# एम . ए . समाजशास्त्र द्वितीय वर्ष

# पेपरः 1

# विकासाचे समाजशास्त्र

# घटक १
# विकासाशी संबंधित असलेल्या संकल्पना
## घटक संरचना

**अनुक्रमणिका**

**१.0 घटकांची उद्दिष्टे**

**१.१ प्रस्तावना**

**१.२ विषय विवेचन**

**१.२.१ विकासाला अर्थ**

**१.२.२ आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी**

**१.२.३ सामाजिक विकास**

**१.२.४ मानवी विकास**

**१.२.५ शाश्वत विकास**

**१.२.६ विकासाला हक्क**

**१.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न/उपक्रम**

**१.४ सारांश**

**१.५ पारिभाषिक शब्द/शब्दार्थ**

**१.६ संदर्भ सूची**

**१.७ सरावासाठी प्रश्न**

## १.0 घटकांची उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास

१. 'विकास' या संज्ञेचा/संकल्पनेचा अर्थ सांगता येईल.

२. आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी (वाढ) या संकल्पनाचा अर्थ व त्यांच्यातील भेद स्पष्ट करता येईल.

३. सामाजिक विकास, मानव विकास, शाश्वत विकास पर्यायी विकास आणि विकासाला हक्क या संकल्पना समजावून घेता येतील.

## १.१ प्रस्तावना

या ग्रंथात/पुस्तकात तुम्ही विकासाचे समाजशास्त्र या ज्ञानशाखेचा अभ्यास करणार आहात. विकासाचे समाजशास्त्र ही समाजशास्त्राची एक शाखा आहे. या शाखेत सामाजिक-आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा अभ्यास केला जातो. तिच्यात विकासाच्या प्रक्रियेवर प्रभाव

टाकणाऱ्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक इत्यादी घटकांचे विश्लेषण केले जाते. प्रा. ई. नागल (Prof. E. Nagal) यांच्या मते विकासाचे समाजशास्त्र हे सामाजिक व आर्थिक विकासाशी संबंधित आहे. डॉ. आर. दत्ता यांच्या मतानुसार विकासाचे समाजशास्त्र हे क्रिया व्यवस्थेच्या विकासाशी (development of the action system) संबंधित आहे. जी. आर. मदान यांच्या मते विकासाचे समाजशास्त्र ही सामान्य समाजशास्त्राची शाखा असून ती सामाजिक विकासाशी संबंधित आहे.

वरील विवेचनावरून हे लक्षात येते की विकासाचे समाजशास्त्र हे विकास प्रक्रियेच्या अभ्यासाशी संबंधित आहे. आधुनिक काळात जगातील सर्वच देशांमध्ये मानवी जीवनाचा सर्वच क्षेत्रांत विकास घडवून आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत. यातूनच आर्थिक विकास, सामाजिक विकास, राजकीय विकास इत्यादी संकल्पना उदयास आल्या आहेत. विकासाची प्रगती ही सर्वप्रथम आर्थिक क्षेत्रात सुरू झाली आणि तिचा प्रभाव पडून नंतर मानवी जीवनाच्या इतर क्षेत्रांतही (उदा. सामाजिक क्षेत्र, राजकीय क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र, सांस्कृतिक क्षेत्र इत्यादी) विकास घडून येण्यास चालना मिळाली. या विकासाच्या प्रक्रियेवर समाजातील विविध घटकांचा (उदा. आर्थिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, प्रशासकीय, पर्यावरणीय इत्यादी) प्रभाव पडू लागला. तसेच विकास प्रक्रियेचा प्रभाव मानवी वर्तन व मानवी संबंध यावरहा पडू लागला आणि त्यातून सामाजिक परिवर्तन घडून येण्यास चालना मिळाली. अशा या विकास प्रक्रियेवर प्रभाव टाकणाऱ्या घटकांकडे व विकास प्रक्रियेमुळे घडून येत असलेल्या सामाजिक परिवर्तनाकडे समाजशास्त्रज्ञांचे तसेच इतरही सामाजिक शास्त्रज्ञांचे (उदा. अर्थशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, सामाजिक, मानवशास्त्रज्ञ, सामाजिक मानसशास्त्रज्ञ इत्यादी) लक्ष वेधले गेले आणि त्यांनी आर्थिक-सामाजिक विकासाला (Social economic development) अभ्यास सुरू केला. यातूनच विकासाचे समाजशास्त्र ही शाखा उदयास आली. अशा या शाखेचा परिचय या ग्रंथात तुम्ही करून घेणार आहात.

## १.२ विषय विवेचन

कोणत्याही विज्ञानाचे (शास्त्राचे) यथार्थ आकलन होण्यासाठी सर्वप्रथम त्या विज्ञानात रूढ झालेल्या व वारंवार वापरल्या जाणाऱ्या विविध संकल्पना (Concepts) समजावून घेणे आवश्यक ठरते, त्यामुळे विकासाचे समाजशास्त्र या विज्ञान शाखेचे यथार्थ आकलन होण्यासाठी या विज्ञानात रूढ झालेल्या व वारंवार वापरल्या जाणाऱ्या संकल्पना समजावून घेणे उचित ठरते. म्हणून या ग्रंथांच्या पहिल्या घटकात (प्रकरणात) तुम्ही विकासाशी संबंधित असलेल्या विविध संकल्पना सर्वप्रथम समाजावून घेणार आहात.

विषय विवेचनाच्या सोयीसाठी या घटकाचे तीन विभाग पाडले आहेत. पहिल्या विभागात (१.२.१) विकास या संज्ञेचा अर्थ सांगितलेला आहे. दुसऱ्या विभागात (१.२.२) आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी (वाढ) या संकल्पनांचा अर्थ सांगून त्यांच्यातील भेद स्पष्ट केलेला आहे. तर तिसऱ्या विभागात (१.२.३) सामाजिक विकास, मानवी विकास, शाश्वत विकास, पर्यायी विकास, विकासाला हक्क  या संकल्पना स्पष्ट केलेल्या आहेत.

यानंतर तुम्ही या तीन विभागांतर्गत येणाऱ्या विषयांचे विवेचन किंवा स्पष्टीकरण अभ्यासणार आहात.

### १.२.१ विकासाला अर्थ

या ठिकाणी आपण सर्वप्रथम विकास या संज्ञेचा किंवा संकल्पनेचा अर्थ समजावून घेऊ या. विकास ही संज्ञा वाढ किंवा वृद्धी (Growth), प्रगती किंवा उन्नती (Progress), विस्तार (extent), परिवर्तन किंवा बदल (change) इत्यादी अर्थाने वापरली जाते, त्यामुळे एखाद्या गोष्टीचा विकास होणे म्हणजे तिची वाढ होणे असा अर्थ सांगता येतो. विकास ही एक प्रक्रिया (process) असून कोणत्याही गोष्टीचा विकास हा विविध अवस्थांमधून किंवा टप्प्यांतून (Stages or steps) होत असतो, त्यामुळे विकास म्हणजे एखादी विशिष्ट अवस्था किंवा टप्पा गाठणे असाही अर्थ होतो. विकासाच्या प्रक्रियेतील पुढची अवस्था ही अगोदरच्या अवस्थेपेक्षा अधिक उन्नत किंवा प्रगत असते. त्यामुळे ''विकास म्हणजे अधिक प्रगत'' गोष्ट करण्याची प्रक्रिया होय. (Development is the process of creating something more advanced) असे म्हणता येते.

ऑक्सफर्ड शब्दकोशात विकासाला अर्थ पुढीलप्रमाणे सांगितला आहे ''विकास ही अधिक मोठे होण्याची, अधिक सामर्थ्यवान होण्याची अधिक चांगले होण्याची प्रक्रिया आहे किंवा काहीतरी असे करण्याची प्रक्रिया आहे. (Development is the process of becoming bigger, stronger, better etc. or making something do this.)

सामाजिक शास्त्रांमध्ये विकास उत्क्रांती (evolution), क्रांती (revolution), प्रगती (progress), सुधारणा (reform) यांच्याप्रमाणे सामाजिक परिवर्तनाचे एक रूप (form) मानले जाते. ''समाजाच्या कोणत्याही क्षेत्रात इच्छित किंवा अपेक्षित दिशेने परिवर्तन घडून येणे म्हणजे विकास होय.'' असा अर्थ सामाजिक शास्त्रांमध्ये घेतलेला दिसतो. आर्थिक विकास, सामाजिक विकास, राजकीय विकास, शैक्षणिक विकास, सांस्कृतिक विकास इत्यादी शब्दप्रयाग याच अर्थाने वापरले जातात. अमेरिकन समाजशास्त्रज्ञ टालकॉट पार्सन्स या संदर्भात म्हणतात की, ''विकासाला संबंध हा अशा बदलांशी आहे जे बदल आर्थिक, सामाजिक व राजकीय संस्थांमध्ये झालेले दिसून येतात.'' विकासाच्या प्रक्रियेत होणारे बदल हे प्रगतीशील स्वरूपाचे असतात. म्हणून ''विकास म्हणजे प्रगतीशील बदल (progressive changes)'' असा थोडक्यात अर्थ सांगता येतो. आर्थिक विकास, सामाजिक विकास, राजकीय विकास इत्यादी संज्ञा हाच अर्थ सूचित करतात. या सर्वांमध्ये आर्थिक विकासास विशेष महत्त्व दिले जाते. कारण इतर क्षेत्रातील विकास हा बऱ्याच प्रमाणात आर्थिक विकासावर अवलंबून असतो. त्यामुळे व्यवहारात सर्वसामान्य माणूस विकास म्हणजे आर्थिक विकास असाच अर्थ घेतो. तथापि, हा अर्थ अत्यंत संकुचित स्वरूपाचा आहे.

आज विकास ही संज्ञा अत्यंत व्यापक अर्थाने वापरली जाते. यादृष्टीने संयुक्त राष्ट्रसंघाच्या तज्ज्ञ समितीने विकासाची केलेली पुढील व्याख्या अधिक समर्पक, समावेशक व सर्वमान्य होईल अशी आहे.

''विकासाला संबंध मानवाच्या जीवनाच्या सामाजिक स्थितीतील सुधारणेशी आहे. त्यामुळे विकास म्हणजे केवळ आर्थिक वृद्धी नव्हे तर वृद्धीबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, संस्थात्मक तसेच आर्थिक बदल होय.'' (Development concerns not only man's

material needs but also the improvement of the social conditions of life. Development is therefore, not only economic growth but growth change, social, cultural and institutinal as well as economic.)

वरील विवेचनाच्या आधारे विकास या संकल्पनेच्या अर्थाविषयी पुढील मुद्दे सांगता येतात.

* विकास ही वाढ, विस्तार, प्रगती, बदल इत्यादी घडून येण्याची एक प्रक्रिया आहे.
* या प्रक्रियेतील बदल ह प्रागतिक (progressive) स्वरूपाचे असतात.
* या प्रक्रियेत मानवी जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इ. क्षेत्रात अपेक्षित किंवा इच्छित दिशेने बदल होतात.
* विकास प्रक्रियेमुळे मानवी जीवनाच्या सामाजिक स्थितीत सुधारणा होते.

(टीप - या घटकाच्या पुढील दोन विभागात आपण आर्थिक विकास, सामाजिक विकास, मानवी विकास, शाश्वत विकास इत्यादी संकल्पना समजावून घेणार आहोत. या संकल्पना अभ्यासल्यानंतर विकास या संज्ञेचा अर्थ अधिक स्पष्ट स्वरूपात तुमच्या लक्षात येईल.)

**१.२.२ आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी** (Economic development and Economic growth) –

विकास या संज्ञेचा अर्थ समजावून घेतल्यानंतर आता तुम्ही विकासाशी संबंधित असलेल्या आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी या दोन संकल्पना समजावून घेणार आहात तसेच त्या दोन्हीतील भेदही अभ्यासणार आहात.

त्यासाठी प्रथम विकसित देश, अविकसित देश व अल्पविकसित देश या संज्ञा समजावून घेऊ. आधुनिक काळात जगातील सर्वच देश हे आपला आर्थिक विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. आर्थिक विकासाच्या दृष्टीकोनात जगातील देशांची विभागणी तीन गटात केली गेली.

**१) विकसित देश** (Developed Contries) –

ज्या देशांचे दरडोई वास्तविक उत्पन्न (per capita real income) हे तुलनात्मकदृष्ट्या खूपच जास्त आहे त्यांना विकसित देश म्हणतात. उदा. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, जपान, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, अमेरिका.

**२) अविकसित देश** (Undeveloped countries) –

ज्या देशांचे दरडाई वास्तविक उत्पन्न खूपच कमी आहे. त्यांना अविकसित देश म्हणतात. उदा. उत्तर व दक्षिण ध्रुवीय प्रदेश, सहारा.

**३) अल्पविकसित देश** (Under developed countries) –

ज्या देशांचे दरडोई वास्तविक उत्पन्न हे विकसित देशांच्या तुलनेत कमी आहे; पण

अविकसित देशांच्या तुलनेत जास्त आहे त्यांना अल्पविकसित देश म्हणतात. उदा. भारत, चीन, पाकिस्तान, थायलंड, पनामा, युगांडा इत्यादी. अल्पविकसित देशांना अगोदर मागासलेले (backward) किंवा गरीब (poor) देश असेही म्हटले जाई. तथापि 'मागासलेला' हा शब्द नवात्मक व तुच्छतादर्शक असून, तो अर्थव्यवस्थेची स्थितिशिलता, दर्शविते म्हणून आज मागासलेला हा शब्दप्रयोग टाळला जातो. त्याऐवजी अल्पविकसित देशांसाठी विकसनशील देश (Developing countries) ही संज्ञा वापरली जाते. देशात आर्थिक विकासासाठी आवश्यक असणारी सामग्री उपलब्ध असून जेथे विकासाची प्रक्रिया सुरू झाली आहे व तो देश विकासाच्या वाटेवर अग्रेसर होत आहे. त्यास विकसनशील देश असे म्हणतात. अशा या अल्पविकसित व विकसनशील देशात आर्थिक विकासाच्या संभाव्यता (Potentialities) विद्यमान असतात तर अविकसित देशात त्या नसतात.

दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील विकसित, अविकसिन व विकसनशील अशा सर्व देशांत आर्थिक विकासाची प्रेरणा प्रबळ झालेली दिसते. पूर्वी अनेक देश विशेषत: आशिया-आफ्रिका खंडातील देश हे पारतंत्र्यात होते. दुसऱ्या महायुद्धानंतर हे देश स्वतंत्र झाले. या नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांचे दरडोई वास्तविक उत्पन्न हे विकसित देशांच्या तुलनेत खूपच कमी होते. तसेच या देशांमध्ये दारिद्र्य, बेकारी, आर्थिक विषमता, निम्न दर्जाचे राहणीमान, निरक्षरता, अज्ञान, अंधश्रद्धा, अनारोग्य (ill health), रूढीप्रियता, दैववादी वृत्ती इत्यादी समस्या गंभीर स्वरूपात होत्या. या समस्यांची सोडवणूक करून या देशांचा आर्थिक विकास घडवून आणणे व त्यांना विकसित देशांच्या बरोबरीने आणणे व त्याचबरोबर विकसित देशांतील आर्थिक विकासाला वेग (गती) स्थिर ठेवणे यासाठी प्रयत्न सुरू झाले. यातूनच आर्थिक विकासाला अर्थ, आर्थिक विकासाचे मोजमाप, आर्थिक विकास साध्य करण्याचे मार्ग, आर्थिक विकासाचे प्रतिमान (model) इत्यादी विषयीचे विचार मांडले जाऊ लागले. या ठिकाणी तुम्ही आर्थिक विकासाची संकल्पना समजावून घेण्यासाठी त्याची व्याख्या, वैशिष्ट्ये यांचा अभ्यास करणार आहात.

**आर्थिक विकासाची व्याख्या** (Definition of economic development) **–**

साधारणपणे आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी या दोन्ही संज्ञा समान अर्थाने वापरल्या जातात. तथापि, बहुसंख्य अर्थशास्त्रज्ञांनी या दोन्हीमध्ये फरक केलेला आहे. या ठिकाणी आपण आर्थिक विकासाची व्याख्या व वैशिष्ट्ये अभ्यासणार असून, त्यानंतर आर्थिक वृद्धी म्हणजे काय हे पाहणार आहोत व शेवटी त्यांच्यातील भेद व फरक अभ्यासणार आहोत. आर्थिक विकास म्हणजे काय हे समजण्यासाठी काही मान्यवर अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकासाच्या दिलेल्या व्याख्या विचारात घेऊ या.

**१) प्रो. डब्ल्यू. आर्थर लेविस** – दरडोई उत्पन्नातील वाढ म्हणजे आर्थिक विकास होय. ही वाढ नैसर्गिक संपत्ती व मानवी व्यवहार यावर अवलंबून असते.

**२) प्रो. मायर आणि बाल्डविन** – आर्थिक विकास ही एक अशी प्रक्रिया आहे की जिच्याद्वारे एखाद्या अर्थव्यवस्थेच्या वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नात दीर्घकाळपर्यंत वाढ होते आणि जर विकासाला दर हा लोकसंख्यावाढीच्या दरापेक्षा जास्त असेल तर दरडोई वास्तविक उत्पन्नातही वाढ होईल.

**३) बेंजामिन हिगिन्स** – आर्थिक विकास म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात होणारी अशी वाढ की जिचा लाभ विविध व्यावसायिक व उत्पन्न गटांना प्राप्त होतो व जी पुरेशा दीर्घकालापर्यंत चालू राहून सतत वर्धिष्णू असते.

**४) सी. पी. किंडलबर्जर** – आर्थिक विकास म्हणजे अधिक उत्पादन आणि ते ज्यामुळे शक्य होते अशा तांत्रिक व संस्थात्मक व्यवस्थेतील बदल होय.

वरील व्याख्यांवरून हे स्पष्ट होते की राष्ट्राच्या वास्तविक उत्पन्नात तसेच दरडोई उत्पन्नात वाढ होणे म्हणजे आर्थिक विकास होय. आर्थिक विकासाबाबतचा हा दृष्टीकोन १९५० पर्यंत स्वीकारला गेला. त्यानंतर मात्र आर्थिक विकास ही संज्ञा अधिक व्यापक अर्थाने वापरली जाऊ लागली. आर्थिक विकासाला संबंध मानवाच्या भौतिक कल्याणाशी जोडला जाऊ लागला. इ. स. १९५० मध्येच जेकब विनर या शास्त्रज्ञाने सर्वप्रथम असे मत मांडले की केवळ दरडोई उत्पन्न वाढणे म्हणजे आर्थिक विकास नव्हे. एखाद्या देशातील गरिबीचे प्रमाण जोपर्यंत कमी होत नाही तोपर्यंत तो देश आर्थिकदृष्ट्या प्रगत आहे, असे म्हणता येत नाही. त्याचे हे मत प्रथम दुर्लक्षिले गेले. तथापि १९५० व १९६०च्या दशकात ज्या विकसनशील देशांतील दरडोई उत्पन्न वाले व त्यांच्या अर्थव्यवस्थेत रचनात्मक बदल घडून आले अशा देशातील सुमारे ४० टक्के जनतेस विकासाचे फायदे मिळाले नाहीत. त्यामुळे अनेक अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकासाची वरील पारंपरिक संकल्पना नाकारली व आर्थिक विकासाची नवीन म्हणजेच कल्याणकारी दृष्टिकोनातून व्याख्या दिली. उदा.

**५) ओकन आणि रिचर्डसन** – आर्थिक विकास म्हणजे दीर्घकाळ सतत चालू राहणारी भौतिक कल्याणातील अशी सुधारणा की जिचा प्रत्यय समाजाला प्राप्त होणाऱ्या वस्तू व सेवा यांच्या वाढत्या स्त्रोतात प्रतीत होतो.

**६) किंडलबर्जर व ब्रुस हेरीक** – आर्थिक विकास म्हणजे कनिष्ठ उत्पन्न पातळी असणाऱ्या व्यक्तींच्या भौतिक कल्याणात सुधारणा घडवून आणणे दारिद्र्य, निरक्षरता, रोगराई अकाली मृत्यू इत्यादींचे उच्चाटन करणे होय. तसेच कृषी क्षेत्राऐवजी उद्योगक्षेत्रातील उत्पादनात वाढ झाली पाहिजे. अर्थव्यवस्थेतील उत्पादक रोजगार हा काम करणाऱ्या वयोगटातील लोकसंख्येतून (working age population) निर्माण झाला पाहिजे. अर्थव्यवस्थेतील आर्थिक व आर्थिकेतर निर्णय सामान्य लोकांच्या कल्याणात वाढ करण्यासाठी घेतले जावेत.

**७) मायकेल पी टोडारो** – ''आर्थिक विकास ही एक बहुआयामी (multi dimensional) प्रक्रिया असून, तिच्यात सामाजिक संरचना, प्रवृत्ती व राष्ट्रीय संस्था यांच्यात मोठे बदल होणे, आर्थिक विषमता व दारिद्र्य यांचे निर्मूलन होणे इत्यादीचा अंतर्भाव होते. व्यक्तीच्या व समाजाच्या मूलभूत गरजा व इच्छा पूर्ण होऊन त्यांच्या भौतिक व अभौतिक जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी संपूर्ण समाजव्यवस्थेत सार्वत्रिक बदल होणे अभिप्रेत आहे.''

थोडक्यात – वरील विवेचनावरून हे लक्षात येते की आर्थिक विकासाला संकल्पनेबाबत दोन दृष्टीकोन आहेत. पहिल्या पारंपरिक दृष्टिकोनानुसार आर्थिक विकास होणे म्हणजे राष्ट्रीय तसेच दरडोई उत्पन्नात वाढ होणे व संस्थात्मक बदल होणे होय. याउलट नवीन कल्याणकारी

दृष्टिकोनानुसार आर्थिक विकास होणे म्हणजे उत्पन्नवाढ व संस्थात्मक बदलाबरोबरच व्यक्ती व समाज यांच्या भौतिक व अभौतिक (किंवा आर्थिक व सामाजिक - सांस्कृतिक) कल्याणात सुधारणा होणे होय.

**⁕ आर्थिक विकासाची वैशिष्ट्ये** (Characteristics of economic development)

वरील विवेचनाच्या आधारे आपणास आर्थिक विकासाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतात.

**१) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ –** आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत राष्ट्राच्या वास्तविक उत्पन्नात (real income) सतत वाढ होत असते. राष्ट्राचे उत्पन्न दोन प्रकारे मोजता येते अ) मुद्रेच्या (पैशाच्या) रूपात ब) वस्तू व सेवांच्या स्वरूपात. एखाद्या देशात एका वर्षाच्या कालावधीत अंतिम वस्तू व सेवा यांचे जे उत्पादन होते त्या मुद्रेतील (पैशातील) मूल्य म्हणजे मौद्रिक राष्ट्रीय उत्पन्न (Monetary National Income) होय. याउलट देशात एका वर्षात अंतिम वस्तू व सेवांच्या स्वरूपात जे उत्पादन होते त्यास वास्तविक राष्ट्रीय उत्पन्न (Real National Income) असे म्हणतात. आर्थिक विकासात केवळ राष्ट्रीय वास्तविक उत्पन्नच विचारात घेतले जाते. मौद्रिक राष्ट्रीय उत्पन्न हे विकासाचे मापदंड ठरू शकत नाही. कारण देशाचे वास्तविक राष्ट्रीय उत्पन्न (वस्तू व सेवा) स्थिर असूनही केवळ भाववाढ होत गेल्यास देशाचे मौद्रिक उत्पन्न वाढत जाईल व त्यावरून विकासाबाबतचा काढलेला निष्कर्ष चुकीचा ठरेल. येथे आणखीन एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे व तो म्हणजे विकासाचे मोजमाप करताना मिश्र राष्ट्रीय उत्पन्नाऐवजी (Mixed National Income) शुद्ध राष्ट्रीय उत्पन्न (Net National Income) विचारात घेतले जाते. कारण शुद्ध राष्ट्रीय उत्पन्नावरूनच देशाच्या विकासाला खरा अर्थबोध हातो. मिश्र राष्ट्रीय उत्पन्नात स्थिर भांडवलाचा झीज खर्च वजा केला की शुद्ध राष्ट्रीय उत्पन्न मिळते.

**२) दरडोई उत्पन्नात वाढ –** आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत दरडोई उत्पन्नात वाढ होत असते. काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते (उदा. आर्थर ले;वस, डब्ल्यू. डब्ल्यू. रोस्टो इ.) आर्थिक विकास ही राहणीमान उंचावणे व दारिद्र्य निर्मूलन करणे यासाठीची दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे आर्थिक विकासाला निकष ठरविताना राष्ट्रीय वास्तविक उत्पन्नाऐवजी दरडोई उत्पन्नातील वा यास महत्त्व द्यावे. राष्ट्रीय वास्तविक उत्पन्नास देशाक्षच्या लोकसंख्येने भागले असता दरडोई वास्तविक उत्पन्नाच्या आधारे विकासाचे मोजमाप करताना देशांच्या वास्तविक उत्पन्नातील वाढ लक्षात घेतली जाते;पण लोकसंख्यावाढीचा विचार केला जात नाही. समजा देशाचे वास्तविक उत्पन्न ३ टक्क्यांनी वाढते व लोकसंख्याही ३ टक्क्यानेच वाढते. अशा स्थितीत दरडोई वास्तविक उत्पन्न स्थिर राहील. त्यामुळे तयास आर्थिक विकास म्हणता येणार नाही. जेव्हा वास्तविक उत्पन्नातील वाढ ही लोकसंख्येतील वाढीपेक्षा जास्त असते तेव्हा दरडोई वास्तविक उत्पन्नात वाढ होते आणि तेव्हाच खऱ्या अर्थाने विकास होत असतो.

तथापि दरडोई वास्तविक उत्पन्नाच्या आधारे आर्थिक विकासाचे मोजमाप करण्यातही अनेक अडचणी आहेत. दरडोई राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ही शेवटी सरासरी आहे. ही सरासरी

काढताना एकूण राष्ट्रीय उत्पन्न व लोकसंख्या याचाच विचार होतो. राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप लोकसंख्येत कसे झाले आहे याचा विचार होत नाही. राष्ट्रीय उत्पन्न वाढूनदेखील सामान्य लोकांचे जीवनमान उंचावले असे म्हणता येत नाही; तथापि सामान्य लोकांचे जीवनमान उंचावणे हा विकासाला हेतू आहे. त्यामुळे आर्थिक विकासाचे मोजमाप करताना राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप (वितरण) ही लक्षात घेणे गरजेचे वाटते; परंतु तसे करावयाचे झाल्यास 'वाटप' हा निकष खूपच गुंतागुंतीचा होईल. उत्पन्नाचे वाटप हा प्रत्येक राष्ट्राचा अंतर्गत प्रश्न असून आज बहुतेक राष्ट्रे कल्याणकारी दृष्टिकोनातून हा प्रश्न हाताळताना दिसतात. म्हणून सध्यातरी दरडोई उत्पन्नातील वाढ हाच विकासाला अधिक यथार्थ निकष मानणे योग्य.

**३) भौतिक कल्याणात वाढ –** आर्थिक विकासात लोकांच्या भौतिक (आर्थिक) कल्याणात वाढ होणे अभिप्रेत आहे. काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते देशात आर्थिक विकास किती झाला हे त्या देशातील लोकांच्या भौतिक कल्याणात किती वाढ झाली याआधारे ठरविले पाहिजे. लोकांना वस्तू व सेवांचा अधिकाधिक लाभ मिळू लागल्यास त्यांना सुखासमाधानाची अनुभूती येते. ही अनुभूती म्हणजेच भौतिक वा आर्थिक कल्याण होय. लोकांच्या भौतिक कल्याणात भर पडत जाणे हेच खरे आर्थिक विकासाचे गमक आहे. राष्ट्रीय तसेच दरडोई उत्पन्न वाढूनही त्यातील हिस्सा केवळ मूठभर लोकांना मिळत असेल व बहुसंख्य लोक त्यापासून वंचित रहात असतील तर अशा स्थितीस आर्थिक विकास म्हणता येणार नाही. जर उत्पन्नाचे न्याय्य वाटप होत असेल तरच लोकांच्या कल्याणात भर पडून आर्थिक विकास झाला असे म्हणता येते. अर्थात टीकाकारांच्या मते भौतिक कल्याण ही अमूर्त व भावनात्मक संकल्पना असल्याने तिचे मोजमाप करणे कठीण आहे. तथापि, तेवढ्यावरून आर्थिक विकासाचे गमक/मापदंड म्हणून भौतिक कल्याणास असलेले महत्त्व कमी होत नाही.

**४) सुधारणात्मक प्रक्रिया –** आर्थिक विकास ही सुधारणात्मक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत परस्परावलंबी अनेक आर्थिक घटक (शक्ती) सतत कार्यरत असतात. त्यामुळे आर्थिक क्षेत्रात बदल वा सुधारणा होत असतात. हे पुढीलप्रमाणे आहेत.

अ) नवीन किंवा जादा साधनसंपत्तीचा शोध घेऊन तिचा वापर होतो

ब) भांडवलात वाढ होणे व त्याचा पुरवठाही वाढणे.

क) उत्पादनात सुधारित तंत्राचा वापर होणे.

ड) लोकसंख्या वाढ होणे, लोकांच्या आवडी-निवडी बदलणे, त्यांच्या गरजा वाढणे, त्यामुळे वस्तूंची मागणी वाढणे.

इ) कामगार, तंत्रज्ञ, व्यवस्थापक यांच्या कौशल्यात सुधारणा होणे.

फ) संस्था व संघटनांत प्रगतशील बदल होणे इ.वरील सर्व घटकांचा प्रभाव पडून राष्ट्रीय उत्पन्न वाढत असते.

**५) गतिशील प्रक्रिया –** आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रात उत्पादकतेची उच्च पातळी गाठावयाची असते. त्यासाठी विकासाची प्रक्रिया ही गतिशील

असावी लागते. विकास प्रक्रियेत बचत, गुंतवणूक, वस्तूंची मागणी व पुरवठा, उत्पन्न, रोजगार इत्यादी घटकांत सतत बदल होत असतात व या बदलांची गती वेगवेगळ्या काळात वेगवेगळी असते. त्यामुळे आर्थिक विकासाचे स्वरूप गतिशील असते.

६) दीर्घकालीन प्रक्रिया – आर्थिक विकास ही अल्पकाल नसून दीर्घकाल चालणारी प्रक्रिया आहे. अल्पकाळात केवळ व्यापारचक्रुळे (तेजी मंदीच्या चक्रामुळे) देखील राष्ट्रीय उत्पन्न वाढू शकते; पण या वाढीस आर्थिक विकास म्हणता येणार नाही. केवळ दोनचार वर्षाच्या काळात राष्ट्रीय उत्पन्नात झालेली वाढ म्हणजे आर्थिक विकास नव्हे. त्यासाठी २० ते २५ वर्षांच्या दीर्घकालावधीत देशाच्या वास्तविक उत्पन्नात वाढ झाली पाहिजे.

आर्थिक वृद्धी (एलेपोळल ॠेुींह)

आर्थिक विकास ही संकल्पना समजावून घेतल्यानंतर आर्थिक वृद्धी ही संकल्पना समजावून घेऊ. सामान्यपणे या दोन्ही संज्ञा दैनंदिन व्यवहारात समान अर्थानेच वापरतात. प्रा. लेविस, बुइल्समन, मायर व बाल्डविन इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी या दोन्ही संज्ञा, समान अर्थानेच वापरलेल्या आहेत. तथापि अलीकडील अनेक अर्थशास्त्रज्ञांनी उदा. शूपिंटर, श्रीमती ऊर्सला हिक्स, बोन, जे. के. मेहता, एलन बरेरी इत्यादी मात्र या दोन्ही संकल्पनाक्षत भेद करून त्या वेगवेगळ्या अर्थाने वापरलेल्या आहेत.

आर्थिक वृद्धीचा अर्थ – एखाद्या अर्थव्यवस्थेत प्रदीर्घ काळात मंदगतीने व सातत्याने होणारी वाढ म्हणजे आर्थिक वृद्धी होय. आर्थिक वृद्धीच्या काळात देशातील लोकसंख्या वाढीबरोबरच श्रमिकांची संख्या, कृषी व औद्योगिक उत्पादन, निर्यात इत्यादीत वाढ होते व त्यामुळे दशांतर्गत राष्ट्रीय उत्पन्नातही (ॠीेी ऊेाशीींळल झीेर्वीलींळेप – ॠऊझ) भरीव वाढ होते. तसेच बचत व गुंतवणूक, विमा व बँकिंग सुविधा, माहिती–तंत्रज्ञान यामध्येही भरीव वाढ होते. एका सालात देशामध्ये उत्पादीत झालेल्या वस्तू व सेवा यांचे मुद्रेतील (पैशातील) एकूण मूल्य म्हणजे त्या सालातील स्थूल देशांतर्गत उत्पादन होय. आर्थिक वृद्धीचा विचार करताना गत सालातील एकूण देशांतर्गत उत्पन्नाशी तुलना करता या साली उत्पन्न किती वाढले आहे ही बाब विचारात घेतली जाते. म्हणजे यातील वास्तविक बदल विचारात घेतला जातो. वस्तू व सेवांच्या स्थिर किंमती विचारात घेऊन हा बदल मोजला जातो.

आर्थिक वृद्धीची व्याख्या – आर्थिक वृद्धीचा अर्थ अधिक स्पष्टपणे समजण्यासाठी आर्थिक वृद्धीच्या अर्थशास्त्रज्ञांनी दिलेल्या व्याख्या विचारात घेऊ या.

१) जे. ए. शूपिंटर – आर्थिक वृद्धी म्हणजे दीर्घकाळात क्रमशः तसेच सातत्याने होणारे परिवर्तन होय. हे परिवर्तन होणाऱ्या वाढीमुळे घडून येते.

२) सी. पी. किंडलबर्जर – आर्थिक वृद्धी म्हणजे अधिकाधिक उत्पादन होय. या उत्पादनात अधिक अदान घटक (ळेश ेींिीीं) व अधिक कार्यक्षमता (सीशरींशी शषषळलळशपलू) अपेक्षित असते.

३) जॉन फ्रीडमन – अर्थव्यवस्थेच्या संरचनेत बदल न होता तिच्या एक किंवा अनेक क्षेत्रांत झालेला विस्तार म्हणजे आर्थिक वृद्धी होय.

**४) सायमन कुझनेटस –** आर्थिक वृद्धी ही लोकसंख्येला विविध प्रकारच्या वस्तू पुरविण्याच्या क्षमतेतील दीर्घकालीन वाढ असून, ही वाढती क्षमता त्यासाठी आवश्यक असलेल्या तंत्रज्ञानातील प्रगती व संस्थात्मक व तात्त्विक समायोजन यावर आधारलेली असते.

## आर्थिक वृद्धीची वैशिष्ट्ये –

वरील विवेचनाच्या आधारे आपणास आर्थिक वृद्धीची पुढील वैशिष्ट्ये सांगतात येतात.

**१) एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ –** आर्थिक वृद्धी म्हणजे देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे होय. आर्थिक वृद्धीत देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात म्हणजेच अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांच्या एकूण उत्पादनात वाढ होत असते.

**२) जलद किंवा मंद –** आर्थिक वृद्धी ही जलद किंवा मंद स्वरूपाची असू शकते. उदा. मागीलवर्षी एकूण राष्ट्रीय उत्पन्न १० टक्क्यांनी वाढले असेल व यावर्षी ते १५ टक्क्यांनी वाढले असेल तर या वाढीस जलद आर्थिक वाढ असे म्हणता येईल. याउलट मागीलवर्षी एकूण राष्ट्रीय उत्पन्न १० टक्क्यांनी वाढले असेल व यावर्षी मात्र केवळ ३ टक्क्यांनी वाढले तर या वाढीस मंद आर्थिक वाढ असे म्हणता येईल. थोडक्यात आर्थिक वृद्धी म्हणजे एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे होय. मग ती वाढ जास्त किंवा कमी असू शकते.

**३) दरडोई उत्पन्न वाढतेच असे नाही –** आर्थिक वृद्धीत देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते हे खरे. तथापि त्यामुळे देशातील लोकांचे दरडोई उत्पन्न वाढेलच असे नाही. आर्थिक वृद्धीत देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न वाढले तरी दरडोई उत्पन्न हे कधी कमी होईल तर कधी ते स्थिर (म्हणजेच पूर्वीइतकेच) राहू शकेल. देशातील प्रत्येक व्यक्तीस एकूण राष्ट्रीय उत्पन्नात जो सरासरी वाटा (हिस्सा) मिळतो त्यास दरडोई उत्पन्न असे म्हणतात. देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नास देशाच्या एकूण लोकसंख्येने भागले असता दरडोई उत्पन्न मिळते. दरडोई उत्पन्न काढण्याचे सूत्र पुढीलप्रमाणे मांडले जाते.

**दरडोई उत्पन्न – ह्न्ह्न**

आर्थिक वृद्धीत एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. मात्र दरडोई उत्पन्नात वाढ होईलच असे नाही. ते वाढेल, कमी होईल किंवा पूर्वीइतकेच राहील. हा मुद्दा पुढील उदाहरणाच्या आधारे समजावून घेता येईल. समजा, देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे रु. १००० आहे व देशाची एकूण लोकसंख्या ही २०० आहे तर वरील सूत्रानुसार दरडोई उत्पन्न हे रु. ५ असेल. समजा देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न रु. १००० वरून रु. १६०० इतके वाढले व देशाची लोकसंख्या २०० होती ती ४०० इतकी झाली तर दरडोई उत्पन्न हे रु. ४ इतके राहील. म्हणजे दरडोई उत्पन्न हे घटले कारण पूर्वी ते रु. ५ होते. आता ते रु. ४ इतके झाले. तथापि दरडोई उत्पन्न घटले असले तरी एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे रु. १००० वरून रु. १६०० इतके वाढले असल्याने देशात आर्थिक वृद्धी झाली असेच म्हणावे लागते.

तसेच समजा देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे रु. १००० वरून रु. २००० इतके वाढले व लोकसंख्या ही २०० वरून ४०० इतकी वाढली तर दरडोई उत्पन्न हे रु. ५ इतके होईल

म्हणजेच दरडोई उत्पन्न पूर्वीइतकेच (स्थिर) राहिले असे होईल. तथापि ते स्थिर राहिले असले तरी आर्थिक वृद्धी झाली नाही असे नव्हे. अशावेळीही आर्थिक वृद्धी झाली असे म्हणावे लागते. कारण दरडोई उत्पन्न स्थिर राहिले तरी एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे रु. १००० वरून रु. २००० इतके वाढले असल्याने देशात आर्थिक वृद्धी झाली असेच म्हणावे लागते. थोडक्यात दरडोई उत्पन्न स्थिर राहिले किंवा घटले तरीही आर्थिक वृद्धी होऊ शकते.

४) समाधानकारक किंवा असमाधानकारक - आर्थिक वृद्धी ही समाधानकारक किंवा असमाधानकारक असू शकते. देशात आर्थिक वृद्धी झाली की नाही हे ठरविण्याची कसोटी दरडोई उत्पन्न घेऊ शकत नाही. तथापि, झालेली आर्थिक वृद्धी ही समाधानकारक आहे की नाही हे ठरविण्याची कसोटी म्हणून दरडोई उत्पन्न तवचारात घेता येते. देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न वाढले असेल; पण त्याप्रमाणात लोकसंख्या वाढली नसेल तर दरडोई उत्पन्नदेखील वाढेल. अशावेळी देशात झालेली आर्थिक वृद्धी ही समाधानकारक आहे असे मानले जाते. याउलट, देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न वाढले व एकूण राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा लोकसंख्या जास्त प्रमाणात वाढली तर दरडोई उत्पन्न घटेल. अशा स्थितीत एकूण राष्ट्रीय उत्पन्न वाढल्याने आर्थिक वृद्धी झाले असेच मानले जाते; पण ही वृद्धी असमाधानकारक आहे असे मानले जाते.

५) उणे (नकारात्मक) आणि शून्य आर्थिक वृद्धी - आर्थिक वृद्धी उणे स्वरूपाची तसेच शून्य स्वरूपाची असू शकते. देशात उणे (पशसरींळींश) आर्थिक वृद्धी झाली असे मानले जाते. जर देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे पूर्वीइतकेच (स्थिर) राहिले तर देशात शून्य आर्थिक वृद्धी झाली असे मानले जाते.

आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी यांच्यातील फरक - वरील विवेचनावरून आर्थिक वृद्धी या संकल्पनेचा अर्थ लक्षात येतो. आर्थिक वृद्धीची संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी या दोन संकल्पनातील फरक (भेद) पुढील मुद्दयांच्या आधारे समजावून घेऊ या.

१) उत्पन्नात वाढ - वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे म्हणजे आर्थिक विकास होय. याउलट, एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे म्हणजे आर्थिक वृद्धी होय.

२) दरडोई उत्पन्न - अनेक अर्थशास्त्रज्ञांनी (उदा. सायर व बाल्डवीन व प्रा. लुई) आर्थिक विकास म्हणजे दरडोई उत्पन्नात वाढ होणे असे मानले आहे. त्यामुळे आर्थिक विकासात दरडोई उत्पन्नात वाढ होत असते असे म्हणता येते. याउलट, आर्थिक वृद्धीत दरडोई उत्पन्नात वाढ होतेच असे नाही. ते वाढेल, घटेल वा स्थिरही राहू शकेल.

३) बदलाचे स्वरूप - प्रा. जे. के. मेहतांच्या मते आर्थिक वृद्धीमध्ये संख्यात्मक (टींरपींळींरींळींश) बदल घडून येतात. आर्थिक वृद्धीच्या काळात उत्पादन, निर्यात, बचत, गुंतवणूक, तंत्रज्ञान, विमा व बँक सुविधा इत्यादीत संख्यात्मक बदल घडून येतात. याउलट आर्थिक विकासात गुणात्मक (टींरश्रळींरींळींश) बदल घडून येतात. आर्थिक विकासातून वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्याबरोबरच दारिद्य्र निर्मूलन होणे, विषमता कमी होणे, बेकारी कमी होणे, लोकांचे जीवनमान उंचावणे, सामाजिक स्वास्थ्य उंचावणे, शिक्षण प्रसार

होणे इत्यादी गुणात्मक बदल घडून येतात. प्रो. किडलबर्जरच्या मते आर्थिक वृद्धीत केवळ वस्तुगत उत्पादनात वाढ होते. याउलट, आर्थिक विकासात मात्र उत्पादन वाढीबरोबरच उत्पादनाचे तंत्र बदलते तसेच संस्थात्मक बदलही घडून येतात.

४) बदलाची गती – आर्थिक विकासाची गती ही खंडित स्वरूपाची असते तर आर्थिक वृद्धी ही संथगतीने व सातत्याने होते. प्रा. जे. ए. शूपिंटरच्या मते स्थिर अर्थव्यवस्थेत स्वयंप्रेरणेने व खंडित (तुटक) स्वरूपाचा (ींपिींरपशेीी रपव वळीलेपींळपीीी) होणारा बदल म्हणजे आर्थिक विकास होय. अशा बदलांमुळे अगोदरच्या संतुलनाच्या जागी नवीन संतुलन अवस्था येते. अशावेळी संयोजकाच्या नवप्रवर्तनाला विशेष महत्त्व असते. नवीन वस्तूंचे उत्पादन होते किंवा प्रचलित वस्तूंमध्ये सतत सुधारणा होत जाते. याउलट आर्थिक वृद्धीत संथगतीने पण सातत्याने बदल होत असतो. हा बदल बचतींचा दर व लोकसंख्या वाढ यामुळे होतो. परिणामी देशाचे उत्पादन, उत्पन्न, रोजगाराची पातळी वाढत जाते. आर्थिक वृद्धीत नवनिर्मितीचा विचार नसतो.

५) अर्थव्यवस्थेचे स्वरूप – आर्थिक विकासाची संकल्पना ही विकसनशील देशातील स्थितीशील अर्थव्यवस्थेस लागू पडते. याउलट आर्थिक वृद्धीची संकल्पना ही विकसित देशातील गतिशील अर्थव्यवस्थेस लागू पडते. श्रीमती उर्सूला हिक्स यांच्या मते आर्थिक विकास ही संकल्पना अल्पविकसित किंवा विकसनशील देशाला लागू पडते. कारण अशा देशात साधनसामग्रीचा वापर होत नसतो किंवा अपुरा वापर होत असतो तेव्हा या साधनसामग्रीचा वापर करून सरकारला जाणीवपूर्वक विकासाचे प्रयत्न करावे लागतात. याउलट आर्थिक वृद्धी ही स्वयंचलित प्रक्रिया असून, ती विकसित देशांना लागू पडते. या देशांत साधनसामग्रीचा पर्याप्त वापर होत असतो. त्यासाठी सरकारला जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागत नाहीत. मॅडिसन यांनी आर्थिक विकास व आर्थिक वृद्धीचा संबंध उत्पन्न पातळीशी जोडलेला आहे. त्यांच्या मते विकसनशील देशात उत्पन्न पातळीत वाढ होत असेल तर त्यास आर्थिक वृद्धी असे म्हणणे याचाच अर्थ असा की आर्थिक विकासाची संकल्पनाही विकसनशील देशाच्या तर आर्थिक वृद्धीची संकल्पना ही विकसित देशाच्या संदर्भात वापरतात.

६) मदत व मार्गदर्शन – आर्थिक विकास आपोआप होत नाही. त्यासाठी मुद्दाम, जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. आर्थिक विकासास चालना देण्यासाठी सरकारी मदत व मार्गदर्शन यांची गरज असते. याउलट आर्थिक वृद्धी ही आपोआप होत असते. त्यासाठी मुद्दाम जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागत नाहीत. आर्थिक वृद्धीत बाजारयंत्रणेस महत्त्वाचे स्थान असते त्यामुळे त्यासाठी सरकारी मदत व मार्गदर्शन यांची गरज नसते.

७) क्रम व कारण कार्य संबंध – कोणत्याही देशात प्रथम आर्थिक विकास घडून येतो व त्यानंतर आर्थिक वृद्धी होत रहाते. विकासोत्तर काळातही वृद्धी होतच असते. त्यामुळे आर्थिक विकास हे आर्थिक वृद्धीचे कारण ठरते तर आर्थिक वृद्धी ही आर्थिक विकासाचे कार्य/परिणाम (शषषशलीं) ठरते.

१.२.३ सामाजिक विकास (डेलळरश्र वशींशश्रेेशिपीं)

आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी या संकल्पनांनंतर आता तुम्ही या घटकाच्या तिसऱ्या

विभागात सामाजिक विकास, मानव विकास, शाश्वत विकास, पर्यायी विकास व विकासाला हक्क इत्यादी संकल्पना अभ्यासणार आहात.

सामाजिक विकास ही संकल्पना आर्थिक विकास या संकल्पनेहून अधिक व्यापक आहे. आर्थिक विकास या संकल्पनेत राष्ट्राच्या वास्तविक उत्पन्नात वाढ होणे अपेक्षित आहे. याउलट सामाजिक विकास या संकल्पनेत समाजातील सर्व लोकांच्या जीवन जगण्याच्या परिस्थितीत सुधारणा घडून येणे अपेक्षित आहे. समाजातील समस्या व प्रश्न यांची सोडवणूक करून समाजातील सर्वच घटकांच्या जीवनाची गुणवत्ता उंचावण्याची प्रक्रिया म्हणजे सामाजिक विकास होय. सामाजिक विकासाला अर्थ समजण्यासाठी विविध विचारवंतांनी त्याच्या दिलेल्या व्याख्या विचारात घेऊ या.

**सामाजिक विकासाची व्याख्या –**

१) संयुक्त राष्ट्र सामाजिक विकास संशोधन संस्था (United Nations Research Institute for social Development UNRISD) - सामाजिक विकासाला संबंध हा परिवर्तनाच्या अशा प्रक्रियांशी आहे की ज्या मानवी कल्याण, सामाजिक संबंध आणि सामाजिक संस्थांमध्ये सुधारणा घडवून आणतात आणि त्या लोकशाही कारभार व सामाजिक न्याय यांच्या तत्त्वांशी न्याय आधारभूत व सुसंगत असतात.

२) डॉ. राम आहुजा – एका बाजूने मानवी गरजा व आकांक्षा आणि दुसऱ्या बाजूने सामजिक धोरणे व कार्यक्रम यांच्यात अधिक चांगली तडजोड घडवून आणणारी नियमबद्ध संस्थात्मक परिवर्तनाची प्रक्रिया म्हणजे सामाजिक विकास होय.

३) डब्ल्यू. डब्ल्यू. रास्टो – सामाजिक विकास हे सामाजिक संबंधात होणाऱ्या परिवर्तनाचे दुसरे नाव आहे. ज्याची अभिव्यक्ती ही आर्थिक विकासाद्वारे होत असते.

४) व्ही. एस. डिसूझा – सामाजिक विकास ही एक प्रक्रिया असून तिच्यामुळे सापेक्षत: साध्या असलेल्या समाजाचे सापेक्षत: सुधारित समाजात रूपांतरण होत असते.

५) जे. एस. पान्सिओ – सामाजिक विकासाला संबंध हा अशा संबंधाशी व संरचनांशी आहे जो एखाद्या समाजास आपल्या सदस्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यास समर्थ बनवितो.

**सामाजिक विकासाची वैशिष्ट्ये –**

वरील व्याख्यांच्या आधारे आपणास सामाजिक विकासाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतात.

**१) सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया –** सामाजिक विकास ही सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत समाजातील लोकांच्या सामाजिक संबंधात व सामाजिक संस्थांमध्ये परिवर्तन घडवून आणले जाते. साध्या समाजाचे प्रगत समाजात रूपांतरण घडून येते.

**२) सुधाणात्मक परिवर्तन –** सामाजिक विकास ही समाजास सुधारून परिवर्तन घडवून आणणरी प्रक्रिया आहे. सामाजिक विकासाच्या प्रक्रियांच्या समाजातील विविध समस्यांची व प्रश्नांची (उदा. बेकारी, कुपोषण, अनारोग्य, अज्ञान, निरक्षरता, अंधश्रद्धा,

दैववादी वृत्ती, रूढीप्रियता, शोषण, दमन, अन्याय, अत्याचार इत्यादी) सोडवणूक करून लोकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्याचा वा उंचावण्याचा प्रयत्न केला जातो. म्हणजेच त्यांच्या भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धिक, मानसिक गरजांची व आकांक्षांची पूर्तता करून त्यांच्या जीवन जगण्याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणली जाते. त्यामुळे समाजास प्रगत अवस्था (advanced stage) प्राप्त होते.

३) नियोजनबद्ध परिवर्तन – सामाजिक विकासाची प्रक्रिया ही नियोजनबद्ध असते. या प्रक्रियेमध्ये जे सुधारणात्मक परितवर्तन घडवून आणले जाते ते अत्यंत नियोजनबद्धपणे घडवून आणले जाते. त्यासाठी सामाजिक विकासाला एक आराखडा तयार केला जातो. या आराखड्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो.

अ) समाजातील लोकांच्या गरजा व आकांक्षा ओळखून त्यांचे मूल्यमापन करणे.

ब) समाजात काही संरचनात्मक (structural) बदल घडवून आणणे. त्यासाठी काही जुन्या व टाकाऊ झालेल्या संस्थांचा त्याग करणे किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या संस्थांत बदल करणे, लोकांना प्रतिसाद देणाऱ्या काही नवीन संस्थांची निर्मिती करणे आणि लोकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी मुळापासून नियोजन करणे इत्यादी गोष्टी गेल्या जातात.

४) विविध पद्धती –सामाजिक विकासासाठी विविध पद्धतींचा अवलंब केला जातो. साधारणपणे सामाजिक विकासाच्या आराखड्यात पुढील पद्धतींचा अवलंब केला जातो.

अ) धोरण निर्धारण – सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत सर्वप्रथम धोरण निर्धारित केले जाते. म्हणजेच विकासाची ध्येये, उद्दिष्टे, प्राधान्यक्रम, व्यूहरचना (strategies) इत्यादी बाबी निश्चित किंवा निर्धारित केल्या जातात.

ब) कार्यक्रम आखणी – निर्धारित केलेली ध्येयधोरणे व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कार्यक्रमांची आखणी केली जाते.

क) प्रशासन – आखलेल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा उभारून तिच्यात विविध व्यक्ती व समूहांना सहभागी करून घेतले जाते.

ड) संघटन – सेवा व संसाधने (resources) यांचा जास्तीत जास्त फायदा घेण्यासाठी लोकांना संघटित केले जाते. गरज भासल्यास प्रचलित व्यवस्थांमध्ये बदल केले जातात.

ई) मूल्यमापन – ध्येये व ती साध्य करण्यासाठी केलेली कृती (goals and performance) यांच्यातील अंतराचे (तफावतीचे) मूल्यमापन केले जाते व पुढील नियोजनासाठी प्रत्याभरण (feed back) मिळविले जाते.

५) सामाजिक विकासाची निदर्शके – सामाजिक विकासाची कांही निदर्शके (indicators) मानली आहेत. ती पुढीलप्रमाणे आहेत.

अ) लोकांच्या जीवन जगण्याच्या परिस्थितीत किंवा स्तरात बदल/सुधारणा होणे.

ब) दारिद्र्याचे निर्मूलन होणे.

क) रोजगाराच्या संधी वाढणे.

ड) लोकांना समान स्वरूपात संधी उपलब्ध होणे. म्हणजेच सामाजिक न्याय प्रस्थापित होणे.

इ) दुर्बल घटकांची उन्नती होणे म्हणजे समाज कल्याण साध्य होणे.

फ) जीवनात आकस्मिकपणे घडणाऱ्या घटनांपासून लोकांना सुरक्षा प्राप्त होणे.

ग) सर्व प्रकारची विषमता (भेदभाव) नष्ट होणे.

घ) शिक्षणाचा प्रसार होणे.

च) लोकांच्या व समुदायाच्या आरोग्याचे संरक्षण व संवर्धन होणे.

छ) पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन होणे.

ज) विस्तार कार्यक्रमात लोकांचा सहभाग वाढणे इ.

साधारणत: कोणत्याही समाजात वरील गोष्टी पर्याप्त स्वरूपात (पुरेशा प्रमाणात) घडून आल्या की त्या समाजात सामाजिक विकास घडून आला असे मानले जाते.

**६) लोकशाही तत्त्वांशी सुसंगत –** सामाजिक विकासाची प्रक्रिया ही लोकशाही तत्त्वांशी सुसंगत असते. कारण या प्रक्रियेत स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, सामाजिक न्याय इत्यादी लोकशाही तत्त्वांनुसार सामाजिक संबंधात, सामाजिक संस्थांत व समाजातील सर्व लोकांच्या (केवळ दुर्बलांच्या नव्हे) जीवन जगण्याच्या परिस्थितीत प्रागतिक बदल (Progressive Changes) किंवा सुधारणा घडवून आणल्या जातात. समाजातील मानवनिर्मित भेदभाव (विषमता), शोषण, दमन, अन्याय नष्ट करणे तसेच मानवी संबंधातील असंतोष नष्ट करणे हे सामाजिक विकासाचे लक्षण मानले जाते. लोकशाही व्यवस्थेतही हीच गोष्ट अपेक्षित असते. त्यामुळे सामाजिक विकासाची प्रक्रिया ही लोकशाही तत्त्वांशी सुसंगत ठरते.

**७) सामाजिक उत्क्रांतीहून भिन्न –** प्रारंभीच्या समाजशास्त्रीय लिखाणात सामाजिक विकास व सामाजिक उत्क्रांती (social evolution) या दोनही संज्ञा समानअर्थाने वापरलेल्या आढळतात. तथापि आज या दोन्ही संज्ञा वेगवेगळ्या अर्थाने वापरल्या जातात. हर्बर्ट स्पेन्सर व इतर काही विचारवंतांनी असे मत मांडले आहे की, समाज व सामाजिक संस्था या साध्या अवस्थेकडून संकीर्ण अवस्थेकडे क्रमाक्रमाने परिवर्तित किंवा रूपांतरित होत आलेल्या आहेत. परिवर्तनाच्या या प्रक्रियेस सामाजिक उत्क्रांती असे म्हणतात. मानव समाज हे वन्य अवस्था (Savage stage), रानटी अवस्था (Barbarian stage) व सभ्य अवस्था (Civilized stage) या अवस्थांमधून उत्क्रांत होत आला आहे. उत्क्रांतीच्या या प्रक्रियेस उद्दशून सामाजिक विकास ही संज्ञा पूर्वी वापरली जाई. तथापि सामाजिक उत्क्रांती व सामाजिक विकास यांच्यात पुढीलप्रमाणे भेद आहेत. सामाजिक उत्क्रांती ही नैसर्गिक तर सामाजिक विकास ही मानवनिर्मित प्रक्रिया आहे.. उत्क्रांतीची प्रक्रिया ही मानवी नियमनापासून मुक्त आहे. या प्रक्रियेत होणाऱ्या परिवर्तनास इच्छित दिशा (desired direction) नसते. विकासाच्या प्रक्रियेत होणाऱ्या परिवर्तनास मात्र इच्छित दिशा असते. त्यामुळेच तिच्यावर

मानवी नियंत्रण असते. उत्क्रांतीचा मूल्यांशी व नीतिमत्तेशी संबंध नसतो. याउलट विकासाला संबंध या गोष्टींशी असतो. उत्क्रांतीची प्रक्रिया ही निरंतरपणे चालू असते; पण विकासाची प्रक्रिया ही खंडित होऊ शकते. थोडक्यात सामाजिक विकासाची संकल्पना ही सामाजिक उत्क्रांतीच्या संकल्पनेहून भिन्न आहे.

### **१.२.४ मानव विकास** (Human development)

आज मानव विकास ही संकल्पना विकास प्रक्रियेच्या अध्ययनात विशेष लोकप्रिय झालेली आहे. मानव विकास ही संकल्पना आर्थिक विकास, सामाजिक विकास, शाश्वत विकास इत्यादी संकल्पनांहून अधिक व्यापक अशी आहे. पूर्वी आर्थिक विकासाचे मापन हे स्थूल राष्ट्रीय उत्पादन (GNP) हा निकष वापरून केले जाई. राष्ट्राच्या स्थूल उत्पादनात वाढ झाली की आर्थिक विकास घडून आला असे मानले जाई; पण आज हे मत मान्य केले जात नाही. कारण समाजात उत्पन्नाचे विषय वितरण झालेले असते. त्यामुळे उत्पादनवृद्धी किंवा उत्पन्नात वाढ होऊनही अनेकांना आपल्या मूलभूत गरजादेखील भागविता येत नाहीत. म्हणून ही स्थिती विकासाची निदर्शक मानता येत नाही. त्यामुळे अलीकडील काळात उत्पादनातील वा उत्पन्नातील वाढ या निकषाऐवजी विकासाचे अधिक व्यापक असे इतर निकष (उदा. दीर्घ आयुर्मान, शिक्षण, आरोग्य, चांगले जीवनमान इ.) वापरून विकासाचे मापन केले जाऊ लागले. यातूनच मानव विकास ही संकल्पना विकसित झाली. नोबेल पारितोषिक विजेते भारतीय अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन आणि संयुक्त राष्ट्रे विकास कार्यक्रमाचे (United Nations Development Programme) मार्गदर्शक पाकिस्तानचे अर्थतज्ज्ञ महबूब-उल-हक हे दोघे मानव विकास या संकल्पनेचे प्रमुख पुरस्कर्ते असून त्यांच्याशिवाय मार्थ नस्सबम (Martha Nussbaum), साबिना अलकिरे (Sobina Alkire), इनग्रिड रॉबिन्स (Ingried Robeyns) आणि इतरांनी या संकल्पनेचा विस्तार केलेला आहे. संयुक्त राष्ट्रे विकास कार्यक्रमाद्वारे १९९० मध्ये पहिला मानव विकास अहवाल (Human Development Report) प्रसिद्ध केला तेव्हापासून 'मानव विकास' ही संकल्पना लोकप्रिय झाली आहे.

मानव विकासाची व्याख्या - मानव विकास या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी या संकल्पनेच्या व्याख्या अभ्यासणे उचित ठरते.

१) संयुक्त राष्ट्रे विकास कार्यक्रमाद्वारे केलेली व्याख्या - संयुक्त राष्ट्रे विकास कार्यक्रमाद्वारे जो मानव विकास अहवाल प्रसिद्ध केला त्या अहवालात मानव विकासाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे. 'मानव विकास ही लोकांच्या निवडी किंवा पसंती विस्तारित करण्याची प्रक्रिया आहे. (Human development is a process of enlarging people's choices.)'

या अहवालानुसार लोकांच्या सर्वाधिक महत्त्वाच्या अशा तीन निवडी किंवा पसंती आहेत.

अ) आरोग्यसंपन्न असे दीर्घायुष्य लाभणे. (To get long & healthy life)

ब) ज्ञान संपादन करणे. (To acquire knowledge)

क) चांगले जीवनमान (राहणीमान) उपभोगण्यास मिळणे (To enjoy decent standard of living)

या प्रमुख तीन पसंतीशिवाय राजकीय स्वातंत्र्य असणे, मानवी हक्कांची हमी मिळणे व आत्मसन्मान (self respect) लाभणे या पसंतीचीही लोक अपेक्षा करतात. या अहवालात पुढे असे म्हटले आहे की, केवळ देशातील उत्पन्न वाढले तरी त्यामुळे लोकांच्या या अपेक्षांची पूर्तता होतेच असे नाही. कारण लोकांचे कल्याण हे उत्पन्नाच्या स्तरावर अवलंबून नसते तर ते उत्पन्न कोणत्या गोष्टींवर खर्च केले जाते यावर अवलंबवून असते. म्हणून मानव विकासामध्ये उत्पन्नवाढीपेक्षा अधिक कशाजातरी समावेश होतो.

विकासाचे वास्तविक उद्दिष्ट हे लोकांचे कल्याण साध्य करणे हे असते व त्यासाठी लोकांना अधिकाधिक पर्याय उपलब्ध करून देणे आवश्यक असते. उत्पन्न हे त्या अनेक पर्यायांपैकी एक आहे. म्हणून केवळ उत्पन्नात वाढ होणे म्हणजे विकास होणे नव्हे, तर उत्पन्न वाढीबरोबरच लोकांना शिक्षण, आरोग्य, पौष्टिक आहार, शुद्ध पाणी, स्वच्छ पर्यावरण, राजकीय स्वातंत्र्य, आत्मसन्मान किंवा प्रतिष्ठा इत्यादी गोष्टी समान स्वरूपात (कोणत्याही भेदभावाशिवाय) उपलब्ध होणे सुखी जीवनासाठी आवश्यक असते. मानव विकास संकल्पनेत या सर्व गोष्टी लोकांना उपलब्ध होणे अभिप्रेत आहे.

२) महबूब-उल-हक - यांनी आर्थिक वृद्धी व मानव विकास यातील मूलभूत भेद स्पष्ट केलेला आहे. ते म्हणतात, आर्थिक वृद्धी ही फक्त एकाच पर्यायाचा म्हणजे उत्पन्नाचा विस्तार (उत्पन्नात वाढ) करते, त्याच्यावरच लक्ष केंद्रित करते. याउलट मानव विकास हा मानवाच्या सर्व पसंतींना (choice) विस्तारित करतो. मग त्या पसंती या आर्थिक, सामाजिक, राजकीय किंवा सांस्कृतिक असोत. याचाच अर्थ असा की आर्थिक वृद्धीचा संबंध हा उत्पन्नात वाढ होण्याशी आहे तर मानव विकासाला संबंध हा मानवी जीवनाची गुणवत्ता वाढविणाऱ्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इ. घटकांशी आहे.

महबूब-उल-हक पुढे असे म्हणतात की समाजास उत्पन्नाचा उपयोग (वापर) महत्त्वाचा वाटत असतो. तथापि केवळ उत्पन्न वाढीमुळे फारसे समाधान मिळत नाही. लोक जर राजकीय पारतंत्र्यात किंवा सांस्कृतिक पोकळीत राहात असतील तर उत्पन्नवाढ ही त्यांना अधिक सुखसमाधान मिळवून देते. उत्पन्नवाढ किंवा संपत्तीचा संचय हा कितीतरी मानवी पसंतीच्या पूर्ततेसाठी आवश्यक नसतो. अनेक पसंतीच्या पूर्ततेसाठी संपत्तीची गरजही नसते. उदा. लोकशाही व्यवस्था स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी जातीभेद, धर्मभेद, वंशभेद नष्ट करण्यासाठी समाज श्रीमंत असण्याची गरज नसते. म्हणून 'हक' म्हणतात समाजाची वास्तविक संपत्ती हे लोक आहेत. म्हणून लोकांच्या पसंती विस्तारित करणे गरजेचे आहे. अशा मानवी पसंतीच्या विस्तारासच मानव विकास असे म्हणतात.

३) मानव विकास म्हणजे मानवी कार्यक्षमतांचा विकास (development of human capabilities) होय, अशीही एक व्याख्या केली जाते.

मानवाची कार्यक्षमता वाढविणारे काही घटक असून त्यांच्यावर मानव विकास अवलंबून असतो. मानव विकास साध्य करण्यासाठी मानवी भांडवलनिर्मिती आवश्यक असते. मानवी

भांडवलाचा प्रमुख हेतू हा मानवी संसाधनांचा विकास (development of human resources) घडवून आणणे हा असतो. त्यासाठी मानवी भांडवलात गुंतवणूक करणे गरजेचे असते. मानवी भांडवलात गुंतवणूक करणे म्हणजे शिक्षण, आरोग्य, पौष्टिक आहार, शुद्ध पाणी, इत्यादी घटकांवर खर्च करणे होय. असा खर्च केला की लोकांच्या कार्यक्षमतांचा/कौशल्यांचा विकास होतो. यासच मानव विकास असे म्हणतात.

एका मूर्त उदाहरणाद्वारे हा विचार स्पष्ट करता येईल. सायकल हे एक वाहतुकीचे साधन आहे. एखाद्या व्यक्तीकडे सायकल खरेदी करण्याची क्षमता असेल पण तिच्याकडे जर सायकल चालविण्याचे कौशल्य नसेल तर वाहतुकीच्या दृष्टीने ती सायकल तिच्यासाठी निरुपयोगी ठरते. मात्र, जर एखाद्याकडे सायकल खरेदी करण्याची व ती चालविण्याची या दोन्ही क्षमता असतील तर त्या व्यक्तीकडे कोणत्याही ठिकाणी सायकलवरून जाण्याची कार्यक्षमता (capability) येईल आणि अशी ही कार्यक्षमता त्या व्यक्तीच्या जीवनाचे मूल्य (value of life) आणि तिच्या पसंती यामध्ये वाढ करील. म्हणून व्यक्तीकडे संसाधने (resources) आणि त्यांचा वापर करण्याची क्षमता (ability) या दोन्ही गोष्टी तिच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी असणे गरजेचे ठरते. या उदाहरणाबद्दल हे लक्षात येते की विविध संसाधने व कौशल्ये ही व्यक्तीच्या कार्यक्षमता विस्तारण्यामध्ये कसे योगदान देतात यावरून आपणास असे म्हणता येते की, व्यक्तीच्या कार्यक्षमतांचा विकास घडवून आणणारी संसाधने व त्यांचा वापर करण्याचे कौशल्य सर्वांना उपलब्ध होणे म्हणजे मानव विकास होय.

## मानव विकासाचे आधारस्तंभ

**मानव विकासाचे मूलभूत असे सहा आधारस्तंभ (ळिश्रश्ररीी) आहे.**

**१) समता किंवा निप्पक्षपातीपणा** (Equity) - मानव विकासात समतेचे निप्पक्षपातीपणाचे तत्त्व अंतर्भूत आहे. मानवामानवात कोणताही भेदभाव करता म्हणजेच निप्पक्षपातीपणे सर्व मानवांना स्त्री-पुरुषांना समान वागणूक देणे, प्रत्येकास शिक्षण घेण्याचा व आरोग्याची काळजी घेण्याचा हक्क आहे हे मान्य केले आहे.

**२) शाश्वतता** (Sustainability) - मानव विकासात शाश्वततेचे तत्त्वही मान्य केले जाते. म्हणजे प्रत्येक मानवास आपले आयुष्य जगण्यासाठी अर्थाजन करण्याचा (संपत्ती कमावण्याचा) हक्क आहे. हा हक्क त्याच्या जीवनात शाश्वतता मिळवून देतो.

**३) उत्पादकता** (Productivity) - उत्पन्न निर्मितीच्या प्रक्रियेत लोकांचा पूर्ण सहभाग असावयास हवा असा उत्पादकतेचा अर्थ आहे. याचा असासुद्धा अर्थ आहे की शासनाकडे आपल्या जनतेसाठी सामाजिक कार्यक्रम असावयास हवेत.

**४) सबलीकरण** (Empowerment) - मानव विकासात लोकांचे सबलीकरण घडवून आणणे आहे. लोकांना सबल करणे म्हणजे त्यांना विकास प्रक्रियेवर व त्यांच्या जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या निर्णयावर प्रभाव टाकण्याचे स्वातंत्र्य देणे होय.

**५) सहकार्य** (Co-operation) - मानव विकासात परस्पर सहकार्याची कल्पनाही अंतर्भूत आहे. परस्परांच्या संपन्नतेचे एक साधन व सामाजिक उद्दिष्टांचे स्त्रोत म्हणून सहकार्य

हे सहभाग आणि समुदाय व समूह यांच्याशी संबंधित असण्याची भावना वृद्धिंगत करते.

**६) सुरक्षा** (Security) – भविष्यात लगेचच संपुष्टात येणार नाहीत अशा विकासाच्या मुक्त व सुरक्षित संधी लोकांना प्रदान करणे म्हणजे सुरक्षा होय.

मानव विकास आणि मानवी हक्क – मानव विकास व मानवी हक्क (Human Rights) या दोन्ही संकल्पनाच परस्परांशी जवळचा संबंध आहे. कारण या दोन्ही संकल्पनांमध्ये समान दृष्टीकोन असल्याचे आढळते. मानवी स्वातंत्र्य (Human freedom) हे या दोन्हीचेही ध्येय आहे. एखाद्या तुरुंगात आर्युमान व साक्षरता या दोन्हीचा दर अत्यंत उच्च असू शकतो. त्यामुळे तेथे कैद्यांचा विकास घडवून आला असे म्हणता येणार नाही. कारण कैद्यांना स्वातंत्र्य नसते. मानवी कार्यक्षमतांचा विकास होण्यासाठी व मानवी हक्क उपभोगण्यास मिळण्यासाठी स्वातंत्र्य हे महत्त्वपर्ण ठरते. आपल्या पसंती वा निवडीची कार्यवाही करण्यासाठी व आपल्या जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या निर्णयांचे निर्धारण करण्यामध्ये सहभागी होण्यासाठी लोकांना स्वातंत्र्य असावेच लागते. लोकांचे कल्याण व आत्मसन्मान वाढविणे, इतरांचा आदर करण्यास शिकणे या गोष्टी साध्य करण्यासाठी मानव विकास व मानवी हक्क हे परस्परांना मदत करतात. जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान झालेल्या आजच्या काळात विविध हक्कांविषयक अनेक प्रश्न उद्‌भवलेले आहेत. यासंदर्भात मानव विकास ही संकल्पना शिक्षणप्रसार, कामाच्या ठिकाणी उत्तम स्थिती असणे, लोकांना अधिक पसंती (choice) उपलब्ध करून देणे यासाठी उपयुक्त ठरते. मानव विकासाची संकल्पना ही मानवी हक्काच्या बरोबरीने वाटचाल करते. या दोन्ही संकल्पनांना प्रथमत: एकदमच चालना दिली ती सुराज्य मानवी हक्कांच्या अंमलबजावणीचे धोरण आणि निर्णय निर्धारण प्रक्रियेत समुदायाचा सहभाग वाढविण्याची प्रक्रिया यांनी व त्यानंतर चालना मिळाली ती विकास पातळीचे घटक असलेल्या नागरी, राजकीय, आर्थिक व सामाजिक हक्कांना मिळालेल्या प्रोत्साहनामुळे उदा. शिक्षणाचा हक्क हा बौद्धिक विकासाशी तर राजकीय हक्क हे समाजाच्या राजकीय विकासाच्या स्तराशी संबंधित आहेत.

**मानव विकास निर्देशांक** (Human Development Index) –

मानव विकास ह्या संकल्पनेचे अधिक स्पष्ट आकलन होण्यासाठी मानव विकास निर्देशांक ही संकल्पना समजावून घेणे आवश्यक ठरते. मानव विकास निर्देशांक ही संकल्पना संयुक्त राष्ट्रे विकास कार्यक्रमाद्वारे १९९० मध्ये प्रकाशित केलेल्या पहिल्या मानव विकास अहवालात मांडण्यात आली. विकासाचे मापन करण्यासाठी मानव विकास हे निर्देशक वापरले जाते. मानव विकास निर्देशांकामध्ये मानवी विकासाच्या पुढील तीन पैलूंचे मापन केले जाते.

**अ) दीर्घायुष्य** (Longevity) – दीर्घायुष्याचे मापन जन्माच्या अपेक्षित आयुर्मर्यादेच्या (डळषश एशिलींरपलू रीं इळीींह) साहाय्याने केले जाते. ते किमान २५ वर्षे व कमीत कमी ४५ वर्षे मानले जाते.

**ब) शैक्षणिक प्राप्ती** (Educational attachment) – ही चे मापन हे प्रौढ साक्षरता व प्राथमिक, द्वितीयक आणि तृतीयक स्तरावरील नोंदणीचे गुणोत्तर यांच्या आधारे केले जाते

म्हणजे प्रौढ साक्षरता ० ते १०० टक्के आणि एकत्रित नावनोंदणी गुणोत्तर ० ते १०० टक्के मानले जाते.

**क) जीवनमानाचा दर्जा** (Standard of Living) – याचे मापन दरडोई वास्तविक उत्पन्नाच्या सहाय्याने केले जाते. डॉलरच्या संदर्भातील क्रयशक्ती (Purchasing Power Purity - PPP) आधारित स्थूल देशांतर्गत उत्पन्न दरडोईने मोजले जाते. ते किमान १०० डॉलर्स व कमाल ४०००० डॉलर्स इतके मानले जाते.

मानव विकास निर्देशांकाची रचना करण्यासाठी या तीनपैकी प्रत्येक पैलूचा निर्देशांक तयार केला जातो. अपेक्षित आयुर्मर्यादा निर्देशांक हा निरोगी व दीर्घायुष्य बळ या पैलूचा निर्देश करतो. शैक्षणिक निर्देशांक हा ज्ञान या पैलूचा निर्देश करतो तर स्थूल राष्ट्रीय उत्पादन (GDP) निर्देशांक हा जीवनमानाचा दर्जा या पैलूचा निर्देश करतो.

मानव विकास निर्देशांकाच्या कोणत्याही घटकांसाठी (पैलूसाठी वैयक्तिक निर्देशाक काढण्यासाठी पुढील सूत्र वापरले जाते.

**निर्देशांक = ह्न चे वास्तविक मूल्य – ह्न चे किमान मूल्य**

**ह्न चे कमाल मूल्य – ह्न चे किमान मूल्य**

मानव विकास निर्देशांक हा अपेक्षित आयुर्मर्यादा निर्देशांक, शैक्षणिक निर्देशांक व दरडोई वास्तविक निर्देशांक या तीनची साधी सरासरी काढून मिळविला जातो. सन ११९० पासून मानव विकास निर्देशांक हा संयुक्त राष्ट्रे विकास कार्यक्रमाद्वारे तयार केला जातो व मानव विकास अहवालात प्रसिद्ध केला जातो. मानव विकास निर्देशांकाद्वारे जगातील देशांची प्रगती मोजली जाते व त्यासंदर्भातील क्रमवारी लावली जाते. जर एखाद्या देशाचा मानव विकास निर्देशांकाचा क्रम जागतिक स्तरावर उंचावला असेल तर त्या देशात मानवी भांडवलाचा पाया आर्थिक वृद्धीसाठी भक्कमपणे घातला गेला आहे असे मानले जाते.

**मानव विकास निर्देशांकाचे महत्त्व –** या निर्देशांकाद्वारे एखाद्या देशाची वास्तविक स्थिती दर्शविली जाते. कारण त्यामध्ये उत्पन्नाबरोबरच शिक्षण व आरोग्य यांचे मापन केले जाते. या निर्देशांकाचे वाढीव मूल्य हे देशाची प्रगती दर्शविते. या निर्देशांकामुळे देशाची आर्थिक व सामाजिक प्रगती ही एकत्रितपणे मोजणे शक्य होते. या निर्देशांकामुळे मानव विकासासाठी केवळ आर्थिक प्रगती पुरेशी नसून सामाजिक प्रगतीही आवश्यक आहे, याची जाणीव वाढली आहे. या निर्देशांकात मानवी जीवनाच्या गुणवत्तेचा विचार केलेला आहे. या निर्देशांकामुळे न्यून विकसित देशांना जागतिक क्रमवारीत आपले स्थान कोठे आहे हे कळण्यास मदत होते. उत्पन्न वाढीबरोबरच सामाजिक सेवांमध्ये (आरोग्य, शिक्षण इ.) सुधारणा केल्या पाहिजेत याची जाणीव मानव विकास निर्देशांमुळे होते.

**मानव विकास निर्देशांकाच्या मर्यादा –**

१) अमर्त्य सेन यांच्या मते हा एक ओबडधोबड निर्देशांक असून, तो मानव विकास व ऱ्हास याविषयी गुंतागुंतीची वास्तवता एका साध्या अंकात पकडण्याचा प्रयत्न करतो.

२) या निर्देशांकात केवळ तीनच (दीर्घायुष्य, शिक्षण व उत्पन्न) पैलू विचारात घेतले आहेत.

त्यांच्याशिवाय इतरही अनेक पैलू (उदा. बालमृत्यू प्रमाण, पौष्टिक अन्न इ.) असून ते विचारात घेतले जात नाहीत.

इतर निर्देशांक –मानव विकास निर्देशांकाप्रमाणेच लिंगाधारित विकास निर्देशांक (Gender-related Development Index) मानवी दारिद्र्य निर्देशांक (Human Poverty Index) असेही निर्देशांक तयार करून ते मानव विकास अहवालात प्रसिद्ध केले जातात. लिंगाधारित विकास निर्देशांक काढताना स्त्रियांना शिक्षण, आरोग्य, सेवा, आर्थिक संधी व राजकारणातील सहभाग यामध्ये पुरुषांच्या तुलनेत किती संधी मिळते याचा विचार केला जातो. तर मानवी दारिद्र्य निर्देशांक काढताना निरोगी दीर्घायुष्य, ज्ञानप्राप्ती व चांगले जीवनमान या तीन पैलूतील न्यूनता (deficiencies) विचारात घेतली जाते. मानवी दारिद्र्य निर्देशांक हा मानव विकासाला अधिक व्यापक असा दृष्टीकोन देतो.

**संयुक्त राष्ट्रे सहस्रक विकास ध्येये** (United Nations Development) – संयुक्त राष्ट्राने सप्टेंबर २००० मध्ये पुढील आठ ध्येये ही सहस्त्राकातील किसावी ध्येये महणून स्वीकारली आहेत. १) दारिद्र्य व भूक यांचे निर्मूलन करणे. २) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण साध्य करणे. ३) लिंग समानता व स्त्रियांचे सबलीकरण यांना चालना देणे. ४) बालमृत्युदर कमी करणे. ५) मातांचे आरोग्य सुधारणे. ६) एमआयव्ही/एडस व इतर रोगांशी लढा देणे. ७) पर्यावरणीय शाश्वततेची तजवीज करणे. ८) विकासासाठी जागतिक स्तरावर भागीदारी विकसित करणे. संयुक्त राष्ट्रांनेच २०१५ पर्यंत ही ध्येये गाठण्याची बांधिलकी पत्करली असून, त्याद्वारे मानव विकासात चालना देण्याचे प्रयत्न चालविले आहेत.

### **१.२.५ शाश्वत विकास** (Substainable Develolpment)

सामाजिक विकास व मानव विकास या संकल्पना अभ्यासल्यानंतर आता तुम्ही शाश्वत विकास ही संकल्पना अभ्यासणार आहात. आज ही संकल्पना विशेष लोकप्रिय झाली असून, विकास व पर्यावरण यासंबंधीच्या अध्ययनात तिची मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आहे. अर्थात शाश्वत विकास ही संकल्पना तशी नवीन नाही. जगातील अनेक परंपरागत रूढिप्रिय समाजातील लोकांना शाश्वत विकासाची जाणीव असल्याचे दिसून येते. तथापि आर्थिक, सामजिक विकासाला ध्यास घेतलेल्या व आधुनिक म्हणविल्या जाणाऱ्या समाजातील लोकांना मात्र, आर्थिक लाभाच्या हव्यासापोटी या संकल्पनेचे भान राहिलेले नाही. विकासाच्या नादात त्यांच्याकडून पर्यावरणाचा ऱ्हास होऊन संपूर्ण जीवसृष्टीच्या अस्तित्वास गंभीर धोका निर्माण झाला आहे. या संकटावर मात करण्याच्या विचारातून व प्रयत्नातून शाश्वत विकास या संकल्पनेस आज महत्त्व दिले जाऊ लागले आहे.

इतर प्राण्यांप्रमाणेच मनुष्यदेखील आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करतो. पूर्वीच्या काळात मानवी लोकसंख्या व मानवी गरजा या मर्यादित होत्या. त्यांच्या तुलनेत नैसर्गिक साधनसंपत्ती मात्र विपुल प्रमाणात उपलब्ध होती. त्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीची टंचाई भासणे पर्यावरणाचा ऱ्हास होणे अशा समस्या भेडसावत नव्हत्या. आधुनिक काळात मात्र मानवी लोकसंख्या, मानवी गरजा, मानवाची उपभोग प्रवृत्ती किंवा हाव इत्यादी गोष्टी प्रचंड प्रमाणात वाढल्या. जगातील बहुतेक समाजात

विकासाचे कार्यक्रम सुरू झाले. विकासाच्या नावाखाली लोक स्वार्थी किंवा लोभी वृत्तीने नैसर्गिक साधनसंपत्तीचा अविवेकी व अतिरेकी स्वरूपात वापर करू लागले. वसाहती, इमारती, रस्ते, लोहमार्ग, उद्योगधंदे, खाणी इत्यादीच्या उभारणीसाठी व शेती करण्यासाठी लोकांनी प्रचंड वृक्षतोड सुरू केली. मात्र, हे करताना नव्याने वृक्षलागवड केली नाही. त्यामुळे वृक्षांचे/जंगलांचे प्रमाण घटून मातीची धूप होणे, वाळवंटीकरण होणे, जैवविविधता ऱ्हास होणे अशा समस्या तीव्र झाल्या. अधिक पिकविण्यासाठी मनुष्याने पाणी, रासायनिक खते, कीटकनाशके इत्यादीचा बेसुमार वापर केल्याने मातीचे व प्राण्याचे प्रदूषण होणे, जमिनी क्षारपड होणे अशा समस्या उद्‌भवल्या औद्योगिक उत्पादन वाढीच्या हव्यासापोटी खनिजे, इंधने यांचा अंदाधुंद वापर सुरू केला. त्यामुळे त्यांचे साठे घटत जाऊन ही नैसर्गिक साधनसंपत्ती पुढील पिढ्यांसाठी शिल्लक राहील की नाही अशी भीती निर्माण झाली. उद्योगधंद्यातील/कारखान्यातील टाकाऊ पदार्थ नदी, तलाव, समुद्र यांच्यात सोडल्याने जलप्रदूषण तर त्यातील धूर, धुरळा, काजळी, राख, विषारी वायू इ. वातावरणात सोडल्याने हवाप्रदूषण वाढले. त्यामुळे जागतिक तापमान वृद्धी झाली. त्यामुळे अर्क वितळणे, समुद्राच्या पाण्याची पातळी उंचावणे असे धोके निर्माण होऊन बर्फाळ प्रदेशातील आणि समुद्रकिनारी असलेल्या मानवासह सर्वच सजीवांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. धरणे बांधताना अनेक गावे उठली. त्यातील लोक विस्थापित झाले. त्याचबरोबर जंगले नष्ट होऊन त्यातील सजीवांचा अधिवास (निवास) नष्ट झाले. अशाप्रकारे गरजापूर्तीच्या व विकासाच्या नादात नैसर्गिक साधनसंपत्तीचा विध्वंस होऊ लागला. तिच्यात घट होऊ लागली. पर्यावरणातील घटकांची (हवा. पाणी, मृदा, वनस्पती, स्वभाविक गुणवत्ता, दर्जा, प्रमाण बाधित झाले. प्रत्येक सजीवांचे पर्यावरण हे त्यांच्यासाठी अनुकूल असे असते. तसेच त्या पर्यावरणातील विविध घटक हे परस्परावलंबी व परस्परपूरक असतात. त्यामुळे त्यांच्यात एक प्रकारचा समतोल (संतुलन) तयार झालेला असतो. तथापि मानवाच्या वरील प्रकारच्या कृतीमुळे हा समताल ढासळत चालला आहे. त्यामुळे सजीवांचे पर्यावरण हे त्यांच्यासाठी प्रतिकूल ठरू लागले आहे. यालाच पर्यावरणाची अवनती वा ऱ्हास असे म्हणतात. असा हा पर्यावरणाचा होणारा ऱ्हास मानवासह सर्वच सजीवांच्या अस्तित्वास धोकादायक ठरू लागला आहे. या धोक्याची जाणीव जागतिक संस्था, संघटना, राज्यकर्ते, प्रशासक, विचारवंत, पर्यावरण, प्रेमीमंडळी इत्यादींना झाली. या जाणिवेतूनच मानवी गरजांची पूर्तता करताना व विकास करताना पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन केले पाहिजे. नैसर्गिक साधनसंपत्ती पुढील पिढ्यांसाठी टिकून राहिली पाहिजे, विकास हा पर्यावरणचा ऱ्हास करणारा नसावा, तर तो सर्वांचे कल्याण करणारा व पिढ्यानपिढ्या टिकून राहणारा असावा, अशाप्रकारे विचार मांडले जाऊ लागले. या विचारातूनच शाश्वत विकास ही संकल्पना प्रकाशझोतात आली आहे.

शाश्वत विकासाला अर्थ आणि व्याख्या – शाश्वत रहाणे (to sustain) म्हणजे सतत सुरू राहाणे (to continuous) किंवा टिकून राहाणे असा अर्थ आहे. त्यानुसार शाश्वत विकास म्हणजे सतत सुरू राहणारा किंवा टिकून राहणारा विकास होय, असा अर्थक होतो. जे सुरू राहू शकत नाही म्हणजेच खंडीत होते ते अशाश्वत होय. याउलट जे सुरू राहू शकते म्हणजे अखंडित राहाते ते शाश्वत होय. शाश्वत विकास म्हणजे अखंडपणे सुरू राहणारा वा टिकून राहणारा विकास होय. शाश्वत विकास या संज्ञेचा अर्थ अधिक स्पष्ट होण्यासाठी

त्याची पुढील व्याख्या अभ्यासणे उचित ठरते.

१) ब्रुटलँड आयोगाची व्याख्या – विकास करताना पर्यावरण संरक्षणाची दीर्घकालीन व्यूहरचना कशी असावी हे मांडण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने १९८३ मध्ये पर्यावरण व विकासाबाबतचा जागतिक आयोग (World Commission on Environment and Development - WCED) हा आयोग नेमला. त्यांचे अध्यक्ष ग्रो हर्लेम ब्रुटलँड (नार्वे) होते. त्यामुळे त्यास ब्रुटलँड आयोग असेही म्हणतात. या आयोगाने आपले सामाईक भविष्य (Our Common Future) या नावाने जो प्राथमिक अहवाल सादर केला त्यामध्ये शाश्वत विकासाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे.

''शाश्वत विकास म्हणजे असा विकास की ज्याच्याद्वारे भावी पिढ्यांच्या त्यांच्या स्वत:च्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता वर्तमानकालीन गरजा पूर्ण केल्या जातात. (Sustainable development is development that meets the needs of present without compromising the ability of the future generations to meet their own needs.)''

२) ब्लॉवर्स (Blowers) – गरजापूर्तीसाठी आणि पुढील पिढीस नुकसानकारक ठरणाऱ्या कृती थांबविण्यासाठी श्रीमंतांकडून गरिबाकडे संपत्तीचे पुनर्वाटप करणे व साधनसामग्रीच्या उपभोगाऐवजी तिचे संवर्धन करणे असा संपूर्ण पालट किंवा बदल शाश्वत विकासात अंतर्भूत आहे.

३) के. पाटील – निसर्गावस्थेकडून समाजात वस्तू व सेवांचा पुरवठा होण्यासाठी अर्थव्यवस्थेच्या उत्पादक शक्यतांचे जतन करणे म्हणजे शाश्वत विकास होय.

**शाश्वत विकासातील घटक –**

शाश्वत विकासाच्या वरील व्याख्येचे विश्लेषण केले असता त्यामध्ये पुढील बाबींचा किंवा घटकांचा अंतर्भाव होतो हे लक्षात येते.

**१) गरजापूर्ती –** शाश्वत विकासात गरजापूर्तीची कल्पना अंतर्भूत आहे. या ठिकाणी गरजा म्हणजे मानवाच्या मुलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य असा अर्थ अभिप्रेत आहे. शाश्वत विकास हा लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणारा आहे. त्यामध्ये चैनीच्या गरजांना स्थान नाही. लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण होणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे, असे शाश्वत विकासात मानले जाते.

**२) लोक म्हणजे सर्व लोक –** शाश्वत विकासात सर्व लोकांच्या कल्याणाची केवळ विशिष्ट प्रकारच्या मूठभर लोकांच्या कल्याणाची नव्हे, कल्पना अंतर्भूत आहे. या ठिकाणी लोक म्हणजे जगातील सर्व वंशाचे, धर्माचे, वर्गाचे, जातीचे, प्रदेशाचे, भाषेचे, लिंगाचे लोक असा अर्थ अभिप्रेत आहे. तसेच लोक म्हणजे वर्तमानकालीन पिढीचे लोक तसेच भविष्यकालीन पिढीतील लोक असाही अर्थ आहे. शाश्वत विकास हा वर्तमान तसेच भावी पिढ्यांचे कल्याण किंवा उन्नती साधणारा त्यांना सरक्षा प्रदान करणारा आहे.

**३) विकासाची पद्धती –** शाश्वत विकासात विकासाची विशिष्ट पद्धती व प्रतिमान

(Pattern of development) अंतर्भूत आहे. आपला विकास घडवून आणण्याची क्षमता माणसात आहे. तथापि या क्षमतेचा उपयोग विवेकबुद्धीने, संयमाने व शास्त्रशुद्ध पद्धतीने केला पाहिजे. विकासाची पद्धती अशी असली पाहिजे की तिच्यामुळे भावी पिढ्यांच्या गरजा भागविणाऱ्या क्षमतेस धोका निर्माण होता कामा नये. आजच्या पिढीच्या विकासामुळे पुढील पिढ्यांचा विकास म्हणजे भविष्यकालातील विकास घटणार नाही अशी विकासाची पद्धती असली पाहिजे.

**४) उपभोगाची पद्धती –** शाश्वत विकासात उपभोगाचीही विशिष्ट पद्धती अभिप्रेत आहे. उपभोग घेणे म्हणजे साधनसंपत्तीचा गरजापूर्तीसाठी वापर करणे होय. हा वापर म्हणजेच उपभोग हा साधनसंपत्तीचा ऱ्हास करणारा. तिची गुणवत्ता घटविणारा. तिला प्रदुषित करणारा नसावा. उपभोगाची पद्धती अशी असावी तिच्यामुळे मानवाचे कल्याण व निसर्गाची समृद्धी वा संपन्नता वाढेल यासंदर्भात हर्मन डॅली सुचवितजात की अपुनर्नवीय संसाधनांच्या वापराचा दर हा त्यांच्या पैदाशीच्या दरापेक्षा जास्त नसावा. उदा. गजापूर्तीसाठी करावयाच्या वृक्षतोडीचे प्रमाण हे वृक्षलागवडीच्या प्रमाणापेक्षा जास्त नसावे.

ब) पर्यावरणाच्या शोषणशक्तीपेक्षा अधिक प्रमाणात टाकाऊ पदार्थ (धूर, धुरळा, विषारी वायू, नागरी कचरा, सांडपाणी इ.) पर्यावरणात सोडू नयेत.

क) पुनर्नवीकरणीय पर्यायी संसाधनांच्या उदा. सौरऊर्जा. पवनऊर्जा निर्मितीच्या दरापेक्षा अधिक दराने अपुनर्नवीकरणीय संसाधनांचा (non-renewable resources) (उदा. कोळशापासून बनविलेली ऊर्जा) वापर केला जाऊ नये.

५) पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन – शाश्वत विकासात पर्यावरणाच्या संरक्षणाची व संवर्धनाची कल्पना केंद्रस्थानी आहे. विकासाच्या प्रक्रियेत पर्यावरणाची अवनती होते. प्रदूषण वाढते, पर्यावरणचा समतोल बिघतो हे खरे. तथापि याचा अर्थ असा नव्हे की त्यामुळे विकासाची प्रक्रिया बंद करावयाची विकासाची प्रक्रिया राबवावयाचीच; पण ती राबविताना पर्यावरणाची अवनती होणार नाही त्याचे प्रदूषण होणार नाही त्याचा समतोल ढळणार नाही याची अधिकाधिक काळजी घेतली पाहिजे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा काटकसरीने व गरजेपुरताच वापर करून तिचे पुढील पिढ्यांसाठी जतन करून ठेवण्याचे, तिच्यात वाढ करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी पर्यावरण स्नेही तंत्रज्ञानाचा (Ecofriendly technology) वापर केला पाहिजे. ''एखादे उत्पादन, त्याची प्रक्रिया व त्याचा वापर यामुहे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम कमी करणाऱ्या तंत्रज्ञानास पर्यावरण स्नेही तंत्रज्ञान असे म्हणतात. या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे प्रदूषण कमी होते, संसाधनाची बचत होते, टाकाऊ पदार्थांचे प्रमाण घटते शिवाय कच्च्या माल म्हणून त्यांचा इतर प्रक्रियेत वापर करता येतो.''

अर्थात पर्यावरण स्नेही तंत्रज्ञान वापरले तरीही थोड्या प्रमाणात का होईना पर्यावरणाची अवनती होतेच. म्हणून पर्यावरणाच्या संरक्षण व संवर्धनासाठी शाश्वत विकासाच्या संकल्पनेत तंत्रज्ञान वापराच्या काही सुधारित पद्धतीचा अवलंब करणे अभिप्रेत आहे. उदा. पारंपरिक उत्पादनासाठी पर्यायी कच्चा माल वापरणे. कागद बनविण्यासाठी लाकूड किंवा बांबू वापरण्याची परंपरागत पद्धती आहे. या पद्धतीमुळे जंगलतोड मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे

कागद उत्पादनासाठी लाकडाऐवजी सागर वनस्पती मुख्यत: तणे, तसेच गळलेली पाने आणि बांबूऐवजी 'टणटणी' ही उपद्रवी तण वनस्पती वापरतात. त्यामुहे जंगलतोड वजाते. तसेच एखाद्या उत्पादनातील ज्या घटकांमुळे पर्यावरणाची हानी होते त्याऐवजी अन्य घटक वापरून ही हानी कमी करता येते. फ्रीज व एअरकंडिशनमध्ये वापरल्या जाणाऱ्या क्लोरोफ्लोरो कार्बन या रासायनिक पदार्थामुळे ओझोनचा थर विरळ होतो. हे टाळण्याऐवजी क्लोरोफ्लोरो कार्बनऐवजी कमी हानीकारक घटक वापरता येतात. याशिवाय टाकऊ पदार्थांचे चक्रीकरण व पुनर्वापर करणे, प्रदूषण नियंत्रणाचे सुधारित तंत्रज्ञान वापरणे अशा पद्धतीही अवलंबिता येतात.

६) अभिवृत्ती, दृष्टिकोन व वर्तनप्रकार यात बदल – शाश्वत विकासामध्ये लोकांच्या अभिवृत्ती, दृष्टिकोन व वर्तनप्रकार यांच्यात बदल होणेही अपेक्षित आहे. यासंदर्भात लोकांनी गरजा कमी करणे, चंगळवादी वृत्तीस आळा घालणे, कमीत कमी टाकाऊ पदार्थ (कचरा) निर्माण करणे, प्रदूषणकारी उत्पादनाऐवजी स्वच्छ उत्पादन पद्धती अवलंबणे, स्वत:च्या गरजांबरोबरच इतरांच्या विशेषत: गरिबांच्या गरजापूर्तीचाही विचार करणे, केवळ मनुष्यजातीच्याच नव्हे तर सर्वच सजीव व तसेच निर्जीव घटकांच्या म्हणजेच एकंदर विश्वाच्या कल्याणाची काळजी घेणे, त्यादृष्टीने कोणाचेही शोषण न करणे, लोकसंख्या वाढ रोखणे, वस्तूंचा पुनर्वापर करणे, पर्यावरण संरक्षण व संवर्धनाविषयी लोकजागृती करणे, दीर्घकाळ टिकणाऱ्या नैतिक व कल्याणकारी संस्था व संघटना स्थापन करणे इत्यादींचा अंगीकार होणे नितांत गरजेचे ठरते.

**शाश्वत विकासाची तत्त्वे** (Principles of Sustainable Development) **–**

शाश्वत विकास ही संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी शाश्वत विकासाची तत्त्वे अभ्यासणे उचित ठरते. ब्रूटलँड आयोग, ब्राझीलमधील रिओदोजानीरो शहरात झालेले (३ ते १४ जून १९९२) वसुंधरा (पृथ्वी) शिखर परिषदेचा जाहिरनामा यासारख्या आंतरराष्ट्रीय कागदपत्रांतून शाश्वत विकासाची पुढील तत्त्वे रूढ झालेली आहेत.

**१) आंतरपीठीय समता** (Inter-generational equity) – आंतरपीठीय समता प्रस्थापित करणे हे शाश्वत विकासाचे एक तत्त्व आहे. या ठिकाणी समता म्हणजे सर्व व्यक्तींना काही मूलभूत उत्पन्न, गुणवत्ता मिळण्याची समान संधी उपलब्ध होणे होय. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येते की, समाजातील फायदे व नुकसान यांचे वितरण साधारणत: सारख्याच प्रमाणात होणे महणजे समता होय. पर्यावरणापासून मिळणारे फायदे सर्वांना समान प्रमाणात मिळावयास हवेत तसेच पर्यावरणाची हानी (ऱ्हास) झाल्याने एखाद्या व्यक्तीचे वा समूहाचे इतर व्यक्ती वा समूहांहून अधिक नुकसान होता कामा नये. शाश्वत विकासाच्या संकल्पनेत समतेचे हे तत्त्व सध्याच्या व पुढच्या पिढ्यांच्या संदर्भात लागू होणे अपेक्षित आहे. प्रत्येक पिढीला मागील पिढ्यांकडून प्राप्त होणाऱ्या सांस्कृतिक व नैसर्गिक वारशाचा फायदा मिळणे हा तिचा मूलभूत अधिकार आहे तसेच हा वारसा पुढील पिढ्यांसाठी जतन करून ठेवणे हे तिचे कर्तव्य ठरते. आंतरपिठीय समतेच्या कल्पनेत अशा या हक्क व कर्तव्याचा समावेश होतो. नैसर्गिक संसाधनांचा वापर ती पुढील पिढ्यांसाठीही टिकून राहतील अशी व्यवस्था होणे यालाच आंतरपिठीय समता असे म्हणता येते. शाश्वत विकासात नैसर्गिक संसाधनावर सध्याच्या तसेच पुढील पिढ्यांचा समान अधिकार आहे असे मान्य केले जाते.

**२) नैसर्गिक संसाधनांचा वापर व संवर्धन** (Used conservation of natural resources) – नैसर्गिक संसाधनांचा काळजीपूर्वक वापर करणे व त्यांचे संवर्धन करणे हे शाश्वत विकासाचे दुसरे तत्त्व आहे. नैसर्गिक संसाधनांचा वापर करताना मानवाच्या प्रत्येक पिढीने इतर सजीव व पुढील पिढ्यांसाठी ही संसाधने पर्याप्त मात्रेत टिकून राहतील याची काळजी घेणे हे तिचे नैतिक कर्तव्य ठरते. वाढत्या लोकसंख्येच्या गरजापूर्तीसाठी संसाधनांचे संवर्धन करणे आवश्यक ठरते.

**३) पर्यावरण संरक्षण** (Protection of Environement) – पर्यावरणाचे संरक्षण करणे हे शाश्वत विकासाचे एक महत्त्वाचे तत्त्व आहे. पर्यावरणाचे पर्याप्त स्वरूपात संरक्षण न केल्यास विकासाची प्रक्रिया ही क्षीण (दुर्बल/कमकुवत) होते आणि विकासाशिवाय अपेक्षित गुंतवणुकीसाठी संसाधनेही अपुरी पडतात. परिणामी पर्यावरण संरक्षणाचे प्रयत्न अयशस्वी होतात. पर्यावरणाविषयीची योग्य धोरणे ही विकासासाठी पूरक ठरतत. विकासास बळकटी आणतात. पर्यावरणाचा ऱ्हास व प्रदूषण यामुळे श्रीमंतापेक्षा गरिबांचे अधिक नुकसान होते. कारण गरीब लोक श्रीमंताप्रमाणे या गोष्टींपासून स्वत:चे संरक्षण करू शकत नाहीत. जगाच्या विविध भागातील बहुसंख्य लोक हे आपल्या निर्वाहासाठी जंगलावर अवलंबून आहेत. जंगलांचा अविवेकी व अतिरेकी स्वरूपात वापर करणे हे कृत्य विकास प्रक्रिया, पर्यावरण व गरीब लोक या सर्वांसाठी हानिकारक ठरते म्हणून पर्यावरणाचे संरक्षण करणे हे तत्त्व सर्व स्तरावर घेण्यात येणाऱ्या निर्णय प्रक्रियेचे अविभाज्य अंग बनले पाहिजे.

**४) सावधगिरीचे तत्त्व** (Precautionary Principle) –शाश्वत विकासात सावधगिरीचे तत्त्व स्वीकारले जाते. मानवी हस्तक्षेपाचा परिणाम म्हणून निर्माण झालेला एखादा पदार्थ (substance) वा क्रिया (activity) यांच्यामुळे पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम होत असेल व ही गोष्ट अद्याप वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेली नसेल तरीही त्या पदार्थांवर वा क्रियेवर प्रतिबंध घालणे हा सावधगिरीच्या तत्त्वाचा मुख्य उद्देश आहे. यासंदर्भात स्थानिक स्वराज्य संस्था व शासन यांनी पर्यावरणाची हानी करणारी कारणे गृहीत धरून त्या कारणांना प्रतिबंध करावा, ती नष्ट करावीत असे सावधगिरीचे तत्त्व सांगते. तसेच जेथे कोठे पर्यावरणाची हानी गंभीर स्वरूपात होत असेल व ही हानी कधीही भरून काढता येणारी नसेल तर अशावेळी ही बाब वैज्ञानिकदृष्ट्या निश्चित झालेली नाही ही सबब (कारण) सांगून ती हानी रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना पुढे ढकलली जाऊ नये. त्याचबरोबर आपली कृती ही पर्यावरणास हानी पोहोचविणार नाही हे सिद्ध करून दाखविण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तींवर राहील ही बाबदेखील सावधगिरीच्या तत्त्वात अभिप्रेत आहे. बहुतेक सर्वच आंतरराष्ट्रीय संस्था व संघटनांच्या पर्यावरणविषयक धोरणात व कार्यक्रमात सावधगिरीचे तत्त्व स्वीकारण्यात आलेले आहे. यासंदर्भात असे म्हटले जाते की शाश्वत विकास हे इच्छित ध्येय असून सावधगिरीचे तत्त्व हे या ध्येयपूर्तीसाठीची योग्य अशी व्यूहरचना आहे.

**५) प्रदूषणकर्त्याने नुकसान भरपाई देण्याचे तत्त्व** (Polluter Pays Principle - PPP) - शाश्वत विकासात नुकसान भरपाई देण्याचे तत्त्वही अंतर्भूत आहे. या तत्त्वाचा अर्थ असा आहे की, जो कोणी पर्यावरणाचे प्रदूषण करील, त्याची हानी करील त्याने तया प्रदूषणास वा हानीस बळी पडलेल्या व्यक्तींना (victims) योग्य ती नुकसान भरपाई

द्यावीच. शिवाय पर्यावरणाची झालेली हानी भरून काढण्यासाठी द्यावी लागणारी किंमतदेखील चुकती करावी. थोडक्यात नुकसान भरपाईच्या तत्त्वात पर्यावरणाची हानी करणाऱ्या व्यक्तीवर किंवा संस्थेवर ती हानी भरून काढण्याची जबाबदारी टाकलेली आहे.

**६) मदतीचे व सहकार्याचे बंधन किंवा कर्तव्य** (Obligation to assist and co-operate) – पर्यावरणाचे प्रदूषण किंवा हानी होणे ही कोणत्या एका व्यक्तीची वा देशाची समस्या नसून ती जागतिक स्वरूपाची समस्या आहे. त्यामुळे ही समस्या जगातील सर्व देशांनी व नागरिकांनी एकत्र येऊन परस्पर मदतीने व सहकार्याने सोडविली पाहिजे. त्यासाठी आवश्यक त्या वैज्ञानिक व तांत्रिक ज्ञानाची व साधनांची परस्परांत देवाणघेवाण केली पाहिजे. तसेच जगातील सर्व देशांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर एक आर्थिक व्यवस्था निर्माण करून तिच्याद्वारे सर्व देशांत आर्थिक वृद्धी व शाश्वत विकास घडवून आणण्याचे प्रयत्न करावेत.

**७) दारिद्य्र निर्मूलन** (Erudication of poverty) – शाश्वत विकासात दारिद्य्र निर्मूलनावर भर दिला जातो. जगातील बहुसंख्य लोक हे दरिद्री असून त्यांना आपल्या मूलभूत गरजादेखील व्यवस्थितपणे पूर्ण करता येत नाहीत. नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत वापर कसा करावा हे दारिद्य्रामुळे लोकांना समजत नाही. त्यामुळे पर्यावरणावर प्रचंड ताण (दबाव) पडतो. बहुसंख्य विकसनशील देश हे दारिद्य्राच्या समस्येने ग्रासलेले आहेत. त्यामुळे विकसनशील देशांत आर्थिक वृद्धीची प्रक्रिया अधिक गतिमान करून दारिद्य्र निर्मूलन केले पाहिजे. दारिद्य्र निर्मूलनामुळे पर्यावरणाचा होणारा ऱ्हास रोखणे शक्य होते. म्हणूनच दारिद्य्र निर्मूलन ही शाश्वत विकासाची गुरुकिल्ली मानली जाते.

**८) विकसनशील देशांना वित्तीय व तांत्रिक साहाय्य देणे** (To provide financial and technical assistance to developing countries) - दारिद्य्र ही सर्वच विकसनशील देशांची समस्या असून, ही समस्या पर्यावरणाच्या प्रदूषणाचे एक महत्त्वाचे कारण आहे. दारिद्य्रामुळे या देशातील लोक हे आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी नैसर्गिक संसाधनांचा अंधाधुंदपणे वापर करतात. तसेच या देशांकडे शाश्वत स्वरूपाचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारा पैसा किंवा वित्त आणि आधुनिक तंत्रज्ञान नाही. त्यामुळे या देशांत पर्यावरणाची हानी मोठ्या प्रमाणात होते. म्हणून शाश्वत विकासासाठी व पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी विकसित देशांनी विकसनशील देशांना अर्थसाहाय्य व आधुनिक तंत्रज्ञान पुरविणे आवश्यक आहे.

### १.२.६ विकासाला हक्क (Right to Development) -

या घटकाच्या शेवटी तुम्ही विकासाला हक्क (अधिकार) ही संकल्पना समजावून घेणार आहात. व्यक्तीला आपली प्रगती वा उत्कर्ष घडवून आणण्यासाठी, आपल्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी सुखी व संपन्न जीवन जगण्यासाठी काही हक्क किंवा अधिकार (rights) असावयास हवेत ही गोष्ट आज जगातील सर्वच समाजात मान्य केलेली आहे. यातून मानवी हक्कांची संकल्पना (Concept of Human rights) उदयास आलेली आहे. मानव म्हणून प्रत्येक व्यक्तीस काही निश्चित असे हक्क जन्मत:च स्वाभाविकपणे (नैसर्गिकपणे)

प्राप्त होतात. या हक्कांनाच स्थुलमानाने मानवी हक्क असे म्हटले जाते. उदा. जीविताचा हक्क, समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, अन्यायाविरुद्ध दाद मागण्याचा हक्क, मतदानाचा हक्क, मालमत्तेचा हक्क इत्यादी महत्त्वपूर्ण मानवी हक्क आहेत. विकासाला हक्क हा देखील असाच एक मानवी हक्क मानला जातो. ''प्रत्येक व्यक्तीस स्वत:चा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचा हक्क किंवा अधिकार आहे.'' असे मानले जाते. आज विकासाला हक्क हा एक आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता पावलेला मानवी हक्क आहे. सर्व प्रकारचे मूलभूत हक्क व स्वातंत्र्य हे जिविताचा हक्क उच्च जीवनमान प्राप्त करण्याचा हक्क आणि म्हणून विकासाच्या हक्काशी अनिवार्यपणे जोडलेले आहेत. त्यामुळे विकासाला हक्क हा मानवी हक्क आहे. कारण देशाचा/समाजाचा विकास घडवून आणल्याशिवाय मनुष्याला मनुष्य म्हणून (केवळ प्राणी म्हणून नव्हे, आपले अस्तित्व टिकविता येत नाही. म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व संस्था व कार्यालयांच्या आज्ञा किंवा हुकुमांमध्ये (mandate) विकासाला हक्क समाविष्ट केलेला आहे.

विकासाच्या हक्कास सर्वप्रथम मान्यता आफ्रिकन सनद देण्यात आली. सन १९८१ मध्ये ''आफ्रिकन ऐक्य संघटना (Organization of African Unity)'' या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या सभेत आफ्रिकन देशांचे प्रमुख व त्या देशांच्या सरकारचे प्रतिनिधी यांनी मानवी व जनतेच्या हक्कांबाबत एक सनद (Charter on Human and People's Rights) मंजूर केली. तिलाच आफ्रिकन सनद (African Charter) असे म्हणतात. या सनदेत नागरी (Civil), राजकीय (Social), आर्थिक (Economic), सामाजिक (Social), सांस्कृतिक (Cultural) हक्कांचा समावेश आहे. या सनदेच्या २२व्या कलमात असे सर्वप्रथम नमूद केले की, ''आपले स्वातंत्र्य व अस्मिता यांचे जतन करण्यासाठी आणि मानवजातीच्या सामूहिक वारशाचा समान उपभोग घेण्यासाठी सर्व लोकांना आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाला हक्क असावयास हवा.'' या सनदेत मालमत्तेचा हक्क, काम करण्याचा हक्क, आरोग्याचा हक्क, शिक्षणाचा हक्क आणि इतरही आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांबाबतच्या तरतुदी केलेल्या आहेत. यापुढे विकासाच्या हक्काकडे विशेष लक्ष देणे अत्यावश्यक आहे असेही या सनदेत नमूद केलेले आहे.

### **आफ्रिकन सनद** (African Charter)

**संयुक्त राष्ट्रसंघाचा विकासाच्या हक्काचा जाहिरनामा –** आफ्रिकन सनदेनंतर संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १९८६ मध्ये विकासाच्या हक्कास जाहिरपणे मान्यता दिली. यालाच विकासाच्या हक्काची घोषणा किंवा जाहीरनामा (Declaration on Right to Development) असे म्हणतात.

या जाहिरनाम्यातील प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

१) कलम १ आणि २ मध्ये व्यक्तींच्या हक्कांची चर्चा केलेली आहे.

२) कलम ३ ते ८ अंतर्गत राज्यांच्या कर्तव्याचे (विकासाबाबतच्या) वर्णन केलेले आहे.

३) कलम ८ मध्ये असे म्हटले आहे की राज्याने सर्व व्यक्तींना रोजगाराच्या समान संधी देऊन विकासाच्या हक्कास सुनिश्चित करावे. महिलांनाही काम करण्यात सहभागी करून घ्यावे.

४) कलम ९ मध्ये असे स्पष्ट केले आहे की व्यक्तीला आपला संपूर्ण विकास करण्यास अनुकूल ठरेल असे वातावरण राज्याने निर्माण करावे.

५) विकासाला हक्क हा कोणीही हिरावून घेऊ शकत नाही.

६) प्रत्येक व्यक्ती आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय विकासात सहभागी होऊन आपले योगदान देऊ शकते.

७) विकासाला हक्क असेल तरच मानवी हक्क व स्वातंत्र्ये ही पूर्णपणे प्राप्त होऊ शकतात.

पर्यावरण आणि विकासासंबंधीचा रिओ जाहिरनामा (The Rio Declaration on Environment and Development) – पर्यावरण आणि विकास यावर संयुक्त राष्ट्रसंघाची एक परिषद जून १९९२ मध्ये रिओ–दे जानेरो येथे भरली होती. तिलाच विश्व परिषद (Earth Summit) असे म्हणतात. या परिषदेने २७ कलमी जाहिरनामा प्रसिद्ध केला. यासच रिओ जाहिरनामा म्हणतात. या जाहिरनाम्यातील कलम ३ मध्ये विकासाच्या हक्कास मान्यता दिलेली आहे. कलम ३ मध्ये असे म्हटले आहे की वर्तमान तसे भावी पिढीच्या विकासाच्या व पर्यावरणाच्या गरजा या समान स्वरूपात भागविल्या जातील अशा विकासाच्या हक्काची पूर्तता झालीच पाहिजे.

व्हिएन्ना जाहिरनामा (The Vienna Declaration) – मानवी हक्कांशी संबंधित असे एक विश्व संमेलन (परिषद) १४ जून ते २५ जून १९९३ मध्ये व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) येथे भरले होते. त्यामध्ये १७१ देशांचे सुमारे २१०० प्रतिनिधी सहभागी झाले होते. या संमेलनात जो जाहिरनामा प्रसिद्ध केला त्यासच व्हिएन्ना जाहिरनामा असे म्हणतात. या जाहिरनाम्यात विकासाच्या हक्काबाबत पुढील तरतुदी केलेल्या आहेत.

✻ विकासाला हक्क हा विश्वव्यापी (Universal) आणि अदेय म्हणजेच हिरवून न घेता येणारा (Inalienable) असा आहे.

✻ विकासाला हक्क हा मूलभूत हक्कांचे अविभाज्य अंग आहे.

✻ विकास घडवून आणण्यासाठी व विकासाच्या मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी विविध देशांनी परस्परांना सहकार्य करावे. तसेच आंतरराष्ट्रीय समुदायानेही त्यासाठी परिणामकारक असे आंतरराष्ट्रीय सहकार्य निर्माण करण्यास चालना द्यावी.

✻ विकसनशील देशांवरील परकीय कर्जे कमी केली पाहिजेत. कारण त्यामुळे त्यांना आपल्या जनतेस आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक हक्क देता येतील.

✻ स्थानिक लोकांच्या हक्कांविषयीचा जाहिरनामा (Declaration on the Right of Indigenous Peoples) – संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १३ सप्टेंबर २००७ रोजी हा जाहिरनामा स्वीकारला व त्यामध्ये विकासाला हक्क हा स्थानिक (मूळच्या) लोकांचा हक्क आहे असे मान्य केलेले आहे. या जाहिरनाम्यात असे नमूद केले आहे की, वसाहतवादी धोरणामुळे अनेक देशांतील स्थानिक लोक हे इतिहासकाळात अन्यायास बळी पडलेले होते. त्यांच्या जमिनी, भूप्रदेश, साधनसामग्री हिरावून घेण्यात आलेल्या होत्या. त्यामुळे आता त्यांचा विकासाला हक्क मान्य करावयास हवा. या जाहिरनाम्यातील कलम २३ असे सांगते

की, स्थानिक लोकांना त्यांचा विकासाला हक्क अंमलात आणण्यासाठी आवश्यक असलेली व्यूहरचना (strategies) व अग्रक्रम (Priorities) निर्धारित व विकसित करण्याचा हक्क असावयास हवा. आरोग्य, गृहनिर्माण व इतर आर्थिक व सामाजिक कार्यक्रम निर्धारित व विकसित करण्यामध्ये स्थानिक लोकांचा सहभाग असावयास हवा. तसेच या कर्मचाऱ्यांचे प्रशासन हे शक्यतो स्थानिक लोकांच्या संस्थांद्वारे चालविले जाते.

अशाप्रकारे विकसाचा हक्क हा आज आंतरराष्ट्रीय स्तरावर एक मानवी हक्क म्हणून मान्य झालेला आहे.

विकसाच्या हक्काचे महत्त्व – विकसाबाबतचे जे वर्तमानकालीन सिद्धांत आहेत त्यामधील एक महत्त्वाचा दोष असा की या सिद्धांतात विकासाचे अमानवीय (unhuman) आधार लक्षात घेतलेले आहेत. त्यामुळे विकास कार्यात असंतुलन निर्माण झालेले आहे. तथापि विकासाला हक्क या संकल्पनेमुळे हा दोष दूर होण्यास मदत झाली आहे. विकासाच्या हक्कामुळे प्रत्येक व्यक्तीस विकासाची संधी देऊन मानवकेंद्रित विकासाच्या दृष्टिकोनास प्रोत्साहन मिळालेले आहे. विकासाच्या हक्कामुळे व्यक्तीला जगण्यासाठी आवश्यक असणारी अनुकूल परिस्थिती उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाने संस्थेवर टाकलेली आहे. तर व्यक्तीला देशातील उपलब्ध साधनसामग्रीचा वापर करण्याचा समान हक्क मिळालेला आहे. विकासाला हक्क हा एखाद्या व्यक्तीस किंवा संस्थेस कोणत्याही नैसर्गिक साधनसामग्रीवर एकाधिकार प्रस्थापित करण्याचा हक्क देत नाही. त्यामुळे इतरांच्या विकासाच्या संधी मर्यादित होऊ शकत नाहीत. साधनसामग्रीचा समान उपभोग घेण्याचा अधिकार प्रदान करून व्यक्ती विकासास अनुवूल परिस्थिती निर्माण करण्याची जबाबदारी शासनावर टाकलेली आहे. प्रत्येक व्यक्तीस विकासाचे धोरण ठरविण्यात व कार्यक्रम राबविण्यात सहभागी होण्याची संधी विकासाच्या हक्कामुळे प्राप्त झालेली आहे. थोडक्यात विकासाला हक्क हा व्यक्ती व समाज या दोघांच्याही हिताच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारा आहे. त्यामुळे हा हक्क आंतरराष्ट्रीय कायद्यातील एक प्रमुख तत्त्व बनलेले आहे. मेहरान संमेलनात विकासाच्या हक्काचे महत्त्व स्पष्ट करताना हे मान्य केले आहे की, जोपर्यंत व्यक्तीस आर्थिक व सामाजिक विकासाला हक्क दिला जात नाही तोपर्यंत नागरी व राजकीय हक्कांचा उपयोग नाही. कारण हे हक्क परस्परपूरक आहेत.

## १.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.

१) विकास म्हणजे काय?

,.................................................................................

,.................................................................................

,.................................................................................

२) आर्थिक विकासाची कोणतीही एक व्याख्या द्या.

,..............................................................................

,..............................................................................

,..............................................................................

३) आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी यातील मूलभूत फरक सांगा.

,..............................................................................

,..............................................................................

,..............................................................................

४) सामाजिक विकास या संज्ञेचा अर्थ सांगा.

,..............................................................................

,..............................................................................

,..............................................................................

५) मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी कोणते तीन घटक विचारात घेतले जातात?

,..............................................................................

,..............................................................................

,..............................................................................

६) ब्रुटलँड आयोगाने केलेली शाश्वत विकासाची व्याख्या सांगा.

,..............................................................................

,..............................................................................

,..............................................................................

७) विकासाच्या हक्कास सर्वप्रथम मान्यता कोणत्या सनदेमध्ये देण्यात आली?

,..............................................................................

,..............................................................................

,..............................................................................

## १.४ सारांश

या पहिल्या घटकामध्ये तुम्ही विकासाशी संबंधित असलेल्या विविध संकल्पना समजावून घेतलेल्या आहेत. सर्वप्रथम विकास या संज्ञेचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. विकास ही अधिक प्रगत गोष्ट करण्याची प्रक्रिया आहे. सामाजिक शास्त्रामध्ये विकास ही संज्ञा, ''समाजाच्या कोणत्याही क्षेत्रात इच्छित किंवा अपेक्षित दिशेने परिवर्तन घडून येणे.'' या अर्थाने वापरली जाते. संयुक्त राष्ट्र संघाच्या तज्ज्ञ समितीच्या मते विकासाला संबंध मानवाच्या केवळ भौतिक गरजांशी नसून तो त्याच्या जीवनाच्या सामाजिक स्थितीतील सुधारणांशी आहे. त्यामुळे विकास म्हणजे केवळ आर्थिक वृद्धी नव्हे, तर वृद्धीबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक,

संस्थात्मक तसेच आर्थिक बदल होय. यानंतर तुम्ही आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी या दोन्हींचे अर्थ व वैशिष्ट्ये समजावून घेऊन त्यांच्यातील फरक समजावून घेतलेला आहे. पारंपरिक दृष्टिकोनानुसार आर्थिक विकास म्हणजे राष्ट्रीय तसेच दरडोई उत्पन्नात वाढ होणे व संस्थात्मक बदल होणे होय. याउलट नवीन कल्याणकारी दृष्टीकोनानुसार आर्थिक विकास म्हणजे उत्पन्नात वाढ व संस्थात्मक बदलाबरोबरच व्यक्ती व समाज यांच्या भौतिक व अभौतिक कल्याणात सुधारणा होणे होय.

१) राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात वापर होणे. २) लोकांच्या भौतिक कल्याणात वाढ होणे. ३) आर्थिक क्षेत्रात सुधारणा होणे. ४) आर्थिक विकास ही गतिशील व दीर्घकाल चालणारी प्रक्रिया आहे. इत्यादी आर्थिक विकासाची वैशिष्ट्ये आहेत. आर्थिक वृद्धी ही संकल्पना आर्थिक विकास या संकल्पनेहून भिन्न आहे. एखाद्या अर्थव्यवस्थेत प्रदीर्घ काळात मंदगतीने व सातत्याने होणारी वाढ म्हणजे आर्थिक वृद्धी होय. आर्थिक वृद्धीची पुढील वैशिष्ट्ये आहेत. १) आर्थिक वृद्धीत एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. २) आर्थिक वृद्धी ही जलद वा मंद स्वरूपाची असते. ३) आर्थिक वृद्धीमुळे दरडोई उत्पन्न वाढतेच असे नाही. ४) आर्थिक वृद्धी ही समाधानकारक वा असमाधानकारक असू शकते. ५) तसेच ती उणे व शून्य स्वरूपाची असून शकते. आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी यातील फरक पुढीलप्रमाणे आहेत. – १) वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे म्हणजे आर्थिक विकास होय तर एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे म्हणजे आर्थिक विकास होय तर एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे म्हणजे आर्थिक वृद्धी होय. २) आर्थिक विकासात गुणात्मक तर आर्थिक वृद्धीत संख्यात्मक बदल घडून येतात. ३) आर्थिक विकासाची गती खंडित असते तर आर्थिक वृद्धी सातत्याने होत राहाते. ४) आर्थिक विकास ही संज्ञा विकसनशील देशांसाठी तर आर्थिक वृद्धी ही विकसित देशांसाठी वापरली जाते. ५) आर्थिक विकास जाणीवपूर्वक घडवून आणावा लागतो तर आर्थिक वृद्धी ही आपोआप होत असते. ६) आर्थिक विकास हे आर्थिक वृद्धीचे कारण तर आर्थिक वृद्धी ही आर्थिक विकासाला परिणाम आहे.

यानंतर तुम्ही सामाजिक विकासाला अर्थ व त्याची वैशिष्ट्ये अभ्यासलेली आहेत. समाजातील समस्या व प्रश्नांची सोडवणूक करून समाजातील सर्व घटकांच्या जीवनाची गुणवत्ता उंचावण्याची प्रक्रिया म्हणजे सामाजिक विकास होय. सामाजिक विकास ही नियोजनबद्ध व सुधारणात्मक अशी सामाजिक परिवर्तनाची एक प्रक्रिया आहे. सामाजिक विकासासाठी विविध पद्धतींचा अवलंब केला जातो. सामाजिक विकासाची काही निदर्शके (उदा. जगण्याच्या स्थितीत सुधारणा होणे, दारिद्र्याचे निर्मूलन होणे, रोजगारात वाढ होणे, विषमतेचे प्रमाण कमी होणे, शिक्षण व आरोग्य सुविधांचा विस्तार होणे इ. आहेत. सामाजिक विकासाची प्रक्रिया ही लोकशाही तत्त्वांशी सुसंगत असून, ती सामाजिक उत्क्रांतीच्या प्रक्रियेहून भिन्न अशी आहे.

यानंतर मानव विकास ही संकल्पना अभ्यासलेली आहे. संयुक्त राष्ट्रे विकास कार्यक्रमाच्या पहिल्या मानव विकास अहवालानुसार ''मानव विकास ही लोकांच्या निवडी व पसंती विस्तारीत करण्याची प्रक्रिया आहे.'' मानव विकासाला संबंध हा मानवी जीवनाची गुणवत्ता वाढविणाऱ्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक घटकांशी आहे. मानवी कार्यक्षमतांचा

विकास होणे म्हणजे मानव विकास असेही मानले जाते. विकासाचे मोजमाप करण्यासाठी मानव विकास निर्देशांक वापरला जातो. हा निर्देशांक दीर्घायुष्य, ज्ञानप्राप्ती व जीवनमानाचा दर्जा या तीन घटकांचा विचार काढून काढला जातो.

विकास व पर्यावरण यांच्या अध्ययनात शाश्वत विकास ही संकल्पना विशेष लोकप्रिय झाली आहे. ब्रुटलँड आयोगाच्या अहवालानुसार, ''शाश्वत विकास म्हणजे असा विकास की ज्याच्याद्वारे भावी पिढ्यांच्या त्यांच्या स्वत:च्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता वर्तमानकालीन गरजा पूर्ण केल्या जातात.'' शाश्वत विकासात पुढील घटक अंतर्भूत आहेत. १) शाश्वत विकासात गरजापूर्तीची संकल्पना अंतर्भूत आहे. २) त्यामध्ये सर्व लोकांच्या कल्याणाची कल्पना अंतर्भूत आहे. ३) त्यामध्ये विकासाची एक विशिष्ट पद्धती (प्रतिमान) अंतर्भूत आहे. ४) त्यामध्ये उपभोगाचीही विशिष्ट पद्धती अंतर्भूत आहे. ५) पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याची कल्पना त्यामध्ये केंद्रस्थानी आहे. ६) त्यामध्ये व्यक्तीच्या अभिवृत्ती, दृष्टिकोन व वर्तनप्रकार यामध्ये बदल होणे अपेक्षित आहे. शाश्वत विकासाची काही तत्त्वे आहेत. ती पुढीलप्रमाणे – १) आंतरपीठीय समता प्रस्थापित करणे. २) नैसर्गिक संसाधनांचा वापर व संवर्धन करणे. ३) पर्यावरणाचे संरक्षण करणे. ४) सावधगिरीचे तत्त्व स्वीकारणे. ५) प्रदूषण कर्त्याने नुकसान भरपाई देणे. ६) पर्यावरणाची समस्या ही सर्व देशांनी परस्परसहकार्याने सोडविणे. ७) दारिद्र्याचे निर्मूलन करणे. ८) विकसनशील देशांना वित्तीय व तांत्रिक सहाय्य देणे.

सर्वात शेवटी तुम्ही विकासाला हक्क ही संकल्पना अभ्यासली आहे. आज आंतरराष्ट्रीय स्तरावर हे मान्य झाले आहे की, प्रत्येकास स्वत:चा संपूर्ण विकास घडवून आणण्याचा हक्क आहे. आफ्रिकन सनद, संयुक्त राष्ट्रांचा विकासाच्या हक्काचा जाहिरनामा, रिओ जाहिरनामा, व्हिएन्ना जाहिरनामा, स्थानिक लोकांच्या हक्कांचा जाहिरनामा इत्यादीत विकासाच्या हक्कास मान्यता मिळालेली आहे.

## १.५ पारिभाषिक शब्द/शब्दार्थ

* संयुक्त राष्ट्रसंघ – आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखणे. आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविणे, मानवी हक्क व मानवी स्वातंत्र्य सर्वांना उपलब्ध करून देणे इत्यादी उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी १९४५ मध्ये स्थापन केलेली आंतरराष्ट्रीय संघटना.
* हक्क – व्यक्तीच्या गरजापूर्तीसाठी व विकासासाठी आवश्यक असणारे सामाजिक परिस्थितीतील समाजमान्य घटक किंवा साधने.
* पर्यावरण – निसर्गातील सजीव–निर्जीव घटक तसेच मानवनिर्मित भौतिक – अभौतिक घटक यांच्यातील सहसंबंधामुळे सजीवाभोवती निर्माण झालेली व त्याच्यावर प्रभाव टाकणारी परिस्थिती.
* संसाधने – गरजापूर्तीसाठी वापरली जाणारी साधनसामग्री. उदा. जमीन, खनिजे, पाणी, वनस्पती, इत्यादी.
* प्रशासन – विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अनेक व्यक्तींचे व साधनांचे संघटन,

संचालन, संयोजन व नियंत्रण करणे.

* संघटन – निश्चित हेतुच्या पूर्ततेसाठी लोकांमध्ये कार्ये व जबाबदाऱ्यांचे वाटप करण्याची व्यवस्था.
* कल्याण – सुस्थिती/सुखसमाधानाची स्थिती.
* सुधारणा – एखाद्या वस्तूतील दोष काढून तिला सुस्थितीत आणणे, तिची धारणा चांगली करणे.
* प्रगती – चांगल्या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी घडवून आणलेले परिवर्तन.
* सनद – विशेषाधिकार व सत्ता यांचे लिखित निवेदन किंवा विधान.

## १.६ संदर्भ सूची


१) S. K. Misra and V. K. Puri - Economic of Development and planning.

२) P. K. Singhal & Pankaj Shrivastav - Challenges in Sustainable Development.

३) P. s. Jaswal and Nishtha - Jaswal - Environment Law

४) मालवीय पदमधर/मुकर्जी आर. एन. – विकास का समाजशास्त्र

५) चंद्रकांत खंडागळे – भारतीय समाज

६) डॉ. वसुधा पुरोहित – विकास व पर्यावरणाचे अर्थशास्त्र.


## १.७ सरावासाठी प्रश्न

अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) आर्थिक विकासाची व्याख्या देऊन त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) आर्थिक वृद्धीची व्याख्या देऊन तिची वैशिष्ट्ये विशद करा.

३) सामाजिक विकास म्हणजे काय हे सांगून त्याच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा.

४) मानव विकास ही संकल्पना स्पष्ट करा.

५) शाश्वत विकासाला अर्थ सांगून त्याचे घटक स्पष्ट करा.

ब) टीपा लिहा

१) विकास संज्ञेचा अर्थ

२) आर्थिक विकास व आर्थिक विकास यातील फरक

३) समाािजक विकासाच्या पद्धती व निदर्शके

४) शाश्वत विकासाची तत्त्वे

५) विकासाला हक्क.

# प्रकरण २
# आर्थिक जीवनाचा विकास आणि सामाजिक क्षेत्र

**अनुक्रमाणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

  २.२.१ प्रकरणाचा मुख्य गाभा – आर्थिक जीवनाचे सामाजिक पैलू

  २.२.२ आर्थिक विकास आणि कुटुंब नातेगोती संबंध

  २.२.३ आर्थिक विकास आणि व्यवसाय यांचा संबंध

  २.२.४ आर्थिक विकासाला कुटुंबावर होणारा परिणाम

  २.२.५ आर्थिक विकास आणि सामाजिक स्तरीकरण

  २.२.६ आर्थिक विकास आणि धर्म

  २.२.७ आर्थिक विकास आणि राजकीय पैलू

  २.२.८ आर्थिक विकास आणि सांस्कृतिक मूल्ये

२.३ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

२.४ संदर्भसूची


## २.० उद्दिष्टे

१) आर्थिक विकास आणि सामाजिक पैलूंचा अभ्यास करणे.

२) आर्थिक विकास आणि कुटुंब–नाते व्यवस्थेच्या संबंधाचा शोध घेणे.

३) आर्थिक विकासात व्यावसायिकतेच्या महत्त्वाचा अभ्यास करणे.

४) आर्थिक विकासात सामाजिक स्तरीकरणाची भूमिका शोधणे.

५) आर्थिक विकास आणि धर्म यांचा परस्परसंबंध अभ्यासणे.

६) आर्थिक विकासात राजकीय पैलू योगदान.

७) आर्थिक विकास आणि सांस्कृतिक मूल्यांचा संबंध अभ्यासणे.

## २.१ प्रस्तावना –

आधुनिक समाजाच्या विकासासाठी समाजरचनाही महत्त्वाची असते. त्यासाठी समाजातील संबंधामध्येही बदल होणे आवश्यक आहे. अर्थातच सामाजिक संबंधामध्ये आधुनिकता येणे गरजेचे असे. आर्थिक विकास आणि आधुनिकतेचा संबंध परंपरागत सामाजिक मार्गाचा

त्याग करून आधुनिक औद्योगिक बाजूंचा विचार करणे महत्त्वाचे आहे. श्यामचरण दुबे यांनी आपल्या 'विकासाचे समाजशास्त्र' या ग्रंथात आर्थिक विकास आणि आधुनिकता या संकल्पनेवर सविस्तर प्रकाश टाकला आहे. याशिवाय पार्सन्स, स्मेलसर, लेव्ही आणि आयसेन्स्टँड इतयादी समाजशास्त्रज्ञांनी या संकल्पनेच्या विकासात योगदान दिलेले आहे.

आर्थिक विकासात संरचनेचे विभेदीकरण ही संकल्पना मुख्य आहे. या संकल्पनेबद्दल सर्वप्रथम स्पेन्सर आणि नंतर मॅकआव्हर यांनी लिखाण केलेले दिसून येते. संरचना विभेदीकरण म्हणजे समाजातील विविध गट उपगट, संघटना, संस्था, त्यातील विविध विभागांत झालेले विभाजन होय. समाजातील प्रत्येक कार्यासाठी वेगवेगळी अव्यवस्था असते. त्यानुसार व्यक्तीची भूमिका ठरते. उदा. औद्योगिक क्रांतीपूर्वी सर्व लोक शेती व्यवसायाभोवती गुंतलेले होते. अर्थात इतर उद्योगांत अधिक महत्त्व नसल्याचे जाणवत होते. संपूर्ण समाजात संयुक्त कुटुंब पद्धत होती म्हणजे शेतीशी निगडित व्यवस्था व कामधंदा होता. नंतर मात्र, उद्योगांमध्ये विशेषीकरण झाले. व्यक्तीच्या श्रमांच विभागणी झाली व उद्योगव्यवस्था व अर्थव्यवस्था अधिकाधिक गुंतागुंतीची झाली. समाजातील प्रत्येक व्यक्ती हा एका मर्यादेत न राहता गावापासून शहरापर्यंत विविध क्षेत्रांत स्वतंत्र व्यवसाय करत निघाला.

आधुनिक समाजात समाजाचा सर्वांगीण विकास जसजसा वाढत राहील तसतसा समाज धार्मिकतेला सोडून निधार्मिकतेकडे व बुद्धिप्रमाण्यतेकडे जाईल. अर्थात सामाजिक संस्थांवरील धर्माचा प्रभाव आपोआप कमी होईल. समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढल्याशिवाय विशेषीकरणाला योग्य दिशा मिळत नाही. पूर्वी समाजात जातीय संरचना साधी व सरळ स्वरूपाची होती. उदा. जात जातपंचायत, कुळे-जमीनदार, गरीब-श्रीमंत, बलुतेदारी इत्यादी. आधुनिक औद्योगिक समाजरचनेत उद्योगांचे विशेषीकरण झाले व त्यामुळे समाजात वर्ग रचना निर्माण झाली. अशा वर्गीय समाजातून विविध संघटना, गट-उपगट निर्माण झाले व समाजाला राजकीय अंग जाणवू लागले. पूर्वी कुटुंबातील वडिलधारी व्यक्ती धर्म, समाज, व्यवसाय, पंचायत, शिक्षण इत्यादी ठिकाणी नियंत्रण ठेवत होते. आता मात्र सर्व व्यक्ती स्वतंत्र झालेले दिसतात.

आजचा भारतीय समाज पाश्चिमात्य समाजाप्रमाणे दिसून येतो. औद्योगिकदृष्ट्या विकसित राष्ट्रांमध्ये व्यवसायाला अधिक संधी दिली जाते. अशा राष्ट्रांमध्ये जातपात, धर्म, भाषा, राज्य, जातीव्यवस्था अशा विचारांना थारा दिला जात नाही तर येथे व्यक्तीची कार्यक्षमता, कार्यत्परता, नियोजन, फायदा, संपत्तीमध्ये वृद्धी इत्यादी प्रकारची व्यावहारिकता आणि बुद्धिप्रामाण्यता स्वीकारली जाते. आधुनिक समाजात व्यक्तीचा दर्जा हा गुणवत्तेवर, कर्तृत्त्वावर व्यक्तीने स्वत: संपादित केलेला असतो. तर परंपरागत समाजात वय, लिंग, जात, धर्म व्यवसाय, इत्यादींवर अवलंबून असतो. आधुनिक समाजात व्यवसायामध्ये अधिक विशेषीकरण झाल्याने प्रत्येकाच्या कार्यक्षेत्राच्या मर्यादा निर्माण झाल्या. आधुनिक समाजात व्यक्तीला सामाजिकतेबरोबरच राजकीय अंगसुद्धा मिळाले आहे.

अविकसित राष्ट्राबाबतसुद्धा तेवढेच सत्य आहे की नैसर्गिक साधनसंपत्ती प्रचंड प्रमाणात असूनसुद्धा अनेक राष्ट्रे तांत्रिक प्रणाली न झाल्याने मागास आहेत. गरीब राष्ट्रे नेहमीच राजकीयदृष्ट्या अस्थिर असतात तेथेच क्रांतीचे वा परिवर्तनाचे स्फोटके उदयास येतात. अशा प्रकारच्या तिसऱ्या जगातील राष्ट्राचा अर्थिक विकासाला मारक ठरण्यास लोकसंख्या हा घटक मोठा अडसर ठरतो.

आज प्रश्न निर्माण होतो की आर्थिक प्रगती, अधोगती, गरिबी–श्रीमंती यांचे चढउतार आर्थिक विकासाची निश्चितता आणि अनिश्चितता यामध्ये सर्वत्र फरक जाणतो. तसेच आर्थिक विकासाच्या साधन मार्गाबद्दल आणि विचार प्रणालीबाबत विविध राष्ट्रांमध्ये भिन्नता दिसते. समाजातील काही मूल्ये आणि निष्ठा या केवळ आदर्श असतात. उदा. धर्म हा परंपरागत असून, संकुचित आहे तरीसुद्धा प्रत्येक धर्मात व्यापक आणि विशाल अशी काही बंधने आजही आहेत. हिंदू धर्मातील समाजरचनेत खूप विषमता आहे. या धर्मात सहिष्णुतेसारखी भिन्नभिन्न पंथ आणि आचार विचारांना सामावून घेणारी धर्मसंस्था म्हणून पाहिली जाते. व्यापक समाजात निष्ठेबरोबर येणारे अंतरविरोध केवळ परंपरागत समाजात येतात असे नाही तर आधुनिक समाजातही असतात. उदा. लोकशाही, तंत्रज्ञान, विज्ञान, धर्मनिरपेक्षता, समजणाऱ्या प्रगत राष्ट्रांमध्येसुद्धा काळ्या वर्गातील लोकांबद्दल कमालीची विषमता दिसून येते. यावरून असेच सिद्ध होते की विभेदीकरण ही आधुनिक आर्थिक विकासाची एक आवश्यक गरज असली तरी तिचे प्रकार आणि स्वस्थ यात विविधता आहे.

सारांश –उपरोक्त विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो की सामाजिक विभेदीकरण मधल्या काही टप्प्यांना पार करू शकेल. मात्र विभेदीकरणाबाबत जस्तर किंवा अटी–तटीची भाषेत बोलता येत नाही. उदा. लोकशाही रूजवण्यासाठी साक्षर व सुशिक्षित समाज लागतो असे म्हटले जाते; पण भारतात वरील दोन्ही गोष्टी मोठ्या प्रमाणावर असूनही जगात सर्वात मोठी लोकशाही मानली जाते. परंतु निरक्षर असणाऱ्या समाजात टेलिव्हिजन, रेडिओ, मोबाईल, संगणक, टेप, सीडीप्लेअर, डि. व्ही. डी., एल. ई. डी. इत्यादीसारख्या अद्ययावत साधनांचा सुळसुळाट अनेक राष्ट्रांत आहे. भारतातील भाषावार विभागणी फक्त संकुचित प्रादेशिक वादाच्या राजकारणातून निर्माण झाली असे म्हणणेही सत्य आहे, असे म्हणणे गैर आहे. कारण भाषावार राज्ये काही बाबतीत संकुचित वाटत असली तरी भारत विविधेतेने नटलेल्या सांस्कृतिक विविधतेतील एकात्मतेशी आणि संयुक्त संविधानाशी आधुनिक व लोकशाही तत्त्वाशी सहमत आहे. म्हणून भाषावार प्रांत रचनेमुळे आर्थिक विकासाला खीळ बसते असे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही. विकसित समजणाऱ्या पञ्श्चिमात्य समाजातही विभेदीकरणाचे अनेक प्रकार आणि उदाहरणे दिसून येतात. इंग्लिश/अमेरिकन राजकीय जीवनात आणि घटनेत रूढी व परंपरा यांचा प्रभाव आहे. उदा. अमेरिकेमधील विविध ग्रंथांची धर्ममंदिरे (Churches) ही शैक्षणिक संस्थांमध्ये विलीन झालेली दिसतात. अनेक चर्चनी वैज्ञानिक शोधांसाठी मोठमोठ्या प्रयोगशाळा उभारल्या आहेत. याचा अर्थ समाजात धार्मिक जीवन व इहवाद असे समाजात दोन भाग नसतात. नेटल या समाजशास्त्रज्ञाच्या मते, ''एकाधिकारशाहीमुळे निर्माण झालेल्या या प्रकारच्या विभेदीकरणाचे वर्णन दबलेले विभेदीकरण (Compressed Structural Differntion) असे केले आहे.'' किंबहुना एकाधिकारशाही ही विभेदीकरणाला विरोध करणारी (De-differntiating) शक्ती आहे असे म्हणतात.

विभेदीकरणाला मुरड घालणारा आणखी एक स्वायत्त घटक म्हणजे त्या राष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरातून उदयास आलेली मूल्ये आणि श्रद्धा होय. रशिया आणि अमेरिका या दोन राष्ट्रात उद्योग प्रधानतेमुळे काही बाबतीत लोकशाही व्यवस्थेसारखे वाटत असले तरी त्याच्यात फरक जाणवतो. तसेच समाजात विभेदीकरण आणि विशेषीकरण यामुळे

समाजात दिसणारे संघठन व एकता यामुळे समाज स्थिर राहील याचे भाकित सांगता येत नाही. उदा. पश्चिमात्य समाजात वेबर प्रणित कार्य व संरचना दिसूनही समाज जीवनात अशांतता व अस्थिरता दिसतेच. वृद्धांचे प्रश्न, गुंगीचे पदार्थ, वाढती गुन्हेगारी इत्यादीमधून अस्थैर्य निर्माण होते. याशिवाय मानवतावादाची पिछेहाट जीवनाला आलेले यांत्रिक सत्व उपभोगाला आलेले अनन्य साधारण महत्त्व इत्यादी समस्या कोणत्याही विकसीत राष्ट्रातसुद्धा आहे.

याचा तात्पर्य असा की, आधुनिकता आणि समृद्ध समाज निर्माण करण्याइतका आर्थिक विकास होऊनही जीवनाबद्दल अनेक महत्वाचे सांस्कृतिक प्रश्न उद्‌भवतात. उदा. पूर्वेकडील सर्वच देशात आज तरी आधुनिकतेबरोबर मोठ्या प्रमाणावर अस्थिरता व विघटन आढळून येते.

सारांश रूपात असेच म्हणता येईल की,

१) आर्थिक विकासासाठी सामाजिक संरचनेतचे विभेदीकरण ही एक अटळ आणि आश्यता आहे.

२) विभेदीकरणाचे वैशिष्ट्ये, स्वरूप, व्याप्ती, सर्वत्र एकसारखे असेल असे नाही.

३) परंतु आज आपणाकडे उपलब्ध असलेल्या माहितीआधारे असे म्हणता येईल की, विभेदीकरणाचा सिद्धांत हा काही बाबतीत गैर असेल परंतु पूर्णपणे खोटा नाही.

## २.२ आर्थिक स्थिती आणि नातीगोती व्यवस्था व कुटूंब –

कुटुंब, संयुक्त कुटुंब आणि नातीगोती यांना आधुनिक समाजात काय महत्त्व आहे? उद्योगप्रधान समाजात नाते सबंधांचा ऱ्हास होत आहे काय? आधुनिक समाजाच्या आर्थिक गरजा फक्त केंद्र कुटुंबापुरत्याच मर्यादित आहे म्हणून संयुक्त कुटुंब हे अशा स्थितीत महत्त्वाचे नाही काय? अर्थात उपरोक्त प्रश्नांबद्दल विचार करणे गरजेचे आहे. अनेक राष्ट्रांमध्ये या सामाजिक संस्थेला संस्कृतीच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण मानले जाते व पूर्वेकडील राष्ट्रांमध्ये या संस्थेमागे लोकांचे धार्मिक, नैतिक, सांस्कृतिक आणि भावनिक संबंध फार आहेत. यावरून असा अर्थ निघतो की, सांस्कृतिक परंपरेचे एक वैशिष्ट्ये आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत उध्वस्त होत आहे की काय? विल्बर्ट मूर आणि हॉझेलिट यांनी (Socity and Industrialization) या ग्रंथात पूर्वेकडील समाजातील विचारवंतामध्ये या प्रश्नाबद्दल भावनातमक ताण असल्याचे म्हटले आहे.

आधुनिक समाज व व्यवसाय रचना अशा प्रकारची बनत चालली आहे की, ज्यामध्ये संयुक्त कुटूंब आणि त्यातून निर्माण होणारे संबंध जाणवतसुद्धा नाहीत. आधुनिकीकरण हे औद्योगिकरणातून उदयास येत आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

आधुनिकीकरणात समाज हा गतिमान झालेला आहे. त्या समाजाला चैनीच्या सवयी लागल्या आहेत. उदा. समाजातील अबाल वृद्धापर्यंत प्रत्येकाला मोबाईल, गाडी, इत्यादींची आवश्यकता वाटते. आधुनिकीकरणामुळे व्यवसाय स्वातंत्र्य मिळाले म्हणजे पारंपारिक व्यवसाय एका पिढीकडन दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होईल असे राहिले नाही. म्हणजे

प्रत्येक पिढीला आपल्या आवडीनुसार व्यवसाय संधी मिळते अशा व्यवसाय रचनेवरून संयुक्त कुटुंब व नातेसंबंधांना काडीमोल किंमत राहिली नाही. व्यवसायात नफा कमावणे हा हेतू समोर ठेवला तर इतर कोणत्याच नाते, कुटुंब, वय, मानसन्मान गोष्टींना महत्त्व दिले जात नाही कारण हे सर्व अडसर ठरू शकतात की काय असे वाटते. थोडक्यात असे म्हणता येईल की, आधुनिक उद्योगरचना ही आर्थिक बुद्धीवादी असून, ती व्यक्तीवादीसुद्धा आहे. आजचे केंद्र कुटुंब हे याच दोन मूल्यांवर बुद्धीवादी व व्यक्तीवादी उभे आहे. म्हणून संयुक्त कुटुंबापेक्षा केंद्र कुटुंब या परिस्थितीत महत्त्वाचे आहे.

मानवी समाजाचा इतिहास जर पाहिला तर शिकारी अवस्थेपासून आजपर्यंत संयुक्त कुटुंबाला अनन्यसाधारण महत्व होते. कारण यामधून प्रत्येकाला मानसिक, भावनिक, आर्थिक, सामाजिक आधार दिला जात होता. त्यातून समाज स्थिर होता. आज अनेक विचारवंत आधुनिक समाजाकडे पाहून असे म्हणतात की, पूर्वीचा शिकारी व अन्नसंचयी समाज आणि आजचा केंद्र कुटुंबीय समाज सारखाच दिसतो. कारण कुटुंबातील मनुष्यबळाची मर्यादित गरज आणि शारीरिक हालचालींची आवश्यकता या दोघांमध्ये समानता दिसते. परंतु कुटुंब आणि नातेसंबंधाचा आर्थिक विकासावर अनुकूल व प्रतिकूल परिणाम होतो असे म्हणतात. या संबंधी इतिहासातील आपण काही पुरावे देतो. नातीगोते संबंधामुळे व्यवसायाला अनुकूलता दर्शवणारे काही पुरावे आहेत. उदा. जपानमध्ये कुटुंबातील सर्वात मोठ्या मुलाला आपला पारंपारिक व्यवसाय जशासतसा मिळतो तर धाकट्या किंवा लहान मुलाला शहरात किंवा इतरत्र कुठेतरी दुसरीकडे तोच किंवा दुसरा धंदा वा व्यवसाय करावा लागतो. अर्थात दोन्ही परिणाम आपण नातीसंबंधावरून पाहतो.

कुटुंबाबद्दल सविस्तर लिखाण करणारे विल्यम गुड यांच्या (World revolution and Family Patterms) या ग्रंथात कुटुंब आणि नातेसंबंध यांच्यामध्ये चालू असलेल्या परिवर्तनाची कारणमीमांसा सांगितली आहे. नागरीकरण व औद्योगिकरण यांचा कुटुंबावर काय परिणाम झाला हे सांगितले आहे. जगातील विकासाच्या कळसावरील अमेरिकेसारख्या राष्ट्रात कुटुंबाबद्दल बोलताना त्यावर नेमका कोणता आघात झाला हे ध्यानात घेणे महत्वाचे आहे. कारण समाजशास्त्रज्ञांना असे वाटते की सध्या अमेरिका कुटुंब संस्था सध्या कोणत्या दिशेला (उगम–अस्त) जात आहे. याबद्दल दोन पंथ वा विचारप्रवाह निर्माण झाले आहेत. भविष्यात अमेरिकेमध्ये कुटुंब व विवाह संस्थात अस्तित्वात होत्या किंवा नाही असे होईल. विवाहामध्ये करार पद्धत आली आहे. कारण समाजात लैंगिक स्वैराचार माजला आहे. कुटुंबाचे नियंत्रण कोणत्याच प्रकारचे राहिलेले नाही. तेथे अत्यंतिक रोमँटिक प्रेमाच्या तत्त्वज्ञानामुळे आणि सततच्या स्थलांतरामुळे पती–पत्नीमध्ये आपलेपणाची भावना वैफल्यग्रस्थ झाली आणि त्यातून मादक पदार्थांचे प्रमाण वाढले व त्याचा परिणाम म्हणून एकूण गुन्हेगारीचे प्रमाण वाढले व समाजात चंगळवाद निर्माण होऊन पूर्णत: कुटुंब उध्वस्त होतो की काय असे भाकित करणारे ऑगबर्न फोलसन, बर्जेस इत्यादी आहेत. उपरोक्त विचारवंतांच्या विरुद्ध विचार मांडणारे मॅकआव्हर, मरडॉक, पार्सनस, फिंग्जले डेव्हीस, विल्यम गुड इत्यादी शास्त्रज्ञ आहेत. या शास्त्रज्ञांना आधुनिक अमेरिकन कुटुंबात झालेला बदल मान्य आहे. परंतु या चंगळवादाला हे शास्त्रज्ञ कुटुंब विघटन न मानता कुटुंबाची संरचना विस्कळीत झाली असे

मानतात. परंतु प्रत्यक्षात असे न होता कुटुंब रचना व कार्य यात मोठा बदल झाला आहे. उदा.

१) हे कुटुंब उत्पादक घटक म्हणून सुद्धा काम करत नाही.

२) शैक्षणिक कार्य औपचारिक पद्धतीने केले जाते.

३) विवाह पद्धतीत करार पद्धती आली अर्थात घटस्फोटातून विघटन.

४) समाजात करार पद्धतीच्या विवाहामुळे पती-पत्नीला महत्त्व नाही.

५) मुलांचे संगोपन व संवर्धनाची जबाबदारी विविध संस्थाकडे दिली. उदा. पाळणाघर, हॉस्टेल, गुरूकुल शाळा इत्यादी.

६) वृद्धांना कुटुंबात आधार न देता वृद्धाश्रमात ठेवणे.

७) नातीगोती कचराकुंडीत टाकल्याप्रमाणे त्यांना महत्त्व न देणे.

८) स्वार्थभाव, व्यक्तीवाद, आपलेपणा इत्यादीमध्ये वाढ.

सारांश स्वरूपात असे म्हणता येईल की. नागरी औद्योगिक रचनेचा व संस्कृतीचा कुटुंब संस्थेवर काय परिणाम झाला आहे हे अचूक व निर्णायक कोणत्याही समाजशास्त्रज्ञाला सांगता आलेले नाही. फक्त एवढेच म्हटले जाते की समाजातील वर्गव्यवस्थेचा विचार केला तर मध्य, कनिष्ठ व शेतकरी वर्गात काही प्रमाणात आजही नातीगोती संबंध जोपासली जातात. तुलनेने उच्च, उच्च मध्य, व नोकरशाहीपेक्षा अधिक जोपासली जातात.

## २.३ आर्थिक विकास आणि व्यवसाय

व्यवसाय हा घटक लक्षात घेतला तर विविध व्यवसायात गुंतलेली कुटुंबे आणि त्यांची नातीगोती यांच्याबद्दल लावलेली निष्कर्ष ठामपणे लावणे कठीण कार्य आहे असे शास्त्रज्ञ मानतात. उद्योगधंद्यातील प्रवेश, उमेद्‌वारी, अधिकारांच्या जागा, मानसन्मान, भागीदारी, भांडवलाची गुंतवणूक, फायदे या सर्वांवर कुटुंबीय आप्तसंबंधाचे वर्चस्व आहे. उदा. अमेरिकेतील उद्योगंधद्यामधील मोठमोठ्या कंपन्या आणि उद्योगसमूह यांच्या पाहणीवरून असा निष्कर्ष काढला की व्यवसायात आप्तसंबंधीचा आधार घेतला गेला आहे. आपल्या व्यवसाय प्रत्येकजण स्वत: प्रस्थापिततेकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न केला जातो. भारतातील सामाजिक जीवन आणि आर्थिक क्षेत्रात बदलत्या आर्थिक परिस्थितीनुसार कुटुंब आणि नातेसंबंध यांचे काय स्थान आहे हे विवेचन आय. पी. देसाई, कापडिया, गोरे, इ. कर्वे. आयलीन रॉस, मिल्टन सिंगर, लँबर्ट, मदन इत्यादी समाजशास्त्रज्ञांच्या उपलब्ध साहित्यावरून आणि संशोधनावर आधारलेले आहे.

भारतात प्राचित काळापासून संयुक्त कुटुंब व केंद्र कुटुंब एकत्र दिसून येतो. विशेषत: शेतीक्षेत्र सोडून इतर व्यवसाय करणाऱ्या जातींमध्ये केंद्र कुटुंब आहे. परंतु एक सत्य आहे की, केंद्र कुटुंब संस्थाबद्ध कधीच झालेले नाही. संयुक्त कुटुंबाप्रमाणे सांस्कृतिक पारंपारिकतेला प्रभावित केलेले नाही. भारतातील कुटुंबाला केंद्र व संयुक्त विभाजनाचे निष्कर्ष भिन्न भिन्न आहेत. त्यातील प्रमुख म्हणजे वास्तव्य, मालमत्तेचे एकात्म वा विभक्त स्वरूप, सभासदांतील परस्परसंबंधाचे स्वरूप आणि त्यांच्यामधील भावना, दोन पिढ्यांमधील स्थित्यंतराचा काळ

आणि त्यातून कधी केंद्रवर्ती आणि कधी एकत्र असे निर्माण होणारे चक्र. भारतातील वेगवेगळ्या प्रदेशामध्ये आणि एकाच प्रदेशामधील वेगवेगळ्या थरात कुटुंब रचनेचे भिन्न प्रकार आहेत. उदा. पॉलिन कॉलंदा यांच्या मते, गंगा नदीच्या खोऱ्यात राहणारे ग्रामीण भागातील संयुक्त कुटुंबाचे प्रमाण, मध्य भारत, महाराष्ट्र आणि कर्नाटकपेक्षा जास्त आहे. याच नदीच्या खोऱ्यातील राजपूत जमातीमध्ये संयुक्त कुटुंबाचे प्रमाण आहे. भारतातील महानगरांमध्ये जवळपास विखुरलेले कुटुंबाचे प्रमाण अधिक दिसून येते.

भारतीय समाज हा परंपरानिष्ठ आहे. भारतात विविध जाती, संयुक्त कुटुंबे आणि नातीगोती या एका विशिष्ट व्यापार करणारी मूळची एकही जमात वा जात नाही तर त्या उलट लिंगायत, मारवाडी, जैन, रेड्डी, अय्यंगार, चेटियार इत्यादींमध्ये परंपरेने व्यापार चालत आलेला दिसतो. आज महाराष्ट्रात या जातींचे व त्यांच्या आप्तसमूहांचे सर्वच उद्योग त्यांचे आहेत. (यामध्ये ब्रेडपासून ते राजुरी सळईपर्यंत) या व्यापारी जाती शहरात रहात असल्या तरी त्यांच्या एकूण वर्तनावरून असाच निष्कर्ष निघतो की, या जातीतील तरुणांमध्ये सुद्धा आपल्या नातीगोतीबद्दल भावनिकता दाखवली जाते. उदा. व्यवसाय सुरू करण्यासाठी एकमेकांना मदत करणे.

थोडक्यात असे म्हणता येईल,

१) संयुक्त कुटुंब ग्रामीण व नागरी भागात हळूहळू नष्ट होत आहे.

२) संयुक्त कुटुंब जरी नष्ट होत असले तरी त्याचा प्रभाव लोकांच्या मनावर आजही काही प्रमाणात जाणवतो.

३) संयुक्त व केंद्र कुटुंबाची काही वैशिष्ट्ये भारतीय समाजात स्वीकरणारे लोक आहेत. अर्थात गरजेनुसार तडजोड करतात.

ग्रामीण भागात आज रोजगाराच्या संधी हळूहळू कमी होत आहेत. पूर्वी बलुतेदारी होती म्हणून ज्या त्या जातीचा ठराविक व्यवसाय होता. आता मात्र सर्वांना स्वातंत्र्य असल्यामुळे व्यवसायाची मक्तेदारी संपलेली दिसते. परिणामी गावातील रोजगार व जीवन जगण्याची हमी कमी झालेली आहे. ग्रामीण भागातील लोक अन्य व दीर्घकाळासाठी शहरात जाऊन रोजगार करतात व संधी मिळेल त्या प्रमाणात गावाकडे जातात. उदा. महाराष्ट्रातील ग्रामीण युवक मुंबईला जाऊन अनेक प्रकरचा रोजगार करतात. भारतीय समाजात सामाजिक कल्याणाच्या सुविधा आजही पाहिजे त्या प्रमाणात राबवल्या जात नाहीत. विकसित राष्ट्रांच्या तुलनेत भारत जवळपास सर्वच क्षेत्रात मागेच आहे. भारताने विकासासाठी ज्या तत्वाचा स्विकार करावा लागतो ते परिपूर्ण स्वीकारलेले दिसत नाहीत म्हणून भविष्यकालीन भारतातही फार मोठा बदल होईल अशी अपेक्षा वाटत नाही. कारण योग्य राजकारण उरले नाही. तरुण पिढीला निश्चित मार्ग कळत नाही, तरुण पिढीला नैतिकता काय आहे हे कुणीही सांगत नाही, महागाईच्या भस्मासुरात सामान्य व गरीब होरपळून जात आहेत, मुबलक सुविधा मिळत नाही एकूणच विचार केला तर आर्थिक विकासाच्या नावाखाली भविष्यात काय होईल याची निश्चित ग्वाही कोणीही देत नाही.

## २.४ आर्थिक जीवनाचे सामाजिक पैलू – समाजशास्त्रीय ऐतिहासिक आढावा

(Sociological Aspects of Economic Life historisum of Sociological thought)

आर्थिक विकासाच्या सामाजिक पैलूंचा अभ्यास करत असताना आर्थिक जीवनाच्या इतिहासाचा आढावा घेणे क्रमप्राप्त आहे. मानवाचे आर्थिक व सामाजिक जीवन हे एकमेकावर अवलंबून आहे. आर्थिक जीवनाचा विकास कसकसा होत गेला याला सैद्धांतिक दृष्टीकोन कसा आहे, हे या ऐतिहासिक आढाव्यावरून दिसून येतो. यामध्ये हर्बर्ट स्पेन्सर, इमाइल उरखीम व मॅकसवेबर या विचारवंतांचे विचार लक्षात घेणे आवश्यक आहे.

१) हर्बर्ट स्पेन्सर (Hurbort Spencer) – स्पेन्सर यांनी डारविनचा जीवनशास्त्रीय उत्क्रांतीवाद हा सामाजिक उत्क्रांतीला कसा पूरक आहे हे सांगितले आहे. ज्याप्रमाणे चार्लस डारविन याने एखादी वनस्पती ज्याप्रमाणे वाढते हे सांगितले त्याप्रमाणे स्पेन्सरनेही समाजाची वाढ विविध पैलूने होते असे सांगितले आहे. सामाजिक उत्क्रांती स्पष्ट करण्याकरीता त्यांनी दोन समाजाचे उदाहरण दिले आहे. १) सैनिकी समाज (Millitant Society) २) औद्योगिक समाज (Industrial Socity).

१) सैनिक समाज – या समाजातील नियम हे सर्वांना बंधनकारक स्वरूपाचे असतात. येथे सर्व काही अनिवार्य असते अर्थात या समाजात सैनिक प्रमुखाने दिलेली आज्ञा ज्याप्रमाणे सर्वांना निमूटपणे पार पाडावी लागते त्याप्रमाणे नियमांचे पालन करावे लागते. येथे स्वातंत्र्याला संधी नाही.

२) औद्योगिक समाज – या समाजात सैनिकी समाजाच्या अगदी विरुद्ध आहे. या समाजात कोणतीच बंधने नसतात तर येथे प्रत्येकला ऐच्छिक स्वरूपाचे स्वातंत्र्य असते. येथे लोकशाही तत्त्वाप्रमाणे जबरदस्ती जुलूम नसतो.

समाजात ज्याप्रमाणे एकीकरण (Integration) जसे असते तसे विघटनही (Disintegration) असते. त्याचबरोबर समाजात जशी समानता तसी विषमता दिसते. स्पेन्सरच्या मते यामधून आर्थिक विकास होते.

२) इमाईल डरखीन (Emil Durkheim) – इमाईल दरखीन यांनी आपल्या (Division of Labour in Society) या ग्रंथांच्या माध्यमातून समाजाच्या विकासाच्या पैलूबद्दल विचार मांडले. त्यांच्यामते मुलतः समाज हा कसा संघटित होतो व त्याचे नियम कशाप्रकारे चालतात हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. उरखीम यांनीही समाजाचे दोन भागात वर्गीकरण केले आहे. १) एकरूप समाज (Segmental society) २) गुंतागुंतींचा समाज (Complex Society).

१) एकरूप समाज – या समाजात श्रमाचे विभाजन त्याच्या वय आणि लिंगाप्रमाणे होते. डरखीमच्या मते हा समाज एखाद्या किटकांच्या कोषाप्रमाणे असतो. अर्थात या कोषातील काही किटके मेली तर त्यांची जागा ताबडतोब दुसरे कीटक भरून काढतात. एकरूप समाजात देखील समाजाची परंपरा व संस्कृती जोपासणारी एक पिढी नामशेष झाली

तर तिची जागा दुसरी पिढी भरून काढते. उदा. या समाजात संघटन हे यंत्राप्रमाणे असते. (Mechanical Satidarity)

२) गुंतागुंतीचा समाज – या समाजात, समाजाला संघटीत करणारी जी संघटना आहे तिला जैविक संघटन (Organic Solidarity) असे म्हणतात. या समाजात काही प्रमाणात स्वातंत्र्य असते. उदा. समाजाच्या चालीरीती व व्यवहार पद्धती इत्यादी. डरखीमच्या गुंतागुंतीच्या समाजाची संकल्पना स्पेन्सररच्या औद्योगिक समाजाशी मिळतीजुळती आहे.

३) मॅक्सवेबर (Maxweber) –युरोपमध्ये एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जी औद्योगिक भांडवलशाहीची जी लाट (Industrial Capitalism) आलेली होती. त्याबद्दल वेबरने आपले मत मांडले. वेबरने आदर्श औद्योगिक भांडवलदारावर बऱ्याच मोठ्या प्रमाणात लिहिले आहे आणि हा भांडवलवाद आर्थिक भांडवलवाद हा वसाहतवादावर आधारलेल्या भांडवलदारापेक्षा वेगळा कसा आहे हे दाखवले आहे. औद्योगिक भांडवलदारामध्ये उत्पादक स्वतंत्र असतो. बाजारात स्पर्धा असते. उत्पादनखर्च व नफा यामध्ये समन्वय साधून उत्पादन क्रियांचे नियमन करता येते. औद्योगिक भांडवलवादाबद्दलची काही राजकीय व कायदेशीर मांडणीचे तत्व सांगितले आहे.

१) मजुरांचा रोजगारावर हक्क नसावा तो दुसऱ्यावर अवलंबून असावा.

२) मजूर व मालक (व्यवस्थापक) यांचे संबंध वास्तव स्वरूपाचे असावे.

३) उत्पादन साधने मालकाच्या हक्काचे मजुरांच्या नव्हे.

४) भांडवलशाहीमध्ये नफ्यावर भांडवलदारांचे नियंत्रण असावे.

वेबरच्या मते भांडवलदारांच्या बाजूने केंद्र सरकार उभे राहते म्हणजे नफा झाल्यासारखेच होय.

## २.५ आर्थिक विकासाला कुटुंबावर होणारा परिणाम

(Effect of Economic Development on Family) -

आतापर्यंत कुटुंबाचा आर्थिक विकासावर काय काय परिणाम झाला आहे हे आपण पाहिले आहे. आता मात्र याउलट आर्थिक विकासाला कुटुंबावर काय परिणाम होतो हे पाहावयाचे आहे.

१) पूर्वीच्या तुलनेत आधुनिक काळात कुटुंबातील सदस्य संख्या अथार्जनात सहभागी होत असल्याचे दिसते. पूर्वी मात्र, कुटुंबातील कुटुंबप्रमुख एकटा किंवा अनन्य दुसरा एक असे चित्र दिसत होते. उदा. कुटुंबातील सर्वच अबाल–वृद्ध स्त्रिया अर्थाजन करणे म्हणजे आर्थिक विकासाला सर्व कुटूंबाचाच हातभार होय.

२) पूर्वी पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान होते. आज ती परिस्थिती बदलली आहे. आज सर्वच व्यवसायात स्त्रिया समर्थ उभ्या आहेत. अर्थच असा की बदलत्या आर्थिक परिस्थितीमुळे स्त्रियांची कुटुंबातील भूमिका बदलली आहे. पूर्वी स्त्रियांची मर्यादा चार भिंतीच्या आतच होती. फक्त घरकामच असे पूर्वीचे स्त्रियांचे चित्र बदलले. आता जोड व्यवसाय (बचतगट, शिलाई मशीन, खानावळ, पापड, लोंचे इ.) करतात. अर्थातच आता आपल्या कुटुंबाला आपल्या कार्याच्या माध्यमातून हातभार लावून परिस्थिती बदलणे.

३) पूर्वीच्या तुलनेत पुरुषांबरोबर स्त्रियांना समजात मान–सन्मान मिळत आहे. आत कोणत्याही उच्च पदावर व कोणत्याही व्यवसायात स्त्रिया पोहोचल्या आहे. उदा. राष्ट्र अध्यक्ष, पंतप्रधान, अध्यक्ष, बँक मॅनेजर, कुलगुरू, सचिव, सैनिक इत्यादी स्त्रीयांचे हे बदलते चित्र आर्थिक विकासाला व बदलत्या आर्थिक परिस्थितीचा परिणाम होय.

४) बदलत्या आर्थिक स्थितीमुळे संयुक्त कुटुंबाच्या ऐवजी केंद्र कुटुंब अधिक प्रभावी झाले. आर्थिक विकासाला कुटुंबाच्या अर्थव्यवस्थेवर हा झालेला सकारात्मक परिणाम होय. आत कुटुंबाची रचना व सदस्या संख्या अगदी मोजून मापून ठरली जाते.

५) आज समाजात झालेल्या आर्थिक व औद्योगिक प्रगतीमुळे कुटुंबातील प्रत्येक सदस्य गतीशील बनला आहे. कुटुंबातील सदस्यांची गतिशीलता वाढल्यामुळे समाजात स्थलांतराचे प्रमाण खूप वाढले आहे. परंतु बऱ्याच मोठ्या प्रमाणावरील कुटुंबाला नेहमीचे स्थलांतर आवडत नाही. त्यांना स्थायी स्वरूपाचे जीवन जगण्याचे आवडते. स्थलांतराला पोषक अशी कुटुंब व्यवस्था आज राहिली नाही.

६) आर्थिक विकासामुळे कुटुंबाची रचना जशी बदलत गेली तशा काही समस्या निर्माण झाल्या. उदा. लहान मुलांच्या संगोपनाच्या व संवर्धनाच्या, वृद्ध, नैतिकता इत्यादीसारख्या. मुलांच्या संदर्भात काही उपाय काढले आहेत; परंतु वृद्धांना वृद्धाश्रमला पर्याय योग्य दिसत नसल्याचे जाणवते. स्मेलशर यांनी वृद्धांच्या समस्यांकरिता तीन घटकांना जबाबदार मानले आहे.

१) वैद्यकशास्त्र – वैद्यकीय (जीवशास्त्रीय) सोयीसुविधा वाढल्यामुळे लोकांचे आयुर्मान वाढले अर्थात अधिक वय वाढेपर्यंत जीवंत राहणे आता कुटुंबात सरासरी ८० वर्षापर्यंतची मंडळी सहज असल्याचे जाणवते अशाच वृद्धांच्या समस्या अधिक वाढल्या आहेत.

२) शासन प्रकारात ही लोकशाहीतील कल्याणकारी राज्य निर्माण झाले म्हणजे लोक कल्याणाकरिता अधिक योजना तयार केल्या व राबवल्या जात आहेत. उदा. निवृत्ती वेतन, प्रॉव्हिडंड फंड, आयुर्विमा, संजय गांधी निराधार योजना इत्यादी या योजनामधून वृद्धांना किमान जीवन जगता येते.

३) अलिकडच्या काळात वृद्धांच्या अनेक सामाजिक संघटना निघाल्या आहेत. वृद्धांना अधिक सेवा देणे, संरक्षण देणे, अशी कार्य करणाऱ्या संघटना निर्माण झाल्या आहेत.

परंतु सामाजिक दृष्टिकोनातून विचार केला तर असे म्हणता येते की वृद्धांच्या समस्या कुटुंब रचनेला पोषक नाही असेच म्हणावे लागते.

## २.६ आर्थिक विकास आणि सामाजिक स्तरीकरण /सामाजिक स्तरीकरण व जातीव्यवस्था

(Economic development and social stratification/Social stralification and caste systme)

समाजातील लोकांमध्ये वर्ग, जात, वर्ण इत्यादीमध्ये विविध विभागणी घेऊन स्तर वा वर्ग निर्माण होतात, अशा स्तररचनेला सामाजिक स्तरीकरण म्हटले जाते. समाजाची प्रत्येक

माणसाला जाणवणारी ही स्तररचना विविध वर्गातून, जातीतून आणि गटातून व्यक्त होते. या स्तरीकरणाचे परिणाम कुटुंब, धर्म, राज्य, राष्ट्र, अर्थकरण इत्यादींवर होतात. कोणाचाही समाजात सामाजिक स्तरीकरणाची दुसरी बाजू नैतिकता आहे. परंतु समाजात असे विविध पडणारे वर्ग योग्य आहेत काय? एक वर्ग दुसऱ्या वर्गाचे शोषण करतो. अशा व्यवस्थेत सर्वांना न्याय मिळतो काय? अशी अनेक प्रश्न निर्माण होतात. सामाजिक स्तररचनेला सामाजिक धार्मिक राजकीय, आर्थिक, घटक जबाबदार असतात. आपण येथे फक्त आर्थिक घटक लक्षात घेणार आहेत.

**आर्थिक विकास आणि सामाजिक स्तररचना यांचा संबंध**

**अ) परंपरागत व्यवसाय** (Traditional occupation) – कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये औद्योगिक विकास हे अंग अनिवार्यच असते. औद्योगिक विकास होत असताना विविध व्यवसाय व लघु कुटीर उद्योग उदयास येतात अशामध्ये काम करणारे लोक स्वतंत्र असतात याचाच शेवटी एक गट वा वर्ग निर्माण होतो. उदा. कुशल कामगार, डॉक्टर्स, इंजिनीअर्स, मॅनेजर इत्यादी (Inkles and Rossi) यांनी या संबंधी १९५६ साली इंग्लंड, अमेरिका, न्युझीलंड, जपान इत्यादी देशातील लोकांचा अभ्यास करून त्यांनी असे मत मांडले की, उपरोक्त प्रत्येक राष्ट्रांमध्ये व्यवसाय आधारित वर्ग निर्माण झाल्याचे निदर्शनास आले.

Hodge, Triman and Rossi या समाजशास्त्रज्ञांनी १९६६ मध्ये पूर्वेकडील राष्ट्रांचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला की, ही राष्ट्र औद्योगिकदृष्ट्या मागास असून सुद्धा या राष्ट्रातील सामाजिक स्तररचना ही व्यवसायभिमूख आहे. अर्थात या राष्ट्राची स्तररचना विकसित राष्ट्रांप्रमाणे आहे असे दिसून येते. समाजातील लोकांना व्यवसायामुळे सामाजिक प्रतिष्ठा मिळते त्यांचा एक स्वतंत्र वर्ग निर्माण होतो. भारतात पूर्वी जातीय परंपरेनुसार व्यवसाय करत होते परंतु भारतात सुद्धा जातीय व्यवसायबंधने मुक्त करून व्यवसाय स्वतंत्र मिळाले आणि आज भारतातही वर्ग व्यवस्था निर्माण होत असल्याचे जाणवते. ही किमया वाढते औद्योगिकरण व नागरीकरणामुळे झाली आहे.

ब) आर्थिक न्याय आणि विषमता (Economic Justics and Ineauality)

सामाजिक स्तररचेनत कशाप्रकारचे बदल होतात हे पाहताना आर्थिक न्यायाच्या तत्त्वाचाही विचार करणे आवश्यक आहे. अर्थातच राष्ट्रातील उत्पन्न व साधनसंपत्ती यांचे समान तत्त्वानुसार वाटप करणे आणि लोकांना सर्वच क्षेत्रात समान संधी उपलब्ध करून देणे. समाजात शोषण होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. कारण भांडवली अर्थव्यवस्था ही दोषांवर उभी असल्यामुहे त्या ठिकाणी आर्थिक न्यायाची अंमलबजावणी होत नाही. कधी कधी असाही प्रश्न निर्माण होतो की ज्या राष्ट्रात समाजवादी अर्थव्यवस्थेत तरी आर्थिक न्याय दिसतो काय? अशा प्रश्नांची उत्तरे नेहमी निराशाजनकच असतात.

उपरोक्त प्रश्नांच्या संदीर्ात गुलार मिरडाल या अर्थशास्त्रज्ञाने आपल्या .. या ग्रंथात पूर्वेकडील राष्ट्रांच्या आर्थिक नयायाचे योग्य चित्रण केलेले आहे.

i) गुन्नर मिरडाल यांच्यामते अविकसित राष्ट्रांमध्ये आर्थिक विषमता अधिक प्रमाणात

दिसून येते. गरीब व श्रीमंतामध्ये फार मोठी दरी निर्माण होत जातेच त्यातून श्रीमंताकडून गरिबांचे नेहमी शोषण व पिळवणूकच होते.

ii) उपरोक्त स्पष्ट केलेली विषमता प्रादेशिकस्तरावर असल्याचे जाणवते. एकाच राष्ट्रात अनेक प्रांत वा विभाग यांच्यात श्रीमंतीची दरी दिसून येते. मागास वा अविकसित प्रांतातील जनतेचे राहणीमान त्या विभागाचे चित्र दाखवते.

iii) अविकसित राष्ट्रांमध्ये ग्रामीण भाग शहरी भाग खूपच अविकसित राहतो. विकासातून उत्पन्न होणाऱ्या सुखसुविधा फक्त शहरी वा नागरी लोकांना मिळतात. त्यामुळे ग्रामीण नागरी लोकांमध्ये मोठी दरी निर्माण होते.

iv) अविकसित राष्ट्रांमध्ये गरीबी व बेकारी ही एक समस्या समोर येते. येथे आर्थिक न्याय तर मिळतच नाही परंतु उत्पन्न घेणाऱ्या समस्याच अडथळासुद्धा ठरतात.

v) प्रा. गुन्नर मिडाल यांच्यामते, गरीबी व अविकसित पणा फक्त आर्थिक घटकांमुळेच राष्ट्रात निर्माण न होता त्याला सामाजिक व राजकीय घटक जबाबदार असतात. सामाजिक घटकात जातीव्यवस्था मुख्यत: जबाबदार घटक असतो.

**क) जातीव्यवस्था आणि सामाजिक स्तररचना**

(Caste System and Social Stratification) -

जगात सर्वत्र जाती व्यवस्था असतेच असे नव्हे तर काही राष्ट्रांमध्ये जातीव्यवस्था असते तर काही राष्ट्रांमध्ये वर्ग-व्यवस्था असते. पूर्वेकडील जवळपास सर्वच राष्ट्रांमध्ये सर्वप्रथम जातीव्यवस्थाच दिसते. याच जातीव्यवस्थेचा आधार घेऊन वर्गव्यवस्था निर्माण होत असल्याचे दिसत व त्यावरच सामाजिक स्तररचना अवलंबून असते. भारतासारख्या राष्ट्रांमध्ये तर जातीव्यवस्थेची निर्मातीही व्यवसायावरूनच निर्माण झाली असे मानतो. उदा. सोनार, शिंपी, लोहार, सुतार, चांभार, कुंभार इत्यादी. औद्योगिकीकरण हेच आर्थिक विकासाला कारणीभूत आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या जातीच्या व्यवसायात जखडून न राहता अधिक उत्पन्न देणारा व विकासाकडे वाटचाल करणारा व्यवसाय करावा. परंतु जातीव्यवस्थेत अडकलेला समाज अशा स्वतंत्र व्यवसायाला किती प्रमाणात संधी देतात यावर बरेच बलवून आहेत.

औद्योगिक व आर्थिक विकासामुळे जातीव्यवस्थेची धार निश्चित काही प्रमाणात बोथट झालेली दिसते. सद्यस्थितीत भारतात जातीव्यवस्थेची जागा प्रादेशिकतेने घेतली आहे. भारतात प्रादेशिकवाद मोठ्या प्रमाणावर बोकाळलेला दिसतो. उदा. महाराष्ट्रीयन, बिहारी अण्णा, उत्तरप्रदेशातील, केरळ, राजस्थानीय इत्यादी राज्यातील लोक व्यवसायासाठी इतर राज्यात गेल्यास फार मोठा वाद निर्माण होत आहे. अशा प्रादेशिक वादाच्या गरमागरम वातावरणाच्या चुलीवर राजकीय पक्ष आपल्या पोळ्या भाजून घेतात; परंतु त्यामुळे राष्ट्राच्या विकासाला निश्चित खीळच बसते. भारतात जातीय भेदभाव नष्ट होईल अशी अपेक्षा सध्यातरी करावी का ना करावी? अशी संभ्रम अवस्था निर्माण झाली कारण अनेक ठिकाणी जातीयवादाला खतपाणी घालणारे लोकही आहेत तर अनेक ठिकाणी जातीयवादाला दूर करणारेही आहेत. जगात कुठेच भारतासारख्या जाती, मर्ध, पंथ, वंश, वर्ण नसतील अशा बहुविध समाजात तडजोड करून विकास घडवणे म्हणजे तारेवरची कसरत होय.

### ड) ग्रामीण समाजरचना आणि आर्थिक विकास

(Rural Social Structure and Economic Development) -

भारतात शहरी व ग्रामीण भाग अशी विभागणी झाल्याचे दिसते. परंतु हे एकमेकांवर अवलंबून आहेत. भारताचा विकास म्हणजे फक्त शहरांचा विकास नव्हे तर भारतातील प्रत्येकाचा विकास होय. ग्रामीण समाज परिवर्तनात कोणत्या दिशेने वाटचाल करत आहे हेही पाहणे महत्त्वाचे आहे. भारतातील ग्रामीण भागात अस्पश्यता अजूनही काही प्रमाणात आहे. विशेषत: उत्तर भारतात अस्पृश्यता हा ग्रामीण विकासातील सर्वात मोठा अडथळा मानला जातो. भाारतात वरवर देखावा पाहिला तर अस्पृश्यता कमी झाल्याचे वाटते; परंतु ग्रामीण भागात आतून अजूनही आहे. परंपरागत व्यवसायात काही प्रमाणात बदल मात्र झाले. परंपरागत व्यवसायात काही प्रमाणात बदल मात्र झाले. ही बाब आर्थिक विकासासाठी अनुकूलच मानली पाहिजे. ग्रामीण विकासासाठी शासनाने विविध योजना तयार केलेल्या आहेत.या योजना कार्यान्वित केल्यानंतर रोजगाराच्या संधी मात्र ग्रामीणवासियांना उपलब्ध होतात. त्याचा अनेकांनी फायदा घेतला पाहिजे व स्वत:चा विकास साधला पाहिजे. अर्थात याच्यामुळे ग्रामीण लोकांच्या उत्पन्नात वाढ झाली व त्याची जीवन पातळी व राहणीमान उंचावणार अर्थातच ग्रामीण बेकारी व बेरोजगारी कमी होईल व आर्थिक विकासाला हातभार लागेल. त्याचबरोबर समाजात समाजकारण, अर्थकारण आणि राजकारण ही येईल. राजकारणात ग्रामीण भाग अत्यंत महत्वाचा घटक आहे. ग्रामीण भागांना सत्तेची उगमस्थाने मानली जातात. आजचा प्रत्येक नेता आपली नाळ ग्रामीण भागाशी जोडतो. उदा. महाराष्ट्रातील राजकीय नेते वि. मा. ना. विलासराव देशमुख – बाभूळगाव, मा. ना. गोपीनाथ मुंडे – परळी (नाथ्रा) इत्यादी यांच्या राजकीय जीवनाचा आधार ग्रामीण शक्तीतून मिळतो. आजमितीला शैक्षणिक संस्था, कारखाने इत्यादी शक्तीस्थाने म्हणून पुढे येऊ पाहात आहेत.

### २.७ आर्थिक विकास आणि धर्म

(Economic Development and Religion) -

समाजशास्त्रात मॅकसवेबरने युरोपीयन राष्ट्रातील अनेक धर्मांचा अभ्यास केलेला असून, त्यांनी आर्थिक विकास वा संपन्नता आणि धार्मिक तत्त्वे यांचा परस्परसंबंध कसा आहे हे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये मुख्यत: प्रोटेस्टंट, कॅथालिक, ज्यू आणि कान्फ्युशिअस इत्यादी धर्म अस्तीत्वात असून, ही या राष्ट्रांनी जी आर्थिक प्रगती केली तिचे सैद्धातिक स्वरूप वेबरने मांडले.

मॅक्सवेबरच्या मते, कोणत्याही धर्मात काही पारमार्थिक तत्व असतात. या पारमार्थिक तत्त्वाप्रमाणे मानवी जीवनात ऐहिक उपभोगाला महत्वाचे स्थान नसते. मानवाने जीवन जगताना ऐहिक उपभोगी सुखाला बाजूला करून जीवन जगले पाहिजे. भारतीय हिंदू धर्मात ही परलोकवाादाला महत्तव दिलेले आहे. कोणत्याही राष्ट्रांमध्ये जर परलोकवादाला आणि संन्यासवादाला महत्व दिले तर राष्ट्रांचा आर्थिक विकास कधीच होणार नाही. कारण कोणत्याच प्रकारचे कष्ट न करता सुखाची अपेक्षा केली तर ती कधीच पूर्ण होत नाही. उदा. एखाद्या विद्यार्थ्याने शिक्षण घेत असताना शाळेत न जाता एखाद्या मंदिरामध्ये दिवसभर

देवाची सेवा करत नसेल तर तो विद्यार्थी परीक्षेत पास होईल काय? नाही. कारण त्याने अभ्यासाचे कष्ट घेतले नाहीत. त्याप्रमाणे मेहनत करणाऱ्याचाच आर्थिक विकास होईल. धर्म कधीच मेहनत करून नका असे म्हणत नाही. प्रोटेस्टंट धर्म हा तर कष्टालाच देव मानतो व पैसा जमा करणे म्हणजे उद्याचा जीवन आधार तयार करणे. धर्मात कर्म-काम व कष्ट करण्याला महत्त्व आहे; पण हे कष्ट नैतिक मार्गाचेच असले पाहिजे. अनैतिक मार्गाच्या संपत्तीला कोणत्याच धर्मात स्थान नाही. उदा. चोऱ्या, दरोडे, लुटमार, लबाडी, फसवाफसवी इत्यादी गैर मार्गाला समाजात मान्यता नसते.

प्रत्येक धर्मात कर्मवादाला महत्त्वाचे स्थान आहे. धर्मात कर्मवादाला जोड बुद्धीवाद्याची ज्यांनी ज्यांनी घातली, त्यांचा त्यांचा आर्थिक विकास निश्चित होतोच. युरोपीयन राष्ट्रात विशेषत: प्रोटेस्टंट पंथाचा ज्यांनी स्विकार केला त्यांचा आर्थिक विकास झपाट्याने झाला कारण प्रोटेस्टंट पंथाची तत्त्व ही आधुनिक भांडवलशाहीची तत्त्व आहेत. म्हणजेच फायदा देणारी आर्थिक विकास घडवणारी तत्त्व आहेत तर कॅथॉलिक पंथाची तत्व ही ऐहिक सुखाला मानणारी आहेत. म्हणून त्यांचा फार आर्थिक विकास झालेला नाही. भारतामध्येही धार्मिक अंधश्रद्धा या आर्थिक विकासाला अडसर ठरल्या आहेत. अंधश्रद्धेला महत्त्व देणाऱ्या या जमातीत ऐतखाऊ वर्ग मोठा असतो. अर्थातच कोणताही कामधंदा न करता नशिबाला आधार मानून बसतात. त्यानंतर वाईट होते. तेव्हा नशिबाला दोष देऊन मोकळे होतात. म्हणून भारताच्या संदर्भात तरी धर्म आर्थिक विकासाला काही प्रमाणात का होईना अडसर ठरलेला आहे.

मॅक्सवेबर यांच्या मते ज्या ज्या समाजात वा राष्ट्रांत अंधश्रद्धा आहेत त्या राष्ट्रांमध्ये जादू आहे. जादूला मानणारे राष्ट्र आपल्या आर्थिक प्रगतीला खिळ देणारे आहेत. ज्यू धर्म अंधश्रद्धावर विश्वास ठेवतो त्यांची त्यांची प्रगती झाली नाही. म्हणून ज्यू धर्माच्या राष्ट्रांमध्ये गरिबीचे प्रमाण वाढले व त्या गरिबीचे वर्णन वेबरने आत्मक्लेषदायी केल्याचे जाणवते. मॅक्स वेबरच्या मते, हिंदू धर्म जादूटोण्याने प्रभावित आहे. त्यामुळे आर्थिक विकासाला आवश्यक असलेला बुद्धीवाद प्रगल्भ झालेला दिसत नाही. म्हणून भारतात तरी काही अंशी धर्म आर्थिक विकासाला अडसर ठरला आहे की काय? असा प्रश्न निर्माण होतो. उदा. भारतात मुले ही देवाची देणगी मानतात आणि एका दाम्पत्याला १०-११२ मुले होतात ही देणगी जर दोन-तीन असेल तर त्यांना योग्य संगोपन, संवर्धन, शिक्षण, आहार व इतर सुविधा मिळतील का? १०-११ एकत्र असल्यास सुविधा मिळतील. याबद्दल विचार केला तर आपणास लक्षात येईल.

**हिंदू धर्म आणि आर्थिक विकास** Economic Development and Hindu Riligion-

भारतातील हिंदू धर्माच्या पार्श्वभूमीवर उपरोक्त विवेचन जे केले त्यावरून आपणास काही गोष्टी निश्चित लक्षात येण्यासारख्या आहेत. हिंदू धर्मात परलोकवादी व परमार्थिक मूल्यांवर अत्याधिक भर दिला जातो ही गोष्ट कोणीही नाकारू शकत नाही. जीवन मिथ्य आहे. आपणास दिसणाऱ्या सर्व वस्तू, गोष्टी आपले नातेवाईक, पैसा, धन-दौलत, सोने-नाणे इत्यादी सर्व माया क्षणभंगूर असून ती अशाश्वत आहेत असे म्हटले तरी चालेल. या क्षणभंगूरतेत ज्यांनी लक्ष घातले ते अधिक दु:खी, कष्टी होतात त्यांना ऐहिक सुख मिळत नाही. हिंदू धर्म हा परलोकी व काल्पनिक सुखाकडे ओढणारा आहे. त्यामुळे मॅक्सवेबरने

साधा सरळ निष्कर्ष सांगितला की, भारताचा धर्मामुळे आर्थिक विकास खुंटला आहे.

**धर्म आणि आर्थिक विकास दर्शवणारे काही संशोधने** :- १) आर्थिक विकासामुळे भारतीय समाजातील अंधश्रद्धा परंपरा, रूढी, चालीरीती, प्रथा यांच्यात बदल झाल्याचे दिसून येते. उदा. भारतीय समाजातील पूर्वीपासून चालत आलेली बलुतेदारी, पावसासाठी डोंगर, दगडे, झाडे, जलदेवता, यज्ञ इत्यादीची पूजा करून पाऊस पडेल अशी धारणा आज लोकांची नाही. आज लोकांचा विकास झाला. त्यांना विज्ञानाचे ज्ञान मिळाले. त्यावरून अनेक लोक ग्रामीण भागातीलसुद्धा वरील पूर्वीप्रमाणे पूजा न करता कृत्रीम पाऊस पाडणे योग्य मानतात, हवामानात होणाऱ्या बदला बद्दल बोलतात. शेतकरी आज बदलत्या परिस्थितीचा अंदाज घेऊन पिके घेतात. अर्थात पावसाचे प्रमाण कमी झाले. पाणी मुबलक नाही म्हणून कमी पाण्यावर येणारी पीके घेणे उदा. दांडाने पाणी पिकांना न देता तुषार, ठिबक इत्यादी पद्धतीने देणे.

२) भारतीय संस्कृतीत मोक्षप्राप्ती ही एक अंधश्रद्धाळू संकल्पना आहे. मोक्षप्राप्तीसाठी माणसे वाटेल ते करतात. उदा. दाने देणे. अर्थात दान दिल्यामुळे आशीर्वादाचे पुण्य मिळते अशी धारणा होती. परंतु आज दान देणारा ही बदलला आहे व भिक्षा मागणाराही बदलला आहे. देणारा वर्ग कमी झाला म्हणजे लोकांना मोक्षाबद्दल जाणीव झाली व पूर्वीसारखे भिक्षूक राहिले नाहीत. एखादी भिक्षा वा दान दिले नाही तर आज ते दान मागणारा देणाऱ्याला शिवीगाळ करतात. कमीच दिले म्हणतात. उदा. विनोबा भावे यांनी आंदोलन दानासाठी केले. त्यातून लोकांची जनजागृती करून भूदान, ग्रामदान यासारख्या गोष्टी दान देण्यास भाग पाडले. आज अशी दाने देणारा एकही सापडणार नाही. प्रत्येक व्यक्ती म्हणतो तो धडधाकट आहे. त्याने कामधंदा करावा असे म्हणतात याचा अर्थ लोकांच्या मनातील धर्मभावना कमी झालेली दिसते.

३) शिक्षणामुळे आर्थिक विकास होतो. समाजातील लोकांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढल्यामुळे लोकांना वास्तवाचे ज्ञान मिळते. ज्यांना वास्तव परिस्थितीबद्दल, गोष्टीबद्दल, ज्ञान असते ते लोक परंपरेनुसार चालत आलेल्या प्रथा, परंपरा, रुढी यांना विरोध करून झुगारून टाकतो. आजच्या आधुनिक युगात असा तर्क काढला जातो की, जे जे धार्मिक कट्टरता बाळगणारे लोक वा संघटना आहे, त्यांचा आर्थिक विकास कमी झालले आहे वा ते अंधश्रद्धेच्या भूत वादेतून बाहेर आलेले नाही असे मानतात.

४) भारतीय समाजात अनेक धर्म, पंथ, वर्ग, जाती आहेत. त्यामध्ये एक वैश्य हा चार वर्गापैकी एक वर्ग वा जात आहे. या जातीत व्यापारी-वाणी-दुकानदार अशा शब्दांनी संबोधले जाते. ज्यांच्याकडे उपजतच व्यापाराचे गुण आहेत असे अनेक मानले जाते. मॅक्स वेबर यांच्या मते, हे लोक आपला व्यापार अधिक मोठा करून वाढवू शकत नाहीत. कारण हा वर्ग आपल्या कुटुंबात अधिकच गुंतलेला असतो. त्यांना सोडून नवीन उद्योजक बनण्याची प्रकृती आत्मसात करत नाही. आहे त्यात समाधान मानून शांत बसणारी जात आहे.

मॅक्सवेबर यांचे उपरोक्त विधान वा मत वा सिद्धांत कसा चूक वा अयोग्य आहे दाखवण्यासाठी अनेकांनी टीका केल्या आहे.

१) फॉक्स – यांच्या मते, मी उत्तर भारतातील छोट्या व्यापाऱ्यांचा अभ्यास केला तेव्हा माझ्या निदर्शनास आले की हे व्यापारी आपला व्यवसाय वाढवू शकत नाहीत. त्याचे कारण धर्म नसून सामाजिक व आर्थिक परिस्थिती त्याला जबाबदार होती.

२) पैपनिक – यांच्या मते, मी मुस्लीम जमातीमधील मोमीन या व्यापारी जमातीचा अभ्यास केले आहे. ही व्यापारी जमात कोठेही असली तरी ती व्यापारी, उद्योजक आहे. अनेक मुस्लीम राष्ट्रांमध्ये ही जमात धर्मनिष्ठ आहे; परंतु त्यांनी आपला आर्थिक विकास सुद्धा केलेला दिसतो.

३) ओवेन व आशिश नंदी – यांच्या मते आम्ही जे संशोधन केले ते कलकत्त्याजवळील हौरा येथील इंजिनीअरिंगचा व्यवसाय करणाऱ्यां महिष्य जातीमधील लोकांचा या जातीच्या लोकांनी इतरांना हाताखाली न घेता फक्त स्वत:चाच जातीच्या लोकांना हाताखाली घेऊन व्यवसाय वाढवला आहे.

४) महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील लोहा व कंधार तालुक्यातील काही लोकांचा व्यवसाय हा हिंदुधर्मातील मंदिराचे शिखर बांधणे हा आहे. या व्यवसायासाठी महाराष्ट्रात व बाहेरही काही मंडळी प्रसिद्ध आहे यांनी मात्र त्यांच्या संपर्कात येणाऱ्या हा व्यवसाय शिकाऊ वा स्वत: बरोबर ठेऊन अनेकांना रोजगार देऊन आर्थिक विकास केला आहे.

वरील टीका मान्य करून ही भारतात वा अन्य राष्ट्रांमध्ये धर्माला मानणारे व दारिद्र्यात जीवन जगणारे आजही आपला विकास साधू शकले नाहीत ही वस्तुस्थिती मान्य करावी लागते. कारण जात, धर्म, वर्ग यांच्यात नेहमी द्वंद्वं दिसून येते. उच्च-निच्च, शोषक-शोषित हे आहेत त्यामुळे समांतर आर्थिक विकास होईल अशी अपेक्षा येत्या शतकातसुद्धा नाही.

शेवटी असे म्हणता येईल की, आर्थिक विकास व धर्म यातून अनेक प्रश्न निर्माण होतात. अशा प्रश्नांना किती महत्व द्यावे किंवा देऊनही हे समाज व परिस्थिती ठरवते. विकसित राष्ट्रांमध्ये परिपूर्ण आर्थिक विकास झालेला आहे मग तेथे काही प्रश्न व समस्या नाही का? तेथे अविकसित राष्ट्रातील प्रश्न वा समस्या नसतील परंतु तेथे विकासामुळे दुसऱ्या समस्या वा प्रश्न निर्माण झालेले दिसतात. ज्यांचा आर्थिक विकास झालेला आहे त्या समाजात नितीमूल्ये, भाव, सन्मान इत्यादी समाज उपयोगीत राहिलेली नाही. येथे फक्त गुंडगिरी, आतंक, चंगळवाद, भोगवाद, इत्यादी निर्मिती झाली व अनेक प्रश्न निर्माण झाले तर अविकसित समाजात बेकारी, दारिद्र्य, धार्मिक प्रथा परंपरातील अंधश्रद्धा इत्यादीमध्ये बुडालेले असतात. परंतु येथे कष्टदायी शांती, सुख, समाधान असते. विकसित राष्ट्रांना सुख, शांती, समाधान, नितीत्व इत्यादीचा शोध घ्यावा लागत आहे.

वरील सर्व लिखाणावरून असेच म्हणावे लागेल की, मानवी कल्याण हे सर्व शास्त्रांचे अंतीम ध्येय आहे. आर्थिक विकास हे साध्य नसून मानवी कल्याण साधण्याचे साधन आहे. मानवी कल्याण हे फक्त आर्थिक विकासातच नसून सामाजिक व धार्मिक मूल्यांमध्ये सुद्धा आहे. धार्मिक नीतीत हे तर विकासातील तत्त्वापेक्षा चिरकाल टिकणारे असतात. धर्म ही वैयक्तिक बाब आहे. धर्माला आर्थिक विकासाशी जोडून सार्वजनिक करण्याचा प्रयत्न आहे. परंतु धर्म व आर्थिक विकास या संबंध जोडणे काही अंगी अयोग्य आहे. धर्माची कार्ये

समाजासाठी महत्वाची सुध्दा असतात. उदा. शांती, सुख, बंधुभाव, प्रामाणिकपणा, सत्य, अहिंसा, निष्काम, कर्मयोगी, नितीमूल्ये, आदर इत्यादीमधून समाजाला संतुलन साधता येते. धर्मात काही गोष्टी निकृष्ट वा वाईट असतीलही, नाही आहेत. परंतु तो नष्ट करावा असे नाही.

## २.८ आर्थिक विकास आणि राजकारण

(Economic Development and Politics) -

प्रत्येक समाजाला आर्थिक, सामाजिक व धार्मिक शैक्षणिक, राजकीय अशा बाजू असतात. यामध्ये सर्वात महत्त्वाची बाजू म्हणून राजकारणाकडे पाहिले जाते. कारण प्रत्येक समाजाचा कारभार पाहणारी संस्था वा बाजू असते. राजकीय बाजूशिवाय कोणत्याच राष्ट्राचा विकास आपण पाहू शकत नाहीत. कारण राष्ट्रात कोणत्या प्रकारची राजकीय विचार श्रेणी त्या राष्ट्राने स्वीकारलेली आहे हे पाहणे गरजेचे असते. अर्थातच त्या त्या राष्ट्रातील राजकीय पक्ष, त्यांचे विचार, राष्ट्रात सत्तेत येणारी विचारश्रेणी महत्त्वाची आहे. उदा. इराण या राष्ट्रामध्ये माजी राष्ट्राध्यक्ष सद्दाम हुसेन यांची हुकूमशाही अशा राष्ट्रामध्ये कोणत्या प्रकारचा विकास होईल. ज्या राष्ट्रात लोकशाही नांदते त्या राष्ट्रात सर्वांना स्वातंत्र्य असते म्हणून तेथील विकासाला वेग थोडा मंद असतो असे मानतात. तुलनेने समाजवादी राष्ट्रापेक्षा कारण समाजवादामध्ये सर्वांना समानता दिली जाते. तुलनेत लोकशाही व हुकूमशाहीपेक्षा म्हणजे त्या त्या राष्ट्रातील राजकीय शक्ती (प्रेरणा) त्या राष्ट्राच्या विकासाला निश्चित दिशा देण्याचे कार्य करते.

### २ अ) लोकशाही आणि आर्थिक विकास (Democracy and Economic development) -

लोकशाही म्हणजे लोकांनी लोकांसाठी चालविलेले राज्य होय. ही प्रणाली ज्या राष्ट्रांनी स्वीकारलेली असते तेव्हा त्या राष्ट्रांचा विकास हा सर्वांचा निर्णय कार्यपद्धतीवर, आकांक्षा, अशा व विचार यावर असतो. लोकशाही नांदणाऱ्या राष्ट्रांचा विकास कसा होतो याचे उत्तम उदाहरण म्हणून जग भारताकडे पाहते. भारतात समाजातील लोकांवर कोणत्याच प्रकारचा जुलूम, जबरदस्ती न करता एखाद्या विचार वा नियम लागूसुद्धा केला जात नाही. त्यामुळे अशा ठिकाणी होणारा विकास मंद व सावकाश होतो. भारताच्या आर्थिक विचाच्या मंदीचेही हेच कारण आहे.

लोकशाहीमध्ये आर्थिक विकासाची सूत्रे लोकांच्या हातात असतात. तेथील सरकार हे केवळ आर्थिक नियोजनाचा आराखडा तयार करणारी यंत्रणा म्हणून उभी राहते. भारतातसुद्धा आर्थिक विकासाची सर्व सत्ता केंद्रित न होता ती विकेंद्रित आहे.

भारतात ७३व्या घटना दुरुस्तीनुसार विकास साध्य करण्यासाठी पंचायत राज योजना लागू केली. शासनाच्या विविध योजना तयार करून व भांडवल उपलब्ध करून देऊन सर्वांचा विकास करण्यासाठी पंचायत राजचा उपयोग केला जातो. पंचायत राज अंतर्गत जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत असे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. या त्रिसूत्रीमुळे गाव, तालुका व जिल्हा गल्लीपासूनच्या समस्या सोडवल्या जातात व विकास साधला जातो.

**लोकशाही पद्धतीत काही दोषसुद्धा आहेत.**

१) राष्ट्रातील सत्ता दीर्घकाळ टिकवणे

२) लोकशाहीमध्ये सरकार लोकांच्या मतावरून निवडून येणारे असते हे सर्वच सत्ताधारी लक्षात ठेवूनच सरकार चालवतात.

३) सरकार ज्या योजना तयार करून राबवते त्यातून लोकांची मने जिंकणे हा त्यामागचा उद्देश असतो.

४) लोकशाहीतील प्रत्येक योजना शुद्ध विकासासाठी न राहता त्यामागेसुद्धा सत्ताधाऱ्यांचे राजकारण असते.

५) निवडणूक तोंडावर आली की सर्वच राजकीय पक्ष विविध विकासाचे व सुख सुविधांचे क्षणभंगूर जाहिरनामे (वचने) तयार करून जनतेला आश्वासने देतात.

६) सत्ताधारी पक्ष एकदा सत्तेत आला की पहिले तीन वर्ष निवडणुकीत झालेला खर्च काढण्यात गुंतलेला असतो व शेवटची एक-दीड वर्ष पुन्हा आपण सत्तेवर कसे येऊ यासाठी आपापल्या मतदारांना खूष ठेवण्यात खर्च करतात.

वरील दोषांमुळेसुद्धा लोकशाही राष्ट्रात आर्थिक विकासाला विलंब होतो.

**ब) समाजवाद आणि आर्थिक विकास** (Socialism na Economic development)-

समाजवाद ही एक स्वतंत्र डाव्या विचारांची विचारसरणी आहे. समाजवादी विचारसरणी आज जवळपास कमी कमी होत आहे की काय असे वाटत आहे. कारण पूर्वी रशिया, चीन व युरोपीयन अनेक राष्ट्र होती. भारतात पश्चिम बंगाल या राज्यात जवळपास ४० वर्षे राज्य सरकार होते. समाजवाद म्हणजे सर्वांना समान संधी वा समानता. कार्ल मार्क्स यांनी आपल्या विचारात ऐतिहासिक भौतिकवाद मांडला व त्यातून जे इतिहासाचे पाच टप्पे सांगितले आहे त्यापैकी दोन तर समाजवादाच्या संदर्भात आहेत. मार्क्स जगातील कामगारांच्या शोषणाबद्दल विचार करतो व नंतर बोलतो. तेव्हा तो म्हणतो की, जगातील कामगार एकत्र येऊन भांडवलदारांच्या विरोधात संघर्ष करा विजय तुमचा होईल. समाजवादात आर्थिक विकास हा सरकारच्या हाती असतो. समाजवादात आर्थिक नियोजन व आर्थिक विकास स्वत:च सरकार आपलया हातात ठेवते. त्यामुळे समाजवादी राष्ट्रातील विकासावर फक्त सरकारचेच नियंत्रण असते. अर्थातच या विकासाला केंद्रीकृत विकास म्हणता येईल. लोकशाही राष्ट्रांच्या व भांडवलशाही राष्ट्रांपेक्षा समाजवादात आर्थिक विकासाचे सूत्र वेगळे असते. लोकशाही राष्ट्रांमध्ये सर्व लोकांच्या हातात भांडवलाबाबत खासगी भांडवलदारांच्या हाती तर समाजवादात फक्त सरकारच्या हाती आर्थिक विकास केंद्रित झालेला असतो.

समाजवादी राष्ट्रांमध्ये लोकशाही व भांडवलशाहीसारखी परिस्थिती नसून स्वतंत्र आहे. यामध्ये अधिकाधिक जनतेचे वा लोकांचे कल्याण व फायदा कसा होईल हेच उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून विकास साधला जातो. आज भारतासारख्या लोकशाहीवादी संमिश्र अर्थव्यवस्था स्विकारणाऱ्या राष्ट्रांमध्ये आर्थिक विकासात दोन मार्ग आहे. संमिश्र अर्थव्यवस्था

भारताने जवळपास रशियामधील साम्यवाद नेस्तनाबूत झाल्यानंतर स्वीकारली आहे. संमिश्र अर्थव्यवस्थत १) खासगी क्षेत्र २) सार्वजनिक क्षेत्र अशा दोन क्षेत्रांचे मिश्रण आहे.

खासगी क्षेत्रात उत्पादन साधनांची सर्व मालकी ही वैयक्तिक एखाद्या व्यक्ती, संघटन, संस्थेची असते, तर सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादनावर व साधनांवर मालकी ही सरकारची असते. भारतातील महत्त्वाचे व मोठ्यात मोठे उद्योग हे सार्वजनिक क्षेत्रात आहेत. उपभोग्य वस्तूसारखे कमी महत्त्वाचे उद्योग खासगी क्षेत्रात आहेत. भारताचा विचार केला तर भारतात समाजवाद व भांडवलवाद हे दोन्ही प्रकार दिसून येतात. जे उद्योग सार्वजनिक आहेत त्यांच्यावर नियंत्रण सरकारचे आहे. उदा. रेल्वे, अंतराळ संशोधन, इत्यादी. भारतात काही खासगी मालकीचेही आहेत. उदा. रिलायन्स, हिंदुस्तान लिव्हर इत्यादी.

**क) भांडवलवाद आणि आर्थिक विकास** (Capitalizm and Economic development) -

आर्थिक विकासात भांडवल ही संकल्पना महत्त्वाची आहे. ज्या राष्ट्रांमध्ये खासगी मालमत्ता विकसित करण्याचे स्वातंत्र मिळाले त्यांचा विकास लवकर झालेला दिसतो. अर्थातच ज्या ज्या राष्ट्रांनी आपल्या राजकारणात भांडवलवाद स्वीकारले आहे त्या त्या राष्ट्रांचा विकास मात्र वेगळ्या पद्धतीने होतो. खऱ्या अर्थाने भांडवलवादी राजकीय प्रणालीमध्ये व्यक्ती स्वातंत्र्य, आर्थिक विकास साधण्याचे स्वातंत्र्य, वैयक्तिक संपत्ती जमवण्याचे स्वतंत्र, बाजारातील वस्तूंच्या पुरवठ्यानुसार व मागणीनुसार किंमतीत कमी जास्त करून नफा कमावण्याचे स्वातंत्र्य इत्यादी. अशी स्थिती लोकशाही किंवा समाजवादात नसते. ही अवस्था फक्त भांडवलवादी राजकीय प्रणाली स्वीकारणाऱ्या राष्ट्रांमध्येच दिसून येते. उदा. अमेरिका, इंग्लंड, जपान, फ्रान्स, कॅनडा, स्वित्झर्लंड इत्यादी राष्ट्रांनी ही विचारसरणी स्विकारली व त्याचा विकासही याच विचारसरणीमधून झालेला दिसतो. वरील उदाहरणातील राष्ट्रांमध्ये लोकशाही नाही असे नाही. त्यांनी लोकशाहीच्या कक्षेत राहून भांडवलवादाचा स्वीकार केलेला आहे. जगाला सिद्ध करून दाखवले की लोकशाहीत भांडवलवाद स्विकारून कसा आर्थिक विकास घडवून आणला जातो.

भांडवलवाद हा जगाच्या विकासासाठी १०० टक्के योग्यच आहे असे नाही. त्यातसुद्धा काही दोष आहेत. कार्ल मार्क्स यांच्या मते ''भांडवलवादाच्या नाशाची बीजे भांडवलवादातच अंतर्भूत आहेत.'' परंतु मार्क्स हे भाकीत फोल ठरवण्याचे काम काही विकसित राष्ट्रांनी केले. १०व्या व २०व्या शतकात अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, इत्यादी राष्ट्रांनी महायुद्धानंतर जी प्रगती करून जगाला दाखवली ती अतिशय महत्त्वाची आहे. कारण जगातील इतर जी लोकशाही व समाजवादी राष्ट्र आहेत त्या राष्ट्रांनी या प्रगतीकडे डोळे उघडे ठेवून पाहिले आणि आपापल्या राष्ट्रांमध्ये भांडवलवादाला खतपाणी घालून पोषण करण्यास सुरुवात केली. उदा. रशिया, चीन, भारत इत्यादी जगातील ज्या ज्या राष्ट्रांनी लोकशाहीयुक्त भांडवलवाद स्वीकारलेला नाही त्या त्या राष्ट्रांची प्रगतीला आर्थिक विकास मागे राहिलेला आहे. तसेच ज्या राष्ट्रांमध्ये लष्करशाही व हुकूमशाही त्या राष्ट्रांमध्ये तर कोणत्याच प्रकारच्या विकाससंधी दिसून येत नाहीत.

**ड) राष्ट्रवाद आणि आर्थिक विकास** (Nationaolism and Economic development)

राष्ट्रांच्या विकासाला खऱ्या अर्थाने प्रेरणेची गरज असते असे म्हटले तर वावगे होणार नाही कारण प्रत्येक व्यक्तीला स्वत: विकास करण्यासाठी प्रेरणा महत्त्वाची असते. जशी व्यक्तीला गरज असते. त्याचप्रमाणे राष्ट्राच्या विकासालाही प्रेरणा पोषक असते. राष्ट्रवाद म्हणजे स्वत:च्या राष्ट्राबद्दल असणारी भावना, प्रेम, देशभक्ती, श्रद्धा इत्यादी राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला राष्ट्रवादाची जाणीवसुद्धा असली पाहिजे कारण प्रत्येकजण राष्ट्राच्या प्रगतीसाठी व विकासाठी कार्यशील होईल व कितीही मेहनत, जिद्द, कष्ट करून राष्ट्रांच्या विकासाला हातभार लागेल. उदा. देशातील जवान हा त्या त्या देशाच्या संरक्षणासाठी स्वत: जीवात जीव असतेपर्यंत तो शत्रूशी झुंजतो कारण तो देशभक्तीने प्रेरीत झालेला असतो. तसा राष्ट्रातील प्रत्येक व्यक्ती विकास प्रेरणेतून होऊन विकास साध्य करता येतो.

## २.९ संस्कृती आणि आर्थिक विकास

(Cultural and Economic Development) -

जागतिकीकरणाच्या प्रवाहात आज संपूर्ण संस्कृती एक होऊ पाहत आहे. भारतासारख्या संस्कृतिक वारसा लाभलल्या राष्ट्रांना भीती वाटत आहे की या प्रवाहात आपली संस्कृती टिकते का? नाही. आज तरी असेच म्हणावे लागेल की भारतात काही प्रमाणात का होईना संस्कृतीचे जतन करून ठेवले आहे. जगात सर्वत्र औद्योगिकीकरणाच्या व नागरीकणाच्या माध्यमातून प्रत्येकजण विकास साध्याचा प्रयत्न करत आहे. ज्या राष्ट्रांकडे नैसर्गिक साधन संपत्ती असलेले राष्ट्र त्यांना संपत्तील आधुनिकीकरणाची सांगड घालून विकास करण्याचा प्रयत्न करत आहेत. नवनवीन आधुनिक यंत्रतंत्राचा वापर करून घेऊन विकास साधण्याचा प्रयत्न सर्वत्र होत आहे. जगात औद्योगिकीकरणामुळे मुक्त बाजापेठेमुळे, मुक्त सामाजिकतेमुळे सर्वांच्या विचाराच्या कक्षा रुंदावल्यामुळे स्वत:च्या संस्कृतीचा त्याग करून हळूहळू जागतिक संस्कृतीचा स्वीकार केला जात आहे. परिणामी जगात सारख्याच परिवर्तनाची नांदी निर्माण झाली आहे. यामुळे प्रत्येक राष्ट्राची स्वत:ची संस्कृती अस्तित्वात राहील का? नाही अशी, भिती प्रत्येक राष्ट्रांना व त्यातील लोकांना वाटत आहे.

वरील विचार प्रवाहाच्या विरुद्ध विचार गाठणारेसुद्धा काही विचारवंत आहेत. त्यात, मूर, रमेलशर ब्लुमर आणि सिंगर इत्यादी यांच्या मते प्रत्येक राष्ट्राची मूल्ये, प्रथा, परंपरा, रूढी, चालीरिती, श्रद्धा व संस्कृती इत्यादी इतके खोलवर रूजलेले असतात की भौतिक संस्कृतीप्रमाणे बदलत नाहीत. अर्थातच या अभौतिक संस्कृतीची जड वटवृक्षाच्या मुळाप्रमाणे प्रत्येकाच्या मनात भिनलेली असते. उदा. भारतीय समाजात आज आधुनिक युगातील संगणक घरात आणला तर घरातील उच्च सुशिक्षित डॉक्टर, प्राध्यापक, वकील इत्यादी महिला या संगणकाला हळद-कुंकू लावून पेढा ठेऊन अगरबत्ती लावून, नारळ फोडतात आणि नंतर चालू करतात. अर्थातच भारतीय समाज आर्थिकदृष्ट्या कितीही विकसित झाला तरी आपल्या सांस्कृतिक मूल्यांचे जतन करताना यावरून असे म्हणता येईल की, राष्ट्रांचा व

राष्ट्रातील जनतेचा–लोकांना कितीही विकास झाला तरी आपापल्या राष्ट्रातील संस्कृतीला जतन करून ठेवण्याचा वारसा पुढे चालू ठेवण्याचा प्रयत्न निश्चित केला जातो म्हणून आर्थिक विकास आणि संस्कृती यांचा परस्परसंबंध आहे, असे म्हणावे लागते.

**आर्थिक विकास आणि संस्कृतीतील परस्परसंबंध**

**१) सांस्कृतिक मूल्ये आणि परंपरा परिवर्तनीय असतात –** आर्थिक विकास आणि संस्कृतीमधील संबंध स्पष्ट करताना आपणास असे दिसून येते की, कोणत्याही राष्ट्रांची प्रथा, परंपरा, मूल्ये व संस्कृती विकासाबरोबर परिवर्तनीय असतात. परंपरा, प्रथा, मूल्ये व संस्कृती जर अपरिवर्तनीय असतील तर त्या राष्ट्रांचा विकास होणार नाही. उदा. सनातनी व रूढी प्रिय अशा मुस्लीम राष्ट्रांमध्येसुद्धा विकासाबरोबर परिवर्तन झालेले दिसून येते. पूर्वी मुस्लीम स्त्रियांना घोषा पद्धत हाती. आज ती संपुष्टात आलेली दिसते. प्रत्येक राष्ट्राच्या विकासाच्या ओघात परिवर्तन आपोआप येऊन जाते. परंतु संस्कृतीची छाप मात्र राहून जाते.

**२) सांस्कृतिक मूल्ये विकास विरोधक नसतात –** सांस्कृतिक मूल्ये आणि आर्थिक विकास यांच्यात कधीही परस्परविरोध दिसून येत नाही. कोणत्याही राष्ट्राला आपापल्या संस्कृतीची जोपासना करून आर्थिक विकास करावा लागतो. संस्कृती, मूल्ये, परंपरा या विकासाला पूरक मदत करणारेच असतात. फक्त त्यांचा योग्य अर्थ लक्षात घेऊन उपयोगात आणल्या पाहिजेत. उदा. भारतातील महिलांना चूल आणि मूल या बंधनातच ठेवले जाते. म्हणून भारतातील महिलांचा विकास झाला नाही असे नाही भारताच्या महिला सर्वोच्च पदावरसुद्धा विराजमान झालेल्या आहेत. उदा. इंदिरा गांधी, प्रतिभा पाटील, किरण बेदी, मायावती, ममता बॅनर्जी, सुषमा स्वराज इत्यादी.

**३) सांस्कृतिक परंपरा समाजानुसार विविध असतात –** एकाच राष्ट्रात अनेक जाती, धर्म, पंथ, गट, समुदाय असतात. त्यांची स्वतंत्र काही मूल्ये असतात आणि ही मूल्ये एकमेकांच्या विरोधी असतात. परंतु अशा विरोधी मूल्यांना एका मर्यादेपर्यंत स्थित ठेवून राष्ट्रांच्या मुख्य सांस्कृतिक प्रवाहाला ग्राह्य धरून आर्थिक विकास केला जातो. उदा. भारत याचे समर्पक उदाहरण राहील.

**४) सांस्कृतिक परंपरा समाजातील सर्वच स्तरांत समान नसतात –** प्रत्येक राष्ट्रातील समाजामध्ये संपूर्ण समाज (लोक) एक सारख्या स्तरामध्ये जीवन व्यतीत करत नसतात. अर्थात समाजामध्ये श्रीमंत, मध्य व गरीब असे तीन स्तर असतात. या तिन्ही स्तरांमध्ये जीवनमान, राहणीमान, सुख–सुविधा, आर्थिक विकास त्यासारखा कधीच व कोठेही दिसून येत नाही. त्यामुळे या तिन्ही स्तरांत जीवन जगणाऱ्या समाजाची संस्क़ृती, परंपरा, मूल्ये, प्रथा, इत्यादींमध्ये स्पष्ट फरक दिसून येतो. परंतु राष्ट्रांची मुख्य संस्कृती व उच्च संस्कृतीला मुख्यत: लक्षात ठेवून विकासाला गती दिली जाते. उदा. भारतात उच्च राजकीय, सिनेसृष्टी, अधिकारी, जमीनदार, उद्योजक इत्यादींची संस्कृती व मध्य–गरीब लोकांची संसकृती यांच्यात दिसून येणारे अंतर याचे उत्तम उदाहरण आहे.

सारांश – उपरोक्त मांडणीवरून असे स्पष्ट होते की कोणत्याही राष्ट्रांची मुख्य संस्कृती

आणि आर्थिक विकास यामध्ये अतुट संबंध असल्याचे दिसून येते. संस्कृती, प्रथा, मूल्ये, परंपरा कोणत्याही स्वरूपाच्या असल्या तरीही राष्ट्राच्या विकासाला अडथळा ठरणाऱ्या नसल्याचे स्पष्ट जाणवते. आर्थिक विकासाबरोबर संस्कृतिक परिवर्तनसुद्धा होत असते कारण संस्कृती ही परिवर्तनीय व लवचिक स्वरूपाची असते. राष्ट्रांतर्गत समाज श्रेणीतील लोकांना सोबत घेऊन राष्ट्रांच्या विकासाला गती दिली जाते. समाजातील उच्च, निच्च, शेतकरी, शहरी झोपडपट्टी इत्यादींची उपसंस्कृत्या मुख्य संस्कृतीच्या प्रवाहाच्या आधीन मानून विकास साधला जातो.

## स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**२अ) दीर्घ उत्तरीय प्रश्न**

१) आर्थिक विकासाचे सामाजिक पैलू स्पष्ट करा. Explain the social effect of Economic development?

,...........................................................................................

,...........................................................................................

,...........................................................................................

२) आर्थिक विकास आणि कुटुंब नातीगोती संबंधावर चर्चा करा? Discuss the Economic development and Family Kinship system relationship?

,...........................................................................................

,...........................................................................................

,...........................................................................................

३) आर्थिक विकासात व्यावसायिकतेची भूमिका विशद करा. Elaborate the Economic developmenting role of occupation.

,...........................................................................................

,...........................................................................................

,...........................................................................................

४) आर्थिक विकास आणि सामाजिक स्तरीकरणावर निबंध लिहा. Asses on the Economic evelopment and social stratification.

,...........................................................................................

,...........................................................................................

,...........................................................................................

५) आर्थिक विकासात धर्माची भूमिका स्पष्ट करा? Explain the Economic development in the Role of Religion.

,.......................................................................................

,.......................................................................................

,.......................................................................................

६) आर्थिक विकास आणि राजकीय पैलूमधील संबंध विशद करा? Elaborate the Economic development and polities aspects Relation.

,.......................................................................................

,.......................................................................................

,.......................................................................................

७) आर्थिक विकासात संस्कृतीची भूमिका यावर चर्चा करा. Discuss the Economic development in the Role of caltural?

,.......................................................................................

,.......................................................................................

,.......................................................................................

८) आर्थिक विकासाला कुटुंबावर होणारे परिणाम स्पष्ट करा? Explain the effects of Economic development on family.

,.......................................................................................

,.......................................................................................

,.......................................................................................

९) आर्थिक विकास आणि हिंदू धर्मातील संबंध विशद करा? Elaborate the Economic development and Hindu religion Relationship

,.......................................................................................

,.......................................................................................

,.......................................................................................

१०) आर्थिक जीवनाच्या सामाजिक पैलूंच्या समाजशास्त्रीय ऐतिहासिक आढावा, यावर चर्चा करा? Discuss the sociological aspect of Economic Life -Historical of sociological thought.

,.......................................................................................

,.......................................................................................

,.......................................................................................

थोडक्यात उत्तरे द्या. (Write answers in Brief)

१) आर्थिक न्याय आणि विषमता Economic Justice and Inequality

,..............................................................................

,..............................................................................

,..............................................................................

२) जाती व्यवस्था आणि सामाजिक स्तरीकरण Caste system and social stratification

,..............................................................................

,..............................................................................

,..............................................................................

३) लोकशाही आणि आर्थिक विकास Democracy and Economic development

,..............................................................................

,..............................................................................

,..............................................................................

४) समाजवाद आणि आर्थिक विकास Socialism and Economic development

,..............................................................................

,..............................................................................

,..............................................................................

५) भांडवलवाद आणि आर्थिक विकास Capitalizm and Economic development

,..............................................................................

,..............................................................................

,..............................................................................

६) राष्ट्रवाद आणि आर्थिक विकास Nationlism and Economic development

,..............................................................................

,..............................................................................

,..............................................................................

**सेट/नेट प्रश्न**

१) आर्थिक विकासात संरचनेची ......... ही संकल्पना मुख्य आहे.
(कार्यालकता, विभेदीकरण, आधुनिकीकरण)

२)	कुटुंबावर सविस्तर लिखाण करणारे ......... हे शास्त्रज्ञ आहेत.
(डॉ. इरावती कर्वे, विल्यम गुड, स्पेन्सर)

३)	हर्बर्ट स्पेन्सर यांनी उत्क्रांतिवाद स्पष्ट करताना ......... समाज सांगितले.
(दोन, तीन, चार)

४)	......... हा समजा शिस्तबद्ध आहे.
(आधुनिक, सैनिकी, औद्योगिक)

५)	एकरूप समाजात ......... प्रकारचे संघटन दिसून येते.
(यांत्रिकस्वरूप, जैविकस्वरन, दैवी स्वरूप)

६)	......... यांच्या मते कोणत्याही धर्मात काही परमार्थी तत्त्व असतात.
(उरखम, स्पेन्सर, मक्सवेबर)

७)	राष्ट्राच्या विकासाला ......... गरज असते.
(इच्छा, भावना, प्रेरणा)

८)	आर्थिक विकासाला सर्वात मोठा अडसर ......... हा आहे.
(व्यवसाय, राजकारण, धर्म)

९)	जोड्या लावा.

| अ | ब |
|---|---|
| १) विल्यम गुडे – | world revolution and family patterns |
| २) हर्बर्ट स्पेन्सर – | Principal of Socilogy |
| ३) दरखीम – | division of Labour in society |
| ४) गुरमिरडल – | Asian Drama. |

## संदर्भ ग्रंथ


१)	पुंडलिक विद्याधर गंगाधर (१९७९) आर्थिक विकासाच्या सामाजिक बाजू–विजयनगर, पुणे महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, गांधी रोड, यांच्यासाठी २अ. कुलकर्णी कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजयनगर, पुणे ३० पृष्ठ क्र. ७८ ीं १३९

२)	पुंडलिक विद्याधर गंगाधर (१९९९–२०००) विकासाचे समाजशास्त्र आणि आधुनिकीकरण – नागपूर – श्री गजानन प्रकाशन. अनिल लक्ष्मणराव वाघाडे – श्री गजानन प्रकाशन महाल, नागपूर – २, पृष्ठ क्र. १३ ीं ८२

३)	सोमन/सतुर/फडके (१९९०–९१) सामाजिक शास्त्र पुस्तक दुसरे – नाशिक–कुलसचिव यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२००५ पृष्ठ क्र. १०३ ीं १५२

हिंदी

१) गुप्ता/शर्मा (२००३) सामाजिक विचारचक्र - आग्रा - साहित्यभवन पब्लिकेशन, हॉस्पिटल रोड आग्रा - पृष्ठ क्र. ५२-५७, १०४-११४, ४०-५०

२) गुप्ता शर्मा ( २००३) भारतीय ग्रामीण समाजशास्त्र, आग्रा, साहित्यभवन पब्लिकेशन्स, हॉस्पिटल रोड, आग्रा, पृष्ठ क्र. १६३-१७३

३) गुप्ता शर्मा (२००४) पृष्ट क्र. २५३-२६८ ४३१-४४४, ४७९-५९७

४) गुप्ता शर्मा (२००४), समाजशास्त्र .. २ आग्रा पृष्ठ क्र. ९३०-९६१, ९८१-९८७, ११०६-१२३३, १३१०-१३३०

५) दोषी/जैन (२००२) प्रमुख समाजशास्त्रीय विचारक - जयपूर, रावत पब्लिकेशन्स, जैन मंदिर रोड, जवाहरनगर, जयपूर पृष्ठ क्र. १२३ ीं २०६७ २६७ ीं ३०६

६) मित्र-जे-पी (२००३) जनांकिकी - आग्रा - साहित्य भवन पब्लिकेशन्स हॉस्पिटल रोड आग्रा पृष्ठ क्र. ४४५-४६४.

७) Incyclopidia.

८) Wikipediya.

९) Intoneral.

# घटक -३
## विकासाच्या वाटा/यार्ग

अनुक्रमणिका


३.0 उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ सामाजिक विकासाचे संतूलन

 ३.२.२ विकासाच्या वाटा

 ३.२.३ भांडवावादाचे गुण-दोष किंवा फायदे - तोटे (मूल्यमापन)

 ३.२.४ समाजवाद

 ३.२.५ मिश्र अर्थव्यवस्था

३.३ स्वयं अध्ययन प्रश्न

३.३ सारांश

३.५ पारिभाषिक शब्द

३.६ संदर्भ सूची


## ३.0 उद्दिष्टे

## ३.१ प्रस्तावना

आधुनिक समाज्याच्या विकासात औद्योगीकीकरण, जागतीकीकरण आणि आधुनिकीकरण इत्यादी प्रक्रियांचा विशेष प्रभाव पडतो. विकासाला समाजशास्त्रात या

बाबींचा अध्ययनांवर विशेष भर दिला जातो. तसेच विकासातील अडथळे, विकासातील समाजाच्या समस्या आणि त्यांचे समाजाच्या समस्या आणि त्यांचे समाधान शोधण्याचा प्रयत्न या शास्त्रात होतो. विकासाचे ध्येय सर्वांना न्याय देणे याला आहे. सामाजिक कल्याणाची भावना यामध्ये विद्यमान आहे. या शास्त्रात आयोजन, सामाजिक नियोजन, सामाजिक विधान इत्यादींबरोबरच मागासलेल्या, विकासात पछाडलेल्या लोकांचा, समूहांचा देखील अभ्यास केला जातो. विकासाचे स्वरुप दोन प्रकारचे असते. एक म्हणजे राजकीय व दुसरे आहे सामाजिक. या दोन्हींमध्ये इतर संबांधीत क्षेत्राचा अंतर्भाव विकासाच्या समाजशास्त्रात होतो.

मनुष्याच्या सामाजिक विकासाची प्रक्रिया नैसर्गीक विकासापासून वेगळी आहे. नैसर्गीक विकासात हर्बर्ट या सिद्धांत लागू होतो. कारण, नैसर्गीक विकास हा यांत्रिक स्वरुपाचा विकास आहे. मानव समाजाच्या विकासाला यांत्रिक नियमांव्दारे समजणे शक्य नाही. हेगेल ने या संबंधात अध्यात्मिक विकासाचा सिद्धांत मांडला.

लॅबहाकच्या मतानुसार नैसर्गीक आणि सामाजिक विकासात अंतर आहे. नैसर्गीक विकासात यांत्रिकपणा असतो तर, सामाजिक विकासात आत्मचेतना असते. निसर्गच मानवाला प्रेरित करीत नाही तर, मनुष्यही निसर्गिक प्रयत्नांनी बदलत असतो. ही सामाजिक विकासाची स्थिती असते. हॉबहाऊसने या सामाजिक विकासाला नैसर्गीक विकासापासून पृथकपणे दर्शविण्याकरीता त्याला प्रगती (Progress) ही संज्ञा दिली आहे. या अवस्थेत विकासाची गती, प्रक्रिया मनुष्याच्या नियंत्रणात येत जाते. यानवाने आपल्या बुद्धीच्या, ज्ञानाच्या, संशोधनाच्या, प्रयत्नांच्या, जिज्ञासेच्या बळावर परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासंबंधी यश मिळविले आहे. यशाचा हा प्रवास सुरुच आहे. हे प्रमाण ज्या समाजात जितके जास्त तितका तो समाज प्रगत समजला जातो. बुद्धी आणि चेतनेच्या क्रियांमुळे सामाजिक विकास उद्देशपूर्ण बनतो निसर्गाला आपल्या अनुकूल बनविणे हेच त्याच्या मानवी विकासाचे उद्देश आहे.

सामाजिक विकासाची व्याख्या करतांना हॉबहाऊसने व्यक्तीच्या परस्पर क्रिया आणि एक-दुसऱ्याच्या सामाजिक संबंधाचा त्याचे आधारभूत तत्व म्हटले आहे. सामाजिक संबंधात मानवी भावनांचा प्रभाव पडतो. सामाजिक विकास आणि सामाजिक प्रगतीत अंतर आहे. सामाजिक विकासात सामाजिक प्रगती आणि सामाजिक अवनती दोन्ही होऊ शकतात. ज्यांना आपण मुल्यवान व महत्त्वपूर्ण समजतो, त्या गुणांचा विकास म्हणजे प्रगती होय. हॉबहाऊसच्यामते, प्रगतीचा संबंध प्रजातीशी नसून संस्कृतीशी आहे. सामाजिक प्रगतीचे मुळ तत्व हे समाजशास्त्राचे ध्येय आहे. प्रगतीसाठी प्रयत्न करावे लागतात. सामाजिक प्रगतीचे संचालन मनुष्य करतो. प्राणी जगतात जैविक विकास होतो तर, मानव जगतात सामाजिक विकास होतो.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ सामाजिक विकासाचे संतुलन :-

सामाजिक परिवर्तनाच्या विविध प्रकारांपैकी 'सामाजिक विकास' हा त्यातीलच एक प्रकार आहे. सामाजिक विकासाची संकल्पना सर्वप्रथम हॅबहाऊस यांनी १९२४ मध्ये आपल्या "Social Development" ग्रंथात मांडली. सामाजिक संस्था आणि या संस्थेच्या कार्यातील विकास असे म्हटले आहे. विकासाच्या या व्याख्येत समाजातील समायोजन वाढण्याला विकासाचे प्रमुख चिन्ह मानलेले आहे. हॉबहाऊसने सामाजिक विकासाला नैतिक विकासाप्रमाणेच मानले आहे. सामान्य रुपात कुठल्याही समाजात सामाजिक विकास वाढीबरोबरच नैतिक विकासही होत असतो. साधारणत: समाजाच्या विकासाची स्थिती ही चांगलीच राहते. हेगेन म्हणते की, जीवनाप्रती एक चांगला दृष्टीकोन सामाजिक विकासची एक अनिवार्य स्थिती आहे. सामाजिक विकासात एक आंतरिक चेतनेच्या विकास मिळालेला असतो. सामाजिक विकासाबरोबरच समाजातील लोक काही आधारभूत नैतिक तत्वांना स्वीकृती देत असतात व त्यावर अंमलदेखील करीत असतात.

**आर्थिक विकासाची संकपना :-**

काही समाजशास्त्रज्ञ आर्थिक विकासाला सामाजिक विकासाचे सुचक पावतात. दुसऱ्या महायुद्धानंतर 'विकासाचे अर्थशास्त्र' अशी स्वतंत्र शाखा अर्थशास्त्रात उदयास आली. आजच्या प्रगतीशील जगात आर्थिक विकासाचा अभ्यास महत्त्वाचा झाला आहे. शिवाय आर्थिक विकासाची प्रमुख समस्या सुद्धा आहे. आर्थिक विकास म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ, दारिद्र्यात वाढ, दारिद्र्यात घट आणि लोकांच्या जीवनमानात सुधारणा करणे होय. प्रो. मेखर आणि बाल्कविन यांच्या मते, आर्थिक विकास अशी एक प्रक्रिया आहे की, तीच्याद्वारे अर्थव्यवस्थेच्या वास्तविक उत्पन्नात दीर्घकाळापर्यंत वाढ होते. प्रो. आर्थर लेविस यांच्या मते, आर्थिक विकासाला अर्थ दरडोई उत्पादनातील वाढ असा आहे. आधुनिक काळात आर्थिक विकासाला अर्थ व्यापक दृष्टीकोनातून केला जातो.

आर्थिक विकास म्हणजे केवळ वृद्धी नव्हे तर, त्यात मानवाचा सर्वांगीण विकास अभिप्रेत आहे. मानवाच्या केवळ भौतीक गरजा पूर्ण होणे महत्त्वाच्या नाहीत तर, त्याचबरोबर सामाजिक व सांस्कृतिक विकास होणे आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या समितीने केलेली व्याख्या महत्त्वाची ठरते. विकासाचा संबंध केवळ मानवाच्या भौतिक गरजांशी नसून तो त्याच्या सामाजिक सुधारणेशी आहे. विकास म्हणजे अशारितीने केवळ आर्थिक वृद्धी नव्हे, तर वृद्धीबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, संस्थागत तसचे आर्थिक बदल अभिप्रेत आहेत.

## ३.२.२ विकासाच्या वाटा (Path of Development) :-

विकासाचे प्रामुख्याने तीन मार्ग सांगीतले आहेत, ते तीन मार्ग म्हणजे -

१.भांडवलवाद (Capitalism)

२.समाजवाद (Sociolism)

३.मिश्र अर्थव्यवस्था (Mixed Economy)

१.भांडवलवाद / भांडवलवादी मार्ग :-

प्रा. पिगू यांच्या मते, ''ज्या अर्थव्यवस्थेत भौतिक साधनांची मालकी किंवा त्यांचा वापर करण्याचा आधिकार काही विशिष्ट व्यक्तींच्या हातात असतो व त्यांचा इच्छेनुसार साधनांचा वापर केला जातो, त्या अर्थव्यवस्थेला भांडवलशाही अर्थव्यवस्था म्हणतात.''

मॉरिस डॉब यांच्या मते, ज्या अर्थव्यवस्थेत व्यक्तीगत उपक्रमावर कोणतेही निर्बंध नसतात, लोकांना स्वच्छेनुसार कोणताही व्यवसाय करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते, सरकारकडून कायदेशीर प्रतिबंध व नियंत्रणे लादली जात नाही, आर्थिक जीवनात सरकारी हस्तक्षेप नसतो व ज्यात मुक्त स्पर्धा असते, त्या अर्थव्यवस्थेला भांडवलशाही अर्थव्यवस्था असे म्हणतात. कार्ल मार्क्सच्या मते, ज्या अर्थव्यवस्थेला कामगारांची गुलामगिरी नफ्यावर अधिष्ठित उत्पादन व अतिरीक्त मूल्य यांचा समन्वय असतो, त्या अर्थव्यवस्थेला भांडवाशाही अर्थव्यवस्था असे म्हणतात. जी.डी.एच. कोलच्या मते, लाभाच्या हेतूने केल्या जाणाऱ्या उत्पादनाशी भांडवलवाद ही अशी प्रणाली आहे की, त्यामध्ये उत्पादनाची साधने व सामग्री ह्यांवर खाजगी मालकी असते व उत्पादनाचे कार्य मुख्यत: भाडोत्री श्रमाव्दारे केले जाते. उत्पत्ती मात्र भांडवादाराच्या मालकीची असते.

**भांडवलदाराची वैशिष्टे :-**

**१. आर्थिक स्वातंत्र्य :-** भांडवाशाही अर्थव्यवस्थेत प्रत्येक व्यक्ती आपल्या इच्छेनुसार व शक्तीनुसार खाजगी संपत्ती प्राप्त करु शकतो, तीचा उपभोग घेवू शकतो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे खाजगी उत्पन्न व खाजगी संपत्ती हे एक ठळक वैशिष्ट म्हणता येईल. स्वत: मिळविलेल्या उत्पन्नाचा स्वत:च्या इच्छेनुसार उपभोग घेणे, बचत करणे आणि संपत्ती नफा करणे हे भांडवावादातील मुलभूत अधिकार होत. भांडवलवादात आर्थिक क्रियांध्ये सरकारचा हस्तक्षेप शक्य तितका कमी असतो. विशेषत: उत्पन्नाच्या क्षेत्रामध्ये खाजगी संघटकांना कशाचे उत्पादन करावयाचे, किती यात्रेत करावयाचे व कोणत्या किंमतीला त्याची विक्री करावयाची अशा निर्णयाबाबत पूर्ण स्वातंत्र्य असते. भांडवाशाही अर्थव्यवस्थेत उत्पादन, व्यापार इत्यादी क्षेत्रांमधील स्वातंत्र्याला महत्त्व दिले जाते.

**२. खाजगी किंवा व्यक्तीगत संपत्ती :-** खाजगी संपत्तीचा वापर व ती मिळविण्याबाबत व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर भांडवलवादात बंधने नसतात. अर्थात या संपत्तीचा वापर लाभ मिळविण्यासाठी केला जातो आणि त्या मध्ये शासनाकडून ढवळाढवळ होत नाही. या व्यवस्थेत उत्तराधिकारी ही अभिप्रेत असल्याने एका व्यक्तीच्या पश्चात तिची संपत्ती तिच्या वारसाकडे जाऊन खाजगीकरण प्रक्रिया चालत राहते.

**३. अनियंत्रीत अर्थव्यवस्था :-** भांडवलशाही अर्थव्यवस्थेत लोकांना आर्थिक व्यवहार करण्याचे पूर्ण स्वातंत्र आहे. त्यामुळे सरकारला लोकांच्या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवता येणे कठीण असते. अशा प्रकारच्या व्यवस्थेत नफ्याच्या उद्देशाने प्रेरित - झालेले उत्पादक महत्तम नफा मिळविण्यासाठी सतत प्रयत्न करतात. समाजाच्या उत्पादन, उपभोग, विनीमय, वितरण इत्यादी व्यवहारांवर सरकारचे नियंत्रण नसते. समाजात विविध वस्तूंची मागणी मोठ्या प्रमाणात केल्या जात असतांना उत्पादनात सातत्याने बदल घडून येतात. लहान-मोठ्या उद्योगांमध्ये नेहमी स्पर्धा दिसून येते. परिणामत: वस्तूच्या मागणी

पुरवठ्यात असंतुलन निर्माण होऊन कधी अती उत्पादन तर कधी न्यून उत्पादन अशी स्थिती निर्माण झालेली असते. अशा प्रकारच्या अनियंत्रीत अर्थव्यवस्थेत मगणी-पुरवठ्यात विसंगती दिसून येते.

**४. मूल्य प्रणाली व नफ्याचे उद्दिष्ट :-** भांडवलवादात उत्पादनाच्या कार्यात केंद्रीय किंवा इतर कोणत्याही सत्तेचा हस्तक्षेप नसून हे कार्य संघटकाच्या निर्णयानुसार चालते उपभोक्त्यांची मागणी आणि उत्पादकांनी केलेला पुरवठा ह्यांच्या मूल्याद्वारे समायोजन घडून येते. बाजार यंत्रणेला मिळालेले हे स्थान भांडवावादाचे एक प्रमुख वैशिष्ट आहे. भांडवाशाही-भांडवावादी पद्धतीत संघाटकाना एकमेव उद्देश महत्तम नफा प्राप्त करण्याचा असतो. त्यामुळे या निर्णयामधून नफा जास्त मिळेल, मग सामाजिक कयाण न झाले तरी चालेल, तेच निर्णय घेतले जातात. उत्पादनाच्या विविध साधनांचे एकत्रीकरणही याच हेतूने केले जाते. परिणामत: या पद्धतीस सामाजिक कल्याणाला फारसे स्थान नसते. महत्तम नफा मिळविणे हे भांडवाशाहीचे उद्दिष्ट होय. प्रत्येक उत्पादक महत्तम नफा मिळविण्यासाठी सतत प्रयत्नशील असतो. उत्पादक नफा मिळविण्यासाठी नवप्रवर्तन करणे, यालाच्या दर्जात सुधारणा करणे, विक्री व्यवस्था, श्रमिकांच्या कार्यक्षमतेत वाढ करणे इत्यादी बाबींवरभर देत असतो. एकूण मालाची विक्री करुन उत्पादन व्यय वजा जाता मिळणारी रक्कम म्हणजे नफा होय आणि नफा हा भांडवाशाहीला / भांडवावादी अर्थव्यवस्थेचा प्राण आहे.

**५. व्यापार चक्र आणि स्पर्धा :-** भांडवाशाही अर्थव्यवस्थेत नेहमी व्यापार चक्राची स्थिती निर्माण होते असे दिसून येते. भांडवावादी समाजव्यवस्थेत तेजी-मंदीचे चक्र सतत चालत राहते. हे चक्र टाळता येणे शक्य नसते. उत्पादक महत्तम नफा मिळविण्यासाठी उत्पादनाच्या परिमाणात वाढ करीत असतो. त्यामुळे वस्तूंच्या किंमती, गुंतवणूक, उत्पन्न, उपभोग, रोजगार, उत्पादन यांत असंतुलन निर्माण होऊन अर्थव्यवस्था तेजी किंवा मंदीकडे वाटचाल करते. कधी अति उत्पादन तर कधी न्यून उत्पादन होऊन मागणी-पुरवठामध्ये मोठ्या प्रमाणात असंतुलन निर्माण होते. अशाप्रकारे भांडवावादात तेजी-मंदीचे व्यापार चक्र सतत निर्माण होते. भांडवाशाहीच्या विकासासाठी स्पर्धा असणे आवश्यक असते. बाजारात वस्तूंची मागणी-पुरवठा या दोन शक्ती प्रभावीपणे कार्य करीत असतात. स्पर्धेच्या स्थितीत क्रेते आणि विक्रेत्यांना पूर्ण -ज्ञान असते. त्यामुळे प्रत्येक खरेदीदार कमी किंमतीत चांगला माल खरेदी करता येईल यासाठी प्रयत्नशील असतो. तर, प्रत्येक विक्रेता आपला माल जास्त किमतीला कसा विकला जाईल या प्रयत्नात असतो. भांडवावादी व्यवस्थेत शोषक-शोषीत वर्ग निर्माण होतात. सामाजिक ऐक्य भंग पावण्याची जास्त शक्यता निर्माण होते.

**६. वर्ग संघर्ष व आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण :-** भांडवाशाही अर्थव्यवस्थेत संपत्तीचे मुठभर लोकांच्या हातात केंद्रीकरण होते व असंख्य श्रमिकांना संपत्तीचा फारा छोटासा भाग मिळतो. भांडवादार वर्ग व मजुर / श्रमिक वर्ग यांच्यात नेहमीच संघर्ष धुमसत असतो. भांडवादार वर्ग मजूरांचे शोषण करुन अतिरीक्त मूल्य मिळवित असतो. मजुर हतबल होतात. त्यांचेवर अन्याय होतो. पोटासाठी अन्याय सहन करीत श्रमिक वर्ग जगत असतो. शोषण आणि शोषीत, मालक आणि मजुर, कारखानदार व श्रमिक / कामगार असे ठळक दोन वर्ग भांडवावादी व्यवस्थेत पडलेले दिसून येतात. श्रमिक वर्ग आपल्या हक्कासाठी, न्यायासाठी

आवाज उठवित असतात. तर, भांडवलदार वर्ग त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करीत असतात. श्रमिक श्रममूल्यासाठी तर, भांडवादार जादा नफ्यासाठी प्रयत्नशील असतो. अशा स्थितीत वर्ग संघर्ष निर्माण होतो. भांडवावादात वर्गसंघर्ष कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष दिसून येते असतो.

भांडवावादात केवळ मूठभर लोकांच्या हातात आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण – झालेले असते. भांडवादारांच्या संपत्तीत सतत वाढ होत असते. उत्पादनाच्या साधनांवर या वर्गाचे प्रभूत्व असल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचा फार थोडा हिस्सा उत्पादन प्रक्रियेतील इतर घटकांना दिला जातो. बाकी उरलेला मोठा हिस्सा भाग मालक वर्ग स्वत:च्या खिशात घालत असतो. या व्यवस्थेत श्रीमंत श्रीमंत होत जातात व समाजात आर्थिक विषमता वाढत जाते. संपत्तीचे केंद्रीकरण मुठभर लोकांच्या हातात होवून बसते.

## ३.२.३ भांडवावादाचे गुण–दोष किंवा फायदे – तोटे (मूल्यमापन) :–

भांडवावादाचे मूल्यमापन करतांना त्याची सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही बाजूंची समीक्षा करणे गरजेचे असते. अर्थात गुण–दोष किंवा फायद्या–तोट्याची चर्चा करावी लागते. अशा विवेचनालाच मूल्यमापन म्हणतात. भांडवावादी व्यवस्थेचे गुण किंवा फायदे पुढीप्रमाणे सांगता येतील.

**गुण किंवा फायदे किंवा लाभ :–**

**१.स्पर्धेचा लाभ व राहणीमानात वाढ :–** भांडवावादात असलेल्या स्पर्धेमुळे जो सर्वात प्रबळ असतो तोच टिकतो. अकार्यक्षम संघटक टिकू शकत नाहीत. त्यामुळे विविध साधनांचे अधिकाधिक कार्यक्षमतेने वितरण होते. पश्चिम युरोपीय देशातील लोकांचे राहणीमान सतत वाढत गेलेले दिसते. अमेरिकेसारखे भांडवावादी राष्ट्र जगात आर्थिकदृष्ट्या व इतर दृष्टीनेही सर्वात प्रबळ म्हणून मानले जाते. ह्या देशांना भांडवावादाचा अवलंब करुन दारिद्र्यातून बाहेर पडणे शक्य झाले.

**२.लवचिकता व प्रगती :–** बदलत्या परिस्थितीनुसार जुळवून घेण्याची क्षमता या पद्धतीने दाखवून दिली आहे. दोन महायुद्धे व जागतिक मंदी अशा पेच प्रसंगातून सुद्धा ही पद्धत टिकून राहिली आहे आणि जुळवून घेत घेत विकसित झाली. व्यक्तीचे स्वातंत्र्य अबाधीत असल्याने आणि नफ्याच्या उद्देशाने या पद्धतीत नव–नवीन वस्तूंचे उत्पादन सतत होत राहते. उत्पादन तंत्र बदलतात. संशोधन तसच प्रवर्तन ह्यांना वाव मिळतो. परिणामत: उत्पादकता वाढून समाजाची प्रगती होत राहते.

**३.व्यक्ती स्वातंत्र्य आणि संसाधनाचे कार्यक्षम वाटप :–** समाजवादामध्ये अर्थात अशा अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक विकास जरी वेगाने होत असला तरी, व्यक्ती स्वातंत्र्याला बळी त्यासाठी दिला जातो. भांडवालवादात मात्र व्यक्तीचे स्वातंत्र्य अबाधीत राहते. उपभोग, उत्पादन, बचत, गुंतवणूक इत्यादींबाबत निर्णय घेऊन ते अंमलात आणणे हे व्यक्तीच्या मनावर अवांबून ठेवले जाते. या पद्धतीत उत्पादनासाठी उपलब्ध असलेल्या संसधानांचे कार्यक्षम रितीने वितरण होते. त्यामुळे उत्पादकतेत वाढ, संपत्तीत वाढ व शेवटी लोकांच्या राहणीमानाच्या स्तरातही वाढ होते. म्हणजे या पद्धतीत सामाजिक कल्याणाचे

उद्दिष्ट स्वीकारलेले नसते किंवा त्या दृष्टीने सरकारचे निर्देशन नसले तरीही ते शेवटी साध्य होते. नियाजनाचा अभाव असूनही या पद्धतीत संसाधनांचे योग्य वितरण आणि लोकांच्या राहणीमानाच्या स्तरात वाढ ही महत्त्वाची उद्दिष्टे साध्य होतात.

**४.परिवर्तनशीलता आणि तांत्रिक प्रगती :–** १८ व्या शतकात भांडवाशाहीचा जन्म होवून ही पद्धती आजही विद्यमान आहे. परंतु, या पद्धतीत तीच्या स्वरुपात मोठा प्रमाणावर बदल झालेले आहेत असे दिसून येते. पूर्वी मजूर किंवा श्रमिक वर्ग संघटित नव्हता. परंतू, आहे. संघटित –झाला आहे. असंघटित श्रमिकांचे शोषण जास्त होते. तर, संघटित श्रमसंघामुळे शोषणाचे प्रमाण बरेच कमी झाले आहे. श्रमिकांची सौदाशक्ती वाढली, कायदे तयार करण्यात आले. भांडवादाराने देखील काळाची लवचिकता ओळखून भांडवल संस्थेत बदल केला. अशाप्रकारे भांडवाशाही अर्थव्यवस्थेत परिवर्तनशीलता हा महत्त्वाचा गुण दिसून येतो. अर्थव्यवस्था गतिमान असते. गतीमान अर्थव्यवस्थेत सतत परिवर्तने होत असतात. उत्पादनाच्या क्षेत्रात आधुनिक तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. बाजारात स्पर्धा असते. स्पर्धेमध्ये टिकाव धरण्यासाठी मालाचा दर्जा सुधारणे आणि उत्पादन व्यय कमी राहिला अशी उत्पादन पद्धती स्वीकारणे आवश्यक असते. त्यासाठी उद्योजक सतत प्रयत्न करीत असतो. स्पर्धेमुळे उत्पादनाच्या रचनेत बदल घडवून आणण्यासाठी तांत्रिक प्रगती घडवून आणणे आवश्यक असते.

**५. जोखीम मोठी, मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि योग्यतेला महत्त्व :–** उत्पादनाच्या प्रक्रियेत उत्पादकांना नेहमी जोखीम स्वीकारावी लागते. त्याचप्रमाणे भांडवाशाहीत उद्याजकांना नेहमीच जोखीम उचलावी लागेल. नेहमी नफा मिळेलच याची खात्री नसते. कारण, सर्व काही झपाट्याने बदलत आहे. अशामध्ये धोका स्वीकारावाच लागतो. जोखीम स्वीकारण्याच धाडस साधा माणूस सहजासहजी करु शकत नाही. जोखीम स्वीकारल्याचा मोबदला म्हणजे नफा असे म्हणता येईल.

भांडवालशाही अर्थव्यवस्थेत नेहमी स्पर्धा अस्तित्वात असते. उद्योगात टिकून राहण्यासाठी प्रत्येक व्यक्ती उत्पादनाच्या स्वरुपात बदल घडवून आणते. अधूनिक उत्पादन पद्धतीचा वापर केल्यामुळे मोठ्या प्रमाणात उत्पादन केले जाते. मोठ्या प्रमाणात उत्पादनापासून अनेक प्रकारचे फायदे मिळतात. उद्योगाचे स्थाननियंत्रण, श्रमविभागणी, साधनसमुग्रीचा महत्तम उपयोग, अधिकाधिक भांडवल निर्मिती, विक्री व्यस्थेची सलभता अशा अनेक बाबींकडे उत्पादक नेहमी लक्ष देतो. त्यामुळे उत्पादन व्यात कपात होऊन आर्थिक फायदा मोठ्या प्रमाणात मिळविता येतो.

भांडवाशाही अर्थव्यवस्थेत उत्पादक आपल्या कौशल्यानुसार उत्पादनात बदल करतो किंवा घडवून आणतो. नव प्रवर्तनाची प्रक्रिया सतत घडत असतांना जे उत्पादक अधिक कार्मक्षम आहेत, त्यांना जास्तीत जास्त लाभ मिळतो. नवनवीन योजना, शोध इ. चा स्वीकार केला जातो. नोकर भरती, जात, धर्म, पंथ, भाषा, क्षेत्र यावरुन न होता कार्मक्षमता, कौशल्य, पात्रता, योग्यता, तत्परता इ. आधारावर होत असते. भांडवावादाने जाती व्यवस्थेला शिथील केले आहे. कुशल व विशेष प्राविण्य असलेल्या श्रमिकांची गतिशीलता वाढाली आहे व

उत्पन्नात भर पडली आहे.

**भांडवलवादाचे दोष / तोटे :-**

**१.सामाजिक कल्याणाकडे दर्लक्ष :-** जेव्हा उत्पादनात मुलभूत हेतू महत्तम नफा मिळविण्याचा असतो तेव्हा सामाजिक कल्याणाची अपेक्षा करणेच चूक असते. ज्या वस्तूंच्या उत्पादनापासून जास्त नफा मिळेल त्याच वस्तूंचे उत्पादन केले जाईल. या आधारावर समाजाला आवश्यक अशा वस्तूंचे उत्पादन जर नफा मिळत नसेल तर केले जाणार नाही. यातून समाजाला आवश्यक वस्तू मिळणार नाही. समाजाला कोंडीत धरले जाते. वस्तूचा तुटवडा झाल्याने किंमती वाढतात. समाजाला कुणी वाली राहत नाही. भांडवाशाहीत सामाजिक कल्याणाची उपेक्षा केल्या जात असल्यामुळे देशातील साधन संपत्तीचा योग्य विनीयोग होत नाही.

**२. आर्थिक विषमता व एकाधिकार निर्माण होतो :-** व्यक्ती स्वातंत्र्य, संपत्तीचा अधिकार वगैरे वेशिष्ट्यांमुळे संपत्तीचे केंद्रीकरण थोड्या व्यक्तींच्या हाती एकवटण्याची प्रवृत्ती भांडवाशाहीत दिसून येते. त्यामुळे आर्थिक विषमता वाढत जाते. यामधूनच समाजात परोपजीवी वर्ग वाढत जातो. केवळ उत्तराधिकारामुळे काही लोक उत्पादनातील लाभ हडप करतात. आर्थिक विषमतेची व शोषणाची वाढ म्हणजे वर्ग संघर्षाला खतपाणी घालणे होय. समाजात श्रीमंत व गरीब, मालक व मजूर, भांडवादार व श्रमिक, शोषक व शोषित असे वर्ग पडतात. श्रीमंत हे श्रीमंत तर गरीब आणखी गरीब होत जातात. या दोन वर्गातीज वैमनस्य शिगेला पोहचले तर, क्रांती निर्माण होण्याची शक्यता वाढते.

स्पर्धा हे जरी भांडवलवादाचे एक अंग असले तरी या स्पर्धेत सबळच टिकतो व गरीब, दुर्बल आपले सर्वस्व गमावून बसतो. भांडवलदारांचा एकाधिकार निर्माण होतो. विविध संघटक आपापल्या उत्पादनाबाबत संयोगाचा अवलंब करून बाजारात एकाधिकार प्रस्थापित करतात. कार्टेल, रिंग, ट्रस्ट वगैरे मक्तेदारीचीच उदाहरणे म्हणून सांगता येतील. एकाधिकार निर्माण झाल्याने हे लोक वस्तूच्या किंमती भरमसाठ वाढवितात व ग्राहकांची पिळवणूक करतात.

**३. आर्थिक संकटे व अपव्य :-** तेजी-मंदीच्या चक्रातून निर्माण होणारी आर्थिक अस्थिरता भांडवालवादाचे अभिन्न अंग आहे. तेजीमध्ये वाढत्या किमतींमुळे तर मंदीमध्ये वाढत्या बेकारीमुळे भांडवलवादी अर्थव्यवस्थेचे अस्थैर्य निर्माण होते. तेजीमध्ये ग्राहकांना फटका बसतो तर मंदीमध्ये उत्पादकांना भांडवावादात उपलब्ध साधनांच्या आपव्ययामुळ अकार्यक्षमतेचा दोष शिरतो. अपव्य होण्याची कारणे अनेक आहेत. अनेक संस्था परस्पर सहकार्य न करता एकाच प्रकारची वस्तू तयार करतात. त्यामुळे जास्तीचे उत्पादन, किंमतीत घसरण, कारखाने बंद पडणे, बेराजगारी इ. परिणाम निर्माण होतात. समान्य माणसाच्या जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनाकडे दुर्लक्ष म्हणजे समाजाच्या संसाधनांचा अपव्यय ठरतो. जाहिरातीवरील खर्च देखील वाया जातो.

**४. एकांगी विकास व शोषण :-** विशिष्ट वस्तूचेच उत्पादन जास्त झाल्याने अर्थव्यवस्थेत त्याच वस्तूंचे उद्योग प्रगत होतील आणि बाकी क्षेत्रे मात्र तशीच राहतील. अशाा प्रकारचा असंतुलीत विकास देशाच्या दृष्टीने कोणत्याच तऱ्हेने फायद्याचा नसतो. या पद्धतीत प्रामुख्याने

उपभोक्ता व श्रमिक वर्गाचे शोषण होते. श्रम ही एक वस्तूच मानली गेल्याने ती कमीत कमी किंमतीत मिळविण्याचा प्रयत्न भांडवलदार करतात. श्रमिकांचे संघटन असले तर, त्यांचे शोषण आणखीनच वाढते. स्त्री व बाल मजूरांना कामावर घेऊन त्यांचा कामाचा मोबदला त्यांच्या सीमांत उत्पादकतेवर दिला जात नाही. स्त्री व बाल मजूरांच्या असहायतेचा गैर फायदा घेऊन भांडवलदार त्यांच्या श्रमावर जास्तीत जास्त अर्थात महत्तम नफा मिळवितात. परंतू, आज स्त्री व बालमजूरांच्या पक्षात कायदे झाल्याने शोषणाचे प्रमाण घटले आहे.

**५. व्यक्ती हित व मुद्रेला अवास्तव महत्त्व :-** भांडवलशाही अर्थव्यवस्थेत प्रत्येक व्यक्ती आपला स्वार्थ पाहते. व्यक्ती हिताचा विचार करतांना समाज हिताकडे दुर्लक्ष केले जाते. व्यक्तीगत हितासाठी समाज हिताचा बळी दिला जातो. अधिक नफ्याच्या हव्यासापोटी निकृष्ट उत्पादन केले जाते. त्याला लोकांवर न्याय परिणाम होइल याचा विचार केला जात नाही. व्यक्ती हिस्सासाठी मानवी मूल्यांचा ऱ्हास होतो व त्याचे गंभीर परिणाम समाजात दिसू लागतात. भांडवाशाहीचा मुलभूत अधार म्हणजे पैसा होय. पैशाला या अर्थव्यवस्थेत अवास्तव महत्त्व प्राप्त झाले आहे. 'सबसे बडा रुपय्या' होवून बसले आहे. पैसा हे साधना ऐवजी साध्य झालेले आहे. पैसा मिळविण्यासाठी वमा मार्गाचा अवलंब करण्यास लोकांना, भांडवादारांना काहीच वावगे वाटत नाही. याचा परिणाम म्हणून भ्रष्टाचार, अपहरण, नैतिक पतन, मिलावट अर्थात भेसळ सारखे गुन्हे वाढत आहेत. भांडवावादी अर्थव्यवस्थेत गारीबांचे जीवन म्हणजेच गुलामगीरीचे जीवन होऊन बसते.

**६. व्यापार चक्र व दारिद्र्यात वाढ :-** भांडवाशाहीत व्यापारचक्र, आर्थिक चक्र अटळ असतात. तेजी-मंदीची भरती-ओहोटी सुरु असते. या व्यापारचक्राने अर्थव्यवस्थेत अस्थिरता निर्माण होते. विकासात अशी चक्रे अडचणी निर्माण करतात. या चक्रात बेरोजगारी वाढते. क्रयशक्ती कमी होते, तेजी किंवा मंदी दोन्ही समाजहितास योग्य नसते. परंतू, भांडवलवादात या गोष्टी टाळणे शक्य नसते. दारिद्र्यात वाढ होते. गरीब हे गरीब होत जातात.

## **३.२.४ समाजवाद** (Socialism) **:-**

**समाजवादाचा अर्थ :-** समाजवाद हे समाजाचे असे आर्थिक संघटन आहे. की, यामध्ये सामान्य आर्थिक योजनेच्या दृष्टीने उत्पादनाची भौतीक साधने संपूर्ण समूदायाच्या मालकीची असतात आणि अशा समाजीकृत नियोजीत उत्पादनाच्या लाभाचे समान आधारावर सर्व नागरिक अधिकारी असतात. - डिफीन्सन

प्रो. वेब्स च्या मते, समाजवाद म्हणजे अशी आर्थिक व्यवस्था होय की, ज्यामध्ये उत्पादनाच्या साधनेवर खाजगी मालकी आणि नियंत्रणाऐवजी संपूर्ण समाजची मालकी व नियंत्रण असते.

प्रो. मॉरिसच्या मतानुसार, समाजवादाची खास वैशिष्टे म्हणजे सर्व मोठे उद्योग व संपूर्ण भूमीवर सार्वानिक-सामूहिक स्वामित्व असले पाहिजे आणि त्याचा उपयोग व्यक्तीगत लाभाऐवजी सार्वानिक हितासाठी केला पाहिजे.

टुगान बॅरानोव्हस्की म्हणतात, समाजवादाचे सारतत्व म्हणजे त्याच्या अंतर्गत समाजातील कोणत्याही व्यक्तीचे शोषण होत नसते. वर्तमान अर्थव्यवस्था ही लाभाच्या प्रेरणेवर आधारलेली

आहे. परंतू समाजवादात सर्वांचे कल्याण साधणे हे उद्दिष्ट असते.

थोडक्यात म्हणजे - सर्वोदय, अंत्योदय, बहुजनहिताय-बहुजन सुखाय, एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ, शेजार धर्म, मानवतावाद, अपरिग्रह अशा मूल्यांचा गुणसमुच्चय समाजवादात अभिप्रेत असतो.

**समाजवादाची वैशिष्टे किंवा लक्षणे :-**

**१. शोषणाचा अभाव :-** वस्तू व सेवांचे उत्पादन आणि वितरण हे सरकारच्या हाती असल्याने अनुचित किंमत जावून समाजवादात होवू शकत नाही तसच श्रमिकांना उत्पत्तीचा खरा निर्यात म्हणून मान्यता दिल्याने त्यांचेही शोषण होणे शक्य नसते. समाजवादात राष्ट्रीय संपत्तीचे मालक, संरक्षण, विश्वस्त म्हणून सर्वच नागरिक असतात. राष्ट्रीय संपत्तीत सामाईक मानवी असते. समाजवादी अर्थव्यवस्थेत उत्पादनाच्या साधनेवर समाजाला मानवी हक्क असतो. समाजाच्या कल्याणासाठीच उपलब्ध साधन संपत्तीचा उपयोग केला जातो. देशात असलेल्य प्रमुख उद्योग, बँका, दळणवळणाच्या व वाहतूकच्या साधनेवर सरकारची मालकी व नियंत्रण असते.

**२. आर्थिक समानता :-** समाजवादी अर्थव्यवस्थेत सरकारची मालकी असल्याने आर्थिक विषमतेला व शोषणाला वाव नसतो. उत्पन्नातील विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न केले जातात. त्या संदर्भात धोरणे, नियम ठरविले जातात. नियोजन, कार्यक्रम आखले जातात. आर्थिक समानता आणण्याला हेतू पुरस्कर प्रयत्न केला जातो. यामुळे आर्थिक विषमता कमी होऊन सामाजिक समस्या प्रस्थापित होते. भांडवावादात या गोष्टींना महत्त्व दिले जाते त्या बाबींना समाजवादात थारा दिला जात नाही. उत्पादनाची साधने सामाजिक मालकीची असल्याने आर्थिक विषमतचे मुळ कारणच नष्ट होत नाही. कार्यक्षमता, गुण, चातुर्य ह्या आधारावर उत्पन्नात असणारी विषमता कायम असते. ही विषमता विकासाला प्रेरणादायीच असते. परंतू, यामध्ये भेदभाव, भ्रष्टाचार, शोषण यावर नियंत्रण असते.

**३. कल्याणाची भावना :-** सामाजिक कल्याण हा समाजवादाचा आधार असतो. सर्व आर्थिक क्रिया या एका उद्दिष्टाला समोर ठेवून केल्या जातात. केवळ नफा प्राप्त करणे हे समाजवादाचे ध्येय नसते. नफ्यातून जनकल्याण साधने हे मुख्य साध्य असते. सर्वोदयाची भावना यात अंर्तभूत आहे. या व्यवस्थेत प्रत्येकाला जीवनाचा, व्यक्तिमत्वाला महत्त्व दिले जाते. समाजवादी विकासाच्या मार्गात किंवा व्यवस्थेत सर्व सदस्यांना त्यांचा धर्म, जात, वंश यांचा विचार न करता सर्वांना विकासाची समान संधी दिली जाते.

**४. नियाजीत अर्थव्यवस्था :-** केंद्रीय सत्तचे नियंत्रण असले तरी, उत्पादनाच्या साधनेची मालकी समाजाची असते व केंद्रीय सत्ता केवळ प्रातिनिधीक असते. त्यामुळे विविध योजना आखणे, त्याची अंमलबजावणी करणे, संसाधनेचे विविध पर्यायी उपयोगांमध्ये विस्तरण करणे वगैरे कार्यासाठी अधिक योजना आखणे आवश्यक असते. त्याशिवाय सामाजिक प्रमत्नांमध्ये सुसूत्रता येणार नाही. म्हणून नियोजीत अर्थव्यवस्था हे समाजवादाचे आवश्यक अंग आहे. देशांतर्गत उत्पादन साधने मर्यादीत असतांना त्यांचा महत्तम उपयोग करुन घेण्यासाठी आर्थिक नियाजन करणे आवश्यक असते. समाजवादी अर्थव्यवस्थेत

आर्थिक नियाजनाचे अत्यंत महत्त्व आहे. नियोजनाचा उपयोग करुन कोणत्या वस्तूचे उत्पादन करावयाचे कोठे व कसे करावयाचे यासंबंधी विचारपूर्वक व चर्चेद्वारा निर्णय घेतले जातात. देशाचा आर्थिक विकास करण्याला हा एक समतोल मार्ग व साधने म्हणता येईल.

**५. समान संधी :–** समाजवादी व्यवस्थेत विकासची समान संधी सर्वांना उपलब्ध असते. या अर्थव्यवस्थेत सर्वांचे कल्याण पात्रतेनुसार अभिप्रेत आहे. कोणताही भेदभाव न करता पात्रता, शिक्षण, कौशल्य इ. आधारावर श्रम विभागणी व आर्थिक मोबदला दिला जातो. प्रत्येकाला विकासाची समान संधी उपलब्ध होत असल्यामुळे समाजाचा जलद गतीने विकास घडून येतो. जात, धर्म, पंथ, क्षेत्र, श्रेष्ठ, कनिष्ठ, शिक्षित, अशिक्षित, लिंग असा भेदभाव न करता त्यांची पात्रता पाहिली जाते. त्यामुळे नागरिकांमध्ये देखील वैमनस्यांची भावना निर्माण होत नाही. राष्ट्रीय एकात्मतेची ही भावना पोषक वाटते.

**६. संघर्ष विहिन समाज :–** मालक–मजूर, शोषक–शोषित अशी वर्गवारी समाजवादी अर्थव्यवस्थेत नसल्याने वर्ग संघर्ष होण्याची शक्यता नसते. त्यामुळे समाजात शांतता व सुव्यवस्था नांदत असते. न्यूनगंडाची भावना राहत नाही. राष्ट्रीय एकतेची भावना विकसित होते. आर्थिक विषमतेला समाजवादात स्थान नाही. पात्रतेनुसार कमवा व सुखात रहा. माझ्याप्रती भेदभाव झाला असे कुणाच्याही मनात येत नाही. पात्रता वाढविण्यास पूर्ण संधी असते. वर्ग संघर्ष निर्माण होत नाही. समाजवाद म्हणजे संघर्ष विरहित समाज व्यवस्था होय.

**समाजवादी अर्थव्यवस्थेचे गुण/लाभ/फायदे/सकारात्मक बाजू :–**

**१. शिघ्रगामी विकास :–** ऐतिहासिक अनुभवांवरुन असे म्हणता येईल की, समाजवादी अर्थव्यवस्थांना आर्थिक विकासाचे उद्दिष्ट भांडवावादी अर्थव्यवस्थेपेक्षा लवकर गाठणे शक्य होते. कारण आर्थिक नियोजनामुळे विविध उद्दिष्टे निश्चित कालावधीत कसे गाठावयाचे याची पूर्व योजना पद्धतीशीरपणे, विचारपूर्वक आखली जाते. नियोजनामुळे वेळ, श्रम, पैसा, साधने यांचा अपव्य होत नाही. मुलभूत औद्योगीकरणासाठी पाश्चिमात्य राष्ट्रांना २५ ते ३० वर्षे लागली. परंतु, युरोपच्या समाजवादी देशांनी मात्र हाच विकास १२ ते २० वर्षात साध्य केला. १८३८ मध्ये युरोपीय समाजवादी देशांचा जागतिक औद्योगीक उत्पादनात ९० % पेक्षा कमी असलेला हिस्सा १९७० पर्यंत ३०% झाला. राष्ट्रीय उत्पन्न ८% वेगाने वाढले. १९१७ नंतरच्या काळात रशियाने विस्मयकारक प्रगती करुन अमेरिकेच्या बरोबरीने स्थान मिळविले.

**२. समाजहिताला प्राधान्य व आर्थिक समानता :–** समाजवादी अर्थव्यवस्थेत व्यक्ती हिताला प्राधान्य देण्याऐवाजी समाजहिताला प्राधान्य दिले जाते. समाजवादी समाज रचना स्थापण्यासाठी सर्वांनाच योग्य सोयी पुरविल्या जातात. समाजाचे महत्तम हित या व्यवस्थेत लक्षात घेतले जाते. सर्वोदय हा समाजवादी व्यवस्थेचा गाभा असतो. समाजवादात आर्थिक समानता स्थान करणे हे उद्देश असतांना राष्ट्रीय उत्पन्न समानतेने वितरित केले जाते. त्यामुळे कुणाच्याच हातात संपत्तीचे अधिक केंद्रीकरण होत नाही. श्रीमंत–गरीब अशी श्रेणी रचनेतील भेदभाव केला जात नाही. आर्थिक विषमता कमी करुन सामाजिक समता प्रस्थापित होते. स्थानिक समतेसाठी आर्थिक विषमता कमी करणे आवश्यक असते.

**३. शोषणमुक्त समाज :–** समाजवादी पद्धतीत उपभोक्त्याचे किंवा श्रमिकांचे शोषण

होण्याचे कारण उद्‌भवत नाही, कारण समाजवादी दृष्टीकोन नफ्यापेक्षा समाज कल्याणावरच केंद्रीत झालेला असतो. वस्तूच्या किंमती रास्त ठेवल्या जातात. चैनीच्या वस्तूंचे उत्पादन कमी केले जाते. आवश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवण्यासाठी गरज पडल्यास सरकार नुकसानही सहन करते. परिरणमत: लोकांचे उपभोक्ता म्हणून शोषण होत नाही. समाजहिताच्या दृष्टीने कोण्त्या वस्तूंचे उत्पादन करावयाचे आहे ? किती प्रमाणात उत्पादन करावयाचे आहे? उत्पादन कुठे करावयाचे आहे? उत्पादनाचे वितरण कसे करावयाचे आहे? इत्यादी बाबत तज्ज्ञ समितीद्वारे सरकार ठरवित असल्याने तेजी-मंदीच्या चक्रापासून राष्ट्राचे, जनतेचे रक्षण करण्याला प्रयत्न समाजवादी व्यवस्थेत केला जातो. श्रमाचे मूल्य अगोदरच निश्‍चित केले जाते. त्यामुळे व्यवहारात पारदर्शकता येवून शोषणाला आळा घातला जातो.

**४.समानसंधी व वर्ग संघर्षाला पायबंद :-** समाजवादी अर्थव्यवस्थेत सर्वांना समान संधी दिली जाते. हे या व्यवस्थेचे खास वैशिष्ट म्हणता येईल. येथे देश, राष्ट्र, समाज इ. चा विकास हाच विचार प्रमुख असतो. त्यामुळे लिंग, जात, धर्म, वंश, भाषा, प्रांत, ग्रामीण-शहरी असा निकष लावला जात नाही. ज्ञान, चातुर्य, योग्यता, कर्तव्य परायणता, क्षमता माल गुणांना नोकर भरतीत प्रधान्य दिले जाते. आई-भतीजा वादाला येथे स्थान नसते. प्रत्येकाला विकासाची संधी उपलब्ध असते. त्यामुळे समाजाला जलदगतीने विकास होतो. समाजवादी अर्थव्यवस्थेत मालक-नोकर, कारखानदार-कामगार, शोषक-शोषीत असे वर्ग व वर्गसंघर्ष आढळत नाही. 'एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ' हा समाजवादाचा आत्मा असतो. समान वितरणाने भेदभाव उरत नाही. आपोआपा वर्गसंघर्षाला पायबंद घातला जातो.

**५. नियोजनपूर्वक निर्णय व केंद्रीय सत्तेचे महत्त्व :-** विविण वस्तचे उत्पादन खाजगी व्यक्तीच्या निर्णयानुसार न होता सरकारने आखलेल्या योजनेप्रमाणे होते. अशी योजना तयार करतांना वर्तमान व भावी मागणीचा विचार केला जातो. समाजवादात उद्योगाचे अनावश्यक केंद्रीकरण टाळो जाऊन सर्व क्षेत्राच्या समान विकासाकडे लक्ष देणे शक्य होते. समाजवादी अर्थव्यवस्थेत सार्वानिक सत्ता सर्व शक्तीमान असते. देशातील एकंदर आर्थिक व्यवहाराबाबत निर्णय घेणे आणि त्याची अंमलबजावणी करणे अशी दुहेरी भूमिका सार्वानिक सत्तेला पार पाडावी लागते. देशाचे सरकार संपूर्ण अर्थव्यवस्थेचे साधन करीत असल्याने समाजाच्या हिताला धोका पोहात नाही. सार्वानिक सत्तेद्वारे घेतले जाणारे निणर्य समाजहिताच्या दृष्टीने योग्य असल्याने समाजाला सरकारवर विश्वास वाढत जातो व त्यातून देश बळकट बनतो. राष्ट्रीय एकात्मता वाढते. देशाभिमान बळावतो. देशाचा इतर देशांवर प्रभाव पडतो.

**समाजवादाचे दोष / तोटे / नकारात्मक बाजू :-**

**१. वैयक्तिक स्वांतत्र्याला विचार :-** समाजवादी अर्थव्यस्थेत उत्पादनाच्या साधनोंवर सरकारची मालकी आणि नियंत्रण असते. अशा स्थितीत व्यक्तीगत स्वातंत्र्यावर मर्यादा पडतात. व्यक्ती स्वातंत्र्य संपूष्टात आल्यामुळे अधिकाधिक संपत्ती मिळविणे, भांडवालाची उभारणी, गुंतवणूक, खरेदी-विक्री इत्यादींबाबत कोणतेही निर्णय व्यक्ती स्वत: घेऊ शकत नाही. त्यामुळे त्या त्या चातुर्य, कौशल्य आणि कार्यक्षमतेचा पुरेसा विकास करण्यास वाव

मिळत नाही. सर्व आर्थिक निणय सरकार घेत असतांना सामाजिक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेले जातात. यातून व्यक्तिमत्वाच्या विकासाला खीळ असते. यातून प्रेरणा मिळत नाही. संतुलित व्यक्तित्वाचा विकास होत नाही. मनुष्यालच्या मानव म्हणून इच्छा–आंकाक्षांचा चुराडा होतो. मनुष्य एक इच्छारहित, भावनाहिन, यंत्रक्त जीवंत प्रेत बनून राहते. उपभोक्ता म्हणून किंवा एक व्यक्ती म्हणूनही समाजवादात लोकांना पुरेसे स्वातंत्र्य नसते. जे उत्पादन केले जाते त्यातूना त्याला निवड करावी लागते. स्वतंत्र व्ययवसाय करण्याचे स्वातंत्र्य व खाजगी मालमत्तेचा अधिकार देखील त्यांना नसतो. स्वातंत्र्याला पूर्ण अभाव व्यक्तीच्या विकासाच्या दृष्टीने योग्य म्हणता येणार नाही.

**२.प्रेरणा व नाविन्याचा अभाव :–** समाजवादात अधिक नफा मिळविणे हा हेतू नसतो तर, महत्तम सामाजिक हित साधने हा असतो. उत्पादनावर मिळालेल्या नफ्याचे सामाजिकरण केले जाते. वस्तूचे उत्पादन आणि वितरण व्यक्तीगत हितासाठी उपयोगात आणले जात नाही. त्यामुळे लोकांसमोर आर्थिक प्रेरणा नसते. उत्पादन प्रक्रियेत प्रेरणांचा अभाव असतांना उत्पादनाच्या रचनेत बदल घडून येणे शक्य नसते. समान उत्पादन समान वितरण यामुळे त्यामध्ये कुठाच नाविन्य नसते. जीवन रटाळ व कंटाळवाणे बनते. उत्साह, आनंद इ. बाबींना मर्यादा पडतात. मनोवैज्ञानिक दृष्टीने अशा बाबी देशाच्या भावी विकासाला मारक बनू शकतात. या ठिकाणी कार्यामध्ये लाभाचे उद्दिष्ट असते तेथे ते कार्य अणिक कार्मक्षमतेने व मन:पूर्वक केले जाते. परंतू, समाजवादात यात्र उत्पन्नाचे एकूणच कार्य नोकर वर्गाच्या हाती असल्याने त्यामागे प्रेरणांचा अभावा दिसून येतो. उत्पादन वाढो काय किंवा कमी झाले काय याची काळजी व्यक्ती करीत नाही. कारण समाजवादात त्यांच्या गरजा पूर्ण होणाऱ्या असतात. त्यामुळे मनुष्य  कामचुकार, आळशी बनतो. अशी संख्या वाढली तर, एकूण उत्पादनावर त्याचा वाईट परिणाम पडू शकतो. ही बाब भविष्यात अनेक धोके निर्माण करणारी असते. समाजवादी रशियाची आर्थिक स्थिती याच कारणामुळे दुबळी झाली. तेथे समाजवादी व्यवस्था अयशस्वी झाली. समाजवादी अर्थव्यवस्थेत लोकांच्या ठिकाणी एक प्रकारची उदासिनता दिसून येते.

**३. नोकरशाहीवर अति विश्वास धोक्याचा असतो :–** नोकरशाहीच्या अकार्मक्षमतेमुळे वस्तूचे उत्पादन व्यय जास्त येते. उपभोक्त्याला त्यची झळ सहन करावी लागते. यामध्ये नोकरशाही ध्येयनिष्ठ, प्रामाणिक राहिल याची शाश्वती कशी देता येईल. समाजवादात नोकरशाही प्रतिनिधी किंवा सरकारच्या वतीने कर्य करते. नोकरशाही, निर्णायक मंडळ, लोक प्रतिनिधी इ. समाजव्यवस्थेत समाजाचे विश्वस्त असतात. परंतू, सर्वच विश्वस्त एक सारखे राहतील असे म्हणता येते नाही. यात उलट स्वार्थी, नाकर्ते अधिकारी जास्त झाले तर, समाजवादी अर्थव्यवस्थेच पोखरु लागतात. रशियाचे आपल्यासमोर हे ताजे उदाहरण आहे. भारतातही पब्लिक सेक्टर तोटात गेले. सरकारी शाळांचे, कार्यालयांचे, महामंडळाचे, जिहा नागरिक बँकांचे, सहकारी बँकांचे त धिंडवडे निघाले व निघत आहे तेही आपल्या डोळ्यासमोर आहेत. त्यामुळे समाजवादी अर्थव्यवस्था हा अंतिम व उत्तम पर्याय मानता येणार नाही.

**४. प्रच्छन्न हुकूमशाही :–** स्पर्धेच्या अभावी वैयक्तिक अधिकारात जसे दोष निर्माण होतात तसच राज्याच्या एकाधिकारातही होऊ शकतात. विशेष म्हणजे असे दोष निर्माण झाले

तरी, सामान्य लोक त्या विरुद्ध काही करु शकत नाहीत, कारण एकाधिकार हा राज्याचा असतो. समाजवादात व्यक्तीला जसे उत्पादनाचे स्वातंत्र्य नसले तरी, सरकाराचा एकाधिकार असतो. काही विचारवंतांच्या मते, समाजवादी अर्थव्यवस्था लोकशाही तत्वांवर अवांबून असतांना, व्यक्तीमत्वाला महत्त्व नसते, देशातील आर्थक सत्तेचे युग केंद्रीय सत्तेच्या हातात असल्याने केंद्रीय सत्तेची हुकूमशाही निर्माण होते. सरकारची हुकूमशाही निर्माण होऊन जनतेच्या अपेक्षा नेहमी पूर्ण केल्या जातात असे नाही. कधी-कधी तर, जनतेला मान्य नसलेले धोरण स्वीकारावे लागते. म्हणजे एक प्रकारे सामान्य जनतेवर जुलूम-जबरदस्ती होण्याची दाट शक्यता असते.

**५. उपभोक्त्याला महत्त्व नसते :-** समाजवादात उपभोक्त्याच्या आवडी-निवडी, फॅशन, व्यक्तीची अपेक्षा, भावना, संवेदना, इच्छा इत्यादींचा विचार केला जात नाही. परितर्वतनाचा अडथळा निर्माण होतो. समाज स्थिर व बधीर होत जातो. विकासाची गती मंदावते. सामाजिक गतिशीलता शिथील होत जाते. चैतन्य, उत्साह, धडाडी इ. गोष्टींना प्रेरणा मिळत नाही. सरकार आपल्या निर्णयानुसार वस्तूंचे उत्पादन करीत असते. उपभोक्त्याच्या सार्वभौमत्वाला स्थान नसल्याने उत्पादन रचनेत बदल होत नाही तसच ते रटाळ जीवन चालू राहते. समाजाला मरगळ यायला लागते. दुसऱ्या बाजूने लोकांच्या आवडीच्या वस्तूंची विदेशातून चोरटी आयात वाढते. देशाचा पैसा विदेशात जातो. देशाचे आर्थिक नुकसान होते. समाजवादात स्पर्धोंचाा अभाव असल्याने एकाधिकार निर्माण होतो. सरकारच्या या एकाधिकाराचे दुष्परिणाम भोगावे लागते. सरकारचे निर्णय चुकीचे असल्यास त्याचा गंभीर परिणाम समाजाला भोगावा लागतो.

**रशिया :-** १९२८ ते १९८८ या काळात सोव्हिएत रशियात लोकशाही घाटणीचा साम्यवाद नव्हता तर, बोरेव्हिक कम्यूनिस्ट पक्षाची (क्रूर) हुकूमशाही होती. मोठाले उद्योग उभे करण्यासाठी लावलेल्या मजूरांना अर्धपोटी ठेवून जेमतेम जगण्यापुरता शिधा दिला गेला. गुंतवणूकीसाठी लागणारी ही बचत होय असे त्याचे गोंडस नाव होते. कृषीक्षेत्रात कृषीभूमीचे सामूहिकीकरण (सहकार नव्हे) केले गेले. स्टालिनच्या काळापासून शेती दर्लक्षीत राहिली. शेतीचा दर्जा व उत्पादन घटले. प्रत्यक्ष कसणाऱ्याला कोणतेही स्वांत्र्य नव्हते. शासकीय अधिकारी जे सांगतील ते पेरणे त्यांना भाग पडत होते. त्यांचा त्यात पूर्ण हस्तक्षेप होता. जमीनीचा कस आणि क्षमता लक्षात न घेता ठराविक पिके घेण्याला ते हुकूम सोडीत. परिणामी अन्नधान्याची तीव्र टंचाई असे. ती घााविण्यासाठी आयातीवर विसंबून रहावे लागे. त्यापायी तेल निर्यात करुन विदेशी चलन पैदा करावे लागे. घराची तीव्र टंचाई होती. एका अपार्टमेंटमध्ये बऱ्याच कुटूंबाना रहावे लागे. एका कुटूंबाचा एकच खोली वाट्यास येईल. विदेशी चलन अन्नधान्याचा आयातीवर वेचावे लागल्याने उद्योगांद्यास लागणारी यंत्रसामुग्री व तंत्रज्ञान मिळविणे कठीण झाले. अस्तित्वातची यंत्रसामुग्री जुनी, मोडकळीस येऊ लागली म्हणून उत्पादन क्षमता घटली होती. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाकडे पहिल्यापासूनच दुर्लक्ष केले गेले होते. त्यामुळे अनेक उपभोग्य वस्तूंचा तुटवडा होता. त्या मिळविण्यासाठी बराच काळ रांगेत तिष्ठत उभे रहावे लागे. तरही वस्तू मिळेल याची शाश्वती नव्हती. उत्पादनाचे लक्ष ठरवून दिले जाई. हे लक्ष गाठले गेले नाही तर शिक्षा ठरलेली होती. उत्पादनाचा लागणारा

कच्चा माल दुसऱ्या कारखान्यातून मिळवायचा तर तिथल्या प्रशासनाला काही प्रलोभने दाखवावी लागत प्रशासनांची अरेरावी आणि लाचखोरी या रितीने शिगेला पोहोचली होती. अर्थव्यवस्था ढासळायला लागली होती. राजकीय हस्तक्षेप, नोकरशाहीची पकड व लाचखोरी अर्थव्यवस्थेची तिरडी बांधण्यास जबाबदार ठरली.

यातून सुटका करण्यासाठी १९८८ मध्ये राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या मिरवाईल गोर्बाचेव यांनी उद्योगधंद्यांना निर्णय स्वातंत्र्य बहाल केले. सरकारी उद्योगधंद्यांना उत्पादन खर्च व कर वजा जातो उरलेल्या पैशावर व्यक्ती स्वातंत्र्य दिले. त्यातून नवीन गुंतवणूक करण्यास, मजूरांना बोनस देण्यास, सामाजिक सोयी उपलब्ध करण्यास मुभा दिली. घसारा निधी त्याच उद्योगधंद्यातील गुंतवणूकीसाठी वापरता येऊ लागला. बँकेकडून कर्ज घेण्यास परवानगी मिळाली. समाजव्यवस्थेत खुलेपणा आणि परितवर्तन आणणरी बोर्बाचेव यांनी क्रांती घडवून आणली. १९९१ मध्ये रशियात उदारमतवादी सरकार आले. प्रवास, अभिव्यक्ती, बिनसरकारी संस्थांची स्थापना, व्यापार, खााजगी उद्योगांद्यांची उभारणी यांचे स्वातंत्र्य मिळाले. शिथीलीकरणाकडे रशिया झुकला आहे. साम्यवादाने समाज सुखी होतो हे समाजवाद्याचे म्हणणे खोटे ठरले.

## ३.२.५ मिश्र अर्थव्यवस्था ( ) :-

भांडवलवाद व समाजवाद सुवर्णमध्य गाठणारी मिश्र अर्थव्यवस्था होय. दोन्ही पद्धतीचे गुण कायम ठेवून दोष तेवढे टाळण्याचा प्रयत्न या अर्थव्यवस्थेत केला आहे. मिश्र अर्थव्यवस्थेत भांडवलवादामधील मक्तेदारीचे प्राबल्य टाळले जाते तसच सरकारचा अनिर्बंध हस्तक्षेपही टाळला जातो. मुक्त वातावरण, वैयक्तिक स्वातंत्र्य, खाजगी उत्पादन, नफ्याची प्रेरणा ह्या गोष्टींना सरकारचे प्रभावी नियंत्रण, उत्पादनात सरकारचा सहभाग इत्यादी तत्वांची जोड दिली जाते. एका बाजूला भांडवलशाहीचे दोष दाखविणे आणि दुसऱ्या बाजूला समाजवादातील मात्यांतिकतेला विराध करणे या प्रो. किन्सच्या भूमिकेत आजच्या मिश्र अर्थव्यवस्थेचा संदर्भ सापडतो. भांडवलवाद व समाजवाद या दोन्ही पद्धतीतीप चांगली तत्वे घेऊन विकास-प्रक्रिया सुरु केली गेली. या नवीन रचनेचे तत्व 'मिश्र अर्थव्यवस्था' असे आहे.

भांडवलशाही व समाजवादी या दोन्ही अर्थव्यवस्थेत दोष दिसून आले तेव्हा या दोन्ही अर्थव्यवस्थेतील दोष सारुन नवीन अर्थव्यवस्था स्वीकारण ही संकपना पुढे आली आणि त्यातूनच मिश्र अर्थव्यवस्था जन्माला आली. तिला संमिश्र अर्थव्यवस्था असे म्हणतात. भांडवलशाही आणि समाजवादी अर्थव्यवस्था ह्या दोन टोकाच्या अर्थव्यवस्था आहेत. ह्या दोन्ही अर्थव्यवस्थेतीा गुणांाा योग्म सफन्वम साानून मिश्र अर्थव्यवस्था तयार करण्यात आली. भांडवलवादातील व्यक्ती स्वातंत्र्य आणि समाजवादातीला समता व सामाजिक नियंत्रण यांचे एकत्रीकरण करण्यात आले. मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वानिक क्षेत्र, खाजगी क्षेत्र आणि संयुक्त क्षेत्र सुद्धा विद्यमान असतात.

सार्वजनिक क्षेत्रावर सरकारची मालकी आणि नियंत्रण असते. या क्षेत्रातील वस्तूंच्या उत्पादनावर व वितरणावर सरकारचे नियंत्रण असते. खाजगी क्षेत्रातील उद्योगांवर व्यक्तीची आणि व्यक्ती समूहाची मालकी आणि नियंत्रण असते. त्यात सरकारचा हस्तक्षेप नसतो. संयुक्त क्षेत्र म्हणजे असे क्षेत्र की, त्या क्षेत्रात सरकार आणि व्यक्तीगत स्वरुपाची मालकी

आणि नियंत्रण असते. या क्षेत्रातील वस्तूंच्या उत्पादनावर संस्थांमध्ये सरकारचे भाग भांडवल अर्ध्यापेक्षा जास्त असते. लोकशाही नियोजनात अंतिम निर्णय जनतेच्या हाती असतात. उद्दिष्टे, लक्ष व पद्धती याबाबत तज्ज्ञांचा सल्ला घेतला जातो. परंतू, योजनेला शेवटी लोकप्रतिनिधींची संमती आवश्यक असते. व्यक्ती स्वातंत्र्य कायम ठेवून योजना राबविण्याचा अशा प्रकारच्या नियोजनात प्रयत्न असतो. यासाठी उत्तेजनात्मक तंत्राचा अधिक महत्त्व दिले जाते. अगदी आवश्यक तेवढी नियंत्रणे जनतेवर लादली जातात. अशाप्रकारच्या नियोजनामुळे अर्थव्यवस्थेत सार्वानिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्र, अशी दोन क्षेत्र निर्माण होतात. सार्वानिक क्षेत्रात आदेशात्मक तंत्र आणि खाजगी क्षेत्रात उत्तोनात्मक तंत्राचा वापर करण्यात येतो. अशा अर्थव्यवस्थोला मिश्र अर्थव्यवस्था असे म्हणतात.

**मिश्र अर्थव्यवस्थेची वैशिष्टे :-**

**१.खाजगी आणि सार्वानिक क्षेत्रांचे सह अस्तित्व :-**

मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्र आणि सार्वानिक क्षेत्र विद्यमान असतात. देश हिताचा विचार करुन शस्त्रास्त्र, दारुगोळा, विद्युत आणि अणूउर्जा, लोह-पालाद, विमान व वाहतूक इत्यादी उद्योगांवर सार्वानिक क्षेत्राची मालकी व नियंत्रण असते. तर, लघू उद्योग, कुटीर उद्योग, कृषी यासारखे उद्योग खाजगी क्षेत्रात असणे फायदेशीर असते. खाजगी क्षेत्रात व्यक्तीगत साहसाला आणि उपक्रमाला वाव मिळतो. या अर्थव्यवस्थेत दोन क्षेत्र एकाच वेळी कार्यरत असतात. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने असणारे खाजगी व सार्वानिक क्षेत्राचे महत्त्व या रचनेने मान्य केले आहे व त्यांच्यामध्ये सुयोग्य संतुलन साधण्याचा प्रयत्न केली जातो. केवळ खाजगी क्षेत्र असल्यास एकाधिकार निर्माण होण्याची शक्यता निर्माण होते तसेच समस्त उद्योग सार्वानिक क्षेत्रात ठेवल्यास नोकरशाहीचे दोष अर्थव्यवस्थेत शिरतात. म्हणून ही तडजोड आहे. ह्या दोन क्षेत्रामध्ये अंतर्विरोध नसतो. हे महत्त्वाचे आहे. उलट दोन्ही क्षेत्रे परस्पर सहकार्याने विकीत होतात. भारतीय नियोजनकारांनी म्हटल्याप्रमाणे सार्वानिक आणि खाजगी क्षेत्र हे दोन वेगळे घटक नाहीतच किंबहूना ते एकाच यंत्रणेचे दोन भाग आहेत. जर यंत्रणा सुरळीत चालू रहावयाची असल तर, ह्या दोन क्षेत्रांमध्ये परस्पर वैमनस्याऐवजी सहकार्य असणे आवश्यक आहे. मिश्र व्यवस्थेत उत्पादन क्षेत्राचे अशा प्रकारे विविध वर्गीकरण सहेतूकपणे करण्यात येते. सार्वानिक क्षेत्राद्वारे अर्थव्यवस्थेतील मलभूत व दीर्घकालीन स्वरुपाची गुंतवणूक पूर्ण केली जाते. सामान्य लोकांना आवश्यक अशा वस्तूंचे उत्पादन करणे हे सुद्धा या क्षेत्राचेच काम असते. मिश्र अर्थव्यवस्थचे ध्येय कल्याणकारी राज्याचे असल्याने सर्वसामान्य जनतेच्या कल्याणाकडे त्यात दुर्लक्ष व्हायला नको इतर उत्पादनात मात्र खाजगी संघटनांना वाव देण्यात येतो. बाजार यंत्रणेच्या कार्य सामान्यत: हस्तक्षेपाशिवाय चालते. मिश्र अर्थव्यवस्थेत सामाजीक गरजांना अनुसरुन सार्वानिक क्षेत्राची भूमिका प्रागतीक आणि महत्त्वपूर्ण राहील तर खाजगी क्षेत्राची उपयुक्तता मान्य करुन अंतीम उद्दिष्टे व अर्थव्यवस्थेची खाजगी क्षेत्राची उपयुक्तता मान्य करुन अंतिम उद्दिष्टे व अर्थव्यवस्थेची घडण विचारात घेऊन खाजगी विभागाला नवीन स्वरुप प्रदान करण्यात येते.

**२. उपभोक्त्याचे महत्त्व :-**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उपभोक्त्यांच्या उपभोगावर कोणत्याच मर्यादा नसतात.

ग्राहकांच्या इच्छा, आवड, गरजा, फॅशन, कल इ. बाबी लक्षात घेऊनच भांडवादार वस्तूचे उत्पादन करतो. परंतू, मिश्र अर्थव्यवस्थेत उपभोक्ता हा सार्वभौम असला तरी, त्यांचा सामाजिक, आर्थिक, आरोग्यविषयक बाबी लक्षात घेऊन नशेच्या उत्पादनावर व उपभोगावर नियंत्रण केले जाते. उपभोक्त्याचे महत्त्व मिश्र व्यवस्थेत लक्षात घेतले जाते. भांडलवादात उत्तेजनावर भर असतो. तर, समाजवादाचा आदेशावर भर असतो. परंतू, मिश्र अर्थव्यवस्थेत भांडवलवाद व समाजवाद यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जातो. मिश्र अर्थव्यवस्थेत नियोजन तयार केले जात असले तरी, ते समाजवादी नियाजनाप्रमाणे नसतात. यामध्ये काही क्षेत्रात आदेशात्मक तर काही क्षेत्रात उत्तेजनात्मक नियोजनाचा उपयोग करुन देशाचा आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो.

**३. राष्ट्रीय उत्पन्नाचे योग्य वाटप :–**

मिश्र अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्नाचे समान आणि आवश्यकता लक्षात घेऊन वितरण होइल या दृष्टीने शासनाकडून नियम तयार केले जातात. श्रीमंताच्या उत्पन्नावर अधिक कर लावून त्या पैशातून समाजलतील दुबली घटकांसाठी सोयी पुरविल्या जातात. या पद्धतीद्वारा लोकाचे जीवनमान उंचाविण्याचा प्रयत्न केला जातो.

**४. सहकारी चळवळींना प्रोत्साहन :–**

मिश्र अर्थव्यवस्थेत सहकाराच्या तत्वानुसार सहकारी चळवळी उभारल्या जातात. खाजगी क्षेत्रात स्पर्धा दिसून येते. तर, सार्वानिक क्षेत्रात स्पर्धेचा अभाव असतो. खाजगी क्षेत्रात व्यक्ती हिताची उपेक्षा सिद्ध होत असेल तर, सरकार हस्तक्षेप करते. या दोन्ही प्रकारच्या क्षेत्रात सहकारवादाला विशेष महत्त्व असते. एकमेकांच्या व परस्परपुरक उत्पादन, उद्योग, वितरण इत्यादी प्रक्रिया होत असल्यामुळे सहकारी क्षेत्राचा विकास होऊन सहकार्याची भावना वाढीला लागते. मिश्र व्यवस्थेत एकाधिकारावर नियंत्रण ठेवले जाते. शोषणावर प्रतिबध घातला जातो. सहकारी चळवळ, उपक्रम, उद्योग यांना प्रोत्साहन दिले जाते. मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी व सार्वानिक विभागाप्रमाणच संयुक्त विभागही असू शकतो.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. केंद्रस्थानी राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यात आले. या राष्ट्रीय सरकारमध्ये उद्योगमंत्री डॉ. शामाप्रसाद मुखर्जी होते. त्यांनी १९४८ साली जाहिर झालेल्या औद्योगीक धोरणात भारतातील उद्योगधंदे 'अ', 'ब' व 'क' अशा तीन गटात विभागले. या धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत सार्वानिक क्षेत्र, संयुक्त क्षेत्र आणि खाजगी क्षेत्र निर्माण झाले आणि तेव्हापासून भारताची अर्थव्यवस्था सार्वानिक क्षेत्राला महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते. एकच बाजुला आर्थिक संरचनेत बदल घडवून आणणे आणि तीला विकसीत करणे तर, दुसऱ्या बाजूला बचत, भांडवलनिर्मिती, गुंतवणक पातळीत वृद्धी घडवून आणणे आणि आर्थिक विकासाची गती वाढविणे आवश्यक असते. यासाठी मिश्र अर्थव्यवस्थेत आर्थिक नियोजनाचा विशेष महत्त्व दिले जाते.

## मिश्र अर्थव्यवस्थचे लाभ / फायदे / गुण / सकारात्मक बाजू :–

**१.भांडवलवादी व समाजवादी अर्थव्यवस्थेचे संतुलन साधले गेले :–**

भांडवलवादी व समाजवादी अर्थव्यवस्था पूर्णत: उत्तम, दोषरहित नाहीत. तेव्हा या दोन्ही पद्धतींचे दोष टाळून व जास्तीत जास्त गुण स्वीकारुन मिश्र अर्थव्यवस्थेचा मार्ग व दृष्टीकोन स्वीकारला आहे. त्यामुळे जास्तीत जास्त समाजकल्याण व विकास साधणे शक्य होते. भांडवलवादी आणि समाजवादी या दोन्ही पद्धतीतील महत्त्वाचे गुण मिश्र अर्थव्यवस्थेत अशारितीने एकत्रित होतात की, त्यामुळे कोणत्याही प्रकारची आत्यंतिकता टाळली जाऊन अर्थव्यवस्थेचा फायदा होतो.

**२. सह अस्तित्वातून भांडवल निर्मिती :–**

विकसनशील देशात आर्थिक विकास वेगाने होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गरज भासते. एवढा मोठ्या प्रमाणात भांडवल (चल–अचल) एकट्या सरकारद्वारे किंवा नुसत्या खाजगी व्यक्तींना शक्य नसते. मिश्र अर्थव्यवस्थेतील सार्वानिक व खाजगी क्षेत्रांच्या सह अस्तित्वामुळे व सहकार्यामुळे मोठ्या स्तरावर भांडवल निर्मिती केली जाऊ शकते तसेच एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ हे तत्व अंमलात आणयाने सामाजिक स्थैर्याला व कल्याणाला बळ मिळते.

**३. शासनाचे कमी हस्तक्षेप :–**

समाजवादात सरकारला व्यक्तीच्या जीवनातील हस्तक्षेप अतिरेकी असतो. तो टाळून मिश्र अर्थव्यवस्थेत स्वातंत्र्य, खाजगी संपत्तीचा अधिकार इत्यादी तत्वे पर्याप्त प्रमाणात समाविष्ट असतात. परंतू, सामाजिक हित हे सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट असल्याने इतर गोष्टी त्याच्या आड येणार नाहीत याची दक्षता घेतली जाते. भारतातील लोकशाहीचा होणारा आदर हच दर्शवितो की, अशा तत्वांना मिश्र अर्थव्यवस्थेत समाजहिताच्या चौकटीत महत्त्वाचे स्थान आहे. भांडवलवादात श्रीमंत लोकांच्या एकाधिकार व शोषण याची भिती असते. परंतू, मिश्र अथव्यवस्थेत समाजकल्याण, विकास यांचे संतूलन साधले जाते. सरकारचे अतिरेकी हस्तक्षेप नसतो.

**४.कार्यक्षमतेचा भरपूर वापर :–**

समाजवादात सरकारच्या एकाधिकारामुळे किंवा सार्वजनिकतेमुळे लोकांच्या विशेषत: होतकरु व्यक्तींच्या कार्यक्षमतेला वाव मिळत नाही भांडवलवादात सर्व काही मुक्त असल्याने खाजगी व्यक्तींच्या स्वार्थापुढे सामाजिक हिताचे दुर्लक्ष होते. परंतू, मिश्र अर्थव्यवस्थेत व्यक्तींच्या कार्यक्षमतेला वाव मिळतो व नियंत्रणही राहते. स्वातंत्र्य मिळते व स्वैराचाराचा पायबंद घातला जातो. त्यामुळे नियमांच्या चौकटीत राहून व्यक्तीच्या कार्मक्षमतेचे मोल अबाधित राखले जाते.

## मिश्र अर्थव्यवस्थचे दोष / तोटे / नकारात्मक बाजू :–

**१.कामचुकारपणा वाढतो :–** मिश्र अर्थव्यवस्थेतील एक मार्ग म्हणजे सार्वानिक (सरकारी) क्षेत्र व उद्योग होत. सार्वानिक अर्थरचनेत प्रथम मनुष्याची मानसिकता उच्च दर्जाची असायला पाहिजे. व्यसटी ऐवजी समष्टिला उच्च मानले पाहिजे. परंतू, हा आदर्शवाद प्रत्यक्ष व्यवहारात दिसत नाही. त्यामुळे सरकारी क्षेत्रातील कर्मचारी (नोकरशाह / कर्मचारी)

कामचुकारपणा करतात. भारतात सार्वजनिक क्षेत्राचे जे धिंडवडे निघताहेत ते सर्वंना माहित आहे. या अर्थरचनेत आपलेपणा आढळत नाही. त्याग आढळत नाही. प्रामाणिकता, कर्मनिष्ठा यांचा फारसा उपयोग होत नाही. दुसरीकडे खाजगीकरण आहे. यामध्ये नफा हाच उद्देश असल्याने समाजकल्याणाऐवजी व्यक्तीगत स्वार्थच बघतला जातो. म्हणतात ना, 'घोबी का कुत्ता न घर का न घाट का' तेच या मिश्र अर्थव्यवस्थेत आढळते. या दोन अर्थसंरचनेत उघड तर कधी छुपा संघर्ष चालत राहतो. भ्रष्टाचार, भेसळ, शोषण चालू राहते. समाजवादात कामचुकारपणा तर, भांडवलवादात शोषण अधिक प्रमाणात होते. अर्थात मिश्र अर्थव्यवस्थेचा हा दोष आहे.

**२. दोन विश्व–दोन मानसिकता :–** मिश्र अर्थव्यवस्थेत समाजाची अर्थव्यवस्था दोन गटात विभागली जाते. भांडवलवादी किंवा खाजगी व समाजवादी (सार्वानिक / सरकारी) अशा दोन विश्वात आर्थिक उत्पादन व व्यापार चालतो. या दोन क्षेत्रात कार्य करणाऱ्या लोकांची मानसिकता एक समान असते. या दोन प्रकारात कामाचे तास, सवलती, वेतन, सेवा आणि इतर लाभाच्या बाबतीत तफावत आढळते. यातून एकाच समाजात राहणाऱ्या इतर लाभाच्या बाबतीत तफावत आढळते. यातून एकाच समाजात राहणाऱ्या परंतू दोन पद्धतीत काम करणाऱ्यांमध्ये एकता निर्माण होत नाही. त्यांचे मते श्रेष्ठ –कनिष्ठपणाची, न्यूनगंडाची व अंहकाराची भावना निर्माण होते. देशाच्या हिताच्या दृष्टीने व एकात्मतेच्या दृष्टीने असे दुहेरी विभाजन अडचण ठरु लागते.

**३. भेसळयुक्त अर्थरचना :–** भेसळीचे जे दुष्परिणाम दिसून येतात तसेच मिश्र अर्थव्यवस्थेत ही दोष आहेत. ही व्यवस्था कोणत्याही एका स्तरावर स्थिर नाही. या व्यवस्थेत नेहमीच स्पर्धा असल्याने ती विकोपाला जाण्याची व देशाचे अहित होण्याची भिती निर्माण होते. मिश्र व्यवस्था दोन गटात वाटल्याने समाजात नेहमीच कंठकापू स्पर्धा निर्माण होत राहते. समाजाचे स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता त्यातून वाढते. सरकारी व खाजगी अशा दोन गटात एकच समाज विभागला जातो. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेत अडथळा निर्माण होतो.

## ३.३ स्वयं अध्ययन प्रश्न :–

**दिर्घोत्तरी प्रश्न :–**

१. विकासाला एक मार्ग म्हणून भांडवावादी अर्थव्यवस्थचे मूल्यमापन करा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

२. समाजवादी अर्थरचना म्हणजे काय ? त्याचा गुणदोषाी चर्चा करा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

३. मिश्र अर्थव्यवस्थेची संकल्पना स्पष्ट करा. मिश्र अर्थव्यवस्थेचा सकारात्मक व नकारात्मक बाजूंवर प्रकाश टाका.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

४. विकासाचे मार्ग या नात्याने भांडवलदार, समाजवाद व मिश्र व्यवस्था यांचे परिक्षण करा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

५. भारतात मिश्र अर्थव्यवस्था आहे का ? समर्थनार्थ उदाहरणे देऊन समजवून सांगा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

६. भांडवलवादी अर्थरचना आणि समाजवादी अर्थरचना यातील भेद विषद करा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

७. समाजवादी अर्थरचनेचे रशियाच्या संदर्भात विवेचन करा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

**लघूत्तरी प्रश्न :–**

१. सामाजिक व आर्थिक विकासाची संकल्पना विषद करा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

२. भांडवलवादी अर्थव्यवस्थेची लक्षणे सांगा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

३. समाजवादी अर्थरचनेचे दोष सांगा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

४. मिश्र अर्थव्यवस्थेचे महत्त्व स्पष्ट करा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

५. मिश्र अर्थव्यवस्था ही संतुलित व्यवस्था आहे. स्पष्ट करा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

६. जागतीकीकरणात भांडवावादी अर्थरचना प्रभावी होत आहे. चर्चा करा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

७. भांडवावादी अर्थव्यवस्थचे लाभ सांगा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

८. समाजवादी अर्थव्यवस्था परिपूर्ण किंवा संतूलित अर्थव्यवस्था म्हणता येणार नाही. स्पष्ट करा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

## ३.४ सारांश :-

## ३.५ पारिभाषीक शब्द :-

## ३.६ संदर्भसूची :-

# घटक –४

## सैद्धनंतीक दृष्टीको–न

अ–नुक्रमणिका


४.0 उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ आधु–नकीकरण

४.२.२ प्रकार्यात्मक दृष्टीकोन

४.२.३ उत्क्रांतीवादाचा सिद्धांत ( )

४.२.४ दुष्टचक्राचा सिद्धांत ( )

४.२.५ प्रतिमा–नत पर्यायी दृष्टीको–न ( )

४.२.६ नव–उदारवाद / उदारीकरण (–)

४.४ स्वयं अध्ययन प्रश्न

४.४ सारांश

४.५ पारिभाषिक शब्द

४.६ संदर्भ सूची

४.७ सरावासाठी प्रश्न


### ४.0 उद्दिष्टे :

### ४.१ प्रस्ताव–ना :–

### ४.२.१ सैद्धांतीक दृष्टीकोन :–

**आधु–नकीकरण** (Zodernization)

सी.प. खेर आपल्या 'जागतीकीकरण : समस्या, आशय आणि अ–नुभव' या ग्रंथात लिहितात की, जागतीकीकरण म्हणजे व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञा–न, दळणवळण,

विदेशी स्थलांतरण, पर्यावरण, राहणी, शासन, समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व क्षेत्रातू-न होत राहणारे रुपांतर होय. हे आधु-नकीकरणच होय. कारण यामध्ये आधु-नकीकरणनी वैशिष्ट्ये सामावलेली आहेत. अठराव्या शतकात वैज्ञा-नक क्रांती-ने युरोपच्या लोकांचा विचार करण्याच्या पद्धतीलाच बदलून टाकले. लोक, रुसो आणि होव्ज ने सामाजिक व्यवस्थेची व्याख्या किंवा स्पष्टीकरण -नव्याने केले. औद्योगीकरणनच्या परिणामामुळे युरोपमध्ये जिथे एका बाजूला सांमतवादाने पतन झाले तेथेच दुसरीकडे भांडवलवादाच्या विकासनची सुरुवात झाली. उद्योगांमुळे शहरीकत्वाने वेग घेतला, छोट्या शहरां-नी मोठ्या शहराने व मोठ्या शहरांनी महा-नगराने रुप घेतले. हा सर्व आधुनिकेचा प्रभाव होता.

भांडवलवादाने नफाखनेरीच्या विचार प्रवाहाला शक्तीशाली ब-नविले. जगातील जवळपास सर्वच देश या नफाखोरीच्या स्पर्धेत उतरलेले दिसतात. यांचा एकमेव उद्देश म्हणजे जास्तीत जास्त नफा मिळविणे हा आहे. या स्पर्धेने जगाला दोन गटात विभागले. गरीब देश आणि श्रीमंत देश. इंग्रजां-नी भारतात कारखा-ना पद्धती सुरु केली, वाफेने चालणारी यंत्रे आणली आणि या उद्योगांनी, भांडवलवादानी आणि बाजाराने आधुनिकतेच्या प्रक्रियेला वेग दिला. स्था-निय परंपरांचे देखील आधुनिकीकरण सुरु झाले.

बौमे-न चे म्हणणे आहे की, जिथे पश्चिमी युरोपात भांडवलवादी व्यवस्थे-ने आधु-नकतेला गती दिली तिथेच पूर्वी युरोपात एका प्रति-संस्कृतीचा ज-न्म झाला. ही संस्कृती समाजवादाची होती. या व्यवस्थेने ज्या सभ्यतेला ज-न्म दिला त्याचा परिणाम म्हणून आधु-नकतेचा एक अवतार समोर आला असे म्हणता येईल की, भांडवलवाद व समाजवाद दोन्ही पद्धती-ने आपापल्यच परी-ने आधु-नक्तेच्या प्रक्रियेला धारदार ब-नविले.

१९८० च्या दशकात अशी पुस्तके जगात आली व त्यांनी असे दाखवून दिले की, लोकशाही आणि उदारवादाच्या माध्यमानेच आनधुनिकतेला एक प्रमुख विचारप्रवाह म्हणू-न समनेर आणले. एके -नवा दृष्टीकोन म्हणू-न आधु-नकतेची स्थाप-ना केली जाऊ शकते. फुकोयामाच्या मता-नुसार यशाची व विकासाची मात्र एकच वाट आहे व ती म्हणजे आधु-नकता आणि भाडवलवादी व्यवस्था. जागतीकीकरणामुळे त्याच्या आव्हा-नापुढे मात्र राज्य-राष्ट्र आकुंचन पावली आहेत.

जगात आधु-नकता अचानक किंवा एक रनात्रीतू-न आलेली -नाही. याचा देखील इतिहास आहे. उत्क्रनंतीच्या काड्या आहेत. आधुनिकतेच्या अवस्थांमध्ये १९८०-९० मध्ये असे काही घडले की, त्याने हे दाखवून दिले की, आधुनिकता अर्थात भांडवलवादाच या जगाचे भाग्य आहे. सामान्यपणे आधुनिकतेची संकल्प-ना इतिहासाच्या एका निश्चित काळाशी जुळलेली आहे. खरे तर आधुनिकतेचा संबंध एका विशेष प्रकारच्या अ-नुभवाशी, एका विशेष प्रकारच्या संस्कृतीशी आहे. आधुनिकतेत सांस्कृतीक एकाधिक्यता / अ-नेकता किंवा बहूविविधता आहे. यामध्ये आर्थिक, सामाजिक आणि राजकीय गठबंध-न असते जे त्याला स्वत:ची ओळख देतात. यामध्ये अनेक जाती, भाषा, संस्कृती क्षेत्र असतात. आधुनिकतेत लवचिकतच असते. अचधुनिकतेत ि-नत्य -नवी संशोध-ने होत राहतात व त्याला त्या संदर्भात प्रोत्साह-न देखील मिळत राहते. ए-न्थ-नी गिडिंग्च्या मतानुसार आधुनिकता एका पळपुट्या इंजिनासारखे आहे. ज्याला आप-ण एका सीमेपर्यंत तर चालवू शकतो. परंतु, आम्हाला तो बेलगाम होऊ-न

धावण्याची धमकी देखील देत राहतो. तो म्हणता आधुनिकता अर्ि-नवार्य रुपा-ने बहु-आयामी अनहे. यामध्ये परिवर्त-न आणि गत्यात्मकता अंतर्भूत आहे. गिडिंग्ज आधुनिकतेला उदारवाद किंवा भांडवलवादाशी जोडत -नाही. त्यांच्याच मते, आधुनिकता चार संस्थनंच्या संदर्भात स्पष्ट करता येईल -

प्रथम संस्था भांडवलवाद आहे. यामध्ये वस्तचे उत्पादन, खाजगीकरण, देखरेख ठेवण्याची क्षमता आणि राष्ट्र-राज्य यांचा समावेश केला आहे.

दुसरी संस्था आहे उद्योगवाद, तीसरी संस्था आहे ि-नरीक्षण क्षमता आणि चौथी संस्था आहे राज्य-राष्ट्र

दुर्खीमच्या मता-नुसार ज्या समाजात जितके जास्त स्पष्टीकरण तो समाज तितका आधुनिक म्हणता येईल. मार्क्स-ने आधुनिकतेची व्याख्या भांडवलवादी अर्थव्यवस्थेच्या माध्यमाने केली आहे. जनास्तीत जास्त उत्पादन करणेचा आधुनिकता अनहे. मनर्क्स-ने अनधुनिकतेला वस्तूकरणाच्या, बाजारवादाच्या रुपात व्यक्त केले आहे. मॅक्स वेबर आधुनिकतेची व्याख्या बुद्धीवादी संदर्भात करतो. तो म्हणतो ज्या लोकांमध्ये बुद्धी आहे, विचार आहे, विवेक आहे, चातुर्य आहे तोच पैसे कमाऊ शकतो, तोच भांडवलवादी बनू शकतो.

### ४.२.२ प्रकार्यात्मक दृष्टीको-न (Functional approach) :-

**प्रकार्याचा अर्थ :** कोणत्याही समाज किंवा संस्कृतीच्या स्थैर्यासाठी व सातत्यासाठी त्याच्या विविध घटकांमध्ये संघटन आणि व्यवस्था -नीट असायला पाहिजे. समाजातील विभिन्न निर्णायक तत्व किंवा घटक समाज व्यवस्था टिकवू-न ठेवण्यासाठी आपली ठराविक भूमिका योग्य तऱ्हेने बजावतात. त्या भूमिकेलाच प्रकार्य म्हणतात. समाज एक अखंड व्यवस्था नाही. समाजांतर्गत अ-नेक घटक असतात. हे विभीन्न घटक समाजाचेच अंग असतात. परंतु, सर्वच अंग, भाग किंवा घटक आपली ि-नर्धारीत भूमिका पार पाडण्यात कमी पडतात. यासाठी कारणे काहीही असू शकतील, परंतु त्यामुळे समाजाच्या विकासाच्या मार्गात अडचणी ि-नर्माण होतात यालाच त्या घटकांचे अकार्य म्हणतात. सामाजिक व्यवस्थेला किंवा संघट-नेला एक उत्क्रांतीय प्रकार्यात्मक प्रक्रियेच्या रुपात बघीतले गेले. रॅडक्लिफ ब्राऊ-न प्रकार्यवादाचे प्रमुख समर्थक आहेत. त्यांनी असे मान-ले आहे की, प्रकार्यवाद आणि सावगवीवादात एक अविच्छिन्न संबंध आहे. समाजाच्या शास्त्रीय किंवा वैज्ञाि-नक अध्ययनासाठी प्रकार्यवादी संकल्पनेला सर्वप्रथम १८९५ मध्ये इम्राईल दुर्खिमने उपयोगात आणले. प्रकार्याला साधरणत: चार दृष्टीकोनातू-न बघता येईल.

१. सामाजिक जीवनाचे प्रकार्यात्मक विश्लेषण

२. सामाजिक जीव-नाचा एक सिद्धांत

३. मुक्त कार्यक्रम

४. व्यवस्था ि-नर्धारित आणि व्यवस्था पोषक कार्यक्रम

**प्रकार्यवाद :-**

प्रकार्यवादी आंदोलन १९ व्या शतकात सुरु झाले होते. तेव्हापासू-न आजपावेतो या

आंदोलनात अनेक विद्वनाची आपले योगदान दिले आहे. हर्बट स्पे-न्सरनेच सर्वप्रथम डार्वि-नच्या प्राणीशास्त्रीय उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताच्या आधारावर सामाजिक प्रकार्याबाबत आपला दृष्टीकोन स्पष्ट केला. त्यांच्या मतानुसार सावयव किंवा समाजात काही आधारभूत समानता असल्या कारणाने एकाच्या आधारावर दुसऱ्याला समजू-न घेणे सोपे होईल. सुरुवातीला प्रत्येक सावयव (जीव) फारच सरळ असते. त्यांनी अंगे एकमेकात इतकी एकवटलेली असतात की, त्यां-चा वेगळे करता येत -नाही. परंतु, पुढे ही अंगे स्वतंत्रपणे विकसित होऊ-न पृथकपणे दिसू-न येतात. याचप्रमाणे सुरुवातीलच समाजाने विभिन्न अंग- कुटूंब, राज्य, आर्थिक संस्था, धर्म, प्रथा, आचार इ. परस्परांशी इतके मिसळलेले असतात की, त्यां-ना वेगळे करता येत -नाही. परंतु, हळू हळू ही अंगे स्पष्ट होत गेली. पुढे-पुढे या विभिन्न अंगाने प्रकार्य देखील स्वतंत्र होत जातात. हात, पाय, डोळे, का-न इ. चे कार्य वेगळे असते. त्यांच्या कार्यात विशेषीकरण येते. हीन बाब समाजाला देखील लागू होते. जसजसा समाजाचा विकास होत जातो तसतसे समाजाच्या विभिन्न अंगाच्या कार्याने विशेषीकरण होत जाते. समाज सरळतेकडू-न जटीलतेकडे, सामा-न्यांकडून विशेषीकरणाकडे प्रवास करीत जातात. सावयवाप्रमाणे विभिन्न अंगाच्या प्रकार्याने विभाजन झाले तरी, विशेषीकरण झाले तरी, देखील त्यांच्यात परस्परावलंब-न आणि अंर्तसंबंध टिकू-न राहते. हीच बाब समाजाला देखील लागू पडते. राज्य, अर्थसंस्था, शिक्षणसंस्था, धर्मसंस्था इ. चे कार्य विभाज-न झाले असले तरी, त्यांचे विशेषीकरण झाले असले तरी, ते समाजाचेच अंग असू-न परस्परावलंबी आहेत व या परस्परावलंबीत्वातू-नच त्यांचा विकास होत असतो. जसजशी उत्क्रांतीची प्रक्रिया पुढे-पुढे वाढत जाते त्याप्रमाणे प्रकार्यांची एकमयता अधिक घ‍ि-नष्ठ होत जाते. जेव्हा अंगामध्ये कमी भिन्नता असते तेव्हा ते सहजपणे एक- दुसऱ्याचे प्रकार्ये करु शकतात, परंतु जिथे ही विभिन्नता जास्त असते तेव्हा अंगाने दुसऱ्याचे प्रकार्य सहजपणे करता येत -नाहीत. समाजाच्या जटिलतेबरनेबरच अंग‍ि-नहाय प्रकार्य स्वतंत्र व विशेष होत जातात. समाजाची व्यवस्था आणि संघटनाचे स्थैर्य व सातत्य या गोष्टीवर अवलंबू-न असते की, प्रत्येक अंग आपापले सोपविलेले किंवा ि-नश्चित केलेले कार्य / भूमिका व्यवस्थीत करतील. प्रकार्यामध्ये बदल झाल्याशिवाय संरचनेत बदल किंवा परिवर्त-न होऊ शकत -नाही. अशाप्रकारे स्पे-न्सर-ने सामाजिक प्रकार्याला सावयवी प्रकार्याच्या संदर्भात किंवा त्याप्रमाणे मानून समजू-न घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## दुर्खिमचा प्रकार्यवादी दृष्टीकोन :-

दुर्खिम-ने ध्येय किंवा उद्देशांऐवजी प्रकार्याला सामाजिक घट-नं-ानना समजू-न घेण्यासाठी मान्यता दिली आहे. कोणत्याही घटोच्या संदर्भात अध्यय-न करतां-ना सर्वप्रथम त्याच्या कारणांना शोध घेण्याचा प्रयत्न करीत असतो आणि नंतर तेच कारण त्याच्याद्वारा उत्पन्न परिणामाने विश्लेषण करते. खरे तर, कार्य आणि कारण यांचा संबंध परस्पर देवाण-घेवाणीना आहे. कार्याचे अस्तित्व कारणाशिवाय अशक्य आहे आणि कारणाला देखील आपल्या अस्तित्वाच्या सातत्याकरीता कायानची आवश्यकता असते. दुर्खिमच्या मते, प्रत्येक सामाजिक घटनेच्या किंवा तथ्याचे एक कारण असते तसेच सामाजिक व्यवस्थेच्या अस्तित्वामध्ये त्याने कोणते -ना कोणते प्रकार्य देखील असते. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे सामाजिक व्यवस्था विभिन्न सामाजिक तथ्यांच्या किंवा घट-नाच्या प्रकार्याचा

परिणाम आहे. सामाजिक घट–ननंच्यच या प्रकार्यात्मक बाजूनी उपेक्षा करु–न त्यां–ना शनस्त्रीय स्तरावर समजू–न घेता येणार –नाही. प्रत्येक समाजीक घट–ना कोणते –ना कोणते प्रकार्य करते. म्हणजेच सामाजिक व्यवस्थेच्या संरननेत त्याने कोणते –ना कोणते योगदान असतेच.

**परेटोचा दृष्टीकोन :–**

परेटोच्यचा मता–नुसार सामाजिक व्यवस्था सर्व समाजात एक सारखी नसते. त्याचे स्वरुप पृथक–पृथक ठिकाणी वेगवेगळे असते. ही समाज व्यवस्था अ–नेक घटकांद्वारा ि–नर्धारित होते. हे घटक सामाजिक व्यवस्थेला ि–नर्धरित आणि प्रभावित करतात आणि स्वत: सामाजिक व्यवस्थेद्वारा ि–नर्धारित आणि प्रभावीत होतात. परेटाने या घटकां–ना ती–न श्रेणीत विभागले आहे.

१. नैसर्गिक घटक, २. बाह्य घटक, ३. अंतर्गत घटक. या शिवाय परेटो–ने अ–न्य महत्त्वपूर्ण पाच घटकांचा उल्लेख केला आहे. जे समाज व्यवस्थेने आधारभूत घटक आहे. १. विशिष्ट चालक (Residues), २. भ्रांततर्क (Derivation), ३. आर्थिक घटक, ४. सामाजिक भिन्नत्व व सामाजिक परिवर्तन आणि ५. अभिजात वर्ग .

**मॅली–ननॅस्कीचा प्रकनयर्चत्मक दृष्टीकोन :–**

मा–नवशास्त्रज्ञांमध्ये ज्या विद्वानांनी प्रकार्यवादी दृष्टीकोनातून सांस्कृतीक व्यवस्थेला समजू–न घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्या मध्ये मॅलि–ननॅस्की व रॅडाक्लिफ ब्रनाऊ–नचा विशेष उल्लेख करावा लागेल. मॅलि–ननॅस्कीच्या मता–नुसार संस्कृती असे साध–न आहे. ज्याच्यामुळे मनुष्य आपल्या शारीरिक, मा–नसिक आणि बनैद्धिक अस्तित्वाला टिकवू–न ठेवण्यात यशस्वी होतो. संस्कृतीच्या विभिन्न अंगाने एक विशेष स्वरुप नसते तर एक विशेष प्रकार्य देखील असते. संस्कृतीने कोणतेच तत्व किंवा घटक बेकार नसते. त्याचेद्वारा मा–नवाने काणते –ना कोणते कार्य होत असते. कोणत्याही सांस्कृतीक तत्वाने अस्तित्व यावर अवलंबू–न असते की, ते मानवाच्या कामाचे आहे किंवा नाही. थोडक्यात हाच मॅलि–ननॅस्कीचा प्रकार्यवाद आहे. संस्कृतीच्या विभिन्न घटकांने वेगवेगळे अस्तित्व नसते व तसे ते शक्य देखील –नाही. संस्कृतीने प्रत्येक तत्व कोणते –ना कोणते कार्य करण्यासाठी असते आणि त्याने अस्तित्व तोपर्यंतच असतेच जोपर्यंत ते संपूर्ण जीव–न व्यवस्थेत कोणते –ना कोणते कार्य करीत राहते. मॅलि–ननॅस्कीच्या मतानुसार, सांस्कृतीक संघट–नेचे आधारभूत कारण त्या संस्कृतीच्या प्रत्येक यात्रेद्वारा केल्या जाणारे प्रकार्य आहे. मॅलि–ननॅस्कीने मनुष्याच्या सात आधारभूत प्राणीशास्त्रीय गरजांचा उल्लेख केला आहे.

१. पोषक (Zetabolic), २. उत्पादक (Reproductive), ३. शारीरिक आरोग्य (bodily CoZforts), ४. सुरक्षा (Safety), ५. गती (ZoveZent), ६. वृद्धी (Growth), ७. आरोग्य (Health)

**रॅडक्लिफ ब्राउ–नचा प्रकार्यवादी दृष्टीकोन :–**

रॅडक्लिफ ब्राउनच्या मतानुसार, संरचना आणि प्रकायर्चची संकल्प–ाच याचा प्रयोग तेव्हाच होऊ शकतो जेव्हना समाज आणि जीवंत सावयवनच्या समानतेचा स्वीकार केला जाईल. एका सावयवनचे जीव–न त्याच्या संरचनेच्या प्रकार्याच्या स्वरुपात पाहता येईल.

प्रकार्यांच्या सातत्याच्या माध्यमानेच संरचनेचे सातत्य टिकू-न राहते. एका समूदायाचे जीव-न सामाजिक संरचनेचे प्रकार्य आहे.

आज प्रत्येक समाजशास्त्रज्ञ या गोष्टीशी सहमत आहे की, सामाजिक जीव-नात कोणती -ना कोणती व्यवस्था असते आणि सामाजिक जीव-नाच्या त्या व्यवस्थेला टिकवू-न ठेवण्यासाठी या गोष्टीने देखील आवश्यकता असते की, सामाजिक संरचनेला तयार करणाऱ्या बाबीं-नी काही प्रकार्य करीत राहिले पाहिजे. सामाजिक संरचना व प्रकार्य यामध्ये घ-िनष्ठ संबंध आहे. संरचन-ात्मक-प्रकार्यात्मक दृष्टीकोन आधुनिक समाजशास्त्राच्या त्या नवीन-नुतन प्रवृत्तीने प्रति-िनधीत्व करतो जो की, सैद्धांतीक विकासाकडे सतत प्रकृत असतो.

## ४.२.३ उत्क्रांतीवादनाचा सिद्धांत (Theory of Evaluation) :-

उत्क्रांतीच्या संकल्प-नेचा सर्वप्रथम वापर व व्यवस्थित स्पष्टीकरण सर्वात अगोदर डार्वि-न-ने शारीरिक रचनेत होणाऱ्या प्राणीशास्त्रीय किंवा जैविक परिवर्त-नाला समजू-न घेण्यासाठी केला होता. नंतर हबर्ट स्पे-न्सरने उत्क्रांतीची अधिक विस्ताराने विवेचन करु-न दिला उपयोग सामाजिक जीवनाच्या विविध बाजूं-ना आणि संस्थांना त्यातील होणाऱ्या परिवर्त-नाला समजू-न घेण्यासाठी केला. त्यानंतर तर ही एक परंपराच ब-नली आणि सामाजिक जीव-ननाच्या सर्व बाजूं-ना व त्यातील होणाऱ्या परिवर्त-नाला उत्क्रनंतीच्या आधारावर स्पष्ट करण्याचा प्रयत्न होऊ लागला. सामाजिक परिवर्त-नाचे रेखात्मक सिद्धांतावर देखील उत्क्रांतीवाद्याच्या विचाराने प्रभावित झाले. कॉम्त-ने उत्क्रांतीय रुपां-ना ती-न स्तरांमध्ये (धार्मिक ते वैज्ञा-िनक), स्पे-न्सरने चार स्तरांमध्ये (शिकरी अवस्थेपासून औद्योगीक अवस्थेपर्यंत), मार्क्स-ने पाच स्तरांमध्ये (आदिम साम्यवादी ते आधुनिक साम्यवादी पर्यंत) समाजाचा विकासाचे स्तर किंवा अवस्था मानल्या आहेत.

### उत्क्रनंतीचा अर्थ (Zeaning of Evaluation) :-

Evaluation शब्दानी उत्पत्ती लॅटि-न भाषेतील Evalvere या शब्दापासू-न मानली जाते. e चा अर्थ आहे बाहेरील (OUT) आणि 'Volvere' चा अर्थ प्रसारणाशी आहे. अशाप्रकारे शाब्दिक रुपाने eVolvere किंवा Evaluation चा अर्थ आहे प्रसरणे-पसरणे-वाढणे. परंतु, प्रत्येक वस्तूचे वाढणे किंवा पसरणे उत्क्रांती -नाही. पसरणे किंवा प्रसरण याचा अर्थ सामान्य अवस्थेकडू-न गुंतागुंतीच्या अवस्थेकडे जाणे होय. याला अधिक स्पष्ट करतां-ना हर्बट स्पे-न्सर म्हणतो की, उत्क्रांतीच्या काही तत्वांने एकीकरण आणि त्याच्याशी संबंधित अशी गती आहे, ज्याच्या प्रवाहात कोणतेही तत्व अ-िनश्चित आणि असुत्रबद्ध समानतेकडू-न निश्चित आणि सुत्रबद्ध भिन्नतेत बदलतेच उत्क्रांतीने तात्पर्य अशा परिवर्त-नाशी आहे ज्याच्या अंतर्गत एखाद्या वस्तूत किंवा वैशिष्ट्यात होणारे परिवर्त-न अनेक स्तरांच्या माध्यमाने होत जाऊ-न प्रत्येक पुढील परिवर्त-नाबरनेबर वस्तचे रुप अधिक जटिल होत जाते. मॅकआयव्हर आणि पेज यांचे मतानुसार, ''जेव्हा परिवर्त-नामध्ये केवळ सातत्यच नसते तर, परिवर्त-नाची एक दिशा देखील असते, तेव्हा अशा परिवर्त-नाला उत्क्रांती म्हणतात.'' या बरनेबरचा मॅकआयव्हर-ने उत्क्रातीच्या स्पष्ट करतां-ना त्याला अंतर्गत शक्तीद्वारा उत्पन्न होणारे परिवर्त-न म्हटले आहे. ऑगबर्न आणि ि-नमकॉफ ने देखील 'उत्क्रांती'

ला एका दिशेने होणारे परिवर्त-न म्हटले आहे. या विवेचनावरून आपणाला असा ि-नष्कर्ष काढता येईल की, उत्क्रांती एका विशिष्ट दिशेने होणारे असे परिवर्त-न आहे जे अ-नेक आंतरीक शक्तींमुळे ि-नर्माण होते आणि सामान्यत: त्याचे स्वरुप सामान्यांकडून जटिलतेकडे वाढण्याचे असते.

**उत्क्रांतीच्या संदर्भात काही सिद्धांत :-**

**१.डार्विनचा उत्क्रांतीविषयक सिद्धांत :-**

डार्वि-नने उत्क्रांतीवादाचा सिद्धांत स्पष्ट करतांना म्हटले आहे की, सुरुवातीला प्रत्येक जीवंत वस्तूचे स्वरुप अतिशय सरळ असते. ही स्थिती अनिश्चित आणि असंबंध समानतेची असते अर्थात वरवर त्या वस्तूने विभिन्न रुप एक-दुसऱ्याशी इतके साम-न असतात की, त्यांच्यामध्ये कोणतेच निश्चितच संबंध दिसत नाही. परंतु, त्या वस्तूचा जसजसा विकास होत जातो, त्याने विभिन्न अंग एक-दुसऱ्यापासू-न वेगळे वाटू लागतात. एवढेच नव्हे तर त्यांचे स्वरुप देखील स्पष्ट होतात. उदा. एखादे बी आपण पाहतो ते फारच सरळ वाढते. परंतु, त्या बिजाने जेव्हा हळू हळू वृक्षात रुपांतर होते तेव्हा त्या झाडाचे विभिन्न अंग स्पष्ट होतात. उदा. बुंधा, फांद्या, पा-ने, फळे, रंग, उंची, जाडी वगैरे. हे विभिन्न भाग एक-दुसऱ्यांशी संबंधी असतात. ही दुसरी स्थिती असते. ि-नश्चित आणि संबंध भिन्नता स्थिती येथे प्रत्येक भागाने कार्य वेगळे असते. उदा. मुळे जमीनीतू-न भोज-न-पाणी घेतात, पा-ने आणि फांद्या सुर्यापासू-न उष्णता ग्रहण करतात, हवा घेतात, झाडावरील साल वेगवेगळ्या ऋतूंपासू-न झाडाचे संरक्षण करते वगैरे. ही सर्व विभिन्न कार्ये परस्पर अवयवां-ना पोषण देत असतात. एका अंगावर झालेला प्रभाव इतर अंगावरही पडतो आणि म्हणू-नच त्यांच्यामध्ये कुठली स्पष्ट पृथकता राहत नाही.

उत्क्रांतीनची प्रक्रिया ही एक क्रमिक प्रक्रिया आहे जी अ-नेक अवस्थाद्वारा परिवर्त-नाची स्थिती उत्पन्न करतात. उदा. म-नुष्याच्या शरिरात प्रत्येक क्षणीपरिर्वत-न होत राहते, परंतु हे परिवर्त-न इतके क्रमिक आणि मंदगतीने असते की, ि-नश्चित नियमांच्या पद्धती-ने होत असू-नही आम्ही त्याला परिवर्तन प्रक्रियेत पाहू शकत ननाही. जेव्हा ही स्थिती दुसऱ्या स्तरात पाहोचते तेव्हा झालेला बदल लक्षात येतो. उदा. मनुष्याच्या जीव-नात शैशावस्था, बाल्यकाळ, किशोरावस्था, युवावस्था, प्रौढता आणि वृद्धावस्था इत्यादी विभिन्न स्तर आहेत ज्याने स्वरुप किंवा आकार उत्क्रांतीय प्रक्रियेद्वारा परिवर्तीत होते.

उत्क्रांतीची प्रक्रिया आंतरिक वैशिष्ट्यांशी संबंधित आहे. याना अर्थ एखाद्या प्राण्यामध्ये सरळतेकडू-न जटिलतेकडे होणारे हे परिवर्त-न कुठल्या बाह्य घटकांनी होत नसू-न शरीरांतर्गत प्रच्छन्न आंतरिक शक्तीच्या प्रभावा-नेच कार्य करते. थोडक्यात हान डनार्वि-नचा उत्क्रांतीवादाचा सिद्धांत आहे.

**२. सामाजीक उत्क्रांतीवादाचा सिद्धांत :-**

डार्वि-नच्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताच्या आधारावर हबर्ट स्पे-न्सर-ने सामाजिक उत्क्रांतीचा सिद्धांत मांडला. स्पे-न्सरच्या मते, उत्क्रांतीची प्रक्रिया केवळ प्राण्यांमध्येच आढळू-न येत -नाही तर सामाजिक जीव-न, सामाजिक संस्था आणि सांस्कृतीक प्रतिमा-नांमध्ये देखील आढळते.

उदा. सुरुवातीला सामाजिक जीव–न फारच साधे–सोपे आणि सरळ होते. अ–निश्चित होते. हि अ–निश्चितेची आणि असुत्रबद्धतेची स्थिती होती. त्याच्या–नंतर व्यक्तीच्या विचारांमध्ये आणि अ–नुभवात परिवर्तन झाल्याने समाजातील विभिन्न बाजू एक–दुसऱ्यांशी पृथक होऊ–न स्वतंत्र रुपा–ने कार्य करु लागली. या स्थितीला निश्चित संबंधतेची स्थिती म्हणता येईल. समाजात जेव्हा विभिन्न अंग कार्यात्मक रुपाने एक–दुसऱ्यांपासू–न पृथक होतात तेव्हा त्याच्यामध्ये श्रमविभाजन आणि विशेषीकरणाची प्रक्रिया सुरु होते. अशाप्रकारे एक साधा–सरळ समाज व सामाजिक जीवन हळू हळू गुंतागुंतीचे स्वरुप घेऊ लागते. याचे उदाहरण आपल्याला शिकारी अवस्थेपासू–न ते सभ्यतेच्या अवस्थेपर्यंत संपूर्ण सामाजिक इतिहासात पहावयास मिळते. स्पे–न्सरच्या म्हणण्याप्रमाणे राष्ट्राचा विकस समा–न वैशिष्ट्ये दर्शविणाऱ्या आदिवासी आणि त्यांच्या असमा–न कार्याच्या पुर्नमिलनाने होते. अशाच प्रकारे सर्व संस्था सुरुवातीला एक–दुसऱ्यांशी मिळू–न असतात. परंतू, हळूहळू त्यांच्यामध्ये स्पष्ट फरक दिसण्यास सुरुवात होते आणि त्यांची ि–नर्मिती करणाऱ्या तत्वांमध्ये देखील एक स्पष्ट भिन्नता दिसून येते. अशाप्रकारे उत्क्रांतीवादी प्रक्रियेच्या आधारावर संस्थांने आकारामध्ये वृद्धी होते, त्यांच्यात विभिन्नता वाढते आणि कार्यात्मक रुपा–ने त्या अधिक निश्चित स्वरुपाच्या होतात. अशाप्रकारे स्पे–न्सरचे असे मत आहे की, जसजसा काळ पुढे सरकत जातो, समाज प्रगतीशीलता, कार्यकुशलता, स्वतंत्रता आणि परस्पर सहकार्याच्या दिशेने पुढे–पुढे जात राहतो. केवळ सामाजिक जीवनातच न–व्हे तर, आर्थिक, कौटूंबिक आणि धार्मिक जीव–नात देखील उत्क्रांतीची प्रक्रिया स्पष्टपणे पाहता येईल. अशाप्रकारे सामाजिक जीव–नात क्रमीक आणि विशेष दिशेने होणाऱ्या परिवर्त–नाला सामाजिक उत्क्रांती म्हणता येईल.

**३. ऑगस्तकॉम्त चा सिद्धांत :–**

काम्तने सामाजिक परिवर्त–नाचा संबंध मानवाच्या बौद्धिक विकासाशी जोडला आहे. त्या–ने बौद्धिक विकासाने आणि सामाजिक परिवर्त–नाने ती–न स्तर मानले आहेत.

१.धार्मिक स्तर –

२.तात्वक स्तर –

३.वैज्ञा–नक स्तर –

धार्मिक स्तर समाजानी प्राथमिक अवस्था हांती ज्यामध्ये मानव प्रत्येक घटनेला ईश्वर आणि धर्माच्या संदर्भात समजण्याचाच प्रयत्न करीत असे. जगातल्या, विश्वातल्या सर्व क्रियांचा आधार धर्म आणि ईश्वरालाच मानले गेले होते. त्यावेळी वेगवेगळ्या ठिकाणी धर्माने विभिन्न स्वरुप होते. उदा. बहुदेववाद, एकेश्वरवाद किंवा निसर्ग पूजा प्रचलीत होती. सामाजिक विकासाचा दुसरा स्तर तात्विक स्तर होता. यामध्ये मानव घट–नाचे स्पष्टीकरण त्याच्या गुणांच्या आधारावर करीत असे. या अवस्थेत मानवाचा अलौकिक शक्तींवरील विश्वास कमी झाला आणि प्राण्यांमध्ये विद्यमा–न अमूर्त शक्तीलाच समस्त घट–नांसाठी जबाबदार मानले गेले. सनामाजिक विकासाचा तीसरा स्तर वैज्ञा–नक स्तर आहे. जो आज विद्यमान आहे. वैज्ञानीक स्तरात मानव सांसारिक घट–नांचे विवेचन धर्म, ईश्वर आणि अलौकिक शक्तीच्या आधारावर करीत –नाही तर, विज्ञानाच्या आणि तर्काच्या आधारावर करु लागला

आहे. म–नुष्य कार्य आणि कारण यातील सहसंबंध लक्षात घेऊ–न ि–नयम आणि सिद्धांताने प्रतिपादन करु लागला आहे. मानवी घटनांचे ि–निरिक्षण करु–न त्यांनी तार्किक आणि वैज्ञाि–नक विवेचनावरु–न सत्यापर्यंत पोहोचण्यरचा प्रयत्न करु लागला आहे. अशाप्रकारे चिंतनाच्या विकासाबरनेबरच सामाजिक संरचना, संगठ–न आणि व्यवस्थेने देखील विकास आणि परिवर्त–न झाले आहे.

उत्क्रांतीवादी सिद्धांताच्या विवेचनावरु–न असे म्हणता येईल की –

- उत्क्रांती विभेदीकरण आणि एकीकरणाची प्रक्रिया आहे.
- सामाजिक उत्क्रांती वैश्विक विकासाच्या ि–नयमाने एक सांस्कृतीक किंवा मनावी स्वरुप आहे.
- सामाजिक उत्क्रांती त्याच्याप्रमाणे होत असते ज्याप्रमाणे वैश्विक विकास.
- सामाजिक उत्क्रांती एक मंद प्रक्रिया आहे.
- सामाजिक उत्क्रांती प्रगतीशील आहे.
- सामाजिक उत्क्रांती एका निश्चित दिशा जरी होत असली तरी, ते परिवर्तन उत्थान किंवा पतन देखील होऊ शकते.
- सामाजिक उत्क्रांती मूल्यांवर आधारीत नसते.

## ४.२.४ दुष्ट चक्राचा सिद्धांत (Vicious Circle)

मागासलेल्या किंवा अप्रगत अर्थव्यवस्थेत काही घटकांचा असा संयोग घडू–न येतो की, ज्यामुळे विकासाने वेग शिथील होऊ लागतात किंवा त्याना वेग मंद होण्याची प्रक्रिया वाढत जाते. यासाठी जे घटक जबाबदार असतात त्यांना अशा स्थितीत एक प्रकारचा चक्राकार संबंध असतो. विशेष म्हणजे अशा अनेक घटकांपैकी कोणता घटक मुख्यत्वे करुन जबाबदार आहे व कोणता घटक दिला परिणाम आहे हे नक्की सांगता येत नाही. ही एक प्रकारनी गुंतागुंत असते. ही एक जटील प्रक्रिया होवू–न बसते. त्या जबाबदार घटकाला अचूकपणे पृथक करुन स्पष्टपणे दाखविता येत –नाही. पहिल्या घटकाचा परिणाम दुसरा घटक असू शकता, तर दुसऱ्या घटकाचा परिणाम तिसरा घटक असू शकतो. ही दुष्टचक्रानी प्रक्रिया अशीच चालत राहते व शेवटी शेवटच्या घटकाचा पु–न्हना पहिल्या घटकावर परिणाम होतां–ना दिसतो. यालाच दुष्टचक्र असे म्हणतात. याउलट जर असेच घटक एकत्रित होवू–न त्यातून प्रगतीला वेग मिळाला तर हा वेग सतत वाढत जातो. येथेही एका घटकाचा परिणाम दुसऱ्या घटकावर होतो. अर्थात प्रगतीच्या संदभातही असेच चक्र अस्तित्वात येते. तेव्हा त्याला दुष्टचक्र (Vicious Circle) असे म्हणता येईल.

दुष्टचक्राची कल्प–ना रॅ–नर नर्क्सने एका उदाहरणाद्वारा स्पदु केली आहे. एखाद्या माणसाचा आहार अपूरा असतो. त्यामुळे तो दुबळा असू–न आजारीही असतो. साहजिकच दुबळेपणामुळे त्याची कार्यक्षमता कमी होते व तो जास्त काम न करु शकल्याने त्याचे उत्पन्न घटते व तो गरीब होत जातो. गरीबीमुळे पु–न्हा त्याचा आहार कमी होतो व निकृष्ट ब–नतो असे हे चक्र चालू राहते. हीच परिस्थिती विविध घटक एकत्रित झाले असता देशाच्या बाबतीत दिसू–न येते. म्हणू–नच देशाच्या दारिद्र्याचे कारण दारिद्र्यच ब–नते किंवा असते. मागणी व पुरवठ्याच्या

बाजूंचा विचार केला तर, आपल्याला प्रामुख्याने ती–न दुष्टचक्र दर्शविता येतील

प्रथम चक्र अर्थविकसीत संसाधने

मागासलेले लोक

जर नैसर्गिक साध–नांचा विकास घडू–न यायचा असेल तर, लोक प्रगत हवेत, कुशल, कार्यक्षम, जिज्ञासू, होतकरु, कर्तव्यनीष्ठ, साहसी, सुदृढ असायला हवेत. जर लोक ि–नरक्षर, मागासलेले, आळशी, दरिद्री, कमजोर असतील तर उत्पादनात भर पडणार –नाही. त्यामुळे विकास होणार नाही. जर प्रगती होणार नाही तोपर्यंत विकास होणार नाही याचा अर्थ अर्थविकसीत साधने मागासलेल्या लोकांचे कारण तसेच परिणामही आहे.

दुसरे चक्र १

अर्थविकसीत संसाधने २

मागासलेली लोकसंख्या अल्प उत्पादकता

भांडवलाची कमतरता

३

अल्प वास्तविक उत्पन्न

४

अल्प गुंतवणूक ५ अल्पबचत

विपणीच्या अपूर्णतेमुळे (अर्थविकसीत साध–ने, मागासलेली लोकसंख्या इ.) आणि भांडवली कमरतेमुळे अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रामध्ये उत्पनदकता खालच्या स्तरावर असते. परिणामत: वास्तविक उत्पन्नाची पातळीही उच्च नसते. जेव्हा वास्तविक उत्पन्नच कमी असते तेव्हा बचत व गुंतवणूक जास्त होणे शक्य –नसते आणि कमी गुंतवणूकीतूनच भांडवली कमतरता निर्माण होते. अशारितीने हे चक्र फिरत राहते. एका घटकामुळे इतरांची तिव्रता वाढते व त्याचा परिणाम अर्थव्यवस्था अप्रगत राहण्यात झालेला दिसू–न येतो. याठिकाणी या चक्राचा विचार (भांडवली) पुरवठयाच्या बाजूने केला आहे.

तिसरे चक्र :– मागणीच्या (भाडवली बाजू–ने) विचार.

१

अर्थविकसीत संसाधने २
मागासलेली लोकसंख्या अल्प उत्पनादकता
भांडवलाची कमतरता

३
अल्प वास्तविक उत्पन्न
४
अल्पमागणी

५ अल्प गुंतवणूक

वरील चक्राप्रमाणेच येथेही विविध घटकामुळे वास्तविक उत्पन्न कमी आहे, त्यामुळे लनेकांनी विविध वस्तूंसाठी असणारी मागणी कमी राहिल. कारण, लोकांची क्रय शक्ती दुबळी असते. जर बाजारात मागणीच कमी असली तर, गुंतवणूकही फारशी होणार –नाही. अशा रिती–ने याही ठिकाणी चक्र पूर्ण झाले आहे.

थोडक्यात म्हणजे अर्थव्यवस्थेतील विविध घटकांच्या चक्री कार्य–कारण संबंधातू–न तीच्या अप्रगत अवस्थेचे स्पष्टीकरण दिले जाऊ शकते. जोपर्यंत ही चक्रे प्रभावी रुपा–ने भेदली जात नाहीत तोपर्यंत अर्थव्यवस्था वेगा–ने प्रगती करण्याची शक्यता कमी राहिल. परंतु, ह्या दुष्टचक्रातील एक जरी घटक बदलता आला तर, त्याचे रुपांतर दुष्टचक्रात होवू–न वेगा–ने विकास साधले जावू शकतो. उदा. जर लोकांची मागणी वाढू शकली तर, गुंतवणूक वाढेल व त्यातून इतर घटकांवर अ–नुकूल परिणाम होतील. जर भांडवली कमतरता दूर होऊ शकली किंवा बचत जास्त प्रमाणात उपलब्ध झाली तरी हे दुष्टचक्र भेदले जावू शकते.

### ४.२.५ प्रतिमा–नीत पर्यायी दृष्टीकोन / सिद्धांत (Pattern Variables) :–

**प्रतिमानाच्या पर्यायांची संकल्प–ना / प्रतिमा–न पर्याय किंवा चर :**

पार्स–न्स–ने सनामाजिक क्रियेच्या सिद्धांतात प्रतिमान पर्यायाने विशेष महत्त्व आहे. पार्स–न्सने सामाजिक क्रियेच्या सिद्धांताचे स्पष्टीकरण करताना सामाजिक क्रियेच्या ती–न तत्वांचा उल्लेख केला आहे.

१. कर्ता – Actor , २. परिस्थिती – Situation , ३. प्रेरणा किंवा उद्देश – Zotive or Goal.

सामाजिक क्रियेच्या तीसच्या तत्वात अशा प्रेरणा किंवा उद्देशांचा समावेश होतो जे कर्त्याच्या आवश्यकते–नुसार संबंधीत असतात. कर्त्याच्या त्या गरजा मूल्यात्मक देखील असू शकतात आणि परिस्थितीज–न्य देखील असू शकतात. आंतरिक देखील असू शकतात आणि परिस्थितीज–न्य देखील असू शकतात. क्रियेच्या स्थितीत कर्त्याचा संबंध या गरजा आणि मूल्यांच्या संदर्भात स्थापित होतो. परिस्थितीच्या प्रती कर्त्याचा कल त्याच्या

ध्येयाप्रती आणि साध–नांप्रती ि–नवड करण्यात सहाय्यक राहतो. कर्त्याच्या गरजा अ–नंत असतत तसचे उद्देश देखील अनेक असतात. क्रियेच्या परिस्थितीत या उद्देशांच्या प्राप्तीसाठी अनेकसाधने देखील उपलब्ध असतात. अशाप्रकारे कर्त्यासमोर ध्येय आणि साध–नांनी ि–नवड करण्याची समस्या ि–नर्माण होते. या ध्येयाची आणि साध–नांची ि–नवड करणे साधे–सोपे काम नसते. या ध्येयांचे आणि साध–नांचे स्वरुप परस्पर विरोधी असू शकते. अर्थात कर्त्याने ि–नवड पर्याय एक–दुसऱ्याच्या विरोधी असू शकतात. ही स्थिती कर्त्यासाठी दुविधापूर्ण स्थिती असते. सांगण्याचे तात्पर्य असे आहे की, कर्त्यासमोर विभिन्न–विविध पर्यायी ध्येय आणि साध–न उपलब्ध असतात. त्या पर्यायांमधूच त्याला ि–नवड करावी लागते. अर्थात कोणाप्रती आकर्षित व्हावे, कोणाप्रती साधन–ा आणि प्रयत्–नशील रहावे याचा विचार करावा लागतो. पार्स–न्स–ने या अवस्थेला ओढ किंवा कल (DileZZa of Orentation) म्हटले आहे.

ओढ किंवा कल याचे कारण म्हणजे ध्येय आणि साध–न जे क्रियेच्या स्थितीत कर्त्यासमोर विद्यमा–न असतात आणि ज्यांच्या प्रती कर्ता समान रुपा–ने आकर्षित असू शकतो. वेगवेगळ्या परिस्थितीत वेगवेगळे ध्येय आणि साध–न समा–न रुपा–ने यश प्राप्त करण्यामध्ये सहाय्यक ठरु शकतात. ज्या ध्येय आणि साध–नांमधू–न कर्ता ि–नवड करतो त्यांना एक–दुसऱ्याचा पर्याय म्हणता येईल. या पर्यायी ध्येयांना आणि साध–नांनाच पार्स–न्सने पर्यायी प्रतिमान किंवा प्रतिमानीत पर्याय (Pattern Variables) म्हटले आहे. हे पर्याय समाजाद्वारा स्वीकृत व्यवहार प्रतिमनानांचा अ–नुकूल असतात आणि कर्ता कोणत्याही दडपणाशिवाय किंवा म–न–बुद्धीच्या चलविचल–नावि–ना यापैकी कोणत्याही एकाचा स्वीकार करतो किंवा करु शकतो. हे पर्याय दो–न विरोधी अवस्थांशी संबंधीत असतात जे कर्त्याचा मा–नसिक कल दर्शवितात. म्हणू–नच पार्स्न–स–ने यां–ना जोडी (Pair) च्या रुपात मांडले आहे.

पनर्स–न्स–ने पाच पर्यायी प्रतिमानीत पर्यायांचा उल्लेख केला आहे ते पुढील प्रमाणे आहेत.

१.रागात्मक विरुद्ध रागात्मक तटस्थतेशी संबंधीत पर्याय ( Affectivity Versus Affective Neutrality)

२.आत्मकेंद्रीत विरुद्ध समूह केंद्रीत पर्याय (Sub-Orientation Versus Collectivity Orientation)

३.सार्वभौमिकता विरुद्ध विशिष्टतेचे पर्याय (UnversalisZ Versus ParticularisZ)

४.गुण विरुद्ध क्रियेशी संबंधीत पर्याय (Quality Versus PerforZance)

५.विशेषता विरुद्ध व्यापकतेचे पर्याय (Speciality Versus Diffusion)

पनर्स–प्स–ने दर्शविले आहे वरील पाच पर्याय क्रिया व्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात लागू होतात.

व्यक्तिमत्वाच्या व्यवस्थेत हे पर्याय गरजां–ना प्रदर्शित करतात. सांस्कृतीक व्यवस्थेत पर्यायी मूल्यात्मक प्रतिमानांना व्यक्त करतात आणि सामजीक व्यवस्थेत विभिन्न प्रकारच्या अपेक्षित भूमिका किंवा कार्यासंबंधी अपेक्षनांना स्पष्ट करतात.

सैद्धांतीक स्तरनवर टॉलकाट पार्स–प्स–ने असे प्रतिपादीत केले आहे की, आर्धु–नकता तर मूल्यांनी एक गाठोडी आहे आणि या संदर्भात समाजात जितके जास्त  विभेदीकरण अर्थात संरचनात्मक विभेदीकरण असेल, समाज तितकाच अधिक आर्धू–नक असेल. आर्धु–नकतेच्या याच व्याखेंतर्गत पार्स–प्स–ने पॅट–र्न वरनयबलच्या आदर्श आराखड्याला मांडले आहे. त्याने असे म्हणले आहे की, कोणताही व्यवहार करण्यापूर्वी व्यक्ती विचारात किंवा दुविधेत असतो. क्रिया करण्याच्या  अगोदर व्यक्ती आपल्या मूल्यांना अभिस्थाप–नेनुसार किंवा मूल्याभिमुखते–नुसार ि–नर्णय घेत असतो की त्याला कोणतीच क्रिया करावयाची आहे, कोणती क्रिया केली पाहिजे इ. हे पॅट–र्न वरनयबलन समाजाला परंपरागत आणि आधुनिक ब–नवित असतो. या अथर्नने अनधूनिक समाज तो आहे ज्याला भावात्मक तटस्थता (Affectivity Neutrality), विशिष्टता (Speciality), सर्वव्यापकता (Universality), उपलब्धी (AchieveZent) आणि सामूहिकता (Collectivity) इ. मूल्ये असतात. पार्स–न्स याच मूल्याच्या आधारे आधुनिकतेची व्याख्या करतो.

कुलरीच बॅक म्हणतो आधुनिकतेची संस्कृती धोक्याची धोक्याचीघंटी आहे. आज आम्हाला जी आधुनिकता पहावयास मिळते आहे त्यामध्ये व्यक्तीवादाचा अतिरेक झाला आहे. आज  आम्ही ज्या आधुनिकतेत जगत आहोत ते दुसरे काही –नसू–न ि–नसर्गाने राज–नीतीकरण आहे. कारखा–न्याना व धूरांना जो भया–नक चेहरा आपल्या समोर आहे तो कुठल्याही प्राणघातक धोक्यापेक्षा कमी –नाही. या अर्था–ने आधुनिकता  केवळ धोक्याची घंटी आहे. रिट्जरच्या मते, आधुनिकता विकसीत विवेक आहे.

ज्ञा–नोदय सिद्धातकारांचे असे मत आहे की, आर्धू–नकतेचा आधार तर्क, ज्ञा–न, अ–नुभव आणि विज्ञा–न आहे. सत्याने ज्ञा–न अ–नुभवानेच होत असते. ज्ञा–नोदय आशावादी आहे आणि हा विश्वास घेऊ–न चालतो की, वैज्ञा–नक ज्ञानाद्वारा शिक्षण आणि विकासाना उंच शिखरावर पोहोचले जाऊ शकते.

**४.२.६ – नव–उदारवाद / उदारीकरण (–) :–**

आर्थिक उदारीकरण

जागतीकीकरण व उदारीकरणाने भारताच्या दृष्टीने लाभ

जागतीकीकरणाने / उदारीकरणाने दोष किंवा धोके

बहुराष्ट्रीय महामंडळे किंवा ि–नगम (ZNCs)

भारत आणि बहुराष्ट्रीय कंप–न्या

जागतीक व्यापार संघट–ना

संरचना

जागतीक व्यापार संघट–ना करार

भारत आणि जागतीक व्यापार संघट–ना लाभ–अलाभ

गॅट (GATT)

**आर्थिक उदारीकरण** (EconoZic Liberalisation) **:-**

आर्थिक उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक, उत्पाद-न आणि आयात - ि-नर्यात यासाठी अ-नावश्यक ि-नर्बंध-ि-नयंत्रण-ि-नयमन आणि परव-ाना पद्धती कमीत कमी करण्याची प्रक्रिया आहे. आर्थिक उदारीकरणाच्या माध्यमाने अर्थव्यवस्थेत ि-नकोप स्पर्धेने वातारवरण निर्माण करण्यात येते. यात सरकारी नियंत्रणे व हस्तक्षेप कमीत कमी होण्याकडे धोरणांचा कल असतो. आर्थिक व्यवहारांचे उदारीकरण आणि खाजगीकरण हे १९८० च्या दशका-नंतर आपल्या देशात परवलीचे शब्द झाले. आर्थिक उदारीकरण ही संकल्प-ान व्यापक अर्थाने वापरली जाते. बाजारयंत्रणा आणि मुक्त स्पर्धा यातील अडथळे दूर करण्याचा, कमी करण्याचा सरकारच्या धोरणास आर्थिक उदारीकरणाचे धोरण म्हणतात. यात उद्योगांनी उभारणी करतांना शासकीय ि-नयम शिथिल असावेत तसेच शासकीय अधिकाऱ्यांची वृत्ती उदार असावी, या बाबी अभिप्रेत असतात. अर्थव्यवस्थेतील कोणत्याही क्षेत्रात उत्पाद-न, गुंतवणूक व वितरण यासाठी मुक्त प्रवेश आणि कोणत्याही उद्योगांतून मुक्तपणे बाहेर पडण्याने स्वातंत्र्य या अटी पूर्ण झाल्यास उदारीकरणाची- नीति अंमलात आणण्यात आली असे म्हणता येईल. आर्थिक उदारीकरणामुळे बाजाराधिष्ठित किंमत यंत्रणेतील अडथळ्यांनी समस्या काही प्रमाणात दूर करता येते.

आर्थिक उदारीकरणानी प्रक्रिया आपल्याला ती-न विविध टप्प्यात दर्शविता येईल.

१. किंमतीवरील ि-नयंत्रणे कमी करणे.

२. श्रम बाजारात व भांडवल बाजारात शिथिलता.

३. वित्तीय बाजाराचे उदारीकरण.

देशातील विविध वस्तू व सेवन यातील किंमत ि-नर्बंध दूर केल्यास वाटप योग्य प्रकारे होण्यास मदत होते असे भांडवलशाही राष्ट्रात मा-नण्यात येते. किंमती बाजारात शासनाच्या धोरणास शिथिलता आणणे हा उदारीकरणाचा पहिला टप्पा होय.

देशांतर्गत श्रमबाजार आणि भांडवलबाजार अधिक मुक्त होण्याच्या दृष्टी-ने या बाजारावरील ि-नयंत्रणे उदारीकरणाच्या दुसऱ्याच टप्प्यात सैल करण्यात येतात. त्यामुळे उत्पादक घटकांनी गतिशीलता वाढण्यास मदत होते. पण कायद्यातील सुधारणा हा यातीलच एक महत्त्वपूर्ण भाग होय. श्रमिक कायदे कडक असल्यास उद्योजकांने कामगारांवरील ि-नयंत्रण सैल होऊ-न उत्पादकतेवर त्याचा परिणाम होतो असे मानण्यात येते. त्यामुळे या कायद्यात सुधारणा होण्याचे दृष्टीने उदारीकरणाच्या धोरणात प्रयत्-न करण्यात येतात.

आर्थिक उदारीकरणाच्या तीसऱ्या टप्प्यात पतपुरवठ्याच्या वाटपात शिथीलता आणण्यात येते. गुंतवणूकीने प्रसरण विविध क्षेत्रात होण्यासाठी या धोरणाचा पुरस्कार करण्यात येतो. वित्तीय व्यवस्थेत असलेली विविध ि-नयंत्रणे या धोरणाच्या माध्याने कमी करण्यात येतात. बाजाराधिष्ठित व्याजदर हा यातीलच एक महत्वपूर्ण भाग असतो. कमीत कमी औपचारिकता कर्ज घेणाऱ्याला पूर्ण करता येईल अशा प्रकाराच्या धोरणांची आखणी यात अभिप्रेत आहे. गूंतवणूकीला चलनाच्या माध्यमाने मिळू शकेल असा आशावाद व्यक्त करण्यात येतो.

उदारीकरणानी प्रक्रिया विदेशी व्यापार, भांडवल प्रवाह, तंत्रज्ञन-ाची देवाण-घेवाण यातील शिथीलीकरणाने पूर्ण होते. या धोरणांचा अवलंब केल्याने परिमणण बंधने संपुष्टात येऊन मुक्त व्यापाराची प्रक्रिया आरंभ होण्यास मदत होते. आर्थिक उदरीकरण हे साध्य नसून आर्थिक विकास हे स्थैर्य, राहणीमानात सुधारणा इत्यादी उद्दिष्टांचीपूर्ती करण्याने साध-न आहे हे लक्षात घेतले पाहिजे. महत्त्वाच्या क्षेत्रात जसे शिक्षण, आरोग्य सेवा, लोकोपयोगी सेवा, चलन व्यवस्था इत्यादी प्रकारच्या अनेक क्षेत्रात सहकारी सहभाग महत्त्वाचा असतो. संपूर्ण उदारीकरणाला आणि भांडवलशाहीला लगाम घालण्याचे कर्तव्य शेवटी सरकारलाच करावे लागते ही बाब दुर्लक्षू-न चालणार -नाही.

उदारीकरणातच जागतीकीकरणाची प्रक्रिया अभिप्रेत आहे. त्यामध्ये फारसे अंतर आढळत -नाही. जागतीकीकरण म्हणजे व्यापार, वित्त रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, राहणीमान, शासन, समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व क्षेत्रातू-नच होत राहणारे रुपांतर होय असे म्हणता येईल. जागतीकीकरण म्हणजे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतीक अशा सर्व क्षेत्रातू-न सीमांनी मर्यादा दूर करुन आजवर उभी केलेली अडथळ्यांची- नीति काढू-न टाकणे होय. जागतीकीकरणा-ने व्यापाराचा विस्तार, कक्षा व प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढले आहे. १९८६ च्या अखेरीस बहुराष्ट्रीय व्यापारी वाटाघाटीसाठी गॅट अंतर्गत व्यापाराच्या संदर्भात ि-नयमांचा मसूदा तयार करण्यास सुरुवात झाली. या वाटाघाटीतून गॅट १९९४ च्या कराराची ि-नष्पत्ती झाली. यातू-नच ९ जा-नेवनरी १९९५ पासून जागतीक व्यापारी संघट-ना उभी राहिली आहे. भारत सरकारने १९९० च्या आर्थिक संकटावर ि-नयंत्रण करण्यासाठी शिथीलीकरण, खाजगीकरण आणि जागतीकीकरण अशा तिहेरी आर्थिक सुधारणा सुरु केल्या. उदारीकरणाने लायसे-न्स आणि परमिट राज नाहिसे केले. खाजगीकरणाने गुंतवणूकीने सरकारी क्षेत्र कमी करण्याचे धोरण स्वीकारले. खाजकीकरणा-ने खाजगी औद्योकीगीक क्षेत्रासाठी स्पर्धात्मक वातावरण ि-नर्माण करु-न उपभोक्त्याला विविध वस्तूंना ि-नवडीने स्वातंत्र्य प्राप्त करु-न दिले. जागतीकीकरणाच्या व्यापार आणि गुंतवणूक ही खुलेपणा-ने व्हावी असा एक अर्थ अभिप्रेत आहे. जागतीकीकरणाने विविध फायदे भारतासारख्यच अर्थव्यवस्थेला मिळू शकतील असा अंदाज व्यक्त करण्यात येतो.

**जागतीकीकरण व उदारीकरणाने भारताच्या दृष्टीने लाभ :-**

१.उत्पादनच क्षमतेचा योग्य वापर होण्यची शक्यता वाढते.

२.विविध प्रकारच्या अंतर्गत बचतीने लाभ अर्थव्यवस्थेला प्राप्त होऊ शकतात.

३.विविध क्षेत्रात उत्पाद-ाच्या वाढीला प्रोत्साह-न मिळते.

४.उत्पन्नाची विभागणी समाजातील विविध गटात अधिक समतेनुसार होऊ शकेल.

५.उदारीकरणाने व जागतीकीकरणा-ने तंत्रज्ञानाच्या देवाण-घेवाणीत वाढ होऊन विकासाची- नवी क्षेत्रे तयार होतात.

६.विविध देशातील -नव--नवी-न संशोध-नाचा लाभ विकासासाठी प्राप्त करता येतो.

७.जगतीकरणामुळे अर्थात उदरीकरणा-ने व्यवस्थाप-न कौशल्यात सुधारणेची शक्यता वाढते आणि कामगारांच्या दृष्टीकोनात बदल होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.

८.स्पर्धात्मक वातवारण तयार झाल्याने कामाच्या संस्कृतीत देखील बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

९.समाज परिवर्तनाची प्रक्रिया उदारीकरणामुळेच सुरू होऊन आर्थिक विकासाला चालना मिळू शकेल.

१०.भारताच्या विदेशी गंगाजळीत (तीजोरीत) सुधारणा होऊन भारतावरील विश्वास वाढविण्यास मदत होऊ शकेले.

११. भारताच्या निर्यात व्यापरात भरपडेल त्यामुळे येथील लोकांची आर्थिक समृद्धी बाढण्याबरोबरच भारताची ओळख प्रखर होत जाईल.

१२. मुक्त व्यापारामुळे कुठल्या प्रकाराच्या वस्तूला विदेशी बाजारपेठ प्राप्त होऊ शकेल याबाबतचे संकेत प्राप्त होतील. विशिष्ट िनर्यातीवर लक्ष केंद्रीत केल्यास भारताला फायदा होण्याची शक्यता निर्माण होईल.

**उदारीकरणाचे / जागतीकीकरणाचे दोष किंवा धोके :-**

१. जागतीकीरणामुळे किंवा उदारीकरणामुळे भारतासारख्या राष्ट्राला कर्जाच्या सापळ्यात अडकण्याचा धोका संभाव्य आहे. आयातीत वाढ होऊन विदेशी देणी फेडण्यासाठी कर्ज वाढणे आवश्यक होईल.

२. भारतीय उद्योजक बहजुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करण्यास सक्षम न राहिल्यास आजारी उद्योगांची संख्या वाढण्याची भिती सतत लागून राहिल.

३. बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या वस्तूच्या किंमती कमी ठेवून भारताची बाजारपेठे काबीज करण्याचा प्रयत्न करीत राहतील. आज चीनने भारताचा इलेक्ट्रॉनिक, खेळणी व तत्सम वस्तूंबाबत बाजार मोठ्या प्रमाणावर काबीज केला आहे.

४. उदारीकरण व जागतीकीकरणामुळ चैनीच्या वस्तूंची मागणी वाढते. त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन कमी होऊन वस्तूंचा तुटवडा निर्माण होण्याची भिती राहते. वस्तुंच्या किंमती वाढतात.

५. जागतीकीकरण, उदारीकरण, मुक्तस्पर्धा, बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्था यामुळे विविध राष्ट्रांच्या एकीकरणामुळे मुक्त व्यापार या धोरणाला धोका संभवतो.

६.अर्थव्यवस्थेच्या या जागतीकीकरणामुळे बेरोजगारी वाढण्याची भिती वाढते. रोजगारीच्या रचनेत जागतीकीकरणामुळे बदल होतो. बदलत्या तंत्राशी अवगत होण्यास बराच कालावधी लागतो. कौशल्यजनीत श्रम कमी पडते. त्यामुळे बेरोजगारी वाढते.

७.स्वेछा िनवृत्ती सारख्या योज-नांचा अवलंब करण्यात येतो. यामुळे सामाजीक संतुलन विस्कळीत होऊन विविध समाजिक समस्यांना अर्थव्यवस्थेला तोंड द्यावे लागते.

८.भारतातील सुधारणानंतरचे भारतीय अर्थव्यवस्थेचे चित्र बघतल्यास त्यात गेल्या १०-२० वर्षात फार काही बदल झाल्याचे जाणवत नाही. आर्थिक सुधारणांनंतर अनुकूल आणि प्रतिकूल असे दोन्ही परिणाम झाल्याचे आढळते.

९. आर्थिक सुधारणानंतरचे भारतीय अर्थव्यवस्थेचेचित्र बघितल्यास त्यात गेल्या १०-२० वर्षात फार काही बदल झाल्याचे जाणवत नाही. आर्थिक सुधारणानंतर अनुकूल आणि प्रतिकूल असे दोन्ही परिणाम झार्लयाचे आढळते.

जागतीक भांडवली पद्धतीने महत्वपूर्ण लक्षण म्हणजे राज्ये आपापली कल्याणकारी व्यवस्थेची बांधीलकी बाबतची क्षमता हळू हळू -नाहीशी करीत आहेत. व्याजाचा दर, मुद्रास्थिती आणि वि-नीमय दर याबाबतची स्वायतत्ता घसरू लागली आहे. आता कल्याणकारी राज्य ही संकल्पनाच संपुष्टात येत आहे. जागतीकीकरण, उदारीकरण विविध प्रकारच्या समस्या निर्माण करणार यात वाद नाही. परंतु, बंद व्यवस्थेपेक्षा खुल्या अर्थव्यवस्थेमुळे भारताला नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. अर्थव्यवस्थेसाठी काय चांगले आणि काय वाईट या बाबतच्या आपल्या कल्पनाच मुळात बदलत आहेत. या कल्पना चूक किंवा बरोबर असतील परंतु, याचा फार मोठा परिणाम अर्थव्यवस्थेवर होणार आहे.

**बहुरष्ट्रीय महामंडळे किंवा ि-नगम** (Multi-National Corporation ) :-

बहुराष्ट्रीय कंप-न्या या खूप मोठया अशा औद्योगिक संघट-ना असतात. हे ि-नगम त्यांच्या शासनाद्वारे आपल्या औद्योगीक आणि खरेदी विक्रीच्या व्यवहारांचा विस्तार करतात तसेच या विस्तारतात त्यांना त्यांच्याशी संलग-न असलेल्या आणि कंप-नीचा बहुतांश भांडवलाची मालकी असणाऱ्या विदेशी कंपन्यांची ही मदत होते. या निगमाला आंतराष्ट्रीय निगम (Trans National Corporation - TNC) असे ही म्हणतात. हे निगम एक किंवा दोन वस्तूंपासून महत्तम नफा मिळविण्याचा उद्देश न ठेवता अनेक क्षेत्रात व्यवाहार ठेवतात. या दृष्टीकोनामुळे त्यांची व्यापारी व्यूहरचना अनेक वस्तू हाताळण्याची असून त्यांचे व्यवहार अनेक देशांमध्ये चालत असतात. सध्या असे ४०,००० बहुराष्ट्रीय ि-नगत असू-न त्यांची पकड त्यांच्याशी सलंग-न असणाऱ्या जगातील २,५०,००० कंप-न्यांद्वारे जागतीक अर्थव्यवस्थेवर प्रस्थापित झाली आहेत. १९८२ साली २०० मोठ्या बहुराष्ट्रीय कंप-न्यांची विक्री जगाच्या सकल देशी उत्पत्तीच्या (GDP) २४.२% होती. यावरु-न या ि-नगमांच्या अवाढव्य साध-न संपत्तीची आणि त्यांच्या व्याप्तीची सहज कल्पना लावता येईल. सर्वात मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या आता जागतील आर्थिक व्यवहाराच्या २५ टक्क्यापेक्षा अधिक व्यवहारांवर नियंत्रणस ठेवतात. वाशिंगट-नच्या संस्थे-ने केलेल्या पाहणी-नुसार जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी ५१ बहुराष्ट्रीय ि-नमग होते तर देशांचीसंख्या ४९ होती. यावरु-न या बहुराष्ट्रीय कंपन्याच्या प्रचंड आकाराची कल्पना येते. या बहुराष्ट्रीय कंपन्याचे अवाढव्य भांडवली ध-न, अद्ययावत तंत्रज्ञा-न अणि जागतीक प्रतिष्ठेमुळे या कंप-न्या त्यांना वाटेल त्या वस्तू ि-नर्रा-नरनळ्या देशांमध्ये उत्पाद-न करु-न विकू शकतात. या बहुराष्ट्रीय ि-नगमांचे जागतीक अर्थव्यवस्थेवर वर्चस्व आणि ि-नयंत्रण प्रस्थापित झाले आहे.

**वाडीची करणे :-**

१.बाजारपेठांच्या क्षेत्राचा विकास

२.विपण-नाची श्रेष्ठता

३.वित्तीय श्रेष्ठता

४.तांत्रिक श्रेष्ठता

५.वस्तूंचे –नवप्रवर्त–न

कोणत्याही व्यापारी संस्थेचे व्यवहार जेव्हा वाढू लागतात आणि तीची आंतरराष्ट्रीय प्रतिमा उजळते. तसे तीचा प्रयत्न आपले व्यवहार देशापुरते मर्यादीत न ठेवता इतर देशातही जातात. बहुराष्ट्रीय कंपनी देशी व्यापारी संस्थेच्या तुलनेत विपणनाचे बाबतीत अनेक पटीने श्रेष्ठ असते. उदा. बाजाराचे अद्ययावत ज्ञान, माहिती तंत्र असते, बाजारात प्रतिष्ठा असते, अधिक प्रभावी व श्रीमंत असते, जाहिरातीवर भरपूर खर्च करतात, मोठ्या पगाराचे बुद्धीमान लोक असतात. उत्तम गोदामांची व्यवस्था असते.

बहुराष्ट्रीय कंप–नीला राष्ट्रीय व्यापारी संस्थेच्या –तुलनेत वित्तीय श्रेष्ठता असते. वित्तीय संसाध–नांची रेलचेल असते. विविध देशात उलाढाल असल्या–ने भांडवल खेळते राहते. कोणत्याही बाजारात या कंपन–या सहज प्रवेश करतात. इतर देशातील गुंतवणूकदार आणि बँका अशा कंप–नीत पैसा लावण्यास तत्पर असतात.

मोठ्या स्तरावरील बहुराष्ट्रीय कंपन्यांजवळ तांत्रिक व्यवस्था व ज्ञा–न असते, ते सरस्वतीला कामाला लावून लक्ष्मीचा आशिर्वाद घेतात. अविकसीत देश स्वत:च्या बळावर औद्योगीकरण करु शकत –नाहीत. परंतू, बहुराष्ट्रीय कंप–न्या उद्योगाला लागणाऱ्या सर्व बाबी स्वतः बरोबर आणतात. अविकसीत देशांना यांचा सामाना करणे शक्य होत नाही. बहुराष्ट्रीय कंपन्या अशा देशांना उत्पादनात व दर्जा सांभाळण्यास मदत करतात.

बहुराष्ट्रीय कंपन्याशी संशोधन आणि विकास विभाग स्थापन केले असून तेथे नवीन वस्तूंचा विकास आणि जुन्या वस्तूंचे अधिक श्रेष्ठ संकल्प चित्र तयार करण्याचा प्रयत्न केला जातो.

**भारत आणि बहुराष्ट्रीय कंप–न्या :–**

बहुराष्ट्रीय कंपन्यांची भारतीय अर्थव्यवस्थेवर घट्ट पकड आहे. दोन दशकापूर्वीही या कंपन्यांनी भारतातील मोठ्या क्षेत्रातील ५३.७% मालमत्तेवर नियंत्रण मिळविले होते. १९६० च्या मध्य शतकात भारताच्या मोठ्या व्यापारी क्षेत्रावर पाश्यात्य विदेशी भांडवलाचे वर्चस्व होते. बहुराष्ट्रीय निगमांच्या भारतातील व्यवहाराबद्दल लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे त्यांनी गुंतविलेल्या साधन संपत्तीपैकी बहुतांश धन भारतातच उभारले होते. वास्तविक परिस्थिती अशी आहे की, या विदेशी कंपन्या त्यांना लागणारे बहुतांश भांडवल भारतातच गोळा करतात. परंतु, त्यांना मिळणारा नफा त्यांच्या मायदेशी प्रत्यावर्तित करतात. भारतीय उद्योगांमध्ये सहभागी होण्याचा बहुराष्ट्रीय कंपन्यांचा सामान्य प्रकार म्हणजे भारतीय उद्योगांबरोबर सहयोगाचा (कोलेबरेशन) करार करणे, या करारामध्ये तंत्रज्ञानाची विक्री तसेच अंतिम वस्तूंच्या विदेशी चिन्हांच्या (ब्रँड) उपयोगाबाबत तरतूदी असतात. स्वातंत्र्यानंतर भारतात मोठ्या आणि मध्यम आकाराच्या गटात स्थापण्यात आलेल्या बहुतेक सर्व नवीन उद्योगांमध्ये विदेशी सहयोगाबाबतचा करार कोणत्या ना कोणत्या स्वरुपामध्ये अस्तित्वात

होता.

यावरु–न, भारतातील विदेशी सहयोगाच्या व्यापकतेची कल्प–ना येते. लाभांश, –नफा, स्वामीत्व, तांत्रिक शुल्क आणि व्याज यच विविध रुपन–ने भारतातू–न विदेशी गुंतवणूकदारांकडे मोठ्या प्रमाणात पैशाचा ओघ सुरु असतो. देशी विक्रयशिलतेला दाबून ठेवणे, मालाचे अनावश्यक विभेदीकरण, मोठ्या जाहिराती, भरमसाठ नफा मिळविणे यासारख्या अल्पधिकारी प्रथांचा विस्तार, अयोग्य असे तंत्रज्ञान आणि अयोग्य माल पुरविणे, उच्च उत्पन्न असणाऱ्या समृद्ध लोकांसाठी उत्पादन यंत्रणा राबवू–न उत्पन्नाने वितरण असमा–न करणे अशा विविध मार्गाने या विदिशी कंपन्या यजमान देशांना हानी पोहचवितात. विदेशी गुंतवणूकीमुळे नवसाम्राज्यावाद आणि पिळवणूकीला उत्तेजन मिळते. या विदेशी कंपन्यांच्या प्रचंड अशा वित्तीय आणि तांत्रिक शक्तीमुळे त्या अविकसीत देशांच्या –िनर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकू शकतात. या कंप–न्या देशाच्या अंतर्गत कारभारात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या हस्तक्षेप करीत असल्यामुळे अविकसीत देशातील सरकारां–ना त्यांची प्रकारे भीती वाटते. यामुळे यजमान देशाची स्वायत्तता आणि सर्वाभौमिकता धोक्यात येते. या कंपन्या संशोधन आपल्या देशात करतात. परंतु, त्याचा खर्च यजमान देशांकडून वसूल करतात. नवीन अद्यावत तंत्रज्ञाची आयात आणि उपयोग मोठ्या प्रमाणावर करीत राहिल्यास बेरोजगारी वाढून अविकसीत देशांच्या अर्थव्यस्थेवर अनिष्ट असे गंभीर परिणाम होऊ शकतात. अशा तंत्रज्ञामुळे अविकसीत देशांच्या बाजारपेठाही विकसीत होऊ शकणार नाहीत. बहुउद्देशीय आयोगांच्या व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबादारी भारतात निरनिराळ्या सरकारी खात्यांकडे सोपविण्यात आली आहे. यापैकी प्रमुख संस्था म्हणजे कंपनी कारभाराचे मंत्रालय, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, औद्योगिक विकास मंत्रालय, वित्त मंत्रालय वगैरे. परंतु, या विविध एजन्सीजमध्ये घनिष्ट आणि संपूर्ण सहकार्य असल्याचे आढळून येत नाही. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यवहारावर १९७३ च्या विदेशी नियमन कायदा (फेमा) यानुसार नियंत्रण ठेवण्यात आले आहे.

## जागतीक व्यापार संघट–ना (World Trtade Organization- WTO) :–

दुसऱ्याच महायुद्धा–नंतर अनेक देशांनी एकत्र येऊ–न १९४७ मध्ये २३ देशनांनी शुल्क आणि व्यापाराचा सामान्य करार केला. याला गॅट करार असे संक्षिप्त –नामकरणा–नी ओळखले जाते. या गॅटचा भारत संस्थापक सदस्य होता. १९९४ मध्ये गॅटले (ज–नरल ॲग्रीमेंट ॲण्ड ट्रेड) एकूण ११८ सदस्य होते. या कराराद्वारे नियमकरून आंतरराष्ट्रीय व्यापाराला उत्तेजन देण्याचा प्रयत्न केला. 'विशेष पसंत देश' (WTO) हे गॅटचे मार्गदर्शक तत्व आहे. या कलमांचा उद्देश दुतर्फा करार टाळू–न बहुराष्ट्रीय करारांना उत्तेज–न देण आणि जागतीक व्यापाराचा विस्तार करणे हा होता. १९४७ पासून गॅटच्या अनेक सभा झाल्या. या सभांमधू–न आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविण्यासाठी विविध उपाय योजना करण्यात आल्या. गॅटचे डायरेक्टर जनरल ऑर्थर डंकेल यांनी पुढे एक आराखडा तयार केला. हा आराखडा 'डंकेल आराखडा' या नावाने प्रसिद्ध आहे. या आराखड्यावर १५ एप्रिल १९९४ चा सदस्य राष्ट्रांनी सह्या केल्या. बहुराष्ट्रीय व्यापार व्यवस्थेशी जुळून रहावे या हेतूने भारत आणि इतर विकसनशील देशांनी या करारावर सह्या केल्या. या करारानुसार जागतीक व्यापार संघटना (WTO) स्थापण्याचा मार्ग मोकळा होऊन ही संस्था १ जानेवारी १९९५ ला अस्तित्वात आली. या करारावर

भारताने संस्थापक सदस्य म्हणून सही केली. आता या संस्थचे १४४ देश सभासद आहेत. ही संघट–ना कायम स्वरूपाची असून वस्तूंचा आणि सेवांचा व्यापार, विदेशी गुंतवणूक, बौद्धिक मालमत्तेचा हक्क इत्यादी विषयांबाबत ती सदस्य राष्ट्रांना मार्गदर्शन करेल अशी अपेक्षा आहे. या संघटनेची (WTO) प्रमुख पाच कार्ये आहेत..

१. जागतिक व्यापारी संघटना या कराराच्या अंमलबजावणी, प्रशासन आणि कार्यवाहिता आणि उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी आणि बहुद्देशीय व्यापार करार आणि अंमलबजावणी यासाठी आराखडा तयार करेल.

२. या कराराच्या अंतर्गत असलेल्या विषयांबाबत बहुद्देशीय व्यापार संबंधाबाबत जागतीक व्यापार संघटना, सदस्यांमधील वाटाघाटीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देईल.

३. संघर्ष सोडविण्याबाबतचे नियम आणि प्रक्रिया याबाबतचे प्रशासकीय व्यवहार जागतीक व्यापार संघटना सांभाळेल.

४. जागतिक व्यापार संघटना व्यापार धोरण पुनरावलोकन यंत्रणेचे प्रशासनही सांभाळले.

५. जागतिक आर्थिक धोरण तयार करण्यात अधिक सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने जागतीक व्यापार संघटना आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक आणि संलग्न संस्थांशी सहकार्य करेल.

**संरच–ना :–**

संरचनेच्या दृष्टीने मंत्री परिषद ही सर्वश्रेष्ठ संस्था आहे. या संस्थेत सर्व सदस्य राष्ट्राचे प्रर्ति–नधी असू–न या संस्थेची बैठक दोन वर्षात किमान एकदा होते. या व्यतिरिक्त एक समान्य परिषद (ज–नरल कौन्सील) असू–न या परिषदेत सर्व सदस्य राष्ट्रांचे प्रर्ति–नधी असतात. ही सामान्य परिषद मुख्यत: मंत्री परिषदेची कार्ये अंमलात आणते. सामान्य परिषद संघर्ष ि–नवारक संस्था आणि व्यापार धोरण पु–नरावलोक–न संस्थेच्या बैठकी ही बोलावते. शिवाय सामान्य परिषदेच्या अधिपत्याखाली –

१. मालाच्या व्यापाराबाबत परिषद

२. सेवांच्या व्यापाराबाबत परिषद आणि

३. व्यापाराशी संबंधीत विषयांबनबत बौद्धिक मालमत्तेच्या हक्काबाबत परिषद

अशा स्वतंत्र परिषदा स्थाप–न करण्यात आल्या आहेत.

**जागतिक व्यापार संघट–नेचे करार :–**

१. कृषी विषयक करार

२. वस्त्राबाबत करार

३. कारखाना माल करार

४. गुंतवणूकीबाबत करार

५. बौद्धिक मालमत्तेबाबत करार

६. सेवांबाबत करार

७. संघर्ष ि-नवारक करना

कृषी करारामध्ये कृषी व्यापाराच्या दीर्घकाली-न सुधारणनांचा आणि देशी धोरणाचा पुढील काळासाठी आराखडा देण्यात आला असू-न कृषीव्यापार अधिक बाजाराभिमूख व्हावा हा यात उद्देश आहे.

वस्त्र किंवा कापड व्यापारासंबंधी आयात धोरण ठरविणे व त्याचेवर पु-नर्विचार करण्याचे अभिप्रेत आहे. कारखा-ना मालाबद्दल विकसीत देशांनी जकात शुल्क कमी करावा असे पुढे मान्य करण्यात आले.

गुंतवणूकीच्या संदर्भात समा-न वागणूक देण्याचे आणि परिणामकार ि-नर्बंध दूर करण्याचे आव्हान करण्यात आले आहे. बौद्धिक मालमत्तेच्या हक्कांबाबत करारामध्ये पेटेंट, उपयोगी प्रतिमाने, ट्रेड मार्क्स आणि औद्योगीक रचना समाविष्ट आहेत. या कराराची व्याप्ती वाढविण्यात येवून त्यात पेटेंट, कर्नेपीरनईट, भनैगनेलीक ि-नर्देशांक, औद्योगीक रच-ना, जाहिर -न केलेल्या माहितीचे संरक्षण इत्यादी बाबी अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.

सेवांबाबत करारात बँकींग, वीमा, पर्यट-न, समुद्र वाहतुक, श्रमाची गतीशिलता इत्यादी बाबींचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. संघर्ष ि-नवारक संस्थेमुळे गॅटच्या काळात असलेले प्रक्रियासंबंधी विलंब आणि इतर दोष आतना दूर करण्यात आले आहेत. संघर्ष मिटविण्यासाठी मुदत १८ महि-ने ठरविण्यात आली असू-न या संस्थने ि-नष्कर्ष संबंधीत पक्षनं-ाच बंध-नकारक आहेत.

**भारत आणि जागतीक व्यापार संघट-ना :-**

जागतीक व्यापार संघट-नेचा सदस्य झयल्ययमुळे भारताला संभनव्य फायदे-तोटे किंवा लाभ-अलाभ किंवा जमनी व उणी बनजू पुढील प्रमाणे सांगता येईल -

**लाभ :-**

१. भारत सरकारच्या निवेदनानुसार काही बाबतीत (वस्त्र,कृषी जंगली वस्तू, मस्य वस्तू) भारताच्या निर्यातीची स्पर्धात्मक अनुकूलता असल्यामुळे या क्षेत्रात भारताला मोठा फायदा होईल. अशी अपेक्षा आहे.

२. परिणामाचे निर्बंध हटविल्यावर त्याचा फायदा भारताप्रमाणेच इतर देशांनाही होईल. भारताला स्पर्धेत उतरावे लागल्याने त्याच्या कार्यक्षमतेत ही भर पडले.

३. देशी वित्तीय सहाय्य आणि व्यापारातल अडथळे दूर करण्यात आल्यामुळे शेतमालाच्या जागतिक किंमती वाढण्याची शक्यता आहे. यामुळे भारताच्या शेतमालाची निर्यात वाढून भारताला फायदा होण्याची शक्यता आहे.

४. उरुग्वे फेरीच्या करारामुळे बहुराष्ट्रीय निगत आणि शिस्त सुदृढ झाली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवस्थेत आधिक सुरक्षितता आणि स्थैर्य प्रस्थापित होण्याची शक्यता आहे आणि त्यामुळे नवीन जागतीक अर्थव्यवथेत भारताकरीता अधिक अनुकूल वातावरण निर्माण होऊ शकेल.

**अलाभ :-**

१.भारताला शेतमालाच्या निर्यातीत वाढ होण्याची शक्यता बरीच कमी आहे. कारण, भारतातील कृषी क्षेत्रातील उदारीकरणाचे प्रमाण मर्यादित आहे. वस्तूंवरील प्रशुल्क कपातीमुळे भारताचा फारसा लाभ होण्याची शक्यता फारच कमी आहे.

२. बौद्धिक  मालमत्तेच्या हक्कांसंबधी कायदा मुठभर विकसित देशांनाच होण्याची शक्यता अधिक आहे. याचे कारण जागातील जेमतेम १० देशांमध्येच तंत्रज्ञान विषयक व्यवहार आणि संशोधन सुरू आहे. बहुउद्देशीय कंपन्यांच्या मक्तेदारीला 'कायदेशीर' स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला दिसतो. बौद्धिक मालमत्तेच्या हक्काचे संरक्षण हेच व्यापाराला मोठा अडथळा आहे.

३. बौद्धिक मालमत्तेच्या हक्काविषयीचा करार अनेक बाबतीत पेटेंट कायदा १९७० च्या विरुद्ध आहे. या कायद्यानुसार पेटेंट केवळ २० वर्षासाठीच असते. वेगवेगळ्या वस्तूंचे पेटेंट देण्याबाबत मर्यादित एक सुत्रता -नाही.

४. -नवी-न व्यवस्थेत प्रस्थापित नियमांत बदल होईल, वस्तूंचे पेटेंट दिल्यामुळे भारतीय औषधी उद्योगाची सुत्रे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हाती जातील व त्याचा फायदा मोठ्या कंपन्यांनाच होइ्रल. औषणांच्या किंमती वाढल्याने भारतीय लोकांच्या आरोग्याची पातळी घसरण्यात होईल.

५. आपल्या उत्पत्ती विज्ञान (Genetic) संसाधनाचे नियंत्रण हळूहळू बहुराष्ट्रीय कंपन्यांकडे जाईल आणि त्यांना भारतातील बी-बियाणांच्या उत्पादनाचे नियंत्रण करणे कठीण जाणार नाही. बी-बियाणांचे नियंत्रण म्हणजे अन्न पुरवठ्यावरील नियंत्रण असल्यामुळे संपूर्ण भारतीय अन्न सुरक्षा व्यवस्थाच धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

६. जागतिक व्यापार संघटनाच्या करारामुळे विकसनशील देशांना स्वावलंबी अशा वृद्धीच्या कोणत्याही योजना करणे किंवा व्यूहरचना आखणे अशक्य होईल. अशा देशांच्या देण्या-घेण्याच्या आढाव्याच्या परिस्थितीवर प्रतिकूल परिणमा होण्याची शक्यता आहे.

७.- अनेक विकसनशील देशातील सेवा उद्योग आरंभीच्या व्यवस्थेत असून नवीन करारामुळे त्यांच्या प्रगतीला खीळ बसेल. भारतीय कंपन्यांना या विदेशी कंपन्यांशी सेवा क्षेत्रात स्पर्धा करणे कठीण जाईल.

८. टीकाकारांच्या मते, जागतीक व्यापार संघटनेच्या व्यवहारामुळे स्वतंत्र राष्ट्राच्या कार्यक्षेत्रावर आणि अधिकारावर अधिकाधिक आक्रमण होण्याची शक्यता आहे. नवीन करारानुसार (गॅट करार) जागतीक व्यापार संघटनेने स्वतंत्र राष्ट्राच्या सार्वभौमकतेवर आक्रमण केले आहे. या करारात नावाजलेल्या विकसनशील देशांच्या हितसंबंधाचा बळी देण्यात आला आहे. स्वतंत्र राष्ट्राच्या सार्वभौमिकतेच्या दृष्टीने ही धोक्याची घंटा आहे.

थोडक्यात म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापारी क्षेत्रात 'बळी तो कानपिळी' हीच स्थिती राहण्याची शक्यता आहे. विकसित देशांचे आव्हान स्वीकारण्यासाठी सर्व विकसनशील राष्ट्रांनी एकजूट होवून जागतिक व्यापार संघटनेच्या भाविष्यातील वाटाघाटीमध्ये आपले

हितसंबंध जपण्याचा कसोशीने प्रयत्न केला पाहिजे.

*** गॅट करार** (GATT- General Agreement Trarriffis and Trade)

गॅट १९९४ हा सर्व राष्ट्रांच्या विचाराने, देवाण-घेवाणीने, तडजोडीने झालेला समझोता आहे. यात विकसनशील देशांना विकसित देशांच्या बरोबरीने येण्यास वाव व कालावधी नमूद केलेला आहे. याने कुठल्याही एका देशाचे पूर्ण समाधान झालेले नाही. पुन्हा वाटाघाटीला यात मुभा ठेवलेली आहे. वाटाघाटीने समझोता व अंतिम उपभोक्त्याचे हित हा गॅट १९९४ चा पाया आहे. आजवरच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढते प्रशुल्क, वाटा पद्धत, निर्यात-वस्तू स्वस्त राखण्यासाठी निर्यातदारांना आर्थिक सहाय्य अशा सारखे जे अडथळे आले ते घालविण्याचे, कमी करण्याचे गॅट १९९४ हे व्यासपीठ होते. या वाटाघाटीतून जागतीक व्यापार संघटनेची स्थापना झाली व ती १ जानेवारी १९९५ पासून कार्यान्वित झाली.

गॅट १९४७ पासून नसलेले पण गॅट १९९४ मध्ये पुढील विषय नव्याने आणलेले आहेत.

१.कृषी उत्पादनाचा व्यापार

२.उत्पादकांना मिळणारा समग्र आधार (सपोर्ट)

३.अर्थसहाय्य / सवलत (सबसीडी)

४.बौद्धिक स्वामीत्वाचे अधिकार

५.तक्रार निवारण यंत्रणा

कृषी मालाच्या खुल्या व्यापारात तीन प्रकारच्या अडथळ्यांनी, आयात महाग व निर्यात स्वस्त राहिल. यासाठी संरक्षक कवच निर्माण केले होत. गॅट १९९४ मध्ये प्रथमच बौद्धिक सामित्वाच्या अधिकाराचा समावेश केला होता. यात पेटेंट मिळवून नवे तसेच नवा टप्पा गाठणारे संशोधन करणाऱ्यांचे अधिकार शाबूत राखण्याची तरतूद आहे. कृषी संबंधात वनस्पतींचे वैविध्य राखण्याचा व नवनवीन बियाणांचा विचार बौद्धिक स्वामित्वाच्या अधिकारात येतो. नवीन बियाणे शोधून काढणाऱ्यांकडून विकत घ्यावे लागते व त्याचा पुन्हा उपयोग करता येणार नाही. बियाणे पेरणीसाठी नव्याने विकत घ्यावे लागले. भारतीय शेतकऱ्यांचे स्वातंत्र्य हिरावले जात आहे. गॅट १९९४ मध्ये नव्याने समाविष्ट केलेले विषय, विशेषतः कृषी, बौद्धिक सामित्वाचे अधिकार इ. वादग्रस्त ठरले आहेत. गॅट १९९४ चा समझोता झाला तेव्हा विकसनशील देशांनी पूर्ण विचार, पूर्ण तयारी केलेली नव्हती. त्यातील कलमांचा कसा कायदेशीर परिणाम होईल याची कल्पना केली गेली नव्हती. पुढे काही वर्षांनी त्यातून बसणाऱ्या फटक्यांची जाणीव झाली. गॅट १९९४ व जागतिक व्यापार संघटना ही उघडपणे विषम व्यवस्था व विकसनशील देशांना अन्यायकारक ठरली आहे. भारताच्या आणि विकससनशील देशांच्या कृषी मालाच्या निर्यातीवर प्रगत देशांकडून, गॅट १९९४ च्या विषम समझोत्यामुळे येणारे अडथळे वाटाघाटीने दूर करवून घेऊन निर्यात वाढविण्यासाठी देशांतर्गत कृषी उत्पादन वाढविण्याचा नेटाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. गॅट १९४७, १९९४ व यातून पुढे निर्माण झालेली जागतिक व्यापार संघटना यांचा भारत हा संस्थापक सभासद आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर राष्ट्रा-राष्ट्रातील व्यापारावर असणाऱ्या परिणामपद्धती, जकाती यासारखी बंधने कमी करून आंतरराष्ट्रीय व्यापार शक्य तितका मुक्त व्हावा यादृष्टीने १९४८ साली जकात व व्यापार यासंबंधीचा सर्वसाधारण करार किंवा गॅट (General Agreement Trarriffis and Trade) ही संस्था स्थापण्यात आली. सुरुवातीला या गॅट २३ देश सभासद होते. आता ही संख्या १२७ पर्यंत वाढली आहे. भारत या संस्थेचा सुरुवातीपासून सभासद आहे. १९५५ साली गॅटने अविकसीत राष्ट्रांच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने एक विशेष योजना आखली होती. त्यानुसार राष्ट्रा-राष्टात भेद करणे व अनाठायी जकात वाढविणे याला बंदी आहे. भारताने सदस्य म्हणून ती तत्वे स्वीकारलेली आहेत. याचबरोबर राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक त्या धंद्यांना संरक्षण देऊन आर्थिक विकासासाठी योग्य ते करार मदार करण्याची भारतासारख्या विकसनशील देशांना आतापर्यंत मुभा होती. स्थापनेपासून १९८६ पर्यंत गॅटच्या एकूण ७ वेळा वाटाघाटी झाल्या असून बऱ्याच प्रमाणात जकातीचे प्रमाण कमी होण्याला आणि देशादेशांमधला व्यापार वाढण्याला मदत झाली आहे. गॅट कलम १८नुसार विकसनशील देशांना काही विशिष्ट परिस्थितीत देशाच्या हिताचे दृष्टीने जकाती व निर्बंध लावण्याची सवलत असल्यामुळे आतापर्यंत विकसनशील देशांनाही गॅटचा फायदा घेता आला आहे.

गॅटची आठवी फेरी १९८६ साली उरुग्वे देशात झाली. ही फेरी 'उरुग्वे फेरी' (१९८६-९०) या नावाने ओळखली जाते. ३० जून १९९३ पर्यंत जनरल आर्थर डंकेल गॅटचे डायरेक्टर जनरल होते. काही बाबत नवीन कराराचा संपूर्ण मसुदा जनरल डंकेल यांनी तयार केला असून तो 'डंकेल मसुदा' या नावाने ओळखला जातो.

डंकेल प्रस्तावात पेटेंटच्या सौद्धांतीक बाजूकडे दुर्लक्ष करण्यात आले असून पेटेंट धारकांचे हक्क, पेटेंटची व्याप्ती आणि पेटेंटचा कालावधी मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आला आहे. पेटेंटमुळे उच्च प्रकारची बियाणे बहुराष्ट्रीय कंपन्यांकडूनच शेतकऱ्यांना घेणे भाग पडेल. याचा परिणाम म्हणजे केवळ पीक रचनाचे नव्हे तर, उत्पादनाच्या प्रमाणावरही बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व येण्याची शक्यता आहे. वस्तू पेटेंटचीपद्धती सुरु झाल्यास बहुराष्ट्रीय कंपन्या याचा मक्तेदारी लाभ उठवतील. वस्तूंच्या किंमती वाढून ग्राहकांची पिळवणूक होईल. 'बौद्धिक मालतत्तेसंबंधीचा हक्क' या डंकले प्रस्तावाला मान्यता दिल्यामुळे विकसनशील देशांना आपले पेटेंट विषयक कायदे बदलावे लागतील. या प्रस्तावामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हिताचे संरक्षण करण्यात येऊन विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक हिताचा बळी दिला जाईल.

## ४.३ स्वयं अध्ययन प्रश्न

दीर्घोत्तरी प्रश्न

१. आर्थिक उदारीकरणची संकल्पना स्पष्ट करा आणि भारताच्या संदर्भात त्याच्या गुणदोषांचील चर्चा करा.

.................................................................................

.................................................................................

..........................................................................................

२. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यवहारांचा भारताच्या अर्थव्यवस्थेत होणारा परिणाम विषद करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३. जागतिक व्यापार संघटना काय आहे? जागतिक व्यापार संघटनांच्या प्रकारांची माहिती द्या.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४. भारताच्या संदर्भात जागतिक व्यापार संघटनांचे लाभ-अलाभ यावर प्रकाश टाका.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**लघूत्तरी प्रश्न**

१. आर्थिक उदारीकरणाचा भारतावर प्रभाव

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२. उदारीकरण व विकसनशील देश

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३. डब्लू. टी. ओ.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४. गॅट करार व भारत

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

५. बहुराष्ट्रीय कंपन्या व भारत

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

६. जागतिक व्यापार संघटना करार

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

७. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वाढीची कारणे

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

८. जागतिक व्यापार संघटनेची कार्ये (थढज)

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

## ४.४ सारांश

## ४.५ पारिभाषिक शब्द

# घटक ५
# भारतातील विकास आणि आधुनिकतेची प्रक्रिया
# (Process Of Development and Modernization in India)

## ५.0 उद्दिष्टे –

विकासाचे समाजशास्त्र समजून घेताना त्यातील संकल्पनाचे आकलन होणे आवश्यक असते. तेव्हा भारतीय समाजाच्या विकासाचे समाजशास्त्र समजून घेताना 'विकास', परंपरा आणि आधुनिकता' या प्रक्रिया संकल्पनात्मक स्तरावर समजून घेणे महत्त्वाचे ठरेल. या घटकांचा अभ्यास करताना आधुनिकता, आधुनिकीकरणाचे आयाम, परंपरा, सामाजिक स्तरीकरण, स्तरीकरणाचे विविध आधार, शोषण आणि शोषणाचे प्रारूप यासारखे महत्त्वाचे मुद्दे आणि त्याची व्यापकता व अद्यावत स्वरूपाचे ज्ञान प्राप्त होण्यास मदत होईल.

या घटकांचे अध्ययन केल्यानंतर अध्ययनार्थी खालील बाबी निश्चितच आत्मसात करू शकेल.

* भारतातील विकास आणि आधुनिकतेची स्थिती
* भारतातील परंपरा आणि आधुनिकता
* सामाजिक स्तरीकरण, स्तरीकरणाचे आधार आणि प्रकार
* सामाजिक स्तरीकरण व्यवस्थेचे आधुनिक समाजातील स्वरूप
* शोषणाचे स्वरूप
* आधुनिकीकरणामुळे उदयास आलेले नवीन वर्ग

या परिवर्तनाच्या प्रक्रियेतील मानवी समाजाचे अस्तित्व टिकून राहण्यासाठी रोजगाराची पर्यायी व्यवस्था व कामगार संबंध

## ५.१ प्रस्तावना –

सदर प्रकरणामध्ये भारतातील विकास आणि आधुनिकतेची प्रक्रिया समजून घेणे महत्त्वाचे आहे. तेव्हा प्रथम विकास या संकल्पनेचे तत्त्वज्ञान व अर्थ अभ्यासणे आवश्यक ठरेल. साधारणत: विकास म्हटले की, सर्वांच्या आकलनात केवळ आर्थिक संपन्नता, आर्थिक भरभराट आणि श्रीमंतीचा डामडौल यासारखी चित्र निर्माण होतात. वास्तवत: शास्त्रीय पद्धतीने अध्ययन करता यासारखा विरोधाभास 'विकास' संकल्पनेच्या संदर्भात दुसरा असूच शकत नाही. विकास म्हणजे केवळ 'आर्थिक विकास' असा समज करून घेतला तर 'विकास' या संकल्पनेतून 'दारिद्र्यता निर्मूलन' सूचित हाते. म्हणून 'विकास' ही संकल्पना

आर्थिक विकास आणि प्रगती या दोन्ही संकल्पनेपेक्षा व्यापक स्वरूपाची आहे.

प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन, यांनी विकास संकल्पना स्पष्ट करताना शिक्षण, आरोग्य, स्त्री-पुरुष समानता आणि आहाराची पातळी या गोष्टींना महत्त्व दिले. याच आधारावर केरळ राज्याची स्थिती किती सकारात्मक आहे हे दिसून येते. पण याचबरोबर पंजाब राज्य हे आर्थिक विकास व दरडोई उत्पन्नात खूप वरच्या स्थानावर आहे. परंतु स्त्री-पुरुष प्रमाण आणि समानता या विषयी बिकट अवस्था आहे.

समाजशास्त्रीय साहित्यात 'विकास' ही आधुनिक संकल्पना आहे. कारण आधुनिक युगापूर्वीचा जगातील समाज हा पारलौकिक शक्ती, नशीब, पूर्वजन्मातील कर्मे, दैववाद इत्यादीकडे सर्वार्थाने झुकलेला होता. परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये हाच समाज आधुनिकतेकडे वाटचाल करू लागला. मानवी समाजाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये झपाट्याने परिवर्तन होऊ लागले. या बदलत्या परिस्थितीमध्ये समाजाच्या आशा, अपेक्षा, गरजा, इच्छा यामध्येसुद्धा लक्षणीय स्वरूपाचा बदल होऊन जी अवस्था आली ती अवस्था आधुनिक अवस्था आहे. विज्ञानाच्या सहाय्याने निसर्गाचे नियम शोधून त्यांचे तंत्रविज्ञानात रूपांतर करून मानवी जीवन डोळसपणे अधिक चांगल्या स्थितीकडे जाण्याकरिता बदलता येईल. ही आधुनिकतेची मूळ प्रेरणा आहे.

विकास ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. शाश्वत विकासासाठी ही प्रक्रिया अखंडितपणे चालली पाहिजे. त्यासाठी विकासाच्या प्रक्रियेमध्ये पाच मुद्दे महत्त्वाची भूमिका बजावतात. १) समाजाची अंतर्बाह्य स्थिती काय आहे? २) समाजाची भविष्यकालीन निश्चित उद्दिष्टे कोणती आहेत. ३) उद्दिष्टांचा अग्रक्रम कसा आहे. ४) उद्दिष्टे साध्य करताना लागणारी साधने किती प्रमाणात अनुकूल व प्रतिकूल आहेत व ५) यासाठी आवश्यक संस्थात्मक स्वरूपाचे प्रारूप (Model) कोणते असेल व त्यात अद्यायवता आणण्याची इच्छाशक्ती आणि कर्तृत्व समाजाकडे किंवा राष्ट्राकडे आहे की नाही? विकास ही आधुनिक काळात सतत चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे विकासाचे नवे रूप, नवीन स्वरूपाचे आकलन व नवीन व्यूहरचना स्वीकारणे आवश्यक ठरते आणि या विकासाच्या प्रक्रियेत मानवी समाज, त्यातील व्यक्ती,सामाजिक संस्था, उत्पादन साधने व तंत्रे त्याचबरोबर नैसर्गिक समतोल असा नवीन विचार आज पुढे येत आहे.

## ५.२ भारतातील आधुनिकता

सद्य:कालीन भारतीय समाजात विविध क्षेत्रात सामाजिक परिवर्तनाची परिभाषा अनेकविध प्रकारे केली जाते. जसे औद्योगिकीकरण, नागरीकरण, पाश्चिमात्यकरण, तार्कीकीकरण, लोकशाहीकरण आणि सांस्कृतीकरण इत्यादी सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचा अभ्यास करताना समाजशास्त्रज्ञ भारतातील समकालीन समाजातील परंपरा आणि आधुनिकता या मुद्द्यांकडे विशेष लक्ष देतात. एका बाजूला समाजात परंपराचे अस्तित्व टिकून आहे. तर दुसरीकडे विकसित राष्ट्राप्रमाणे भारतातही आधुनिकतेचा शिरकाव वेगाने होत आहे.

भारतातील परंपरा आणि आधुनिकता यांचा संबंध सांस्कृतिक प्रतिमानाच्या रूपाने दिसून येतो. परंतु या ठिकाणी परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील संबंधापेक्षा भारतातील आधुनिकतेचा प्रत्यय अभ्यासणे महत्त्वाचे ठरेल. भारतातील आधुनिकता ही अमेरिका

(संयुक्त राष्ट्र संघटना) आणि ब्रिटिशांच्या सामाजिक संरचनेच्या आधारावर स्पष्ट केली जाते. डॉ. लर्नर आपल्या " The passing of Traditional Society Modernizing the Middle East" या ग्रंथात आधुनिकतेचे पाश्चात्त्य स्वरूप स्पष्ट करताना तिची प्रमुख पाच वैशिष्ट्ये अधोरेखित करतात, १) वाढते नागरीकरण, २) साक्षरतेचे वाढते प्रमाणे, ३) साक्षरतेच्या वाढत्या प्रमाणाबरोबरच वृत्तमान पत्रे, ग्रंथ, रेडियो इत्यादी प्रसारमाध्यमांच्या विविध साधनाद्वारे साक्षर व्यक्ती–व्यक्तीमधील परस्पर अर्थपूर्ण विचार विमर्श, ४) ज्या कौशल्यावर व मानवी शक्तीवर देशाचा आर्थिक विकास आणि दरडोई उत्पन्न अवलंबून आहे, अशा कौशल्यांचा व मानवी शक्तीची निर्मिती व ५) यामुळे राजकीय जीवनाचा विकास होतो.

आधुनिकता हा औद्योगिकीकरणाचा परिणाम आहे, असे मानले जाते. कारण औद्योगिकीकरणामुळे जी सांस्कृतिक क्रांती झाली तिचे आधुनिकतेच्या संबंधी वर्णन केले जाते. औद्योगिक क्रांती ही पाश्चात्त्य देशाच्या आधुनिकीकरणापेक्षा व्यापक आहे. आधुनिकीकरण हे सभ्यता आणि साक्षरता तसेच नगरवादाच्या उच्चतम स्तराशी संबंधित आहे. ज्याअंतर्गत भौगोलिक गतिशीलता, दरडोई उत्पन्न आणि यांत्रिकीकरण इत्यादीमध्ये वृद्धी होत जाते. दुसरीकडे आधुनिकता संस्कृतीचेच एक नवे रूप आहे. ज्याअंतर्गत विवेकशीलता, उदारपणा, विविधता, स्वतंत्रता, बुद्धिप्रामाण्यता तसेच व्यक्तीचा मानसन्मान इत्यादींना अनन्यसाधारण महत्त्व असते. थोडक्यात आधुनिकता म्हणजे दुसऱ्यांच्या मतांचा सन्मान आणि प्रत्येकास आपल्या मताप्रमाणे, मनाप्रमाणे व्यवहार व वर्तन करण्याची सामाजिक परवानगी असते. एवढ्या विवेचनावरून 'आधुनिकता' ही संकल्पना स्पष्ट होईलच असे नाही म्हणून आधुनिकतेची व्याख्या तपशीलसुद्धा पाहणे क्रमप्राप्त ठरते, असे म्हटले जाते की, आधुनिकतेची कोणतीही परिभाषा नाही व जेवढे अभ्यासक आहेत तितक्या प्रमाणित परिभाषा केल्या जाऊ शकतात, असे असतानाही काही अभ्यासकांनी आधुनिकतेला परिभाषित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### ५.२.१ आधुनिकतेची व्याख्या –

रिटझर यांच्यामते, ''आधुनिकता ही बेलगाम, उधळलेल्या अश्वाप्रमाणे असून तिला कोणत्याही परिस्थितीत नियंत्रित करणे कठीण आहे.''

अन्थोनी गिडिन्स यांच्या मते, ''आधुनिकता एक दिशाहीन प्रकारची जननी आहे, आधुनिकता ही बहु–आयामी असून यामध्ये परिवर्तन आणि गत्यात्मकता समाविष्ट आहे.''

टॉलकट पार्सन्स : पार्सन्स आधुनिकतेची व्याख्या करताना मूल्यांमधील परिवर्तनाला प्राधान्य देतात. त्यांच्यामते, '' भावात्मक तटस्थता, विशिष्टता, सर्वव्यापकता आणि सामूहिकता आदी मूल्यांवर आधारित क्रिया म्हणजे आधुनिकता होय.''

उल्रीचे बेक यांच्या मते, ''आधुनिकतेची संस्कृती ही धोकादायक संस्कृती आहे.''

वरील व्याख्यांचा परामर्श घेता असे लक्षात येते की, आधुनिकता परिभाषित करणे खूपच जटील आणि क्लिष्ट स्वरूपाचे कार्य आहे. 'आधुनिकता' ही संकल्पना सैद्धान्तिक पातळीवर समजून घेण्यापेक्षा व्यावहारिक पातळीवर समजून घेणे आवश्यक व उचित वाटते.

त्याचप्रमाणे भारतीय परंपरा व आधुनिकतेचा परस्पर संबंध लक्षात घ्यावा लागतो. त्याशिवाय भारतातील आधुनिकतेची प्रतिमा स्पष्ट होत नाही. त्या अनुषंगाने काही प्रमुख भारतीय आधुनिकतेच्या अभ्यासकांच्या विचारांचा परामर्श घेता येईल.

**आधुनिकता आणि डॉ. एम. एन. श्रीनिवास –**

आपले विचार व्यक्त करताना, आधुनिकतेचा उगम ब्रिटिश आगमन व राजवटीतून झालेला आहे, असे मानतात. व्यापाराच्या उद्देशाने ब्रिटिश भारतात आल्यानंतर त्यांनी आपली राजवट मजबूत करण्याचा प्रयत्न केला. यातूनच आधुनिकतेचा हळूहळू जन्म झाला. कारण ब्रिटिशांनी व्यापार, राजसत्ता आणि त्याचबरोबर रेल्वे, प्रसारमाध्यमे, छपाई यंत्रे, नवीन शिक्षणपद्धती यासारख्या व अन्य नवीन घटकांचा प्रयोगाच्या माध्यमातून आधुनिकता प्रकट होण्यास फार मोठा हातभार लागला. एम. एन. श्रीनिवास यांच्या मते, भारतीय समाजाच्या उत्थानाच्या दृष्टीने ब्रिटिश राजवट ही एक वरदानच ठरलेली आहे. कारण ब्रिटिशांच्या राजवटीतून स्वातंत्र्यप्राप्तीसाठी संपूर्ण भारतराष्ट्र आणि सबंध भारतातील लोक स्वातंत्र्यलढ्याच्या रूपाने एकत्र आलेत. म्हणजेच लोकतंत्र आणि समानतेची मूल्ये प्रथमच भारतीयांनी स्वीकारली. याचा भारतीय समाजात प्रथमच परंपरेला नाकारून, झुगारून आधुनिकतेचे दर्शन झाले. कुटुंबसंस्था, स्तरीकरण व्यवस्था यांच्यातील पारंपरिकतेला तर मोठा धक्काच बसला. वर्षांनुवर्षे परंपरेखाली दबलेला समाज आधुनिकतेच्या रूपाने समोर आला. भारताने आधुनिक राष्ट्र बनण्याचे प्रयत्नच सुरू केले. डॉ. एम. एन. श्रीनिवास म्हणतात की पाश्चिमात्यीकरण, विवेकीकरण, मानवतावाद, विज्ञान व तंत्रज्ञान तसेच आधुनिक शिक्षण पद्धतीने भारतातील व आधुनिकतेला प्रचंड गती प्राप्त करून दिली.

**आधुनिकता आणि योगेंद्रसिंह –**

डॉ. योगेंद्रसिंह यांनी आपल्या "Modernization of Indian Tradition" या ग्रंथात, आधुनिकतेचा भारतीय परंपरेवरील प्रभाव यासंबंधी सखोल स्वरूपाचे विवेचन केले आहे. त्यांच्यामते आधुनिकता ही एक सांस्कृतिक आणि सार्वत्रिक घटना आहे. आधुनिकतेच्या वैशिष्ट्यांचा प्रसार ज्या ज्या क्षेत्रात होतो ती सर्व क्षेत्रे सामाजिक, ऐतिहासिकतेनुसार स्वीकार करतात. स्थानिक स्तरावर ही आधुनिकता परंपरेमध्ये उत्क्रांत रूपाने समाविष्ट होत जाते. या आधुनिकतेची समाजातील तर्कसंगत, विज्ञाननिष्ठा, मानवता, तांत्रिकता, आधुनिक मूल्ये इत्यादींच्या सामाजिक चौकटी नाहिशा होऊन जातात. थोडक्यात, आधुनिकीकरण हे विशेषत: भारतीय परंपरेशीच संबंधित असल्याचे योगेंद्रसिंह सांगतात.

## ५.२.२ आधुनिकीकरणाचे आयाम (Modernization Paradigm)

साधारणत: आधुनिकीकरणाचे आयाम पाश्चात्त्य देश आणि त्यांच्यातील होणारे परिवर्तन हेच राहिले आहे. ज्याप्रमाणे बॅन्डीक्स म्हणतात की, ''आधुनिकीकरण म्हणजे १७६० ते १८३० दरम्यान इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीच्या रूपाने झालेले परिवर्तन आणि १७८९ – १७९४ या कालावधीत फ्रान्समध्ये जी राजकीय क्रांती झाली तो सामाजिक बदल होय.'' वर्तमानकालीन लोकतंत्र, शिक्षणप्रणाली आणि औद्योगिक क्रांतीचा प्रारंभ विशेषत: पाश्चात्त्य राष्ट्रांतच झाला आहे. पाश्चात्त्य राष्ट्रातील या परिवर्तनाचे सामाजिक, आर्थिक, राजकीय व

अन्य क्षेत्रांतील अनुकरण इतर राष्ट्रांत होते. विशेषत: भारतामध्ये तेव्हा त्यास आधुनिकीकरण असे संबोधले जाते. म्हणजेच हे निश्चित आहे की, आधुनिकीकरणाचा प्रारंभ पाश्चात्त्य राष्ट्रात झालेला आहे. उदा. चीन, जपान, अमेरिका इत्यादी. यासंबंधी लर्नर असे म्हणतात की, ‘‘पाश्चात्त्य मॉडेल केवळ ऐतिहासिकदृष्ट्या पाश्चात्त्य आहे, समाजशास्त्रीयदृष्ट्या तर विश्वव्यापी आहे.

आधुनिकीकरणाचे मुख्यत: पाच आयाम आहेत, ते खालील आकृतीवरून स्पष्ट होतील.

तंत्रज्ञानात्मक

१) ऊर्जेचे अचेतन स्रोत

२) आधुनिक यंत्रे

३) अवजड तंत्रज्ञान

अर्थशास्त्रीय

१) बाजार आधुनिकीकरण

२) भांडवल

३) क्रियवस्तू

४) उपभोगवाद

राजकीय

१) स्वातंत्र्य

२) व्यक्तिवाद

३) लोकशाही

४) राजकीय सहभाग

सामाजिक

१) सामाजिक गतिमत्व

२) व्यावसायिक विविधता

३) सार्वभौमवाद

४) नागरी-औद्योगिक संस्कृती

५) साक्षरता आणि आधुनिक शिक्षण

मानसशास्त्रीय

आधुनिकीकरणाची जे पाच आयाम आहेत,ते म्हणजे तंत्रशास्त्रीय, अर्थशास्त्रीय, राजकीय, सामाजिक आणि मानसशास्त्रीय होय. या पाचही क्षेत्रांतील उच्चकोटीचे परिवर्तन हे आधुनिकीकरणाशी संबंधित आहे. कोणत्याही एका क्षेत्रातील अथवा आयामातील उच्च

कोटीचे परिवर्तन म्हणजे पूर्ण आधुनिकीकरण होत नाही. आधुनिकीकरणाची प्रक्रिया ही समस्तर प्रक्रिया आहे. एकाच वेळेस आधुनिकरणाचे पाचही आयाम कमी–अधिक प्रमाणात एका दिशेने बदल पादाक्रांत करत जातात. तंत्रज्ञानात्मक आधुनिकतेमध्ये ऊर्जेच्या अचेतन स्रोतांचा विकासासाठी उपयोग, नवनवीन यंत्रे आणि अवजड तंत्रज्ञान हे सर्व तंत्रज्ञानात्मक आधुनिकतेचे लक्षण आहे. अर्थव्यवस्थेतील बाजार, भांडवल क्रयवस्तू आणि उपभोगवाद हे आर्थिक आधुनिकतेचे लक्षण आहे. स्वातंत्र्य, व्यक्तिवाद, लोकशाही आणि राजकीय सहभाग इत्यादी राजकीय आधुनिकीकरणात अपेक्षित असते. तसेच सामाजिक क्षेत्रातील आधुनिकता म्हणजे, सामाजिक गतिमत्व, व्यावसायिक विविधता, सार्वत्रिकता, नागरी–औद्योगिक संस्कृती, साक्षरता आणि आधुनिक शिक्षण तर मानसशास्त्रीय आधुनिकता ही कॉस्मोपोलिटीयन मानसिकता, ध्येयसिद्धी भूमकता यांच्याशी संबंधित आहे. व्यक्ती समाजात घडून आलेले हे विविध क्षेत्रातील परिवर्तन जेव्हा स्वीकारतो तेव्हा तो आधुनिक समाजात जीवन जगत असतो. हे परिवर्तन संस्थात्मक रूपाचे असल्यामुळे व्यक्ती किंवा समाज नकळतपणे परंपरेकडून आधुनिकतेकडे मार्गक्रमण करत जातो– अर्थात परंपरा आणि आधुनिकता यांच्यात स्पष्ट सीमारेषा नसली तरी या अवस्था मात्र, भिन्नभिन्न स्वरूपाच्या आहेत.

## ५.२.३ आभासी आधुनिकता (Mistaken Modernity) –

आभासी आधुनिकतेस भ्रामक स्वरूपाची आधुनिकतासुद्धा संबोधिले जाते. भ्रामक आधुनिकतेच्या संदर्भात दिपांकर गुप्ता यांचे मत विचारात घेणे महत्त्वाचे वाटते. त्यांनी आपल्या, "Mistaken Modernity India between Worlds" या ग्रंथात आधुनिकतेच्यासंबंधी असलेले अनेक भ्रामक विचारांचे खंडन केलेले असून, त्यांच्यामते, भारतातील आधुनिकता ही अन्य राष्ट्रांतून विशेषत: पाश्चात्त्य राष्ट्रांतून आली आहे. भारतीय समाजात आधुनिकतेचा अर्थ आणि प्रयोजनासंबंधी कोणतही एकमत दिसून येत नाही. म्हणजेच या ठिकाणी आधुनिकतेच्या व्यक्तीपरत्वे व्याख्या बदलतात. दिपांकर गुप्ता यांनी चळींीरज्ञशप चेवशीपळीूं च्या संदर्भात कोणताही सिद्धान्त मांडलेला नाही पण अनेक भ्रामक विचाराचे खंडण केलेले आहे. ते म्हणतात, जे समकालीन आहे ते सर्वच आधुनिक असते असे नाही, तर आधुनिकता हीच आधुनिकता आहे. त्यामुळे आधुनिकता बहुआयामी नसून ते आधुनिकतेचे वेगवेगळे प्रकार आहेत. समाजाच्या दैनंदिन कार्यात वाढत्या तंत्रज्ञानाचा उपयोग व उपभोग्य म्हणजे आधुनिकता म्हणता येणार नाही. व तसे मानणे गैर ठरेल.

दिपांकर गुप्ता यांच्यामते, 'आधुनिकता' ही संकल्पना व्यापक व क्लिष्ट स्वरूपाची आहे. आधुनिकतेचा संबंध हा मानसिकतेशी किंवा मानवी अभिवृत्तीशी आहे. केवळ पाश्चात्त्यांचे अनुकरण म्हणजे आधुनिकता होत नाही. आधुनिकता ही एक विश्वव्यापी संकल्पना आहे.

आधुनिकीकरणाच्या राजकीय आयामात लोकशाही या तत्त्वाला महत्त्व दिलेले आहे. भारतातील आधुनिकीकरणातसुद्धा याची प्रचिती येते. परंतु येथील लोकशाही कमजोर आहे. कारण ती काही प्रस्थापित व भांडवलदारांच्या हातात आहे. समाजातील व्यक्तीला प्रत्येक वस्तू व सेवेसाठी पैसे मोजावे लागतात. परिणामी व्यक्तीच्या स्वयंप्राप्तीला महत्त्व उरत नाही. लोकशाहीत 'एक मत एक मूल्ये' असे तत्त्व जारी असले तरी आजही भारतीय समाजात

कुटुंब, जात, कुळभाऊबंदकीचे संबंध इत्यादी आधारावरच ओळखले जाते. तेव्हा अशा परिस्थितीत समता, स्वातंत्र्य, राजकीय सहभाग, लोकशाही इत्यादी तत्त्वाला हरताळ बसतो आणि या परिस्थितीला आधुनिकता कसे म्हणावे? असा प्रश्न निर्माण होतो.

म्हणजेच दीपांकर गुप्ता यांचे विचार हे भारतीय समाजातील भ्रामक आधुनिकता लक्षात घेण्यासाठी उपयुक्त ठरतात व त्यातून निश्चितच आधुनिकतेच्या पूर्ण विकासाला दिशा प्राप्त होते.

## ५.२.४ आमची आधुनिकता (Our Modernity)

**चरप्रवेशित आधुनिकता** (Entreched Modernity)

आधुनिकता ही आधुनिकीकरणाच्या माध्यमातून जगातील सर्वच समाजामध्ये पोहोचली आहे. भारतातही आधुनिकतेने उच्च स्तर गाठलेले आहे. असे असले तरी परंपरेचे प्राबल्यही टिकून आहे. 'आमची आधुनिकता' (Our Modernity) यासंबंधी जेव्हा चर्चा करावयाची असते तेव्हा एक बाब निश्चित लक्षात घ्यावी लागते की, 'आमची आधुनिकता' ही पाश्चात्त्य अनुकरणाने प्रभावित आहे. भारतातील आधुनिकता ही मूलत: भारतीय नाहीच तिचे मॉडेल हे पाश्चात्त्य आहे. बैडठिक्स याविषयी आपले विचार व्यक्त करताना म्हणतात की, 'आधुनिकीकरणाचा तात्पर्य इ. स. १७६० ते १८३०च्या दरम्यान इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती तथा इ. स. १७८९ ते १७९४ दरम्यान फ्रान्स राज्यक्रांतीच्या माध्यमातून झालेल्या परिवर्तनाशी आहे.' हे परिवर्तन संपूर्ण जगभर हळूहळू पोहचले. तेव्हा संपूर्ण जगच आधुनिककतामय झाले. यास भारतसुद्धा अपवाद नाही. म्हणजेच आमची आधुनिकता ही आमची नाही तर पाश्चात्त्यांची देणगी आहे.

आमची आधुनिकता ही चरप्रवेशित (Entrenched) आधुनिकता आहे. असे दिसून येते. कारण पाश्चात्त्य देशात औद्योगिकीकरणामुळे आधुनिक प्रवृत्ती निर्माण होत गेली. म्हणजेच ज्याप्रमाणात औद्योगिकीकरण वाढत जाते त्याप्रमाणात आधुनिकता वाढत जाते. भारतीय आधुनिकता ही परंपरेबरोबर समन्वय साधत विकसित होत आहे व उत्तर आधुनिकतेकडे मार्गक्रमण करत आहे.

भारतीय समाजातील सामाजिक व आर्थिक समस्या सोडविण्यासाठी औद्योगिकीकरणाची गती वाढविण्याची आवश्यकता आहे. परंतु जर आपण परंपरा सोडून आधुनिकता स्वीकारणार नसेल तर औद्योगिकीकरणाच्या नवनवीन क्षेत्राला समजू शकणार नाही. परिणामी औद्योगिकीकरणातून येणाऱ्या परिस्थितीशी समायोजन करणेसुद्धा कठीण होऊन बसते. अमेरिकेत औद्योगिकीकरणाबरोबरच आधुनिकतेच्या क्षेत्रातही परिवर्तन झाले असेच भारतातही होणे अपेक्षित आहे. या परिस्थितीला एका विशिष्ट टप्प्यावर समजून घेतले तर भारतीय समाजातदेखील अमेरिकन समाजाप्रमाणे परिवर्तन होऊ शकते. त्याचप्रमाणे भारतीय प्राचीन परंपरेच्या मौल्यवान तत्त्वांना कुठल्याही प्रकारचा धक्का न पोहचतासुद्धा भारतीय समाजात आधुनिकता स्वीकारली जाऊ शकते. यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्नाची मात्र, आवश्यकता आहे.

भारतीय संस्कृतीच्या इतिहासाचे अवलोकन केले तर असे लक्षात येते की, भारतीय

संस्कृतीमध्ये सदैव वेगवेगळ्या संस्कृती प्रवाहाचे समन्वय होत गेलेले आहे. पाश्चात्त्य सभ्यतेच्या संपर्काची काही परंपरागत विचारवंतांनी अवहेलना केली आहे. तर काही लोकांनी पूर्णपणे पाश्चिमात्यीकरणास स्वीकार केले आहे. म्हणजेच या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण घटना ही पाश्चात्त्य आणि भारतीय परंपरेच्या समन्वयाची राहिली आहे.

भारतीय समाजात औद्योगिकीकरणाची प्रक्रिया ही ब्रिटीश राजवटीतच सुरू झाली होती. ही प्रक्रिया सुरू होताच भारतीय अर्थव्यवस्थेचे संपूर्ण स्वरूपच बदलून गेले. परंपरागत लघु व कुटिरोद्योग, ग्रामोद्योग इत्यादींचा ऱ्हास झाला. आणि मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण, यांत्रिकीकरण झाले. या सर्व घटनांचा प्रभाव भारतीय सामाजिक संरचनेवरदेखील पडला. वास्तवत: हे एक प्रकारचे सांस्कृतिक युद्धच होते. यातून समाजात परस्परविरोधी प्रवृत्ती निर्माण झाल्यात. त्या म्हणजे देशीवाद विरुद्ध विदेशी. त्याचाच परिणाम म्हणून भारतात गांधीवाद आणि सर्वोदय विचाराचे वारे वाहू लागले. परंतु पाश्चिमात्यीकरणाच्या प्रक्रियेपुढे गांधीवाद आणि सर्वोदयी विचाराचा प्रभाव कमी होऊ लागला. पाश्चिमात्यीकरणाचा शिरकाव केवळ वेशभूषा आणि भौतिक क्षेत्रातच नाही तर आधुनिक समाजात विचारसरणीत दिसून येत आहे. सुरुवातीच्या काळात विदेशीला विरोध म्हणून काही राष्ट्रवादी आणि उच्चवर्गीय लोकांनी स्वदेशीचा अंगीकार केला होता. परंतु आज या विचारसरणीचा प्रभाव कमकुवत झालेला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय विकासवादी लोकांचा एक गट वैज्ञानिक आणि तंत्रशास्त्रीय प्रगतीचा स्वीकार व समर्थन करणारा अस्तित्वात होता. हीच रणनीती पुढे वास्तवात उतरविण्यासाठी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून नियोजित आधुनिकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. किंग्सले डेवीसने म्हटल्याप्रमाणे, कोणत्याही समाजाच्या आर्थिक आधुनिकीकरणासाठी राष्ट्रवाद, विवेकवाद, सामाजिक गतिशीलता, शिक्षण आणि तंत्रज्ञान-प्रशिक्षण इत्यादींची आवश्यकता असते. आणि नेमके याच दिशेने भारतामध्ये शीघ्रतेने परिवर्तन होत आहे.

डॉ. एस. सी. दुबे यांचे विचार या ठिकाणी विचारात घेणे महत्त्वाचे ठरेल. त्यांनी आपल्या 'Modernization : Its Meaning and Models' (१९६४) तसेच 'Modernization and Education' (१९६९) व 'Contemporaty India and Its Modernization' इत्यादी ग्रंथांतून भारतीय आधुनिकीकरणाची प्रक्रिया स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते आधुनिकीकरण मूल्यरहित अशी प्रक्रिया आहे. त्यांनी आधुनिकीकरणासाठी कोणतेही एक निश्चित मॉडेल किंवा दिशा स्पष्ट केलेली नाही. जसे की काही विद्वानांच्या मते, भारतात राजकीय क्षेत्रात लोकसत्ताक, धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद इत्यादी मार्गांचा अवलंब केला आहे. आणि यासाठी पाश्चात्त्य मॉडेल स्वीकारलेले आहे. तर दुसरीकडे समतावादी समाज निर्मितीसाठी रशिया आणि चीनचे मॉडेल स्वीकारले आहे. आधुनिकीकरणामुळे व्यक्तींमध्ये तार्किकता, सहानुभूती, गतिशीलता आणि सहभागित्व इत्यादीमध्ये वृद्धी होते.

डॉ. एस. सी. दुबे आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत खालील मुद्द्यावर अधिक भर देतात.

१) मानवी समस्यांच्या निराकरणासाठी अवजड शक्तींचा उपोग.

२) या अवजड शक्तींचा उपयोग व्यक्तिगत न करता सामूहिक स्तरावर केला जातो. परिणामी जटिल संघटन निर्माण होते.

३) अशा प्रकारच्या जटिल संघटनास व्यवस्थित चालविण्यासाठी समाज आणि संस्कृतीमध्ये परिवर्तन होणे आवश्यक असते. डॉ. एस. सी. दुबे शिक्षणास आधुनिकीकरणाचे एक सशक्त साधन मानतात कारण शिक्षणामुळे ज्ञानाची वृद्धी होते, मूल्ये, धारणा इत्यादीमध्ये परिवर्तन होते. आणि परिवर्तन आधुनिकीकरणापर्यंत पोहोचण्यासाठी फारच आवश्यक आहे.

वरील विवेवचनावरून आमची आधुनिकता ही कोणत्या प्रकारची आहे व ती आमच्यापर्यंत कशी पोहचली याची कल्पना निश्चितच येते. म्हणजेच आमची आधुनिकता ही चरप्रवेशित आधुनिकता असल्याचे सिद्ध होते. कराण या सर्व प्रक्रियेच्या परिवर्तनामागे आधुनिक शिक्षण प्रणाली हा घटक कारणीभूत आहे आणि ही आधुनिक शिक्षण प्रणाली धर्मप्रसाराच्या आडपडद्यातून आमच्याकडे ब्रिटिश काळात आलेली आहे.

## ५.२.५ आधुनिकता एक बृहत पर्यायी रूपाने

(Modernity at Large Alternate)

आधुनिकीकरणाची प्रक्रिया ही विशेषत: मूल्यव्यवस्था, सामाजिक व्यवस्था आणि व्यक्तित्व व्यवस्थेच्या स्तरावर कार्यान्वित होते. आधुनिकतेमुळे समाजातील मूल्ये, रूढी, परंपरा, श्रद्धा, प्रचलित सिद्धान्त, लोकरिती, श्रमविभाजन, सामाजिक संस्था, विचारसरणी, शिक्षणप्रणाली इत्यादीमध्ये प्रचंड प्रमाणात परिवर्तन घडून आले. आधुनिक समाजात, तार्किकता, बुद्धिवाद, विज्ञानवाद इत्यादींना महत्त्वपूर्ण स्थान दिले जाते. या सर्वांचा परिपाक म्हणून धर्मनिरपेक्षवाद, इहवाद, परिवर्तनशीलता इत्यादी प्रवृत्तित वृद्धी झाली.

एकंदरीत आधुनिकता ही सर्वच क्षेत्रांत पोहचली आहे. एवढेच नाही तर प्रत्येक क्षेत्रात एक नवीन आणि बृहत पर्यायाच्या रूपाने, आधुनिकतेचा प्रत्यय दिसून येतो. दिवसेंदिवस आधुनिकतेचा परिघ विस्तारतच चाललेला आहे. म्हणजे विवेकशील, विज्ञानवादी आणि पुरोगामी समाजाच्या दिशेने होणारी ही वाटचाल आहे. आधुनिक समाजातील ‘मुक्त वर्गव्यवस्था’ ही स्तरीकरण व्यवस्थेतील संरचनात्मक परिवर्तनाशी संबंधित अशी घटना आहे. यामुळेच पारंपरिक समाजरचना, सामाजिक मूल्ये व नियमने, श्रमविभाजन, श्रद्धा, धारणा इत्यादींमध्ये मूलगामी स्वरूपाचे परिवर्तन घडून आले आहे.

आज आधुनिक समाजामध्ये जे वर्ग दिसून येतात तो आधुनिकतेचा परिणाम आहे. म्हणजेच आधुनिकता हाच वर्गीय समाज आहे. प्रचलित समाजव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडून येणे म्हणजे आधुनिकता, असे विधान करता येईल. अर्थात प्रचलित समाजव्यवस्थेतील जीवनपद्धतीच्या प्रत्येक घटकामध्ये हा बदल घडून येणे अपेक्षित असते. आर्थिक संपन्नता, सापेक्ष राजकीय स्थैर्य असलेली पाश्चात्त्य देशाची जीवनशैली मॉडेल मानून त्याप्रमाणे आपल्या प्रचलित व पारंपरिक जीवनशैलीत ज्याप्रमाणात परिवर्तन करता येईल ते सर्व परिवर्तन आधुनिकतेत अपेक्षित असते. त्यामुळे ज्या समाजात आधुनिकता संचारली आहे. तो समाज ‘वर्गीय समाज’ बनलेला आहे. त्यामध्ये मुक्तवर्ग व्यवस्था असलेली दिसून येते.

परंपरागत व प्रचलित समाजात सामाजिक गतिशीलतेचा अभाव असतो. परंतु आधुनिक समाजात मुक्त स्तरीकरण व मुक्त वर्गव्यवस्था असल्याने हा समाज प्रचंड गतिशील स्वरूपाचा आहे. अशा समाजव्यवस्थेत व्यक्ती आपल्या स्व कुवतीप्रमाणे, शिक्षण, गुणवत्ता, पात्रता

आणि कौशल्य प्राप्त करू शकतो परिणामी आपल्या अर्जित दर्जामध्येसुद्धा उर्ध्वोगामी परिवर्तन घडवून आणू शकतो. हेच परिवर्तन परंपरागत समाजात शक्य नसते कारण तेथे 'बंद स्तरीकरण' व्यवस्था असते. असे असले तरी शिल्स यांचे मत विचारात घेणे महत्त्वाचे आहे. त्यांच्यामध्ये, ''पारंपरिक समाज हा पूर्णत: कधीच पारंपरिक नसतो व आधुनिक समाज हा पूर्णत: परंपरांनी मुक्तही नसतो.'' म्हणजेच परंपरागत समाजदेखील वर्गीय समाजाच्या दिशेने परिवर्तित होत आहे. परंपरागत समाज हा आधुनिक किंवा वर्गीय समाजाकडे बदलत जाताना खालील स्वरूपाचे परिवर्तन प्रक्रिया घडून येते.

१) अर्पित दर्जाची जागा अर्जित दर्जा घेतो.

२) समानता हळूहळू अर्जित संस्तरित होत जाते.

३) अर्थव्यवस्था विकसित होऊन त्यात स्वावलंबनत्व येते.

४) व्यवसाय अधिक तांत्रिक, कौशल्यपूर्ण होतात.

५) घरगुती व लघुउद्योगांची संख्या कमी-कमी होत जाऊन नवनवीन व्यवसायिकांची संख्या वाढत जाते.

६) वस्तू विनिमयाची जागा पैसा विनिमय घेतो.

७) श्रमविभाजन व परस्परावलंबन यात वाढ होत जाते.

८) व्यवसायिक स्वातंत्र्याबरोबरच समानता हे तत्त्व वृद्धिंगत होते.

उपरोक्त स्वरूपाच्या परिवर्तनामुळे सामाजिक स्तरीकरण व्यवस्था संरचनात्मक स्तरावर परिवर्तन होऊन तीच समाजव्यवस्था स्वीकारून व्यक्तीला समाजात जीवन व्यतीत करावे लागते. म्हणजेच व्यक्तीला आधुनिकता एका पर्यायी समाजव्यवस्थेच्या रूपाने उपलब्ध असते.

## ५.३ परंपरा (Tradition) :-

परंपरा आणि आधुनिकता या दोन्हीमध्ये विचारांची, मूल्यांची आणि संस्थांची एक व्यवस्था समाविष्ट आहे. हे विचार, मूल्ये आणि संस्था परंपरेत वेगळ्या स्वरूपाच्या आणि आधुनिकतेत वेगळ्या स्वरूपाच्या असतात. म्हणजे परंपरा आणि आधुनिकतेचे विश्व वेगवेगळे आहेत. परंतु कोण.ताही समाज पूर्ण पारंपरिक व कोणताही समाज पूर्ण आधुनिक स्वरूपाचा नाही. म्हणजेच परंपरा आणि आधुनिकता या दोन्ही बाबी सैद्धान्तिक पातळीवर भिन्न स्वरूपाच्या आहेत. प्रत्यक्षात मात्र, प्रत्येक समाजात परंपरा आणि आधुनिकता या दोन्ही बाबी दिसून येतात. परंपरा म्हणजे काय?

परंपरा ही संकल्पना डॉ. योगेंद्रसिंग यांनी परिभाषित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यामते, ''परंपरा समाजाचा एक सामूहिक वारसा आहे जो की, सामाजिक संघटनांच्या सर्वच स्तरावर व्यापलेला आहे. उदाहरणार्थ मूल्य व्यवस्था, सामाजिक संरचना आणि व्यक्तिमत्त्वाची संरचना.'' म्हणजेच, सामूहिक वारसा म्हणजे परंपरा होय आणि सामूहिक वारसाची तीन तत्त्वे आहेत. १) मुल्यांची व्यवस्था, २) सामाजिक संरचना आणि ३)

व्यक्तिमत्त्वाची संरचना हा परंपरेचा समाजशास्त्रीय अर्थ आहे, असे म्हटल्यास उचित ठरेल.

परंपरेचा आध्यात्मशास्त्रीय आणि ऐतिहासिक अर्थसुद्धा वेगळ्या स्वरूपाचा सपष्ट करता येईल. परंतु या ठिकाणी समाजशास्त्रीय अर्थच महत्त्वाचा आहे. कारण समाजशास्त्रीय अर्थ सामाजिक, सांस्कृतिक आणि कार्यात्मक आहे. परंपरेचा हा अर्थ आधुनिक काळात विकसित झालेला आहे. कोणत्याही समाजात संस्कृतीमध्ये विकास होत जातो. तरी सुद्धा काही मूल्य, संस्था आणि सामाजिक संरचनेचे काही भाग कमी-अधिक प्रमाणात स्थिर राहतात. त्यालाच परंपरा म्हटले जाते. परंपरेचे हे रूप भारतीय समाजात परंपरागत संस्कृतीच्या विश्लेषणावरून अधिक स्पष्ट होऊ शकेल.

### ५.३.१ सामाजिक स्तरिकरण (Social Stratification) :-

मूलत: विविधता हा सृष्टीचा नियम आहे. हे वास्तव असले तरी मानवी समाजातील श्रेष्ठ-कनिष्ठत्वावर आधारित श्रेणीरचना जशी आहे त्याप्रमाणे सृष्टीची रचना नाही हे तितकेच खरे आहे. मानवानेच उलट आपल्या सोयीसाठी सृष्टीतील काही बाबींना श्रेष्ठ तर काहींना कनिष्ठ मानले आहे.

श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या तत्त्वावरच सामाजिक स्तरिकरण आधारलेले आहे. समाजाची विविध गटात किंवा विभागात झालेली विभागणी आणि त्यांच्यातील आंतरसंबंध यातूनच कोणत्याही समाजात स्तरिकरण व्यवस्था अस्तित्वात असलेली दिसते. विषमता आणि श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या आधारे निर्माण झालेली व्यवस्था म्हणजे सामाजिक स्तरिकरण होय.

समाजात सर्वांनाच समान गणल्या जाईल. व्यक्ति-व्यक्ति आणि समुहा-समुहात कोणताही फरक अथवा भेदभाव केला जाऊ नये, अशा प्रकारचा समताधिष्ठित समाज निर्माण होईल, अशी अवास्तव अपेक्षा नेहमीच बाळगली जाते. परंतु प्रत्यक्षात कोणताही समाज समान स्तर असलेला असत नाही. डोंगरदऱ्यात राहणारा आदिवासी समुदाय असोत, ग्रामीण क्षेत्रात राहणारा ग्रामीण समुदाय असोत अथवा शहरी समुदाय असोत या सर्वच समाजात सत्ता, संपत्ती, अधिकार आणि प्रतिष्ठा इत्यादींची विषम विभागणी झालेली असते. या विषम वाटप अथवा विभागणीतूनच समाजात भिन्न -भिन्न स्वरूपाचे दर्जा धारण केलेले भिन्न-भिन्न स्तर निर्माण होतात. या स्तरांच्या सामाजिक स्थानातील कमी-अधिक्यामुळे श्रेष्ठ-मध्यम-कनिष्ठ अशी सामाजिक रचना तयार होते व यांच्यातील स्तरभिन्नता म्हणजेच सामाजिक स्तरिकरण होय. उदा. मोठे जमीनदार, मध्यम शेतकरी, अल्पभूधारक, भूमीहीन, शेतमजूर असे विविध स्तर ग्रामीण समुदायात पारंपारिक रूपाने आढळतात. समाजात या विविध स्तरांच्या त्यांना असलेल्या दर्जानुसार झालेली स्तररचना म्हणजेच सामाजिक स्तरिकरण म्हणता येईल.

'स्तरीकरण' ही संज्ञा आणखी स्पष्टपणे समजून घेण्यासाठी काही विचारवंताने केलेल्या परिभाषांचा अभ्यास करावा लागेल.

१) स्तरिकरणाची व्याख्या करताना थिओडोर कॅपलो म्हणतात की ''समाजव्यवस्थेच्या सदस्यांची विषम दर्जा असलेल्या स्तरात झालेली रचना म्हणजे स्तरिकरण होय.''

२) ड्रेसलर आणि विलिस 'स्तरिकरण' संज्ञा परिभाषित करताना म्हणतात, ''समाजाने

सामान्यपणे स्वीकृत केलेल्या निकषांच्या आधारे सामाजिक स्थाने आणि भूमिकांचे मूल्यमापन करून त्यांना दर्जा आणि विभेदित स्वरूपातील पारितोषिके प्रदातन करण्याची व्यवस्था म्हणजे सामाजिक स्तरिकरण होय.''

३) सदरलँड आणि वुडवर्ड यांच्यामते, ''सामाजिक स्तरिकरण ही साधारणत: आंतरक्रिया किंवा विभेदिकरणाची अशी एक प्रक्रिया आहे की, जिच्याद्वारे काही व्यक्तिंना इतरांच्या तुलनेत उच्चस्थिती प्राप्त होते.''

स्तरिकरणाच्या उपरोक्त परिभाषावरून खालील काही मुद्देसमोर येतात. त्यामध्ये प्रथमत: विषमता हा स्तरिकरणाचा मूलाधार असलेला दिसतो. विभन्न दर्जा असलेले अनेक स्तर समाजात अस्तित्वात येतात. या स्तराचे रचनीकरण म्हणजे स्तरिकरण होय. स्तरिकरणाचे निकष हे समाज सापेक्ष असतात व संबंधित समाज व्यवस्थेने मान्य केलेले असतात.

थोडक्यात जगातील कोणत्याही समाजात स्तरिकरण व्यवस्था आढळून येत नव्हे. स्तरिकरण हे समाजाचे एक मूलभूत लक्षणच आहे. इंग्रजीत स्तरिकरणास 'Stratification' असे संबोधतात व 'Stratification' हा शब्द एूल्स् या मूळ ग्रीम शब्दापासून बनलेला असून त्यास 'थ्ब' असा प्रतिशब्द आहे. त्यास मराठीत 'थर' किंवा 'स्तर' असे म्हणतात. एूम्हणजे अनेक स्तर आणि या स्तरांची रचना म्हणजे स्तरिकरण (Stratification) हो एवढेच नाही तर त्या स्तरांची श्रेणीबद्ध स्वरूपाची रचना अथवा व्यवस्था होय.

सामाजिक स्तरिकरणाचे समाजपरत्वे अनेक प्रकारचे निकष आढळतात. एकाच समाजात अनेक प्रकारचे निकष असलेले दिसतात की ज्या आधारे त्या समाजात स्तरिकरण झालेले असते. उदा. व्यवसाय, शैक्षणिक अर्हता, आर्थिक प्राप्ती, सत्ता, प्रतिष्ठा, वर्ण, वय, जात, लिंग, वारसा इत्यादी. यातील काही निकष हे जन्मानेच प्राप्त होतात तर काही व्यक्ति आपल्या क्षमतेने प्राप्त करतो. पण त्यांचा श्रेष्ठ व कनिष्ठपणा मात्र, समाजाद्वारे निश्‍चित केलेला असतो. म्हणजे ही स्तरिकरण व्यवस्था मानवनिर्मित असते. भिन्न-भिन्न दर्जा असलेले मानव निर्मित स्तरिकरण हे विविध निकषावर आधारलेले असते. आर्थिक प्राप्तीनुसार गरीब-श्रीमंत, शिक्षणानुसार शिक्षित, उच्चशिक्षित, अल्पशिक्षित आणि अशिक्षित इत्यादी वयानुसार लहान-मोठा, वयस्कर इत्यादी. प्रचलित भारतीय समाजात जातीआधारित स्तरिकरण खूपच खोलवर पोहोचलेले होते. त्याचप्रमाणे लिंगधारित स्त्री-पुरुष असे स्तरिकरण झालेले आहे व यामध्ये पुरुष प्रधान असे स्तरिकरण झालेले आहे व यामध्ये पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे पुरुष गटाचा दर्जा स्त्री गटापेक्षा महत्त्वाचा व वरचढ मानला जातो.

स्तरिकरणाचे जे विविध निकष आहेत त्यामध्ये प्रदत्त निकषांच्या आधारे असलेले स्तरिकरण आधुनिक आणि औद्योगिक समाजात त्याचे महत्त्व खूपच होत चाललेले आहेत.

**सामाजिक स्तरिकरणाचे प्रकार** (Forms of social Stratification)–

सामाजिक स्तरिकरणाची संकल्पना सार्वत्रिक स्वरूपाची असली तरी प्रत्येक समाजात स्तरिक प्रकार समान असू शकत नाही. सामाजिक स्तरिकरणाचे साधारणत: दोन प्रकार आहेत. १) बंद स्तरिकरण (Closed stratification) आणि २) मुक्त स्तरिकरण (open Stratification)

**१) बंद स्तरिकरण** (Closed stratification) हा स्तरिकरणाचा पहिला प्रकार होय. समाजातील ज्या स्तरिकरण व्यवस्थेमध्ये व्यक्तिला आपला सामाजिक स्तर बदलता येण्याची शक्यता अजिबातच नसते किंवा सामाजिक गतिमत्त्वाचा पूर्णत: अभाव असतो आणि व्यक्तीला आपल्या आई-वडिलांकडून मिळालेल्या स्थानावरच अरूढ राहावे लागते. त्यास बंद स्तरिकरण म्हणतात. म्हणजेच ज्या स्तरिकरण व्यवस्थेत जन्माद्वारेच व्यक्तिचा सामाजिक दर्जा निर्धारित होतो आणि त्यामध्ये बदल करण्याची संधीच नसते असे स्तरिकरण बंदिस्त स्वरूपाचे स्तरिकरण असते. उदा. भारतीय जातीव्यवस्था हे बंद स्तरिकरणाचे उत्तम उदाहरण आहे.

**२) मुक्त स्तरिकरण** (open Stratification) -

स्तरिकरणाचा दुसरा प्रकार म्हणजे मुक्त स्तरिकरण होय. समाजातील ज्या स्तरिकरण व्यवस्थेमध्ये व्यक्तिला आपला सामाजिक स्तर बदलण्याची अनुमती, सोय, परवानगी आणि संधी असते किंवा सामाजिक गतीशिलता अधिक असते, स्वत:च्या कुवतीप्रमाणे अथवा पात्रता, कौशल्य इत्यादींच्या आधारे सामाजिक दर्जात बदल प्राप्त करण्याची पूर्णपणे मुभा असते त्यास मुक्त स्तरिकरण असे म्हणतात. उदा. - वर्गव्यवस्था, वर्गव्यवस्थेत व्यक्ति आपल्या कुवतीप्रमाणे व क्षमतेनुसार एका वर्गातून दुसऱ्या वर्गात प्रवेश करू शकतो व उच्च दर्जा प्राप्त करू शकतो.

वास्तवत: कोणतेही स्तरिकरण पूर्णत: बंद किंवा पूर्णत: मुक्त स्वरूपाचे नसते. बंद स्तरिकरणात थोड्याफार प्रमाणात का असेना पण स्वत:च्या कुवतीप्रमाणे अथवा गुणवत्तेप्रमाणे एक वेगळ्या प्रकारचा मान-सन्मान, प्रतिष्ठा इत्यादी अर्जित करण्याची संधी व्यक्तिस उपलब्ध असते. मुक्त स्तरिकरणजात उर्ध्वगामी स्तर बदलण्याची व्यवस्था असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात व्यक्तिंना आपला सामाजिक दर्जा बदलता येणे अवघड असते. थोडक्यात बंद स्तरिकरण आणि मुक्त स्तरिकरण हे दोन्ही स्तरिकरण सापेक्ष स्वरूपाचे स्तरिकरण आहेत. असे म्हणजे अधिक उचत ठरेल.

### ५.३.२ जाती व्यवस्था (Cast system)

जाती व्यवस्था हा भारतीय समाजाचा मुलाधार आहे. जातीच्याच आधारावर भारतीय समाजात वेगवेगळ्या प्रकारचे श्रेष्ठ-कनिष्ठ स्तर निर्माण झालेले आहेत. जात समुहाचे सदस्यत्व व्यक्तीस जनमानेच प्राप्त होते ते अजीवन अपिरवर्तनीय असते. म्हणजेच जातीव्यवस्था हा उपरोक्त उल्लेखित बंद स्तरिकरणाचा प्रकार आहे. प्रामुख्याने जातीव्यवस्थेचा संबंध हा हिंदू धर्माशी असला तरी इतरही धर्मामध्ये जाती, उपजाती आढळून येतात. जाती व्यवस्थेचे पारंपारिक स्वरूप जती बदलत असले तरी जातीव्यवस्थेचे अस्तित्व मात्र टिकून आहे.

जातीची व्याख्या करताना प्रसिद्ध विचारवंत आणि संशोधक इरावती कर्वे म्हणतात की, ''जाती म्हणज्चे एक विस्तारीत कुटुंब होय.'' तर मुजुमदार आणि मदन यांच्यामते, ''जाती म्हणजे एक बंदिस्त वर्ग होय.'' जाती संदर्भात ड्रेसलर आणि विलीस व्यापक स्वरूपाची व्याख्या करताना म्हणतात की, ''जन्माच्या वेळी प्राप्त झालेल्या दर्जापेक्षा उच्च सामाजिक दर्जा वा स्थान प्राप्त करण्यास प्रतिबंध करणारी दर्जा विषयक व्यवस्था म्हणजे जाती-व्यवस्था होय.''

भारती समाजशास्त्राचे जनक डॉ. जी. इस. धुर्ये जातीव्यवस्थेविषयी भाष्य करताना म्हणतात की, जातीव्यवस्थेची परिभाषा करणे अत्यंत गुंतागुंतीची बाब आहे. जातीव्यवस्था समजून घेण्यासाठी तिचे वैशिष्ट्ये अभ्यासने आवश्यक ठरतात. त्यानुसार त्यांनी जाती–व्यवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्ये सांगितले आहेत. त्यांचा थोडक्यात खालील प्रमाणे विचार करता येईल.

१) समाजाची खंडात्मक विभागणी

२) जन्माधारित सदस्यत्व

३) श्रेणीरचना किंवा अधिक्रमित व्यवस्था

४) अंतर्विवाह समूह

५) खानपान व सामाजिक व्यवहारावरील निर्बंध

६) व्यवसाय निवडीवरील बंधने

७) जात पंचायत

स्तरिकरणाचा एक बंदिस्त प्रकार या दृष्टीने उपरोक्त प्रमुख लक्षणे विचारात घ्यावी लागतात. ही व्यवस्था जन्माधारित असली तरी पाश्चिमात्यीकरण आधुनिकीकरण किंवा परिवर्तनाच्या अन्य प्रक्रियांच्याद्वारे पारंपारिक जातिव्यवस्थेमध्ये बरेच परिवर्तन घडून आले आहे. पूर्वीइतकी ताठरता राहिलेली नसली तरी जातीव्यवस्थेची मूळ चौकट अभेद्य आहे. असे म्हटल्यास अतिशोक्ती ठरणार नाही.

**जाती व्यवस्था आणि आधुनिकीकरण –**

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे भारतीय जातीव्यवस्थेवर अनेक आघात झाले. कारण आधुनिकीकरणाची प्रक्रिया ही औद्योगिकीकरणाशी संबंधित आहेत व औद्योगिक समाजात जातीपेक्षा वर्गाला अधिक प्राधान्य दिले जाते. त्यामुळे जातीव्यवस्थेच्या संरचनेत आणि प्रकार्यात अनेक प्रकारचे परिवर्तन झाले आहे. जातीमध्ये नवीन प्रवृत्तीचा उदय होवू लागला आहे, ते खालील घटकांच्या आधारे लक्षात घेता येईल.

**१) प्रस्थापित जातींच्या स्थितीमध्ये घसरण –**

भारतीय समाजाच्या अनुषंगाने विचार केला तर इतिहास काळापासून भारतामध्ये सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय आदी क्षेत्रात ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व व एकाधिकारशाही होती. आधुनिक समाजात वर्गव्यवस्थेला जाती–व्यवस्थेपेक्षा अधिक महत्त्व असल्याने कनिष्ठ जातीतील व्यक्तीसुद्धा आपल्या स्व–कर्तृत्वाने सामाजिक, आर्थिक, राजकीय धार्मिक, शैक्षणिक आदी क्षेत्रामध्ये आपली क्षमता सिद्ध करताना दिसत आहे. परिणामी प्रचलित समाज व्यवस्थेतील प्रस्थापित जातीच्या स्थितीमध्ये अधोगतीने परिर्वतन होत असताना दिसून येत आहे.

**२) जाती श्रेणी परंपरेत परिवर्तन –**

जाती व्यवस्थेत विभिन्न जातीची एक श्रेणी परंपरा होती. प्रत्येक जातीला आपला जातीय दर्जा ज्ञात होता. त्यामुळे सर्वच जातींना ही श्रेणी रचना मान्य केलेली होती. आधुनिक

समाजात मात्र, ही श्रेणी रचना बदलताना दिसून येत आहे. अगदी कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातीतील व्यक्तीसुद्धा आपल्या सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थानात उर्ध्वोगामी प्रगती करून जातीय श्रेणीरचना परंपरेत उच्च स्थान मिळवित आहे. परंपरागत समाजात व्यक्तिची जात व्यक्तिची समाजातील स्थिती निर्धारित करत होती. परंतु आधुनिक समाजात गुणवत्ता, योग्यता, शिक्षण, संपत्ती आणि राजकीय सत्ता इत्यादींच्या आधारे सामाजिक स्थान निर्धारित होत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी पूर्वीची जातीय श्रेणीरचना आता आधुनिक समाजात कमकुवत होत चालली आहे.

**३) व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य –**

परंपरागत जातीव्यवस्थेमध्ये प्रत्येक जातीला स्वतंत्र व्यवसाय ठरलेला होता. व्यक्तिने आपल्या जातीचाच व्यवसाय करणे बंधनकारक होते. परंतु भारतीय राज्यघटनेनुसा व्यक्तिला व्यवसाय स्वातंत्र्य बहाल करण्यात आल्यामुळे त्यानुसार व्यक्ति आपल्या आवडीनिवडी प्रमाणे व्यवसाय करू लागलेत. त्याचप्रमाणे औद्योगिक क्रांतीनंतर परंपरागत लघुउद्योग, हस्तउद्योग व घरगुती उद्योगांचा ऱ्हास झाला. परिणामी संबंधित आणि विशिष्ट जातीच्या लोकांच्या परंपरागत रोजगारांच्या नवीन रोजगारांच्या संधी उपलब्ध झाल्यात त्यानुसार व्यक्ति आपल्या क्षमतेप्रमाणे विविध क्षेत्रामध्ये रोजगार अथवा व्यवसाय करू लागलेले आहेत. समाजातील काही महत्त्वाची प्रतिष्ठेची पदे जसे की, डॉक्टर, अभियंता, वकील, प्राध्यापक, राजपत्रित अधिकारी इत्यादी पदावर देखील कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातीतील व्यक्तीसुद्धा सेवा करताना दिसून येत आहे. असे असले तरी लोकसंख्येच्या प्रमाणात या प्रतिष्ठेच्या पदावर कनिष्ठ जातीतील लोकांची संख्या अतिशय कमी प्रमाणात आहे. परंतु अल्प प्रमाणात का होईना पण हे परिवर्तन झालेले आहे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

**४) जन्माचे महत्त्व कमी झाले –**

व्यक्तिची 'जात' ही जन्माने ठरत असल्यामुळे परंपरागत समाजामध्ये जन्मास अतिशय महत्त्वाचे स्थान होते. ब्राह्मण जातीत जन्म घेणारी व्यक्ती जन्मानेच श्रेष्ठ ठरत होती. कारण ब्राह्मण जातीला जातीय श्रेणीरचनते उच्चस्थान होते. आधुनिक समाजात जातीचे महत्त्व कमी झाल्याने व्यक्तीने कोणत्या जातीत जन्म घेतला यापेक्षा जन्मानंतर व्यक्तिने काय कर्तृत्व गाजवले? हे महत्त्वाचे व त्यानुसारच व्यक्तिचा सामाजिक दर्जा व स्थान आहे. निर्धारित होतो, मग व्यक्तिची जात करिष्ठ असली तरी फरक पडत नाही.

**५) खानपान विषयक प्रतिबंधामध्ये परिवर्तन –**

पारंपारिक जातीव्यवस्थेमध्ये खानपानाविषयक खूपच विधीनिषेध होते. शाकाहारी, मांसाहारी, कच्चे अन्न, शिजलेले अन्न इत्यादींशी पवित्रता व शुद्धताविषयक भावना आणि श्रद्धा जुळलेल्या होत्या. विशिष्ट जातीतीलच लोक मांसाहार करत होते. काही जातीत मांसाहार निषद मानलेला होता. ज्या जातीचे लोक मांसाहार करावयाचे ते सुद्धा काही पवित्र समजल्या जाणाऱ्या दिवशी मांसाहार वर्ज्य करत असतात. एवढेच नाही तर उच्च जातीतील लोक कनिष्ठ जातीतील लोकांकडे अन्नपाणी घेत नसत. अगदी त्यांचा स्पर्शसुद्धा केलेला पाप मानले जाई. याचबरोबर खानपान विषयक अनेक प्रकारचे जातीय निर्बंध होते. परंतु आधुनिक

समाजात हे शक्य होत नाही. आधुनिक समाजातील जीवन हे स्पर्धात्मक व धक्काबुक्कीचे बनले आहे. त्यामुळे व्यक्तींना बरेचदा घराबाहेरच जेवण करावे लागते. मग हॉटेलमध्ये स्वयंपाक करणाऱ्याची जात विचारणे शक्य होत नाही व ते आधुनिक समाजात महत्त्वाचेही वाटत नाही. व्यक्ती आपल्या आवडीनिवडीप्रमाणे मांसाहार, शाकाहाराची निवड करतात.

**६) अस्पृश्य जातीच्या अधिकारात वाढ –**

परंपरागत भारतीय समाजातील जातीव्यवस्थेत प्रचंड प्रमाणात विषमता, शोषण, गुलामगिरी इत्यादींची दाहकता दिसत होती. जातीच्या रचनेत शुद्र–अतिशुद्र समजल्या जाणाऱ्या जाती अस्पृश्य स्वरूपाच्या होत्या. सवर्णांना या जातींच्या व्यक्तिंचा स्पर्श अथवा सावली देखील सहन होत नव्हती, निषद मानल्या जात होती. अस्पृश्यांना अनेक प्रकारच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि त्याचबरोबर राजकीय अधिकारापासून वंचित ठेवलेले होते. आधुनिक समाजात मात्र, अनेक समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळे, समानतेचे तत्व स्वीकारल्यामुळे भारतीय राज्यघटनेच्या तरतुदीप्रमाणे सर्वांना न्याय, मुलभूत हक्क इत्यादींची हमी प्राप्त झाल्यामुळे तसेच एक 'मत' एक मूल्य या संकल्पनेमुळे अस्पृश्यांना देखील सवर्णांना इतकेच महत्त्व प्राप्त झाले. त्याचप्रमाणे अस्पृश्यांना मुख्य प्रवाहात येण्यासाठी आरक्षणासारखा मार्ग अवलंबिला गेला. त्याचप्रमाणे आजही वंचितांना त्यांच्या विकासासाठी शासनस्तरावर विविध योजनांची अंमलबजावणी होत आहे. त्यातून अस्पृश्यांना मानवतेची भावना प्राप्त होत आहे. एकंदरित आधुनिक समाजाचा विचार केल्यास अस्पृश्यता जवळपास इतिहास जमा झालेली आहे.

**७) जातीय संघटनाची निर्मिती –**

आधुनिक काळामध्ये प्रत्येकच जातींनी आपआपल्या जातीय संघटना स्थापन केलेल्या दिसून येत आहे. या जातीय संघटना प्रादेशिक व राष्ट्रीय स्तरावर जात हिताचे कार्य करतात. आपआपल्या जातीला सामाजिक, राजकीय व शैक्षणिक गतीशीलता प्राप्त करून देण्याचे कार्य करतात. प्रत्येक जात आपले जातीय संघटन मजबूत करून राजकीय क्षेत्रात व निवडणुकांच्या काळात दबदबा निर्माण करण्याचा प्रयत्न करताहेत.

**८) विवाहविषयक प्रतिबंधामध्ये परिवर्तन –**

जातीव्यवस्था टिकून राहण्याचा मूलाधारच जाती अंतरविवाहपद्धती (Cast Endogamy) हा आहे. प्रचलित समाजव्यवस्थेत प्रत्येक व्यक्ती आपल्या स्वजातीय जोडीदारासोबतच विवाहबंधनास महत्त्व देतात. परंतु आधुनिक समाजामध्ये चित्रपट, प्रसारमाध्यमे, विचारधारा, वैयक्तिक हितसंबंध इत्यादीमुळे व्यक्ती बरेचदा आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास सुद्धा पसंती देतात. त्याचप्रमाणे कायद्यानेसुद्धा अशा विवाहास संरक्षण दिल्यामुळे आधुनिक समाजात विवाहविषयक जातीय बंधने शिथिल होत चाललेले आहे.

**९) जाती–जातीच्या संबंधामध्ये परिवर्तन –**

आधुनिक समाजामध्ये जाती–जातींच्या पारस्पारिक संबंधामध्ये खूपच परिवर्तन झाले आहे. पूर्वी समाजात बलुतेदारी पद्धती अस्तित्वात होती. त्यामुळे एक जात दुसऱ्या जातीला आपल्या व्यवसायाद्वारे सेवा देत होती. त्यामुळे त्यांच्यामध्ये परस्परावलंबनाची भावना

होती. आधुनिक समाज हा उद्योग प्रधान व चलनी अर्थव्यवस्थेचा समर्थक असल्यामुळे पूर्वीप्रमाणे जाती-जातीमध्ये असलेले संबंध आज पहावयास मिळत नाही.

एकंदरित आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे संपूर्ण समाजसंरचनाच प्रभावित झाली व समाज संरचनेचा मुलाधार असलेली जाती संरचना देखील प्रभावित झाली. जाती व्यवस्थेमध्ये परिवर्तन होवून त्यातील ताठरता कमी झालेली आहे व लवचिकता अधिक निर्माण झाल्याचे दिसून येते. असे असले तरी सुद्धा आधुनिक समाजात जातीव्यवस्था एका वेगळ्या मार्गाने आपले अस्तित्व टिकून आहे.

## ५.३.३ आप्तसंबंध, संयुक्त कुटुंब आणि आधुनिकीकरण

(Kinship Joint family nand Modernization)

वास्तवत: आप्तसंबंध, संयुक्त कुटुंब आणि आधुनिकीकरण या सर्व वेगवेगळ्या संकल्पना आहेत. आप्तसंबंध आणि कुटुंब या दोन्ही संकल्पना अथवा सामाजिक संस्था परस्पर संबंधित असून, परस्पर निर्भर सुद्धा आहे. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत मात्र, दोन्ही संस्थांचे स्वरूप पूर्णत: बदलत चालले आहे. या सामाजिक संस्थेवर आधुनिकीकरणाचा काय परिणाम झाला हे अभ्यासन्यापूर्वी प्रचलित समाजव्यवस्थेतील आप्तसंबंध व्यवस्था आणि कुटुंब संस्था यांचे स्वरूप कसे होते हे समजून घेणे उचित ठरेल.

**आप्तसंबंध व्यवस्था –**

प्रत्येक व्यक्ती कोणत्यातरी एका कुटुंबचा सदस्य असतो. कुटुंबामध्ये भाऊ-बहीण, आई-वडील, आजी-आजोबा इत्यादी सदस्य असतात. कुटुंबात विवाहित भाऊ असेल तर वहिणीसुद्धा असतेच. म्हणजेच हे सर्व एकमेकांचे आप्त (नातेवाईक) असतात. वास्तवत: कुटुंब हा एक आप्तसंबंधी समूह आहे. आता या ठिकाणी कुटुंबातील 'वहिणी' ही व्यक्ती दुसऱ्या कुटुंबातून आलेले असते व ती ज्या कुटुंबातून आलेले असते त्या कुटुंबातील अन्य सदस्य देखील परस्परांचे नातेवाईकच ठरतात.

म्हणजेच आप्तसंबंध व्यवस्थेचे दोन प्रकार पडतात.

१) रक्त संबंधित आप्त (Blood Kinship)

२) विवाह संबंधित आप्त (Marital Kinship)

उपरोक्त विवेचनानुसार, भाऊ आणि भावाची मुले रक्त संबंधत असतात. त्यामुळे त्यांना रक्तसंबंधित आप्त म्हणतात. तर दुसरीकडे भावाची पत्नी ही नातेवाईक असते. पण तिच्याशी रक्त संबंध नसतो. तर हा संबंध विवाहाच्या माध्यमातून आलेला असतो. म्हणजेच भावाशी विवाह करून वहिणी कुटुंबात आलेली असते. त्यामुळे हा आप्तसंबंध विवाह संबंधित आप्तसंबंध ठरतो. अशा प्रकारे प्रत्येक कुटुंबात दोन प्रकारचे आप्तसंबंध असतात.

उपरोक्त आप्तसंबंधाचे विश्लेषण हे उत्तर भारतीय आप्तसंबंधाचे उदाहरण आहे. भारतीय समाज बहुसांस्कृतीय असल्यामुळे उत्तर भारतीय आप्तसंबंध व्यवस्था ही दक्षिण भारतीय आप्तसंबंध व्यवस्थेशी एकरूप असेलच असे नाही. म्हणजेच त्यामध्ये भिन्नता आहे.

**संयुक्त कुटुंब** (Joint Family) –

''भारतीय समाजातील सर्वात लहान आणि संरचनात्मक गट म्हणजे कुटुंब होय.'' कुटुंब निर्मिती ही विवाह संस्थेमार्फत होते. विवाहाच्या माध्यमातून एकत्र येणाऱ्या दोन भिन्न लिंगीय व्यक्ती, यांच्यातून आपोआपच आप्तसंबंध व्यवस्था निर्माण होते. इरावती कर्वे तर म्हणतात की, आप्तसंबंधाचा विस्तारच जाती निर्माण करतो. म्हणजेच जातीव्यवस्था आप्तसंबंध व्यवस्थेचा विस्तारच आहे. भारतीय समाजात कुटुंब संस्थेला इतर राष्ट्रातील कुटुंब संस्थेपेक्षा खूपच महत्त्वाचे स्थान आहे. भारतीय समाजात क्रीया करणारा सर्वात लहान समूह म्हणून कुटुंबाकडे बघितले जाते.

मूलत: भारतीय कुटुंबाची परिभाषाच विवादास्पद आहे. प्राच्यविद्या दृष्टीकोनाचे समर्थकांचे म्हणणे आहे की, भारतीय समाज मूलत: संयुक्त कुटुंबाचाच समाज आहे, असे असले तरी कुटुंबाचे स्वरूप समजून घेणे महत्त्वपूर्ण ठरेल. साधारणत: आईवडील आणि त्यांची संतती यांचा समूह म्हणजे कुटुंब होय, असे कुटुंबास प्राथमिक किंवा केंद्र कुटुंब म्हटले जाते. काही वेळा कुटुंबाचा तात्पर्य पितृवंशीय कुटुंब मातृवंशीय कुटुंब किंवा असा सजातीय समूहा की ज्याचे पूर्वज एकच आहे, असाही होतो.

भारतामध्ये 'कुटुंब' या घटकावर भरपूर संशोधन झालेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने के. एम. कपाडिया यांनी १९५५ मध्ये Marriage and Family in India, आय. पी. देसाई यांनी १९६४ मध्ये 'some aspeats of family in mahuwa' एम. एस. गोरे यांनी १९६८ मध्ये 'Urbanization and family change'. प्रसिद्ध सामाजिक मानवशास्त्रज्ञ इरावती कर्वे यांनी १९९० मध्ये 'Kinship organization in India' या ग्रंथात आप्तसंबंधाच्या विश्लेषणाबरोबरच संयुक्त कुटुंबाची परिभाषा देखील केलेली आहे. ती पुढील प्रमाणे, ''संयुक्त कुटुंब व्यक्तींचा असा समूह आहे की, जो सामान्यत: एका छताखाली निवास करतात, ज्यांचे एक स्वयंपाक घर असते, ज्यांची संपत्ती सामूहिक असते, जे धार्मिक कर्मकांड व पूजाविधीमध्ये सामूहिक रूपाने सहभागी असतात, एकमेकांशी विशिष्ट बंधाने संबंधित असतात.''

उपरोक्त उल्लेखित आय.पी. देसाई यांनी गुजरातमधील महुआ जिल्ह्याचा अभ्यास करून कुटुंबाची अनुभवाधिष्टित व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. ते म्हणतात की, भारतामध्ये जेव्हा केव्हा कुटुंबाच्या विषयी चर्चा केली जाते. त्यामध्ये अनिवार्य रूपाने देशात कुटुंबाचा अर्थ संयुक्त कुटुंब असाच होतो. या देशाची परंपरा संयुक्त कुटुंबच राहिली आहे. ज्याप्रमाणे इरावती कर्वे यांनी संयुकत कुटुंबाचे निकष सांगितले आहे त्याचप्रमाणे आय. पी. देसाई यांनी संयुक्त कुटुंबाची केवळ एक कसोटी निर्धारित केलेली आहे. आणि ती म्हणजे संयुक्तता (Jointness) होय.

आधुनिक आणि गतीशिल समाजात कुटुंब, संयुक्त कुटुंब आणि आप्तसंबंध या संस्थांना काय स्थान आहे? आप्तसंबंध व्यवस्थेचा ऱ्हास होत आहे काय? आधुनिक आणि उद्योगप्रधान समाजात व्यवसाय व अर्थाजनाच्या दृष्टीने केंद्रीय कुटुंबच उपयुक्त आहे काय? इत्यादी प्रश्नांचा विचार करणे आवश्यक ठरेल. भारतीय आणि पौर्वात्य देशाच्या दृष्टीने कुटुंब, संयुक्त कुटुंब आणि आप्तसंबंध व्यवस्था अतिशय महत्त्वाच्या आहेत. त्यांची संस्कृती या संस्थांशी

जोडलेली आहे. त्यामुळे या परिवर्तनशील आधुनिक समाजात या देशांना आपली संस्कृती इतिहास जमा करावी लागते की काय? अशी भिती निर्माण होत आहे.

आधुनिक समाजातीला उद्योग आणि व्यवसायाची संरचना ही केंद्रीय कुटुंबास सोयीस्कर ठरणारीच आहे. आधुनिक सामाजिक गतीशिल प्रक्रियेत आप्तसंबंध आणि संयुक्त कुटुंबव्यवस्था जोपासने व जपने कठीण आहे. कारण औद्योगिकरणातून आधुनिकता आणि परिवर्तन येते. औद्योगिकरणामुळे प्रचलित व्यवस्थेची संरचना पूर्णपणे गतीमान होते. त्यांच्यातील उपव्यवस्था सुद्धा बदलतात. व्यावसायिक गतीशिलता निर्माण होते. पारंपारिक व्यवसायाचा ऱ्हास होवून त्यातील मनुष्यबळ औद्योगिक क्षेत्रात इतरत्र पर्याय शोधतात. म्हणजे कुटुंबाचा पारंपारिक व्यवसाय मोडकळीला आल्यामुळे कुटुंबाची 'संयुक्तता' देखील अडचणीत येते. परिणामी कुटुंबाचे विघटन होऊन अर्थार्जनाच्या अनुषंगाने केंद्रीय कुटुंबास प्राधान्य दिले जाते. संयुक्त कुटुंबात वय, नाती, गोती इत्यादींना जो मानसन्मान होता तो औोगिक समाजातील केंद्रीय कुटुंबात शक्य होत नाही. उद्योग क्षेत्रात आपल्या स्थानिक आणि प्रादेशिक निष्ठासुद्धा आडव्या येता कामा नये. ज्या ठिकाणी आपले आप्तेष्ठ, नातेवाईक उद्योग किंवा मजुरी करतात त्याचठिकाणी आपणही व्यवसाय करूच असे निश्चित नसते. आधुनिक उद्योगधंदे हे रिझल्ट ओरिएंटेड असल्यामुळे त्यामध्ये आप्तसंबंधांना स्थान नसते. तर व्यक्तीच्या अंगी असलेले कौशल्य, गुणवत्ता, क्षमता इत्यादींना महत्त्व असते. म्हणजेच या उद्योगरचनेत कामाच्या अटी सुद्धा वेगळ्याच असतात, प्रसंगी कुटुंबापासून दूर अन्य राज्यात अथवा राष्ट्रात व्यवसाय करावा लागतो. त्यामुळे पैसा, आर्थिक सुरक्षिततेसाठी इतर नातेवाईकांचा आधार मिळेलच याची शाश्वती नसते. एकंदरित आधुनिक उद्योग प्रधान समाज हा बुद्धीवादीशी संबंधित असल्याने तसेच व्यक्तिवाद आणि व्यक्तिस्वातंत्र्य या मूल्यांशीही पूर्णत: संबंधित आहे. अणि केंद्रीय कुटुंब या सर्वांच्या आधारावरच आधारलेले असते. परिणामी संयुक्त कुटुंबापेक्षा केंद्र कुटुंबच आधुनिक समाजास पोषक व उपयुक्त ठरणारे आहे.

## ५.३.४ धर्म आणि नृवांशिक बहुलता आणि आधुनिकीकरण –

(Religion and Ethnic Plurality and Modernization) -

धर्म मानवी समाजाचे व्यापय, स्थायी आणि शाश्वत तत्त्व आहे, असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही. या सर्व बाबींचा अभ्यास केल्याशिवाय भारतीय समाजाचे वास्तवरूप लक्षात येत नाही. भारतीय समाजाची धार्मिक संरचना समजून घेण्यापूर्वी धर्म म्हणजे काय? हे समजून उचित ठरेल.

धर्माचा संबंध अलौकिक शक्तीवरील विश्वासाशी आहे. आणि विश्वास मानव पूजा, कर्मकांड, भक्ती, आराधना इत्यादींच्या माध्यमातून व्यक्त करत असतो. म्हणजे धर्माविषयी असा दृढ विश्वास असतो की, अलौकिक शक्तीद्वारे निसर्ग आणि मानवी जीवन नियंत्रित आणि निर्देशित होत असते.

भारतामध्ये जगातील जवळपास सर्वच धर्मीय लोक निवास करतात. कदाचित जगातील धार्मिक विविधता असलेला भारत एकमेव देश असेल. भारतामध्ये साधारणत: सहा धर्माचे अनुयायी आढळतात. त्यामध्ये हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध आणि जैन याशिवाय

पारशी, यहुदी, ज्यू इत्यादी धर्माचे अनुयायी देखील आढळतात. मुख्य धर्मामध्येसुद्धा भेदाभेद आढळतात. उदा. हिंदू धर्मामध्ये शैव पंथ, वैष्णव पंथ, महानुभ पंथ, वारकरी पंथ, शक्ति, ब्राह्मो समाज, आर्य समाज इत्यादी. इस्लाम धर्मात शिया आणि सुन्नी, ख्रिश्चन धर्मामध्ये प्रोटेस्टंड आणि कॅथोलिक, बौद्ध धर्मामध्ये हनियान आणि महायान, शिख धर्मामध्ये अकाली आणि गैरअकाली, जैन धर्मामध्ये श्वेतांबर आणि दिगंबर असे विविध पंथ किंवा सांप्रदाय प्रत्येक प्रत्येक धर्माम्ध्ये कमी अधिक संख्येने आढळून येतात. हिंदू, बौद्ध आणि जैन हे भारतीय धर्म असून, ख्रिश्चन, इस्लाम, पारशी, यहुदी आदी धर्म विदेशातून आलेले आहेत. इतक्या प्रचंड प्रमाणात धार्मिक बहुलता असतानासुद्धा भारतामध्ये आधुनिक समाजाने धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व स्वीकारलेले असल्यामुळे काही अपवाद वगळता सर्वच धर्माचे अनुयायी भारतीय समाजव्यवस्थेमध्ये सुरळितपणे वावरताना दिसतात. कोणत्याही धर्माचा अनुयायी वैयक्तिक पातळी स्वधर्माचा प्रचार-प्रसार करू शकतो. आपल्या धर्माचा विकास करू शकतो. त्यामुळे भारतामध्ये सहिष्णुता आणि समन्वयाचे तत्त्व दिसून येते. त्याचप्रमाणे विभिन्न धर्मियांमध्ये होणाऱ्या आंतरक्रियामुळे एकमेकांच्या धर्माबद्दल असलेली भावना, रीतिरिवाज आदींची माहिती एकमेकांना प्राप्त होते. याविषयी डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी मांडलेल्या संस्कृतीकरणाची संकल्पना अभ्यासली तर लक्षात येईल, आदीवासी लोकांनी हिंदू धर्मीय तत्त्व, देवी, देवता, सण, उत्सव, इत्यादी जीवन पद्धती स्वत: अंगीकारली होती.

नागा, गारो, भील आणि गोण्ड आदिवासींनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला आहे तर काहींनी इस्लाम धर्म स्वीकार केलेला आहे तर काही दलितांनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला आहे. ही सर्व धर्म-धर्मांतराची प्रक्रिया आधुनिक समाजातील आहे. भारतामध्ये २०व्या शतकात धर्मांतराची प्रक्रिया वेगात होती. व्यक्तिवर धर्माचा इतका पगडा असतो की, सहसा ती धार्मिक बंधन झुगारत नाही. पण आधुनिक आधुनिक समाजात व्यक्तिला हक्क, न्याय, समता इत्यादींची आधुनिक शिक्षण आणि प्रबोधनाच्या माध्यमातून ओळख झाल्यामुळे व्यक्तिवरील धर्माच पकड आधुनिकीकरणामुळे सैल होत चाललेली आहे.

**नृवंशीय बहुलता** (Ethnic plurality) –

नृवंश हा समाजशास्त्रातील समुहाचा एक आधारभूत घटक आहे. म्हणजे 'नृवंश' या घटकांच्या आधारे एक वेगळा समूह निर्माण होऊ शकतो. नृवंशिक समूह आपल्या रंगाच्या आधारे अथवा संस्कृतीच्या आधारे विश्लेषित केला जाऊ शकतो. साधारणत: नृवंशीय समूह म्हणजे लोकसंख्येचा असा भाग आहे की, जो कुटुंब पद्धती, भाषा, मनोरंजन, प्रथा, धर्म, संस्कृती आणि उत्पत्ती इत्यादींच्या आधारे आपणास दुसऱ्यांपासून वेगळा समजतो. म्हणजेच एकाच प्रकारची भाषा, प्रथा, धर्म, कुटुंब, रंग आणि संस्कृती इत्यादींशी संबंधित लोकांच्या एका समुहास नृवंशिकता म्हटले जावू शकते. थोडक्यात, समानवंश, समान इतिहास, समान वेशभूषा, समान खाद्यपदार्थांचा उपभोग घेणारा सामाजिक समूह सुद्धा एक नृवंशिक समुहाचे आहे. समान आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक हितासंबंधी समूहसुद्धा नृवंशीय समूहच आहे. भारतीय समाज हा बहु नृवंशीय समाज आहे.

समान नृवंशीय लोकांमध्ये परस्पर प्रेम, सहकार्य, संघटन इत्यादी गुण दिसून येतात. त्याचप्रमाणे अहंमपणा सुद्धा दिसून येतो. एक नृवंशीय समूह दुसऱ्या नृवंशिय समुहापेक्षा

आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा नेहमीच प्रयत्न करतो. ज्या समुहाकडे आर्थिक, सामाजिक आणि राजकीय सत्ता असते तो समूह आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी दुसऱ्या नृवंशीय समुहाचे शोषण करतो. त्यामुळे दोन समुहांमध्ये नेहमी तणाव, वाद आणि संघर्षमय वातावरण दिसून येते. कधी कधी तर सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय उद्देशांच्या पूर्ततेसाठी लोकांचा एक सजातीय समूह एकत्र येतो तेव्हा तो समुहाशी तिरस्काराच्या भावनेतून बघतो. याचे उदाहरण दुसऱ्या म्हणून आपणास बिहारमधील छोटा नागपूर आणि संथालमधील आदिवासी आपल्या विशिष्ट संस्कृती आणि भाषेमुळे वेगळ्या झारखंड राज्याची मागणी करत आले व त्यांना काही प्रमाणात यशही प्राप्त झाले. याचप्रकारचे उदाहरण आंध्रप्रदेशातील तेलंगणा, महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाड्याची वेगळी मागणी करणारा एक समूह अस्तित्वात आहे. अर्थात प्रत्येक समुहाचा प्रश्न वेगवेगळा आहे. आणि हा वेगळा प्रश्नच समूह निर्माण करण्यास बाध्य करतो.

आधुनिक समाज तर बहुलता वादाच्या तत्त्वावर आधारित आहे. विशेषत: सांस्कृतिक बहुलतावाद हा आधुनिक समाजाचा आधारच आहे. जसजसा समाज परंपरेकडून आधुनिकतेकडे मार्गक्रमण करतो तस-तसे त्या समाजात नवनवीन ज्ञान, अनुभव, मूल्ये इत्यादीमध्येसुद्धा वृद्धी होत असते.

## ५.४ **शोषण** (Exploitation)

शोषण ही संकल्पना बहुधा 'आर्थिक शोषण' अशा अर्थासाठीच वापरली जाते. परंतु शोषणाचे वेगवेगळे प्रतिमान आधुनिक समाजात अस्तित्वात आहेत. साधारणत: कामगार शोषण आणि आधुनिक समाज या अनुषंगाने चर्चा करणे या ठिकाणी उचित ठरेल तेव्हा कामगाराचे शोषण म्हणजे 'एखाद्या व्यक्तिकडून वास्तविक अथवा खोटी धमकी देवून अथवा भिती निर्माण करून त्याची इच्छा नसताना सुद्धा श्रम करून घेणे होय.''

कामगाराचे वेगवेगळे प्रकार आहेत आणि या कामगारांच्या प्रकारानुसार शोषणाचेही प्रतिमान बदलत जातात. विशेषत: महिला कामगाराच्या शोषणाचा प्रकार फारच विचित्र आणि भयानक स्वरूपाचा आहे. कारण भारतीय समाजाचा विचार केल्यास या ठिकाणी पुरुष वर्गाची अधिसत्ता राहिली आहे. त्यामुळे महिला कामगाराचे कामगार म्हणून होणारे शोषण व महिला म्हणून होणारे शोषण असे दुहेरी शोषणास महिला कामगारांना सामोरे जावे लागते.

भारतीय समाजातील दुर्बल घटकांतर्गत समाविष्ट असलेला 'बंदिस्त कामगार वर्ग' हा इतिहास काळापासून शोषणाची शिकार झालेला आहे. हे मजूर अथवा कामगार आपल्या आर्थिक गरजांची पूर्तता करण्यासाठी सावकाराकडून किंवा श्रीमंत जमीनदाराकडून सशर्त कर्ज घेतात आणि या कर्जाची व्याजासहित परतफेड करेपर्यंत त्यांच्याकडेच मजुरी करतात. २५ ऑक्टोबर १९७५ ला नृवंशीय बहुलता Bonded Labour System Abolition ordinance १९७६मध्ये 'Bonded Labour System Abolition Act' तयार करण्यात आला व या कायद्यानुसार देशातील 'बंदिस्त कामगार' ही प्रथा समाप्त करण्यात आलेली आहे.

आजीही देशामध्ये प्रचंड प्रमाणात बालकामगार आणि महिला कामगारांवर अनेक

उद्योगाचे उत्पादन अवलंबून आहे. या वर्गातील कामगाराचे शोषण देखील अधिक प्रमाणात करण्यात येते, त्यांच्या शोषणाची साखळी साधारणत: खालीलप्रमाणे दिसून येते.

प्रथम गट (मुख्य शोषक), द्वितीय गट (मध्यस्त), तृतीय गट (शोषीत)

वरील साखळीवरून असे लक्षात येते कामगाराचे शोषण करणारा प्रथम गट हा मुख्य शोषकांचा असून, द्वितीय गटामध्ये होणारे शोषण हे मध्यस्ताकडून (Agent) होणारे असून, तृतीय गटात शोषितच शोषितांचे शोषण करताना दिसतो.

याशिवाय कामगाराचे पदोपदी शोषण होत असते. त्यामध्ये आर्थिक शोषण, मानसिक शोषण, शारीरिक शोषण, लैंगिक शोषण या विविध प्रतिमानातून कामगाराचे होणारे शोषण आधुनिक समाजात दिसून येते.

**अधिनता आणि अपवर्जन** (Sub-ordination and exclusion)

समता आणि स्वातंत्र्य हे भारतीय लोकशाहीचे महत्त्वाचे अंगे आहेत. हे वास्तविक असले तरी भारतीय समाजातील दारिद्र्यता, निरक्षरता आणि बेकारी आदी समस्यांमुळे अपवर्जित (exclosive) समाज आधुनिक काळात देखील मुख्य प्रवाहापासून दूरच आहे. तेव्हा अशा वर्गातील शेतकरी, दलित, आदिवासी, महिला, अंध-अपंग इत्यादींना आरोग्य, शिक्षण आणि अहार प्राप्त करण्यासाठी रोजगार आणि रोजगाराचा योग्य मोबदला मिळेल अशी व्यवस्था आधुनिक समाजात होणे गरजेचे आहे. साधारणत: अपवर्जन म्हणजे एखाद्या सामाजिक समूहाच्या शक्ती केंद्रापासून आणि संसाधनापासून काही समुहांना दूर ठेवण्याची प्रक्रिया आणि त्याचा परिणाम होय.

अपवर्जित म्हणजे संसाधनावरील अधिकार, समान संधी आणि नियंत्रणापासून वंचित होणे होय. आधुनिक आणि औद्योगिक समाजात श्रमावरील अधिकार आणि उत्पादित संसाधनावरील अधिकाराने वंचित असणे. अपवर्जिततेशी संबंधित आहे. त्याचप्रमाणे शिक्षण, आरोग्य, निवारा, सार्वजनिक सुविधा, मूलभूत गरजा इत्यादीपासून वंचित असणे देखील अपवर्जिततेशी संबंधित आहे.

अपवर्जन भेदभावयुक्त वर्तनाचे एक जीवंत रूप आहे. मानवी विकासाच्या अथवा सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत अपवर्जनाच्या प्रक्रियेमुळे मानवाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रापासून लोकांच्या एका विशिष्ट समुहाला दूर ठेवण्याचे षडयंत्र या प्रक्रियेत समाविष्ट आहे. अपवर्जनाची प्रक्रिया ही केवळ अलगता आणि वंचितता या घटकाशी संबंधित नसून समाजामध्ये सांस्कृतिक पातळीवर श्रेष्ठता आणि कनिष्ठतता हे तत्त्व निर्माण करण्याचे कार्य करते. परिणामी समाजात वर्चस्व (Domination) आणि अधिनता (Subordination) अशी परस्पर विरोधी वर्गीय समाज निर्माण होतो. यातूनच शोषणांचा उगम होतो. सामाजिक अपवर्जन एक बहुआयामी व्यवस्था असून, या व्यवस्थेत मूलभूत गरजा, रोजगार, उपभोग, शिक्षण, कल्याणकारी राज्य, संपत्ती, आत्मसन्मान इत्यादीपासून काही समुहांकडून या अपवर्जित समूहांना वंचित ठेवले जाते. उदा. जमीनदार लोक शेतमजुरांना, राजकीय सत्ताधारी वर्ग इतरांना न्याय, अधिकारापासून वंचित ठेवतो, पुरोहित दलितांना व अस्पश्यांना मंदिर प्रवेशापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न करतो. त्याचप्रमाणे

भांडवलदार कामगारांना उत्पादन प्रक्रियेशी संबंधित अनेक अधिकारापासून वंचित ठेवतात.

आधुनिक आणि औद्योगिक समाजात अपवर्जित लोक हे भूमिहीन शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी, बालकामगार, घरकाम करणारे मजूर, असंघटीत कामगार, वेठबिगार कामगार, सफाईकामे करणारे लोक इत्यादी होय.

सामाजिक अपवर्जन ही एखाद्या समाजाचे काही सदस्य वा नागरिकांना मुख्य विकास प्रवाहापासून पूर्णत: किंवा अंशत: दूर वा वंचित ठेवण्याची प्रक्रिया आहे.

### **५.४.१ श्रमबाजार** (Labour Market)

कोणत्याही समाजात व्यक्तिला जीवंत राहण्यासाठी मुलभूत गरजांची पूर्तता करावी लागते. या गरजा पूर्ण करण्यासाठी व्यक्तीला कोणत्या न कोणत्या प्रकारचे श्रम करावे लागते, श्रमाची विक्री करावे लागते आणि त्यासाठी श्रमबाजारपेठेची आवश्यकता असते. तेव्हा ही श्रमबाजारपेठ म्हणजे काय हे समजून घेणे उचित ठरेल. डॉ. टी. एन. भागोलीवाल 'Economics of Labour and Social welfare' या ग्रंथात श्रमबाजाराची व्याख्या करताना म्हणतात की, ''ज्या प्रक्रियेने एखाद्या विशिष्ट प्रकारच्या श्रमाचा पुरवठा व त्यासाठी असणारी मागणी यांच्यात समतोल निर्माण होतो वा समतोल निर्माण करण्याचा प्रयत्न होतो त्यास श्रमबाजारपेठ असे म्हणता येईल.''

श्रमबाजार पेठ व वस्तू आणि सेवांची बाजारपेठ दोन्हीही बाजारपेठा असल्या तरी दोन्ही भिन्नभिन्न स्वरूपाच्या आहेत. वस्तू आणि सेवाच्या बाजारपेठेतील संबंध हे विक्रीची प्रक्रिया पूर्ण करेपर्यंतच असतात. परंतु श्रमाची प्रक्रिया दीर्घकालीन असल्यामुळे श्रमबाजारात व्यक्तिगत घटकांकडे विशेष लक्ष दिले जाते. त्याचप्रमाणे श्रमबाजारपेठ ही विशेषत: स्थानिक पातळीवरच असते. कारण श्रमविक्रीसाठी स्थलमर्यादा असते. वस्तुमात्र साठवणूक व व्यवस्थित पॅकिंग करून निर्यात किंवा आयात केल्या जावू शकतात. अपवाद म्हणून स्थलांतरित कामगाराचा विचार करता येईल. परंतु वस्तुंच्या बाजारपेठेपेक्षा श्रमबाजाराची गतीशिलता खूपच कमी असते. त्यामागे अनेक सामाजिक आणि आर्थिक कारणे आहेत. एखाद्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या अतिरिक्त श्रम पुरवठ्याचा परिणाम अन्य ठिकाणच्या वेतनावर होण्याची शक्यता कमी असते. त्याचप्रमाणे श्रमाच्या बाजारपेठेत मुक्तेदारी ही अपवादात्मकच आढळते. उदा. अत्यंत दुर्मिळ स्वरूपाचे कौशल्यप्राप्त कामगार. भारतीय सामाजाचा विचार करताना या ठिकाणी बेकारीचे प्रमाण प्रचंड आहे. त्यामुळे मुबलक श्रमिक उपलब्ध आहेत. ही कामगारांची संख्या अधिक असली तरी ते गरीब आणि असंघटित स्वरूपाचे आहेत. त्यामुळे हा श्रमिक वर्ग श्रमिक ग्राहकांच्या इशाऱ्यावर नाचणारा आहे. अत्यंत कुशल कामगार वगळता अन्य कामगारांत काम प्राप्त करण्यासाठी खूपच स्पर्धा असलेले दिसून येते. कारण श्रम ही अत्यंत नाशवंत अशी बाब आहे. कारण वेळ निघून गेल्यानंतर श्रमाचे अस्तित्व संपलेले असते. म्हणजे मागणी नसेल तर श्रम साठवून ठेवता येत नाही.

**भारतातील श्रमबाजार –**

भारत हा कृषी प्रधान देश असल्यामुळे येथील सर्वात जास्त रोजगार हा शेती आणि शेतीशी संबंधितच आहे, असे असले तरी अन्य क्षेत्रातील रोजगार देखील प्रचंड प्रमाणात

आहे. भारतामध्ये उपलब्ध होणारा श्रमपुरवठा हा शेतीवर जगणारा लोकसंख्येचा अतिरिक्त भाग आहे. वर्तमानकाळात नागरी भागातून कारखान्याकडून मजुरीसाठी वळणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

भारतातील कामगार वर्ग खूपच अस्थिर आहे. भारतामध्ये कुशल, प्रशिक्षित आणि तत्सम स्वरूपाचे कामगार फार कमी प्रमाणात आहेत जे आहेत ते विदेशात स्थलांतरित होत आहे. अकुशल व काम न करण्याची इच्छा असलेला वर्ग मात्र, फार मोठा आहे. हा असमतोलच भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला मारक ठरत आहे. कामगाराच्या अतिरिक्त पुरवठ्यामुळे व त्यांच्यातील अस्थिरतेमुळे औद्योगिक क्षेत्रातील रोजगाराचे स्वरूप तात्पुरते व किरकोळ असे होते हे भारतीय श्रमबाजाराचे वैशिष्ट्यच मानावे लागेल.

भारतामध्ये बालकामगार आणि महिला कामगार यांचे प्रश्न अतिशय महत्त्वाचे आहे. या दोन्ही वर्गाची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. बालकामगार कायद्याने बंद असले तरी प्रत्यक्षात मात्र, बालकामगारांची संख्या बरीच आहे हे नाकारता येण्यासारखे नाही.

**लिंगभाव आणि श्रमबाजार –**

आज संपूर्ण जगभरात महिलांच्याविषयी पुरुषांमध्ये हिंसक प्रवृत्ती दिसून येत आहे. हे स्पष्ट रूपाने मानवाधिकाराचे हननच आहे. मानवाची ही हिंसक प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढतच जात आहे. आणि क्रूर रूप धारण करत आहे. यास विरोधात्मक उपाययोजना अद्याप तरी प्रभावीरित्या तयार करण्यात आलेली नाही. उलट या स्थितीला एक समस्या म्हणून स्वीकार केल्या जात आहे. अशाप्रकारे आधुनिक समाजात स्त्रियांची सामाजिक स्थिती असताना आर्थिक स्थिती फारच चांगली आहे असे नाही. भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार केल्यास लक्षात येईल की, साधारण स्त्रिया–पुरुषांपेक्षा दुप्पट कार्य करतात. मग ते शेतीशी संबंधित असो, व्यवसायाशी अथवा उपजिविकेशी संबंधित कोणतेही कार्य असो स्त्रिया त्यामध्ये निश्चितच पुरुषापेक्षा अधिक वेळ कार्यरत असतात. परंपरागत समाजात तर स्त्रियांचा श्रमाला श्रम मानलच जात नाही. स्वयंरोजगार आणि असंघटित क्षेत्राशी संबंधित महिला राष्ट्रीय आयोगाच्या अहवालानुसार एका राज्यातील समाजकल्याण संचालकाचे म्हणणे आहे की, आमच्या राज्यात असंघटित क्षेत्रात एकही महिला कार्य करत नाही. पण जेव्हा आयोगाने विचारले की, ''काय आपल्या क्षेत्रात एकही महिला जंगलातून लाकाडाच्या मोळ्या आणत नाही? काय एकही महिला शेतकाम करत नाही? तर तेव्हा संचालक म्हणतात की अशा भरपूर महिला आहे. यावरून स्पष्ट होते की, महिलांच्या या श्रमाचा आर्थिक श्रमात समावेश केला जात नाही. जर या प्रकारच्या श्रमाचा विचार केला तर ग्रामीण भागातील ८८ टक्के आणि शहरी भागातील ६६ टक्के महिला उत्पादक ठरतात.

भारतामध्ये २००१ साली ग्रामीण क्षेत्रात ३०.९ टक्के आणि शहरी क्षेत्रात ११.५५ टक्के महिला कार्यक्षेत्रात सहभागी असल्याचे दिसते तर हे प्रमाण पुरुषामध्ये ग्रामीण क्षेत्रात ५२ टक्के आणि शहरामध्ये ५०.८० टक्के दिसून येते. २००१ साली महिलांची एकूण भागिदारी २५.७ टक्के, १९९९ मध्ये संघटित क्षेत्रामध्ये १७.२ टक्के व सार्वजनिक क्षेत्रामध्ये केवळ १४.५ टक्के, १९९७ मध्ये १९९७ मध्ये सरकारमध्ये १४.६ टक्के, १९९९–2000मध्ये १४ टक्के सुशिक्षित महिला बेरोजगार आणि ९० टक्के महिला असंघटित क्षेत्रामध्ये आपले

अस्तित्व टिकविण्यासाठी संघर्ष करताहेत. या सर्व आकडेवारीवरून असे लक्षात येते की, महिलांवर कसा नियोजनपूर्वक अन्याय किंवा भेदभाव केला जात आहे.

खालील तक्त्यावरून स्त्री-पुरुष श्रम भागिदारी स्पष्ट होईल. (लिंगधारित कार्यात सहभागाचे प्रमाण)

१९८१-२००१ (शेकडामध्ये)

| वर्ष | क्षेत्र | महिला | पुरुष | व्यक्ती |
|---|---|---|---|---|
| १९८१ | एकूण | १९.७ | ५२.६ | ३६.७ |
| | ग्रामीण | २३.१ | ५३.८ | ३८.८ |
| | शहरी | ०८.३ | ४९.१ | ३०.० |
| १९९१ | एकूण | २२.३ | ५१.६ | ३७.५ |
| | ग्रामीण | २६.८ | ५२.६ | ४०.१ |
| | शहरी | ०९.२ | ४८.९ | ३०.२ |
| २००१ | एकूण | २५.७ | ५१.९ | ३९.३ |
| | ग्रामीण | ३१.० | ५२.४ | ४२.० |
| | शहरी | ११.०६ | ५०.९ | ३२.२ |

(स्रोत - १९९१ ची जनगणना, सीरिज -, २००१ ची जनगणना अंतिम आकडेवारी)

### ५.४.२ नवीन वर्ग (New Classes) -

प्राचीन भारतीय समाजाचा इतिहासाकडे दृष्टीक्षेप टाकला तर समाजात नेहमीच भिन्न-भिन्न स्वरूपाचे वर्ग आढळतात. जसे की, जमीनदार, कामगार, शेतमजूर इत्यादी औद्योगिक समाजात देखील कारखानदार आणि कामगार असे परस्परावलंबी दोन वर्ग दिसतात. हे दोन्ही वर्ग परस्परावलंबी असले तरी कारखानदार अथवा भांडवलदार वर्ग नेहमीच कामगाराचे शोषण करत आलेला आहे. वर्गीय जाणीवेतून वर्ग संघर्षसुद्धा झालेला आहे. वर्गीय जाणीवेतून वर्ग संघर्ष सुद्धा झालेले आहेत. यांचे विश्लेषण आपणास मार्क्सच्या साहित्यातून दिसनू येतेच. भारताने आंतरराष्ट्रीय व्यापारावरील निर्बंध उठवून उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरणाला चालना दिली. उत्तरोत्तर भारतीय राष्ट्रीय उत्पन्नाचा कृषीचा हिस्सा कमी-कमी होत जाऊन औद्योगिक क्षेत्राचा हिस्सा वाढतच आहे. औद्योगिक क्षेत्रात कामगारास नोकरीच्या व रोजगाराच्या संधी वाढतच आहे. कुशल आणि बुद्धिजीवी कामगारांना गलेलठ्ठ पगाराच्या अनेक संधी औद्योगिक क्षेत्रात उपलब्ध आहेत. त्यामुळे आधुनिक समाजात 'कामगार' ही संकल्पनासुद्धा बदलत चालली आहे. अशा दुर्मिळ कामगारांना सर्व प्रकारच्या सोयी सवलती कारखानदार प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करताहेत. परंतु कामगार जॉब

सॅटिस्फॅक्शन आणि आर्थिक कारणामुळे गुणवत्ताधारक कामगार कोणत्याही एकाच ठिकाणी टिकून राहणे पसंत करत नाही. कामगाराच्या अशा प्रकाराला 'फुटलूज लेबर' म्हणतात.

**फुटलॅज लेबर** (Foot loose Labour) –

भारतीय अर्थव्यवस्थेच्या अध्ययनात 'Foot loose Labour' या घटकावर फारच कमी किंवा अल्प प्रमाणात संशोधन झाले आहे. म्हणजेच या घटकांच्या सर्वांगावर भरपूर संशोधन होण्याची आवश्यकता आहे. 'Foot loose Labour' या संज्ञेसाठी मराठीत समर्पक असा पारिभाषिक शब्द नसला तरी साधरणत: 'मनमानी मजूर' असा एका मर्यादेपर्यंत त्याचा अर्थ लावला जावू शकतो. 'Foot loose Labour' म्हणजे काय? या संबंधीचे विश्लेषण The dictionary of thesauras मध्ये केलेले आहे. प्रथम 'Foot loose' शब्दाचा अर्थ म्हणजे 'Having no attachment or ties : free to do as one pleases' म्हणजेच कुठलीही बांधिलकी न जपता आपल्याला सुखावह वाटेल असे करणे. free to go or do as one wishes कोठेही जाऊन आपल्या इच्छेप्रमाणे काम करणे. एखाद्या व्यवसायात जास्त काळ न टिकता सहजपणे दुसरीकडे जाणे 'Foot loose means without long-term responsibilities or commitments.

Foot loose Labour हे व्यक्ती स्वातंत्र्याचा उच्च उपभोग घेणारा वर्ग आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कारण व्यवसायात मजूर म्हणून काम करताना ते एकाच व्यवसायात टिकून राहण्याची आपेक्षा करत नाही अथवा स्वत: बांधिलकी असत नाही. दुसरा महत्त्वाचा आणि सामाजिक मुद्दा असा की बहुतांश 'Foot loose Labour' हे अविवाहित असतात. त्यामुळे त्यांच्यावर सामाजिक आणि कौटुंबिक जबाबदारीचा भार सुद्धा असण्याची शक्यता फार कमी असते. त्यामुळे ते सहजतेने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी श्रमविकण्यास जाण्यासाठी तयार असतात.

**अकृषक करण** (Disinherited Peasanty)–

जमीन हे कृषी उत्पादनाचे मुख्य साधन आहे. जमीनीवर कौटुंबिक किंवा व्यक्तिगत अधिकार असतो. काही लोकांकडे शेकडो एकर जमीन आहे तर काही लोक भूमिहीन आहेत. समाजात काही लोक असेही आहेत की, ज्याकडे फारच कमी जमीन आहे. कालांतराने कुटुंबाचे विभक्तीकरण झाल्यामुळे जमीनीचे वाटप होते. व एक वेळ अशी येते की, या लोकांना भूमिहीन व्हावे लागते. कारण जमीन किंवा भूमी हा घटक मर्यादित स्वरूपाचा आहे. भारतामध्ये जमीन वाटप होणे हा एकमेव घटक कारणीभूत आहे असे नाही तर मोठे जमीनदार लोक, औद्योगिकीकरण, सिंचन कालवे आणि आधुनिक काळात उदयास आलेली विशेष आर्थिक क्षेत्रे (Sez) इत्यादी कारणामुळे अल्पभूधारक व सिमान्त शेतकरी हे भूमीहीन होत चाललेले आहे.

Disinherited d Peasanty हे शब्द वेगवेगळे आहेत. दोन्ही शब्दाचा अर्थ समजवून घेतल्यानंतर ही संकल्पना लक्षात येईल. प्रथम 'Disinherited' या शब्दाचा अर्थ Dictionary of Thesauras मध्ये सांगितल्याप्रमाणे

1) To exclose from inheritance or right to inherit.

2) To deprive of a natural or established right or privilege.

Disinherited म्हणजे वारसाधिकारापासून अपवर्जित करणे, व्यक्तिला आपल्या अस्थापित अथवा नैसर्गिक अधिकारापासून वंचित करणे होय. तर peasantry म्हणज्चे शेतकरी वर्ग होय. म्हणजे 'Disinherited peasantry' याचा अर्थ अपवर्जित शेतकरी वर्ग होय, की ज्याचा वारसाध्धिकार, नैसर्गिक अधिकार किंवा अस्थापित अधिकार म्हणजे भूमीवर किंवा जमिनीवर असलेला अधिकार आधुनिक काळात वेगवेगळ्या कारणाने संपुष्टात येत चालला आहे.

ग्रामीण भारतीय समाजातील काही कुप्रथा अथवा रूढी, परंपराच्यामुळे सुद्धा अनेकदा अनेकांवर शेतजमीन विकून भूमीहिन होण्याची वेळ येते. या सर्व बाबींवर होणारा अमाप खर्च शेतकरी वर्गाला भूमीहीन वर्ग बनविण्यात कारणीभूत ठरत आहे. शासकुीय पातळीवर अथवा स्वयंसेवी संस्थांद्वारे विविध राज्यात भूमीहिनांना शेतजमीनीचे वाटप करण्यात आलेले आहेत. परंतु कालांतराने पुन्हा पुर्ववत स्थिती झाल्याचे निदर्शनास येत आहेत. म्हणजेच एकंदरित या समस्येचे स्वरूप दिवसेंदिवस व्यापक होत आहेत हे मात्र, वास्तव आहे.

कृषी क्षेत्राशी संबंधित अनेक समस्या आधुनिक समाजामध्ये निर्माण झालेल्या आहेत. उदा. जमिनीचे नापीकिकरण होणे. अर्थात यासाठी औद्योगिकीकरणामुळे जे भूमी प्रदूषण झालेले आहे किंवा आजही होत आहे. त्यामुळे जमिनीची उत्पादकता जवळपास संपुष्टात येत चालली आहे. तसेच निसर्गाचा लहरीपणा इत्यादीमुळे शेतजमीन असूनही नसल्यासारखेच आहे.

**अस्तित्त्व टिकून ठेवण्यासाठीचे पर्यायी साधने** (Alternate Circuits of Survival)-

मानवी समाजाच्या विकासाच्या अवस्थांचे आकलन केले तर सहज लक्षात येईल की, मानवाने आपले अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी कसा संघर्ष केला आहे. जीवशास्त्रातील डार्विनच्या मानवी उत्पत्तीच्या सिद्धान्तापासून सुरुवात केली तरी अस्तित्वाची लढाई समजने सोपे जाईल. या सिद्धान्ताप्रमाणे मानवाची उत्पत्ती ही एकपेशीय प्राणी (अमीबा) यापासून झालेली आहे. या ठिकाणी उत्पत्तीच्या संदर्भातील वास्तविकता हा मुद्दा गौण आहे. त्यामध्ये मतभेद असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सिद्धान्तानुसार, काळाच्या ओघात अनेक जीव निर्माण झाले आणि संपुष्टातही आले. परंतु ज्यांनी अस्तित्वाची लढाई जिंकली ते आजतागायत या भूतलावर उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून कोणत्या-कोणत्या अवस्थेत तग धरून आहेत.

उदा. मानव हा आदिम काळापासून तर आधुनिक काळापर्यंत वेगवेगळ्या अवस्थेत संघर्ष करून जगलेला आहे. मानवाची भटकी अवस्था लक्षात घेतली तर या अवस्थेत त्याने जंगलामध्ये भटकंती करून आपल्याला मिळेल त्या आहाराच्या सहाय्याने उदरनिर्वाह केलेला आहे. त्यानंतर कृषी आणि पशुपालन अवस्थेमध्ये मानवी जीवन थोडेफार स्थिरावलेले दिसते आणि तेव्हापासूनच कृषी हा मानवाचा उदरनिर्वाहाचा मुख्य आधार राहिलेला आहे. याशिवाय काही आदिवासी जमाती या आजही पूर्वीप्रमाणेच जंगलात राहून आपले अस्तित्व कायम टिकून आहेत.

पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे भारत हा कृषी प्रधान देश आहे व या देशाची बहुतांश लोकसंख्या ही कृषी आणि कृषिशी संबंधित व्यवसायावर अवलंबून आहेत. पूर्वऔद्योगिक समाज हा पूर्णत: वस्तुविनिमयावर आधारलेली अर्थव्यवस्था असणारा समज होता म्हणजेच या समाजात बलुतेदारी पद्धती अस्तित्वात होती. प्रत्येकाला आपल्या जातीय व्यवसायाने रोजगार ठरवून दिलेला होता. थोडक्यात, व्यवसाय निवडीवर निर्बंध होते. जीवन जगणयसाठी जातीव्यवस्थेअंतर्गत जो व्यवसाय ठरलेला होता त्यापेक्षा वेगळा व्यवसाय करण्यासाठी सामाजिक परवानगी नव्हती. समाजातील लोकांच्या जीवन जगण्यासाठीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आलुतेदार आणि बलुतेदारामध्ये वस्तूच्या वा सेवांचा रूपाने देवाण-घेवाण होत असायची.

मौद्रिक अर्थव्यवस्था आणि औद्योगिकीकरणाच्या आगमनामुळे क्रांतीकारकच परिर्वतन झाले. हस्तअद्योग, लघुउद्योगांचा ऱ्हास होत जावून नवीन कारखाने उभे राहिले आणि त्याचबरोबर भारतीय समाजात पाश्चात्याचे आगमन इत्यादीमुळे व्यवसायाचे स्वरूप व अर्थव्यवस्था पूर्णपणे बदलून गेली. प्रथमच बेकारीची जाणीव होऊ लागली. लोकांचे उदरनिर्वाहाचे जातीव्यवस्था प्राप्त करून दिलेले साधन संपुष्टात येवू लागले त्यास पर्याय म्हणून लोक कारखान्यामध्ये नोकरी स्वीकारू लागले. म्हणजेच जीवन जगण्याचा पर्यायी मार्ग या ठिकाणी निर्माण झाला.

मौद्रिक अर्थव्यवस्थेमध्ये पैशाच्या मोबदल्यात सर्वच सेवा उपलब्ध होतात. त्यामुळे रोजगाराच्या माध्यमातून पैसा कमविणे व त्यावर उदरनिर्वाह करणे ही मानवाची जीवन जगण्याची व्यवस्थाच झालेली आहे. या परिवर्तन चक्रात कोणतीही व्यवस्था पूर्णपणे नष्ट झालेली नाही. हे सुद्धा महत्त्वाचे आहे.

स. न. १९९१ नंतर भारताने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला आणि त्यानंतर खऱ्या अर्थाने उद्योग क्षेत्राला चालना मिळाली. गती प्राप्त झाली. कृषी वरील अतिरिक्त श्रमाचा असलेला भार पर्यायाने औद्योगिक क्षेत्राकडे वळू लागला. उद्योगामध्ये 'नफा' ही संकल्पना स्पष्ट असल्यामुळे आवश्यकतेपेक्षा अधिक मजुरांना रोजगार देण्याचे संबंधित व्यवस्थापक अथवा मालक वर्ग टाळतात. परिणामी कृषी वर अतिरिक्त भर पडतो. याचा परिणाम म्हणून वाढती बेरोजगारीचे प्रमाण समोर येते.

आधुनिक समाजात वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये प्रचंड परिवर्तन झाल्यामुळे रोजगाराच्या संधी सुद्धा उपलब्ध होत आहे. उदा. कायदा, वैद्यकीय, अभियांत्रिकी, संगणकक्षेत्र, समाजकार्य, संरक्षणक्षेत्र, व्यवस्थापन क्षेत्र, तंत्रक्षेत्र, व्यवसायक्षेत्र इत्यादी क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्याचबरोबर सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रामध्येसुद्धा अनेक संस्था वस्तू आणि सेवा देण्याचा उद्योग करत आहेत. त्यातूनसुद्धा प्रचंड प्रमाणात रोजगार निर्मिती होत आहेत, असे असताना भारतामध्ये बेरोजगारीचे प्रमाणसुद्धा वाढतच आहे. याचे मुख्य कारण आपणास 'लोकसंख्येचा विस्फोट' या घटकात दिसते. कारण वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली नाही. परिणामी लोकांना आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी मिळेल तो व्यवसाय स्वीकारावा लागतो. नाहीतर बेकारीतच जीवन जगावे लागते.

## ५.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :–

१) भारतातील विकास आणि आधुनिकतेची प्रक्रिया स्पष्ट करा.

Explan the process of development and Modernization in India.

,.......................................................................................

,.......................................................................................

,.......................................................................................

२) परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील आंतरसंबंध सांगा.

(state the interrelation between tradition and Modernity)

,.......................................................................................

,.......................................................................................

,.......................................................................................

३) सामाजिक स्तरिकरणात जाती व्यवस्थेची भूमिका काय आहे?

(What is the role of caste in social stratification system?)

,.......................................................................................

,.......................................................................................

,.......................................................................................

४) शोषणाचे बदलते स्वरूप यावर चर्चा करा.

(Discuss on changing pattern of exploitation)

,.......................................................................................

,.......................................................................................

,.......................................................................................

५) 'संयुक्त कुटुंब आणि आधुनिकीकरण' यावर टीप लिहा.

Write note on 'Joint family and Modernization in India.'

,.......................................................................................

,.......................................................................................

,.......................................................................................

## ५.६ सारांश :–

भारतीय समाजाचा इतिहास विशेषत: सामाजिक इतिहास हा समाजशास्त्राची एक भव्यदिव्य स्वरूपाची प्रयोगशाळाच राहिला आहे. भारतीय समाजाचा मुलाधार जातीव्यवस्था असल्यामुळे येथील समाजात नेहमीच सांस्कृतिक पश्चायनाचा प्रत्यय येत गेलेला आहे. एकीकडे परिदृढ अशी जातीव्यवस्था समाजाची प्रचलित चौकट मजबूत करत असतानाच पाश्चात्याचे आगमन, औद्योगिक क्रांती व यासारखे नानाविध कारणांमुळे परिवर्तनास सुरुवात होणे खरे तर भारतीय प्रचलित जातीव्यवस्थेला धक्का बसल्यासारगेच आहे. देशाची वाढती लोकसंख्या आणि मर्यादित भूसंपत्ती या समीकरणातून मार्ग काढण्यासाठी विकास आणि आधुनिकतेची कास धरावी लागते. जोपर्यंत आध्धुनिकता स्वीकारली जात नाही तोपर्यंत विकासाच्या वाटेला जाणेसुद्धा दुरापास्तच आहे. तेव्हा भारतीय समाजातील वेगवेगळ्या मार्गाने आलेली आधुनिकता स्वीकारणे हाच पर्याय सोयस्कर वाटतो. नव्हे आधुनिकता समाज जीवनात कधी आणि कशी प्रवेश करते हे सुद्धा लक्षात येत नाही. म्हणजेच भारतीय समाजातील चरप्रवेशित आणि भ्रामक स्वरूपाची आधुनिकता येथटील समाजजीवनाचा एक अविभाज्य भाग बनून जाते.

भारतीय समाज हा परंपरा प्रिय आहे. येथील लोक परंपरेशी भावनिकतेने जोडलेले आहेत. परिवर्तनाच्या प्रक्रियेत परंपरेकडून आधुनिकतेकडे जाताना भारतीय समाजातील स्तरिकरण व्यवस्था एक मोठा अडथळा ठरत आहे. साधारणत: स्तरिकरणाचे दोन प्रकार प्रचलित असून, मुक्त स्तरिकरण आधुनिकतेला स्वीकारणारे असून, बंद स्तरिकरणाचा मात्र, आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण करते. बंद स्तरिकरणाचा मुख्य आधार 'जात' हा आहे. जातीय संरचनेत काही जाती उच्चस्थानी आहेत तर काही जाती अतिशय खालचा दर्जा असलेल्या आहे. परंतु आधुनिक समाजात जातीय दर्जापेक्षा व्यक्तीच्या कर्तृत्वाला आणि क्षमतेला अधिक महत्त्व दिले जात आहे. आप्तसंबंध व्यवस्थेत आप्तसंबंधाचे महत्त्व दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. कारण आधुनिक आणि औद्योगिक समाज हा व्यवसायाच्या निमित्ताने, शिक्षणाच्या निमित्ताने वा अन्य कारणाने मूळस्थानापासून स्थलांतरित होत आहे. या स्थलांतराच्या प्रक्रियेत संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन केंद्र कुटुंब त्यांची जागा घेत आहे. त्यामुळे आपोआपच कुटुंबातील वयस्कर व्यक्तिचे महत्त्व कमी होत आहे. परिणामी नातेसंबंधातील आयाम बदलत चालले आहे. आधुनिक समाजात जात, लिंग, धर्म, वंश इत्यादींचा फारसा विचार न करता तार्किक आधारावर हे परिवर्तन स्वीकारण्याचे प्रमाण समाजात खूपच वाढत आहे. म्हणजेच या पारंपारिक स्तरिकरणाचे आधारांना दूर सारून आधुनिक समाज तार्किक, बौद्धिक, वर्गीय पातळीवर एकत्र येत आहे. सर्वच क्षेत्रातील परिवर्तनाचे स्वीकार करत आहे. असे असले तरी समाजात परंपरेला चिकटून असलेला परंपराप्रिय लोक समूह देखील अस्तित्वात आहे.

व्यक्तिचे व्यवसायाचे स्वरूप ज्याप्रमाणे बदलत गेले त्याप्रमाणे कामगार आणि मालक यांच्यातील संबंध देखील बदलत गेले असले तरी कामगाराचे शोषण मात्र थांबलेले नाही.

शोषणाचे प्रतिमान आणि स्वरूप तेवढे व्यवस्थेप्रमाणे परिवर्तीत झाले. इतिहास काळातील अधिनतेची आणि अपवर्जनाची संकल्पना नवीन व्यवस्थेनुसार अस्तित्वात टिकून आहे.

श्रम बाजारापमध्ये पूर्वी श्रम विकण्यासाठी पुरुष वर्गीय श्रमिकच बहुतांश प्रमाणात उपलब्ध होते, परंतु आधुनिक समाजात स्त्री-पुरुष समानता या तत्त्वानुसार स्त्रियासुद्धा घराबाहेर पडून रोजगार प्राप्त करत आहेत. पुरुषांच्या बरोबरीने त्यांनी आपली क्षमता सिद्ध केली आहे. स्त्री कामगारांची संख्या कमी असली तरी महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, त्यांच्या संख्येत दिवसेंदिवस अधिक गतीने वृद्धी होत आहे. श्रमिक आता जागरूक होत चालले आहेत. त्यांना स्वत:च्या न्याय हक्काविषयी जाणीव होत आहेत. बंदीस्त मजूर (Bonded labour) म्हणून श्रम करण्याची प्रवृत्ती जवळपास नाहिशी झाली आहे. व त्याऐवजी आधुनिक समाजात फूटलूज लेबर (Foorloose labour) वर्ग तयार होत आहे. या वर्गातील मजूर मालकाशी बांधिल नसतात त्यांना पूर्णपणे आपल्या इच्छेनुसार केव्हाही रोजगार सोडून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची मुभा असते. वाढत्या उद्योगधंद्यामुळे व जमिनीचे वेगवेगळया कारणासाठी वाढते उपाययोजना यामुळे शेतीसाठीची जमिनीचे क्षेत्र घटत आहे. काही लोक तर वाढत्या लोकसंख्येमुळे अथवा अन्य कारणामुळे भूमिहीन होत आहे. भूमिहीन झाल्यामुळे पुन्हा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो. यातून लोकांना परंपरागत व्यवसायाला मुकावे लागते. परंतु आधुनिक समाजात उदरनिर्वाहासाठी रोजगार प्राप्तकरिता अनेक क्षेत्रामध्ये पर्यायी व्यवस्था उपलब्ध होत आहेत. व्यक्ती आपली जाम, धर्म, वंश इत्यादी घटकांकडे दुर्लक्ष करून सर्व घटकांतील लोक औद्योगिक आणि आधुनिक समाजात बौद्धिक आणि तार्किक आधारावर आपल्या क्षमतेनुसार एकत्र येवून एका नवसमाजाची निर्मिती करत आहेत.

## ५.७ पारिभाषिक शब्द शब्दार्थ :–

पारंपारिक समाजानंतर येणारी, समाजात आमुलाग्र बदल घडवून आणणारी, विशिष्ट संस्कृती असणारी प्रक्रिया.

परंपरा (Tradition) :

समाजातील व्यक्तिंना मूल्ये व नियम प्रदान करणारा, धार्मिक विधी व प्रतिकात्मक व्यवहार संक्रमित असणारा सामाजिक व्यवहार म्हणजे परंपरा होय.

स्तरिकरण (Stratification)

समाजाची श्रेष्ठ-कनिष्ठ अशा सामाजिक स्तरात झालेली समाजाची समस्तर विभागणी.

अपवर्जन (Exclusion)

संसाधनावरील अधिकार, समानसंधी आणि नियंत्रणापासून वंचित असणे.

श्रमबाजार (Labour Market)

ज्या ठिकाणी रोजगारप्राप्तीच्या अनुषंगाने मागणी आणि पुरवठा यांचा समतोल होतो ते ठिकाण.

## ५.८ संदर्भ सूची :-

1) Dube, S.C. (1974). contemparary India and Its Modernization. Delhi, Vikas publication, P.N. 15.

2) Bendix, (1967). Tradition and Modernity Recognised, chicago, page No. 329.

३) डोईफोडे, जे. पी. (२००९), समाजश्जास्राची रूपरेषा, औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स, पृ. क्र. ३०४.

4) Shingh yegendra, shah, A.B and Rao. C. R.M. (Ed.) (1995). Tradition and modernity In India, Bombay, Manaktalas Publication, page No.52.

५) दोषी, एस. एल. आणि जैन, पी. सी. (२००५). भारतीय समाज, जयपूर, नॅशनल पब्लिशिंग हाऊस. पृ. क्र. १७४.

६) आंबर्डेकर, ना. श. आणि पाटील, ज. फा. (१९८९). भारतीय कामगार समस्या व कामगार विधान, पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पृ. क्र. ८३.

## ५.८.१ संदर्भासाठी व अधिक वाचनासाठी ग्रंथसूची.

1) Alavi and T. Shamin (ed) (1982). Introduction to sociology of development societies, London, Macmillan.

2) Desai, A. R. (1971). " Essay on Modernization of under Development Society." Bomay, Thacker and Com.

3) Gupta. Dipankar. (2000). Mistaken Modernity India between worlds, ISBN -8172234155.

4) Appadurai, Arjun (1996). Modernity at Large : cultural Dimention of Globalization, University of Minnesota press.

5) Ghurye, G. S. ( ) Caste and Race in India.

6) Das gupta, S. (1972). The Hindu Ethos and challenges of change, calcutta, Minerva.

7) Breman, J. (1996). Foot loose labour : working in India's informal economy, cambridge university press cambridge.

## ५.९ सरावासाठी प्रश्न.

१) आधुनिकीकरणाची गती खालीलपैकी कोणत्या समुदायात अधिक आहे.

अ) नागरी समुदाय, ब) ग्रामीण समुदाय, क) आदिवासी समुदाय, ड) वरील सर्व.

The process of Modernization is faster in which community of following.

a) urban community, b) Rural community, c) Tribal community, d) All above

२) आधुनिक समाजातील सामाजिक स्तरिकरणाचा आधार खालील पैकी आहे.

अ) जात, ब) लिंग, क) वय, ड) शिक्षण.

What is base of social stratification in modern society.

a) caste, b) sex, c) Age, d) Education.

३) आधुनिकता म्हणजे काय? (What is mean by modernity)

४) सामाजिक स्तरिकणाची व्याख्या द्या?(Define Social stratification)

५) शोषनाचा अर्थ सांगा?(state the meaning of exploitation)

६) भारतीय समाजाच्या संदर्भात आधुनिकता स्पष्ट करा.

(Explain Modernity in context of india society.)

७) आधुनिक समाजातील आप्तसंबंध व्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करा?

(Explain the Nature Kinship system in Modern Society.)

## उपाययोजनात्मक प्रश्न

१) भारतातील आधुनिकीकरण हे पाश्चिमात्यिकरण आहे चर्चा करा.

(Discuss, Modernization in India is Westernization).

२) आधुनिकीकरणामुळे भारतीय सामाजिक संरचना मुक्त स्तरिकरणाकडे वळत आहे. स्पष्ट करा.

Explain, Indian Social structure is moving towards open social stratification system due to modernization).

# घटक ६

# SOC 241/Seme IV
# Unit 2 Agents of Development
## विकासाचे घटक

**अनुक्रमाणिका**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्ताविक

२.२ मुख्य मुद्दा (राजकीय संरचना)

२.३ योग्य नेतृत्व

२.४ नोकरशाही

२.५ शैक्षणिक आणि व्यवसाय संरचना

२.६ विज्ञान आणि तंत्रज्ञान

२.७ नागरिकरण

२.८ औद्योगिकरण

२.९ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.१० संदर्भसूची


## १.० उद्दिष्टे

विकासाचे समाजशास्त्रातील समाजाच्या आणि समाजशास्त्राच्या विकासाच्या घटकांमध्ये राजकीय संरचना आणि नेतृत्व, विज्ञान आणि तंत्रज्ञान, नोकरशाही, समजाची शैक्षणिक आणि व्यावसायिक रचना, औद्योगिकरण आणि नागरीकरण इत्यादी घटक अत्यंत महत्वपूर्ण आहेत. तयांचा आढावा घेत असताना अभ्यासकांना आधिक सुलभपणे अभ्यासता यावीत यासाठी काही उद्दिष्ट्ये समोर ठेवण्यात आली ती

१) देशातील राजकीय संरचना आणि नेतृतव याविषयी अभ्यासता येतील.

२) नोकरशाही आणि ग्रामीण तसेच देशाचा विकास यांतील अडचणी लक्षात येतील.

३) औद्योगिकरण आणि नागरीकरण याचा परिणाम समस्यांची कारणे अभ्यासता येतील.

४) औद्योगिक क्रांतीनंतरची व्यवसायरचना पूर्वीची व्यवसाय संरचना अभ्यासता येईल.

५) शैक्षणिक संरचना पारंपारिक आणि आधुनिक याविषयी अभ्यास काता येईल.

## २.१ प्रास्ताविक –

भारतीय समाज इ. स. अठराव्या शतकांपर्यंत एक स्वतंत्र, स्वायत्त व स्वयंपूर्ण असा समाज होता. ग्रामपंचायती या जनहिताचा विचार करून कारभार चालवीत होत्या. असा कारभार केव्हा चालतो? ज्या ठिकाणी राजकीय संरचना आवश्यक असते? असे प्रश्न जेव्हा तपासले तेव्हा लक्षात येते की तेव्हा सत्तेचे विकेंद्रीकरण झालेले होते. समाजात प्रत्येक व्यक्तीला विविध स्थानपरत्वे दर्जा व भूमिक पार पाडाव्या लागतात. उदा. कुटुंबात पिता, भाऊ, पती, मुलगा अशा विविध भूमिकाप्रमाणे दर्जा प्राप्त होतो आणि त्यानुसार कर्तव्य पार पाडावी लागतात. समाजातील अधिकार, हक्क, सत्ता, कुणाला किती प्रमाणात द्यावयाच ही सत्ता कशी गाजवायी याची काही नियमने, मूल्ये, प्रमाणके यांचा संच म्हणजे राज्यसंर्स्थां होय.

या घटकांमध्ये विकासाची माध्ये यामध्ये राजकीय संरचना आणि नेतृत्व आणि नौकरशाही यांचा आढावा घेणार आहोत. तसे (ब) विभागात शैक्षणिक, व्यावसायिक रचना, विज्ञान तंत्रज्ञान, औद्यागिकीकरण आणि नागरिकण इत्यादी घटकांचा समाज विकासावरील परिणाम आणि भूमिका यावर प्रकाशा टाकणार आहोत.

## २.२ विषय विवेचन –

### राजकीय संरचना, नेतृत्व आणि नोकरशाही –

मनुष्य जसा कुटुंबाचा सदस्य असतो. त्याचप्रमाणे राजकीय संरचनेचाही सदस्य असतो. प्रत्येक समाजात राज्य ही एक व्यापक अशी सामाजिक संस्था आहे. त्याद्वारे लोकसमूहावर नियंत्रण ठवेणे आणि सर्वांगिण विकासाचे साधन म्हणून कार्य करतत असते. राजकीय संरचनेविषयी लिप्सन म्हणतात की, सर्व प्रकारचे मानवी संबंध व गट यांचा मिळून समाज बनलेला असतो त्यानंतर राजकारण अस्तित्वात येते. नागरिकत्वाची व्यापी, राज्यसंस्थेची कार्य अधिकारांचे उगमस्थान, अधिकारविषयक रचना व राज्यांचा आकार इत्यादीसंबंधी प्रश्न निर्माण होतात व हे पाच महान प्रश्न सोडविण्यासंबंधी परस्परविरोधी पर्याय पुढे येऊन संघर्षमय प्रक्रिया म्हणजे राकारण निर्माण होते. या राजकीय प्रक्रियेला औपचारिक व संघटीत स्वरूप राज्यसंस्था प्राप्त करून देते. राज्यात यंत्रणा, माध्यमे, सत्ताअधिकार व हक्क इत्यादी अंतर्भाव असतो. राज्य म्हणजे विविध संबंधाचे रचनात्मक जाळेच असते.

### (अ) राज्याची व्याख्या –

प्रा. गार्नर यांच्या मते, 'एखाद्या विशिष्ट भूप्रदेशावर कायमचे वास्तव्य करून राहणारा, बाह्य नियंत्रणापासून बराचसा मुक्त असलेला व जिची आज्ञा नोक नित्यनेमाने पाळतात अशी शासनव्यवस्था ज्यामध्ये आहे अशा लोकसमुदायाला राज्य म्हणता येईल.

आकृती

**(ब) राज्यव्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये**

**१) विशिष्ट भूप्रदेश –** प्रत्येक राज्याच्या निर्मितीसाठी राज्याला निश्चित सीमा असलेला भूप्रदेश असणे आवश्यक असते. त्या सीमेच्या आतील भूप्रदेशावर शासनाची सत्ता असते.

**२) लोकसंख्या –** राज्यनिर्मितीसाठी केवळ भूप्रदेश किंवा राजा किंवा सत्ताधीश असन चालत नाही तर त्यासाठी लोकसंख्या, समूह आवश्यक असतात. त्याद्वारेच शासक आणि शासित असा व्यापक समुदायाची आवश्यकता राजाला असते.

**३) स्वातंत्र्य –** राज्य हे स्थातंत्र्य/सार्वभौम असते. यामध्ये अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार राज्याकडेच असतो. तो इतर राज्याकडून देशाकडे नसतो.

**४) शासनसंस्था –** राज्यकारभार व्यवस्थित पाहण्यासाठी विविध उपघटकांत विभागणी केलेली असते. त्यामध्ये समन्वय साधने, कायद्याची निर्मिती दुरुस्ती करणे, कायद्यांचे नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा करणे यासाठी कार्यकारी यंत्रणा शासन संस्थेच्या रूपाने अस्तित्वात असते.

**५) कायद्याचे राज्य –** राज्य किंवा राज्य कारभार पाहणाऱ्याला न्याय, कादेशीर लोकांच्या संमतीने सत्ता मिळालेली असते. लोकांच्या किंवा लोकभावनाविरोधी जाऊन त्यांच्या वर्तनावर प्रभाव टाकण्याची क्षमता राज्याकउे असते. उदा. एखादी दंगल. मोर्चा आटोक्यात आणणे यासाठी कायद्यांचा आधार घेण्यात येतो.

**६) समाजहितवादी दक्ष –** प्रत्येक राष्ट्रातील राज्यसंस्था किंवा राज्य समाजाचे/समुदायाच्या संरखण, समस्या, अडचणी सोडवून विकास साधणे, कायदे आणि सुव्यवस्था राखणे इत्यादी कर्तव्य पार पाडतांना सत दक्ष असते.

**७) नेतृत्व –** राज्याचे शासन नेतृत्व कौशल्य असणाऱ्यां काही ठराविक लोकांमार्फत चालविले जाते. राजकीय पक्षांचे नते कायदेशीर मार्गांनी सत्ता, तसेच अधिकार हस्तगत करतात आणि शासन, प्रशासन व्यवस्थेवर नियंत्रण प्रस्थापित करून ती कार्यरत ठेवली जाते.

प्रत्येक राष्ट्रातील राजकीय संरचना एकसारखी असत नाही. कारण त्या ठिकाणची सामाजिक परिस्थिती/समाजसंरचना, समस्या, उत्पादन स्थिती, संस्कृती इत्यादी घटकांवर आधारलेली असते. सर्वच राजकीय संरचना विशिष्ट कार्यांवर अधिक जोर देत असते. परंपरागत विचारधारेत राजकीय आणि सामाजिक संरचना यामध्ये भेदभाव केलेला सून

समानतेवर अधिक भर दिलेला दिसून येतो. यामध्ये कोणताही एक दृष्टीकोन योग्य नाही. तुलनात्मकदृष्ट्या विद्यार्थ्यां न्यायालयाच्या कार्यांचे मूलयांकन किंवा व्याख्या यांची माहिती देण्यापेक्षा न्यायालयाच्या कार्याचा अभ्यास शिकवला पाहिजे. त्याचप्रमाणे देशातील प्रत्येक नागरिकाला, विद्यार्थ्यांना नोकरशाही फक्त कायद्याची अंमलबजावणी करणारी नाही तर कायदेशीर करू शकते. त्याचप्रमाणे विधानसभा, कार्यालिका आणि न्यायपालिका दोन्ही प्रभावित करतात. राजकीय पक्ष आणि दबावगट राष्ट्रीय प्रशासनामध्ये कायदेनिर्मितीत राजकीय विचार पोहचवण्याचे कार्य करतात. यावरून स्पष्ट होते की नोकरशाही न्यायपालिका आणि विधानसभा (कायदेमंडळ) यांची कार्ये वेगवेगळी होऊ शकत नाही. यापैकी एकही घटक वेगवेगळे कार्य करू शकत नाही. तर एक काम करताना विविध कार्ये आपोआप परस्पर संबंधीत असतात. त्यावरून नोकरशाही न्यायपालिका आणि विधानसभा (कायदेमंडळ) एक दुसऱ्यास पूरक आहेत. आधुनिक कालखंडात राजकीय व्यवस्थेचे संस्थानात्मक केंद्रीकरण मोठ्या प्रमाणात झालेले दिसते. लोकशाही व्यवस्थत तसे अपेखितही असते. कारण लोकशाहीच्या आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणातच लोकांचे हित असते. तसेच राजकीय पक्ष, न्यायालय, हितसमूह, नोकरशाही इत्यादीचींच कार्य वेगवेगळी असली तरी सामाजिक हितसंबंधाशी व्यापक अशी आहेत. राजकीय व्यवस्था समाजातील परंपरेचे निर्मूलन करत नाही. मात्र, तिला नियमित आणि नियंत्रित करत असते. कायदे हे प्रथा-परंपरांच्या विरोधात नसतात. परंतु प्रथा-परंपरांना निमंत्रित करत असतात.

भारतातील राजकीय संरचना पाहण्यासाठी प्राचीन भारतीय ग्रामीण राजकीय संरचना पााहणे आवश्यक ठरते. प्राचीन राजकीय संरचना.

भारतामध्ये प्राचीन कालखंडात एकाधिकार किंवा अनियंत्रित राजवट सतत राहत आलेली आहे असे पाश्चात्य इतिहासकार व्हिन्सेंट स्मित म्हणतात.

अशीच काही अंशी भूमिका भारतीय इतिहासकार/अभ्यासकांनी घेतलेली दिसून येते. यामध्ये पूर्णेंदू नारायण सिंह म्हणतात, प्राचीन भारतात मर्यादित, घटनात्मक राजेशाही अस्तित्वात होती. ती गावाचा कारभार पाहत असे. याला पूरक अभ्यास विवेचन मांडताना १९२४ मध्ये जयस्वाल आपल्या हिंदू पॉलिटी या ग्रंथात प्राचीन भारतातील गणराज्य यावर प्रकाश टाकला. ते म्हणतात की, समकालीन ग्रीक व रोमन प्रजास्त्ताक राज्यापेक्षा ही गणराज्ये प्रगल्भ होती. भारतीय राज्यांवर (ग्राम) सभा, (ग्राम) समिती, जनपद यासारख्या लोकसभांचा अंकुश होता.

यावरून भारतातील लोकशाहीला प्राचीन परंपरेचा वारसा आहे. एखाद्या खेड्यातील शासकीय कारभार हा संपूर्णत: किंवा बहुतांशी तेथील रहिवाशांच्या संमतीने, सहकार्याने आणि विचार विचारात होऊन चालत असेल तर ग्राम स्वराज्य, ग्रामराज्य असे मानले जात असे, म्हणून एच. डी. मालवीय म्हणतात, प्राचीन काळापासून स्वतंत्र स्वायत्त असे ग्राम समुदाय अस्तित्वात होते. वैदिक वाडमयातून मनुस्मृती, रामायण, महाभारत यासारख्या महाकाव्यातून खेड्यात स्वतंत्र स्वायत्ता शासन लावल्या असल्याचा उल्लो आढळतो. त्याचप्रमाणे बौद्ध, जैन वाडमयातही स्वायत प्रशासनाचा उल्लेख आढळतो.

**(क) प्राचीन राजकयी संरचनेची वैशिष्ट्ये –**

प्राचीन कालखंडातही खेड्यांमध्ये स्वायत्तशासन व्यवस्था होती. ती जात पंचायत आणि ग्रामसभा यावरील सदस्य त्या समूहातील प्रत्येकाचे प्रश्न समजाऊन सोडवणूक करत असत. त्या सभासदासाठी काही नियमावली (अलिखित) होती. त्याचा आढावा आपण घेऊ या.

**१) सदस्य निवडीचे निकष –** प्राचीन काळात ग्रामसभासंदाची निवड होत असताना काही निकषांच्या आधारे निवड होत असे. उदा. सभासदाचे घर गावात असावे. त्याला जमीन असावी तो शहाणा व सदग्रस्त असावा असे निकष लाऊन त्याची निव्ड करण्यात येत असे.

**२) स्वतंत्र ग्राम –** स्वातंत्र्यपूर्व कालखंड खेड्यातील ग्रामसभा सर्व निर्णय, कारभार स्वतंत्रपणे होत असत. त्यामध्ये कोणीही हस्तक्षेप करत नसते. पुन्हा त्यांच्या निर्णयामध्ये केंद्रीय सत्ताही हस्तखेप करत नसे. त्याला अपवाद फक्त सैन्य उभा करणे, युद्ध आणि परराष्ट्र धोरण इत्यादी होते. या सर्व जबाबदाऱ्या व निर्णय केंद्रीय राज्यसत्तेच्या अधिकारात होत्या. त्यामुळे स्थानिक पातळीवर स्वतंत्र ग्राम होते.

**३) ग्राम प्रमुख (ग्रामीण) –** प्राचीन पंचायतीचा प्रमुख ग्राम अधिकारी (ग्रामीण) असे. त्याला गावचा कारभार पाहण्यासाठी मदत करणारा वर्गही होता. त्यामध्ये खजिनदार, रखवालदार, सिमारक्षक, पाणपुरवठा अधिकारी, पुरोहित, शिक्षक असे अन्य पदाधिकारी इत्यादींचा समावेश होता.

**४) सर्वधर्म समभाव –** गावामध्ये प्रत्येक धर्माला समान स्थान होते. त्यामध्ये कोणा एका जातीच्या लोकांची मक्तेदारी नव्हती. कोणत्याही प्रकारे जातीधर्माचा विचार न करता पात्रता असलेल्या सर्वच सभासदांचा उमेदवार म्हणून विचार केला जात असते.

**५) महसूल उत्पादन आणि खर्च –** स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामसभांना शेतसारा (उत्पन्नकर) जमा करण्याचा अधिकार होता. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातूच गाव प्रशासन आणि इतर बाबींवर होणारा खर्च भागवला जात असे.

**६) सर्वांगिण विकास –** गावाच्या गरजा ओळखून त्या पूर्ण करण्यात गावप्रमुखाला यश येत असे. कारण त्याची जाणीव असल्याने पूर्ण करण्यात येत असत. गावातील खरे गरजवंत यांची माहिती असल्याने अफरातफर, अन्याय होत नसे. दिनदुबळ्यांना संरक्षण देण्यासाठी गुनहेगारांना शासन देऊन शांतात व स्थैर्य जोपासण्यासाठी, गुणीजनांच्या, वृद्धांच्या मार्गदर्शनाने गावातील सर्व लोकांच्या समस्या सोडवून त्यांना विकासाच्या प्रवाहात त्यांच्या परीने आणले जात असे.

**(ड) आधुनिक कालखंड**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतात ग्रामीण पुनर्रचरनेचा कार्यक्रम हाती घेतला गेला तेव्हा त्यामध्ये समुदाय विकास योजनेचे अपयश त्याची कारणे शोधण्यासाठी श्री बलवंतराव मेहता समिती स्थापन जानेवारी १९५७ मध्ये करण्यात आली. या समितीने आपला अहवाल २४

नोव्हे १९५७ मध्ये सादर केला आणि लोकशाहीने विकेंद्रीकरण सुचविले. यालाच पंतप्रधान पंडित नेहरू यांनी पंचायतराज असे नाव दि. यामध्ये तीन स्तर करून विकास साधण्याचा प्रयत्न केला गेला. यामध्ये

१) ग्रामस्तरावर – ग्रामपंचायत

२) तालुका स्तरावर – पंचायत समिती

३) जिल्हा स्तरवर – जिल्हा परिषद

ग्रामीण भागातील लोकांना सत्तेमध्ये आणि केंद्र व राज्य सरकारने घेतलेले निर्णय अंमलात आणून विकास साधण्याच्या उद्देशाने वरीलप्रमाणे तीन स्तर निर्माण करून त्यांच्यात समन्वय सहकार्य आणि परस्परावलंबन असे संबंध प्रस्थापित केले गेले. याच सूत्रातून ग्रामीण भागाची जाणिव असलेले नेतृत्व निर्माण होऊ लागले. तसेच ग्रामीण विकासाची गती चालू असल्याचे दिसून येते.

मेहता समितीच्या शिफारशीप्रमाणे २ ऑक्टोबर १९५८ पासून देशभर कमी–अधिक प्रमाणात (त्रीसतरीय–द्विस्तरीय) पंचायती राज लागू केले. महाराष्ट्रात ग्रामपंचायतींना अधिक स्वायत्तता देऊन त्यांची कार्यकक्षा वाढविण्यासाठी १९५८ मध्ये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम लागू केला आणि पुढे १९६१ मध्ये महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम संमत करण्यात आला. यामध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद अशी संरचना होय.

**(ई) राज्यांची त्रिसूत्री**

**(अ) ग्रामपंचायत –** प्रत्येक खेड्यात/गावात प्रौढ मतदान पद्धतीने निवडून दिलेल्या प्रतिनिधीद्वारे ग्रामपंचायत स्थान करण्यात येते. ग्रामपंचायतीमध्ये अनुसूचित जाती–जमाती, महिला प्रतिनिधी इतर मागासवर्ग इत्यादी प्रतिनिधी घेण्याची विशेष तरतूद आहे. ग्रामपंचायतीना स्वतंत्र उत्पादन आणि विशेष अनुदान असते. त्यामुळे आर्थिक पाठबळ मिळते तसेच स्वायत्तता, सवयंपूर्णता वाएवलेली आहे. ग्राम प्रशासन व ग्रामविकास संबधीची काही कार्ये अपेक्षित आहेत. त्यामध्ये आरोग्य शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, शिक्षण, संस्कृती संवर्धन इत्यादी होत.

**(ब) पंचायत समिती –** जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यांच्यातील दुवा म्हणून पंचायत समितीकडे पाहिले जाते. पंचायत समितीही तालुका सतरावर कार्यरत असते. यातही राखीव जागांची व्यवस्था असते. या ठिकाणी राजकीय पक्ष बहुमत या आधारावर सत्ता स्थापन करतात. त्यामध्ये सहकारी संघटना व गटांच्या क्षेत्रातील नगर पालिकांना प्रतिनिधीत्व दिले जाते. पंचायत समितीची कार्ये, शेती, जंगले, पशुसंवर्धन, समाजकल्याण, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय दळणवळण, कुटीर उद्योग, सहकार, समाज विकास इत्यादी कार्ये असतात.

पंचायत समितीमध्ये ग्रामपंचायतीचे प्रतिनिधी असल्याने ग्रामपंचायत व पंचायत समिती यांच्यात समन्वय निर्माण झालेले आहेत. तसेच पंचायत समितीचे सभापती जिल्हा परिषदेचे सभासद असल्याने जिल्हा परिषद व पंचायत समितीत ही समन्वय साधला जातो.

(क) जिल्हा परिषद – जिल्हा स्रातवर जिल्हा परिशद ही स्थानिक स्वराजय संस्था होय. जिल्हा परिषदेच्या सदस्यांची निवउ जिल्ह्यातील ग्रामीण भागातील प्रौढ मतदानाच्या पद्धतीने झालेली असते. जिल्हा परिषदेत प्रत्यक्ष निवडून आलेल्या सदस्यांबरोबरच पंचायत समितीचे सभापती जिल्हयातील सर्व आमदार, खासदार व विकास खात्यातील जिल्हा स्तरावर काम करणारे सर्व अधिकारी हे सभासद सहभागी असतात. जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद लोकप्रतिनिधी आणि कार्यकारी पद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे असते. त्यामुळे समन्वयातून जिल्हयाच्या विकासात पुढीलप्रमाणे कार्ये केले जाते.

जिल्हा परिषदेची मुख्य कार्ये – १) जिल्ह्यातील पंचायत समित्यांचे अंदाजपत्रक मंजूर करणे. २) सरकारी अनुदान मिळवून त्याची वाटणी करणे. ३) पंचायत समितीच्या कामात मार्गदर्शन करणे. ४) पंचायत समितीच्या अधिकार क्षेत्रातील कार्याप्रमाणेच कृषि, समाजकल्याण, लघु कुटीर उद्योग, सहकार, शिक्षण, स्वच्छता इत्यादी कार्ये जिल्हा परिषद कार्यकक्षेत येतात.

२.३ योग्य नेतृत्व (डशरवशीहळ ऐश्रळींशी) –

प्रत्येकी समूहात विभिन्न सदस्यांची भिन्न भिन्न कार्ये असतात. समूहातील सर्व सदस्य प्रत्येक कार्य करण्यास योग्य किंवा सक्षम असत नाहीत. ते त्यांच्या आवडीनिवडीप्रमाणे कार्य करत असतात. त्यामुळे व्यक्तीगत योग्यते प्रमाणे कार्याची विभागणी होते. तसेच कार्याप्रमाणे दर्जात अंतर पडत असते. मुलांच्या कोणत्याही समूहात उत्तम नेता दिसून येतो, तर बाकी त्याच्या मागे चालणारे असतात. कधी कधी एकाच समूहात अनेक नेते दिसून येतात. ज्यामध्ये काही नेते दंगा निम्रण करण्याची योजना आखतात, दुसरे त्याची अंमलबजावणी करतात. बाकी लोक त्याला सहकार्य करत असतात. यावरून स्पष्ट होते की, योजना तयार करणारा नेता बौद्धिकदृष्ट्या तेज असतो. त्याची अंमलबजावणी करणारा शारीरिकदृष्ट्या शक्तीशाली असतो. लहान मुलांच्या समूहाप्रमाणेच मानव समाजामध्येही विभिन्न समहामध्येही एक किंवा अधिव नेते असतात आणि बाकीचे अनुयायी असतात. भारतात प्रत्येक गावात भिन्न भिन्न जाती आहेत. त्या प्रत्येक जातीमध्ये एक किंवा अधिक नेते असतात. यातील काही नेते गावचे नेतृत्व करत असतात. राजकीय क्षेत्रात नेता याशहाचा सर्वव्यापक असा अर्थ मानला जातो.

लोकशाही विकेंद्रीकरणाच्या तत्त्वामुळे ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत सत्ता पोहोचू शकली. त्यामुळे ग्रामीण समाजातून नव्याने नेतृत्व निर्माण होण्यास संध निर्माण झाली. तसेच शहरी नेतृत्वही विकसित होत गेले. असे असले तरी राज्याच्या आणि देशाच्या नेतृत्वात महत्वाची भूमिका वठवतात. लोकशाही विकेंद्रीकरणामुळे ग्रामीण लोकांचा राजकारणाकडे कल वाढला. लोकशाही प्रगल्भ होताना दिसून येते. त्यांच्यामध्ये राजकीय जाणिवा मोठ्या प्रमाणात रूजताना दिसतात.

(अ) नेतृत्व म्हणजे काय? (थहरीं ळी डशरवशीहळ)

नेतृतव म्हणजे समूहाला किंवा जनतेला प्रभावित करण्याची क्रिया होय. काही व्यक्तींच्या ठिकाणी आपल्या समूहाला मार्ग दाखविण्याचे त्यांची प्रगती करून दाखविण्याचे व त्यासाठी

त्या समूहावर आपले प्रभूत्व निर्माण करण्याचे सामर्थ्य असते. असे सामर्थ्य म्हणजे नेतृत्व होय.

(ब) १) नेतृत्वाची व्याख्या करताना किंनालत यंग म्हणतात की, नेतृत्व म्हणजे इतर लोकांच्या मनोवृत्ती व क्रिया प्रभावीत करणचे कार्य!

२) टेड (Tead) म्हणतात की, कोणत्याही आवश्यक उद्दिष्ट पूर्तीसाठी सहयोग करण्यासाठी जनतेला प्रभावित करण्याची क्रिया म्हणजे नेतृत्व होय. (Leadership is the activity influencing people to cooperate to some goal which they come of fiuld desirable.)

३) लेपियर आणि फॅान्सवर्थ म्हणतात की, नेतृत्व म्हणजे असा व्यवहार की जो दुसऱ्या व्यक्तीच्या व्यवहारांना प्रभावित करतो.

### (क) नेतृत्वाचे आधार

नेतृतव मान्य होण्याकरिता किंवा एखाद्या व्यक्तीला नेता म्हणण्याकरिता काही आधारभूत घटक आवश्यक असतात. काही दृष्टी त्यांच्याकडे असते. त्यामध्ये १) लोकमान्यता हा नेतृत्वाचा आधार असतो. तर शक्ती किंवा सत्ता हा प्रभूत्वाचा आधार असतो. २) नेतृत्वात लोकांच्या इच्छा महत्वाची असते. त्यामध्ये लोक नेत्याचे विकचार मान्य करणे. न करणे याबाबत स्वातंत्र्य असते. ३) नेता आणि अनुयायी यांच्यात सहकार्य, प्रेम, जिव्हाळा, निष्ठा आणि मोकळेपणाचे संबंध असतात. ४) प्रगती हा दृष्टिकोन नेत्यापुढे असतो. त्यामुळे लोक त्याला नेता असे म्हणतात.

### (ड) नेतृत्वाची कार्ये

नेतृत्व विकसित होताना प्रत्येक नवोदित नेता समोर काही उद्दिष्ट्ये ठेऊन कार्य करत असतो. तसेच प्रस्थापित नेत्याला आपले स्थान टिकवण्यासाठी सतत कार्य प्रवण रहावे लागते.त्यांचा आढावा आपणास पुढीलप्रमाणे घेता येईल.

१) आपल्या मतदारसंघातील समूहाचे उद्दिष्टे किंवा कार्ये स्पष्ट करणे.

२) आपल्या समूहाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी लोकमत तयार करणे समूह संघटीत करून स्वत: सहभागी होणे.

३) समूहाच्या विकासाला विचार करणे त्यासाठी साधणे उपलबध करून देणे इत्यादींचे ज्ञान नेत्याला असणे आवश्यक असते.

४) सामुदायिक उद्दिष्टांसाठी लोकमत तयार करणे, उद्दिष्टो साध्य करताना येणारे अडथळे व समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न करणे.

५) समूहातील लोकांना सतत कार्यप्रवण ठेवणे तसेच या लोकांवर योग्य प्रकारे नियंत्रण ठेवणे.

### (इ) भारतातील नेतृत्वांचे स्वरूप – पारंपारिक/आधुनिक

भारतीय नेतृत्वाचे स्वरूप पाहताना पारंपारिक व आधुनिक किंवा ढोबळ मानाने स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर असे भाग पाडता येतील.

**स्वातंत्र्यपूर्व काळ –** ग्रामीण भगातील/गावातील नेतृत्व उच्च व धनिक जातींच्या विशेषत: जमिनदार लोकांची मक्तेदारी होती ज्या जातीतील लोक प्रभावी होते त्या जातीतील लोंचे हितसंबंध जोपसण्यासाठी भावना अधिक होती. ज्या वर्गाकउे अधिक जमीन–जुमला, साधनसंपत्ती असेही त्या लोकांचा प्रभाव गावावर होता. गावच्या लोकांचा दृष्टिकोन परंपरावादी होता. जमाती (बलुतेदारी) पद्धतीचा प्रचंड पगडा होता. ज्ञजमानपी व्यवस्थेप्रमाणे बारा बलुतेदार आणि इरा बलुतेदार आपल्या वरिष्ठांची सेवा करत आणि त्याचा मोबदला धानयाच्या स्वरूपात मिळत असे. यातील बहुसंख्य लोक अर्धपोटी दारिद्र्यात जीवन जगत असत. अस्पृशांना तर कोणीच वाली नव्हता.

प्रत्येक गावात जातपंचायती होत्या, प्रत्ये जातीतील वयाने ज्येष्ठ असलेले लोक त्या जातीतील कौटुंबिक, आर्थिक, वैवाहिक, शेतीविषयक भावा–भावांतील वाटणीविषयक आणि इतर समस्या सोडवत असत. एखादा प्रश्न न सुटल्यास गावपंचायतीत मांडल्या जात असे. गावपंचायत ही गावातील सर्व जातींचे एक–एक प्रतिनिधी मिळून बनलेली असे. तसेच त्यामध्ये दोन जातीतील प्रश्नही मांडल्या जात असे परंतु या ठिकाणी योग्य न्याय मिळेल अशी अपेक्षा असते. त्यामध्ये गावातील ज्येष्ठ व प्रामाणिक व्यक्तींचे मत अंतिम मानले जाई.

### (इ) स्वातंत्र्योत्तर काळ

स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये पारंपारिक नेतृत्व निवउीची प्रक्रियेत पूर्णपणे परिवर्तन झालेले आहे. यामध्ये प्रौढ मतदानाचा हक्क सर्वांनाच मिळाला असल्यामुळे गावात बहुसंख्यांक जातीला अधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. अशा बहुसंख्यांक जातीची व्यक्ती मताधिक्यामुळे साहजिकच नेतापद प्राप्त करून घेते, गावात जे खालच्या स्तरातील पणनिर्धन लोक आहे. त्यांच्या ठिकाणीही नेतृत्वाची आकांक्षा निर्माण झाली आहे. ते उच्चवर्णियांविरुद्ध दंड थोपटून उभे आहेत. अशा निम्न समजल्या जाणाऱ्या समाजातही नेतृत्व निर्माण होत आहे व त्याचा लाभ तया घटकांपर्यंत पोहोचत आहे.

भारतीय संविधानामध्ये राजकीय क्षेत्रात प्रत्येक मागास जातीचे प्रतिनिधीत्व हक्क दिल्याने प्रत्येक जातीय घटकांपर्यंत विकास योजनांचे लाभ मिळताना दिसून येतात. त्यामुळे प्रत्येक जातीत एकापेक्षा अधिक नेते निर्माण होत असल्यामुळे गावात पक्षबाजीला, गटबाजीला व राजकीय स्पर्धेला चांगलाच जोर चढलेला दिसून येतो.

ग्रामीण भागात असे चित्र दिसत असले तरीही अलिकडे पूर्वीपासून धनवान, श्रीमंत व पारंपरिक प्रतिष्ठा असलेले लोक सलास्थानावर आजही दिसून येतात. पर्वी वृद्ध व शिकलेल्या लोकांना मान असे; पण हल्ली गावात अनेक सुशिक्षित तरुण सर्व जातीत निर्माण होऊ लागले आहेत. त्यामुळे विविध जातीतील सुशिक्षित तरुण नेतागिरीच्या आखाड्यात उतरले आहेत. हल्ली वरिष्ठाप्रमाणेच कनिष्ठ जातीतही कुशल नेत्यांची संख्या वाढत आहे. प्रत्येक नेता आपआपला गट बनवितो व गटा–गटांत स्पर्धा होऊन गावात गटबाजी निर्माण होत आहे. म्हणून म्हणावेसे वाटते. गाव होतं चांगल राजकाणांना पांगल आणि मनान दुभंगलं अशी स्थिती आज गावा–गावात दिसून येते.

पंचायत राजमध्ये नेतृत्वा विकास कार्यात महत्वाचा सहभाग आहे. विविध योजनांचा

लाभ आपल्या गावाला योग्य प्रमाणात मिळावा म्हणून हा नेता वर्ग कार्यरत असतो. नेत्याच्या योग्य मार्गदर्शनामुळे सामान्य जनताही आपल्या आवश्यक त्या गरजा, समस्या सोडवून घेत आहे. अशी प्रवृत्ती जागृत करणे हे नेत्याचे कार्य होय. त्यासाठी सुयोग्य नेतृत्वाची गरज असते. योग्य नेतृत्वामुळे लोकांचा दृष्टिकोन प्रगत, व्यापक व विशाल बनू लागला आहे.

**उ) वर्तमानकालीन नेतृत्व**

**१) नेत्यावरील विश्वासार्हता कमी –** पारंपरिक ग्रामीण शहरी नेतृत्व हे पूर्णपणे जात, धर्म, जन्मस्तर, कुटुंब, प्रतिष्ठा, वय, भाषा, शिक्षण इत्यादी प्राथमिक बाबींवर आधारलेले होते. आधुनिक काळात भारतीय संविधानाने सर्व जातीधर्मांना दिलेला समान हक्क अधिकार यामुहे नेतृत्व करण्याची संधी सर्वाना समान प्रमाणात मिळालेली असल्याने नेतृत्वाची सर्व जातीधर्माच्या लोकांना मिळाली यामध्ये आदिवासी, दलित, महिला, शेतकरी, गरीब कुटुंबातील अनेक नेते ग्रामीण भागात काम करताना दिसतात, असे असले तरी ग्रामीण राजकारणातील पारंपरिक जात, कुटुंब, धर्म इत्यांदीवर आधार कायम असल्याचे दिसून येतात. फरक फक्त प्रभाव झाल्याचे दिसून येतो.

**२) तरुण व जातींच्या नेत्यांचा वाढता प्रभाव –** स्वातंत्र्यपूर्व काळात आणि नंतर १९८० पर्यंत राजकीय नेतृत्व हे प्रामुख्याने धार्मिकदृष्ट्या उच्च दर्जा लाभलेले, शैक्षणिक परंपरा, जमिनची मालकी असणाऱ्या जातीत प्राप्त होत असे. तसेच अनुवंशिकता ही उच्च जातीची सत्ता, प्रतिष्ठा, प्रभुत्व यांच्यापुढील पिढीला प्राप्त होत असे. निम्न जाती प्रवर्गातील लोक यापासून अधिकाधिक परावलंबी, दुर्बल, निर्धन होते. त्यामुळे साहजिकच राजकीय सत्तेपासून दूर राहिले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर वरील सर्वच बाबीतील परिस्थिती वेगाने बदलली यामध्ये प्रौढ मतदान लोकशाही नागरी समानता, विकेंद्रिकरण इत्यादीमुळे लोकमताला महत्व प्राप्त झाले. यामुळे ज्या विाागात जया जातींचे लोक अधिक त्या विभागात त्या जातीचे नेतृत्व विकसित होत गेले.

प्रभावी जातीची संकल्पना मांडताना डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी लोकशाही प्रभावी जात कशी निर्माण होत आहे हे म्हैसूर जवळील रामपूरा या खेड्याचा अभ्यास करताना लक्षात आले. ते म्हणतात की, सामान्यपणे संख्येने मोठ्या असणाऱ्या म्हणजे मतांची शक्ती अधिक असणाऱ्या जातींनी ग्रामीण राजकारणावर स्थानिक स्वराज्य संस्थावर आपला प्रभाव निर्माण केला व त्याद्वारे गावावर इतर जातीपेक्षा अधिक असे आर्थिक, सामाजिक, सांसकृतिक वर्चस्व प्रथापित केले.

भारताच्या विविध प्रांतामध्ये (राज्यांमध्ये) वेगवेगळ्या जातींची संख्या अधिक असल्याने तेथे आर्थिक दर्जा, व्यवसाय, शिक्षण इतयांदीच्या आधारे नव्याने प्रभावी जाती निर्माण झाल्या. उदा. कर्नाटकात – लिंगायत व स्कलिंग, आंध्रप्रदेशात – रेड्डी व कामा, तामिळनाडूत – गोंडर पदायाची, मोदलिपयार, केरळ – नायर, महाराष्ट्रात – मराठा, गुजात – पाटीदार, उत्तर भारतात – राजपूत, जाठ, अहिर, गुजर इत्यादी जाती समूहांचा राजकारणावर प्रभाव दिसून येतो. म्हणून डॉ. एम. एन. श्रीनिवास यांना 'प्रभावी जात' असे म्हणतात.

**३) दुर्बल घटकांना संधी –** लोकशाहीचे विकेंद्रीकरण तसेच ७३ व ७४वी घटना दुरुस्तीने आलेले स्थानिक स्वराज्य संस्थातील लोकसंख्येच्या प्रमाणात राखिव जागा ठेवण्यात

आल्या, तसेच महिलांचे नेतृत्व नव्याने विकसित होत आहे. तसेच आरक्षणामुहे प्रस्थापितांची इच्छा असो वा नसो त्यांना आर्थिकदृष्ट्या सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सामाऊन घ्यावेसे लागते. त्यामुळे ग्रामीण भागातील प्रस्थापितांची सत्ता मतदानाच्या किंवा लोकसंख्या अधिक असलेल्या घटकांनी खेचून घेतल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसून येत आहे.

**४) शिक्षणास महत्त्व –** आज ग्रामीण भागात सुशिक्षितांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. तरीही निरक्षर पारंपरिक वृत्तीच्या नेत्यापेक्ष्या सुशिक्षित, कल्पकता तसेच लोकप्रश्नांची जाणीव व अभ्यास असलेला नेता ग्रामीण भागात लोकप्रिय होत आहे. तसेच कायाद्याची माहिती असणारा, कृषीमध्ये नवनवे बदल करणारा कृषी मालास चांगला भाव मिळण्यासाठी प्रयत्न करणारा, पाण्याचे नियोजन करणारा इत्यादी बाबींचे ज्ञान असणाऱ्या व्यक्तीस लोक आपला नेता मानतात. त्याचबरोबर आपल्या गावात सरकारी योजना, उपक्रम राबवून विकास प्रक्रियेत तालुक्यात, जिल्ह्यात, राज्यात गावाचे नाव मोठे करणाऱ्या नेत्यास ग्रामीण भागात लोक मान्यता मिळताना दिसते.

**५) नेता निवडीबाबत ग्रामस्थ अधिक जागरूक आहेत –** ग्रामीण भाग असो वा शहरी जातींचा प्रभाव राजकारणावर आहे. परंतु लोक आपला नता कसा, कोण असावा हे ठरवताना जातीचा निकषही बाजूला सारतात, जातीय बळावर निवडले गेलेले नेतृत्व लोकामान्यता मिळवण्यास व टिकवून ठवण्यास काही अंशी अपयशी ठरेल. पंचायत राजमुहे गाव-शहर यांच्यात आंतरक्रिया वाढल्या. त्यामुळे जनता आपल्या नेत्याविषयी चौकस होऊन काही गुणांच्या आधारेच नेता निवडताना दिसून येते ते निकष पुढीलप्रमाणे होत.

१) नेत्याचे शिक्षण

२) नेता संपूर्ण गावांच्या/समुदायाच्या हिताला प्राधान्य देतो किंवा कसे.

३) गावातील प्रश्न सोडवण्यात किती सहभाग घेतो.

४) नेता चारित्र्यवान आणि धार्मिक वृत्तीचा असेल तर त्यास प्राधान्य.

५) गावातील सर्वांना घेऊन चालणाऱ्या नेत्यास लोकमान्यता इत्यादी होत.

**६) आर्थिक सत्ता प्रभावी होत आहे –** साधारणपणे १९९५ नंतर पंचायत राज, विधानसीाा किंवा लोकसभा इत्यादी कोणत्याही निवडणूका असतील यांचे नेतृत्व जमीनदार, उच्चवर्गीय, भांडवलदार, व्यावसायिक यांच्याकडे सत्ता जाताना दिसून येते. केवळ आदर्श, सदाचारी, नेतृत्वगुण असलेला नेता पुरेशा आर्थिक पाठिंब्याशिवाय राजकारणात अपवादात्मक यशस्वी होताना दिसतात. कारण आपले चहाते जमा करणे, टिकवून ठेवणे, निवडणुकांमध्ये प्रचारासाठी खर्च करणे यासठी आर्थिक स्थिती मजबूत असणे आवश्यक असते. तसेच राकीय पक्षही उमेदवाराची आर्थिक स्थिती पाहूनच उमेदवारी देताना दिसतात. राजकीय पक्षांचे काही निकष आहेत त्यात मोठी बागायती शेती, मोठा व्यवसाय, शिक्षण संस्था, व्यापारी संस्था, सहकारी संस्था, सहकारी उद्योग यांवर प्रभाव, जातींची संख्या, नातेदारी इत्यादी निकष लावून तिकीट देतात. तसेच विविध पक्षांना डोनेशन देण्याची क्षमता यावरही तिकीट मिळते. अशीही चर्चा असते. असे असले तरी स्थानिक राजकारणात ग्रामीण लोकांना आपले स्थान निर्माण करण्यास संधी मिळताना दिसून येते.

**३) वर्तमानकालीन नेतृत्व आणि मर्यादा –**

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील लोकशाहीचे विकेंद्रीकरण त्यामुळे नव्याने निर्माण झालेले स्थानिक नेतृत्व ग्रामीण समुदायातील आर्थिक, सामाजिक, राजकीय पुर्नरचनेचे यश आणि काही मर्यादा आपणास पुढीलप्रमाणे पहाता येतील.

**१) बहुजनांना संधी –** परंपरागत नेतृत्वात जात, धर्म, घराणे, जमीनदार इत्यादी घटक प्रामुख्याने प्रभावी होते. परंतु पंचायत रामुळे सर्व सामान्यपणे मागास जाती, घटक तसेच बहुजनांना आपल्या मतांची संख्या व एकता यांच्या जोरावर नेतृत्वाची संधी उपलब्ध झाली. याविषयीचे निरीक्षण रेटझलक यांनी उत्तर प्रदेशातील विविध जातींची राजकीय समिकरणे बदलली. तसेच बहुजन जातींना नेतृत्वाची संधी मिळाली.

भारतीय संविधानातील ७३ व ७४व्या घटना दुरुस्तीने अनुसूचीत जाती–जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात आणि स्त्रियांना ३३.. राखीव जागा ठेवल्यामुळे नेतृत्वाची संधी उपलबध होऊन बहुजन जातीतील लोकांत नेतृत्व विकसित झाल्याचे दिसते.

**२) नव नेतृत्व उदय आणि विकासाची संकल्पना –** पंचायतराजमध्ये दिलेल्या आरक्षणामुळे नेतृत्व स्त्रिया, सामान्य दलित यांच्याकडे गेले. त्यांना आपल्या गावाच्या विकासात आणि आपले प्रश्न यांना आग्रकम देऊन सोडवण्याचे प्रयत्न झालेले दिसतात. उदा. स्त्री सभासद (नेतृत्वाने) पाणी, स्त्री साक्षरता, स्त्री आरोग्य, पोषण आहार, संडास, बाथरूम, सौरचूल, दारुबंदी, शाळांची व्यवस्था, बालविवाह प्रतिबंध, बचतगट, स्त्री सावलंबन, अंधश्रद्धा निर्मूलन, पर्यावरण विकास इत्यादी प्रश्नांना आग्रक्रम दिलेला दिसून येतो.

**३) ग्रामीण पारंपारिक सत्ताधाऱ्यांना चपराक –** पारंपारिक खेड्यात विशिष्ट जातीच्या लोकांची सत्तेत मक्तेदारी होती. त्याचेच अधिकार होते. लोकशाही व्यवस्थेत एक व्यक्ती एकमताने क्रांती घडवली आणि विविध जातींचा राजमार्ग मोकळा झाला. त्यातून पारंपारिक सत्ताधाऱ्यांना सर्वच जातीधर्माच्या लोकांना घेऊन त्यांचे मत विचारात घेऊन निर्णय घ्यावे लागतात.

**४) प्रत्येक व्यक्तीचे मत/गरज याप्रमाणे कारभार –** नेता निवडण्याचा अधिकार श्रीमंताप्रमाणेच सर्व सामान्यांनाही मिळाला असल्याने तसेच नेता गावचा कारभार गावातील लोकांच्या गरजा, अपेक्षा, समस्या, भाव–भावना विचारात घेऊन काम करावे लागते. त्यामुळे गावाचा विकास हा गावातील लोकांच्या मर्जीप्रमाणे होण्यास मदत झाली. याविषयी डॉ. एम. एन. श्रीनिवास आपल्या 'Social Change in Modern India' या ग्रंथात म्हणतात की, पंचायत राजमुळे ग्रामीण भागाला स्वावलंबी बनविण्यात आणि दलित, मागास जातींना सत्तेत सहभागी होण्यास हातभार लागला.

**५) लोकशाहीचा विकास –** भारतात बहुतांशी ७४% लोकसंख्या ग्रामीण भगात राहते. त्यामुळे लोकशाहीचा गाभा ग्रामीण भाग आहे. पंचायत राजमुळे प्रत्येक ग्रामीण व्यक्तीला राजकारणात सामाऊन, सर्वांना समान संधी मिळवून देत लोकशाहीची पाळेमुळे रुजविण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

नव्याने विकसित होत असलेले ग्रामीण नेतृत्व लोकशाहीचे धडे शिकते. त्यामध्ये लोकांना संघटीत करणे, रजाकीय गटांची मोड-तोड, पुर्नबांधनी, कुटनिती, निर्णय घेणे, मतदारांना प्रभावित करणे इत्यादी राजकीय समिकरणे शिकविली. त्यामुळे लोकांचे राजकीय, सामाजिकरणही झाले. नव्या नेतृत्वाची पिढी घडत गेली.

**६) ग्रामीण विकासास गती –** नव्याने निर्माण झालेले नेतृत्व स्पर्धा, शिक्षण, टिकून राहण्याची धडपड यामुळे ग्रामीण भागातही विकासकामे करण्याची वृत्ती वाएल्याने ग्रामीण भागाचा कायापालट झाला असे म्हणणे धाडसाचे होईल. असे असले तरी विकासाची दिशा निश्चित मिळाली असे म्हणता येईल. ग्रामीण भागाचा पाहिजे तसा विकास झाला नाही. कारण ग्रामीण भागातील जातीय राजकारण, निरक्षरता, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय नेतृत्वाची उदासिनता आणि ग्रामीण नेतृत्वाच्या मर्यादा यामुळे ग्रामीण विकास पाहिजे तसा होऊ शकलेला नाही.

**राजकीय नेतृत्वाच्या मर्यादा/अपयश**

नेतृत्वाचा विचार काता ग्रामीण समुदायाचा आणि विकासाला मुद्दा महत्त्वाचा आहे. पंचायत राज व्यवस्थेने ग्रामीण पारंपरिक सत्तेच्या व्यवस्थेत परिवर्तन झाल. त्यामुळे सत्ता केंद्रे बदलली असून कधी कधी विरोधासाठी विरोध होताना दिसून येतो.

उत्तर भारतामध्ये काही संशोधकांनी केलेल्या संशोधनातून काही निष्कर्ष काढले ते असे. राजस्थानमधील चित्तोडगड – जिल्ह्यातील पंचायती नेतृत्वाचा अभ्यास केला. यामध्ये असे म्हणतात की, पंचायतीचे नेतृत्व हे श्रीमंत, मोठे शेतकरी आणि उच्च जातीचे लोक यांचेच राहिले आहे. तसेच त्यांच्या खालोखाल ब्राह्मण, बनिया, गुजर इत्यादी जातीतील मोठे जमिनदार, जातीकडेच नेतृत्व आहे. अनुसूचित जातीचा सहभाग असला तरी तो अत्यल्प असल्याने प्रभाव पाडू शकली नसल्याचे स्पष्ट केले. महाराष्ट्रामध्ये पंचायतीराजमध्ये पारंपारिक नेतृत्व या अनुशंगाने प्रा. डी. ए. वाघ यांनी अभ्यास करताना काही निष्कर्ष हाती आले. त्यामध्ये ते म्हणतात की, पारंपारिक नेतृत्व निवडीचे आधार जमीनदार, पैसा, नातेगोते, वय इत्यादी निकष होते. मात्र, स्वातंत्र्योत्तर काळात ग्रुप मतदान पद्धतीने निवड होते म्हणून आधुनिक म्हणावे लागते. मात्र, नेतृत्व निवडीच्या प्रक्रियेत आजही जात, नातेसंबंध, संपत्ती इत्यादी पारंपारिक आधारावरच ग्रामीण नेतृत्व निवडले जाते. महाराष्ट्रात ७१.२% मराठा जातीचे जिल्हा परिषदेत प्राबाल्य होते असे आढळून आले आहे.

ग्रामीण भागातील नेतृत्व खऱ्या अर्थाने दलित, वंचित घटकांपर्यंत पोहचलेच नाही. राखीव प्रवर्गातून निवडन आलेले प्रतिनिधी अल्प प्रमाणात असल्याने निर्णय घेऊ शकत नाहीत. त्यामुळे प्रस्थापितांच्या हातातील बाहुले बनून राहतात असेही आढळून आले. असे प्रा. जी. एस. मुंडे यांनी आपल्या संशोधनात नोंदवले. तसेच ग्रामीण भागातील स्त्री आरक्षणाचीही स्थिती यापेक्षा वेगळी नाही. स्त्रियांना सत्तेच्या खुर्चीत बसविले जाते. कधी कधी नाही निर्णय मात्र पुरुषच घेत असतात. त्याला विविध कारणे सांगितली जातात. प्रतिगामित्वशील, चारित्र्य, घराकडे दुर्लक्ष इत्यादी भिती पुरुषांना वाटते म्हणून स्त्रियांना राजकारणात सक्रिय होऊ दिल्या जात नाही.

अलीकडील काळात पंचायतराज, लोकसभा, विधानसभा इत्यादी निवडणुकांत प्रचंड प्रमाणात खर्च उमेदवार करतात. मते विकत घेतली जातात. हे काम आर्थिक स्थिती मजबूत असणारे, मोठे जमीनदार, साखर शिक्षण सम्राट यांचे काम असल्याने तेच निवडणूका लढतात, जिंकतात आणि आलेल्या विकास योजनांचा फायदाही तेच घेतात आणि त्याच जोरावर पुन्हा निवडणूका जिंकतात. त्यामुळे विकासाकड ेकायमचेच दुर्लक्ष होते.

ज्यांच्या हाती सत्ता राखण्यासाठी वाटेल त्या मार्गाचा अवलंब करतात. १९९३-९४ पर्यंत पंचायत राज ही नामधारी होती. राज्यसरकारच्या मर्जीप्रमाणे काम करणारी संस्था बनली होती. परंतु ७३ व ७४ वी राज्यघटना दुरुस्ती झाली आणि दर पाच वर्षांनी निवडणूका घेणे सक्तीचे करून निवडणूक आयोग, अनुसूचीत जाती-जमाती इतर मागासवर्ग, महिला आरक्षण इत्यादी बाबींचा समावेश झाला. असे झालेले असले तरी प्रस्थापित नेतृत्व अवैध मार्गांनी सत्तेचा रिमोट आपल्या हाती ठेवताना दिसून येतात.

ग्रामपंचायतीच्या राजकारणाकडे विधानसभा, लोकसभेच्या निवडणुकांची शिडी म्हणून पाहिजे जाते. ग्रामीण भागाच्या विकासासाठी अत्यल्प प्रमाणात नेतृत्वाने प्रयत्न केलेले दिसून येतात आणि जे काही प्रमाणता विकास झालेला दिसतो त्याविषयी हयग्रे म्हणतात की, गावात झालेले रस्ते अधिकाऱ्यांना पुढाऱ्यांना व जमीनदारांना हवे होते म्हणून झाले, लोकांची गरज होती म्हणून नाही.

## २.४ नोकरशाही (Bureaccuracy)

नोकरशाीला इंग्रजीत (Bcarecaucy) असे म्हणतात. हा शब्द फ्रेंच Bureacy यापासून बनला तयाचा अर्थ लिहीणारा टेबल/बेंच असा आहे. यामुळे फानर यांनी नोकरशाहीला डेस्क गव्हर्नमेंट (Desk government) असे म्हटले. तर ब्यूरोचा दुसरा अर्थ आहे. यादृष्टीने ब्यूरो क्रेंसी म्हणजे अधिकारीयांचे शासन असा आहे. तसेच हिंदीमध्ये ब्युरो क्रंसी म्हणजे अधिकाऱ्यांचे शासन असा आहे. तसेच हिंदीमध्ये ब्युरो क्रंसीला नोकरशाही अधिकारी तंत्र, सेव तंत्र इत्यादी शह उच्चारले जातात. आधुनिक कालखंडात कोणतेही राज्य नोकरशाहीच्या सहकार्याविना राज्य करूच शकत नाही.

आधुनिक समाजातील हे अधिकारतत्व साकार करणारी यंत्रणा म्हणजे नोकरशाही होय. नोकरशाही व्यापारी, उद्योगधंदे, व्यवसाय, कारखाने या आर्थिक क्षेत्रातही निर्माण होते. आर्थिक विकासात औद्योगिक नोकरशाहीचे आणि नेत्यांचे कार्य महत्वाचे असते. या ठिकाणी मुख्यत: सरकारी यंत्रणेतील नोकरशाहीची समाजशास्त्रीय मीमांसा करावयाची आहे.

### (अ) नोकरशाहीचा अर्थ आणि व्याख्या –

शासकीय धोरणांची किंवा कायद्यांची अंमलबजावणी करणारा जो नोकरवर्ग असतो त्याला एकत्रितपणे नोकरशाही असे म्हणतात. आधुनिक काळात तर अभ्यासकांनी या शब्दाचा वापर शासकीय क्षेत्रापुरताच मर्यादित ठेवणे चुकीचे मानले आहे. त्याच्यामते नोकरशाही हे संघटनेचे एक अंग असते व म्हणून विशाल आकाराच्या किंवा गुंतागुंतीच्या संघटना जेथे अस्तित्वात असतात. तेथे नोकरशाही अस्तित्वात असते. यामुळे सार्वजनिक

नोकरशाही (private Bureaucacy) व निजी नोकरशााही (private Bureacacy) असे प्रकार पडतात.

१) मैक्स वेबर यांच्या मते, नोकरशाही विशेष योग्यता. निष्पक्षता आणि मानवता इत्यादी गुणधर्मयुक्त प्रशासन व्यवस्था होय.

२) प्रो. लस्की नोकरशाहीची व्याख्या करताना म्हणतात की, नोकरशाही एक अशी व्यवस्था आहे की जीचे नियंत्रण अधिकाऱ्यांच्या हाती असते की तयांच्या शक्तीने सामान्य नागरिकांच स्वातंत्र्य संपुष्टात येते.

३) मर्टन नोकरशाहीचा अर्थ स्पष्ट करताना म्हणतात की, नोकरशाही काही क्रिया करण्यासाठी बनवलेला द्वितीय समूह संरचना आहे ती प्राथमिक समूहाच्या कसोटी आधारे समाधानकारक कार्य करू शकत नाही.

४) नोकरशाही ही संकल्पना मॅक्सवेबर या जर्मन विचारवंताने सर्वप्रथम विशिष्अ अर्थान वापरली व स्पष्ट केली. पुढे अर्थशास्त्रातील ऐतिहासिक विचारप्रणालीचा पुरस्कर्ता गुस्ताव इमॉलेर यांने राजेशाही व राजाचा नोकरवर्ग, नैतिकता आणि कार्यक्षमता यांचे प्रतिनिधीतव करतो असे म्हटले होते. या विचाराचा प्रभाव मॅकस वेबर यांच्या नोकरशाहीविषयक विचारसरणीवर पडला असावा. असे बेल्डिक्स व लिपसेट यांनी म्हटले आहे The Theory of social and Economic organization या ग्रंथात मॅक्स वेबर यांनी नोकरशाही संकल्पनेतील आशय स्पष्ट केला.

**(क) नोकरशाहीची वैशिष्ट्ये** (Characteristics of Bureaucracy) -

नोकरशाहीच्या वरील व्याख्या आणि अर्थावरून काही वैशिष्ट्ये आपणास पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) विशिष्ट व्याख्या** (Particularr System) - नोकरशाही एक विशेष प्रकारची व्यवस्था असून तीचा उद्देश मोठे उद्योगांना व्यवस्थित स्वरूपात चालवणे असा आहे.

**२) पदसोपान** (Hierarchy) - नोकरशाही पद्धतीमध्ये चढ-उतार क्रमाप्रमाणे अनेक अधिकारी असतात. कार्यालयीन फाईल खालून वर प्रवास करत असते. प्रत्येक पदावर बसलेला व्यक्ती खालून आलेली फाईल प्राप्त करतो. आपे काम करून आपल्या वरिष्ठाकडे पाठवतो. यामध्ये कोणताही सोपानपदाचे उल्लंघन केले जात नाही. त्यामुळे कार्यालयातील कामाच्या उचित मार्गाद्वारेच काम करण्यावर भर दिल्या जातो.

**३) अधिकारी यांच्या कर्तव्याची व्याख्या** (Definition of duties of officers)- नोकरशाही पद सोपानमध्ये जितके अधिकारी असतात त्यांची आप-आपली कर्तव्ये आणि आधिकार यांची व्याख्या लिखित आणि स्पष्ट असते. त्यामुहे कोणताही अधिकारी आपल्या क्षेत्राबाहेर जाऊन काम करू शकत नाही आणि तसे कलेच तर अनुचित समजले जाते. प्रत्येक अधिकारी आपल्या अधिकार कक्षेतच कार्यरत असतो.

**४) विवेकीकरण** (Specialisation) – नोकरशाहीमध्ये विविध पदावर असलेल्या व्यक्तींा विशिष्ट प्रकारची कार्य करावी लागतात. ज्यामध्ये विविध प्रकारची योग्यता आवश्यक

असतात. प्रत्येक पदाकरिता आवश्यक विशेष योग्यता असलेल्या व्यक्तींची पदावर मागणी करणे आवश्यक असते. त्यामुळे प्रत्येक ठिकाणचे काम योग्य पद्धतीने होण्यास मदत होते.

**५) कर्तव्यपालन व्यवस्था** (System of fulfilment of duties) - या प्रकारामध्ये नोकरशाहीमध्ये प्रत्येक व्यक्ती विशिष्ट कर्तव्य असतात. त्यांना आपली कर्तव्ये करावी लागतात. जोपर्यंत ोकरशाहीतील सर्व सदस्य आपली कर्तव्य करत राहतात तोपर्यंत त्याच्या माध्यमातून चांगले प्रशासन शक्य आहे.

**६) वरिष्ठता आणि योग्यता याआधारे पदोन्नती** (Promotion of Seniority and Ability) - नोकरशाहीमध्ये पदोन्नती दोन प्रकारे होते. सेवा जेष्ठता आणि योग्यता या दोन्ही बाबींचा विचार करून पदोन्नती केली जाते. कारण फक्त ज्येष्ठता पाहून पदोन्नती दिल्यास चांगल्या कामाची प्रेरणा मिळत नाही. त्यामुळे चांगले कर्तव्य किंवा काम याचाही आधार घेतला जातो. हा आधार योग्य मानला जातो.

**७) कागदोपत्री आणि फाईल यावर आधारीत** (Base on Documents and File) – नोकरशाही ही कार्ये ही लिखित नियम आणि फाईली यांच्या माध्यमातून चालत असतात. प्रत्येक कार्य संगठीत कर्मचारी त्यांचे वेतन, नियुक्ती, पदोन्नती बोनस, पेन्शन, तसेच कारखान्यातील उत्पन्न आणि खर्च इत्यादी बाबतीत लिखित नियम असतात तसेच कार्यालयातील जुने रेकॉर्ड फाईल्स इत्यादी क्रमवार वर्षेवाईज लावलेले असून त्याचा निपटारा नोकरशाही या फाईलींची कामे वेगाने करत असते या फाईलींना बांधण्यासाठी लाल फीत असते म्हणून लालफितशाही असेही नोकरशाहीला म्हटले जाते.

**८) कामाची गोपनीयता** (Secrecy of Functions) – नोकरशाहीतील प्रत्येक पदावरील काम करणारा अधिकारी आपल्या कामाविषयी अत्यंत गोपनीयता ठेवत असतो. तशी अपेक्षाही असते.

**९) करियरसाठी नोकरी** (Service for carrier) – नोकरशाहीमध्ये प्रत्येक व्यक्ती मोठे पद प्राप्त करण्यासाठी ईमानदारीने काम करत असतो. दुसरीकडे जे लोक कठोर परिश्रम, कर्तव्यपरायणता आणि योग्यता याप्रमाणे काम करतात त्यांना चांगले फळ करियरच्या स्वरूपाहून मिळत असते. परंतु जे लोक भ्रष्ट मार्गाच्या अवलंब करतात त्यांनी मोठ्या प्रमाणात हानी किंवा नुकसान होत असते.

**१०) सिद्धांत आणि व्यवहारात अंतर** (Difference in theory and Practice) – नोकरशाहीत बहुतेक वेळा सिद्धांत आणि व्यवहारयामध्ये आंतर पडत असते. यामध्ये काही लोक नोकरशाहीला मानवतेच्याविरुद्ध संबोधते. परंतु नोकरशाहीची आवश्यकता असून तीला दूर सारले जाऊ शकत नाही.

**११) प्रशिक्षण** (Training) – नोकरशाहीमध्ये प्रत्येक पदावर नियुक्त केलेला व्यक्ती प्रशिक्षित असतो. तसेच त्या पदावर योग्य निर्णय घेण्याकरिता सक्षम असावा याकरिता त्यांना वेळोवेळी प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात आलेली असते.

**१२) नोकरशाही व्यक्तिमत्व** (Bureaucrate Personality) – नोकरशाहीचे अत्यंत महत्वाचे लक्षण मानले जाते. अधिकारी पदावरील व्यक्तीचे खासगी आणि नोकरीच्या

ठिकाणचे (कार्यालयातील) जीवन वेगवेगळे असते. कधी कधी संघर्षही होत असतो. अनेकदा अशी स्थिती होते यालाच भूमिका संघर्ष असे म्हणता येते. परंतु नोकरशाहीत त्याला विशेष महत्त्व नाही. कारण कार्यालयीन आणि व्यक्तीस जीवनातील व्यक्तिमत्व वेगवेगळे असते.

नोकरशाहीची वैशिष्ट्ये आपणास वरीलप्रमाणे आढळून येत आहेत. परंतु परिस्थितीच्या ओघामध्ये त्यामध्ये काही अंशी परिवर्तन नसलेले आढळून येते.

**ड) नोकरशहीचे प्रकार** (Typs of Bureaucacy) –

नोकरशाहीची वरीलप्रमाणे वैशिष्टे पाहिल्यास आपणास नोकरशाहीचे काही प्रकार पाता येतील. त्यासाठी काही कसोट्या आहेत. उदा. भारतीय योग्यताच्या आधारे असेल तर योग्यता नोकरशाही (Merit Bureaucacy) जर जातिच्या आधारे जातीय नोकरशाही (Cast Bureaucacy) म्हटले जाते. असेच वर्गीकरण अधिकाऱ्यांच्या आचारविचारावरही करता येतात. आपणास अधिकार या स्वरूपावर पुढील आकृती नोकरशाहीची रचना आणि अधिकार पाहता येतील

आकृती

**इ) नोकरशाहीचे फायदे** (Benifit Bureaucacy) – नोकरशाहीच्या उपरोक्त विवेचनावरून काही फायदे होतात त्याचा आढावा आपणास पुढीलप्रमाणे पाहता येतील.

**१) व्यवस्थित प्रशासन** (Systematic Administration) – नोकरशाहीला विविध अर्थाने पाहिले जाते. त्यामध्ये शासनाला सहकार्य करणे, प्रशासनातील व्यवस्था, दप्तर पद्धती इत्यादीचा वापर केला जातो.

**२) प्रभावशाली नियंत्रण** (Effective Control) – नोकरशाही ही नियमांच्या आधारे चालणारी प्रशासन व्यवस्था आहे. ज्यामध्ये व्यक्तिगत भावनांना महत्तव दिले जात नाही. कधी कधी अमानवीय वाटत असले तरी उद्योग क्षेत्रातील कार्य प्रभावीपणे पार पाडले जाते.

**३) थोड्या व्यक्तिद्वारे प्रशासन** (Administration by able persons) – नोकरशाही प्रशासन व्यवस्थेची सर्व कार्ये आणि उपकार्ये विभागून पदांची व्यवस्था केली जाते. प्रत्येक कार्ये पदानुसार विभागून योग्य व्यक्तींची नियुक्ती केलेली असते.

**४) इ) मोठ्या उद्योगासाठी आवश्यकता** (Possibility of Large Scale Industry) - नोकरशाही आंतरराष्ट्रीय उद्योग समूहासाठी महत्त्वपूर्ण आहे. नोकरशाहीत कितीही दोष असले तरी आधुनिक कालखंडात तीचे महत्त्वूपर्ण रूप दिसून येते.

**इ) नोकरशाहीचे दोष** ( Demerits of Bureaucacy)

नोकरशाहीचे वरीलप्रमाणे गुण असले तरी काही विचारवंतांनी टिकात्मक परिक्षण करून दोष दर्शविलेले आहेत. यामध्ये प्रो. लासकी म्हणतात. व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर गदा येते. तर बरनार्ड शा. यांनी नोकरशाहीला उच्च अधिकाऱ्यांची सामन्तशाही म्हटले, रेमजेम्योर यांनी तर नोकरशाहीची अगिनशी तुलता नकेली. प्रो. रोबसन म्हणतात. नोकरशाहीमध्ये नागरिकविषयी उदासिनता, विभागीय निर्णयात कठोरता, औपचारीकत्वाचे पालन केले जाते. शसक आणि शासित यांच्यात मोठे अंतर दिसून येते. वरीलप्रमाणे नोकरशाहीची मिमांसा केली असली तरी त्यापेक्षा अनेक दोष दिसून येतात. त्याचा आढावा आपणास पुढीलप्रमाणे घेता येईल.

**१) लाल फितशाही** (Red Tapism) – नोकरशाहीचा सर्वात मोठा दोषतात कितशाही मानला जजातो. यामध्ये फाईली दीर्घकाळ टेबलवरून फिरत असताना लालफितीमध्ये बांधलेली आणि पडून राहते. कधी कधी एवढा वेळ लागतो की त्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. अलिकडे खासगी उद्योगांमध्ये लाल फितशाही कमी सिून येते.

**२) सत्तवादी मनोवृत्ती** (Authoritiative Tendency) – नोकरशाहीतील अधिकारी बहुतांशीवेळी आपली सत्ता/दबाव वाढवत कठोर निर्णय घेतात तो निर्णय कधीकधी अमानवीय असतो.

**३) दैनंदिन कामावर भर** (Emphasis of Routine) – नोकरशाही ठिकाणी विकास करण्याचा प्रयत्न करत नाहीत तर आलेला दिवस व समोरचे काय करायचे अशीच मानसिकता दिसून येते.

**४) श्रेष्ठत्वाची भावना** (Superiority Complex) – नोकरशाहीतील पदाधिकाऱ्यांमध्ये अहंकाराची भावना दिसून येते. ते लोक आपल्या सत्तेच्या घमंडीत राहतात. सामान्य कर्मचारी बहुतेक मोठे समजतात. कनिष्ठ अधिकारी स्तर कर्मचारी यांना अपमानास्पद वागणूक मिळते.

**५) वर्गीय जाणीव** (Class consciousness) – नोकरशाहीतील अधिकारी आपल्यापेक्षा कमी–वरिष्ठ दर्जा असलेल्या लोकांशी वावरताना आपल्या वर्गाची जाणिव होते. वरिष्ठ लोक कनिष्ठांना कमी लेखताना दिसतात.

**६) रुढिवादीवृत्ती** (Conservative) - नोकरशाही रूढीवादी आहे. बरोबरीला विरोध करते. अधिकारी आपली सत्ता भोगताना परिस्थितीशी सुसंगत असा कोणताही निर्णय घेत नाहीत. तेव्हा नियमाकडे बोट दर्शवितात. त्यामुळे नुकसान होते. तयांच्यात तानशाही आणि औपचारिकता दिसून येते.

नोकरशाही किंवा प्रशासन हा कोणत्या देशाच्या विकासातील महत्त्वाचा आधार असतो म्हणून डॉ. आंबेडकर यांनी भारतीय लोकशाहीच्या महत्त्वाचा आधारस्तंभ प्रशासनास म्हटलेले आहे. देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका आहे. त्यामुळे नोकरशाहीचे गुण

आणि फायदे तर आहेतच; परंतु तोटेही अधर्शिक असल्याचे दिसून येते.

(इ) एर्वीलरींळेपरश्र । जलर्लीरींळेपश्रर र्डीर्ीीलर्ीीश) शैक्षणिक आणि व्यवसाय रचना

अ) शिक्षणाचा अर्थ उद्दिष्ट्ये –

मानवाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्याचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. शिक्षणामुळे मानव प्राण्याचे रुपांतर सामाजिक प्राण्यात होते. तसेच व्यक्तीचे व्यक्तिमत्व आर्थिक आणि सामाजिक विकास होऊन सारासार विचार करण्याची उद्दिष्ट्ये विकसित होते. शिक्षणाविषयी महात्मा जोतीराव फुले म्हणतात की, ज्या शिक्षणामुहे माणसांला खरं खोटं काय कळतं ते शिक्षण होय. यावरून शिक्षणामुळे माणसाला विचार करण्याची शक्ती येऊन त्याचे कार्य व कार्यकारण संबंध लक्षात येईल अशी अपेक्षा महात्मा जोतीराव फुले ठेवतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणास वाघीनीचे दूध असे म्हटलेले आहे.

शिक्षण या शब्दाचा अर्थ ज्ञान मिळविणे, शिकणे, उपदेश करणे हा आहे. शिखण या शब्दाची फोउ केली असता शिक्ष+अन असी होते. अन म्हणजे बदल करणे. इष्ट तो बदल घडवून आणणे. याचाच अर्थ शिक्षण हे व्यक्तीच्या वर्तनात परिवत्रन घडवून आणण्याचे प्रभावी साधन आहे महणून भारतीय संविधानात मुलभूत हक्कांत शिक्षणाचा समावेश करण्यात आलेला आहे.

ब) शिक्षणाची व्याख्या

१) प्लेटो यांनी शिक्षणाची व्याख्या स्पष्ट करताना म्हणतात की, शिक्षणामुळे मुलांमध्ये चांगली नैतिकता विकसित करता येते.

२) कॉण्ट शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होऊन अपेक्षित उद्दिष्टांपर्यंत पोहचते.

३) महात्मा जोतीराव फुले शिक्षणामुळे व्यक्तीचा विकास होऊन खरं काय खोटं काय (नैतिकता) कळते ते शिक्षण होय.

४) स्वामी विवेकानंद महणतात की, आम्हाला असे शिक्षण आवश्यक आहे की ज्याद्वारे चरित्र निर्माण होते. मेंदूची शक्ती वाढते. बुद्धिचा विकास होतो आणि मनुष्य आपल्या पायावर उभा राहतो, ते शिक्षणामुळे.

वरील विचारवंतांनी वेगवेगळया परिभाशात शिक्षणाचा अर्थ स्पष्ट केलेला असला तरी या सवांचा उद्देश हा व्यक्तीचे व्यक्तीमत्व, चरित्र, नेतिक विकास इत्यादी शिक्षणामुळेच विकसित होत असतात असे म्हटलेले आहे.

क) शिक्षणाचे प्रकार

औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण असे प्रामुख्याने शिक्षणाचे प्रकार आहेत.

१) औपचारिक शिक्षण – औपचारिक शिक्षण पद्धतीमध्ये निश्‍चित अभ्यासक्रम शिक्षक विद्यार्थी पूर्वनियोजित उद्देश साध्य करण्यासाठी निश्‍चित ठिकाणी येऊन विद्यार्जन करत असतो. विशिष्ट परिक्षा देऊन पदवी ग्रहण केली जाते. ही शिक्षणपद्धती कृत्रिम असे. टीव्ही सर्वसाधने सिमीत असतात. परंतु ग्रंथालय पुस्तके, प्रयोगशाळा, चित्रे इत्यादी शाळेत साधने मानली जातात.

२) अनौपचारिक शिक्षण – अनौपचारिक शिक्षण पद्धतीमध्ये कोणताही अभ्यासक्रम, शिकवण्याची पद्धत, शिक्षक, वेळ इत्यादी निश्‍चित नसतात. तसेच मनौपचारिक शिक्षणाचे कोणतेही साधन पूर्व निश्‍चित असत नाही; परंतु शिक्षणाव्यतिरिक्त इतर प्रकारे आपली उद्दिष्ट्ये पूर्ण करता येतात. अनौपचारीक शिक्षण बालक, कुटुंब, समाज, धम्र, खेळाची मैदाने इत्यादी विविध साधनांद्वारे ज्ञान ग्रहण करते आणि विकसित होत असते.

**ड) भारतातील शिक्षणाचे उद्देश –**

भारतामध्ये शिक्षणाची उद्दिष्ट्ये व्यवस्थित प्रयत्न केलेला सिून येतो. यासाठी विविध आयोग, समित्या, विशेषज्ञांच्या समूहांनी काही उद्देश प्रतिपादन केलेले आहेत ते पुढीलप्रमाणे–

१) नवीन ज्ञान विज्ञान स्विकारणे.

२) प्राकृतिक न्यायाविषयी अस्था बाळगणे.

३) विकासाच्या समस्या सोडवण्यासाठी कोशल्या प्रकरणे

४) कार्यानुभव, व्यवहारिक शिक्षणाद्वारे विद्यार्थी सवावलंबी बनण्याची योग्यता निर्माण करणे.

५) सर्वांना समान शिक्षणाची सुविधा प्राप्त करून देणे.

६) मतिमंद विद्यार्थ्यांना वेगळी शिक्षणाची व्यवस्था करणे.

७) विद्यार्थ्यांत नेतृत्वगुण विकसित करणे.

८) विद्यार्थ्यांना लिहिने बोलणे या गुणांना विकसित करणे.

९) राष्ट्राच्या अपेक्षा. आकांक्षा पूर्ण करणे.

१०) राष्ट्रीय अपेक्षेप्रमाणे नागरिक निर्माण करणे.

११) शिक्षणास जीवनोपयोगी बनविणे

१२) धर्मनिरपेक्षतेची भावना सदृढ करणे.

१३) विद्यार्थ्यांप्रती राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लावणे.

१४) विद्यार्थ्यांत देशप्रेम आणि संसकृतीविषयी अभिमानाची वृत्ती बळावणे.

१५) वर्गमुक्त अनौपचारिक शिक्षण किंवा खुले विद्यापीठाची व्यवस्था करणे आणि शिक्षणाला सार्वजनिक बनविणे.

**इ) शिक्षणविषयक आधुनिक दृष्टिकोन**

शिक्षणाचा आधुनिक दृष्टिकोन समजण्यासाठी प्राचीन आणि आधुनिक दृष्टिकोनाचा तुलनात्मक अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यामुळे आपल्यासमोर वास्तविक परिस्थिती समोर येईल. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

१) शिक्षणाचा अर्थ – शिक्षण या शब्दाला लॅटिन भाषेत (..) असे म्हणतात. (..) चा अर्गी आतमध्ये (..) अर्थ पुढे ाणे किंवा विकास करणे. याप्रकारे आधुनिकता दृष्टिने शिक्षण

मुलांच्यामध्ये सुप्त शक्तीला सामाजिक वातावरणत विकसित करण्याची कला आहे.

प्राचीन शिक्षण पद्धतीत अंतर्गत निर्देशावर भर दिला जात होता. शेवटी शिक्षणाचे कार्य मुलांच्या डोक्यात ज्ञान ठासून भरले जात होते. (पाठांतर) आजच्या स्थितीत मुलांचे मन एक खाली भांडे (..) किंवा एक कोरी पाटी (..) इत्यादी प्राचीन धरणांचे खंडण करून अलिकउे मुलांना योग्य वातावरणात क्रियाद्वारे सिखवले जाते. योम्यग मार्गदर्शनाने सामाजिक विकास घडून येतो.

**२) शिक्षणाची साधने –** प्राचीन विचार धारेनुसार शिक्षण फक्त शाळेत दिले जाते आणि शाळांचे हे कार्य मानले जात होते. परंतु आधुनिक पद्धतीत शाळेसोबतच कुटुंब, समुदाय, धर्म आणि राज्य इत्यादी अनौपचारिक साधनेही महत्वाची मानली जातात तसेच औपचारिक आणि अनौपचारीक दोन्ही साधने मिळून प्रयत्न करणे गरजेचे आहे.

३) शिक्षक – प्राचीन विचारानुसार शिक्षण शिक्षकप्रधान (..) होती. तसेच शिक्षकाचे स्थान प्रचंड मोठे होते. तो राजाप्रमाणे मानला जायचा; परंतु आधुनिक परिस्थितीत मित्र दिशादर्शक आणि मार्गदर्शक समजला जातो. त्याच्याकडून अशी अपेक्षा बाळगली जाते की मुलांना सहानुभूती देऊन व्यक्तिमत्व संबंध स्थापन करून सामाजिक आवडनिवड, सवयी, दृष्टीकोन विकास करणे.

**४) मुल –** प्राचीन विचारानुसार मुलांना निष्क्रिय रूपात पाहत होते. तसेच एका ठिकाणी बसून शिक्षकाने दिलेले ज्ञान, सूचना ऐकण्याची सवय लावली जाते. आधुनिक विचारानुसार शिक्षण मुलांच्या केंद्रित (उहळश्रव उशपींशी) झालेली आहे. अलिकडे मुले अधिक सक्रिय होऊन अभ्यासाची आवड निर्माण होऊन शिक्षक आणि मुले यांच्यात अन्तक्रिया (Interaction) अधिक होतात. त्यामुळे मुलांचा अधिकाधिक विकास होत आहे.

**५) शिक्षणाचा उद्देश –** प्राचीन शिक्षण मुलाच्या मानसिक विकासावर भर देते. ज्यामुळे केवळ ज्ञानार्जनालाच शिक्षण असे म्हटले जाते. आधुनिक शिक्षणशास्त्रात व्यक्तीच्या प्रकृतीचा अभ्यास करताना मानसिक विकासाबरोबरच शारीरिक, सामाजिक आणि अध्यात्मिक विकासावर भर देत आहे. यादृष्टिने आनुनिक शिक्षणाचा उद्देश आहे.

**६) अभ्यासक्रम –** प्राचीन विचारधारेनुसार अभ्यासक्रम फक्त मुलांच्या मानसिक विकास होण्याच्या हेतूने निश्चित केलेला होता. तसेच अभ्यासक्रम निश्चित आणि स्थिर बनलेला होता.

आधुनिक काळात बालकांचा/मुलांचा सर्वांगिण विकास होण्याच्या हेतूने अभ्यासक्रम बनविलेला आहे. त्यामुळे मुलं प्रगतशिल बनविण्यावर भर दिले जाते. तसेच आपआपली आवडनिवडीनुसार विकास होण्याचे स्वातंत्र्य आहे.

**७) शिक्षणपद्धती –** शिक्षणाच्या प्राचीन पद्धतीप्रमाणे संपूर्ण अभ्यासकम पाठांतरावर भर देण्यात येत होता. या पद्धतीमुळे शिक्षण निर्जीव, निरास होत होते, आधुनिक पद्धतीमध्ये आता मुलांचा सर्वांगिण विकास होण्याच्या उद्देशाने हसतखेळत सिखने आवश्यकता, आवडनिवड आणि वास्तविकस जीवनातील अनुभव प्राप्त करून विकसित होत आहे.

**८) अनुशासन/शिक्षा –** प्राचीन विचारधारेनुसार शिस्त लावण्यासाठी कठोर शिक्षा किंवा छडीच्या सहाय्याने शिक्षा शिक्षक देत होते; परंतु आधुनिक काळात अशी अपेक्षा नाही. शिक्षकाचे प्रभावी नियंत्रण आणि स्वातंत्र्य यावर भर देण्यात येते. ज्यामुहे बालकामध्ये स्वत:च शिस्त (Self Diciplin) ची भावना निर्माण होते.

**९) परिक्षा –** शिक्षकाला मुलांच्या प्रगतीच्या माहितीसाठी परिक्षेचा उपयोग करणे आवश्यक असते. या परिक्षेसाठी प्राचीन कालावधीत निबंध लिहावे लागत त्यामुळे रटाळ ज्ञान मिळाल्याचा प्रत्यय येत असे. त्यामध्ये अनेक चुका होत. त्यामुळे आधुनिक वस्तुनिष्ठ परिक्ष, प्रगती पत्रे आणि प्रगती पुस्तक इत्यादीवर भर देण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे आपणास शिक्षणाचे प्रकार शिक्षणाविषयीची प्राचीन व आधुनिक दृष्ट यांचा उहापोह करण्यात आला आहे.

## व्यवसायसंरचना पारंपरिक व आधुनिकता

पारंपरिक व्यवसाय हे जातीने मिळत असत तर जातही जनमाने मिळत असे. याविषयी नेसफिल्ड यांनी व्यवसाय हा घटक जातींसंस्थेच्या निर्मितीचा केंद्र बिंदू मानला. त्यांच्यामते वंश, धर्म, प्रगती यासर्व घटकापेक्षा व्यवसाय जातीव्यवस्थेकरिता कारणीभूत आहे. प्रत्येक जातीचा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ दर्जा  तो जात नव्हे तर उद्योगाचे प्रतिनिधित्व करणे असे म्हणतात.

नेसफिल्ड यांच्या मते औद्योगिक विकासात प्रथम अस्तित्वात येणारा व्यवसाय नंतरच्या व्यवसायापेक्षा निकृष्ट समजल्या जाऊ लागला. प्रत्येक नवीन व्यवसाय औद्योगिक  पगतीची अवस्था दर्शवीत असल्याने तो व्यवसाय करणाऱ्या गटाचा दर्जा श्रेष्ठ मानल्या जाऊ लागलया. टोपल्या तयार करणाऱ्या जातीपेक्षा धातुकाम करणाऱ्या सोनार, लोहार या जाती श्रेष्ठ ठरल्या. व्यावसायिक गट हे जाती व समाजाची नैसर्गिक उत्पत्ती आहे असे ते मानतात.

पारंपरिक समाज व्यवस्थेत प्रत्येक जातीचा एक प्रमुख व्यवसाय होता. प्रस्तुत व्यवसाय व्यावसायिक ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होत असे. यामध्ये कुटुंब हे व्यवसायाचे प्रशिक्षण केंद्र होते. उदा. लोहाराच्या मुलाला लोखंडाच्या वस्तु बनवण्याचे प्रशिक्षण कुटुबातच मिळत असते. शेतकऱ्याच्या मुलाला शेती करण्याचे ज्ञान कुटुंबातच मिळत असे. नसफिल्ड यांनी जातीची नावेही व्यवसायावरून पडली आहेत. असे स्पष्ट करून जातीच्या उत्पत्तीचा व्यावसायिक सिद्धांत मांडला.

### अ) पारंपारिक व्यवसाय संरचनेत बलुतेदारी पद्धत –

पारंपरिक व्यवसाय संरचनेची मुळे जातीव्यवस्थेत दिसतात. काही विचारवंताच्या मते व्यवसायावरून जातींची नावे तयार झाली. असे असले तरी काळाच्या ओघात आणि गरज पूर्तीसाठी म्हणून गावगाड्यात नेटनेटकेपणा आणि सर्वांच्या गरजा पूर्ण करण्याकरिता वेगवेगळे व्यवसाय निर्माण झाले आणि पुढे व्यवसायच जातीत रुपांतरीत झाले. व्यवसायाच्या गरजेप्रमाणे व्यवसायिकांची विभागणी करून श्रेष्ठ कनिष्ड स्थान दिसून येते. बलुतेदारी व्यवस्थत बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार होत.

१) बलुतेदार (कारू) यामध्ये पहिली ओळ – सुतार, लोहार, चांभार, महहार, दुसरी

ओह – कुंभार, न्हावी, पारेट (धोबी), मातंग, तिसरी ओळ – सोनार, जोशी, गुरव, कोळी इ. ओह या क्रमाप्रमाणे गावातील कुणब्याला त्याच्या कृषितील कामाच्या गरजेप्रमाणे क्रम दिल्याचे दिसून येते.त्याचप्रमाणे मोबदला देण्याचा क्रम असे पहिल्या ओळीतील बलुतेदारांना थोरले बलुते (अधिक मोबदला) तर त्याच्या उतरत्या क्रमाने इतरांना मोबदला मिळत असे.

२) अलुतेदार (नारू) – ग्रामीण समाजामध्ये आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्याबरोबरच काही महत्तव कमी असणारी कामे करण्यासाठी इतर जातींची मदत घेतली जात असे त्याला अलुतेदार (नारू) असे म्हणत. त्यांचा मोबदला ठराविक नसे, अलुतेदार या शब्दचा अर्थ अलुलकीने प्रमाणे किंवा देणाऱ्याच्या मर्जीप्रमाणे असा होतो. यामध्ये अठरा जातींचा समावेश होता. जसे तेली. तांबोळी, साळी, धनगर, शिंदी, माळी, गोंधळी, डोऱ्या, भाट, ठाकर, गोसावी, जगम, मुलाणी, वजंत्री, घडशी, बलवंत , तराळ, भोई इत्यादी होत.

**व्यवसाय संरचचेने विशेष**

भारतातील पारंपारिक व्यवसाय संरचना पद्धतीचा सुक्ष्म अभ्यास अने कभारतीय आणि पाश्चात्य संशोधक विचारवंत यांनी केलेला उदा. डॉ.दुबे, वाईझर, ऑस्कर, लेवीस, रेड्डी इत्यादी यांच्या मतानुसार ग्रामीण व्यवसाय रचना आणि जाती यांचा मिलाप बलुतेदारी व्यवथा यामुळे सेवेच्या मोबदल्यात वस्तु मिळत असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचा प्रचंड परिणाम झाल्याचे म्हटलेले आहे. त्यांचा आढावा आपणास घेता येईल.

**१) जाती व्यवस्थेवर आधारित –** बलुतेदारी पद्धती ही जाती व्यवस्थवर आधारित असून, ते जातीव्यवस्थेचे आर्थिक संघटन आहे. यामध्ये बलुतेदार व अलुतार सर्व कार्ये करत असत. मात्र, मोबदला नगण्य असते. जातीव्यवस्थेनुरूप प्रत्येक जातीची कार्ये ठरलेली होती.

**२) प्राथमिक व समोरासमोरचे संबधं –** या व्यवस्थेत प्रत्येक जातीच्या कार्याची गरज दुसऱ्या जातीला असल्याने एकदुसऱ्याला ओळखत असतात. तसेच एखाददुसरा व्यक्ती गावी गेल्यास आपल्या कामाची सोय दुसऱ्याकडे सोपऊन जात असत. या प्रथेमध्ये जातीय विषयमता –भेद असूनही जाती–जातीत आपुलकीचे सहकार्याचे (गरज म्हणून) संबंध होते.

**३) वंशानुगत व्यवसाय –** यजमान कुह, परजन कुळ यातील संबंध (व्यावसायिक) पिढ्यानपिढ्या (वंशपरंपरेने) चालत आलेले असत. पित्याचे कार्य ुलाला आणि ज्याचे काम वडिलांनी केले त्याच्या मुलाचे काम करावे लागत असते त्यामुळे व्यवसायात सुधारणा होत नसे आणि अधिक उत्पन्न ही मिळत नसे.

**४) पारंपरिक मोबदला –** सेवा करणाऱ्याला धान्याच्या स्वरूपात अत्यल्प माबदला मिळत असते. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र बदलून रोख रकमेच्या स्वरूपात सेवा असे सूत्र प्रचलित झाल्याने व्यावसायिक विविधता आणि दर्जात परिवर्तन झाल्याचे दिसून येते.

**५) समाधानाची भावना –** पारंपरिक व्यवसाय पद्धतीमध्ये व्यक्ती यजमानाने दिलेल्या सेवेच्या बदल्यात धान्य, कपडे, वस्तू इतयादीमध्ये समाधान मानत असे. उदरनिर्वाहाचा प्रश्न त्यामुळे सुटत असे.

**६) उदग्र संबंध** (Vertual Relations) – उदग्र म्हणजे उच्चनिच किंवा श्रेष्ठ कनिष्ठ संबंधावर आधारित असतात. यामध्ये प्रत्येक जातीचा व्यवसाय वेगवेगहा असल्याने एक

दुसऱ्यास त्याची गरज असते व तो त्याची गरज पूर्ण करताना आपल्या दजाप्रमाणे करत असतो. उदा. सुताराच काम नाव्ही तर नाव्ह्याचे काम कुंभार करतो. तसेच ब्राह्मण या सर्वांचे पुरोहित करतो तर त्याची कामे इतर लोक करतात.

**७) परस्पर कर्तव्य व अधिकार भावना –** एखादा यजमान आपल्या सेवकाकडून अधिकाराने काम करून घेऊ शकतो, पण त्याचबरोबर त्या सेवकाला माबदला देण्याचे आपले कर्तव्य आहे. त्याचबरोबर त्याच्या अडचणीच्या वेळी त्याला मदत करणे हेही कर्तव्य समजतो.

**८) मोबदल्यात भेद –** बलुतेदारांच्या कार्याचा/मेहनतीचा मोबदला एकसारखा असत नाही. त्यामध्ये अतयंत महत्वाचे काम असणाऱ्या तसेच पहिल्या ओळीतील बलुतेदारांना अधिक त्यापेक्षा कमी दुसऱ्या–तिसऱ्या ओळीतील बलुतेदारांना दिल्या जात असे. तसेच मोठे शेतकरी व छोटे शेतकरी यांच्या देण्यात ही फरक असे.

**बलुतेदारी पद्धतीचे दोष/तोटे**

या पद्धतीने या देशातील बहुसंख्यांकाचे अल्पसंख्यांकानी आर्थिक, मानसिक, सांस्कृतीक आणि शारीरिक प्रचंड प्रमाणात शोषण केल्याचे दिसून येते.

**१) सेवक वर्ग निम्न जातीचे शोषण –** या व्यवस्थेमुळे वरिष्ठ वर्ग कनिष्ठ जातीचे शोषण करत असत. परजन किंवा सेव कवर्ग सर्वच बाबतीत दुर्बल असत. त्याच्या दारिद्र्याचा फायदा जमीनदार, श्रीमंत जातीचे लोक घेत. तसेच त्याची आर्थिक, सांस्कृतीक आणि कुठलीही प्रगती होणार नाही याची काळजी घेतली जात असे. म्हणजे या वर्गाची दारिद्र्याकडून दारिद्र्याकडे वाटचाल असा क्रम होता.

**२) गुलामी वृत्ती वाढ –** या व्यवस्थेमध्ये शुद्र व अतिशुद्र वर्ग वरिष्ठांचे दास बनलेले असत. बलुतेदारी व्यवस्था ही वंशपरंपरेने चालत आल्यामुळे या जातीत आपला जन्म फक्त सेवा करण्यासाठीच झाला आहे अशी मानसिकता तयार केली जात असे. त्यातून बाहेर येण्याचा मार्गही नेस तसेच धाार्मिक ग्रंथातूनही कशीच शिकवण दिली जात असे. उदा. ठेविले अनंत तैसिची राहावे चित्ती असावे समाधान. यामुळे गुलामी वृत्ती वाढच होत असे.

**३) गतिशीलतेला बाधक –** प्रत्येक जातीचा व्यवसाय ठरलेला असे, त्याची कार्य स्वरूप, मोबदला हेही निश्चित होते. त्यामुळे सेवक किंवा कारागिरामध्ये नवीन स्वरुपाचे काम करण्याची जिज्ञान उतर नसे.तसेच नवीन व्यवसायही करू शकत नसे. प्रगतीही करू श्कात नसे. त्यामुळे ग्रामीण समुदायातील मोठ्या वर्गाची गतिशीलता थांबवली व प्रगती होऊ शकली नाही.

**४) व्यक्तिस्वातंत्र्यावर बंदी –** बलुतेदारी व्यवस्थेत सेवक वर्गाला पिढ्यानंपढ्यिा फक्त सेवाच करावी लागत असे. ग्रामीण समाजरचनेत एक प्रकारची सक्तीच होती. तसे न केल्यास विविध प्रकारच्या शिक्षा धार्मिक ग्रंथातून व प्रत्यक्ष दिल्या जात असत. त्यामुहे सेवक वर्गाची इच्छा असो वा नसो त्याला त्या प्रकारची सर्व काम करावीच लागत असत.

**५) आर्थिक विकासाला बाधक –** बलुतेदारी व्यवस्थेमध्ये कोणी काणती सेवा (कामे) करावीत हे निश्चित होते. त्याचबरोबर कामाचा मोबदला किती मिळणार हेही

निश्चित असल्याने सेवक वर्गाचा कामाचा उत्साह राहत नसे. त्यात प्रगती/विकास करण्याची वृत्ती मरत असे. काम आणि कामचा मोबदला नश्चित असल्याने नवे काम, नवा उद्योग करण्यात प्रयत्न कोणीही करण्याचा प्रयत्न करत नसे. त्यामुळे ही व्यवस्था आर्थिक विकासाला चालना देऊ शकली नाही.

थोडक्यात पारंपरिक व्यवसाय संरचनेमध्ये कोणत्याही प्रकारचे परिवर्तन करण्याचे धाडस होत नव्हते. स्वातंत्र्योत्तर काळात व्यक्ती स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य, कायद्याचे राज्य, एकव्यक्ती एकमत अशी विविध मूल्ये भारतीय संविधानाने दिल्यामुहे व्यवसाय संरचना औद्योगिक प्रधान होऊन शहरीकरणात प्रचंड वाढ झाली, कोणी कोणताही व्यवसाय करू लागला.

## २.६ विज्ञान आणि तंत्रज्ञान (Science and Technology) -

आजच्या युगामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान सामाजिक परिवर्तनात महत्वपूर्ण घटक आहे. आपासून पाचशे वर्षे जे परिवर्तन णाले त्या पाठीमागे विज्ञान आणि तंत्रज्ञान आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, विज्ञान क्षेत्रात होत असलेली प्रगती विविध अविष्कारांना जन्म देत आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात यांत्रिकरण व त्यामुळे मोठ्या प्रमाणात परिवर्तन होऊन उत्पादन प्रणाली बदलली. त्यामुळे सामाजिक संबंध, परिस्थिती, भूमिका, सामाजिक व्यवस्था आणि सामाजिक संरचनांमध्ये परिवर्तन झालेले आहे. तसेच रेडिओ, टेलीव्हिजन, सिनेमा यातायात आणि संचारमाध्यमे, वीज, अनुशक्ती इत्यादी अविष्कारामुळे जीवनातील विविध क्षेत्रात महत्वपूर्ण परिवर्तन घडवून आणण्यास मोठे योगदान दिलेले आहे. त्यामुळे मानवी जीवनातसुख सुविधांमध्ये वाढ झाली परंतु काही समस्याही वाढलेल्या दिसून येतात. ज्या ठिकाणी नागरिकरणांत वाढ झाली. रोजगार समस्या, नागरी सुविधांवर ताण, झोपडपट्टी, अति गर्दी, खून, बलात्कार, चोरी, गुंडागर्दी, वेश्याव्यवसाय इत्यादी असंख्य समस्याही याचेच देणं आहे. नागरीकरणामुळे जातीव्यवस्था, जजमाती पद्धती, स्पृश्य-अस्पृश्य, जातीय भेदाभेद, स्त्री-स्वातंत्र्य इतयादी बाबतीत मोठ्या प्रमाणात परिवत्रन झालेले दिसून येते.

### तंत्रज्ञान काय आहे (What is Techonology) -

तंत्रज्ञान अंतर्गत भौतिक विकासास सहाय्य करत आपले उद्दिष्ट प्रापत करते. तंत्रज्ञानाचे तात्पर्य आधुनिक युयागत तीव्र गतीने यांत्रिकीकरण करणे असे नाही तर तंत्रज्ञान प्रत्येक कालखंडात (युगात) समाजात आलेले आहे. त्यामध्ये साधा समाज, जटील समाज, सभ्य समाज किंवा असभ्य समाज तसेच परंपरागत किंवा आधुनिक समाज या सर्व कालखंडात तंत्रज्ञानाने आपली प्रगती केलेली आहे.

तंत्रज्ञानाविकायी काही विचारवंतांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. त्याचा आढावा घेतल्यास तंत्राानाविषयीची व्याप्ती अधिक विस्ताराने लक्षात येईल.

**१) कार्ल मार्क्स –** तंत्रज्ञानाचा अर्थ स्पष्ट करताना म्हणतात की, तंत्रज्ञानाच्या बरोबर मनुष्य व्यवहार आणि उत्पादाची प्रक्रिया बदलत राहतो त्यामुळे मनुष्य जिवंत राहतो आणि आपले सामाजिक आणि मानसिक संबंधाचे स्वरूप निश्चित करतो.

२) प्रो. सरन – तंत्रज्ञानाची व्याख्या करताना म्हणतात की, कोणताही उद्देश किंवा उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष उच्च श्रेणीच्या साधनांची व्यवस्था म्हणजे तंत्रज्ञान होय.

३) पियर यांच्यामते, तंत्रज्ञानाचा अर्थ अशा पद्धती, ज्ञान आणि दक्षता यांना सहायने मनुष्य भोतिक आणि जैविक तश्यांना नियंत्रीत करून उपयोगात आणले जाते.

वरील विचारवंतांना तंत्रज्ञानाची परिभाषा/व्याख्या स्पष्ट केल्यानंतर तंत्राान आणि सामाजिक परिवर्तन या घटकांकडे वळू या.

**तंत्रज्ञान आणि सामाजिक परिवर्तन** (Technology and Cocial Change) –

तंत्रज्ञान किंवा तंत्रज्ञानात्मक कारण आणि सामाजिक परिवर्तन यात घनिष्ठ संबंध आहे. वर्तमानकाळात विविध समाजामध्ये गतीने होणारे परितर्वनाचे मूळ करण नववीन संधोशन उत्पादनाची नवीन साधने ही आहेत. याविषयी मैक आयवर आणि पेज म्हणतात की, आमच्या काळातील  महत्वपूर्ण घटना भांडवलवाद नाही; परंतु यांत्रिकीकरण आहे. त्याचा भांडवलवाद हे एक उपकळ आहे. आज यांत्रिकीकरणामुळे आमच्या जीवन पद्धती, विचारांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेले आहेते. तसेच सामाजिक संबंध,दर्जा आणि भूमिकांमध्ये सर्वांगीण पद्धतीत सामाजिक संरचनेला बदलण्यात महत्वूपर्ण योगदान दिलेले आहे. या ठिकाणी आपण विज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक परिवर्तन यातील संबंधावर विचार करू या.

**१) यांत्रिकीकरण आणि सामाजिक परितर्वन –** आज आणि विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात संशोधनास विशेष महत्तव आहे. वर्तमानात प्रेस, जहाज, विमान, मोटारकार, ट्रॅक्टर, टेलिफोन, टेलीविजन, रेडिओ, वीज, कॉम्प्युटर, गनपाऊडर, अणुबाँब इत्यादींच्या संशोधनाने जीवनात विविध प्रकारचे परिवर्तन घउवून आलेले आहे. याविषयी मैकाइवर म्हणतात वाफेवरील इंजनाच्या शोधाने मानवाचे सामाजिक, राजकीय जीवन एवऐ प्रभावित केले की जेवढे स्वयं त्याच्या  संशोधकांनीही केलेली नव्हती.

**२) यांत्रिकीकरण आणि सामाजिक मूल्यांत परिवर्तन –** यांत्रिकीकरणाने सामाजिक मूल्यांमध्ये परिवर्तन करणसाठी योगदान दिले. सामाजिक मूल्यांच्या मानवी जीवनात विशेष महत्त्व असते. कारण त्यार आधारीत व्यवहार वर्तन असत. वर्तमानात व्यक्तिगत संपत्ती आणि शक्तीचे महत्तव वाएलेले आहे. सामुहिकतोच मूल्य कमजोर झालेले आहे. आज धन आणि राजकीय शक्तीचा वाढलेला प्रभाव आणि महत्त्व यावर समाजामध्ये मान, प्रतिष्ठा दिली जात आहे. मोठे व्यापारी, उद्योगपती, राजकीय नेता, उच्च पदस्थ अधिकारी इत्यादी होत. आज चारित्र्यवानांना इतके महत्त्व दिले जात नाही. आज स्वार्थ, सिद्धी यांना मोठ्या प्रमाणात महत्त्व दिले जात आहे. आज स्वार्थ सिद्धी यांना मोठ्या प्रमाणात महत्त्व दिले जात आहे. याप्रकारे सामाजिक मूल्यांत परिवर्तन होत आहे.

**३) प्रसार माध्यम आणि सामाजिक परिवर्तन –** प्रसार माध्यमे त्यांच्यातील विविध प्रकारचे संशोधन, विकास विविध गुंतागुंतीच्या सामाजिक परितर्वनास जन्म दिला आहे. प्रसाराची अनेक प्रकार ज्यामध्ये तर टेलीफोन, रेडिओ, टेलिव्हिजन, वृत्तपत्रे इत्यादी प्रमुख आहेत. प्रसार ही सामाजिक संबंधावर आधारित आहे. जोपर्यंत व्यक्ती–व्यक्तीमध्ये प्रसार

होणार नाही तोपर्यंत सामाजिक संबंध स्थापन करणे शक्य नाही. सिनेमा, बोलपट यामुळे लोकांचे विचार, विश्वास आणि मानसिकता याला बदलण्यात मोठे योगदान आहे. त्याचबरोबर कौटुंबिक,सामाजिक आणि जातीय संबंधही प्रभावित केले आहेत. रेडिओ, टेलिव्हिजन यामुळे मनोरंजनाबरोबरच समाजात परिवर्तनही होते. या साधनामुळे ग्रामीण, आदिम आणि शहरी संसकृतीला एकत्र आणण्याचे महत्वूपर्ण योगदान आहे.

**४) कृषिक्षेत्रातील संशोधन आणि सामाजिक परिवर्तन –** भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान मानली जाते. भारतातील ८० लोक संख्या आजही कृषी आणि कृषी पूरक व्यवसायाशी निगडीत आहे. याच कृषिमध्ये तंत्राज्ञानामुळे संकरीत, पशु, बी–बियाणे, ट्रॅक्टर, रासायनिक खत, आणखी विविध यंत्रे जसे मळणीयंत्र, हार्वेस्टर, इत्यादीमुळे कृषी उत्पादनात वाढ, गुणवत्ता, बाजारपेइ, सिंचनव्यवस्था, इत्यादी घटष्कांत परिवर्तन झाल्याने सामूहिकतेचे महत्त्व कमी झाल. सहकार्याची भावना लोप पावली. व्यक्तीच्या गरजा कमी झाल्या त्यामुहे ग्रामीण समाज जीवनावर विविध प्रकारे भाव पडलेला दिसून येतो.

**५) उत्पादन प्रणाली आणि सामाजिक परिवर्तन –** तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे उत्पादन प्रणालीत अमूलाग्र परिवर्तन झाले. ज्यामुळे वेळोवेळी सामाजिक संबंध आणि सामाजिक संरचना यामध्ये परिवर्तन झाले. पहिले कोणतीही कृषियंत्रे नव्हती त्यामुळे उत्पादनासाठी अधिक मनुष्यांची आवश्यकता होती. त्यामुळे सामाजिक संबंध जिव्हाळ्याचे होते. परंतु यांत्रीकरणामुळे कमी व्यक्ती यंत्राच्या सहाय्याने कृषि, मशागत, मळणी, पेरणी, काढणी, इत्यादी करता येत असल्याने सामाजिक संबंधात दुरावा वाढत चाललेला आहे. तसेचसामुदायिक कार्यक्रम, विवाह, कुटुंब, जातीय संबंध यामध्येही मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाल्याचे आढळून येते. हा यांत्रिकीकरण, विज्ञान, संशोधनाचा परिणाम आहे.

**६) अणुशक्तीवर नियंत्रण आणि सामाजिक परिवर्तन** (Control over Atomic)– मानवी गरजांच्या पूर्ततेसाठी अणुशक्तीचा वापर हे सर्वात मोठे युग परिवर्तन आहे. आधुनिक विज्ञानातील विविध संशोधनाप्रमाणे अणुशक्तीचा प्रयोग ही रचनात्मक आणि विनाशात्मक दोन्हीप्रकारे कार्ये करू शकते. याविशयी मैकाइवर आणि पेज म्हणतात की, युद्धाचे प्रमुख स्त्रोत मानवी रचना आणि कृतींना समाप्त करण्याची पूर्व सूचना देत आहे. यावरून आणुशक्तीचा शोध हे दुधारी शस्त्र आहे. परंतु ज्याने त्याने त्याच्या वापरावर अवलंबून आह. त्यामुळे जागतीक स्तरावरील, सामाजिक, वातावरण ढवळून निघाले आहे. उदा. इराक–अमेरिकासंबंध, दक्षिण कोरिया, उत्तर कोरिया, अमेरिका, जपान, भाप, चीन या देशातील संबंध सतत संशयास्पद दिसून येतात.

**विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा समाजावरील प्रभाव**

(Effect of Science and Technology on Society) - विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विविध क्षेत्रावर परिणाम झालेला आहे. यामध्ये काही प्रभाव प्रत्यय तर काही क्षेत्रावर अप्रत्यक्ष परिणाम झालेला आहे असे मानले जाते. प्रत्यक्ष प्रभाव तंत्रज्ञात्मक परिवर्तन अनिवार्य आणि शिघ्र गतीने सामाजिक परिवर्तन होते. अप्रत्यक्ष प्रभाव समाजात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच फलस्वरूप अप्रत्यक्ष परिवर्तन घडवून आणते. तयाचा प्रभाव खालील घटकांवर होतो त्याचा आढावा आपण पुढीलप्रमाणे घेऊ या.

**१) श्रमविभाजन आणि कार्याचे विशेषीकरण –** विज्ञान आणि तंत्रज्ञानातील परिवर्तनाचे फलस्वरूप उत्पादन वाढवण्यासाठी मोठ–मोठाले कारखाने यांत मोठ्या प्रमाणात श्रमविभाजन आणि कार्याचे विशेषीकरण वाढत चालले. यात अलग अलक व्यक्तींना अलग अलग प्रकारची कार्य करावी लागतात. त्यासाठी योग्य प्रशिक्षण ही आवश्यक असते ही एक वेळखाऊ प्रक्रिया असली तरी विशेष ामाचे ज्ञान असेल तर दर्जेदार काम करतात आणि उत्पादन वाढते.

**२) श्रमिक संघटनांची निर्मिती –** उत्पादन क्षेत्रातील नवीन नियमावलीने काम करण्यापूर्वी कोणताही श्रमसमस्या नव्हती. कारण कामगार आपल्या घरीच काम करत आणि वस्तुंची निर्मिती करत. आता कारखान्यात मोठमोठ्या मशिनच्या साहाय्याने काम केले जाते. परिणामी कामगाराचे रूप बदलले आणि कामचे तास, वेतन, कार्याची दिशा (स्वरूप) इत्यादी निश्चित केले गेले. कारखाना मालक आपला नफा वाएविण्यासाठी कामगारांकडून अधिक काम आणि कमी वेतन देण्याचा प्रयत्न करू लागला तेव्हा कामगार संघटना आपल्या मागण्या आणि शोषणाच्या विरोधात कामगार संघटना निर्माण झाल्या. त्यामुळे कामगारांची नौकरीची हमी, वेतन वाढ, बोनस, कामाचे तास इत्यादी मागण्या मालकाकडन पूर्ण करून घेतात.

**३) नागरीकरण –** जेव्हा उत्पादन कारखान्यातून होऊ लागली तेव्हा खेड्यातील लोक कारखान्यात कामाच्या निमित्ताने शहराकडे स्थलांतर करू लागले. कारण त्यांचे हसत उद्योग बंद पडले. शहरीकरणाचे आकर्षण वाढले आणि शहरातच स्थायिक होणाऱ्यांचे प्रमाण वाढले. ग्रामीण भाग ओस पडला आणि शहरे बकाल वाढली. त्याचा परिणाम शहरात झोपडपट्टी, अती गर्दी, गुन्हेगारी, गुंडगिरी, वेश्या व्यवसाय, अत्याचार यासारख्या समस्यांत मोठ्या प्रमाणात वाढ ही औद्योगिकरण, तंत्रज्ञान इत्यादींचा परिणाम म्हणजे नागरिकरणात झपाट्याने वाढ होणे होय. त्यामुळे सामाजिक परिवर्तन ही योग्य प्रमाणात होत आहे.

**४) गतिशिलतेते वाढ –** विज्ञान आणि तंत्रज्ञानातील विकासामुळे ग्रामीण–शहरी समुदायातील अंतर कमी होऊन जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था यातील सामाजिक, आर्थिक, व्यवहारीक आंतर (विषमता) कमी होऊन सामाजिक गतिशिलतेत वाए झाली. स्थानिक गतीशिलता म्हणजे एका ठिकाणावरून सामाजिक गतिशिलतेत वाढ झाली. स्थानिक गतिशलता म्हणजे एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत होणे आणि सामाजिक गतिशिलता म्हणजे एका सामाजिक दर्जातून दुसरा सामाजिक दर्जा प्राप्त करणे होय. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे प्रत्येक व्यक्तीच्या सामाजिक दर्जात परिवर्तन झालेले आहे.

**५) सामाजिक संबंधात परिवर्तन –** विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा परिणाम व्यक्ती व्यक्तीतील सामाजिक संबंधात मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाले. यामध्ये कौटुंबिक, सामाजिक आणि आर्थिक संबंधात परिवर्तन होऊन गुंतागुंत वाढली.यामध्ये पहिले कुटुंबातील वयस्क व्यक्तीला मानपान होता. आज त्यांच्या मताला कुटुंबात किंमत राहिलेली नाही. शिक्षण विशिष्ट कुटुंबातील मुलांनाच होते. आज सार्वत्रिकरण झाल्याने तसेच मनोरंजनाच्या साधनांचा प्रभावही व्यक्ती व्यक्तीतील सामाजिकसंबंधावर प्रभाव पाडताना दिसून यतो. त्यामुळे वर्तमानकाळात अनौपचारिक संबंधापेक्षा कार्यात्मक, अप्रत्यक्ष आणि औद्योगिक संबंध अधिक वाढत चालले आहेत.

**६) ग्रामीण भागात नागरी वैशिष्ट्यांचा प्रभाव –** सर्वाधिक मानव दोन प्रकारच्या समुदायात वास्तव्य करतो. यात ग्रामीण समुदाय आणि नागरी समुदाय होय. या दोन्ही समुदायाचे राहणीमान, खानपान, संस्कृती, उत्सव, घरांची रचना, व्यवसाय, उत्पादन, सामाजिक दर्जा इत्यादी भिन्न प्रकारचे होत. मात्र, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासामुळे शहरीकरणाची छाप ग्रामीण भागावर पडली आणि शहरातील प्रत्येक बाबतीत ग्रामीण भागातही प्रसार होऊन शहरी आणि ग्रामीण अंतर हळूहळू कमी होत आहे.

**सामाजिक नियंत्रणावर विज्ञानाचे योगदान** (Contribution of Science in social control) –सामाजिक नियंत्रणाद्वारे व्यक्तीच्या व्यवहारावर समाजाच्या माध्यमातून तसेच प्रतिकातून नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. याविषयी लौण्डिस यांच्या शब्दात सामाजिक नियंत्रण एक प्रक्रिया आहे जिच्याद्वारे सामाजिक व्यवस्था निर्माण केली जाते.

काही समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक यिंत्रणाला दोन भागात विभागले. त्यामध्ये १) औपचारिक सामाजिक नियंत्रण आणि २) अनौपचारीक सामाजिक नियंत्रण, औपचारीक सामाजिक नियंत्रण हे राज्यसरकार हे काही औपचारीक संस्थाद्वारे आपल्या राज्यातील लोकांवर नियंत्रण करत असते. उदा. पोलीस यंत्रणा, न्यायपालिका यांचे निर्णय बंधनकारक असतात तर अनौपचारिक सामाजिक नियंत्रण समाजातील लोकरिती, प्रथा, परंपरा, रुढी, आदर्श प्रतिमांना अनुसरून नियंत्रण मिळवले जाते.

आजच्या विज्ञान युगात सामाजिक ठेवणे ही राज्याची महत्त्वूपर्ण भूमिका आहे. राज्य शिक्षणाच्या माध्यमातून लोकांना सांस्कृतिक प्रथा, परंपरा शिकवते तसेच ज्ञान–विज्ञानाचे प्रशिक्षण देऊन व्यक्तीला समाजउपयोगी सदस्य बनविते आणि आपत्ती उपजिविका करण्यासाठी साधनांची निर्मिती करण्यास सक्षम बनवते. याप्रकारे त्याचे सामाजिकरण घडवण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. आजच्या काळात व्यक्तींवर नियंत्रण मिळविण्यासाठी विविध साधने उपलब्ध आहेत. त्यामध्ये वृत्तपत्रे, साहित्य, टेलिव्हिजन, रेडिओ, सिनेमा, मेळावे इत्यादींच्यामाध्यमातून समाजातील क्ल्युप्त्या जसे हुंडापद्धती, बालविवाह, अस्पृश्यता, विधवा विवाह निषेध इत्यादींवरील विश्वास उठवून सामाजिक विचारवंत, नेते, महापुरुषांचे विचार लोकांच्या मनावर बिंबवणे आणि प्रसार केला जाते. त्यासाठी विज्ञान तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष निश्चित फायदा होऊन समाजात परितर्वन घडवून येतो.

## २.७ नागरीकरण (Urbarization)

प्रस्तावना – नगाला मानवी सभ्यतेचे केंद्र मानल जाते. सभ्यतेच्या संदर्भात नागरी क्रांती इतकी महत्त्वपूर्ण आहे की, जसी औद्योगिक क्रांती महत्त्वपूर्ण आहे.सद्य स्थितीतीला आमूलाग्र परिवर्तनासंबंधीत नागरीकरण महत्त्वाचे आहे. नागरीकरण एक प्रक्रिया आहे असे म्हटले तर अयोग्य नाही. कारण विकासाच्या संदर्भातून पाहिले तर सतत विकसित होणारी प्रक्रिया आहे. नागरीकरणाला सर्वात जास्त प्रेरणादायक कारण म्हणून आज औद्योगिकरणाकडे पाहिले जाते. नागरीकरणाच्या वाढीला अनेक कारणे कारणीभूत आहेत. सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भातून नागरीकरणाला व औद्योगिकरणाला चालक मानले जाते. वाढत्या नागरीकरणातून समाजातील लोकांना मिळणाऱ्या सुविधा सतत वाढत आहेत. नागरीकरणाला लोकसंख्या व औद्योगिकरण जसे हातभार लावतात तसे ते परिणामही कारक आहेत. वाढत्या नागरीकरणामुळे अनेक समस्याही निर्माण होतात.

प्रत्येक नगराला इतिहास आहे. नागरीकरण हा शब्द समजून घेण्याअगोदर नगर शब्दाचा अर्थ पाहणे आवश्यक आहे. सामाजिक जीवनाच्या संघटनात्मक स्वरपात ग्रामीण व नागरी समाजाचे महत्त्वाचे स्थान आहे. आजमितीला तर वाढत्या नागरिकणाचा परिणाम इतका वाढला आहे की, ग्रामीण-नागरी असा स्पष्ट भेद करणे ही अवघड झाले आहे. नगराची परिभाषा विविध राष्ट्रांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची आहे. नागरीय समुदाय, नगरीय क्षेत्र व नगर/शहर हे परस्पर पर्यायाचीशब्द वापरले जातात. त्याची सर्वसामान्य परिभाषा देणे कठीण आहे. लोकसंख्येच्या आकाराचा विचार करता विविध राष्ट्रांमध्ये विविधता दिसून येते. उदा. ग्रीनलँडमध्ये ३००, अर्जेण्टिना - १०००, भारत -५०००, इटली वस्पेन - १००००, अमेरिका २०००० आणि कोरिया गणराज्य - ४०००० लोकांच्या वसाहतीला नगर मानले जाते. नगराच्या क्षेत्राच्या विषयाच्या संदर्भात भिन्न भिन्न विचार मानले जातात. उदा. हंगेरीमध्ये शेती क्षेत्राला अधिक मानले जाते. लॅटिन अमेरिकेत म्यूनिसिपालिटी असणाऱ्या ठिकाणाला नगर म्हटले जाते. भारतात रोजगार अधिक कृषि शिवाय असणाऱ्या ठिकाणाला मानले जातात.

अनेक विद्वानांनी नगराची परिभाशा लोकसंख्या आकार व घनता लक्षात घेऊन करण्याचा प्रयत्न केलेला आहे; परंतु फिठस्ले डेव्हिस हे यांना सहमत नाहीत तर त्यांच्या मते सामाजिक दृष्टीकोनातून नगर आणि एक जीवन विधी आहे. अर्थातच नागरी वातावरणाची देण मानली जाते. त्यांच्या मते नगर एक असा समुदाय आहे ज्यामध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय विषमता दिसून यते आणि कृत्रिमता, वयक्तीवादताख स्पर्धात्मकता व दाट लोकसंख्या असल्यामुळे नियंत्रणासाठी औपचारिक साधनाच्या साहाय्याने संगठीत केले जाते.

**नागरिकरण म्हणजे काय?**

नागरीकरण ही एक प्रक्रिया असून, प्रत्येक नगराच्या नागरीकरणाचा वेग मात्र भिन्नभिन्न असतो. एकाच राष्ट्रातील, प्रांतातील नागरीकरणाचा वेग प्रत्येक नगरात सारखा नसतो. तर त्यात कमी-जासत वेग असतो. त्याला अनेक कारणे कारणीभूत आहेत. अर्थात प्रत्येक नगरांच्या वा शहराच्या नागरीकरणाला एकच घटक सर्वत्र सारखाच असतो असे नाही तर धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, प्रेक्षणीय, औद्योगिकरण इत्यादीमुळे नगराच्या वाढत्या नागरीकरणाला प्रवृत्त केले जाते. आजमितीला नागरीकरणाच्या कलाचा विचार केला तर भारताचे नागरीकरण विकसित राष्ट्रांच्या तुलनत २/३ महिने कमी आहे. त्यामुळे भारताचा आर्थिक, सामाजिक व राजकीय विकाससुद्धा कमी झाला आहे.

भारताच्या नागरीकरणाला इतिहास लाभलेला आहे. परंतु  भारतास जी नागरीकरणाची संस्कृती लाभली तिची पायमल्ली मुघल व इंग्रजांनी केलेली दिसून येते. इंग्रजांच्या काळातील भारताचे जे नागरीकरण झाले ते स्वार्थी दृष्टीकोनातून झालेले दिसून येते. स्वातंत्र्यानंतर हळूहळू उद्योगधंदे वाढले. परंपरागत रोजगाराची जागा आधुनिक उद्योगांनी घेतली. रोजगाराचया संधी उपलबध झाल्या आणि खऱ्या अर्थाने नागरीकरणाला सुरुवात झाली.

सद्यस्थितीला ग्रामीण भागातून नगरकडे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. कारण नगरात रोजगाराची १००% हमी दिसत आहे. कारण ग्रामीण भागात रोजगार कमी झाल्याने बेकारी व बेरोजगारी, शिक्षणाचा अभाव, नगरातील सोयीसुविधा इत्यादीमुळे लोकांचा कल

नगराकडे वाएला व त्यातून नागरीकरण अधिकच होत आहे. वाढत्या नागरीकरणामुळे आज अनेक नगरांनी आसपासची खेडे विलीन झाली. उदा. औरंगाबाद शहरात वाळूज, पंढरपूर, चिखलठाण, पडेगाव, मुकुंदमादुके देवळी, गोदळी, कुंभेफळ इत्यादी गावे विलीन झाले.

**नागरीकरण ओळखण्यासाठीचे निष्कर्ष**

युनायटेड नेशन्सने नागरीकरणचे प्रमुख सात निष्कर्ष खालीप्रमाणे सांगितले आहेत.

**१) लोकसंख्या आकार व घनता –** नागरिकरणाच्या संदर्भात लोकसंख्या आकार व घनता यांचा विचार करता ग्रीनलँड – ३००, डेन्मार्क – २००, आईसलँड – ३००, न्यूझीलँड – १५००, फ्रानस – २४००, जपान – ३0000 व भारत ५000 लोकसंख्या असलेल्या ठिकाणाला नगर/शहर मानले जाते. घनतेच्या संदर्भात दर चौरस किलोमीटर क्षेत्रात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण म्हणजे घनता होय. नगरात दर चौ. कि. मी. क्षेत्रात किमान ४00 लोक असणे आवश्यक आहे.

**२) आर्थिक कार्य –** नागरीकरणात असणाऱ्या लोकांच्या व्यवसायात त्या त्या राष्ट्राने ठरवलेले क्षेत्र अधिक असणे आवश्यक आहे. उदा. ग्रीनलँडमध्ये शेती करणारे अधिक असणे आवश्यक आहे. तर भारतात मात्र शेतीशिवाय ७५ लोकांचा व्यवसाय इतर असणे आवश्यक आहे. अर्थात नगरात राहणाऱ्या २५% लोकांचा व्यवसाय शेती असावा व इतर ७५% लोकांचा इतर व्यवसय असणे गरजेचे आहे.

**३) सामाजिक विविधता –** नागरी भागात विविध जाती व धर्माचे, विविध भाषा बोलणारे लोक राहतात. ग्रामीण भागापमाणे नागरीभागात अस्पृश्यता पाळली जात नाही. नगारी संसकृती ग्रामीण संस्कृतीपेक्षा सापेक्षता, वेगळी असते. उदा. फॅशन्स, रहण–सहन, खानपान, सोयी–सुविधा इत्यादींमध्ये फरक जाणवतो.

**४) नगररचना (शहराची रचना) –** नगरामध्ये घरांची व्यावसायिक बाजारपेठ, रस्ते, मोकळ्या जागा इत्यादीचे नियोजन केले जाते. रस्त्यामध्ये पादचाऱ्यासाठी जड वाहनांसाठी, रस्ते विभाजक, शासकीय कार्यालय, सार्वजनिक ठिकाण, न्यायव्यवस्था, औपचारिक संरक्षण, दवाखाने, सांडपाण्याच्य नाळ्या, कचराकुंडी, साफसफाई इत्यादी व्यवस्थितपणा असतो.

**५) कार्यात्मक निकष –** शहरात/नगरात व्यापारात्मक कार्य करणारा मोठा वर्ग असतो. नगरात दररोज बाजार व बाजारपेठ कार्यरत असतात. जीवन आवश्यक सर्व वसतु व सेवा तात्काळ उपलब्ध होतात.

**६) शासकीय प्रदेश –** नगरात आसपासच्या सर्व खेड्यासाठीची शासकीय कार्यालये एकत्र बसलेले असतात. तालुका, जिल्हा, विभागीय कार्यालय, राजधानी इत्यादी नगरात बँक, पतसंस्था, हॉटेल, लॉजींग–बोर्डींग इत्यादी असतात.

**७) स्थानिक शासन –** ज्या प्रदेशात एक विशिष्अ स्वायत्ता शासनप्रणाली असे त्यांना शहर म्हणतात. उदा. नगरपालिका, महानगरपालिका

**८) इतर निकष** – १) अन्नधान्य बाबतीत नागरी लोक ग्रामीण क्षेत्रावर अवलंबून असतात.

२) नगर हे त्या क्षेत्रातील वाहतुकींचे केंद्र असते.

३) नगराची विशिष्ट अशी रचना ग्रामीण भागापेक्षा भिन्न असते.

४) प्रत्येक शहराला एक खेड्यातून वा गावातून लाभलेला इतिहासाचा वारसा असावा.

*** जे. सी. मिखेल ग्रॅण्डब्रेस –** नागरिकरण ही अशी प्रक्रिया आहे की, ज्यामुळे शेती क्षेत्राकडून बिगरशेती कामगारांना आकर्षित केले जाते. नवीन व्यवसाय चालू करून आर्थिक व सामाजिक रचना बदलली जाते. त्याला नागरीकरण असे म्हणतात.

*** एण्डरसन आणि ईश्वरन –**लोकांचे ग्रामीण क्षेत्राकडून औद्योगिकरण क्षेत्राकउे कृषिकडून आकृषिक क्षेत्राकडे लोकांना आकर्षण करून स्थिर करणे म्हणज नागरीकरण होय.

**युनायटेड नेशन्स –** नागरीकरण ही अशी प्रक्रिया आहे की ज्यामुळे नागरी क्षेत्रातील लोकसंख्या प्रमाण वाढते. त्यामुळे सांसकृतिक, सामाजिक बदल घेऊन जीवन जगण्यात आधुनिकता येते व नगरांच्या सिमा विस्तारीत होऊन खेड्याची नगरात विभिन्नता येते त्यास नागरीकरण म्हणतात.

भारतीय जनगणनेनुसार नगर या संज्ञेत तीन गोष्टी अंतभूत केल्या आहेत.

१) नगरपालिका असणारी लोकसंख्या

२) नगरपालिकांच्या हद्दीत असलेला सर्व सिव्हिल लाईन

३) ५००० पेक्षा जास्त व्यक्तंची कायम वस्ती असलेले कोणतेही ठिकाण.

उपरोक्त व्याख्येमध्ये लोकसंख्या हा महत्त्वाचा निकष नसून शासकीय विभाग हा मुख्य विषय आहे. उदा. छावणी, वसाहती यांची लोकसंख्या ५००० पेक्षा कमी असली तरीसुद्धा त्याला शहर वा नगर म्हणतात.

भारतामध्ये अनेक संस्थांचे विलिनीकरण झाले. १९५१ पासून पंचवार्षिक योजनांना सुरुवात झाली म्हणन १९६१चया भारतीय जनगणनेनुसार वापरली. १९९१ च्या जनगणनेचे नागरीकरणाची खालील प्रमाणे काही निकष सांगितले आहेत.

१) सर्व नगरपालिका, महानगरपालिका, लष्करी छावणी यांचा समावेश शहरी/नागरी प्रदेशात होतो.

२) बाकीच्या वस्तीस्थानासाठी पुढील तीन कसोट्या पूर्ण होणे आवश्यक आहेत.

I) किमान ५००० लोकसंख्या असावी.

II) आर्थिक कार्यानुसार एकूण लोकसंख्येपैकी ७५ लोकांचा कामधंदा शेतीशिवाय इतर असावा.

III) दर चौ. कि. मी.ला ४०० व्यक्ती एवढी घनता कमीत कमी असावी.

वरील निकष ज्या वस्तीस्थानाला लागू पडतात त्याला नागरीकरण असे म्हणतात.

**भारतातील लहान मोठ्या शहरांतील नागरीकरणाची प्रकृती –**

इंग्रजांनी २०व्या शतकामध्ये जे औद्योगिकरण केले त्यात रेल्वे, दळणवळण, तंत्रज्ञान इत्यादी विकास झाला तो इंग्रजांच्या स्वार्थासाठीचा विकास झालेला आहे. परंतु प्रत्यख-अप्रत्यख या विकासाला फायदा भारताला झाला. इंग्रजांनी ज्या ठिकाणी औद्योगिकरण, व्यापारीकरण केले. त्यामुळे भारतातील ग्रामीण क्षेत्रातील लहान-लहान नगरांमधील अनेक लोक रोजगारासाठी, व्यापारासाठी, शिक्षणासाठी, उद्योगासाठी नगरांकडे आकर्षित झाले. त्याचा परिणाम म्हणून लहान लहान शहरांचे मोठ्या नगरात रूपांतर होऊन त्यांचे नागरीकरण वाढले.

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने मोठ्या नगरांमध्ये औद्योगिकरण वाढवले. अनेक प्रादेशिक कार्यालये मोठ्या नगरांमध्ये सुरू झाली. तसेच अशा नगरांमध्ये सार्वजनिक व खासगी माध्यमांनी लहान-मोठे उद्योग (कारखाने) उभारले गेले. त्याचा परिणाम म्हणून नगरांचा विस्तार सतत होत राहिला. आज अशा अनेक औद्योगिक शहरांनी जवळची खेडी विलीन झाली आहेत. परिणामी त्या क्षेत्रातील ग्रामीण बेकार व बेरोजगारांना रोजगार उपलब्ध झाले. याच कारणामुहे लहान नगरांपेक्षा मोठमोठ्या नगरांचे नागरीकरण अधिक झाले.

१९६१ च्या भारतीय जनगणनेने नागरीकरणाची व्याख्या बदलली. त्यांनी शहरांचे लोकसंख्येनुसार वर्गीकरण खालील सहा विभागात विभाजन केले.

१) 'अ' वर्ग = १,००,००० पेक्षा जासत लोकसंख्या असणारे शहरे

२) 'ब' वर्ग = ५०,००० ते ९९९.९९९ लोकसंख्या असणारे शहरे.

३) 'क' वर्ग = २०,००० ते ४९.९९९ लोकसंख्या असणारे शहरे

४) 'ड' वर्ग = १०,००० ते १९.९९९ लोकसंख्या असणारे शहरे

५) 'इ' वर्ग = ५००० ते ९९९९ लोकसंख्या असणारे शहरे

६) उ वर्ग = ५००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेली शहरे

**शहरांच्या गटांची संकल्पना**

शहरांचा गट म्हणजे एखाद्या शहराचया गाभाऱ्याभोवती अनेक उपनगरे निर्माण होणे होय. उदा. विद्यापीठ परिसर, रेल्वे स्टेशन व वस्ती, छावणी, विमानतळ, इत्यादींच्या निर्मितीमुळे त्याचया परिक्षेत्राच्या कक्षेत नगरांची होणारी अतिरिक्त वाढ.

१९५१ ते २००१ पर्यंत भारतातील नगरांची एकणू संख्या व कल दर्शवतो.

| वर्ष | नगरांची एकूणसंख्या | नागरी लोकसंख्या |
|---|---|---|
| १९५१ | २७९५ | ६१,६२९,६४६ |
| १९६१ | ३२७० | ७७,६५२,००० |
| १९७१ | २४७६ | १०६,९६६,५३४ |
| १९८१ | २२४५ | १५६,४१९,७६८ |

| | | |
|---|---|---|
| १९९१ | ३६०९ | २१२,८६७,३३७ |
| २००१ | ३७०५ | २७८,६६५,२३२ |
| २०११ | – | – |

**स्रोत** Census of India 2001

उपरोक्त तक्यावरून असे स्पष्ट होते की, स्वातत्र्यानंतर नागरी लोकसंख्येत सतत वृद्धी झालेली दिसून येते. सुरुवातीला काही काळात लोकसंख्या वृद्धीचे प्रमाण कमी आहे; परंतु १९७१ पासून वृद्धी अधिक झाल्याचे दिसून येते. नगराच्या तलुनेतही अशीच स्थिती आहे. ५० वर्षात नगराच्या संस्थेतही सुमारे २०००च्या आसपास वाढ झाल्याचे जाणवते.

**नागरीकरणाची कारणे**

१) औद्योगिकरणात झालेली वाढ व प्रगती

२) नगराकड होणारे स्थलांतर.

३) रोजगार संधीचे आकर्षण

४) नैसर्गिक लोकसंख्या वृद्धी

५) बँका व अन्य सेवा देणाऱ्या संस्था, पतसंस्था

६) शैक्षणिक क्षेत्रातील वाढत्या सुविधा वसोयी

७) राजधानी वा जिल्ह्याचे ठिकाण वा औद्योगिक शहर म्हणून त्याकडे कल.

८) जिल्ह्यांच्या ठिकाणी सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये उपलब्ध.

९) वाहतूक व दळणवळण साधनाचा विकास व सुविधा.

१०) शहरातील वातावरणाचे आकर्षण.

११) वाढत्या गरजा पुरवणारे केंद्र म्हणून आकर्षण.

१२) जातीय व धार्मिकता कमी म्हणून शहराकडे कल.

**नागरीकरणाच्या समस्या –**

१) गलिच्छ वस्तीत मोठ्या प्रमाणात वाढ.

२) घराच्या संख्येचा तुटवडा.

३) जागेचा तुटवडा.

४) व्यसनाधिनतेचे वाढते प्रमाण.

५) नितीमूल्याची कमतरता

६) प्रदूषण (हवा, पाणी, जमीन, आवाज)

७) शेती उपयोगी जमिनीचे तुकडीकरण

८) अनेक खेड्यांची अस्तित्व नष्ट

## २.८ औद्योगिकरण

औद्योगिकरण एक प्रक्रिया असून, ती आर्थिक संकल्पना आहे. घरगुती उत्पादन प्रणाली ऐवजी यंत्र आणि तंत्रज्ञानावर आधारीत उत्पादन पद्धत होय. घरगुती उत्पादनाची जागा कारखान्यांनी घेतली जाते. अशा विविध उद्योगांची उत्पादन व्यवस्था म्हणजे औद्योगिकरण होय. औद्योगिकरणामुळे उत्पादन प्रमाणात वाढ होते व त्याचा फायदा सामान्य जनतेला होतो. अर्थव्यवस्थेतील कोणताही बदल औद्योगिकरणाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. जगातील प्रत्येक देशाचा विकास हा औद्योगिकरणामुळेच झालेला दिसून येतो. डेन्मार्क व न्युझीलंड यासारख्या कृषिप्रधान देशांमध्ये व कृषि (शेती) व्यवसायाचे ही औद्योगिकरण झालेले दिसते. कारण या राष्ट्रांमध्ये शेती क्षेत्रात फार कमी मनुष्यबळ गुंतलेले आहे. येथे शेती ही यंत्रतंत्राच्या साहाय्याने केली जाते. औद्यागिक क्रांतीमुळे औद्योगिक क्षेत्रात अमूलाग्र बदल झाली. हस्तकला उद्योग बंद होऊन रोजगाराला धक्का बसला. दळणवळणाच्या व वाहतुकीच्या साधनात प्रगती झाली. व्यक्तीवादाच्या व भौतिकवादाच्या कल्पना वाढल्या. व्यक्तीनिरपेक्ष सामाजिक मूल्यात आमूलाग्र बदल झाला. त्यामुळे आर्थिक क्षेत्रातील विशेषत: उत्पादन प्रक्रियेतील परंपरागत प्राचीन पद्धती व साधनांची जागा विवेकपूर्ण विचाराने ठरविलेल्या साधनांनी घेतली. अशा रीतीने औद्योगिकरणाच्या प्रक्रियेमुळे उद्योगधंदे व समाजव्यवस्था यांच्यामध्ये अमूलाग्र बदल झाला.

आर्थिक विकासाचे प्रमुख साधन म्हणून औद्योगिकरणाचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यात आर्थिक विकास, आधुनिकता ही महत्त्वाच्या संकल्पना असून, त्यातील सुक्ष्म भेद लक्षात घेतला पाहिजे. औद्योगिकरणाची स्थिती विविध ठिकाणी भिन्न भिन्न स्वरूपाची असते. औद्योगिकरणासाठी शासनाजवळ एक निश्चित धोरण असते आवश्यक आहे. एक काळ असा होता की पूर्वेकडील सर्वच राष्ट्र औद्योगिकरणाने भारावले होते व जगाला रशियाचे वैभव दिसत होते. या रशियाच्या वैभवाचे कारण औद्योगिकरण मानले जात होते. भारतात १९व्या शतकात औद्योगिकरणाला सुरुवात झाली. इंग्रज शासन कालखंडात भारतातील औद्योगिक धोरण व अर्थव्यवस्था इंग्लंडच्या धोरणास पूरक होती. तत्कालीन भारतीय उद्योग इंग्लंडमध्ये पाठविला जाणारा कच्चा माल तयार करणारे होते. इंग्लंमधील मँचेस्टर येथील कापड गिरण्या व बर्मिगहँम या लिव्हरपूलमधील पोलाद कारखानयांना कच्चा माल पुरवणे होच उद्दिष्ट होते. मँचेस्टरमधील तयार झालेला कपडा भारतीय बाजार पेठांमध्ये विक्रीस होता. अर्थात अशा प्रकारे सर्व गरजा इंग्रजांचया मालावर आधारीत होत्या आणि त्या भारतीयांना परवडणाऱ्या वस्तू नव्हत्या म्हणून भारतीय स्वातंत्र्यवीरांनी इंग्रजांच्या मालाची होळी केली. तसेच जर्मनी व जपानसुद्धा भारतीय बाजारपेठ काबीन करण्याच्या प्रयत्नात होते. यामुळे भारतात औद्योगिकरण झाले. कलकत्ता, जमशेदपूर  व राणीराज इत्यादी शहरांमध्ये स्थानिक संपत्तीचा वापर करणाऱ्या तागाच्या गिरण्या व पोलाद कारखाने सुरू केले. मुंबई, अहमदाबाद व सोलापूर इत्यादी शहरांमध्ये कापडगिरण्या सुरू झाल्या. वाहतूक व दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध झाल्या त्यातून मोठ्या व छोट्या बाजारपेठा अस्तित्वात आल्या. एकाकी जीवन जगणारे पूर्व औद्योगिक अवस्थेत असलेले शहरे व गावेही वाहतुकीच्या साधनामुळे जोडले गेले व बाह्या जगाच्या संपर्कात येऊन प्रकाशमय झाले.

औद्योगिकीकरणामुळे पारंपारिक उपभोग्य वस्तुंच्या जागी नाविण्यपूर्व वस्तु स्वस्तामध्ये उपलब्ध करून दिल्या आहेत. पारंपारिक कारागीर हे यांत्रिकी उत्पादनाला स्पर्धा करू शकले नाहीत. त्यामुळे त्यांचा व्यवसाय बंद झाला. त्यांना व्यवसाय बंद करावा लागल्यामुळे गाव सोडून नगरामध्ये कामधंद्याकरीत स्थलांतरीत झाले म्हणून औद्योगिक शहरांचे अधिकाधिक नागरीकरण झलोले दिसूनयेते. समाजामध्ये अनेक उपभोग्य वस्तूंची उपलब्धता झालेली आहे. उदा. कपडे, पादत्राणे, वाहने, घराची रचना, इत्यादी शेती क्षेत्रात उत्पादनात नगदी उत्पादनाच्या पिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. लोखंडी नांगर ही शेतीच्या यांत्रिकीकरणाची नांदी आहे असे मानले जाते. सिंचन क्षेत्रात आत्याधुनिक सुविधा निर्माण झाल्या. उदा. ठिबक,. तुशार, पाण्यातील विविध मोटार इत्यादी औद्योगिकरणामुहे सर्वच क्षेत्रात (शेती, उद्योग, बि-बियाणे, खते, औषधे, स्वयंपाक, गिरण्या दळणाच्या वाहतूक साधने दूरसंचार इत्यादी) प्रगती झालेली दिसून आलेली आहे.

**व्याख्या**

औद्योगिरकण एक अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये वस्तुंचे उत्पादन, हस्तकला वा हस्तउद्योगाच्या ऐवजी निर्जीव शक्ती वा यंत्राद्वारे उत्पादन केले जाते त्यास औद्योगिकीकरण असे म्हणतात.

उद्योगवादाच्या स्थापनेच्या प्रक्रियेससुद्धा औद्योगिकरण म्हणतात.

**औद्योगिकरणाची संसाधने –**

कोणत्याही राष्ट्राचे औद्योगिकरण मुख्यत: तीन घटकांवर अवलंबून असते. १) नैसर्गिक संसाधने २) मानवी संसाधने ३) मानवनिर्मित संसाधने. उपरोक्त घटकांच्या योग्य उपयोगावर राष्ट्राचे औद्योगिक विकास अवलंबून असतो. आर्थर लुईस याच्या मते कोणत्याही राष्ट्राचा विकास हा त्या राष्ट्रातील संसाधनाच्या क्षमतेप्रमाणे योग्य उपयोग केला तरच औद्योगिक विकास होतो. त्यात कमी-अधिक प्रमाण होता कामा नये. अर्थातच या साधनाच्या क्षमतेनुसार औद्योगिक नियोजनही महत्वाचे असते. मानवाची बुद्धी किती तल्लख आहे किती सर्जनशील आहे यावरून नियोजनाचा दर्जा ठरतो.

**प्राकृतिक साधने –**

संयुक्त राष्ट्र संघटना, प्राकृतिक साधने म्हणजे कोणतीही अशी वस्तु की जी मानवाला निसर्गातून प्राप्त होते आणि मानव त्याचा उपयोग स्वत:च्या व राष्ट्राच्या हितासाठी करतो. अशा नैसर्गिक वस्तूंचा निसर्गात साठा असतो त्याचा अधिक प्रमाणात उपभोग व उपयोग केला तर संपुष्टात येतो. नंतर हि नैसर्गिक वस्तुचा पुरवझ वाढत नाही व उत्पादन करता येत नाही. उदा. सोने, चांदी, लोखंड, अभ्रक, पेट्रोजन्य पदार्थ इत्यादींचा उपयोगसुद्धा विचारपूर्वक व नियोजनपूर्वक करावा लागतो. खनिज साधनांचा पुरवझ ज्या ज्या भागात असतो त्या क्षेत्रात उद्योग निर्माण होतात. उदा. मध्यप्रदेशातील चेन्नई, ओरिसातील-रूरकेल या ठिकाणी प्रचंड मोठ्या प्रमाणावर कारखाने आहेत कारण येथे लोखंडाच्या खाणी आहेत.

वरील उदाहरणावरून असे लक्षात येते की नैसर्गिक साधनसंपत्तीची उपलब्धता औद्योगिक विकासामध्ये फार महत्वाची आहे. औद्योगिक विकास आणि उद्योगधंद्याची वाढ यांना

खनिज संपत्तीवर अवलंबून राहावे लागते. वास्तविकता या दोन्हींचा घनिष्ठ संबंध आहे. आर्थिक विकास जसजसा होत गेला तसतसा खनिज संपत्तीमध्येही बदल होत गेला.

**मानवीय साधने –**

देशातील कार्यशील लोकसंख्या जी धडधाकट, प्रशिक्षित आणि कुशल असेल तरच देशातील उद्योगाचा विकास होतो. चेस्टर बोल्सच्या मते, एक व्यवस्थीत गतिशीलता आणि उपयुक्त समाजाची निर्मिती करावयाची असेल तर नैसर्गिक शक्तीशी सामना करण्यासाठी शिक्षित, प्रशिक्षित व कार्यक्षम होणारी मानवी शक्ती असावी. कामगार मंडळी ही उत्साही, आनंदी, सुदृढ, कामसू असली पाहिजेत. सद्यस्थितीत भारताची स्थिती तर फारच वाईट वळणावर आहे. आरोग्य सेवेचा अभाव, शिक्षण क्षेत्रातील उदासिनता, पालकांचा बेजबाबदारपणा व नैराश्य, तरुणाची नैतिक मूल्यांकडील दुर्लखता, तांत्रिक शिक्षणातील महागाई, इत्यादीच्यावर राष्ट्राचा विकास अवलंबून असतो. कार्यक्षमत मनुष्यबळ राष्ट्राचा विकास घडवू शकते.

**मानवनिर्मित साधने –**

उच्चस्तरीय तांत्रिक यांत्रिक ज्ञान घेतलेले पदवीधर, इंजिनिअर्स आणि शास्त्रज्ञ असल्याशिवाय नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य उपयोगसुद्धा करता येत नाही. अनेक राष्ट्रात योग्य उपयोग घेणारी मानवी शक्ती नसल्यामुळे त्या राष्ट्रांमध्ये नैसर्गिक संपत्ती तशी पडून राहते किंवा व्यर्थ जाते. नवीन आधुनिक यंत्रतंत्राचा वापर करून उत्पादीत वस्तुंच्या मागणीवरही विकास अवलंबून असतो. भारतातला अनेक यंत्रनिर्मितीसाठी दुसऱ्यांवर अवलंबून रहावे लागत होते;परंतु आजमितीला भारतामध्ये यंत्र, तंत्र, परमाणू साहितय, परमाणुशक्ती, रॉकेट, जेट विमाने इत्यादी बनवणारे आता भारतीय आहेत. उदा. माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जी. अब्दुल कलाम, अनिल काकोडकर, २००० मध्ये संगणक परिभाषेत बदल करणारे इंजिनिअरिंगचे विद्यार्थी इत्यादी.

सारांश – देशाची नैसर्गिक, मानवी आणि आर्थिक शक्ती किती आणि कशा प्रकारची आहे हेही लक्षात घेतले पाहिजे. भारताला सद्यस्थितीवर मात करणे गरजेचे आहे. भारताची लोकसंख्या वाढली आहे. परंतु भारताची औद्योगिक प्रगती झाली नाही तर परवडणारे नाही. म्हणून भारतातील तरुण पिढीने यांत्रिक व व्यावसायिक शिक्षण घेणे व प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. अन्यथा तरुण पिढीला मार्ग सांगणे कठीण होईल.

**औद्योगिकणाचे परिणाम –**

औद्योगिकरणामुळे सुद्धा समाजावर अनेक परिणाम झाल्याचे दिसते. समाजाच्या जीवनाचे व्यापार व बाजार प्रधान अर्थव्यवस्थेत रूपांतर झाले. औद्योगिकीरणामुळे लोकसंख्या वाढली, आकार वाढला, वितरणावरही परिणाम झाला. औद्योगिकरणामुळे नागरीकरण वाढले व शहरेही लोकसंख्येची केंद्र बनत आहेत. ज्या ज्या शहरांमध्ये मोठमोठे उद्योग आहेत त्या त्या क्षेत्रात, ठिकाणी लोकसंख्येत वृद्धी जाणवते. शेती क्षेत्रातसुद्धा नवनवीन यंत्रातंत्राचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जात आहे. त्यामुळे शेती क्षेत्रातील मनुष्यबळ बेरोजगार व बेकार होत आहे अशा ग्रामीण रोजगाऱ्यांना उपासमारीची वेळ आल्याने ते शहराकडे रोजगारासाठी स्थलांतरीत होत आहेत. सुरुवातीला सुशिक्षित व प्रशिक्षित मजूरांना औद्योगिक शहरामध्ये

रोजगार मिळाला; परंतु बाकीच्या मजूरांना अवघड झाले. एवढेच नव्हे तर औद्योगिक प्रगतीमुळे विशेषीकरण श्रमात झाले. उद्योग निर्मितीला भांडवलांची गरज असते. शहरात नवनवीन उद्योग निर्माण होत आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या स्थलांतरीत लोकांना राहण्याची समस्या शहरात निर्माण झाल्याने झोपडपट्ट्यांचे प्रमाण वाढले आहे. उदा. मुंबईमधील धाराई नावाची झोपडपट्टी अशिया खंडात मोठी आहे. औद्योगिकरणामुळे वस्तुंचे उत्पादन वाढले व त्या वस्तु बाजारपेठेपर्यंत पोहोचून उपभोग धेणे सहज शक्य झाले. मुलभूत गरजा नंतर चैनीच्या गरजा आज घरोघरी आहेत. या चैनीच्या गरजेतून गुन्हेगारी व वेश्या व्यवसायाचे प्रमाणही वाढलेले दिसते.

## स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

**दीर्घोत्तर प्रश्न**

१) बलुतेदारी व्यवस्थेवर निबंध लिहा

,.............................................................................

,.............................................................................

,.............................................................................

२) पंचायतराज व्यवस्थेवर चर्चा करा

,.............................................................................

,.............................................................................

,.............................................................................

३) नोकरशाहीची संरचना सविस्तर लिहा

,.............................................................................

,.............................................................................

,.............................................................................

४) वाढते नागरीकरण एक समस्या चर्चा करा

,.............................................................................

,.............................................................................

,.............................................................................

५) विज्ञानतंत्रज्ञानाने मानवी जीवन सुसह्य होते यावर भाष्य करा.

,.............................................................................

,.............................................................................

,.............................................................................

६) जातीव्यवस्था ही एक विकासात अडथळा आहे. यावर सविस्तर लिहा.

,.............................................................................................

,.............................................................................................

,.............................................................................................

**लघुत्तरी प्रश्न**

१) नोकरशाही म्हणजे काय?

,.............................................................................................

,.............................................................................................

,.............................................................................................

२) विज्ञान व तंत्रज्ञान एकच आहेत?

,.............................................................................................

,.............................................................................................

,.............................................................................................

३) नेतृत्व हे ग्रामीण भागातच विकसित होते.

,.............................................................................................

,.............................................................................................

,.............................................................................................

४) आधुनिक व्यवसाय रचना व्यवसाय स्वातंत्र्यामुळे बदलली.

,.............................................................................................

,.............................................................................................

,.............................................................................................

५) नागरीकरण म्हणजे काय?

,.............................................................................................

,.............................................................................................

,.............................................................................................

६) भारतातील राजकीय संरचना स्पष्ट करा?

,.............................................................................................

,.............................................................................................

,.............................................................................................

**सेट/नेट साठीचे प्रश्न**

१) प्राचीन कालखंडात खेड्यांमध्ये ...... शासनव्यवस्था होती. (राज्यकेंद्रित, स्वायत्त, लष्करी)

२) भारतीय संविधानामध्ये राजकीय क्षेत्रात प्रत्येक ....... प्रतिनिधीत्व दिलेले आहे. (जातीचे, धर्माचे वंशाचे)

३) नोकरशाही ही संकल्पना सर्वप्रामि .... या समाजशास्त्रज्ञाने मांडली. (मॅकसवेबर, लास्की, मर्टन)

४) शिक्षणास वाघीणीचे दूध आहे असे ....... म्हणाले. (महात्मा गांधी, डॉ. बी. आर. आंबेडकर, सरदार पटेल)

५) प्राचीन भारतीय कृषीत ...... यांची भूमिका महत्वाची होती. (बलुतेदार, अलुतेदार, जोशी)

६) बलुतेदार पद्धती ...... आधारित होती. (वर्ण, जाती, वंश)

७) ...... मुळे कमी वेळेत अधिक व दर्जेदार कामे होतात. (यंत्रामुळे, हातमाग, लोकसहभाग)

८) नागरीकरण हे ..... याचे फळ आहे.

९) झोपडपट्टी हे ..... याचं देणं आहे. (वाढती लोकसंख्या, औद्योगिकरण, शिक्षण)

## संदर्भसूची (मराठी)


१) इनामदार/पुराणीक, राजकीय, समाजशास्त्र (१९८४) कॉन्टिनेन्टर प्रकाशन, विजयानगर, पुणे ३०.

२) कर्वे इरावती : हिंदूंची समाजरचना, नागपूर विश्वविद्यालय, नागपूर

३) केतकर श्री. व्यं. : महाराष्ट्र ज्ञानकोश, महाराष्ट्र ज्ञानकोश मंडळ लि. नागपूर, १९२५

४) कुलकर्णी एम. जी. भारतीय समाजशास्त्र, परिमल प्रकाशन, औरंगाबाद १९७५

५) लोकशाही विकेंद्रीकरण समितीचा अहवाल , १९६१ सहकार व ग्रामीण विकास विभाग महाराष्ट्र शासन १९६१

६) कमल मुळे (मुख्य संपादक) – भारतीय खेडी व जाती, विचार प्रकाशन, औरंगाबाद १९७६

७) ज्योत्सना देशपांडे – विकासाचे अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर २०११

८) आत्रे त्रि. नां. गावगाडा, भास्कर शिवराम आत्रे, मुंबई १९५९

९) मेहंदळे यशवंत श्रीधर – समाजशास्त्राची मुलतत्त्वे, मेहंदळे प्रकाशन, ३८८, नारायण पेठ, पुणे ३०

१०) सुधाकाळ दाते – औद्योगिक समाजशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स,. औरंगाबाद, २००५

११) नाडगोंडे गुरूनाथ, औद्योगिक समाजशासत्र, कॉन्टिनेन्टल, पुणे १९७८

**हिंदी**

१) एस. एल. शाह, भारत मे जाति एवं वर्ण व्यवस्था,. लोकहित प्रकाशन, डी–५८५/१२, गली नं. २ (निकट वजीराबाद रोड) अशोकनगर, शाहदरा, दिल्ली – ११००९३

२) एम. एम. लवानिया/शशी के. जैन सामाजिक वचारक, रिसर्च पब्लिकेशन्स, नई दिल्ली ११०००२

३) राजेंद्र कुमार शर्मा, राजनैतिक समाजशास्त्र एटलांटिक पब्लिशर्स, एण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नई दिल्ली

४) घुर्ये गो.सं. जाती, वर्ग और व्यवसाय, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६१

English Reference Books

1) Bondix r Nation Building and citiznsip, wilery eastern Pvt. Ltd. New Delhi 1969

2) Deasi A. R. Social Backgrount of Indian Nationalism Popoular prakashan Bombay (4th) 1966

3) Kothari R Politics In India arient Longman Ltd, New Delhi 1972

4) Ambedkar B. R. : Annitilation of Caste, bhim Patricka publications, sullunder 1968

5) Davis Kingsley : Human Socity The macmillan company, Newyork 1961

6) Ghurye G. S. Caste, Class and occupstion popular Book depot Bombay 1961

# प्रकरण ७
# भारतातील ग्रामीण विकासाच्या योजना व कार्यक्रम

**अनुक्रमाणिका**


**७.० उद्दिष्टे**

**७.१ प्रास्ताविक**

**७.२ विषय विवेचन**

**७.२.१ समुदाय विकास संकल्पना**

**७.२.२ समुदाय विकास वैशिष्ट्ये**

**७.२.३ एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम**

**७.२.४ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान**

**७.२.४.१ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत राबविले जाणारे उपक्रम.**

**७.२.४.२ राष्ट्रीय ग्रामीण अभियानासमोरील आव्हाने,**

**७.२.५ स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना**

**७.२.५.१ सवर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये**

**७.२.५.२ स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेअंतर्गत स्वयंमसहाय्य गट**

**७.३ पारिभाषिक शब्द**

**७.४ स्वयं अध्ययनाची प्रश्न**

**७.५ सारांश**

**७.६ अधिक वाचनासाठी पुस्तके**


## ७.० उद्दिष्ट्ये –

भारत हा खेड्यांचा देश आहे. ग्रामीण भागाचा अजूनही म्हणावा तसा विकास झालेला आढळून येत नाही. ग्रामीण विकासासाठी शासनाने विविध योजना व कार्यक्रम राबवित आहे. या प्रकरणामध्ये आपण या संबंधीची माहिती प्रापत करून घेणार आहोत.

या प्रकरणाच्या अध्ययनानंतर तुम्हाला....

१. मुदाय विकास या संकल्पनासंबंधी माहिती प्राप्त होईल.

२. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाची माहिती मिळेल.

३. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान व या अभियानांतर्गत राबविले जाणारे कार्यक्रम जाणून घेता येईल.

४. स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनासंबंधीची माहिती प्राप्त होईल.

५. स्वयंसहाय्यता गटाची माहिती जाणून घेता येईल.

## ७.१ प्रास्ताविक

खरा भारत हा खेड्यामध्ये राहतो हे राष्ट्रपिता म. गांधीचे उदगार आहेत. आज ही हे वाक्य सामाजिक, राजकीय आणि आर्थिक दृष्टीकोनातून सत्यच आहे आणि कदाचित भविष्यातही हे वाक्य सतयच असेल. कारण आजही भारताची लोकसंख्या ६८.८% ग्रामीण भागातच वास्तव्य करते. यामुळे ग्रामीण विकास हे केंद्र व व राज्य शासनाच्या कार्यक्रम व योजनाचे प्रमुख केंद्र आहे. यासाठी शासनाने एकात्मिक ग्रामीण विकाससारखे कार्यक्रम राबवित आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशातील दारिद्र्य रेषेखाली लोकांना रोजगार प्राप्त होईल अशी तरतूद केली आहे तर राष्ट्रीय गामीण आरोग्य अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बालमृत्यू, मातामृत्यूचे प्रमाण कमी करणे तसेच लोकसंख्या स्थिर करण्यासाठी जननदार व मृत्यूदर कमी करणे साथीच्या रोगावर नियंत्रण प्राप्त करणे जेणेकरून मृत्यूदर कमी करणे साथीच्या रोगावर नियंत्रण प्राप्त करणे जेणे करून मृत्यूदर कमी करता येईल. त्याचबरोबर सार्वजनिक आरोग्य सेवेचा स्तर उंचावण्यास प्रयत्न केला जात आहे..

स्वर्णजयंती रोजगार योजनेअंतर्गत सुक्ष्म उद्योगावर भर दिला आहे. त्याद्वारे दरिद्र्य निर्मूलन करणे बँकामार्फत BPL कुटुंबांना कर्ज देण्याची सोय करणे. या अशा अनेक योजना राबवून ग्रामीण भागाचा विकास घडवून आणला जात आहे. तसेच स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातूनही ग्रामीण विकास करण्याचा प्रयत्न केला जात आहे. जेणेकरून भारतातील ग्रामीण भाग विकसीत होईल व दारिद्र्य रेषेखालील जनसंख्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होईल.

## ७.२ विषय विवेचन

**समुदाय विकास**

**प्रस्तावना –**

विकास ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. याचा संबंध हा आर्थिक घटकाशी अधिक असतो. आर्थिक वृद्धी व आर्थिक विकास या संकल्पना सारख्याच अर्थाने वापरल्या जातात. या दोन्ही संकल्पना तशा भिन्न भिन्न स्वरुपाच्या आहेत. आर्थिक वृद्धी ही संकल्पना संख्यात्क आहे. तर विकासाच्या संकल्पनेत गुणात्मकतेवर भर दिला जातो.

विकासाचा विचार करताना एकूण राष्ट्रीय उत्पन्नात व सर्व स्तरातील लोकांच्या राहणीमानात सातत्याने वाढ होणे आवश्यक असते. यामुळे समुदायातील सर्व सदस्यांना विकासाची संधी मिळते. हाच विकासाला आधार आहे. विकासामध्ये फक्त आर्थिक विकासावरच भर देऊन चालणार नाही तर सामाजिक विकासाकडेही तेवढेच लक्ष द्यावे लागेल. कारण विकासाच्या प्रक्रियेत सामाप्य व्यक्तीला केंद्रबिंदू मानून आराखडा तयार केला जातो. विकास साधला जातो. समुदाय विकासाच्या प्रक्रियेत त्या त्या समाजाची ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी, समाजाची मानसिकता यासारख्या गोष्टीही तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत.

समुदाय विकासाला विचार करताना त्याचा अर्थ समजून घेणे ही तेवऐच आवश्यक आहे.

**अर्थसंकल्पना**

कार्न टायलर यांच्या मते समूदाय विकास ही एक अशी प्रक्रिया आहे की, या प्रक्रियेत ग्रामवासी आपली आर्थिक व सामाजि परिस्थिती सुधारण्यासाठी मदत करण्यासाठी सहभागी होतात व त्या योगे समर्थपणे काम करणाऱ्या लोकांचा समूह बनून राष्ट्रीय विकास कार्यक्रमात हातभार लावतात.

केंब्रीज कॉन्फरन्सने समुदाय विकासाची व्याख्या खालीलप्रमाणे आहे. समाजाच्या शक्य झाल्यास स्वयंप्रेरणेने सर्व समाजाला चांगले राहणीमान मिळवून देणारी चळवळ म्हणजे समाज विकास योजना होय.

युनो (UNO) ने समुदाय विकासाची व्याख्या केली आहे. शासन व लोक यांच्या संघटीत प्रयत्नाने सर्व समाजाची सांस्कृतिक, आर्थिक व सामाजिक परिस्थिती उंचावणारी व राष्ट्रीय विकास कामात हातभार लावण्यास शिकवणारी एक परिवर्तनाची प्रक्रिया म्हणजे समाजविकास योजना होय.

वरील व्याख्यांवरून समुदाय विकासासंदर्भात काही महत्त्वाचे मुद्दे लक्षात येतात.

१. समाजविकास योजनेच्याद्वारे पारंपारीक जीवन पद्धती सोडून नवीन पुरोगामी जीवनपद्धतीचा अंगीकार केला जातो.

२. समाजाच प्रेरणेने व सहकार्याने लोकांचे जीवनमान उंचविण्याचा प्रयत्न केला जातो.

३. ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक जीवनात परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला जातो.

म्हणजेच समुदाय विकास म्हणजे ग्रामीण भागातील सर्व लोकांचा विकास होय.

## ७.२.२ समुदाय विकासाची उद्दिष्ट्ये

समुदाय विकास करण्यासठी काही उद्दिष्ट्ये निर्धारीत केले जातात व ते साध्य करण्यासाठी विविध योजनांची आखणी केली जाते. ती काही उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) समुदाय विकासाच्या संदर्भातील योजना व इतर योजनामध्ये मुलभूत फरक असतो तो म्हणजे समुदाय विकास योजनांमध्ये लोकांना सहभागी करून घेतले जाते. इतर विकासाच्या योजनेत सामान्य जनतेचा सहभाग नसतो. उदा. नदीवरील पूल बांधणे, रेल्वे ट्रॅक तयार करणे इ.मध्ये लोकांचा सहभाग नसतो.

२) समुदाय विकासाच्या प्रक्रियेचा माध्यमातून समूदायाच्या पारंपारिक विचारसरणी बदलविण्यासाठी जुनी कालबाह्य झालेल्या रूढी परंपरा ज्या विकासाला मारक आहेत त्या दूर करण्यासाठी योजना राबविल्या जातात. त्यातून त्यांच्या सवयी, प्रवृत्ती बदलविण्याचा प्रयत्न केला जातो.

३) प्रत्येक समुदायचे काही प्रश्न सामान्य स्वरूपाचे असतात. ते प्रश्न सोडवावित. लोकांच्या सामन्य स्वरूपाच्या गरजा भागवाव्यात याची जाणीव लोकांना करून देणे आवश्यक असते. म्हणूनच समाजविकास योजनाचा कार्यक्रम लोकाच्या सामान्य स्वरूपाच्या गरजावर आधारीत असतो.

४) समुदाय विकास योजनांच्या माध्यमातून समाजविकासाला पोषण गुणांचा विकास व्हावा हेही अपेक्षित असते. स्वत:च्या खेड्याचा विकास सामूहिक प्रयत्नांनी साधण्यात सहयोग, स्वयंप्रेरणा, स्वावलंबन, सामाजिक जबाबदारीची जाणीव, नेतृत्व, विश्वास, कार्यक्षमता या गुणाचा विकास होणे आवश्यक आहे म्हणून समुदाय विकासाच्या योजना या मुलत: माणूस घडविण्याची योजना आहेत.

५) ग्रामीण भागातील उपलब्ध साधनसामुग्रीचा वापर करून लोकांचा जीवनमानाचा दर्जा उंचावेल आरोग्याचा स्तर सुधारेल, राहण्यास निवास उपलब्ध होती अशा स्वरूपाच्या अनेक गरजा समुदाय विकासाच्या योजनांच्या माध्यमातून भागविल्या जातील.

६) आधुनिक पद्धतीचा अवंब करून शेती उत्पादनात वाढ करणे, शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे. आरोग्य सुधारणे ही उद्दिष्टे आहेत.

म्हणजेच समुदाय विकास हा सर्वस्पर्शी आहे. खेड्यांच्या सामान्य समसया सोडविण्यासाठी समुदाय विकासाच्या प्रक्रियेत प्राधान्य दिले जाते. ग्रामीण समाजात आर्थिक सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व मानसिक परिवर्तन घडवून आणणे हे समूदाय विकासाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे.

## ७.२.३ एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम

(IRDP) (Integrated Rural development Programme) -

एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम हा बहुआयामी, बहुपपातळी व बहुक्षेत्रीय असा ग्रामीण विकास कार्यक्रम होता. हा कार्यक्रम 0 दारिद्र रेषोखालील कुटुंबाकरीता राबविण्यात आला. लघु शेतकरी विकास संस्था, सिमांत शेतकरी, शेतकामगार विकास कार्यक्रम आणि समान क्षेत्रीय विकास कार्यक्रम यासारखे अनेक कार्यक्रम या क्षेत्रात कार्यरत होते; परंतु हे सर्व वेगवेगळे कार्यक्रम असल्याकारणाने जेवढ्या परिणामकारकतेने अंमलबजावणी होणे आवश्यक होती तेवढी ती होत नव्हती. त्यामुळे या सर्व कार्यक्रमांना एकत्रित करून एप्रिल १९७८ मध्ये एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) या नावाने २३०० समुदाय विकास गटात हा कार्यक्रम राबविण्यात आला. कालांतराने म्हणजेच २ ऑक्टोबर १९८० मध्ये (IRDP) चा विस्तार संपूर्ण देशात ५००४ समुदाय विकास गटात राबविण्यात आला.

या कार्यक्रमाचा प्रमुख केंद्रबिंदू हा लहान तसेच सिमांत शेतकरी हा होता. अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती (sc, st) मधील आर्थिकदृष्ट्या मागासलेले ज्यांचे वार्षिक उत्पन्न हे ६४०० रु. पेक्षा कमी होते. (त्यातही ज्यांचे उत्पन्न हे ४८०० रु. पेक्षा कमी आहे अशा गटांचा विशेष लक्ष गटात समावेश करण्यात आला.) प्रत्येक गरजू घटकाला यात आरक्षण देण्यात आले. ते पुढीलप्रमाणे.

| गट | आरक्षण |
|---|---|
| SC/St | ५०% |
| महिला | ४०% |
| अपंग व्यक्ती | ०३% |
| इतर | ०७% |

*** अंमलबजावणी करणाऱ्या संस्था –**

जिल्हा ग्रामीण विकास संस्था वा जिल्हा परिषद ही (..) च्या अंमलबजावणीस जबाबदार संस्था होती. शेवटच्या स्तरावर या योजनेचे कामकाज गटविकास अधिकारी पाहत असे.

*** IRDP चे अनुदान**

एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाचा अनुदानाचा भाग हा राज्य व केंद्रपातळीवर विभागून करण्यात आला. त्यात राज्याचा हिस्सा हा ५०% तर केंद्राचा हिस्सा हा ५०%असा होता.

*** अनुदानाचे निकष –**

– या कार्यक्रमांतर्गत लहान शेतकऱ्यांकरीता २५%

–सिमांत शेतकरी, शेतकामगार, ग्रामीण कारागीर यांच्याकरीता ३३.५%

– अनु. जाती, अनु. जमाती व अपंगाकरीता ५०% एवढे अनुदान देण्यात येत होते.

*** व्यक्तीगत लाभार्थ्यांनुसार अनुदानाची मर्यादा –**

– सर्वसाधारण क्षेत्रात – ४००० रु.

– उ्झअझ/ऊ्ऊझ क्षेत्रात – ५००० रु.

– अनु. जाती, अनु. जमाती, अपंग यांच्यासाठी ६००० रु.

– सुशिक्षित बेरोजगारांसाठी ७५०० रु. किंवा एकूण प्रकल्पाच्या ५०% जी किंमत जास्त असेल ती.

## ७.२.४ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

(NRHM (Ntional Rural health Programme) -

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान हे देशातील ग्रामीण भागापर्यंत आरोग्यसेवा परिणामकारकरित्या पुरविण्यासाठी विशेषत: ज्या १८ राज्यांमध्ये सार्वजनिक आरोग्य सोयी सुविधांचा अभाव होता तेथे राबविण्यात येत आहे.यात अरुणाचलप्रदेश, आसाम, बिहार, छत्तीसगढ, हिमाचलप्रदेशा, झारखंड, जम्मूकश्मीर, मणिपूर, मिझोरम, मेघालय, मध्यप्रदेश, नागालँड, ओरिसा, राजस्थान, सिक्कीम, त्रिपूरा, उत्तराखंड आणि उत्तरप्रदेश यांचा समावेश होतो.

*** राष्ट्रीय ग्रामीण आरोग्याचे ध्येय**

१. सार्वजनिक आरोग्यखर्च हा दरडोई उत्पन्नाच्या ०.९% वरून २ ते ३% पर्यंत नेणे. हा अभियानाचा मुख्य गाभा आहे.

२. व्यवस्थापन व सेवांची उपलब्धता यांना बळकट करण्यासाठी राष्ट्रीय किमान समान कार्यक्रमाच्या वचननाम्यानुसार असलेल्या ध्येयास उत्तेजन देण्यासाठी व्यवस्थेत संरचनात्मक दुरुस्ती करणे आणि वाढीव तरतूद परिणामकारक हाताळणे हे त्यांचे ध्येय आहे.

३. आरोग्य आणि कुटुंबकल्याण कार्यक्रमाचे एकीकरण आणि निधीचा पुरेपूर उपयोग पायाभूत सुविधा आणि प्राथमिक आरोग्यसेवेची उपलब्धता यांच्यासाठी निधी उभारणे इ.

४. जिल्हा आरोग्य व्यवस्थापनासाठी कार्यक्रमाचे विकेंद्रीकरण करणे.

५. ग्रामीण भागातील/गावातील महिला कार्यकर्ती, ग्रामीण आरोग्य योजना, भारतीय सार्वजनिक आरोग्य मनांकनानुसार परिणामकारक गुणकारी, सेवा आणि समाजाला उत्तरदायी असलेल्या ग्रामीण रुग्णालयाचे बळकटीकरण करणे.

६. स्थानिक आरोग्यविषयक उपचारपद्धती पुनर्जिवीत करणे, आयुर्वेद योग, नैसर्गिक उपचार पद्धती, युनानी सिद्ध व होमीओपॅथी (अँीह) या पद्धतींना मुख्य प्रवाहात आणणे.

७. समान, टिकाऊ,. उत्तरदायी आणि परिणामकारक, प्राथमिक आरोग्य सेवा, गरिबांना विशेषत: महिला बालकांना संधी उपलब्ध करून देणे.

८. आरोग्य समस्यांचे निर्धारक घटक, जसे स्वच्छता आणि आरोग्य, पोषणद्रव्य आणि शुद्ध पिण्याचे पाणी यांचे जिल्हा आरोग्य योजनेद्वारे एकीकरण करणे.

*** राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे उद्देश –**

- अर्भक व माता मृत्यूदर कमी करणे.
- साथीच्या रोगाचा प्रसार रोखणे व प्रतिबंधात्मक उपाय करणे.
- स्त्री–पुरुष गुणोत्तर व लोकसंख्या समतोल राखणे. तसेच लोकसंख्या स्थिर करणे.
- स्थानिक उपचार पद्धतीतंना पुनर्जिवीत करणे व त्यांना मुख्य प्रवाहात आणने.
- आरोग्यदायी जीवनमानास उत्तेजन देणे.
- सर्वांना आरेग्यसेवेची समान संधी उपलब्ध करून देणे.

राष्ट्रीय ग्रामीण अभियानाच्या माध्यमातून सर्व जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये यांचे भारतीय सार्वजनिक आरोग्यमानांकनानुसार श्रर्णीवर्धन करणे, इयत्ता १ली ते १०वीच्या विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करणे. टेलीमेडीसीन प्रकल्प अडक्अ (अधिकृत सामाजिक आरोग्य कार्यकर्ता) ही कार्य केली जातात.

## ७.२.४.१ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियनांतर्गत खालील कार्यक्रम राबविले जातात.

**१. प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम** (Reproductive and Child Health) –

प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमाचा दुसरा टप्पा हा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचा एक प्रमुख घटक असून, त्याचा उद्देश मातामृत्यूप्रमाण, अर्भकमृत्यू व एकूण जननदर कमी करून त्याद्वारे बाल आरोग्य सुधारणे व लोकसंख्या स्थिर करणे हा आहे.

**२. कुटुंब कल्याण कार्यक्रम** (Family Welfare Programme) -

लोकसंख्या स्थिर करणे व त्याद्वारे जनतेचे आरोग्यमापन सुधारणे हे कुटुंबकल्याण कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. तसेच संतती प्रतिबंधक साधने, इ. प्रसारावर जास्त भर दिला जात आहे. राज्यात हा कार्यक्रम २,६९२ सामाजिक संस्थांच्या सहाय्याने राबविला जातो.

**३. जननी सुरक्षा योजना** (Janani Surksha Yojna) - ग्रामणी व नागरी भागात रुग्णालयात जावून प्रसूतीला प्रोत्साहन दिले जाते. याद्वारे दारिद्र रेषेखालील अनु. जाती, अनु. जमातीच्या कुटुंबातील ज्यांचे वय प्रसूतीपूर्व नोंदणीच्या  वेळी १९ वर्षाच्यावर आहे अशा लाभार्थ्यांमधील मातामृत्यू प्रमाण व अर्भक मृत्यू प्रमाण कमी करणे या उद्देशाने देशात २००५-०६ पासून ही योजना राबविली जाते. या योजनेअंतर्गत रुग्णालयात प्रसूत झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना ७०० व शहरी भागातील लाभार्थ्यांना ६०० रुपये दिले जजातात. कुशल दायीच्या मदतीने घरी प्रसूती केल्यास ५०० रु. दिले जातात.

**४. सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम** (Universal Immunisation Programme)-

देशात सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम १९८५-८६ पासून राबविण्यात येतो. याचा उद्देश घटसर्प, क्षयरोग, डांग्या खोकला, धनुर्वात, पोलिओ, गोवर यासारख्या आजारांना लसीकरणाद्वारे प्रतिबंध घातला जातो. यामुळे गर्भवती स्त्रीय, बालके यांच्या मृत्यूचे रोगग्रस्ततेचे व अपंगत्वाचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

**५. राष्ट्रीय आयोडीन न्युनता विकास नियंत्रण कार्यक्रम** (Nation Iodine Deficiency disorders control programme) -

या कार्यक्रमांतर्गत गलगंडग्रस्त रुग्णाचे सर्वेक्षण करणे, आयोडीनयुक्त मिठाची निर्मीती करणे, प्रादूर्भाव झालेल्या जिल्ह्यात बंटी व आयोडीनच्या प्रमाणावर लक्ष ठेवणे, आयोडिनयुक्त मीठ वापराबाबत आरोग्य शिक्षण देणे इ. द्वारे आयोडीन युक्त मिठाच्या वापराबाबत उत्तेजन देणे. ही महत्वाची कामे केली जातात.

**६. राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम**

(National programme for control of Blindness) -

या कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टे दृष्टिदोष शोधून काढून उपाराद्वारे अंधत्वाचे प्रमाण कमी करणे. प्रत्येक जिल्ह्यात डोळ्याची काळजी घेण्यासाठी उपयुक्त सुविधा निर्माण करणे व त्यासाठी मनुष्यबळ विकसीत करणे.

**७. राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम** (National vector Brone Diseses control Programme) NVBDCP -

हिवताप, हत्तीरोग,ख मेंदूज्वर, डेंगुताप, चिकनगुण्या, चंडीपूरा इ. रोगांचा प्रतिबंध रोगनिदान, उपचार व नियंत्रणासाठी देशात हा कार्यक्रम राबविण्यात येतो.

**८. राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम** (National eprosy rradication Progame)-

देशातील कुष्ठरोग्यांची संख्या कमी करणे, कुष्ठरोग पिडीत व्यक्तीला उच्च दर्जाची आरोग्य सेवा पुरविणे, कुष्ठरोग्यांचे शारीरिक, मानसिक, सामाजिक पुनर्वसन करणे.

**९. सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम** (Revised National TB control Programme) -

लागण झालेल्या क्षयरोग रुग्णाची डायरेक्ट ऑब्जर्व्हड ट्रिटमें शॉर्ट कोर्स (ऊजढड) द्वारे तपासणी करून ते पूर्ण बरे होईपर्यंत प्रभावीपणे उपचार संपूर्ण कालावधीसाठी औषधांचा खात्रीशीर पुरवठा, इ. यंत्रणा देशात सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत आहे.

**१०. शालेय आरोग्य कार्यक्रम** (School Health programme) -

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य कार्यक्रमांतर्गत शालेय आरोग्य कार्यक्रम हा शिखा अभियानाच्या मदतीने राबविला जातो. या कार्यक्रमांतर्गत इयत्ता १ली ते १०वी व शहरी भागातील इयत्ता १ली ते ४ थी वर्गातील विद्यार्थ्यांची दरवर्षी आरोग्य तपासणी केली जाते.

अशा विविध योजना राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविल्या जातात.

### ७.२.४.१ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानासमोरील आव्हाने.

१. आरोग्य हा राज्यसूचीतील विषय आहे. (NRHM) अधिक प्रभावी परिणामासाठी राज्यासोबत भागिदारी करीत आहे. त्यामुळे राज्यात आरोग्य सेवा क्षेत्रात नवीनउपक्रम राबविले जात आहेत.

२. जास्त निधीची गरज असलेले उपक्रम उदा. जननी सुरक्षा योजना, वैद्यकीय सुविधा, प्रशिक्षित कर्मचारी यांच्या उपलब्धतेची हमी देणे या कृती कार्यक्रमात अग्रभागी आहेत.

३. आरोग्य सेवेत तज्ज्ञ डॉक्टरची नेमणूक करून सार्वजनिक आरोग्यसेवा अधिक बळकट करणे.

४. भारतात दरवर्षी ३० हजार एमबीबीएस डॉक्टर डिग्री घेऊन बाहेर पडतात; पण सार्वजनिक आरोग्य सेवेत ७५० दशलक्ष लोकसंख्या असलेल्या ग्रामीण भागात केवळ २६ हजार एमबीबीएस डॉक्टर कार्यरत आहेत.

### ७.२.५ स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना (SGSG)

स्वर्णजयंती ग्रामस्वयरोजगार योजना (SGSG) ही १ एप्रिल १९९९ रोजी सुरू झालेली व आजपर्यंत सुरू असलेली सर्वात व्यापक स्वयंरोजगार योजना आहे. या योजनेत १९९९ पूर्वीच्या काही योजना समाविष्ट करण्यात आल्या त्या पुढीलप्रमाणे.

IRDP - एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम.

DWCRA - ग्रामीण स्त्रिया व बालकांचा विकास कार्यक्रम.

ग्रामीण कारागीरांना सुधारीत औजारांचा पुरवठा.

GKY - गंगा कल्याण योजना.

MWS - दशलक्ष विहीरीची योजना.

TRYSEM - ग्रामीण युवकांना स्वयंराजगारासाठीची प्रशिक्षण योजना.

या वरील सहा योजनांच्या एकत्रीकरणातन स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना ङत्रङ्कत्रॠ सुरू करण्यात आली.

**※ स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा उद्देश**

- दारिद्र्य निर्मूलन
- गटांना कर्ज उपलब्ध करून देऊन दारिद्र्य निर्मूलनासाठी त्यांचा साधन म्हणून वापर करणे.
- दारिद्र्य निर्मूलनाच्या अनेक योजनाची पुनरोक्ती टाळून अनेक योजनाऐवजी एकच प्रभावी योजना राबविणे.
- दारिद्र्यामधून बाहेर पडण्यासाठी इझङ कुटुंबांना बँकामार्फत कर्ज व शासनामार्फत अनुदान देऊन सहाय्य करणे.
- लाभार्थी कुटुंबाला लाभ दिल्याच्या दिवसापासून पुढील तीन वर्षात अझङ बनविणे.
- समूह अथवा वैयक्तिक व्यवसायासाठी प्रकल्प अहवाल तयार करून त्यात आवश्यक पायाभूत सुविधांची कर्जाच्या रकमेची तांत्रिक प्रशिक्षण आवश्यक असल्यास प्रशिक्षणाची व बाजारपेठेच्या सुविधांची तरतूद करणे. अशा प्रकल्पाच्या आधारावर पतपुरवठा बँकामार्फत करून त्यावर अनुदान दिले जाईल.
- छोटे उद्योजक तयार करण्यासाठी त्या भागातील नैसर्गिक साधन संपत्तीच्या उपलब्धतेवर आधारीत उद्योग निर्माण करण्यासाठी ४ ते ५ प्रमुख व्यवसाय भौगोलिक घटक पाडून त्यावर आधारीत उद्योगाच्या बाबी निश्चित करून त्यामार्फत ७५% सामूहिक उद्योगासाठी सहाय्य व व्यक्तिगत उद्योगासाठी २५% अर्थसहाय्य देणे.

### ७.२.५.१ स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये (SGSG) –

(i) (SGSG) ने ग्रामणा भागात मोठ्याप्रमाणावर सुक्ष्म उद्योग उभारण्यावर भर दिला आहे.

(ii) स्वयं सहाय्यता गट स्थापून लोकांचे एकत्रीकरण घडवून आणले आहे.

(iii) सार्वजनिक कामातून सामाजिक सुविधा उभारल्या आहेत.

(iv) पंचायत समितीच्या मान्यतेने प्रत्येक गटाकरिता ४–५ कार्यक्रम हाती घेतले जातात.

(v) (BPL) जनगणनेमधून कुटुंबाची निवड करण्याचे अधिकार ग्रामसभेला देण्यात आले आहेत.

(vi) पंचायत संस्था DRDA विविध विभाग, बँक ना एकत्रित बांधणारी योजना आहे.

*** SGSG चे लाभधारक –**

- देशतील दारिद्र्य रेषेखालील सर्व कुटुंबाचा समावेश या योजनेत होतो.
- या योजनेतील एकूण लाभार्थीपैकी ५०% अनु. जाती, अनु. जामतीमधील असावेत.
- ४०% लाभधारक या स्त्रिया असाव्यात.

- ३% लाभधारक हे अपंग व्यक्ती असाव्यात.

* SGSG **मधील अनुदान**

- SGSG ही केंद्र पुरस्कृत योजना आहे.
- SGSG मध्ये केंद्र व राज्य यांचा वाटा ७५:२५ या प्रमाणात आहे.
- ईशान्य भारतातील राज्यासाठी वाटा ९०:१० असा आहे.
- वर्ष २०११-१२ मध्ये डिसेंबर २०११ पर्यंत एकूण ८,०७९ वैयक्तिक स्वयंरोजगारींना ३०.४७ कोटींचे कर्ज तसेच ८,०३९ स्वयंसहाय्यता गटांना १८०.७८ कोटीचे कर्ज वितरीत करण्यात आले.

### ७.२.५.२ सध्या राष्ट्रीय पातळीवर कार्यरत असलेली एकमेव स्वयंरोजगारावर आधारीत योजना होय.

*** स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनांतर्गत स्वयंसहाय्य गट –**

या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी स्वयंसहाय्यता गट स्थापनकरण्याची आवश्यकता असते. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील लोक एकत्र येऊन लहान गट स्थापन करून गटाच्या निर्णयानुसार नियमित बचत करतात. सभासदांच्या आर्थिक गरजा भागवितात. सातत्यपूर्ण सामाजिक आणि आर्थिक विकासाचे प्रश्न चर्चेने व योग्य असा सहभागात्मक निर्णयाद्वारे सोडवितात. अशा गटास स्वयंसहाय्यता गट असे म्हणतात.

**स्वयंसहाय्य गटाची गरज –**

- बचत गटाचा प्रमुख उद्देश हा दारिद्र्य निर्मूलन हा आहे.
- अपेक्षित घटकांना सावकारी पाशातून मुक्त करणे.
- तातडीच्या व अत्यावश्यक दैनंदिन गरजा भागविण्यासाठी गटाच्या सभासदांना गरजेनुरूप त्वरीत कमी दरात आणि योग्य सुलभ हप्त्याने कर्ज उपलब्ध करून देणे.
- गटातील सदस्यांना अंतर्गत कर्ज व बँकेचे कर्ज परतफेडीची शिस्त लावणे.
- गावाच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी सकारात्मक सहभाग घेणे.
- महिलांची शक्ती व आत्मविश्वास वाढविण्यासाठी महत्वूपर्ण व्यासपीठ विकसित करणे.
- गटातील सभासदांच्या वैयक्तिक उत्पन्नात वाढ करण्यासाठी आवश्यक लागणारे तांत्रिक ज्ञान पुरविणे.
- उदरनिर्वाहाची साधने निर्माण करण्यासाठी व मालमत्ता जमविण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देणे.

*** स्वयंसहाय्यता गटाची वैशिष्ट्ये –**

१) गटातील सर्व सदस्य हे दारिद्र्य रेषेखलील असावेत. ते एकजीनसी असावेत तसेच ते सामाजिक आणि आर्थिक समान तत्वावर असावेत.

२) स्वयंसहाय्य गट स्त्री, पुरुष याचे स्वतंत्र किंवा दोन्ही मिळून असू शकतील.

३) गटामधील सर्व सभासदांचा सहभाग समान असावा.

४) गटातील सदस्यांची कर्ज व परतफेडीची वैयक्तिक व संयुक्त जबाबदारी गटाने स्वीकारावी
५) गटाने नियमीत बचत करून सामूहिक निधी निर्माण करावा.
६) गटाने बँकेमध्ये गटाच्या नावाने खाते उघडून त्याचे संचलन संयुक्तरित्या करावे.
७) दारिद्र्य रेषेखालील एका कुटुंबातील एकच सदस्य गटात राहील. दुसऱ्या गटात कुटुंबातील कोणताही सदस्य सामली होऊ शकणार नाही.

*** गटाच्या उत्पन्नाची साधने –**

- सभासदांची बचत रक्कम.
- बचतीवरील व्याज.
- जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा/बँकामार्फत खेळते भांडवल.
- बँकेकडील कर्ज गटातील सभासदांना कर्ज व अनुदान हे वैयक्तिक वा सामूहिकरित्या मिळण्यास पात्र होण्यासाठी आवश्यक त्या मार्गदर्शक तत्त्वानुसार गट सक्षम असणे आवश्यक राहील.

## ७.३ परिभाषिक शब्द

IRDP - Integrated Rural Development (एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम)

SC - Sheduled Caste

ST - Sheduled Tribe

NRHM - National Rural Health programme (राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान.)

SGSG - Swarna Jayant Gram Swarojgar Yojyan

GKY - गंगा कल्याण योजना

## ७.४ स्वयं अध्ययनाचे प्रश्न

१. समुदाय विकासाला अर्थ सांगून समुदाय विकासाची उद्दिष्ट्ये स्पष्ट करा.

,...............................................................................

,...............................................................................

,...............................................................................

२. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रामविषयी सविस्तर चर्चा करा.

,...............................................................................

,...............................................................................

,...............................................................................

३. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमाचे विश्लेषण करा.
४. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानासंबंधी विश्लेषणात्मक चर्चा करा.
५. स्वर्णजयती ग्राम स्वररोजगार योजनेची वैशिष्ट्ये लिहा.
६. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेतंर्गत स्वयंसाह्यता गटाची माहिती द्या.

## ७.५ सारांश

विकास ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचा प्रत्यक्ष संबंध हा न्यायाच्या तत्वाशी आहे किंवा उत्पन्नाच्या न्याय वितरणाशी आहे म्हणजे एखाद्या समुदायाचा विकास झाला वा नाही हे बघायचे असल्यास त्याच्या उत्पन्नात किती वाढ झाली हे न बघता निर्माण झाले. उत्पन्न हे समुदायातील सर्व स्तरापर्यंत पोहचले का नाही हे महत्त्वाचे असते. म्हणजेच विकासाला विचार करताना एकूण राष्ट्रीय उत्पन्नात सर्व स्तरातील लोकांच्या राहणीमाणात सातत्याने वाढ होणे आवश्यक आहे.

समुदायाचा विकास करण्यासाठी शासन विविध योजना राबवित असते. त्यात एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) महत्वाचा आहे. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम दारिद्र रेषेखालील कुटुंबाकरीता राबविण्यात आला. यात सिमांत शेतकरी, अनु. जाती, अनु. जमाती केंद्रबिंदू मानण्यात आला. त्यानुसार एप्रिल १९७८ मध्ये मर्यादित स्तरावर लागू करण्यात आला. २ ऑक्टोबर १९८० मध्ये याचा विस्तार संपूर्ण देशात करण्यात आला.

आरोग्य हा मानवी विकासासाठी आवश्यक घटक आहे. देशाच्या सामाजिक आर्थिक विकासासाठी आरोग्य हा घटक महत्वपूर्ण ठरतो. १९६० पर्यंत देशाचा सामाजिक आर्थिक विकास साध्य करण्यासाठी नैसर्गिक साधनाच्या वापरावर अधिक भर देण्यात आला; पण १९७० नंतर मात्र या दृष्टीकोनात बदल करण्यात आला. विकास साध्य करण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीच्या गुणात्मक वाढीवर भर देण्यात आला. त्यासाठी २०५-१२ या काळात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) राबविण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून देशातील ग्रामीण जनतेपर्यंत आरोग्यसेवा परिणामकारकपणे पुरविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. देशातील १८ राज्यात ही योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

तसेच ग्रामीण भागातील आर्थिक विकासासाठीसुद्धा शासनाने अनेक योजना राबविल्या आहेत. कारण कृषी हाच आजही ग्रामीण भागातील लोकांसाठी रोजगाराचा प्रमुख स्त्रोत ओ. पण या एकाच स्त्रोतावरून ग्रामीण भागाचा आर्थिक विकास होऊ शकणार नाही म्हणून दारिद्र निर्मूलन करण्यासाठी स्वर्णजयंती ग्राम स्वयरोजगार योजना १ एप्रिल १९९९ रोजी सुरू करण्यात आली. आजपर्यंत सुरू असलेली सर्वात व्यापक योजना आहे.

## ७.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) घोडके अमोल लक्ष्मण - भारतातील मानव संसाधन विकास. द युनिक ॲकॅडमी, पुणे (२०१३)
२) प्रा. डॉ. नाडगोंडे गुरुनाथ - ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे (२००२)

# घटक –८
# विकास आणि महिला सबलीकरण

**अनुक्रमणिका**

८.० उद्दिष्टे

८.१ प्रस्तावना

८.२ विषय विवेचन

८.२.१ खाजगीकरण, उदारीकरण, जागतीकीकरणाचा अर्थ

८.२.२ 'खा उ जा' चा शासकीय धोरणावर पडलेला प्रभाव

८.३ स्वयं अध्यन प्रश्न

८.८ सारांश

८.५ पारिभाषिक शब्द

८.६ संदर्भ सूची

## ८.० उद्दिष्टे :–

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

१. जागतीकीकरण, उदारीकरण, खाजगीकरणाचा अर्थ समजून घेता येईल.

२. 'खाउजा' चा भारतीय शिक्षण क्षेत्रावर झालेला परिणाम जाणून घेता येतील.

३. आरोग्य क्षेत्रावर 'खाउजा' चे परिणाम कळण्यास मदत होईल.

४. शासकीय रोजगार धोरणावर 'खाउजा' च्मा परिणामांचा प्रभाव समजण्यास मदत होईल.

५. शासनाने सार्वजनिक वितरण धोरण व 'खाउजा' चाप्रभाव समजून घेण्यास मदत होईल.

६. भारतीय समाजातील वंचीत घटकांवर 'खाउजा' प्रभाव जाणून घेण्यास मदत होईल.

## ८.१ प्रस्तावना :–

जगाच्या पाठीवरती सर्व राष्ट्राने जागतीकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणाची प्रक्रिया अवलंबली असून त्यामुळे सर्वच देश मोठे परिवर्तन घडून आलेले आढळून येते. प्रत्येक राष्ट्राने आपापल्या अर्थव्यवस्थेचा बारकाईने अभ्यास केला. त्यानुसारच खाजगीकरण, उदारीकरण व जागतीकीकरणाचे पर्व सुरु झाले. आर्थिक सुधारणेला वेग प्राप्त झाला. आज जगाच्या पाठीवरती वेगवेगळे राष्ट्र हे आपला व्यापार व्यवसाय ऐकमेकाच्या सहकार्याने करीत असतांना दिसून येतात. एका देशातून वस्तू दुसऱ्या देशात नेणे किंवा दुसऱ्या

देशातील वस्तू आपल्या देशात आणणे हा आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवसायाला स्वातंत्र्य नव्हते. पूर्वी चालत असलेल्या आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवसायावर वेगवेगळ्या राष्ट्राचे नियंत्रण, बंधन किंवा वेगवेगळे नियम अस्तित्वात होते. या नियमांचा विचार केला असता, व्यापार व्यवसायाला एवढी चालना मिळाली नव्हती. परंतू, आज रोजी वेगवेगळ्या राष्ट्रातील वेगवेगळ्या शासनांनी या आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवसायाच्या बाबतीत अनेक बंधने नियम केले असून व्यापार व्यवसायाला एक प्रकारची सुट दिलेली आहे. शासनाच्या या भूमिकेलाच उदारीकरण म्हणून ओळखले जाते.

खाजगीकरण जागतीकीकरणाशी संबंधीत असलेली प्रक्रिया आहे. जगामध्ये अनेक उद्योग व्यवसायाचे मोठ्या प्रमाणात खाजगीकरण होवू लागले. खाजगीकरणाच्या प्रक्रियेला वेग प्राप्त झाला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील अनेक उद्योग व्यवसायाची घसरण होवून ती खाजगी क्षेत्राकडे येत आहे. शासन देखील सार्वजनिक क्षेत्रातील तोट्यात चालत असलेल्या उद्योग व्यवसायांचे खाजगीकरण करत असतांना दिसून येत आहे. एखाद्या घटकांवरची मालकी ही एखाद्या व्यक्तीची वा समूहाची असणे त्याला खाजगीकरण असे म्हणता येईल.

खाजगीकरण, उदारीकरण व जागतीकीकरणाचा प्रभाव फक्त आर्थिक क्षेत्रावरच पडलेला आहे असे नाही तर तो समाजातील विविध घटकांवर देखील पडलेला आहे. त्यात शिक्षण, आरोग्य शिक्षण, रोजगार, सार्वजनिक वितरण व्यवस्था इ. घटकांचा समावेश होतो तसेच समाजातील विविध स्तरावर ही याचा परिणाम झालेला आहे. या खा.उ.जा. मुळे जगातील देशाचे परस्पर संबध वाढले. देश एकमेकांच्या जवळ आले. प्रत्येक देशातील सामाजीक संस्थांचा, संस्कृतीचा परिचय हा परस्परांना होवू लागला. त्याचा परिणाम समाज रचना व सामाजीक परिवर्तनावर मोठ्या प्रमाणात होवू लागला. आधुनिक, आधुनिक, विज्ञानपीठ संस्कृती पुढे येवू लागली. आर्थिक प्रगतीला गती मिळताना नवी सामाजीक मुल्य व नवी संस्कृती उदयास आली. याचा परिणाम म्हणजे सामाजीक परिवर्तनाला चालना मिळाली.

या प्रकरणात आपण जागतीकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाचा शिक्षण, आरोग्य, रोजगार, सार्वजनिक वितरण व्यवस्था यांवर पडलेल्या प्रभावांचा अभ्यास करणार आहोत.

## ८.२ विषय विवेचन :-

स्वातंत्र्यानंतर भारताने जलद आर्थिक विकासासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. वीज, कोळसा, पेट्रोल, लोखंड-पोलाद रेल्वे यांसारख्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या पामाभूत क्षेत्रात सरकारी मालकी व इतर क्षेत्रात खाजगी मालकी असे अर्थव्यवस्थेचे स्वरुप होते. सहकारी क्षेत्रास प्रोत्साहन व पाठींबा देवून दुर्बळ घटकांच्या विकासासाठी संधी दिली गेली. दुध, हॉटेल, बँका, कापड गिरण्या, विमा कंपन्या अशी सरकारी क्षेत्रात वाढ होत गेली.

राष्ट्रीय उत्पन्न संघटीत क्षेत्रातील रोजगार बचत, भांडवल निर्मिती, निर्यात, सरकारचे कर उत्पन्न इ. क्षेत्रात सरकारचा लक्षणीय वाटा होता. यात सरकारला आदर्श मालकाची

भूमिका पार पाडावी लागते. सरकारी उद्योगाची वाढ ही जागतीक प्रवृत्ती दुसऱ्या महायुद्धानंतर सुरु झाली. इंग्लंड मधील मजूर पक्षाचे राष्ट्रीयकरणाचे धोरण, सामाजीक सुरक्षा व आरोग्य सेवेत वाढ, कम्यूनिस्ट देशाचा विकास व वाढता दबदबा बँकेचाही गरीब देशांच्या आयात पर्यायी औद्योगीक धोरणास पाठींबा यामुळे सरकारी क्षेत्राच्या वाढीचे भारतात स्वागत झाले. त्या वाढीत कामगार अधिकारी व राजकारणी मंडळीचे हितसंबंध गुंतलेले असतात.

१९९०-९१ मध्ये भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवरील पत धोक्यात आली. याचा परिणाम म्हणून जुलै १९९१ मध्ये भारत सरकारने नवे आर्थिक धोरण जाहिर केले. उदारीकरण, जागतीकीकरण, खाजगीकरण ही या धोरणाची त्रिसूत्री होती. सरकारी नियंत्रणे, परवाना पद्धती, राखीव क्षेत्र, सरंक्षण यांची गुंतवणूक व आयात या सर्व गोष्टी बाजार यंत्रणेनुसार खुलेपणाने होवू द्यायच्या आणि सरकारी उद्योगाचे खाजगीकरण करायचे असा संकल्प करण्यात आला.

खाजगीकरण, उदारीकरण, जागतीकीकरणाचे समर्थक व विरोधक परस्पर विरोधी मते मांडतात. खा.उ.जा. धोरणाचे समर्थक हे शासकीय हस्तक्षेप व सार्वजनिक क्षेत्र यांना नाकारतात. त्यांच्या मते, सार्वजनिक क्षेत्रामध्ये काम करण्याची वृत्ती नसते. मानवी क्षमतांचा पूर्णपणे वापर केला जात नाही. नोकरशाहीमुळे वेळ व दुर्मिळ स्त्रोत वाया जातात. राजकीय व्यक्ती यांचा स्वत:च्या फायद्यासाठी वापर करतात. नवनिर्मिती व संशोधन वृत्ती मारली जाते. वेळेत निर्णय घेतले जात नाहीत. भांडवली - उत्पादन गुणोत्तराचे प्रमाण अतिशय कमी असते. एकूणच सार्वजनिक क्षेत्रामध्ये शासकीय हस्तक्षेप व नियंत्रणामुळे अत्याधीक कार्यक्षमता असते. असे अनेक मुद्दे खा.उ.जा. च्या समर्थनार्थ मांडले जातात.

खा.उ.जा. च्या विरोधात ही अनेक मुद्दे मांडले जातात. ते म्हणजे खा.उ.जा.ची निति बाजारपेठ मागणीकडे दुर्लक्ष करुन पुरवठ्यावरच लक्ष केंद्रीत केले जाते. पायाभूत सुविधांकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केले जाते. खाजगी क्षेत्र हे स्पर्धेचे क्षेत्र आहे. यात लहान उद्योग टिकू शकत नाहीत. बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी निर्माण होते. त्याच बरोबर परराष्ट्रीय कंपन्या ह्या देशातील पर्यावरणाचा विचार न करता नैसर्गीक साधन संपत्तीची लुट करतात. एकूणच त्या देशातील पर्यावरण धोक्यात येते.

असे अनेक मुद्दे हे खा.उ.जा. च्या समर्थनार्थ व विरोधात मांडले जातात. त्याची सविस्तर या प्रकरणात आपण करणार आहोत.

## ८.२.१ खाजगीकरण, उदारीकरण व जागतीकीकरणाचा अर्थ :-

### १. खाजगीकरण :-

खाजगीकरण ही जागतीकीकरणाच्या प्रक्रियेतील एक महत्वाची संकल्पना आहे. सध्या जगामध्ये नव्या आर्थिक धोरणामध्ये खाजगीकरण महत्वाचे मानले जाते. सर्वसाधारणपणे १९९० नंतर खाजगीकरणात वेगाने वाढ झाली. सार्वजनिक क्षेत्र अकार्यक्षम बनणे त्यातून तोटा वाढत जाणे. शिवाय सार्वजनिक क्षेत्रातील भ्रष्टाचार आणि दिरंगाई अशा विविध कारणांमुळे खाजगीकरण अस्तित्वात आले. सार्वजनिक उद्योगातील मालकी एखाद्या संस्थेकडे किंवा व्यक्तीकडे देण्याला खाजगीकरणे असे म्हणतात. खाजगीकरणात खाजगी

क्षेत्राच्या उत्पादनासाठी स्वातंत्र्य दिले जाते. सार्वजनिक उद्योगाचे व्यवस्थापन खाजगी संस्थेकडे वा व्यक्तीकडे दिले जाते. खाजगी करणाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

* जॉन नेलिस यांच्या मते ''खाजगीकरण म्हणजे साधन सामुग्रीच्या वितरणासाठी वैयक्तिक संबंध असून, सरकारच्याा निममानुसार चालत असलेले व्यवसाय होय.''

* द.रा. पेंडसे यांच्या मते, ''खाजगीकरण म्हणजे सरकारचा आर्थिक व्यवहारातील सहभाग कमी करणे होय''

डेव्हिड हेरॉल्ड यांच्या मते, ''खाजगीकरण म्हणजे साधन सामग्रीच्या वितरणासाठी बाजाराधिष्ठीत पद्धतीचा स्विकार करण्याची प्रक्रिया होय.''

वरील व्याख्येवरुन असे स्पष्ट होते की, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग व्मयवसायाशी मालकी खाजगी व्यक्ती किंवा संस्था अथवा कंपन्या यांच्याकडे हस्तांतरीत करणे होय. समाजवादी अर्थव्यवस्थेमध्ये जवळपास उद्योग व्यवसाच हे सरकारच्या मालकीचे असतात तर, खाजगी उद्योगाला कमी महत्व दिले जाते. पण, सरकारच्या नवीन धोरणामुळे सरकारी उद्योग व्यवसायाची मालकी खाजगी संस्थेकडे हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया किंवा अनेक उद्योग व्यवसायासाठी देशातील वा विदेशतील विविध उद्योग समूहांना स्वतंत्र परवाने देणे व त्यांच्या खाजगी उद्योग व्यवसायावर बाहेरुन निमंत्रण ठेवणे किंवा सरकारी उद्योग व्यवसामयामध्ये ५०% भांडवल हे खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरीत करण या प्रक्रियेलाच खाजगीकरण असे म्हंटले जाते.

**२. उदारीकरण :-**

जागतीकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये उदरीकरण हा महत्वाचा घटक आहे. जगात येणारे आर्थिक संकट टाळण्यासाठी म्हणून उदारीकरण अस्तित्वात आले. उदारीकरणाला उदारमतवादी धोरण अथवा मुक्त अर्थव्यवस्था असे म्हणतात. या अगोदर देशादेशातील व्यापाराच्या आयात आणि निर्यातीबद्दल बरेच कडक नियम होते. त्यामुळे व्यापार कमी प्रमाणात होत होते. व्यापार पूर्णपणे सरकारच्या नियंत्रणात होते. त्यामुळे हे निमंत्रण काढून टाकावे आणि संपूर्ण व्यापार खुला करावा याला उदारीकरण असे म्हणतात. उदारीकरणाची व्याख्या पुढीलप्रमाणे -

डॉ. एम. रामनजनेयुल :- ''उदारीकरण म्हणजे आयात निर्यात व्यवहारावर असलेले अनिष्ठ निर्बंध कमी करणे होय.''

डॉ. बामोल :- ''अर्थव्यवस्थेतील कोणत्याही क्षेत्रात उत्पादन गुंतवणूक आणि वितरण यामध्ये देशी विदेशी व्यक्तींना स्वतंत्र असणे यालाच उदारीकरण म्हणतात.''

डॉ. अत्री व्ही.एन. :- ''व्यापारातील निर्यात विरोधी प्रवृत्ती कमी करण्यासाठी अधिक विस्तृत किंमत पद्धतीचा वापर करणे, नियमांचे शिथलीकरण करणे व अर्थव्यवस्थेची कार्यक्षमता व स्पर्धा वाढविणे म्हणजे उदारीकरण होय.''

वरील व्याख्यांवरुन असे स्पष्ट होते की, उदारीकरण ही एक राष्ट्रीय व

आंतरराष्ट्रीय व्यापार, व्यवसाय करीत असतांना व व्यापार व्यवसायावरती संबंधीत राष्ट्रांनी अनावश्यक निर्बंध या व्यापारावर लावू नये अशी अपेक्षा उदारीकरण या संकल्पनेची

असते. आंतरराष्ट्रीय व्यापार हा व्यवसाय हा विना अडथळ्यांनी सुरु रहावा हाच उदारीकरणचा हेतू आपल्याला दिसून येतो.

**३. जागतीकीकरण :-**

जागतीकीकरण ही आर्थिक राजकीय, सामाजीक तसेच सामाजीक तसेच सांस्कृतीक स्वरुपाची प्रक्रिया आहे. ही मुख्यत: आर्थिक प्रक्रिया असून जागतीकीकरणाचा सांस्कृतीक, राजकीय तसेच सामाजीक क्षेत्रावर पडलेला आहे. प्रत्येक देशाची स्वतंत्र अशी अर्थव्यवस्था आहे. जागतीकीकरणामुळे या अर्थव्यवस्था एकमेकांवर अवलंबून आहेत. आपल्या देशाचा आर्थिक विकास व्हावा म्हणून विविध देश परस्परांना सहकार्य करतात. परस्परातील आर्थिक गुंतवणूक करतात. यातूनच विविध देशात आर्थिक, राजकीय, सामाजीक, सांस्कृतीक प्रक्रिया होतात यालाच सर्वसाधारणपणे जागतीकीकरण असे म्हणतात. जागतीकीकरणाचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

* दिपक नायर :- ''जागतीकीकरण म्हणजे राष्ट्राराष्ट्राच्या सिमा ओलांडून अस्तित्वात आलेला व्यवसाय होय.''
* चार्लस् हिल :- ''परस्परावलंबन आणि एकात्मता यामधून जागतीक अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी केलेला बदल म्हणजे जागतीकीकरण होय.''
* सी.पी.खेर :- ''जागतीकीकरण म्हणजे व्यापार, अर्थ, तंत्रज्ञान, दळणवळण, पर्यावरण, लोकांचे राहणीमान, समाजव्यवस्था व संस्कृती अशा सर्व क्षेत्रांमध्ये घडून येणारे परिवर्तन होय.''

वरील व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की, जागतीकीकरण ही एक आंतरराष्ट्रीय

सर्वांना स्वतंत्र असलेली व्यापार व्यवस्था होय. या जागतीकीकरणामध्ये सिमापार वेगवेगळे उत्पादन भांडवली सेवा आणि धार्मिक सामाजीक वेगवेगळ्या क्रिया घडलेल्या असतात. जगाच्या विविध क्षेत्रात राहणाऱ्या लोकांमध्ये आर्थिक, सामाजीक, संस्कृती संबंध दर्शविणारी ही एक प्रक्रिया आहे. जगातील जवळपास सर्वच देशात जागतीकीकरण झालेले दिसून येते.

## ८.२.२ खाजगीकरण, उदारीकरण व जागतीकीकरणाचा शासकीय धोरणावर पडलेला प्रभाव :-

* **शिक्षणावर जागतीकीकरण आणि उदारीकरणाचा प्रभाव :-**

खाजगीकरण, उदारीकरण व जागतीकीकरणाच्या प्रक्रिये दरम्यान

शिक्षणाच्या स्वरुपामध्ये बदल होत गेला. शिक्षणाचे पारंपरिक स्वरुप बदलून

त्याचे व्यापारीकरण होण्यास १९९० च्या दशकानंतरच सुरुवात झाली. 'खाउजा' च्या प्रक्रियेमुळे शिक्षण क्षेत्रासमोर मोठी आव्हाने निर्माण झाली आहेत. पण त्याचबरोबर विकासाच्या संधी देखील निर्माण झालेल्या दिसून येतात. या संधीचा पुरेपूर फायदा घ्यावयाचा असेल तर, आपल्याला काही सुधारणा वा योजना बनवाव्य लागतील म्हणजे

'खाउजा' चा दुष्परिणाम भारतीय शिक्षणव्यवस्थेवर होणार नाही.

'खाउजा' चे परिणाम अभ्यासावयाचे असतील तर ते दोन टप्प्यात अभ्यासावे लागतील.

१. आव्हाने वा दुष्परिणाम

२. निर्माण झालेल्या संधी वा सकारात्मक परिणाम

**१. 'खाउजा' चे शिक्षणाच्या क्षेत्रावर पडलेला दुष्परिणाम / आव्हाने :-**

शिक्षणाचे पारंपरिक उद्दिष्ट हे विद्यार्थ्यांचा विकास करणे, नैतिक मुल्याची जपणूक करणे होते. परंतू, जागतीकीकरणामुळे, उदारीकरणमुळे, खाजगीकरणामुळे याचे पारंपरिक स्वरुप बदलले आहे. शिक्षणाचे 'सेवे' मध्ये रुपांतर होवून तिचा उद्देश 'नफा कमविणे' हा बनलेला आहे. 'खाउजा' चे दुषपरिणाम व आव्हान भारतीय धोरणावर पडलेले आहेत ते पुढीलप्रमाणे-

**१. विद्यापीठांवर पडलेला प्रभाव :-**

विद्यापीठ ही ज्ञानदानाची व प्रसाराची केंद्र मानली जातात. परंतू, 'खाउजा' च्या प्रभावामुळे हे स्वरुप बदलून विद्यापीठ हे 'सेवा' पुरविणारे केंद्रे बनतील. विद्यापीठांना स्वायतत्ता द्यावी लागेल. त्याचबरोबर परदेशी विद्यापीठे भारतात येऊ घातली आहेत. त्यामुळे भारतीय विद्यापीठांना पारंपरिक स्वरुप बदलून जागतीक पातळीवरील विद्यापीठांना स्पर्धा करण्यासाठी मुलभूत धोरणात बदल करावा लागेल.

**२. विचारधारेतील बदल :-**

रार्बट केविन म्हणतात की, जागतीकीकरणामुळे शिक्षणाचे आधूनिककडून उत्तर-आधूनिक अवस्थेकडे संक्रमण झालेले आहे. ज्यामुळे शिक्षण व्यवस्थेवर पूर्वीच्या राजकीय किंवा सामाजीक उद्देशांचा, विचारांचा प्रभाव नष्ट होवून जागतीक विचारधारेचा अधिक प्रभाव निर्माण होतो आहे.

**३. वस्तूकरण** (Commodification) **:-**

'खाउजा' चा सर्वात महत्वाचा परिणाम म्हणजे 'ज्ञानाचे वस्तू' मध्ये रुपांतर होत आहे. म्हणजेच ज्ञानाची 'खरेदी-विक्री' करता येवू शकते. याचा सरळ सरळ प्रभाव भारतातील मध्यम, कनिष्ठ वर्गावर, मागासलेल्या जातीवर मोठ्या प्रमाणात होणार आहे. कारण, ज्ञानाच्या या भरमसाठ शैक्षणिक शुल्काचा भार त्यांना पेलावणार नाही. शिक्षणाच्या प्रवाहात त्यांना स्थान राहणार नाही.

**४. खाजगीकरण :-**

GAT करार स्विकारल्यामुळे ज्या शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये शासनाचा पूर्ण सहभाग नाही अशी सर्व क्षेत्र खाजगी क्षेत्रासाठी खुली झाली. प्रामुख्याने उच्च शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये खाजगी गुंतवणकदार, संस्था व विद्यापीठे यांचा प्रवेश झाला. परिणामी गुंतवणूक केलेल्या रक्कमेचा परतावा म्हणजेच नफा मिळविणे हाच यांचा हेतू असतो.

**५. मागास घटकांवर परिणाम :-**

अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, स्त्रिया या घटकांवर मोठा प्रभाव पडणार आहे.

ज्यांच्याकडे पुरेसे आर्थिक पाठबळ नसते, असे शिक्षणाच्या बदललेल्या व्यवस्था स्वरुपामुळे शिक्षणापासून वंचीत राहतील. कारण, त्यांना वाढत्या शुल्कांचा भरणा साहित्याचे वाढते दर इ. मुळे उच्च शिक्षण घेणे त्यांना परवडणार नाही. समाजामध्ये एक मोठी दरी निर्माण होईल. श्रीमंत वर्ग जो शिक्षणाची मक्तेदारी त्याच्याकडे असेल दुसरा मागास वर्ग जो शिक्षणापासून

**६. मानकीकरणाचा अतिरेक (एुश्रशीर्ळींश डींरपवरीवळीरींळेप) :-**

जागतीकीकरणामुळे व उथरीकरणाच्या प्रभावामुळे शिक्षणाच्या भारतीय पद्धती व शिक्षणाचा अभ्यासक्रम, मुल्यांकन पद्धती व शिक्षणाचा अभ्यासक्रम मुल्यांकन पद्धती यांच्या बाबतचा मानकीकरणाचा अतिरेक होण्याचा मोठा धोका आहे. प्रसार माध्यमांमुळे व जागतीकीकरण, उदारीकरणाचा रेटा यामुळे जागतीक स्तरावर सारख्याच पद्धतीचा शिक्षणाचा स्तर असेल व सारखेच प्रशिक्षण असेल परिणामी भारतीय शिक्षण पद्धत व ज्ञानव्यवस्थेतील विविधता नष्ट होईल.

**७. माहिती व संप्रेषणाचा वापर :-**

जागतीकीकरण व उदारीकरणाच्या काळामध्ये शिक्षण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात माहिती व काँप्रेषणाचा वापर होवू लागला आहे. नवीन ज्ञान निर्मिती व त्याचा प्रचार प्रसार सुद्धा याच माध्यमातून होवू लागला आहे. त्याचा परिणाम असा होतो आहे की, ग्रामीण भागातील विद्यार्थी, दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थी यांच्या पर्यंत अशी साधने पोहचू शकत नाहीत वा उपलब्ध होत नाहीत. परिणमी ते या प्रक्रियेत सामील होवू शकत नाहीत. त्यामुळे ते नवीन ज्ञानापासून वंचीत राहतील.

**८. मुल्यशिक्षणावरील प्रभाव :-**

उदारीकरण व जागतीकीकरणामध्ये शिक्षणाचा मुख्य हेतू आर्थिक प्राप्ती करणे हाच होवू घातला आहे. मुल्यशिक्षण व त्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा समतोल विकास हे उद्दिष्ट पूर्णपणे बाजूला पडले आहे. परिणामी फक्त उद्योगधंद्यासाठीचे कौशल्य असलेले मनुष्यबळ निर्माण केले जात आहे. त्याचबरोबर विदेशी व परकीय संस्कृतीच्या प्रसारामुळे राष्ट्रीय मुल्याची अधोगती होवू शकते.

**९. विद्यार्थ्यांची फसवणूक :-**

अविकसीत व विकसनशील देशात उच्च शिक्षणाचे प्रभावीपणे निमंत्रण केले जात नाही तसेच शिक्षणाचा स्तर देखील उच्च नसतो. अशा परिस्थितीमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्या पैशाच्या बळावर बाजारपेठ काबीज करतील. अशा वेळेस ज्यांना मान्यता नाही अशा संस्था विद्यार्थ्यांची फसवणूक करु शकतात.

**१०. पारंपरिक विद्यापीठ स्पर्धेत मागे :-**

भारतामध्ये एकूण शिक्षणावर होणारा शासकीय खर्च, गुंतवणूक ही एकूण ३.०% च्या पेक्षा कमी आहे. यामुळे भारतीय विद्यापीठ, शिक्षण संस्था यांचा दर्जा, पायाभूत सोयी, सुविधा यांचा दर्जा अतिसामान्य आहे. जागतीकीकरण, उदारीकरण या प्रक्रियेमुळे विदेशी विद्यापीठ भारतात येवू लागले आहेत. या विद्यापीठाशी भारतातील पारंपरिक विद्यापीठ

स्पर्धा करु शकणार नाहीत.

अशा प्रकारच्या अनेक आव्हानांना भारतीय उच्च शिक्षण क्षेत्रातील संस्थांना सामोरे जावे लागणार आहे.

**जागतीकीकरण व उदारीकरणामुळे शिक्षण क्षेत्रावर झालेले सकारात्मक परिणाम :–**

**१. संशोधनाचा वाव :–**

संशोधनासाठी दिला जाणारा निधी अल्प असल्यामुळे तसेच संशोधन क्षेत्राकडे होत असलेले दुर्लक्ष यामुळे आपल्या संशोधनाचा दर्जा हा जागतीक पातळीवर टिकणारा नाही. पण, भारतीय संशोधन संस्थांनी जर विदेशी विद्यापीठाशी हात मिळवणी केली तर, हुशार विद्यार्थ्यांना संशोधनासाठी चालना मिळेल. त्यांना आर्थिक मदत होत असल्या कारणाने नवीन संशोधन पुढे येतील.

**२. शिक्षणाच्या दर्जात वाढ :–**

जागतीकीकरण, उदारीकरण यांमुळे आंतर व वेळ याची मर्यादा दुरु झाली, राष्ट्रे जवळ आली. त्यातून विविध स्तरावर जसे विद्यार्थी, शिक्षक, संस्था, विद्यापीठ यांच्याात अभिक्रिया निर्माण होवून कधी

**३. विद्यार्थ्यांना संधी :–**

भारतातील गुणवत्ता असलेल्या अनेक विद्यार्थ्यांना संस्था व जागांची उपलब्धता नसल्याने शिक्षणापासून वंचीत रहावे लागते. जागतीकीकरण, उदारीकरणाच्या प्रभावामुळे भारतातील विद्यार्थ्यांना भारतात राहून जागतीक स्तरावरच्या संस्थांमध्ये शिक्षण घेता येईल व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळेल.

**४. विकेंद्रीकरणाला वाव :–**

जागतीकीकरणामुळे शिक्षण क्षेत्रातील शासकीय नियंत्रणे कमी होवून शैक्षणिक संस्था मोठ्या प्रमाणात स्वायतत्ता मिळेल. त्यामुळे निर्णय स्वातंत्र्य मिळेल. नवीन उपाययोजना व नवीन शैक्षणिक उपक्रम राबविता येईल. ज्यामुळे सर्व स्तरावरील घटकांपर्यंत शिक्षण पोहचण्यास मदत होईल.

**५. तांत्रिक व व्यवस्थापन पद्धतीचे हस्तांतरण :–**

मुक्त बाजारापेठांमुळे विदेशी गुंतवणक संस्था, विद्यापीठे विकसनशील राष्ट्रांमध्ये आपले अस्तित्व निर्माण करु लागले आहेत. अशा जागतीक स्तरावरील संस्था आपल्यासोबत प्रगत तंत्रज्ञान व आधूनिक व्यवस्थापनाच्या पद्धती देखील घेवून जातात. ज्याचा फायदा देशातील इतर संस्थांना होतो. विकसीत व विकसनशील राष्ट्रांमधील गुणवत्ता तंत्रज्ञानाची अद्यावतता, व्यवस्थापन यांसारख्या बाबींमधील मोठी दरी शिक्षणाच्या जागतीकीकरणाद्वारे कमी होईल.

**६. परकीय चलनाचा स्त्रोत :–**

भारतासारखी विकसनशील राष्ट्रे ही जागतीक स्तरावरील गुंतवणूकदारांना मोठी

बाजारपेठ आहे. त्यामुळे जागतीक स्तरावरच्या मोठमोठ्या संस्था, विद्यापीठे अशा देशामध्ये गुंतवणूक करण्यास इच्छूक

असतात. त्यामुळे विदेशी चलन भारतात मोठ्या प्रमाणात गुंतवले जाईल तसेच विदेशी विद्यार्थी देखील भारतात येवून शिक्षण घेवू शकतात. त्यामुळे सुद्धा विदेशी चलन प्राप्त होवू शकते.

**जागतीकीकरण व उदारीकरणाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी केलेल्या उपाययोजना किंवा धोरण :–**

१. 'COFIE' यंत्रणा विकसीत :-

भारतातील केंद्र शासनाने केंद्रीय मान संसाधन विकास मंत्रालयाच्या माध्यमातून 'COFIE' ही यंत्रणा विकसीत करण्यात आलेली आहे. त्यामार्फत आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्थांना भारतामध्ये प्रवेशाची मान्यता देण्यात येईल. त्यामुळे बेकायदेशीर संस्थांचा प्रवेश रोखता येईल.

२. TWINNING PROGRAMME

या कार्मक्रमाच्या माध्यमातून परदेशी विद्यापीठासोबत भारतीय विद्यापीठांना भागीदारी करण्यास प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे दोन्ही विद्यापीठांना परस्परांच्या सोयी सुविधांचा लाभ घेता येतो. दर्जा सुधारता येतो. विद्यार्थ्यांना दोन्ही देशाच्या पदव्या प्राप्त करता येतात.

३. PIHEAD (Promotion of India Higher Education Abroad)

या कार्यक्रमाच्या माध्यमातून उच्च शिक्षणाच्या निर्यातीमधील संधी शोधण्यासाठी व प्रोत्साहन देण्यासाठी UGC च्या माध्यमातून हा कार्यक्रम राबिला जातो. डॉ. अरुण निगवेकर यांच्या मते, भारतीय मुल्य शिक्षणाच्य सेवेची निर्यात क्षमता IT ही क्षेत्राच्या १० पटीने मोठी आहे.

४. IT ACTION PLAN :-

माहिती व तंत्रज्ञान कृती आराखडा जुलै १९९८ मध्ये संसदेत मंजुर करण्यात आला. त्यानुसार २००३ पर्यंत ५० अब्ज डॉलरची खढ सेवा निर्यात करणे. २००३ पर्यंत प्रत्येकाला IT सेवा उपलब्ध करुन देणे तसेच जागतीक स्तरावरील सुविधा निर्माण करण्याचे उद्दिष्ट निर्धारीत करण्यात आले.

५.निर्धारीत प्रशिक्षण कार्यक्रम :–

विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत विद्यापीठ व महाविद्यालयांना संगणक केंद्र व संगकण सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी विशेष अनुदान देण्यात येते. आतापर्यंत १३० विद्यापीठांना अशा प्रकारे अनुदान देण्यात आले आहे. याशिवाय १३५ संगणक प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आले आहे.

६. द्विपक्षीय करार :–

दोन देशांमध्ये शैक्षणिक देवाण– घेवाण वाढून शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी शासनाने

विविध राष्ट्रांसोबत असे करझिर केले आहेत. ज्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, तज्ज्ञांची आदान प्रदान कार्यक्रम राबविले जातात. उदा. भारत, अमेरिका दरम्यानचा २०१० साली झालेला २१ व्या शतकातील ज्ञान पुरस्कार.

या अशा अनेक कार्यक्रमाबरोबरच विद्यापीठ अनुदान आयोगाने देखील परदेशी शिक्षण संस्थांबाबत मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत. त्यानुसार भारतात येवू इच्छिणाऱ्या संस्थांना पुढील तत्व मान्य करावे लागतील.

१. मुळ देशामध्ये कायदेशीर मान्यता असावी.

२. दिल्या जाणाऱ्या पदव्या दोन्ही देशांना मान्य असाव्यात.

३. त्या देशामध्ये भारतीय विद्यापीठात देखील प्रवेश मिळावा.

*** खाजगीकरण :-**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे व सामाजीक विकासाचे एक महत्वपूर्ण साधन आहे. कोणत्याही भेदभावाशिवाय शिक्षण मिळाले पाहिजे असे मार्गदर्शक तत्व राज्यघटनेत कलम ४७ मध्ये नमूद केले आहे. सुरुवातीला ही जबाबदारी शासनाची होती. पण नंतर कलम २१ (अ) अंतर्गत 'शिक्षण' हे मुलभूत अधिकारामध्ये रुपांतरीत करण्यात आले आहेत. परंतू, शिक्षणासारखे महत्वाचे कार्य फक्त शासनाकडून प्रभावीपणे पार पाडले जावू शकत नाही. तर, त्यासाठी खाजगी क्षेत्राचाही समावेश असावा अशी शिफारस १८८२ मध्ये हंटर आयोगाने स्वातंत्र्यापूर्वीच केली होती. त्याच काळात बऱ्याच समाजसुधारकांनी व समाजसेवी संस्थांनी शासनाची कुठल्याही प्रकारची मदत न घेता शिक्षणाचा प्रचार व प्रसाराचे काम केले होते. स्वातंत्र्यानंतर शासनाने 'कल्याणकारी भूमिका' स्वीकारली. त्यामुळे शिक्षणाच्या प्रचार, प्रसाराची जबाबदारी ही शासनाकडे आली मात्र या प्रकारच्या कार्यासाठी मोठ्या प्रमाणात साधन सामग्रीची गरज भासू लागली. परिणमी हळू हळू शासनाचे या क्षेत्राकडे दुर्लक्ष होवू लागले. सर्वसाधारणपणे एकूण घरगुती उत्पादनाच्या (GDP) च्या ६.०% खर्च शिक्षणावर होणे गरजेचे आहे. पण, संसाधनांच्या अभावी हा खर्च २-३% एवढाच होवू लागला. त्यामुळे शिक्षणाचा प्रभावी प्रचार-प्रसार कराण्यासाठी खाजगी क्षेत्राची गरज भासू लागली. त्यामुळे शासनाने खाजगी क्षेत्राला शिक्षण खुले केले.

१९९१ नंतर भारताने 'खाउजा' धोरणाचा स्वीकार केला. १९९१ नंतर मात्र शिक्षण हे सेवा कार्य राहिले नाही. तर, तो व्यवसाय झाला. त्याच्याकडे 'नफा-तोटा' या दृष्टीकोनाने बघीतले जावू लागले. त्यातून मोठ्या प्रमाणात शिक्षणाच्या खाजगी संस्थांचे पेव फुटले.

**शिक्षणाच्या खाजगीकरणाचा अर्थ :-**

'शासन निमंत्रीत संघटना किंवा उद्योग समूह यांच्यावर खाजगी चालकांचे निमंत्रण प्रस्थापीत होणे म्हणजेच खाजगीकरण म्हणता येईल.'

म्हणजेच खाजगीकरणात व्यवस्थापन व नियंत्रण या दोन्ही घटकांचा समावेश होतो. खाजगीकरण हे पूर्णत: वा अशंत: असू शकते.

**खाजगीकरणाचा शिक्षणक्षेत्रावर सकारात्मक प्रभाव :-**

खाजगीकरणामुळे शिक्षणक्षेत्रावर अनेक परिणाम झालेले आहेत. त्यात काही परिणाम हे सकारात्मक तर, काही परिणाम हे नकारात्मक झालेले दिसून येतात. यातील सकारात्मक प्रभावाची सविस्तर चर्चा पुढीलप्रमाणे आहे.

**१. शासनावरील खर्चाचा भार कमी :-**

शिक्षण क्षेत्रातील खाजगी क्षेत्राच्या सहभागामुळे शासनाचा खर्चाचा भार कमी झाला. परिणामी शासन तो खर्च व पैसा इतर विकासात्मक कार्याकडे वळणे शक्य झाले.

**२. शिक्षणाच्या प्रसाराला सहाय्य :-**

खाजगीकरणाच्या प्रक्रियेमुळे अनेक खाजगी संस्था शिक्षण क्षेत्रात आल्या. त्याचा परिणाम असा झाला की, शिक्षणाचा प्रसार वेगाने होवू लागला. लोकांच्याा शिक्षणाच्या वाढत्या अपेक्षांची पूर्तता या वाढ होवू लागली. ज्यात शासन मोठ्या प्रमाणात आर्थिक गुतवणूक करु शकत नव्हते. तिथे खाजगी संस्था गुंतवणूक करु लागल्या.

**३. गुणवत्तापूर्ण शिक्षण :-**

खाजगीकरणामुळे संपूर्ण क्षेत्रात स्पर्धात्मक वातावरण निर्माण होऊन सर्वच शैक्षणिक संस्था विशेषत: शासकीय संस्था आपल्यामध्ये सुधारणा घडवून आणतील व शासकीय शैक्षणिक दर्जा सुधारेल. एकंदरीत गुणवत्तापूर्ण व उच्च दर्जाच्या शिक्षणाची उपलब्धता होईल.

**४.शैक्षणिक सुविधांचा दर्जाचा स्तर सुधारला :-**

शैक्षणिक दर्जाचा स्तर सुधारला तर, विदेशी विद्यार्थ्यांना विशेषकरुन विकसीत व अविकसीत राष्ट्रांतील विद्यार्थ्यांना आकर्षीत करता येईल. त्या माध्यमातून देशाला परकीय चलन प्राप्त होईल.

**५. कौशल्याचा विकास :-**

खाजगी संस्थांचा शैक्षणिक क्षेत्रातील प्रवेशामुळे शैक्षणिक सुविधात वाढ होते. परिणामी देशातील मनुष्यबळाचा विकास होईल. विविध शोधांमुळे माहितीच्या क्रांतीमुळे त्याचा जास्तीत जास्त फायदा भारतातील नागरिकांना मिळेल व त्यातून देशाच्या मनुष्यबळाचा विकास होईल. विविध स्वरुपाचे कौशल्य निर्माण होण्यास मदत होईल.

**६. समतोल विकास :**

ज्ञानाची दरी कमी करण्यामध्ये खाजगी क्षेत्राचा हातभार लाभेल. त्यामुळे ग्रामीण, शहरी, पुढारलेली राज्ये, मागास राज्ये, विकसीत, अविकसीत राष्ट्रे असा भेद कमी होईल.

असे अनेक फायदे खाजगीकरणामुळे झालेले आहेत.

## खाजगीकरणामुळे झालेले दुष्परिणाम :-

१. मागास अतिमागास राहण्याची शक्यता :-

समाजातील आर्थिक, सामाजीक मागास घटकांच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी नाकारल्या जातील. त्यामुळे ते शिक्षणाच्या मुलभूत हक्कापासून वंचीत राहतील.

**२. समानतेचे तत्व पाळले जाणार नाही :-**

शिक्षणाच्य खाजगीकरणामुळे राज्यघटनेचे समानतेचे तत्व पाळले जाणार नाही. घटनेने भारतातील सर्व नागरिकांना समान संधी उपलब्ध करुन देण्याची हमी दिली आहे. मात्र शिक्षण क्षेत्रातील खाजगीकरणामुळे जे श्रीमंत असतील, ज्यांच्याकडे पैसा असेल त्यालाच शिक्षणाच्या संधी उपलब्ध होतील. शिवाय समानतेच्या तत्वालाही हरताळ फासला जाईल.

**३. मनमानी प्रवृत्ती निर्माण होईल :–**

शिक्षण क्षेत्रातील खाजगीकरणामुळे काही व्यक्तींची, संस्थांची, गटाची मक्तेदारी निर्माण होईल. त्यांना वाटेल तसे निर्णय घेतील. शासनाचे कुठलेही नियंत्रण नसल्यामुळे मनमानी वाढू शकेल तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी याच्या बाबतीत ही 'Hire and Fire' धोरण राबवून मनमानीपणे त्यांचा वापर केरुन घेण्याची प्रवृत्ती वाढेल. त्यामुळे एका प्रकारे शोषणास प्रोत्साहन मिळेल.

**४. विद्यार्थ्यांचे शोषण :–**

खाजगी शिक्षण संस्था विविध सोमी, सुविधांच्या नावाखाली भरमसाठ शैक्षणिक शुल्क आकारतील. त्यातून विद्यार्थ्याचे आर्थिक शोषण होईल. त्यामुळे शिक्षणाचे सेवेचे तत्व सोडून बाजारीकरणाला सुरुवात होईल.

**५. विशिष्ट विषयांचाच विकास :–**

खाजगीकरणाच्या प्रक्रियेमध्ये ज्या विषयाला वा घटकाला मागणी आहे तोच कोर्स खाजगी संस्था चालवतील यात इतर ज्या सामाजीक जाणिवा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होवू शकतील पण त्याचे व्यावसायीक मूल्य नसेल अशा विषयांना व कोर्सेसेना मागणी उरणार नाही व ती हळू हळू मागे पडतील. उदा. सामाजीक शास्त्र

**६. फसवणूकीला प्रोत्साहन :–**

खाजगी संस्था शिक्षणक्षेत्रात आल्यामुळे त्यांच्यात स्पर्धा सुरु होईल. एकमेकांवर मात करण्यासाठी खोटी आश्वासने देवून विद्यार्थी, पालक इ. कडून भरमसाठ शैक्षणिक शुल्क आकारले जातात. पण, प्रत्यक्षात मात्र तशा सुविधा दिल्या जात नाहीत. परिणामी विद्यार्थी व पालकाची फसवणूक होते.

**७. संशोधन कार्याकडे दुर्लक्ष :–**

शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे शिक्षण क्षेत्राकडे ‘सेवा’ म्हणून न बघता फायद्या-तोट्याच्या उद्देशाने बघितले जावू लागले आहे व त्याच प्रकारचे कोर्सेस चालविले जातात. समाजाच्या मुलभूत विकासासाठी आवश्यक असणारे संशोधनाकडे दुर्लक्ष केले जाते.

वरील सर्व मुद्द्यांचा विचार करता, शिक्षणाची संधी समाजाच्या सर्व स्तरावरील घटकांना प्राप्त होण्यासाठी दोन्ही क्षेत्राचे अस्तित्व असणे गरजेचे आहे. शासनाची भूमिका या खाजगी क्षेत्रावर नियंत्रण ठेवणारी असली पाहिजे. म्हणजेच नफ्यासोबत गुणवत्तेला संधी, समानतेसोबत आर्थिक बाजू, उपयुक्ततेसोबतच उलबधता या गोष्टींची सांगड घालणे गरजेचे ठरेल.

आरोग्य धोरणावर खाजगीकरण, उदारीकरण व जागतीकीकरणाचा पडलेला प्रभाव :–

कोणत्याही देशाच्या आर्थिक, सामाजीक विकासासाठी आरोग्य हा घटक महत्वपूर्ण ठरतो. १९६० च्या दशकांपर्यंत देशाचा आर्थिक, सामाजीक विकास साध्य करण्यासाठी नैसर्गीक संसाधनांचा वापर करण्यावर अधिक भर देण्यात आला. परंतू, १९७० नंतर मात्र व्यूव्हरचनेत मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आला. देशाचा सामाजीक, आर्थिक विकास साध्य करण्यासाठी नैसर्गीक साधन संपत्ती ऐवजी मानवी संसाधनांच्या विकासावर भर देण्यात आला. आता हे मान्य करण्यात आले की, देशाचा विकास हा मंत्राची उपलब्धता, नैसर्गीक साधन संपत्तीची मुबलकता यावर होत नसून देशाछमा मानव संसाधनाच्या विकासावर अवलंबून आहे. त्या देशाच्या नागरिकांचा गुणात्मक विकास किती झाला यावर अवलंबून आहे. देशात नुसती लोकसंख्या असण्यापेक्षा त्या लोकसंख्येला आरोग्य शिक्षण यावर भर देण्यात येवू लागला. हे धोरण अलिकडच्या काळात स्वीकारण्यात आले. या धोरणाचा स्वीकार म्हणजेच मानव संसाधन विकासाची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेतील सर्वात महत्वाचा घटक म्हणजे आरोग्य होय.

जागतीकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणाच्या प्रभावामुळे देशातील अनेक घटकांवर थेट परिणाम झालेला जाणवतो. त्यातला एक घटक म्हणजे आरोग्य हे होय. 'खाउजा' मुळे सर्व देशांची बाजारपेठ सर्वांसाठी खुली झाली. परिणामी ज्या थ्देशाछी सेवा प्रभावी त्मा थ्देशातील वस्तूंना वा सेवेला जास्त मागणी जगभरात होवू लागली. म्हणून भारताने १९९० नंतर भारतातील लोकसंख्या जागतीक स्तरावरील स्पर्धेसाठी सज्ज रहावी म्हणून गुणात्मक विकासावर अधिकाधिक भर देण्यात आला व त्यानुसार प्रभावी धोरणे आखण्यात आली. जेणेकरुन देशातील सर्व स्तरावरील नागरिकांचे आरोग्य संवर्धन होवून देशांचा गुणात्मक विकास होईल. शासनाची 'खाउजा' मुळे प्रभावीत वा जागतीक स्तरावर भारतीय लोकेसंख्येचा नागरिकांचा गुणात्मक दर्जा वाढविण्यासाठी राबविण्यात आलेली धोरणे पुढीलप्रमाणे आहेत.

**आरोग्यविषयक धोरणे :-**

**१. आरोग्य क्षेत्र नियोजन :-**

योजना आयोगाने जागतीक स्तरावर आपल्या नागरिकांच्या आरोग्याचा स्तर उंचावण्यासाठी व देशाचा व्यापक विकास नजरेसमोर ठेवून आरोग्यविषयक कार्यक्रमांना प्राधान्य दिले आहे. आरोग्य क्षेत्र पुढील उपविभागांमध्ये विभागले गेले आहे.

१. पाणी पुरवठा आणि स्वच्छता
२. संसर्गजन्य आजार
३. वैयक्तिक शिक्षण, प्रशिक्षण आणि संशोधन
४. गुणकारी सेवा उदा. हॉस्पीटल्स आणि इ.
५. सार्वजनिक आरोग्य सेवा
६. कुटूंब नियोजन
७. एत्तदेशीय औषधांची व्यवस्था

मा उपविभागाचा प्राधान्यक्रम त्या त्या पंचवार्षिक योजनेनुसार ठरविण्यात येतो.

योजना आयोगाने महत्वपूर्ण उद्देशांच्या सहाय्याने आरोग्य

विषयक कार्मक्रमांवर विशेष लक्ष पुरविले आहे.

१. सार्वजनिक आरोग्य विषयक महत्वाचे असे संसर्गजन्य रोगाचे निर्मुलन व नियंत्रण.

२. उपकेंद्र आणि प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करुन मुलभूत ग्रामीण आरोग्य सेवेचे करण करणे.

३. लोकसंख्या नियंत्रण.

४. आरोग्यविषयक मनुष्यबळ संसाधनांचा विकास.

आरोग्यविषयक अकराव्या पंचवार्षिक योजनेतील जाहिरनामा :-

अकराव्या पंचवार्षिक योजनेतील मुख्य विषयाचा पाठपुरावा खालील बाबींच्या आधारे संक्षिप्तपणे दर्शविला आहे.

१. आरोग्य विषयक न्याम सुधारणा व समता

- राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभिमान (NRHM)
- राष्ट्रीय शहरी आरोग्य अभिमान (NUHM)

२. रोग केंद्रीत दृष्टीकोनाऐवजी व्यवस्था केंद्रीत दृष्टीकोनाचा स्वीकार.

३. जीवनमान - आर्युमान वाढविणे.

४. आरोग्यविषयक समस्यांच्या निराकरणासाठी एत्तदेशीय व्यवस्थांचा पूर्ण लाभ घेणे.

५. आरोग्यावरील खर्चामुळे होणाऱ्या कर्जबाजारी पणाला विराम.

६. शासनधिकारांचे विकेंद्रीकरण.

७. ई-आरोग्याची स्थापना (E-Health)

८. आवश्यक व दर्जेदार आरोग्याच्या साधनांमध्ये सुधारणा.

९. आरोग्यविषयक मानव संसाधन वाढविण्यावर भर.

१०. आरोग्य विषयक बाबींमध्ये दुर्लक्षीत क्षेत्रावर लक्ष पुरविणे.

११. रोगांचे प्रमाण कमी करण्याच्या प्रयत्नांमध्ये वाढ.

१२. आरोग्य व्यवस्था व जैव वैद्यकीय संशोधन यांच्यावर लक्ष पुरविणे.

## सार्वजनिक आरोग्य व सामुदायीक औषधी संबंधीत धोरण :-

देशाच्या आरोग्य विषयक समस्यांबाबत शासनाचे धोरण तसेच त्यासंबंधी स्विकारलेल्या योजना, कार्यक्रम याबाातची माहिति देणारे धोरण यालाव राष्ट्रीय आरोग्य धोरण म्हणतात. भारताचे पहिले आरोग्य धोरण १९८३ मध्ये जाहिर करण्यात आले व त्यानंतर २००२ मध्ये दुसरे राष्ट्रीय आरोग्य विषयक धोरण जाहिर करण्यात आले. त्यात देशाच्या विविध आरोग्य विषयक समस्यांचे विविध पैलू व त्यासंबंधी स्विकारलेल्या योजना

यांचा या धोरणात

समावेश करण्यात आला.

## राष्ट्रीय आरोग्य धोरण – २००२ :–

या धोरणान्वये देशातील सर्व स्तरातील नागरिकांसाठी आरोग्यविषयक चांगल्या सुविधा पुरविण्यासाठी आवश्यक असलेली मुलभूत उद्दिष्ट्ये निर्धारीत करण्यात आली आहेत. या आरोग्य धोरणानुसार, सार्वजनिक आरोग्य केंद्र आणि राज्य सरकार यांच्या माध्यमातून च्या २–३% खर्च करते. या धोरणांतर्गत आरोग्या संदर्भातील आर्थिक प्रश्न , आरोग्य सुविधा पुरविण्यातील अडचणी व आरोग्य विषयक परिसेवा अशा विविध बाजुंनी असणाऱ्या अडचणींचा आढावा घेण्यात आला आहे. त्यानुसार महत्वाच्या बाबींचा विचार करण्यात आला आहे.

१. आरोग्याचाा स्तर उंचावण्यासाठी लोक संख्येवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. यासाठी इ.स. २००० साली. राष्ट्रीय लोकसंख्या धोरण जाहिर करण्यात आले. संसर्गजन्य रोगावर नियंत्रण, (AIDS) ला प्रतिबंध, सर्व मुलांना प्रमुख आजारांपासून संरक्षण देणे, लसीकरण कार्यक्रम राबविणे यांचा लोकसंख्या धोरणाशी समन्वय साधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

२.ग्रामीण व शहरी आरोग्य सेवेमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते. सोयी, सुविधांच्या बाबतीत विषमता दिसून येते. प्रगत राज्याच्या तुलनेत मागास राज्यामध्ये या सेवांची उणीव भासते ही विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

३.आरोग्य सेवा, सुविधा, तज्ज्ञ डॉक्टर, नर्सेस, औषधे यांचे प्रमाण ग्रामीण भागात लक्षणीकरित्या कमी आहे. तो सुधारण्यावर भर दिला जाणार आहे.

४.देशातील आरोग्य विषयक सार्वजनिक खर्चाचे प्रमाण अतिशय कमी आहे. १९९० साली ते राष्ट्रीय उत्पन्नाच्या १.३% एवढे होते. १९९९ पर्यंत ते ०.९% पर्यंत घटले. आरोग्यावर होणारा एकूण खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५.२% असून त्यापैकी ८३% खर्च हा खासगी म्हणजेच स्वत:च्या खिशातून करावा लागतो. फक्त १७% खर्च सार्वजनिक आहे. दरडोई आरोग्य खर्चाचे प्रमाण फक्त २०० रु. इतके आहे. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य गुणवत्ता व सुविधांमध्ये कमी पडू नये म्हणून लक्ष पुरविले जाणार आहे.

या शासकीय धोरणाच्या अंमलबजावणी व 'खाउजा' चा प्रभाव तर, जाणवतोच पण याचा प्रभाव 'खासगी' क्षेत्रावर व सर्वसामान्य व्यक्तीच्या आरोग्यावरही झालेला दिसून येतो. तो पुढीलप्रमाणे.

### १. खाजगी आरोग्य संस्थांचे पदार्पण :–

१९९० च्या 'खाउजा' धोरणानंतर भारतात जागतीक स्तरावरच्या अनेक आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक विदेशी देशी खाजगी संस्थांनी मोठमोठी दवाखाने उभारली. उदा. अपोलो फॅटभ्स इ. यामुळे बऱ्याचशा रोगांचा इलाज देशांत होवू लागला.

**२. दर्जेदार सुविधा :–**

सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील शासकीय दवाखान्याच्या तुलनेत या खाजगी दवाखान्यातील सोयी सुविधा या दर्जेदार असतात. सर्व साधनांनी युक्त अशी दवाखाने असतात. त्यामुळे रुग्ण अशा दवाखान्यात जाण्यास पसंती देतात.

**३. तत्पर सेवा :–**

खाजगी दवाखाने ही २४ तास तत्पर सेवा देतात. त्यामुळे रुग्णांची सोय होते. त्यांच्याकडे कुशल डॉक्टरांची उपलब्धता असते. परिणामी रुग्ण शासकीय सेवेपेक्षा या खाजगी सेवा घेण्यास पसंती देतो.

**४. तज्ज्ञ डॉक्टरांची मदत :–**

खाजगी दवाखाने आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विदेशातील इतर राज्यातील, आणिबाणी प्रसंगी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेतात. जेणेकरुन रुग्णाचे प्राण वाचविण्यास मदत होईल.

**५. स्वच्छता निटनिटकेपणा :–**

खाजगी दवाखान्यांमध्ये कमालीची स्वच्छता आढळून येते. सर्व ठिकाणी टापटिपपणा, प्रसन्न वातावरण निर्मीती केली जाते. त्यामुळे जरी या मल्टीनॅशनल दवाखान्यांची फीस जास्त असली तरी, रुग्ण वा रुग्णाचे नातेवाईक अशा दवाखान्यातच जातात असे सध्याचे चित्र आहे.

**६. खर्चिक सेवा :–**

या मल्टिनॅशनल वा खाजगी दवाखान्याची फिस ही बरीच जास्त असते. त्यामुळे असे दवाखाने सर्वसामान्य जनतेच्या आवाक्याच्या बाहेरचे असतात. अशी दवाखाने ही श्रीमंत, उच्च स्तरावरील लोकांनाच परवडणारी असतात.

**७. फसवणूक :–**

काही मल्टिनॅशनल वा खाजगी दवाखान्यांमध्ये रुग्णांची फसवणूक करुन विनाकरण इतर चाचण्या घेतल्या जातात. रुग्णाला त्या चाचण्यांचा अतिरीक्त खर्च द्यावा लागतो. काही वेळेस शारिरीक अवयवाची तस्करी करण्यासाठी म्हणून रुग्णाच्या शरिरातील अवयव काढून घेतले जातात. ज्याची प्रचंड विक्री केली जाते.

**८. ग्रामीण समाज वंचीत :–**

मल्टिनॅशनल वा खाजगी दवाखाने हे मोठमोठ्या शहराच्या ठिकाणीच असल्या कारणाने ग्रामीण समाजाला या सुविधा आपत्कालीन परिस्थितीत मिळत नाहीत. अशा दर्जेदार सुविधांपासून ग्रामीण समाज वंचीत आहे.

अशा प्रकारचे अनेक प्रभाव 'खाउजी' मुळे भारतीय अरोग्य क्षेत्रावर पडलेले दिसून येतात.

स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळी सर्व आधुनिक आरोग्य सेवेंपैकी केवळ ८% आरोग्य सेवा खाजगी क्षेत्रामार्फत दिली जात होती. आज मात्र सर्व आऊट –पेशन्ट सेवेपैकी ८०% तर इन–पेशन्ट सेवेपैकी सुमारे ६०% सेवा खाजगी क्षेत्रामार्फत प्रदान केली जाते.

आरोग्य क्षेत्राच्या सर्व उपक्षेत्रांमध्ये खाजगी क्षेत्राचे प्रभावी अस्तीत्व आहे. वैद्यक शिक्षण व प्रशिक्षण, वैद्यक तंत्रज्ञान व निदानशास्त्र, औषण निर्मिती व विक्री, दवाखाने बांधकाम व अनुषंगीक सेवा आणि शेवअी आरोग्य सेवेची तदतूद देशातील एकूण ६८% दवाखाने ३७% खाटा आणि ७५% मानव संसाधन खाजगी क्षेत्रात कार्यरत आहेत.

**रोजगार धोरणावर 'खाउजा' चा पडलेला प्रभाव :–**

पुरेशा प्रमाणात रोजगार निर्मिती करणे हे भारताच्या सामाजीक, आर्थिक धोरणाचे महत्वाचे उद्दिष्ट होय. भारतात मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची उपलब्धता आहे. त्या मनुष्यबळाला पुरेशा प्रमाणात रोजगार संधी उपलब्ध करुन देशाच्या आर्थिक विकासाला व सामाजीक कल्याणाला वेग देता येईल. जर का उपलब्ध मनुष्यबळाला योग्य रोजगार उपलब्ध करुन दिला नाही तर, देशातील तरुण पिढी विघातक कृत्यामध्ये, सामाजीक अशांतता पसरविणाऱ्या कृत्यांमध्ये सामील होईल. देशाचा विकास होवू शकणार नाही.

स्वातंत्र्यानंतर भारताने विकासासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचे धोरण स्वीकारले. नियोजनाच्या माध्यमातून विकास साधण्याचा प्रयत्न केला गेला. तरी ही सुद्धा बेरोजगारी दूर झाली नाही. भारतामध्ये ग्रामीण आणि शहरी बेरोजगारी वाढण्यास सुरु झाली. मात्र शहरी व ग्रामीण क्षेत्रातील बेरोजगारीचे स्वरुप मात्र भिन्न भिन्न होते. ग्रामीण भागात कमी प्रतिची बेरोजगारी आढळून येते तर, शहरी भारतात शैक्षणिक बेरोजगारी व तांत्रिक बेरोजगारी आढळून येते.

पण १९९० नंतर भारताने 'खाउजा' धोरण स्वीकारले त्यामुळे देशामध्ये हळू हळू औद्योगीक क्षेत्राचा विस्तर होण्यास सुरुवात झाली. परिणामी देशातील बेरोजगारीचे स्वरुप व 'खाउजा' धोरण या नुसार भारताला रोजगाराचे नवे धोरण स्वीकारणे भाग पडले. ते पुढीलप्रमाणे –

**शासकीय रोजगार निर्मिती धोरण :–**

स्वातंत्र्यानंतर मोठ्या प्रमाणात निर्माण झालेल्या बेरोजगारीला सामावून घेणाऱ्या व काम करणाऱ्या लोकांच्या संख्येमध्ये भर टाकणाऱ्या रोजगाराच्या योग्य संधी निर्माण करणे हे आपले सामाजीक व आर्थिक धोरणासमोरील एक महत्वाचे आव्हान होते.

वाढता विकासदर व आर्थिक क्रियांच्या विविधीकरणाशिवाय वाढती उत्पादकता आणि उत्पन्न यासोबत रोजगार निर्माण करणे अशक्य प्राय होते. यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक व रोजगाराला सहाय्य करणारे आधुनिक उद्योगधंदे आणि तंत्रज्ञानाया सर्वांगीण व समावेशक विकास याची आवश्यकता होती.

स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या काळात महालनोबीस व्यूव्हरचनेनुसार दिर्घकाळापर्यंत शिक्षणाच्या विकासदरासाठी आवश्यक पायाभूत सुविधांवर भर देण्या आला. मात्र यामुळे झाले हे की, लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगार संधी वाढल्या नाहीत. रोजगाराच्या निर्मितीस सहाय्यक दृष्टीकोनाचा स्विकार करण्यात आला. कामगार बहुल उद्योगाची वाढ व प्रसार व्हावा यासाठी काही उपाय योजण्यात आले. त्यास विभेदी कररचना, आरक्षण, अनुदान, कर्जपुरवठा, तांत्रिक मदत इ. म्हणजेच शासन सुरुवातीपासूनच रोजगार निर्मितीसाठी प्रयत्नशील होते. शासनाने सार्वजनिक उद्योग क्षेत्रात उद्योगधंदे, हॉटेल, वाहतूक व्यवस्था कंपन्यांची स्थापना

करुन रोजगार उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण खाजगी क्षेत्रातील उद्योगधंदे जेवढ्या प्रमाणात वाढायला हवे होते तेवढ्या प्रमाणात वाढले नाहीत. परंतू, बेरोजगारीची संख्या मात्र वाढतच गेली. ७० च्या दशकापर्यंत लोकसंख्या वेगाने वाढली. मात्र त्या वेगाने रोजगार निर्मिती मात्र होत नव्हती. परिणामी बेरोजगाराचा मोठा प्रश्न निर्माण झाला.

वाढत्या विकासदरासोबतच रोजगार निर्मितीचा दर ही वाढला पाहिजे त्यासाठी विशेष उपाय योजना कराव्या लागतील अशी सूचना अर्थतज्ज्ञ, जागतीक बँक यांनी केली. त्यानुसार तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत त्याची दखल घेण्यात आली. पण, त्याचा फार मोठा फायदा झाला असे वाटत नाही. परंतू, रोजगार निर्मितीच्या प्रयत्नांना खरी सुरुवात पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या 'गरीबी हटाव' पासून झाली. दारिद्र्य निर्मुलनासाठी 'रोजगार निर्मिती' चे धोरण स्वीकारण्यात आले होते. रोजगाराच्या मोठ्या प्रमाणात नवनवीन संधी निर्माण करुन गरीब जनतेचे जीवनमान उंचावणे, शिक्षण व आरोग्य स्तर उंचावणे हे लक्ष्य ठेवण्यात आले होते. पुढील पंचवार्षिक योजनेचेही तेच उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्या योजनांचे दोन गटात विभागणी करण्यात आली.

१.वेतन आधारीत योजना

२.स्वयंरोजगार आधारीत योजना

वेतन आधारीत योजनेच्या अंतर्गत बेरोजगार व्यक्तींना वर्षभरातून काही

निश्चित दिवसांसाठी रोजगार पुरविला जातो तसेच रोजगाराच्या माध्यमातून अन्न व वेतन दिले जाते. उदा. रोजगार हमी योजना, कामाच्या बदल्यात अन्न योजना, जवहार रोजगार योजना, म. गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MNREGA) इ. तर स्वयंरोजगार कार्यक्रमाचा उद्देश विस्तृत आहे. मात बेरोजगार व्यक्तीला कायमस्वरुपी रोजगार उपलब्ध करुन देणे व त्याला स्वावलंबी बनविणे हा मुख्य उद्देश आहे. उदा. एकात्मिक ग्रामीण विकास कार्मक्रम, स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना इ.

१९९० नंतर 'खाउजा' धोरणाच्या स्वीकारानंतर मात्र रोजगाराच्या धोरणात बदल करण्यात आला. वाढत्या विकासाबरोबर रोजगार निर्मिती शक्य आहे. व विकास आणि रोजगार परस्पर विरोधी नसून ते परस्पर पुरक आहेत असा दृष्टीकोन स्वीकारण्यात आला व रोजगार धोरणात बदल करण्यात आला. भारतातील मोठ्या प्रमाणावर (७०%) अशिक्षीत असलेल्या मजूर वर्गाला सामावून घेण्यासाठी मोजना बनविण्यात आल्या. त्यासाठी कृषी क्षेत्रात खाजगी, विदेशी गुंतवणूकीला परवानगी देणे, उपभोग्य वस्तू उत्पादन उद्योगधंद्याला प्रोत्साहन देणे, उद्योगधंद्याचे ग्रामीण क्षेत्रात विकेंद्रीत करणे इ. सारख्या गोष्टींवर भर देण्यात आला तसेच लघू उद्योगाला चालना देण्यात आली. सेवा क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळाची आवश्यकता भासू लागली त्यासाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ विकास करण्यासाठी 'कौशल्य विकासनावर' भर देण्यात आला.

CW. हॉटेलींग, पर्यटन, बांधकाम, बी.पी.ओ., इ. जेणेकरुन बेरोजगारीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

एकूण रोजगार निर्मिती मधील विविध क्षेत्रांचा वाटा %

| क्षेत्र | १९७२-७३ | १९८३ | १९९३-९४ | १९९९-२००० |
|---|---|---|---|---|
| प्राथमिक | ७४.३ | ६८.६ | ६४ | ६०.४ |
| द्वितीय | १०.९ | ११.५ | १६ | १५.८ |
| तृतीय | १४.८ | १६.९ | २० | २३.८ |
| एकूण | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० |

### सार्वजनिक वितरण व्यवस्था :-

जनतेला वाजवी दरात अन्न धान्य उपलब्धतेची हमी तसेच गरीबाच्या अन्न सुरक्षेत वाढ या शासनाच्या आर्थिके  धोरणामधील महत्वाचे साधन म्हणून सार्वजनिक वितरण व्यवस्था विकसीत झाली. ती दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रमाचा एक महत्वाछ्चा घटक असून कुपोषणाचा धोका असलेल्या बहुसंख्य गरीबांसाठी संरक्षण जाळे म्हणून वापर हे या व्यवस्थेचे उद्दिष्ट आहे. अन्न धान्याची साठवणूक, वाहतुक व नियमन करणे इ. जबाबदारी केंद्र शासनाची तर, रास्त भाव दुकानाचे जाळे निर्माण करुन अन्नधान्याचे वितरण करणे, दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाची निश्‍चिती करणे, शिधापत्रिका देणे व रास्तभाव दुकानाचे निमंत्रण इ. ची जबाबदारी राज्यशसनाची आहे. रास्तभाव दुकानाच्या जाळ्याद्वारे गहु, तांदूळ, साखर आणि केरोसीन यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंचे नियमीत मासिक वितरण केले जाते. तर, वर्ष २०११-१२ मध्ये पाम तेलाचे सुद्धा वितरण करण्यात येत आहे.

### सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत असलेल्या इतर योजना :-

#### १. द्वार वितरण योजना :-

द्वार वितरण योजना ही आदिवासी तसेच अवर्षण प्रवण भागात राबविली जाते. या योजनेअंतर्गत गोदामातून रास्तभाव दुकानापर्यंत वाहनाने धान्याची वाहतूक केली जाते. महाराष्ट्र राज्यात ही योजना महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास संघ मर्यादीत तर, आवर्षण प्रवण भागात महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ यांच्याद्वारे राबविली जाते.

#### २. लक्षनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्था :-

दारिद्र्य रेषेखालील जनतेला सेवा पुरविण्यातील अपयश, गरीबाचे जास्त प्रमाण, पारदर्शक वितरणाचा अभाव त्यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर मोठ्या प्रमाणावर टिका होत होती. त्यामुळेच केंद्र शासनाने लक्षनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्था जुन १९९७ मध्ये सुरु केली. या योजनेअंतर्गत गरीब वर्गाची निश्‍चिती करुन त्यांच्या पर्यंत अन्नधान्य पोहचविण्याची जबाबदारी राज्यशासनावर टाकली आहे. या योजनेच्या माध्यमातून गहू, तांदूळ, साखर, तुरडाळ व पामतेल या पाच वस्तूच्या किंमती स्थिर ठेवण्याचा निर्णय राज्यशासनाने घेतला आहे.

**अंत्योदय अन्न योजना :–**

अंत्योदय अन्न योजने अंतर्गत सर्व भूमीहीन शेतमजूर, अल्पभूधारक, ग्रामीण कारागीर, असंघटीत क्षेत्रात रोजंदारीवर काम करणारी कुटूंबे, विधवा प्रमुख असलेली कुटूंबे,अपंग व्यक्ती, सामाजीक वा आर्थिक आधार नसलेली, ६० वर्षे किंवा त्यावरील व्यक्ती, सर्व आदिम जमातीची कुटूंबे यांना प्राधान्याने लाभ दिला जातो. या योजनेतून लाभार्थ्यांना गहू व तांदूळ ही अन्न धान्य अनुक्रमे दोन रुपये प्रति किलो व तीन रुपये प्रति किलो या दराने पुरविली जातात.

**अन्नपूर्णा योजना :–**

अन्नपूर्णा ही योजना १०० % केंद्र पुरस्कृत आहे. ही योजना १ एप्रिल २००१ पासून राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय वृद्धापकाळ, निवृत्ती वेतन अथवा राज्य निवृत्ती वेतन या योजनांतर्गत लाभ मिळत नसलेल्या ६५ वर्ष व त्यावरील निराधारांना अन्नपूर्णा योजनांतर्गत दरमहा १० किलो धान्य गहू व तांदूळ मोफत पुरविले जाते.

खाजगीकरण, जागतीकीकरण व उदारीकरणाचा वंचीत घटकांवर पडलेला प्रभाव :–

**लिंगभाव :–**

२०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येत महिलांचे ४८.४६% एवढे प्रमाण आहे. महिला या एक महत्वपूर्ण असे मान संसाधन असून ते देशासाठी महत्वपूर्ण आहे. देशाच्या शासन विकासासाठी त्यांचा सामाजीक, आर्थिक, शैक्षणिक विकास होणे अनिवार्य आहे. देशाचे कायदे विकासाचे धोरण योजना व कार्यक्रमांचे विविध क्षेत्रातील स्त्रीयांच्या विकासावर भर देणारी आहेत. स्त्री–पुरुष समानतेचे तत्व भारताच्या घटनेत नमूद करण्यात आले आहेत.

स्वातंत्र्यानंतर महिलांच्या सबलीकरणावर भर देण्यात आला. पण, त्याला यश मर्यादीत प्राप्त झाले. पण, भारताने १९९० नंतर 'खाउजा' धोरण स्वीकारले. त्यानंतर महिलांचे पारंपरिक सामाजीक चित्र बदलले आहे. आर्थिक, सामाजीक, शैक्षणिक, सांस्कृतीक, कौटूंबीक,

राजकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन झालेले आढळून येते. ते पुढीलप्रमाणे –

**१. समान सामाजीक दर्जा :–**

भारतात प्राचीन काळी स्त्रीयांवर अनेक प्रकारची बंधने होती. त्यांना समान दर्जा दिला जात नव्हता. दुय्यम दर्जा दिला जात असे. त्यांचे कार्यक्षेत्र चूल आणि मुल एवढेच होते. १९९० नंतर औद्योगीकीकरणाचा, नागरिकरणाचा वेग वाढला, औद्योगीकीकरणाचे विकेंद्रीकरण झाले. त्याचा परिणाम स्त्रीयांच्या दर्जावर झाला. औद्योगीकीकरणाचा परिणाम म्हणजे. विभक्त कुटूंब पद्धती. या कुटूंबात व्यक्ती स्वातंत्र्य असते. परिणमी स्त्रीयांना कुटूंबात समान दर्जा दिला जाऊ लागला. त्या विविध प्रकारच्या सामाजीक कार्यक्रमात सहभागी होवू लागल्या. स्त्रीया परंपरावादी विचारापासून दुरु जाऊन नवीन आणि तार्कीक आदर्श आणि मुल्यांचा स्वीकार करु लागल्या आहोत. स्त्रीयांनी स्वत: पुढाकार घेऊन अनेक सामाजीक संघटना स्थापन केल्या आहेत. लिंग विषमतेमुळे कुठल्याही प्रकारचा अन्य अत्याचार होवू नये म्हणून या संघटना जागृत असतात.

## २. शैक्षणिक समता :-

पूर्वी स्त्रीयांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. इ.स. १८४८ मध्ये म. फुले यांनी पहिल्यांदा पुणे येथे मुलींची शाळा सुरु केली. १९९१ मध्ये भारतात ३९.२९% एवढी महिला साक्षरता होती. नंतर २००१ मध्ये ती ५२.२१% एवढी झाली. २०११ मध्ये ६५.४६% साक्षरता आहे. म्हणजेच स्त्रीयांच्या साक्षरतेत वाढ होतांना दिसत आहे. आज भारतात खाजगी शिक्षण संस्था ग्रामीण भागापर्यंत पोहचल्या आहेत. परिणामी मुलींना शिक्षणाची सोय प्राप्त झाल्यामुळे मुली सहज शिक्षण घेवू लागल्या. साक्षरतेच प्रमाण वाढण्यास मदत झाली. इंजिनिअरींग, मेडीकल, आय.टी.आय. इ. सारखे तांत्रिक कोर्सेस सुद्ध ग्रामीण भागापर्यंत पोहचले त्यामुळे सुद्धा मुली अशाप्रकारचे शिक्षण घेवू लागल्या आहेत.

## ३. आर्थिक समता :-

प्राचीन काळी लिंग विषमतेमुळे स्त्रीयांना आर्थिक मिळकतीची कामे करण्यास बंदी होती. मात्र ब्रिटीश भारतात आल्यानंतर त्यांनी समानतेच्या संधी उपलब्ध करुन दिल्या. घटनेने मुलभूत हक्क दिले. त्यामुळे महिला शिक्षण घेऊन स्वत:च्या पायावर उभ्या रहू लागल्या. १९९० नंतर 'खाउजा' धोरणाचा स्वीकार झाला. औद्योगीकीकरणाचा वेग वाढला, महिलांना नौकऱ्यात आरक्षण तर मिळाले होतेच पण 'खाउजा' धोरणने त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याची संधी दिली. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्री वावरतांना दिसते. स्त्रीयांनी केवळ आर्थिक स्वावलंबनातच प्राप्ती केली नाही तर, स्वत:च्या कर्तृत्वाने त्यांनी त्याचे नाव सुद्धा कमावले आहे. उदा. किरण बेदी, सायना नेहवाल, कल्पना चावला इ. पूर्वी स्त्रीयांना सांपत्तीक अधिकार नव्हता. पण, आज तो त्यांना प्राप्त झाला आहे. त्या त्यांच्या हक्काविषयी जागरुक झाल्या आहेत. परिणामी स्त्रीयांचा आर्थिक दर्जा वाढलेला दिसून येतो.

## ४. सांस्कृतीक समानता :-

'खाउजा' धोरणाच्या स्वीकारामुळे भारतात मोठ्या प्रमाणात विदेशी कंपन्या आल्या. त्यांनी स्वत:ची उत्पादने भारतीय बाजारपेठात अगदी ग्रामीण भागापर्यंत पोहचवली. परिणमी भारतातील पारंपरिक स्त्री अत्याधूनिक होवू लागली. राहणीमानाचा स्तर उंचावला. पारंपरिक वेशभूषा बरोबरच पाश्चिमात्य संस्कृती स्वीकारली. पाश्चिमात्य सण, उत्सवाचाही स्वीकार करण्यात येवू लागला आहे. भारतीय स्त्रीया जागतीक स्तरावर 'फॅशन आमकॉन' बनू लागल्या आहेत. उदा. ऐश्वर्या रॉय, सुश्मिता सेन, लारा दत्ता इ.

अशा अनेक क्षेत्रात स्त्रीमांछमा पारंपरिक स्थितीत बदल झालेले दिसून येतात.

## वृद्ध :-

भारत हा कृषी प्रधान देश आहे. त्यामुळे भारतातील सर्व सामाजीक संस्था या 'कृषी' केंद्र मानूनच आकारात आल्या. उदा. सयुक्त कुटूंब पद्धती, सण, उत्सव इ. त्यात महत्वाची संस्था म्हणजे कुटूंब संस्था, भारतीय कुटूंब व्यवस्थेत 'संयुक्त कुटूंब' होते. त्या प्रकारच्या कुटूंबात सर्व प्रकारच्या नात्यांना सामावून घेतले जात असे. त्यात निरनिराळ्या वयातील व्यक्तींचा समावेश होता. 'खाउजा' धोरणानंतर मोठ्या प्रमाणात उद्योगाचे विकेंद्रीकरण झाले.

उद्योग ग्रामीण भागापर्यंत पोहचले. पण याचा परिणाम असा झाला की, संयूक्त कुटूंब पद्धती मोडकळीस आली. औद्योगीकीकरणाचा परिणाम म्हणजे नागरिकरण. नागरिकरणाचा वेग वाढला. ग्रामीण भागातील तरुण शहरात उद्योगधंद्याच्या ठिकाणी वास्तव्यास जावू लागले. नौकरी, व्यवसाय करु लागले. पण, ग्रामीण भागात घरी असलेले वृद्ध आई-वडीलांचा आधार गेला ते निराधार झाले.कारण, शहरात जागेचा अभाव, वाढती महागाई, घरांची समस्या इ. कारणांमुळे वृद्ध आई-वडीलांना शहरात आणणे शक्य नव्हते.

औद्योगीकीकरण, नागरिकरण, आधुनिकीकरण या सर्व घटकांचा प्रभाव कुटूंब, विवाह यांसारख्या संस्थांवर पडला. यामुळे यात मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडून आले. या संस्थांपुढे अनेक संकटे निर्माण झाली. याचाच एक परिणाम म्हणजे संयुक्त कुटूंबाचा ऱ्हास होय व विभक्त कुटूंब पद्धतीचा उदय. याप्रकारच्या कुटूंबात वृद्धांना स्थान नसते. परिणामी वृद्धांची समस्या निर्माण झाली.

पूर्वी जेव्हा जाती व्यवस्थेचा प्रभाव होता तेव्हा व्यक्तीला जातीनिहाय वागणूक मिळायची. जातीचे संरक्षण प्राप्त व्हायचे. जातीला 'आर्थिक घटक' महत्वाचा नव्हता. संबंध महत्वाचे होते. पण, 'खाउजा' जातीचे उच्चाटन केले पण याचा दुष्परिणाम असा झाला की, वर्ग व्यवस्थेत आर्थिक घटकाला महत्व प्राप्त झाले. व्यक्ती कमावता असतांना जो दर्जा असतो पण जेव्हा वृद्धत्वामुळे व्यक्ती निवृत्त होते. आर्थिक विकास कमी होते. त्यावेळेस त्याच्या सामाजीक दर्जात बदल होतो. परिणामी त्याच्यात न्युनगंड निर्माण होतो. व्यवसायातील वा कामाच्या ठिकाणच्या मंडळीपासून दुरु होतो. सामाजीक असुरक्षततेची भावना निर्माण होते. ते एकाकीपणे जीवन जगतात. त्याचा परिणाम कौटूंबीक जीवनावर होतो.

शहरातील वृद्ध व्यक्ती एकाकी पडल्या वृद्धावस्थेत त्यांची कार्मक्षमता कमी होवू लागली. त्याचा प्रभाव आर्थिक घटकावर पडू लागला. शहरी भागातील वाढती महागाई याच्याशी जूळवून घेतांना वृद्धांना आर्थिक ताण सहन करावा लागतो आहे. औषधांचा, दवाखान्याचा इतर घटकांचा खर्च वाढतो तो भागविणे कठीण होते. मानसिक तणावाला समाोरे जावे लागते.

एकाकी जीवन मानसीकताण आर्थिक भार न सोसणे इ.चा परिणाम त्याच्यावर होतो. त्यामुळे मेट्रो शहरातील अनेक वृद्ध या त्रासाला कंटाळून आत्महत्या करु लागले आहेत. हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

असे जरी असले तरी 'खाउजा' मुळे अनेक परिणाम वृद्धांसाठी फायदेशीर ही ठरले आहेत. खाजगी हॉस्पीटलमुळे वृद्धतत्वांतील आजारांवर मात करता येवू लागली आहे. मल्टीनॅशनल कंपन्यांचे औषध भारतात प्राप्त होवू लागल्यामुळे अनेक रोगांवर नियंत्रण मिळविता आहे.

वृद्धाश्रमासारखी संकल्पना 'खाउजा' मुळेच भारतात उदयास आली. पण वृद्धांना तो एक मोठा आधार झाला आहे. एकाकी जीवन जगण्यापेक्षा वयस्क व्यक्तींबरोबर हसत खेळत

जगता येते. जीवनातील दुःख विसरता येते. सेवा सुश्रुषा करणारे असल्यामुळे वृद्धापकाळातील त्रास कमी होण्यास मदत होत आहे.

अनेक शहरात 'वृद्ध दिनकेंद्र' निर्माण होत आहेत. यात वृद्धांच्ची काळजी घेतली जाते. या केंद्रात वृद्ध व्यक्ती दिवसभर राहतात. तेथे मनोरंजन, खेळ, वैयक्तीक मदत इ. गोष्टी उपलब्ध करुन दिल्या जातात. विश्रांतीची व्यवस्था असते. असे अनेक वृद्ध व्यक्ती या केंद्रात येत असल्यामुळे समवयस्कांची ओळख होते. एकमेकांचे अनुकुल दुःख, आनंद शेअर करतात. रात्री हे सर्व वृद्ध आपापल्या घरी जातात.

त्याचबरोबर अनेक खाजगी मल्टीनॅशनल बँका, विमा कंपन्या वृद्धापकाळातील पेंशन योजना सुरु केल्या आहेत या फायदा ही वृद्धांना होतो आहे तसेच शासनाने ही भविष्य निर्वाह निधी वृद्धापकालीन निवृत्ती वेतन इ. सारख्या आर्थिक मदतीच्या योजना सुरु केल्या आहेत.

असे अनेक परिणाम 'खाउजा' धोरणाने वृद्ध व्यक्तीच्या जीवनावर झालेले दिसून येतात.

**बालक :-**

भारत 'खेड्यांचा देश' म्हणून ओळखला जायचा. ही खेडी स्वयंपूर्ण होती. पण, ब्रिटीश भारतात आल्यानंतर ही खेडी ऐकमेकांशी जोडल्या गेली. नंतर औद्योगीकीकरणाची प्रक्रिया सुरु झाली. शहरीकरणाची प्रक्रिया सुरु झाली. शहरात सोयी-सुविधांमुळे शहरीकरणाचा वेग वाढला. त्यामुळे भारतीय सामाजीके संस्थांमध्ये परिवर्तन घडून येण्यास सुरुवात झाली.

१९९० नंतर 'खाउजा' धोरणाच्या स्विकृती मुळे सामाजीक परिवर्तनाची गती वाढली. कुटूंब संस्था, शिक्षणसंस्था, विवाहसंस्था, जातीसंस्था इ. सामाजीक संस्थेच्या संरचनेत बदल होण्यास सुरुवात झाली.

संयुक्त कुटूंबात तिन ते चार पिढ्यांचे लोक राहत असत. त्यामुळे बालकाची सामाजीकरणाची प्रक्रिया योग्य प्रकारे होत असे. पण नागरिकरणाच्या प्रक्रियेत संयुक्त कुटूंबाचे विभक्त कुटूंबात परिवर्तन झाले. या प्रकारच्या कुटूंबात पती-पत्नी व त्यांची अविवाहीत मुले यांचाच समावेश होतो. पती-पत्नी व्यवसामानिमित्त, नौकरी निमित्त घराबाहेर जात असल्याकारणाने लहान मुलांचा सांभाळ करण्यासाठी 'पाळणा घरे' अस्तित्वात आली. 'संस्कार केंद्र', 'प्ले सेंटर' सारखी समाजीकरणाची बाह्य केंद्र उदयास आली. यांच्या माध्यमातून मुलांना नव्या जगाची ओळख करुन दिली जाते तसेच बालवाडी,

अंगणवाडीच्या ठिकाणी नर्सरी, किड्स ग्रुप सारखे घटक अस्तित्वात आले.

जागतीकीकरण, खाजगीकरणाचा मुख्य प्रभाव म्हणजे इंग्रजी माध्यमातील शाळा आता ग्रामीण भागापर्यंत पोहचल्या. त्यामुळे ग्रामीण भागातील मुले सुद्धा शहरी मुलांच्या बरोबरीने शिकू शकतील. जागतीक स्तरावरचे ज्ञान त्यांच्यापर्यंत पोहचण्यास मदत झाली. या 'हायटेक' इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधून संगणक, नवीन खेळ, विदेशी भाषा, विज्ञानातील विविध प्रयोग इ. गोष्टींची सहज माहिती होवू लागली. आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम शाळांमधून शिकविल्या जावू लागले. वैज्ञानीक दृष्टीकोन रुजविण्यासाठी प्रयत्न केले जावू लागले आहेत.

विविध खेळाच्या असोशिएशन निर्माण झाल्या आहेत. जागतीक स्तरावरचे प्रशिक्षण

लहानपणापासूनच मुलांना मिळत असल्या कारणाने जीथे भारतात पूर्वी खेळाप्रती उदासीनता होती तीथे लहान शहरातील, ग्रामीण भागातील मुले आंतरराष्ट्रीय स्तरावरचे खेळाडू बनले आहेत. उदा. कविता राऊत, तेजस्विनी सावंत, विजय झोल, जहिर खान इ.

शहरीकरण औद्योगीकीकरण, दळणवळणाची अत्याधुनिक साधने इ. मुळे लहान मुलांना विविध संस्कृतीची, धर्माची ओळख होण्यास मदत झाली. एकात्मता निर्माण होण्यास मदत झाली. इंग्लिश, हिंदी सारख्या भाषा आता ग्रामीण भागापर्यंत पोहचल्या त्या व्यवहारातील भाषा होवू लागल्या आहेत. बोली भाषेचा ऱ्हास होत आहे.

या सर्व घटकांबरोबरच काही दुष्परिणामांनाही सामोरे जावे लागत आहे. विभक्त कुटूंब पद्धतीमुळे एकलकोंडी बनत चालली आहेत, आत्मकेंद्री बनत चालली आहेत. समाजीकरणाच्या प्रक्रियेतील कुटूंबाचा सहभाग कमी होत आहे. कारण, मुलांना आई-वडील, आजी-आजोबा, मावशी-आत्या इ. चा संबंध येईनासा झाला. त्यामुळे नातेसंबंध त्याग, आपलेपणा इ. वृत्तीचा लोप होत आहे. बालगुन्हेगारीचे प्रमाण दिवसदिवस वाढत आहे. कारण, अनौपचारीक नियंत्रणाची साधने प्रभावी ठरत नाहीत. मानसिक रोग वाढतांना दिसत आहेत. उदा. डिप्रेशन, आत्मविश्वासाची कमतरता इ. मुळे लहान मुले आत्महत्या करतांना दिसत आहे. दिवसेंदिवस लहान मुलांमधील गुणकलेची स्पर्धा दिवसेंदिवस तीव्र होत चालली आहे. त्यात त्याचे बालपण हरवत चालले आहे. त्यांना सतत कोणत्याना कोणत्या स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. पालकांच्या, शिक्षकांच्या अपेक्षांचे ओझे दिवसेंदिवस वाढत आहे. याचा परिणाम स्पर्धेत मागे राहणाऱ्या मुलातील आत्मविश्वास कमी होवून ते मानसीक रुग्ण होत आहेत.

आधुनिकीकरणाच्या या युगात फास्ट फुडचा परिणाम ही मुलांच्या आरोग्यावर होतांना जाणवतो आहे. फास्ट फुडमुळे शहरीभागात कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे. डायबेटीसचे प्रमाण लहान मुलांत वाढत आहे. दूरचित्रवाणी (TV), इंटरनेट, मोबाईल, टॅबलेट पीसी सारखी अत्याधुनिक मनोरंजनाची साधने लहान मुलांना सहज प्राप्त होवू लागली आहेत. परिणामी लहान मुले मैदानावर खेळायला न जाता तासनतास या (TV), इंटरनेट, मोबाईलवर गेम्स खेळू लागली आहेत. याचा परिणाम डामबेटीस सारखे रोगांचे प्रमाण वाढत आहेत. अशी अनेक चांगले-वाईट प्रभाव खाउजा धोरणाने लहानमुले बालकांवर होतांना दिसत आहे.

**अनुसूचीत जाती – जमाती :-**

भारतामध्ये जवळपास ६ हजार जाती जमाती आहेत. जाती संरचनेत सर्वात खालचे स्थान अस्पृश्य जातीचे आहे. अस्पृश्य जातीच्या लोकांना मुलभूत अधिकारापासून वंचीत ठेवण्यात आले होते. अस्पृश्य जाती इतराच्या तुलनेत मागासलेल्या राहिल्या आहेत तर, अनुसूचीत जमाती अजुनही दऱ्या खोऱ्यात आणि जंगलात वास्तव्य करतात. शासनाच्या जंगलविषयक धोरणामुळे, कायद्यांमुळे त्यांच्या जगण्यावर मर्यादा पडल्या आहेत. अनुसूचीत जमातीच्या जीवनात त्यामुळे मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडून आले आहेत.

ब्रिटीश भारतात येण्या अगोदर मागास जातींना समाजातील कुठलेच अधिकार प्राप्त नव्हते. शिक्षणाचा अधिकार नव्हता, धार्मिक अधिकारापासूच वंचीत ठेवले होते. संचाराने

स्वातंत्र्य नव्हते. जेव्हा ब्रिटीश भारतात आले त्यांनी तेव्हा भारतीयांना सर्वप्रकारच्या संधी उपलब्ध करुन दिल्या त्यामुळे सामाजीकदृष्ट्या मागास घटक मुख्य प्रवाहात येण्यास मदत झाली.

स्वातंत्र्यानंतर भारतातील विविध मागास घटकांना सबल करण्यासाठी योजना तयार करण्यात आल्या. घटनेत मागास घटकांसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली. विविध योजना तयार करण्यात आल्या. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महामंडळे स्थापन करण्यात आली. 'कल्याण' मंत्रालये स्थापन करण्यात आली.

'खाउजा' धोरणाचा प्रभाव हा अनुसुचीत जाती-जमातीवर ही पडलेला जाणवतो. खाजगीकरण, जागतीकीकरण, उदारीकरणाचा थेट प्रभाव 'ग्रामीण भाग', आदिवासी पाड्यांपर्यंत पडलेला आपल्याला आढळून येतो. बांधा-वापरा, हस्तांतरीत करा (BTO) च्या माध्यमातून रस्त्यांचा विकास करण्यात आला. त्यामुळे खेडी-पाडी हे शहराला जोडले गेले. दुरध्वनी, दुरचित्रवाणी, वर्तमानपत्रे इ. सारखी माध्यमे ग्रामीण भागात आदिवासी भागात पोहचली. त्यांना त्याच्या परिस्थितीची जाणीव होवू लागली. कालबाह्य झालेल्या रुढी, प्रथा, परंपरांची जाणीव झाली. ते मुख्य प्रवाहात सामील होण्याची प्रक्रिया सुरु झाली. इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु झाल्या. त्यामुळे जगाची ओळख होण्यास मदत झाली.

मागास घटकांतील तरुण-तरुणी आधुनिक तंत्रज्ञान, तांत्रिक शिक्षण घेवून मोठमोठ्या कंपनीत उच्च पदावर गेले. आर्थिक परिवर्तन घडून आले. विविध प्रक्रिया उद्योगासाठी खाजगी बँक, मल्टीनॅशनल बँक, राष्ट्रीय बँक कर्ज देवू लागल्या. परिणामी लघूउद्योग, कुटीर उद्योगाची उभारणी होण्यास मदत झाली. मागास घटकातील कुटूंबे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यास मदत झाली.

आधूनिकीकरण, औद्योगीकीकरण, नागरिकरण इ. प्रभाव संस्कृती व सामाजीक संस्थांवरही मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो. अनुसूचीत जमातीची संस्कृती 'खाउजा' मुळे मोठ्या प्रमाणात प्रभावीत झाली. लोकनृत्य, लोकसंगीत, लोककथा, वेशभूषा, खाद्यपदार्थ, भाषा इ. मध्ये परिवर्तन झालेले दिसून येते. आदिवासी संगीत आता CD, DVD मध्ये उपलब्ध आहे. त्यांछी पारंपरिक वेशभूषेत बदल होवून त्याची जागा जीन्स, टि-शर्ट, पंजाबी सुट, साडी इ. नी घेतलेली आहे. दूरचित्रवाणीने त्यांचे मुकागृह, नृत्य जिथे लोप पावतांना दिसत आहे. अगदी दुर्गम भागामध्ये दूरचित्रवाणी पोहचले आहे तसेच शाळा, महाविद्यालयातून प्रमाण मराठी, हिंदी, इंग्रजीचा वापर होत असल्याकारणाने तसेच व्यवहारातही प्रमाण भाषेचाच वापर होत असल्याकारणाने आदिवासी जमातीची बोली भाषा हळू हळू लोप पावत चालली आहे. जमातीसुद्धा अशाच प्रमाण भाषांचा वापर करु लागल्या आहेत.

दळणवळणाच्या साधनात झालेली वाढ व सुधारणा यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील मागास कुटूंबे शहराकडे स्थलांतर करु लागली. ते शहरात येवून नौकरी व्यवसाय करु लागली. त्यामुळे बऱ्यापैकी आर्थिक उन्नती होवू लागली व त्यांचा जीवनमानाचा स्तर उंचावण्यास मदत झाली. आर्थिक, शैक्षणिक प्रगती होवू लागली. जातीची, धर्माची बंधने तोडून कालबाह्य रुढी, प्रथा, परंपरांना सोडून वैज्ञानीक दृष्टीकोनाचा स्वीकार करु लागले

आहेत.

मागास घटकात राजकीय, शासकीय योजना इ. संदर्भात मोठ्या प्रमाणात जागृती झाली व परिवर्तन घडून येण्यास सुरुवात झाली.

## ८.३ स्वयं अध्यन प्रश्न :-

**थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. जागतीकीकरणाचा अर्थ सांगा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२. खाजगीकरण म्हणजे काय.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३. उदारिकरणाची व्याख्या लिहा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४. अनुसूचीत जातीचा अर्थ लिहा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

५. आदिवासी जमातीची व्याख्या लिहा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**दिघोत्तरी प्रश्न .**

१. जागतीकीकरण, उदारीकरण, खाजगीकरणाचा प्रभावामुळे अनुसूचीत जाती-जमातीमध्ये कोणते परिवर्तन घडून आले चर्चा करा -

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

२. 'खाउजा' चा प्रभाव शिक्षण क्षेत्रावर झाल्यामुळे शिक्षण क्षेत्रातील झालेले परिवर्तन कोणते सविसतर चर्चा करा -

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

३. खाउजाचे आरोग्य घटकांवर झालेले परिणाम लिहा.

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

४. स्त्रीयांच्या सामाजीक दर्जावर 'खाउजा' मुळे कोणता परिणाम झाला चर्चा करा.

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

## ८.४ सारांश :-

## ८.५ पारिभाषीक शब्द :-

१. खाउजा - खाजगीकरण, उदारीकरण व जागतीकीकरण

२. सार्वजनिक उद्योग - शासनाने जे उद्योग उभारलेले आहेत. ज्यावर शासनाचे पूर्ण नियंत्रण असते अशा उद्योगांना सार्वजनिक उद्योग असे म्हटले जाते.

३. अनुसूचीत जाती - भारतीय राज्यघटनेतील कलम ३६६ (२४) मध्ये अनुसूचीत जातीचा उल्लेख करण्यात आला आहे. या संविधानाला प्रयोजनार्थ कलम ३४१ खाली अनुसूचीत जाती असल्साचे मानले गेले आहे. अशा जाती, वंश किंवा जमाती अथवा अशा जातीचे, वंशाचे किंवा जमातीचे भाग अथवा त्यातील गट होय.

४. अनुसूचीत जमाती - दुर्गम भागात राहणारे एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणारे,

एकच बोली भाषा बोलणारे समान सांस्कृतीक जीवन जगणाऱ्या समूहाला अनुसूचीत जमाती म्हणतात.

५. वृद्ध – व्यक्तीच्या जीवनकाळातील शेवटचा कालखंड म्हणजे वृद्धावस्था होय.

## ८.६ संदर्भसूची :–


१. डॉ. आगलावे प्रदिप – ''भारतीम समाज संरचना आणि समस्या'' साईनाथ प्रकाशन, नागपुर, २००८

२. Ahuja Ram - 'Special Problems In India', Rawat Publicaton, Jaipur, 1992

३. Kolambe Ransan मानवसंसाधन विकास आणि मानवाधिकार, भगीरथ प्रकाशन, पुणे, २०१२

४. www.maharashtra.gov.in

# एम . ए . समाजशास्त्र द्वितीय वर्ष

# पेपरः 2

## भारतीय समाजशास्त्र आणि सामाजिक विचारवंत

# घटक १
# Origin & development of Sociology
# समाजशास्त्राचा उगम आणि विकास

**ऐतिहासिक पार्श्वभूमी** (Historical Background)

समाजशास्त्र मनुष्याच्या सामाजिक संबंधांचे शास्त्र आहे. बाटोमोरच्या मतानुसार समाजशास्त्र एक आधुनिक शास्त्र आहे. इतर सामाजिक शास्त्रांच्या तुलनेत समाजशास्त्र एक नवीन शास्त्र आहे. एका स्वतंत्र विज्ञानाच्या स्वरूपात समाजशास्त्राच्या उत्पत्तीचे श्रेय फ्रान्सचा तत्त्ववेत्ता ऑगस्त कॉम्तला जाते. त्यांनी १८३८ मध्ये समाजाच्या या नव्या शास्त्राला समाजशास्त्र हे नाव दिले. तेव्हापासून समाजशास्त्र सतत विकासाच्या वाटेवर आपला प्रवास करीत आहे. या ठिकाणी वाचणाऱ्याच्या मनात सहजच एक प्रश्न डोकावतो की ऑगस्त कॉम्त पूर्वी म्हणजे समाजशास्त्राच्या उगमापूर्वी समाजाचे अध्ययन होत नव्हते काय? प्रश्न अगदी बरोबर आहे व त्याचे उत्तर असे आहे की, समाजशास्त्राच्या उत्पत्तीपूर्वी समाजाचे-सामाजिक व्यवहाराचे, सामाजिक संबंधाचे, संस्कृतीचे, धर्माचे, सामाजिक संस्थांचे अध्ययन इतर सामजिक शास्त्रातून होत होते. तसेच ते धर्मशास्त्रातूनही होत असे. परंतु वैज्ञानिक अध्ययन पद्धतीचा वापर करून स्वतंत्रपणे, उद्दिष्टपूर्ण व वस्तुनिष्ठ स्वरूपात सामाजिक संबंधाचा, व्यवहारांचा अभ्यास ऑगस्त कॉम्त द्वारा प्रथमच सुरू करण्यात आला, त्यामुळेच ऑगस्त कॉम्तला समाजशास्त्राचा जनक मानले जाते (father of sociology)

ऑगस्त कॉम्तच्या पूर्वी देखील समाजशास्त्राच्या अभ्यासाला सुरुवात झाली होती. परंतु त्या अध्ययनाला स्वतंत्र शास्त्राचा दर्जा मात्र प्राप्त झालेला नव्हता. समाजशास्त्र एकाकी विकास पावले नाही. यासाठी त्याला अनेक अवस्थांतून जावे लागले आहे. तेव्हा येथे आपण थोडक्यात समाजशास्त्राच्या विकासाचा प्रवास लक्षात घेऊ या. या प्रवासालाच समाजशास्त्राच्या विकासाच्या अवस्था देखील म्हणता येईल.

## १.१ समाजशास्त्राच्या विकासाच्या अवस्था (stages of development of sociology)

### १) समाजशास्त्राच्या विकासाची प्रथमावस्था / स्तर
(preliminary stage of development of sociology)

साधारणपणे असे मानले जाते की, समाजशास्त्राच्या विकासाची सुरुवात युरोपातून झाली. परंतु काही भारतीय विचारवंतांच्या मते समाज जीवनासंबंधी अनेक महत्त्वाच्या बाबी वेद, उपनिषद, पुराण, महाकाव्य आणि स्मृती इत्यादीत मिळतात. भारतातील वर्णने व्यवस्था या गोष्टीची साक्ष देतात की समाजजीवनाचे व्यापक अध्ययन व त्याचा विकास पाश्चात्त्य विद्वानांच्या फार पूर्वीच केला होता किंवा तशी सुरवात तर त्यांनी निश्चितच

केली होती असे स्पष्टपणे दिसते. पाश्चात्त्य समाजात समाजासंबंधी अध्ययनाची सुरुवात यूनानी विचारवंताद्वारे झाली. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल रचित साहित्य या दिशेने झालेल्या प्रयत्नांची साक्ष आहेत. प्लेटोने आपल्या 'रिपब्लिक' (republic- 437-347 B.C.) आणि ॲरिस्टॉटल ते आपल्या 'इथिक्स् एन्ड पॉलिटीक्स' (Ethics and politics, 384-322 B.C.) या ग्रंथात समाजजीवनासंबंधी विविध समस्यांच्या व घटनांचा व्यवस्थित ऊहापोह केला आहे. या विद्वानांमध्ये स्पष्टतेचा अभाव होता तसेच त्यांना समाज, समुदाय, राज्य इ. मध्ये तसेच दुसरीकडे तत्त्वज्ञान आणि विज्ञान यामध्ये स्पष्ट फरक करता आला नाही. सामाजिक घटनांचे अध्ययन वैज्ञानिक दृष्टिकोनातून फारसे झाले नाही. प्लेटो, ॲरिस्टॉटल नंतर समाजजीवनाचे अध्ययन आणि समाजशास्त्राच्या विकासात लुकेशियम (97-55 B.C.) सिसरो (106-43 B.C.), मारकस आरेलिअस (121-180 A.D.), सेन्ट ऑगस्टाइन (354-430 A.D.) इ.चे उल्लेखनीय योगदान राहिले आहे. या विचारवंतानी देखील रीती-रिवाज, प्रथा, परंपरा, कौटुंबिक जीवन, भौगोलिक अवस्थांचा व्यक्ती आणि समाजावर काय परिणाम होतो याचे अध्ययन केले आहे.

ii) **समाजशास्त्राच्या विकासाची दुसरी अवस्था**

(second stage of Development of Sociology)

सहाव्या शतकापासून ते चौदाव्या शतकापर्यंतचा कालावधी हा समाजशास्त्राच्या विकासातील दुसरी अवस्था किंवा स्तर मानली जाते. या काळात देखील साधारणत: आठ शतकापर्यंत (८०० वर्ष) समस्यांना समजून घेण्यासाठी धर्म आणि तत्त्वज्ञानाचा आधार घेतला गेला. परंतु १३ व्या शतकात सामाजिक समस्यांना तर्काच्या आधारे समजून घेण्याच्या प्रयत्नाला सुरुवात झाली होती. हळूहळू सामाजिक घटनांच्या अध्ययनात तर्काचे महत्त्व वाढत गेले. थॉमस एफ्यूनस (१२२७-१२७४) आणि दान्ते (१२६५-१३२१) च्या साहित्यातून असे दिसून येते की त्यांनी तर्काला महत्त्वाचे स्थान दिलेले होते. या विद्वानांनी मनुष्याला एक सामाजिक प्राणी मानले आणि समाजाला व्यवस्थित पद्धतीने संचालित करण्यासाठी सरकारच्या आवश्यकतेवर भर दिला. एफ्यूनसने सामाजिक सहकार्य, न्याय, ईश्वर, श्रद्धा, ऐक्य इ. चे अध्ययन केले. याच काळात समाजाला परिवर्तनशील मानले गेले. आणि असे देखील सांगितले गेले की, परिवर्तनाच्या मागे काही निश्चित नियम, सामाजिक क्रिया आणि शक्ती कार्य करतात. या काळात सामाजिक घटना आणि तथ्यांना समजून घेण्यासाठी अशा विधींवर जोर दिला गेला. ज्याचा प्रयोग नैसर्गिक घटना आणि तथ्यांना समजून घेण्यासाठी केला जात होता. परिणामत: या काळात विचारवतांच्या चिंतनक्रियेत विज्ञानाचा प्रभाव दिसू लागला. याच काळात किंवा अवस्थेत समाजाच्या अध्ययनात कार्य-कारण संबंधावर भर देण्यात येऊ लागला. विद्वानांना असा विश्वास वाटू लागला की, समाजात होणाऱ्या परिवर्तनाच्या काही सामाजिक नियम, शक्ती आणि क्रिया असतात. ईश्वराच्या चमत्काराऐवजी तर्काचे महत्त्व वाढले.

iii) **समाजशास्त्राच्या विकासाची तिसरी अवस्था :**

(Third stage of Development of Sociology)

या अवस्थेची सुरुवात पंधराव्या शतकापासून मानली जाते. या काळात सामाजिक घटनेच्या अध्ययनात वैज्ञानिक अध्ययन पद्धतीचा उपयोग करण्यास सुरुवात झाली. या काळात समाजजीवनाच्या विविध बाजूंचे– सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक इत्यादींचे स्वतंत्र रूपात अध्ययनास प्रारंभ झाला. याचा परिणाम म्हणून विशेष सामाजिक शास्त्रांचा उदा. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र इ. सामाजिक शास्त्रांचा विकास झाला. या काळातील विचारवंतांच्या बौद्धिक चिंतनामुळे समाजशास्त्राच्या विकासासाठी आवश्यक पार्श्वभूमी तयार होण्यास मदत झाली. हॉब्स, लॉक आणि रुसो डाटा – सामाजिक करार सिद्धांताची मांडणी–बांधणी होऊ शकली. सर थॉमस मूर ने आपल्या यूटोपिया (utopia) ग्रंथात रोजच्या सामाजिक व्यवहारांना समजून घेण्याचा प्रयत्न केला. याच पुस्तकात थॉमसने तत्कालीन इंग्लंडच्या सामाजिक व्यवस्थेचे विवेचन केले आहे. मॉन्टेस्क्यू ने आपल्या "The Spirit of Laws" या पुस्तकात मानव समाजावर भौगोलिक पर्यावरणाचा प्रभाव दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. विको नावाच्या अभ्यासकाने "The New Science" या ग्रंथात सामाजिक शक्तीच विवेचन केले आहे. माल्थसने लोकसंख्या सिद्धांत आणि जनाधिक्या (Overpopulation) शी संबंधित प्रश्नावर प्रकाश टाकला. ॲडम स्मिथ ने आर्थिक मनुष्याचा विचार केला. कंडोस्टेट ने सामाजिक परिवर्तनाचा सिद्धांत मांडला. जेम्स हेरिंगटन ने इतिहासाचे आर्थिक स्पष्टीकरण मांडले. या अवस्थेत (काळात) अनेकांनी समाजशास्त्राच्या विकासात आपले योगदान दिले. परंतु यांच्या अध्ययनात एकवाक्यता आणि विशेषीकरणाचा अभाव होता.

iv) **समाजशास्त्राच्या विकासाची चौथी अवस्था:**

(Fourth Staage of Development of Sociology)

**या अवस्थेला दोन भागात विभागता येईल.**

**अ) १९व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत** (first half)

**ब) १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत व त्यानंतर**

**(अ) १९ व्या शतकाचा पूर्वाध:**

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धात अर्थशास्त्रज्ञांनी, तत्त्ववेत्त्यांनी आणि इतिहासकारांनी जास्त करून आर्थिक स्थितीवर लक्ष केंद्रित करून सामाजिक समस्यांचे अध्ययन केले. या विद्वानांमध्ये हलमॅन, एडम, मूलर, माकरर, हसलर, आरनोल्ड, स्टर्नफैण्ड, रोशरलीले, हिण्डब्राण्ड, प्रौथा इत्यादींचे नो उल्लेखनीय आहेत. त्यावेळी वैज्ञानिक विधीचा प्रयोग करूनही सामाजिक आणि आर्थिक घटनांमध्ये स्पष्ट फरक फारसा करण्यात आलेला नव्हता. अधिकांश सामाजिकशास्त्रे समाजाच्या एका विशिष्ट बाजूच्या अध्ययनात गुंतल्याचे आढळते. कोणतेही असे एक शास्त्र नव्हते ज्यांनी आपले लक्ष केवळ सामजिक बाजूवर केंद्रित केलेले होते. किंवा ज्याने समाजाच्या संपूर्ण बाजूंचा सर्वसामान्य अध्ययनाला महत्त्वाचे मानले होते. याच वेळी एक सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ जेम्स मिल (James mill) ने एका अशा शास्त्राची आवश्यकता अनुभवली जे संपूर्ण समाजाचे तत्त्वज्ञान ठरेल. मिलच्या या इच्छेची पूर्ति प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ ऑगस्त कॉम्ते (August Comte: 1798-1857

A.D.) ने एका नव्या सामाजिक शास्त्राची कल्पना केली. अगोदर त्यांनी या शास्त्राचे नाव– 'सामाजिक भौतिकी' (Social Physics) ठेवले आणि १९३८ मध्ये या नावात बदल करून 'समाजशास्त्र' (Sociology) हे नाव ठेवले. इतर अभ्यासकांनी कॉम्तच्या महत्त्वाच्या योगदानाबद्दल त्याला समाजशास्त्राचा पिता म्हणून गौरव दिला. पुढे जेम्स मिलचा पुत्र जॉन स्टुअर्ट मिल (J. S. Mill) ने Sociology या संज्ञेचा फार मोठ्या प्रमाणावर प्रचार केला. आणि अशा प्रकारे समाजशास्त्राच्या अध्ययनाची पायाभरणी केली.

ऑगस्त कॉम्तनेच सर्वप्रथम सामाजिक तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्रात फरक स्पष्ट केला. त्यानेच समाजशास्त्रीय प्रणालीचा विकास केला. कॉम्तनेच सांगितले की, नैसर्गिक किंवा भौतिक घटनांप्रमाणेच सामाजिक घटनांचा वस्तुनिष्ठ पद्धतीने अभ्यास केला जाऊ शकतो. ब्रिटिश समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट स्पेन्सरने समाजशास्त्राच्या विकासात सक्रिय योगदान दिले. सावयवी सिद्धांताचा वापर करून समाजाची तुलना शरीराशी केली. सर्वप्रथम अमेरिकेत येल विद्यापिठात समाजशास्त्राच्या अध्ययन–अध्यापनाला (१८७६) सुरुवात झाली.

**१९ व्या शतकाचा उत्तरार्ध :**

यामध्येच हर्बट स्पेन्सर, जे.एस. मिल, गिन्सबर्ग, रॉबर्टसन, बकल, वेस्टरमार्क, मानहीम, हॉबहाऊस, दुर्खिम, ससो, मॉन्टेन, मॉस, टार्डे, कार्ल मार्क्स, टोनिज, रेजल, विरकान्त, मॅक्सवेबर, सिमेल, वानविजे, पार्सन्स्, सोरोकीन, बार्न्स, रॉस, मॅकमाइवर, वार्ड, ऑगबर्न, गिडिंग्स, निमकॉफ, लुण्डबर्ग इ. विद्वानांनी, जे फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी, अमेरिका इ. देशाचे होते. यांनी समाजशास्त्राच्या विकासात मोठे योगदान दिले.

अमेरिकेत समाजशास्त्राचा विकास सर्वात जास्त झाला. म्हणूनच समाजशास्त्राला 'अमेरिकन शास्त्र' देखील म्हटले जाते. पुढे इ.स. १८९६ मध्ये फ्रान्स मध्ये, १९०७ मध्ये इंग्लंड, १९२० मध्ये हॉलण्ड, १९२४ मध्ये मिश्र, १९४७ मध्ये स्वीडन, १९४७ मध्येच लंकेत, १९५४ मध्ये रंगून विद्यापीठात समाजशास्त्राचे स्वतंत्र रूपाने अध्ययन–अध्यापन सुरू झाले. आज जवळपास सर्वच विकसित आणि विकसनशील देशांमध्ये समाजशास्त्राचे अध्ययन–अध्यापन सुरू झालेले आहे.

## १.२ भारतात समाजशास्त्राचा विकास :

भारतात समाजशास्त्राच्या विकासाला तीन भागात विभागता येईल.

अ) प्राचीन भारतात समाजशास्त्राचा विकास

ब) भारतात समाजशास्त्राचा औपचारिक प्रतिस्थापन युग

क) स्वतंत्र भारतात समाजशास्त्राचे व्यापक प्रसार युग

वरील तीन विभागातील किंवा युगातील समाजशास्त्राच्या विकासाचे वर्णन थोडक्यात पुढीलप्रमाणे करता येईल.

**अ) प्राचीन भारतात समाजशास्त्राचा विकास:**

(Development of Sociology in Ancient India)

भारताला समाजशास्त्राच्या अध्ययनात अग्रणी मानले जाऊ शकते. कारण सामाजिक अध्ययनाचा भारताचा इतिहास चार हजार वर्षापेक्षाही जास्त आहे. अधिकांश समाजशास्त्रज्ञ किंवा पाश्चात्त्य विचारवंत समाजशास्त्राची सुरुवात युरोपातून मानतात आणि पक्षपात करून हे विसरतात, की जेव्हा युरोपात सभ्य जीवन नव्हते त्याच्या अगोदरपासून भारतात सामाजिक जीवन उन्नत अवस्थेत होते. समाजशास्त्राचा आशय सामाजिक संबंधाविषयी व त्याच्या व्यवस्थित ज्ञानाशी आहे. प्राचीन भारतात उनपिषद, महाभारत, स्मृती गीता इ. मध्ये सामाजिक संबंधाविषयी, त्याच्या स्वरूपाबाबत आणि सामाजिक व्यवस्थेचे जे सूक्ष्म अध्ययन व विवेचन केले गेले आहे ते वास्तविक अर्थाने समाजशास्त्रीय अध्ययनच आहे. ज्या प्रदीर्घ अनुभवाच्या आधारावर भारताच्या प्राचीन सामाजिक अभ्यासकांनी, विद्वानांनी संयुक्त कुटुंब पद्धती, वर्णव्यवस्था, आश्रम-व्यवस्था, कर्मसिद्धांत, पुरुषार्थ, पुनर्जन्म, मोक्ष, गावपंचायत, जातीव्यवस्था(श्रमविभाजन), विवाहसंस्था व त्याचे नियम, आणि इतर तत्सम बाबी सामाजिक ज्ञानामुळेच शक्य झाले आहे. वैदिक आणि उत्तर वैदिक काळातील सामाजिक चिंतनात धर्माचा प्रभाव अधिक आढळतो. या काळात सामान्यत: लोक सामाजिक ज्ञानाला धार्मिक ज्ञान आणि सामाजिक व्यवस्थेला धार्मिक व्यवस्थेच्या रूपात पाहत असत. मनुस्मृती आणि चाणक्याचे अर्थशास्त्र इ. ना समाजशास्त्राचे महान ग्रंथ मानता येईल. यामध्ये सामाजिक, राजकीय आणि आर्थिक नीतीचे प्रतिपादन करण्यात आले आहे. याच्या तुलनेत युनानी विचारवंताचा स्तर किंवा विचारांचे प्रस्तुतीकरण फारसे सूक्ष्म वाटत नाही. प्राचीन भारतात सामाजिक ज्ञानाची ही प्रथमावस्था होती तरीही ती तुलनेने सर्वोच्च होती.

कौटिल्याचे अर्थशास्त्र, शुक्राचार्यांचे नीतिशास्त्र, मनुची मनुस्मृती, मोगल काळातील आईने मकबरी इ. ग्रंथापासून असे दिसून येते की, त्यावेळची सामाजिक स्थिती काय होती, सामाजिक व्यवस्था कशी होती, कोणत्या प्रकारचे रीतिरिवाज प्रथा, परंपरा आणि व्यवहाराबाबतचे आदर्श नियम कशा प्रकारचे होते. मनुस्मृतीमध्ये सामाजिक ज्ञानप्रवाह भरलेला दिसून येतो. यामध्ये वर्ण, जाती, विवाह, कुटुंब, राज्य, धर्म इ. चा गांभीर्याने विचार केलेला आहे. या ग्रंथाने समाजाचे भावी स्वरूप ठरविण्यात फार मोठे योगदान दिले आहे. प्राचीन ग्रंथाचे समाजशास्त्रीय दृष्टीने अध्ययन करण्याच्या दिशेने प्रो. विनयकुमार सरकार, प्रो. बृजेन्द्रनाथ, डॉ. भगवानदास आणि प्रो. केवल मोतवाणी यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. आज आवश्यकता आहे की प्राचीन भारतीय विचारांवर समाजशास्त्रीय दृष्टीने अध्ययन व संशोधनाची एक गोष्ट येथे लक्षात घेणे देखील आवश्यक आहे की त्या वेळी समाजव्यवस्थेवर धर्माचा पगडा जास्त होता.

### (ब) आधुनिक काळात भारतातील समाजशास्त्राचा विकास :

वैज्ञानिक पद्धतीने समाजाचे अध्ययन करण्याचा जेथे प्रश्न निर्माण होतो तेथे असे म्हणता येईल की, भारतात समाजशास्त्राचा विकास वर्तमान काळातील आहे. एका स्वतंत्र विषयाच्या स्वरूपात- समाजशास्त्राचे अध्ययन-अध्यापन सर्वात अगोदर मुंबई विद्यापीठात इ.स. १९१९ मध्ये प्रो. पोट्रीक गिड्सच्या अध्यक्षतेखाली सुरू झाले. त्यानंतर १९२३ मध्ये

म्हैसूर विद्यापीठात समाजशास्त्राच्या अध्ययन-अध्यापनाची सुरुवात झाली. पुढे वेगाने भारतातील इतर विद्यापीठात समाजशास्त्राच्या विषयाचे अध्ययन सुरू करण्यात आले. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, पंजाब, लखनौ, कानपूर, दिल्ली, आग्रा, मेरठ, इन्दौर, गोरखपूर, रांची, कर्नाटक, राजस्थान, हैद्राबाद अशा अनेक विद्यापीठांमधून समाजशास्त्राचे अध्ययन-अध्यापन व संशोधन कार्य चालू आहे. संशोधनाच्या क्षेत्रात 'आग्रा इन्स्टीटयूट ऑफ सोशल सायन्सेस' चे नाव उल्लेखनीय आहे. इ.स. १९१४ ते १९४७ पर्यंतचा काळ भारतात समाजशास्त्राच्या औपचारिक प्रतिस्थापनेचा काळ म्हणता येईल. आज भारतात समाजशास्त्राच्या विकासाने वेग धरला आहे. समाजशास्त्राच्या विकासाच्या दृष्टीने देशात काही शोध संस्थान देखील सुरू करण्यात आले आहेत. उदा. टाटा इन्स्टिटय़ूट ऑफ सोशल सायंसेस, मुंबई; जे.के. इन्स्टिटय़ूट ऑफ सोशियोलॉजी एण्ड सोशल वर्क्स, लखनौ; आई.आई.टी कानपूर इ. आज तर चिकित्सशिास्त्रात अर्थात संस्थांमध्ये समाजशास्त्रीय ज्ञानाचे महत्त्व वाढत आहे. वर्तमान भारतात कृषी विद्यापीठांमध्ये देखील ग्रामीण समाजशास्त्राच्या अध्ययनाकडे विशेष लक्ष दिले जात आहे. भारतातील काही प्रमुख समाजशास्त्रज्ञांची नावे पुढीलप्रमाणे देता येतील- डॉ. जी.एस.घुरिये, डॉ. के. एम. कपाडिया, डॉ. पी.एन. प्रभू, डॉ. एम.एन. श्रीनिवास, डॉ. राधाकमल मुकर्जी, डॉ. शामाचरण दुबे, डॉ. आर.एन. सक्सेना, डॉ. ए.आर. देसाई, डॉ. आई. पी. देसाई, डॉ. डी. एन. मुजुमदार इ. प्रो. विनयकुमार सरकार द्वारा लिखित - The positive background of Hindu Sociology, the Falk Element in Hindu Culture and Human progress Am{U Creative India from Mohen-jo-daro to the age of Ramkrishna, Vivekanand इ. ग्रंथांनी भारतात समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन-अध्यापन करण्याच्या एका नव्या युगाची सुरुवात झाली आणि इतर विद्वानांना या संदर्भात विचार करावयास भाग पाडले.

प्रो. बृजेंद्रशील ने "Positive science of the Ancient Hindus" ग्रंथातून प्राचीन हिन्दुत्वाचे शास्त्रीय विवेचन केले आहे. डॉ.भगवान दास ने आपल्या " The Science of Social Organisation (1909) या ग्रंथात मनुच्या समाजव्यवस्थेचे विस्ताराने अध्ययन केले आहे. प्रो. केवल मोटवानीने आपल्या "India's Ancient Literature : An Introductory Survey" या ग्रंथात प्राचीन परंपरेच्या संदर्भात हिन्दुत्वाचे वैज्ञानिक विवेचन केले आहे. या विद्वानांच्या योगदानाला विसरता येणार नाही.

डॉ. कपाडियाने 'विवाह, कुटुंब आणि नातेदारी'वर आपल्या अध्ययनाच्या आधारावर बरेच काही लिहिले आहे. आपल्या अनेक लेखांच्या व्यतिरिक्त दोन महत्त्वाच्या ग्रंथांची रचना केली आहे. ते दोन ग्रंथे म्हणजे-(i) मॅरेज एण्ड फैमिली इन इंडिया आणि (ii) हिन्दू विनशीप हे ते दोन ग्रंथे होत. डॉ. मुजुमदारने बिहार, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश आणि बंगालच्या आदिवासी क्षेत्रात महत्त्वाचे संशोधन कार्य केले आहे. जातीव्यवस्था आणि ग्रामीण भारताबाबतीतही डॉ. मुजूमदारांनी बरेच काही लिहिले आहे. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांमध्ये- 'रेस एण्ड कल्चर इन इंडियाफ, 'एन इन्ट्रोडक्शन टू सोशल एथ्रोंपोलॉजी', 'ट्राइब इन ट्रांन्सशन', कास्ट एण्ड कम्युनकेशन इन एन इंडियन व्हिलेज', 'दि अफेअर ऑफ

ए ट्राइब', 'मॅट्रिक्स ऑफ इंडियन कल्चर'इ. चा समावेश होतो. पाश्चात्त्य परंपरेशी संबंधित इतर काही भारतीय विद्वानांनी देखील समाजाचे अध्ययन केले आहे. या विचारप्रवाहाशी संबंधित विद्वानांनी धार्मिक विश्वास आणि नैतिक विचारांच्या तुलनात्मक अध्ययनावर भर दिला. उदा. एम.एन. श्रीनिवास यांनी दक्षिणेतील कुर्ग प्रदेशातील कुर्ग लोकांचे या दृष्टीने अध्ययन केले आणि आपले पुस्तक 'रिलीजन एण्ड सोसायटी अमंग दी कुर्गज् ऑफ साऊथ इंडिया' लिहिले. इतर समाजशास्त्रज्ञांनी अशा प्रकारचे अध्ययन फारसे केले नाही. खरे तर अशा प्रकारच्या अध्ययनाची आवश्यकता, उपयोगिता आणि महत्त्व आहे. श्रीनिवास यांनी भारतीय समाजशास्त्रात संस्कृतिकरणाची नवीन संकल्पना दिली. 'मॅरेज एण्ड फॅमिली इनं म्हैसूर', 'कास्ट इन मॉडर्द इंडिया एण्ड अदर एसेज', सोशल चेंज इन मॉडर्न इंडिया', 'इंडियन व्हिलेज', दी रिमेंबर्ड व्हिलेज', इ. ग्रंथ भारतीय समाजशास्त्राला श्रीनिवास यांचे योगदान म्हणता येईल.

भारतात अनेक विद्वानांनी 'ग्रामीण अध्ययने' देखील केली आहेत. ही अध्ययने अमेरिकन समाजशास्त्रीय परंपरेनी बरीच प्रभावित असल्याची दिसतात. भारतात डॉ. एस.सी. दुबे, डॉ.मुजुमदार, डॉ. ए. आर. देसाई इ. प्रमुख समाजशास्त्रज्ञांनी ग्रामीण समाजाच्या अध्ययनात विशेष योगदान दिले आहे. डॉ. एस.सी. दुबे यांनी पुढील ग्रंथ लिहीले आहेत.– 'एन इंडिया व्हिलेज', 'इंडियन चेंजिंग व्हिलेजेस', आणि 'द कमार' इ. डॉ. मुजूमदार ने आपल्या 'रूरल प्रोफाईल' मध्ये ग्रामीण समाजाचे समाजशास्त्रीय चित्रण केले आहे. डॉ.ए.आर.देसाई ने भारतीय ग्रामीण समाजावर बरेच काही साहित्य उपलब्ध करून दिले आहे. 'रूरल सोशियॉलॉजी इन इंडिया' 'रूरल इंडिया इन ट्रान्सेशन, सोशल बॅकराऊंड ऑफ इंडियन नॅशनलिजम्' इ. ग्रंथ भारतीय समाजशास्त्राच्या दिलेल्या योगदानाची पावती आहेत. डॉ. राधाकमल मुकर्जी यांनी 'अर्थशास्त्राचा संस्थात्मक सिद्धांत (इन्स्टिट्यूशनल थिअरी ऑफ इकॉनामिक्स) मांडला. यामध्ये आर्थिक जीवनावर सामाजिक मूल्य आणि परंपराचा कसा प्रभाव पडतो हे दर्शविण्याचा प्रयत्न केला गेला आहे. डॉ. पी.जी.मुकर्जींनी अर्थशास्त्राशी संबंधीत प्राचीन ज्ञानाला इंतिहास आणि समाजशास्त्राशी जोडण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य केले आहे. भारतात समाजशास्त्रीय चिंतनावर पाश्चात्यांचा प्रभाव असल्या कारणाने समाजशास्त्राचा स्वतंत्रपणे विकास होऊ शकला नाही. आज असे म्हणता येईल की, आता समाजशास्त्र उपनिवेशवादाच्या प्रभावापासून मुक्त हाऊ पाहत आहे. आणि स्वतंत्रपणे विकासाचा मार्ग धरू इच्छितो आहे.

भारतात समाजशास्त्राच्या विकासाची दुसरी प्रवृत्ती व तिच्या समर्थकांनुसार भारतीय समाजशास्त्रीय विचारांचा प्रवाह व त्याचा आधार पाश्चात्य समाजशास्त्रीय सिद्धांत नसून भारतीय परंपरागत सिद्धातं असले पाहिजे. भारतीय समाज अणि संस्कृतीत अशी काही वैशिष्टे आहेत, ज्यांना पाश्चात्य समाजशास्त्रीय सिद्धांताचे अनुकरण करून समजून घेलतले जाऊ शकत नाही. अशा परिस्थितीत भारतात समाजशास्त्राचा विकास परंपरागत भारतीय समाजशास्त्रीय सिद्धांताच्या आधारावरच समजून घेता येईल. असे केल्यानेच आपण भारतीय समाजाला योग्य पद्धतीने समजून घेऊ शकू. अशा प्रकारच्या विचारकांमध्ये श्री. आनंदकुमार स्वामी, डॉ. भगवानदास, प्रो. ए.के. सरण, नरेंन्द्र आणि नर्मदेश्वर प्रसाद इ. समावेश करता

येईल. आनंदकुमार स्वामी आणि डॉ. भगवानदास यांचे असे मत आहे की, पाश्चात्यांपासून घेतलेल्या सिद्धांताच्या आणि संकल्पनाच्या आधारावर आम्हाला भारत व भारतीय समाज नीट समजून घेता येणार नाही. भारतीय समाज व पाश्चात्य समाज यांच्यातील सामाजिक मूल्य, जीवनदर्शन आणि संस्कृतीत काही मूलभूत अंतर आहे. त्यामुळे पाश्चात्य सिद्धांत भारतातील सामाजिक जीवनाला वास्तविक स्वरूपात समजून घेण्यास फारसे उपयोगाचे नाहीत व बऱ्याच प्रमाणात ते सिद्धांत भारतीय परिवेशात निरुपयोगी, व्यर्थ व कुचकामाचे ठरतात. पाश्चात्य सिद्धांताच्या आधारे भारतीय समाज समजून घेणे म्हणजे अंधारात प्रवास करण्यासारखे आहे. भारतीय समाजाला भारतीय मूल्यांच्या, इतिहासाच्या आधारावरच समजून घेणे गरजेचे आहे. आनंदकुमार व डॉ. भगवानदास यांच्या मतानुसार परंपरागत भारतीय विचारांचे अध्ययन तार्किक दृष्टीने झाले पाहिजे. प्रो. सरनने भारतीय समाजाच्या सरंचेनच्या अध्ययनाकरिता सामाजिक मूल्यांना योग्य प्रकारे समजून घेण्यावर भर दिला आहे. प्रो. नर्मदेश्वर प्रसादने जाती व्यवस्थेच्या अध्ययनाच्या अधारावर भारतीय समाज आणि संपूर्ण जीवन-व्यवस्थेला समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व विचारवंतांची अशी मान्यता आहे की भारतीय समाज, सामाजिक संस्था आणि संस्कृती इतक्या गुंतागुंतीच्या आहेत की यांच्या अध्ययनांनीच आम्हाला संपूर्ण भारतीय समाज व्यवस्था समजून घेता येईल. आज अधिकांश समाजशास्त्रज्ञ असे मानतात की केवळ परंपरागत भारतीय सिद्धांताच्या आधारेच नव्हे तर आवश्यक तेथे पाश्चात्त्य सिद्धांत आणि संकल्पनांचा देखील आधार घेतला पाहिजे.

डॉ. डी.पी. मुकर्जी यांनी भारतीय सामजशास्त्राच्या विकासात बरेच काही योगदान दिले आहे. मुकर्जींचा असा विश्वास होता की, भारतीय समाजाचा स्वत:चा असा एक विचारप्रवाह, जीवन तत्त्वज्ञान आहे. त्याच्या स्वत:च्या काही मान्यता आहेत. ज्याचे अध्ययन करण्याची आवश्यकता आहे. भारतीय समाजाला समजून घेण्यासाठी भारतीय परंपरांचे अध्ययन करणे फार गरजेचे आहे. पुढे मुकर्जी म्हणतात, भारतात संशोधन कार्य केवळ पाश्चात्य संस्कृतीतून आयातित सिद्धांतावर-संकल्पनांवर आणि अध्ययन पद्धतीच्या आधारावरच होऊ नये, येथे संशोधनासाठी भारतीय परंपरा, प्रथा, संस्कार, लोकरीती इत्यादी बाबींना नीट समजून घेतले पाहिजे. यासाठी ऐतिहासिक पद्धतीची मदत घेतली पाहिजे. मुकर्जींच्या मते भारतात पाश्चात्त्य आणि भारतीय परंपराच्या समन्वयात्मक चिंतनाच्या आधारावरच समाजशास्त्राचा योग्य व उपयोगी विकास होऊ शकतो.

राधाकमल मुकर्जी म्हणतात, समाजशास्त्रीय विचारांना योग्य प्रकारे समजून घेण्यासाठी ऐतिहासिक दृष्टिकोनाचा उपयोग केला पाहिजे. समाजाच्या सामान्य सिद्धांतांना समजण्यासाठी त्या समाजाच्या स्तरीकरण पद्धतीला आणि विद्यमान अलौकिक विश्वासांच्या बाबत तथ्य प्राप्त करणे आवश्यक आहे. पाश्चात्त्य समाजशास्त्रीय परंपरांनी प्रभावित होऊन मुकर्जी यांनी भारतात परिस्थितीकीय समाजशास्त्र ( इकोलॉजिकल सोशियॉलॉजी) चा विकास करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लिहिलेल्या 'डायनॉमिक ऑफ मार्क्स, सोशल इकोलॉजी आणि सोशल स्ट्रक्चर ऑफ व्हॅल्यू', इत्यादी ग्रंथातून त्यांनी आपले विचार मांडले आहेत. डॉ. जी.एस. धुरियेंच्या मते केवळ पाश्चात्त्य सिद्धांताचे अंधानुकरण करून भारतीय समाज व

संस्कृती समजू शकत नाही. युरोपात समाजशास्त्राचा जो काही विकास झाला आहे, जे काही सिद्धांत व संकल्पना विकसित झाल्या आहेत, ज्या पद्धतींचा वापर केला गेला आहे, त्यांना भारताची परिस्थिती, समाजव्यवस्थेची वैशिष्ट्ये इत्यादी गोष्टी लक्षात न घेता आंधळेपणाने वापर करणे धोक्याचे आहे. समन्वयात्मक चिंतनाच्या आधारावरच भारतात समाजशास्त्राचा विकास केला गेला पाहिजे. डॉ. आर.एन. सक्सेना देखील वरील विचारांना अनुमोदन करतात. त्यांच्या मतानुसार पुरुषार्थ सिद्धांत- धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष व्यक्तीच्या सर्व प्रकारच्या सामाजिक संबंधाचा आधार आहे आणि समाजशास्त्रात याच्या अध्ययनावर भर दिला गेला पाहिजे.

भारतात समाजशास्त्राच्या विकासाच्या इतर प्रवृत्ती मार्क्सवादी विचारांनी प्रभावित असल्याचे देखील आढळून येते. प्रो. डॉ. डी.पी. मुकर्जी या प्रवृत्तीने प्रभावित राहिले आहे. तरी देखील त्यांनी सांस्कृतिक परंपरांच्या अध्ययनाच्या आधारावर समाजव्यवस्थेला समजून घेण्यावर भर दिला आहे. भारतात समाजशास्त्राच्या विकासात वरील विद्वानांव्यतिरिक्त डॉ. पी.एन.प्रभू, डॉ. सच्चिदानंद, डॉ. योगेश भटल, डॉ.योगेंद्र सिंह, प्रो. एल.पी. विद्यार्थी, प्रो. राजारामशास्त्री, प्रो. एम.एल.ए.राव, प्रो.वाई.पी. दामले, डॉ. श्रीमती इरावती कर्वे, डॉ. बृजलाल चव्हाण, प्रो. एस.पी. नगेन्द्र यांनीही योगदान दिले आहे.

स्वातंत्र्योत्तर भारतात आतपावेतो समाजशास्त्रीय चिंतनाला स्पष्ट अशी दिशा मिळालेली नाही. पाश्चात्त्य सिद्धांताच्या, पाश्चात्त्यांच्या विचारातून भारतीय समाजव्यवस्थेचे आंधळे चिंतन करण्याची, न्यूनगंडाची प्रवृत्ती गेलेली नाही. भारतीय समाजशास्त्राचे अध्ययन म्हणावे तितके विकास पावलेले नाही.

## A) Historical Background-Hindu Sociology, Indology, Indian Sociology

### हिन्दू समाजशास्त्राची (हिन्दू सामाजिक संगठन व व्यवस्था) ऐतिहासिक पार्श्वभूमी :

सामाजिक वर्ग (social class) मनुष्याच्या अशा समूहाचे प्रतिनिधित्व करतो, ज्याला समाजात एक विशेष स्थान प्रदत्त करण्यात आले. हे स्थान किंवा दर्जा (प्रस्थिती status) त्याच्या सामाजिक प्रतिष्ठेच्या आधारावर अवलंबून असते, आणि ही सामाजिक प्रतिष्ठा वर्गाच्या सदस्याच्या आचरण-व्यवहारावर आणि सामाजिक सोयींच्या आधारावर ठरते. वर्ग-प्रतिष्ठेत काही सोयी प्राप्त होतात, ज्या संपत्ती, बुद्धी, राजकीय पद किंवा अन्य कुठल्याही आधारावर असू शकतात.

आधुनिक विचारकांचे असे मत आहे की, ही वर्गव्यवस्था बऱ्याच प्राचीन काळापासून जगातील सर्वच समाजात राहिली आहे, वर्तमान काळातही आहे, आणि भविष्यात याचे संपुष्टत्व किंवा समाप्त होण्याची शक्यता वाटत नाही. वार्ड, समनर, फुले, मॅकआयव्हर इ. प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञांनी सखोल अध्ययन आणि विश्लेषणांनतर अशाच प्रकारचे मत व्यक्त केले आहेत.

भारतीय समाज देखील या अपरिहार्य सामाजिक स्तरीकरणापासून मुक्त नाही. येथील

वर्ग-भेदाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अशा प्रकारचा वर्ग-भेद जगातील इतर समाजात फारसे पाहावयास मिळत नाही. ही वर्ग व्यवस्था वर्ण-धर्म किंवा जातिव्यवस्थेच्या नावाने ओळखली जाते.

समाजाचे वर्गीकरण परंपरागत, आधुनिक आणि आधुनिकोत्तर समाजात केले जाऊ शकते. परंपरागत समाजात व्यवहारासंबंधी प्रतिमाने आणि मूल्यांमध्ये धर्म आणि जादूवर भर दिला जातो. ज्यामध्ये वास्तविक किंवा काल्पनिक भूतकाळाशी घट्ट नाते किंवा सातत्याचा संकेत मिळतो. हा समाज पवित्र भोजन, बळी प्रथा, कर्मकांड इ. चा स्वीकार करतो. साधारणपणे परंपरागत समाज त्याला म्हणता येईल ज्यामध्ये-

१. व्यक्तीचा दर्जा त्याच्या जन्मानुसार ठरतो. आणि ती सामाजिक गतिशीलतेसाठी फारसा प्रयत्न करीत नाही.

२. लोकांचा व्यवहार भूतकाळातील आदर्शमूल्यांशी, प्रतिमानांशी, जनरीती-रिवाज, परंपरा इ. ने संचालित आणि नियंत्रित होत असतो.

३. सामाजिक संगठन श्रेणीरचनेवर अवलंबून असते.

४. अंतर्क्रियेत नातेदारी संबंध प्रमुख असतात आणि व्यक्तीची ओळख त्याच्या प्राथमिक समूहामुळे होत असते.

५. सामाजिक संबंधात 'पदा'च्या तुलनेत स्वत: व्यक्तीला अधिक महत्त्व दिले जाते.

६. लोक रूढीवादी असतात, अर्थव्यवस्था साधी-सरळ व सोपी असते. उत्पादन प्रामुख्याने गरजपूर्तीसाठी केले जाते.

७. धर्मश्रद्धा, अंधविश्वास, पौराणिक व काल्पनिक विचार, 'जुने ते सोने' अशी वृत्ती इ. बाबींचा प्रभाव दिसून येतो.

आधुनिक समाज परंपरागत समाजापेक्षा बऱ्याच बाबतीत वेगळा असतो. हा समाज विवेकवादावर भर देतो. विज्ञान आणि तर्कावर जोर देतो. 'बाबा वाक्य प्रमाणम' या सामाजला रुचत नाही. 'याची देहा याची डोळा' यावर हा आधुनिक समाज जास्त विश्वास ठेवणारा असतो. थोतांड, पाखंड, बुवाबाजी इ. गाष्टींचा हा समाज विरोध करतो. हा समाज वस्तुनिष्ठतेवर भर देणारा आहे. यथार्थवाद या समाजाला मान्य आहे. धर्मनिरपेक्षता, व्यक्तिस्वातंत्र्य, समानसंधी, सर्वोदय, मानवतावाद, स्त्री स्वातंत्र्य इ. मानवोचित गुणांचा पुरस्कर्ता आहे.

आधुनिकोत्तर समाज टिकात्मक, समीक्षात्मक जागृतीवर भर देतो. निसर्ग, पर्यावरण आणि मानवता यावर व्यावहारिक विज्ञानाच्या विनाशक प्रभावाप्रति चिंताग्रस्त आहे. आधुनिकोत्तर समाज प्रगतीच्या अवांछित व नकारात्मक विनाशक प्रभावाबाबत चिंतित दिसतो व त्यापासून परावृत्त होण्यास आवाहन करीत आहे. हा समाज राष्ट्रवादाकडून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेकडे गतिशील आहे. हा समाज आर्थिक व सामाजिक विकासात संतुलन साधण्यावर भर देण्यास महत्त्व देणारा आहे. संस्कृतीचा विकास देखील महत्त्वाचा असतो याचे शहाणपण सुचलेला व सुचविणारा हा समाज आहे.

**परंपरागत भारतीय समाज :**

परंपरागत समाजाच्या वरील संकल्पना व वैशिष्ट्यांच्या आधारावर किंवा त्या वैशिष्ट्यांसह, समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून परंपरागत समाजाला कशा प्रकारे बघितले जाऊ शकेल? परंपरागत भारतीय समाजाला समाजशास्त्रीय आधारावर समजून घेण्यासाठी तीन दृष्टिकोनांचा उपयोग केला जाऊ शकतो.

१) **प्रकार्यात्मक दृष्टिकोन** functional approach

२) **मार्क्सवादी दृष्टिकोन** Marxit approach

३) **सामाजिक क्रिया दृष्टिकोन** Social action approach

दुर्खिमचा प्रकार्यात्मक किंवा प्रकार्यकारी दृष्टिकोन या विचारावर आधारलेला आहे की प्रमुख सामाजिक संस्था आणि उप-व्यवस्था (उदा. कुटुंबव्यवस्था, नातेदारी, आर्थिक विनिमय संस्था इ.) मनुष्याच्या मूलभूत गरजा (उदा. लैंगिक समाधान, उत्पादन, जीवन गरजा, उपभोग) पूर्ण करतात.

मार्क्सचा दृष्टिकोन या विचारावर आधारलेला आहे की वर्ग संघर्ष ही एक मूलभूत सामाजिक शक्ती आहे आणि समाजाची कार्यक्षमता किंवा कार्यात्मकता संघर्षपूर्ण हित असलेल्या वर्गांनी प्रभावित होते.

मॅक्सवेबर चा क्रियावादी दृष्टिकोन या बाबींवर किंवा विचारावर भर देतो की व्यक्ती समाजाची निर्मिती करते आणि समाजाला प्रभावित करते. समाज व्यक्तीला प्रभावित करत नाही. समाज लोकांच्या अनुभवांची संरचना करीत नाही तर व्यक्तीच (लोक) स्वत:च्या अनुभवांची रचना करण्यात सहायक ठरते.

पहिले दोन दृष्टिकोन संरचनात्मक आहेत, अर्थात हे दोन दृष्टिकोन प्रामुख्याने असा विचार करतात की, समाज व्यक्ती आणि समूहाच्या व्यवहाराला कशा प्रकारे प्रभावित करतो या ऐवजी व्यक्ती आणि समूह समाजाची रचना कशा प्रकारे करतात. खरे तर तिसरा दृष्टिकोन संरचनात्मक मानला गेला आहे. जिथे प्रकार्यवाद सामाजिक व्यवहारावर सहमती दर्शवितो, तेथे मार्क्सवाद आणि सामाजिक क्रियासंबंधी दृष्टिकोन समाजात संघर्षावर भर देतो. माइक डोनेलच्या मतानुसार सरंचनात्मक दृष्टिकोनाच्या आधारावर प्रश्न आणि ज्याची उत्तरे तयार केली जातात.

**ते पुढीलप्रमाणे सांगता येतील:**

-समाजाची निर्मिती कशी होते?

-समाज कशा प्रकारे कार्य करतो?

-समाजात काही गट इतर गटांपेक्षा शक्तिशाली कसे असतात?

-सामाजिक परिवर्तन कोणत्या कारणाने घडून येते?

-समाज सहमतीवर आधारलेला असतो की संघर्षावर?

-व्यक्तीचा समाजाशी काय संबंध आहे?

**हिन्दूचा जीवनविषयक तत्त्वज्ञान किंवा दृष्टिकोन**

(Life Philosophy or View of Hindu)

हिन्दूचा जीवनविषयक दृष्टिकोन समजून घेण्यासाठी किंवा ज्ञात करून घेण्यासाठी हिन्दू धर्मातील प्रसिद्ध धर्मग्रंथांचा आधार घ्यावा लागतो. हिन्दूचे प्रसिद्ध ग्रंथ वेद मानले जातात. वेदज्ञानानुसार वादळ, पाऊस, वीज, प्रकाश इत्यादी नैसर्गिक घटनांची निर्मिती ही विविध देवतांमार्फत होत असते आणि या घटनांचे नियंत्रणही देवता करीत असतात. ज्या ज्या ऋतूमध्ये ज्या ज्या घटनांचे महत्त्व असते त्या त्या देवतांना महत्त्व दिले जात. निरनिराळे देव हे एकाच देवाची रूपे असून विविध ऋतूंमध्ये विविध परमेश्वरी अवतार होत असतात.

**हिन्दुत्वाचे मूलाधार** (basic Tenets of Hinduism) :

१. **आध्यात्मिकता** – Theological Ideas
२. **पवित्र–अपवित्रतेची कल्पना** – purity-impurity
३. **श्रेणी रचना** – Hierarchy
४. **मूर्तिपुजा** – Idol worship
५. **एकेश्वर व बहुदेववाद** – Monotheism and plythiesm
६. **सहिष्णुता** – Tolerance
७. **अहिंसा** – non-violence
८. **अलिप्तता** – segregation
९. **आश्रमव्यवस्था** – Ashrams
१०. **पुरषार्थ** – Purusharth
११. **संस्कार** – Sanskars

हिन्दूधर्म भारताचा सर्वात प्राचीन धर्म आहे. सुरवातीला याला आर्यधर्म म्हणून ओळखले जात होते. वेदांच्या रचनेबरोबर याला वैदिक धर्म म्हटले गेले. पुराण आणि स्मृतींची जेव्हा रचना झाली तेव्हा या धर्माला पौराणिक धर्म संबोधले गेले. आणि जेव्हा भारताला हिन्दूस्थान म्हटले जाऊ लागले, तेव्हा येथील लोकांच्या धर्माला हिन्दू धर्माची संज्ञा दिली गेली. भारतात सर्वाधिक (७२.६९ टक्के) लोक हिन्दू धर्माला मानणारे आहेत. वैदिक धर्म विकसित झाला आणि कालचक्रानुसार उत्तरवैदिककालिन वेद, ब्राम्हण, ग्रंथ, अरण्यके आणि उनिषदातून तो प्रकट होत गेला. सोयीसाठी प्रारंभिक धर्माला ऋग्वैदिक किंव पूर्ण वैदिक धर्म म्हटलो जाऊ लागले आणि परवती धर्माला उत्तर वैदिक. ऋग्वैदिक धर्माचे मुख्य दोन माग होत–ईश्वर आणि यज्ञ. विभिन्न देवतांना प्रसन्न ठेवण्यासाठी आर्य यज्ञ आणि अनुष्ठान इ. मध्ये बळी देत असत. पूर्व वैदिककालिन धर्म बहुदेववादी देवाचे मानवीकरण होते. आर्यांचा देव समूह निसर्गाचे दैवीकरण आहे. ऋग्वेदात एकूण ३३ देव मानले गेले आहे. यामध्ये इन्द्र, अग्नी आणि सोम सर्वश्रेष्ठ आहेत. ऋग्वेद काळात बहुदेववाद आणि निसर्ग उपासना यांचा समन्वय दिसून येतो. ऋग्वैदिक धर्म निसर्गपूजेवर आधारित बहुदेववाद होता. ऋग्वेदात एकेश्वरवादाचा स्पष्ट संकेत आढळतो. तो देखील त्यांच्या आध्यात्मिक प्रगतीच्या अंतिम टोकावर. ऋग्वेदात नैतिक आदर्शांवर अधिक भर दिलेला होता. नैतिक आदर्शाच्या महानतेवरच कुठल्याही धर्माचे महत्त्व समाजात स्थापित

होऊ शकते.

आध्यात्मिकता : हिंदू धर्म काही प्रमुख विश्वासांवर आणि विचारांवर आधारलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने आध्यात्मवाद, पाप-पुण्य, कर्म, धर्म, मोक्ष, पुनर्जन्म, आत्मा इ. कर्म सिद्धांत मनुष्याला सात्विक कर्म करण्यास प्रेरणा देतो. कर्माच्या आधारावरच मनुष्य भविष्यात चांगली व वाईट फळे भोगतो. वर्तमान जीवन पूर्वजन्माच्या कर्मानुसारच असते. धर्माचा सिद्धांत व्यक्तीला कर्तव्यपालनाची प्रेरणा देतो. हिन्दू धर्मात आत्म्याला अमर, अविनाशी मानले आहे. मोक्ष आणि स्वर्गाचा विचार व्यक्तीला सात्विक कर्म करण्याची प्रेरणा देतो.

**पवित्र-अपवित्रतेची कल्पना :** हिन्दू धर्मात पवित्र-अपवित्रतेवर सखोल विचार मंथन आढळते. पवित्र-अपवित्रतेचा संबंध जन्म, मरण, विवाह, मासिक धर्म, मृत्यू आणि प्रार्थनेशी जोडला आहे. भोजन, शारिरीक अंतर, विवाह आणि जातीय भेदभाव इ. मध्ये पवित्रता-अपवित्रता यावर विचार केलेला दिसून येतो. शाकाहारी भोजनाला पवित्र मानले आहे. निम्न जाातीच्या हातचे बनलेले भोजन अपवित्र मानले आहे. अस्पृश्यता पाळली जात होती. मासिक धर्मात स्त्रियांना अपवित्र मानले गेले. पवित्र-अपवित्रतेचे नियम वेगवेगळ्या क्षेत्रात भिन्न आहेत. अपवित्रतेची संकल्पना विशेषत्वाने जन्माशी संबंधित आहे. स्वच्छतेशी फारशी नाही.

**श्रेणी रचना :** हिन्दू धर्मात स्तरीकरण (उच्च व निम्न) चा विचार आढळतो. हे स्तरीकरण जीवनाच्या अनेक क्षेत्रात आढळते. वर्ण, ज्ञान, गुण आणि जीवनाच्या ध्येयामध्ये स्तरीकरणाची व्याप्ती दिसून येते. याच आधारावर चार वर्ण (ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र) मानले गेले आहे. त्या क्रमानेच समाजात त्याचे श्रेष्ठत्व व कनिष्ठत्व मानले गेलेले होते. वर्ण आणि जातीमुळे सामाजिक गतिशीलता फारशी आढळत नव्हती. तसा समाजाचा दंडक देखील होता की प्रत्येकाने आपल्या वर्णधर्मानुसार व जातिधर्मानुसारच कार्य करावे. गुणांचे देखील स्तरीकरण (श्रेणीक्रम) केलेले आहे. उदा. सात्विक कर्म, राजसिक कर्म, तामसिक कर्म जीवनाच्या ध्येयातही धर्म, मोक्ष, अर्थ, काम इ. मध्ये सर्वोच्च स्थानावर धर्म आणि मोक्ष आहे. अर्थ आणि काम यांची श्रेणी नंतर येते.

**मूर्तिपूजा :** हिन्दू धर्मीय मूर्तिपूजक आहेत. मूर्तिपूजेवर त्यांचा विश्वास आहे. प्रत्येक धर्मसंप्रदायामध्ये मूर्ती वेगळी राहू शकते. काही शिवभक्त, काही रामभक्त, कृष्णभक्त, गणेशभक्त असतील तर ते त्या मूर्तीची पूजा करतात. देवळात मूर्तीची स्थापना करतात. मंदिर किंवा देऊळ त्यांचे पवित्र स्थान व प्रार्थनास्थान आहे. पूर्वी व काही प्रमाणात आजही अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश निषिद्ध मानला गेला आहे. प्रवेश निर्बंध अस्पृश्यतेशी संबंधित होता. इतर धर्मीयांशी संघर्ष नव्हता. हिन्दू धर्मात सगुण साकार व निर्गुण निराकार ईश्वर भक्त आढळतात. काही शैवपंथी आहेत तर काही वैष्णव भक्त आहेत. मूर्तिभंजन आणि मंदिर प्रवेशावरून भारतात अनेक वेळा संघर्ष देखील झाला आहे.

**एकेश्वरवाद आणि बहुदेववाद :** हिन्दूमध्ये अनेक देवताची संकल्पना केली गेली आहे. जल, वायू, अग्नी, इ. सर्वाच्या वेगवेगळ्या देवतांची कल्पना आढळते. परंतु एकाच ईश्वराची ती वेगवेगळी रूपे आहेत, त्यांची नावे वेगवेगळी आहेत. हिन्दूचे मूल्यवैशिष्ट्य असे आहे

की, हा समाज रूपाने एकाश्मीय धर्म नाही, तर लवचीक धार्मिक सांप्रदायांचे ते एक समन्वय आहे. ही लवचीकता त्याची शक्ती आहे. ज्यामध्ये गैर लोकांना आणि वैदिक समूहांना, धर्मशास्त्रांना विरोध दर्शविणाऱ्यांना देखील राहण्याची अनुमती आहे.

**सहिष्णुता :** भारतीय धार्मिक संस्थामध्ये सहिष्णुता अपार प्रमाणात दिसून येते. हा धर्म आक्रमकता शिकवित नाही. सहिष्णुता येथील मूळ धर्माचा आत्मा आहे. जो धर्म दुसऱ्या धर्मात संकट निर्माण करीत असेल तर तो धर्म नसून कुधर्म आहे. जो सर्वच धर्मांचा आदर करणारा आहे तोच खरा धर्म आहे.

**'धर्म यो बाधते धर्मो न स धर्मः कुधर्म तत् ।**

**अविरोधी तु यो धर्मः स धर्मः सत्यविक्रम ।।'**

साध्य किंवा लक्ष्य एक असल्याने साधनांची विभिन्नता गौण ठरते. स्वामी विवेकानंद म्हणतात 'समस्त प्राण्यांमध्ये, मग ते कुठल्याही धर्माचे, जातीचे, देशाचे, राष्ट्राचे किंवा वंशाचे असोत ईश्वराचे निवासस्थान आहे.' आणि त्याच्या विषयीची श्रद्धा हाच वास्तविक मानवधर्म आहे. ''श्रेष्ठ-अनिष्ठतेच्या भावनेचा त्याग करून सर्वांशी प्रेमाने वागा- हीच मुक्ती, हाच मंत्र, हीच पूजा, हाच ईश्वर आहे.'' हिन्दू धर्म सहिष्णू प्रधान आहे, म्हणूनच या धर्मामध्ये अनेक मत-मतांतरे आणि संप्रदाय आढळतात. ईश्वराला अनेक रूपात पूजण्याची स्वीकृती दिली आहे. असाही एक विचारकांचा वर्ग आहे, जो हिन्दू धर्माला सहिष्णू मानत नाही.

**अलिप्तता :** हिन्दूधर्मात पूजा, धार्मिक कृत्य, सामाजिक संबंध आणि जातीमध्ये पृथकतेच्या (अलिप्ततेच्या) सिद्धांताचा स्वीकार करण्यात आला आहे. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र यांच्यात अलिप्तता किंवा पृथकता आहे. विवाह, भोजन व अन्य काही धार्मिक-सामाजिकतेबाबत निषेध नियम आढळतात. विभिन्न देव-देवतांच्या पूजा-आराधनेत देखील पृथकता आढळते. पृथकतेचे स्वरूप, वर्ण, जातीच्या प्रस्थिरितीवर अवलंबून आहे.

**आश्रमव्यवस्था :** हिन्दू तत्त्वज्ञानात किंवा धार्मिक चिंतन स्वरूपात मनुष्याचे आयुष्य शंभर वर्षे मानून जीवनाचे चार उद्देश मानून त्याचे चार भाग पाडले आणि प्रत्येक भागाला एक आश्रम मानले. डॉ. कपाडिया यांनी म्हटल्याप्रमाणे, भारतीय ऋषी-मुनींनी दीर्घ जीवनाची आकांक्षा करून संपूर्ण जीवनाच्या पूर्ण साफल्यासाठी चार आश्रमात विभागणी केली आहे. ते चार आश्रम म्हणजे- ब्रम्हचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम होत. प्रत्येक आश्रमातील जीवन-व्यवहार स्वंतत्रपणे सांगितला आहे. याला आश्रमधर्म म्हटले आहे. या संदर्भात स्वतंत्र व विस्ताराने ऊहापोह 'आश्रमव्यवस्था' यामध्ये केलेला आहे.

**पुरुषार्थ :** हिन्दू धर्मात जीवनाचे चार उद्देश सांगितले आहेत. यालाच पुरुषार्थ म्हटले आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे ते चार पुरुषार्थ होत. धर्म याचा अर्थ कर्तव्य असा आहे. हा पुरुषार्थाने हिन्दू माणसाच्या जीवनाला दिशा दिली आहे व नियमित केले आहे. याची सविस्तर चर्चा पुरुषार्थ भागात पुढे केली आहे.

**संस्कार :** हिन्दू धर्मात सोळा संस्काराचे महत्त्व देखील सांगितले आहे. गर्भापासून तो मृत्यूनंतरचे काही संस्कार इ. चा समावेश आहे. संस्कार याचा अर्थ अशा सामाजिक आणि

धार्मिक क्रिया विधी होत ज्यामध्ये मनुष्याच्या शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक विकास करावयाचा विचार विद्यमान आहे. हे संस्कार विधी ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य वर्णांमध्येच केले जात असत. गर्भाधान, पुंसवन, सीमान्तोन्नयन, नामकरण, निसक्रमण, चूडाकर्म, उपनयन, वेदारंभ, समापवर्तन, विवाह इ. संस्कार होत.

### हिन्दू वर्णव्यवस्था :

**प्रस्तावना :** भारतीय शास्त्रकारांनी हिन्दू समाजाला ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार भागामध्ये विभागले आहे. स्तरीकरणाच्या या चार वर्णीय व्यवस्थेलाच 'वर्णव्यवस्था' असे नाव दिले आहे. शाब्दिक दृष्टीने 'वर्ण' या शब्दाचे तीन संभाव्य अर्थ लावले जाऊ शकतात. पहिला अर्थ म्हणजे 'वरण' अर्थात निवड करणे. दुसरा अर्थ आहे 'रंग' आणि तिसरा अर्थ आहे 'स्वभावनुरूप'डॉ. घुरिये आणि पी. वी. काणो तसेच सेनार्ट यांचे असे मत आहे की, सुरवातीला वर्ण शब्दाचा वापर आर्य आणि अनार्य यांच्यामधील भेद किंवा अंतर दर्शविण्यासाठी केला गेला. परंतु नंतर वर्ण शब्दाचा वापर समाजातील चार वर्णांना व्यक्त करण्यासाठी केला गेला. वर्ण शब्दाच्या तिसऱ्या अर्थानुसार 'वृत्ती' नुसार आहे. ज्यांची मानसिक व व्यवहारासंबंधी वैशिष्ट्ये एकसमान आहेत, अर्थात ज्या लोकांचा स्वभाव एकसारखा आहे, त्यांना मिळूनच एक वर्ण तयार होतो. खरे तर शाब्दिक अर्थाने किंवा अर्थाच्या आधारे 'वर्ण' समजून घेणे कठीण आहे. वर्णाचा संबंध व्यक्तीच्या गुण आणि कर्माशी आहे. ज्या लोकांचे गुण आणि कर्म एकसारखे होते, जे समान स्वभावाचे होते, ते सर्व एका वर्णाचे सदस्य मानले गेले. भगवद्गीतेत श्रीकृष्ण म्हणतात 'चातुवर्ण मया सुष्टं गुण कर्म विभागश:' अर्थात मीच गुण आणि कर्मानुसार चार वर्णाची रचना केली आहे. याचा अर्थ वर्णव्यवस्था सामाजिक स्तरीकरणाची अशी व्यवस्था आहे. जी व्यक्तीच्या गुण आणि कर्मावर आधारलेली आहे. ज्याच्या अंतर्गत समाज चार वर्णाच्या स्वरूपात कार्यात्मक विभागलेला आहे. समाजात विभिन्न कार्ये योग्य प्रकारे चालावित या उद्देशाने व्यक्तींच्या स्वाभाविक प्रवृत्तींना किंवा त्यांचा स्वभाव लक्षात घेऊन त्यांना वेगवेगळ्या समूहात अर्थात चार वर्गात (स्तरात) विभागले गेले होते. याला वर्णव्यवस्था म्हणतात. साधारणत: 'वर्ण' आणि 'जातफ' या शब्दांना एक दुसऱ्याचे पर्यायी शब्द मानले जाते. परंतु वस्तुत: दोन्ही शब्द एक दुसऱ्यापासून भिन्न आहेत. वर्ण अशा लोकांचा समूह आहे ज्यांचा व्यवसाय समान आहे. गुण आणि कर्माचे तात्पर्य व्यक्तीच्या स्वभावाशी आणि सामाजिक भूमिकेशी आहे.

### वर्णव्यवस्थेची वैशिष्ट्ये :

**१. कर्माची प्राथमिकता :** वर्णव्यवस्था एक कर्मप्रधान व्यवस्था आहे. ज्यामध्ये व्यक्ती आणि समाजाच्या दृष्टीने सर्व कार्यांला चार श्रेणींमध्ये विभागण्यात आले आहे. त्यांनतर त्या कर्मांसाठी (कामासाठी) अपेक्षित गुण आणि स्वभावानुसार मानवालादेखील चार श्रेणींमध्ये विभक्त करण्यात आले. कौशल्य, योग्यता, पात्रता इ. नुसार व्यक्तीला काम मिळत गेले किंवा देण्यात आले.

**२. परस्परावलंबन :** प्रत्येक वर्ण दुसऱ्या वर्णावर अवलंबून होता. अशा प्रकारे समाजात

ब्राम्हणांचे जितके महत्त्व होते तितकेच महत्त्व शूद्राचेही होते. म्हणूनच जिथे शूद्राच्या धर्मांचे वर्णन आहे तेथे त्याच्या प्रति इतर वर्णाच्या कर्तव्याचे देखील वर्णन आहे. ही एक सामाजिक व्यवस्थेची संरचना व व्यवस्था होती असे दिसून येते.

**३. सामाजिक न्यायाधारित :** वर-वर पाहता ही व्यवस्था शोषणावर आधारलेली आढळते. परंतु वास्तविक दृष्टीने ही व्यवस्था प्रत्येक व्यक्तीला तिच्या गुणानुसार, स्वभावानुसार, कौशल्यानुसार, कार्य सोपविण्याची व्यवस्था होती. प्रगती आणि अधोगती कर्मावर आधारलेली दिसून येते. यात गतिशीलता देखील होती.

**४. संस्कार –** ब्राम्हण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्णांना द्विज म्हटले गेले आहे. कारण उपनयन संस्कार हाच त्यांचा दुसरा जन्म. अर्थात गुरूद्वारा आध्यात्मिक जन्म होतो. शूद्रासाठी एक मात्र संस्कार म्हणजे तीन वर्णाची सेवा करणे हाच होता.

**५. पुरुषार्थप्राप्ती :** वर्णव्यवस्था पुररुषार्थाशी देखील संबंधित आहे. ब्राम्हणासाठी धर्म, क्षत्रियांसाठी शासन, प्रशासन नियंत्रण, न्यायदान व वैश्यांसाठी अर्थ म्हणजे उत्पादन, निर्माण, व्यापार, शेती इ. आणि शूद्रांसाठी त्यांच्या पात्रतेनुसार समाजातील इतर उर्वरित कार्ये होती.

**६. गतिशीलता –** वर्णव्यवस्था गुण आणि कर्मानुसार वर्ण परिवर्तनाचा अधिकार देत असे किंवा तशीच ती मूळ स्वरूपातील व्यवस्था होती. सामाजिक गतिशीलता या वर्णव्यवस्थेत होती. पुढे-पुढे त्याची लवचिकता घटत गेली असावी.

**७. नैसर्गिक व मानसिक रचना :** समाजात सर्व लोक एकाच स्वभावाचे, कौशल्याचे, क्षमतेचे, पात्रतेचे, आवडीचे नसतात. प्रत्येक व्यक्तीची आवड-निवड व क्षमता यामध्ये फरक व विविधता आढळते व ही विविधता संपूर्ण विश्वात दिसून येते. प्राणिमात्रांतही दिसून येते. तेव्हा वर्णव्यवस्थेची रचना मानसिक देखील दिसून येते. नैसर्गिक गुण सात्विक, राजसिक आणि तामसिक यावर आधारित असल्याने ही व्यवस्था नैसर्गिक आहे असे म्हणता येईल.

**वर्णव्यवस्थेची उत्पत्ती:**

वर्णव्यवस्थेच्या उत्पत्तीबाबत एकवाक्यता आढळत नाही. या संदर्भात वेगवेगळे दृष्टिकोन आढळून येतात.

ऋग्वेदाच्या पुरुषसुक्तानुसार वर्णव्यवस्थेची उत्पत्ती एक-ईश्वरीय व्यवस्था आहे. आज या विचाराला प्रामाणिक मानले जात नाही. प्रवृत्ती पुरुषाच्या मुखातून ब्राम्हण, बाहूतून क्षत्रिय, जांघेतून वैश्य आणि पायातून शूद्रांची उत्पत्ती झाली. शतपथ ब्राम्हण आणि उपनिषदांमध्ये देखील असे वर्णन आढळते की प्रत्येक वर्णात आढळून येणाऱ्या अग्नीच्या चार दिव्यत्वापासून चार वर्णाची उत्पत्ती झाली.

छान्दोग्य उपनिषद् नुसार कोणत्याही वर्णात जन्म हा पूर्वजन्माच्या कर्मानुसारच होतो. चांगल्या आचरणाचे लोक लवकरच उत्तम योनी प्राप्त करतात. त्या काळातही वर्णभेद आढळून येतो. महाभारतात अनेक ठिकाणी आणि अनेक प्रकारे वर्णाच्या उत्पत्तीची चर्चा आढळते. महाभारतात एका ठिकाणी अशी चर्चा आढळते की सतयुगात वर्ण आणि जातीत

भेद नव्हता.

वर्णव्यवस्थेच्या उत्पत्तीबाबत दुसरा विचारप्रवाह असा दिसून येतो की, वर्णव्यवस्थेच्या आधारावर देखील वांशिक भेद होता. डी.एन. मुजुमदार यांनी देखील जात आणि वर्ण व्यवस्थेचा मूळ आधार सांस्कृतिक संघर्ष आणि वांशिक संघर्ष मानला आहे. तसेच मत एच.एच. रिजलेचे देखील आहे. वरील विचारांना ईरावती कर्वे मान्यता देताना दिसतात. ही मंडळी इतिहासकार, इन्डोलॉजिस्ट होती.

वर्णव्यवस्थेच्या उत्पत्तीबाबत विचार मांडणारा समाजशास्त्रज्ञांचा देखील एक वर्ग दिसून येतो. हा विचार प्रभाव मार्क्सच्या आर्थिक सिद्धांतानी प्रभावित दिसतो. काही विद्वान असे मानतात की, काही व्यवस्था वर्ण व्यवस्थेचेच एक रूप आहे. जो सतत आणि स्थायी सामाजिक व आर्थिक गरजेतून अस्तित्वात आला. वर्णव्यवस्थेच्या सदस्यात्वासंबंधी डॉ. राधाकृष्णन असे मानतात की, या व्यवस्थेत अनुवांशिक क्षमतांचे (जन्माचे) महत्त्व दिसून येते, तरीदेखील ही व्यवस्था प्रामुख्याने गुण आणि कर्मावर आधारित होती. तत्कालिन काही घटनांच्या आधारावर ते म्हणतात की, महाभारत आणि त्यापूर्वीच्या काळात वर्ण परिवर्तन शक्य होते.

डॉ.जी.एस. घुरिये यांनी वर्ण-निश्चितीत व्यक्तिगत गुणांना विशेष महत्त्व दिले आहे. डॉ. के.एम. पणिक्कर यांनी तथ्यांच्या आधारावर असे सांगण्याच प्रयत्न केला आहे की, वर्ण-व्यवस्थेचा आधार कर्म होते, जन्म नव्हता. वर्णाचा संबंध व्यवसायाशी होता. महात्मा गांधी जे 'वर्ण' चा आधार व अर्थ रंग आणि व्यवसाय अशा दोन्ही प्रकारे घेतला आहे. ते म्हणतात व्यक्तीला आपल्या पित्याकडून रंग आणि व्यवसाय वंशानुक्रमाने प्राप्त होतात त्यामुळे वर्णाचा आधार जन्मच आहे. बसंतकुमार चट्टोपाध्याय देखील वर्णाचा आधार जन्माला मानतात.

**वर्णधर्म किंवा कर्तव्य :** ब्राम्हणवर्ण धर्म: ब्राम्हणांचे महत्त्वाचे कर्तव्य म्हणजे इंद्रियांवर संयम प्राप्त करणे होय. तिरस्कार करू नये. आदराला अमृत मानून त्याची कामना केली पाहिजे. वेदांचे अध्ययन, ज्ञानार्जन, अध्ययन-अध्यापन, दान स्वीकारणे, यज्ञ करणे, पूजा-पाठ करणे, संयमी व कठोर जीवन जगणे, लोकांना धार्मिक मार्गदर्शन करणे इ. ब्राम्हणांचे कर्तव्य मानले गेले आहे. शम, दम, तप, शुचिता, क्षमा, आर्जव, ज्ञान, विज्ञान आणि आस्तिक देखील ब्राम्हणाचे गुण किंवा धर्म आहे. असे गीतेत भगवान श्री कृष्णाने सांगितले आहे. मनुस्मृतीत ब्राम्हणाला षटकर्मा म्हटले आहे. ब्राम्हणाचा मुख्य धर्म इंद्रिय संयम सांगितला आहे. ब्राम्हणाकडे सोपविण्यात आलेल्या या सर्व कर्तव्याचा संबंध सात्विक गुणांशी आहे. सात्विक गुणांना सर्वश्रेष्ठ मानले आहे. ब्राम्हणांनी शांतचित्त असावे. लोभ, धनलालसा, संग्रहण, स्वार्थ, द्वेष, हेवा, भोगलालसा इ. दुर्गुणापासून त्यांने नेहमीच जागरूक असले पाहिजे.

**क्षत्रिय धर्म :** परोपकार, प्रजारक्षण, प्रशासन, नियंत्रण इ. क्षत्रियांची मुख्य कर्तव्ये सांगितली आहेत. दान देणे, यज्ञ करणे, अध्ययन करणे, विषयात आसक्ती न ठेवणे हेही क्षत्रिय गुण सांगितले आहेत. क्षत्रियांनी उदार, पराक्रमी, शूर, भयरहित असले पाहिजे. गीतेत क्षत्रियांचे सात प्रकारचे धर्म सांगितले आहेत.- शौर्य, तेज, धैर्य, चातुर्य, युद्धाला न घाबरणे, दान देणे आणि नि:स्वार्थ भावनेने प्रजेचे पालन करणे. क्षत्रियांनी याचना करणे शोभत नाही. आपल्या

पराक्रमाचे प्रदर्शन केले पाहिजे. दुष्टांचे दमन करणे, सात्विकांना अभय देणे, प्रजेचे पालन करणे, राजा म्हणून प्रजेसाठी पित्याची भूमिका बजावणे इ. कर्तव्ये क्षत्रियांची सांगितली आहेत.

**वैश्य धर्म :** (कर्तव्य/भूमिका) मनुस्मृतीत वैश्याची कर्तव्ये सांगितली आहेत. पशुपालन करणे, शेती, व्यापार-व्यवसाय करणे, उत्पादन करणे, धन कमाविणे वगैरे. महाभारतात सांगितले आहे की, अध्ययन करणे, दान देणे आणि पवित्रता पूर्ण धनसंग्रह करणे हे वैश्यवर्णाची कर्तव्ये आहेत. अनुचित व निंदनीय मार्गाने पैसा कमाविता कामा नये. या कर्माव्यतिरिक्त कर्म- त्याच्यासाठी वर्ज्य आहेत. प्रजापतीने पशूंची सृष्टी करून त्यांच्या पालनाची जबाबदारी वैश्यवर्णाला सोपविली आहे. गीतेत श्रीकृष्ण म्हणतात, कृषी, गोरक्षा आणि वाणिज्य वैश्यवर्णाचे स्वाभाविक कर्म आहे. समाजाच्या भरण-पोषणाची जबाबदारी स्वत:वर घेऊन समाजाचे अस्तित्व टिकवून ठेवणे हे त्याचे कर्तव्य आहे. हीच त्याची भूमिका आहे व हाच त्याच धर्मदेखील आहे.

**शूद्रधर्म :** इतर तीन वर्णाची सेवा करणे, त्यांच्या आज्ञेत राहणे, स्वामी भक्तीचे पालन करणे, सेवेत तत्पर राहणे, स्वामीची संपत्ती नष्ट झाल्यास आपल्याधनातून व सेवेतून स्वामीच्या कुटुंबाचे पालन त्याने करावे. इतर मनुष्यसुलभ सामान्य कर्तव्ये त्यांनी करीत राहावे हाच त्याच धर्म आहे. महाभारतात भीष्म म्हणतात प्रजापतीने तीन वर्णाची सेवा हेच त्याचे शास्त्रविहित कर्म आहे. या तीन वर्णाची सेवा करूनच तो महान सुखाचा भागी बनू शकतो. शूद्राचे स्वत:चे असे कुठलेच धन नसते. त्याच्या सर्व धनावर त्याच्या मालकाचे (स्वामी) आधिपत्य असते.

**वर्णव्यवस्थेचे मूल्यमापन :** वर्णव्यवस्था समाजात किती उपयोगी राहिली आहे याबाबत विद्वानांमध्ये दोन मतप्रवाह दिसून येतात. काही विद्वान असे मानतात की, वर्णव्यवस्था एक उत्तम सामाजिक व्यवस्था आहे. यामध्ये ॲरिस्टॉटल, नित्से, सिमेल, एच.जी. वेल्स यांचा उल्लेख करता येईल. या विद्वानांच्या मतानुसार कार्य विभाजनाचे इतके चांगले शास्त्रीय आणि स्वाभाविक वर्गीकरण हिन्दू समाजाव्यतिरिक्त इतरत्र कुठेच आढळत नाही. कठोर शिस्त आणि धर्माचा आधार असल्याने या वर्णा-वर्णामध्ये फार कमी संघर्ष आढळून आला. लंपटपणा, स्वैराचार, क्रूरता, अव्यवस्था इ. पासून मुक्त जीवन जगण्यासाठी जी परिस्थिती या पद्धतीने मिळाली आहे त्याचा आधार व श्रेय म्हणजे वर्णव्यवस्था होय. के. एम. पणिक्करने वर्णव्यवस्थेला अनुपयोगी मानले आहे. ते म्हणतात, वर्णव्यवस्था जन्मावर आधारले, असल्याने व्यक्तिमत्त्व विकासाच्या वाटा अरुंद झाल्या आहेत. निम्न वर्णावर या व्यवस्थेने अन्याय केला आहे किंवा अशा व्यवस्थेमुळे शूद्रावर अन्याय झाला आहे. त्याची झळ त्यांना आयुष्यभर सोसावी लागली आहे व हे मानवतेच्या विरोधी आहे. कालांतराने ही वर्णव्यवस्था शेकडो जातीत व पुढे उपजातीत विभाजीत होत गेली. संघर्षाची बीजे निर्माण होत गेली. ऐक्यभाव भंग पावत गेला. पुढे या जातिव्यवस्थेपुढे हिन्दू समाज विखुरला गेला. समाजाची संघटित शक्ती दुबळी होत गेली व याचा परिणाम म्हणून बाह्यशक्तींनी भारतावर अनेक आक्रमणे केलीत. भारत गुलामगिरीत राहिला. वर्णव्यवस्था अखंड राष्ट्रीय ऐक्याच्या मार्गातील फार मोठी बाधा आहे.

**आश्रमव्यवस्था: अर्थ :** आश्रम शब्दाची उत्पत्ती संस्कृतमधील 'श्रम' धातू पासून झाली आहे. ज्याचा अर्थ आहे कष्ट करणे, श्रम-परिश्रम करणे होय. या अर्थात दोन बाबी विद्यमान आहेत. १) ते ठिकाण - जिथे श्रम केले जाते, आणि २) कष्ट-श्रम करण्यासाठी केली जाणारी क्रिया. शाब्दिक अर्थाने, आश्रम असे विश्रामस्थान आहे जिथे व्यक्ती- स्वत: आपल्या गुणांचा विकास करते आणि आपल्या पुढील जीवनाचा प्रवास करण्यासाठी पुढे जात राहते. आश्रम स्वत:मध्ये ध्येय नाही तर ते ध्येय गाठण्याचे साधन आहे. ध्येय/साध्य प्राप्तीपर्यंत पोहोचण्यासाठी प्रवासातील एक-एक टप्पे आहेत. आश्रमव्यवस्थेला जीवनाचे टप्पे किंवा अवस्था म्हणता येईल. पी.एच.प्रभूने आश्रमाला पडाव किंवा विश्रामस्थल म्हटले आहे. या अर्थाने आश्रम मानवीजीवनाच्या अशा शिड्या आहेत, ज्याच्या आधारे मनुष्य आपल्या जीवनाच्या अंतिम ध्येयापर्यंत सहज पोहोचू शकतो. जर समाजाचा घटक 'व्यक्ती'च योग्य नसेल तर समाजात संतुलन आणि व्यवस्था शक्य होणार नाही. हिन्दू समाज विधायकांनी याच आदर्शाच्या प्राप्तीसाठी आश्रमव्यवस्थेला जन्म दिला. आश्रमव्यवस्थेच्या निर्मात्यांनी या व्यवस्थेला अधिकार आणि कर्तव्याच्या परस्परावलंबीतत्वेवर उभे केले आहे. निर्माणकर्त्यांना याची जाणीव होती की अधिकारांचा उपयोग आणि कर्तव्याच्या संतुलनातूनच व्यक्तीचा पूर्ण विकास होऊ शकतो. आश्रमव्यवस्थेत अधिकार आणि कर्तव्याची उत्तम संतुलित योजना व व्यवस्था आढळते. हे अधिकार आणि कर्तव्येच आश्रमव्यवस्थेचे आधार आहेत. हिन्दूधर्म शास्त्राच्या भाषेत अधिकाराला 'पुरूषार्थ' आणि कर्तव्यांना 'ऋण' म्हटले आहे. आश्रमव्यवस्थेचे महत्त्व विशद करताना पी.एन.प्रभू यांनी लिहिले आहे की, हिन्दूद्वारा निर्मित आणि नियोजित करण्यात आलेली आश्रम व्यवस्था जगाच्या सामाजिक विचारांच्या संपूर्ण इतिहासात एक अपूर्व भेट आहे. मनुष्याच्या संपूर्ण जीवनाला आणि त्यासंबंधित कार्याला आश्रमव्यवस्थेअंतर्गत समाविष्ट केले आहे. महाभारतात व्यास म्हणतात, जीवनाचे चार विश्रामस्थान म्हणजेच आश्रम - व्यक्तिमत्त्व विकासाच्या चार पायऱ्या आहेत. या क्रमाने चढून व्यक्तीला ब्रम्ह प्राप्ती करता येते.

**चार आश्रम :-**

**१) ब्रम्हचर्याश्रम** **२) गृहस्थाश्रम**

**३) वानप्रस्थाश्रम** **४) संन्यासाश्रम**

**१) ब्रम्हचर्याश्रम :**

'ब्रम्हचर्यश्रम' या शब्दात 'ब्रम्ह' म्हणजे महान आणि 'चर्य' म्हणजे आचरण असे दोन शब्द असून त्याचा अर्थ 'सर्वश्रेष्ठ आचरण' असा होतो. ब्रम्हचर्याश्रमाची सुरुवात उपनयन संस्काराने होते. उपनयनाचे वय वर्णपरत्वे वेगवेगळे सांगितले आहेत. उपनयन संस्कारानंतर त्या व्यक्तीला 'व्दिज' म्हणून संबोधण्यात येते. उपनयन झालेल्या बालकाला ज्ञानार्जनासाठी गुरूच्या आश्रमात पाठविले जाई. गुरुकुलात बालकांना त्यांच्या-त्यांच्या वर्णानुसार शिक्षण दिले जात असे. उदा. ब्राम्हण मुलांना धर्मशास्त्राचे, क्षत्रियांना युद्धकलेचे, वैश्य मुलांना व्यापारकलेचे शिक्षण दिले जाई. स्त्रियांना व शूद्रांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. गुरुकुलात सर्व वर्णाच्या बालकांना समान रूपाने अनुशासन सक्तीचे होते. अध्ययन,

शरीरसौष्ठव, ब्रम्हचर्य व्रताचे पालन, आश्रम व त्या परिसरातील स्वच्छता, पाणी भरणे, स्वयंपाकासाठी लाकडे गोळा करणे, यज्ञासाठी समिधा जमविणे, गुरुआज्ञा पाळणे, इ. कामे करावी लागत. गुरुसेवा करणे, काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर इ. पासून दूर राहणे, पवित्र जीवन जगावे, जिभेचे व इतर इंद्रियांचे चोचले पुरवू नये असेही नियम होते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर 'समावर्तन संस्कार' केला जाई. यावेळी शिष्य आपल्या गुरूला गुरुदक्षिणा देत असत व निरोप घेत असत. या आश्रमात भावी जीवनात येणाऱ्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची तयारी करवून घेतली जाई. या आश्रमाला मूलभूत, पायाभूत आश्रम म्हणता येईल. शिक्षण पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांना आश्रमातच राहावे लागे. येथे मुलांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकासाला विशेष महत्त्व दिले जाई. औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन्ही पद्धतीने येथे शिक्षणाचे (अध्ययन-अध्यापन) कार्य चालत असे. ब्रम्हचर्याश्रम म्हणजे विद्यार्थिदशेचा आश्रम म्हणता येईल. ब्रम्हचर्याश्रम व्यक्तीला जीवनात कर्तव्यपालनासाठी योग्य बनवित असत.

**२) गृहस्थाश्रम :**

गृहस्थाश्रम म्हणजे सांसारिक जीवनाची सुरुवात. व्यक्तीने विवाह करून पितृऋणातून मुक्त व्हायचे असते. कुटुंबाचा सांभाळ करावा. अर्थोपार्जन करावे. आपल्यावर अवलंबून असणाऱ्यांचा सांभाळ व सेवाशूश्रुषा करावी. यज्ञ-याग, दान, होम-हवन, सांसारिक कर्तव्ये याचे निर्वहन करावे. मुलांना जन्म द्यावा. त्यांचे पालनपोषण करावे. त्यांचा विवाह करून द्यावा. आतिथ्य सत्कार करावा. साधू-संतांना दान द्यावे, धर्म, अर्थ, काम इ. पुरुषार्थसंपन्न करावे. अशा नाना बाबी व्यक्तीला या आश्रमात पूर्ण करावयाच्या असतात. गृहस्थाश्रम म्हणजे इतर तीन (ब्रम्हचर्य, वानप्रस्थ व संन्यास) आश्रमाचा कणा आहे. कारण आपल्या उदरनिर्वाहासाठी इतर तीन आश्रम केवळ गृहस्थाश्रमावर अवलंबून असायचे. अर्थार्जनाचे कार्य केवळ गृहस्थीच करीत असतात. या आश्रमातील गृहस्थीने पंचमहायज्ञ करण्याचे देखील सांगितले आहेत. गौतम व बोधायनने गृहस्थाश्रमाला सर्वश्रेष्ठ आश्रम म्हटले आहे. सर्व स्मृतिकार गृहस्थाश्रमाला इतर आश्रमाचा आधार मानतात. अनेक नद्या ज्याप्रमाणे समुद्रास मिळतात त्याचप्रमाणे इतर आश्रम गृहस्थाश्रमास मिळतात. महाभारतातील शांतिपर्वातही या आश्रमाला आधारभून मानले आहे. पंचयज्ञ करावे अर्थात पंचयज्ञाना ब्रम्हयज्ञ, पितृयज्ञ, देवयज्ञ, भूतयज्ञ आणि आतिथीयज्ञाचा समावेश होतो. या आश्रमाने व्यक्तीच्या इंद्रियइच्छेला स्वीकृती तर दिली आहे परंतु त्याचबरोबर नियमांचे परिघही सांगितले आहे. स्वैराचाराला मान्यता नाही. म्हणूनच हिन्दूनी विवाहाला संस्कार म्हटले आहे.

उपनिषद, महाभारत आणि स्मृतींमध्ये सांगितले आहे की, गृहस्थाश्रमात जीवन घालविल्याशिवाय मनुष्याला मोक्षाची प्राप्ती शक्य नाही. या आश्रमाबरोबर अनेक सामाजिक, धार्मिक आणि नैतिक कर्तव्ये जुडलेले आहेत. मनुस्मृतीत सांगितले आहे की, जो व्यक्ती पृथ्वीवर स्थायी सुख आणि स्वर्गाचा आशीर्वाद यांची कामना करतो त्यांनी गृहस्थाश्रमाची कर्तव्ये निष्ठेने करावीत.

**वानप्रस्थाश्रम :**

धर्म, अर्थ, काम इ. पुरुषार्थाची साधना केल्यावर वानप्रस्थास सुरुवात होते. या

आश्रमावस्थेत व्यक्ती आपल्या सांसारिक कर्तव्यांची जबाबदारी पूर्ण करून एकटी किंवा पत्नीसह मानसिक गृहत्याग किंवा मोह यापासून परावृत्त होण्यास प्रवृत्त होते. उर्वरित आयुष्य त्याने समाजासाठी जगावे, समाजकार्याला स्वत:ला झोकून द्यावे, इंद्रिय मोह, सुख यांचा त्याग करावा, काया, वाचा, मन यांनी शुद्ध व्हावे व वृक्षाप्रमाणे नदीप्रमाणे जीवन जगण्याचा प्रयत्न करावा. कुठल्याही मोहाच्या बळी पडू नये. सम्यक् आचरण, सम्यक विचार, सम्यक वृत्ती ठेवावी.

वानप्रस्थ याचा शाब्दिक अर्थ वनात जाणे किंवा गमन करणे होय. वनात गेल्यावर गुरुकुलास किंवा वनाश्रमात राहावयाचे असते. या आश्रमात प्रवेश करणाऱ्यांकडून समाजाच्या विशेष अपेक्षा असतात. त्याग, संयम, इंद्रियनिग्रह, अपरिग्रह, परोपकार, अहिंसावृत्ती, कल्याण कार्य इ. मध्ये वानप्रस्थींनी रममाण व्हावे. मोक्षाची ही पूर्वतयारी असते. तपोमय जीवन जगावे. वानप्रस्थात पंचयज्ञाची पूर्ती सांगितली आहे. ईश्वर चिंतन, समाजकार्य, 'वसुधैवकुटुंबकम' या वृत्तीने वागावे. या आश्रमाचे मुख्य ध्येय म्हणजे व्यक्तीला संन्यासाश्रमासाठी तयार करणे आहे. कुठल्याच सांसारिक सुखाचा लोभ टाळावा असा या आश्रमाचा अनुशासनात्मक दंडक आहे. साधारणत: वयाच्या पन्नाशीनंतरचा हा काळ आहे. साधारणत: केस पांढरे व्हावयास लागतात, पचनक्रिया कमजोर होऊ लागते, रोगप्रतिकारक क्षमता कमी होते, कातडी ढिली होऊ लागते, डोळ्यांची नजर कमजोर होऊ लागते. अशा वेळी व्यक्तीने संसार मुलांच्या स्वाधिन करून स्वत:ला त्यापासून निवृत्त करून मोक्षाची तयारी करावी असे सांगितले आहे. त्यासाठी वानप्रस्थ आश्रम सांगितला आहे. वनात जे काही मिळेल त्यावर उदरनिर्वाह करावा, 'भुकेला कोंडा आणि झोपेला धोंडा' या चित्तवृत्तीने पुढचे जीवन जगावे. जगावे तर आता समस्त प्राणिमात्राच्या कल्याणासाठी हे या आश्रमाचे विशेष आहे. 'मी' ऐवजी आता 'आम्ही' साठी जीवन वेचावे अशी या आश्रमाची शिकवण व शिस्त आहे.

**४) संन्यासाश्रम :**

मनुष्य जीवनाचा हा अंतिम टप्पा होय. जीवनाची ही संध्याकाळ असते. साधारणत: या आश्रमाचा वयोगट ७५ ते १०० वर्षाचा असतो. संन्यासाश्रमात सर्वसंगपरित्याग समाविष्ट असतो. संन्यासी आपल्या मूळच्या नावाचा त्याग करून वेगळे नाव धारण करतो. भगवी वस्त्रे धारण करून भीक्षा मागून जीवन जगतो. त्याने भटकंतीवर असावे. एकाच जागी स्थिर राहू नये. कुठल्याही मोहापासून अलिप्त असावे. हीच संन्यासाची खरी ओळख असते. ईश्वर चिंतनातच आपला वेळ घालवावा व मोक्षाची बळकट तयारी करावी.

शरीर कमजोर व्हायला लागते तेव्हा व्यक्तीने वानप्रस्थीतून संन्यास घ्यावा व केवळ ईश्वर चिंतनातच मन रमवावे असे सांगितले आहे. आत्मज्ञानात रममाण व्हावे. केवळ जिवंत राहण्यासाठीच जेवण करावे. भिक्षेवरच जगावे. सर्व मोहांचा त्याग झाला तर मरणाचे दु:ख उरत नाही. आत्मा शांत चित्ताने बाहेर पडतो. याला मोक्ष म्हटले आहे.

भारतीय समाजजीवनात आश्रमव्यवस्थेची योजना गूढ चिंतनाने प्रस्थापित करण्यात आल्याचे दिसून येते. मनुष्याच्या आयुष्याला चार टप्प्यात विभागून चारही आश्रमांची विशिष्ट क्रमाने मांडणी करण्यात आली आहे. या आश्रमव्यवस्थेतून उन्नत, संयत जीवनाचा प्रत्यय येतो.

मानवप्रेम या बरोबरच इतर प्राणिमात्रांवर दया कशी करावी, का करावी याचे उत्तम तात्त्विक विवेचन व सामाजिक मनाची सुंदर बैठक स्पष्ट होते. सामाजिक जीवनाला सुंदर वळण देऊन समाजाची घडी व संघटन अबाधित राखण्याचे प्रबंधन कौशल्य धर्माची झालर देवून पूर्ण केले आहे. आश्रमव्यवस्थेने समाजाला जगण्याची उदात्त चौकटच दिली नाही, तर समाजाच्या विकासाचा विचार त्यात समाविष्ट आहे. जीवनाच्या साफल्याचा तो मार्ग मानला आहे. लौकिक व पारलौकिक प्रगतीचा, उत्थानाचा 'सत्यम् शिवम् व सुंदरम्' असा संयम साधला आहे.

**हिन्दू समाजव्यवस्थेत पुरुषार्थाची संकल्पना:**

पुरुषार्थ म्हणजे हिन्दू माणसाने आपल्या जीवनात पार पाडावयाची कर्तव्ये होत. त्यासाठी साधन म्हणून आश्रमव्यवस्थेची स्थापना केलेली दिसून येते. हिन्दू धर्मातील जीवन विधायक तत्त्वज्ञानात पुरुषार्थाचा विचार अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्यात इहलोक व परलोकाचा योग्य समन्वय साधलेला आहे. हिन्दूनी मानवी जीवनाची चार ध्येये कल्पिली आहेत. धर्म, अर्थ, काम, मोक्ष ही ती चार ध्येये होत.पुरुषार्थ हे आश्रमव्यवस्थेचे आधारस्तंभ आहेत. पुरुषार्थाला फार मोठा असा मानसशास्त्रीय व सामाजिक संदर्भ आहे. व्यक्तिगत व सामाजिक ध्येयांच्या या चार पुरुषार्थामध्ये समावेश होतो. समाजाचे अस्तित्व टिकविणे ही समाजाची गरज असते. त्याचबरोबर समाजातील व्यक्तींच्या मूलभूत किंवा भौतिक गरजा या परस्परविरोधी नसतात तर त्या परस्पर पोषक असतात. हिन्दूच्या पुरुषार्थ योजनेमध्ये व्यक्ती व समाज यांच्या गरजा योग्य प्रकारे कशा भागविल्या जातात व त्यायोगे समाजाचे अस्तित्व कसे टिकविले जाईल या संबंधी सखोल विचार केलेला आहे. पुरुषार्थ म्हणजे जीवनाची ध्येये आहेत. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ही जीवनाची चार ध्येये मानली गेली आहेत. पुरुषार्थ म्हणजे जीवनाची नैतिक तत्त्वे आहेत. या चार पुरुषार्थाच्या आधारे सामाजिक जीवन कसे जगावे, वैयक्तिक गरजा कशा प्रकारे पूर्ण कराव्यात याचे उत्तम मार्गदर्शन व प्रबोधन केल्याचे दिसून येते. लौकिक व पारलौकिक या दोन्ही बाजूंचा समतोल राखण्याचा प्रयत्न हिन्दूनी केला. आहे. धर्म म्हणजे नैतिकता – योग्य प्रकारे वर्तन होय. अर्थ म्हणजे आर्थिक किंवा भौतिक गरजा भागविण्यासाठी करण्याचे प्रयत्न, काम म्हणजे वैषयिक जीवन किंवा भावनात्मक जीवन जगणे होय. मोक्ष म्हणजे विश्वाच्या अंतिम गूढ अशा स्वरूपामध्ये विलीन होणे आहे. हिन्दू शास्त्रकारांनी जीवनाच्या सर्व बाजूंचा विचार केला आहे. हिन्दूचा जीवनविषयक दृष्टिकोन एकांगी असा नाही. जीवनाच्या सर्वांगीण परिपूर्तीचा विचार पुरुषार्थामध्ये केला आहे. गृहस्थाश्रमातून प्रामुख्याने धर्म, अर्थ आणि काम या तीन पुरुषार्थांना साध्य करावयाचे असते. हिन्दू धर्मातील जीवनविषयक तत्वज्ञानात पुरुषार्थाचा विचार अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

**चार पुरुषार्थांचा थोडक्यात विचार पुढीलप्रमाणे करू या.**

**धर्म :** पुरुषार्थाच्या श्रेणीरचनेत, हिन्दूधर्माच्या संरचनेत, व्यवस्थेत धर्माला प्रथम क्रमांकाचे स्थान आहे. धर्माला हिन्दू धर्म तत्त्वज्ञानात अत्यंत मूलभूत तसेच व्यापक पुरुषार्थ मानले आहे. व्यक्तीने कसे आचरण करावे याची मार्गदर्शक तत्त्वे धर्मात सांगितली आहेत. धर्माचरणाने व्यक्तीला मोक्ष मिळतो. या दृष्टीने सर्व पुरुषार्थात धर्माला सर्वात श्रेष्ठ मानतात.

कौटिल्याने धर्मास शाश्वत सत्य म्हटले आहे. धर्म म्हणजे मानव धर्म असून तो सर्व मानवासाठी समान मानला जातो. या मानव धर्मात दया, क्षमा, शांती, संयम, इंद्रिय नियंत्रण विवेक इ. घटकांचा समावेश होतो. महाभारतात 'अहिंसा' हा श्रेष्ठ धर्म मानला आहे. भगवद्गीतेत 'सत्य' हे धर्माचे सार म्हटले आहे. धर्मात वर्णधर्म, आश्रमधर्म, कुलधर्म, देशधर्म, कालधर्म, राजधर्म इ. समावेश होतो.

धर्म याचा अर्थ योग्यप्रकारे शिस्तबद्ध नैतिक वर्तन असाही लावला जातो. लौकिक उन्नती व पारलौकिक कल्याण साधणारा तो धर्म. सर्व वस्तुमात्रांच्या कल्याणासाठी धर्माची निर्मिती झाली आहे. भूतमात्रांचे संरक्षण करणारा तो धर्म. धर्माचा अर्थ कर्तव्य असाही होतो. उदा. स्त्रीधर्म, शेजारधर्म, मित्रधर्म, पुत्रधर्म, वर्णधर्म, आश्रमधर्म इ. धर्म म्हणजे एक विशिष्ट जीवनपद्धती आणि आचारसंहिता होय. सामाजिक वर्तनांचे, आंतरक्रियांचे व सामाजिक संबंधांचे स्वरूप धर्माद्वारे निश्चित केले जाते. धर्म याचा अर्थ नियत कार्य (भूमिका) असाही होतो. भौतिक व अधिभौतिक जीवनाचा समतोल टिकविण्याचे कार्य धर्म हा पुरुषार्थ करतो. लौकिक व पारलौकिक ध्येयांना जोडणारा दुवा म्हणजे धर्म होय.

**२)अर्थ :** प्रत्येकाला जिवंत राहण्यासाठी, जीवन जगण्यासाठी अनेक भौतिक गरजांची आवश्यकता आहे. अन्न, वस्त्र, निवारा या प्रत्येक मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. धर्मशास्त्रकारांनी अशा इहलोकातील उन्नतीकडे दुर्लक्ष न करता ती आवश्यक बाब मानली आहे. 'अर्थ' हा शब्द धनसंपत्ती किंवा मुद्रा दर्शवित नाही तर भौतिक सुखाच्या सर्व आवश्यकता आणि साधनांचा द्योतक आहे. अर्थ या संकल्पनेत सर्व भौतिक वस्तूंचा समावेश करता येईल. अर्थ हे साधन असून मोक्ष हे ध्येय (साध्य) आहे. अर्थ (धन) धर्माच्या आड येऊ नये याची खबरदारी प्रत्येकांने घेतली पाहिजे. मानवी जीवनातील गरजा भागविण्यासाठी अर्थप्राप्ती हा पुरुषार्थ मानला असला तरी त्याच्या उपभोगावर नियंत्रण ठेवले आहे. अर्थ हे अन्य पुरुषार्थ साध्य करण्याचे साधन मानले आहे. भौतिक गरजांचा विचार देखील हिन्दू तत्त्ववेत्त्यांनी केला होता. संपन्न व संयमित भौतिक जीवन आध्यात्मिक ध्येय समाज कोलमडून पडेल. गरजा भागविण्यापुरतेच अर्थोत्पादन करावे, पैशाची अमर्याद हाव ठेवू नये असे हा पुरुषार्थ सांगतो. अर्थोत्पादन, धनसंचय, व्यवसाय इत्यादी आर्थिक कृती समाजाचे अस्तित्व टिकविण्यास मदत करतात.

**३) काम :** काम या शब्दाचा अर्थ वैषयिक सुख असा होतो. असे असले तरी या पुरुषार्थाला हिन्दू तत्त्ववेत्त्यांनी केवळ एवढाच संकुचित अर्थ दिलेला नाही. त्या भोवती मर्यादेची, विवेकशिलतेची, कर्तव्याची, त्यागाची सुंदर अशी गुंफण केलेली आहे. व्यक्तीच्या सर्वच सृजनशीलतेचा यात समावेश होतो. व्यक्तीच्या सहज प्रवृत्तींना समाजमान्य वाव देणे आवश्यक असते यामुळे व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व समतोल राखण्यास मदत होते. परंतु अमर्याद अशा कामुकतेला येथे वाव नाही. अर्थ व काम ही पुरूषार्थाची अर्थात गृहस्थाश्रमाची ध्येये समजली जातात. मोक्ष हे ध्येय साधण्याच्या आवश्यकतेसाठी अर्थ व काम या पुरुषार्थाची व्यक्तीने कास धरावी असे सांगितले जाते. अर्थ व काम हे सर्वस्व मानले गेलेले नाही. काम या पुरुषार्थामुळे पितृऋण फेडले जाते. पितरांचा उद्धार होतो. समाज टिकून राहतो. वंशाला निरंतरता लाभते. कर्तव्य पालन करण्यास 'काम' हा पुरुषार्थ प्रेरक व सहाय्यक आहे.

गीतेमध्ये काम धर्माच्या विरुद्ध न मानता पूरक मानलेला आहे. प्राणिमात्रांच्या ठिकाणी असलेल्या कामभावनेस धर्मशास्त्रकारांनी उच्च पातळीवर प्रस्थापित केले आहे.

**४) मोक्ष :** हिन्दू व्यक्तीचे जीवनाचे अंतिम लक्ष्य ध्येय (साध्य) - मोक्ष प्राप्ती हे आहे. मोक्ष म्हणजे जन्ममरणाच्या चक्रातून कायमची मुक्तता होय. परमेश्वराशी एकरूप होणे म्हणजे मोक्ष. पृथ्वीतलावर जन्म म्हणजे परमेश्वरापासून दूर जाणे होय. आत्मा हा परमेश्वराचाच अंश आहे असे हिन्दू लोक मानतात. जीवन म्हटले की, सुख-दु:ख, यातना, कष्ट, हेवे-दावे, मत्सर, संघर्ष, लोभ, स्वार्थ, स्पर्धा, अहंकार, व्याधी यांची गोळाबेरीजच असते. तेव्हा या सर्व प्रपंचातून आत्म्याला कायमची मुक्तता मिळावी म्हणून ईश्वरविलीन होण्याची मनोमन कामना म्हणजे मोक्ष होय. मोक्ष प्राप्त करण्यासाठी हिन्दू धर्मशास्त्रात सविस्तरपणे विवेचन आढळते - सात्विक कर्माची व्यक्तीने कास धरावी त्यामुळे मोक्षाचा मार्ग सुकर होतो. मोक्ष हा पुरूषार्थ पूर्णपणे कल्पनामय आहे. तो एक अमूर्त विचार किंवा संकल्पना आहे. शुद्ध चित्ताने ईश्वर आराधना, सम्यक आचरण व सम्यक दृष्ट, पवित्र विचार, वाणी व आचरण यांची सांगड, प्राणिमात्राच्या कल्याणाची भावना, त्यासाठी यथाशक्ती प्रयत्न इ. असे अनेक मार्ग व कार्य मोक्षासाठी सांगितले आहेत.

मोक्ष हे वर्णाश्रम धर्माचे अंतिम उद्दिष्ट आहे. मानवाची चिरंतन प्रवृत्ती आध्यात्मिक आहे. आणि जीवनाचा उद्देश त्यास प्रकाशमान करण्याच आहे. अंतिम, चरम, सर्वोच्च सुख मिळविण्यासाठी आत्मिक उन्नती आवश्यक असते. आत्मिक उन्नतीतून मोक्ष मिळतो. काही अभ्यासकांच्या मते सत्यम् शिवम् आणि सुंदरम्‌तेची प्राप्ती म्हणजे मोक्ष होय. अज्ञानाचा नाश आणि ज्ञानप्राप्ती म्हणजे मोक्ष होय. मोक्ष प्राप्तीचे तीन मार्ग सांगितले आहेत.-१) कर्ममार्ग २) ज्ञानमार्ग आणि ३) भक्तीमार्ग. कर्ममार्गास कर्मयोग म्हणतात. कर्म कोणतेही असो ते पवित्र असते. कर्मात सर्व कर्मांचा समावेश होतो. ज्ञानमार्गात बुद्धिवान व्यक्ती आपल्या बौद्धिक सामर्थ्याच्या आधारावर ईश्वराचे अस्तित्व जाणून आराधना करतो. यामध्ये तर्क, विवेक, जिज्ञासा इ. चा समावेश होतो. गीतेत ज्ञान मार्गाचे सुयोग्य वर्णन मिळते. सर्व भूत-मात्रात ज्ञानमार्गी भेदभाव करीत नाही. भक्तिमार्गात प्रेमाने, स्नेहाने, स्वत:ला अज्ञानी, बालक मानून ईश्वरचरणी संपूर्ण रूपाने शरण जातो. भक्तिमार्ग सर्वांसाठी खुला आहे. संतांनी भक्तिमार्गाचा मोक्षप्राप्तीसाठी अवलबं केला आहे. प्रत्येक जण आपल्या आवडीप्रमाणे, क्षमतेप्रमाणे वरील तीन मार्गांचा अवलंब ईश्वरप्राप्तीसाठी करू शकतात.

सारांश रूपाने असे म्हणता येईल की, आध्यात्मिक, भौतिक जीवनाचा सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न या पुरुषार्थानी केला आहे. जीवनाच्या सर्व अंगांचे संयमित संतुलन पुरुषार्थामध्ये पाहावयास मिळते. व्यक्तीच्या सहज प्रवृत्तींना कुठेही दडपल्याचे आढळत नाही. सहजप्रवृत्तीच्या प्रकटीकरणाला आध्यात्मिक दिशा देऊन त्यांना समाजमान्यता प्राप्त करून दिली आहे. लोकांमध्ये असणाऱ्या सामान्यत्वाचा व असामान्यत्वाचा सुंदर संगम व मेळ घालण्याच प्रयत्न पुरुषार्थामध्ये केला आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने विचार केल्यास असे म्हणता येईल की, संपूर्ण मानवी जीवनाचा सखोल व विस्तृत विचार केलेला आढळतो. समाजातील संगठन, सातत्य साधण्याचा प्रयत्न केला आहे.

**कर्मसिद्धांत व पुनर्जन्माची कल्पना:**

कर्म सिद्धातांप्रमाणे प्रत्येकाला आपापल्या कर्माचे फळ मिळतेच. पूर्वजन्मी केलेल्या चांगल्या-वाईट कर्मांची फळे व्यक्तीला या जन्मात भोगावी लागतात व या जन्मीच्या कर्माची फळे पुढील जन्मी भोगावी लागतात. प्रत्येक जिवाला कर्म हे चिकटलेलेच असते. हिन्दूच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानामध्ये पुनर्जन्म, कर्मसिद्धांत याचे सूक्ष्म विश्लेषण आढळते. हिन्दूच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे आत्मा हा अविनाशी आहे. अमर आहे. आत्मा हा निरनिराळी शरीरे धारण करतो. शरीर नष्ट झाले तरी आत्मा नष्ट होत नाही. अग्नी त्याला जाळीत नाही, वारा त्याला सुकवित नाही, शस्त्र त्याला तोडू शकत नाही, पाणी त्याला भिजवित नाही. आत्मा हा नित्य सर्वव्यापी, स्थिर, अचल व सनातन आहे. ज्या प्रमाणे मनुष्य जीर्ण झालेली वस्त्रे टाकून नवीन वस्त्रे धारण करतो, त्याच प्रमाणे आत्मादेखील जुने शरीर टाकून नवीन शरीर धारण करतो.

जेव्हा आत्मा शरीर टाकून देतो तेव्हा माणसाचा मृत्यू झाला असे आपण म्हणतो. मृत्यू शरीराचा होतो. आत्म्याचा नव्हे. आत्म्याच्या अविनाशी कल्पनेतून पुनर्जन्माची कल्पना निर्माण झाली. कोणत्याही जीवाला ८४ लाख जन्ममरणाच्या फेऱ्यात अडकावे लागते व नंतर तो जीव ईश्वराशी एकरूप होतो अशी समजूत आहे. अशा प्रकारे पुनर्जन्माच्या कल्पनेचा कर्म सिद्धातांशी संबंध जोडला आहे. मोक्षाच्या कल्पनेप्रमाणेच हिन्दू लोकांचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. पुनर्जन्म व कर्मसिद्धांत यांची सांगड घातल्याने, या जन्मातील उचित असे कर्म केले पाहिजेच अशी त्यांची कल्पना आहे. वर्तमानात चांगली कर्मे केल्यास पुढे चांगला जन्म मिळतो. म्हणजे पुनर्जन्मासंबंधीच्या श्रद्धा व्यक्तीस कार्यप्रवण करतात, कृतिशील बनवतात. सामाजिक नियमानुसार वर्तन करण्यास प्रेरणा देतात.

कर्म सिद्धांत हा हिन्दू तत्त्वज्ञानाचा एक विशेष व महत्त्वपूर्ण भाग आहे. हिन्दूच्या सर्व व सामाजिक संस्थेचे ते आधारभूत असे तत्त्व आहे. समाजाच्या सर्व स्तरांमध्ये कर्म सिद्धांताचा प्रभाव-छाप दिसून येते व या सिद्धांताने हिन्दूचे जीवन व्यापून टाकले आहे. जवळपास सर्वच हिन्दू धार्मिक ग्रंथामध्ये कमी-अधिक प्रमाणात, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रूपात कर्मसिद्धांताचे विवेचन, उल्लेख, प्रभाव आढळून येतो. शतपथ ब्राम्हण या ग्रंथात भृगू ऋषीने कर्म सिद्धांताचे विवेचन केले आहे. उपनिषदामध्ये देखील कर्म सिद्धांताचा उल्लेख आढळतो. गरूड पुराणात देखील या सिद्धांताचे गूढ विवेचन पाहावयास मिळते. ब्रम्होपनिषदामध्ये असे सांगितले आहे की, मृत्यूनंतर आत्मा शरीरातून बाहरे पडतो व बाहेर पडताना जन्मभर केलेल्या कर्माचा संचय आत्म्याबरोबर लगडलेला असतो आणि व्यक्तीच्या कर्मानुसार त्याचे पुनर्जन्म ठरविले जाते. महाभारतातील वनपर्वामध्ये कर्मसिद्धांत व स्वर्ग यांची सांगड घातलेली आढळते. प्रवृत्ती ही कर्मभूमी तर स्वर्ग व नरक ही फलभूमी मानली आहे. चांगल्या कर्माची फळे स्वर्गात उपभोगता येतात तर वाईट कर्माची कडू फळे नरकात अनेक यातना सहन करून भोगावी लागतात. भगवद्गीतेत कर्मसिद्धांत विस्ताराने चर्चिला गेला आहे.

**कर्माचा प्रकार:**

मनुष्य आपल्या जीवनात विविध प्रकारची कामे करतो. त्या सर्व कामांना किंवा क्रियांना कर्म म्हटले आहे. त्या कर्माच्या योग्य-अयोग्य, उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, उत्तम-

अधम या तत्त्वावर काही प्रकार केलेले आहेत. धर्मशास्त्रानुसार कर्माचे तीन प्रकार पाडलेले आहेत.

**१) कायिक कर्म**

**२) वाचिक कर्म**

**३) मानसिक कर्म**

शरीरधर्माशी निगडित असलेल्या सर्व क्रियांना कायिक कर्म म्हणतात. कायिक याचा अर्थ शरीराशी संबंधित क्रिया होत. उदा. धावणे, खेळणे, हसणे, रडणे, जेवणे, झोपणे, मदत करणे, मारहाण करणे इ.

वाचेच्या (जिभेच्या, वाणीच्या) सहाय्याने जी कार्ये होतात (चांगली-वाईट) त्यांना वाचिक कर्म म्हणतात. उदा. बोलणे, संभाषण करणे, गाणे-भजन म्हणणे, शिव्याशाप देणे वगैरे.

मानसिक कर्म म्हणजे विचार करणे, चिंतन करणे, ध्यान लावणे, चांगला विचार करणे, वाईट विचार इ. मानसिक कर्मे होत. या क्रियांचा मनाशी संबंध असतो.

**कर्माच्या प्रकारावरून त्याच्या श्रेणी पाडण्यात आलेल्या आहेत.**

**१) सात्विक कर्म**

**२) राजसिक कर्म**

**३) तामसिक कर्म**

कर्मफलाची आशा न ठेवता केवळ कर्तव्यबुद्धीनी केलेल्या कर्मास सात्विक कर्म म्हणतात. भगवद्‌गीतेत अशा प्रकारच्या कर्माचा गौरव केला आहे व अशा कर्माला सर्वश्रेष्ठ कर्म मानले आहे.

कर्मफलाची आशा, अपेक्षा, स्वार्थ, इच्छा मनात धरून केलेले कर्म राजसिक कर्मात (श्रेणीत) मोडते. सात्विक कर्माच्या खालोखाल अशा कर्मांचा दर्जा असतो. उदा. गरिबांना भोजनदान देणे परंतु ह्यामागे आपली प्रसिद्धी छुप्या रूपात करून घेणे. धर्मशाळा बांधणे परंतु त्याला आपले नाव देणे इ.  राजसिक कर्म होत. मनाला वाटेल त्या पद्धतीने वागणे, बेताल वागणे, सामाजिक-धार्मिक नियमांचा भंग करणे, अन्यायी-अत्याचारी वृत्तीने कर्म करणे, स्वैराचार माजवणे, क्षुल्लक व निम्न दर्जाच्या स्वार्थपूर्तिसाठी इतरांच्या मनाची-जीवाची तमा न बाळगणे व कृती करणे इ. सारख्या कर्मांना तामसिक कर्म म्हटले आहे. तामसिक कर्माला अतिशय कनिष्ठ मानले गेले आहे. या कर्मांना पाप म्हटले आहे. उदा. चोरी, डकैती, बलात्कार, खून, विश्वासघात वगैरे.

आत्म्याचे अविनाशित्व, पुनर्जन्म, कर्म सिद्धांत आणि मोक्ष या कल्पना एकमेकांशी निगडित आहेत. त्यात एक प्रकारची तार्किकता आहे. उदा. आत्मा अविनाशी आहे म्हणून तो पुनर्जन्म घेतो. पुनर्जन्माचे स्वरूप गतकालीन कर्मावर आधारित आहे. व्यक्ती विशिष्ट प्रकारे जर कर्म करील तर तिची जन्ममरणातून सुटका होईल व तिला मोक्ष मिळेल.

कर्म सिद्धांताबद्दल परस्पर विरोधी मते मांडली जातात. काही टीकाकारांच्या मतानुसार

कर्मसिद्धांताने लोकांना दैववादी व स्थितीप्रिय बनविले आहे. तर या उलट काहींच्या मते कर्मतत्त्वज्ञानाने लोकांना कार्यप्रवण बनविले आहे. कर्म सिद्धांताने लोकांमध्ये चैतन्य निर्माण करून पुढील जन्माच्या चांगल्या स्थितीची अभिप्रेरणा दिली आहे. कर्म सिद्धांताने लोकांच्या समाजबाह्य, मानवतेविरुद्ध आचरणावर व मनोवृत्तीवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य केले आहे. समतोल, सकारात्मक, उत्तम व्यवहाराकरिता दिशादर्शन देण्याचे काम या सिद्धांताने केले आहे.

C) Indian Sociological Research Field of Theory

**भारतीय समाजशास्त्रीय संशोधनाचे क्षेत्र सिद्धांत**

**१) ग्रामीण समाजाचे अध्ययन** (Study of Rural Society)

**ग्रामीण समुदायाचा अर्थ:**

श्री. त्रि. ना. अत्रे यांनी खेड्याची व्याख्या खालील प्रमाणे दिली आहे.-

'खेडे म्हणजे जमीन कसणे व खेडूत म्हणजे जमीन कसणारा. तेव्हा खेडूतांची जी वस्ती ते खेडे. ज्यामध्ये मुख्य व्यवसाय शेती व ज्यामध्ये अधिकांश वस्ती शेतकऱ्यांची असते. त्या गावाला लोक खेडे किंवा गावठे म्हणतात'

श्री. हेरॉल्ड पीक यांनी सामाजिक शास्त्राच्या विश्वकोशात खेड्याची व्याख्या केली आहे. ते म्हणतात 'ग्रामीण समुदायात अशा परस्पर संबंधित किंवा असंबंधित व्यक्तीच्या समूहांचा अंतर्भाव होतो की, जो समूह एका कुटुंबापेक्षा मोठा आहे व ज्यांची राहती घरे अगदी जवळजवळ किंवा अनियमितपणे वसलेली असतात. या समुदायाच्या कृषीयोग्य जमिनीवर शेती केली जाते व त्या सभोवती असणाऱ्या पडीक जमिनिवर गुरे चारली जातात. शेजारच्या समुदायाच्या सीमेपर्यंत पसरलेल्या कृषीयोग्य व पडीक जमीनीवर त्या समुदायाची मालकी हक्काची भावना असते.'

भारतीय समाज ग्रामप्रधान असून एकूण लोकसंख्येच्या ७२.६० टक्के लोक या समुदायातील आहेत. भारतीय समाजात ग्राम हे अतिप्राचीन वस्तिस्थान आहे. वैदिक साहित्यात ग्रामाचा उल्लेख मिळतो. रामायणात ग्रामप्रमुखास ग्रामणी म्हटले आहे. मनुस्मृतीत ग्रामरचना कशी असावी याची चर्चा केली आहे. आपस्तंभ धर्मसूत्र, विष्णूस्मृतीत राजाने ग्रामप्रमुखाची नेमणूक करावी असे म्हटले आहे. कौटिल्याने 'अर्थशास्त्र' या ग्रंथात ग्राम अधिकाराच्या कार्याची चर्चा केलेली दिसते. बौद्ध साहित्यात ग्रामाची चित्रे मिळतात. जातककथांतून 'ग्रामसभेचा' उल्लेख येतो. जैन साहित्यात गावासाठी घोष, ग्राम, पल्ली अशा संज्ञा येतात. मध्ययुगीन भारतात गावे बऱ्याच प्रमाणात स्वयंपूर्ण होती. जातीप्रथा, कुटुंब, बलुतेदारी, देवळे, ग्रामसभा, सावकार, जमीनदार, पुरोहित इ. घटक त्यात महत्त्वपूर्ण होते. आधुनिक काळात ग्रामीण जीवनाचे पारंपरिक चित्र बदलत चालले आहे. नेल्सनने ग्रामीण जीवन वैशिष्ट्यपूर्ण असते, असे सांगताना त्यांनी 'ग्रामीणता' (Ruralism) असा शब्दप्रयोग केलेला आहे. अँडरसनने ग्रामीण जीवनाचा वेगळाच ढंग असतो असे म्हटले आहे.

**ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये :**

भारतातील ग्रामीण समाजाची पारंपरिक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील-

१. स्वयंपूर्णता, २. रूढींचे प्राबल्य, ३. सा. गतिशीलतेचा अभाव, ४. स्वायतत्ता, ५. पृथकता ६. सामाजिक एकसारखेपणा, ७. नैसर्गिक वातावरण, ८. संयुक्त कुटूंब, ९. कृषी मुख्य व्यवसाय, १०. बलुतेदारी पद्धती

**१) स्वयंपूर्णता :** पूर्वी ग्रामीण क्षेत्रातील गरजा गावातच पूर्ण होत. जातीनुसार व्यवसाय ठरलेले होते. त्यामुळे लोकांच्या गरजा परस्पर सहकार्याने पूर्ण केल्या जात होत्या. लोहार, कुंभार, चांभार, सुतार, गवंडी, सोनार, ब्राम्हण, कुणबी, माळी, तेली, कोल्हाटी अशा नानाविध जातीचे लोक एकाच गावात गुण्यागोविंदाने राहत. या जाती परस्परावलंबी होत्या. न्हावी, ढीवर इ. जाती आपापली कामे करत. इतर स्पर्धक त्यांना नव्हते. त्यामुळे व्यवसायिक संघर्षदेखील नव्हता. षस्वायतत्ताश हे प्राचीन खेड्याचे एक महत्त्वाचे वैशिष्टे होते. ग्रामीण समुदाय ही लहान प्रजासत्ताक राज्येच होती. बाह्यसंबंधांतून खेडी अलिप्त होती. इंग्रज राजवटीत खेड्याची स्वायतत्ता हळूहळू ऱ्हास पावत गेली.

**२) रूढींचे प्राबल्य :** ज्या गोष्टी, नियम रीती समाजात रूढ होत्या तेव्हा त्या रीतव्यवहाराला रुढी म्हणतात. रुढीनुसार आचरण-व्यवहार करणे हे आपले कर्तव्य व धर्म आहे व त्यानुसारच वागले पाहिजे या विचाराचा जबरदस्त प्रभाव गावातील सदस्यांवर असायचा. नगदी पैशाने आर्थिक व्यवहार फार कमी होत असत, तर वस्तुविनिमयच प्रामुख्याने चालायचा. बलुतेदारी म्हणजे जाती-जातीने परस्पर सहकार्याने सेवा करायची व परस्परांच्या गरजा भागवायच्या असा प्रघात होता. गावाचे सामाजिक जीवन रूढींनी बद्ध झालेले होते. त्यांच्या जीवनात रूढी, परंपरा व धर्म इ. ना आगळेच महत्त्व होते.

**३) सामाजिक गतिशीलतेचा अभाव :** एका स्तरातून दुसऱ्या स्तरात जाण्यायेण्याच्या क्रियेला - व्यवहाराला किंवा प्रक्रियेला स्तरीकरण म्हणतात. स्तरीकरणाची उपस्थिती प्रत्येकच समाजात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात दिसून येते. कुठे वर्णव्यवस्थेच्या तर कुठे जातीव्यवस्थेच्या स्वरूपात स्तरीकरण आढळते. भारतात स्तरीकरणाचा आधार जात आहे. जातीव्यवस्थेत एक प्रकारची श्रेष्ठ-कनिष्ठतेची उतरंड किंवा श्रेणी रचना आढळते. प्रत्येकाने आपल्या जातीधर्मानुसारच व्यवसाय करावा असा दंडक होता. त्यामुळे प्रत्येकाला आपला परंपरागत जातीचा व्यवसाय करावा लागे. परिणामत: इच्छा असो वा नसो, क्षमता असो वा नसो, व्यक्तीला आपलाच व्यवसाय करावा लागे. त्यामुळे सामाजिक गतिशीलतेला भारतीय ग्रामीण समाजजीवनात वाव नव्हता.

**४) स्वायत्तता :** स्वायत्तता याचा अर्थ सर्व दृष्टीने सत्तापूर्ण असणे होय. स्वत:चीच सत्ता असणे म्हणजे स्वायतत्ता. आर्थिक, राजकीय, धार्मिक इ. सर्वच दृष्टीने गावे स्वतंत्र होती. गावात पंचायत असायची व काही ठिकाणी ही पंचायत आजही आहे. गावाचा कारभार ही पंचायत बघायची, गावावर नियंत्रण ठेवणे, सोयी-सुधारणा करणे, भांडण-तंटे सोडविण, न्यायनिवाडा करणे इ. पंचायतीची कामे होती. गावातील वयोवृद्ध नागरिक पंचायतीचे सदस्य असायचे. शिवाय प्रत्येक जातीची जातपंचायत वेगळी असायची. गावातील समस्या गावातच सोडविली जायची. या दृष्टिने भारतातील खेडी स्वायत्त होती.

**५) पृथकता:** भारतात इंग्रजाच्या राजवटीपूर्वी पक्क्या सडका, रेल्वेलाईन, मोटारी नव्हत्या. कच्चे रस्ते होते. गाडी, घोडा, पायदळ हीच प्रवासाची साधने होती. त्यामुळे प्रवास कठीण

होता. दळणवळणाच्या साधनांचा विकास झालेला नव्हता. त्यामुळे खेड्यातील लोकांचा बाह्य लोकांशी फारसा संपर्क नव्हता. खेडे हेच त्यांचे विश्व होते. तो बाह्य जगतापासून, मोठ-मोठ्या शहरांपासून पृथक राहिला. त्याच्या या पृथकतेचे फायदे-तोटे दोन्ही आहेत. अज्ञान, निरक्षरता, प्रचार-प्रसार साधनांचा अभाव यामुळे वैचारिक क्रांतीला देखील वाव नव्हता. भौतिक आणि सामाजिक दोन्ही दृष्टीने ग्रामीण समुदाय पृथक राहिला. म्हणून पृथकता हेही एक वैशिष्ट्य सागंता येईल.

**६) सामाजिक एकसारखेपणा:** आकाराने लहान असल्याने ग्रामीण समाजात सर्वच लोक एकमेकांना व्यक्तिगत रूपाने ओळखत असत. मुख्य व्यवसाय शेती होता त्यामुळे त्यांच्या व्यावसायिक जीवनात समानता दिसून येते. व्यवसायानिमित्त एकत्र राहणे अपरिहार्य असायचे. खान-पान, सण-उत्सव, सामाजिक कार्यक्रम, आर्थिक व्यवहार, मनोरंजन, पोशाख, बोली-भाषा, रुढी-परंपरा इ. मध्ये एकजिनसीपणा दिसून यायचा. आज ग्रामीण जीवनातील या वैशिष्ट्याच्या संदर्भातील चित्र बदलत चालले आहे.

**७) नैसर्गिक वातावरण:** खेडी नैसर्गिक वातावरणांनी किंवा पर्यावरणानी घेरलेली असतात. कृत्रिमता येथे फारच कमी पाहावयास मिळते. डोंगर, नदी, शेती, मातीचे घरे, गुरे-ढोरे, कच्चे रस्ते, जंगल अशा नैसर्गिक वातावरणात लोकांचे जीवनचक्र चालत राहते. आजही भारतातील अनेक खेड्यांमध्ये असेच चित्र पाहावयास मिळते. भजन-कीर्तन-दंडार अशीच त्यांची मनोरंजनाची साधने होती. मातीच्या चुलीवर लाकडे जाळून स्वयंपाक करणारे लोकजीवन आजही विद्यमान आहे. लोकांचे जीवन नैसर्गिक वातावरणाशी जुळलेले असते. गावातील लोककला, गाणी, कथा ग्राम्य वातावरणाशीच संबंधित असतात.

**८) संयुक्त कुटुंब:** भारतीय ग्राम्य जीवनाचे हे खास वैशिष्ट्य होते. मुख्य व्यवसाय शेती व इतर जातींचे व्यवसाय निश्चित असल्याने व इतर ठिकाणी अन्य व्यवसाय करण्याची गरज नसल्याने लोक एकत्रच राहत. मोठमोठे वाडे आजही पाहावयास मिळतात. दोन ते तिन पिढ्यांचे सदस्य एकत्र राहत. वडीलधाऱ्या मंडळींचे वर्चस्व होते. व्यक्तीपेक्षा कुटुंबाला विशेष स्थान होते. आजोबा-आजी, आई-वडील, काका-काकू, अविवाहित आत्या, विधवा आत्या, नातू अशी भरगच्च रक्तसंबंधी नाती-गोती असलेली मंडळी एकाच छताखाली राहत. आज परिस्थिती पूर्वीसारखी राहिलेली नाही. त्यात बदल होऊ लागला आहे.

**९) मुख्य व्यवसाय शेती :** ग्रामीण भारतात पूर्वी आणि आजही मुख्य व्यवसाय शेतीचाच दिसून येतो. अधिकांश ग्रामीण लोक शेतीकार्यात व्यस्त दिसतात. ज्यांच्याकडे शेती नाही, ते इतरांच्या शेतीवर काम करतात. पूर्वी लोक आपल्या गरजा भागविण्यासाठी शेती करीत. व्यापारासाठी किंवा जास्त पैसा मिळविण्यासाठी शेती करीत नव्हते. थोडक्यात म्हणजे शेतीचे व्यापारीकरण झालेले नव्हते. लोक आहे त्यात सामधानी होते. परंतु आज या क्षेत्रातही पारंपरिक चित्र बदलत चालले आहे. जीवनमानाची पातळी आणि सांस्कृतिक जीवनात शेती हा केन्द्रबिंदू होता.

**१०) बलुतेदारी पद्धती :** भारतातील एकूणच ग्राम्यजीवन अर्थात आर्थिक, सामाजिक,

धार्मिक, सांस्कृतिक जीवनात बलुतेदारी पद्धतीचे महत्त्व होते. विभिन्न जाती परस्परांना मदत करीत, आपली सेवा देत असत आणि त्या सेवेच्या मोबदल्यात सेवा देणारा सेवा करून घेणाऱ्यांकडून उदरनिर्वाहासाठी मोबदला घेत असत. या पद्धतीलाच बलुतेदारी पद्धत म्हणत. जीवनात अनौपचारिक पद्धतीचाच प्रभाव व वास्तव्य होते. ग्रामीण जीवनात जाती आणि व्यवसायाच्या संबंधातून बलुतेदारी पद्धती साकार झाली. ग्रामीण जीवनात १२ बलुतेदार आणि १८ अलुतेदार अशा दोन भागात विभाजन असायचे. सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, धोबी, सोनार, कोळी, महार, गोंधळी, चौगुला व जोशी हे बलुतेदार होत आणि तेली, तांबोळी, गोसावी, साळी, धनगर, शिंपी, माळी, गोंधळी, जंगम डवऱ्या, भाट ठाकर, जंगम, वाजंत्री, पडशी, कलावंत, तराळ, भोई, आणि मुलाणी यांना अलुतेदार म्हणत. सर्व जातींना एकत्र आणणारा दुवा म्हणजेच ही बलुतेदारी पद्धती होती. बलुतेदारी पद्धतीवर रूढींचे प्राबल्य होते. शेती हाच बलुतेदारी पद्धतीचा केंद्रबिंदू होता. त्यामुळे खेड्यातील शेतकऱ्यांना मत्त्वपूर्ण स्थान होते. शेती करणाऱ्यांना 'कुणबी' म्हणत व बिगरशेती करणाऱ्यांना 'अडाणी' म्हणत. शेतकऱ्याला बळीराजा म्हणून संबोधले जाई. ज्यांची विद्या, कसब, कौशल्य, शेतकऱ्याला अधिक उपयोगी त्यांना 'कारू' म्हणत व ज्याचे पासून शेतकऱ्यांचे फारसे अडत नव्हते त्याला 'नारू' म्हणत. कारूला बलुतेदार व नारूला अलुतेदार म्हणत.

**स्वातंत्र्योत्तर भारतातील ग्रामीण जीवनातील परिवर्तन :**

औद्योगिकीकरण, वाढते नागरीकरण, स्थलांतरण, दळण-वळणाच्या साधन-सोईत झालेली वाढ व विकास, नवीन कायदे, शिक्षणाचा प्रचार-प्रसार, समानसंधी, धर्मनिरपेक्षता, स्त्रीशिक्षणाचा विकास, पाश्चात्त्य संस्कृतीचा व ज्ञानाचा प्रभाव, आधुनिकीकरण, दृकश्राव्य संवाद साधनांचा विकास, विज्ञानाचा प्रभाव, सामाजिक-धार्मिक चळवळी, समाजसुधारकार्य व प्रबोधन अशा अनेक घटकांचा संयुक्त प्रभाव व त्यातून होणारे परिवर्तन आज ग्रामीण जीवनातही पाहावयास मिळते. अनेक सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रात परिवर्तन होत आहे. पारंपरिक ग्रामीण भारतीय जीवनाचे कायाकल्प होऊ लागला आहे. या परिवर्तनाचा आढावा थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल :

**परिवर्तनाची क्षेत्रे:**

१) कुटुंबाच्या स्वरूपात बदल, २) जीतीसंबंधात बदल, ३) व्यवसायातील बदल, ४) राजकीय संधीतील बदल, ५) आर्थिक व्यवहारातील बदलए ६) धार्मिक क्षेत्रातील बदल, ७) शिक्षण क्षेत्रातील बदल, ८) सांस्कृतिक बदल, ९) विवाह क्षेत्रातील बदल, १०) राहणीमानातील बदल, ११) स्त्री-पुरुष संबंधातील बदल, १२) स्वास्थ्य संबंधी जागरूकता

**१) कुटुंबाच्या स्वरूपात बदल :** संयुक्त कुटुंब पद्धती हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्य होते. परंतु आज औद्योगीकीकरण, नागरीकरण, पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव, वाढती लोकसंख्या व जमिनीवर (कृषीवर) लोकसंख्येचा वाढता भार, स्थलांतराचा वाढता वेग, शिक्षणाचा ज्ञानाचा स्फोट, दळण-वळणाच्या साधनांचा तीव्र गतिविकास, स्त्रियांचे वाढते शिक्षण, नवीन कायदे अशा अनेक कारणांमुळे ग्रामीण क्षेत्रातूनही संयुक्त कुटुंब पद्धतीचे

प्रमाण घटत चालले आहे. विभक्त कुटुंब पद्धतीचे प्रचलन जोरात सुरू झाले आहे.

**२) जातीसंबंधात बदल :** पूर्वी जाती-जातीत अनौपचारिक, खाजगी व नातेसंबंध आढळत नव्हते. प्रत्येक जात आपल्या जाती-नियमानुसार, जातीधर्मानुसार वागत हात्या. विवाहसंबंध जाती अंतर्गतच होत. रोटी-बेटी व्यवहाराला बंधने होती. परंतु आज चित्र बदलत चालले आहे. सामाजिक गतिशीलता वाढल्याने विभिन्न जातींचे सामाजिक, आर्थिक संबंधात भर पडत आहे. जातीची कठोर बंधने शिथिल होऊ लागली आहेत. आज भारतीय कायद्याने आंतरजातीय विवाहास अनुमती दिली आहे. रोटी व्यवहार देखील सुरू झाला आहे. आज जातीच्या आधारावर व्यक्तीचा सामाजिक दर्जा ठरत नाही तर तो व्यक्तीच्या कौशल्यावर ठरू लागला आहे. अर्पित दर्जाची जागा अर्जित दर्जान घेतली आहे. अस्पृश्यता समाजातून नष्ट झाली आहे. विभिन्न जाती-जातीमध्ये सामाजिक विनिमयाचे प्रमाण वाढत आहे.

**३) व्यवसायातील बदल:** जवळपास स्वातंत्र्यपूर्व काळापर्यंत भारतीय ग्राम्य जीवनात लोक आपापल्या जातीचाच व्यवसाय करायचे. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात या परिस्थितीत झपाट्याने बदल होऊ लागले आहेत. जातीचाच व्यवसाय केला पाहिजे असे बंधन आज राहिलेले नाही. प्रत्येक व्यक्ती आपल्या आवडीनुसार, क्षमतेनुसार व्यवसाय निवडू शकतो. या संदर्भात जातीची कठोर बंधने शिथिल झाली आहेत. शिक्षण-प्रशिक्षण घेऊन लोक आपला नवा व्यवसाय सुरू करू लागले आहेत. त्यामुळे आज गावातही व्यावसायिक स्पर्धा वाढल्याचे दिसून येते. व्यावसायिक गतिशीलतेचे प्रमाण वाढले आहे. या संदर्भात गावातील पारंपरिक चित्र झपाट्याने बदलत चालल्याचे दिसून येते.

**४) राजकीय संधीत बदल:** आज राजकीय क्षेत्रात कोणत्याही नागरिकाला प्रवेशाची दारे उघडी झाली आहेत. कायद्यासमोर सर्व सारखेच व समान मानल्याने निम्न जातींना लोकशाही व्यवस्थेत निवडणूक लढविण्याचा, राजकीय पद प्राप्त करण्याचा अधिकार मिळाला आहे. एवढेच नव्हे तर स्त्रियांना देखील ही संधी मिळाल्याने व त्यांच्यासाठी राखीव जागा असल्याने पंचायती राज्यात अनेक निम्न जातीचे लोक व स्त्रिया पदांवर आढळत आहेत. राजकीय जागरूकता ग्रामीण क्षेत्रात निश्चितच वाढली आहे. राजकीय गटबाजीचे तीव्र पडसाद देखील येथे दिसून येत आहेत. आता ग्रामीण भारत जाती-जातीतच नव्हे तर राजकारणातील विभिन्न राजकीय पक्षात विभागला जात आहे. यामुळे गावातील पूर्वीचे एकोप्याचे, सहकार्याचे, प्रेमाचे संबंध आटत चालले आहे. असेही चित्र समोर येऊ लागले आहे.

**५) आर्थिक व्यवहारातील बदल:** व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य मिळाल्याने गावातही आर्थिक स्पर्धा निर्माण झाली आहे. पूर्वीचे परंपरागत आर्थिक व्यवहाराचे स्वरूप बदलून आधुनिक आर्थिक व्यवहार रुजू होत आहेत. वस्तुविनिमयाची जागा मुद्रविनिमयाने घेतली आहे. बलुतेदारी पद्धती इतिहासजमा होत आहे. व्यवसायावर जातीची बंधने राहिलेली नसल्याने एक नवीन वर्णव्यवस्था स्थापन होऊ लागली आहे. सहकारी शेती, पतपेढ्या, कृषीचे वाणिज्यीकरण, आधुनिक पद्धतीने शेती, शेतकरी संघटना, ग्रामीण विकासाच्या

शासनाच्या नवीन योजना यामुळे ग्रामीण भारताचे चित्र बदलू लागले आहे. असे असले तरी या बदलाची गती फारच मंद दिसून येते हेही तितकेच खरे आहे.

**६) धार्मिक क्षेत्रातील बदल :** शिक्षणाच्या विकासाबरोबर आणि विज्ञानाच्या प्रगतीबरोबरच लोकांचा दंतकथा, कर्मकांड, अंधविश्वास इ. वरील विश्वास कमी होत चालला आहे. पवित्र-अपवित्रतेची निषेध भावना व विचार बदलू लागले आहेत. ब्राम्हणांचे वर्चस्व व महत्त्व घटत चालले आहे. नवीन पिढीचा उपवास, व्रत-वैकल्ये, सोहळे-ओवळे, होम-हवन इ. वर विश्वास देखील घटत चालला आहे. धर्माला विज्ञानाची जोड नवीन पिढी देऊ लागली आहे. कायद्याने मागावर्गीयांना देवळाची दारे उघडी केली आहे. धार्मिक कीर्तने, प्रवचन, पोथी पुराणाच्या वाचनाचे प्रमाण कमी होत आहे. प्रसार माध्यमांनी धार्मिक ज्ञानात भर पडू लागली आहे. 'बाबा वाक्य प्रमाणम' चा प्रभाव घसरू लागला आहे. मौखिक आरत्यांची जागा कॅसेट घेऊ लागली आहे.

**७) शिक्षण क्षेत्रातील बदल :** सर्वांना शिक्षण हे भारत सरकारचे धोरण असल्याने व सर्वांनाच शिक्षणाचा अधिकार या न्यायाने ग्रामीण क्षेत्रातही ही शिक्षणाची दारे उघडी करण्यात आल्याने सर्व स्तरातील व जातीधर्मातील मुले शाळांमध्ये शिक्षण घेऊ लागली आहेत. जवळपासच्या परिसरातील महाविद्यालयांमध्ये उच्च शिक्षण देखील घेऊ लागली आहेत. महाराष्ट्रात तर उच्च शिक्षणाचे जाळे पसरले आहे. सहशिक्षणाला सुरुवात झाली आहे. मुला-मुलींना देखील शिकवले पाहिजे अशी सकारात्मक मनोवृत्ती लोकांमध्ये निर्माण होऊ लागली आहे. कला-वाणिज्य-विज्ञान-तंत्रज्ञान, वैद्यकीय, कृषी क्षेत्रातील ज्ञान आपापल्या आवडीप्रमाणे व क्षमतेप्रमाणे ग्रामीण मुले घेऊ लागली आहेत. मागासवर्गीय मुला-मुलींना शिक्षणात सवलती व वसती गृहाची सोय यामुळे मुले-मुली या संधीचा लाभ घेताना दिसतात.

**८) सांस्कृतिक बदल :** कला, संस्कृती, राहणीमान, जीवनमान, नवीन उपकरणे, पोशाख, इ. क्षेत्रात होणाऱ्या परिवर्तनाला सांस्कृतिक बदल म्हणता येईल. आज आधुनिकीकरणाचा प्रभाव ग्रामीण जीवनातही पाहावयास मिळतो आहे. मनोरंजनासाठी आता रेडिओ, टी.व्ही, चित्रपट इ. वापर होतो आहे. क्रिकेटचे वेड तर सर्वत्रच दिसत आहे. डी.जे., लाऊडस्पीकरचा वापर वाढला आहे. पोशाखात नवीन पिढीत बराच बदल झालेला दिसतो आहे. प्रवासासाठी मोटार, रेल्वे, सायकल, मोटारसायकल यांचे प्रमाण वाढले आहे. घरात किचनओटा, गॅस, डाइनिंग टेबल इ.चा वापर व चलन वाढू लागले आहे. असे नानाविध सांस्कृतिक बदल सांगता येतील. असे असले तरी ग्रामीण क्षेत्रातील सर्वच घरांत हा बदल दिसत नाही. याला आर्थिक कारण जबाबदार आहे. तरी परिवर्तनाच्या प्रक्रियेने वेग घेतला आहे हे खरे आहे. सांस्कृतिक क्षेत्रात (भौतिकतेत) जेवढा बदल दिसून येत आहे तेवढा संस्कृतीत बदल झालेला नाही. या बदलाची प्रक्रिया तुलनेने मंद आहे असेही दिसून येते.

**९) विवाह क्षेत्रातील बदल :** विवाहातील मुला-मुलीचे वय, पसंती, वैवाहिक विधी, कार्यक्रम, संस्कार समारंभ यात बदल होत आहे. परिचय संमेलने, सामुदायिक विवाह, विवाहातील पोशाख, भोजनाचे पदार्थ, बुफेपद्धती असे अनेक बाबतीत परिवर्तन होत असल्याचे आढळून येत आहे. शिक्षणाचे महत्त्व विवाह ठरवितांना लक्षात येते. मुला-

मुलींच्या पसंतीना प्राथमिकता दिली जात आहे. शहरी जीवनाच्या तुलनेत येथील परिवर्तन मंद असले तरी ते उघडपणे दिसून येत आहे हे वास्तवदेखील नाकारता येत नाही. सरकारी क्षेत्रात नोकरी करणाऱ्या मुलांना अधिक पसंत केले जात आहे. हेही एक सत्य व वास्तव पुढे येत आहे. सौंदर्यापेक्षा शिक्षणाला, गुणांना, योग्यतेला व व्यक्तिमत्त्वाला प्राथमिकता दिली जात आहे.

**१०) राहणीमानातील बदल :** ग्रामीण जीवनात विशेषत: नवीन पिढीमध्ये राहणीमानाच्या बाबतीत परिवर्तन होत असल्याचे आढळते. मुले पॅन्ट, शर्ट व इतर फॅशनेबल ड्रेस वापरू लागले आहेत. हीच स्थिती मुलींच्या बाबतीतही दिसून येते. पारंपरिक जीवनपद्धती नवीन पिढीत फारशी आढळत नाही. धावपळ वाढली आहे. नवीन तरुण पिढी शेतीऐवजी शहरात नोकरी, धंदा, शोधतांना दिसतात. रोजगार प्राप्तीसाठी न शिकलेले लोकदेखील शहरात येऊ लागले आहेत. शहरी जीवनाचा प्रभाव त्यांच्यावर झाल्याशिवाय राहत नाही. ग्रामीण क्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होऊ लागले आहे. याचा परिणाम म्हणून आज ग्रामीण क्षेत्रात शेतीवर राबण्यासाठी लोक (मजूर) मिळेनासे होत आहेत. शहरी जीवनाच्या अनुकरणातून येथील लोकांच्या राहणीमानात फरक पडत चालला आहे.

**११) स्त्री-पुरूष संबंधातील बदल :** पुरुषप्रधान समाजात स्त्रीकडे दुय्यम दर्जा म्हणून बघितले जात होते. ग्रामीण क्षेत्रात या बाबतीतील स्थिती तर फारच वाईट होती. परंतु आज स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन निखळ पुरुषप्रधान मानसिकतेचा राहिलेलानाही. त्यामध्ये सकारात्मक बदल दिसू लागला आहे. मुलींनादेखील शिकविले पाहिजे, ती काळाची गरज आहे. या बाबतीतील जागरुकता लोकांची वाढत आहे. स्त्री ही मनोरंजनाची वस्तू राहिलेली नाी. तिच्याकडे मानवतेच्या व सम्यक् दृष्टीने पाहण्याचा दृष्टिकोन वाढू लागला आहे. पूर्वीपेक्षा स्त्रीचा दर्जा निश्चितच वाढला आहे. हे जरी खरे असले तरी पूर्वीपणे समानतेचा भाव व विचार रुजलेला नाही.

**१२) स्वास्थ्यसंबंधी जागरुकता** :पूर्वी ग्रामीण लोक आजारावर खाजगी औषधांचा, टोने-टोटकांचा, मंत्र-तंत्राचा वापर करीत. परंतु आज विज्ञानाच्या विकासाने आरोग्यासंबंधीची जागरूकता निर्माण होत आहे. यात गावकरी आजारातून बरे होण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांकडे जाऊ लागले आहेत. शासनाने ग्राम क्षेत्रातही सरकारी दवाखाने उघडले आहेत. प्राथमिक सेवा केन्द्र उघडली जात आहेत. कंपन्यामध्ये तयार झालेल्या औषधांचा उपयोग करू लागली आहेत. अंधविश्वास कमी होऊ लागला आहे. टी.व्ही. मुळे आरोग्यविषयक जागरूकतेत भर पडत आहे. वर्तमानपत्रांची भूमिका देखील कमी महत्त्वाची नाही. गावातही स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण होत आहे. शासनाने खेड्यातही स्वच्छागृहे असावेत या संदर्भात मोहीम सुरू केली आहे. याला प्रतिसादही मिळू लागला आहे. असे असले तरी पूर्ण जागरूकता अजूनही आलेली नाही हेही सत्य विसरून चालणार नाही.

भारतीय समाज म्हणजे गावा - गावात वसलेला समाज होय. आज शहरीकरणाचा वेग वाढला आहे व शहरे वाढत चालली आहेत. शहरे गर्दीची आणि नवीन अनेक समस्यांची केन्द्रे होत चालली आहेत. भारत खेड्यांचा, कृषी प्रधान देश आहे तरीदेखील स्वातंत्र्यांनतर या क्षेत्राच्या समतोल विकासाकडे शासनाने लक्ष द्यायला पाहिजे होते तेवढे

दिले नाही. त्यामुळे या क्षेत्रातही अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. महात्मा गांधींनी विकासाचे जे प्रारूप सांगितले होते ते उत्तम होते. संस्कृतीच्या जपणूकबरोबरच समतोल भौतिक विकास साधता आला असता व त्यातून आमची भारतीय अस्मिता टिकविता आली असती. परंतु शासनाचे लक्ष शहरांवर व उद्योगाच्या केंद्रिकरणावरच स्थिर झाल्याने शहरी जीवन व ग्रामीण जीवन अशा दोन प्रभेदक संस्कृतीचे चित्र निर्माण झाले आहे.

भारतीय समाज खऱ्या अर्थाने त्याच्या मूलभूत स्वरूपात समजून घ्यायचे असेल तर येथील ग्रामीण समाज समूजन घेणे अत्यावश्यक आहे व त्याच्या विकासाकडे लक्ष दिल्यासच भारतीय समाजाचा विकास साधता येईल. भारतीय समाज खेड्यात वसलेला आहे. तेव्हा ग्रामीण समाजशास्त्राचे महर्त्तव वाढले आहे. आजही या क्षेत्राचा सखोल आणि संपूर्ण अभ्यास झालेला नाही. यावर संशोधनाची आवश्यकता आहे. औद्योगिकीकरणाचा परिणाम ग्रामीण क्षेत्रावर होत आहे. जागतिकीकरणाच्या धोरणाने चित्र बदलत आहे. आतापर्यंत झालेला अभ्यास पारंपरिकतेचे चित्र रेखाटण्याच्या संदर्भात झाला आहे. नित्य नवीन बदल होत आहेत. अशा परिस्थितीत नव्या दृष्टिकोनातून ग्राम्य जीवनाचे अध्ययन होणे गरजेचे झालेले आहे. या संशोधनातूनच ग्रामीण जीवनाच्या विकासाचे धोरण ठरविले जाऊ शकते. विभिन्न राज्यातील खेड्यांची स्थिती व समस्या एकसारख्याच असतील हे जरूरी नाही. महाराष्ट्रातच वेगवेगळ्या विभागात शेतकऱ्यांच्या समस्या थोड्या भिन्न आहेत. त्यामुळे ग्रामीण विकासाचे सरसकट व धोपट धोरण स्वीकारणे बरोबर ह अंगांनी संशोधन करण्यास वाव आहे. उदा. भारतीय ग्रामीण जीवनाचे बदलते स्वरूप, ग्रामीण आर्थिक समस्या, ग्रामीण सामाजिक जीवनातील परिवर्तने व परिणाम, ग्रामीण आरोग्य व्यवस्था व समस्या, ग्रामीण विकासाच्या संदर्भात शासनाचे धोरण व त्याचे यशापयश, ग्रामीण क्षेत्रातील स्थलांतरण व त्याचा सामाजिक-आर्थिक परिणाम, ग्रामीण स्त्रियांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक स्थिती, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कारणे, परिणाम व उपाय, ग्रामीण क्षेत्रातील सहकार चळवळ व त्याची फलश्रुती, तांत्रिक घटकांचे ग्रामीण क्षेत्रातील परिवर्तनातील योगदान, स्त्री-पुरुष प्रमाण, कुटुंबनियोजन व त्याचे यशापयश, ग्रामीण क्षेत्रातील राजकीय जागरूकता, ग्रामीण संघर्ष व त्याचे परिणाम, शेतीचे वाणिज्यीकरण व त्यातील अडचणी, ग्रामीण कुटीर उद्योग-स्थिती व महत्व, स्वयंसहायता गटांची स्थिती, समस्या आणि भवितव्य, मुक्त व्यापार धोरणाचा ग्रामीण क्षेत्रावर परिणाम, ग्रामीण क्षेत्रात आधुनिकीकरण, धर्म, आस्था यात होत असलेला बदल, कुटुंब, विवाह संस्थेतील परिवर्तन, ग्रामीण क्षेत्राचे मागासलेपण- कारणे व उपाय, सहकारी शेती- अपयशाची कारणे व उपाय, ग्रामीण अर्थव्यवस्थेचे बदलते चित्र, ग्रामीण नेतृत्वाचे मूल्यमापन, ग्रामीण जीवन व जातीयता, ग्रामीण लोकजीवन व परसंस्कृती ग्रहण, पारंपरिक व वर्तमान ग्राम्य जीवनाचा तुलनात्मक अभ्यास इ. अनेक प्रश्नांवर आज स्वतंत्रपणे क्षेत्र, राज्यनिहाय संशोधनाची आवश्यकता आहे. यातून काही सामन्य तत्त्वे तर काही स्थानीय तत्त्वे लक्षात येतील व त्यानुसार क्षेत्रनिहाय ग्रामीण विकासाचे नियोजन व प्रशासन करण्यास दिशादर्शन लाभेल. श्रम, वेळ, पैसा याचा योग्य उपयोग होईल.

**शहरी समुदाय/समाज** (Urban Community/Society)

- शहरी समुदायाचा अर्थ
- शहरी समुदायाची वैशिष्टे
- शहरांचे वर्गीकरण
- भारतात शहरांच्या वाढीचा इतिहास
- शहरीकरणाच्या किंवा शहरांच्या वाढीची कारणे
- भारतात शहरीकरणातून निर्माण झालेल्या समस्या
- नगर नियोजन: आवश्यकता किंवा महत्त्व
- स्वाध्याय
- पारिभाषिक शब्दावली

**शहरी समुदाय** (Urban Society)

**शहरी किंवा नागरी समुदायाचा अर्थ:**

भारतीय समाजाचा तिसरा महत्त्वाचा भाग किंवा घटक म्हणजे नागरी समुदाय होय. औद्योगिकीकरणाने नागरीकरणाची प्रक्रिया विशेषत्वाने तीव्र झाली. परंतु औद्योगिकीकरणापूर्वी देखील भारतात शहरांचे अस्तित्व होते हे लक्षात ठेवले पाहिजे. नालंदा, तक्षशीला, पाटलीपुत्र, काशी, इन्द्रप्रस्थ, वैशाली अशी अनेक उदाहरणे देता येतील. भारतात शहरीसमुदाय ५००० वर्षा पूर्वीपासून विद्यमान आहेत. अयोध्या, द्वारका, हस्तिनापूर अशा शहरांचा उल्लेख प्राचीन साहित्यात आढळून येतो. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात नगररचनेचे उल्लेख येतात. मॅकआयव्हर व पेज म्हणतात, ''जेथे ग्रामीण समुदाय संपतो तेथून नागरी समुदाय सुरू होतो''. वर्थ यांच्या मते, ''सामाजिक विजातीयता असलेल्या व्यक्तीं सापेक्षत: मोठा, दाट तसेच स्थायी स्वरूपाचा समुदाय म्हणजे नगर होय.'' मानवाच्या समुदायाच्या विकासातील अत्यंत विकसित टप्पा म्हणजे शहरे होत. सुरवातीच्या काळात जगातील मोठी शहरे नद्यांच्या काठावर वाढली. जगातील तैग्रीस, युक्रेटिस, नाईल, सिंधू इ. नद्यांच्या शेजारी मानवी संस्कृतीचा विकास झाला. शहरी समुदायाचे प्रभावक्षेत्र वाढल्याने ग्रामीण जीवन पद्धती वेगाने बदलत आहे. शहरी समुदाय ही मानवाच्या समुदाय जीवनाची विकसित अवस्था आहे. आधुनिक काळात शहरी समुदायांची संख्या कमालीची वाढत आहे म्हणून त्यांचे महत्त्वही वाढत आहेत.

**शहरी समुदायाची वैशिष्टे (स्वरूप):**

१. **सामाजिक विविधता** (Social Heterogeneity)

२. **दुय्यम समूह** (Seceondary Group)

३. **सामाजिक गतिशीलता** (Social Mobility)

४. **ऐच्छिक मंडळाची रेलचेल** (Voluntary Association)

५. **सामाजिक सहिष्णुता** (Social Tolerance)

६. **व्यक्तिकेंद्रिकरण** (Individuation)

७. **क्षेत्रीय नियोजन** (Spatial planning)

८. **सामाजिक परिवर्तनाचा वेग** (High rate of Social change)

९. **जनसंख्येचे अधिक घनत्व** (high density of population)

१०. **उद्योगांचे केंद्रिकरण** (Centreliazation of Industries)

**सामाजिक विविधता :** शहरी समुदायात अनेक लोक बाहेरून येऊन स्थायी झालेले असतात. शहरात विकासाच्या अनेक सोयी-संधी उपलब्ध असतात. त्यामुळे येथे लोक बाहेरून येत राहतात. या प्रक्रियेलाच शहरीकरण म्हणतात. विविध धर्माचे, जातीचे, भाषेचे, सवयीचे, क्षमतेचे, पात्रतेचे, विविध राज्यांचे, विविध आवडी-निवडीचे, स्वभावाचे, खान-पानाचे, पोशाखाचे, संस्कृतीचे लोक आढळतात. अनेक बाबतीत येथे विविधता आढळते. मंदिर, मस्जीद, चर्च, गुरुद्वारा, आग्यारी, मठ अशी नाना धर्म, प्रार्थनेची केन्द्रे दिसून येतात. लोकांच्या पोशाखात, खानपानात, रितीरिवाजात, धार्मिक विधी-उपासना पद्धती, प्रार्थना पद्धती इ. मध्ये विविधता आढळते. विभिन्न जीवनशैली असलेल्या लोकांचा समावेश या समुदायात आढळून येतो. शहरी समुदायात सामाजिक बहुजीनसीपणा असतो. देशाच्या अनेक भागातून व इतर देशांतूनही लोक एखाद्या शहरात उदरनिर्वाहासाठी वास्तव्य करीत असतात.

**२. दुय्यम समूह :** शहरी समुदायात दुय्यम समूहाचे प्राबल्य असते. येथे लोक परस्परांना व्यक्तीगत स्तरावर ओळखत नाहीत. लोकांचे संबंध येथे व्यवसायानिमित्त औपचारिकरितीने येत असतात. लोक एकमेकांच्या खाजगी जीवनात विनाकारण लुडबूड करीत नाहीत. शहरातील जनजीवनात धावपळ, धडपड जास्त आढळते. संबंध वरवरचे, दिखाऊ, शिष्टाचारी व कृत्रिम स्वरूपाचे असतात. लोक एकमेकांबद्दल नेहमीच साशंक असतात. प्रत्येक व्यक्तीला आपल्या मूलभूत व अनिवार्य गरजा भागविण्यासाठी अपरिचित लोकांवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे अवलबूंन राहावे लागते. शहरी जीवनात प्रेम, आपुलकी, त्याग, सहकार्य प्रवृत्तीचे प्रमाण तुलनेने कमी असते. त्यामुळे येथे लुबाडणूक, फसवेगिरी, गुन्हेगारीचे प्रमाणही जास्त असते. येथे लोकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस, कायदे, न्यायव्यवस्था अशा दुय्यम संस्था कार्यरत असतात. नागरी समुदायाचा आकार मोठा, विजातीयता, लोकांची गर्दी, सामाजिक, धार्मिक बहुजीनसीपणा इ. वैशिष्ट्यामुळे दुय्यम समूहाचे विशेष महत्त्व दिसून येते.

**३. सामाजिक गतीशीलता :** सामाजिक गतिशीलतेचा वेग शहरात तुलनेने जास्त दिसून येतो. याचे कारण म्हणजे शहरातील व्यावसायिक भिन्नता, शिक्षण व आवश्यक सोयी-संधीची उपलब्धता होय. येथे मोठ-मोठे उद्योग, कारखाने, सरकारी कार्यालये, व्यवसाय यांची रेलचेल असते. त्यामुळे गतिशीलतेला वेग आहे. नोकरभरती जाती-धर्माच्या आधारावर न होता ज्ञान, शिक्षण, कौशल्य, क्षमता इ. गुणांवर होत असते. नागरी समुदायात अर्पित दर्जा ऐवजी अर्जितदर्जा महत्त्वाचा असतो. जातीव्यवस्थेबरोबरच शहरात वर्गव्यवस्था देखील प्रभावी असल्याचे आढळते.

**४. ऐच्छिक मंडळाची रेलचेल :** शहरी समुदाय विविधतेने व्यापलेला दिसतो. जाती, धर्म, भाषा, संस्कृती, प्रदेशसंस्कृती, खान-पान, शिक्षण, व्यवसाय, आवडी-निवडी इ.

विविध क्षेत्रांत विविधता आढळते. क्रिकेट संघ, गायन-नृत्य मंडळ, चित्रकला मंडळ, गृहनिर्माण संस्था, विविध शाखांची महाविद्यालये, महिला मंडळे, योगाभ्यास मंडळ, भगिनी मंडळ, ग्राहक मंच इ. मंडळांबरोबरच जैन मंडळ, बौद्ध मंडळ, ख्रिश्चन समिती, नारीकल्याण समिती, अशी मंडळेदेखील आढळतात. भाषेनुसारही विविध मंडळे किंवा समित्या आढळतात. उदा. हिन्दी प्रचार समिती, आंग्लभाषा विकास मंडळ, संस्कृत अभ्यास मंडळ वगैरे. छंदानुसार, गरजांनुसार, धर्मानुसार, येथे विविध मंडळांची रेलचेल दिसून येते. ऐच्छिक मंडळांची विविधता व विपुलता हेही एक शहरी समुदायाचे वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल.

**५. सामाजिक सहिष्णुता :** सामाजिक सहिष्णूता हा शहरी समुदायाचा एक गुण म्हणता येईल. येथे लोक विविधता असूनही सलोख्याने राहतात व त्यांना तसे राहणे आपल्या अस्तित्वासाठी व विकासासाठी आवश्यक असते. एकाच भागामध्ये वेगवेगळ्या प्रदेशाचे, भाषेचे लोक राहतात, आढळतात. औपचारिकतेतून हळूहळू अनौपचारिकताही वाढीस लागते. शेजारधर्माचे पालन त्याचे महत्त्व जाणून होत असते. काही बाबतीत लोकांना विशिष्ट नियमाने वागावे लागते. चौकटीत राहून वागणे शहरात सर्वांच्याच हिताचे असते. एकाच छंदाचे, गरजेचे लोक एकत्र येऊन मंडळाची स्थापना करतात. शहरी समुदायात पारंपरिक कुटुंब रचनेत व कार्यामध्ये बदल झालेले आहेत. जातीची पारंपरिकता व नियम येथे शिथिल झालेले दिसतात.

**६. व्यक्तिकेंद्रीकरण :** शहरे लोकसंख्येंनी आणि लोकसंख्येच्या घनतेने फुगलेली असतात. विविध निमित्ताने ग्रामीण क्षेत्रातून व बाहेरील प्रातांतून लोकांचा ओघ शहरांकडे दिसून येतो. शहरात लोकांची गर्दी दिसते. शहरात माणूस गर्दीत राहूनही एकटा असतो. मायेचा ओलावा येथे कमी आढळतो. लोक अनोळखी असतात. आपला म्हणून फारसा कोणी नसतो. पैसा भरपूर असूनही मानसिक तणाव राहतोच. लोक येथे आपल्यापुरताच विचार करतात. शहरातील लोक व्यवहारी असतात आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव कमी दिसून येते. शेजारधर्म, मनुष्यधर्म, मानव प्रेम इ. मूल्यांचे फारसे महत्त्व जाणत नाहीत. शहरी समुदायात लोक लोककेंद्री, समाजकेंद्री असण्यापेक्षा व्यक्तिकेंद्री जास्त आढळतात. शहरी समुदायाचे वातावरण असे असते की, व्यक्ती स्वकेंद्री किंवा आत्मकेंद्री बनत जाते. शहरात त्याच्या गावचे लोक फारसे नसतात. बहुतेक लोक परकेच असतात. त्यामुळे परस्पर विश्वासात कमतरता आढळते. नेहमी साशंकता आढळते.

**७) क्षेत्रीय नियोजन :** स्थलांतरणामुळे शहरी समुदायाचा आकार वाढतच आहे. त्यामुळे जागेची टंचाई निर्माण होते. जमिनीचे भाव गगनचंबी होऊ लागतात. सामान्य माणसाच्या ते आवाक्याबाहेरचे असते. लोक सर्व सोयीच्या दृष्टिने शहराच्या मध्यभागी राहण्याला प्राथमिकता देतात. सोयीच्या जागेसाठी मागणी जास्त असते व पुरवठा कमी असतो. परिणामत: जागेच्या किमती बेलगाम वाढतात. त्यामुळे समुदायातील विविध व्यवसाय, समूह व उद्योगधंदे यांचे शहराच्या विभिन्न भागात नियोजन होते. यालाच क्षेत्रीय नियोजन म्हणतात. वस्तिस्थानाच्या भिन्नतेबरोबरच लोकांच्या आचारविचारातील फरक स्पष्टपणे दिसून येतो. इतकेच नव्हे तर जन्म, मृत्यू, गुन्हेगारी, घटस्फोट, आत्महत्या, वेडसरपणा,

तणाव, अनैतिकता व्यभिचार, दारिद्र्य इ. प्रमाण शहरातील वस्तिस्थानाप्रमाणे बदलत जाते. शहरी समुदायातील क्षेत्रीय नियोजनावरून शहराच्या सामाजिक जीवनाची पूर्ण कल्पना येऊ शकते.

**८) सामाजिक परिवर्तनाचा वेग:** शहरी जीवनात सामाजिक परिवर्तनाचा वेग ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्राच्या तुलनेत जास्त असतो. याचे कारण म्हणजे सामाजिक परिवर्तनाचे जे विविध घटक किंवा कारणे असतात त्या सर्वांची उपलब्धता शहरी समुदायातच जास्त असते. विभिन्न संस्कृती, संपर्क, परसंस्कृत ग्रहणशीलता, तंत्रज्ञान, शिक्षणाचा विकास, आर्थिक क्षेत्रातील विविधता व रोजगाराच्या संधी, राजकारण इ. कारणांची विपुलता आणि विविधता त्याचबरोबर त्या सर्वांची सहज उपलब्धता असल्याने त्याचा प्रभाव पडणे व त्यातून बदल होणे स्वाभाविक आहे. त्यामुळेच शहरी समुदायात परिवर्तर्नाची गती अधिक दिसून येते. अशी संधी व वातावरण ग्रामीण लोकांना सहज उपलब्ध नसल्याने तेथे परिवर्तनाचा वेग मंद असतो.

**९) जनसंख्येचे अधिक घनत्व :** शहरात लोकांची आवक व त्यांचे वास्तव्य यांचे प्रमाण जास्त असल्याचे आढळते. जागा कमी व मागणी जास्त असल्याने लोक शहराच्या मध्यभागी व लगतच्या जागेत राहणेच पसंत करतात. लोकांच्या स्थलांतरणाच्या प्रमाणाबरोबर शहरातील सोयी त्याच वेगाने वाढत नाहीत. त्यामुळे सर्वत्र लोकांची गर्दीच गर्दी आढळते. शहरात म्हणूनच लोकसंख्येचे घनत्व जास्त आढळून येते. घनत्व याचा अर्थ एका कि.मी. मध्ये किती लोक राहतात हे होय. ग्रामीण व आदिवासी समुदायाच्या तुलनेत शहरात असे लोकसंख्या घनत्व दाट स्वरूपाचे असते.

**१०) उद्योगांचे केंद्रिकरण :** शहरात उद्योगांचे केंद्रिकरण झाल्याचे दिसून येते. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात शहरी विकासाकडे जास्त लक्ष केन्द्रित झाल्याने विविध प्रकारच्या सोयी शहरातच निर्माण झाल्या. विकासाचे भारतीय गांधीवादी मॉडेल न स्वीकारल्याने आज क्षेत्रीय विषमता निर्माण झाली आहे. त्यातून ग्रामीण व शहरी अशा दोन भिन्न संस्कृतींचा उदय झाला आहे व या प्रक्रियेतून अनेक प्रश्न देखील निर्माण झाले आहेत. रेल्वेच्या सोई, विमानतळे, उद्योग केन्द्रे, सरकारी कार्यालये, उच्च शिक्षणाच्या सोयी, मोठमोठे कारखाने, उद्योगकेन्द्रे इ. शहरातच केंद्रित झाली आहेत. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर, सोलापूर, नांदेड अशा शहरांत उद्योगांचे केंद्रिकरण झाल्याने शहराचा आकार वाढला. खेडी ओस पडत चालली आहे. उद्योगांचे विकेन्द्रिकरण झाले असते तर आज जी परिस्थिती निर्माण झाली आहे ती कदाचित निर्माण झाली नसती.

**शहरांचे किंवा नगरांचे वर्गीकरण:**

एम. रीमर यांनी नगरांचे वर्गीकरण खालील निकषांच्या आधारावर केले आहे.

१. संस्थाचे मुख्य स्थान

२. व्यापारिक केंद्र

३. औद्यागिक केंद्र

४. महानगरीय केंद्र

५. परावलंबी शहरे

**आर. डी. मेकेन्जी यांनी परिस्थितीच्या आधारावर खालील चार प्रकार सांगितले आहेत**

१. प्राथमिक सेवा देणारी शहरे

२. वाणिज्यिक नगरे

३. औद्यागिक नगरे

४. मिश्रित नगरे

**ई. बर्गेल यांनी प्रकार्यात्मक वैशिष्ट्यांच्या आधारे शहरांना खालील श्रेणीमध्ये विभागले आहे.**

१. आर्थिक केंद्र

२. उत्पादन केंद्र

३. औद्योगिक केंद्र

४. व्यापारिक केंद्र

५. परिवहन केंद्र

६. आर्थिक सेवा केंद्र

७. राजकीय केंद्र

८. धार्मिक केंद्र

९. धर्म-निरपेक्ष सांस्कृतिक केंद्र

१०. विश्राम केंद्र

**राईजन यांनी शहरांच्या प्रकारांचे विवेचन कार्याच्या आधारावर खालील प्रमाणे केले आहे.**

| | | |
|---|---|---|
| १. उपभोगाची नगरे | ७. | श्रमिक व कारागिरांची नगरे |
| २. उत्पादनाची नगरे | ८. | सैनिक नगरे |
| ३. मिश्रित कार्याची नगरे | ९. | स्नान नगरे |
| ४. संचय आणि वितरणाची नगरे | १०. | हवामान आणि स्वास्थ्यलाभ नगरे |
| ५. नदी आणि समुद्रतटीय नगरे | ११. | अजायबघरांची नगरे |
| ६. वित्त आणि पत नगरे | १२. | विद्यापीठांची नगरे |

**गिस्ट आणि हलबर्ट यांनी नागरी समुदायाचे सहा प्रकारांमध्ये वर्गीकरण केले आहे.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | उत्पादन केंद्रे | - | मुंबई, अहमदाबाद, लखनौ |
| २. | व्यापार केंद्रे | - | कलकत्ता, लुधियाना इ. |
| ३. | सांस्कृतिक केंद्रे | - | पुणे |
| ४. | राजकीय शहरे | - | दिल्ली, चंदिगढ |

५. थंड हवेची ठिकाणे - श्रीनगर, महाबळेश्वर

६. बहुविध व्यवसाय केंद्रे - मुंबई, मद्रास इ.

**भारतात शहरांच्या वाढीचा इतिहास:**

१९व्या शतकापर्यंत शहरात राहणाऱ्या लोकांची संख्या अगदीच मर्यादित होती. या शतकातील विकसित झालेले सर्वात मोठे शहर म्हणून प्राचीन रोमचा उल्लेख करावा लागेल. पण या काळात जगातील सर्व शहरात त्या त्या देशातील लोकसंख्येच्या सुमारे २ टक्के लोकच शहरात राहत असत. पण तरी सुद्धा युरोप, आशिया व आफ्रिका खंडातील शहरी समुदायाचा तत्कालीन समाजजीवनावर दूरगामी परिणाम झालेला होता हे नमूद केले पाहिजे. मानवी समाजात इ. सनापूर्वी ५,००० वर्षापासून शहरे अस्तित्वात असल्याचे दिसून येते. त्यांची सुर्वात भारत, इजिप्त व मेसापोटेमिया या देशात झाली. समाजाचा इतिहास शहरातच घडत असतो असे जे म्हटले जाते त्याची प्रचिती येते. डेव्हिस यांनी नमूद केल्याप्रमाणे इ.स. १८०० मध्ये जगाची २.४ टक्के लोकसंख्या शहरात राहत होती. १९०० व्या शतकात हे प्रमाण दुप्पट झाले. इ.स. १८०० ते १९५० या कालखंडात शहरातील लोकवस्ती ८ पटीने वाढल्याचे दिसून येते. इ.स. १९६० मध्ये जगातील ३/४ लोकसंख्या शहरात स्थिर झाली होती. इ.स. १९५० मध्ये जगातील ९०० शहरांत १,००,००० लोकसंख्या होती तर १९६० मध्ये शहराची संख्या १४०० होऊन शहरात राहणाऱ्या लोकांची संख्या १,००,००० हून जास्त झाली. याच वेगाने ही शहरीकरणाची प्रक्रिया वाढत गेली तर २०५० साली जगातील ४/५ लोकसंख्या शहरात राहू लागेल. भारतातही आज शहरीकरणाचा वेग वाढला आहे. आज खेड्यात नागरी जीवनपद्धती मूळ धरू लागल्याचे प्रत्ययास येते. परिणामत: शहरे व खेडी यांच्यातील विभाजन रेषा हळूहळू पुसट होत जाईल.

**भारतातील शहरीकरण :**

शहरीकरणाची प्रक्रिया भारतात नवीन नाही. भारतामध्ये तंत्रविद्या व उद्योग यांचा विकास होण्यास नुकतीच सुरुवात झाली असली तरी - भारतामध्ये प्राचीनकाली प्रसिद्ध शहरे असल्याचे पुराव उपलब्ध आहेत. चिनी प्रवासी फाहियान याने लिहिलेल्या वृतांत्तात त्याने भेट दिलेल्या प्राचीन शहरांची नावे दिली आहेत. तक्षशीला, नालंदा, पाटलीपुत्र ही विद्येची केंद्रे होती. मोहंजादडो व हडप्पा ही शहरे अत्यंत सुसंघटित होती. प्राचीन काळची शहरे मोठी व भव्य होती. पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावाने भारतात व संपूर्ण आशिया खंडात शहरीकरण झाले या विधानाला फारसा अर्थ उरत नाही. केवळ पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावाने भारतात शहरीकरणाला गती मिळाली आहे असे म्हणता येईल. अमेरिकेतील शहरी लोकवस्तीपेक्षा अधिक लोकवस्ती आशिया खंडातील शहरातून दिसून येते.

गरिबी व श्रीमंती यांच्या वस्तिस्थानाचे स्वरूप त्या काळीही परस्पर विरोधी होती. भारतीय शहरे स्वयंपूर्ण होती. आज भारताचे औदयोगिकरण जाणीवपूर्वक घडत आहे. लोकांच्या जीवनमानातही विकास होऊ लागला आहे. नागरीकरणाची प्रक्रिया भारतात आज जोमाने सुरू झालेली आहे. मुंबई, कलकत्ता, दिल्ली, बेंगलोर, चेन्नई, अहमदाबाद, पुणे, नागपूर, औरंगाबाद, भोपाळ, लखनौ, सुरत, नांदेड, चंडीगढ, लुधियाना, हैदराबाद इ. शहरे क्षेत्रफळांनी

आणि लोकसंख्येने फुगत चालली आहेत. भारतातील शहरीकरणाच्या वाढीचे आणखी एक कारण म्हणजे शहरीकरणाची वाढ ही अचानक किंवा लगेचच होत नाही. जगातील शहरांचा अभ्यास केल्यास सर्व शहरांची वाढ ही ठराविक प्रकारानेच होत असते. शहरीकरणाची सुरुवात संथ असते. औद्योगिकीकरणाच्या प्रगतीबरोबरच शहरीकरणाची प्रक्रिया वेग घेते. त्यामुळे औद्योगीकीकरणाची सुरुवात होताच शहरांची वाढ झपाट्याने होते पण कालांतराने शहराची वाढ एका निश्चित टप्प्यात आल्यानंतर शहरीकरण त्याच वेगाने घडत नाही. एखाद्या समुदायाचे संपूर्ण शहरीकरण झाल्यानंतर सुध्दा औद्योगिकीकरणाची प्रगती चालू असते. पण त्यावेळी शहरीकरणाची प्रक्रिया मंदावलेली असते. शहरीकरणाची वाढ ही आजच्या विकसित व विकसनशील जगातील अटळ वस्तुस्थिती आहे. ही वाढ सर्व देशात समान आहे असे नाही.

**शहरीकरणाच्या किंवा शहरांच्या वाढीची कारणे:**

१. स्थलांतर

२. व्यापार व उद्योगांचा विस्तार

३. औद्योगिकीकरण

४. दळणवळणाच्या साधन-सोयीत वाढ

५. शहरात विकासाच्या विविध संधी

६. लोकसंख्येतील अतिरिक्त वाढ

७. शहरांचे आकर्षण

८. सुरक्षितता

**१.स्थलांतर :** नगरांच्या किंवा शहराच्या लोकसंख्येत विलक्षण वाढ स्थलांतरामुळे घडून येत आहे. कोणत्याही समुदायाच्या लोकसंख्येचा आकडा ठरविताना जन्मदर व मृत्युदर यांच्या विचाराबरोबरच स्थलांतरणाच्या वेगाचा विचार केला पाहिजे. कारण आजच्या शहरी लोकसंख्या वाढीचे स्थलांतर हे प्रमुख कारण आहे. लोकांच्या स्थलांतराचा वेग दुसऱ्या महायुद्धानंतर कमालीचा वाढला आहे. लोक विविध कारणांनी आपले जन्मस्थान सोडून शहरात येऊ लागली आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालाप्रमाणे प्रत्येक दशकात जागातील शहरांची लोकसंख्या १०० ते २०० पटीने वाढते. एका दशकात कैरो शहराची लोकसंख्या दुप्पट झाल्याचे वृत्त आहे. भारातील शहरांच्या वाढीचे प्रमुख कारण स्थलांतर हेच आहे.

**२. व्यापार व उद्योगांचा विस्तार:** व्यापार व उद्योगांच्या विस्ताराचे शहरे ही केन्द्र झालेली आहेत. विविध प्रकारचे व्यापार, विविध उद्योग, विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी,

इ. मुळे लोक आपल्या उदरनिर्वाहासाठी शहरांकडे खेचले जात आहेत. टाटानगर, शिकागो, लिव्हरपूल, मँचेस्टर मुंबई, बेंगलोर, चेन्नई, अहमदाबाद, पुणे, नागपूर, दिल्ली, नोएडा इ. सारख्या मोठमोठ्या शहरांचा उदय झाला. इ.स. १८०० नंतर सर्व जगात शहरांच्या वाढीचे प्रमुख कारण हेच आहे.

**३. औदयोगिकीकरण :** जगात आणि भारतातही मोठमोठ्या यंत्रचलित उद्योगांचे, कारखान्यांचे केन्द्रिकरण शहरातच झाल्याने शहरांचे औद्यागीकीकरण होत गेले. कारण मोठमोठ्या उद्योगांना लागणाऱ्या विविध सोयी शहरातच उपलब्ध असल्याने शहरातच किंवा शहरांजवळ उद्योग सुरू होत गेले. परिणामत: या उद्योगांमध्ये काम करण्यासाठी मनुष्यबळाचा पुरवठा जवळपासच्या व दूरच्या गावांमधून होऊ लागला. त्यामुळे शहरांची लोकसंख्या वाढत गेली.

**४. दळणवळणाच्या साधन–सोयीत वाढ :** आज विज्ञानाच्या क्रांतीने दळणवळणाच्या क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती साध्य केली आहे. अतिशय द्रुतगतीची वाहने काही तासातच हजारो–शेकडो मैल लोकांना पोहोचवित आहेत. पक्क्या सडका, रेल्वेलाईन, विमानतळे अशी विविध परिवहनाची केन्द्रे निर्माण झाली आहेत. आवश्यकतेनुसार व क्षमतेनुसार लोक परिवहन साधने निवडू शकतात. आज या क्रांतीमुळेच केवळ देशान्तर्गतच नव्हे तर देशाबाहेरही लोक व्यवसायानिमित्त, नोकरीसाठी, शिक्षणासाठी जाऊ लागली आहेत. अर्थात राष्ट्रीय व जागतिक स्तरावर प्रवास वाढला आहे. यातून आपोआपच शहरांतील लोकसंख्या वाढत जात आहे.

**५. शहरात विकासाच्या विविध सोयी :** प्रत्येकाला आपल्या विकासाची लालसा असते. विकास करणे, तशी इच्छा बाळगणे हा मनुष्याचा स्वभाव आहे. विकासासाठीचे काही वातावरण हवे असते, ते शहरात उपलब्ध असते. कारखाने, मोठमोठ्या कंपन्या, बँका, विद्यापीठे, महाविद्यालये, कलाकेन्द्रे, शहरातच असतात. त्यामुळे लोक शहरात येण्याचा प्रयत्न करतात. आपल्या भावी पिढीचा विचार करूनही लोक गाव सोडून शहरांचा रस्ता धरतात.

**६. लोकसंख्येतील अतिरिक्त वाढ :** जेव्हा सर्व लोकांना काम मिळत नाही, राहण्याची सोय होत नाही, कुपोषणाचा सामना करावा लागतो, बेकारी वाढते तेव्हा त्या देशाची लोकसंख्या अतिरिक्त आहे असे समजले जाते. स्वातंत्र्यानंतर भारताच्या उत्पादनाच्या साधनापेक्षा लोकसंख्या वाढली. साधने व लोकसंख्ूया यांची विषमता निर्माण झाली. शेतीवर लोकसंख्येचा दाब वाढला. परिणामत: गावातील लोक आपल्या उदरनिर्वाहासाठी शहरांकडे कामधंदा मिळविण्यासाठी स्थलांतरित होत आहेत.

**७. शहरांचे आकर्षण :** शहरांमध्ये विविध प्रकारच्या सुखसोयींची उपलब्धता असते. मनोरंजनाची विविध साधने असतात उदा. सिनेमा, नाट्यगृहे, संगीत मंडळे, क्रिकेट क्लब, बाग–बगिचे, कॅसिनो अशी नानाविध साधने सांगता येतील. एकदा शहरात आलेल्या व्यक्तीचे मन येथेच रमू लागते. गाव नकोसे वाटू लागते. आपल्या जीवनाचे सार्थक शहरात राहूनच होईल असे वाटू लागते त्यामुळे व्यक्ती परत गावी जाऊन स्थायी होण्याचा विचार करीत नाही. शहराच्या झगमगाटात लोक हरवून जातात. शहरे लोकांना आपल्याकडे

आकर्षित करू लागतात. लोकांना शहरांची भुरळ पडते. त्यामुळे शहराचे आकर्षण हेही एक शहरीकरणाचे व स्थलांतरणाचे कारण म्हणून सांगता येईल.

**८. सुरक्षितता :** शहरात खेड्यांच्या तुलनेत सुरक्षिततेच्या सोयी जास्त असतात. पोलीस विभाग, न्यायव्यवस्था, अद्ययावत वैद्यकीय सोयी, मोठमोठे दवाखाने, आपात्कालीन व्यवस्था व त्यासंबंधी यंत्रणा, सैनिक छावण्या इ. विविध साधने, सोयी व व्यवस्थापनाच्या यत्रणा शहरात उपलब्ध असल्याने शहरातील लोकांची सुरक्षितता वाढते. लोक निश्चिंत मनाने राहतात. रात्री पोलिसांची गस्त असते. खाजगी गस्त घालणारे गुरखा वगैरे असतात. आपात्कालीन वाहन व्यवस्था उपलब्ध असतात. आपल्या जीवनाची व कुटुंबाच्या जीवनाची सुरक्षितता लोकांना शहरात जास्त वाटते त्यामुळे देखील लोक गाव सोडून शहरांकडे कुच करू लागली आहेत.

**भारतात शहरीकरणातून निर्माण झालेल्या समस्या :** ग्रामीण क्षेत्रापेक्षा नागरी क्षेत्रात समस्येंचे प्रमाण निश्चितच जास्त आहे. समस्यांची गुंतागुंत देखील जास्त आहे. शहरी जीवनाच्या परिणामाचे अत्यंत परखड व विदारक वर्णन काही अभ्यासकांनी आपल्या अध्ययनातून केले आहे. शहरीकरणामुळे निर्माण झालेले प्रश्न खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | निवासाची समस्या | २. | झोपडपट्टीची समस्या |
| ३. | बेरोजगारीची समस्या | ४. | प्रदूषणाची समस्या |
| ५. | अनैतिकतेची समस्या | ६. | अपघातांची समस्या |
| ७. | गुन्हेगारीची समस्या | ८. | आरोग्याची समस्या |
| ९. | मानसिक तणावाची समस्या | १०. | संस्काराची समस्या |

**१. निवासाची समस्या :** आजच्या शहरांपुढचा हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा प्रश्न आहे. गावांकडून लोकांचा शहरांकडे सतत ओघ लागल्याने शहरात जागेची टंचाई निर्माण होऊ लागली आहे. लोकांची गर्दी दिवसें-दिवस वाढत चालली आहे. जागेला मागणी जास्त व पूर्तता कमी झाल्याने जागेचे भाव आकाशाला भिडत चालले आहेत. गरिबांना व मध्यमवर्गीयांना स्वत:च्या मालकीचे घर घेणे स्वप्नासारखे झाले आहे. घरांची भाडी देखील भरपूर वाढली आहेत. जागेच्या अपुरेपणाचे सर्व तोटे येथील सामान्य लोकांना सहन करावे लागत आहेत. जागेच्या अपुरेपणाचा परिणाम कुटुंबीयांवर पडतो. भारतातील शहरात घरांचा प्रश्न अतिशय गंभीर स्वरूपाचा आहे. गरीब लोक चाळीत व झोपडपट्टीत राहतात. येथील वातावरणाचा वाईट परिणाम मुलांवर पडल्याशिवाय राहत नाही.

**२. झोपडपट्टीची समस्या :** शहरात दोन विश्व किंवा दोन जग पाहावयास मिळते. एकीकडे गगनचुंबी इमारती, पॉश बंगले तर दुसरीकडे बकाल वस्त्या, एकीकडे श्रीमंत लोक तर दुसरीकडे लाचार, गरीब हतबल झालेले लोक. शोषक व शोषित असे दोन वर्ग शहरात सरळ-सरळ दिसून येतात. श्रीमंतांची संस्कृती व गरिबांची संस्कृती अशा दोन भिन्न संस्कृती येथे नांदत असतात. झोपडपट्ट्या म्हणजे शहरांवरील कलंक आहेत. काही अभ्यासकांनी तर झोपडपट्ट्यांना शहरांचा कॅन्सर म्हटले आहे. झोपडपट्ट्यातील भौगोलिक व सामाजिक वातावरण शारीरिक व मानसिक स्वास्थ्य बिघडविणारेच आहे. गलिच्छता, सार्वजनिक

सुखसायींचा अभाव, गुन्हेगारी, अवैध धंदे, भांडण-तंटे, अनैतिकता, दारूचे अड्डे, अशा नाना प्रकारच्या समस्या येथे पाहावयास मिळतात. कलकत्ता, मुंबई, कानपूर, दिल्ली, नागपूर अशा शहरांमध्ये झोपडपट्ट्यांचा प्रश्न अतिशय गंभीर बनलेला आहे. अशीच परिस्थिती भारतातील इतर मोठ्या शहरांची देखील दिसून येते.

**३. बेरोजगारीची समस्या :** काम करायला शारीरिक-मानसिक पात्रता, योग्यता व तयारी असताना देखील योग्य काम मिळत नाही तेव्हा त्या परिस्थितीला बेरोजगारीची स्थिती म्हणता येईल. आज भारतातील मोठ्या शहरांमध्ये अनेक ठिकाणांहून बाहेरून लोक काम-धंदा, रोजगार मिळण्याच्या आशेने येत राहतात परंतु सर्वांनाच व पूर्णवेळ, नेहमीकरिता काम, नोकरी मिळतेच असे नाही. आज शहरातच अनेक क्षेत्रातील सुशिक्षित बेरोजगारांचा प्रश्न भयावह बनत चालला आहे. एका-एका जागेसाठी शेकडो अर्ज येतात. त्यावरून बेकारीच्या समस्येची भयावहता लक्षात येते.

**४. प्रदूषणाची समस्या :** सभोवतालचे वातावरण जेव्हा मनुष्याच्या आरोग्याला धोकादायक वाटते तेव्हा त्या परिस्थिला प्रदूषण म्हणता येईल. शहरांमध्ये भौतिक व सामाजिक अशा दोन्ही प्रकारचे प्रदूषण वाढत चालले आहे. भौतिक प्रदूषणात जला प्रदूषण, वायू प्रदुषण, ध्वनिप्रदूषण, यांच्या समावेश करता येईल. या प्रदूषणामुळे मनुष्याच्या आरोग्यावर विघातक परिणाम होतात. लिव्हर खराब होते, फुफ्फुसांचे रोग, डोळ्यांचे रोग, कानाच्या पडद्यांवर होणारे आघात, चर्म रोग, नपुंसकता अशा अनेक प्रकारच्या स्वास्थ्य संबंधी समस्या निर्माण होतात. सामाजिक समस्या अंतर्गत अनैतिकता, गुन्हेगारी, बालगुन्हेगारी, व्यसनाधिनता, वेश्याव्यवसाय, सांप्रदायिक दंगे, नैतिक मूल्यांची व मानवतेची पायमल्ली इ. चा समावेश होतो. या सामाजिक प्रदूषणामुळे अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात.

**५. अनैतिकतेची समस्या :** शहरातील विविधता, औपचारिकता, कोरडी व्यवसायिकता, पैशाचे महत्त्व, दिखावूपणा, स्पर्धा इ. मुळे येथे सामाजिक प्रमाणकांची व मूल्यांची जोपासना होत नाही व जोपासनेतून जीवनाची गाडी विकासाकडे नेणे कठीण होऊन बसते. शहरातील माणूस सतत धावत राहतो. धावत राहिल्यामुळेच त्याच्या जीवनाची गाडी व उद्देश पूर्ण होणार असतात. जो थांबला तो संपला अशी एकंदरीत शहरांची स्थिती झालेली आहे. पैसा द्या व काम करवून घ्या. शहरात पैसाच बोलतो. नैतिकता, प्रामाणिकता, सत्यनिष्ठा, आदर्श, इ. बाबी शहरात प्रत्यक्ष व्यवहारात उपहासाच्या ठरतात. जो तो पैसा मिळविण्यासाठी धडपडताना दिसतो. म्हणूनच शहरात बरेच अवैध धंदे चालताना दिसतात. अनेक हॉटेल्समध्ये चांगल्या वस्तीत पोलिसांनी धाडी टाकल्यानंतर गुप्तपणे चालणारे देहविक्रय व्यवसाय आपल्या अपरिचयाचे नाहीत.

**६. अपघातांची समस्या :** वाहतुकीची समस्या आज मोठ्या शहरातील एक बिकट समस्या होत चालली आहे. देशात रोज शेकडो लोक अपघाताचे बळी ठरत आहेत. रोज नवी वाहने रस्त्यावर येताहेत. त्या मानाने रस्त्याचे रुंदीकरण होत नाही. रस्त्याचे अर्थात वाहतुकीरचे नियम बऱ्याच जणांना माहीत नसतात. ज्यांना माहीत असतात ते त्या नियमांची पर्वा करीत नाहीत. वाहनांच्या गतीवर नियत्रण नाही. रोज वर्तमानपत्रातून रोड अपघातांच्या बातम्या वाचावयास मिळतात. सकाळी घरून कामावर गेलेली व्यक्ती संध्याकाळी

सुखरूप घरी पोहोचेल याची खात्री नसते. भारतातील शहरात ही समस्या दिवसेंदिवस भयावह होत आहे. हे सत्य नाकारता येत नाही.

**७. गुन्हेगारीची समस्या :** शहरातील लोकांची गर्दी, अनोळखीपणा, विविधता, व्यक्तिकेंद्री प्रवृत्ती, स्पर्धा, स्वार्थ, उपभोगतावाद, चंगळवाद, मौज-मस्तीची वाढती दुष्प्रवृत्ती या सर्व कारणांनी शहरात विविध प्रकारच्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. चोरटा व्यापार, लैंगिक गुन्हे, दारूचे अवैध धंदे, जुगार, अपहरण, लूटमार, हप्तेवसुली, महिलांच्या गळ्यातील दागिने पळविणे, बलात्कार, छेडछाड, विनयभंग, लहान मुलांना अवैध धंद्यात खेचणे, धोका देणे, हत्या अशा नाना प्रकारचे गुन्हे शहरात वाढत्या प्रमाणावर आहेत. शासनव्यवस्था, प्रशासन, न्यायव्यसस्था, समाजसुधारक इ. समोर ही नवीन आव्हाने आहेत.

**८. आरोग्याची समस्या :** शहरात सर्वत्र आरोग्याच्या सोयी उपलब्ध नाहीत. सरकारी दवाखाने नावाचीच आहेत. अद्ययावत सोयींचा येथे नेहमीच तुटवडा जाणवतो. भ्रष्टाचार, शासन-प्रशासनाची उदासीनता इ. कारणे त्यामागे दडलेली आहेत. ध्वनीप्रदूषण, जल प्रदूषण, वायु प्रदूषण यांचे असते. जल निःसारणाची चोख व्यवस्था नाही. जागोजागी कचऱ्यांचे ढीग साचल्यामुळे रोगांचा प्रादुर्भाव होऊ लागतो. शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये सोयीची वानवाच जाणवते. क्षयरोग, कर्क रोग, मलेरिया अशा रोगांचे प्रमाण शहरात जास्त वाढत चालले आहे.

**९. मानसिक ताणतणाव :** आज मानसिक तणावाची समस्या एकूणच जगात वाढली आहे. भारत त्याला अपवाद नाही. शहरातील लोकांचे जीवन बऱ्याच मोठ्या प्रमाणावर इतरांवर अवलंबून आहे. दूध, गॅस, वीज, पाणी अशा मूलभूत गरजांसाठी शहरातील माणूस इतरांवर अवलंबून आहे. गॅस सिकलंडर नाही म्हणून तणाव, फोन बिघडला म्हणून तणाव, कामवाली बाई आली नाही म्हणून तणाव, घरचे आटोपून वेळेवर ऑफिसला पोहचण्याचा तणाव, मुला-मुलींचा तणाव, असे कितीतरी तणाव सांगता येतील. शहरी माणसाचे चित्त त्यामुळे स्थिर राहत नाही. शहरात अबाल-वृद्धापर्यंत सर्वच कोणत्या ना कोणत्या तणावात जगतो आहे. संयुक्त कुटुंबाचे विघटन झाल्याने आज त्याचे दुष्परिणाम पाहावयास मिळत आहेत.

**१०. संस्काराची समस्या :** संस्कार याचा अर्थ योग्य, उत्तम प्रकारचे समाजीकरण होय. पूर्वी संयुक्त कुटुंबे असायची, मुलांवर आजोबा-आजी चांगले संस्कार करायचे. काका-काकू, आई-वडील, आजोबा-आजी, भाऊ-बहिणी, अशी नातावळी असायची. एकत्र राहिल्याने मुलांवर व एकमेकांवर नीतिमूल्यांची बंधने असायची. सुख-दुःखात वाटेकरी असायचे. आदर, सहकार्य, प्रेम, जिव्हाळा, आपलेपणा, निष्ठा, त्याग अशा मूल्यांची जोपासना व्हायची. व्यवहारात त्यांची प्रचिती यायची. परंतु आज शहरांमध्ये विभक्त कुटुंबातून ही सामाजिक-भावनिक मूल्ये लोप होत चालली आहेत. आजची पिढी आपल्या परंपरागत नीतिमूल्यांचा, संस्कृतीचा, अध्यात्माचा, मानवतावादाचा, सामाजिक बांधिलकीचा वारसाच विसरत चालले आहेत. यातून नवीन सामाजिक समस्या जन्म घेत आहेत.

**नगर-नियोजन : आवश्यकता किंवा महत्त्व**

नगरनियोजनाची आवश्यकता नागरी जीवनाच्या अनेक प्रश्नांमुळे निर्माण झाली आहे. औद्योगिकीकरणाच्या वेगाबरोबरच शहरातील अतिरिक्त लोकसंख्येचे केंद्रिकरणही वाढत आहे. आज भारतातही शहरी जीवन अनेक दृष्टीने त्रासदायक होत चालले आहे. या कटकटींपासून, हालअपेष्टांपासून, दगदगीपासून, तणावापासून, प्रदूषणापासून शहरे व शहरी जीवनाला वाचविण्यासाठी नगरनियोजनाची आवश्यकता वाढली आहे. भावी काळातील वेध घेऊन व वर्तमान स्थितीचे भान ठेवून शहरांच्या रस्त्यांचा, पाण्याच्या सोयींचा, वाहतुकीचा, जागेचा, लोकसंख्येचा विवेकपूर्ण विचार करून अशा योजना निर्माण करणे की त्यामुळे शहरांच्या समस्यांचे निराकरण केले जाऊ शकेल. या सैद्धांतिक व व्यावहारिक कृती कार्याला नगर-नियोजन म्हणता येईल.

नियमित नियोजन न करता उभारलेले कारखाने व खेड्यातील लोकांचे शहरांमध्ये होणारे अनियंत्रित स्थलांतर यामुळे शहरांत राहण्याच्या जागेची विलक्षण चणचण निर्माण झालेली आहे. यामुळे शहरांच्या सौंदर्याला काळिमा फासणाऱ्या झोपडपट्ट्यांचा जन्म झाला आहे. सेन कमिटीला असे आढळून आले की, शहरातील ६० टक्के लोक झोपडपट्ट्यांत राहतात. या वस्त्यातील एकूण वातावरणच आरोग्याला हानीकारक असते. त्यामुळे नगरनियोजनाची आवश्यकता अधिक वाटते. शहरातील अनेक समस्यांच्या निराकरणासाठी जाणीवपूर्वक नियोजन करणे, काळाची गरज झाली आहे. नगरनियोजनाची सुरवात विकसित पाश्चात्त्य देशात झाली. अमेरिका, इंग्लंड, रशिया व इतर युरोपमधील देशांमध्ये नगर-नियोजन काळजीपूर्वक केले जाते. भारतामध्ये नगरनियोजनाची सुरवात मागील दोन-तीन दशकांपासून झाली आहे.

महाराष्ट्राने विद्यमान प्रादेशिक व नगररचना अधिनियम करून शहराच्या वाढत्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व भौगोलिक समस्यांचा विचार केला आहे. शहरी जीवनाच्या समस्या शहरी जीवनापुरत्याच मर्यादित न राहता शहराभोवतालच्या परिसरातही या समस्यांची झळ पोहोचत आहे. म्हणून प्रादेशिक योजनांची आखणी मुंबई व पुणे शहरासाठी केली आहे. कोल्हापूर, नागपूर, नाशिक या शहरांच्या प्रादेशिक योजनांची कामे झाली आहेत. सांगली व औरंगाबाद शहरांमध्ये देखील या संदर्भात काम केले गेले आहे. मुंबई महानगर व प्रादेशिक विकास प्राधिकरण ही स्वतंत्र यंत्रणा कायदा करून स्थापन केलेली आहे. महानगरपालिका, नगरपालिका यांनाही या संदर्भात कार्य करण्यासाठी प्रेरणा दिली जात आहे.

## **भारतातील आदिवासी समाज** (Tribal Society in India)

- आदिवासी समुदायाचा अर्थ
- आदिवासी समुदायाची वैशिष्ट्ये
- भारतातील आदिवासी
- आदिवासी समुदायातील धर्म आणि जादू
- आदिवासींच्या समस्या
- आदिवासी समुदायातील संरचनात्मक बदल

## जनजाती किंवा आदिवासी समुदाय (tribal Society)

**आदिवासी समुदायाचा अर्थ :** डॉ. रिव्हर्सच्या मतानुसार ''आदिवासी समुदाय हा एक सजातीय गट असून त्याचे सर्व सभासद सामान्य बोली भाषा बोलतात, तसेच युद्ध व इतर उद्देशपूर्तीसाठी परस्परांना सहकार्य करतात.'' १९६२ साली शिलाँग येथे भरलेल्या परिषदेने आदिवासी समुदायाची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. ''आदिवासी समुदाय असा एक सजातीय गट असतो की, ज्यातील सभासद एक भाषा किंवा बोली बोलतात. त्यांचा सामान्य वंश असतो. सर्व लोक एका विशिष्ट भूभागावर राहतात, त्यांचे जीन तांत्रिक क्षेत्रात मागासलेले असते. हा समुदाय प्राधान्याने निरक्षर असून, त्यात नातेसंबंधांसवर आधारित सामाजिक व राजकीय प्रथांचे पालत करण्याची प्रवृत्ती असते.'' भारतातील डोंगरदऱ्यात जवळपास ४२७ जमाती वसलेल्या आहेत. १९९१ च्या जनगणनेप्रमाणे एकूण लोकसंख्येशी त्यांचे प्रमाण ८.८ टक्के आहे. आदिवासींना ग्रीगसन, ठक्कारबाप्पा यांनी मूळचे रहिवासी म्हटले आहे. हटट्नने आदिमजमाती तर डॉ. घुर्ये यांनी मागासलेले हिन्दू म्हटले आहे. भारताच्या राज्यघटनेने त्यांना 'अनुसुचित जमाती' असे म्हटले आहे. आदिवासी लोकसंख्या सर्वात जास्त मध्यप्रदेशात असून त्यांनतर ओरिसा, बिहार या प्रदेशांचा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात १९८१ च्या जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या ५७ लाखांपेक्षा जास्त होती. भारतीय घटनेच्या ३४१ आणि ३४२ कलमाप्रमाणे अनुसूचित जमातींची नोंद करण्यात आली आहे. घटनेतील या कलमाप्रमाणे नोंदविण्यात आलेल्या वन्यजातींना अनुसूचित जमाती असे म्हणतात. वनात राहणारे म्हणून 'वन्यजाती', 'गिरीजन' असेही त्यांना म्हणण्यात येते. डॉ. मुजुमदार म्हणतात ''आदिवासी समुदाय म्हणजे नातेदारीने संबंधित असललेल्या अनेक कुटुंबाचा समुदाय होय की ज्याचे एक सामान्य नाव आणि समान भाषा असते. हा समुदाय एका विशिष्ट भूभागावर वसलेला असतो. तसेच या समुदायातील सभासद विवाह व व्यवसायाबाबत समान नियमांचे पालन करतात.'' शामाचरण दुबे लिहितात की भारतीय संदर्भात जनजातीची निश्चित आणि सर्वमान्य समाधानकारक व्याख्या देता येत नाही. त्यांनी यासंदर्भात काही सूचकांचे वर्णन केले आहे. ज्याच्या आधारावर जनजातीय लोकांना भारताच्या इतर लोकांपासून वेगळे दर्शविले जाऊ शकते. हे सूचक पुढीलप्रमाणे आहेत.

१) आदिवासी भारतात राहणारे प्राचीन निवासी आहेत. म्हणूनच विशिष्ट क्षेत्रात त्यांची पाळेमुळे फार जुनी आहेत.

२) घनदाट जंगलात आणि पहाडांमध्ये तुलनात्मकरित्या आपले पृथक जीवन जगतात. अर्थात आज काही आदिवासींचे असे पृथकत्व संपुष्टात आले आहे. परंतु आजही अधिकांश लोक एकूण लोकसंख्येपासून पृथकच आढळतात.

३) आदिवासींचे ऐतिहासिक ज्ञान वरवरचे आहे. पाच-सहा पिढ्यांपेक्षा जास्तीची माहिती किंवा इतिहास पौराणिक कथांच्या रूपात मौखिक रूपाने त्यांना माहीत आहे किंवा स्मरणात आहे.

४) तंत्रविकास आणि आर्थिक विकासात ते निम्नस्तरावरच दिसतात.

५) आपली संस्कृती, भाषा, राहणीमान, श्रद्धा-अंधश्रद्धा, खान-पान, रीतिरिवाज, संस्था,

विश्वास, प्रथा इ. आधारावर ते इतर समाजापासून स्पष्टपणे वेगळे जाणवतात.

डॉ. दुबे यांनी म्हटले आहे की वरील सूचक परिपूर्ण नाहीत. परंतु यांचा कमी-जास्त प्रमाणात संयोग त्यांच्या जनजातीयपणाला स्पष्ट करतात.

**आदिवासी समुदायाची वैशिष्ट्ये :**

१) सामान्य भूप्रदेश (common territory)

२) विशिष्ट नाव (particular name)

३) सामान्य भाषा (common language)

४) नातेदारी (kinship)

५) कुटुंबाचा समुच्चय (collection of families)

६) विशेषीकरणाचा अभाव (lack of specialisation)

७) मागासलेली अर्थव्यवस्था (backward economy)

८) लिखित साहित्याचा अभाव (absence of written literature)

९) अंतर्विवाह पद्धती (Endogamous nature)

१०) वांशिकदृष्ट्या सजातीय (Racialu homogeneous)

११) आदिवासी पंचायत (Tribal panchayat)

१२) धर्म आणि जादूचा प्रभाव (Impact of religion and magic)

१३) परिवर्तनाची मंदगती (slow process of change)

१४) अनौपचारिक संघटन (formal organisation)

**सामान्य किंवा विशिष्ट भूप्रदेश :** कोणताही समुदाय म्हटला की त्याला एका भूप्रदेशाची आवश्यकता असते. अनेक वर्षापासून एका विशिष्ट भूप्रदेशावर पिढी-दर-पिढी सातत्याने निवास करणाऱ्या लोकांमध्ये एक विशिष्ट संस्कृतीचा जन्म होतो. त्यात तेथील भौगोलिक-नैसर्गिक वातावरणाचा व हवामानाचा प्रभाव देखील कारणीभूत असतो. आदिवासींचा समुदाय देखील प्रामुख्याने विशिष्ट जंगली प्रदेशात-दऱ्याखोऱ्यात राहत आला आहे. त्या भूप्रदेशाविषयी तेथील लोकंच्या मनात आदर, श्रद्धा, आपलेपणा व अभिमान निर्माण होतो व यातून एका विशिष्ट समुदाय भावनेचा जन्म होतो. उदा. कोरकू हे अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागात केंद्रित झालेले आहेत. लोडा जमात ही निलगिरी टेकड्यांवर वसलेली आहे. हे लोक इतर ठिकाणी गेले तरी मूळ भूभागाच्या आत्मीयतेने विचार करतात.

**२) विशिष्ट नाव:** जगातील आदिवासी त्यांच्या कोणत्या ना कोणत्या विशिष्ट नावाने ओळखला जातो. उदा. गोंड आदिवासी, भिल्ल, कोरकू, वारली, चेंचू वगैरे नावाने त्या समुदायांचा उल्लेख होतो. त्यांची स्वत:ची बोलीभाषा आढळते. आदिवासींची गावे देखील विशिष्ट नावाने ओळखली जातात. परिचयासाठी व आपली ओळख दर्शविण्यासाठी नावाचे महत्त्व असते. गावाच्या नावाचा एक इतिहास असतो. तेथील भूभाग, टेकड्या, नद्या, वनस्पती, प्राणी-पक्षी यांना आदिवासी आपल्या बोली भाषेतून नाव देऊन ओळखतात. उदा. गारो टेकड्यांच्या परिसरात राहणारे 'गारो आदिवासी' म्हणून ओळखले जातात.

**३) सामान्य भाषा:** विचारांची, भावनांची, व्यवहाराची देवाण-घेवाण करण्यासाठी भाषा महत्त्वाचे माध्यम आहे. आदिवासी समुदायांची देखील विशिष्ट भाषा आढळते. त्यांचे सर्व व्यवहार त्यांच्या बोलीभाषेत होत असतात. उदा. गोंड आदिवासीची बोलीभाषा 'गोंडी' म्हणून ओळखली जाते. तसेच कोरकूच्या भाषेला कोरकू, बंजाराच्या भाषेत बंजारी अशी स्वतंत्र नावे आहेत. त्या भाषेतच त्यांच्या दंतकथा, गाणी आढळतात. काही आदिवासी समुदायांना अनेक उप-समूहात विभागले आहे. अशा उप वन्यजातींची भाषा किंवा बोली वेगवेगळी असते. उदा. नागा वन्यजातीत आओनागा, 'अन्गामी नागा', रेन्गामा नागाफ यांची स्वतंत्र भाषा व साहित्य आहे. आदिवासींच्या बोलीभाषेला लिपी नाही. आता मिशनऱ्यांनी रोमन लिपीचा व भारतीय सुधारकांनी देवनागरी लिपींचा अवलंब केला आहे. थोडक्यात म्हणजे प्रत्येक आदिवासी समुदायाची स्वतंत्र बोलीभाषा असल्याचे आढळते.

**४) नातेदारी :** बऱ्याच आदिवासी जमातीची विभागणी अनेक पोटजमातींत होते. उदा. कोळी ही जमात महादेव कोळी, सोत कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी इत्यादी जेव्हा ही जमात एकाच भूभागावर वसलेली असते तेव्हा त्यांच्यात आप्तसंबंध म्हणजेच नातेदारी दृढ असतात. मेडलंबामच्या मतानुसार, पक्के भारत हे आदिवासींचे मुख्य वैशिष्ट्य असते. आप्तसंबंध किंवा नातेदारीत रक्ताने व विवाहाने संबंधित सदस्यांचा समावेश होतो. नातेसंबधात कुठल्या नात्याला कोणत्या शब्दाने (नावाने) संबोधायचे हेही स्पष्ट दिसते. कुणाशी आदराचे, तर कुणाशी बरोबरीचे, कुणाशी गांभीर्याचे, शिष्टाचाराचे तर कुणाशी थट्टेचे नाते असते.

**५) कुटुंबाचा समुच्चय :** आदिवासी समुदायात अनेक कुटुंबांचा एक समुच्चय आढळतो किंवा तो समुदायच मुळात कुटुंबाचा एक समुच्चय असतो. बाहेरील व्यक्ती किंवा कुटुंब या समुदायात सहसा आढळत नाही. आदिवासी समुदायाला प्रादेशिक सामाजिक समूह म्हणतात. तसेच हे समुदाय अनेक कुटुंबे मिळून बनलेले असतात. ही कुटुंबे लहान-लहान क्षेत्रीय समुदायात (उदा. तांडा, पोड, पाडा, गाव) विभागलेली असतात. कुटुंबामध्ये नातेदारीचा बंध (ज्ञळपीहळि िंळशी) असतो आणि या समुदायातील कुटुंबांमध्ये परस्पर संबंध आणि परस्परावलबंन आढळते.

**६) विशेषीकरणाचा अभाव :** आधुनिक समाजात ज्याप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात विशेषीकरण आढळून येते त्या प्रकारचे व त्या पद्धतीचे विशेषीकरण आदिवासी समुदायात आढळत नाही. कारण आदिवासी समाज हा पृथकपणे जंगलात, दऱ्याखोऱ्यात राहत आलेला आहे. हा एक लहान गट आहे व त्याच्या गरजादेखील फारच मर्यादित आहेत. मोठ्या प्रमाणात तो निसर्गावरच अवलंबून राहिलेला आहे. अनेक व विविध कामे एकच व्यक्ती पूर्ण करताना दिसतो. उदा. गुरे पाळणे, शेती करणे, घर बांधणे, औषधपाणी करणे इ. सर्व कामे तेच करतात. विशिष्ट काम करणारे किंवा विशेष व्यक्ती येथे फारसे आढळत नाही. आधुनिक समाजात ज्या प्रमाणे प्रत्येक क्षेत्रात विशेषज्ञ आढळतात तसे विशेषीकरण आदिवासी समाजात आढळत नाही.

**७) मागासलेली अर्थव्यवस्था :** माणसाला जगण्यासाठी काही भौतिक वस्तूंची आवश्यकता भासते. मनुष्य गरजा असलेल्या वस्तूंची आपसात देवाण-घेवाण करतात. उत्पादन, विनिमय, नफा, तोटा इ. बाबीच्या व्यवस्थेला अर्थव्यवस्था म्हणतात. आदिवासी अनेक

बाबतीत मागासलेले आढळतात. जे आदिवासी शेती करतात ती अतिशय मागासलेली पद्धती आहे. या पद्धतीमागे त्यांचे अज्ञान, अंधश्रध्दा दडलेल्या आहेत. मुद्रा विनिमयाची थोडीबहुत ओळख हल्ली व्हायला लागली आहे. गरजेपुरते उत्पादन हेच त्यांचे ध्येय असायचे. शेतीचे आधुनिकीकरण व व्यापारीकरण आजही फारसे झालेले नाही. वस्तुविनिमय आजही बऱ्याच आदिवासी समुदायात प्रचलित आहे. आजही भारतातील आदिवासी आर्थिक दृष्टीने मागासलेलेच आहेत. गरिबी, दारिद्र्य, कुपोषण, शोषण, कर्जबाजारीपणा आदी समस्यांना ते आजही तोंड देत आहेत.

**८) लिखीत साहित्याचा अभाव :** आदिवासींच्या भाषेला व बोली भाषेला लिपीच जोड न मिळाल्याने आधुनिक समाजाप्रमाणे त्यांचे साहित्य लिखित स्वरूपात आढळत नाही. दुसरे म्हणजे निरक्षरता, अज्ञान, शिक्षणापासून वंचित, पृथक जीवन इ. कारणांमुळे त्यांचे ज्ञान, कला, कथा, काव्य, गाणी इ. शब्दबद्ध स्वरूपात उपलब्ध नाही. पिढी दर पिढी मौखिक स्वरूपात व स्मरणशक्तीच्या भरवशावर त्यांचे साहित्य चालत आलेले आहे. बाहेरील काही अभ्यासक आता आदिवासींचे साहित्य आधुनिक व आपापल्या परिचित लिपीत शब्दबद्ध करू लागले आहेत.

**९) अंतर्विवाह पद्धती :** अंतर्विवाह याचा अर्थ आपल्याच गोटात, समूहात किंवा जमातीत विवाह करणे होय. आदिवासी समुदायात वर-वधूची निवड करताना अनेक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात येते. विवाहात आदिवासी आणि उप-आदिवासी अंतर्विवाह नियम लक्षात घेतात. जसे आओनागा हे अन्गामी नागांसोबत विवाह संबंध जोडणार नाहीत, तसेच कातकरी, कोळी आपल्याच जमातीत विवाह करतात. अंतर्विवाहासंबंधी असलेले नियम मोडणाऱ्यास दंड करण्यात येतो. जमातीत आणि विशेषत: पोटजमातीत वर-वधूंची निवड 'आतल्या-आतर्फ' केली जाते. त्यासाठी वेगवेगळे निकष लक्षात घेतले जातात. मात्र कुल बहिर्विवाह, कुलचिन्ह बहिर्विवाहावर भर देण्यात येतो.

**१०) वांशिकदृष्ट्या सजातीय :** वंशाचा संबंध शारीरिक लक्षणाशी कुलाशी असतो. एकाच व एक समान लक्षणांनाच सजातीयता म्हणतात. जमात विशिष्ट वंशाची असते. एका भू-भागावर राहणाऱ्या अनेक जमाती एका वंशाच्या असू शकतात उदा. उत्तरपूर्व भारतातील नागा, मिझो या जमाती मंगोलॉइड, वंशाच्या आहेत. दक्षिण भारतातील तोडा, कोटा, इसला जमाती द्रवेडियन वंशाच्या आहेत. त्याचबरोबर एकाच भू-क्षेत्रात अनेक वंशाच्या जमाती सुद्धा आढळतात. आदिवासी समुदायाचे स्वरूप सजातीय असते. या समुदायातील लोकसंख्येत भिन्न धर्म, पंथ, वंशाचा समावेश सहसा आढळत नाही. सर्वांचा वंश एकच असतो.

**११) आदिवासी पंचायत :** आदिवासी समुदायात सामाजिक, आर्थिक, नैतिक नियंत्रण व न्यायनिवाडा करण्यासाठी त्यांची स्वत:ची खाजगी, अनौपचारिक जमात पंचायत असते. या पंचायतीत साधारणत: काही अनुभवी, वृद्ध लोक असतात. अन्य लोक त्यांचा आदर करतात. प्रत्येक गावात, पाड्यात किंवा तांड्यात एक पंचायत असते. पाच सदस्यांवरून कदाचित पंचायत शब्द रूढ झाला असावा. गावातील भांडण-तंटे सोडविणे, घटस्फोटाबाबत निर्णय घेणे, नियंत्रण व संरक्षण करणे, कार्यक्रम ठरविणे अशा विविध कार्याची जबाबदारी

पंचायत पूर्ण करीत असते. आदिवासींमध्ये राजकीय संघटन प्राथमिक स्वरूपाचे होते. काही जमातीत राजेशाही होती. उदा. गोंड, महादेव कोळी इत्यादी अन्य जमातीत पंचायतच मुख्य असते. उदा. कोलाम, कोरकू. पंचायतीच्या प्रमुखाला मुखिया, नाईक, चौधरी, प्रधान इ. नावाने ओळखले जाते.

**१२) धर्म आणि जादूचा प्रभाव :** धर्म आणि जादूचा संबंध अलौकिक शक्तीशी जोडला गेला आहे. दोन्ही शक्तीपुढे मनुष्य आदरयुक्त भीतीपोटी शरण जातो. ज्या शक्तींवर मनुष्यातला नियंत्रण करता येत नाही अशी ईश्वरीय शक्ती म्हणजे धर्म व ज्या शक्तीवर काहींना स्व-प्रयत्नाने (मंत्र-तंत्र, सिद्धी इ.) नियंत्रण केले जाते, त्याला जादू म्हणतात. या दोन्ही शक्तींचा प्रभाव आदिवासींच्या रोजच्या जीवनावर झालेला आढळतो. नवस-सायास, उपास-तापास, प्राण्यांचा बळी, शक्ती प्राप्तीसाठी, इच्छित इंगित प्राप्तीसाठी आदिवासी आजही वरील दोन्ही शक्तींचा उपयोग करताना, श्रद्धा ठेवताना आढळतो. मांत्रिक-तांत्रिकांचा प्रभाव या जमातीत आजही कायम आहे. दुर्खिमने आदिवासीच्या धर्माला 'कुलचिन्ह धर्म' म्हटले आहे.

**१३) परिवर्तनाची मंदगती :** परिवर्तन जसा निसर्गाचा नियम आहे तसाच तो समाजाचाही नियम आहे. प्रत्येक मानवी समाजात परिवर्तनाची प्रक्रिया दिसून येते. फरक केवळ एवढाच आहे, की हे परिवर्तन काही समजात गतिमान असते तर काही समाजात परिवर्तनाची गती मंद असते. उदा. आधुनिक समाजात (भौतिक-सामाजिक दृष्टीने विकसित) परिवर्तनाची गती तीव्र असते तर मागासलेल्या समाजात ही गती मंद आढळते. या मंद प्रवृत्तीमागे अज्ञान, पृथकता, अंधविश्वास, परंपराप्रियता, नावीन्याच्या विरोधाची वृत्ती, जुने ते सोने मानण्याची हटवादी मानसिकता, अलगतावाद, इ. कारणे असू शकतात. अदिवासी समुदायात वरील बाबींचा प्रभाव प्रामुख्याने दिसून येतो. त्यामुळे या समुदायात परिवर्तनाची गती मंद आढळते. ही गती सापेक्ष व तुलनात्मक दृष्टीने समजून घेणे आवश्यक असते.

**१४) अनौपचारिक संघटन :** आदिवासींचे जीवन एकूणच साधे व सजातीय स्वरूपाचे आढळते. हा एक लहान प्राथमिक गट आहे. छोटा आकार आहे. यातील प्रत्येक सदस्य एक-दुसऱ्याला प्रत्यक्ष नावाने व व्यक्तीगत स्वरूपात साधारणत: जन्मापासूनच किंवा लहानपणापासूनच जाणतात-ओळखतात. व्यवहारात किचकटपणा किंवा जटिलता आढळत नाही. कायद्यांची भरमार नसते. शिष्टाचार, दिखावूपणा, कृत्रिमता नसते. आधुनिक समाजाप्रमाणे विविध मंडळे नसतात. औपचारिक संघटन येथे आढळत नाही. जे आहे ते सरळ, साधे व उघड-उघड असते. बनावटपणा नसतो. 'हम सब एक है' ची भावना प्रभावी असते. म्हणूनच आदिवासींच्या समूहाला अनौपचारिक संघटना म्हटले गेले आहे.

**भारतातील आदिवासी :**

भारतातील आदिवासी जनता भौगोलिकदृष्ट्या तीन भागात वर्गीकृत झाल्याची दिसते. उत्तरपूर्व भागात नागा, मिझो, गारो, कुफी, खासी वगैरे वन्यजाती पसरलेल्या आहेत. मध्य भारतात कोरकू, कोलाम, कोळी, भिल्ल, गोंड, बैगा, संथाल, वारली, कातकरी इ. वन्यजाती राहतात. दक्षिण भारतात तोडा, कोटा, बडगा, कादर, चेंचू इ. आदिवासींचा समावेश होतो.

भाषेच्या आधारावर वर्गीकरण करावयाचे झाल्यास तीन समूहात त्यांना विभागता येईल. १) द्रवेडियन भाषा समूहात गोंडी, कर्दु, कुरूख, भाषी आदिवासी २) ऑस्ट्रिक भाषा समूहात संथाली, मुंडारी, हो, खरीमा, कोरकू भाषिक आदिवासी येतात. ३) चिनी-तिबेटी भाषा समूहात नागा, बोंडो, लेपचा इ. भाषिक आदिवासींचा समावेश होतो.

वंशाच्या आधारावर वर्गीकरण करावयाचे असल्यास डॉ. गुहा यांच्या मतानुसार, भारतीय लोकसंख्येत सहा वांशिक गटांचा समावेश होतो. हे आदिवासी समुदाय निग्रीटो, प्रोटो-ऑस्ट्रोलाइड आणि मंगोलॉईड वंशाचे आहेत. तसेच नागा, मिझो हे मंगोलॉइड वंशाचे आहेत, तर गोंड, बैगा, भिल्ल हे प्रोटो-ऑस्ट्रोलॉइड वंशाचे आहेत आणि लोडा, कादर यांना निग्रीटो वंशाचे मानले जाते.

एम.के. बोस यांनी आदिवासींना तीन आर्थिक गटात विभागले आहे. जसे १) शिकार, मासेमारी, फळफळावळे गोळा करणाऱ्या जमाती. उदा. कादर, इरूला २) स्थानांतरित शेती करणारे आदिवासी. उदा. गोंड, बैगा, हो इत्यादी. ३) स्थायी शेती करणारे आदिवासी. उदा. संथाल, भिल्ल, कोरकू इ.

**रॉय बर्मन यांनी आदिवासी समुदायांना पाच क्षेत्रात विभागले आहे.**

**१) उत्तर-पूर्व भारत- आसाम, अरुणाचल, नागालँड, मणिपूर, त्रिपुरा.**

**२) हिमालय क्षेत्र उत्तर-पश्चिम भारत-उत्तर प्रदेशातील पर्वतीय क्षेत्र, हिमालय प्रदेश**

**३) मध्य व पूर्व भारत - पश्चिम बंगाल, बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश**

**४) दक्षिण भारत - तामिळनाडू, केरळ, कर्नाटक**

**५) पश्चिम भारत - राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र**

**-आदिवासी समुदायातील धर्म आणि जादू :**

अलौकिक शक्तीवरील विश्वासाचे, श्रद्धेचे, आस्थेचे नाव धर्म आहे. धर्म ही संकल्पना सार्वभौमिक स्वरूपाची आहे. देश, संस्कृतीपरत्वे धर्माचे स्वरूप भिन्न-भिन्न आहेत. पूजा-पाठ, होम-हवन, यज्ञ, प्रार्थना, पवित्र-अपवित्रतेच्या कल्पना, श्रद्धायुक्त भीती, उपवास, नवस-सायास, विविध कर्मकांड, तत्त्वज्ञान, सगुण-साकार, निर्गुण निराकार भक्ती, पवित्र ग्रंथ, श्रद्धास्थाने, प्रार्थनास्थळे इ. चा समावेश धर्माच्या बाह्य स्वरूपात होतो. एडवर्ड टायलरने दिव्य भक्तीवरील विश्वासाचा समावेश धर्मात केला आहे. आदिवासी समाजातील धर्माची उत्पत्ती हा निरंतर चिंतनाचा विषय राहिला आहे.

टायलरने आत्मवादाचा/जीववादाचा सिद्धांत मांडून धर्माच्या उत्पत्तीचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला आहे. आदिवासी लोक आत्म्यावर विश्वास ठेवतात. त्यांचा असा विश्वास आहे की, सर्व मानवी व नैसर्गिक व्यवहारांवर नियंत्रण व दिशादर्शन आत्म्याद्वारे होत असते. ते आत्म्याला अविनाशी मानतात. आत्म्यांची देखील एक श्रेणी असते असा विश्वास व समज आदिवासींमध्ये आढळतो. हे लोक दोन प्रकारच्या आत्म्यावर विश्वास ठेवतात. एक म्हणजे शरीरात्मा व दुसरा म्हणजे स्वतंत्र किंवा मुक्त आत्मा होय. यावरून या लोकांमध्ये मनुष्याचा मृत्यू झाल्यावर दोन प्रकारचे दहन संस्कारही आढळतात. एक म्हणजे

कच्चा दहन संस्कार व दुसरा पक्का दहनसंस्कार. देवतांच्या आणि पूर्वजांच्या आत्म्यावरील श्रद्धा प्रकट करण्यासाठी जी पूजा-आराधना केली जाते त्यातूनच धर्माची उत्पत्ती झाली असावी. आवाजाचा प्रतिध्वनी, सावली, स्वप्ने हे सर्व आत्म्याचे क्रियाकलाप असतात, असे हे लोक मानतात. मुक्त आत्मा सतत मुक्तपणे सर्व ठिकाणी प्रवास करीत असतो. त्याची गती तीव्र असते. हा आत्मा शरीराबाहेर पडला तरी शरीर मृत होत नाही. मनुष्याला केवळ झोप येते. या उलट शरीरात्मा बाहरे पडत नाही व एकादा तो शरीराबाहेर पडला की परत येत नाही. तेव्हा शरीराला मृत्यू होतो असे मानतात. हे आत्मे दिव्यप्राणी बनतात. त्यातून देवता, प्रेतात्मा, भूत असे वेगवेगळ्या आत्म्यांची रूपे प्रत्ययास येतात.

धर्माच्या उत्पत्तीबाबत चेतनावादाचा किंवा मानावादाचा सिद्धांत मॅरेट, कोडरिंगटन यांनी मांडला. या सिद्धांताला बोंगावाद देखील म्हणतात. जीवित सत्तावाद असेही या सिद्धांताला नाव आहे. या सिद्धांतानुसार विश्वाच्या प्रत्येक वस्तूत चेतनातत्त्व विद्यमान असते हे चेतनतत्व म्हणजेच दैवी व दिव्य शक्ती होय. या चेतना शक्तीला मलेशियातील आदिवासी 'माना' म्हणतात. बिहार प्रदेशील 'हो' आदिवासी या चेतनशक्तीला 'बोंगा' म्हणतात. इतर काही आदिवासी या चेतनशक्तीला आपापल्या बोलीभाषेत विविध नावांनी संबोधतात. ही चेतनामय शक्ती सर्वत्र म्हणजे जळी-स्थळी-काष्ठी विद्यमान असते. ही शक्ती श्रेष्ठ व पवित्र असते. या शक्तीमुळेच वस्तूत चैतन्य निर्माण होते. या शक्तीला प्रसन्न करण्यासाठी आदिवासी लोक विविध मार्गाचे अनुसरण करतात. या आराधनेतून धर्माची उत्पत्ती झाली असावी असा अभ्यासकांनी कयास बांधलेला दिसून येतो. या तनशक्तीशी संलग्न विश्वास व्यवस्थेचा समावेश धर्मात होतो. अर्थात सर्व जगताला-विश्वाला व्यापणाऱ्या अलौकिक शक्तीवरील विश्वासातून धर्माची उत्पत्ती झाली असावी.

धर्माच्या उत्पत्तीबाबत मॅक्समूलर नावाच्या जर्मन संशोधकाने निसर्गवादाचा सिद्धांत रचला. या सिद्धांतात त्याने धर्माची उत्पत्ती कशी झाली याचे विवेचन केले आहे. आदिम मानवाचे जीवन निसर्गाशी जुडलेले असते. निसर्गावरच त्याचे जीवन अवलंबून असते. निसर्गात अनेक बदल-घटना घडत असतात. उदा. विजांचा कडकडाट, पाऊस, ऊन, वारा, सूर्य, चंद्र, ग्रहतारे, भूकंप, ज्वालामुखी म्हटले आहे. या शक्तीपुढे मानवाचे काही चालत नाही. या शक्तीमुळेच आपण जिवंत आहोत. या शक्तीच्या उपकारक व अपकारक शक्तीपुढे मनुष्य नतमस्तक झाला. समर्पण केले. या शक्तीला प्रसन्न करण्यासाठी त्याने निसर्गाची पूजा करावयास सुरवात केली. पुढे या आराधनेतूनच धर्म नावाच्या संकल्पनेची व संस्थेची उत्पत्ती झाली असावी असे टायलरचे मत आहे. या सिद्धांताप्रमाणेच मॅमीनॉस्की, रॅडक्लिफ ब्राऊन यांनी प्रकार्यवादी सिद्धांत मांडला.

**जादूची संकल्पना :**

जादू ही अशी अलौकिक शक्ती आहे ज्यावर मनुष्याला विशेष श्रमाने, कष्टाने व सावधगिरीने नियंत्रण करणे शक्य असते. सर्वांनाच असे करणे शक्य नसते. या शक्तीवर नियंत्रण करणाऱ्या

व्यक्तीला जादूगार किंवा तांत्रिक-मांत्रिक म्हणतात. आदिवासींचा आजही मोठ्या प्रमाणावर जादूवर विश्वास दिसून येतो. जादूने यांचे जीवन प्रभावित असल्याचे देखील दिसून येते. याला ते जादूसेना म्हणतात. तांत्रिक-मांत्रिकांचा प्रभाव या सामाजावर जाणवतो. अलौकिक शक्तीला अंकित करून त्या शक्तीचा आपल्या हेतूप्रमाणे उपयोग करणे म्हणजे जादू होय. जादूद्वारा चांगले-वाईट, शुभ-अशुभ काम केले जाते.जादूच्या या विधायक व अविधायक उपयोगामुळे जादूचे दोन प्रकार मानले जातात. ही जादू जेव्हा विधायक कामासाठी उपयोगात आणली जाते तेव्हा तिला पांढरी जादू/श्वेत जादू म्हणतात. उदा. रोग बरा करणे, भूतबाधेचे निवारण करणे वगैरे. जेव्हा जादू वाईट उद्देशाने-इतरांचे अहित करण्यासाठी वापरली जाते तेव्हा तीला काळी जादू म्हणतात. उदा. आजारी करणे, मूठ मारणे, वस्तू नष्ट करणे वगैरे. आदिवासी लोक अशा दोन्ही प्रकारच्या जादूवर विश्वास ठेवतात. जे शिकू लागले आहेत त्यांचा अशा गोष्टींवरचा विश्वास कमी होत आहे. मॅमीनॉस्कीने जादूचे संवर्धक, संरक्षक आणि विनाशक असे तीन प्रकार केले आहेत. जादूमध्ये मंत्र,तंत्र, भौतिक पदार्थ, काळ, वेळ, पद्धतीतील क्रम आणि भावनात्मक, अभिनिवेशात्मक अभिव्यक्ती प्रकट होते. जादू जाणणाऱ्या जाणकाराला वेगवेगळ्या आदिवासींमध्ये वेगवेगळी नावे आहेत. वारली, कातकरी जमातीत त्याला 'भगत' म्हणतात. कोरकू जमातीत त्याला 'भूमक' म्हणतात. मांत्रीकाला 'शामन' म्हणतात. या जाणकारांचे किंवा तज्ञांचे आदिवासी जमातीत विशेष महत्त्व आढळून येते.

## आदिवासींच्या समस्या :

**आदिवासींच्या समस्यांना प्रामुख्याने तीन भागात विभागता येईल.**

| अ) | ब) | क) |
|---|---|---|
| **आर्थिक समस्या** | **सामाजिक सांस्कृतिक समस्या** | **आरोग्य विषयक समस्या** |
| १) स्थानांतरीत व मागासलेली शेती पद्धती | १) युवागृहांचा ऱ्हास | १) कुपोषणाची समस्या |
| २) कर्जबाजारीपणा | २) धर्मांतरण | २) आधुनिक वैदयकीय सल्ला-सोईंचा अभाव |
| ३) मुद्रा विनिमयाचे अपूर्ण ज्ञान | ३) प्राचीन सामाजिक संघटनेचा ऱ्हास | ३) गुप्त रोगांची लागण |
| ४) आर्थिक शोषण | ४) भाषा विषयक समस्या | ४) मलेरिया, न्यूमोनिया सारखे आजार |
| ५) बैठ बिकारी | ५) लोक कल्याणाचा ऱ्हास | ५) चर्म रोगांचे आजार |
| ६) बेरोजगारी | ६) कन्यामूल्यांची प्रथा | ६) व्यसनाधिनता |
| ७) कमालीचे दारिद्र्य | ७) स्थलांतर | ७) आरोग्य विषयक अज्ञान |
| ८) निवासाची योग्य व्यवस्था नसणे | ८) शिक्षणाचा अभाव व योग्य सोयी नसणे | ८) घरगुती औषधांचाच वापर |
| ९) दुर्गम निवासस्थान | ९) अंधविश्वास व परंपरा प्रियता | |
| १०) इतर जोडधंदा नसणे | | |

१. आदिवासी स्थानांतरीत शेती करायचे. त्यामुळे त्यांचे भटके जीवन आहे. ही

शेतीपद्धती फारच मागासलेली होती. वर्षभर पुरेल एवढेदेखील उत्पन्न अशा शेतीतून मिळत नव्हते. हे लोक अंधविश्वासामुळे शेती नांगरून करण्याऐवजी खोदून करायचे. आधुनिक पद्धतीने शेती करण्याच्या ज्ञानाचा व साधनांचा अभाव आजही दिसून येतो.

२. बहुतांश आदिवासी सावकारांच्या, जमीनदारांच्या, मालकांच्या, बँकेच्या कर्जात फसलेले आढळतात. कर्जबाजारीपणा जणू काही त्यांच्या पाचवीलाच पुजलेला आहे. कर्जापोटी या अशिक्षित, अडाणी आदिवासींना आपल्या जमिनी, गुरे-ढोरे, भांडी वगैरे स्थायी-अस्थायी किंवा चल-अचल संपत्ती गमवावी लागत आहे. अज्ञानापायी त्यांची फसवणूक केली जाते.

३. आधुनिक समाजाच्या संपर्कात आता आदिवासी येऊ लागले आहेत. जंगलावर शासनाने नियंत्रण केल्याने पोटासाठी त्यांना जंगल सोडून गावे, शहरे यांचा आश्रय घ्यावा लागत आहे. आधुनिक सामाजात आर्थिक व्यवहाराचे माध्यम मुद्रेने चालतात. अज्ञानामुळे मुद्रेचे (नोटा,पैसा इ.) ज्ञान नसल्याने लोक त्यांची फसवणूक व शोषण करतात.

४. आर्थिक शोषण ही एक मोठी समस्या आहे. शहरातील गावातील चालाक, धूर्त लोक त्यांचे आर्थिक शोषण करतात. दलाल आपली दलाली हडपतात. ठेकेदार कमी मतुरीत जास्त काम करवून घेतात. वर्षभर काम मिळेल याची खात्री नसते. इतरांशी फारशी ओळख नसल्याने यांना काम धंदा दलालांमार्फत मिळवावा लागतो. गावा-शहरातील सावकार, दुकानदार यांचा माल कमी किमतीत व त्यांची अडवणूक करून घेतात. जागोजागी हा आदिवासी नागवला जातो.

५. वेठबिगारी म्हणून आदिवासींना आजही अनेक ठिकाणी वेठबिगार म्हणून राबविले जाते. शासनाने वेठबिगारीविरूद्ध कायदा केला आहे. परंतु प्रच्छन्न रूपात आजही काही आदिवासी या समस्येतून पूर्णपणे सुटलेला नाही. कर्जापोटी पिढी-दर-पिढी सावकारांकडे, जमीनदारांकडे निमूटपणे देईल त्यात काम करण्याची व करवून घेण्याची वेठबिगारी ही एक अनिष्ट प्रथा आहे.

६. बेरोजगारीची नवीन समस्या आदिवासींपुढे नव्याने उभी राहिली आहे. जंगल सुटत गेले. शेती गमावली म्हणून मोलमजुरी करणे भाग पडत चालले आहे. काही आदिवासी इतरांच्या शेतावर शेतमजूर म्हणून कामे करतात. शेतीवर हंगामातच काम मिळते. शिक्षण नसल्याने इतर कामे करता येत नाहीत. अशा परिस्थितीत पर्षातून सहा महिने बेकार राहावे लागते. इतर जोडधंदा नसतो. अर्थात बेरोजगारीची समस्या त्यांच्या समोरील फार मोठे आव्हान आहे.

७. कमालीचे दारिद्र्य आज जवळपास सर्वच आदिवासी क्षेत्र-समुदायात दिसून येते. जंगलावर सरकारचा ताबा, मालकीची शेती नसणे, जोडधंदा नसणे, भांडवल नसणे, ज्ञान नसणे, बेरोजगारी, अंधविश्वास अशी अनेक कारणे आदिवासींच्या दारिद्र्याला कारणीभूत असल्याची दिसून येतात.

८. निवासाची व्यवस्था ही मनुष्याची एक प्राथमिक गरज आहे. थंडी, ऊन, पाऊस, इतर श्वापदे यांचेपासून संरक्षण इ. साठी घराची योग्य व्यवस्थादेखील आढळत नाही.

लाकूडफाटाच्या, गवताच्या, मातीच्या लहानशा झोपड्यांमध्ये या आदिवासी कुटुंबांना राहावे लागते. प्रत्येक मोसमाचा मारा सहन करावा लागतो. 'आलीया भोगाशी असावे सादर' या म्हणीप्रमाणे त्यांना सतत नशिबाशी व परिस्थितीशी समझोता करत नाइलाजास्तव जगावे लागते.

९. दुर्गम ठिकाणी निवासस्थान ही समस्येतील एक समस्या आहे. दुर्गम ठिकाणी वस्ती असल्याने त्या ठिकाणी सुखसायी नसतात व तेथे सोईपुरविणे साधनाअभावी शासनाला शक्य होत नाही. पावसाळ्यात नद्यांना पूर, चिखल, घनदाट जंगल असल्याने या वस्तींचा इतर गावांशी संपर्क तुटतो. दळण-वळण बंद असते. त्यामुळे आहे त्या परिस्थितीत दिवस काढण्याशिवाय पर्यायच नसतो.

१०. इतर जोडधंदा नसणे ही परिस्थिती आदिवासींच्या समस्येत भर टाकण्यास कारणीभूत ठरते. धंदा किंवा व्यवसाय ही कल्पनाच या समाजात आजच्या सारखी नव्हती. केवळ उदरनिर्वाह व तेही जंगलावर, निसर्गावर होते. धंद्याचे ज्ञान नाही, भांडवल नाही, शिक्षण-प्रशिक्षण नाही, व्यापारी वृत्ती नाही त्यामुळे मिळकतीचे साधन नाही. या परिस्थितीने त्यांच्या गरिबीत, दारिद्र्ययात व हालआपेष्टामध्ये वाढच होत आहे.

११. युवागृह आदिवासी समुदायातील एक शिक्षण-प्रशिक्षण संस्थाच होती. ते एक मनोरंजनाचे उत्तम केंद्र होते. युवकांची ती एक चांगली संघटना होती. परंतु आधुनिक समाजाच्या संपर्कामुळे या युवागृहाचे पतन होत गेले. पूर्वीची गरिमा लोप पावली. याला बाजारू स्वरूप प्राप्त झाले. युवागृह नामशेष होत आहेत परंतु त्या जागी नवीन दुसरी कुठली संस्था मात्र निर्माण झाली नाही.

१२. धर्मांतण ही प्रवृत्ती आदिवासींच्या समस्या कमी करण्याऐवजी समस्या वाढवीत असल्याचे दिसून येत आहे. आपला मूळ धर्म आपल्याला धीर देत असतो. मानसिक पाठबळ पुरवीत असतो. त्यातून आपली अस्मिता व परिचय व्यक्त होत असते. परंतु धर्मान्तरणामुळे आहे ते सुटले व नवीन अपुरे पडले. यातून मानसिक खच्चीकरण होत आहे.

१३. प्राचीन किंवा परंपरागत संघटनेचा ऱ्हास. आदिवासींची वस्ती जंगलात, दऱ्याखोऱ्यात एकांतपणे वसलेली होती. आकार लहान असल्याने लोकांमध्ये परस्पर सहकार्य, त्याग, शेजारधर्म या मूल्यांची जोपासना होइ; परंतु आज 'पोटासाठी दाही दिशा' या न्यायाने त्यांना इतरत्र फिरावे लागत आहे. शिवाय धर्मांतर केल्याने एकाच मूळच्या आदिवासींमध्ये विभीन्न नवधर्मगट पडत चालले आहेत. नवीन पिढीला आपल्या परंपरेचा, मूल्यांचा, भाषेचा विसर पडत चालला आहे. अशा अनेक कारणांमुळे त्यांच्या मूळ परंपरागत संघटनेला खीळ बसत आहे.

१४. शहरात, गावात आलेली आदिवासींची नवी पिढी नव्या वातावरणात तयार होत आहे. शहरात, गावात त्यांची बोलीभाषा बोलणारे कुणीही नसते. संवादासाठी त्यांना नव्या क्षेत्रातील भाषा अवगत करावी लागते. यांच्या नवीन पिढीला त्यांची मातृभाषा फारशी येत नाही. कारण त्यांच्या सभोवताली त्यांची मातृभाषा बोलणारे नसतात. मातृभाषेचा विसर व नवीन भाषेत पूर्णत्व नसल्याने भाषा विषमता समस्येला त्यांना

तोंड द्यावे लागते. आदिवासींची मूळ मातृभाषा अशा प्रकारे संपुष्टात येत असल्याने हा एक सांस्कृतिक ऱ्हासच म्हणावा लागेल.

१५. मनोरंजनासाठी आदिवासी आपली गाणी, वाद्य, यंत्र इ. चा वापर करीत. त्यांची स्वत:ची अशी नृत्ये, कला इ. होत्या. परंतु नवीन वातावरणामुळे त्यांचा हा सांस्कृतिक वारसा घटत चालला आहे. नवीन पिढी नव्या मनोरंजन साधनांचा वापर करू लागली आहे. उदा. रेडिओ, टी.व्ही. सिनेमा, वगैरे नवीन वाद्यतंत्र वगैरे. त्यामुळे आदिवासींना मूळ परंपरागत कला-संस्कृतीचा विसर पडू लागला आहे. आदिवासींच्या कला-संस्कृतीचे जतन व्हावे म्हणून शासन प्रयत्नशील आहे.

१६. कन्यामूल्याची प्रथा पूर्वी आदिवासी समुदायात नव्हती. परंतु आधुनिक समाजाच्या विशेषत: हिन्दू समाजाच्या संपर्कात आल्याने पर-संस्कृतीग्रहण व संस्कृतीकरणच्या प्रभावाने संदर्भसमूह मानून काही बाबींचा प्रभाव त्यांचेवर पडला आहे. कन्यामूल्याची प्रथा (वधू मूल्य/हुंडा) निर्माण झाली.

१७. स्थलांतरणाच्या प्रक्रियेने आदिवासी समुदायातही पूर्वीच्या तुलनेत वेग घेतला आहे. भूक नेईल तेथे भटकंती या न्यायाने हे लोक आपले गाव सोडून इतरत्र जाऊ लागले आहेत. त्यामुळे नवीन ठिकाणी ते स्वत:ला परके समजू लागले आहेत. नव्या वातावरणाशी समायोजन करताना त्यांची बरीच त्रेधा उडते. अनेक नव्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. म्हणून मूळचे सुटले व नवीन कमी पडले अशा त्रिशंकू परिस्थितीत ते स्वत:ला एकटे व असुरक्षित समजू लागले आहेत.

१८. आजही आदिवासी क्षेत्रात शिक्षणाचा व तत्सम सोयींचा बराच अभाव जाणवतो. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने 'सर्वांसाठी शिक्षण' नारा दिला असलों तरी आवश्यक ती पाऊले उचलली नाहीत. ज्या ठिकाणी शाळा आहे तेथे पावसाळ्यात योग्य रस्त्याच्या अभावी पोहोचता येत नाही. शासनाने काही ठिकाणी आश्रमशाळा उघडल्या आहेत, परंतु आवश्यक सुखसोयींचा अभाव आहे. भ्रष्टाचाराने कल्याणकारी प्रयोग यशस्वी होऊ दिले नाहीत. शिक्षकांचा तुटवडा आहे. शाळेसाठी योग्य इमारती नाहीत. ग्रंथालयाचा अभाव आजही जाणवतो. मध्यस्थ-दलाल, नेते, अधिकारी मध्यलामधे शासनाकडून मिळालेला निधी हडपतात. कुंपणच शेत खायला लागले तर त्यांनी न्यायासाठी कुठे व कुणाकडे जायचे?

१९. अंधविश्वास व परंपराप्रियता यामुळे काही समस्या आदिवासींनी स्वत: होऊन निर्माण केल्या आहेत. कालसापेक्ष जो राहतो त्याचाच विकास होतो. जे परंपरेला चिकटून असतात ते विकास प्रवाहाच्या बाजूला फेकले जातात. अज्ञान, निरक्षरता, अंधविश्वास यामुळे आदिवासी जीवनात समस्या त्यांच्या पिच्छा सोडत नाहीत असे आढळते. नवस, सायास, मंत्रतंत्र, बळीप्रथा, भूत-प्रेत, आत्म्याची शांती अशा निरर्थक कामात पैसा खर्च होतो.

२०. भारतातील आदिवासी आजही मोठ्या प्रमाणात जंगलात, डोंगरात, शेतात निवास करताना आढळतो. गरिबी, बेकारी, कर्जबाजारीपणा, परंपरागत जुनाट शेती पद्धती यामुळे त्यांची आर्थिक स्थिती खालावत आहे. यामुळे पोटभर व वर्षभर रोज पोषक

आहार मिळत नाही. सकाळी जेवण मिळाले तर रात्री जेवण मिळेलच याची खात्री नसते. याचा एकूण परिणाम त्यांच्या कुपोषणावर होतो. अनेक ठिकाणी कुपाषणामुळे मुले दगावलीत व दगावत आहेत याची आकडेवारी वर्तमानपत्रातून आपण वाचतच असतो. कुपोषणाची भयावह समस्या आजही कायम आहे.

२१. आदिवासी क्षेत्रात आजही योग्य सुखसोयींचा अभाव आहे. डॉक्टर आदिवासी क्षेत्रात जाण्यास तयार होत नाहीत. विशेषप्रसंगी तातडीची आरोग्य सेवा मिळत नाही. दवाखाने नाहीत. आदिवासींच्या प्रत्येक गावी तातडीने पोहोचण्यासाठी रस्ते नाहीत, फिरते दवाखाने पावसाळ्यात आवश्यक ठिकाणी पोहचू शकत नाहीत.

२२. अज्ञान, निरक्षरता, मार्गदर्शनाचा अभाव, पैशाची टंचाई, संकोच इ. कारणांनी काही आदिवासी गुप्तरोगांवर उपचार घेऊ शकत नाहीत. शहरी क्षेत्रात कामासाठी एक-एकटे आलेले पुरुष शहरातील वेश्यांच्या मोहात पडतात. योग्य ती काळजी घ्यावयाचे ज्ञान नसते. त्यामुळे गुप्तरोगांना बळी पडतात. गावी पत्नीबरोबर संपर्क आल्याने हा रोग वस्तीमध्येही पसरतो. या व्यतिरिक्त आदिवासी स्त्रिया क्षुल्लक लाभासाठी शहरी पुरुषांच्या भूलथापांना बळी पडतात. त्यांच्या भोळेपणाचा, अज्ञानाचा व गरिबीचा फायदा घेऊन त्यांना वेश्याव्यवसायात गोवले जाते. तेथे त्या गुप्तरोगास बळी पडतात, रुग्ण होतात.

२३. शरीराची, आरोग्याची, स्वच्छतेची, निरोगी राहण्याची कशी काळजी घ्यावी, त्यासाठी काय करावे, या बाबतीत आजही येथे मागासलेपणाच आढळतो. राहत्या जागीच गायी-म्हशी व इतर जनावरे राहतात. सांडपाणी निःसारणाची सोय नसते. अशा वातावरणात मलेरियासारखे आजार सहज जडतात, अंगावरचे कपडे ओले झाल्यास बरेचदा अंगावरच ठेवतात व कामे करतात त्यामुळे न्यूमोनियासारख्या आजाराला बळी पडतात.

२४. कपड्यांची निगा कशी राखावी, शरीर स्वच्छ कसे ठेवावे याचे अज्ञान व पैशाचा अभाव या दोन्ही गोष्टींचा अनिष्ट परिणाम त्यांचेवर होतो. कपडे वरचेवर नीट न धुतल्याने चर्मरोगांना बळी पडतात. या संदर्भात जागरूकता निर्माण होऊ लागली आहे. पण त्याची गती मात्र बरीच मंद आहे.

२५. दारू पिण्याचे प्रमाण व प्रथा आदिवासी जीवनाचे भयावह सत्य आहे. आदिवासींच्या जवळपास सर्वच कार्यक्रमात दारूचे सेवन आढळते. आज लोक शहरातील भट्ट्यांमध्ये तयार झालेली दारू पिऊ लागले आहेत. याचा विघातक परिणाम त्यांच्या आरोग्यावर दिसून येत आहे. अनेक कुटुंबे दारूपायी उद्ध्वस्त होत आहेत. विषारी दारू पिण्याने अनेक लोक मृत्युमुखी पडले, काही अंध झाले अशा विदारक बातम्या वर्तमानपत्रातून आपण वाचतच असतो. ही व्यसनाधीनता कुटुंबाचे, त्यांचे स्वतःचे शारीरिक, आर्थिक व सामाजिक आरोग्य उद्ध्वस्त करीत आहे.

२६. आजार झाल्यास त्यावर योग्य उपचार वेळीच केला पाहिजे. हे माहीत नसते, माहित असले तरी तशी सोय नसते, सोय असली तर पैसा नाही, पैसा आहे तर विश्वास नाही अशा विचित्र चक्रव्यूहात हे लोक सापडलेले आढळतात. परिणाम म्हणून मृत्यूचा

स्वीकार हेच सत्य ठरते.

२७. डॉक्टरांचा सल्ला, आधुनिक औषधे, त्याचे ज्ञान, त्याविषयीची जागरूकता यांचा अभाव यामुळे आजारांवर व रोगांवर खाजगी औषधांचा वापर केला जातो. त्याचे परिणाम माहीत नसतात. रोगाचे अचूक निदान फारसे होत नाही. त्यामुळे रोग बरा होईलच याची शाश्वती नसते. आधुनिक औषधाप्रमाणे ही खाजगी, घरगुती औषधे प्रयोगशाळेतून सिद्ध झालेली नसतात.

**आदिवासी समुदायातील संरचनात्मक बदल आणि परिवर्तन :**

शासनाचे जंगलविषयक कायदे, औद्यागिकीकरण, नागरीकरण, दळण-वळणाच्या साधनांचा विकास, शिक्षणाचा प्रचार-प्रसार, समान संधी, शासनाच्या लोककल्याणकारी योजना, आदिवासींच्या विकासासाठी विशेष प्रयत्न, सामाजिक चळवळी, आदिवासी कल्याण कार्यक्रम, विशेष नेतृत्व अशा अनेक घटकांचा किंवा कारणांचा संयुक्त परिणाम म्हणजे आज भारतातील आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, जीवनात बदल होऊ लागले आहेत. या बदलाचा किंवा परिवर्तनाचा थोडक्यात परिचय करून घेता येईल.

**१. सामाजिक परिवर्तन किंवा बदल :** आदिवासीच्या विवाहसंस्थेत अर्थात विवाह संबंधाबाबत परिवर्तन दिसून येत आहेत. बहुपत्नी विवाहास कायद्याने बंदी घातल्याने ही बहुपत्नीत्वाची प्रथा संपुष्टात आली आहे. एक विवाहाचे प्रमाण वाढू लागले आहे. वधू मूल्यांचा रिवाज होता. आता आदिवासीतील शिकलेले, सरकारी नोकरी करणारी मुले हुंडा मागू लागली आहेत. वधूमूल्याऐवजी आता वरमूल्य डोके वर काढत आहे. अपहरण विवाह, हट्टविवाह आता प्रतीकस्वरूपच उरले आहेत. वर-वधू प्राप्त करण्याच्या पद्धतीत बदल झाले आहेत. हिन्दूकरण झालेल्या जमातीत विवाहाला संस्कार मानले जाते. ख्रिश्चन धर्म स्वीकारणाऱ्या जमातीत विवाह चर्चमध्ये संपन्न होतो. शिक्षणामुळे वर-वधूंची निवड व विवाहाचे वय यात बदल झाला आहे. युवागृहे संपुष्टात येत आहेत. आदिवासी लोक धर्मान्तरणामुळे विभिन्न धर्मात विभागले आहेत. जादूचा प्रभाव व त्याबद्दलच्या दृष्टिकोनात बदल होत आहे. आजारासाठी डॉक्टरकडे जाऊ लागले आहेत.

**२) तंत्र क्षेत्रात परिवर्तन :** वन्य जीवनापासून परावृत्त होऊन औद्योगिक क्षेत्रात व विविध उत्पादन क्षेत्रात काम मिळवू लागले आहेत. औद्योगिकीकरणामुळे परंपरागत व्यवसायात बदल दिसून येत आहेत. खाणींमध्ये, चहाच्या मळ्यात, पोलाद कारखान्यात वगैरे क्षेत्रात मजुरी करू लागले आहेत. शेती काही प्रमाणात नवीन पद्धतीने करू लागले आहेत. शहरात, गावात येऊन राहणारे आदिवासी विजेचा, गॅसचा वापर करणे शिकू लागले आहेत. त्यांच्या घरात नवीन भौतिक वस्तूंनी प्रवेश केला आहे. राहणीमानात बदल दिसून येऊ लागला आहे. काही संपन्न होत असलेले आदिवासी मोबाईल, टी.व्ही. चा उपयोग करू लागले आहेत. सायकल, मोटारसायकल, घड्याळ अशा आधुनिक साधनांचा वापर करताना आढळू लागले आहेत. या सर्वांची गती मंद आहे परंतु सुरवात झालेली आहे असे चित्र दिसू लागले आहे.

**३) शैक्षणिक जागरूकता वाढत आहे. :** भारत सरकारने शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली आहेत. शिक्षण घेता यावे म्हणून आदिवासींसाठी काही विशेष सोयींचा व साधनांचा पुरवठा केला जात आहे. शाळा-कॉलेजात प्रवेशासाठी, सरकारी नोकऱ्यांची संधी मिळावी म्हणून आरक्षणाची तरतूदही केली आहे. आदिवासींच्या दुर्गम क्षेत्रात आश्रमशाळेची व्यवस्था केली आहे. या सर्व उपाय योजनांचा लाभ आदिवासी घेऊ लागले आहेत. शिक्षणाशिवाय विकास होणे कठीण आहे याची समज येऊ लागली आहे. मुलीदेखील शिकू लागल्या आहेत. परंतु आजही या संदर्भात क्रांती दिसत नाही. असे असले तरी भविष्यात या संदर्भात क्रांती दिसून यायला वेळ लागणार नाही असे चित्र स्पष्ट होऊ लागले आहे. आदिवासींमधूनच यासाठी नेतृत्व निर्माण होऊ लागले आहे असे दिसत. ही एक सकारात्मक परिवर्तनाची नांदी आहे असे म्हटल्यास ते गैर ठरणार नाही.

**४) आर्थिक परिवर्तन :** परंपरागत शेती, परंपरागत अन्य उदरनिर्वाहाची साधने, परंपरागत वस्तुविनिमयाची पद्धती, गरजेपुरते उत्पादन इ. बाबात परिवर्तन होत असल्याचे आढळते. मुद्राविनिमयाचा शिरकाव त्यांच्या जीवनात झालेला आहे. स्थानांतरित शेतीऐवजी स्थायी शेती, बाजारासाठी उत्पादन, नव्या पद्धतीने शेती, सहकार क्षेत्रात सहभाग याचे उपयोजन आदिवासी करू लागले आहेत. नवीन बी-बियाणे, रासायनिक खतांचा वापर वाढला आहे. लोकांचे उत्पन्न वाढले आहे. सहकारी संस्थांच्या विकासामुळे शोषणाला बऱ्या प्रमाणात आळा बसला आहे. छोट्या-मोठ्या गृहउद्योगांचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली जात आहे. त्यासाठी लागणाऱ्या भांडवलासाठी शासनाकडून आर्थिक मदत दिली जात आहे. पूर्वीच्या तुलनेत त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊ लागली आहे.

**५) धार्मिक क्षेत्रात परिवर्तन :** गरिबी, लाचारी, बेकारी, अज्ञान, निराशा इ. कारणांनी हतबल झालेल्या आदिवासींनी सुखी जीवनाच्या आशेवर धर्मांतरण केले आहे. काहींनी ख्रिश्चन, काहींनी हिन्दू, काहींनी इस्लाम धर्माचा तर काहींनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आदिवासी विविध धर्मात विभागला गेला. त्यामुळे त्यांची पूजा-अर्चा, श्रद्धा यात बदल झाला आहे. त्या-त्या धर्माचा अंगीकार केल्याने त्या धर्माच्या शिकवणुकींचा प्रभावही पडत चालला आहे. त्यांचे परंपरागत देवदेवता, सणसमारंभ, उत्सव, विश्वास प्रभावित झाले आहेत. जादूचा प्रभाव घटत चालला आहे.

**६) राजकीय संदर्भातील परिवर्तन :** आदिवासी समाजात आजही त्यांच्या परंपरागत जमात पंचायतीचे महत्त्व कायम आहे. परंतु त्याचबरोबर लोकशाही पद्धतीतील त्यांचा सहभाग व जागरूकता वाढत आहे. प्रचार-प्रसार माध्यमांनी व स्थानिय नेता मोठ्या निवडणुकींला उभे राहत आहेत. कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षांशी ते जोडले जात आहेत. आपल्या मागण्या समूह शक्तीने मांडत आहेत. मतदानाचा हक्क बजावित आहेत. राजकीय प्रवाहाची ओळख व जाण त्यांच्यातही वाढत आहे. आपल्या न्यायासाठी कोर्टाची मदत देखील घेत आहेत.

## स्वाध्याय

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) आदिवासी कुणाला म्हणायचे? आदिवासी समुदायाचे स्वरूप विशद करा.

२) आदिवासी समुदायातील धर्माची संकल्पना समजावून सांगा

३) भारतातील आदिवासींच्या समस्यांवर प्रकाश टाका.

४) भारतातील आदिवासींच्या जीवनात कोणते बदल होत आहेत. ते स्पष्ट करा.

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) भारतात आदिवासींचे चित्र

२) जादूची संकल्पना

३) आदिवासींमधील होत असलेले आर्थिक परिवर्तन

...................................................................................

...................................................................................

४)  शिक्षण आणि परिवर्तन यांचा सहसंबंध

...................................................................................

...................................................................................

...................................................................................

## शब्दावली

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Tribal | - | आदिवासी | impact | - | प्रभाव |
| Society | - | समाज | effect | - | परिणाम |
| Community | - | समुदाय | concept | - | संकल्पना |
| Structure | - | संरचना | dormitory | - | युवा गृह |
| Change | - | परिवर्तन | health | - | आरोग्य |
| Problem | - | समस्या | Bounded Labour | - | बंधुआ मजूर |
| Religion | - | धर्म | unemployment | - | बेरोजगार |
| Magic | - | जादू | Need | - | गरज, आवश्यकता |
| Common | - | सामान्य | Collection | - | समुच्चय |
| Territory | - | भू–प्रदेश | Exchange | - | विनिमय |
| Kinship | - | नातेदारी | Indogamy | - | अंतर्विवाह |
| Language | - | भाषा | Exogamy | - | बहिर्विवाह |
| Backward | - | मागासलेले | Race | - | वंश |
| Family | - | कुटुंब | Group | - | समूह |
| Marriage | - | विवाह | Primary | - | प्राथमिक |
| Economy | - | अर्थव्यवस्था | Institution | - | संस्था |
| Absence | - | अनुपस्थिती | Health | - | आरोग्य |
| Written | - | लिखित | Region | - | क्षेत्र |
| Literature | - | साहित्य | Organisation | - | संघटन |
| Slow | - | मंद | Specialisation | - | विशेषीकरण |
| Process | - | प्रक्रिया | Informal | - | अनौपचारिक |
| Formal | - | औपचारिक | | | |

# जनसंवादाचे समाजशास्त्र आणि
# सामाजिक परिस्थितीकी
## (Sociology of Mass Communication and Social Ecology)

- **प्रस्तावना**
- **संदेश वहनाचा अर्थ**
- **संदेश वहनाची वैशिष्ट्ये**
- **जनसंवादाचे काही प्रारूप**
- **सामाजिक परिस्थितीकी**
- **स्वाध्याय**
- **पारिभाषिक शब्दार्थ**

**प्रस्तावना :**

आजच्या जागतिकीकरणाच्या, औद्योगिकीकरणाच्या, ज्ञानाचा स्फोट झालेल्या, विज्ञानाच्या युगात लोकांचे परस्पर संबंध औपचारिकरित्या विस्तारत आहेत. सामाजिक विनिमयाचे क्षेत्र दिवसेंदिवस मोठे होत चालले आहे. दळणवळणाच्या अत्याधुनिक व जलदगती साधनांनी जगालाचा एक गाव करून टाकले आहे. आज जगातील इतर देशांशी आपले व आपल्यांशी त्यांचे विविध क्षेत्रात (सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक) संबंध वाढत आहेत. हे वाढते सामाजिक विनिमय आमचे ज्ञान क्षेत्रदेखील वाढवित आहे. आज आपल्याला आपला विकास साधावयाचा असेल, टिकून राहावयाचे असेल तर स्पर्धेत उतरावे लागणार आहे. विज्ञानाचा अंगीकार करावा लागणार आहे. तंत्रज्ञान व तत्सम इतर क्षेत्रात शिरकाव करून हे ज्ञान आत्मसात करावे लागणार आहे. रेडिओ, दूरदर्शन, इंटरनेट, ई-मेल, फॅक्स्, टेलिफोन, वायरलेस, मोबाईल, वर्तमानपत्रे अशी नाना प्रकारची सम्प्रेषण किंवा जनसंवादाची साधने विकसित झालेली आहेत. आज मनुष्य परावलंबी होत चालला आहे. विशेषीकरणाचे हे युग आहे. ज्ञानाचा विस्तार व सखोलता यांचा व्याप एका-एका क्षेत्रात इतका अधिक वाढला आहे की सर्व क्षेत्रातील ज्ञान आत्मसात करणे व्यक्तीच्या आवाक्या बाहेरचे आह. एकाच ज्ञानशाखेतही विविध उपशाखा ज्ञानाच्या स्फोटामुळे व जनसंपर्क वृद्धीमुळे निर्माण झाल्या आहेत. आज संदेशवहनाच्या साधनात केवळ विविध पद्धतीने वाढच झाली नाही तर विकासही झपाट्याने होत चालला आहे. इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात, तंत्रात व साधनात झपाट्याने बदल व विकास होत असल्याचे आपल्या अनुभवास येत आहे. आज मास मीडिया मूळ मास कम्युनिकेशन

वाढीवर आहे. मास कम्युनिकेशन (जनसंवाद) ने जगाला एकत्रित, जवळच आणले नाही तर ज्ञानाची, संस्कृतीची देवाण-घेवाण वाढली आहे. या सामाजिक-सांस्कृतिक विनिमय क्षेत्राच्या विस्तारामुळे, गतीमुळे एक मिश्र संस्कृती निर्माण होत आहे. जिचे स्वरूप औपचारिक जरी असले तरी तिचा प्रभाव मात्र वाढला आहे, हे स्वीकारावे लागणार आहे. नवीन उपलब्ध ज्ञान सामान्य जनेतपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. नवीन ज्ञान जाणून घेणे ही आजच्या काळाची गरज आहे.

## **संदेशवहनाचा अर्थ** (Meaning of Communication)

अनेक समाजशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ आणि मानसशास्त्रज्ज्ञांनी आपापल्या विषयाच्या अनुषंगाने संदेशवहनाच्या विविध व्याख्या केल्या आहेत. डॉ. जे.पी. लिगन्स् यांच्या मतानुसार, ''संदेशवहन ही अशी एक प्रक्रिया आहे, ज्यामध्ये दोन किंवा अधिक व्यक्ती आपल्या कल्पना, वस्तुस्थिती, भावना किंवा समजुतीची अशा रीतीने परस्पर अदलाबदल करतात की, ज्यामुळे प्रत्येकाला संदेशाची एकसारखी जाणीव होते.'' श्री. हॉवलंड यांच्या मते, ''संदेशवहन ही अशी एक क्रिया आहे की ज्यामध्ये एक व्यक्ती संदेशवाहक, दुसऱ्या व्यक्तीचे संदेश ग्राहक-वर्तन सुधारणाकरिता उत्तेजना देत असते.''

गिस्टच्या मते, ''ज्यावेळेस सामाजिक आंतरक्रियेत प्रकरण सुरू असते, त्यामध्ये चिन्हांचा उपयोग करून अर्थाचे संचारण केले जाते. तेव्हा त्याला संदेशवहन असे म्हणतात''

श्री. वॉरेन व्हीवर यांच्या मते, ''एकाने दुसऱ्याच्या मनावर परिणाम घडवून आणण्याच्या सर्व पद्धती म्हणजे संदेशवहन होय.''

संदेशवहन/सम्प्रेषण/संवाद/संसूचन व्यक्तीच्या व पर्यायाने समाजाच्या वा देशाच्या प्रगतीकरिता आवश्यक आहे. संदेशवहन हे सर्व मानवी संघटनांना आवश्यक आहे. नवीन ज्ञान लोकांना समजावून सांगणे, पटवून देणे आणि त्याकरिता योग्य ती कृती करावयास लावणे हे कठीण कार्य करण्यासाठी योग्य संदेशवहन क्षमतेची आवश्यकता आहे. संदेशवहनामध्ये नवाचाराची ओळख जनतेला पटवून देऊन चालत नाही तर तो नवाचार प्रत्यक्षात आणण्यास शिकविण्याचीही गरज आहे. उत्तम संदेशवहन म्हणजे केवळ आदेश देणे नव्हे तर नवाचाराबद्दल लोकांमध्ये जाणीव निर्माण करणे एवढेच अपेक्षित नाही तर त्या ज्ञानाचा अर्थ स्पष्ट करून समजावून घेण्यास मदत करणे होय. आधुनिक विज्ञानयुगाची प्रगती योग्य व उपयुक्त तांत्रिक ज्ञानाचा प्रसार करण्यावरच अवलंबून आहे. आर्थिक व सामाजिक विकास साध्य करण्याकरिता परिणामकारक व उपयुक्त असे नवीन ज्ञान लोकांपर्यंत पोहोचवून त्यांना समजावून देऊन त्याचा वापर करण्यास मदत करणे आवश्यक असते.

संदेशवहन या शब्दाची व्युत्पत्ती लॅटिन भाषेतील (communis) कम्यून्स या शब्दापासून झालेली आहे. ज्याचा अर्थ सामान्यपणा किंवा एकवाक्यता निर्माण करणे असा होतो. संदेशवहनामुळे सर्वांचे ज्ञान, अनुभव, आचार-विचार व इतर बाबींमध्ये एकसारखेपणा येण्यास मदत होते.

## **संदेशवहनाची वैशिष्ट्ये (स्वरूप) :** (nature of communication)

**१) मूक किंवा प्रतिकात्मक संवाद होऊ शकतो.**

संदेशवहन भाषेचा शब्द न उच्चारता देखील घडू शकते. दोन मूक बालके आपसात ध्वनीचा, शब्दाच्या उच्चारणाचा वापर न करता देखील संवाद साधताना आपण पाहतो. काही संवाद प्रतिकात्मक देखील होतात. कारण प्रत्येक समाजात, संस्कृतीत काही प्रतीके किंवा चिन्हे असतात, ज्यांना एक विशेष अर्थ असतो. उदा. राष्ट्रध्वज, स्वस्तिक, मंगलकलश, विशिष्ट रंग, पताका वगैरे. अशी प्रतीके आदिम समाजापासून आधुनिक समाजापर्यंत दिसून येतात. हिन्दूधर्मात मंगळसूत्र हे विवाहित स्त्रीचे प्रतीकच आहे. खरे म्हणजे या प्रतीकांना, हावभावांना आपणच (समाज) अर्थ दिलेला असतो. शब्दांना स्वत:चा अर्थ नसतो. ते निर्जिव असतात. समाज त्यांना अर्थ देऊन जिवंत करतो. आपल्याला हवा असलेला अर्थ दुसऱ्यांना कळला तरच संवाद घडून येऊ शकतो.

**२) संदेशवहन अर्थ प्रसारित क्रिया आहे.**

संदेशवहन ही व्यक्ती-व्यक्तीमध्ये अर्थ प्रसारित करण्याची प्रक्रिया आहे. मानव हा समाजशील प्राणी असल्याने संवादाची किंवा सम्प्रेषणाची क्रिया सातत्याने चलायमान असते. पिढी-दर-पिढी संवादशैली, संकेत, चिन्हे यात सतत संचय होत राहतो व संदेशवहन प्रक्रिया विस्तृत तसेच सखोल, प्रगल्भ, वैज्ञानिक बनत जात असते. यातून ज्ञानाचा संचय व विकास साधला जातो. यांत्रिक व तांत्रिक ज्ञानाच्या विकासा बरोबरच लिखित साहित्य आणि इतर दृक-श्राव्य साधने व पद्धतीचा उपयोग संदेशवहनाकरित होऊ लागला.

**३) एकाधिक घटकांची आवश्यकता.**

संवाद साधण्यासाठी किंवा आंतरक्रिया करण्यासाठी किमान दोन व्यक्तींची आवश्यकता असते. जास्त घटक कितीही असू शकतात. सामाजिक विनिमयात संवादाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सवांदातून विचारांचे, मतांचे, ज्ञानाचे, भावनांचे, संवेदनांचे, नाराजीचे, आवडी-निवडीचे, योग्य-अयोग्यतेचे आदानप्रदान होत असते. अध्ययन-अध्यापन ही एक संवाद पद्धतीच आहे. दोन व्यक्ती त्यासाठी समोरासमोरच असण्याची आज गरज नाही. फोनवरून संवाद साधता येतो. सिनेमा, टी.व्ही. रेडिओ इ. संवादाची आधुनिक माध्यमे आहेत. विचार-विनिमय होत असेल तरच संवाद परिणामकारक होतो अन्यथा नाही. संदेशवहन किंवा संवादाची प्रक्रिया एक प्रकारे दुतर्फी प्रक्रिया आहे.

**४) संवादाच्या विविध शैली:** संवाद किंवा सम्प्रेषण किंवा संदेशवहनाची कुठली एकच शैली सर्वत्र आढळते असे नाही. जगात वेगवेगळ्या देशात तसेच एकाच देशातील विविध भौगोलिक क्षेत्रात विभिन्न भाषा, रिवाज, प्रथा, आस्था, विश्वास, अंधश्रद्धा आढळतात. त्यानुसार त्यांची प्रतीके देखील भिन्न राहू शकतात. एकाच शब्दाचा एका ठिकाणी जो अर्थ घेतला जातो तोच अर्थ इतर क्षेत्रात घेतला जाऊ शकत नाही. तेव्हा संवाद साधताना त्या व्यक्तीची, तेथील प्रदेशाची संस्कृती समजून घेतली पाहिजे. तेव्हाच संवाद यशस्वी होण्याची शक्यता असते. भारतात नमस्कार दोन हात जोडून करतात तर पाश्चात्त्य देशात हस्तांदोलन करतात. महाराष्ट्रात राम-राम म्हणतात तर गुजरातमध्ये जयश्रीकृष्ण, मुसलमान सलाम अलेकुम तथा पंजाबी सत्श्रीअकाल म्हणून अभिवादन करतात.

## ५) संवादशैली परिवर्तनीय असते.

विज्ञानाची व तंत्रज्ञानाची प्रगती सतत सुधारत चालली आहे. एवढेच नव्हे तर तंत्रज्ञानात नवीन ज्ञानाची झपाट्याने वाढ व विकास होत आहे. आज व्यक्तीला आपल्या विकासासाठी व आधुनिक काळाशी संलग्न राहून विकास साधावयाचा असेल तर त्याला कालसापेक्ष जागरूक राहणे अतिशय गरजेचे आहे. आज सामाजिक विनिमयासाठी, क्रिया-आंतरक्रियांसाठी व्यक्ती समोरासमोर असल्याच पाहिजे हे गरजेचे नाही.

## संवादाचे काही प्रारूप किंवा नमुना :

**ॲरिस्टॉटलचा नमुना :** ॲरिस्टॉटलच्या विचाराप्रमाणे संवादाचा घटक किंवा व्यक्ती, त्याचे वक्तव्य आणि एकणारे (श्रोते) हे तीन मूलभूत घटक असतात. वक्ता आणि श्रोते समोरासमोर असतात. त्यामुळे अशा संवादाला प्रत्यक्ष स्वरूपाचा संवाद म्हणता येईल.

**शॉमॉन व्हीवरचा नमुना :** शॉमॉन व्हीवर यांनी संवादशैलीच्या प्रक्रियेत एकूण पंचम तत्त्वांना किंवा घटकांना अंतर्भूत केले आहे. या प्रक्रियेत प्रेषक विशिष्ट स्त्रोतातून नवाचार किंवा संकेत घेऊन संदेश ग्राहकापर्यंत पोहोचवितो व संदेश वहनाचे उद्दिष्ट साध्य करतो.

**वेस्ले व मॅक्लीनचा संवाद नमुना :** यांनी प्रतिपादिलेल्या नमुन्यानुसार संदेशवहनाचे पाच घटक मुख्यत्वे केलेले दिसून येतात. ते म्हणजे संदेशवाहक- संकेत ठरविणे-संदेशवहन मार्ग-संकेत स्पष्ट करणे-संदेशग्राहक. संदेशवाहक हा संदेशाला संकेतबद्ध करून विशिष्ट संदेशवहन मार्गाने नेल्यानंतर संदेशातील संकेत संदेश ग्राहकाला स्पष्ट करतो.

**बेर्लोचा संवाद नमुना:** बेर्लोचा संवाद प्रारूप किंवा नमुना वेस्ले वा मॅक्लीनच्या संदेशवहन नमुन्यासारखाच आहे. यांने एका घटकाची आपल्या प्रारूपात वाढ केली आहे. म्हणून घटकांची संख्या सहा झाली आहे. संदेशवाहकसंकेत ठरविणारा-संदेश-संदेशवहन मार्ग-संकेत स्पष्ट करणारा-संदेश ग्राहक.

**लेटररचा नमुना :** लेटररने संवादाचे सात घटक सांगितले आहेत. संदेशवहन क्रियेत निर्माण होणारे अडथळे संदेशवहन मार्गातच निर्माण होतात असे त्याचे म्हणणे आहे व ते अडथळे दूर करणे देखील गरजेचे आहे यावरही त्याने भर दिला आहे.

निवड-संकेत ठरविणे-प्रेषण-संदेशवहन मार्ग-अडथळे-तपासणी-संकेत स्पष्ट करणे-निवड.

**लिग्न्सचा नमुना:** याच्या नमुन्याप्रमाणे संदेशाची निवड करून त्यावर योग्य ते संस्कार करून निवडलेल्या संदेशवहन मार्गाचे संदेश ग्राहकाकडे पाठविले जाते. संदेशवाहक संदेश समजावून घेऊन त्यावर आपली प्रतिक्रिया दर्शवतो.

संदेशवहनाचे हेच घटक कमी-अधिक प्रमाणात विविध समाजशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, मानसशास्त्रज्ञ, मानवशास्त्रज्ञ इत्यादींनी दिले आहेत.

## Social Eclology **सामाजिक परिस्थितीकीय**

मानव समाज प्रामुख्याने दोन तत्त्वांनी सामान्यत: प्रभावित होतो. एक म्हणजे वंशानुक्रम आणि दुसरे म्हणजे पर्यावरण. पर्यावरण प्रामुख्याने दोन प्रकारचे असते. ते म्हणजे अंतर्गत पर्यावरण आणि बाह्य पर्यावरण. आंतरिक वातावरणांतर्गत संघटन आणि नियमन,

परंपरा आणि संस्था, सामाजिक जीवनाचा दबाव आणि स्वातंत्र्य ज्यांना आपण संघटित रूपात सामाजिक वारसा म्हणतो त्यांचा समोवश होतो. बाह्य वातावरणात ब्रम्हांडीय भौतिक तथ्य आणि जीवशास्त्रीय तत्त्वांचा अंतर्भाव होतो. पर्यावरणाव्यतिरिक्त, मनुष्य आणि समाज वंशानुसंक्रमणाने देखील प्रभावित होत राहतो. वंशानुसंक्रमण फरक व्यक्ती आणि समूहाच्या लक्षणात भिन्नता आणतो. विभिन्न तथ्यांमुळे विभिन्न प्रकारचे मानव समाजात आढळतात. मानव समाजातील भिन्नता संस्कृतीमुळे आहे. केवळ एवढेच नाही तर तेच समाज जिवंत राहतात किंवा प्रभुत्वसंपन्न राहतात, ज्यांची संस्कृती विकसित असते. संस्कृती संपूर्ण समाजाची असते, ती केवळ एका व्यक्तीची नसते. म्हणूनच समाजाचे जीवन एखाद्या व्यक्तीच्या शक्तीवर किंवा प्रतिभेवर अवलंबून नसते तर ते संपूर्ण समूहावर अवलंबून असते.

संपूर्ण पर्यावरण

- भौतिक बाजू
  - मनुष्या व्दारा अनियंत्रित
    - १) हवामान आणि ब्रम्हांडीय दशेत बंजर जमीन इ.
    - २) जैविक तत्व
  - मनुष्य द्वारा नियंत्रित
    - भौतिक रासायनिक → कृषीभूमी, मार्ग संचार व्यवस्था, खनिज इ.
    - जैविक पाळीव प्राणी आणि वनस्पती
- सामाजिक बाजू
  - सांस्कृतिक संस्थेत लोकरूढी इ उदा. कुटुंब, राजकीय संघटन इ. व्यक्ती
  - सामाजिक सूमह आणि संघटन
  - मानव नगरे झोपड-पट्ट्या

संपूर्ण जिवंत प्राण्याला पर्यावरणाशी समायोजन करावे लागते. असे करता आले नाही तर जीवन जगणे कठीण होऊन बसते. वर्तमान जीवन किंवा जीवनाची संरचना मागील जीवन आणि पर्यावरणाचा परिणाम आहे. पैतृकता आणि पर्यावरण यांच्या संबंधाची चर्चा न करता येथे मुख्यत्वे करून हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न आहे की पर्यावरण कशाप्रकारे

समाजाला प्रभावित करते. काही भौगोलिक परिस्थितीचा घनिष्ठ संबंध जीवनाच्या प्रकाराशी आहे. प्राणी शास्त्रीय रूपाने एका निश्चित भौगोलिक पर्यावरणाशी समायोजन करतात. काही भूगोल शास्त्रज्ञ आणि त्याच्याने प्रभावित समाजशास्त्रज्ञ इथपर्यंत सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात की मनुष्याचे संपूर्ण जीवन भौगोलिक परिस्थितीने नियंत्रित होते आणि त्यांनी समाजशास्त्रात भौगोलिक सिद्धांताची स्थापना केली आहे. या सिद्धांताच्या समर्थकांमध्ये ली प्ले (फ्रांस), एफ. रेटजल (जर्मन), एच.टी. बकल (इंग्लंड), एलन सी. सैम्पल (फ्रांस), ई. जी. डेक्टर आणि एल्सवर्थ हटिंगटन (यु.एस.ए.) इ. चा समावेश करता येईल. परंतु आज या प्राचीन भौगोलिक सिद्धांताचा अस्विकार केला जात आहे. जस जसे मनुष्याचे ज्ञान, विचार आणि क्रियांचा विकास होतो, पृथ्वीच्या नवीन तथ्यांचा शोध घेतला जातो आणि प्राचीन तथ्यांना नवीन महत्त्व दिले जाते. हे संबंध परस्परावलंबी आहेत.

ज्या प्रमाणे रोपटे नैसर्गिक पर्यावरण आणि इतर जातीच्या रोपट्यांनी (वनस्पती) प्रभावित होतात, त्याचप्रमाणे मानव जीवन देखील जवळपासच्या किंवा सभोवतालच्या मनुष्यांनी प्रभावित होते. उदा. जर एकाच ठिकाणी अधिक झाडे असतील तर त्या मध्ये जे शक्तिशाली असतील ते पूर्णपणे विकास पावतात आणि इतरांना दाबून टाकतात. हीच बाब मनुष्यावर देखील लागू होते. मानव किंवा सामाजिक परिस्थितीशास्त्र सिद्धांत (Human ecological school) ची स्थापना करण्यात आली. या सिद्धांताच्या आधारे शहरात सामाजिक-सांस्कृतिक घटनांच्या अध्ययनात विशेष लक्ष बनविले आहे. अशा प्रकारे कुटुंबाच्या संगठनेच्या स्वरूपापासून ते व्यक्तीच्या मानसिक आजाराच्या प्रकारांपर्यंतच्या घटनांच्या एका समूहावर एका विशिष्ट क्षेत्राच्या विशिष्ट परिस्थितीशी समायोजन दर्शवित असते. जागेच्या किंवा क्षेत्राच्या प्रभावाचे वर्णन करतांना परिस्थितीशास्त्र विद्वानांनी त्या क्रियाशील प्रक्रियांचा प्रतिस्पर्धा आणि सहकार्य, केंद्रिकरण आणि विकेंद्रिकरण, विशेषीकरण आणि विभेदीकरण, आक्रमण आणि विजय- यांचे विस्ताराने वर्णन केले आहे. या वर्णनाचे महत्त्व ग्रामीण आणि नागरी दोन्ही समुदायाच्या संरचनेत आहे. या सिद्धांताच्या प्रतिनिधींमध्ये आर.ई. पार्क, डब्ल्यू. बर्गेस, आर.डी.मॅकेन्जी, जे.ए. कुइन आणि लुइसवर्थ यांचा समावेश करता येईल.

मानव समाज नेहमीच आपल्या सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणांनी प्रभावित होत राहिला आहे. वर्तमान समाज भूतकालिन सामाजिक-सांस्कृतिक वारशाने नियंत्रित असतो. भारतातील सामाजिक परिस्थितीकीय संरचना विविधतेने नटलेली आहे. येथे विविध धर्म, भाषा, वंश, जाती, जातींची श्रेणी रचना, परंपरा, रूढी, भौगोलिक विविधता, संप्रदाय, सांप्रदायिक तणाव, मानसिक तणाव, बेरोजगारी, वाढती लोकसंख्या, शहरीकरण, झोपडपट्ट्या, वाढते प्रदूषण, वाढते अपघात, गरिबी, सामाजिक-आर्थिक विषमता, भ्रष्टाचार, राजकारणातील वाढते अपराधीकरण, स्थलांतर, कोरडा-ओला दुष्काळ, संचार साधनांचा विकास, प्रचार-प्रसार व त्याचा होणारा सकारात्मक व नकारात्मक प्रभाव, वाढते अपराध, बालश्रमिक, लैंगिक गुन्हे, वाढत्या आत्महत्या अशा विविध समस्यांचे वाढते जाळे व अशा परिस्थितीतून उद्‌भवणारे नवीन प्रश्न, जलद होणारे सामाजिक-भौतिक परिवर्तन व त्यांच्या दबावात्मक स्थितीतून मानवाचा जीवनप्रवाह अशी आज भारताची सामाजिक-भौतिक परिस्थितीकी दिसून येत आहे.

## स्वाध्याय

### दीर्घोत्तरी प्रश्नः

१) जनसंवादाचे समाजशास्त्र म्हणजे काय? जनसंवादाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

२) सामाजिक परिस्थितीकी कशाला म्हणतात? त्याचा समाजजीवनावर पडणाऱ्या प्रभावाचे स्पष्टीकरण द्या.

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

### लघुत्तरी प्रश्नः

१) संदेशवहनाचा विकास व परिवर्तन

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

२) संदेशवहनाची संकल्पना

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

३) संदेशवहनाचे महत्त्व

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

४) संदेशवहनाचा लेटररचा नमुना

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

५) सामाजिक परिस्थितीकीची संकल्पना

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

६) सामाजिक परिस्थितीकी व व्यक्तिमत्त्वाचा पडणारा प्रभाव.

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

## शब्दार्थ

| | | |
|---|---|---|
| Mass | - | बीहुल, जनता |
| Communication | - | संवाद, सम्प्रेषण, संसूचन, संदेशवहन |
| Globelization | - | जागतिकीकरण |
| Ecology | - | परिस्थितीकी, सभोवतालची परिस्थिती |
| School | - | विचार, परंपरा, विशिष्ट विचारप्रणाली |
| Theory | - | सिद्धांत |
| Physical | - | भौतिक |
| Geographical | - | भौगोलिक |
| Branch | - | शाखा |
| Child Labour | - | बालश्रमिक |

## स्वाध्याय :

### दीघोत्तरी प्रश्न :

१) नागरी समुदायाची व्याख्या करा आणि नागरी समुदायाच्या वैशिष्ट्याचे वर्णन करा.

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

२) भारतातील शहरीकरणाचे स्पष्टकरण द्या.

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

३)शहरीकरणातून निर्माण झालेल्या समस्यांचे वर्णन करा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

**थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) विविध अभ्यासाद्वारा शहरांचे वर्गीकरण

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

२) भारतातील शहरांच्या वाढीचा वृत्तांत लिहा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

३) नगर नियोजनाचे महत्त्व

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

## शब्दावली (Glossary)

| | | | |
|---|---|---|---|
| urban | नागरी / शहरी | Secular | धर्मनिरपेक्ष |
| Society | समाज | Labour | श्रमिक |
| Social | सामाजिक | Urbanization | नागरीकरण |
| Mobility | गतिशीलता | Maigration | स्थलांतरण |
| Heterogeneity | विविधता | Accident | अपघात |
| Voluntary | एच्छिक | Defination | व्याख्या |
| Association | समिती, मंडळ | Meaning | अर्थ |
| Tolerance | सहिष्णुता | Phase | टप्पा |
| Planning | नियोजन | Nature | स्वरूप |
| Rate | दर, वेग | Population | लोकसंख्या |

| | | |
|---|---|---|
| Density - घनत्व | | Industry - उद्योग |
| Centralization - केंद्रिकरण | | Change - बदल, परिवर्तन |
| Indivdsulization - व्यक्तिकेंद्रित | | Growth - वाढ |
| Developement - विकास | | Various - विविध |
| Attraction - आकर्षण | | Town - शहर |
| City - महानगर | | Pollution - प्रदूषण |
| Slum - झोपडपट्टी | | Value - मूल्य |
| Norms - प्रमाणके | | Crime - गुन्हा |
| Criminal - गुन्हेगार | | Rape - बलात्कार |
| System - व्यवस्था | | |

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

१) समाजशास्त्राच्या विकासाच्या विभिन्न अवस्थांची चर्चा करा.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

२) भारतात समाजशास्त्राच्या विकासावर प्रकाश टाका.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

३) परंपरागत भारतीय समाजाच्या अध्ययनाचे प्रकार्यात्मक, मार्क्सवादी आणि सामाजिक क्रिया दृष्टिकोन समजावून सांगा.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

४) हिन्दुत्वाच्या मूलाधाराचे स्पष्टीकरण द्या.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

५) हिन्दू वर्णव्यवस्थेवर निबंध लिहा.

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

६) हिन्दूंची आश्रमव्यवस्था विशद करा.

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

७) पुरुषार्थ कशाला म्हणतात? चारही पुरुषार्थाचे वर्णन करा.

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

८) 'हिन्दू समाजजीवनातील कर्मसिद्धांत आणि पुनर्जन्माची संकल्पना परस्परावलंबी आहे.' विशद करा

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

९) ग्रामीण समुदायाचा अर्थ स्पष्ट करा आणि त्याचे स्वरूप (वैशिष्ट्ये) समजावून सांगा.

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

१०) स्वातंत्र्योत्तर ग्रामीण समाजातील परिवर्तनाची माहिती लिहा.

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

**थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) प्राचीन भारतात समाजशास्त्राचा विकास

....................................................................................

..............................................................................

..............................................................................

२) आधुनिक भारतातील समाजशास्त्राचा विकास

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

३) हिन्दू समाजशास्त्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

४) समाजशास्त्राचा प्रकार्यात्मक दृष्टिकोन

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

५) काम आणि मोक्षाची संकल्पना

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

६) गृहस्थाश्रमाचे महत्त्व (प्रकार्य)

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

७) वर्णव्यवस्थेची उत्पत्ती

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

८) आश्रमव्यवस्था

..............................................................................

.............................................................................................

.............................................................................................

९) पुनर्जन्माची संकल्पना

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

१०) बलुतेदारी पद्धती

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

११) तंत्रज्ञानात्मक घटक आणि ग्रामीण परिवर्तन

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

१२) बलुतेदार आणि अलुतेदार

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

१३) ग्रामीण जीवनातील जातीविषयक परिवर्तन

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

१४) ग्रामीण समाजातील अध्ययनाची (संशोधनाची) क्षेत्रे

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

## संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| त्रिपाठी श्री शंभूरत्न | : | भारतीय संस्कृती और समाज, किताब घर, आचार्य नगर, कानपूर, १९६३ |
| मुकर्जी रविन्द्रनाथ | : | भारतीय सामाजिक संस्थाएँ, सरस्वती सदन, दिल्ली |
| महाजन धर्मवीर, कमलेश | : | भारत में समाज, विवेक प्रकाशन, जवाहरनगर, दिल्ली - ७, २००३ |
| आहुजा राम | : | भारतीय समाज, रावत पब्लिकेशन, जयपूर २००० |
| मुकर्जी रविन्द्रनाथ | : | सामाजिक मानवशास्त्र की रूपरेखा, सरस्वती सदन, मसुरी. १९६२ |
| गुप्ता एम.एल., शर्मा डी.डी. | : | समाजशास्त्र, साहित्य भवन, आगरा |
| काळदाते सुधा | : | भारतीय समाजरचना, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, भारत मुद्रक आणि प्रकाशक लि. औरंगाबाद, १९७६ |

**Edited by**

| | | |
|---|---|---|
| Unnithan T.K.N., Singh yogendra Singh Narendra Deva Indra | : | Sociology for India Prentic - hall of India p. ltd., 1967 |
| Hansraj | : | Society of India |

# घटक : २

# डॉ. राधाकमल मुखर्जींचे योगदान.
# (Dr. Radhakamal Mukharjee's Contribution)

**घटक संरचना** (Structure of Unit)


२.० **घटकाची उद्दिष्टे** (Objectives of Units)

२.१ **प्रस्तावना** (Introduction)

२.२ **विषय विवेचन** (Subject explaination)

२.२.१ **सामाजिक शास्त्रे, समाजशास्त्र, प्रादेशिक समाजशास्त्र** (Social Sciences, Sociology, Regional Sociology)

२.२.२ **मूल्ये : मूल्यांची वैशिष्ट्ये, मूल्यांचा प्रादेशिक आधार, मुल्ये आणि प्रतीके, व्यक्तिमत्त्व आणि मूल्ये** (Values :- Characteristics of values, Regional basis of val ues, values and symboles, Personality and values.)

२.२.३ **समाजाविषयीचा सामान्य सिद्धांत** (General theory of Society)

२.२.४ **समूह मानसशास्त्र** (Group Pschyology)

२.३ **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न/उपक्रम** (Questions for self learning/ Activities)

२.४ **सारांश** (Summary)

२.५ **पारिभाषिक शब्द/शब्दार्थ** (Glossary)

२.६ **संदर्भ सूची** (Bibliography)

२.७ **सरावासाठी प्रश्न** (Exercise)


## २.० घटकाची उद्दिष्टे (Objectives of Units)

या घटकाचा अभ्यास, केल्यानंतर तुम्हास -

* डॉ. राधाकमल मुखर्जी यांचे सामाजिक शास्त्रे व समाजशास्त्र व प्रादेशिक समाजशास्त्र याविषयीचे विचार समजावून घेता येतील.
* डॉ. मुखर्जीनी सांगितलेली मूल्यांची वैशिष्ट्ये व प्रादेशिक आधार तसेच मूल्ये व प्रतीके आणि व्यक्तिमत्त्व व मूल्ये याबाबतच्या विचारांचे आकलन होईल.
* डॉ. मुखर्जींचा समाजाविषयीचा सामान्य सिद्धांत स्पष्ट करता येईल.
* डॉ. मुखर्जींचे समूह मानसशास्त्र समजावून घेता येईल.

## २.१ प्रस्तावना (Introduction)

या दुसऱ्या घटकात तुम्ही डॉ. राधाकमल मुखर्जी यांनी समाजशास्त्रास दिलेले योगदान समजावून घेणार आहोत. भारतात समाजशास्त्राचा पाया घालणाऱ्या आद्य समाजशास्त्रज्ञांपैकी एक आहेत. अर्थात त्यांनी समाजशास्त्राबरोबरच अर्थशास्त्र, मानवशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, सभ्यता, संस्कृती, धर्म इत्यादी विषयांसाठीही मौलिक योगदान दिलेले आहे. भारतीय तसेच पाश्चात्त्य विचारवंतांच्या ग्रंथांचे सखोल अध्ययन केले असल्याने त्यांच्या विचारात पौर्वात्य व पाश्चात्त्य विचारांचा सुरेख समन्वय साधलेला दिसून येतो. याठिकाणी आपण त्यांचे सामाजिक विचार अभ्यासणार आहोत. तत्पूर्वी त्यांचा जीवन परिचय थोडक्यात समजावून घेणे उचित ठरेल.

### डॉ. राधाकमल मुखर्जींचा जीवन परिचय

### करिअर :

डॉ. मुखर्जीचा जन्म ७ डिसेंबर १८८९ रोजी पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यातील बेऱ्हमपूर या छोट्या शहरात झाला. त्यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण कोलकाता येथील प्रेसिडंसी कॉलेजमध्ये पूर्ण केले. प्रारंभी त्यांना इतिहासात विशेष रुची होती. मात्र कोलकातामधील झोपडपट्ट्यांतील दुःख, दारिद्र्य पाहिल्यानंतर ते अर्थशास्त्र व समाजशास्त्र या विषयांकडे आकर्षित झाले. तसेच समाजकल्याण कार्याकडे ओढले गेले. त्यातूनच त्यांनी प्रौढ रात्र शाळा १९०६ मध्ये सुरु केली व प्रौढ शिक्षणावर पाठ्यपुस्तकेही लिहिली. सन १९१० मध्ये त्यांनी आपल्याच जन्मगावी म्हणजेच बेऱ्हमपूरमधील कृष्णनाथ महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून करिअर सुरु केले. ब्रिटिश सरकारने त्यांना दहशतवादी ठरविले. तथापि त्यांच्या वकील बंधूनी त्यांची न्यायालयातून दहशतवादाच्या आरोपातून निर्दोष मुक्तता केली. त्यानंतर डॉ. मुखर्जी हे १९१६ मध्ये लाहोर (पंजाब) येथील सनातन धर्म महाविद्यालयात प्राचार्य म्हणून रुजू झाले. तथापि, १९१७ मध्येच ते परतले व कोलकाता विद्यापीठात अर्थशास्त्र, समाजशास्त्र व राजकीय तत्त्वज्ञान या विषयांचे प्राध्यापक म्हणून काम करु लागले. तेथे त्यांनी १९२० मध्ये ''भारतीय ग्रामीण समुदायातील सामाजिक व आर्थिक परिवर्तन'' या विषयांवर पीएच.डी. ही पदवी प्राप्त केली. पुढे ते १९२१ ते १९५१ पर्यंत लखनौ विद्यापीठात अर्थशास्त्र व समाजशास्त्र या विषयांचे प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून कार्यरत राहिले. पुढे १९५५ ते १९५७ पर्यंत ते लखनौ विद्यापीठात कुलगुरू झाले व या पदावरून सेवानिवृत्त झाल्यानंतर याच विद्यापीठातील ''जे.के. इन्स्टिट्यूट ऑफ सोशिऑलॉजी अँड ह्युमन रिलेशन्स'' या संशोधन संस्थेचे संचालक म्हणून मृत्यूपर्यंत (ऑगस्ट १९६८) कार्यरत राहिले.

### डॉ. मुखर्जीवरील प्रभाव

डॉ. मुखर्जीवर भारतीय विचारवंत ब्रिजेंद्रनाथ सील, पॅट्रिक गिडीस, नरेंद्रनाथ सेनगुप्ता, विनयकुमार सरकार इत्यादींचा तर पाश्चात्त्य समाजशास्त्रज्ञ व्हेब्लेन, रॉबर्ट ई. पार्क, ई.ए.रॉस यांचा मोठा प्रभाव पडला. या सर्वांशी त्यांचे घनिष्ठ असे मैत्रीपूर्ण संबंध होते. सामाजिक शास्त्राच्या अध्ययनासाठी ब्रिजेंद्रनाथ सीलनी जी तुलनात्मक पद्धती वापरली,

तिचा मोठा प्रभाव डॉ. मुखर्जीवर पडला. पॅट्रिक गिडीसमुळे पर्यावरण, लोकसंख्या या विषयांच्या, नरेंद्रनाथ सेनगुप्तामुळे सामाजिक मानसशास्त्राच्या, रॉबर्ट पार्कमुळे समुदायाच्या, ई. ए. रॉसमुळे प्रदेशवादाच्या (ïशसळेपरश्रळीं) अभ्यासाची प्रेरणा डॉ. मुखर्जींना मिळाली. याशिवाय त्यांनी ऑगस्त कॉम्ट, हर्बर्ट स्पेन्सर, हॉबहाऊस, लेस्टर वार्ड, बॅगेहॉट, गिडिंग्ज यासारख्या समाजशास्त्रज्ञांच्या ग्रंथाचे, तसेच बर्कले, टेन, लिकी, ॲक्टन यासारख्या इतिहासकारांच्या व रिकार्डो, मिल्, मार्शल इत्यादी अर्थशास्त्रज्ञांच्या ग्रंथाचे सखोल अध्ययन केल्याने त्यांच्यावर या सर्वांच्या विचारांचा प्रभाव पडला. वॉशिंग्टन (अमेरिका) मध्ये शिक्षण घेत असताना समाजशास्त्रज्ञ व्हेब्लेनचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

**मानसन्मान :–**

त्यांची विद्वता, व्यासंग व सेवाभाव यामुळे डॉ. मुखर्जींना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्था व संघटनांवर काम करण्याचा सन्मान लाभला. १९४५–१९४७ मध्ये ते ग्वाल्हेर सरकारचे आर्थिक सल्लागार होते. भारत सरकार व उत्तर प्रदेश सरकारने त्यांची अनेक समित्यांवर सदस्य म्हणून नेमणूक केली. अन्न व शेती संघटना (ऋअज) या आंतरराष्ट्रीय संघटनेने त्यांची १९४६ मध्ये आर्थिक व सांख्यिकी आयोगावर अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. तसेच आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या तांत्रिक समितीचे सदस्य म्हणनूही त्यांची नियुक्ती झाली होती. तसेच केंब्रिज, ऑक्सफर्ड, व्हिएन्ना, हार्वर्ड, कोलंबिया, शिकागो, मिशिगन विस्कॉसिन इत्यादी परकीय विद्यापीठांमध्ये अर्थशास्त्र व समाजशास्त्र या विषयांवर व्याख्याने देण्यासाठी त्यांना आमंत्रित केले गेले.

**ग्रंथ :–**

डॉ. मुखर्जीनी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, मूल्ये, धर्म, संस्कृती, सभ्यता, मानवशास्त्र, मानसशास्त्र, इत्यादी विषयांवर ५३ ग्रंथ लिहिले. समाजशास्त्राच्यादृष्टीने त्यांचे काही प्रमुख ग्रंथ पुढीलप्रमाणे. १) Democracies of the East २) Regional Sociology ३) Social Ecology ४) Man and his Habitation ५) Social Structure of Value ६) History of Indian civilization ७) Horizon of Marriage ८) Culture and Art of India, ९) Symbolic life of man १०) Philosphy of social science. याशिवाय त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये असंख्य लेख व शोधनिबंध प्रसिद्ध केले.

## २.२ विषय विवेचन (Subject explaination)

आता आपण डॉ. राधाकमल मुखर्जींचे समाजशास्त्रीय विचार अभ्यासणार आहोत. विषय विवचेनाच्यादृष्टीने या घटकाचे चार विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात त्यांचे सामाजिक शास्त्रे, समाजशास्त्र व प्रादेशिक समाजशास्त्र याविषयीच्या विचारांचे विवेचन केलेले आहे. दुसऱ्या विभागात त्यांनी मूल्यांची सांगितलेली वैशिष्ट्ये व त्यांचा प्रादेशिक आधार तसेच मूल्ये व प्रतीके व व्यक्तिमत्त्व व मूल्ये याबाबतच्या विचारांचे विवेचन केलेले आहे. तिसऱ्या विभागात त्यांच्या समाजाविषयीच्या सामान्य सिद्धांताचे तर चौथ्या विभागात समूह मानसशास्त्राचे विवेचन केलेले आहे.

### २.२.१ डॉ. राधाकमल मुखर्जींचे सामाजिक शास्त्रे, समाजशास्त्र व प्रादेशिक समाजशास्त्र याविषयीचे विचारः-

**सामाजिक शास्त्रे** (social sciences) - डॉ. मुखर्जींचा सामाजिक शास्त्रांकडे पाहण्याचा विशिष्ट असा दृष्टिकोन आहे. विज्ञान युगाची सुरुवात १५ व्या शतकात झाली. विविध विषयांचा अभ्यास वैज्ञानिक दृष्टिकोनातून होऊ लागला. यातून पुढे विविध शास्त्रे उदयास आली. या शास्त्रांचे नैसर्गिक शास्त्रे (natural sciences) व सामाजिक शास्त्रे असे वर्गीकरण केले गेले. नैसर्गिक घडामोडींचा म्हणजेच निसर्गात घडणाऱ्या घटनांचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रांना नैसर्गिक शास्त्रे असे म्हणतात. पदार्थविज्ञान (physics), रसायनशास्त्र (chemistry), जीवशास्त्र (biology) इत्यादी नैसर्गिक शास्त्रे आहेत. याउलट सामाजिक घडामोडींचा म्हणजेच मानव समाजात घडणाऱ्या घटनांचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रांना सामाजिक शास्त्रे असे म्हणतात. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी सामाजिक शास्त्रे आहेत.

डॉ. मुखर्जींच्या मते या दोन्ही प्रकारच्या शास्त्रांमध्ये अभ्यास विषयाचे स्वरूप अभ्यासासाठी वापरली जाणारी पद्धती, तंत्रे, व शास्त्रीय उपकरणे इत्यादीबाबत मूलभूत असे फरक आहेत. एकाच प्रकारच्या नैसर्गिक घटनांचे स्वरूप हे सर्व स्थळी व सर्व काळी जवळपास सारखेच असते. या घटनांचा अभ्यास करताना वस्तुनिष्ठ निरीक्षण, प्रयोग व विविध शास्त्रीय उपकरणे यांचा वापर करता येतो. तसेच नैसर्गिक घटनांचे मापनही करता येते. त्यामुळे नैसर्गिक घटनांचा अभ्यास करुन त्यांच्याविषयी काढलेले निष्कर्ष हे काटेकोर व अचूक स्वरूपाचे असतात. याउलट एकाच प्रकारच्या सामाजिक घटनांचे स्वरूप हे सर्व स्थळी व सर्व काळी एकसारखे असत नाही कारण सामाजिक घटनांवर व्यक्तींच्या भावभावना, वर्तन, सामाजिक मूल्ये, समाजाच्या रूढी परंपरा इत्यादींचा प्रभाव पडत असतो. त्यामुळे नैसर्गिक शास्त्रात वापरली जाणारी अभ्यासांची पद्धती, तंत्रे व शास्त्रीय उपकरणे यांचा तंतोतंत वापर सामाजिक घटनांच्या अभ्यासासाठी सामाजिक शास्त्रात करणे कठीण होते. म्हणून सामाजिक शास्त्रांनी आपल्या विषयांच्या अभ्यासासाठी विविध पद्धती व तंत्रे वापरली पाहिजेत असे डॉ. मुखर्जी म्हणतात. त्यांच्या मते सामाजिक घटनांचे वस्तुनिष्ठ निरीक्षण करण्यावर अनेक मर्यादा पडतात. त्यामुळे सामाजिक शास्त्रातील एखादा विचार बुद्धिनिष्ठ असला तरी तो वस्तुनिष्ठ असेलच याची खात्री देता येत नाही. सामाजिक घटनांविषयीचा एखादा बुद्धिवादी विचार सर्वच बुद्धिवाद्यांना पटेलच असे नाही. कारण सामाजिक घटनांकडे पाहण्याचा प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन हा वेगवेगळा असू शकतो. त्यामुळे सामाजिक शास्त्रातील एखाद्या विचारावर सर्वांचे एकमत होणे कठीण आहे. त्यामुळे सामाजिक शास्त्रात वस्तुनिष्ठता (objectivity) व व्यक्तिनिष्ठता (subjectivity) यांच्या संदर्भात विभिन्न मतप्रवाह दिसून येतात. त्यामुळे वस्तुनिष्ठता व व्यक्तिनिष्ठता यांच्या मर्यादेपासून सामाजिक शास्त्रे किंबहुना मानवाचा अभ्यास करणारी सर्वच शास्त्रे (Humanities) मुक्त असावीत असे डॉ. मुखर्जी म्हणतात. एखाद्या विचार किती वस्तुनिष्ठ आहे किंवा किती व्यक्तिनिष्ठ आहे याची चर्चा न करता त्या विचाराचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न सामाजिक शास्त्रज्ञांनी करावा असे डॉ. मुखर्जी सुचवितात.

थोडक्यात डॉ. मुखर्जींच्या मते नैसर्गिक शास्त्रे व सामाजिक शास्त्रे यांच्यात मूलभूत फरक आहे. सामाजिक घटनांवर मानवी भावभावना, वर्तन, मूल्ये, संस्कृती इत्यादींचा प्रभाव पडत असल्याने त्यांचे स्वरुप अत्यंत संकीर्ण व परिवर्तनीय असते म्हणून त्यांच्या अभ्यासासाठी एकच एक पद्धती व तंत्र न वापरता आवश्यकतेनुसार वेगवेगळ्या पद्धती व तंत्रे वापरावीत, तरच सामाजिक घटनांचे वास्तविक ज्ञान होऊ शकेल.

<u>**सामाजिक शास्त्रांची एकता**</u> – डॉ. मुखर्जींनी सामाजिक शास्त्रांच्या एकतेवर भर दिलेला आहे. त्यांच्या मते सर्वच सामाजिक शास्त्रे ही मानवी जीवनाच्या अभ्यासाशी संबंधित आहेत. ही शास्त्रे मानवी जीवनाच्या वेगवेगळ्या अंगाचा किंवा पैलूंचा अभ्यास करतात. उदा. अर्थशास्त्र हे आर्थिक अंगाचा, राज्यशास्त्र हे राजकीय अंगाचा तर समाजशास्त्र हे सामाजिक अंगाचा अभ्यास करते. डॉ. मुखर्जी म्हणतात की, ही सर्व वेगवेगळी अंगे असली तरी ती परस्परांशी अत्यंत घनिष्ठपणे निगडित आहेत. तसेच त्यांचा परस्परांवर प्रभाव पडत असतो. त्यामुळे मानवी जीवनाचे यथार्थ आकलन होण्यासाठी या अंगांचा वेगवेगळा किंवा स्वतंत्रपणे अभ्यास न करता त्यांचा एकत्रितपणे व साकल्याने अभ्यास झाला पाहिजे. जर सामाजिक शास्त्रे आपल्या अभ्यासाचा विषय मानवी जीवनाच्या एखाद्याच अंगापुरताच मर्यादित ठेवतील तर मानवी जीवनाच्या समग्र स्वरुपाचे यथार्थ आकलन होणार नाही. म्हणून डॉ. मुखर्जी म्हणतात की, सर्व सामाजिक शास्त्रांनी आपापल्या विचारांची, सिद्धांताची पद्धती व तंत्रांची आपसात देवाणघेवाण केली पाहिजे. यासाठी विविध सामाजिक शास्त्रांमध्ये उभारलेल्या भिंती पाडून टाकल्या पाहिजेत असे ते सांगतात. मानवी संबंध व मानवी वर्तन हे बहुरंगी व बहुढंगी असल्याने त्यांचे वास्तविक स्वरुप जाणून घेण्यासाठी विविध ज्ञानशाखांचा अवलंब केला पाहिजे, असे सांगून डॉ. मुखर्जी सर्व ज्ञानशाखांच्या एकतेवर भर देतात.

सामाजिक शास्त्रांमध्ये एकता निर्माण करण्यासाठी डॉ. मुखर्जींनी समाजाचे एक महाविज्ञान (रीींशी ीलळशपलश ेष ीलळशीं) निर्माण करण्याचा उपाय सुचविलेला आहे. या महाविज्ञानांत सर्व शास्त्रांचे स्वरुप प्रस्तुत केले जाईलच शिवाय त्यांचे स्वतंत्र अस्तित्वही टिकवून ठेवले जाईल. या महाविज्ञानामुळे समाजाविषयीचा एक सामान्य सिद्धांत प्रस्थापित करणे शक्य होईल व हा सिद्धांत सर्व सामाजिक शास्त्रांना एकतेच्या सूत्रात बांधेल. यांचे सविस्तर विवेचन ''समाजाविषयीचा सामान्य सिद्धांत''या मुद्द्यामध्ये (२.२.३) केलेले आहे.

**मूल्याधिष्ठित समाजव्यवस्थेची निर्मिती** – मूल्याधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करणे हे सामाजिक शास्त्रांचे कार्य आहे असे डॉ. मुखर्जी म्हणतात. त्यांच्या मते मानवाजवळ दया, करुणा, नम्रता, क्षमा, शांती, प्रेम इत्यादी अनेक मूल्ये असून त्यांचे संरक्षण व संवर्धन करण्याची क्षमता मानवास प्राप्त झालेली आहे. त्यामुळे मूल्याधिष्ठित समाज निर्माण करणे शक्य आहे. मानवाने संस्कृतीची निर्मिती करून तिचे संरक्षण व संवर्धन केलेले आहे. त्यामुळे मानवाने पावित्र्याच्या भावनेतून मानवतेचे संरक्षण व संवर्धन करण्याचा प्रयत्न केल्यास 'वैश्विक मानव समाज' स्थापन करता येईल असा आदर्शवादी विचार डॉ. मुखर्जींनी मांडलेला आहे.

थोडक्यात डॉ. मुखर्जींच्या मते सामाजिक शास्त्रांचा अभ्यासविषय हा संकीर्ण व परिवर्तनशी असल्याने त्याच्या अभ्यासासाठी विविध पद्धतींचा व तंत्रांचा अवलंब करावा लागतो. तसेच मानवी जीवनाच्या विविध अंगांचा स्वतंत्रपणे अभ्यास न करता एकत्रित स्वरुपात अभ्यास सामाजिक शास्त्रांनी करावा असे सांगून ते या शास्त्रांच्या एकतेचा पुरस्कार करतात. त्यासाठी ते समाजाविषयीचे एक महाविज्ञान निर्माण करावे असेही सुचवितात. सामाजिक शास्त्रांच्या आधारे मुल्याधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करता येईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केलेले आहे.

**समाजशास्त्राविषयीचे विचार** – डॉ. मुखर्जींनी समाजशास्त्राविषयी देखील आपले मौलिक विचार मांडलेले आहेत. त्यांचे हे विचार पुढील मुद्द्यांच्या आधारे आपणास समजावून घेता येतील.

**१) समाजशास्त्राची व्याख्या व अभ्यासविषय–** समाजशास्त्र हे समाजाविषयी मांडलेल्या सामान्य सिद्धांताचे शास्त्र आहे अशी व्याख्या डॉ. मुखर्जींनी केलेली आहे. सामाजिक संस्थांच्या चौकटीत दर्जा, भूमिका, संप्रेषण यांच्या संदर्भात प्रस्थापित झालेले सामाजिक संबंध हा समाजशास्त्राचा मूलभूत अभ्यास विषय आहे असे ते म्हणतात. त्यांच्या मते व्यक्ती व्यक्तीत आढळणारे दर्जे आणि संबंध उदा. आप्तसंबंध, स्पर्धा, प्रभुत्व, सहकार्य इत्यादींचा अभ्यास समाजशास्त्रात होतो. हा अभ्यास करताना समाजशास्त्राने वास्तववादी दृष्टिकोन स्वीकारावा असे ते सांगतात.

**२) मूल्यांच्या अभ्यासावर भर** – डॉ. मुखर्जींनी मूल्यांच्या अभ्यासावर विशेष भर दिलेला आहे. त्यांच्या मते समाजशास्त्रात मूल्यांचा अभ्यास झाला पाहिजे. ते म्हणतात, समाजशास्त्राने जुन्या तसेच नवीन मूल्यांचे मूल्यांकन वा परीक्षण करावे. तसेच सामाजिक परिस्थिती, सामाजिक गरजा व अनुभव यांच्या संदर्भात मूल्यांमध्ये होणाऱ्या नवीन प्रवृत्तींचाही अभ्यास करावा. बदलत्या काळानुसार मूल्यव्यवस्थेत होत जाणाऱ्या बदलांचे परीक्षण करुन मानवी गरजापूर्ततीच्या दृष्टीने व सामाजिक स्वास्थांच्यादृष्टीने कोणती मूल्ये उपयुक्त आहेत व कोणती मूल्ये निरुपयोगी आहेत हे निश्चित करण्याचे कार्य समाजशास्त्राने करावे असे त्यांनी सुचविलेले आहे. उपयुक्त मूल्यांच्या स्वीकार करणे व निरुपयोगी मूल्यांचा त्याग करणे हे व्यक्ती व समाजाचे कर्तव्य आहे असे ते म्हणतात.

वैज्ञानिक व तांत्रिक प्रगतीमुळे एखाद्या समाजातील आदर्श तत्त्वे किंवा मानवी मूल्ये ही ऱ्हास पावत चालली असतील अथवा दर्जा व सत्ता यांच्यातील संबंधामुळे मानवी मूल्यांचा संकोच होत असेल तर या गोष्टींचा अभ्यास करून त्या आदर्श तत्त्वांची वा मानवी मूल्यांची पुनर्स्थापना करण्याच्या कार्यात त्या समाजातील लोकांना कसे सहभागी करुन घेता येईल याचा अभ्यास करण्याकडे समाजशास्त्रज्ञांनी लक्ष द्यावे असे डॉ. मुखर्जींनी सुचविलेले आहे.

**३) उपयोजित शास्त्र** – डॉ. मुखर्जी हे समाजशास्त्राकडे उपयोजित (रंश्रिळशव) म्हणजेच व्यवहारोपयोगी शास्त्र म्हणून पाहतात. त्यांच्या मते समाजशास्त्र हे इतर सामाजिक शास्त्रांपेक्षा अधिक व्यापक असे शास्त्र आहे. समाजाविषयीचे केवळ सैध्दांतिक ज्ञान उपलब्ध करुन देणे एवढेच समाजशास्त्राचे कार्य नाही तर मानव समाजातील विविध सामाजिक समस्यांचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करुन त्या समस्यांची वास्तविक कारणे शोधून काढण्याचे व त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपाययोजना सुचविण्याचेही कार्य समाजशास्त्राने

करावे असे ते म्हणतात. समाजशास्त्राने हे विधायक कार्य हाती घेतल्यास समाजाचे संघटन व ऐक्य टिकून राहण्यास तसेच त्याचे संरक्षण व विकास होण्यास मदत होईल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केलेली आहे. मानवापुढील ज्या प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत ती उत्तरे शोधण्याचे कार्य समाजशास्त्राने करावे असेही त्यांनी सुचविलेले आहे. यासंदर्भात त्यांनी ज्ञानाचे समाजशास्त्र, मूल्यांचे समाजशास्त्र, प्रतीकांचे समाजशास्त्र, कलेचे समाजशास्त्र, धर्माचे समाजशास्त्र इत्यादी शाखा विकसित करण्यावर भर दिलेला आहे.

**४) दुहेरी दृष्टिकोन** – डॉ. मुखर्जी हे समाजशास्त्राकडे तात्त्विक – समाजशास्त्रीय (philosophical sociological) आणि तार्किक – समाजशास्त्रीय (Logical- sociological) अशा दुहेरी दृष्टिकोनातून पाहतात. त्यांच्या मते समाजशास्त्रास तत्त्वज्ञानाची जोड दिली पाहिजे. त्यामुळे समाजशास्त्र हे अधिक व्यापक, सर्वस्पर्शी होईल व त्याचे निष्कर्ष हे सर्व काळातील सामाजिक घटनांना लागू पडतील. समाजशास्त्रीय विचार हे सामाजिक तत्त्वज्ञांनाशी निगडित आहेत. त्यामुळे सर्व काळात सर्व परिस्थितीत लागू पडणाऱ्या जीवनमूल्यांच्या आधारावर समाजशास्त्रीय सिद्धांत प्रस्थापित करण्याचा प्रयत्न संशोधकांनी करावा असे डॉ. मुखर्जींनी सुचविले आहे. मूल्ये ही बऱ्याच प्रमाणात मानवी कल्याण व आदर्शवाद यांच्याशी निगडित असतात. तथापि, ही मूल्ये कितपत तार्किक व वास्तववादी आहेत याचे विश्लेषण समाजशास्त्रीय संशोधकांनी केले पाहिजे असे त्यांचे मत आहे. म्हणून त्यांनी समाजशास्त्रांत तार्किक – समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचा पुरस्कार केलेला आहे.

**प्रादेशिक समाजशास्त्र** (Regional sociology)– डॉ. मुखर्जींनी प्रादेशिक समाजशास्त्र या संकल्पनेसंबंधीही आपले विचार मांडलेले आहेत. १९२६ मध्ये त्यांनी ठशसळेपरश्र डेलळेश्रेसू हा ग्रंथ प्रकाशित केला व त्यामध्ये प्रादेशिक समाजशास्त्र या संकल्पनेचा ऊहापोह केलेला आहे. समाजशास्त्र हे मानव समाजाचा अभ्यास करते. तथापि अखिल मानव समाज हा अत्यंत विशाल असून त्याची संरचना ही खूपच संकीर्ण आहे. तसेच अखिल मानव समाजातील सामाजिक संबंधात खूपच विविधता असून या संबंधात सतत बदल होत असतात. शिवाय अखिल मानव समाजातील सामाजिक समस्या ही अत्यंत क्लिष्ट व गतिशील स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अखिल मानव समाजाचा विश्लेषणात्कम अभ्यास (analytical study) करणे अत्यंत अवघड आहे असे डॉ. मुखर्जी म्हणतात. जर आपण समाजशास्त्राच्या अभ्यास विषयावर प्रदेशाची मर्यादा टाकली तर मात्र आपणास त्या विषयाचा सूक्ष्म स्तरावर अभ्यास करणे सोपे जाईल असे ते म्हणतात. जगात अनेक मानव समाज आहेत. प्रत्येक समाज हा एक प्रादेशिक समूह आहे. म्हणजे प्रत्येकास स्वतःचा असा विशिष्ट भूप्रदेश आहे. त्यामुळे प्रत्येक मानव समाज हा प्रादेशिक समाज ठरतो. प्रत्येक प्रादेशिक समजाची समाजव्यवस्था त्यातील सामाजिक संबंधांचे स्वरुप, त्याच्या सदस्यांचे वर्तन आणि त्या समाजाची सांस्कृतिक वैशिष्ट्ये इत्यादी गोष्टी वैशिष्ट्यपूर्ण अशा असतात. या वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी त्या प्रादेशिक समाजात घडणाऱ्या घटनेला किंवा समस्येला कारणीभूत ठरत असतात. उदा. लोकसंख्या वाढ किंवा गुन्हेगारीचे वाढते प्रमाण या समस्या अनेक राष्ट्रांना भेडसावत आहेत. तथापि, प्रत्येक राष्ट्रातील सामाजिक व्यवस्था ही वेगळी असून ती त्या समस्यांना कारणीभूत ठरते. त्यामुळे एका राष्ट्रातील लोकसंख्या वाढीस व वाढत्या गुन्हेगारीस

जे घटक कारणीभूत ठरतात तेच घटक इतर राष्ट्रातील या समस्यांना कारणीभूत ठरत असतीलच असे नाही. म्हणून सामाजिक घटनांचा अभ्यास करताना त्यावर प्रदेशाची मर्यादा टाकणे उचित ठरेल असे डॉ. मुखर्जी म्हणतात. थोडक्यात विशिष्ट प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या समाजातील सामाजिक घटनांचा व समस्यांचा अभ्यास समाजशास्त्रज्ञांनी करावा असे मुखर्जी म्हणतात. या अभ्यासासच प्रादेशिक समाजशास्त्र असे म्हटलेले आहे. प्रत्येक समाज हा प्रादेशिक तत्त्वानुसार ओळखला जातो. उदा.अमेरिकन समाज, भारतीय समाज इत्यादी त्यामुळे त्या त्या प्रादेशिक समाजाचा अभ्यास करणारे प्रादेशिक समाजशास्त्र निर्माण होणे स्वाभाविकच आहे असे मुखर्जी म्हणतात. उदा. अमेरिकन समाजाचा अभ्यास करणारे अमेरिकन समाजशास्त्र व भारतीय समाजाचा अभ्यास करणारे भारतीय समाजशास्त्र उदयास आलेले आहे. अशा वेगवेगळ्या प्रादेशिक समाजातील सामाजिक घडामोडींचा अभ्यास करुन त्या आधारे त्या समाजातील समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक वास्तवतेचा शोध घ्यावा असे मुखर्जी सुचवितात.

डॉ. मुखर्जींनी प्रादेशिक समाजशास्त्राचा पुरस्कार केलेला असला तरी समाजशास्त्राचे कार्यक्षेत्र हे केवळ प्रादेशिक समाजाच्या अभ्यासापुरते मर्यादित नाही असे त्यांनी आवर्जून प्रतिपादन केलेल आहे. त्यांच्या मते अखिल मानव समाजाच्या स्वास्थ्यासाठी आवश्यक असणाऱ्या समान मूल्यांचा अभ्यास, चिंतन व मनन करण्याचे कार्य समाजशास्त्राने केले पाहिजे. प्रत्येक राष्ट्रातील समाजव्यवस्था ही वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण असली तरी अखिल मानवजातीचे कल्याण साध्य करणाऱ्या तत्त्वांचा व तंत्रांचा शोध घेण्याचे कार्य समाजशास्त्राने केले पाहिजे असे ते म्हणतात. प्रत्येक प्रादेशिक समाजात विविधता असली तरी अखिल मानवजातीचे संरक्षण व कल्याण करण्यासाठी आवश्यक असणारी समान मूल्ये शोधण्याचा सतत प्रयत्न समाजशास्त्रज्ञांनी करावा असे मत त्यांनी व्यक्त केलेले आहे.

## २.२.२ मूल्ये : मूल्यांची वैशिष्ट्ये, मूल्यांचा प्रादेशिक आधार, मूल्ये आणि प्रतीके, व्यक्तिमत्त्व आणि मूल्ये

डॉ. मुखर्जींचे सामाजिक शास्त्रे, समाजशास्त्र व प्रादेशिक समाजशास्त्र याबाबतचे विचार अभ्यासल्यानंतर आता तुम्ही त्यांचे मूल्याविषयीचे विचार समजावून घेणार आहोत. डॉ. मुखर्जींचे समाजशास्त्राला दिलेले महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे त्यांनी मांडलेला मूल्याविषयक सिद्धांत होय. त्यांच्या या मूल्यविषयक सिद्धांतामुळे समाजशास्त्रात 'मूल्यांचे समाजशास्त्र' ही शाखा उदयास आली. मूल्यविषयक सिद्धांमुळेच त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर कीर्ती प्राप्त झाली.

डॉ. मुखर्जींच्या मते मानव समाजाचा अभ्यास करताना समाजातील मूल्यव्यवस्थेचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. कारण मूल्यव्यवस्थेचा व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनावर मोठा प्रभाव असतो. त्यामुळे मूल्यव्यवस्था अभ्यासल्याशिवाय समाजाचे वस्तुनिष्ठ ज्ञान होऊ शकत नाही. डॉ. मुखर्जींना मानव समाजात सार्वत्रिक स्वरुपात आढळणाऱ्या सामाजिक आंतरक्रियांच्या पार्श्वभूमीवर मूल्यांचा अभ्यास केलेला आहे. त्यांच्या मते, व्यक्तीचे वर्तन व व्यक्तिव्यक्तीतील परस्परसंबंध यातून मूल्ये व्यक्त होत असतात. व्यक्तीच्या व्यक्तिगत व सामाजिक आशा-आकांक्षा, उद्दिष्टे साध्य करण्याच्या प्रक्रियेवर मूल्यांचा प्रभाव पडत असतो. मूल्यांमुळेच व्यक्तिव्यक्तींमध्ये तसेच व्यक्ती व समाज यांच्यात एकात्मता (inte-

gration) निर्माण होते. आणि ही एकात्मता व्यक्तींच्या आशाआकांक्षा व उद्दिष्टांना प्रेरणा देते. म्हणून मानव समाजाचे व मानवी जीवनाचे यथार्थ आकलन होण्यासाठी मूल्यांचा अभ्यास आवश्यक ठरतो. सत्य, सुंदरता, चांगलेपणा, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय, प्रामाणिकपणा, दया, क्षमा, शांती इत्यादी मूल्ये ही शाश्वत (चिरंतन) स्वरुपाची असून ती मानवी संस्कृतीचा अविभाज्य घटक आहेत. समाजातील ही मूल्ये सामाजिक वारशाच्यारूपाने पिढ्यानपिढ्या संक्रमित होत आलेली आहेत.

डॉ. मुखर्जींनी आपल्या बहुतेक ग्रंथात मूल्यांसंबंधी काही ----- तरी विवेचन केलेले आढळते. तथापि, त्यांचे मूल्याविषयक हे प्रामुख्याने The Social Structure of Values आणि The Dimensions of Values (१९६४) या दोन ग्रंथात मांडलेले आढळतात. पहिल्या ग्रंथात त्यांनी मूल्यांचा उदय व विकास, मूल्यांचे नियम, मूल्यांची संरचना यांचे विवेचन पौर्वात्त्य व पाश्चिमात्त्य संस्कृतीच्या संदर्भात केलेले आहे. तर दुसऱ्या ग्रंथात त्यांनी मूल्यांचे आयाम (dimensions) शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे करताना त्यांनी जीवशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान इत्यादींमध्ये मूल्यांचे जे विश्लेषण केलेले आहे, त्यांना समान्वित केलेले आहे. त्यांच्या मते मूल्यांच्या विश्लेषणासाठी आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन आवश्यक आहे. कारण आज मूल्यांविषयीची सार्वत्रिक स्वरुपाची अशी एक सामान्य विचारसरणी प्रचलित नाही. अशा विचारसरणीशिवाय मानवाची वास्तविक प्रगती होऊ शकणार नाही. या ठिकाणी तुम्ही मूल्यांची वैशिष्ट्ये अभ्यासणार आहात. त्यासाठी प्रथम डॉ. मुखर्जींनी दिलेली मूल्यांची व्याख्या पाहणे उचित ठरेल.

**मूल्याची व्याख्या–** मूल्ये ही समाजसंमत अशा इच्छा वा ध्येये असून त्यांचे आंतरीकरण हे शिकण्याच्या व समाजीकरणाच्या प्रक्रियेच्या माध्यमातून होते. मूल्ये ही व्यक्तिनिष्ठ प्राधान्ये, आर्दश व आकांक्षा यांना जन्म देतात. (Values are socially approved desires or goals that are internalized through the process of conditioning and socializtion. They generate subjective preferences, standards and aspirations.)

डॉ. मुखर्जींच्या या व्याख्येवरुन मूल्याविषयीचे पुढील मुद्दे आपल्या लक्षात येतात.

* मूल्ये ही समाजाने मान्यता दिलेल्या इच्छा व ध्येये असतात.
* शिकण्याच्या किंवा समाजीकरणाच्या प्रक्रियेच्या माध्यमातून व्यक्तीमध्ये मूल्यांचे आंतरीकरण होत असते. म्हणजेच या प्रक्रियेद्वारे मूल्ये व्यक्तीच्या मनावर बिंबविली जातात व व्यक्ती ती आत्मसात करतात.
* मूल्ये ही व्यक्तीने कोणत्या गोष्टींना प्राधान्य वा प्राथमिकता द्यावी, कोणते आदर्श (Standrads) व आकांक्षा बाळगाव्यात यांचे निर्धारण करतात.

  * मूल्यांचा विकास होणे ही जैविक वा आनुवंशिक प्रक्रिया नसून ती सामाजिक – सांस्कृतिक प्रक्रिया आहे. कारण मूल्ये ही संस्कृतीद्वारे सामाजिक वारशाच्या रुपाने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित (संक्रमित) होत असतात. म्हणजेच मूल्ये ही व्यक्तीला त्याच्या समूहाच्या–संस्कृतीच्या द्वारे प्राप्त होत असतात.
* व्यक्ती ह्या मूल्याभिमुख (Value-oriented) बनण्याचा प्रयत्न करीत असतात.

म्हणजेच मूल्यांना अनुरुप असे वर्तन करण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे मूल्ये ही सामाजिक व्यवहाराची प्रतिमाने म्हणून समाजात रूढ होतात.

* मूल्यांच्या द्वारे सर्व वस्तूंचे मग त्या विचार, वर्तन प्रकार, भावना, पदार्थ, घटना, व्यक्ती, समूह, ध्येय इत्यादी काहीही असोत मूल्यांकन केले जाते. म्हणजेच योग्य काय-अयोग्य काय, इष्ट काय-अनिष्ट काय, चूक कोणते-बरोबर कोणते इत्यादीबाबतचा निर्णय हा मूल्यांच्या आधारेच घेतला जातो.

**मूल्यांची वैशिष्ट्ये** (Characteristics of values)

डॉ मुखर्जींनी मूल्यांची पुढील वैशिष्ट्ये विशद केलेली आहेत.

१) <u>सार्वत्रिक</u> (Universality) - मूल्ये ही सार्वत्रिक स्वरुपात आहेत. म्हणजेच सर्व मानवी समाजात, समूहात, देशांत राष्ट्रात मूल्यांचे अस्तित्व दिसून येते. मूल्यांची संकल्पना आढळून येत नाही असा एकही समाज, समूह वा समुदाय नाही. समाजातील व्यक्तींच्या परस्परसंबंधांचे व सामाजिक व्यवहारांचे निर्धारण मूल्यांद्वारेच केले जाते. मूल्यांना प्रमाण मानून व्यक्ती समाजात वा समूहात वास्तव्य करते व आपल्या आशा आकांक्षांची व गरजांची पूर्तता करते. व्यक्तीच्या सर्व क्रियांना मार्गदर्शन करण्याचे काम मूल्येच करीत असतात. डॉ. मुखर्जीच्या मते काही मूल्ये ही शाश्वत किंवा चिरंतन स्वरुपाची आहेत. सत्य, सुंदरता, चांगुलपणा (goodness), समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय, मानवता इत्यादी मूल्ये ही शाश्वत असून ती सार्वत्रिक स्वरुपाची आहेत. त्यांच्यावर स्थळ (प्रदेश वा समाज) व काळ यांचा प्रभाव पडत नाही. मानवाच्या गरजांची पूर्तता करुन समाजाचे अस्तित्व व सातत्य टिकवून ठेवण्यामध्ये ही शाश्वत मूल्ये महत्त्वाची भूमिका पार पाडीत असतात. त्यामुळे अशा मूल्यांचे संरक्षण व संवर्धन करण्याचा प्रयत्न प्रत्येक समाज करीत असतो. व्यक्तींनी मूल्यांनुसार वर्तन करावे, त्यांचे पालन करावे म्हणून समाज व्यक्तीवर्तनावर नियंत्रण ठेवण्याची व मूल्यांचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा करण्याची व्यवस्था निर्माण करतो. अखिल मानवजातीचे विषमता, अन्याय, अकल्याण, असुरक्षितता इत्यादींपासून संरक्षण करणे, वैयक्तिक व सामाजिक जीवन जगण्यासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करणे व समाजाचे संघटन व ऐक्य टिकवून ठेवणे हे शाश्वत मूल्यांचे उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी ही मूल्ये प्रत्येक समाजात उदयास आलेली आहेत. त्यामुळेच ती सार्वत्रिक स्वरुपाची आहेत.

२) <u>गति शिलता</u> (Dynamism) - मूल्ये ही गतिशील स्वरुपाची असतात. म्हणजेच ती परिवर्तनशील असतात. मूल्ये ही समाजात उदयास येऊन विकसित होतात. तथापि, त्यांचे स्वरुप नेहमीच एकसारखे, स्थिर नसते. समाजातील परिस्थिती बदलली की मूल्यांमध्येही बदल होत असतात. मनुष्य हा विचारशील प्राणी आहे. काळाच्या ओघात त्याच्या विचारांमध्ये बदल होतो. आपल्या गरजा व आशा आकांक्षांच्या पूर्ततेसाठी तो अधिक उपयुक्त अशा नवनवीन पद्धती, तंत्रे, साधने वापरतो. समाजा भोवतालची परिस्थिती व समाजातील आंतरिक व्यवस्था यांच्यामुळे या पद्धती, तंत्रे व साधने यांच्यात बदल होत असतो. या बदलांना अनुसरुन समाजाच्या मूल्यांमध्येही बदल होत असतात. जी मूल्ये १९ व्या शतकात व २० व्या शतकाच्या पूर्वार्धात स्त्रियांना चार भिंतीच्या आत कोंडून ठेवणे,

त्यांना शिक्षण न देणे, त्यांचा बालवयातच विवाह करणे, त्यांनी अर्थार्जन न करणे इत्यादीं संदर्भात प्रचलित होती ती आज बऱ्याच प्रमाणात बदलली आहेत. आज स्त्रियांनी घराबाहेर पडून शिक्षण घेणे, नोकरीधंदा करुन अर्थार्जन करणे, उशिरा विवाह (प्रौढ विवाह) करणे इत्यादी गोष्टी योग्य मानल्या जाऊ लागल्या आहेत.

**३) <u>संकीर्णता</u>** (Complexity)- मूल्ये ही अत्यंत संकीर्ण (जरी ---क्लिष्ट) स्वरुपाची असतात. मूल्यांमध्ये संकीर्णता निर्माण होण्याची प्रमुख तीन कारणे आहेत.

अ) <u>गतिशीलता</u>- बदलत्या परिस्थितीनुसार व काळानुसार मूल्यांमध्ये परिवर्तन होत असल्याने त्यांचे स्वरुप नेहमी स्थिर व एकसारखे राहात नाही. त्यांच्यात होणाऱ्या परिवर्तनामुळे त्यांचे स्वरुप गुंतागुंतीचे बनते.

ब) <u>विविधता</u> - प्रत्येक समाजात रूढी, परंपरा, आचारविचार, संस्कार, जीवनशैली, जीवनविषयक दृष्टिकोन इत्यादीबाबत मोठी विविधता (diversity) असते. समाजातील बरीच मूल्ये ही या वैविध्यपूर्ण गोष्टींशी निगडित असतात. त्यामुळे मूल्यांमध्येही विविधता निर्माण होऊन त्यांचे स्वरुप संकीर्ण बनते.

क) <u>मूल्य संघर्ष</u> - मूल्यांमूल्यांमध्ये होणाऱ्या संघर्षामुळेही मूल्यांमध्ये संकीर्णता निर्माण होते. प्रत्येक पिढीची स्वतःची अशी मूल्ये असतात. साधारणपणे वृद्ध पिढी ही जुन्या मूल्यांना चिकटून राहते, तर नवी पिढी ही नवीन मूल्यांचा पुरस्कार करते. यातून दोन पिढ्यांत संघर्ष उद्भवतो. यासच मूल्यसंघर्ष म्हणतात. या संघर्षातून आजची मूल्ये ही उद्या जुनी ठरतात व त्यांच्या जागी नवी मूल्ये येतात. जुन्या मूल्यांद्वारे नव्या पिढीच्या नव्या आशा-आकांक्षा पूर्ण होत नसतील तर नवी पिढी नवीन मूल्यांचा पुरस्कार करते. या प्रक्रियेत मूल्यसंघर्ष उद्भवतो व त्यातून मूल्यांचे स्वरुप अधिक संकीर्ण बनते.

**४) <u>प्रतिकात्मकता</u>** (symbolism) - समाजातील प्रचलित मूल्ये ही कोणत्या ना कोणत्यातरी प्रतीकांशी (symbols) जोडलेली असतात. मूल्ये ही अमूर्त असतात. आणि प्रतीकांच्याद्वारे मूल्ये दर्शविली जातात. मूल्ये ही धार्मिक, आर्थिक, राजकीय अशा कोणत्याही क्षेत्राशी संबंधित असोत, ती कोणत्या ना कोणत्यातरी प्रतीकांशी संबंधित असतात व त्या प्रतीकाद्वारेच मूल्यांचा अन्वयार्थ (interpretation) लावता येतो व त्यांना समजावून घेता येतो. म्हणजेच मूल्यांचे आकलन हे प्रतिकांद्वारे होत असते. प्रतीकेच मूल्यांचे महत्त्व समाजाच्या सदस्यांना पटवून देत असतात. समाजातील स्थैर्य (ीींरलळश्रळीूं) तसेच समाजातील परिवर्तनाच्या प्रवृत्ती यांचे आकलन प्रतीकांच्या माध्यमातूनच होत असते. समाजसंमत अशा मूल्यांचे पावित्र्य टिकविण्यासाठी व ती मूल्ये लोकांच्या मनावर बिंबविण्यासाठी प्रतीकांचा वापर केला जातो. उदा. राष्ट्रप्रेमाचे मूल्य हे राष्ट्रध्वज या प्रतीकाद्वारे बिंबविले जाते. विविध धार्मिक समुदाय हे आपल्या धर्माचे तत्त्वज्ञान आपल्या सदस्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी प्रतिकांचाच वापर करतात. 'ॐ' किंवा 'स्वास्तिक' हे हिंदुधर्मातील, '७८६' हा अंक इस्लाम धर्मातील तर 'क्रूस' हे ख्रिस्तीधर्मातील प्रतीकेच आहेत. थोडक्यात अमूर्त अशी मूल्ये ही मूर्त अशा प्रतीकांद्वारे प्रकट किंवा व्यक्त केली जातात. अशा या प्रतीकांचे पावित्र्य राखले जावे, त्यांच्याविषयी आदरभाव बाळगावा अशी समाजाची अपेक्षा असते व ती पूर्ण व्हावी म्हणून समाज प्रयत्नशील असतो. कारण प्रतीकांमुळे लोकांत भावनिक ऐक्य व संघटन निर्माण होण्यास मदत होत असते.

५) **<u>सांस्कृतिक महत्त्व</u>** (Cultural importance) – मूल्ये ही सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची असतात. समाजातील मूल्ये व त्याची संस्कृती यांचा घनिष्ठ संबंध असतो. कोणत्याही समाजाच्या मूल्यांवरच त्याच्या संस्कृतीची उभारणी झालेली असते. त्यामुळे समाजाच्या संस्कृतीतील स्थिरता व तिच्यात होणारे परिवर्तन यांचे ज्ञान मूल्यांमुळेच होत असते. एखादा समाज हा किती मागासलेला आहे किंवा किती प्रगत आहे, त्याची सभ्यता किंवा संस्कृती ही किती प्राचीन आहे व तिच्यात नावीन्याची कोणकोणती वैशिष्ट्ये विकसित होत आहेत याबाबतचे ज्ञान त्या समाजातील मूल्यांमुळेच होत असते. कोणत्याही समाजाच्या सांस्कृतिक वारशाची निर्मिती दर्शविण्याचे काम त्यातील मूल्येच करीत असतात.

**मूल्यांचा प्रादेशिक आधार**_ (Regional basis of values)

मूल्यांची व्याख्या व वैशिष्ट्ये अभ्यासल्यानंतर आता तुम्ही मूल्यांचा प्रादेशिक आधार समजावून घेणार आहात. The social structure of values या आपल्या ग्रंथात डॉ. मुखर्जींनी मूल्यांचे प्रादेशिक आधारावर विवेचन केलेले आहे. यासंदर्भात त्यांच्या विचारावर राबर्ट पार्क, पेट्रिक गिडीस, लुईस ममफोर्ड, ओडम या समाजशास्त्रज्ञांनी मांडलेल्या नैसर्गिक प्रदेशाच्या संकल्पनेचा (Concept of natural region) प्रभाव असल्याचे दिसून येते.

डॉ. मुखर्जींच्या मते एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणारा मानवी समूह हा मानवामानवातील परस्परसंबंधांचे एक जाळे असते. या मानवी समूहातील रुढी परंपरा, सवयी, संस्कृती इत्यादींची जडणघडण करण्यामध्ये त्या समूहाच्या भूप्रदेशातील पर्यावरणीय घटकांचा मोठा प्रभाव पडत असतो. आपले अस्तित्व टिकविण्यासाठी व विकास घडवून आणण्यासाठी मानवी समूहातील व्यक्ती ह्या आपल्या देशाच्या पर्यावरणातील जैविक (उदा. वनस्पती, पशुपक्षी इ.) व अजैविक (उदा. माती, पाणी, खनिजसंपत्ती, हवामान इ.) घटकांशी अनुकूलन साधत असतात. डॉ. मुखर्जींच्या मते मानवी समूहाचे भौगोलिक पर्यावरण हे त्या समूहाला आर्थिक चौकट व सांस्कृतिक सुव्यवस्था (order) मिळवून देण्यासाठी नेहमीच साहाय्यक ठरत असते. त्यामुळे कोणत्याही भूप्रदेशातील मानवी समूहाचा वा समाजाचा आर्थिक व सांस्कृतिक आधार हा प्रदेशसापेक्ष स्वरुपाचा असतो.

**<u>प्रदेश व मूल्ये यांच्यातील अन्योन्य संबंध–</u>** डॉ. मुखर्जींच्या मते मानव समाजाचा भूप्रदेश व त्याची मूल्ये यांच्यात अन्योन्य असा संबंध असतो. कोणत्याही प्रादेशिक समाजातील आर्थिक, व्यावसायिक, सामाजिक, सांस्कृतिक मूल्ये ही त्या प्रदेशाच्या पर्यावरणीय घटकांवर आधारलेली असतात. वेगवेगळ्या समाजांचे भौगोलिक पर्यावरण वेगवेगळे असते. त्यामुळे त्यांची मूल्ये देखील वेगवेगळी असतात. म्हणजेच पर्यावरणीय घटकांतील भिन्नतेमुळे मूल्यव्यवस्थेतही भिन्नता निर्माण होत असते. एवढेच नव्हे तर पर्यावरणात नैसर्गिकपणे किंवा मानवी हस्तक्षेपामुळे परिवर्तन घडून आले की त्याचा प्रभाव पडून मूल्यव्यवस्थेतही परिवर्तन घडून येत असते. थोडक्यात समाजा––प्रदेशातील पर्यावरणीय घटकांचा प्रभाव त्याच्या मूल्यव्यवस्थेवर पडत असतो. तथापि हा प्रभाव एकेरी स्वरुपाचा नाही. पर्यावरण घटकाचा प्रभाव जसा मूल्यव्यवस्थेवर पडतो तसाच मूल्यव्यवस्थेचा प्रभावही पर्यावरणावर पडत असतो व त्यातून पर्यावरणात परिवर्तन घडून येत असते. आज मानव

आर्थिक विकासाच्या हव्यासापोटी पर्यावरणातील घटकांचा अविवेकी व अतिरेकी स्वरुपात वापर करु लागल्याने पर्यावरणाचा समतोल ढासळलेला आहे. ही गोष्ट मूल्यांचा पर्यावरणावरील प्रभाव स्पष्टपणे लक्षात आणून देते.

**प्रादेशिक समतोलावर भर** – डॉ. मुखर्जींनी प्रदेशाच्या अध्ययनात प्रादेशिक समतोलावर (ठशसळेपरश्र लरश्ररपलश) भर दिलेला आढळतो. त्यांनी जी प्रादेशिक समतोलाची संकल्पना मांडलेली आहे, तिलाच ते सामाजिक परिस्थितीशास्त्र (social ecology) असे म्हणतात. या शास्त्रात समुदायांचे संघटनात्मक स्तरावर जसे अध्ययन केले जाते तसेच व्यक्ती, प्रदेश, वनस्पती इत्यादीतील परस्परसंबंधांचेही अध्ययन केले जाते. आपला निर्वाह चालविण्यासाठी मानव ज्या विविध क्रिया करतो त्या क्रिया ह्या प्रदेशाशी निगडित असतात. विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या समाजाच्या अर्थव्यवस्थेचे स्वरुप हे त्या प्रदेशातील नैसर्गिक वा भौगोलिक घटकांद्वारे निर्धारित होत असते असे डॉ. मुखर्जींचे मत आहे. निसर्गावर विजय मिळविण्याच्या नादात मानवाकडून प्रादेशिक समतोल बिघडविला जातो व त्यातून अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. मानवाचा निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, प्रवृत्ती व मानवी कृती यामुळेच प्रादेशिक समतोल ढळत असल्याने हा समतोल टिकविण्याची जबाबदारी सामूहिक स्वरुपात मानव समाजाचीच आहे, असे मत डॉ. मुखर्जींनी व्यक्त केले आहे.

**निसर्ग नियमांचे पालन** – डॉ. मुखर्जींच्या मते निसर्गाचे स्वतःचे असे काही नियम (Laws of nature) आहेत. मानवाला जर निसर्गावर विजय मिळवावयाचा असेल तर त्याने निसर्गाचे हे नियम पाळलेच पाहिजेत. निसर्गाचा समतोल बिघडणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. अशा पद्धतीने जीवन जगण्यातच मूल्यव्यवस्थेचे महत्त्व आहे. डॉ. मुखर्जींनी मांडलेले त्यांचे तत्त्वज्ञान हे फक्त मूल्यांवर आधारलेले नसून ते जीवनावर आधारलेले आहे. आपले तत्त्वज्ञान मांडताना त्यांनी उपयोजित परिस्थितीशास्त्र (Applied ecology) व सहपरिस्थितीशास्त्र (syecology) या दोन संकल्पना विकसित केलेल्या आहेत. त्यांनी लोकसंख्येचा समतोल, ऊर्जेचे संरक्षण व संवर्धन, प्राण्यांच्या परिसंस्थेचे समतोल इत्यादींचा समावेश उपयोजित परिस्थितीशास्त्रात तर मानवी भूगोल, मानवी जीवशास्त्र, अर्थशास्त्र, सामाजिक मानसशास्त्र व तंत्रज्ञान इत्यादींचा पारस्पारिक सहसंबंधांचा समावेश सहपरिस्थितीशास्त्रात केलेला आहे. त्यांनी वनस्पती व प्राणी या दोन्हींची विचार करुनच आपला सामाजिक मूल्य सिद्धांत मांडलेला आहे. आज मानव हा विविधतेने नटलेल्या पर्यावरणात जीवन जगत आहे. त्याच्या जीवनाचा आधार म्हणून त्याच्या सभोवतालचा लोकस––, समाजव्यवस्था, पर्यावरण इत्यादी घटक त्याच्या मूल्यविषयक कल्पना निर्माण करतात.

अशाप्रकारे डॉ. मुखर्जींनी आपला मूल्यविषयक सिद्धांत हा प्रादेशिक आधारावर मांडलेला आहे. तो मांडताना त्यांनी निसर्गाचा समतोल राखणे हे मानवी हिताच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे असे प्रतिपादन केलेले आहे. निसर्गाचा समतोल ढळू देणे हे विचारशिलतेचे तसेच सुसंस्कृतणाचे लक्षण नव्हे. मानवाने जर निसर्गाचा समतोल टिकविण्याचे प्रयत्न केले नाहीत तर निसर्ग त्याची तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करतो व त्यातून मानवास अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, असे मत डॉ. मुखर्जींनी व्यक्त केलेले आहे.

**मूल्ये आणि प्रतीके** (Values and symobls)

आपले मूल्यासंबंधीचे विचार मांडताना डॉ. मुखर्जींनी समाजातील प्रतीकासंबंधीदेखील

मतप्रदर्शन केलेले आहे. त्यांचे मूल्य व प्रतीके यासंबंधीचे विचार आपण यापूर्वीच मूल्यांची वैशिष्ट्ये अभ्यासताना थोडक्यात समजावून घेतले आहेत. याठिकाणी आपण यासंबंधीचे त्यांचे विचार अधिक विस्ताराने समजावून घेणार आहोत. मूल्ये व प्रतीके याबाबतचे डॉ. मुखर्जींचे विचार बलजितसिंग यांनी संपादित केलेल्या The Frontiers of social science या ग्रंथात आढळतात.

**<u>प्रतीकांद्वारे मूल्यांची अभिव्यक्ती</u>** – डॉ. मुखर्जींच्या मते मूल्ये ही प्रतीकांशी संबंधित असतात. समाजात प्रचलित असलेली मूल्ये ही कोणत्या ना कोणत्यातरी प्रतीकांशी जोडलेली असतात. अमूर्त मूल्यांना दर्शविण्यासाठी, व्यक्त किंवा प्रगट करण्यासाठी प्रतीकांचा वापर केला जातो. अमूर्त मूल्यांची अभिव्यक्ती ही मूर्ती प्रतिकांद्वारे केली जाते. मूल्यांचा अन्वयार्थ (interpretation) लावण्याचे कार्य प्रतीके करीत असतात. मूल्यांचा अर्थ व महत्त्व हे प्रतीकांद्वारेच लोकांच्या मनावर बिंबविले जाते. उदा. राष्ट्रीय एकात्मतेचे मूल्य दर्शविण्यासाठी 'राष्ट्रध्वज' हे प्रतीक वापरले जाते. हिंदूंच्या दृष्टीने विवाह हे एक अतूट व पवित्र असे बंधन आहे. विवाहाची अतुटता व पावित्र्य हे विवाहित स्त्रीच्या गळ्यातील 'मंगळसूत्र' व कपाळावरील 'कंकू' या प्रतीकांच्याद्वारे व्यक्त केले जाते. मूल्यांबद्दल लोकांच्या मनात पावित्र्याची, आदराची भावना असते. प्रतीके पवित्र मूल्यांची अभिव्यक्ती करीत असल्याने साहजिकच समाज प्रतीकांविषयीदेखील पावित्र्याची व आदराची भावना बाळगतो. थोडक्यात पवित्र मूल्यांची अभिव्यक्ती करणाऱ्या प्रतिकांनाही पावित्र्य प्राप्त होते.

**<u>जनसंपर्काची माध्यमे</u>** – मनुष्य आपल्या सभोवतालच्या विश्वात मूल्यांचा शोध घेत असतो. डॉ. मुखर्जींच्या मते मूल्ये व प्रतीके यांच्याविषयीचे विचार हे सुसंस्कृत मानवी मनात विकसित होतात आणि त्या आधारेच मानवी संबंध हे दृढ होत असतात. समाजात प्रचलित असलेली मूल्ये व प्रतीके ही समाजातील विविध स्तरांतील लोकांना एकमेकांशी जोडण्याचे, त्यांच्यात संपर्क प्रस्थापित करण्याचे कार्य करतात. म्हणून डॉ. मुखर्जी हे मूल्ये व प्रतीकांना जनसंपर्काची प्रभावी माध्यमे वा साधने (agencies) मानतात.

**<u>सुसंघटित समाजव्यवस्थेच्या निर्मितीसाठी मूल्ये व प्रतीके आवश्यक</u>** – डॉ. मुखर्जींच्या मते सुसंघटित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी मूल्ये व प्रतीके आवश्यक आहेत. त्यांच्या मते मूल्ये ही समाजसंमत व समाजस्वीकृत अशी जीवनपद्धती आहेत. मूल्यांमध्ये मानवी आशा आकांक्षा व ध्येये ही समाजीकरणाच्या प्रक्रियेच्या माध्यमातून लोकांच्या जीवनपद्धतीशी एकरुप झालेल्या असतात. त्यामुळे त्यांच्या पूर्ततेसाठी लोक समाजमान्य मार्गाचाच अवलंब करीत असतात. त्यामुळे समाजात स्थिरता, शांतता व सौख्य निर्माण होते. परिणामी समाज सुसंघटित बनतो.

मानवी संबंध व मानवी वर्तन यांच्यामधून मूल्ये व्यक्त होत असतात. मानवाच्या वैयक्तिक व सामाजिक ध्येयांची व आशा-आकांक्षाची पूर्तता करण्याच्या प्रक्रियेवर मूल्यांचा प्रभाव पडत असतो. मूल्यांच्या या प्रभावामुळेच व्यक्तिव्यक्तींमध्ये तसेच व्यक्ती व समाज यांच्यात ऐक्यभाव निर्माण होत असतो. हाच ऐक्यभाव व्यक्तीच्या आशा-आकांक्षा व ध्येयांना प्रेरणा देण्याचे कार्य करीत असतो. डॉ. मुखर्जी म्हणतात की, समाजाची बांधणी करणे, सामाजिक संबंधात दृढता निर्माण करणे, सांस्कृतिक सामंजस्य वाढविणे यासंदर्भात मूल्ये महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात. व्यक्तीला सामाजिक अधिष्ठान प्राप्त करुन द्यावयाचे

असेल तर तिची जीवनपद्धती व जीवनविषयक मूल्ये ही समाजसापेक्ष असली पाहिजेत. व्यक्तीच्या वैयक्तिक व सामाजिक प्रतिसादांचा विचार मूल्यांच्या आधारावर झाला पाहिजे. ते पुढे म्हणतात, मूल्यांचा विचार हा प्रतीकात्मक स्तरावर झाला पाहिजे. मूल्यांद्वारे सामाजिक संप्रेषणाचे व वैयक्तिक व्यवहारांचे नियंत्रण करण्याचे कार्य साध्य होत असले तरी मानवी संबंध हे मूलतः प्रतीकात्मक (ेीलेश्रळल) स्वरुपाचे असतात. मूल्ये जेव्हा साररूपात व्यक्त केली जातात तेंव्हा त्यांना प्रतीकांचे स्वरूप प्राप्त होत असल्याने वेगवेगळ्या मूल्यांची वेगवेगळी प्रतीके असतात. शिवाय एकाच प्रतीकाचा अर्थ हा वेगवेगळ्या परिस्थितीत वेगवेगळा असतो. उदा. ''+'' या प्रतीकाचा अर्थ गणितात 'बेरीज' असा आहे, तर आरोग्याच्या क्षेत्रात मात्र त्याचा अर्थ 'सेवाभाव' असा आहे.

**इच्छा व गरजापूर्तीत मूल्यांचा व प्रतीकांचा प्रभाव** – समाजातील प्रत्येक व्यक्तीस आपल्या इच्छांच्या व गरजांच्या पूर्ततेसाठी परिस्थितीनुरुप सहकार्य, स्पर्धा व प्रसंगी संघर्ष देखील करावा लागतो. अन्न, वस्त्र, निवारा, लैंगिक तृप्ती इत्यादी मूलभूत गरजांची पूर्तता करताना व्यक्तीस समाजसंमत नियमांचे पालन करावे लागते. या प्रक्रियेत प्रतीके अधिक प्रभावी ठरतात असे मुखर्जी म्हणतात. त्यांच्या मते समाजात होणारी देवाणघेवाण, दर्जाधिष्ठित सामाजिक स्तरीकरण व लोकांच्या वर्तनाचे नियंत्रण करणारी सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था यांच्या माध्यमातून समाजात मूल्यव्यवस्था कार्यरत होत असते व त्यामुळे समाजाची जीवनमूल्ये ही दृश्य स्वरुपात दिसून येतात. प्रतीके ही मूल्यांचे दृश्यरुप वा मूर्त रुप असल्याने त्या प्रतीकांना सामाजिक प्रतिष्ठा व पावित्र्य लाभते व म्हणून लोक त्यांच्याप्रति आदरभाव राखण्याचा प्रयत्न करतात.

तथापि, आज सामाजिक मूल्यांना असलेले अधिष्ठान कमी होऊ लागले आहे. समता व न्याय प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूल्यांचे सामूहिकपणे जतन करण्याची गरज प्रत्येक समाजव्यवस्थेस भासू लागली आहे. साधारणपणे, उत्स्फूर्त प्रेम, सामाजिक जबाबदारी, ऐक्यभाव, परस्परसहकार्याची भावना यासारख्या गुणांमुळेच व्यक्तीत नैतिक मूल्यांचा पाया घातला जातो. उज्ज्वल भविष्यासाठी हा पाया गरजेचा असतो, असे मुखर्जी म्हणतात. उच्च मूल्यांच्या दृष्टिकोनातून पाहता असे आढळून येते की, मानवी जीवन हे इतरांच्या सहभागाशिवाय अपूर्ण आहे. मानव हा आत्मकेंद्री असला तरी त्याच्या अंतर्मनात 'वैश्विक स्व' (पिळींशीीरश्र ीशश्ष) ची जाणीव सदैव असते व त्यामुळे नैतिक मूल्यांच्या आधारे जगाची पुनर्रचना करणे गरजेचे आहे असे मुखर्जी म्हणतात.

**सामाजिक एकीकरणासाठी मूल्यांची गरज** – सामाजिक एकीकरणासाठी मूल्यांची गरज आहे असे मुखर्जी म्हणतात. समान मूल्ये धारण करणाऱ्या व्यक्तींमध्ये ऐक्यभाव निर्माण होतो. त्यांनी मूल्यांचे १) तात्कालिक (immediate) मूल्ये (तात्कालिक गरजापूर्तीच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली) २) विशिष्ट (specifice) मूल्ये (विशिष्ट उद्दिष्टाच्या पूर्तीच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली) ३) सार्वत्रिक (universal) मूल्ये (सार्वत्रिकपणे महत्त्वाच्या मानलेल्या ध्येयांच्या आदर्शाच्या पूर्तीच्यादृष्टीने महत्त्वाची असलेली) ४) अंतर्निहीत (instrict) मूल्ये (समूहात स्वतःच उत्स्फूर्तपणे विकसित होणारी व व्यक्तीच्या व समाजाच्या आंतरिक जीवनाशी निगडित असलेली) ५) आदर्श प्राप्तीची साधने म्हणून असलेली मूल्ये, असे पाच प्रकार पाडलेले आहेत. सामाजिक एकीकरणाच्या संदर्भात त्यांनी मूल्यांचे पुढील चार श्रेणीत

विभाजन केलेले आहे.

**१) जमाव** – अनैतिक कृत्य (उदा. चोरी) करणाऱ्यास जमाव प्रक्षुब्ध होऊन मारहाण करतो. जमावाचे हे कृत्य वरवर पाहता अयोग्य वाटत असले तरी त्याच्या मुळाशी नैतिक मूल्यांचे संरक्षण करणे हे उद्दिष्ट असते असे मुखर्जी म्हणतात.

**२) आर्थिक हितसंबंधी समूह** – फायदा मिळविणे, उत्कर्ष साधणे या हेतूच्या पूर्ततेसाठी हा समूह विधायक (परस्पर सहकार्य, ऐक्य, इतरांची कदर करणे, संस्था व संघटना स्थापणे इ.) तसेच विघातक (गळेकापू स्पर्धा, सुप्त संघर्ष, द्वेष, मत्सर, सूड इ.) मूल्यांचा अवलंब परिस्थितीनुसार करीत असतो.

**३) समाज वा समुदाय** – समता व न्याय या मूल्यांची प्रस्थापना करण्याचा प्रयत्न प्रत्येक समाज वा समुदाय करीत असतो.

**४) सामान्य जीवन** – सामान्य जीवनात उत्स्फूर्त प्रेम, सामाजिक जबाबदारी, सहकार्य, ऐक्य ही मूल्ये प्रमुख असून जगाच्या पुनर्रचनेसाठी ती आवश्यक आहेत असे मुखर्जी मानतात.

## <u>व्यक्तिमत्त्व आणि मूल्ये</u> (Personality and values)

आपल्या Personality या ग्रंथात डॉ. मुखर्जींनी व्यक्तिमत्त्व व मूल्ये यासंबंधीचे विचार मांडलेले आढळतात. त्यांच्या मते कोणत्याही प्रादेशिक किंवा धार्मिक समाजातील मुल्ये व मुल्यव्यवस्था यांचा प्रभाव त्या समाजातील प्रत्येक व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वावर सतत पडत असतो. मूल्यांमूळेच व्यक्तीचा गुणात्मक विकास घडून येतो व अशा विकासामुळेच प्रत्येक व्यक्ती ही मूल्यांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी दक्ष राहात असते. डॉ. मुखर्जींच्या मते ''व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व हे एक साधन (agent) आहे, जे निर्णय घेते, निवडी किंवा पसंती ठरविते व मूल्यांची सिद्धी किंवा परिपूर्ती करते'' ते म्हणतात. व्यक्तीवर दोन प्रकारचे प्रभाव (influences) असतात. १) निसर्ग, पर्यावरण आणि जैविक व मानसिक प्रेरणा व गरजा यांचा प्रभाव. २) समाजाचा किंवा सामूहिकतेचा (society or collectivity) प्रभाव. मानवाचे व्यक्तिमत्त्व हे या दोन प्रभावाद्वारे मोठ्या प्रमाणावर प्रभावित झालेले असते. तथापि, व्यक्तिमत्त्वाचे निर्धारण मात्र या दोन्ही प्रभावामुळे होत नसते. या दोन्ही प्रभावांच्या पलीकडे असलेला एक वेगळा गुण व्यक्तिमत्त्वामध्ये असतो.

**<u>व्यक्तिमत्त्वाची व्याख्या</u>** – डॉ. मुखर्जींनी व्यक्तिमत्त्वाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे. ''व्यक्तिमत्त्व ही जैविक, सामाजिक आणि आदर्श, वैश्विक किंवा अलौकिक या निरनिराळ्या स्तरांवर मिळतेजुळते घेण्याच्या व्यक्तीच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीचा समग्रता आहे.'' (Personality is the sum total of the individual's characteristic mode of adjustment at different dimensions:i) biological, ii) social, and iii) ideal, cosmic or transcendent.)

मानवी व्यक्तिमत्त्व हे एक जैविक व सामाजिक निर्मिती असून ते पर्यावरणाशी मिळतेजुळते घेण्याचे कार्य करीत असते. डॉ. मुखर्जींच्या मते, मात्र व्यक्तिमत्त्व याहून अधिक काहीतरी असते. ते संपूर्ण विश्वास प्रतिसाद देणारी मानसिक – सामाजिक आयाम वा पैलू (dimension) असतो. तथापि, व्यक्ती ही स्वतः व विश्व यांच्यात सलोख्याचे

संबंध प्रस्थापित करण्यासाठी स्वतःला समाजातील इतर व्यक्तींपासून वेगळी ठेवू इच्छिते. डॉ. मुखर्जींच्या मते एक स्वतंत्र साधन (free agent) असेल अशा व्यक्तिमत्त्वाच्या विकासाची प्रक्रिया सुलभ करणे हे समाजाचे व त्याच्या मूल्यव्यवस्थेचे कार्य आहे. त्यांच्या मते समाज ही संरचना व कार्ये यांची अशी समग्रता आहे जिच्याद्वारे मानव तिच्या पर्यावरणाच्या तीन स्तरांशी १) परिस्थितीविषयक (ecologic) २) मानसिक - सामाजिक (psycho - social) ३) नैतिक (moral) - स्वतःस अभिमुख बनविते. समाज हा दर्जा व मूल्यासिद्धी यांच्या निर्वाहासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत आवश्यकतांची पूर्तता करतो.

**मूल्ये व्यक्तिमत्त्वाची आधारशिला -** डॉ. मुखर्जींच्या मते मूल्ये व मूल्यव्यवस्था ही व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वास आकार देते, त्याला प्रभावित करते, मार्गदर्शन करते. मूल्यांद्वारेच व्यक्ती गुणात्मक सुधारणा व नाविन्य आणते. मूल्यांच्या माध्यमातूनच व्यक्ती आपली अंतर्दृष्टी व अनुभव यांना समृद्ध बनविते. असे करताना व्यक्ती ही आपल्या मूल्यांचा संचय करून त्यामध्ये वाढही करते. मूल्यांशिवाय व्यक्ती स्वतःशी तसेच समाजाशी सामंजस्य प्रस्थापित करू शकत नाही. त्यामुळे मूल्ये ही व्यक्तिमत्त्वाची आधारशिला ठरतात.

**समाजीकरणाची प्रक्रिया -** व्यक्तिमत्त्व विकासात समाजीकरणाच्या प्रक्रियेस महत्त्वाचे स्थान आहे. समाजीकरणाच्या प्रक्रियेच्या माध्यमातून व्यक्ती बालपणापासूनच विविध मूल्ये आत्मसात करते आणि ही मूल्ये तिला वर्तन प्रकारांचे शिक्षण देतात. मूल्ये ही व्यक्तीची स्वभाववैशिष्ट्ये व सवयी यांच्यावर प्रभाव टाकून तिच्या वर्तनाचे नियंत्रण करतात व तिला सुसंस्कारित करण्यात विशेष भूमिका पार पाडतात. मातापित्यांचा सन्मान करणे, चांगल्या ग्रंथांचे वाचन करणे, पूजाअर्चा करणे, कुटुंबातील प्रत्येक सदस्यास असलेले महत्त्व जाणणे. खेळात खिलाडीवृत्ती दाखविणे यासारखी मूल्ये व्यक्ती समाजीकरणाच्या प्रक्रियेतूनच शिकत असतात. व्यक्ती बाल्यावस्थेतून किशोरावस्थेत व तेथून पुढे प्रौढावस्थेत येत असताना तिच्या व्यक्तिमत्त्वात विविध प्रकारचे मानवी गुण (हींरप िींरश्रळींळशी) मूल्यांनुसार विकसित होतात. त्याग, सहानुभूती, परोपकार, सहकार्य इत्यादी भावनासुद्धा व्यक्ती मूल्यांच्या आधारे ग्रहण करीत असते.

**आदर्शवादी पैलूंवर भर -** व्यक्तिमत्त्व विकासात मूल्यांचे असलेले महत्त्व स्पष्ट करताना डॉ. मुखर्जींनी मूल्यांच्या आदर्शात्मक पैलूवर भर दिलेला आहे. त्यांच्या मते जर व्यक्ती आपल्या व्यक्तिमत्त्वास चांगले व उच्च दर्जाचे बनवू इच्छित असेल, त्याचा विकास घडवून आणू इच्छित असेल तर तिला आपल्या मूल्यांना सर्वोच्च स्थान दिले पाहिजे. त्यांना सर्वोच्च स्थानावर प्रस्थापित केले पाहिजे. जर मनुष्य आपल्या जीवनास उच्चतम अशा आध्यात्मिक पातळीवर पोहचवू इच्छित असेल तर त्याला सत्य, सुंदर, चांगलेपणा, प्रेम या मूल्यांचा विकास घडवून आणला पाहिजे. कारण या मूल्यांच्याद्वारेच सदृढ असे सामाजिक संबंध निर्माण होऊ शकतात. त्यांच्या आधारावर सामाजिक संस्थांची उभारणी होऊ शकते आणि त्यांच्याद्वारेच मानवी कल्याण साध्य होऊ शकते. म्हणून मूल्यांना आध्यात्मिकतेच्या सर्वोच्च पातळीवर घेऊन गेले पाहिजे.

**जीवनाचे तीन स्तर -** व्यक्ती आपल्या जीवनक्रमात प्रामुख्याने तीन स्तरातून वाटचाल करते. या वाटचालीत ती आपले व्यक्तिमत्त्व व मूल्ये यांच्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न

करते. हे तीन स्तर पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) जैव – सामाजिक स्तर –**_या स्तरावर व्यक्ती स्वतःस सामाजानुरूप बनविण्यासाठी व समाजातील प्रचलित नियमांचे पालन करण्यासाठी तत्पर असते. समाजात राहून सामाजिक नीतिनियमांचे पालन करून व्यक्ती सामाजिक जीवनाशी समरस होण्याचा प्रयत्न करते.

**ब) मानसिक स्तर –**_या स्तरावर व्यक्ती आपल्या समाजाशी मानसिकदृष्ट्या एकीकरण साधण्यासाठी धडपडत असते. आपल्या गरजांच्या पूर्ततेसाठी व स्वतःचा विकास घडवून आणण्यासाठी व्यक्ती आपल्या समाजबांधवांशी प्रेमाने, सहकार्याने वागण्याची आवश्यकता समजावून घेते. डॉ. मुखर्जींच्या मते, प्रेम व सहकार्याच्या आधारे समाज मानसिकदृष्ट्या एकात्म होऊ शकतो. समाजातील ऐक्य हेच समाजाचे सामर्थ्य असून हे सामर्थ्य समाजाचे संरक्षण व संवर्धन करीत असते.

**क) आध्यात्मिक स्तर –**_या स्तरावर व्यक्ती ईश्वर व वैश्विक व्यवस्था (cosmic order) यांच्याशी सुसंवाद व निकटता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते. या प्रयत्नामुळे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासात भर तर पडतेच शिवाय उच्च व उदात्त असा उदारमतवादी जीवनविषयक दृष्टिकोन स्वीकारण्याची क्षमता व्यक्तींमध्ये येते.

अशाप्रकारे व्यक्तिमत्त्वाचा विकास तीन स्तरातून होत जाऊन त्याद्वारे व्यक्ती समाजाभिमुख बनण्याचा प्रत्यन करीत असते असे, मुखर्जींचे मत आहे.

**समाजाचे स्थान –** व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत समाजास महत्त्वाचे स्थान आहे, असे डॉ. मुखर्जी म्हणतात. व्यक्तिविकासासाठी ज्या ज्या गोष्टींची गरज असते, त्या सर्व गोष्टी समाजाने उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत असे त्यांचे मत आहे. सांस्कृतिक विकासासाठी परिपूर्ण व एकात्म स्वरुपाच्या व्यक्तिमत्त्वाबरोबरच मुक्त अशा वैश्विक जाणिवेची आवश्यकता आहे. या जाणिवेच्या अभावामुळेच जगातील काही महान संस्कृतींचा अस्त झाला आहे. एवढेच नव्हे तर आजसुद्धा अनेक चांगल्या परंपरा नष्ट होत चालल्या आहेत असे त्यांचे प्रतिपादन आहे. व्यक्ती व परंपरागत मूल्यव्यवस्था यांच्यात पुरेसा समन्वय नसल्याने समाजाचा व व्यक्तिमत्त्वाचा संकोच होऊ लागला आहे. म्हणून व्यक्तिमत्त्वाचा शोध घेताना आपण सत्य, शिव, सुंदरता, प्रेम या शाश्वत मूल्यांचा ध्यास घेतला पाहिजे. निरंतरपणे चालणाऱ्या या जगात या मूल्यांच्या आधारेच नवीन समाजव्यवस्था उदयास येऊ शकेल, असा आशावाद डॉ. मुखर्जींनी प्रकट केलेला आहे.

## २.२.३ **समाजाविषयीचा सामान्य सिद्धांत** (General theory of Society)

यानंतर तुम्ही डॉ. मुखर्जींचा समाजाविषयीचा सामान्य सिद्धांत अभ्यासणार आहात. बलजितसिंग यांनी १९५६ मध्ये संपादित केलेल्या The Frontiers of social science या ग्रंथात डॉ. मुखर्जींना त्यांचा समाजाविषयीचा सामान्य सिद्धांत मांडला आहे.

**समाजाविषयीचा सामान्य सिद्धांत मांडण्याची गरज :** समाजाविषयीचा सामान्य सिद्धांत मांडण्याची गरज का आहे? या प्रश्नाचे उत्तर देताना डॉ. मुखर्जी म्हणतात की, समाज हा परस्पर संबंधित वास्तविकतांची समग्रता (totality of realitites) आहे. समाज ही एक अखंड व्यवस्था आहे. त्यामुळे त्याचे विभाजन करणे योग्य ठरत नाही. अशा

या अखंड व अविभाज्य समाजाचे यथार्थ ज्ञान मिळवावयाचे असेल तर त्याचा समग्र स्वरुपातच अभ्यास केला पाहिजे. मानव समाजाचे अंतरंग किंवा आंतरिक स्वरुप समजावून घेतल्याशिवाय त्याचे बाह्य रुप समजत नाही. म्हणून समाजाचे अंतरंग समजण्यासाठी व त्याचे वास्तविक ज्ञान होण्यासाठी समाजाच्या सामाजिक सवयी, रीतिरिवाज, मूल्ये प्रतीके या सर्वांचा समग्र किंवा एकत्रित स्वरुपात अभ्यास करुन समाजाविषयीचा सामान्य सिद्धांत प्रतिपादन केला पाहिजे.

**मूल्यांना महत्त्वपूर्ण स्थान –** डॉ. मुखर्जींच्या समाजाविषयीच्या सामान्य सिद्धांतात मूल्यांना महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या समाजाविषयीचा सामान्य सिद्धांत प्रतिपादन करणे हे मूल्यांच्या संदर्भातच शक्य आहे. कारण समाज हा मूल्यांचे संकलन व संघटन आहे. मानव हा आपल्या सामाजिक जीवनात सामाजिक आंतरक्रियांच्या माध्यमातून मूल्यांचा विकास घडवून आणतो. म्हणून समाजाविषयीचा सामान्य सिद्धांत मांडताना मूल्यांच्या अभ्यासावर मुखर्जी भर देतात.

**आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाचा पुरस्कार –** समाजाविषयीचा सामान्य सिद्धांत मांडताना डॉ. मुखर्जी आंतरविद्याशाखीय (Interdisciplinary) दृष्टिकोनाचा पुरस्कार करतात. समाजाविषयीचा सामान्य सिद्धांत मांडताना त्यांनी नैसर्गिक किंवा भौतिक शास्त्रे आणि मानवाच्या सामाजिक व मानसिक पैलूंशी (अंगांशी) संबंधित असेलेली शास्त्रे यांच्यामध्ये असलेले अडथळे काढून टाकणे आणि समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र यासारख्या सामाजिक शास्त्रांच्यामध्ये उभारलेल्या भिंती (compartments) पाडून टाकणे यावर भर दिला आहे. ते म्हणतात, जर विविध सामाजिक शास्त्रे ही स्वतःला सामाजिक जीवनाच्या वेगवेगळ्या अंगाशी संबंधित ठेवतील तर समाजाच्या समग्र स्वरुपाचे आकलन होऊ शकणार नाही व त्यामुळे समाजाविषयीचा समग्र सिद्धांत विकसित करणे शक्य होणार नाही. मानवी मन, मानवी जीवन व मानव समाज हे परस्परांशी घनिष्टपणे संबंधित असल्याने त्यांचे स्वरुप समजावून घेताना सामाजिक शास्त्रांतर्गत येणाऱ्या सर्व शास्त्रांनी आपापल्या ज्ञानांचे (विचारांचे) आपसात आदानप्रदान केले पाहिजे. म्हणजेच समाजाचे वास्तविक ज्ञान समग्र स्वरुपात होण्यासाठी अभ्यासकाने विविध ज्ञानशाखांचा अभ्यास करावयास हवा.

**मानव समाजाच्या अभ्यासाचे तीन घटक –** डॉ. मुखर्जींनी समाजाविषयीचा सामान्य सिद्धांत मांडताना समाजाचा अभ्यास तीन घटकांच्या संदर्भात करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते समाज हा संरचना व प्रकार्ये यांची एक व्यवस्था असून, या व्यवस्थेच्याद्वारे मानव आपल्या पर्यावरणाच्या तीन घटकांशी (आयामांशी किंवा स्तरांशी) अनुकुलन (समायोजन) साधतो. आपली उपजीविका, दर्जा व मूल्यांची पूर्तता यांच्याशी संबंधित असलेल्या आपल्या पायाभूत गरजांची पूर्तता करतो. हे तीन घटक पुढीलप्रमाणे आहेत.

**१) परिस्थितीविषयक** (Ecological) **घटक –** मानवसमाजाचे अस्तित्व व विकास हा मानव व निसर्ग यांच्यातील समतोलावर अवलंबून असल्याने निसर्गाचा म्हणजेच पर्यावरणाचा समतोल ढासळणार नाही याची काळजी घ्यावी लागते. आपले अन्न तयार करण्याची क्षमता मानवाकडे नाही. त्यासाठी त्याला वनस्पतींवर अवलंबून राहावे लागते. म्हणून वनस्पतींची लागवड व वाढ यासाठी आवश्यक असणारे घटक उपलब्ध करण्याची

जबाबदारी समाजावर येऊन पडते. मानवाने निसर्गाचा समतोल बिघडविल्यास त्याचे दुष्परिणाम समाजास भोगावे लागतात. म्हणून समाजाच्या अस्तित्वासाठी पर्यावरणाचा समतोल टिकविण्यास डॉ. मुखर्जी विशेष प्राधान्य देतात.

**२) मानस – सामाजिक** (Psycho - social) **घटक –** या घटकात मुखर्जी व्यक्ती व समाज यांच्यातील परस्परसंबंधावर भर देतात व त्या संबंधात सांस्कृतिक हितसंबंधांचे आदानप्रदान हा महत्त्वपूर्ण घटक मानतात. व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासात सामाजिक – सांस्कृतिक संबंध महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात.समाजाची मूल्ये निर्माण करणे, त्यांचे संरक्षण व संवर्धन करणे व सातत्य टिकविणे हे संस्कृतीचे प्रमुख काम आहे. समाजव्यवस्थेचा एक घटक या नात्याने मानवाच्या श्रद्धा, निष्ठा, मूल्ये, प्रतीके व वर्तन विषयक नीतिनियम यांचे एकत्रीकरण म्हणजे हे सर्व घटक सामाजिक आदानप्रदानाचे साधन ठरतात. विशिष्ट सांस्कृतिक समाजात जीवन जगत असताना व्यक्तीला समाजसंमत मार्गाचा व नीतिनियमांचा अवलंब करावा लागतो. डॉ. मुखर्जींच्या मते व्यक्तीच्या वर्तनावर मूल्ये व नीतिनियमाचे बंधन असेल तरच समाजात ऐक्य, संघटन व स्थास्थ्य निर्माण होते. त्यासाठी मूल्ये व नीतिनियमांच्या प्रति व्यक्तीच्या मनात आदर व निष्ठा असली पाहिजे असे मुखर्जी म्हणतात.

**३) आधि–नैतिक** (Telic - Moral) **घटक** – यामध्ये डॉ. मुखर्जींनी आध्यात्मिक जीवनाविषयीच्या निष्ठांच्या समतोलावर भर दिलेला आहे. आध्यात्मिक (spiritual) मूल्ये ही शाश्वत असल्याने ती सुखशांती व प्रसन्नता निर्माण करतात. त्यांच्या मते सामान्य मानवाचे (common man) विश्व मानवात (ंपिर्ळींरीीरश्र ाउप) रुपांतर करण्यासाठी ही मूल्ये उपयुक्त असतात. ही मूल्ये मानवतावादाचे संरक्षण करतात. त्यामुळे त्यांचे सातत्य टिकविण्याची जबाबदारी प्रत्येक सांस्कृतिक समुदायावर येऊन पडते.

**मुक्त समाजव्यवस्थेचा** (open social system) **पुरस्कार** – डॉ. मुखर्जींचा समाजाचा सामान्य सिद्धांत हा मुक्त समाजव्यवस्थेवर आधारित आहे. त्यांच्या मते बंदिस्त व्यवस्थेत (close system) मानव व समाज यांची प्रगती व गतिशीलता खुंटली जाते. तसेच मानवाच्या सृजनशील प्रवृत्तींना पुरेसे प्रोत्साहन मिळत नाही. याउलट मुक्त व्यवस्था ही स्वयंनियंत्रित किंवा स्वयंदिग्दर्शित असून ती क्रियाशील स्वरुपाच्या संस्था व संघटनांनी मिळून बनलेली असते. या संस्था व संघटनांचे सदस्यत्व स्वीकारुन व्यक्ती आपले व्यक्तिगत व सामाजिक जीवन जगतात. या संस्था संघटना व्यक्तीच्या गरजापूर्तीसाठी व सामाजिक स्वास्थ्यासाठी अनेक विधायक कार्ये पार पाडतात. व्यक्तींच्या श्रद्धा, भावभावना व प्रवृत्तींचे नियंत्रण करुन एकसध समाजनिर्मितीचे कार्यही त्या पार पाडतात. तसेच व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे व संस्कृतीचे संरक्षण, संवर्धन करुन, बदलत्या काळानुसार व परिस्थितीनुसार संस्कृतीत सुयोग्य परिवर्तन करुन संस्कृतीचे सातत्य टिकविण्याचेही कार्य या संस्था व संघटना करतात. मुखर्जींच्या मते जागतिक स्वरुपाची प्रतीके व नीतितत्त्वे विकसित करण्यात समाजाच्या संरचनेचा व कार्यपद्धतीचा मोठा वाटा असतो. म्हणून समाजाच्या विकासाची प्रक्रिया ही तात्कालिक, वैशिष्ट्यपूर्ण व साधनात्मक मूल्यांकडून आदर्शवादी, जागतिक व महत्त्वपूर्ण अशा मूल्यांकडे होत आलेली आहे.

**मुक्त व्यवस्थेचे प्रकार –** डॉ. मुखर्जींनी मुक्त व्यवस्थेच्या तीन प्रकारांचा निर्देश केलेला आहे.

**१) प्रदेश व निर्वाह यांची मुक्त परिस्थितीविषयक** (ecological) **व्यवस्था –** आपला निर्वाह चालविण्यासाठी व्यक्तींना या व्यवस्थेतील जमीन, वनस्पती, पशुपक्षी इत्यादी घटकांशी अनुकूल न साधावे लागते.परिस्थितीविषयक नियमांचा आपणास हवा तसा वापर करुन घेण्याची क्षमता समाजात असते व तो जीवन निर्वाहाच्या नवनवीन परिस्थिती निर्माण करु शकतो व तशा तो करीतही असतो. हीच परिस्थितीविषयीची मुक्त व्यवस्था आहे.

**२) संस्था व दर्जांची मुक्त समाजशास्त्रीय** (sociological) **व्यवस्था –** मनुष्य आपल्या गरजा, ध्येये, आवड व मूल्ये यानुसार विविध प्रकारच्या संस्था व दर्जांच्या योजना निर्माण करतो, ज्या पुरेशा प्रमाणात लवचिक असतात.

**३) समूह व मूल्यांची मुक्त नैतिक** (ethical) **व्यवस्था –** मानव व समाज हे जीवन व बदलत्या अवस्थांनानुसार नवीन नीतिनियम विकसित करण्याचा प्रयत्न करतात.

**नियमन व्यवस्था –** आपल्या समाजाच्या सामान्य सिद्धांतात मुखर्जींनी सामाजिक नियमन व्यवस्थेचेही स्पष्टीकरण केलेले आहे. समाजातील अस्तित्व टिकविण्यासाठी व त्याची स्वयंपूर्णता साध्य करण्यासाठी समाजासंमत नियम व संकेत आवश्यक आहेत असे त्यांचे मत आहे. व्यक्तीव्यक्तीतील व समूहासमूहातील संघर्ष व ताणतणाव नियंत्रित केल्याशिवाय समाजाचे अस्तित्व टिकू शकत नाही. जीवन जगण्यासाठी स्पर्धा व संघर्ष आवश्यक असले तरी ते विधायक व मूल्याधिष्ठित असावेत व त्यासाठी सामाजिक नियमने असावीत असे ते म्हणतात. सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा उंचावण्याची संधी प्रत्येकास उपलब्ध व्हावी म्हणून सामाजिक नियम आवश्यक ठरतात. ही संधी समतेच्या तत्त्वावर आधारित ठेवणे म्हणजे मुक्त समाज निर्माण करणे होय. असा मुक्त समाज सामाजिक नियमांद्वारेच निर्माण होऊ शकतो असे मुखर्जी मानतात.

**प्रकार्ये** (Functions) – समाजाविषयीच्या सामान्य सिद्धांताची मांडणी करताना डॉ. मुखर्जींनी समाजाला आपले अस्तित्व–सातत्य टिकविण्यासाठी आवश्यक असणारी जी काही प्रकार्ये सतत पार पाडावी लागतात त्यांचीही चर्चा केलेली आहे. ती पुढीलप्रमाणे

**१) भरणपोषण –** आपले अस्तित्व व सातत्य टिकविण्यासाठी समाजास आपल्या सदस्यांच्या भरणपोषणाचे कार्य पार पाडावे लागते. समाजाची सदस्यसंख्या (population) एका निश्चित मात्रेत (प्रमाणात) जिवंत राहण्यासाठी हे करावे लागते. जर समाजात मृत्युदर अधिक असेल तर एक वेळ अशी येईल की समाज नष्ट होईल. भरणपोषणाच्या साधनांपेक्षा लोकसंख्या खूपच जास्त असेल तर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. म्हणून समाजास पर्यावरणाचे संतुलन टिकवून ठेवावे लागते.

**२) सामाजिक नियंत्रण –** आपल्या समस्यांचे वर्तनाचे नियंत्रण करण्यास समाजाला सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था निर्माण करावी लागते. सामाजिक नियंत्रणासाठी समाज हा संस्था, कायदे, नीतिनियम यांचा वापर करीत असतो.

**३) जीवनमान –** जीवनासाठी आवश्यक असणारी मूल्ये, सेवा व वस्तू यांची निवड करुन त्यांचे सदस्यांना योग्य वितरण करुन त्यांचे जीवनमान (standard of living) उंचावण्याचे कार्य समाजास पार पाडावे लागते.

**४) सत्तेचे वाटप –** समाजास सत्ता, अधिकार, संपत्ती, स्वातंत्र्य इत्यादींचे आपल्या

सदस्यांत योग्य वाटप करावे लागते.

**५) कलह निवारण –** सदस्यांमध्ये उद्‌भवणाऱ्या कलहांचे (भांडणांचे) निवारण करण्यासाठी कायदे, शिक्षापद्धती, उचित मूल्ये, स्वातंत्र्य व समतेचे सिद्धांत इत्यादी लागू करावे लागतात.

**६) व्यक्तिविकास–** समाजाला आपल्या सदस्यांच्या विकासासाठी सामाजिक, आर्थिक व राजकीय, संस्था, दर्जे, प्रतिष्ठा, विशेषाधिकार, हक्क, कर्तव्ये इत्यादींची व्यवस्था करावी. लागते.

**क्षेत्र** (Field) **संकल्पनेचा अवलंब –** समाजव्यवस्थेची संरचनात्मक–कार्यात्मक एकसंधता व स्वयंनियंत्रित व स्वयंदिग्दर्शित आंतरिक संबंध यांच्या संदर्भात डॉ. मुखर्जींनी समाजाविषयीच्या सामान्य सिद्धांतात क्षेत्र संकल्पनेचा अवलंब केलेला आहे. कारण प्रत्येक प्रादेशिक समाजव्यवस्थेतील विद्यमान संबंध हे त्या क्षेत्रीय प्रदेशाच्या नैसर्गिक पर्यावरणाशी निगडित असतात. मानव व निसर्ग यांच्यातील परस्परसंबंधाला अनुसरुन विशिष्ट प्रकारची समाजव्यवस्था निर्माण होते. त्यामुळे समाजाच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी विशिष्ट प्रकारचे सामाजिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न प्रत्येक समाजव्यवस्था करते. उदा. आदिम समाजव्यवस्थेतील सामाजिक संबंध, मूल्यव्यवस्था, जीवनपद्धती इत्यादी गोष्टी तेथील नैसर्गिक पर्यावरणाशी निगडित असतात. पारंपरिक ग्रामीण समाजव्यवस्थेतील बलुता पद्धती कृषिप्रधान समाजव्यवस्थेशी निगडित आहे. अशाप्रकारे मूल्यव्यवस्था, जीवन पद्धती, प्रतीक व्यवस्था या गोष्टी प्रादेशिक समाजाच्या भौगोलिक क्षेत्राशी निगडित असल्यामुळे मुखर्जींनी क्षेत्र संकल्पनेचा अवलंब समाजाच्या सामान्य सिद्धांतात केला?

**समाजाचे महाविज्ञान** (Master science of society) – समाजाचा सामान्य सिद्धांत विकसित करण्यासाठी मुखर्जींनी समाजाचे महाविज्ञान निर्माण करण्याचा उपाय सुचविला आहे. या महाविज्ञानात मानव परिस्थितीशास्त्र (र्कीरप शलेश्रेसू) व समाजशास्त्र यांचे सिद्धांत आणि मूल्ये व प्रतिकांसंबंधीचे सिद्धांत समाविष्ट असतील. महाविज्ञानात या सर्व सिद्धांताचे समग्र रूप मांडले जाईल, त्याचबरोबर त्यांचे स्वतंत्र अस्तित्वही अबाधित राहील. या विभिन्न सिद्धांतातील आदानप्रदानामुळे सर्वांचाच फायदा होईल. त्याचबरोबर समाजाचे व्यवस्थित ज्ञान देणाऱ्या महाविज्ञानाची निर्मिती करणे सुलभ होईल; आणि समाजाचा सामान्य सिद्धांत देखील विकसित होईल. हा सिद्धांत विविध सामाजिक शास्त्रांना एकतेच्या सूत्रात बांधेल व त्यांच्यातील विद्यमान सैध्दांतिक ज्ञानाविषयीच्या उणिवा कमी करेल. या दृष्टीने समाजाचे महाविज्ञान समाजशास्त्रापेक्षा अधिक व्यापक असेल.

डॉ. मुखर्जींच्या मते सामाजिक मूल्यांचे मापन करु शकेल अशा एका सामाजिक विज्ञानाच्या सिद्धांताची गरज आहे. मानवी संबंधांच्या वस्तुनिष्ठ अध्ययनासाठी सर्व सामाजिक शास्त्रांमध्ये ऐक्य निर्माण होणे गरजेचे आहे. आणि या गरजेची पूर्तता समाजाचे महाविज्ञान करु शकेल. मानवासमोरील ज्या प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत त्यांची उत्तरे हे महाविज्ञान देऊ शकेल. आज समाजशास्त्राच्या अनेक शाखा विकसितहोऊन त्यांच्यात आदानप्रदान होत आहे. तरीदेखील उच्च आदर्शांच्या प्राप्तीसाठी समजाचे एक महाविज्ञान आवश्यक आहे. हे महाविज्ञान जागतिक स्वरुपाचे असेल व जागतिक समुदायासमोरील विविध समस्या सोडविण्याचे प्रयत्न करेल व मानवजातीच्या समान मूल्यांचा आदर करेल.

या महाविज्ञानात असे तत्त्वज्ञान स्वीकारले जाईल जे विविध सामाजिक शास्त्रांतील गृहीतकांचे परीक्षण व पुनर्निर्मिती बदलत्या सामाजिक संबंधांच्या व मूल्यांच्या संदर्भात करेल. हे महाविज्ञान समाजातील एकता, सुव्यवस्था, सुरक्षा, स्वातंत्र्य इत्यादी अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक असलेले उपाय शोधून काढील. तसेच मानवी संबंधाच्या सामाजिक व नैतिक पैलूजील परस्परसंबंध स्पष्ट करेल. डॉ. मुखर्जी म्हणतात, हे महाविज्ञान ईश्वरास परिपूर्णता व पावित्र्य याबरोबरच सत्यम शिवम, सुंदरम यांचे एकात्मिक प्रतीक म्हणून मान्यता प्रदान करील. त्याचबरोबर ईश्वर सर्व प्राण्यांच्या हृदयात वास्तव्य करतो आणि तोच हळूहळू पण निरंतरपणे मानवतेला सार्वभौम स्वातंत्र्य आणि पूर्णत्व यांच्या दिशेने घेऊन जातो.

## २.२.४ समूह मानसशास्त्र (Group Psychology)

डॉ. मुखर्जी हे जसे अर्थशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ होते, तसेच ते सामाजिक मानसशास्त्रज्ञही होते. त्यांनी एन. एन. सेनगुप्ता यांच्या सहकार्याने १९२८ मध्ये An Introduction of social psychology हा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथात त्यांनी समूह मानसशास्त्राविषयी आपले विचार मांडलेले आहेत. सामाजिक समूह व सामाजिक जीवन यामध्ये मानवी मनाचे स्थान काय आहे हे त्यांनी या ग्रंथातील The Mind in society या प्रकरणात स्पष्ट केलेले आहे. तसेच व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक समूहाची भूमिका काय असते हेही त्यांनी स्पष्ट केलेले आहे.

**व्यक्तिमत्त्व विकासात समूहाची भूमिका –** डॉ. मुखर्जींच्या मते व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक समूह हे आपल्या सांस्कृतिक मूल्यांशी निगडित असतात. आपल्या सांस्कृतिक व्यवस्थेच्या व मूल्यव्यवस्थेच्या मर्यादेत राहून व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणणे व तिच्या महत्त्वाकांक्षांची पूर्तता करणे हे सामाजिक समूहांचे उद्दिष्ट असते. आपल्या सभोवतालच्या भौतिक परिस्थितीशी अनुकूलन साधून आपल्या गरजा पूर्ण करण्याचा व्यक्ती जसा प्रयत्न करीत असतात, तसाच त्या समाजातील विविध सामाजिक समूहांचे सदस्यत्व स्वीकारुन विविध कार्ये पार पाडण्याचा प्रयत्न करीत असतात. आणि हे करीत असताना सामाजिक समूह हे व्यक्तींच्या मनाची अशा पद्धतीने जडणघडण करतात की जेणेकरुन त्याच्या गरजा व महत्त्वाकांक्षा पूर्ण करताना समूहाच्या उद्दिष्टांना धोका पोहचणार नाही. या प्रक्रियेत व्यक्तीदेखील तिला ज्या समूहांच्या उद्दिष्टाबाबत व कार्यपद्धतीबद्दल आदर व विश्वास वाटत असतो. समूहांच्या उद्दिष्टाला धोका पोहचणार नाही अशा पद्धतीचे आपले वर्तन ठेवण्याचा प्रयत्न करीत असते. तथापि, एखादा समूह आपल्या गरजा पूर्ण करण्यास असमर्थ ठरत आहे, असे जेव्हा व्यक्तीला वाटते तेव्हा ती त्या समूहाच्या सदस्यत्वाचा त्याग करुन दुसऱ्या समूहाचे सदस्यत्व स्वीकारण्याचा प्रयत्न करते, किंवा इतरांच्या सहकार्याने एखादा नवीन समूह, संस्था वा संघटना स्थापन करण्याचा प्रयत्न करते. समूहावरील दृढ श्रद्धा वा विश्वास हा आपल्या इच्छांच्या पूर्ततेचा मूलभूत पाया आहे अशी जेव्हा व्यक्तीची खात्री होते तेव्ही ती समूहांच्या उद्दिष्टांशी व कार्यपद्धतीशी समरस होते व आपल्या भावभावना व प्रेरणांना नियंत्रित करण्याचा प्रयत्न करते. परंतु जेव्हा समूहाच्या सदस्यांचा समूहावरील विश्वास ढासळण्यास सुरुवात होते. तेव्हा सामाजिक विकृती (Social neuroses) निर्माण होण्याची शक्यता असते. अशाप्रकारे व्यक्तीच्या सामाजिक

मनाची जडणघडण करण्यात समूहांची भूमिका सर्वात जास्त महत्त्वाची असते असे डॉ. मुखर्जींचे मत आहे. सामाजिक समूहांच्या सामूहिक क्रियांना उद्देशून त्यांनी संघ ही संज्ञा वापरली आहे.

## २.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. सामाजिक शास्त्रांमध्ये एकता निर्माण करण्यासाठी डॉ. मुखर्जींनी कोणता उपाय सुचविलेला आहे?

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

२. डॉ. मुखर्जींनी समाजशास्त्राची केलेली व्याख्या सांगा.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

३. डॉ. मुखर्जी हे समाजशास्त्राकडे कोणत्या दोन दृष्टिकोनातून पाहतात.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

४. डॉ. मुखर्जींनी मूल्याची केलेली व्याख्या द्या.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

५. डॉ. मुखर्जींनी व्यक्तिमत्त्वाची केलेली व्याख्या सांगा.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

६. कोणत्या ग्रंथात डॉ. मुखर्जींनी समाजाविषयीचा सामान्य सिद्धांत मांडलेला आहे?

..............................................................................................

..............................................................................................

.....................................................................................

७. कोणत्या प्रक्रियांच्या माध्यमातून मूल्यांचे आंतरीकरण होत असते?

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

## २.४ सारांश

या दुसऱ्या घटकात तुम्ही डॉ. राधाकमल मुखर्जी यांचे समाजशास्त्रीय योगदान अभ्यासलेले आहे. सर्वप्रथम तुम्ही डॉ. मुखर्जींचे सामाजिक शास्त्रे, समाजशास्त्र व प्रादेशिक समाजशास्त्र यांच्याविषयीचे विचार समजावून घेतलेले आहेत. त्यांच्या मते नैसर्गिक शास्त्रे व सामाजिक शास्त्रे यांच्यात अभ्यासविषयाचे स्वरुप, अभ्यास पद्धती व तंत्रे तसेच शास्त्रीय उपकरणे इत्यादीबाबत मूलभूत फरक आहेत. सामाजिक घटनांचे स्वरुप हे अत्यंत संकीर्ण व परिवर्तनशील असते. व त्यांच्यावर व्यक्तीच्या भावभावना, सामाजिक मूल्ये, रुढी-परंपरा इत्यादींचा प्रभाव पडत असतो. त्यामुळे या घटनांचे वस्तुनिष्ठ निरीक्षण करणे कठीण जाते. त्यामुळे सामाजिक घटनांचा अभ्यास करताना विविध पद्धतीचा व तंत्रांचा वापर करणे उचित ठरते असे डॉ. मुखर्जींचे मत आहे. सर्व सामाजिक शास्त्रे ही मानवी जीवनाच्या वेगवेगळ्या अंगाचा अभ्यास करतात पण ही सर्व अंगे ही परस्परांशी निगडित असल्याने त्यांचा वेगवेगळा अभ्यास न करता एकत्रितपणे करावा असे सूचवून डॉ. मुखर्जींनी सामाजिक शास्त्रातील भिंती नष्ट कराव्यात असे सांगितलेले आहे. त्यांनी सामाजिक शास्त्रांच्या एकतेवर भर दिलेला असून ही एकता निर्माण करण्यासाठी समाजाचे एक महाविज्ञान निमार्ण करण्याचा उपाय सुचविलेला आहे. मूल्याधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्याचे कार्य सामाजिक शास्त्रांनी करावे असेही मत त्यांनी मांडलेले आहे. डॉ. मुखर्जींनी ‘‘समाजशास्त्र हे समाजाविषयी मांडलेल्या सामान्य सिद्धांताचे शास्त्र आहे.’’ अशी समाजशास्त्राची व्याख्या देऊन त्याच्या अभ्यासविषयात सामाजिक संस्थांच्या चौकटीत दर्जा, भूमिका, संप्रेषण यांच्या संदर्भात प्रस्थापित झालेले सामाजिक संबंध अंतर्भूत होतात असे म्हटलेले आहे. समाजशास्त्रात मूल्यांचा अभ्यासही केला जावा असे त्यांचे मत आहे. समाजशास्त्राकडे ते उपयोजित शास्त्र म्हणून पाहतात. सामाजिक समस्यांच्या कारणांचा शोध घेऊन त्यांच्या निराकरणासाठी उपाय सुचविण्याचे कार्य समाजशास्त्राने करावे असे ते म्हणतात. डॉ. मुखर्जी हे समाजशास्त्राकडे तात्त्विक - समाजशास्त्रीय व तार्किक - समाजशास्त्रीय अशा दोन्ही दृष्टिकोनातून पाहतात. त्यांनी प्रादेशिक समाजशास्त्र ही संकल्पना विकसित केलेली आहे. त्यांच्या मते अखिल मानव समाज अत्यंत संकीर्ण असल्याने त्याचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे कठीण जाते. म्हणून समाजशास्त्राच्या अभ्यासविषयावर प्रादेशिक मर्यादा टाकणे उचित ठरते. विशिष्ट प्रदेशातील समाजाचा अभ्यास त्या-त्या समाजातील अभ्यासकांनी करावा असे त्यांचे मत आहे.

डॉ. मुखर्जींनी समाजशास्त्राला दिलेले महत्त्वाचे योगदान म्हणजे त्यांनी मांडलेला मूल्यविषयक सिद्धांत होय. त्यांच्या मते, समाजावर मूल्यांचा मोठा प्रभाव असतो. त्यामुळे

समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी मूल्यांचा अभ्यास करावा लागतो. ''मूल्ये ही समाजसंमत अशा इच्छा वा ध्येये असून त्यांचे आंतरीकरण हे शिकण्याच्या व समाजीकरणाच्या प्रक्रियेच्या माध्यमातून होते. मूल्ये ही व्यक्तिनिष्ठ प्राधान्ये, आदर्श व आकांक्षा यांना जन्म देतात.'' अशी मूल्याची व्याख्या देऊन त्यांनी मूल्यांची सार्वत्रिकता, गतिशीलता, संकीर्णता, प्रतीकात्मकता, सांस्कृतिक महत्त्व इत्यादी वैशिष्ट्ये विशद केलेली आहेत. डॉ. मुखर्जींच्या मते एखाद्या समाजाचा भूप्रदेश व त्याची मूल्ये यांच्यात अन्योन्य संबंध असतो. कोणत्याही प्रादेशिक समाजाची मूल्ये ही त्या प्रदेशाच्या पर्यावरणीय घटकावर आधारलेली असतात. डॉ. मुखर्जींच्या मते मूल्ये ही प्रतीकांशी संबंधित असतात. अमूर्त मूल्यांना प्रतीकांच्याद्वारे व्यक्त केले जाते. त्यांनी व्यक्तिमत्त्व व मूल्ये यासंबंधीही विचार मांडलेले आहेत. समाजातील मूल्यांचा प्रभाव व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर पडत असतो. मूल्ये ही व्यक्तिमत्त्वास आकार देतात. शिकण्याच्या व समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारे मूल्यांचे आंतरीकरण होत असते.

डॉ. मुखर्जींनी समाजाविषयीचा सामान्य सिद्धांत मांडलेला आहे. त्यांच्या मते समाज ही अखंड व्यवस्था असून त्याचे विभाजन करणे अयोग्य आहे. अखंड समाजाचे यथार्थ ज्ञान होण्यासाठी त्याचा समग्र स्वरुपातच अभ्यास केला पाहिजे. समाजाचा सामान्य सिद्धांत मांडताना त्यांनी मूल्यांना महत्त्व देऊन आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाचा पुरस्कार केलेला आहे. हा सिद्धांत त्यांनी परिस्थितीविषयक घटक, मानस-सामाजिक घटक व आधि - नैतिक घटक या तीन घटकांच्या संदर्भात मांडलेला आहे. त्यांचा हा सिद्धांत मुक्त समाजव्यवस्थेवर आधारित आहे. या सिद्धांतात त्यांनी सामाजिक नियमन व्यवस्थेचे स्पष्टीकरण दिलेले आहे. समाजाचा सामान्य सिद्धांत मांडताना त्यांनी क्षेत्र संकल्पनेचा वापर केला असून, हा सिद्धांत विकसित करण्यासाठी त्यांनी समाजाचे महाविज्ञान निर्माण करण्याचा उपाय सुचविला आहे.

डॉ. मुखर्जींनी समूह मानसशास्त्राविषयीही आपले विचार मांडलेले आहेत. त्यांच्या मते व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक समूहांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. हे समूह व्यक्तीच्या सामाजिक मनाची जडणघडण करीत असतात. आपल्या गरजा व महत्त्वाकांक्षा पूर्ण करतान व्यक्ती आपल्या समूहाच्या उद्दिष्टांना धोका पोहचणार नाही अशा पद्धतीने आपले वर्तन ठेवीत असतात.

## १.५ पारिभाषिक शब्द/शब्दार्थ (Glossary)

<u>नैसर्गिक शास्त्रे</u> :- नैसर्गिक घटनांचा अभ्यास करणारी शास्त्रे.

<u>सामाजिक शास्त्रे</u> :- सामाजिक घटनांचा अभ्यास करणारी शास्त्रे.

<u>समाजशास्त्र</u> :- समाजाचा अभ्यास करणारे शास्त्र.

<u>उपयोजित शास्त्र</u> :- सैध्दांतिक ज्ञानाचा व्यवहारातील समस्या सोडविण्यासाठी कसा उपयोग करावयाचा याचा ऊहापोह करणारे शास्त्र.

<u>मानसशास्त्र</u> :- शारीरिक व मानसिक वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र.

<u>अन्योन्य संबंध</u> :- परस्परावर क्रिया करणाऱ्या दोन गोष्टीतील संबंध.

<u>समाजीकरण</u> :- समूहाची मूल्ये, नियमने, श्रद्धा, वर्तनप्रकार आत्मसात करण्याची

प्रक्रिया.

<u>संस्कृती</u> :- मानवनिर्मित भौतिक व अभौतिक वस्तूंचा समुच्चय.

<u>प्रतीक</u> :- एखाद्या गोष्टीचे प्रतिनिधित्व करणारे चिन्ह.

<u>सामाजिक नियमनव्यवस्था</u> :- वर्तनविषयक नियमनांची उदा. लोकरुढी, लोकनीती कायदे इ. व्यवस्था.

<u>सामाजिक समूह</u> :- समान उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी एकत्रीतपणे कार्य करणाऱ्या अनेक व्यक्तींचा समूह.

## १.६ संदर्भ सूची (Bibliography)

१. B.K. Nagla - Indian Sociological Thought
२. Dr. Sharaya Anantram - Development of Sociology in India
३. देवेन्द्रपालसिंह तोमर - समाजशास्त्रीय विचारक
४. प्रा. व्ही. एन. गजेंद्रगड - समकालीन भारतीय समाजशास्त्र आणि प्रा. व्ही. एस. मारुलकर
- सामाजिक विचारक

## १.७ सरावासाठी प्रश्न (Exercise)

**(अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. डॉ. मुखर्जींचे सामाजिक शास्त्रे व समाजशास्त्र याविषयीचे विचार स्पष्ट करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२. मूल्यांची व्याख्या देऊन त्याची वैशिष्ट्ये विशद करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३. मूल्यांच्या प्रादेशिक आधाराची चर्चा करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४. डॉ. मुखर्जींच्या समाजाविषयीच्या सामान्य सिद्धांताची चर्चा करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**(ब) <u>टिपा लिहा.</u>**

१. प्रादेशिक समाजशास्त्र

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२. मूल्ये आणि प्रतीके

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३. व्यक्तिमत्त्व आणि मूल्ये

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४. समूह मानसशास्त्र

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

# घटक – ३

# डॉ. डी. पी. मुखर्जींचे योगदान

# पेपर – भारतीय समाजशास्त्र आणि सामाजिक विचारवंत

# (Indian Sociology & Social Thinker)

**अनुक्रमणिका**


१.० घटकाची उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ मुख्य मुद्दा डॉ. मुखर्जींचे योगदान

१.२.२ समाजशास्त्रीय मूलभूत संकल्पना

१.२.३ ऐतिहासिक विरोध–विकासवादाची संकल्पना

१.३ स्वयंअध्ययनसाठी प्रश्न

१.४ सारांश

१.५ पारिभाषिक शब्द

१.६ संदर्भसूची

१.७ सरावासाठी प्रश्न / क्षेत्रीय कार्य


## १.० घटकाची उद्दिष्टे (Objectves)

१. डॉ. डी.पी. मुखर्जींचे समाजाशास्त्रातील योगदान जाणून घेणे.

२. डॉ. मुखर्जींनी वेगवेगळ्या अभ्यास पद्धतींचा केलेला अभ्यास समजून घेणे.

३. समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना मुखर्जींच्या दृष्टिकोनातून लक्षात घेणे.

४. डॉ. मुखर्जींनी ऐतिहासिक विरोध – विकासवादाची संकल्पना कशा पद्धतीने स्वीकारली हे अभ्यासणे.

५. डॉ. मुखर्जींचे भारतीय परंपरा व सामाजिक परिवर्तनाविषयीचे मत जाणून घेणे.

## १.१ प्रस्तावना/ विषय प्रवेश

भारतीय समाजशास्त्रज्ञांपैकी डॉ. डी.पी. मुखर्जींनी आपल्या समाजशास्त्रीय विचारधारेतून एक वेगळा ठसा उमटविलेला आहे. जरी ते मार्क्सवादी समाजशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जात असले तरी त्यातील तत्त्वज्ञानाच्या वेगळ्या अन्वयार्थामधून भारतीय समाजव्यवस्थेची वैविध्यता आणि विशालता लक्षात घेऊन एखाद्या विशिष्ट (Particular) अथवा समस्त भारतीय समाजव्यवस्थेला लागू पडू शकेल असा सामान्य सिद्धांत किंवा निष्कर्ष मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला नाही. तर भारताची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भारतीय परंपरा आणि समाजशास्त्रातील काही मूलभूत संकल्पना याबाबत आपले प्रांजळ मत मुखर्जी यांनी मांडले आहे.

कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवाद, वर्गकलह सिद्धांत आणि अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत यांच्या माध्यमातून भांडवलशाही समाजव्यवस्थेचे, सामा. संघर्षाचे जे विवेचन केले आहे त्या मार्क्सवादी तंत्राचा भारतीय समाजशास्त्रज्ञांनी जशास तसा वापर न करता केवळ विरोध - विकासवाद किंवा एकात्मकता (ऊळरश्रशलींळल) या संकल्पनेचा वेगळ्या पद्धतीने अवलंब केला. ही संकल्पना स्वीकारणाऱ्या डॉ. डी. पी. मुखर्जी, डॉ. ए. आर. देसाई, डॉ. राधाकमल मुखर्जी इ. समाजशास्त्रज्ञांचा विशेष सहभाग आहे.

## १.२ जीवन परिचय :-

डॉ. धुर्जरी प्रसाद मुखर्जी या मार्क्सवादी भारतीय समाजशास्त्रज्ञाचा जन्म ५ ऑक्टो. १८९४ रोजी बंगालमधील एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. कलकत्ता विद्यापीठातून अर्थशास्त्र या विषयावरील एम. ए. ची पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी १९२२ साली लखनौ विद्यापीठात अर्थशास्त्राचे आणि समाजशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्य करण्यास सुरुवात केली. डॉ. राधाकमल मुखर्जी यांच्या प्रेरणेने लखनौ विद्यापीठात १९२१ साली अर्थशास्त्र व समाजशास्त्र हा संयुक्त विभाग सुरु झाला त्यामुळे त्या विभागात अध्यापन करण्याची संधी डॉ. मुखर्जी यांना मिळाली. डी.पी. मुखर्जींचा अध्ययन व अध्यापनाचा काळ ब्रिटिश कालावधीशी प्रामुख्याने निगडित आहे. ब्रिटिश सरकारच्या वसाहतवादी धोरणामुळे व औद्योगिक धोरणामुळे भारतीय समाज व्यवस्थेच्या पारंपरिक जीवनपद्धतीत जो आमूलाग्र बदल होऊ लागला त्याकडे विशेष लक्ष देऊन त्यातील पाश्चात्त्य आणि भारतीय विचारसरणीत सुसंवाद साधण्याचा प्रयत्न केला. तसेच ब्रिटिशांच्या वसाहतवादी धोरणाला विरोध केला. त्यामुळे राष्ट्रीयत्वाची भावना स्वातंत्र्याच्या प्रेरणेने अधिक तीव्र बनत होती. या योगदानामुळेच त्यांना एक राष्ट्रवादी भारतीय समाजशास्त्रज्ञ म्हणून गणले जाऊ लागले.

भारतीय समाजशास्त्राच्या संदर्भात भारताचे समाजशास्त्र (डेलळेश्रेसू ेष खपवळर) व भारतासाठी समाजशास्त्र (डेलळेश्रेसू षी खपवळर) या दोन प्रचलित संकल्पना डी. पी. मुखर्जींच्या विचारातून अधिक स्पष्ट होतात. डॉ. राधाकमल मुखर्जी आणि डी.पी. मुखर्जी यांनी आपल्या अध्ययनात भारतीय परंपरा, संस्कृती, जीवनपद्धती व सामाजिक मूल्ये विचारात घेऊन अध्ययन तंत्राचे भारतीयीकरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारताच्या सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीला उपयुक्त ठरु शकेल अशा पद्धतीचे अध्ययन तंत्र व अभ्यास

पद्धती यांचा पाठपुरावा करण्याचा प्रयत्न केला आहे. पाश्चात्त्य मूल्यव्यवस्थेतून व विचारधारेतून भारतीय समाजव्यवस्थेची वास्तवता पडताळून पाहता येणार नाही याची जेव्हा मुखर्जींना खात्री पटली तेव्हा त्यांनी स्वदेशी अध्ययन तंत्राचा अवलंब करण्यास सुरुवात केली. संस्कृतीचे समाजशास्त्र (Sociology of Culture) आणि ज्ञानाचे समाजशास्त्र (Sociology of knowledge) या दोन समाजशास्त्राच्या उपशाखांचा विकास साध्य करण्यात डी. पी. मुखर्जींचे महत्त्वाचे योगदान आहे.

१९५६ साली डेहराडून येथे डॉ. आर. एन. सक्सेना यांच्या पुढाकाराने भरविण्यात आलेल्या पहिल्या 'अखिल भारतीय समाजशास्त्रीय परिषद' (All Indai Sociological Conferences) त्या परिषदेचे अध्यक्षपद डॉ. डी. पी. मुखर्जी यांनी स्विकारले होते. भारतीय समाजशास्त्राला राष्ट्रवादीची जोड देण्यात मुखर्जींचे योगदान अग्रभागी आहे.

**ग्रंथसंपदा :–**

पाश्चात्त्य संस्कृतीच्या व मूल्यांच्या निकषांवर भारतीय समाजाचे, संस्कृतीचे व मूल्यांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न इंग्रजांनी केला. परंतु भारतीय समाजाची संस्कृती, परंपरा, मूल्ये, आदर्शवादाच्या संकल्पना, भाषा ही कशा प्रकारे वेगळी आहे हे जाणून देण्याचा प्रयत्न डी. पी. मुखर्जी यांनी केला. त्यामुळे या प्रत्येक संकल्पना स्पष्ट करण्यासाठी त्यांनी सैद्धांतिक दृष्टिकोन आंगिकारला म्हणून भारतीय समाजशास्त्राचे 'भारतीयीकरण' (Indianisation) करण्यात डॉ. मुखर्जींचा सिहांचा वाटा होता. डॉ. मुखर्जी यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक ग्रंथ, लेख आणि निबंधांचे लिखाण केले आहे. त्यांचे लिखाण विपुल प्रमाणात आहे.

१) व्यक्तिमत्त्व आणि सामाजिक शास्त्रे – १९२४.(Personality & the Social Sciences -1924)

२) समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना – १९३२ (Basic concepts in sociology - 1932)

३) आधुनिक भारतीय संस्कृती (Modern Indian Culture- 1942)

४) रविंद्रनाथ टागोर – एक अभ्यास (Tagore - A Study - 1943)

५) भारतीय संगीताची ओळख (Introduction of Indian Music 1945)

६) भारतीय इतिहासाविषयी (On Indian History 1945)

७) भारतीय युवांच्या समस्या / युवा भारतीयांच्या समस्या – १९४६ (Problems of Indian Youth 1946)

८) Views & Counter Views (1946)

९) विविधता/ विभिन्नता (Diversities 1958)

या शिवाय १९५२ साली स्वतंत्र भारतातील समाजशास्त्र (Sociology in Independent India) नावाचा शोधनिबंध त्यांनी 'Sociological Bulletin' या नियतकालिकात प्रसिद्ध केला. तसेच डॉ. के. एम. कपाडिया यांनी डॉ. जी. एस. घुर्ये

यांच्या स्मरणार्थ संपादित केलेल्या ग्रंथात १९५५ साली डॉ. मुखर्जींनी सामाजिक संशोधन (Social Research) हा लेख प्रसिद्ध केला.

**मुखर्जींच्या वैचारिक व्यक्तिमत्त्वावर पडलेला प्रभाव –**

डॉ. डी. पी. मुखर्जी यांच्या विचारधारेवर कार्लमार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा विशेष प्रभाव पडलेला दिसून येतो. त्यांनी मार्क्सच्या विशेषतः विरोध–विकासवाद किंवा एकात्मतेचे तंत्र (Dialectice - Technique) भारतीय परंपरेच्या व संस्कृतीच्या संदर्भात वेगळ्या पद्धतीने अवलंबिण्याचा प्रयत्न केला. तसेच डिल्थे (Dilthey) या पाश्चात्त्य समाजशास्त्रज्ञाच्या विचारांचा प्रभावही मुखर्जींच्या वैचारिक व्यक्तिमत्त्वावर पडलेला दिसून येतो. कारण विरोध–विकासवादाचे तंत्र हे एक शास्त्र (डलळशपलश) आहे याची जाणीव मुखर्जींना मार्क्स व डिल्थे यांच्या विचारसरणीतून झाली. लखनौ विद्यापीठातून समाजशास्त्र व अर्थशास्त्र या विषयांचे अध्यापन कार्य करीत असताना समाजशास्त्राचे विभागप्रमुख डॉ. राधाकमल मुखर्जींच्या सामाजिक मूल्यव्यवस्थेच्या संदर्भातील विचाराकडे डी. पी. मुखर्जी विशेष आकर्षित झाले.

व्यक्तिप्रधानतेवर आधारलेला टॉलकॉट पारसन्स यांच्या सामाजिक क्रियासंबंधीच्या सिद्धांताचा (Action Situation Based Theory) मुखर्जींच्या विचारावर विशेष प्रभाव असला, तरी त्या सिद्धांताशी सहमत नव्हते. भारतीय समाजशास्त्रासंदर्भात मुखर्जींनी एखादा विशिष्ट सिद्धांत मांडलेला नाही. भारतीय परंपरेची ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन त्या परंपरेत कशी परिवर्तने होत गेली याचे समाजशास्त्रीय विवेचन त्यांनी केलेले आहे. पृथकरणात्मक व विश्लेषणात्मक अध्ययन तंत्राचा अवलंब करुन भारतीय समाजव्यवस्थेतील व परंपरेतील वास्तवता स्पष्ट करण्याचा पुरेपूर प्रयत्न मुखर्जी यांनी केला आहे.

डॉ. डी. पी. मुखर्जी यांनी भारतीय समाजशास्त्रात दिलेले योगदान हे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्याविषयी खालील विश्लेषण पाहता येईल.

## १.२.२ अ) **समाजशास्त्रीय मूलभूत संकल्पना –** (Basic Sociological concepts)

समाजशास्त्राला विज्ञान निष्ठतेचा दर्जा प्राप्त करुन देण्यात पाश्चात्त्य समाजशास्त्रज्ञांचा सिंहाचा वाटा आहे. पाश्चात्त्यांनी समाजशास्त्र हे मानव्यशास्त्र असल्यामुळे त्याचा अभ्यास करतेवेळी समाज, संस्कृती, सामाजिक नियमने, सामाजिक परिवर्तने, सामाजिक समूह व संस्था, सामाजिक विघटन, समाजरचना, सामाजिक संबंध इ. अनेक संकल्पनांचा वापर करुन त्यांचा समाजशास्त्रीय अन्वयार्य करण्याचा प्रयत्न केला आहे. यावर आधारित १९३२ साली प्रकाशित केलेल्या 'Basic concepts in sociology' या ग्रंथात पौर्वात्य व विशेषतः भारतीय परिस्थितीला समाजशास्त्रीय संकल्पना कितपत लागू पडतील याविषयी विवेचन प्रस्तुत ग्रंथात डी.पी. मुखर्जी यांनी केले आहे. भारतीय समाजव्यवस्था, सामाजिक संस्थांचे स्वरुप, समाज नियंत्रणाचे घटक, समाजजीवनाकडे व्यक्तीचा व समाजाचा व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टीकोन पाश्चात्त्य राष्ट्रांपेक्षा वेगळा असल्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेला लागू पडू शकत नाही अशा काही समाजशास्त्रीय संकल्पना मुखर्जींनी विकसित करण्याचा प्रयत्न

केला आहे.

भारतीय समाजशास्त्रासंदर्भात मुखर्जींनी प्रगती (Progress), समता (Equality), व्यक्तिमत्त्व (Personality), सामाजिक शक्ती (Social Force) आणि सामाजिक नियंत्रण (Social control) या संकल्पनांचा समाजशास्त्रीयदृष्ट्या अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या सर्व संकल्पनांना स्पष्ट करताना त्यांनी व्यक्तिनिष्ठतेऐवजी समाजनिष्ठतेच्या तंत्राचा (Technic) अवलंब केला आहे. या संकल्पनांचे विश्लेषण डॉ. मुखर्जी यांनी खालील प्रमाणे केले आहे.

## १.२.१ प्रगती (Progress)

डॉ. डी. पी. मुखर्जी यांनी प्रगतीविषयी मत मांडत असताना म्हटले आहे की, वैयक्तिक अथवा सामाजिक प्रगतीची प्रक्रिया ही समूहवादी किंवा संघवादी स्वरुपाची असते. प्रागतिक समाजातील प्रत्येक व्यक्ती ही प्रगतिशील असते किंवा प्रगतिशीलतेला तो समाज पोषक परिस्थिती निर्माण करीत असतो. परंतु परिस्थिती निर्माण करुन देण्याची सामूहिक जबाबदारी समाजव्यस्थेवर पडत असते.

प्रगती संदर्भात डॉ. मुखर्जी यांनी तीन तत्त्वांचा किंवा सूत्रांचा पुरस्कार केलेला आहे ते म्हणजेच.

अ) सुसंवादाचे तत्त्व (Principle of Harmony)

ब) समन्वयाचे तत्त्व (Principle of Co-ordination) आणि

क) एकतेचे तत्त्व (Principle of Unity)

**अ) सुसंवादाचे तत्त्व** (Principle of Harmony)-

समाजात होणारे प्रतिकूल अथवा अनुकूल बदलांचे मूल्यमापन हे परिणामकारकतेवर आधारलेले असते. हे बदल सातत्याने होत असेल तरी त्यात एक विशिष्ट व्यवस्था किंवा यंत्रणा निसर्गतःच निर्माण होत असते आणि या यंत्रणेद्वारे अनुकूल आणि प्रतिकूल स्वरुपाच्या बदलात एक विशिष्ट सुसंवाद (क्लीपू) साधल्याशिवाय प्रगतीची प्रक्रिया पूर्ण होत नाही. प्रगती हाच बदलाचा किंवा परिवर्तनाचा अविभाज्य घटक असून, अपेक्षित स्वरुपाचा बदल समाजव्यवस्थेला साध्य करावयाचा असेल तर प्रगतीला पोषक ठरणाऱ्या घटकांमध्ये सुसंवाद साधणे आवश्यक ठरते. त्याविषयी समाजव्यवस्थेतील प्रत्येक व्यक्ती, संस्था, समूह व संपूर्ण समाज इ. मध्ये जाणीवात्मक प्रवृत्ती असणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत मुखर्जींनी मांडले आहे.

**ब) समन्वयाचे तत्त्व** (Principle of Co-ordination)-

सामाजिक प्रगतीच्या संदर्भात मुखर्जींनी सहकाराच्या अथवा समन्वयाच्या तत्त्वाला (Co-ordination) विशेष स्थान प्राप्त करुन दिलेले आहे. समाजव्यव्यस्थेतील अनेक घटकांत जितका अधिकाधिक सुसंवाद साधला जातो, तितक्या अधिकाधिक प्रमाणात प्रगतीच्या प्रक्रियेला आवश्यक असणारे सहकार्य विकसित होत जाते. 'विना सहकार नहीं

उद्धार' अथवा 'एकमेका साह्य करू अवघे धरु सुपंथ' याची प्रचिती आपणास सतत दैनंदिन जीवनात येत असते. मुखर्जींनी हे तत्त्व विशेषतः सामाजिक पर्यावरणाबाबत स्पष्ट केले आहे. प्रगती साध्य करण्यासाठी संधी केवळ सहकाराच्या माध्यमातून मिळू शकते असा आत्मविश्वास डॉ. मुखर्जींना होता. त्यामुळे सहकार्य देणे व घेणे ही प्रक्रिया पारस्परिक (ठशलळІलिरश्र) स्वरुपाची असल्याने ती प्रवृत्ती प्रत्येक व्यक्ती व संस्थेत विकसित झाली पाहिजे. अशी त्यांची अपेक्षा होती. सर्वांनी मिळून सर्वांची प्रगती साध्य करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केल्यास प्रगतीचा मार्ग अधिक सुलभ व सुखी ठरतो याची जाणीव समाजव्यवस्थेतील प्रत्येक घटकाला असणे आवश्यक आहे.

**क) एकतेचे तत्त्व** (Principle of Unity) -

प्रगतीचे तिसरे महत्त्वाचे तत्त्व म्हणजेच एकतेचे तत्त्व होय. ऐक्यामुळे समाजातील विविध घटकांत सुसंवाद साधला जातो व सहकार्याची जाणीव विकसित झालेली असते. आपलेपणाची जाणीव (डशपीश जष थश ऋशशश्रळपस) ही सहकाराच्या प्रवृत्तींमुळे विकसित होत असल्याने प्रगतीच्या प्रक्रियेला अडथळा निर्माण करणाऱ्या घटकांचे निर्मूलन करणे सुलभ होते. 'सर्वेऽपि सुखिनः संतु। सर्वे संतु निरामयः।। या संकल्पनेतही आपलेपणाची जाणीव हाच सुखी व समृद्ध जीवनाचा मार्ग म्हणून स्वीकारलेला आहे.

समाजात ज्यावेळी आप-परभाव किंवा दुजाभाव वाढत जातो, त्यावेळी तेवढ्या प्रमाणात प्रगतीचा वेग मंदावत जातो. त्यामुळेच समाजाचे ऐक्य हे तसेच व्यक्तीच्या मनातील परभावाची भावना दूर करणे व दूषित वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य ऐक्य करते.

थोडक्यात डॉ. मुखर्जी यांनी प्रगतीची सांगितलेली तत्त्वे ही महत्त्वाची आहेत. त्याचबरोबर समाजव्यवस्थेत शांतता, स्थैर्य प्रस्थापित करण्याची/होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. असा विचार मुखर्जी प्रतिपादित करतात. प्रगतीची संकल्पना समाजकल्याणाशी व समाजविकासाशी तसेच सामाजिक ऐक्याशीही संबंधित आहेत. परंतु त्यासाठी समाज नियंत्रणाची साधने ही प्रभावी व परिणामकारक स्वरुपाची असावी लागतात. याविषयी समाजमान्य प्रथा व परंपरा महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात.

**२) समता** (Equality)-

भारतीय समाजव्यवस्था स्पष्ट करताना मुखर्जी असे प्रतिपादित करतात की, भारतीय समाज हा विविधतेने नटलेला आहे. वंश, लिंग, धर्म, पंथ, भाषा व जात इ. विविध प्रकारची वैविध्यता प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. त्यामुळे सांस्कृतिक एकजिन्सीपणा निर्माण होणे अत्यंत कठीण आहे; परंतु अशा वैविध्यतेतही एकता (णपळीूं) आढळून येते. एकतेशिवाय समता निर्माण होणे अत्यंत अवघड आहे. समतेचा संबंध समान संधी, समान प्रतिष्ठा, समान वागणूक, समान दर्जा या मूल्यांशी निगडित आहे; त्यामुळे विविधतेतही समता आढळून येऊ शकते. ज्या समाजात समता आढळून येते अशा समाजात ऐक्याची भावना विकसित होत असते असे मुखर्जी म्हणतात. मुखर्जींच्या मते व्यक्तीच्या अथवा समाजाच्या प्रगतीसाठी पोषक परिस्थितीची आवश्यकता असली तरीही वैविध्यता ही प्रगतीसाठी आवश्यक असते;

कारण प्रगती प्राप्त करण्याची क्षमता व साधने ही सर्वांची सारखीच असू शकतील हे सांगता येत नाही. उद्दिष्टात्मक आणि साधनात्मक वैविध्यता जितकी अधिकाधिक असेल, तितक्या प्रमाणात विकासाची क्षेत्रे विकसित होण्यास मदत होते. थोडक्यात असे म्हणता येईल की, विविधतेतही समता असणे आवश्यक आहे.

### ३) **व्यक्तिमत्त्व** (Personality) -

प्रगतीची किंवा विकासाची प्रक्रिया ही व्यक्तिमत्त्वाच्या विकासाशी निगडित असते. व्यक्तिमत्त्वाचा विकास हा विविधता, बदल, अचूक दिग्दर्शन, हेतू किंवा ध्येय आणि क्षमता यांच्या व्याप्तीशी सहसंबंधित असतो व समाजजीवनात हे पाचही घटक प्रभावी प्रेरणास्रोत म्हणून कार्य करीत असतात असे मुखर्जी यांनी मत मांडले आहे. या कार्यात भौगोलिक परिस्थिती, तांत्रिक सहभाग, जैविक व मानसिक घटक, भावना व समाजविषयक संकल्पना यांचा अत्यंत महत्त्वाचा सहभाग आहे असे मुखर्जी म्हणतात. समाजव्यवस्थेतील अनेक संस्था, समूह व संघटना मानवी गरजा परिपूर्ण करण्यापुरते मर्यादित नसून ते व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यात सतत प्रयत्नशील असतात. समाजापासून अथवा संख्यांपासून अलिप्त राहून व्यक्तिमत्त्वाचा विकाससाध्य होणे खूप अवघड आहे. पण त्या संस्थांच्या उद्दिष्टांशी, कार्यपद्धतींशी एकरुप होण्याची प्रवृत्ती सभासदांमध्ये विकसित होण्याची आवश्यकता असते. व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक ती परिस्थिती, साधने व मार्ग उपलब्ध करुन देण्याची सामूहिक जबाबदारी ही समाजव्यवस्थेलाच पार पाडावी लागते; अन्यथा समाजात विषमतेची किंवा वैमनस्याची भावना निर्माण होऊ शकते. मानवाच्या भौतिक गरजा पूर्ण करणे म्हणजे व्यक्तिमत्त्वाचा विकास होय ही संकल्पना समाजमानसशास्त्रज्ञांच्या दृष्टीने अशास्त्रीय मानली जाते. कारण व्यक्तिमत्त्व विकासासाठी शारीरिक, मानसिक व बौद्धिक समतोल आवश्यक आहे. व त्याची संयुक्तिक जबाबदारी ही कुटुंबव्यवस्था, ऐच्छिक स्वरुपाच्या संस्था व संघटना व संपूर्ण समाजव्यवस्थेला पार पाडावी लागते.

### ४) **सामाजिक शक्ती** (Social Force) -

समाज प्रगतीचे स्वरुप हे सामूहिक आहे. त्यामुळे या प्रगतीच्या प्रक्रियेत समाजव्यवस्थेतील प्रत्येक घटकाला सहभागी करून घेण्याची सामूहिक शक्ती समाजाकडे असणे आवश्यक आहे. ही समाजाची सामूहिक शक्ती सामाजिक जाणिवेतून बलाढ्य करत असते. इतकेच नाही तर ही शक्ती व्यक्तीच्या वर्तनावर दबाव टाकण्याचे कार्य करीत असते. सामाजिक जाणिवेपेक्षा (ीलळरश्र लेपीलळेीपर्शीी) वैयक्तिक जाणिवा (डशश्रष ी खपवळींळवीरश्र लेपीलळेीपर्शीी) जेव्हा प्रभावी ठरतात तेव्हा समाजाची सामूहिक शक्ती कमकुवत बनत जाते आणि व्यक्तिवादाच्या स्वार्थी प्रवृत्ती वाढत जातात. अशा स्वार्थी प्रवृत्तींवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता समाजव्यवस्थेकडे असणे अत्यंत महत्त्वाचे आहे असे मुखर्जी यांचे मत आहे. सामाजिक शक्तीचे स्वरुप हे त्या समाजाच्या भावनिक ऐक्यात अंतर्भूत झालेले असते. व्यक्ती आणि समाज हे परस्परपूरक आहेत. त्यामुळे एखाद्या व्यक्तीचा सामाजिक दर्जा निर्धारित करण्याचा हक्क समाजव्यवस्थेला प्राप्त झालेला असला तरी व्यक्तीचे सामाजिक वर्तन, तिची कृती आणि प्रवृत्ती कोणत्या प्रकारची आहे याचे निरीक्षण करुन तो

दर्जा प्राप्त करुन दिला जातो.

मुखर्जींच्या मते, समाजाचे भावनिक ऐक्य हेच त्या समाजाचे सामर्थ्य होय व ते मजबूत व संघटित करण्याची जबाबदारी समाजव्यवस्थेतील प्रत्येक घटकावर पडलेली असते. व्यक्तिवादापेक्षा समुदायभावनेला मुखर्जींनी अग्रक्रम दिलेला आहे. सामाजिक स्वास्थ्यासाठी, समाजकल्याणासाठी आणि सामा. स्थैर्यासाठी त्याची आवश्यकता त्यांनी स्पष्ट केलेली आहे. त्यांनी सामूहिक शक्तीबद्दल आपले मत व्यक्त करीत असताना त्याचे ख संवर्धन (Preservation) II त्याबाबतची भावनिक जाणीव, (Feeling), III त्याचा आशय (meaning) आणि या तिन्ही घटकांतील परस्परसंबंध (Interplay) या चार घटकांकडे विशेष लक्ष दिलेले आहे. परंतु हे चारही घटक समाजव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक असले तरी त्यांचे स्वरुप मानसशास्त्रीय आहे, असे मत त्यांनी व्यक्त केलेले आहे. जुन्या सवयी (Old Habits) व नवीन अनुभव (New Experiences) यांच्या संघर्षात समाजाच्या सामूहिक शक्तीचे मूल्यमापन करता येते. मुखर्जींची अपेक्षा आहे की सामाजिक विकास, सामाजिक शांतता आणि स्थैर्य, सामाजिक न्याय आणि समता इ.चा उद्दिष्टपूर्तीसाठीच वापर करावा अन्यथा समाजव्यवस्थेबद्दल तिरस्काराची भावना व्यक्तीच्या मनात निर्माण होऊ शकते ही शक्यता नाकारता येत नाही.

### ५) **सामाजिक नियंत्रण** (Social Control) -

डॉ. डी. पी. मुखर्जी यांनी समाजशास्त्राच्या मूलभूत संकल्पनांपैकी सामाजिक नियंत्रणाला विशेष महत्त्व दिले आहे. समाजाची प्रगती, सामाजिक समता, व्यक्तिमत्त्वाचा विकास, समुदाय भावना, सामाजिक स्थैर्य व शांतता इ. सामाजिक उद्दिष्टे सामाजिक नियंत्रणाच्या माध्यमातून साध्य होत असतात. प्रादेशिक समाजाची संस्कृती, परंपरा, लोकरुढी, रीतिरिवाज इ. च्या माध्यमातून समाज नियंत्रणाचे अनेक घटक समाजात प्रचलित होत असतात. समाजजीवनातील अनेक अनुभव लक्षात घेऊन अनुकरणाद्वारे सामाजिक नियंत्रणाची साधने व्यक्तीच्या बहिर्गत वर्तनावर नियंत्रण प्रस्थापित करीत असतात. समाजाची निर्मिती केव्हा झाली? आणि समाजनियंत्रणाच्या घटकांचा उदय केव्हा झाला? हे दोन्हीही प्रश्न अनुत्तरीत आहेत. परंतु सामाजिक मूल्यव्यवस्था, समाजाच्या नीतीविषयक संकल्पना, समाजाची आचारसंहिता (लेवश ेष लेपर्वीं) व्यक्तीचे अपेक्षित सामाजिक वर्तन इ. मधून व्यक्तीचे आणि समाजाचे नियंत्रण केले जात असते.

वरील सामाजिक नियंत्रणाच्या विवेचनातून मुखर्जी यांनी तीन मूलभूत प्रश्न निर्माण केले आहेत. ते म्हणजेच

I **नियमन व्यवस्थेची आवश्यकता –** पहिल्या प्रश्न अथवा घटकात मुखर्जी यांनी नियमनव्यवस्थेच्या आवश्यकतेवर (The Need of order) भर दिलेला आहे. समाजनियंत्रणाची अनेक साधने व मार्ग हे विस्कळीत स्वरुपाच असल्यामुळे त्यांच्यात एक विशिष्ट सूत्रबद्ध व्यवस्था अस्तित्वात असली पाहिजे अशी अपेक्षा मुखर्जींनी व्यक्त केलेली आहे. ज्यामुळे समाजात व्यक्तिसापेक्षता वाढणार नाही. सामाजिक नियंत्रणाच्या बाबतीत व्यक्तिसापेक्षता जसजशी वाढत जाते, तसतसे समाजाचे व्यक्तीवर नियंत्रण प्रस्थापित होऊ शकत नाही. व्यक्तिमत्त्व विकासाला पोषक परिस्थिती निर्माण करुन देण्याची जबाबदारी ही

समाजव्यवस्थेची आहे व ती पार पाडण्यासाठी सामाजिक नियमनाची एक विशिष्ट व्यवस्था निर्माण व्हावी लागते. ही नियमन व्यवस्था निश्चित करताना कोणत्या नियमनात्मक मूल्यांना कोणता अग्रक्रम द्यावा याबाबत सुस्पष्टता असावी लागते. तसेच नवसमाजाच्या आशा-आकांक्षा परिपूर्ण होऊ शकतील अशा पद्धतीचा सुयोग्य बदल सामाजिक नियमनात होण्याइतपत व्यवस्था त्यात असली पाहिजे अशी अपेक्षा मुखर्जींनी व्यक्त केली आहे. कारण पारंपरिक समाजाविरुद्ध संघर्ष करण्याची प्रवृत्ती नवीन पिढीत निर्माण होईल.

**II नियमन करणाऱ्या अधिसत्तेची आवश्यकता** (Need of controlling Authority) – डॉ. मुखर्जी यांनी दुसऱ्या प्रश्नामध्ये नियमन करणाऱ्या अधिसत्तेची (Controlling Authority) आवश्यकता स्पष्ट केली आहे. सामाजिक नियमनाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी निश्चित स्वरुपाची यंत्रणा अस्तित्वात नसल्यामुळे व्यक्तिसापेक्षतेच्या वृत्तीने या नियमनाकडे पाहिले जाते. राजकीय नियम अथवा कायदे अमलात आणण्यासाठी किंवा राबवून घेण्यासाठी अधिकाराने मुक्त अशी यंत्रणा जशी अस्तित्वात असते, त्याप्रमाणे सामाजिक नियमनाच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी अधिकाराने युक्त अशी स्वतंत्र यंत्रणा अस्तित्वात असत नाही. सामाजिक नियामके ही प्रामुख्याने सामाजिक व वैयक्तिक आचारसंहितेशी निगडित असली तरी त्यांचे नियमन करणारे सत्तेचे एक विशिष्ट केंद्र अस्तित्वात असावे लागते असे मुखर्जी म्हणतात. एवढेच नाहीतर आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला शिक्षा देण्याचा अधिकार त्या यंत्रणेला द्यावे लागतात. सामाजिक संघटन व सामाजिक ऐक्य हे समाजनियमनाशिवाय निर्माण होऊ शकत नाही. असे असले तरी ज्या कायद्याला दंडशक्ती प्राप्त झालेली आहे व स्वतंत्र यंत्रणा प्राप्त झालेली आहे, अशा कायद्याद्वारे सामाजिक संघटन व सामाजिक ऐक्य कितपत निर्माण होऊ शकेल याविषयी मूल्यमापन करावे लागेल. समाजमान्य सामाजिक नियमनांना व परंपरांना जेव्हा समाजमान्य स्वरुपाच्या प्रथा व परंपरांना कायद्याचे किंवा राज्यसत्तेचे अधिष्ठान प्राप्त होते तेव्हा तो कायदा त्या समाजातील लोक स्वतःहून पालन करतात. अनिष्ट प्रथा व परंपरांचे निर्मूलन कायद्याच्या व दंडशक्तीच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न राज्यव्यवस्थेला करावा लागतो; म्हणून जुन्या व नवसमाजाच्या आशा-आकांक्षा यात संघर्ष होऊ न देता दोघांत समन्वय साधण्याचा समाजव्यवस्थेने प्रयत्न केला पाहिजे अशी मुखर्जींची अपेक्षा होती.

**III सामाजिक नियमनात सामाजिक मान्यतेचा किंवा पाठिंब्याचा (Social Acceptance) समावेश असावा –** तिसऱ्या महत्त्वाच्या घटकात सामाजिक नियमनाच्या संदर्भात मुखर्जींनी सामाजिक मान्यतेचा किंवा पाठिंब्याचा समावेश केलेला आहे. सामाजिक नियमनांचा उदय समाजव्यवस्थेतून झालेला असल्यामुळे सामाजिक मान्यता ही स्वाभाविकपणे प्राप्त झालेली असते; परंतु केवळ मान्यता प्राप्त झाल्यामुळे नियमने यशस्वी ठरत नाहीत. नियमनांचे पालन समाजव्यस्थेतील घटक स्वतःहून प्रत्यक्षात कितपत करतात त्यावर त्याचे यशापयश अवलंबून असते. समाजव्यवस्थेतील प्रत्येक घटकाला नियमनांच्या पालनामुळे कोणते फायदे होतात याचा अनुभव जोपर्यंत येत नाही, तोपर्यंत त्यांना समाजाची मान्यता प्राप्त होत नाही. सामाजिक शांतता, स्थैर्य व कल्याण साध्य करणारे अनेक संकेत व्यक्ती व समाजाच्या दृष्टीने आवश्यक असतात. परंतु सामाजिक पिळवणूक, अन्याय व विघटन करणाऱ्या संकेतांचे समाजव्यवस्थेकडूनच निर्मूलन व्हावे यासाठीही समाजाची मान्यता

असावी लागते असे मुखर्जी म्हणतात.

बहुसंख्य लोकांचे हितरक्षण व हितसंवर्धन ज्या संकेतांद्वारे, मूल्यांद्वारे अथवा नियमनाद्वारे साध्य होते, याची जाणीव लोकांना होते, त्या संकेतांना, मूल्यांना व नियमनांना अनुसरुन त्यांनी 'सामाजिक नियंत्रण' अशी संज्ञा वापरली आहे. नियंत्रणाची अधिसत्ता लष्करी गटाकडे, धर्मगुरूंकडे, भांडवलशाहीकडे अथवा साम्यवादी गटाकडे असली तरी बहुजन समाजाच्या हित होत असेल तर त्याचा स्वीकार करणे चुकीचे नाही असे मत डॉ. मुखर्जींनी व्यक्त केले आहे.

सामाजिक नियंत्रणाच्या प्रकारासंबंधी विवेचन करताना मुखर्जींनी (क) वर्गीय नियंत्रण (control by classes) व (ख) जातीय नियंत्रण (control by castes) असे दोन प्रकार केले आहेत. परंतु या दोन्ही प्रकारांबाबत त्यांनी असमाधान व्यक्त केले आहे. कारण या दोन्ही प्रकारच्या नियामकांचा उदय आत्मिक अथवा उत्स्फूर्त स्वरुपाचा नसून तो बहिर्गत स्वरुपाचा असतो.

थोडक्यात डॉ. डी. पी. मुखर्जी यांनी वर विशद केलेल्या समाजशास्त्रीय संकल्पनांचे विवेचन करताना भारतीय समाजव्यवस्थेचा आधार घेतलेला आहे. सामाजिक प्रगती, सामाजिक समता, व्यक्तिमत्त्वाचा विकास, सामाजिक शक्ती व सामाजिक नियंत्रण या समाजशास्त्रीय संकल्पनांचे पाश्चात्त्य समाजशास्त्राज्ञांनी ज्या पद्धतीने विवेचन केले त्याचा अन्वयार्थ भारतीय समाजव्यवस्थेसंदर्भात स्पष्ट केला आहे. हा अन्वयार्थ सामान्यत्वाकडून विशिष्टत्त्वाकडे (Particularistic) झुकलेला आहे. एवढेच नाही तर राष्ट्रवादी विचारसरणीतून समाजशास्त्रीय संकल्पनांचा आशय विशद करण्याचा मुखर्जींनी प्रयत्न केला आहे. त्यामुळे राष्ट्रवादी समाजशास्त्राज्ञ म्हणून त्यांची गणना केली जाते.

## १.२.३ ऐतिहासिक विरोध–विकासवादाची संकल्पना (concept of Historial Dialecticism)

भारतीय समाजशास्त्राचे स्वरुप अध्ययन पद्धत व समाजशास्त्रीय सिद्धांत याबाबत डी. पी. मुखर्जी यांनी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. पाश्चात्त्य समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक वास्तवता जाणून घेण्यासाठी ज्या अनेक अभ्यासपद्धतींचा (Methodology) व अध्ययन तंत्रांचा (Technology) अवलंब करण्यास सुरुवात केली, त्यांपैकी अनुभवाधिष्ठित अध्ययन तंत्र (Empirical Technique) हे आधुनिक काळात सर्वेक्षणात्मक अध्ययानात वापरले जाणारे महत्त्वाचे तंत्र आहे. यापूर्वी अनेक भारतीय व पाश्चात्त्य समाजशास्त्रज्ञांनी मांडलेल्या सिद्धांतावर व काढलेल्या निष्कर्षांवर व्यक्तिनिष्ठतेचा आरोप केला जात असे.

समाजाशास्त्र हे मानव्यशास्त्र असून विज्ञानाच्या किंवा शास्त्राच्या मूलभूत कसोट्या मानवी स्वभावाला, त्याच्या प्रवृत्तीला व त्याच्या बहिर्गत वर्तनक्रियेला तंतोतंत लागू करणे खूप कठीण आहे. त्यामुळे लोकपद्धतीशास्त्रज्ञ (Ethnomethodologists) समाजशास्त्र हे वस्तुनिष्ठता आणि व्यक्तिनिष्ठता (Objectivity & Subjectivity) यांच्या गुरफट्यांतून मुक्त करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

समाजशास्त्रीय अध्ययन पद्धतीबाबत मुखर्जींनी मार्क्सप्रणीत विरोध – विकासवादाच्या

तंत्राचा किंवा द्वंद्वात्मकतेचा (Dialectic Technique) अवलंब करण्यावर भर दिलेला आहे. आधुनिक काळात मार्क्सचे समाजशास्त्र किंवा मार्क्सप्रणीत समाजशास्त्र (Marrist Sociology) ही नवीन शाखा समाजशास्त्रात उदयास आलेली आहे. इतकेच नाही तर मार्क्सशास्त्र (Marxolog) हे नवीन विज्ञान सामाजिक शास्त्रात उदयास आलेले आहे. सामाजिक वास्तवतेचा शोध घेत असताना ऐतिहासिक भौतिकवादाच्या आधारावर विरोध-विकासाचे तंत्र (Historical Dialectic Materialism) मार्क्सने ज्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला त्याकडे अनेक समाजशास्त्रज्ञ आकर्षित होऊ लागले. त्यापैकी डॉ. डी. पी. मुखर्जी, डॉ. ए. आर. देसाई व रामकृष्ण मुखर्जी या भारतीय समाजशास्त्रज्ञांचा विशेष उल्लेख केला जातो. डी.पी. मुखर्जींचे सुरुवातीचे लिखाण मार्क्सवादी विचारसरणीवर आधारलेले होते; परंतु उत्तरार्धात त्यांनी जे लिखाण कार्य केले, त्यात मार्क्सवादी विचारसणीचा व अध्ययनतंत्राचा भारतीय समाजव्यवस्थेशी सांगड घालण्याचा प्रयत्न केला; कारण युरोप खंडात औद्योगिक क्रांतीनंतर जी भांडवलशाही समाजव्यवस्था उदयास आली, तिच्या पार्श्वभूमीवर मार्क्सने आपली सामाजिक, आर्थिक, राजकीय व तात्त्विक विचारांची मांडणी केली, तर मुखर्जींनी जमीनदारी आणि सरंजामशाही पद्धत, जातिनिष्ठ समाजव्यवस्था, अनेक व्यावसायिक संघ, धर्म आणि परंपरेचा समाजव्यवस्थेवर पडणारा प्रभाव, अज्ञान, दारिद्र्य, कर्जबाजारीप्रवृत्ती इ. भारतीय समाजव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर मार्क्सवादी विचारांचे मूल्यमापन केले आणि त्यातून असा निष्कर्ष काढला की, केवळ मार्क्सप्रणीत तंत्राचा अवलंब करून भारतीय समाजव्यवस्थेतील वास्तवतेचा आशय संपूर्णतः विशद करणे अत्यंत कठीण आहे; परंतु त्यांनी मार्क्सप्रणीत तंत्राचा अव्हेर केलेला नाही. यासंदर्भात थोडक्यात असे म्हणता येईल की, मार्क्सप्रणीत दृष्टिकोनाचे भारतीयीकरण (Indianisation of Marxian Approach) करण्याकडे त्यांनी विशेष भर दिला आहे.

भारतीय परंपरेचा अन्वयार्थ विशद करण्यासाठी डी.पी.मुखर्जींनी अनुभवाधिष्ठतेपेक्षा (Empiricism) स्पष्टीकरणात्मक पद्धतीचा (Interprepretive Method) पुरस्कार करण्यावर मुखर्जींनी विशेष भर दिलेला आहे. तसेच त्यांच्या मते, एखाद्या समाजाचे सामाजिक घडामोडींचे व सामाजिक समस्यांचे अध्ययन करताना किंवा त्यातील वास्तवता जाणून घेण्यासाठी प्रत्येक अभ्यासकाला त्या समाजाचा इतिहास व परंपरा-संस्कृती आणि वर्गीय रचना यांचा अभ्यास करतेवेळी मुखर्जींनी मार्क्सवादी दृष्टिकोनाचा अवलंब केला.

या मार्क्सवादी दृष्टिकोनात इतिहासाचा भौतिकवादी अन्वयार्थ, वर्गकलहाचा अन्वयार्थ व अतिरिक्त मूल्यांचा अन्वयार्थ अन्वय (Thesis), विरोधान्वय (Antithesis) आणि समन्वय (Synthesis) या विरोध - विकासवादाच्या किंवा द्वंद्वात्मकतेच्या तंत्रातून मार्क्सने विशद केलेला आहे. परंतु विरोध विकासवादाची मूळ संकल्पना हेगेल यांच्याकडून मार्क्सनी स्वीकारलेली आहे. फक्त मार्क्सने भौतिकवादातून तर हेगेलनी कल्पनावादातून (Idealism) विरोध विकासवादाचे स्पष्टीकरण केलेले आहे. विरोध विकासाचे सूत्र असे स्पष्ट करते की, मानवसमाजाचा विकास हा एक सरळ मार्गाने झालेला नसून तो नागमोडी स्वरुपातून झालेला आहे व या नागमोडी मार्गांत नेहमीच संघर्ष किंवा विरोध होत असतो. प्रस्थापित समाजव्यवस्थेविरुद्ध संघर्ष करण्याची प्रवृत्ती नवसमाजात सातत्याने आढळून येते

आणि कालांतराने ही समन्वयवादी समाजव्यवस्था प्रस्थापित समाजव्यवस्थेचे रुप धारण करते व पुन्हा नवसमाज त्याविरुद्ध संघर्ष करण्याचा प्रयत्न करतो. अशाप्रकारे मानवसमाजाचा विकास हा विरोधातून किंवा संघर्षातून झाला, हे मूलभूत सूत्र विरोध-विकासवादाने स्वीकारलेले आहे. हेगेलने दोन परस्परविरोधी अमूर्त विचारांमधील किंवा कल्पनाशक्तीमधील विरोध स्पष्ट केलेला आहे. हेगेलचा विरोध-विकासवाद हा कल्पनावादी (Dialectic Idealism) तर मार्क्सचा विरोध-विकासवाद हा भौतिकवादी (Dialectic Materialism) म्हणून ओळखला जातो.

भारतीय परंपरेचा अन्वयार्थ विशद करण्यासाठी मार्क्सप्रणीत विरोध- विकासवादाचे सूत्र अवलंबिले आहे. कारण भारतीय समाजव्यवस्थेतील अनेक पारंपरिक संस्था भारतीय परंपरेचे संरक्षण व संवर्धन करण्यात नेहमीच प्रयत्नशील असतात. त्यात प्रामुख्याने धर्मसंस्था, कुटुंबसंस्था, जातिव्यवस्था, वर्गव्यवस्था आणि राजकीय व्यवस्था यांचा विशेष अंतर्भाव होतो. भारतीय समाजात आढळून येणाऱ्या सर्वच प्रथा व परंपरा या निर्भेळ स्वरुपाच्या असतात असे नाही. सांस्कृतिक व पारंपरिक वैविध्यता हे भारतीय समाजाचे लक्षण असल्यामुळे विभिन्न समुदायांतील परस्परविरोधी परंपरेत सुरुवातीस संघर्ष होऊन नंतरच समन्वयात्मक रुपाची भूमिका भारतीय समाजव्यवस्थेत रूढ होऊ लागली असे मुखर्जींचे मत आहे. परंतु हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी इतिहासाचाच आधार घेतला आहे असे नाही तर वेगवेगळ्या पद्धतींचा-तंत्रांचा अवलंब करुन विविध प्रकारची माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु या माहितीच्या आधारावर ते एका विशिष्ट निष्कर्षांपर्यंत येऊन पोहोचू शकले नाहीत. म्हणजेच भारतीय परंपरेच्या संदर्भात विरोध विकासवादाच्या तंत्राचा अवलंब करून एका निश्चित अशा समाजशास्त्रीय सिद्धातांची मांडणी करण्यापर्यंत मुखर्जी पोहोचू शकले नाहीत. परंतु परंपरेतील वैविध्यतेमुळे एखादी परंपरा एखाद्या समाजात पवित्र मानून तिचा स्वीकार करतात तर तीच परंपरा अन्य समाजात निषिद्ध मानून तिचा अव्हेर केला जातो व या कारणास्तव काही समाजांत कलह व तणाव निर्माण झालेले आहेत असे मुखर्जींचे मत आहे.

**भारतीय समाजव्यवस्थेतील सामाजिक स्तररचनेचे व सामाजिक संस्थांचे विश्लेषण करण्यासाठी –**

मुखर्जी यांनी मार्क्सप्रणीत तंत्राचा अवलंब करुन भारतीय समाजव्यवस्थेतील सामाजिक स्तररचनेचे व सामाजिक संस्थांचे विश्लेषण केले आहे. विशेषतः भारतीय परंपरेत आजपर्यंत जी स्थित्यंतरे अथवा परिवर्तने घडून आली, त्यांचे विश्लेषण करीत असताना ऐतिहासिक द्वंद्वात्मकतेच्या तंत्राचा (Historical - Dialectical Technique) मुखर्जींनी पुरस्कार केला. भारतीय बहुसंख्य लोक परंपरावादी विचारसरणीचे असून भौतिक क्षेत्रात कितीही सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला तरी परंपरेशी सांस्कृतिक मूल्यांशी चिकटून राहण्याची प्रवृत्ती असते. एवढेच नाही तर आपल्या परंपरा अबाधित टिकाव्यात या उद्देशातून आपले सामाजिक बळ अधिक संघटित करण्याचा प्रयत्न करतात असे त्यांचे मत आहे. आपल्या पारंपरिक मूल्यांना धोका पोहोचण्याची शक्यता जर असेल तर आपल्या सामर्थ्यांसह त्यांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला जातो.

**भारताच्या संदर्भातील इतिहासाचा परिणाम सामाजिक दृष्ट्या कसा होतो हे तपासण्यासाठी –**

डॉ. मुखर्जींनी वरील उद्देश समोर ठेवून विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे. परंपरागत भारतीय समाजशास्त्रज्ञ आपल्या अभ्यासपद्धतीत तिचा अवलंब करतात व गृहिते (Hypothesis) मांडतात. त्यांचा त्यांनी मार्क्सवादी परिमाणातून म्हणजेच वर्गसंघर्ष, वर्गनिर्मिती आणि संरचनात्मक तणावाच्या माध्यमातून तपासण्याचा प्रयत्न केलेला आहे. एवढेच नाही तर ही मार्क्सवादी परिमाणे (Measures) भारतीय इतिहासात आपला विशेष प्रभाव टाकतात व टिकवून धरत असतात. या घटकांच्या समाजशास्त्रीय अभ्यासासाठी मुखर्जींनी मार्क्सप्रणीत प्रतिकृतीचा (Marxis Model) अवलंब करण्यावर भर दिलेला आहे. त्यामुळे साहजिकच कार्ल मार्क्स, डिल्थे यांच्या वैचारिक समन्वयाचा त्यांच्या संशोधनात्मक अभ्यासपद्धतीत प्रभाव पडलेला आहे.

मुखर्जींच्या मते समाजशास्त्रीय विश्लेषण उत्पादनाची साधने व सामाजिक संबंध या बाबी इतिसाहात प्रवाहाला वळण देत असल्या तरी भारताच्या संदर्भात परंपरा हा निर्णायक घटक असून तो कोणालाच डावलता येणार नाही. मार्क्सवादी सूत्रानुसार अन्वय, विरोधान्वय, समन्वय व पुन्हा अन्वय अशी इतिहासाची पुनरावृत्ती होत असते; परंतु भारतीय इतिहासाच्या घटनाक्रमाची पुनरावृत्ती दर्शवू शकत नाही. ऐतिहासिक द्वंद्वात्मक पद्धतीचा आशय विश्लेषणासाठी त्यांनी अवलंब केला; परंतु पृथक्करणवाद त्यांनी नाकारला; कारण भारतीय समाजव्यवस्थेत व्यक्तिगत पातळीवर असे निष्कर्ष काढणे अत्यंत कठीण आहे. भारताविषयी सांघिक अथवा समूहवादी (collectivity) चिकित्सा पद्धत योग्य ठरते. भारतातील बऱ्याच संशोधकांनी आपली आदर्श प्रतिकृती ही पाश्चात्त्य समाजशास्त्र व तत्त्वज्ञान यावर आधारलेल्या प्रतिकृतीचा स्वीकार केलेला आहे व ती प्रतिकृती प्रामुख्याने व्यक्तिवादावर व भौतिकवादावर आधारलेली आहे; त्यामुळे तिचा भारतात अवलंब करणे असयुक्तिक आहे असे मुखर्जी म्हणतात.

डी.पी. मुखर्जी विचारांनी मार्क्सवादी असले तरी मार्क्सवादाचे भारतीयीकरण (Indianized version of Marxism) करण्याचा त्यांनी जो प्रयत्न केला तो गैरवाजवी आहे अशी टीका करण्यात येऊ लागली; कारण आपल्या विश्लेषणाच्या पुष्ट्यर्थ त्यांनी वर्गनिर्मित वर्गसंघर्ष या संदर्भातील परंपरा पाश्चात्त्य पद्धतीने न स्वीकारता स्थानीय (Native) म्हणजेच भारतीय परंपरा हाच आधारभूत घटक म्हणून स्वीकारलेला आहे. एवढेच नाही तर समाजशास्त्राच्या अभ्यासकांनादेखील भारतीय परंपरेच्या आधारावर सामाजिक वास्तवता शोधून काढण्याचा सल्ला दिलेला आहे. समाजशास्त्रीय अभ्यासपद्धती व त्यांच्या शास्त्रीय कसोट्या प्रादेशिक समाजाच्या परंपरेशी निगडित असाव्या लागतात, असे मुखर्जी म्हणतात. तुलनात्मक पद्धतीचा पुरस्कार करून विशिष्टत्वाकडून सामान्यत्वाकडे जाऊन त्यांनी मांडलेले निष्कर्ष हे का असे ही प्रमाणात आपणास स्वीकारावे लागतील.

## १.२.४ भारतीय परंपरा आणि सामाजिक परिवर्तन

(Indian Tradition & Social change) -

भारतीय परंपरा आणि सामाजिक परिवर्तन या विषयी डॉ. मुखर्जींचे योगदान भारतीय समाजशास्त्रात उल्लेखनीय मानले जाते. 'उ्रीशीीळींळशी' या १९५८ साली प्रसिद्ध केलेल्या ग्रंथात त्यांनी भारतीय परंपरेच्या संदर्भात आपले वस्तुनिष्ठ विचार मांडले आहेत. हे विचार आपणास पुढीलप्रमाणे जाणून घेता येतील.

डॉ. मुखर्जींच्या मते, कोणत्याही प्रादेशिक समाजाचा अभ्यास करतेवेळी अभ्यासकाला त्या समाजाची परंपरा, संस्कृती, मूल्ये, रीतिरिवाज इ. चे संपूर्ण आकलन करुन घ्यावे लागते. समाजाचा बहिर्गतदृष्ट्या अभ्यास करण्याऐवजी अंतर्गतदृष्ट्या अभ्यास करणे हे समाजशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. परप्रांतीय व्यक्तीपेक्षा स्वप्रांतीय व्यक्तीला आपल्या समाजाची आंतरिक ओळख जेवढ्या जवळीकतेने व सूक्ष्मतेने होऊ शकते, तितकी परप्रांतीय व्यक्तीला होऊ शकत नाही; त्यामुळे भारतीय समाजाचा सविस्तर व सूक्ष्म अभ्यास भारतीय समाजशास्त्रांनी, संशोधकांनी व अभ्यासकांनी करावा अशी मुखर्जींची अपेक्षा आहे. भारतीय परंपरा, संस्कृती मूल्ये, जीवनविषयक दृष्टिकोन, रीतिरिवाज इ. घटक अत्यंत परिचयाचे असल्यामुळे अथवा त्या पद्धतीचे जीवन स्वतःहून कंठीत असल्याने त्याचा सूक्ष्म अभ्यास करण्यात कोणतीच अडचण भारतीय अभ्यासकाला भासणार नाही; त्याकरिता मुखर्जींनी भारतीय समाजव्यवस्थेचा विश्लेषणात्मक अभ्यास करतेवेळी अनियंत्रित निरीक्षण, सहभागी निरीक्षण, अनुभवाधिष्ठिता क्षेत्रकार्य पद्धत, सर्वेक्षण इ. अध्ययन तंत्रांचा अवलंब करण्यावर भर दिलेला आहे.

भारतीय संस्कृतीच्या आणि परंपरेच्या मर्यादेत राहून सामाजिक परिवर्तनाचे अध्ययन करण्यात एक प्रकारचा देशीपणा दिसून येतो. भारतीय समाजव्यवस्थेत विभिन्न धार्मिक, जातीय, भाषिक, वांशिक, प्रादेशिक व सांस्कृतिक समुदाय लहानमोठ्या आकाराने पिढ्यानपिढ्या वास्तव्य करीत आहेत. प्रत्येक समुदायाची सांस्कृतिक व पारंपरिक लक्षणे वैशिष्ट्यपूर्ण स्वरुपाची जरी असली तरी त्या सर्व विभिन्न लक्षणांना जोडणारा मध्यवर्ती दुवा भारतीय संस्कृतीत आढळतो म्हणून भारतीय परंपरेचे उगमस्त्रोत हे भारतीय संस्कृतीत आढळते. 'सर्वसमावेशकता व परिवर्तनशीलता' ही भारतीय संस्कृतीची लक्षणे आहेत. त्यामुळे साहजिकच भारतीय परंपरा परिवर्तनशील स्वरुपाच्या आहेत. परंतु भारतीय समाजव्यवस्थेच्या चौकटीत राहून ही परिवर्तने होत असतात; त्यामुळे ही समाजव्यवस्था अंतर्गतदृष्ट्या अभ्यासणे हे भारतीय अभ्यासकांचे उद्दिष्ट असले पाहिजे, असे मुखर्जी म्हणतात.

**भारतीय संस्कृती समूहवाद किंवा संघवादावर आधारलेली आहे –**

भारतीय संस्कृती ही व्यक्तिप्रधानतेवर व भौतिकवादावर अवलंबिलेली नसून ती समूहवादावर किंवा संघवादावर आधारलेली आहे. समाजाभिमुखता हे भारतीय संस्कृतीचे लक्षण असल्यामुळे पाश्चात्त्या तत्त्वज्ञानावर भारतीय संस्कृतीचे आकलन होऊ शकणार नाही. पाश्चात्त्य समाजशास्त्रज्ञांनी समाजशास्त्राला विज्ञानाच्या, भौतिकवादाच्या अध्ययनावर अनेक मर्यादा पडू शकतात असे त्यांचे मत आहे. पाश्चात्त्य समाजशास्त्रज्ञांनी अथवा अर्थशास्त्रज्ञांनी किंवा राज्यशास्त्रज्ञांनी सामाजिक शास्त्रांच्या अध्ययनाच्या संदर्भात जी चौकट तयार केली, त्या चौकटीलाच समाजशास्त्र, अर्थशास्त्र किंवा राज्यशास्त्र मानावे

काय, याबाबत डॉ. मुखर्जींनी मूलभूत प्रश्न उपस्थित केला आहे. पाश्चात्त्य तत्त्व प्रणाली, दृष्टिकोन अभ्यास पद्धत व अध्ययनाची मूलभूत चौकट ही संपूर्ण भारतीय समाजव्यवस्थेला कितपत लागू पडू शकेल, याबाबत प्रश्नचिन्ह आहे. त्यांच्या मते, पाश्चात्त्य तत्त्वप्रणाली व दृष्टिकोन हे भारतीय संस्कृतीपासून संपूर्णतः अलग असल्याने त्याचा भारताच्या संदर्भात फारसा वापर करता येत नाही. याबाबत त्यांनी भारतीय इतिहासाचे उदाहरण दिले आहे. पाश्चात्त्य विचारवंतांनी भारताच्या इतिहासाचा अन्वयार्थ हा फक्त आर्थिक, राजकीय दृष्टिकोनातून विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतीय परंपरा, संस्कृती, कला, तत्त्वज्ञान यांकडे दुर्लक्ष करून भारतीय समाजव्यवस्थेला व इतिहासाला पाश्चात्त्य तत्त्वप्रणाली लावण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांच्या निष्कर्षात व विवेचनात पक्षपातीपणा किंवा एकतर्फीपणा जास्त दिसून येतो. या व्यक्तिवादावर व भौतिकवादावर पाश्चात्त्य संस्कृती अवलंबविलेली आहे. त्या पाश्चात्त्य विचारसरणीवर भारतीय संस्कृतीचे व समाजव्यवस्थेचे वस्तुनिष्ठ परीक्षण करणे खूप कठीण आहे असे मुखर्जी म्हणतात.

**भारतीय व पाश्चात्त्य अध्ययन पद्धतीतील फरक**

भारताचा इतिहास, भारताचे अर्थशास्त्र व भारतीय तत्त्वज्ञान यांचे संदर्भ सामाजिक समूहाशी व समाजशील मानवी जीवनाशी निगडित होते. धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, अध्यात्म इ. शास्त्रे ही मूल्याधिकतेवर आधारलेली होती; परंतु पाश्चात्त्य विचारवंतांनी या मूल्यव्यवस्थेकडे दुर्लक्ष करून भारतीय समाजव्यवस्थेचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केला. पाश्चात्त्य विचारप्रणालीचे व तत्त्वज्ञानाचे अनुकरण भारतीय विचारवंतांनी करण्यास सुरुवात केली; त्यामुळे पाश्चात्त्य विचारवंतांप्रमाणेच भारतातील त्या विचारांचे अनुकरण करणाऱ्या भारतीय विचारवंतांना देखील भारतीय समाजव्यवस्थेचे संपूर्णतः आकलन होऊ शकते नाही, असे मुखर्जींना वाटते.

तसेच पाश्चात्त्य अध्ययन पद्धत ही अत्यंत साचेबद्ध व बंदिस्त स्वरुपाची आहे व ती संपूर्णतः भारतीय समाजव्यवस्थेला लागू पडू शकत नाही, असे मुखर्जींचे मत आहे. पाश्चात्य विचारसरणी, पाश्चात्त्य अध्ययनपद्धत यांच्या प्रभावापासून भारतीय समाजशास्त्र मुक्त करण्याच्या उद्देशातून डॉ. मुखर्जी हे भारतीय समाजशास्त्राकडे वळले. भारतीय समाजव्यवस्थेची वास्तवता जाणून घेण्यासाठी भारतीय परिस्थितीला उपयुक्त ठरेल अशा पद्धतीचे अध्ययन तंत्र विकसित करण्याकडे त्यांनी विशेष भर दिला.

**भारतीय समाजाला जाणून घेण्यावर डॉ. मुखर्जींनी भर दिला.**

डॉ. मुखर्जींनी पाश्चात्त्य पद्धतीचा स्वीकार न करता भारतीय समाजव्यवस्थेला जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते कोणत्याही समाजाचे ज्ञान मिळविण्याअगोदर त्या समाजाला जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे. मानवाची जिज्ञासू वृत्ती ही घटना अथवा समस्या जाणून घेण्यास विशेष चालना देत असते. घटना जाणून घेतल्यानंतरच त्या घटनेचे सूक्ष्म अध्ययन करून त्या संदर्भातील विशेष ज्ञान अभ्यासकाला मिळविता येते; म्हणून डॉ. मुखर्जींनी भारतीय समाजव्यवस्थेचे ज्ञान अवगत करुन घ्यावयाचे असल्यास प्रथम भारतीय समाजाला जाणून घेण्यावर विशेष भर दिला आहे. एक 'भारतीय' म्हणून अभ्यासकांनी

जीवन कंठण्याचा, स्वतःहून त्या परंपरा अनुभवण्याचा प्रयत्न केल्यास भारतीय समाजाची वास्तवता अभ्यासकाला शोधून काढता येते, असे मुखर्जी म्हणतात.

**सामाजिक शास्त्रांचा विकास**

सामाजिक शास्त्रांचा जसजसा विकास होऊ लागला, तसतसे सामाजिक शास्त्रांतर्गत (Social Sciences) विविध ज्ञानशाखांनी मानवसमाजाच्या विविध अंगांचा व त्यांच्यातील परस्पर संबंधांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. मानवी वर्तनाबाबत अथवा सामाजिक संबंधाबाबत एखादा समान नियम अथवा एखादे समान सूत्र शोधून काढता येईल का, याचा शोध घेण्याचा सर्व समाजशास्त्रांनी प्रयत्न केला. पण त्यात त्यांना फारसे यश आले नाही. याउलट काही नियमांबाबत सामाजिक शास्त्रांमध्ये वैचारिक अथवा तात्त्विक स्वरुपाचे मतभेद निर्माण होऊ लागले. स्थूलमानाने मानवी समूह दर्जा, गतिशीलता, एकजिनसीपणा, सहानुभूती, संघर्ष, सहकार इ. सर्वसामान्य संकल्पनांना जाणून घेण्याचा समाजशास्त्राने प्रयत्न केला, तर उत्कर्ष, कल्याण, पसंती यांवर अर्थशास्त्राने भर दिला, तर याउलट सत्ता, संपत्ती अधिकार व कल्याण यांवर राज्यशास्त्राने विशेष भर दिला. परंतु तत्त्वज्ञानाचा आधुनिक काळात फारसा उपयोग होत नाही असे मुखर्जींचे मत आहे, कारण तत्त्वज्ञान व व्यवहार यांत पडलेल्या प्रचंड तफावतीमुळे समाजाची वास्तवता जाणून घेता येत नाही. सामाजिक शास्त्रांतर्गत ज्ञानशाखांचा मानवी समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, अध्ययनाची पद्धत, निष्कर्षाचे स्वरुप एकाच प्रकारचे असत नाही. एवढेच नाही तर सिद्धांताचे स्वरुपही भिन्न – भिन्न असते. स्थूलमानाने सर्व काळातील मानवसमाजास लागू पडेल असे सार्वत्रिक स्वरुपाचे सिद्धांत सामाजिक शास्त्रात प्रस्थापित करता येत नसल्यामुळे त्याचे निष्कर्ष तर्कशास्त्रानुसार सामान्य स्वरुपाचे असतात व अशा सामान्य स्वरुपाच्या निष्कर्षाला समाजशास्त्र अपवाद नाही.

भारतीय समाजशास्त्राचे निष्कर्ष हे जरी सामान्य स्वरुपाचे असले तरी ते भारतीय समाजाच्या परंपरेशी निगडित असतात असे मुखर्जी म्हणतातः परंतु या निष्कर्षाच्या पडताळ्यावरुन सिद्धांतात रुपांतर करण्याचा अभ्यासकांनी प्रयत्न केल्यास पाश्चात्त्य समाजशास्त्राइतका श्रेष्ठ दर्जा भारतीय समाजशास्त्राला प्राप्त होऊ शकेल असा विश्वास मुखर्जी व्यक्त करतात.

भारतीय परंपरेच्या संदर्भात डॉ. मुखर्जी म्हणतात की, भारतीय परंपरेत स्वातंत्र्याच्या व विकासाच्या संकल्पना अंतर्भूत झालेल्या असल्या तरी त्या समाजीकरणाच्या माध्यमातून विकसित झालेल्या आहेत. भारताच्या भौगोलिक परिस्थितीला अनुसरुन योग्य त्या परंपरांचा स्वीकार भारतीय समाजव्यवस्थेने केलेला आहे. निसर्गाच्या नीतिनियमांना पोषक ठरेल अशी मूल्ये भारतीय परंपरेत आढळतात. एवढेच नाही, तर भौगोलिक परिस्थितीत, व निसर्गनियमात जसजसा बदल होत जातो तसतसा त्या परंपरतेही सोईस्कर बदल करण्याची प्रवृत्तीही आढळते; त्यामुळे भारतीय भूमीशी एकरुप होऊन जेव्हा समाजव्यवस्थेचे अध्ययन केले जाते, तेव्हाच त्या समाजाची वास्तवता अभ्यासकाला जाणून घेता येते.

मानवशास्त्र व मानसशास्त्र या दोन शास्त्रांविषयी विचार मांडत असताना मुखर्जी म्हणतात की, या दोन्ही शास्त्रांनी सामाजिक परंपरांच्या अध्ययनाकडे दुर्लक्ष केलेले आहे. मानवाची

प्रवृत्ती, त्याचा जीवनविषयक दृष्टिकोन, त्याचा स्वभाव, त्यांची जडणघडण, तो ज्या समाजात वास्तव्य करतो, त्या समाजाच्या परंपरेतून होत असते व अशा परिस्थितीत भारतीय समाजाचा विश्लेषणात्मक अभ्यास भारतीय समाजशास्त्रच करु शकेल.

भारतीय समाजव्यवस्थेत देशकाल परिस्थितीनुसार अनेक बदल झालेले आहेत; मात्र या बदलांना परंपराही बऱ्याच अंशी कारणीभूत आहे. बहिर्गत व अंतर्गतदृष्ट्या जे जे बदल भारतीय समाजव्यवस्थेत झाले ते परंपरेतील बदलांमुळे साध्य झाले. असे भारतीय परंपरेचे स्वरुप हे परिवर्तनशील आहे. परंतु समाजव्यवस्थेच्या चौकटीत राहूनच परिवर्तनाचा स्वीकार करण्याची क्षमता ही भारतीय परंपरेत अप्रत्यक्षरित्या भारतीय समाजात आढळते. समाजव्यवस्थेला व सामाजिक मूल्यांना धोका पोहोचणारी परिवर्तने जर घडत असतील तर त्यांना प्रतिकार करण्याची क्षमता भारतीय परंपरेत आढळते. तसेच या परंपरेत सहिष्णु वृत्तीचा पुरस्कार करण्याची लक्षणेही आढळतात. आजपर्यंत भारतीय परंपरेत जी जी परिवर्तने घडून आली त्यांना आर्थिक घटक व बहिर्गत स्वरुपाचा दबाव हा बऱ्याच अंशी कारणीभूत आहे असे मुखर्जींचे मत आहे. काही परंपरा जरी बाह्यदबावामुळे बदलत असल्या तरी काही परंपरा मिळतेजुळते घेऊन अथवा समायोजन करुन त्या जिवंत टिकविण्याचा प्रयत्न करतात. सामाजिक स्वास्थ्यासाठी, शांतता विकासासाठी ज्या परंपरा उपयुक्त ठरतात, त्या कायम टिकविण्याचा प्रयत्न मानव करीत असतो व या सार्वत्रिक आणि आवश्यक स्वरुपाच्या मूल्यांना धोका पोहोचण्याची जेव्हा शक्यता असते तेव्हा त्यास विरोधही केला जातो. म्हणून समायोजन विरोध, सहकार, संघर्ष यांच्याद्वारे भारतीय समाजाच्या परंपरेत परिवर्तने होत आलेली आहेत, असे मुखर्जींचे मत आहे.

भारतीय समाजाचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्रज्ञ होण्याची गरज नाही असा विचार मुखर्जी ठेवतात. कारण भारतात वास्तव्य करीत असलेल्या, भारतीय समाजाचे आचारविचार व परंपरा यांचा अनुभव असलेल्या भारतीय संस्कृती आत्मसात केलेल्या व बोलीभाषांचे किंवा प्रादेशिक भाषेचे ज्ञान आसलेल्या, कोणत्याही भारतीय नागरिकाला भारतीय समाजाचा अभ्यास करता येतो. भारतीय समाजव्यवस्थेतील गर्भितार्थ जाणून घेण्यासाठी त्या मूल्यांची आवश्यकता असते. भारतीय समाजव्यवस्था, परंपरा, जीवनाविषयक दृष्टिकोन व त्या समाजाच्या समस्या इतक्या क्लिष्ट व गतिशील असतात, की त्या सहजासहजी कळू शकत नाहीत. त्यामुळे भारतीय समाजाला जाणून घेणे हे अभ्यासकाचे मूलभूत कर्तव्य आहे. प्रत्येक प्रादेशिक समाजात प्रचलित असलेल्या म्हणी व वाक्प्रचार सामाजिक अनुभवातून रूढ होत असल्याने त्यांचा आशय जाणून घेणे आवश्यक आहे. भारतीय अभ्यासकांना संस्कृत भाषेचे ज्ञान अवगत करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेतील मूल्ये, प्रतीके व जीवनविषयक तत्त्वज्ञान यांची वस्तुनिष्ठ माहिती मिळू शकेल.

समाजशास्त्र व सांस्कृतिक मानवशास्त्र हे एकमेकांपासून जरी भिन्न असले तरी समाजशास्त्राला सांस्कृतिक मानवशास्त्रावर बऱ्याच प्रमाणात विसंबून राहावे लागते. संस्कृतीच्या आधारावर संपूर्ण भारतीय समाजरचनेचे विश्लेषण करणे फार कठीण असते. परंतु भारतीय संस्कृती व्यक्तिवादाला फारसे महत्त्व देत नाही, जितकी पाश्चात्त्य संस्कृती देते. भारतीय

संस्कृतीचा मूलभूत पाया समूहवादावर किंवा संघवादावर अवलंबिलेला असल्यामुळे भारतीय धर्मशास्त्रात 'पुरुष' हा शूर व्यक्ती (Individual) या संज्ञेने वापरला नसून ते सामूहिक जबाबदारी, कर्तव्यतत्परता व समाजशील आणि संस्कृतिशील व्यक्ती या संज्ञेने वापरलेला आहे. म्हणून भारतीय समाजाचा अभ्यास करतेवेळी समाजात अथवा सामाजिक समूहात राहून वावरणारी व्यक्ती किंवा व्यक्तिसमूह हा घटक गृहीत धरण्यावर मुखर्जींनी भर दिलेला आहे.

**परंपरा किंवा संप्रदाय हा भारतीय समाजव्यवस्थेचा ऐतिहासिक पाया आहे.**

भारताच्या प्राचीन संस्कृतीत पुरुषार्थांची जी संकल्पना विशद केलेली आहे, ती प्रामुख्याने वर्तनविषयक व्यवहाराच्या नीतिनियमांशी निगडित आहे. संस्कृतीमध्ये 'परंपरा' हा शब्द ज्या अर्थाने वापरला जातो त्याचा अन्वय (अर्थ) ऐतिह्य म्हणजे वारसा (Succession) असा आहे व त्यातूनच 'इतिहास' (History) या शब्दाची उत्पत्ती झाली व त्यामुळे परंपरा व इतिहास यांच्यातील संबंध अत्यंत घनिष्ठ आहे. परंपरा या इतिहासातून, जुन्या लिखाणातून, व्यक्तिविषयक कथांतून, ऋषिमुनींच्या शिकवणुकीतून उदयास आलेल्या आहेत; परंतु परंपरेच्या इतिहासाकडे दुर्लक्ष केल्यामुळे भारतीय समाजाची वास्तवता जाणून घेणे अत्यंत कठीण झालेले आहे.

## १.३ स्वयंअध्ययनसाठी प्रश्न

१. डॉ. मुखर्जींच्या मूलभूत समाजशास्त्रीय संकल्पनेविषयी विचार मांडा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२. प्रगती ही संकल्पना स्पष्ट करून तिचे तत्त्व स्पष्ट करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३. ऐतिहासिक विरोध-विकासवादाची संकल्पना स्पष्ट करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४. मुखर्जींची भारतीय परंपरा आणि सामाजिक परिवर्तनाविषयी विचार अधोरेखित करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

## १.४ सारांश

मुखर्जींनी भारतीय जातिव्यवस्थेविषयी विचार मांडत असताना म्हटले आहे, की भारतातील वर्गव्यवस्थेपेक्षा अथवा वर्गीय संबंधापेक्षा जातिव्यवस्था व जातीय हितसंबंध हेच परंपरेचे रक्षण करण्यात यशस्वी ठरलेले आहेत. धार्मिक आचारविचार, संकेत, रीतिरिवाज, लोकरूढी यांच्या माध्यमातून जातिनिष्ठ स्वरुपाची व्यवस्था टिकण्यास कारणीभूत ठरली. परंतु जातिनिष्ठि स्वरुपाच्या समाजव्यवस्थेत सूक्ष्म स्वरुपातून जी परिवर्तने झाली ती प्रामुख्याने संदिग्ध व अन - आर्थिक (Non -Economic) घटकांतून झालेली आहेत. श्रुती, स्मृती आणि अनुभव यांच्या माध्यमातून भारतीय परंपरेत झालेली परिवर्तने ही लोकशाही पद्धतीने झालेली असल्यामुळे ती एक रक्तहीन क्रांतीच म्हणून संबोधवी लागेल. मुखर्जींच्या मते, वैयक्तिक अनुभव हाच परिवर्तनाचा मूलभूत पाया आहे. हे तत्त्व उपनिषदाने काही प्रमाणात मान्य केलेले आहे; परंतु खासगी जीवनात आलेल्या अनुभवापेक्षा सामाजिक किंवा सामूहिक स्वरुपाचा आलेला अनुभव हा सामाजिक परिवर्तनास विशेष कारणीभूत आहे. स्त्रियांच आदर करणे ही शिकवण संत-मुनींनी दिलेली आहे. परंतु अनुभवापेक्षा बौद्धिक किंवा वैचारिक क्षेत्रातील परिवर्तन सर्वश्रेष्ठ प्रतीचे असते.

टर्नर यांच्या परंपरेच्या संदर्भात केलेल्या उच्च व नीच अशा दोन प्रकारच्या वर्गीकरणात सामाजिक सत्याचा अंश अत्यंत कमी असतो, अशी टीका गुरविच यांनी केलेली आहे. कारण उच्चस्तरीय लोकांच्या परंपरा श्रेष्ठ असतात तर कनिष्ठ स्तरातील लोकांच्या परंपरा कनिष्ठ प्रतीच्या असतात असा लोकांचा समज आहे. परंतु त्यात वस्तुस्थितीचा अंश फार कमी आहे. प्रत्येक श्रेष्ठ व कनिष्ठ स्तरातील समाजात अमूर्त मूल्यांचे पावित्र्य टिकविण्यासाठी प्रतीकात्मक घटकांचा अवलंब करण्याची प्रवृत्ती आढळून येते; तसेच त्या प्रतीकांना सामाजिक मान्यतेच्या आधारावर प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली जाते; एवढेच नाही तर या प्रतीकांचा वापर आपल्या समाजात भावनिक ऐक्य निर्माण करण्यासाठी केला जातो; त्यामुळे श्रेष्ठ व कनिष्ठ अशा गटांत परंपरेचे वर्गीकरण करणे असयुक्तिक व अशास्त्रीय मानावे लागेल, असे मुखर्जींचे मत आहे.

भारतीय समाजाचा अभ्यास करणे म्हणजेच भारतीय परंपरेचा अभ्यास करणे होय. परंतु मार्क्सवादाच्या मूलभूत सिद्धांताच्या आधारावर परंपरांचा अभ्यास करणे कठीण असल्याने भारतीय समाजशास्त्रज्ञांनी अशा अभ्यासपद्धती व अशी अध्ययन तंत्रे शोधून काढावित, की जी भारतीय समाजव्यवस्थेला व परिस्थितीला उपयुक्त ठरू शकतील अशी अपेक्षा डॉ. मुखर्जींनी व्यक्त केलेली आहे. पाश्चात्त्य विचार, पाश्चात्त्य अभ्यासाच्या पद्धती व अध्ययन तंत्रे यांच्या आधारावर भारतीय समाजव्यवस्थेची वास्तवता जाणून घेण्यास उपयुक्त ठरणार नाहीत; म्हणून भारतीय समाजशास्त्राचे भारतीयीकरण (Indianisation of sociology) करणारे समाशास्त्रज्ञ या नात्याने डॉ. डी. पी. मुखर्जींचा उल्लेख केला जातो.

## १.५ पारिभाषिक शब्द

१. नियमन अधिसत्ता (controlling Authority) - सामाजिक नियमांना काटेकोरपणे पाळण्यासाठी उपयोगात आणलेली एक यंत्रणा.

२. **लोकान्वय पद्धती/ लोकपद्धतीशास्त्र** (Ethnomethodology)

अर्थ Ethno - एथनो - जन, मानव, लोक

Mthod - मेथड - पद्धती

Logy - लॉजी- शास्त्र

ही एक आधुनिक अभ्यासपद्धती आहे, ज्यास दैनंदिन जीवन जगत असताना लोक या पद्धतीचा उपयोग करतात.

## १.६ संदर्भ सूची (Bibliography)


१) प्रा. गर्जेद्रगड व्ही. एन. व प्रा. मारुलकर व्ही. एस. (२०००) समकालीन भारतीय समाजशास्त्र, कोल्हापूरः फडके प्रकाशन पृष्ठ क्र. - २३०

२) डॉ. खैरनार दिलीप (२००८) समाजशास्त्र परिचय, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स पृष्ठ क्र. २४

३) A huja Ram (1993) Indian Social system, Jaipur : Rawat Publications, Page No.- 79

४) कसबे रावसाहेब, संपा (२०००) समता, विचार, व्यवहार, भवितव्य (मुंबई, दादासाहेब रुपवते फाउंडेशन मुंबई, दादासाहेब रुपवते स्मृती ग्रंथ

५) आहुजा राम व आहुजा मुकेश (२००८) समाजशास्त्रः विवेचन एवं परिप्रेक्ष्य, जयपूर : रावत पब्लिकेशन पृष्ठ नं. २२३

६) डॉ. काकडे सिंधू व प्रा. दुथडे वैशाली (२०१२) समाजशास्त्रातील सैद्धांतिक विचार, नाशिकः गौतमी प्रकाशन पृष्ठ क्र. ३४५.


## १.७ सरावासाठी प्रश्न / क्षेत्रीय कार्य

1) According to Mukharji's which are the sociological basic concepts?
2) Briefly mention D.P.Mukharji's views on concepts of Historical Historical Dialeticism.
3) What do you understand by Indian Tradition & Social Change?
4) Explain the diffrence between Indian & Western Methodology.
5) Examine Mukharji's thought of Development of Social Science.

१. मुखर्जी यांच्या मते समाजशास्त्रीय मूलभूत संकल्पना कोणत्या?

२. डी. पी. मुखर्जी यांची विरोध - 'विकास संकल्पना' बाबतचे विचार थोडक्यात सांगा.

३. भारतीय परंपरा आणि सामाजिक परिवर्तन या संकल्पनांबद्दल आपणास काय माहीत आहे?

४. भारतीय आणि पाश्चिमात्य पद्धतीतील फरक स्पष्ट करा.

५. मुखर्जींच्या सामाजिक शास्त्राच्या विकासाचे परीक्षण करा.

# घटक - ४
# Mahatma Jyotiba Phule
# (महात्मा जोतिबा फुले )

**अनुक्रमणिका**


४.0 उद्दिष्टे
४.१ प्रस्तावना
४.२. मुख्य मुद्दा/विषय विवेचन
  ४.२.१ प्रस्तावना-जीवनपरिचय
  ४.२.२ फुले : एक सामाजिक सुधारक
  ४.२.३ फुलेंचे गुलामगिरीविषयी विचार
  ४.२.४ फुलेंचे धर्माविषयी विचार
  ४.२.५. फुलेंचे शिक्षणाविषयी विचार
  ४.२.६. सत्यशोधक समाज आणि ब्राम्हणेतर चळवळ
४.३ स्वयंअध्ययन प्रश्न / उपक्रम
४.४ सारांश
४.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
४.६ संदर्भ सूची


## ४.0 उद्दिष्टे :-

विद्यार्थी मित्रहो, या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हाला:

* जोतिबा फुलेंचा जिवनपरिचय जाणून घेणे.
* फुलेंचे सामाजिक सुधारणाविषयी माहिती करून घेणे
* महात्मा फुलेंचे गुलामगिरीविषयी विचार समजून घेणे.
* फुलेंचे धर्माविषयी विचार समजून घेता येतील.
* महात्मा फुलेंचे शिक्षणाबाबतचे विचार समजून घेणे
* जोतिबा फुलेंचे सत्यशोधक समाजाविषयी विचार जाणून घेणे.
* ब्राम्हणेतर चळवळीविषयी फुलेंचे कार्य व विचार समजून घेणे.

## ४.१ प्रस्तावना:–

आधुनिक महाराष्ट्राचा चेहरा–मोहरा बदलून टाकण्यासाठी ज्या अनेक समाजसुधारकांनी, महापुरुषांनी आपले जीवन बहाल केले, त्यामुळे केवळ महाराष्ट्रतच नव्हे तर भारतीय समाजाअंतर्गत बदलाचे एक महत्त्वाचे पर्व सुरू झाले. त्यांना सर्वसाधारणपणे 'सामाजिक सुधारणा' असा शब्द वापरला जातो. १८१८ मध्ये महाराष्ट्रातील पेशवाईचा अंत झाला. महाराष्ट्रातील समाजजीवनाची पारंपरिक समीकरणे विस्कटली. पेशवाईच्या काळात ब्राम्हणवर्गाने राज्यसत्ताच आपल्या हाती घेतली. बहुजन वर्गाचे शोषण झालेले दिसते. याच कालखंडात फुले जन्माला आले. त्यांनी ही भोवतालची परिस्थिती बघितली आणि यात बदल करणे व नवीन समाजव्यवस्था निर्माण करुन नवे सांस्कृतिक अनुबंध निर्माण करणे ही महात्मा फुलेंची धारणा होती. ग्रामीण महाराष्ट्राचा गावगाडा जो पूर्वीच्या सामाजिक चौकटीत जखडला होता, समाज परंपरागत बंधनात व अंधारात चाचपडत होता, शूद्र व अतिशूद्र समाज गुलामगिरीत होता, तेव्हा त्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी ह्या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन त्यांच्या मुळावर घाव घालणे गरजेचे होते. प्रस्थापित व्यवस्थेशी टक्कर घेणाऱ्या क्रांतिकारी पुरुषांची गरज होती, ती गरज महात्मा जोतिराव फुले यांनी स्वीकारली. महात्मा फुलेंनी स्त्रियांच्या उद्धारासाठी, स्त्रीशिक्षणाचे कार्य हाती घेतले. विधवा पुनर्विवाह, बालहत्या प्रतिबंध , अस्पृश्यांचा उद्धार अशा एकूणच समाजाच्या उद्धाराचे कार्य त्यांनी केले. आपले संपूर्ण आयुष्य त्यांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी घालविले. शिक्षणाने समाजाची बदलाची क्रांती करून दाखविली. म्हणूनच महात्मा जोतिबा फुलेंना समाजसुधारणांचे अग्रदूत म्हटले आहे.

**महात्मा ज्योतिराव फुले (१८२७–१८९०)**

## ४.१ जीवन परिचय:–

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील करगुण हे खेडे जोतिरावांचे मूळ गाव. एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. जोतिरावांचे घराणे क्षत्रिय–माळी जातीचे. गोऱ्हे हे त्यांचे मूळ आडनाव. जोतिरावांचे आजोबा पुढे पुण्यात येऊन राहू लागले. ते पेशव्यांना फुले पुरविण्याचा व्यवसाय करत. फुलांचा व्यवसाय करू लागल्याने आजोबांना फुले या नावाने ओळखू लागले आणि त्या ठिकाणी फुले आडनाव प्रचारात आले. जोतिरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव. जोतिरावांनी पुण्यातल्या स्कॉटिश मिशनच्या शाळेत प्रवेश घेतला. वयाच्या अकराव्या वर्षी जोतिबांचा विवाह सावित्रीबाईंशी झाला. त्यावेळेस सावित्रीबाईंचे वय सात वर्षाचे होते.

जोतिरावांवर 'राईटस् ऑफ मॅन' ह्या थॉमस पेन या तत्त्वज्ञाच्या पुस्तकातील विचारांचा फार मोठा प्रभाव पडला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरी न करण्याचा निर्णय जोतिरावांनी घेतला व तो पुढे कायम ठेवला. देशबांधवांच्या उद्धारासाठी सर्व आयुष्य वेचण्याचे त्यांनी ठरविले. तेव्हापासून ब्रिटिश सत्तेविरुद्ध बंड करून स्वातंत्र्यप्राप्तीच्या नवविचारांची बिजे पेरण्याचे कार्य त्यांनी सुरू केले. ख्रिश्चन व ईस्लामी धर्माच्या तौलनिक

अभ्यासाचा प्रभाव त्यांच्यावर पडला. धर्म, सहिष्णुवृत्ती, ईश्वराचे खरे रूप या कल्पना जोतिबांमध्ये वाढीस लागल्या आणि त्याचा उपयोग त्यांना पुढे सत्यशोधक समाजाच्या स्थापनेत झाला.

जोतिरावांच्या याच कालखंडात महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती फारच बिकट होती. एकीकडे इंग्रजांची सत्ता, जातिभेद, स्त्रियांची आणि शुद्र यांची अवस्था अतिशय बिकट, शेतकरी व कष्टकरी लोकांची परवड होती. जोतिरावांना क्रांतिकारकांचे नेहमी आकर्षण वाटे. जोतिरावांनी दांडपट्ट्याचे, कुस्तीचे शिक्षण घेतले. समाजातील वेगवेगळ्या लोकांकडे कार्याच्या निमित्ताने जाऊन स्नेहसंबंध वाढविले. अशाच एका प्रसंगी ब्राम्हण मित्राच्या लग्नासाठी गेले असताना सनातनी वृतीच्या ब्राम्हण लोकांनी त्यांचा अपमान केला. या अपमानाच्या प्रसंगातून त्यांना समाजातील भेदाची जाणीव झाली. इंग्रजांच्या राजकीय गुलामगिरीपेक्षा ही सामाजिक व मानसिक गुलामगिरी कितीतरी पटीने भीषण व भयंकर आहे याची जाणीव त्यांना झाली. आणि येथूनच जोतिबांना आपल्या जीवनाचा मार्ग आणि जीवनाचे कार्य कोणते असावे याचा मार्ग सापडला. आयुष्यभर समाजातील बरे-वाईट अनुभव घेणाऱ्या या थोर समाजसेवकाने स्त्रियांचे हक्क, शूद्रातिशूद्र कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, देवदासी अशा पीडित लोकांसाठी झटले तसेच समाजातील लोकांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक सुधारणांसाठी झटले. त्यांच्या सामाजिक उद्धाराच्या कार्यामुळे मुंबईकर जनतेने जोतिरावांना १८८८ मध्ये 'महात्मा' ही पदवी देऊन गौरव केला. अशा या महात्म्याचे २८ नोव्हेंबर १८९० रोजी निधन झाले.

मानव मुक्तीसाठी बंड करणारे व बहुजन समाजाला सामाजिक गर्ततेतून बाहेर काढण्याचे महान कार्य जोतिबांनी केले. पुरातन काळापासून चालत आलेल्या वहिवाटीची दिशा बदलणारे, शेतकरी, कामगार यांचे दारिद्रय निवारण करण्यासाठी चळवळ उभारणारे, समानतेची घोषणा करणारे 'सत्यमेव जयते' हा दिव्य मंत्र देणारे समाजक्रांतीची तुतारी फुंकणारे, जुने आचार-विचार, रूढी, जप-ताप इ. भोळ्या समुजतींवर हल्ला करणारे व समाजाची पुनर्रचना करणारे पहिले युग-पुरुष म्हणून महात्मा जोतिबा फुले होय. जोतिबांनी स्त्रीशिक्षणाचे महत्त्व ओळखून 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी' 'पश ीेंहशी ठी लर्शींशी ींहरप ीेंीरपव ींशरलहशीी' 'एक माता हजारो शिक्षकांपेक्षा मोठे कार्य करू शकते'. यातून स्त्री शिक्षणाविषयी महत्त्व स्पष्ट केले. समाजक्रांतीचे पहिले शस्त्र म्हणून स्त्री शिक्षण महत्त्वाचे मानले.

**महात्मा फुलेंचे लिखाण :**

जोतिबा फुलेंनी समाजाला जागृत करणेसाठी, आपले विचार जनेतपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध ग्रंथांचे लेखन केले.

१८५५ 'तृतीय रत्न' नाटकाचे लिखाण केले

१८६९ छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा

१८६९ 'ब्राम्हणांचे कसब' ग्रंथ

१८७३ ‘गुलामगिरी’ ग्रंथ

१८८३ ‘शेतकऱ्यांचा आसूड’

१८८५ ‘इशारा’

१८९१ ‘सार्वजनिक सत्यधर्म’ मरणोत्तर प्रकाशित

१८७७ दिनबंधू वृत्तपत्र सुरू

१८८५ सत्सार क्र १

**१८८५ सत्सार क्र २ अनियतकालिके**

अस्पृश्यांची कैफियत, असे विविध ग्रंथ व वाङ्मयातून जोतिरावांनी समाजमन जागृत केले आणि त्यावरून जोतिरावांचे सामाजिक सुधारणांचे ध्येय किती मोठे होते याची जाणीव आपणास येईल.

## ४.२.२ महात्मा जोतिबा फुले – सामाजिक सुधारक :–

महात्मा जोतिबा फुले हे खरे समाजसुधारक होते. केवळ बोलके समजासुधारक नव्हे तर कर्ते समाजसुधारक होते. समाजातील विषमता दूर करणारा सच्चा कार्यकर्ता समजले. सामाजिक सुधारणा करताना त्यांनी शूद्रातिशूद्र, गुलामगिरी याचा अर्थ समजावून घेतला व भारताच्या सामाजिक इतिहासातील दांभिकपणा त्यांनी हेरला आणि त्या दृष्टीने कार्य सुरू केले.

फुले हे सामाजिक समतेच्या क्रांतीचे आद्यजनक होत. त्यांचे हे विचार पाश्चात्त्य शिक्षण आणि त्यातून आलेले समतेचे विचार यातून समाजक्रांतीचा जन्म झाला. इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे लोकशाही, स्वातंत्र्य, समता इ. कल्पनांच्या प्रभावातून भारतात समाजसुधारणेच्या क्षेत्रात चळवळींना सुरुवात झाली. महात्मा जोतिबा फुले यांनी इतिहास समजून घेऊन इतिहासाची फेरमांडणी करण्याचा प्रयत्न केला. जो इतिहास स्त्रियांना दास करतो, बहुजन समाजावर अन्याय लादतो, तो इतिहास खरा नाही. फुलेंनी सत्याचा पाठपुरावा करताना शोषित लोकांच्या गतकाळातील जीवनाचा आढावा घेतला. इतिहासाची मांडणी करताना त्यांनी बहुजन समाजाची बाजू घेतली. मानवाच्या इतिहासात ज्याने सर्वसामान्य मानवाने इतिहास निर्माण केला त्याला स्थान नाही. सर्वसामान्य लोक जे श्रम करतात घाम गाळतात त्यांच्यावर सिंहासने काबीज करणाऱ्या लोकांचा इतिहास लिहिला गेला व जात आहे. म्हणून फुले म्हणतात की, नांगर, खराच्या इतिहास कुठेही दिसत नाही. प्रस्थापित साहित्यात कष्ट करणाऱ्यांना कोणतेही स्थान नाही हे त्यांनी लक्षात घेऊन कष्ट व श्रम करणाऱ्या लोकांच्या घामातून संस्कृती आकाराला आली त्या श्रमसंस्कृतीला प्रतिष्ठा मिळाली नाही. आणि याला खरे कारण म्हणजे शिक्षण बंदी हे फुलेंच्या लक्षात आले. कनिष्ठ, शूद्रानिशूद्र स्त्रियांनी शिक्षण घेतले पाहिजे. हजारो वर्षाची शिक्षण बंदी उठविली पाहिजे व श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली पाहिजे याची तीव्र जाणीव फुलेंना झाली. म्हणून फुले म्हणतात की, बहुजन समाजाची उन्नती करायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षण हा एकूणच सांस्कृतिक मुक्तीचा मंत्र आहे, हे त्यांनी वारंवार आग्रहाने सांगितले.

जोतिरावांचा भर सामाजिक सुधारणेवर होता. कष्ट करणारांचे हात बघवत नव्हते. समाजातील उच्चवर्णीय जातीच्या लोकांनी शूद्रांना व स्त्रियांना सामाजिक व मानसिक गुलामगिरीत जखडून ठेवले होते. जोपर्यंत लोकांचे अज्ञान दूर होत नाही तोपर्यंत स्वातंत्र्य मिळणार नाही व पिळवणूकही थांबणार नाही. म्हणून त्यांनी १८४८ मध्ये अस्पृश्यांच्या मुलामुलींसाठी पुणे येथे शाळा सुरू केली. भारतातली ही मुलींसाठीची पहिली शाळा होती. ब्रिटिश सरकार शिक्षणावर जो खर्च करते ते शिक्षण सर्व उच्चवर्णीय लोकांसाठी म्हणून सर्व वरिष्ठ सरकारी पदावर त्यांचीच मक्तेदारी होती इतर लोकांना कोणताच फायदा होत नव्हता हे लक्षात आल्यावर फुलेंनी सरकारात तक्रार नोंदविली. ब्राम्हण लोक विनाकारण जातीच्या नावाखाली व धर्माचा आधार घेऊन शूद्रा-तिशूद्रांवर जो अन्याय करतात, जीवघेणा छळ करतात तो माणुसकीला काळीमा लावणारा आहे असे रोखठोक बोलणारे फुले जीवनभर शोषिंतांसाठी संघर्ष करीत राहिले.

१) **स्त्रियांचा उद्धार :** महात्मा फुलेंच्या कालखंडात महाराष्ट्रात स्त्रियांची सामाजिक स्थिती अतिशय हलाखीची होती. स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे अशी कल्पना समाजात रूढ झालेली होती. स्त्री ही पुरुषांपेक्षा कनिष्ठ 'चूल व मूल' एवढेच स्त्रीचे कार्यक्षेत्र मानले जात होते. स्त्री शिक्षणापासून पूर्ण वंचित होती. स्त्रीने शिकू नये, तिने शिक्षण घेतल्यास भ्रष्ट होते, शिक्षणही भ्रष्ट होते अशा भोंगळ कल्पना तेव्हा समाजात रूढ झाल्या होत्या. बालपणात विवाहाची प्रथा होाती. साहजिकच बालविधवांचे प्रमाणही जास्त हाते, परंतु बालविधवांना पुनर्विवाहाची परवानगी नव्हती. पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीने सती गेले पाहिजे असे बंधन होते. समाजात जरठ विवाहाची अनिष्ट पद्धत रूढ होती. विधवा स्त्रियांना केशवपन करण्याची सक्ती केली जात असे. त्यांनी सार्वजनिक समारंभात जाऊ नये, चांगले कपडे घालू नये अशी बंधने होती. अशा परिस्थितीत विधवा स्त्रीचे पाऊल वाईट दिशेला पडले तर तिला अतिशय कडक शासन केले जात असे. अशा अवस्थेत महात्मा फुलेंनी स्त्रीजातीचे दु:ख दूर करण्यासाठी प्रयत्न केलेत. जोतिरावांनी अशा दु:खी स्त्रियांना वाचविण्यासाठी 'बालहत्या प्रतिबंधक गृहा'ची स्थापना करून विधवांना आश्रय दिला होता. विधवा स्त्रिया बेनाम राहून या गृहात अपत्यांना जन्म देऊ शकत असत. या अनाथ बालकांचे माता-पिता होऊन जोतिराव व सावित्रीबाई यांनी एक चांगला आदर्श निर्माण केला. हे कार्य म्हणजे आकाशाला गवसणी घालणारे होते.

**२) स्त्रियांना शिक्षण :-** स्त्री समाजाचे मूळ आहे. नवसमाजाच्या निर्तितीसाठी स्त्री-शिक्षण गरजेचे आहे. त्यासाठी स्त्री स्वतंत्र असली पाहिजे. स्त्रियांना ज्ञानाचे दरवाजे खुले करून दिले पाहिजेत. स्त्री शिक्षणाविषयीचे अनेक गैरसमज होते. स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे देव-धर्म व समाजाविरूद्ध वर्तन आहे. तेव्हा जोतिबांनी स्त्रीशिक्षणाचे महत्त्व ओळखले. स्त्रीशिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलांचे शिक्षण होय. स्त्रीला शिक्षण दिले तर एका कुटुंबाला शिक्षण दिल्यासारखे आहे, हे लक्षात घेऊन फुलेंनी स्त्रीशिक्षणाचे कार्य हाती घेतले. स्त्री ही पुर्षापेक्षा श्रेष्ठ आहे. 'गुरूकमाता गुरूयासी' हा विचार प्रमुख मानून पुण्यात स्त्रीशिक्षणाला सुक्षविांत केली. इ.स. १८४८ मध्ये पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. पुण्यात भिडे वाड्यात शाळा सुरू केली. तसेच १८५१ मध्ये महार, मांग-चांभार इ. शूद्र व अतिशूद्र समाजातील स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी चिपळूणकर वाड्यात मुलींची

शाळा सुरू केली. शाळेसाठी स्त्रीशिक्षिका नव्हती म्हणून आपली धर्मपत्नी सावित्रीबाई फुलेंना शिकविले व पतीच्या सामाजिक कार्यास त्यांनी वाहून घेतले. सावित्रीबाई ह्या भारतातील पहिली स्त्रीशिक्षिका होत.

पुण्यातील सनातनी मंडळींनी फुले दाम्पत्याच्या या कार्याचा राग आला. त्यांनी सावित्रीबाईंचा छळ केला. निंदा केली, घाण टाकली. हे सर्व पत्करून सावित्रीबाईंनी पतीच्या कार्यात वाहून घेतले. इ.स. १८५१ मध्ये वेताळ पेठेत आणखी दोन मुलींच्या शाळा सुरू केल्या. समाजातील दानशूर व्यक्तींची व युरोपमधील शिक्षणप्रेमी मंडळींची मदत घेऊन शैक्षणिक कार्य सुरू ठेवले. सरकारने त्यांचा विश्रामबागेत इ.स.१८५२ मध्ये सत्कार केला. स्त्रीशिक्षणाचे आद्यजनक म्हणून फुले यांचा गौरव केला.

**३) अस्पृश्यांचा उद्धार :** (work of untouchability) दु:खी, कष्टी व अत्याचाराच्या छळाला बळी पडणाऱ्या समाजाविषयी अत्यंत आदराची भावना ठेवणाऱ्या फुलेंचे अवलोकन करताना आदर्शवादी समाजसुधारक डोळ्यासमोर येतो. भारतीय समाजातील अस्पृश्यता व श्रेष्ठ, कनिष्ठ जातिभेद याचा प्रत्यक्ष दाहकता अनुभवाला आली होती. १९व्या शतकात अस्पृश्यांची स्थिती अत्यंत हलाखीची होती. प्राण्यांसारखी वागणूक अस्पृश्यांना दिली जात होती. अस्पृश्यांना गावाबाहेर वस्ती करून राहावे लागे. उच्चवर्णीयांची सेवा करून पोट भरावे लागत असे. स्पृश्य लोकांना अस्पृश्यांचा स्पर्श सुद्धा चालत नव्हता. अंगावर सावली देखील पडू देत नसत नाहीतर विटाळ होईल म्हणून अस्पृश्यांना रस्त्यावर फिरता येत नव्हते. समाजात शूद्र हे भरडले जात होते. गरिबी, उपासमार, मागासलेपणा हे त्यांच्या नशिबातच होते. कनिष्ठ प्रतीची कामे त्यांना करावी लागत अर्थहीन जीवन त्यांच्या वाट्याला आले होते.

अशा परिस्थितीत फुलेंनी अस्पृश्यांना शिक्षण मिळावे म्हणून शाळा सुरू केली. अस्पृश्यता निवारणाचे कार्य हाती घेतले. शिक्षणाने ही परिस्थिती सुधारू शकते. अस्पृश्यांना समता, बंधुभाव व स्वातंत्र्य प्राप्त करून देणेसाठी जातियतेची बंधने दूर केली तसेच अस्पृश्यांना माणूस म्हणून जगण्यासाठी सक्षम बनविण्यासाठी शिक्षण देण्याचे ठरविले. अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी साधे पाणी भरण्याची परवानगी नव्हती ती जोतिरावांनी स्वःताच्या घरातील हौदावरून पाणी भरण्याची जाहीरपणे परवानगी दिली. स्वत:चा पाण्याचा हौद त्यांनी अस्पृश्यांसाठी खुला करून दिला.

अस्पृश्यांच्या शिक्षणाबरोबरच अस्पृश्यता निवारण, अन्याय, गुलामगिरीचे उच्चाटन, सार्वजनिक ठिकाणी प्रवेश इ. बाबत लिखाणातून व भाषणांतून समाज जागृती केली. १८७३ मध्ये फुल्यांनी अस्पृश्यता निवारणाचा जाहीरनामा काढला. त्यामुळे भारत सरकारला अस्पृश्यता नष्ट करण्याचा कायदा करता आला. पुणे नगरपालिकेचे सदस्य असताना त्यांनी झोपडपट्टीतील लोकांच्या आरोग्याकडे, शिक्षणाकडे लक्ष दिले. झोपडपट्टीतील नागरिकांमध्ये व्यसनांचे प्रमाण जास्त दिसून आले. तेव्हा फुलेंनी नगरपालिकेच्या अधिकाऱ्याला अर्ज करून दारू दुकानांना परवानगी देऊ नये म्हणून प्रयत्न केले.

**४) शेतकऱ्यांविषयी विचार व कार्ये :–** भारत शेतिप्रधान देश आहे. परंतु देशाचा कणा असलेला शेतकरी अज्ञान व कर्जबाजारीपणामुळे पिळून गेला, तेव्हा शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेचे वर्णन फुल्यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथात केले. सरकारने शेतकऱ्यांच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे, मुलांना शिक्षणास प्रवृत्त करण्यासाठी वसतिगृहे उघडावीत, कनिष्ठ वर्गातील जातीचे शिक्षक नेमून मुलांना प्रशिक्षित करावे.

सरकारकडून शेतकऱ्यांचे शोषण होत असल्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था सुधारली नाही म्हणून शेतकऱ्यांच्या शिकलेल्या मुलांना कनिष्ठ पदावर नोकरी देण्याबाबत प्रयत्न केलेत. 'दीनबंधू' वर्तमानपत्रातून शेतकऱ्यांवरील अन्यायाला वाचा फोडली. शेतकऱ्यांच्या उद्धाराकरीता महाराष्ट्रव्यापी चळवळ सुरू केली. ही चळवळ 'खतफोडीचे बंड' म्हणून ओळखली जाते. शेतकऱ्यांच्या जीवनात सुधारणा करण्यासाठी इंग्रज सरकारकडे शेतकऱ्याना संरक्षण, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शेतीच्या योजना आखण्यासाठी आग्रह धरला.

इंग्रजी सत्तेच्या जाचापेक्षा भारतीय समाजातील श्रेष्ठ मंडळींनी समाजाचे चालवलेले शोषण थांबविले पाहिजे म्हणून समाजात क्षिणातून जागृती करून समाज संघटित करण्यावर त्यांनी भर दिला. ब्रिटिशांच्या व ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या सहवासात राहून फुलेंनी धार्मिक, राजकीय व शैक्षणिक गोष्टींचे महत्त्व लक्षात घेऊन भारतीय सामाजाला जागृत करण्यासाठी समाजात सर्वच दृष्टीने बदल करण्यास सुरुवात केली. इंग्रजांच्या सहकार्याने जोतिरावांनी सुधारणावादी कार्यक्रम राबविला म्हणून फुलेंच्या मनात इंग्रजांविषयी सहानुभूती व प्रेम निर्माण झाले. परंपरावादी विचारवंतापेक्षा हे परकीय लोक समाजाच्या उद्धारासाठी उपयोगी वाटले. इ.स. १८८५ मध्ये राष्ट्रीय सभेत कनिष्ठ जातीतील लोकांना प्रतिनिधित्व मिळावे म्हणून आवाज उठविला. या राजकीय विचारांवरून त्यांच्या सामाजिक सुधारणांची कल्पना येते.

हिंदी-बहूजन समाजाच्या सामाजिक गुलामगिरीची प्रथम ओळख जोतीरावांनी करून दिली. महात्मा गांधी जोतिबांना 'खरे महात्मा' म्हणाले.

**५) समाजात समता निर्माण होण्यासाठीचे कार्य :** महात्मा जोतिबा फुले हे मानवतावादी विचाराचे होते. दु:खी-कष्टकऱ्यांच्या बाजूने होते. स्त्रियांचे कैवारी होते. शूद्रातिशूद्रांचा विचार करणारे होते. भट-ब्राम्हणांच्या विचारांवर त्यांचा अजिबात विश्वास नव्हता. फुले समतेच्या विचाराचे पाईक होते. या देशातील विषम समाजव्यवस्था कशी निर्माण झाली हे त्यांनी जवळून अनुभवले आणि त्यांचे विस्ताराने स्पष्टीकरण त्यांनी केले. माणसाला माणूस म्हणून जगू द्यावे. जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीदास्य या अनिष्ठ चालींना त्यांनी प्रखर विरोध केला. सर्वांसाठी सर्वच गोष्टी खुल्या (मुक्त) असाव्यात, अशी त्यांची मागणी होती. पारंपरिक विषमता नष्ट करून नवीन समतेवर आधारित समाज निर्माण कसा करता येईल याचा त्यांनी काळजीपूर्वक विचार केला. समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी शिक्षण, व्यवसाय, कायदे, प्रबोधन या बाबत व्यक्तींना स्वातंत्र्य असावे. ब्राम्हणी व वर्णव्यवस्थेचा पुरस्कार करणाऱ्या विचारप्रणालीला शूद्र विचारप्रणाली एक चांगला पर्याय होईल आणि हा पर्याय त्यांनी देण्याचा प्रयत्न

केला. यासाठी त्यांनी समाजमन जागृत करण्याचा प्रयत्न केला. म्हणून फुले त्या काळातील सर्वश्रेष्ठ समतावादी ठरलेत.

जोतिबा फुले हे हाडाचे साधुपुरुष होते. जोतिरावांना बुद्ध आणि कबीर यांच्या रांगेत बसवून ते महात्मा आहेत असे बाबासाहेब आंबेडकर म्हणतात ते अगदी यथार्थ होते.

कोणत्याही माणसाच्या शारीरिक व मानसिक क्षमतेत जो फरक असतो. तो नैसर्गिक आहे. जाती व धर्माचा कोणताही संबंध त्याच्याशी नसतो. परंतु व्यक्तिगत गुणवत्ता न तपासता सर्व स्त्री आणि शूद्रांना जबाबदारीच्या आणि अधिकारांच्या जागांपासून दूर ठेवून हिंदू उच्चवर्णीयांनी अन्याय केला होता. कष्ट करणाऱ्या लोकांना जीवनावश्यक गरजा पूर्ण करणेही शक्य होत नसे, पुरेसे कपडे नव्हते, झोपायला झोपडी, खायला एळणी, आणि पाणी प्यायला गाडगे अशा अपूर्ण अवस्थेत कष्ट करणाऱ्यांना जगावे लागते असे. हे सर्व चित्र फुल्यांना बेचैन करीत असे. एकाने सुखात जीवन जगायचे आणि दुसऱ्याने मात्र जीवनभर अर्धपोटी राहून जीवन जगायचे हे जोतिरावांना पटत नव्हते. जर सर्वांनी कष्ट करून पोट भरले तर ते सर्वांसाठी चांगले असते. त्यामुळे कोणावरही अन्याय होणार नाही, असा समाजवादी विचार जोतिबांनी मांडला.

**६) स्त्री–पुरुष समानतेविषयी विचार :** फुलेंनी स्त्री–पुरुष समानतेचा पुरस्कार करून समाजजीवनात चौफेर बंदिस्त असलेल्या स्त्रीला कसे मुक्त करता येईल या दृष्टीने सतत प्रयत्नशील राहिले. स्त्रियांची सामाजिक स्थिती उंचावण्यासाठी मुलींसाठी शाळा सुरू केली. शिक्षक मिळत नाही म्हणून स्वतःच्या पत्नीला शिक्षिका केले. घरच्या लोकांचा दोष सहन केला. विधवा पुनर्विवाहासाठी कायदा करून घेतला. बळजबरीने मातृत्व लादलेल्या निराधार स्त्रियांसाठी प्रसूतिगृह उघडून आत्महत्या करणाऱ्या भगिनींना आधार देण्याचे कार्य त्यांनी केले.

समाजाच्या उभारणीत जेवढा वाटा पुरुषांचा असतो तेवढाच स्त्रियांचाही असतो. दोन्हीही परस्परावलंबी असूनही स्त्रियांच्या नशिबात एवढी गुलामगिरी का, असा प्रश्न त्यांनी समाजातील उच्चवर्णीय म्हणवणाऱ्या लोकांना विचारला. जोतिरावांनी स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने आणण्यासाठी सत्यशोधक विवाह पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन केले. स्त्रियांवरील होणारा अन्याय कमी करण्याचा प्रयत्न जोतिबा फुलेंनी मनापासून केला.

थोडक्यात महात्मा जोतिबा फुलेंनी शूद्रतिशूद्र, यांच्यावर होणारा अन्याय थांबविण्यासाठी, अस्पृश्यता निवारण, बालहत्या प्रतिबंध, विधवा केशवपन बंदी, कुमारी–मातांची समस्या, विधवा पुनर्विवाह, समाज शिक्षण, स्त्री–पुरुष समानता तसेच शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविला. अशा अनेक सामाजिक प्रश्नांबाबत आवाज उठवून, जीवघेण्या समस्या दूर करण्यासाठी सामाजिक कार्य केले नव्हे तर फुल्यांनी आपल्या कार्याला सामाजिक चळवळीचे स्वरूप प्राप्त करून दिले आहे.

### ४.२.३ महात्मा फुलेंचे गुलामगिरीविषयक विचार :

महात्मा जोतिबा फुलेंचे कार्य समजून घेण्यासाठी जोतिरावांच्या काळातील सामाजिक परिस्थिती समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. फुलेंचा दृष्टिकोन जेवढा बुद्धिवादी होता तितकाच तो मानव वतावादी देखील होता. फुलेंनी शूद्रातिशूद्रानां, अज्ञानी लोकांना जागृत करण्याचे प्रयत्न केले. कनिष्ठ वर्गातील लोकांचे अज्ञान, निरक्षरता, दूषित पूर्वग्रह व जातीविषयक भावना दूर करून फुलेंना त्यांना ब्राम्हणांच्या मानसिक गुलामगिरीतून मूक्त करायचे होते. ब्राम्हणांनी निर्माण केलेल्या ग्रंथात परशुरामाला चिरंजीवी मानले होते. फुलेंनी परशुरामाला लोकांसमोर पुन्हा येऊन दाखव असे आव्हान दिले. म्हणजेच ब्राम्हणांच्या अशा खुळचट 'अवतार' कल्पना नष्ट करण्यासाठीचे असे आव्हान त्यांनी दिले होते.

'गुलामगिरी' हे फुलेंचे हे चौथे पुस्तक स्वातंत्र्य, समता व बंधुता या विचारांनी भरलेले होते. फुलेंच्या मते मानवाला स्वातंत्र्य असणे महत्त्वाचे आहे. ज्याला स्वतंत्रता नाही त्यासाठी झटणे हे प्रत्येक सज्जन व्यक्तीचे कर्तव्य आहे. प्रत्येक व्यक्तीस परमेश्वर निर्मित हक्क मिळणे म्हणजे सुखाचे साधन आहे तर प्रत्येक व्यक्ती अन्याय व जुलुमापासून सुटू शकतो. ज्याप्रमाणे निग्रो लोकांची सुटका अन्यायापासून झाली त्याचप्रमाणे हिंदुस्थानातील शेतकरी, कामगार हे ब्राम्हणांच्या गुलामगिरीतून मुक्त होतील असे फुलेंना वाटायला लागले. ज्याप्रमाणे अब्राहम लिंकन यांनी अमेरिकेत १८६३ मध्ये गुलामगिरी नष्ट केली, त्याप्रमाणे माझ्या देशातील शूद्रबांधव ब्राम्हण लोकांच्या दास्यत्वातून मुक्ती मिळवण्याचा प्रयत्न करतील अशी आशा बाळगली.

'गुलामगिरी' ग्रंथाची सुरूवात 'ज्या दिवशी मनुष्य गुलाम होतो त्यादिवशी त्याचा अर्धा सद्‌गुण जातो' हया होमरच्या प्रसिद्ध वाक्याने केली. त्यांच्या मते ब्राम्हण हे भारतात येण्यापूर्वी वाळवंटात डोंगरात राहणारे मूळ रहिवाशी; स्वार्थी, धूर्त, अट्टल, गर्विष्ट विचारांचे. हिंदुस्थानात आल्यावर त्यांनी क्षत्रियांचा पराभव करून त्यांना दास व शूद्र बनविले. क्षत्रियांना गुलामगिरीत टाकले. फुलेंच्या मते शूद्र आणि अतिशूद्र हे एकाच वंशाचे होते. त्यांनी ब्राम्हणांना विरोध केला म्हणून ब्राम्हणांनी त्यांना दस्यू, असुर, राक्षस आणि महार म्हटले व स्वत:ला देव मानले. शूद्रांनी अतिशूद्रांना स्पर्श करू नये अशी आज्ञा केली. अतिशूद्रांना उदरनिर्वाहाचे काहीच साधन नसल्यामुळे त्यांना मेलेल्या पशूंचे मांस खाणे भाग पडले. म्हणून त्यांना स्पर्श करू नये असे सांगितले. नंतर ब्राम्हणांनी धर्मशास्त्रे लिहिली. शूद्र व अतिशूद्रांनी धर्मग्रंथ वाचू नये, संपत्तीचा संग्रह करू नये, प्रतिष्ठीत व्यवसाय करू नये अशी बंदी घातली.ब्राम्हणांनी स्वत:ला; या भूमीवरचा देवता मानून स्वत:कडे देवाचे अधिकार घेऊन जातिव्यवस्था निर्माण केली. शूद्रांना मानव म्हणून सामान्य अधिकारही दिले नाहीत.ते नाकारले. आपल्या पवित्र ग्रंथात त्यांनी निंदनीय लबाड्या व ढोंग उघडकीस येऊ नये म्हणून आपले पवित्र ग्रंथ शूद्र व अतिशूद्रांनी वाचू नयेत असा दंडक त्यांनी घातला.

ब्राम्हण शास्त्रानुसार ब्राम्हण हे सर्व जगाचे पती आहेत. देवाच्या बरोबरीचे आहेत. त्यांची सेवा व पूजा करावी. ब्राम्हणाने जरी सर्व प्रकारचे गुन्हे केले तरी कोणत्याही

राजाने त्याची हत्या करू नये. ब्राम्हणाचा प्राण वाचविण्यासाठी प्रसंगी खोटे बोलावे त्याला पाप लागणार नाही. राजानेही ब्राम्हणांकडून कोणताही कर घेऊ नये. ब्राम्हणाला भूकेले ठेवू नये अन्यथा सर्व राज्यावर दुष्काळाचे संकट कोसळेल. ब्राम्हण कनिष्ठ वर्गातील कोणत्याही मनुष्याला गुलाम बनवून राबवू शकतो. शूद्राची गुलामगिरी ही निसर्गनिर्मित आहे, म्हणून त्याने ब्राम्हणाची सेवा करावी. शूद्राने गरजेपेक्षा अधिक संपत्ती संग्रहित करू नये. जर संग्रह केला तर तो गर्विष्ठ होतो व तो बेपर्वा होईल त्यामुळे ब्राम्हणाला दु:ख होईल. अशा प्रकारचे सर्व नीतिबंधनांचा एकच उद्देश होता, तो म्हणजे गरीब अज्ञानी, अशिक्षित शूद्रांना फसवून त्यांना सदासर्वकाळ डांबून ठेवणे व गुलामगिरीत ठेवणे. फुले असे म्हणतात की 'जातिभेदाचे मूळ ब्राम्हणांच्या स्वार्थी वृत्तीत व धार्मिक अहंकारात आहे. या वाईट कामामुळे हिंदुस्थानी जनता पिढ्यानपिढ्या भरडली जात आहे.'

ब्राम्हण भिक्षुकी करत व कनिष्ठ वर्गाला लूटत होते. सरकारी अधिकारी म्हणूनसूद्धा तेच पिळवणुकीचे काम करीत. कारण इंग्रज अधिकाऱ्यांच्या हाताखालच्या सर्व उच्च अधिकाराच्या नोकऱ्या ब्राम्हणांनीच मिळविल्या होत्या. म्हणजे ब्राम्हण हा भिक्षुक, सावकार, राज्यकर्ता. खेडेगावातील कुलकर्णी तोच, शिक्षक व वकील तोच. ब्राम्हणेतर पोलीस पाटील हा त्यांच्या हातातील एक हत्यार. मामलेदार व बांधकाम खात्यातील पर्यवेक्षक, महसूल खात्यातील अधिकारी म्हणून तो आपले जातभाई कुलकर्णी व सावकार यांच्याशी संगनमत करून जनतेला पिळत असे. शासनात ब्राम्हण जातीचेच वर्चस्व वाढले होते. फुले ह्या सर्व अधिकाऱ्यांना सैतान म्हणतात व त्यांचा धिक्कार करतात. कुलकर्णी हा गावाचा रक्षक नसून त्यांना कसाई वाटतो. म्हणून फुले इंग्रज शासनकर्त्यांना सुचवतात की, खेड्यातील व्यवहार पाहण्यासाठी ब्राम्हणांऐवजी काही इंग्रज व्यक्तींचीच निवड करावी.

सरकारने शूद्रांना शैक्षणिक सवलती देऊन त्यांचे अज्ञान व पूर्वग्रह दूर करावे. कनिष्ठ वर्गातील लोकांच्या शिक्षणाची सोय करावी आणि हे सरकारचे कर्तव्यच आहे. कारण जनतेच्या घामाचा, कष्टाचा सरकारला महसूल मिळतो. जनतेची नैतिक आणि बौद्धिक सुधारणा करण्यासाठी कनिष्ठ वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे, संधी उपलब्ध करून देणे, हाच खरा मार्ग आहे, असे फुले पुन: पुन्हा कळकळीने सांगत. शासन व्यवस्थेतील ब्राम्हणांच्या मक्तेदारीचा शेवट करून सरकारने ब्राम्हणतर वगातील उमेदवारांना सरकारी नोकरीत सामावून घ्यावे. कनिष्ठ वर्गातील लोकांना क्षीण देऊन कुलकर्णी, पाटील, शिक्षक या नोकऱ्या द्याव्यात. ब्राम्हणांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या देण्यास फुलेंचा विरोध नव्हता. १८८१-८२ पर्यंत मुंबई विभागातील माध्यमिक शाळांमधे एकही महारमांग मुलगा नव्हता, असे सकारी नोंदीवरून दिसून येते. तसेच ग्रामीण भागातील शाळेत ब्राम्हण शिक्षक नसावा कारण ब्राम्हण शिक्षक कनिष्ठ जातीच्या मुलांना भीती दाखवून शाळा सोडावयास लावत कारण कनिष्ठ वर्गाने शिकून शहाणे होऊ नये अशी इच्छा होती. म्हणून ते मुलांना निरुत्साही करीत. तसेच कनिष्ठ वर्गातील लोकांना नगरपालिकेने पाणी व प्रकाश (पुरेसा उजेड) यांचा पुरवठा करण्याची

व्यवस्था करावी अशी जोतिबा फुलेंची मागणी होती.

रामोशासारख्या दरोडे घालणाऱ्या कनिष्ठ जमातीतील लोकांची चावडीवर हजेरी ठेवणे ही पद्धत फुलेंना अयोग्य वाटत होती. ब्राम्हण हे जर खरे देशभक्त असते तर त्यांनी शूद्रांना गुलामगिरीत ठेवले नसते. त्यांच्या हातचे पाणी अपवित्र मानले नसते. फुले ब्राम्हणांना भावासारखे मानायला तयार होते फक्त ब्राम्हणांनी आपल्या वागण्या-बोलण्यातील स्वार्थीपणा सोडून दिला पाहिजे, असे त्यांचे सांगणे असे. फुलेंच्या मते वेद हे मानवनिर्मीत आहे. वेदांमुळे मानवामानवात भेद पडले तर 'मनुस्मृती'मुळे शूद्रतिशूद्रांना गुलामगिरीत जावे लागले म्हणून ती अपवित्र मानली. फुलेंनी समाजातील ब्राम्हणांना त्यांचे वर्चस्व राखण्यासाठी महाराष्ट्रातील संत कवींनीही मदत केली म्हणून त्यांनी असा भेदाभेद मान्य करणाऱ्या संत कवींचाही धिक्कार केला आहे.

ब्रिटिशांचे राज्य जोपर्यंत आहे तोपर्यंत समाजातील शूद्रातिशूद्रांनी शिक्षण घ्यावे, सज्ञान व्हावे, हाच संदेश त्यांनी आपल्या 'गुलामगिरी' या ग्रंथाच्या माध्यमातून दिला. शिक्षण घेऊन स्वातंत्र्य, समता, बंधुता संपादन करण्यासाठी आपल्या सभोवतालचे अज्ञान व पूर्वग्रह दूर सारून ब्राम्हणांनी त्यांच्या सभोवती टाकलेले गुलामगिरीचे पाश फेकून देऊन आपले मानवी हक्क मिळविण्यासाठी सिद्ध व्हावे हाच संदेश त्यांनी दिला. केवळ ब्राम्हणांकडून शूद्रांची फसवणूक कशी झाली हे सांगण्यासाठी हा ग्रंथ लिहिला नाही तर वरिष्ठ वर्गालाच शिक्षण देऊ इच्छिणारी जी नाशकारक पद्धती आहे हे लक्षात आणून देण्यासाठी हा ग्रंथ लिहिला आहे. फुले असे म्हणतात की, 'शूद्र लोक हे या देशाची शक्ती आहे, जीवन आहे. सरकारने त्यांच्याविषयी शंका न घेता आर्थिक व राजकीय संकटाच्या वेळी त्यांच्यावर अवलंबून राहावे. जर शूद्रांच्या जीवनात व मनात सुख-समाधान निर्माण केले तर सरकारचा त्याला फायदाच होईल.'' म्हणून फुलेंनी सार्वत्रिक शिक्षणाची जोरदार मागणी केली. अशाप्रकारे महात्मा फुलेंनी 'गुलामगिरी' ग्रंथाच्या माध्यमातून तत्कालीन समाजव्यवस्थेतील जातिभेद व शूद्रांचे शोषण, अन्याय याविषयी विचार स्पष्ट केलेत व समाजातील संख्येने मोठ्या वर्गाला न्याय देण्यासाठी सतत प्रयत्न केला.

## ४.२.४ फुलेंचे धर्माविषयी विचार:- (सत्यधर्म)

महात्मा जोतिबा फुले हे सत्याचा धर्म मानणारे होते. सत्य म्हणजेच मानव धर्म. सत्य म्हणजे निती अशा प्रकारचे क्रांतिकारी विचार फुलेंचे धर्माबाबत आढळतात. लहान वयातच ईश्वरनिष्ठा व धर्मशीलतेचे संस्कार त्यांना मिळाले होते. त्यांची संपूर्ण विचारसरणीच ही धर्माच्या मीमांसेवर आधारलेली होती. फुलेंचा स्वत:चा ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास पक्का होता. ईश्वर हा सर्वसमर्थ, सर्वज्ञ व परमन्यायी आहे, दयाळू आहे अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे ईश्वराची कृपा मिळवायची असेल तर धर्म हे साधन आहे. म्हणून त्यांनी धर्माला आपल्या जीवनसरणीत महत्त्वाचे स्थान दिले. त्यांच्या वाङमय लिखाणाची सुरुवातच धर्माच्या चिकित्सेतून झालेली आहे. 'सार्वजनिक सत्य धर्म' हा त्यांचा शेवटचा ग्रंथ त्यांनी धर्माबाबतच्या विषयाला अनुसरून आहे.

जातिराव फुले यांची देवावर निष्ठा होती. सर्व मानव एकाच देवाची लेकरे आहेत. परमेश्वर निर्गुण, निराकार आहे. प्रत्येक मानवाला देवाची प्राप्ती करता येते. देवानेच हे जग निर्माण केलेले आहे. परंतु दगडात देव नाही.त्याला फुले, फळे, नैवेद्य देणे हे विनाकामाचे आहे. स्वर्ग,नरक या कल्पना व्यर्थ आहेत. म्हणजे फुले हे ईश्वरनिष्ठ असले तरी हिंदू धर्मातील काही गोष्टी त्यांना पटत नव्हत्या. नास्तिकता व पाखंडीपणा या गोष्टींचा त्यांनी नेहमी निषेध केला. ब्राम्हणांनी आपल्या स्वत:च्या फायद्यासाठी धर्मग्रंथ तयार केलेत. जातिभेद पाळणे हा धर्म नाही तर प्रयत्न करत रहाणे हाच परमेश्वर आहे म्हणून सर्व मानवांनी एकमेकांशी बंधुभावाने वागावे आणि सत्य धर्म आचरणात आणावा असे म्हटले आहे.

'ब्रम्ह सत्य जगन्मिथ्या' असे सांगून देवाला नाकारणाऱ्या विचारांची त्यांनी बोळवण केली. धर्मग्रंथाच्या नावाखाली शूद्रातिशूद्रांना ब्राम्हण, धर्मभोंदू लोकांनी गुलामगिरीत बांधून टाकले होते. म्हणून त्यांनी सत्यशोधक धर्माची स्थापना केली.

जोतीराव फुले हे पक्के एकेश्वरवादी होते. अनेक देवतावादाची कल्पना त्यांना अजिबात मान्य नव्हती. देवाने मानवाला सर्वश्रेष्ठ केले असले तरी देवाच्या शक्तीचा वेध घेण्याच्या बाबतीत मानवाची बुध्दी कमी पडते असे मा. फुले आपल्या धर्मविषयक विचारातून स्पष्ट करतात. मानवाला देवाच्या सत्य स्वरूपाचे आकलन होणे शक्य नाही. म्हणून मानवाने देवाचे प्रत्यक्ष दर्शन होईल अशी आशा बाळगू नये. लोकांनी निव्वळ श्रद्धा म्हणून कशावरही विश्वास ठेवू नये. मानव हा कितीही केले तरी अपूर्ण आहे. तो पंगू, ज्ञानहीन व दुर्गुणात अत्यंत निपुण आहे. मानवाचे आयुष्य हे क्षणभंगूर आहे. म्हणून मानवाने देवाला भेटण्याचा व प्रत्यक्ष पाहण्याचा हट्ट सोडून द्यावा व मानवाचे श्रेष्ठत्व त्याच्या बुद्धीत आहे. त्याने आपल्या बुद्धीचा वापर करुन जास्तीतजास्त ज्ञान मिळविण्याचा व सृष्टीचा निर्माता देव यांची इच्छा जाणून घेण्याचा प्रयत्न करावा. आणि मानवाच्या बौद्धिक क्षमतेला काही मर्यादा आहेत. त्याने मिळविलेल्या ज्ञानाला काही मर्यादा आहे, ते मान्य करून परमेश्वराला शरण जायला पांहिजे म्हणजे मानवाचा गर्व आपोआप खाली येईल व परोपकार करण्याचा विचार येईल. असे झाले तरच मानवाला मानसिक समाधान मिळेल, असे विचार फुलेंचे धर्माबाबत विचार मांडतांना दिसतात.

प्रत्येक व्यक्तीच्या मनात धर्मभावना खोलवर रुजलेली असते. धर्माच्या प्रभावाखाली सर्व लोक धार्मिक वर्तन करतात. परंतु धर्माचा खरा अर्थ फारच कमी लोकांना लक्षात आलेला असतो. त्यामुळे अनेक लोक हे परंपरागत रूढी परंपरांनाच धर्म मानतात. प्रत्येक व्यक्तीचा धंदा, व्यवसाय हे कार्य आहे त्याला धर्म म्हणता येत नाही. देवाचा आणि मानवाचा परस्पर संबंध समजून घेऊन त्यानुसार प्रत्येक व्यक्तीने इतर मानवाच्या कल्याणाचा विचार करणे हेच खऱ्या पवित्र धर्माचे कार्य आहे असे फुले अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट करतात.

फुले देवाला 'निर्मीक' म्हणत. परमेश्वर आणि शासक हे दोन्ही एकच आहेत. खरा ईश्वरधर्म एकच असावा. ''मानवाचेसाठी बहू धर्म कसे। झाला का हो पिसे । ज्योती

म्हणे 'मानवा'चे धर्म नसावे अनेक । निर्मिक तो एक । ज्योती म्हणे'' अशा शब्दात फुले धर्म एकच आहे आणि ईश्वरही एक आहे या विचारांचा आग्रह धरतात. फुले मुर्तिपूजेलाही कडाडून विरोध करतात. जोतिराव म्हणतात, ''धातू दगडाच्या मुर्तीस भजून । घंटा वाजवून । स्वत: खाई'' म्हणजे पुरोहित किंवा पुजारी, गुरव हे स्वत:च्या फायद्यासाठी मूर्तिपूजा टिकवून ठेवत आहेत. यावर ज्योतिरावांनी प्रकाश टाकला. जोतिरावांनी वामन, परशुराम, रामकृष्ण याबाबत आदर व्यक्त केला परंतु हा आदर ते ईश्वर अवतार आहे म्हणून नाही तर त्यांचे त्यांचे मानवरूप गृहीत धरून केला. हिंदू धर्मातील या अवतार पुरुषांचे मनुष्यत्व गृहित धरून त्यांच्या गुणदोषांवर चिकित्सा करण्याचा त्यांनी वास्तववादी प्रयत्न केला. यो देव-पुरुषांच्या अवतारांना जोतिबा नाकारत परंतु जोतिबा, खंडोबा, म्हसोबा, भैरोबा इत्यादीविषयी आदर व्यक्त करतात कारण फुलेंच्या मते हे सर्वजण बळी राजाच्या राजवटीतील अत्यंत शूर, पराक्रमी व कर्तव्यनिष्ठ अधिकारी होते म्हणून ते सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने पूजनीय ठरतात.

फुलेंनी वास्तव परिस्थितीचे भान ठेवूनच धर्माच्या बाबतीतील प्रत्यक्ष वस्तुस्थितीकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. त्यांच्या मते, परमेश्वर हा सर्वार्थाने परिपूर्ण असून त्याला कशाचीही गरज नाही. म्हणून पूजाविधीतील पूजा, नैवेद्य, अन्नदान, अनुष्ठान, पाप-पुण्य ह्या गोष्टींमुळे जीवनावश्यक गोष्टींचा अपव्यय होतो. त्या वाया जातात. कारण पृथ्वीवरील सर्व पदार्थ हे मानवाच्या निर्वाहाकरिता आहेत. ते सर्व देवाने म्हणजे निर्माणकर्त्याने आपल्या इच्छेने निर्माण केलेले आहेत. तर मग उलट नैवेद्य देऊन पदार्थाचा विनाश टाळावा. अंधश्रद्धेतून सर्वसामान्य लोकांना मुक्त करण्यासाठी फुलेंनी विविध प्रयत्न केलेत.

महात्मा जोतिबा फुलेंच्या धर्माच्या बाबतीतल्या विचारात मनुष्यजातीला सुख किती मिळते व किती विकास साधला जातो, या प्रश्नाला त्यांनी महत्त्व दिले. मनुष्य व त्यांच्या धार्मिक विचारांचा केंद्रबिंदू होता. जेव्हा धर्माच्या नावाखाली अन्नधान्य, पैसा, काळ, शक्ती यांचा उपयोग हा मानवाच्या कल्याणासाठी, दीनदुबळ्यांचे अज्ञान दूर करण्यासाठी होत नाही तर ते वस्तू यांचा अपव्यय होतो. हे देवाच्या योजनेच्या विरुद्ध आहे. अशा प्रकारची देव उपासना म्हणजे अधर्म आहे. काही लोक तासन्तास नाम संकीर्तनात वाया घालवू लागलेत. त्यामुळे नामसप्ताह उदयास आलेत. मानवाची देवावरची भावशुद्धी बाजूला पडली. त्याचे फुलेंना फार दु:ख होते.म्हणून त्यांनी देवाचे नामस्मरण कसे करावे याबाबत सूचना केली. ते म्हणतात ''निर्मीकाच्या (देवाच्या) नावाचे सदा भय बाळगावे त्याच्या नावाची आठवण मनात घट्ट धरून त्याने निर्माण केलेल्या सर्व मानवाबरोबर न्याय भावनेने, सात्विक भावनेने वागल्यास देवाच्या पवित्र नावांस सन्मान मिळेल.''

महात्मा जोतिबा फुलेंनी धर्माशी संबंधित असणाऱ्या पवित्र-अपवित्र, शुभ-अशुभ या बाबींचाही विचार केलेला आहे. मानवी स्वभावात असलेला हा भेद ईश्वर निर्मित नाही, हा भेद मानवाने निर्माण केलेला आहे. मानवाच्या मनात चांगल्या व वाईट प्रवृत्ती भरलेल्या असतात आणि या प्रवृत्तीचा फायदा प्रत्येक समाजातील धार्मिक

क्षेत्रातील मध्यस्थ लोक घेतात. यांनीच या प्रवृत्तीला चालना दिली. मध्यस्थ लोकांनी अन्नदान, देवधर्म यासारख्या खुळचट कल्पनांकडे सर्वसामान्य लोकांना आकर्षित करून स्वत:चा स्वार्थ साधून घेतला. जुन्या काळातील ब्राम्हण राज्यकर्ते आणि सावकार यांनी सर्व जातीच्या श्रद्धाळू लोकांची त्यांच्या मुलांची चिंता न करता आपल्या ब्राम्हण जातीच्या आळशी भट लोकांना दररोज वेगवेगळी प्रकारची अन्नदान करण्याची रित घातली. शूद्र लोकांच्या मुलांना शिक्षण किंवा शाळा बांधण्यासाठी खर्च न करता ठिकठिकाणी देवालये बांधण्यात खर्च केला आणि ते नीतिविरूद्ध आहे, असे फुले म्हणतात. अशा भेद करणाऱ्या प्रथेत धर्माचा आणि ईश्वरप्रति कोणताही विचार दिसत नाही. गरिबांची पिळवणूक करून धनाचा संचय करणारे विशिष्ट जातीतील प्रामुख्याने ब्राम्हण जातीतील सावकारांनी मंदिरे उभारली. पैशाच्या किंवा धनाच्या लोभाने आणि कोणतीही सहानुभूती न ठेवता अशा कार्याला धर्मकृत्य कसे म्हणता येईल, असा फुले प्रश्न विचारतात.

देवाला कोणाचीही मध्यस्थीची गरज नसते. 'सर्वसाक्ष जगत्पती । त्याला नको मध्यस्थी ।' हे फुलेंच्या धर्माच्या विचारातील महत्त्वाचे सूत्र होते. देवाला सर्व माणसे मुलासारखी आहेत. देव आपल्या मुलांमध्ये कोणताही भेदभाव करीत नाही म्हणून देव आणि मनुष्य यांच्यात कोणत्याही मध्यस्थाची गरज नाही. ब्राम्हण लोकांनी वर्ण व्यवस्थेत स्वत:ला श्रेष्ठ मानले व तशी मानसिकताही सर्वसामान्यांची झाली होती. परंतु या ब्राम्हण श्रेष्ठत्वाची झळ सर्वात जास्त गरीब, अडाणी शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, तसेच स्त्रियांना व शूद्रांना सहन करावी लागते. ब्राम्हणांना समाधानी केले नाही तर नरकात जावे लागेल या भीतीमुळे सर्वसामान्य लोक भट-ब्राम्हणांच्या भूल-थापांना बळी पडतात. धर्माच्या पवित्र क्षेत्रातील भिक्षुकांचा (ब्राम्हण-भट) हा पोटभरूपणा निव्वळ धंदा आहे, असे फुले म्हणतात. फुले अशा दांभिक धर्मगुरूंना लबाड, ढोंगी व खोटारडे म्हणत असत. ह्या सर्व लोकांच्या नादी न लागण्याचा सल्ला फुलेंनी भोळ्याभाबड्या समाजाला दिला. ब्राम्हणांच्या धार्मिक मक्तेदारीला आव्हान देऊन समाजातील वर्णव्यवस्थेला त्यांनी कडाडून विरोध केला. माणसाने आपली शक्ती, बुद्धी, वेळ, द्रव्य यांचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी केला पाहिजे. फुलेंनी 'सत्य न नीती' या तत्त्वांवर भर दिला. 'सत्याविना नाही जगी अन्य धर्म' सत्यवर्तन केल्याशिवाय मानवप्राणी सुखी होणार नाही याच दृष्टीने त्यांनी आपल्या धर्माच्या मताला 'सार्वजनीक सत्यधर्म' असे नाव दिले. सत्य नीती व न्याय हे तत्व परस्परांशी निगडित आहेत.

फुलेंनी माणुसकी हे श्रेष्ठ मूल्य आहे. 'धर्म राज्यभेद मानवा नसावा-सत्याने जगावे ईश्वरासाठी ।' मनुष्य जन्माला येतो तो केवळ ईश्वराचे अपत्य म्हणून नंतर त्याचा संबंध धर्म, समाज, देश यांचेशी येतो. या संस्थावर त्याला निष्ठा ठेवावी लागते. त्या प्रकारचे कर्तव्य पार पाडावे लागातात. माणसाला देशाभिमान, धर्माभिमान असावा. दुराभिमान नसावा. मानवाने स्वत:च्या मर्यादा ओळखाव्यात. 'सत्यमेव जयते' हे जोतिरावांचे ब्रीदवाक्य होते. त्यांनी अन्याय करणाऱ्या नीतितत्त्वाचा उघडपणे समाचार घेतला.

धर्म ही मनुष्याची वैयक्तिक बाब आहे. त्यामुळे फुल्यांनी आपल्या धर्म विचारात

स्वयंनिर्णय तत्त्वांचा पुरस्कार केला आहे. व्यक्तीची प्रतिष्ठा ते महत्त्वाची मानतात. ईश्वराची उपासना कोणत्या स्वरूपात, कोणत्या पद्धतीने करावी हे ठरविण्याचा अधिकार सर्वांना असावा.यासाठी कोणत्याही संस्थेने वा समूहाने व्यक्तीवर सक्ती करू नये किंवा छळ करू नये असे फुल्यांचे धार्मिक स्वयंनिर्णयासंबंधीचे स्पष्ट मत होते.

अशा प्रकारे महात्मा जोतिबा फुलेंनी धर्माविषयी, धार्मिक आचार-विचार या विषयी विचार मांडलेत. त्यांनी त्यांच्या विचारांमध्ये सत्य, नीती व कष्ट याला महत्त्व दिले व असत्य, अन्याय, अत्याचार व दांभिकपणा यांना विरोध केला.

### ४.२.५ महात्मा फुलेंचे शिक्षणाविषयी विचार:

महात्मा जोतिराव फुले हे सामाजिक समतेच्या क्रांतीचे आद्यजनक होते. बहुजनांचे शिक्षण या मार्गानेच समाजात समानता निर्माण होऊन अन्याय दूर होईल असे त्यांना वाटत असे. कारण जोतिराव फुलेंच्या पूर्वीची परिस्थिती अत्यंत अन्यायकारक होती. शिक्षण सर्वांना खुले नव्हते. शिक्षण जातीच्या चौकटीत अडकलेले होते. सरकारने शिक्षणाची जबाबदारी घेतली नव्हती. जोतिबांच्या काळात पंतोजी शिक्षण पद्धती होती.

ब्रिटिश भारतात आल्यानंतर १८१३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने शिक्षण सर्वांना खुले केले. कोणताही भेदाभेद न करता सर्वांना शिक्षण खुले केले. मिशनऱ्यांनी शाळा काढल्या आणि याचा उपयोग ब्राम्हणेतर समाजाला झाला. इंग्रजांनी पुण्यात संस्कृत शाळा काढली. ब्राम्हणेतरांनी शिक्षण घेतल्यांनतर कळले की, शिक्षण किती महत्त्वाचे आहे. इंग्रजांचा साम्राज्यवादही या शिक्षणामुळेच सर्वसामान्य जनतेला कळाला. पुढे यापासून प्रेरणा घेऊन १८४८मध्ये भिडेवाड्यात पहिली शाळा फुलेंनी काढली.

स्त्रीशिक्षण आणि कनिष्ठ वर्गाचा कैवारी म्हणून जोतिबांचे नाव सर्व महाराष्ट्रात नव्हे तर देशात गर्जू लागले. हिंदुस्थानात त्या काळी प्राथमिक शाळांची स्थिती अजिबात समाधानकारक नव्हती. देशात शिक्षणाचा प्रसार क्वचित होत होता. अशा निराशामय अंधकारात शिक्षणाची मशाल घेऊन जोतिबा कनिष्ठ वर्गात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी सतत धडपडत होते. आपल्या शैक्षणिक कार्यासाठी शक्य होईल तेथून साहाय्य मिळविण्याचा फुले आटोकाट प्रयत्न करत होते. ते दानशूर व्यक्तींना भेटून, सरकारी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना भेटून शाळेसाठी मदत देण्याचे आवाहन करून शिक्षण प्रसारासाठी प्रयत्न करत होते. १८४८ मध्ये सुरू झालेली शाळा फुले स्वत: पदरमोड करून चालवीत होते. मे, १८५२ मध्ये महारमांग समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्याच्या उद्देशाने फुलेंनी ती शाळा एका संस्थेला चालवायाला दिली.

जोतिराव गोविंद फुले यांनी नंतर वेताळ पेठेत दोन शाळा काढल्या. एक शाळा महारमांग, धेंड, चांभार यांच्या मुलींसाठी तर दुसरी त्याच जातीतील मुलांसाठी काढली. या दोन्ही शाळांची व्यवस्था जोतिराव स्वत: करत तसेच दोन्ही शाळांच्या खर्चही तेच करीत होते. या कामात ब्राम्हण शिक्षक त्यांना मदत करीत होते. शिवाय युरोपियन व सुसंस्कृत भारतीय लोक वर्गणी पाठवीत होते. या शाळेसाठी जोतिबांनी वाचनालयदेखील सुरू केले. जोतिराव फुले हे केवळ सामान्य शिक्षक नव्हते तर समाजाचे महान गुरू

होते. नवीन विचारांची बीजे मुलांच्या मनात रुजावी म्हणून एक माळी जशी कुदळ, फावडे, नागंर यांचा वापर करून आपल्या मळ्याची मशगत करतो तशी ते मुलांच्या मनाची जोपासना करून मुलांची घडण करीत. फुले मुलांना केवळ शिकवत नसत तर विद्यार्थ्यांना विचार करण्यास शिकवित असत. मुलांची ग्रहणशक्ती वाढविण्याचा प्रयत्न करीत. त्यांच्या मते, खऱ्या शिक्षणाचा संबंध मनाच्या विकासाशी असतो. फुलेंची नियमित उद्योगशीलता, भरपूर प्रेम आणि सतत जागरूकता यामुळे शाळेची प्रतिष्ठा वाढली. तसेच मुलांची पटसंख्या ही सरकारी शाळांतील पटसंख्येपेक्षा दहापटीने मोठी होती.

त्या कालखंडात जी शिक्षणपद्धती होती, जी शैक्षणिक स्थिती होती, त्यात शिक्षणाचा प्रसार हा वरिष्ठ वर्गापुरताच होतो. समाजातील ठराविक वर्गाचीच मिरासदारी निर्माण करण्याकडे कल होता. म्हणून फुलेंनी सरकारला स्पष्टपणे सांगितले की, कनिष्ठ वर्गातील लोकांची शिक्षणाची जबाबदारी घ्यावी. खेड्यातील सामान्य जनतेत शिक्षण देऊन भौतिक दृष्टीने उच्च पातळीवर आणल्याशिवाय तसेच सर्वसामान्य जनतेला सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण केल्याशिवाय देशाचा उद्‌धार होणार नाही, असे मत फुलेंचे होते. वरच्या वर्गाने शिक्षण घेतले तर ते खालच्या वर्गापर्यंत झिरपत जाईल असा समज होता. परंतु वरिष्ठ वर्गातील लोक कनिष्ठ वर्गातील लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करतील हे दिवास्वप्न ठरले. गरीब शेतकऱ्यांकडून जो शेतसारा गोळा होतो, ते सर्व वसुलाचे उत्पन्न सरकार लोकांच्या शिक्षणावर खर्च करते. विद्यापीठे, श्रीमतांच्या मुलांना शिक्षण देतात व त्यांची ऐहिक उन्नती साधण्यास मदत करतात. परंतु त्या विद्यापीठातून निघालेल्या सुशिक्षितांनी आपल्या देशबांधवांसाठी उन्नतीच्या कार्यात काहीही भर घातली नाही. त्यांनी फक्त स्वत:चाच फायदा करून घेतला आहे. उच्च वर्गाच्या शिक्षणपद्‌धतीची अशी प्रवृत्ती दिसते की, सरकारी वरिष्ठ जागा ह्या ब्राम्हणवर्गाची मक्तेदारी झाली आहे. म्हणून सरकारने दुसऱ्या इतर जातीच्या काही लोकांची नेमणूक करून दिवसेंदिवस ब्राम्हणांची मक्तेदारी कमी केली पाहिजे. सरकारने प्राथमिक शिक्षणाकडे थोडे जास्त लक्ष दिले तर बरेच चांगले लोक नोकरी करण्यासाठी शिकून तयार होतील. उच्च वर्गातील लोक आपल्या उच्च शिक्षणाची व्यवस्था स्वत: करतील असे फुलेंचे मत होते.

महार, मांग व अतिशूद्र जाती यांना जाती भेदाच्या दूषित पूर्वग्रहांमुळे शाळांतून वगळण्यात आले आहे. वरिष्ठ वर्गातील मुलांच्या शेजारी त्यांना बसू दिले जात नसे म्हणून सरकारने अशा जातीच्या लोकांसाठी वेगळ्या शाळा सुरू केल्या, परंतु त्या फक्त मोठ्या शहरातच आहेत. म्हणून फुलेंनी सरकारला कळकळीची विनंती केली की, ज्या गावात महार, मांग व इतर कनिष्ठ जातीची मोठी वस्ती असेल तेथे त्यांच्यासाठी वेगळ्या शाळा सुरू कराव्यात. कारण जातिभेदाच्या दूषित पूर्वग्रहांमुळे त्यांना इतर जातीच्या मुलांसोबत बसविण्यात येत नाही.

**फुल्यांनी हंटर कमिशनला दिलेले निवेदन:–**

भारतातील शिक्षणविषयक प्रश्नांबाबत चौकशी करून सुधारणा सुचविण्यासाठी

सरकारने १८८२ मध्ये बुइल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक मंडळ नेमले त्यास 'हंटर कमिशन' म्हणतात. ह्या कमिशनला फुलेंनी लेखी निवेदाच्या माध्यमातून आपले विचार समितीला कळविले. त्यात फुले यांनी शिक्षणविषयक विचार स्पष्ट केलेत. – फुल्यांनी प्राथमिक शिक्षणावर भर दिला. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे.

– शिक्षण हे व्यावहारिक जीवनाशी निगडित अभ्यासक्रमावर आधारित असावे.

– बालबोध लेखन, वाचन, हिशोबाची माहिती, सर्वसाधारण इतिहास, भूगोल, व्याकरण याचे प्राथमिक ज्ञान दिले जावे. नीती व आरोग्यसंबंधीचे सोपे धडे असावेत.

– अभ्यासक्रमात शेती व आरोग्य याचा समावेश असावा.

– विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती द्यावी.

– विद्यार्थ्यांना पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, ज्योतिषशास्त्र यांचा जास्तीतजास्त अभ्यास द्यावा. हे कोर्स (विषय) नियमित अभ्यासाव्यतिरिक्त असावेत. त्यामुळे सरकारला लोक न नोकर मिळतील. बेरोजगारी कमी होईल.

– शूद्रातिशूद्रांना जीवनवादी अभ्यासक्रम असावा.

– शहराच्या मानाने खेड्यातील शाळेत अभ्यासक्रम कमी असावा. कारण खेड्यातील मुलांना शेतीची कामे करावी लागतात.

– विद्यार्थ्यांना व्यावहारिक शिक्षण द्यावे म्हणजे बेरोजगारी व श्रमाची लाज बाळगायची नाही. हे मुलांना समजते.

– खालच्या जातीतील व त्यातल्या त्यात स्त्रियांमध्ये गळतीचे प्रमाण जास्त आहे, ते कमी करावे.

– मुलांचा अभ्यासक्रम पालकांना समजावा म्हणून प्रौढ शिक्षणाची सोय करावी.

– शाळांची तपासणी वेळोवेळी करावी. परंतु पूर्वसूचना न देता शाळांची तपासणी करावी. तसेच तपासणी करणारे अधिकारी इंग्रज सरकारचे अधिकारी असावेत.

– शिक्षणात त्रि-भाषा सूत्र असावे.मराठी-इंग्रजी-हिंदी अशाप्रकारे तीनही भाषांचा उपयोग करून शिक्षण द्यावे.

– सरकारने स्त्रियांना शिक्षण द्यावे तरच समाजात बदल घडून येईल.

– शिक्षकांना सन्मानाने जगता यावे म्हणून त्यांनाही पुरेसे वेतन द्यावे वा आदर्श शिक्षकाची शिफारस करावी.

**महात्मा फुलेंचे शिक्षकांविषयी विचार:–**

– प्राथमिक शाळांत जे शिक्षक नेमले जातात ते ब्राम्हण आहेत. त्यात काही शिक्षक हे नॉर्मल शिक्षक विद्यालयातून उत्तीर्ण झालेले आहेत. उरलेले इतर शिक्षक हे साधे शिक्षक आहेत. त्यांचे वेतन अगदी कमी आहे. त्यामुळे त्यांची कामगिरी असमाधानकारक बनते. सर्वसाधारणपणे हे शिक्षक निरुपयोगी व अव्यवहारी असतात.

त्यामुळे त्यांच्या हाताखाली शिकणारे मुले आळशी बनतात. आपले घरगुती धंदे किंवा दुसरे मेहनतीचे काम किंवा स्वतंत्र धंदा-उद्योग करण्याचे टाळून ते नोकरीच्या शोधात राहतात.

म्हणून फुले असे म्हणतात की, प्राथमिक शाळेतील शिक्षक शक्यतो अध्यापनाची परीक्षा उत्तीर्ण झालेले असावेत. आणि ते शेतकरी वर्गातील असावेत. कारण ते शिक्षक गरीब मुलांच्या गरजा, भावना या ब्राम्हण शिक्षकापेक्षा अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतात व मुलांमध्ये सहजपणे मिसळू शकतील. वरिष्ठ वर्गातील शिक्षक कनिष्ठ वर्गातील मुलांमध्ये मिसळू शकत नाहीत. त्यांची मते समजू शकत नाहीत. कनिष्ठ वर्गातील शिक्षक वेळप्रसंगी नांगर धरू शकतात किंवा सुताराचे काम करण्यास त्यांना कमीपणाचे वाटणार नाही. खालच्या वर्गातील लोकांशी ते शिक्षक सहजपणे समरस होतील.

चांगले शिक्षक मिळविण्यासाठी त्यांना अधिक पगार देऊन त्यांच्या परिस्थितीत सुधारणा केली पाहिजे. शहरातील शिक्षकांचे वेतन जास्त असावे. कुलकर्णीचे हिशोब तपासण्याचे काम शिक्षकांना द्यावे किंवा दस्तऐवज कागदपत्रे तयार करण्याचे किंवा खेड्यातील पोस्टमास्तरचे काम देऊन त्यांचा दर्जा वाढवावा. ग्रामीण भागातील शिक्षकांपैकी ज्या शिक्षकांच्या शाळेत अधिक मुले उत्तीर्ण होतील, त्यांना उत्तेजन म्हणून मासिक पगाराशिवाय आणखी काही विशेष वेतन द्यावे. शाळांवर देखरेख करणारी चांगली व्यवस्था असावी. ग्रामीण भागातील शाळांची तपासणी वर्षातून निदान चार वेळा किंवा त्यापेक्षा जास्त वेळा झाली पाहिजे. युरोपियन अधिकारी वर्गाने सुद्धा अधुनमधून देखरेख करणे आवश्यक आहे. त्यामुळे शिक्षकांवर नियंत्रण राहण्यास मदत होईल. शिक्षण खात्यावर सर्व प्रकारचे सरकारचेच संपूर्ण नियंत्रण असले पाहिजे. शिक्षकांना सन्मानाने जगता यावे म्हणून त्यांनाही पुरेसे वेतन वा आदर्श शिक्षक पुरस्काराची शिफारस फुलेंनी केली. कारण शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेचा कणा मानला होता.

**सारांश-**

समाजाच्या तळागाळापर्यंत ज्ञानाचा सर्वांगीण लाभ व्हावा हे स्पष्ट करणारे फुले पहिले भारतीय शिक्षण तज्ज्ञ होय. त्यांना अपेक्षित शिक्षण पद्धती, सामाजिक अभिसरणाची, विषमता निर्मूलनाची, स्त्रीस्वातंत्र्याची व समस्याविरहित समाज निर्माण करणारी व श्रमाशी निगडित शिक्षण पद्धती असेल तर देशाला पूर्वीचे वैभव प्राप्त होऊ शकते.

## ४.२.६ सत्यशोधक समाज आणि ब्राम्हणेतर चळवळ:-

महात्मा जोतिराव फुले हे क्रांतिकारक समाजसुधारक असल्यामुळे त्यांच्या वृत्तीशी सुसंगत व त्यांच्या धोरणाला पोषक असे व्यासपीठ निर्माण करणे महत्त्वाचे होते. ब्राम्हणांच्या मानसिक गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गाला मुक्त करण्यासाठी फुलेंनी सतत प्रयत्न केलेत. कनिष्ठ वर्गातील लोकांना, ते जन्मत:च गुलामगिरी त्यांच्याबरोबर येते, ही कल्पनाच त्यांना सहन होत नव्हती. दारिद्र्य, जातीय अन्याय, जुलूम या विरुद्ध

त्यांनी बंड करण्यास उठावे म्हणून कनिष्ठ वर्गात धैर्य निर्माण केले. मानवाची प्रतिष्ठा, मानवी समानता व स्वत:च्या आत्म्याचा उद्धार करणे ह्या विचारांनी त्यांनी कनिष्ठ वर्गातील गुलामगिरीत असणाऱ्या लोकांना नवीन प्रेरणा देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी एक संघटित चळवळ सुरू करण्याच्या निर्धाराने एक संस्था स्थापन केली.

सत्यशोधक समाज :-

२४ सप्टेंबर १८७३ रोजी जी संस्था स्थापन केली त्या संस्थेस फुलेंनी 'सत्यशोधक समाज' असे नाव दिले. संपूर्ण महाराष्ट्र व्यापणारी समाज सुधारणेची ही पहिली चळवळ होती. सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष आणि कोशाध्यक्ष म्हणुन जोतिबा फुलेंची निवड झाली. शूद्र आणि अतिशूद्रांची ब्राम्हण-भटांकडून जी पिळवणूक होत होती ती बंद करणे, त्यांना त्यांचे हक्क व अधिकारांची जाणीव करून देणे आणि ब्राम्हणी शास्त्राच्या मानसिक व धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करणे हा सत्यशोधक समाजाचा उद्देश होता. सत्यशोधक समाजाची तत्त्वे अतिशय आधुनिक व उदार स्वरूपाची होती. साधारणपणे सर्व धर्मात आढळणाऱ्या तत्त्वांसारखीच होती.

**सत्यशोधक समाजाची तत्त्वे-**

**१) ईश्वर निर्गुण, निराकार आहे, तो सर्वव्यापी एकच आहे.**

**२) ईश्वराची प्राप्ती प्रत्येक मानव करू शकतो. त्यासाठी मध्यस्थाची (एजंट) गरज नाही.**

**३) आपण सर्व ईश्वराची मुलं आहोत.**

**४) मानवाचे श्रेष्ठत्व हे जन्मावर अवलंबून नाही, तर ते व्यक्तीच्या गुण-कर्मावर अवलंबून आहे.**

**५) देवाची भक्ती करण्याचा अधिकार सर्व मानवाला आहे.**

**६) कोणताही धर्मग्रंथ हा ईश्वरनिर्मित नाही तर त्याची निर्मिती मानवानेच केली आहे.**

**वरील तत्त्वे मंजूर असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस सत्यशोधक समाजाचे सभासद होता येते. प्रत्येक सभासदाला प्रतिज्ञा घ्यावी लागत असे, ती अशी-'सर्व मानवप्राणी एकाच देवाची लेकरे आहेत, सबब ती माझी भावडे आहेत, अशा बुद्धीने मी त्यांच्याशी वागेन. परमेश्वराची पूजा, भक्ती अगर ध्यानधारणा करतांना किंवा धार्मिक विधी करतांना मी मध्यस्थाची गरज ठेवणार नाही; दुसऱ्यांनाही तसेच वागण्याबाबत उपदेश करीन. मी माझ्या मुलामुलींना सुशिक्षित करेन. मी नेहमी राजनिष्ठेने वागेन. परमेश्वरास व सत्पुरुषी परमेश्वरास साक्ष ठेवून मी ही प्रतिज्ञा करीत आहे. ह्या प्रतिज्ञेप्रमाणे वागण्यास मला सामर्थ्य येईल अशा प्रकारे आयुष्य जगण्यास योग्य प्रकारे तो मला मदत करो' अशा स्वरूपाची प्रतिज्ञा घेतली जात असे.**

**जेथे जेथे सत्यशोधक समाजाच्या शाखा स्थापण्यात आल्यात, त्या ठिकाणी दर आठवड्यास सभा घेतली जाई. अशा सभांमधून (मीटिंगमधून) दारूबंदी, सक्तीचे शिक्षण, स्वदेशी वस्तूंचा वापराबाबत प्रोत्साहन देणे, ब्राम्हणांची पुरोहितगिरी झुगारून देणे, कुटुंबातील लग्न कमी खर्चात करणे, भूत-पिशाच्च, ज्योतिष यापासून लांब राहणे, जातिभेद, मूर्तिपूजा याविरूद्ध प्रचार केला जात असे. आपला खरा पिता परमेश्वर असून, आपण सर्व त्याची लेकरे आहोत म्हणून आपण सर्व भाऊ आहोत. या तत्त्वावर भर दिला जात असे.**

या सत्यशोधक चळवळींमुळे फुलेंनी खालच्या कनिष्ठ वर्गात चैतन्य निर्माण केले. तसेच कोणताही अन्याय सहन न करण्याची प्रवृत्ती वाढीस लावली. त्यातून या कनिष्ठ वर्गाला सुसंघटित केले. ब्राम्हणांशिवाय व मराठीतून लग्नाची मंगलाष्टके म्हणून लग्न करण्यास सुरुवात केली. समाजातील जातिभेदाची भावना कमी करण्याचा प्रयत्न केला. शिक्षणाविषयी आवड निर्माण केली. अनेक ठिकाणी या संस्थेच्या माध्यमातून शूद्र समाजातील मुलांसाठी शाळा सुरू केल्या. अशा कार्याने प्रभावित होऊन अनेक निस्वार्थी तरुण या सत्यशोधक समाज चळवळीकडे आकर्षित झाले. देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लढणाऱ्या नेत्यांचा तुरुंगातून बाहेर आल्यानंतर सत्कार केला. त्यामुळे इतर तरुणांना प्रेरणा मिळाली.

फुलेंच्या सत्यशोधक समाजाचा जातिव्यवस्थेवर विश्वास नव्हता. तसेच वर्णव्यस्थेवरही नव्हता. सत्यशोधक समाजाची माषा जनतेची होती. सत्यशोधक समाजाची बैठक किंवा सभा शेतातील पिके काढण्याचे, मळणीचे ठिकाण होते. सत्यशोधक समाजाचा प्रचार करणाऱ्या लोकांचा पोशाख म्हणजे एक घोंगडी, पागोटे व धोतर आणि हातात डफ असे. सत्यशोधक कार्यकर्ते आपल्या भाषणात शेतकऱ्यांचे प्रश्न, तसेच धार्मिक विधी व संस्काराच्या नावाखाली सर्वसामान्य शेतकऱ्यांचे कसे नुकसान होते हे सांगत शिक्षणाचे महत्त्व सांगत.

सत्यशोधक समाजाच्या कार्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाई. शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगत. तसेच सत्यशोधक समाजाच्या ध्येयानुसार विवाह करून दिले जात. म्हणजे ब्राम्हण-भटजीच्या अनुपस्थितीत विवाह करून दिले जात. अनेक प्रकारे प्रयत्न करून सत्यशोधक समाजाच्या सभासदांची संख्या वाढविली. सधन लोकांकडून साह्य मिळविण्यासाठी आवाहन केले. इंग्रज राजवटीत शिक्षणाची चांगली संधी चालून आलेली आहे. कनिष्ठ लोकांनी ती वाया घालवू नये, अन्यथा त्यांच्या मुलांना भविष्यात अत्यंत खडतर जीवन जगावे लागेल. असा इशारा १८७६च्या सत्यशोधक समाजाच्या प्रतिवृत्तात देण्यात आला होता.

अशाप्रकारे सामान्य जनतेला एकत्र करण्याचे महत्त्वाचे कार्य सत्यशोधक समाजाने त्या कालखंडात केले. सत्यशोधक समाजातर्फे होणारा संघर्ष हा सामाजिक, राजकीय व धार्मिक गुलामगिरीविरुद्धचा लढा होता. समाजातील कनिष्ठ वर्गाच्या उद्धाराचा उद्देश सत्यशोधक समाजाचा होता. सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ करणारा सत्यशोधक समाज हा पहिला समाज होता. या समाजाने सामाजिक गुलामगिरीविरुद्ध सामाजिक अन्याय, अत्याचाराविरुद्ध लढून समाजाच्या पुनर्रचनेची प्रथम मागणी केली. हजारो वर्षे अन्यायात खितपत पडलेल्या समाजाला बोलके करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. त्यातून पुढे आधुनिक महाराष्ट्राच्या आधुनिकीकरणाची एक प्रकारे पार्श्वभूमी तयार करून दिली. त्यामुळे भारतात आणि महाराष्ट्रात पुढे विविध समाजांचा उदय झाला. म्हणूनच महाराष्ट्राच्या आद्य समाज सुधारकांमध्ये महात्मा जोतिराव फुले यांची गणना एक कर्ता आद्य सुधारक म्हणून केली जाते.

पददलितांच्या व बहुजन समाजाच्या हक्कासाठी लढणाऱ्या विविध चळवळींना सत्यशोधक समाजाच्या चळवळीपासून प्रेरणा मिळाली. १९१० मध्ये शाहू महाराजांनी महात्मा फुलेंच्या मृत्यूनंतर सत्यशोधक चळवळीचे पुनरुज्जीवन केले. सत्यशोधक चळवळ ही महाराष्ट्राची समाजसुधारणांची पहिली चळवळ आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचे बायबल आहे. आधुनिक भारतात सामाजिक पुनर्रचनेची चळवळ करणारी पहिली चळवळ ठरली. स्त्रीशिक्षणाची चळवळ, जमीनदारांचेविरुद्ध शेतकऱ्यांचा उठाव, दलितमुक्ती आंदोलने यांचे बिजारोपण सत्यशोधक चळवळीने केले.

**ब्राम्हणेतर चळवळ:**

महात्मा जोतिराव फुले यांनी मानव मुक्तीसाठी संघर्ष केला. सत्यशोधक समाजाचे नेतृत्व फुलेंनी केले. सत्यशोधक समाजाला समाजातील पुरोहितवर्गाचे वर्चस्व झुगारून द्यायचे होते. सत्यशोधक समाजाला धर्मग्रंथाचे बंधन मान्य नव्हते. ब्राम्हो समाजाची चळवळ ही ब्राम्हण, कायस्थ, सारस्वत यासारख्या उच्चवर्णीय वर्गांकडून चालवली जात होती. तर सत्यशोधक समाजातील बहुसंख्य अनुयायी (सभासद) हे मराठे, गवळी, तेली या सारख्या ब्राम्हणेतर वर्गातून आलेले होते. जोतिरावांनी धर्माविरुद्ध, तिर्थस्थानाविरुद्ध तसेच गुरूंच्या विरुद्ध व परंपरेच्या विरुद्ध बंड केले. धर्माचे व्यक्तिगत व सामाजिक जीवनातील आक्रमण त्यांना मान्य नव्हते. अन्यायकारक परिस्थितीच्या विरोधात फुलेंनी चळवळीच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये जे बदल घडून आलेत त्यासाठी सामाजिक सुधारक आणि सामाजिक चळवळी कारणीभूत ठरल्या आहेत. भारतात जी चारवर्णीय (ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र) व्यवस्था होती, त्यात ब्राम्हणांना उच्च स्थान. ब्राम्हणांना वेगवेगळ्या ग्रंथांचे ज्ञान त्यामुळे त्यांच्याकडे बौद्धीक नेतृत्व होते. त्यामुळे भारतीय समाज व्यवस्थेमध्ये उच्च सामाजिक दर्जा मिळालेला होता. ब्राम्हण हेच खऱ्या अर्थाने येथील प्रशासक होते. राज्यकर्ते होते. देवीदेवतांचे अवतार, कथा-कीर्तने, प्रवचने, नवस, नैवेद्य, यज्ञ, शुभा-शुभ, विवाहविधी इ. च्या माध्यमातून तेव्हाच्या पुरोहित वर्गाने सर्वसामान्य जनतेचे शोषण चालवले होते. ब्राम्हण वर्गाकडे विद्येची मक्तेदारी होती. शाळा त्यांच्याच, शिक्षक त्यांचेच आणि विद्यार्थीही त्यांचेच, अशी परिस्थिती शिक्षण व्यवस्थेची होती.

समाजातील पुरोहित वर्गाचे वर्चस्व नष्ट व्हावे व सर्वसामान्य समाजाचे शोषण थांबावे, ग्रंथप्रामाण्य थांबावे ते झुगारून देऊन ब्राम्हणांविरुद्ध चळवळ संघटित करावी म्हणून महात्मा फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजात विविध जातीचे सभासद होते. या अनुयायांनी संघटित होऊन चळवळ निर्माण करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी त्यांनी ब्राम्हणांचा द्वेष केला. त्यामुळे ब्राम्हण व ब्राम्हणेतर असे दोन प्रवाह निर्माण झाले. ब्राम्हणांऐवजी क्षत्रियांचे वर्चस्व निर्माण करणाऱ्या लोकांनी ब्राम्हणेतर चळवळीत संघटित व्हायला सुरवात केली.

विश्राम रामजी घोले, कृष्णराव भालेराव, नारायण मेधाजी लोखंडे, संतोजी लाड

इत्यादी सत्यशोधक समाजाच्या सभासदांनी महात्मा फुलेंच्या चळवळीची व्यापकता वाढविली. ब्राम्हणेतर चळवळीची सुरुवात महाराष्ट्रापासूनच झालेली दिसते. ब्राम्हणांची मक्तेदारी संपुष्टात आणण्यासाठी त्या कालखंडात ब्राम्हणेतर मंडळींनी आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी लिखाण साहित्य (वाङमय) निर्माण केले आणि त्यामुळे बहुजन समाजामध्ये ब्राम्हणांविरुद्ध जागृती निर्माण व्हायला फार मदत झाली. स्वत: फुलेंनी ''ब्राम्हणांचे कसब'', 'गुलामगिरी' इ. ग्रंथ लिहिले. ब्राम्हणशाहीला विरोध करतांना या चळवळीने बहुजन समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक प्रश्नांचा विचार केला. बुद्धी ही केवळ ब्राम्हणांची मक्तेदारी नाही. बुद्धीप्रमाणेच गुणसंपदा आणि कर्तव्य ह्या गोष्टी वर्णानुसार व पिढीजात नसतात. फुलेंच्या मते शेतकरी अज्ञानी असल्यामुळे ब्राम्हणांना जातिभेदापासून भरपूर फायदे होत आहेत. शूद्रातिशूद्रांच्या प्रगतीच्या मार्गात जातिभेद सर्वात मोठा अडथळा निर्माण झाल्यामुळे शूद्रांची कुचंबणा झाली होती. ब्राम्हणांची ही मक्तेदारी संपुष्टात आणण्यासाठी, ही अन्यायकारक ब्राम्हणशाही ब्राम्हणवादी विचारसरणी नष्ट करण्यासाठीच फुलेंनी ब्राम्हणेतर चळवळ स्थापन केली. पददलित जनतेला मुक्त करावे, ब्राम्हण जातीला विरोध न करता अन्याय करणाऱ्या ब्राम्हणी विचारसरणीला विरोध म्हणून समाजातील बहुजन समाजातील घटकांना संघटीत करून ब्राम्हणेतर चळवळ सुरू केली. तथापि ब्राम्हणेतर चळवळ ही 'भिक्षुकशाही' विरूद्ध होती. त्यामुळेच व्यापक दृष्टिकोनाने विचार करता या चळवळीला मर्यादा होत्या.

महात्मा फुलेंच्या मृत्यूनंतर १८८९ नंतर ही चळवळ मंदावली. कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजाचा आधार मिळाल्यानंतर ब्राम्हणेतर चळवळीला पुन्हा चैतन्य निर्माण झाले. फुलेंनी महाराष्ट्रात ब्राम्हण वर्गाचे वर्चस्व नष्ट करून बहुजन समाजाची त्यांच्या गुलामगिरीतून मुक्तता करण्याच्या हेतूने या चळवळीमार्फत जनजागृती केली. दक्षिण भारतातही ब्राम्हणेतर चळवळीचे लोण पसरले. परंतु संपूर्ण भारतभर ही चळवळ व्यापक होऊ शकली नाही.

## ४.३ स्वयंअध्ययन प्रश्न व उपक्रम:

### अ) दोन वाक्यात उत्तरे लिहा:-

१) 'राईट्स ऑफ मॅन' हे पुस्तक कोणी लिहिले?

...................................................................................

...................................................................................

...................................................................................

२) फुले यांना 'महात्मा' पदवी कोणी व कधी दिली?

...................................................................................

...................................................................................

...................................................................................

३) अस्पृश्यांच्या मुलींसाठी पहिली शाळा कधी व कोठे सुरू केली?

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

४) शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेचे वर्णन फुलेंनी कोणत्या ग्रंथात केले?

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

५) 'ज्या दिवशी मनुष्य गुलाम होतो त्या दिवशी त्याचा अर्धा सद्‌गुण जातो' हे प्रसिद्ध वचन कोणी मांडले?

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

६) 'हंटर कमिशन' कशाला म्हणतात?

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

७) 'सत्यशोधक समाज' म्हणजे काय?

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

८) सत्यशोधक समाजाचे बायबल कोणत्या ग्रंथाला म्हटले आहे?

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

**ब) टिपा लिहा:-**

१) फुलेंचे शेतकऱ्यांविषयीचे विचार

..............................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२) स्त्री-पुरुष समानतेविषयी फुलेंचे विचार

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३) फुलेंचे शिक्षकांविषयीचे विचार

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४) ब्राम्हणेतर चळवळ

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

५) फुलेंचे धार्मिक विचार

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**क) दीर्घोत्तरी प्रश्न:-**

१) महात्मा फुलेंचे सामाजिक सुधारणाविषयक कार्य सविस्तर स्पष्ट करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२) फुलेंचे गुलामगिरीविषयक विचारांची चर्चा करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३) सत्यशोधक समाजाविषयी फुलेंचे विचार विशद करा.

........................................................................................................................

........................................................................................................................

........................................................................................................................

## ४.४ सारांश

मित्रहो, या प्रकरणात आपण महात्मा जोतिबा फुले या महान सामजिक क्रांतिकारकाच्या कार्याचा अभ्यास केला. सामाजिक क्रांतीचे उद्गाते, अग्रदूत म्हणून फुलेंचा गौरव केला गेला. बहुजन समाजाला सामाजिक गर्तेतून बाहेर काढण्याचे काम फुलेंनी केले आहे.

या प्रकरणात आपण फुलेंचा जीवनपरिचय करून घेतला. फुलेंनी तत्कालीन समाजव्यवस्थेत सामाजिक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. शेतकरी, कामगार यांचे दारिद्र्य निवारण करण्यासाठी चळवळ उभारली. समानतेची घोषणा देऊन समाजात सर्व वर्गात समानता निर्माण होणेसाठी समाजाची पुनर्रचना करणारे युगपुरुष म्हणून कार्य केले. स्त्रीशिक्षणाचे महत्त्व ओळखून स्त्रियांना शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केल्या. समाज जागृतीसाठी आपले विचार जनतेपर्यंत पाहोचविण्यासाठी विविध ग्रंथांचे लिखाण केले.

सामाजिक सुधारणांचा भाग म्हणून स्त्रियांच्या उद्धारासाठी स्त्रीशिक्षणाचे महत्त्व जाणून विविध प्रकारचे कार्य केले. बालविवाहाची प्रथा, बालविधवा, विधवा पुनर्विवाह, सतीची चाल, जरठविवाह, केशवपन या विविध समस्यांविषयी विचार करून विविध उपाय योजले. समाजात जागृती निर्माण केली. बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. सावित्रीबाईंना शिकवून त्यांनी स्त्री शिक्षणाला चालना दिली.

अस्पृश्यांच्या उद्धारासाठी अस्पृश्यांना शिक्षण मिळावे म्हणून शाळा सुरू केल्या. अस्पृश्यांना समता, बंधुभाव व स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यासाठी जातीयतेची बंधने दूर केली. शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेचे वर्णन करण्यासाठी 'शेतकऱ्यांचा आसूड' ग्रंथाचे लिखाण केले. शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण सक्तीचे करावे म्हणून सरकारला सूचना केल्या. शेतकऱ्यांच्या अन्यायाला वाचा फोडून त्यांच्या उद्धारासाठी चळवळ सुरू केली. समाजात समानता निर्माण होणेसाठी काळजीपूर्वक विचार केला. समाजवादी विचार जातिरावांनी मांडला; तसेच स्त्री-पुरुष समानतेविषयी विचार मांडलेत. समाजाच्या जडण-घडणीत पुरुषांइतकाच स्त्रियांचाही वाटा असतो. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने आणण्यासाठी सत्यशोधक विवाह पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

फुलेंनी कनिष्ठ वर्गातील लोकांच्या मनातील कमी पणाची भावना दूर केली. त्यांचे अज्ञान, निरक्षरता, दूषित पूर्वग्रह व जातिविषयक भावना दूर करून फुलेंनी कनिष्ठ वर्गातील लोकांना ब्राम्हण वर्गाच्या मनसिक गुलामगिरीतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. सरकारने कनिष्ठ जातीच्या लोकांना शैक्षणिक सवलती देऊन त्यांचे अज्ञान व पूर्वग्रह दूर करण्यासाठी बौद्धिक सुधारा करण्यासाठी ब्राम्हणांची मक्तेदारीचा शेवट करून

सरकारने ब्राम्हणेतर वर्गातील लोकांना सरकारी नोकरीत सामावून घ्यावे. तसेच त्यांना त्यांचे हक्क व अधिकार द्यावेत व समाजातील संख्येने मोठा असलेल्या वर्गाला न्याय देण्यासाठी सतत प्रयत्न केला.

फुलेंनी एकेश्वरवादाची संकल्पना मांडली. देव हा निर्मिक आहे. प्रत्येक व्यक्तीने देवाचा आणि मानवाचा परस्पर संबंध समजावून सांगितला. प्रत्येक व्यक्तीने इतर मानवाच्या कल्याणाचा विचार करणे हे पवित्र व खऱ्या धर्माचे कार्य आहे. असे फुले सांगतात. धार्मिक अंधश्रद्धेतून सर्वसामान्य लोकांना मुक्त करण्यासाठी फुलेंनी अनेक प्रयत्न केलेत. त्यांनी प्राथमिक शिक्षण, शिक्षणाचे महत्त्व, शिक्षकाची भूमिका, सर्व जातीच्या लोकांसाठी शिक्षणाची सुविधा तसेच शिक्षकांची नेमणूक करतांना इतर जातीतील लोकांना सामावून घ्यावे असे आवाहन केले.

मानवाची प्रतिष्ठा, मानवी समानता व स्वतःच्या आत्म्याचा उद्धार करणे या विचारांनी त्यांनी कनिष्ठ वर्गातील गुलामगिरीत असणाऱ्या लोकांना नवीन प्रेरणा देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी एक संघटित चळवळ सुरू करण्याचा निर्धाराने फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. ब्राम्हणेतर समाजातील अनुयायांना एकत्रित करून ब्राम्हणेतर समाजातील अनुयायांनी एकत्रित करून ब्राम्हणेतर चळवळ सुरू केली. यातून ब्राम्हणी प्रवृत्तीता विरोध केला.

अशाप्रकारे आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती करण्यामध्ये अनेक समाजसुधारकांपैकी कर्ते समाजसुधारक म्हणून फुलेंचे कार्य महनीय आहे. म्हणून त्यांना क्रांतिसूर्य म्हटले जाते. त्यांच्या कार्याने केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण देशाला एक नवीन दिशा मिळाली. समानतावादी समाज निर्माण करण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले.

## ४.५ पारिभाषिक शब्द/शब्दार्थ :-

* संस्कृती : मानवाने निर्माण केलेल्या ज्ञान, श्रद्धा, कला, नीतिमत्ता याला उद्देशून हा शब्द वापरला जातो.
* संघर्ष : दुसऱ्याच्या किंवा इतरांच्या इच्छेस विरोध किंवा प्रतिकार करणारी प्रक्रिया
* प्रक्रिया : सामाजिक परिवर्तनामधील सातत्य
* सुधारणा : समाजातील अन्यायकारक चालीरिती, दोष प्रयत्न करून किंवा संघर्ष करून त्यात बदल घडवला जातो., यास सुधारणा म्हणतात.
* निवारण करणे : दूर करणे
* दांभिकपणा : खोटारडेपणा, बनावटपणा
* जरठविवाह : कमी वयाच्या मुलीशी ५० ते ६० वर्षाच्या पुरुषाने विवाह करणे.

* रोष : राग
* नास्तिकता : देवाला न मानणे
* एकेश्वरवादी : एकाच देवाला मानणे किंवा परमेश्वर एकच आहे असे मानणे.

## ४.६ संदर्भसूची :


१) शोधाच्या नव्या वाटा : संपादक- हरी नरके, प्रकाशक- प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई

२) सत्यशोधक समाजाचा इतिहास : प्रस्तावना खंड- महेश जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-१४

३) महात्मा जोतिराव फुले- धनंजय किर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

४) महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास : प्रत्यार्थ गरूड / प्राचार्य-बी.बी. सावंत, कैलास पब्लिकेशन्स्, औरंगपुरा, औरंगाबाद

५) भारतीय सामाजिक विचारवंत - डॉ. दा. धो. काचोळे, कैलास पब्लिकेशन्स्, औरंगपुरा, औरंगाबाद

६) भारतीय समाज : माणिक माने, विद्या प्रकाशन, नागपूर

# घटक क्र. ५

# छत्रपती राजर्षी शाहू

**अनुक्रमणिका**


५.0 उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ मुख्य मुद्दा/विषय विवेचनः

५.२.१ शाहुंचा जीवन परिचय – थोडक्यात

५.२.२ शाहू : सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ

५.२.३ ब्राम्हणेतर चळवळ

५.२.४ अस्पृश्यता निवारण मोहीम (Crusade Against untouchability)

५.२.५ आरक्षण धोरण

५.२.६ वेदोक्त वाद/वेदोक्त प्रकरण (Vedikta controversy)

५.३ स्वयंअध्ययन प्रश्न/उपक्रम

५.४ सारांश

५.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

५.६ संदर्भसूची


## ५.0 – उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो, या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हाला

* शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याची माहिती होईल.
* छत्रपती शाहू सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ कसे या बद्दल माहिती जाणून घेता येईल.
* ब्राम्हणेतर चळवळीविषयी शाहूंची भूमिका समजवून घेता येईल.
* छत्रपती शाहू महाराजांनी आरक्षण धोरणाबाबत केलेल्या कार्याचा परिचय करून घेता येईल.
* वेदोक्त चळवळ किंवा वेदोक्त वाद समजून घेता येईल.

* जातिभेद निवारण चळवळीविषयी विचार समजून घेता येतील.

## ५.१– प्रस्तावना

भारतीय सामाजिक सुधारणांचा अभ्यास करीत असताना इतिहासातील महापुरुषांचे योगदान डोळ्यासमोर येते. भारताच्या इतिहासात गौतम बुद्ध, सम्राट अशोक, शिवाजी महाराज, राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, छत्रपती शाहू हे आधुनिक कालखंडातील महापुरुष, हे सर्व महापुरुष त्यांच्या कालखंडातील समाजाचे नेतृत्व करणारे नायक होते. या नायकांनी काळालाच घडविण्याचे भगीरथ प्रयत्न केलेत. अनेक ठिकाणी थांबून त्यांनी दूषित समाजाला शुद्ध केले. सामाजिक न्याय देण्याचे प्रयत्न केले. लोककल्याणाची कामे केली. यातीलच एक महापुरुष म्हणजे राजर्षी शाहू छत्रपती!

सत्यशोधक समाजाच्या तत्त्वाप्रमाणे छत्रपती शाहू महाराज यांनी अस्पृश्यता नष्ट केली हा त्यांनी स्वराज्याचा खरा पाया घातला असे महात्मा गांधींनी म्हटले, तर डॉ. आंबेडकरांनी शाहू महाराजांचा 'सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ' या शब्दात गौरव केला. छत्रपती शाहूंनी आपल्या कालखंडात न्याय देण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश सत्तेत राहून त्यांनी ब्रिटिशांच्या मदतीने भारतीय समाजातील विशेष करुन महाराष्ट्रातील समाजमनात जागृती घडविण्याचे कार्य केले. लोककल्याण कारभाराचा प्रारंभ केला. प्रशासन यंत्रणेवर पकड मजबूत केली. वेदोक्ताचा सामाजिक न्यायाचा लढा दिला. आपल्या कोल्हापूर संस्थानात आरक्षणाचा क्रांतिकारी जाहीरनामा काढला, ब्राम्हणेतर चळवळ उभारली व पुढे नेली. अस्पृश्यता निवारणासाठी शिक्षणाचा प्रसार केला. भटक्या विमुक्त जमातींचा उद्धार केला. अशा क्रांतीकारी, सामाजिक न्यायाचे प्रणेते, सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ राजर्षी छत्रपती शाहूंचे सामाजिक, जातीय विषयक, शिक्षणासंबंधी, आरक्षणासंबंधी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे हे अनेक सामाजिक कार्यास प्रेरणा देणारे ठरेल.

## ५.२ विषय विवेचन

राजर्षी छत्रपती शाहूंच्या विविध कार्यांचा आढावा आपल्याला पुढील घटकांच्या आधारे घेता येईल.

### ५.२.१ राजर्षी शाहू छत्रपती सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ –जीवन परिचय –

**थोडक्यात**

आबासाहेब घाटगे ऊर्फ जयसिंगराव व राधाबाई या दांपत्यास कोल्हापूर येथे २६ जून १८७४ रोजी पुत्रप्राप्ती झाली. त्या पुत्राचे नाव 'यशवंतराव'. हे यशवंतराव म्हणजेच चरित्रनायक शाहू महाराज होत. १७ मार्च १८८४ रोजी यशवंतराव यांना कोल्हापूर गादीचा वारसा मिळाला. वडिलांच्या सहवासात बाल शाहू घडत होते. वडिलांच्या

जहागिरीचा प्रदेश, भोवताली डोंगर, नद्या, वनराई अशा हिरव्या निसर्गाच्या सान्निधान्यात वडिलांप्रमाणेच प्रत्यक्ष समाजात वावरणे यातूनच शाहूंच्या मनाची-विचारांची जडणघडण होत होती.

शाहू राजकोटच्या राजकुमार महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी गेले. नंतर पुढील शिक्षण त्यांनी धारवाडला घेतले. शिक्षण घेतांना त्यांनी सहलीतून समाजातील वास्तव जवळून बघितले. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांना कोल्हापूर संस्थानाचा अधिकार प्राप्त झाला. संस्थानचा कार्यभार पाहत असतांना त्यांनी महाराष्ट्रातील विविध प्रकारच्या राजकीय व सामाजिक मतप्रणालीही पाहिल्या. त्यावेळी धर्म हा सर्वसामांन्यासाठी हितवह नव्हता. शाहूंचा काळ हा प्रतिकूल होता. त्या विरुद्ध ते क्रांतिकारकाच्या भूमिकेतून लढले. समाजपरिवर्तनाला त्यांनी मोठ्या प्रमाणात गती दिली.

राजर्षी शाहूंनी आपल्या कालखंडात शिक्षणाचे महत्त्व जाणले. प्राथमिक शिक्षण त्यांनी सक्तीचे केले. अस्पृश्यांना शिक्षण मिळावे म्हणून सर्व जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उघडले (१८७०). मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप देण्याची व्यवस्था केली. स्त्रियांना शिक्षण मिळावे म्हणून प्रयत्न केले. शेती विषयक शिक्षण देण्याची व्यवस्था केली. आरक्षण धोरण आपल्या संस्थानात राबवले. समाजातल्या दुर्बल असणाऱ्या क्षेत्रात त्यांनी कार्य केले व समाजामन सक्षम आणि जागृत करण्याचा प्रयत्न केला. दि. ६ मे १९२२ रोजी सकाळी ६ वाजता हा दीनदुबळ्यांचा वाली, महाराष्ट्राचा महापुरुष आपल्या लाखो अनुयायांना व चाहत्यांना सोडून अनंतात विलिन झाला.

## ५.२.२ राजर्षी शाहू छत्रपती : सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ -

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शाहू महाराजांचा 'सामाजिक लोकशाहीच आधारस्तंभ' अशा शब्दात गौरव केला आहे. हे खालील मुद्द्यांवरुन स्पष्ट करता येईल.

### १) लोककल्याणकारी राजा -

आपल्याला मिळालेला राज्याधिकारी हा रंजल्या - गांजल्या प्रजाजनांच्या विशेषतः गरीब अज्ञानी जनतेच्या उद्धारासाठी आहे, अशी जाण शाहू महाराजांना होती. ते सतत राज्यात फिरतांना दिसतात. जनतेला भेटत. त्यांच्याशी वार्तालाप करीत. त्यांची सुख-दुःखे समजुन घेत. त्यांनी जनतेचे दारिद्र्य, वेदना, अज्ञान अंधश्रद्धा यावर उपाययोजना करण्यासाठी ते प्रयत्नशील होते. मजूर आई-बापांच्या लहान मुलांची देखभाल करण्यासाठी 'पाळणाघरे' उभी केली होती. रोजगार हमी योजना, या दोन्ही गोष्टी शंभर वर्षापूर्वी शाहूंनी आपल्या राज्यात अंमलात आणल्या. अर्थात शाहू महाराज राजे असले तरी ते लोकशाही वृत्तीचे होते.

### २) बहुजन समाजाच्या कल्याणाचा ध्यास -

राजर्षी शाहू महाराज हे महाराष्ट्रातील प्रबोधनाचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. सर्वसामान्य बहुजन समाजाचे हित साधणे हे महाराजांचे ध्येय होते. संस्थानाच्या हिताच्या दृष्टीने ब्रिटिश सरकारशी संबंध विश्वासाचे व सौहार्दाचे ठेवले. शाहू महाराजांनी

स्वराज्य चळवळीत भाग न घेता व ब्रिटिशांच्या विरोधात न जाता आपल्या राज्यातील जनतेचे कल्याण कसे करता येईल याचा विचार त्यांनी केला. महाराजांच्या कार्याची व एकनिष्ठतेची पावती म्हणून सार्वभौम सरकारने सम्राज्ञी व्हिक्टोरियाच्या वाढदिवशी कोल्हापूरच्या छत्रपतींना 'माहाराजा' हा किताब बहाल केला. शाहू महाराजांनी आपल्या कार्यकाळात समाजातील सर्व घटकांना सामावून घेण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न केलेत.

### ३) अस्पृश्यांच्या उद्धाराचे कार्य –

राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या उद्धारासाठी केलेले कार्य हे सामाजिक लोकशाहीच्या तत्त्वांना अनुसरुनच होते. शाहूंनी आपल्या संस्थानातील सर्वच मागासलेल्या जातींचा उद्धार शिक्षणाच्या साधनाने करण्याचे धोरण स्वीकारले होते. अस्पृश्यांचे वसतिगृह सुरु केले. अस्पृश्यांच्या शाळांची संख्या वाढविली. पूर्वी अस्पृश्यांसाठी फक्त ५ शाळा व विद्यार्थी संख्या १६८ होती. त्यांनी राज्यकारभार स्वीकारल्यानंतर ४ वर्षांच्या कालखंडात शाळांची संख्या २७ व विद्यार्थी संख्या ६३६ झाली. अस्पृश्य विद्यांर्थ्यासाठी त्यांनी खास पात्रतावर्ग सुरु केले. अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले. शिष्यवृत्या दिल्या जाऊ लागल्या. शाळांमधील अस्पृश्यता नाहीशी करण्यासाठी मुलांना वेदांची संथा दिली. महाराजांनी महारांची वेठबिगारी दूर केली. त्यांच्या नावे जमिनी करुन वतनाच्या जबाबदारीतून महारांना कायमचे मुक्त केले. अस्पृश्यता निवारणासाठी शाहू महाराजांनी महसूल व न्याय खात्यासंबंधी, आरोग्य खात्यासंबंधी, विद्याशाखा (शिक्षण खात्यासंबंधी) व अस्पृश्यता निवारण्यासंबंधी असे चार जाहीरनामे काढून अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले. अस्पृश्यांना मनुष्याप्रमाणे वागवले पाहिजे. महाराजांनी म्हटले होते, 'महाराष्ट्रातील अस्पृश्यांसह तमाम मागासलेल्या बहुजन समाजाचा उद्धार हे माझे पवित्र जीवनकार्य आहे.'

### ४) बहुजन समाजाच्या शिक्षणाला प्रोत्साहन –

ज्ञानासारखी दुसरी पवित्र गोष्ट नाही अशी राजर्षी शाहू महाराजांची श्रद्धा होती. आपल्या संस्थानात त्यांनी समाजातील सर्व स्तरातील घटकांच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले. महात्मा फुलेप्रमाणेच शाहू छत्रपतींनीही सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरला. बहुजन समाजातून उत्तम शेतकरी, उत्तम शिक्षक, उत्तम व्यापारी, उत्तम उद्योगपती, उत्तम सैनिक निर्माण व्हावेत यासाठी शिक्षणरुपी गंगेचे पाट गोरगरीब जनतेच्या दारापर्यंत नेले पाहिजेत असे त्यांना वाटे. २१ सप्टेंबर १९१७ रोजी 'सक्तीच्या शिक्षणाचा कायदा' केला. स्त्रीशिक्षण, प्रौढ शिक्षण याबाबत विशेष लक्ष दिले. या सर्व शैक्षणिक कार्यातून ज्ञानगंगेचे पाट गरिबांच्या झोपडीपर्यंत पोहोचविले. परिणामी महाराष्ट्रात बहुजन समाजाची एक प्रागतिक मानसिकता तयार झाली.

### ५) सामाजिक समता व न्यायाचा पुरस्कार –

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सर्वसामान्य बहुजन समाजाला सामाजिक समता व न्याय मिळवून देण्यासाठी कोल्हापूर संस्थानात ब्राम्हणेतर चळवळ सुरु केली. आपल्या संस्थानातील ब्राम्हण पुरोहितांचे वंशपरंपरागत चालत आलेले हक्क काढून घेतले. महाराजांनी संस्थानात सत्यशोधक समजाची शाखा सुरु केली. सत्यशोधक समाजाच्या कार्याला उत्तेजन दिले. स्वराज्याचा लाभ तळागाळातील सर्वसामान्य जनतेला मिळवून देण्यासाठी

महाराजांनी जातीजातीमधील भेदभाव कमी करण्याचा प्रयत्न केला. समाजातील सर्व जाती-धर्माच्या लोकांना समान धाग्यात बांधून कल्याणकारी राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला , नव्हे तर कल्याणकारी राजा म्हणून कार्य केले.

**६) वसतिगृह चळवळ सुरू केली -**

भारतात बहुजन समाज हा शिक्षणापासून वंचित होता. त्यांच्या अज्ञानामुळेच हा समाज गुलामगिरीच्या गर्तेत ढकलला गेला होता. त्यातून सुटण्यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे, असे महात्मा फुलेंनी हेरले होते. त्यांनी मागासलेल्या समाजासाठी, अस्पृश्यांसाठी शाळा काढल्या. बहुजन समाजाने शिक्षणाकडे पाठ फिरविली होती. त्यासाठी फुले आणि नंतर शाहू छत्रपतींनी अविरत प्रयत्न केले. १८९६ साली कोल्हापूरात उच्चशिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह स्थापन केले. हे वसतिगृह सर्व जाती - धर्माच्या मुलांसाठी खुले होते. १८ एप्रिल १९०१ रोजी 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग' या नावाने कोल्हापुरात वसतिगृहाची स्थापना केली. या वसतिगृहात मराठा, मुसलमान, शिंपी, कोळी, माळी, गवळी अशा बहुजन समाजातील मुलांचा समावेश होता. यातून त्यांनी समाजाच्या सर्वसमावेशकता या घटकाला महत्त्व दिले.

शाहू छत्रपतींनी जैन, मुस्लीम तसेच अस्पृश्यातील चांभार व ढोर जातीसाठीही स्वतंत्र वसतिगृहांची  स्थापन केली. जातवार वसतिगृह निमार्ण करण्यामागे त्यांचा हेतू असा होता की, आपापल्या जातीच्या वसतिगृहात राहून का होईना; पण मुले शिकणे महत्त्वाचे होते. ती मुले शिकल्यावर त्यांना जाती भेदातील खोटेपणा किंवा फोलपणा लक्षात येईल. कुटुंबापेक्षा जात मोठी व जातीपेक्षा 'समाज' मोठी ही जाणीव निर्माण होण्यासाठी प्रथम शिक्षण प्रसार महत्त्वाचा आहे असे शाहूंना वाटे. शाहूंची ही वसतिगृह चळवळ एक लोकचळवळ बनली होती. देशातील थोर कृषितज्ज्ञ, पुणे शेतकी महाविद्यालयाचे प्राचार्य पी. सी. पाटील तसेच कर्मवीर भाऊराव पाटील हे शाहूंच्या वसतिगृहातीलच विद्यार्थी होत.

**७) मागासवर्गीयांसाठी आरक्षण धोरणाचा पुरस्कार-**

२६ एप्रिल १९०२ मध्ये राजर्षी छत्रपती शाहु महाराजांनी एक जाहिरनामा काढून आपल्या संस्थानात मागासवर्गीयांसाठी नोकऱ्यांमध्ये ५०% जागा राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला. शाहू महाराज हे आपल्या संस्थानात मागास असलेल्या वर्गासाठी आरक्षण धोरण स्वीकारणारे भारतातील पहिले राजे होते. मागास - वर्गीयांनी शिक्षण घेतल्यानंतर त्यांना सामाजिक समतेच्या तत्त्वानुसार योग्य संधीही मिळाली पाहिजे. तेव्हा सत्तेच्या वाटणीचा न्याय्य भाग बहुजन समाजाच्या पदरात टाकण्याचे काम, सामाजिक लोकशाही स्थापन करण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले.

**८) शेती व उद्योगधंद्यांच्या विकासाला चालना दिली -**

सामाजिक लोकशाहीचे महत्त्वाचे तत्त्व म्हणजे शेती व औद्योगिक विकास होय. शाहू महाराजांनी या तत्त्वाला अनुसरुन आपल्या कोल्हापूर संस्थानात कृषी व उद्योगधंद्याच्या विकासाला चालना दिली. दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली तसेच त्यांना कर्जातून मुक्त केले. १९१४ पासून संस्थानात कृषी प्रदर्शने भरवली. शेतीला पाणी मिळावे म्हणून राधानगरी धरण बांधले व हरितक्रांतीचा पाया घातला 'सार्वजनिक पाटबंधारे

धोरण' संस्थानात जाहीर केले.

शेती व्यवसायात आधुनिक ज्ञानाचा वापर व्हावा यासाठी कोल्हापुरात 'शेती अवजारांचे म्युझियम' सुरु केले. शेतकऱ्यांना नवीन बी –बियाणे, खते व आधुनिक मशागत पद्धतीचे ज्ञान व प्रशिक्षण दिले. महाराजांनी औद्योगिक विकासासाठी प्रयत्न केले, उद्योगांना मदत केली. चांदीची बाजारपेठ उभारली, कामगारांना उत्तेजन दिले. आपल्या राज्यातच गुळाची बाजारपेठ निर्माण केली. 'मधुमक्षिकापालन' उद्योग सुरु केला. १९०६ मध्ये कोल्हापुरात 'शाहू छत्रपती मिल्स' या कापड गिरणीची स्थापना केली. १९१२ मध्ये शाहूंनी सहकार संस्थाविषयक कायदा केला. व सहकार तत्त्वाचा पुरस्कार केला. साखर उद्योग, दूध संकलन, सूत उत्पादन या तीनही क्षेत्रात सहकार क्षेत्र निर्माण केले.

अशा प्रकारे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी समाजातील शिक्षण, व्यापार, उद्योग, शेती, तसेच सामाजिक स्तरावर विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, कामगार महिला सर्वच घटकांना सामाऊन घेऊन दूरदृष्टी ठेवून एक कल्याणकारी दृष्टीने कारभार चालविला म्हणून त्यांना 'सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ' असे म्हटले गेले हे आपल्या लक्षात येईलच.

### ५.२.३ ब्राम्हणेतर चळवळ

'ब्राम्हणेतर चळवळ' म्हणजे ब्राम्हणेतर समाजाने आपल्या राजकीय हक्कांसाठी उभारलेली चळवळ होय. ब्रिटिशांनी हिंदू लोकांना राज्यपद्धतीत हक्क देण्याची घोषणा केली या पार्श्वभूमीवर या चळवळीचा उदय खऱ्या अर्थाने झाला. परंतु या चळवळीची बीजे त्यापूर्वीच्या महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीत आणि शाहू महाराजांच्या वेदोक्त चळवळीत पाहायला मिळतात. या दोन्ही चळवळी ब्राम्हणेतर चळवळीच होत्या.

महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीचे शाहू महाराजांनी पुनरुज्जीवन केले. मात्र या चळवळीत शहाण्णव कुळे मराठे, जैन, लिंगायात, कामस्थ प्रभू अशांसारखे विविध जाती–धर्माचे लोक सहभागी झाले. महाराष्ट्रातील सर्व सत्यशोधक कार्येकर्ते ब्राम्हणेतर चळवळीत आले. सामाजिक समता व न्याय प्राप्त करण्यासाठी व बहुजन समाजाच्या कल्याणासाठी ब्राम्हणांचे वर्चस्व कमी केले पाहिजे या दृष्टिने ही चळवळ सुरु केली.

कोल्हापुरात शाहू महाराजांनी वैचारिक तालमीत तयार झालेल्या तरुणांसाठी सर्व महाराष्ट्रभर ब्राम्हणेतर समाजासाठी शैक्षणिक संस्था व विद्यार्थी वसतिगृहे स्थापन केली. तसेच समाज जागृतीच अनेक सत्यशोधकी उपक्रम हाती घेतले होते. शाहू महाराजांच्या प्रेरणेने महाराष्ट्रात नगर, खानदेश, वऱ्हाड इ. भागांतही ब्राम्हणेतरांच्या जागृतीची केंद्रे स्थापन झाली होती. सर्व सत्यशोधक चळवळीतील कार्येकर्ते ब्राम्हणेतर चळवळीच्या प्रवाहात आणले.

ब्राम्हणपुरोहितांचे महत्त्व कमी करण्यासाठी आणि आपल्या ब्राम्हणेतर चळवळीला दिशा देण्यासाठी महाराजांनी १९११ मध्ये कोल्हापूर येथे म. फुले यांच्या सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन केली. त्यांनी 'सत्यशोधक समाज शाळा' सुरु केली व या शाळेचा प्रमुख म्हणून एका सुशिक्षित धनगर जातीच्या व्यक्तीची निवड केली. शाळेत सर्व जातीजमातींच्या मुलांना वेदोक्त विधींचे शिक्षण दिले जात असे. महाराज आपल्या

राजवाड्यातील धार्मिक विधी या शाळेत तयार झालेल्या पुरोहितांकडून करु लागले त्यामुळे ब्राम्हण पुरोहितांचे महत्त्व कमी झाले.

वेदोक्त प्रकरणामध्ये शाहू महाराजांनी ब्राम्हणेतर चळवळ सुरु केली. महाराज पंचगंगा नदीवर कार्तिक स्नानासाठी गेले असता राजोपाध्ये या पुरोहिताने वैदिक मंत्र म्हटले नाहीत. तसेच त्याने महाराजांना 'शूद्र' म्हटले. या घटनेमुळे शाहू महाराजांनी पुरोहिताचे सर्व हक्क, इनामी गावे, जमिनी काढून घेतले. ब्राम्हणांनी महाराजांना 'शाप' दिले. काही ब्राम्हणांनी तर महाराजांवर ब्राम्हण स्त्रियांवर बलात्कार केल्याचे खोटे आरोपही केलेत. महाराजांच्या चारित्र्यावर संशय घेण्यात आला. या सर्व प्रकरणांतून महाराजांना असे वाटू लागले की आपल्यासारख्या राजाची अशी अवस्था ब्राम्हण वर्ग करु शकतो तर सर्वसामान्य लोकांची अवस्था काय असेल? म्हणून बहुजन समाजाला ब्राम्हण भिक्षुकांच्या जाळ्यातून मुक्त केले पाहिजे ह्या हेतूने ब्राम्हणेतर चळवळ पुनरुज्जीवित करुन जोमाने कार्य केले.

*** ब्राम्हण नोकरशाहीला विरोध –**

ब्रिटिश कालखंडात सर्व शासकीय नोकऱ्यांमध्ये ब्राम्हणांचे वर्चस्व होते. महाराजांनी कुलकर्णी वतने नष्ट केली व अस्पृश्य वर्गातील लोकांना तलाठी म्हणून नेमले. ब्राम्हणांचे वर्चस्व असलेल्या या नोकरशाही व्यवस्थेला शाहू महाराजांनी विरोध केला आणि २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागासवर्गीय लोकांसाठी ५०% आरक्षण घोषित केले.

*** ब्राम्हणेतर चळवळीचे फलित –**

ब्राम्हणेतर चळवळीमुळे ब्रिटिश अधिकारी माँटेग्यू यांनी हिंदी नेते व संस्थानिकांशी चर्चा करुन त्या आधारे पार्लमेंटने डिसेंबर १९१९ मध्ये सुधारणा कायदा पास करून ब्राम्हणेतरांना कायदेमंडळात काही राखीव जागा राज्यकर्त्यांना ठेवाव्या लागल्या. याचे श्रेय ब्राम्हणेतर चळवळीला आहे. याचा परिणाम म्हणून मुंबई भागात ८६ लोकनियुक्त जागांपैकी ३५ जागा ग्रामीण भागातील प्रतिनिधींसाठी दिल्या पैकी ७ जागा ब्राम्हणेतर समाजासाठी राखून ठेवल्या गेल्या. त्यातील २ जागा अस्पृश्य नागरिकास मिळाल्या. १९२० मध्ये नोव्हेंबर महिन्यात कायदेमंडळाच्या निवडणुका झाल्या. त्यात सी. के. बोले; निंबाळकर, पांडुरंगराव जाधव, दाजीराव विचारे, आनंदराव सुर्वे, गंगाजी काळभोर इ. ब्राम्हणेतर मंडळी कायदेमंडळात गेली तर, आण्णासाहेब लठ्ठे व केशवराव बागडे केंद्रीय कायदेमंडळात निवडून गेले. हे फलित ब्राम्हणेतर चळवळीचे होते. सर्वांना मार्गदर्शन करणारा, तसेच वेळप्रसंगी शिस्त पाळण्यासाठी रागावणे हे कार्य छत्रपती शाहूंनी केले. शाहू महाराजांचे महाराष्ट्राच्या समाजकारणात व राजकारणात असलेले स्थान इतर कोणीच घेऊ शकत नव्हता हे ही तेवढेच सत्य.

## ५.२.४ अस्पृश्यता निवारण मोहिम –

राजर्षी शाहू महाराजांची अस्पृश्यता निवारणाची मनोभूमिका त्यांना आलेले अनुभव, काही प्रसंग यातून निर्माण झाली होती. शाहूंच्या राजपरिवारात त्यांच्या सभोवतालचे वातावरण अतिशय कर्मठ होते. कर्मठ संस्कारात वाढलेल्या शाहू महाराजांनी अस्पृश्यता व जातिभेद या अनिष्ट सामाजिक रूढींविरुद्ध मोठा संघर्ष केला. हा संघर्ष अनेक वर्षांचा होता.

महाराजांनी आपल्या एका भाषणात सांगितले " वंशपरंपरेने अस्पृश्य मानलेल्यांची जरी प्रत्यक्ष शिवाशिव झाली नाही, तरी ते शिवाशिव झाले असे समजून स्नान करीत होते." या उदाहरणावरुन असे स्पष्ट होते की, तेव्हाचे कर्मठ ब्रम्हणवादी लोक राजांना सुद्धा 'शूद्र' मानत असत. शिवछत्रपतींच्या गादीवर बसलेल्या राजास त्याचे क्षत्रियत्व नाकारून त्यांना 'शूद्र' म्हटले. त्यामुळे महाराजांचा अपमान झाला. ही गोष्ट महाराजांच्या मानी स्वभावास संतापजनक व त्रासदायक होती. शाहू महाराजांचा अहंकार दुखावला. या घटनेतून ब्राम्हणशाही व शाहू महाराज यांच्यात विरोध निर्माण झाला. या प्रसंगातून शाहू महाराजांची ब्राम्हणशाही विरोधाची मनोभूमिका अधिक खंबीर व तत्त्वनिष्ठ बनली. ज्या राज्यात राजाचा शूद्र म्हणून अपमान होतो, तेथे शूद्रातिशूद्रांना पशूसारखे जीवन जगण्यास भाग पाडले होते. त्यांच्या वेदना महारांजांना स्पष्ट समजून आल्या. ब्राम्हणशाही विरुद्धच्या भांडणात या शूद्रातिशूद्रांना मानसिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त केले पाहिजे याची तीव्र जाणीव महाराजांना झाली. या जाणिवेतूनच दलित - पतितांचा उद्धार करण्याचे मनाशी ठरविले व अस्पृश्य निवारण कार्याला सुरुवात केली. ते पुढील मुद्द्यांच्या आधारे अधिक स्पष्टपणे समजू शकेल.

*** अस्पृश्यांतील शिक्षणाच्या प्रसारासाठी प्रयत्न -**

शाहू महाराजांच्या तत्कालीन समाजव्यवस्थेत ब्राम्हणशाहीत शूद्रांना संघर्ष करण्यासाठी तयार करणे, त्यांना शहाणे करणे ही गोष्ट शिक्षणाच्या प्रसाराशिवाय शक्य होणार नव्हती. म्हणून शाहूंनी आपल्या संस्थानातील सर्वच मागासलेल्या जातींचा उद्धार शिक्षणाच्या आधारे करणेसाठी धोरण आखले. १९०८ मध्ये त्यांनी भास्करराव जाधव, महादेव डोंगरे, खंडेराव बागल शिंदे या मंडळींना पुढे करुन अस्पृश्यांचे वसतिगृह सुरु केले.

शाहूंच्या कालखंडात स्पृश्यांच्या व अस्पृश्यांच्या शाळा वेगवेगळ्या होत्या. ही स्पृश्य- अस्पृश्यतेची भावना नष्ट करण्यासाठी समाजजागृती महत्त्वाची होती. त्या काळात महाराजांनी अस्पृश्यांमध्ये शिक्षणाची जागृती निर्माण केला. व त्यासाठी अस्पृश्यांच्या शाळांची संख्या वाढविणे हे काम हाती घेतले. जेव्हा शाहूंनी राज्याची धुरा सांभाळली तेव्हा अस्पृश्यांसाठी ५ शाळा व १६८ विद्यार्थिसंख्या होती. पुढील चार वर्षात म्हणजे १९१२ मध्ये अस्पृश्यांची शाळांची संख्या २७ व विद्यार्थीसंख्या ६३६ इतकी झाली. म्हणजे महाराजांच्या प्रयत्नाने अस्पृश्यांसाठी शाळांची संख्या व विद्यार्थी संख्या वाढत गेली.

त्या कालखंडात स्पृश्य व अस्पृश्य शाळांचा अभ्यासक्रम सारखा नव्हता. ४ थी पास झालेल्या विद्यार्थ्यांना हायस्कूलमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी आवश्यक पात्रता येत नसे. एवढा सुमार अभ्यासक्रम चौथी पर्यंतचा होता. यासाठी शाहू महाराजांनी चौथी पास विद्यार्थ्यांसाठी खास पात्रता वर्ग सुरु केले.

*** अस्पृश्य समाजाच्या शिक्षणासाठी विशेष आदेश-**

या कालखंडात शाहू महाराजांनी १९०६ मध्ये कोल्हापूर संस्थानात चांभार, महार वगैरे अस्पृश्य लोकांसाठी 'रात्रीची शाळा' सुरु केली. ४ ऑक्टोंबर १९०७ मध्ये आदेश काढून कोल्हापुरातील चांभार व ढोर अस्पृश्य समाजातील मुलींच्या शाळेसाठी मंजुरी दिली.

संस्थानाच्या स्त्रीशिक्षणाच्या अंदाजपत्रकात खर्चाची तरतूद केली. २४ नोव्हेंबर १९११ च्या आदेशानुसार संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत केले. वेळोवेळी विशेष शिष्यवृत्त्या दिल्या. पुस्तके, पाट्या, पेन्सिल मोफत पुरविले जाऊ लागले. १९१९ मध्ये शाहू महाराजांनी 'तलाठी वर्गातील' अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी दरमहा साठ रुपये शिष्यवृत्ती जाहीर केली.

अस्पृश्य मुलांना सरकारी शाळांमधून इतर लोकांच्या मुलांप्रमाणे प्रवेश देण्यात यावा व सरकारी शाळांतून स्पृश्य-अस्पृश्य भेद न पाळता सर्व जाती व धर्मांच्या मुलांना एकत्र बसविण्यात यावे यासाठी २८ सप्टेंबर १९१९ रोजी अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद करण्याचा आदेश दिला.

अस्पृश्य मुलांप्रमाणेच अस्पृश्य मुलींनाही शिक्षणात शिष्यवृत्ती ठेवल्या गेल्या. महाराजांनी केवळ आपल्या संस्थानातच नव्हे तर संस्थानाबाहेरही अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी नाशिक, नागपूर इ. ठिकाणी वसतिगृहे काढण्यासाठी आर्थिक मदत पुरविली.

### * अस्पृश्य मुलांसाठी वेदांची संथा -

अस्पृश्यांना इतर उच्च वर्णीयांबरोबर आणण्यासाठी काही क्रांतिकारी व धाडसी निर्णय घेतले. अस्पृश्य मुलांना योग्य धार्मिक शिक्षण देण्याची योजना आखली व आर्य व्यक्तींकडून उपनयन करून वेदांची संथा दिली. यातून आपण इतरांपेक्षा कनिष्ठ किंवा हलके आहोत ही भावना नष्ट होऊन आपणही इतरांच्या बरोबरीचे आहोत अशी भावना निर्माण होऊन ही मुले शाळेत इतरांशी बरोबरीच्या नात्याने वागू लागतील. त्यामुळे शाळेतील अस्पृश्यता नष्ट होण्यास मदत झाली.

म्हणूनच शाहू महाराजांना अस्पृश्यांचे उपनयन करुन त्यांना वेदांची संथा देणारा व अस्पृश्यांना ब्राम्हणांबरोबर आणून सोडणारा देशातील पहिला राजा म्हटले जाते. शाहू महाराजांनी मागासवर्गातील लोकांना गरिबीतून व दुःखातून बाहेर काढणे हे पवित्र कार्य आहे असे मानले. 'मी मागासवर्गीयांची सेवा करतो असे नाही तर मानवजातीची सेवा करतो' अशी पवित्रतेची भावना महाराजांच्या मनात होती.

### * हजेरी पद्धतीचे निर्मूलन केले -

२७ जुलै १९१८ रोजी महाराजांनी कोल्हापूर संस्थानात अस्पृश्य मुक्तीचा आदेश मंजूर करून ३ ऑगस्ट १९१८ मध्ये कोल्हापूर गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाला. या आदेशानुसार त्या इलाक्यातील गुन्हेगार जातींच्या लोकांना पोलीस पाटलाकडे दररोज हजेरी लावावी लागत असे. त्यामुळे त्या त्या जातीच्या लोकांची फार गैरसोय होत असे व इमानदारीने धंदे करुन पोट भरण्यास अडचण येत असे. ह्या अडचणी दूर करण्यासाठी महाराजांनी वरील आदेश काढून महार, मांग, रामोशी, बेरड या जातींच्या लोकांची हजेरी पद्धत बंद करण्यात यावी, परंतु जे खरोखर गुन्हेगार आहेत त्यांना मात्र यात माफी नव्हती. तसेच गुन्हेगार म्हणून कायमचा शिक्क बसलेल्या 'गहेचोर' जातीची हजेरी माफ करुन दंडीत झालेल्या कोणत्याही व्यक्तीचे वर्तन शिक्षा संपल्यापासून पाच वर्षे चांगले राहिले तर त्यास हजेरी देण्याची गरज नाही. त्याला हजेरीतून मुक्त करण्यात यावे, असे बजावले.

हजेरी पद्धतीमुळे गरीब, गाव कामगारांवर जास्त जुलूम होत होता. अधिकारी वर्ग हजेरी असणाऱ्या व्यक्तीकडून जबरदस्तीने फुकट काम करून घेत असत. हजेरीवाल्या व्यक्तीकडे कोणी, पाहुणे, नातेवाईक आजारी पडल्यास त्याला ताबडतोब भेटता येत नव्हते. आजारी मुलांना, आई वडील यांच्याकडे लक्ष देण्यास कोणीच नसतात अशी जुलमाची हजेरी पद्धत बंद करण्यामागे हा मानवतावादी उदार दृष्टिकोन महाराजांचा होता.

*** वेठबिगारी (वेठवरळा) पद्धतीचे निर्मूलन –**

हजेरीपद्धती प्रमाणेच वेठवरळा पद्धत ही सुद्धा विशेषतः महार समाजावर अमानुष पद्धत लादली होती. वेठवरळा पद्धत म्हणजे पाटील, कुलकर्णी, सरकारी अधिकारी महार लोकांना विविध प्रकारची कामे सांगत व विनामोबदला त्यांना राबवून घेत असत. म्हणजेच महारांना आपल्या जातीनुसार परंपरागत कामे करावीच लागत, त्यांनाही इनामे व हक्क होती परंतु ते शूद्र मानले जात. महारांना आपल्या गावगाड्याच्या कामाबरोबरच हे जास्तीचे ओझे वाहावे लागे. म्हणजे एक प्रकारे वेठवरळा ही पद्धत महारकीच्या वतनाबरोबर त्यांच्या पायात बेडीप्रमाणे होती म्हणजेच एका दृष्टीने महारकीचे वतन सामाजिक गुलामगिरीच होती. म्हणून शाहू महाराजांनी हे महारवतन खालसा करुन महारांना या गुलामगिरीतून मुक्त करावे यासाठी ही अन्यायकारक वेठवरळा पद्धत कायद्याने बंद केली. यासाठी विशेष हुकूम काढून त्यात म्हटले की, महार, मांग वैगेरे इतर अस्पृश्य लोकांकडून राजघराणे व राज्य सरकरी कामाव्यतिरिक्त कोणीही वरील जातीतील लोकांकडून वेठवरळा घेऊ नये. व जर महारांना इतर कामासाठी लावले तर त्यांना वतनातून कमी केले जाईल. तसेच मांग जातीच्या व्यक्तीकडून दोर – नाडा वगैरे काम फुकट वेठबिगारीच्या स्वरुपात करु नये, केल्यास त्यास जबर शिक्षा केली जाईल.

*** महार वतन खालसा केली –**

छत्रपती शाहू महाराजांनी वेठबिगारी पद्धत बंद केली व त्याचीच पुढची पायरी म्हणजे महार वतने खालसा केली. महारांकडे वतने म्हणून अतिशय अल्पजमीन होती. ह्या जमिनीच्या हक्कावरच महार स्वतःला वतनदार म्हणवून घेत असत. पण हे वतन म्हणजे एक प्रकारे गुलामी होती. परंतु महाराजांनी 'महारकीचे वतन' खालसा करून त्यांच्या जमिनी वतने म्हणून न ठेवता त्यांच्या नावावर करुन दिल्या व महारांना वतनाच्या जबाबदारीतून मुक्त केले. यासाठी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सल्लाही घेतला. १९५८ मध्ये यशवंतराव चव्हाणांनच्या काळात ही महार वतने खालसा करून महारांची वतनाच्या गुलामगिरीतून मुक्तता केली.

*** अस्पृश्यता निवारणासाठी जाहीरनामे काढले –**

अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक असून शाहू महाराजांनी, आपल्या संस्थानात या वाईट प्रथेला कायद्यानेच दूर करण्याचे ठरविले. १९१९ मध्ये त्यांनी दोन जाहीरनामे मंजूर केले पहिला – महसूल व न्याय खात्यासंबंधी होता. त्यात म्हटले होते की, संस्थानात जे कोणी अस्पृश्यांना नोकरीसाठी ठेवतील त्यांना प्रेमाने व समतेने वागवले पाहिज. जे तसे करणार नाहीत अशा अधिकाऱ्यांनी सहा आठवड्यांच्या आत राजीनामा द्यावा तसेच त्यांना

पेन्शनही मिळणार नाही. आपल्या राज्यातील कोणत्याही माणसाला जनावराप्रमाणे न वागवता मानवाप्रमाणे वागवावे. या सूचनेचे सर्व अधिकारी, मिशनरी, आर्य समाजातील व्यक्तींने, सरकारी अधिकाऱ्यांनी याचे अनुकरण काटेकोरपणे करावे.

आरोग्य खात्यातील जाहीरनाम्यात महाराज म्हणतात की, अस्पृश्यांना व स्पृश्यांना धर्मार्थ दवाखान्यात तुच्छतेने वागवू नये. अस्पृश्यांची पूर्ण काळजी घ्यावी. धर्मार्थ संस्था ह्या गरीब व अस्पृश्यांसाठी आहेत. त्यांना समतेने वागवावे. कोणताही रोगी दवाखान्यात येताच त्याची योग्य तपासणी करुन उपचारासाठी दवाखान्यात दाखल करून घ्यावे. ज्या व्यक्तीची हरकत असेल त्यांनी सहा आठवड्यांच्या आत राजीनामा द्यावा व त्याला निवृत्तीचा लाभही मिळणार नाही. असा जाहीरनामा काढला.

तसेच शिक्षण खात्यासंबंधी जो जाहीरनामा काढला त्यात महाराज म्हणतात की, अस्पृश्यांना शाळेत चांगली वागणूक मिळत नाही. अस्पृश्यांना तुच्छतेने वागविण्याचा कुणालाही हक्क नाही. शिक्षण संस्था ह्या गरिबातील गरीब जे अस्पृश्य आहेत त्यांना समानतेची वागणूक द्यावी. ते कर देतात त्यांना वाईट वागणूक द्यावी? सर्व खाजगी व सरकारी शाळांना अनुदान इमारती, मैदान या रुपाने मदत मिळते. म्हणून अशा शाळांनी अस्पृश्यांना आदराने वागवावे. स्पृश्य लोक कोणत्याही मार्गाने शिक्षण घेऊ शकतात परंतु अस्पृश्य फक्त सरकारी शाळांतून शिक्षण घेऊ शकत नाही. म्हणून अस्पृश्यांना समतेने वागवावे. जे मुख्याध्यापक, शिक्षक असेल त्यांनी त्यांच्याशी समतेने वागावे. नाहीतर त्यांना योग्य जाब द्यावा लागेल अन्यथा खाजगी संस्थांना देण्यात येणारी मदत बंद कर्ण्यात येईल.

६ सप्टेंबर १९१९ रोजी शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारण्याचा जाहीरनामा काढला. त्यात त्यांनी म्हटले की, ''सर्व सार्वजनिक इमारती, सर्व धर्मशाळा, रेस्टहाऊस, सरकारी अन्नछत्रे इ. ठिकाणी तसेच नदीचे पाणी, सार्वजनिक विहिरी येथे कोणत्याही प्रकारचा भेदाभेद करु नये.''

हे सर्व करतांना महाराजांना जाणीव होती की ह्या निर्णयाविरुद्ध जनमत उसळेल. म्हणून महाराज जनतेला उद्देशून म्हणतात की, ''आतापर्यंत आपण मी घेतलेल्या निर्णयांना– चांगल्या कामाला मला साथ दिलेली आहे. आपले अस्पृश्यता निवारणाबाबत मन जागृत झालेले आहे. आपण ह्या सर्व समाज व मानव कल्याणाच्या मार्गात माझे बरोबरीचे साथीदार आहात''. महाराजांना खात्री होती, हे जे जाहीरनामे समाजातील दुष्ट रुढींना फेकून देण्यासाठी उचललेले योग्य पाऊल आहे.

शाहू महाराजांनी अस्पृश्यांना मानवाप्रमाणे वागवावे असे नेहमी निक्षून सांगितले. मानवाला मानवाप्रमाणे वागविले पाहिजे, तरच देशसेवा साध्य होईल आणि जे असे वागतील किंवा वागवतील त्यांनीच देशसेवा केली असे म्हणता येईल. अस्पृश्य समाजाने आपल्या मुक्ततेसाठी व प्रगतीसाठी आपल्याच जातीचा पुढारी निवडावा व तयार करावा. अस्पृश्य जातीचे पुढारीपण त्यांच्याच नेत्याने करावे. महाराज म्हणतात की ''जो दुसऱ्यावरी विश्वासला, त्याचा कार्यभार बुडाला! जो आपणच कष्टत गेला! तोच जाण भला!!''

महाराजांनी आपल्या संस्थानात तलाठ्याच्या जागांवर मागासलेल्या वर्गातील विशेषतः

अस्पृश्य वर्गातील लोकांची वर्णी लागावी म्हणून 'तलाठी वर्ग' सुरु करुन त्यात अस्पृश्य उमेदवारांना विशेष शिष्यवृत्त्या देऊन प्रशिक्षित केले. अशा प्रशिक्षित अस्पृश्यांना तलाठी म्हणून नेमले जावे यासाठी हुकूम काढल्यामुळे महार तलाठी महाराजांच्या प्रयत्नाने गावच्या पाटलाच्या मांडीला मांडी लावून बसू लागला. आणि ही एक सामाजिक क्रांती शाहू महाराजांनी केली.

शाहू महाराजांनी अस्पृश्य लोकांपैकी काही लोकांच्या मुलकी खात्यात तर काहींच्या पोलीस खात्यात पोलीस म्हणून नेमणुका केल्या. १९२० मध्ये शहरातील पोलीस गेटवर महार जातीतील १६ व्यक्तींची नेमणूक केली. हे करतांना महाराज म्हणतात की ''या स्पृश्य लोकांचा समाजा दर्जा वाढावा'' म्हणून आपण हे कार्य करीत आहोत.

शाहू महाराजांनी अस्पृश्यांत शिक्षणाचा प्रसार केला तरी फार शिकलेली माणसे मिळत नाहीत. म्हणून त्यांनी अस्पृश्यांना अनेक विभागात जसे सरकारी खात्यात शिकारी खात्यात, टपाल खात्यात, काहींना राजपरिवाराचे ड्रायव्हर, कोचमन म्हणून निवडून कामावर लावली. यातूनच त्यांनी इतरांबरोबर अस्पृश्य समाजाची प्रतिष्ठा वाढविली होती. असे अनेक सामाजिक प्रयोग महाराजांनी आपल्या कार्यकाळात आपल्या संस्थानात केलेत.

अशाप्रकारे अस्पृश्यांबद्दल खराखुरा कळवळा शाहू महाराजांना होता असे म्हणता येते. अस्पृश्योद्धाराचे कार्य अवर्णनीय आहे. शाहूंच्य ह्या सर्व अस्पृश्योद्धाच्या कार्यामुळे त्यांना मागासलेले व अस्पृश्यवर्गाने देवासमान मानले. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात की '' शाहू महाराजांसारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नव्हता व पुढे लाभेल की नाही हे सांगता येत नाही.'' यावरुन शाहू महाराजांच्या अस्पृश्यता निवारण (धोरण) कार्याची प्रचिती दिसून येते.

### ५.२.५ आरक्षण धोरण

इ.स. १८९४ मध्ये शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे आपल्या हाती घेतली. त्या काळात राज्याची कारभार यंत्रणा युरोपियन, पारशी व ब्राम्हण या तीन वर्गाच्या हाती होती. पैकी राज्यकारभार शाहूंकडे आल्यानंतर युरोपियन व पारशी यांना जावे लागले. परंतु राज्यकारभारात मुख्य भरणा हा ब्राम्हण अधिकाऱ्यांचा होता. शासकीय नोकऱ्यांमध्ये उच्चवर्गीय लोकांचे विशेषतः ब्राम्हणांचे वर्चस्व हेते. सामान्य जनतेला विशेषतः दलितांना शासकीय नोकऱ्यांमध्ये कोणतेही स्थान नव्हते. १८८१- ८२ च्या एका शैक्षणिक अहवालानुसार उच्च शिक्षण क्षेत्रात ब्राम्हणांचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षाही जास्त होते. परंतु शेतकरी व मागासवर्गीय जातींमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण एक टकक्यापेक्षाही कमी होते. अस्पृश्य आणि आदिवासी समाजातील लोकांचा प्राथमिक शिक्षणात प्रवेशही नव्हता. 'ब्राम्हणशाहीच्या मक्तेदारीला शह देण्यासाठी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात आरक्षणाचा निर्णय घेतला.

१९०२ मध्ये शाहू महाराज एडवर्ड बादशहाच्या शपथग्रहण समारंभात लंडनला गेले. युरोप दौऱ्यावर असतांनाच २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात अभूतपूर्व जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यानुसार संस्थानात रिकाम्या होणाऱ्या किंवा झालेल्या जागांपैकी ५०

टक्क्यापेक्षा कमी जागा असतील तेथे पुढची नेमणूक ही मागास वर्गीयांची करावी. मागासलेल्या वर्णाच्या म्हणजे ब्राम्हण, प्रभू, शेणवी, पारशी व पुढे गेलेल्या वर्ण सोडून सर्व वर्णाच्या जागा भराव्यात.

भारताच्या इतिहासात कोणत्याही राजाने प्रजेसाठी इतकी अप्रतिम भेट दिलेली नव्हती असे आरक्षण धोरण शाहूंनी जाहीर केले. शासकीय नोकऱ्यांमध्ये ५०% आरक्षण जाहीर केले.

तसेच १९१८ मध्ये गव्हर्नर जनरल चेम्सफोर्ड यांच्याकडे मागासवर्गीय व अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात यावेत म्हणून मागणी केली. शाहू महाराजांच्या प्रयत्नांना यश आले. मागासवर्गीयांनासुद्धा विधिमंडळात काही जागा राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आली.

मागासवर्गीयांसाठी आरक्षण धोरण जाहीर करणारे पहिले संस्थानिक म्हणजे शाहू महाराज होत. म्हणूनच शाहू महाराजांना 'आरक्षण धोरणाचे जनक' असे म्हटले जाते. महाराजांचे आरक्षण धोरण म्हणजे त्यांच्या ब्राम्हणेतर चळवळीचा एक महत्त्वाचा भाग होय. महाराजांच्या आरक्षण धोरणाला उच्चवर्गीय लोकांना खूप विरोध केला. ब्राम्हणवर्गाच्या रोषाला शाहू महाराजांना तोंड द्यावे लागले. परंतु शाहू महाराजांनी आपले समाजसुधारणेचे कार्य थांबविले नाही. महाराज म्हणतात ''दलितांच्या उद्धारासाठी मला माझे सिंहासन सोडावे लागले तरी चालेले'' अशी प्रतिज्ञा शाहू महाराजांनी केली होती. शाहू महाराजांच्या मते जातिव्यवस्था कायम राहिली तर स्वराज्याची सत्ता ही काही मूठभर उच्चवर्गीय लोकांच्या हातात जाण्याची शक्यता आहे. म्हणून निदान १० वर्षांपर्यंत तरी जातवार प्रतिनिधित्व असले पाहिजे. त्यामुळेच ब्राम्हणांच्या नोकरशाहीला शाहू महाराजांनी विरोध केला. आणि बहुजन समाजाच्या आरक्षणाचा आग्रह धरला होता.

शाहू महाराजांनी आरक्षण धोरणाचा भाग म्हणूनच सरकारी पागेत, शिकारी खात्यात, टपाल खात्यात काही जागा अस्पृश्यांच्या भरल्या.

अशाप्रकारे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी समाजात समानता निर्माण करण्यासाठी मागासवर्गीय समाजाला विविध क्षेत्रांत संधी देऊन जागृती निर्माण करण्यासाठी पहिले आरक्षण धोरण आपल्या संस्थानात राबवण्यास प्रथम सुरुवात केली.

## ५.२.६ वेदोक्तवाद/वेदोक्त प्रकरण (Vedikta controversy)

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यकाळातील 'वेदोक्त' प्रकरण ही एक अनन्यसाधारण घटना आहे. हे प्रकरण १८९९ मध्ये कोल्हापुरात उद्भवले. त्यानंतर त्याचे रूपांतर एका तीव्र सामाजिक संघर्षात झाले. सर्व महाराष्ट्र ह्या वेदोक्त प्रकरणाने ढवळून निघाला. सर्वप्रथम आपण वेदोक्त शब्दाचा अर्थ पाहू.

*** वेदोक्त म्हणजे काय?**

'वेदोक्त' या शब्दाचा शब्दाशः अर्थ वेदात सांगितल्याप्रमाणे असा होतो. परंतु हिंदू धर्मातील सोळा संस्कार व इतर धार्मिक कृत्ये वैदिक मंत्रांनी करण्याचा अधिकार म्हणजे वेदोक्त होय, असा समाजात अर्थ प्रचलित आहे.

वेदोक्ताचा अधिकार प्राचीन काळी ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांना होता. तथापि काळाच्या ओघात ब्राम्हणवर्गाने आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी क्षत्रिय व वैश्य या दोन्ही वर्णांचे 'संस्कार लोप' झाले असे सांगून त्यांना शूद्र वर्णात ढकलून दिले व जगात फक्त दोनच वर्ण आहेत, एक ब्राम्हण व दुसरा शूद्र असे जाहीर करून टाकले होते. परंतु शूद्रांची धार्मिक कार्ये चालली तरच आपली अर्थप्राप्ती होईल असे ब्राम्हणांना ठाऊक होते यासाठी त्यांनी 'शूद्रां' करिता 'पुराणोक्त' मत्रांची उपयोयोजना केली. वेदातील मंत्र प्रथम दर्जाचे ते ब्राम्हणांसाठी व शूद्रांसाठी दुय्यम दर्जाचे पुराणातील मंत्र.

ब्राम्हण श्रेष्ठ आहेत हा सिद्धांत ब्राम्हणांनीच निर्माण केला. ब्राम्हण हे पृथ्वीवरील देव आहेत असे मनूपासून ते समर्थ रामदासांपर्यंतच्या ब्राम्हणांनी शेखी मिरविली. अनेक ब्राम्हण धर्मविचारकांनी स्त्रीला शूद्र मानले होते. शूद्र मानलेल्या स्त्री - पुरुषांना वेदांचा अधिकार नाही म्हणून अशा शूद्रांनी पुराणात सांगितलेल्या मत्रांनुसार धार्मिक कृत्ये करावीत असा दंडक त्यांनी निर्माण केला.

*** पूर्वीचे वेदोक्ताचे प्रसंग -**

१८७४ या वर्षी रायगडावर शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकाला आक्षेप घेऊन मराठ्यांच्या क्षत्रियत्वालाच आव्हान दिले होते. परंतु महाराजांनी तेव्हाचे ब्राम्हणश्रेष्ठ गागाभट्टास बोलावून त्यांच्या तोंडून आपले क्षत्रियत्व जाहीर केले. तेव्हापासून ब्राम्हणांची तोंडे बंद झाली.

तद्नंतर साताऱ्यात १८३५ साली छत्रपती घराण्यांतील प्रतापसिंह छत्रपतींच्या काळात शंकराचार्यांनी खुद्द शिवछत्रपतींना, प्रतापसिंह छत्रपतींना शूद्र ठरविले होते. परंतु प्रतापसिंहानी निर्णयसभा घेऊन क्षत्रियांची बाजू मांडली व भोसले, घाटगे, पालकर, जाधव, शिर्के, मोहिते इ. मराठे क्षत्रिय आहेत, हे ब्राम्हणांकडून वदवून घेतले. त्यांना वेदोक्ताचा अधिकार आहे, हे मान्य केले.

तिसरे प्रकरण १८९६ साली बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या दरबारात ब्राम्हणांनी त्यांची धार्मिक कृत्ये 'वेदोक्त' पद्धतीने करावयास नकार दिला होता. तेव्हा सयाजीराव महाराजांनी गुजराथी व राजस्थानी ब्राम्हणांकडून राज्यातील धर्मकृत्ये वेदोक्त पद्धतीने सुय केली होती. अशा प्रकारे शाहू महारांजांच्या कालखंडातील व राज्यातील वेदोक्त प्रकरण हे पहिले प्रकरण नव्हते तर त्या आधीची ही पार्श्वभूमी दिसून येते. याचाच अर्थ ब्राम्हणवादी विचारसरणी राज्याच्या प्रमुखालाही शूद्र ठरवून टाकत असत आणि हेच प्रकरण कोल्हापुरातही घडले.

*** पंचगंगा नदीच्या तीरावर वेदोक्ताची ठिणगी पडली -**

ब्राम्हणवर्गाच्या मानसिकतेबाबत वरील घटना आपल्या लक्षात आल्याच असतील. याच मानसिकतेतून १८९९ मध्ये पंचगंगा नदीच्या काठी ऑक्टोबर महिन्यात वेदोक्ताची ठिणगी पडली. शाहू महाराज नेहमीप्रमाणे पंचगंगा नदीत अंघोळीसाठी गेले असता त्यांच्यासोबत मंत्र म्हणणारा नारायण भटजी, महाराजांचे मित्र पंडित राजाराम शास्त्री भागवतही होते. महाराजांचे स्नान चालू असताना भटजी मंत्र म्हणत होता परंतु भटजी स्नान न करताच

'वेदोक्त' मंत्राऐवजी 'पुराणोक्त' मंत्र म्हणत होता. हे राजारामशास्त्रींच्या लक्षात आले. शाहू वेदोक्त मंत्राचे अधिकारी असून हा भटजी मात्र पुराणोक्त मंत्र म्हणत आहे हे शास्त्रींनी महाराजांच्या लक्षात आणून दिले. तेव्हा शाहुंनी भटजींना याबाबत विचारले असता, भटजीने उत्तर दिले. ''शूद्राला पुराणोक्त मंत्र सांगावे लागतात.'' हे ऐकल्यावर महाराजांवर वीज कोसळावी असा आघात झाला. महाराज या घटनेविषयी चिंतन करु लागले व अखेरीस सामाजिक बंड करण्यास तयार झाले. ही घटना राजाच्या मनाला चांगलीच बोचली. तरीही महाराज शांत राहिले झालेल्या अपमानाबद्दल राजांची माफी तर मागीतली नाहीच उलट भटजीने व त्यांच्या ब्राम्हण नेत्यांनी राजे क्षत्रिय नाहीत हे सांगण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणाने मात्र कोल्हापुरातील मराठा लोकांमध्ये संतापाची लाट उसळली. यातच लोकमान्य टिळकांनीही हस्तक्षेप करुन शाहूंविरुद्ध असणाऱ्या ब्राम्हणांना उलट चिथावणी देऊन प्रकरण जास्त भडकवले. त्यातून ब्राम्हण आणि मराठे यांच्यातील प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण झाला. हे प्रकरण अधिक व्यापक बनले.

*** वेदोक्त प्रकरण भडकले –**

वेदोक्त प्रकरणाच्या ठिणगीने उग्र रूप धारण केले होते. शाहू महाराजांच्या दत्तक आई आनंदीबाईंच्या अंत्यसंस्काराच्या वेळी ब्राम्हणांनी वेदोक्त संस्कारास नकार दिला. नारायणशास्त्रींना ब्राम्हणवर्गाने धर्मबहिष्कृत केले. दरबारातील पुरोहित राजोपाध्ये यांनीही धर्मकृत्य वेदोक्त पद्धतीने करण्यास नकार दिला. यातून वेदोक्त प्रकरणाचा भडका उडाला. त्यातच करवीर पीठाचे शंकराचार्य ब्रम्हनाळकर यांनी छत्रपतींच्या विरोधात भूमिक घेतली व महाराजांच्या क्षत्रियतेला आव्हान दिले. याचा परिणाम महाराजांवर झाला. महाराजांनी राजोपध्येंचे इनाम जप्त केले. शंकराचार्यंच्या मठाचे ३०,००० उत्पन्न सरकारजमा केले. ब्राम्हणांची अनुदाने, इनामे जप्त केली. त्यात ५०% आरक्षण मागसवर्गीयासाठी महाराजांनी जाहीर केल्यामुळे ब्राम्हणवर्ग अधिकच संतप्त झाला. ब्राम्हणवर्गाने महाराजांवर टिकेचा भडीमार केला.

**वेदोक्ताचा शेवट :–**

वेदोक्त संघर्ष जवळपास सहा ते सात वर्षे चालू होता. आणि याचा शेवट मात्र १९०५ साली शाहू महाराजांच्या विजयाने व ब्राम्हणवर्गाच्या शरणागतीने झाला. राजोपाध्यांनी ब्रिटीश सत्तेकडे न्यायासाठी मागणी केली. अनेक अपिले केली. १९०५ मध्ये मात्र गव्हर्नरजनरल यांनी राजोपाध्यांची केस फेटाळून लावली. आणि वेदोक्त प्रकरणात महाराजांचा विजय ब्राम्हणांना मान्य करावा लागला. करवीर शंकराचार्य ब्राम्हनाळकर यांनी क्षमायाचना केली. कोल्हापुरातील ब्राम्हणांनीही शरणागती केली. महाराजांचे वेदाधिकार व क्षत्रियत्व जाहीर सभेत (डिसेंबर १९०५) मान्य केला. हा विजय देशातील सामाजिक इतिहासातील मोठा विजय होता असे म्हणता येईल.

*** वेदोक्त सामाजिक न्यायाचा लढा –**

वेदोक्त मत्रांनी आपला उद्धार होणार नाही याची जाणीव शाहूंना होती. परंतु हा वेदोक्त मंत्राचा प्रश्न नव्हता तर हा सामाजिक न्यायाचा प्रश्न होता. हिंदू धर्मातील क्षत्रियांचा मूलभूत हक्क म्हणून मराठ्यांना वेदोक्ताचा अधिकार पाहिजे होता. ब्राम्हणांनी क्षत्रियांना

शूद्रात टाकून ब्राम्हणांनी वर्णश्रेष्ठत्वाचा अहंकार स्पष्ट केला होता. ब्राम्हण इतर सर्वांना तुच्छ समजत व समाजाची सर्व मक्तेदारी आपलीच आहे अशी गर्वाची भावना त्यांच्यात होती. हा अंहकार नष्ट करून धर्मकारणातच नाहीतर समाजकारणातही ब्राम्हणांच्या बरोबरीने मराठ्यांना प्रतिष्ठा मिळणार होती. म्हणून हा संघर्ष हक्काचा, सामाजिक न्याय प्रस्थापनेचा होता. याची जाणीव महाराजांना होती.

*** वेदोक्त प्रकरणाची फलनिष्पत्ती –**

वेदोक्त प्रकरण म्हणजे ब्राम्हणेतर समाजातील न्यायासाठीचा लढा होता. 'वेदोक्त' हा शाहू महाराजांच्या जीवनातील महत्त्वाचा टप्पा होता हे लक्षात येते. शाहू महाराजांनी मराठ्यांच्या क्षत्रियत्वाचा वेदोक्त अधिकाराचा आग्रह धरला होता. त्यानंतर महाराजांनी वर्णश्रेष्ठत्व जाती भेद व अस्पृश्यता याविरुद्ध लढा दिला. ही शाहूंच्या जीवनातील पुढची पायरी होय. शाहू महाराजांचे सामाजिक जीवन हळूहळू विकसित होत गेले. वेदोक्त प्रकणातून महाराजांच्या जीवनाची कळी उमलू पाहात होती असे म्हणावे लागेल. शाहू महाराजांनी तत्कालीन समाजातील ब्राम्हणांच्या मक्तेदारीला आव्हान दिलेले दिसते व त्यात त्यांना यश मिळाले आणि त्यातून ब्राम्हणवर्गाचे अंतरंग समजून आले. तसेच ब्राम्हणांशी लढण्याचे तंत्रही अवगत झाले. वेदोक्तामुळेच सर्व हिंदूना वेदाचे अधिकार आर्य समाजाकडे आणि ब्राम्हणशाहीच्या मक्तेदारीविरुद्ध लढणाऱ्या सत्यशोधक समाजाकडे शाहू महाराज खेचले गेले व त्यांनी महात्मा फुलेनंतर सत्यशोधक समाजाची धुरा सांभाळली ही 'वेदोक्त' प्रकरणाची सर्वात मोठी फलनिष्पत्ती मानावयास पाहीजे.

## ५.३ स्वयंअध्ययन प्रश्न/उपक्रम

**अ) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ कोणास म्हटले जाते?

..................................................................................

..................................................................................

..................................................................................

२) शाहू महाराजांना ''सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ'' असा गौरव कोणी केला?

..................................................................................

..................................................................................

..................................................................................

३) शाहू महाराजांचा जन्म कधी व कोठे झाला?

..................................................................................

..................................................................................

..........................................................................................

४) आरक्षण धोरण शाहूंनी कधी जाहीर केले?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

५) वेदोक्त शब्दाचा अर्थ सांगा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**ब) टिपा लिहा.**

१) वेठबिगार पद्धतीचे निमूर्लन

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२) आरक्षण धोरण

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३) ब्राम्हणेतर चळवळ.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**क) दिर्घोत्तरी प्रश्न**

१) शाहू महाराज सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ स्पष्ट करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२) छत्रपती शाहूंचे अस्पृश्यता निवारण कार्य विशद करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३) शाहूंया काळातील वेदोक्त प्रकरण याबाबत चर्चा करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

## ५.४ सारांश

या प्रकरणात राजा छत्रपती शाहू महाराजांच्या महान कार्यकर्तृत्वाचा अभ्यास आपणास करता येतो. राजर्षी छपत्रती शाहू हे जरी कोल्हापूर संस्थानाचे राजे असले तरी एक लोकशाहीवादी राजा या देशाने पाहिला.

या प्रकरणात आपण राजा छत्रपती शाहू महाराजांचे जीवनचरित्र अभ्यासले. शाहू महाराज हे सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ होते. एक लोककल्याणकारी राजा; बहुजन समाजाच्या कल्याणाचा वसा त्यांनी घेतला होता. शाहूंनी अस्पृश्यांच्या उद्धाराचे कार्य केले. तसेच बहुजन समाजाच्या शिक्षणाला त्यांनी प्रोत्साहन दिले. सामाजिक समता व न्यायाचा पुरस्कार केला.

सर्व जातीच्या व धर्माच्या मुलांसाठी वसतिगृह चळवळ त्यांनी सुरु केली. तसेच मागासवर्गीयांसाठी आरक्षण धोरणाचा पुरस्कार केला. आपल्या राज्य शासन कार्यकाळात शेती व उद्योगधंद्यांच्या विकासाला चालना दिली.

शाहू महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून ब्राम्हणेतर चळवळ सुरु केली. ब्राम्हण नोकरशाहीचा त्यांनी विरोध केला. ब्राम्हणेतर चळवळीचे फलित म्हणजे ब्राम्हणेतरांना कायदेमंडळात राखीव जागा ठेवाव्या लागल्या व ब्राम्हणेतर मंडळी कायदेमंडळात गेली.

शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारण मोहीम राबवून अस्पृश्यता, जातिभेद या अनिष्ट, सामाजिक रूढींविरुद्ध संघर्ष केला. अस्पृश्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी कोल्हापुरात विशेष आदेश काढले. अस्पृश्य मुलांसाठी वेदांची संथा दिली. गुन्हेगार जातीच्या लोकांना विनाकारण द्यावी लागणारी हजेरी पद्धत बंद केली. जे खरोखर गुन्हेगार आहेत त्यांनाच हजेरी असावी. निर्दोष लोकांना या हजेरी पद्धतीतून वगळले. महार वतने खालसा केली. अस्पृश्यता निवारण्यासाठी विशेष जाहीरनामे काढली. वेठबिगार पद्धतीचे निर्मूलन केले.

२६ जुलै १९०२ रोजी आरक्षण धोरणाचा महाराजांनी कोल्हापूर संस्थानात जाहीरनामा काढला म्हणून शाहू महाराजांना आरक्षण धोरणाचे जनक म्हटले जाते. वेदोक्त प्रकरणातून ब्राम्हणशाहीला आव्हान देऊन ब्राम्हणेत्तर समाजात सामाजिक प्रतिष्ठा व सामाजिक न्याय दिला व एक कर्ता समाजसुधारक लोकशाहीचा खरा आधारस्तंभ म्हणून शाहू महाराजांचे कार्य अतुलनिय होते. संपूर्ण देशाला दिशा देण्याचे कार्य राजर्षी छत्रपती शाहूंनी आपल्या कार्यातून केले.

## ५.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- ✻ सर्वसमावेशकता – सर्व घटकांना सामावून घेणारी प्रक्रिया.
- ✻ आरक्षण – समाजातील वंचित घटकांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी राखीव जागा ठेवणे.
- ✻ ब्राम्हणेतर – ब्राम्हणसोडून इतर वर्गाचे लोक
- ✻ वेदोक्त – वेदात सांगितल्याप्रमाणे
- ✻ वेठबिगार – कनिष्ठ जातीतील लोकांकडून अल्पमोबदल्यात किंवा विनामोबदला काम करून घेण्याची पद्धत

## ५.६ संदर्भसूची

१. पवार जयसिंगराव (२०१२) राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य : कोल्हापूरः महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, प्रथमावृत्ती.

२. मोरे गिरीश (२००९) राजर्षी शाहू विचार व कार्य : कोल्हापूर : निर्मिती विचारमंच

३. देवळे शं. रा. (१९८९) राजर्षी शाहू महाराज : नागपूर : कौस्तुभ प्रकाशन

४. देशमुख मा. म. (१९९०) राष्ट्रनिर्मिते : नागपूर : शिवभारती प्रकाशन.

५. पवार जयसिंगराव (१९८६) मराठी साम्राज्याचा उदय आणि अस्त : कोल्हापूर

६. कीर धनंजय (१९९२-९३) राजर्षी शाहू छत्रपती : मुंबई : पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि., दुसरी आवृत्ती.

७. जाधव रमेश : (१९९२) राजर्षी शाहू छत्रपतीः वाद आणि वास्तव : कोल्हापूर

८. पवार जयसिंगराव (२००१) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ : कोल्हापूरः प्रथमावृत्ती.

९. कडवे रघुनाथ लोकांचा राजा छत्रपती शाहू महाराज : वर्धाः प्रकाशन शशी गवळी.

१०. भोसले एस. एस. (१९९१) क्रांतिसुक्ते : राजर्षी छत्रपती शाहू : मुंबईः महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, सुधारित आवृत्ती

# घटक क्र. ६

# डॉ. बी. आर. आंबेडकर

# (भीमराव रामजी आंबेडकर)

**अनुक्रमणिका**


६.0 उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ मुख्य मुद्दा/विषय विवेचनः

६.२.१ प्रस्तावना व जीवन परिचय

६.२.२ आंबेडकर पुरस्कृत सामाजिक न्याय संकल्पना.

६.२.३ जातिव्यवस्थेविषयी विचार

६.२.४ धर्माविषयी विचार आणि हिंदू धर्म व बौद्ध धर्म (बुद्ध धर्म) समीक्षा

६.२.५ भारतीय राज्यघटना आणि सामाजिक सुधारणा

६.३ स्वयंअध्ययन प्रश्न

६.४ सारांश

६.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

६.६ संदर्भसूची


## ६.0 उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो, या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हाला

* डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन परिचय करून घेता येईल.
* डॉ. आंबेडकरांचे सामाजिक न्यायाबाबतचे विचार व कार्य समजून घेता येईल.
* डॉ. आंबेडकरांचे जाती विषयक विचार जाणून घेता येतील.
* डॉ. आंबेडकरांचे धर्माविषयी भूमिका लक्षात येईल. तसेच हिंदू धर्म आणि बौद्ध धर्म याबाबत समिक्षा किंवा टीकात्मक परीक्षण लक्षात येईल.

* डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना व सामाजिक सुधारणांबाबत विचार जाणून घेता येतील.

## ६.१– प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन पूर्णपणे अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी व कल्याणासाठी वाहिलेले दिसते. आंबेडकरांच्या काळात देशातील समाजात अस्पृश्यता, विषमता व अंधश्रद्धा यासारख्या अनिष्ठ प्रथा प्रचलित होत्या. या प्रथा मोडीत काढल्याशिवाय समाजपरिवर्तन होणार नाही याची जाणीव डॉ. आंबेडकर व त्या काळातील थोर समाजसुधारकांना होती.

समाजातील विषयता अतिउच्च टोकाला पोहोचली होती. पारंपरिक समाज जीवन हे शोषित स्वरुपाचे होचे. हे समाजजीवन बदलून टाकणे आणि शोषण विरहित न्यायी समाज निर्माण करणे हे एक आव्हान होते. हे आव्हान तत्कालीन समाजसुधारकांनी स्वीकारले व संपूर्ण भारतभर बदलाचे वारे वाहू लागलेत. यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका महत्त्वाची होती. अस्पृश्य समाजात नवसंजीवनी निर्माण करण्याचे काम या महामानवाने केले. अस्पृश्यता निवारण, स्त्रीशिक्षण, शेतकरी, कामगार यांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्यघटनेचा मोठा आधार घेऊन समतानिष्ठ समाज निर्माण करण्यात आंबेडकरांचा मोठा वाटा होता. अशा महान समाजसुधकाराचे व्यक्तिमत्त्व जाणून घेण्यासाठी त्यांचा परिचय जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

**जीवन परिचय –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ साली मध्य प्रदेशातील महू या गावी झाला. आंबेडकरांचे घराणे तसे मूळ रत्नागिरी जिल्ह्यातले होते. त्यांचे पूर्ण नाव भीमराव रामजी आंबेडकर असे होते. त्यांचे वडील बडोदा संस्थानच्या लष्करात सुभेदार होते. शिक्षणाची परंपरा आंबेडकरांच्या घरात होती. आपल्या मुलाने खूप शिकावे. शिकून खूप मोठे व्हावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली या गावात प्राथमिक शिक्षण व साताराच्या सरकारी शाळेत त्यांचे माध्यमिक शिक्षण पार पडले १९०७ मध्ये ते मॅट्रिक परीक्षा पास झालेत. १९०७ मध्येच त्यांचा विवाह रमाबाई वालंकर यांच्या सोबत झाला. तेव्हा बाबासाहेबांचे वय १७ व रमाबाईंचे वय ९ वर्षाचे होते. १९१३ साली ते बी. ए. ची परीक्षा पास झाले. त्यानंतर पुढच्या शिक्षणासाठी ते अमेरिकेला रवाना झाले. त्यांच्या शिक्षणासाठी बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांनी मदत केली. अमेरिकेहून बडोद्याला परत आल्यावर लष्करी सचिव पदावर कार्य करू लागले. १९१६ मध्ये आंबेडकरांना पीएच.डी. पदवी मिळाली. ११ नोव्हेंबर १९१८ मध्ये मुंबई येथे सिडेन हॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली.

३१ जानेवारी १९२० मध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या मदतीने 'मूकनायक' पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित केला. तसेच नंतर त्यांनी 'बहिष्कृत भारत' या नावाचे साप्ताहिक चालविले. नंतर पुन्हा एम. एस्सी (इकॉनॉमिक्स) ही पदवी मिळाली. १९२३ मध्ये डी.

एस्सी. ही सर्वश्रेष्ठ पदवी प्रदान केली.

शैक्षणिक यश मिळवित असतांना त्यांनी सामाजिक कार्य करण्यास सुरुवात केली.

- २० जुलै १९२४ ‘बहिष्कृत हितकारिणी सभे’ची स्थापना केली.
- ४ सप्टें. १९२७ ‘समाज समता संघाची स्थापना’ केली.
- २७ मे १९३५ –पत्नी रमाबाई यांचे निधन झाले.
- २ जून १९३५ – ‘मुंबई विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावर नियुक्ती झाली.
- १५ ऑगस्ट १९३६ – ‘स्वंतत्र मजूर पक्षाची स्थापना केली.
- १७ फेब्रु. १९३७ – मुंबई असेंब्ली निवडणुकीत डॉ. बाबासाहेब विजयी झाले.
- १९४३ मध्ये मजूरमंत्री म्हणून निवड झाली.
- २० जून १९४६ मध्ये सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना त्यांनी केली.
- १९४७ ऑगस्ट मध्ये स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाला.
- २९ ऑगस्ट १९४७ मध्ये संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदावर आंबेडकरांची निवड झाली.
- १९ जून १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालायची स्थापना केली.
- ५ जून १९५२ मध्ये कोलंबिया विद्यापीठातर्फे  डॉ. ऑफ लॉज’ पदवी त्यांना अर्पण करण्यात आली.
- १२ जाने. १९५३ मध्ये हैद्राबाद उस्मानिया विद्यापीठातर्फे ‘डॉक्टर ऑफ लिटरेचर’ (डी. लिट) पदवी त्यांना दिली.
- १४ ऑक्टो. १९५६ नागपूर येथे पत्नीसोबत धम्म दीक्षा घेतली. पाच लाख अस्पृश्य बांधवांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली.
- १६ ऑक्टो. १९५६ – चंद्रपूर येथे दोन लाख अस्पृश्य बंधुनां धम्म दीक्षा दिली.
- ६ डिसें. १९५६– दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी महापरिनिर्वाण झाले.
- ७ डिसें. १९५६ – मुंबई येथे दादर चौपाटी किनाऱ्यावर दहा लाख लोकांच्या साक्षीने बौद्ध पद्धतीनुसार अंतिम संस्कार झालेत.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रंथ लेख व महत्त्वाचे भाषण –**

- १९१६ मध्ये ‘कास्ट इन इंडिया देअर मॅकेनिझम जेनिसीस अॅन्ड डेव्हलपमेंट’ या निबंधाचे वाचन
- १९२० मध्ये ‘मूकनायक’ साप्ताहिक सुरु केले.
- २४ नोव्हे. १९३० – ‘जनता’ साप्ताहिकाचा आरंभ केला.
- १९४० –  मध्ये ‘थॉट्स ऑफ पाकिस्तान’ ग्रंथाचे प्रकाशन
- जून १९४५ – काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्याप्रती काय केले? ग्रंथ प्रकाशित झाला.

- १९४६ – मध्ये प्रसिद्ध ग्रंथ 'शूद्र पूर्वी कोण होते?' प्रकाशित झाला.
- ऑक्टोबर १९४८ – 'दि अनटचेबल्स' ग्रंथ प्रकाशित झाला.
- मे १९५० – मध्ये 'बुद्ध आणि त्यांच्या धम्माचे भवितव्य' हा लेख प्रसिद्ध झाला.
- सप्टेंबर १९५१ – 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' हा लेख महाबोधी मासिकात प्रकाशित झाला.
- ३ ऑक्टो १९५४ – आकाशवाणीवर 'माझे वैयक्तिक तत्त्वज्ञान' या विषयावर भाषण प्रसारित झाले.
- २४ मे १९५६ – नरेपार्क येथे 'ऑक्टोबर महिन्यात मी बौद्ध धम्मात दीक्षा घेईन' अशी घोषणा केली.

अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी विविध तत्कालीन सामाजिक, आर्थिक मुद्द्यांवर विविध ग्रंथांच्या माध्यमातून, लेखातून, भाषणातून विचार व्यक्त केले. व सर्वसामान्य जनतेला जागृत केले. नव्हे सरकारला देखील विचार करण्यास प्रवृत्त केले.

## ६.२.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर –सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते

(As a Advocate of Social Justice) विद्यार्थी मित्र हो, डॉ. आंबेडकर हे सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते होते. बहुजन समाजाला सामाजिक न्याय प्राप्त करून देण्यासाठी बाबासाहेब आयुष्यभर धडपडत राहिले. नेहमी त्यांनी समाजहिताचाच विचार केला व कार्य केले. आंबेडकरांनी तत्त्कालीन समाजव्यवस्थेतील वर्णव्यवस्था ही अन्यायकारक व कुचकामी आहे. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी आंदोलन उभारले तसेच राजकारणात अस्पृश्यांना सहभाग घेता यावा म्हणून स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. विविध वृत्तपत्रांच्या माध्यमातून आंबेडकरांनी अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडून समाजाला जागृत केले. त्यासाठी त्यांनी विविध संस्था स्थापन केल्या बौद्ध धर्म स्वीकारुन दलित बांधवांचा उद्धार करण्याचा प्रयत्न केला. धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण व्हावे यासाठी धर्मनिरपेक्ष राज्यघटनेची निर्मिती केली. शिक्षणाशिवाय माणूस अपूर्ण असतो, म्हणून शिक्षणाची गंगा तळागाळापर्यंत पोहचावी म्हणून शिक्षणाचे महत्त्व त्यांनी पटविले. स्त्रियांच्या उन्नतीकडेही बाबासाहेबांनी जाणीवपूर्वक लक्ष दिले. भूमिहीन, मजूर, लहान शेतकरी यांची होणारी पिळवणूक थांबावी यासाठी लढा दिला.

बहुजन समाजाला न्याय मिळावा म्हणून बाबासाहेबांनी अनेक सामाजिक सुधारणा केल्या. त्या खालीलप्रमाणे सांगता येतील.

### १) अस्पृश्यता नाहीशी करण्यासाठी जनआंदोलन उभारले –

जातिव्यवस्थेमुळे हजारो वर्षापासून अस्पृश्य समाज गुलामगिरीत जीवन जगत होता. अत्यंत हलाखीचे जीवन त्यांच्या वाट्याला आलेले होते. पशुतुल्य वागणूक अस्पृश्यांना मिळत होती. अस्पृश्यांना या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी प्रथम त्यांना संघटित करणे गरजेचे मानले. त्यांना शिक्षण दिले पाहिजे यासाठी बाबासाहेबांनी सतत प्रयत्न सुरु ठेवले. २५ सप्टेंबर १९२७ रोजी बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली हिंदू धर्मातील सामाजिक विषमता, अन्याय, क्रूरपणा यांचे प्रतीक असलेली 'मनुस्मृती' समारंभपूर्वक

जाळण्यात आली. १९२७ मध्येच बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी मिळविण्यासाठी सत्याग्रह केला. आणि महाड येथील च व दा र पाण्याचे तळे अस्पृश्यांना मुक्त करुन दिले. त्यांनी लोकांना निक्षून सांगितले की, हे पाणी मिळविणे तुमचा नागरी आणि मानवी हक्क आहे.

१९३० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जरी स्वतः ते हिंदू देव मानत नव्हते तरी त्यांनी नाशिक येथील काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह केला. तेव्हा देवाची प्रार्थना करणे हा त्यांचा हक्क आहे असे आवाहन केले. जर मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळाला तर त्यातून अस्पृश्यतेचा प्रश्न सुटण्यास हातभार लागेल असे बाबासाहेबांना वाटत होते. आणि १९३५ मध्ये काळाराम मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करण्यात आले.

आंबेडकरांनी कधीही रक्तरंजित क्रांतीचा पुरस्कार केला नाही. ते लोकजागृतीचा मार्गाने जनतेचा पाठिंबा मिळवून व कायद्यात सुधारणा करून घडून येणाऱ्या क्रांतीचे नायक होते.

### २) मतदानाचा हक्क –

बाबासाहेब लोकशाहीच्या लढ्यात मतदानाचा हक्क खूप महत्त्वाचा असतो असे मानणारे होते. म्हणून आंबेडकरांनी ब्रिटिश सरकाराला दलितांची परिस्थिती पटवून सांगितली. परिणामी लंडनच्या गोलमेज परिषदेत दलितांना 'दुहेरी' मतदानाचा हक्क मंजूर करुन घेतला. ह्या कायद्यामुळे अस्पृश्य समाजाला त्याच्या बरोबर सर्वसामान्य इतर गटाचा नेता किंवा प्रतिनिधी निवडून देणे शक्य झाले. यामुळे शतकानुशतके स्वतःच्या विकासाच्या सर्व संधी नाकारल्या गेलेल्या समाजाच्या दृष्टीने ही गोष्ट फार मोठी होती.

### ३) राजकारणात अस्पृश्यांचे नेतृत्व –

आंबेडकरांनी 'दुहेरी' मतदानाचा हक्क अस्पृश्यांना मिळवून दिला. तसेच याच काळात दलितांना स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करुन देण्यात आला. १९२६ ते १९३६ या कालखंडात कायदेमंडळाचे सदस्य असतांना 'अस्पृश्य शेतकरी व कामगारांच्या कल्याणासाठी अनेक सुधारणा बिले यांनी कायदेमंडळात आणली. १९३१ मध्ये दुसऱ्या गोलमेज परिषदेत अस्पृश्य समाजाचे नेतृत्व त्यांनी केले. अस्पृश्य लोकांना राजकीय हक्क मिळावेत म्हणून त्यांनी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मान्य करुन घेतली. या 'कम्युनल अवॉर्ड'मुळे एकाच वेळी शीख, मुस्लीम, आणि ख्रिश्चन यांना देखील स्वतंत्र मतदार संघ मिळावेत. १९३२ च्या जातीय निवाड्यात बाबासाहेबांची स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मान्य झाली. परंतु जाती व धर्माच्या आधारावर अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ नसावेत यासाठी महात्मा गांधींनी उपोषण केल्यामुळे बाबासाहेबांनी ही मागणी सोडून दिली होती.

### ४) वृत्तपत्रे, नियतकालिके आणि पुस्तकातून अन्यायाला वाचा फोडली –

डॉ. आंबेडकरांनी समाजमन जागृत करण्यासाठी काही नियतकालिके सुरु केली. १९२० मध्ये त्यांनी मुंबई येथे 'मूकनायक' हे साप्ताहिक सुरु केले. १९३० मध्ये 'जनता'

साप्ताहिक सुरु केले. १९५१ मध्ये हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' हा लेख मासिकात प्रकाशित झाला. 'समता', बहिष्कृत भारत' अशी वृत्तपत्रे काढून अस्पृश्यांवरील अत्याचार व अन्यायाला वाचा फोडण्याच कार्य त्यांनी केले. फक्त वृत्तपत्रांमधून किंवा साप्ताहिकांमधून विचार मांडलेत असे नाही तर १९४६ मध्ये 'शूद्र पूर्वी कोण होते?' १९४८ मध्ये 'दी अनटचेबल्स', १९५० मध्ये 'बुद्ध आणि त्यांच्या धम्माचे भवितव्य', 'बुद्ध आणि त्यांचा धर्म' असे ग्रंथ लिहून समाजात सामाजिक न्याय व समता प्रस्थापित होणेसाठी आग्रह धरला.

### ५) स्त्रियांचा मुक्तिदाता –

भारतीय समाजात महिलांना समानता,प्रतिष्ठा व सन्मान मिळवून देण्यासाठी आंबेडकरांनी लढा दिला. स्त्रियांना समाजात योग्य स्थान मिळाले पाहिजे, त्याच्या स्वातंत्र्य, समानतेच्या हक्काचे संरक्षण कायद्याच्या माध्यमातून व्हावे, स्त्रियांना त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा हक्क नव्हता, तो मिळाला पाहिजे, यासाठी 'हिंदू कोड बिल' याच्या माध्यमातून स्त्रियांना समाजरचनेच्या अन्यायकारी, पक्षपाती व विषमतेच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी पुढाकार आंबेडकरांनी घेतला.

### ६) अस्पृश्य – स्त्री–पुरुषांना शिक्षणासाठी प्रयत्न –

शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये डोळसपणा येतो. शिक्षणाशिवाय माणूस अपूर्ण असतो. शिक्षणाशिवाय आपल्या हक्कांची अधिकाराची जाणीव माणसाला होत नाही. शिक्षणाच्या अभावामुळे माणूस डोळे असून आंधळा, कान असून बहिरा, आणि तोंड असून मुका असतो अशी त्यांची अवस्था असते. म्हणून आंबेडकरांनी आपल्या सार्वजनिक जीवनाच्या सुरुवातीपासूनच अस्पृश्य व दलित समाजातील स्त्री– पुरुषांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यासाठी त्यांनी मुंबई व औरंगाबाद येथे महाविद्यालये स्थापन केली. शिक्षणामुळे कनिष्ठ वर्गातील लोकांची प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागले, तो न्यूनगंड नाहीसा करणे, स्वतःच्या आणि देशाच्या दृष्टीने काय महत्त्व आहे याबाबत जाणीव करुन देण्यासाठी शिक्षण हेच चांगले उत्तम साधन आहे असे विचार आंबेडकरांचे होते. म्हणून त्यांनी 'भारतीय बहिष्कृत शिक्षण प्रसारक मंडळाची' स्थापना केली होती. त्यांच्या सूचनेनुसार प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची स्थापना केली. सक्तीचे व मोफत शिक्षणाबाबत त्यांनी विचार मांडलेत.

### ७) धर्मनिरपेक्ष राज्यघटनेची निर्मिती –

स्वातंत्र्यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी भारताला नवी घटना मिळाली. पंडित नेहरू पंतप्रधान असताना डॉ. आंबेडकर त्यांच्या मंत्रिमंडळात कायदामंत्री होते. तेव्हा राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून आंबेडकरांची निवड झाली. त्यांनी आपल्या देशासाठी धर्मनिरपेक्ष राज्यघटनेची निर्मिती केली. 'धर्म हा माणसासाठी आहे, माणूस धर्मासाठी नाही' हे मानून आंबेडकरांनी धर्मनिरपेक्ष राज्यघटना निर्माण केली त्यात सर्व धर्माच्या, जातीच्या लोकांना त्यांचे हक्क–अधिकार मिळाले पाहिजेत म्हणून

राज्यघटनेत स्वातंत्र्य, समता, बंधुभाव तत्त्वांचा समावेश करुन सामाजिक न्यायाचे राज्य निर्माण करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खरोखरच महामानव म्हटले जातात.

### ८) बौद्ध धर्माचा स्वीकार केला –

आंबेडकरांच्या मते धर्म हा 'सामाजिक वारसा' असतो. धर्म प्रत्येकाला हवा परंतु धर्माच्या नावावर चाललेला ढोंगीपणा नको. मानवी कार्याची प्रेरणा हेच धर्माचे स्वरुप असते. परंतु धर्मामुळे व्यक्तींमध्ये भेद किंवा पक्षपात झाल्यामुळे कोट्यावधी दलित बांधवांना त्यांच्या मूलभूत हक्कापासून वंचित राहावे लागले.

जातिभेद व विषमतेवर आधारित हिंदू धर्मात आपल्या दलित समाज बांधवांचा उद्धार होणार नाही, हे बाबासाहेब आंबेडकरांनी  ओळखले होते. म्हणून त्यांनी प्रथम १४ ऑक्टो. १९५६ मध्ये आपल्या पाच लाख बांधवांसह तसेच १६ ऑक्टोबर १९५६ मध्ये चंद्रपूर येथे दोन लाख बांधवांसह हिंदू धर्माचा त्याग केला. हिंदू व ईस्लाम धर्माप्रमाणे सामाजिक विषमता बौद्ध धर्मात नाही. तसेच बौद्ध धर्मात जातिभेदाला स्थान नाही. त्यामुळे आपण बौद्ध धर्म स्वीकारला. बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे आपल्या दलित बांधवांना न्याय मिळेल. सामाजिक समतेचा पुरस्कार करणारा बौद्ध धर्म स्वीकारुन दलित बांधवांचा पुनर्जन्म झाल्याचे त्यांनी घोषित केले.

### ९) सामाजिक समतेचा पुरस्कार –

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समतेचा लढा सतत सुरु ठेवला, जो महात्मा फुलेंनी सुरु केला होता. भारत स्वतंत्र झाला परंतु सामाजिक समता निर्माण करण्यासाठी स्वातंत्र्य लढ्याच्या समांतर लढाई आंबेडकरांनी सुरु केली. आंबेडकरांना राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक स्वातंत्र्य, सामाजिक सुधारणा अधिक महत्त्वाच्या वाटत होत्या. केवळ दलित समाजालाच नाहीतर इतर मागासवर्गीय समाजातील लोकांना व स्त्रियांना समानतेची वागणूक मिळावी म्हणून त्यांनी प्रयत्न केले, स्त्रीमुक्ती चळवळीला त्यांनी प्रोत्साहन दिले. हिंदू समाजातील स्त्रियांना सामाजिक प्रतिष्ठा मिळावी, स्त्रियांना संपत्तीत हक्क, घटस्फोट इत्यादीबाबत स्वातंत्र्य मिळावे म्हणून त्यांनी 'हिंदू कोड बिल' संसदेत मांडले आणि ते मंजूर झाले नाही म्हणून त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामाही दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण आयुष्यभर दलितोद्धारासाठी, सामाजिक न्यायासाठी लढा दिला. आणि त्यांनी ज्या सामाजिक सुधारणा करण्यासाठी जे प्रयत्न केले, समाजमन ढवळून काढले, व्यक्तिस्वातंत्र्य व समाजवाद यांची सांगड घालतांना दुर्बल घटकांकडे विशेष लक्ष दिले. दारिद्र्य, बेरोजगारी, दुष्काळ, उपासमार यापासून जनतेला मुक्ती देणारे विचार मांडले. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्यायासाठी व त्यांनी केलेल्या सामाजिक सुधारणा यामुळे त्यांना १९९१ मध्ये 'भारतरत्न' हा पुरस्कार देण्यात आला.

अशाप्रकारे आपणास वरील मुद्द्यांच्या आधारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक न्यायाविषयी भूमिका समजून घेण्यास मदत होते.

## ६.२.३ डॉ. आंबेडकरांचे जातिव्यवस्थेविषयी विचार –

(Dr. Ambedkar's Thoughts on caste system)

डॉ. आंबेडकारांनी भारतीय समाजात महत्त्वाची समस्या म्हणजे जातिभेद मानणे होय आणि अनेक समस्यांपैकी ही एक गंभीर समस्या आहे, असे म्हटले. जातिभेद ही समस्या म्हणजे अमानवीय स्वरुप असलेला प्रश्न आहे.

वर्णव्यवस्थेतून जातिव्यवस्था निर्माण झालेली दिसून येते. या वर्णव्यवस्थेमुळे हिंदू समाजाचे पराकोटीचे नुकसान झालेले आहे, असे आंबेडकर मानतात. या वर्णभेदाची तीव्रता एवढी भावनात्मक होती की कनिष्ठ वर्गातील लोकांना नीट जगताही येत नव्हते. वरिष्ठ जातीतील लोक कनिष्ठ जातीतील लोकांचा पराकोटीचा छळ करीत असत. अशी अमानवीय परिस्थिती जातिभेदामुळे समाजात निर्माण झालेली होती. भारतीय समाजव्यवस्थेतील जातिभेदाबाबत आंबेडकरांनी भरपूर लिखाण केले. आपल्या भाषणांमधून जातिव्यवस्थेवर प्रखर टीकाही केली. डॉ. आंबेडकरांचे मते 'जात म्हणजे हा आंतरर्विवाह समूह असतो' 'जातीचा उगम म्हणजे जातीबाहेरील विवाहाला बंदी घालणाऱ्या यंत्रणेचा उगम होय' असे आंबेडकर जातीचे स्पष्टीकरण करतांना म्हणतात.

जातिव्यवस्थेविषयीचे आंबेडकरांचे विचार अधिक स्पष्ट होण्यासाठी खालील मुद्द्यांच्या आधारे आपणास रीतसर मांडता येते.

### १) जातिव्यवस्था अमानवीय –

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते जातिव्यवस्था ही अतिशय अमाननिय आहे व अस्पृश्यांच्या प्रगतीमधील मोठा अडथळा बनली आहे. माणसाचा माणसाला स्पर्श झाला म्हणजे तो भ्रष्ट होतो ही कल्पना जातीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. हिंदू धर्मात अस्पृश्यांना पशूपेक्षाही वाईट वागणूक दिली जाते. दगडाच्या देवालाही अस्पृश्य लोकांचा स्पर्श करु दिला जात नव्हता. अशी अयोग्य वागणूक माणसाला जातिव्यस्थेत मिळत होती. आणि ही दुरावाची भावना प्रत्येक जातीच्या व्यक्तीच्या मनातून जात नाही. म्हणून आंबेडकर म्हणतात. 'जी मनातून जात नाही ती जात होय.'

### २) जातिव्यवस्थेला वर्णाचा व धर्माचा आधार –

आंबेडकरांच्या मते हिंदू समाजात जात ही अत्यंत आवश्यक बाब मानली गेली. जातीच्या धर्माची विशेष अशी जाणीव असते. त्यामुळे ही जातीची कल्पना व्यक्तीच्या मनात रुजलेली असते. वर्णव्यवस्थेमुळे माणसामाणसात भेद अधिक होत गेलेत आणि वर्णव्यवस्थेतूनच पुढे जातिव्यवस्था रुपात आली. आंबेडकरांच्या मते वर्णव्यवस्था जातिव्यवस्था हा भारतीय समाजाचा आधार आहे. प्राचीन धर्मग्रंथांत जसे मनुस्मृतीमुळे सामाजिक न्याय व हक्क नष्ट करण्यात आले. हिंदू हे जातिभेद पाळतात ते बुद्धिहीन आहेत म्हणून नाही, तर ते अतिशय धर्मपरायण असल्यामुळे जातिभेद पाळतात. जातिभेद हा धार्मिक भावनांमुळे निर्माण झालेला आहे आणि या धार्मिक भावनांना शास्त्रांचा आधार आहे. म्हणून जातिभेद नष्ट करावयाचा असल्यास प्रथम वेद व शास्त्रांना सुरुंग लावला पाहिजे. स्मृती, श्रृती, धर्माचा प्रथम नाश केला पाहिजे. हिंदूची पवित्र व

प्रमाण समजली गेलेली सर्व पुराणे, वेद इत्यादी सर्व धर्मग्रंथ कायद्याने बंद करायला पाहिजेत. त्यातील नियम पाळणाऱ्या व्यक्तीला शिक्षा केली पाहिजे. ज्याला हिंदू लोक धर्म मानतात, तो धर्म नसून हे करा व ते करु नका अशा आज्ञा व बंधन यांचे मिश्रण आहे, असे आंबेडकर सांगतात. त्यामुळे इतर समाजावर म्हणजे विशेष करुन शूद्रांवर अन्याय झाला आहे. म्हणून डॉ. आंबेडकरांनी सन १९२७ मध्ये मनुस्मृतीचे दहन केले होते.

### ३) जात हा व्यक्तीचा दर्जा ठरविणारा निकष –

आंबेडकर असे म्हणतात की, जातिव्यवस्था श्रमविभागणी करते. नुसतीच श्रमविभागणी करीत नाही. तर श्रमिकांचीही विभागणी जातिव्यवस्थेच्या रुपाने दिसते. ही श्रमविभागणी जातिव्यवस्थेच्या रुपाने दिसते. ही श्रमविभागणी स्वतःच्या पंसंतीने नसते. येथे मानवाच्या भावनेला महत्त्व नसते. दैवावर आधारित जातिव्यवस्थेचे स्वरुप असते. भारतीय समाजात व्यक्तीचा दर्जा तिच्या गुणांवर व कर्मावर ठरत नाही, तर जी व्यक्ती ज्या जातीत जन्मली ज्या आईवडिलांच्या पोटी त्याने जन्म घेतला त्यांच्या नावापुढे लागलेली जाते. त्या व्यक्तीला मिळते. जातीवरुनच व्यक्तीचा दर्जा ठरविला जातो. त्यामुळे सर्व जातीच्या लोकांना समान संधी मिळत नाही. जर व्यक्तीचा एखाद्या उच्च समजल्या जाणाऱ्या जातीत जन्म झाला तर त्या व्यक्तीला विशेष अधिकार, हक्क मिळतात. मग ती व्यक्ती लायक असो वा लायक नसो; परंतु अस्पृश्य जातीत व्यक्ती जन्माला आला तर त्याचेकडे मात्र कोणतेही अधिकार राहत नाही. अथवा मिळत नाही. जातिव्यस्थेमुळे व्यक्तीची आर्थिक कार्यक्षमता वाढत नाही. यामुळे वंशामध्ये कसलीही सुधारणा घडून आली नाही.

जातिव्यवस्थेमुळे हिंदू धर्मातील व्यक्ती असंघटित राहून नीतिभ्रष्ट तर झालेच परंतु त्यांची कमालीची अधोगतीही झाली. असे मत आंबेडकरांचे जातिव्यवस्थेविषयी होते.

### ४) पाप–पुण्याच्या कल्पनेवर जातिव्यवस्था आधारित –

आंबडेकरांच्या मते – हिंदू धर्मात मागच्या जन्मात केलेले पाप व पुण्याच्या आधारे व्यक्तीचा या जन्मात या जगात जात ठरत असते. म्हणजे दानधर्म व पुण्य करणारी व्यक्ती या जन्मात ब्राम्हण कुटुंबात जन्म घेते तर पाप करणारी व्यक्ती शूद्र वा अस्पृश्य घरात किंवा जातीत जन्म घेते. अशी धारणा धर्माने केल्यामुळे अस्पृश्य जातीतील लोकांना पापी समजणारी ही अन्यायकारक, शोषणकारी जातिव्यवस्था नष्ट केली पाहिजे, असे परखड मत बाबासाहेबांनी व्यक्त केले आहे.

### ५) जातिव्यवस्थेमुळे ब्राम्हणांचे पुढारपण –

आंबेडकारांनी जातिव्यवस्था ही जुल्मी आहे तसेच ते सुज्ञपणाचेही नाही. कारण जातिव्यवस्थेमुळे ब्राम्हणांना श्रेष्ठत्व मिळाले. ब्राम्हण तत्त्वांनी समाजात श्रेणीयुक्त विषमता निर्माण केली. शूद्र आणि अस्पृश्य यांचे पूर्णपणे निःशस्त्रीकरण केले. शूद्र आणि अस्पृश्य लोकांच्या शिक्षणाला प्रतिबंध घातला. समाजातली महत्त्वाची सत्तास्थाने ब्राम्हण जातीकडे, शूद्र व अस्पृश्यांना संपत्ती मिळवण्यावर बंदी घातली, आणि स्त्रियांना

दास्यात ठेवले. ही ब्राम्हणधर्माची तत्त्वे हिंदू समाजाच्या कायमस्वरुपी मानगुटीवर बसली होती.

अस्पृश्यांनाबाबत ब्राम्हणांनी विरोधाचे धोरण घेतल्यामुळे समाजाचा ऱ्हास झाला. समाजातील कष्टकरी लोकांच्या मालमत्तेची लूट ब्राम्हण व बनिया (वैश्य) हे दोघे वाटून घेतात. आणि करण्याबाबत त्यांना काहीही कमीपणा वाटत नाही. उलट या वर्तनला ते धार्मिक मुलामा देऊन सर्वसामान्य लोकांचीदिशाभूल करतात. ब्राम्हण वर्ग आपल्या वर्गाच्या हितसंबंधाविषयी जागरूक होता. आंबेडकरांच्या मते, ब्राम्हणांचे हेतू स्वार्थी होते, त्यांनी सत्याला पायदळी तुडविले व वेदांचे समर्थन करून ते त्यांच्या हिताचे असल्याने आपले हक्क व अधिकार यांचे जोरदार समर्थन केले. अशी वस्तुस्थिती असून पवित्र धर्म ग्रंथाचे स्वतंत्रपणे संशोधन करायला ब्राम्हण वर्ग नेहमी असमर्थ होते.

ब्राम्हण वर्गच समाजाचे पुढारीकरण करीत असल्याने हिंदूचे धर्मग्रंथ हे जवळपास संपूर्णपणे त्यांनीच निर्माण केले आहेत. त्यामागे आपल्या समाजाला मिळत असलेला विशेष अधिकार टिकविणे होता. म्हणून आंबेडकर म्हणतात की, हे सर्व शास्त्र ग्रंथ जप्त केले पाहिजे. कारण या ग्रंथांच्या माध्यमातून सतत जनतेचा अवमान केलेला आहे. गरीब, निरक्षर आणि धर्मश्रद्धाळू हिंदूंना मूर्ख बनविणे, फसविणे हाच उद्योग केलेला आहे. अस्पृश्याचे, जातिव्यवस्थेचे, बालविवाह या सर्व गोष्टींचे समर्थन या धर्मग्रंथानी केलेले आहे. म्हणजेच हिंदू समाजात जेवढे फायद्याचे क्षेत्र असेल ते ब्राम्हणांनी काबिज करण्याचा प्रयत्न केला आहे. जातीची जाचक बंधने तोडणारे होऊ शकत नाही. म्हणून आंबेडकर म्हणतात ''धर्मनिरपेक्ष ब्राम्हण आणि उपाध्यायपण करणारा ब्राम्हण यात फरक करणे हे पालथ्या घागरीवर पाणी टाकण्यासारखे निरुपयोगी आहे.''

### ६) अस्पृश्यता ही जातिव्यवस्थेतून निर्माण झाली –

आंबेडकरांच्या मते, जातिव्यवस्थेतून अस्पृश्यता निर्माण झालेली आहे. वर्णाश्रमात, धर्मात जातीचे मूळ आहे. आणि वर्णाश्रमाचे मूळ उगमस्थान धर्मात आहे. आणि ब्राम्हणी धर्माचे मूळ हे ब्राम्हणांच्या व्यवस्थेत किंवा राजकीय सत्तेत आहे. म्हणून आंबेडकर म्हणतात की, अस्पृश्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी जातिव्यवस्था नष्ट झाली पाहिजे. जातिव्यवस्थेली नष्ट करण्यासाठी वर्णाश्रम पद्धतीला झुगारुन दिले पाहिजे. हे सर्व घडून येण्यासाठी धर्माची बांधणी नव्याने केली पाहिजे. नवीन धर्माच्या बांधणीत व्यक्तीचे गुण व कर्म हाच निकष लावलेला असेल, धर्माचा पाया स्वातंत्र्य, समजा व बंधूता या तत्त्वांवर लोकशाहीशी सुसंगत असावा. त्यातून विषमतेवर आधारित नाती जातिव्यवस्था नष्ट होईल.

### ७ ) धर्माची पुनर्बांधणी व्हावी –

आंबेडकरांनी अस्पृश्यांचे मूळ जातिव्यवस्थेत आहे असे सांगितले. त्यामुळे अस्पृश्यांना मानाने जगता येण्यासाठी जातिव्यवस्था नष्ट झाली पाहिजे. त्यासाठी वर्णाश्रम व ब्राम्हण धर्माचा त्याग केला पाहिजे आणि हे सर्व घडून येण्यासाठी धर्माची बांधणी नव्याने केली पाहिजे. खरा धर्म कसा असावा या विषयी आंबेडकर काही सूचना करतात या पुढील प्रमाणे.

१) सर्व हिंदू समाजातील व्यक्ती स्वीकारतील असा एकच धर्मग्रंथ असावा. वेद, शास्त्रे पुराणे यातून जे धार्मिक, सामाजिक विचारांचा प्रचार केला जातो तो शिक्षापात्र गुन्हा ठरविला पाहिजे.

२) उपाध्येपण संपूर्णपणे नाहीसे केले पाहिजे किंवा ते अनुवांशिक तरी असता कामा नये. उपाध्येपणाची परिक्षा सरकारने घ्यावी म्हणजे त्यावर ब्राम्हणांची मक्तेदारी राहणार नाही.

३) इतर सनदी नोकरांप्रमाणेच उपाध्यायालाही सरकारचा नोकरच समजले जाईल. त्याचा पगारही सरकारने द्यावा. नीतितत्त्वे, निष्ठा व पूजा याबाबत शिस्तीची कारवाई सरकार करेल. इतर नागरिकांप्रमाणे देशाचे कायदे त्यांना लागू होतील. देशीतील प्रत्येक व्यवसाय नियंत्रित आहे, त्याप्रमाणे ब्राम्हण-भटांसारखे उपाध्येपण हा सुद्धा व्यवसाय आहे आणि कायद्याने जर व्यवसाय सर्वांना खुला करून दिला तर ते लोकशाहीकडे नेणारे पाऊल ठरेल व जातीचा शेवट करणे यासाठी हे पाऊल उपयोगी ठरेल.

हिंदू समाजातील विषमतेविरुद्ध तसेच जातिधर्म पालन हे कायद्याविरुद्ध आहे असे ठरवून सर्व समाज पूर्णपणे लोकशाहीप्रधान बनविण्यासाठी नेहमी मोहीम सुरू ठेवली पाहिजे यावर आंबेडकरांनी जास्त भर दिला होता.

**८) अस्पृश्यतेविषयी आंबेडकरांचे विचार –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातिव्यवस्थेचे सखोल अभ्यास केला आहे. त्यांच्या मते अस्पृश्यता ही निसर्गनिर्मित, ईश्वरनिर्मित नसून मानवनिर्मित आहे. अस्पृश्य समाजावर जातिप्रथेची अनेक बंधने होती. अस्पृश्यता ही अमानवीय आहे. जगातील विचित्र घटकांमध्ये अस्पृश्यतेचा समावेश होतो.

रामबिहारी सिंग यांनीही आंबेडकरांप्रमाणेच अस्पृश्यतेचा अभ्यास केला. त्यांच्या मते, ''कोणत्याही सामाजिक, धार्मिक किंवा राजकीय कारणामुळे एखाद्या वर्गाला उच्च मानून, दुसऱ्या वर्गाला अतिशय खालच्या दर्जाचे स्थान देऊन त्याला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अधिकारापासून वंचित करणे, नंतर मानवतेला तिलांजली देऊन खालच्या वर्गाला स्पर्श करण्यास, पाहण्यास किंवा बरोबरीने बसण्यास, अयोग्य घोषित करणे म्हणजे अस्पृश्यता होय.'' अस्पृश्य लोकांवर अनेक बंधने टाकली जातात. सार्वजनिक ठिकाणे, मंदिरे, धर्मशाळा किंवा पाठशाळा या ठिकाणी प्रवेश मिळत नाही. सार्वजनिक रस्त्यांचा उपयोगही करु दिला जात नाही. म्हणजे अस्पृश्यता समाजातील अशी व्यवस्था असते, की जिच्यामुळे एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला किंवा समाजाला परंपरेच्या आधारे स्पर्श करु देत नाही. जर स्पर्श केला तर ती व्यक्ती अपवित्र बनते आणि या अपवित्रतेतून मुक्त होण्यासाठी त्या व्यक्तीला अनेक प्रकारच्या प्रायश्चित्तामधून पार पडावे लागते.

बाबासाहेबांनी अस्पृश्यांना 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश दिला. अस्पृश्यतामुळे कनिष्ठ जातींील लोकांना सामाजिक न्याय वा हक्क मिळत नव्हते. म्हणून अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी जाती व्यवस्थेची बंधने तोंडली पाहिजेत

आणि त्यासाठी  सामाजिक समता आणि न्याय यांचा पुरस्कार करणाऱ्या बौद्ध धर्माचा सर्व अस्पृश्यांनी स्वीकार करावा असा विचार आंबेडकरांनी दिला. महात्मा गांधींनी अस्पृश्यांना 'हरिजन' म्हणण्यास विरोध केला. आंबेडकर असेही म्हणतात की, गांधींनी व कॉंग्रेसने अस्पृश्यांसाठी विशेष असे भरीव कार्य केले नाही.

वरिष्ठ जातींच्या प्रभावाखाली वागणाऱ्या असंख्य जाती आजही अस्पृश्य म्हणून सध्याही जगत आहेत. परंतु अस्पृश्य जातीतसुद्धा आपआपसात श्रेष्ठ - कनिष्ठत्वाची भावना प्राचीन काळापासून निर्माण झाली आहे. जातीमुळे लोकांची विविध समाजात विभागणी होते. हा विभागलेला समाज सामाजिक दर्जाच्या दृष्टीने उतरत्या श्रेणीने तयार होतो. आणि श्रेष्ठ - कनिष्ठ वर्गातील लोक सामाजिक दर्जाबाबत एकमेकांचा विरोध आणि द्वेष करतात. त्यामुळे समाजात विघटन घडून येते. आंबडेकरांच्या मते जर जातिव्यवस्थेवर हल्ला केला तर सर्व हिंदू त्यासाठी कधीही एकत्र येणार नाहीत. म्हणून आंबेडकरांना जातिविषयक भावनिक व मानसिक बदल घडवून आणायचा होता. शास्त्रांच्या पावित्र्यावर असलेली लोकांची श्रद्धा त्यांना नाहीशी करायची होती. म्हणून जातीच्या मागे असलेले देवपण म्हणजेच शास्त्राचा मार्ग असलेले देवपण नाहीसे करायला पाहिजे, असे ते म्हणतात. आंबेडकरांनी शास्त्रांच्याद्वारा जाती व अस्पृश्यांना जी शिकवण दिली त्या विरुद्ध जाण्याचे धाडस केले.

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेबांनी जातिव्यवस्था व अस्पृश्यता याच्या अनिष्ठ सामाजिक विषमतेनेबाबत चिंतन केले व अस्पृश्यांना मुक्त करण्यासाठी मार्ग दाखविला. नव्हे तर संपूर्ण आयुष्य त्यांनी जाती व अस्पृश्यता निर्मूलनासाठी व्यतीत केले. म्हणून त्यांना मानवमुक्तीचा महामानव म्हटले जाते.

### ६.२.४ डॉ. आंबेडकरांचे धर्माविषयी विचार आणि हिंदू धर्म व बौद्ध धर्म (बुद्ध धर्म) समीक्षा

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्माविषयी अतिशय सोप्या शब्दात विचार व्यक्त केले आहेत. त्यांच्या मते, खरा धर्म समाजाची धारणा करतो आणि त्या धर्माच्या पायावर सर्व प्रामाणिक नागरी सरकारे कार्ये करतात. धर्म हा मानवासाठी आहे. माणूस धर्मासाठी नाही.

धर्म हा समाजाला आवश्यक असून धर्माचा पाया हा व्यक्तिगत जीवनाला आवश्यक आहे आणि सामाजिक जीवनाला, सामाजिक व्यवहाराला पोषक असा आहे, असे आंबेडकर म्हणतात. त्यांच्या मते, तरुणवर्ग हा धर्माबाबत बेफिकीर बनत चालला आहे.  हे पाहून मला खूप दुःख होते. त्यांच्या मते, धर्म ही अफूची गोळी नाही. माझ्यामध्ये ज्या चांगल्या गोष्टी आहेत तसेच माझ्या शिक्षणाचे फायदे समाजाला द्यावेत हे मला धार्मिक भावनेमुळेच वाटते. मला धर्म हवा आहे. परंतु धर्माच्या नावाखाली चाललेला ढोंगीपणा नको आहे, असे ते म्हणतात. आंबेडकरांच्या मते धर्म माणसात आशावाद निर्माण करतो व मानवाला कार्य करण्यास प्रवृत्तही करतो, हा आंबेडकरांचा धर्मविषयक विचारांचा स्थायिभाव आहे.

धर्म हा व्यक्तीच्या सामाजिक जीवनाचा किंवा सामाजिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे. प्रत्येक व्यक्तीचे जीवन, त्याची प्रतिष्ठा व स्वाभिमान धर्माशी संबंधित असतो. धर्मामुळे जी एक सामाजिक शक्ती निर्माण होते ती समाजात संघटन घडवून आणते. सामाजिक शक्तीमुळेच धार्मिक वृत्तीच्या माणसांमध्ये एक प्रकारची श्रद्धा व रितीरिवाजांची एक व्यवस्था तयार होत असते. आंबेडकर म्हणतात, मला धर्म आवश्यक वाटतो परंतु धर्माच्या नावाखाली चाललेली दांभिकता नको आहे. आंबेडकरांची अशी धारणा होती की समाजाच्या जीवनाला आणि आचार-विचारांना शिस्त लावण्यासाठी धर्माच्या संस्थापनेची अत्यंत गरज आहे. मनुष्य केवळ अन्न-पाण्यावर जगू शकत नाही तर धर्मामुळे मानवाच्या मनात आशावाद जागृत होऊन माणूस हा चांगल्या उपयोगी सुंदर कामाला प्रवृत्त होत असतो.

धर्म हा मानवाच्या सेवेसाठी आहे. परंतु मानवाने धर्माचे साधन म्हणून राहू नये. धर्म आणि गुलामगिरी एकत्र नांदू शकत नाही. खरा धर्म समाजात कोणत्याही प्रकारची गुलामगिरी नसते. जो धर्म आपल्या दोन अनुयायी यांच्यामध्ये पक्षपात करतो जो धर्म कोट्यवधी लोकांना कुत्र्यापेक्षा किंवा गुन्हेगारापेक्षा वाईट वागवतो व असह्य व नालायकपणा लादतो तो खरा धर्म नसतो. अशा प्रकारची अन्यायी समाजव्यस्थेला धर्म म्हणता येणार नाही. समाजातल्या एका घटकाला सर्व काही मिळते आणि दुसऱ्या घटकाला काहीच सवलती मिळत नाही हे धर्माचरण नाही किंवा तो खरा धर्म नाही. कारण ज्यांना काहीच मिळत नाही, त्यांची एक प्रकारे थट्टा केली जाते. खरे पाहता सामाजिक नीतिमत्तेवर आधारित समाजिक आदर्शावरुन धर्माची परिणामकारकता मोजली गेली पाहिजे.

म्हणजेच धर्म हे मानवी कल्याणाचे साधन आहे. एक मार्ग आहे. धर्माचा संबंध मानवाच्या सामाजिक कल्याणाशी असावा. आंबेडकरांना धर्मातील आध्यात्मिक तत्त्वे पाहिजे होती. धर्म खऱ्या अर्थाने सार्वत्रिक सर्वकाळी, सर्व देशांना व वंशाना लागू पडयाला पाहिजे. जर धर्म नियम व कायदे यात अडकला तर तो धर्म थांबतो. त्याचे आर्थिक कार्य बंद पडते. धर्म खऱ्या अर्थाने चालवायचा असले तर तो बुद्धिनिष्ठ असला पाहिजे. धर्माच्या शास्त्रात नीतितत्वांमध्ये स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूलभूत तत्त्वांचा समावेश असावा, आंबेडकरांच्या मते, धर्म हा चार अवस्थांमधून गेला आहे. पहिल्या अवस्थेत स्वतःच्या आत्म्याच्या मुक्तीचे साधन म्हणून धर्म कार्य करतो.

दुसऱ्या अवस्थेत मानवाने एकमेकांशी कशा प्रकारे वागावे याबाबत नैतिक नियमावर आधारेलेला बंधुभाव हे त्याचे स्वरुप होते.

तिसऱ्या अवस्थेत - ज्यांनी आपल्या आयुष्यातील गरजा पूर्ण केल्यात त्यांची मानवाने पूजा केली आणि चौथ्या अवस्थेत ज्या लोकांनी चमत्कार करुन दाखविलेत अशांची पूजा त्याने केली. आंबेडकरांच्या मते या जन्मात भरभराट किंवा उच्च दर्जा आणि नंतर मुक्ती प्राप्त करुन घेण्याचे साधन अशा प्रकारे धर्माचे स्वरुप असायला पाहिजे होते. कारण धर्म हा मानवाच्या समाजाच्या कल्याणाचे काम करतो.

परंतु आंबेडकरांच्या मते जातिव्यवस्थेचे मूळ वर्णाश्रमात आहे आणि वर्णाश्रमाचे मूळ हे ब्राम्हणी धर्मात आहे. ब्राम्हणी धर्माचा त्याग केला पाहिजे. हे सर्व घडून

येण्यासाठी धर्माची बांधणी नव्याने केली पाहिजे..

**नव्याने धर्माची बांधणी –**

खरा धर्म कसा असावा यासंबंधी आंबेडकरांनी काही बदल सुचविले आहेत.

i) हिंदूंचा सर्वांना योग्य वाटेल असा एकच धर्मग्रंथ असावा.

ii) वेद, शास्त्रे व पुराणे यात असलेल्या धार्मिक व सामाजिक विचारांचा उपदेश करणे हा शिक्षापात्र गुन्हा ठरविला पाहिजे.

iii) मुस्लिम व ख्रिश्चन धर्माप्रमाणे हिंदूंचा एकच देव असावा.

iv) पुरोहितपद अनुवांशिक असता कामा नये पुरोहित हा कोणत्याही जातीचा आसावा.

v) पुरोहितासाठी सरकारने परीक्षा घ्याव्यात. या परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यानांच पुरोहित म्हणून नेमावे. इतर नागरिकंप्रमाणेच देशाचे कायदे पुरोहिताला लागू असावेत.

पुरोहिताचा व्यवसाय सर्वांसाठी खुला करुन दिला तर हे एक लोकशाहीकडे नेणारे पाऊल असेल. ब्राम्हणीशाहीचा विनाश होऊन जातीचा शेवट होण्यास मदत होईल.

आंबेडकरांनी हिंदू धर्माबाबत जसे विचार मांडलेत तसेच मुस्लीम (इस्लाम) व ख्रिश्चन धर्माविषयीही विचार मांडलेत.

*** सामाजिक समतेसाठी धर्मांतराचा मार्ग –**

हिंदू धर्मात जातिभेद, विषमता असल्यामुळे अस्पृश्यांना या धर्मात समानतेचा, न्याय्य हक्क मिळणार नाही, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. त्यामुळे त्यांनी अस्पृश्यांच्या उद्धारासाठी हिंदू धर्माचा त्याग करणे योग्य मानले.

*** हिंदू धर्म व बौद्ध धर्म समीक्षा (तुलना)–**

**अ) हिंदू धर्म –**

आंबेडकरांच्या मते हिंदू धर्म हा यज्ञकांड, सामाजिक, राजकीय आणि आरोग्य विषयक नियमांचा ढीग आहे. हिंदू धर्मात नीतिमत्तेला कायदेशीर स्वरुप दिलेले आहे. हिंदू धर्मात विभूतीपणा, मानवाचे दैवीकरण व त्यानुसार कर्तव्ये यामुळे तो विनाशाकडे गेला. संकटकाळात देव अवतार घेतो व संकट दूर करतो या विचारसरणीमुळे संकटांशी मुकाबला करण्याऐवजी देवाच्या अवताराची वाट पाहतात व जबाबदारीतून मुक्त राहण्याचा प्रयत्न व्यक्ती करतात. देवावर निष्ठा ठेवल्यामुळे पूजा करणे व त्यासाठी पुरोहितची मदत घेणे. यातून सर्वसामान्यांचे पुरोहितांकडून श्रध्देपोटी शोषण होते.

हिंदू धर्माचे स्वरुप बघितले तर कोठेही बंधुता व समानता दिसून येत नाही. अलौकिक मूल्यांवर मानवाचा विश्वास असला तर मानवाच्या बुद्धीचा उपयोग होत नसतो, असे आंबेडकरांचे मत होते. देवावर निष्ठा ठेवल्यामुळे पुरोहितांची चलती सुरु झाली. त्यांनी मानवाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या मानवाच्या सर्व वृत्तींवर नियंत्रण ठेवण्यात यश मिळविले. पूर्वजन्माच्या गोष्टींनी हा जन्म नियंत्रित केला जातो. आंबेडकरांच्या मते, हिंदू तत्त्वज्ञानाने माणसातील शौर्य (पराक्रम) नष्ट करण्याचा प्रयत्न केला. धार्मिक

पूजापाठ वा उपवास करुन अस्पृश्यांची उपासमार थांबणार नाही. संपन्न जिवन लाभणार नाही. हे सर्व थांबवण्यासाठी राजकीय सत्ता, अधिकार, सत्ता मिळविली पाहिजे. ईश्वरपूजेपेक्षा भाकरी (अन्न) बरी हा विचार त्यांनी लोकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न आंबेडकरांनी केला. हिंदू धर्माचे स्वरुप अपरिवर्तनीय आहे. हिंदू धर्म हा कनिष्ठ व श्रेष्ठासाठी कायदा आहे. त्यात बदल करणे महत्त्वाचे आहे. हिंदू धर्मामुळे सामाजिक ऐक्य निर्माण होत नाही. हिंदू धर्मात जातिव्यवस्था निर्माण झाली. म्हणून हिंदूधर्माला 'विषमतेचा धर्म' म्हटले आहे. हिंदूधर्माने जातिसंस्था नष्ट करावी, समानता ह्या दोन तत्त्वांवर स्वीकार करावा असे आंबेडकर म्हणतात.

हिंदू धर्मात जी वर्णव्यवस्था होती ती समाजविरोधी होती. त्यामुळे कतृर्त्ववान माणसाचे महत्त्व कमी झाले; आर्थिक प्रगती खुंटली नव्हे तर जाणीवपूर्वक प्रगतीत अडथळा आणण्याचा प्रयत्न ब्राम्हणांनी हिंदू धर्मात केला. हिंदू धर्माचे तत्त्व माणसाची आर्थिक, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक व राजकीय कुचंबणा हा धर्म थांबवू शकत नाही.

थोडक्यात हिंदू धर्मातील उच्च जातीच्या ब्राम्हणांना लोक पृथ्वीवरील देव मानीत असत. वरिष्ठ वर्गांना विशेष अधिकार आणि कनिष्ठ वर्गीयांना दुबळेपणा किंवा त्यांच्यावर अन्याय हेच हिंदू लोकांचे सार्वत्रिक स्वरुप होते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात धर्माचे वर्चस्व दिसून येते. जातिव्यवस्थेमागे धर्माचा आधार मानला गेला. समाजावर जे काही नियंत्रण होते ते धर्माचेच होते व आहे. इतकेच नाही तर मुसलमान राज्यकर्त्यांनी निर्माण केलेला सरदार, आमिर-उमरावांचा वर्ग हासुद्धा हिंदूच होता. हिंदू धर्मातील उच्च जातीचे लोक कनिष्ठ जातींना प्रत्येक हक्कांपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न करतात हे आंबेडकरांच्या लक्षात आले होते. म्हणूनच त्यांनी हिंदू धर्मातील दोषांवर हल्ला करुन कनिष्ठ जातींच्या हिंदू लोकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु या प्रयत्नात त्यांना यश आले नाही. म्हणून त्यांनी अखेर बौद्ध धर्म स्वीकारण्याचा मार्ग अंगिकारला.

**ब) बौद्ध धर्म –**

आंबेडकरांच्या मते धर्म हा बुद्धिनिष्ठ, नीती मानणारा आणि आध्यात्मिक असावा. हिंदू धर्म हा वैयक्तिक, स्वरुपाचा आहे. ठराविक वर्गाची मक्तेदारी हिंदू धर्मात होती. म्हणून त्यांच्या मते, बौद्ध धर्म हा सामाजिक स्वरुपाचा आहे. बौद्ध धर्मात ईश्वराला स्थान नाही. त्यात ईश्वराचे स्थान नीतीने घेतले. नीती हीच प्रभावी मानली. म्हणून आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षा भूमीवर पाच लाख दलित बांधवांसह बौद्ध धर्माचा स्वीकार केला.

बौद्ध धर्मामध्ये उपासना, प्रार्थना, यात्रा, कर्मकांड व यज्ञ या गोष्टींना अजिबात स्थान नव्हते. धम्म म्हणजे सदाचरण, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मानवामानवात न्यायपूर्ण संबंध निर्माण करणे. म्हणून गौतम बुद्धांचा धम्म हाच खरा धर्म आंबेडकरांचा दृष्टीने होता. धम्माने हिंदू धर्मातील देवावरील श्रद्धा, आत्म्यावर विश्वास, देवपूजा, प्रार्थनेने देवाची आराधना, समारंभ आणि यज्ञ यांचा त्याग केला आहे. हिंदू धर्माचा पायाच मुळात ठिसूळ आहे.म्हणून बुद्धाचा धम्म हा खरा धर्म आहे.

गौतम बुध्दाने सामान्य माणसासाठी नैतिक आदर्श आचरणाविषयी आदेश सांगितलेत व त्या आदर्शासाठी बौद्ध प्रयत्न करीत होते. बौद्धाचा सामाजिक दृष्टिकोन मानवतावादी व सर्वसमावेशक होता. तसेच सामाजिक व्यवहारांशी बुद्धाची शिकवण मिळतीजुळती होती. मानवी जीवन अधिक उदात्त होईल आणि समता, स्वातंत्र्य, प्रेम आणि सहानुभूती युक्त होईल असे बुद्धांना नेहमी वाटत असे. प्रेम आणि करुणा या दोन गुणांची प्रेरणा व स्फूर्ती बुद्ध देतात.

आंबेडकरांच्या मते, ख्रिश्चन धर्माची ९० टक्क्यांपेक्षा अधिक तत्त्वे व त्यातील आशय व बाह्यरुप बघता ती बौद्ध धर्माची नक्कल आहे. त्यांच्या मते,आजपर्यंत चारच धर्मोपदेशक जगात होऊन गेलेत ते म्हणजे श्रीकृष्ण, बुद्ध, ख्रिस्त व महंमद पैगंबर आपल्या शिष्यांनी आपल्या आज्ञा पाळू नयेत तर त्यांनी आपल्या सदसद् विवेकबुद्धीला स्मरुन वागावे, ही बुद्धाची शिकवण आंबेडकरांना पटली. आंबेडकरांच्या मते हिंदू धर्मात समाजातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा समूळ नाश करायचा असेल तर बुद्धाच्या तत्त्वज्ञानाशिवाय पर्याय नाही.

बौद्ध धर्माविषयी आंबेडकरांना कमालीचा अभिमान होता. त्यांच्या मते, बौद्ध धर्मात खऱ्या अर्थाने मानवता आहे. ते म्हणतात. १) बौद्ध धर्मात प्रत्येक मानवाला जिवंत अनुभवाची अपेक्षा असते. परलोकाशी या जन्माचा संबंध नसतो. २) बौद्ध धर्मात वास्तवता आहे. ६) मानवाने मानवावर प्रेम करावे हे बौद्ध धर्म शिकवितो. स्वातंत्र्य, समता व न्याय तत्त्वांना या धर्मात महत्त्व आहे. ४) बौद्ध धर्म हा सर्वसमावेशक आहे. तसेच तो गतिमान आहे. वैज्ञानिक आहे. ५) जीवनाविषयी बुद्धिनिष्ठ आणि तर्कशुद्ध स्पष्टीकरण त्या धर्मात आहे. ६) मनुष्य हा त्या धर्माचा अभ्यासाचा व परीक्षेचा केंद्रबिंदू आहे.

भगवान बुद्धाने माणसांना पुरोहितांच्या तावडीतून मुक्त केले. बुद्धांनी जातीरचनेचा त्याग केला. त्यांनी माणूस आणि परमेश्वरातील पुरोहित (ब्राम्हण) नावाचा दुवा नाकारला. म्हणून गौतम बुद्ध यांना देशातील सर्वांत श्रेष्ठ समाजसुधारक मानले आहे. बौद्धांची शिकवण सर्व मानवजातीला आदरणीय अशीच होती. गौतम बुद्धांनी वर्गविहित समाजाचे स्वप्न उभे करुन वेदोक्त चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेचे समूळ उच्चाटन केले. बौद्ध धर्मान जो उपदेश केला असा उपदेश कोणत्याही धर्माने केलेला नाही. अंधश्रद्धा आणि अलैकिकता यांच्याविरुद्ध असलेल्या 'प्रज्ञा' या मानवी शक्तीचा, तसेच 'करुणा' आणि 'समता' या मूल्यांचा विकास करण्याचा उपदेश गौतम बुद्धांनी केला. बौद्ध धम्म सांगतो की, 'परमेश्वर' अथवा 'आत्मा' समाजाचा उद्धार करु शकत नाही तर बौद्ध धर्म पूर्णपणे तर्कसंगत आणि तर्कशुद्ध विचारसरणीवर आधारलेला आहे. बौद्ध धर्मात जी लवचिक व्यवस्था आहे तशी व्यवस्था कोणत्याही धर्मांत दिसून येत नाही.

आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेण्याचा निश्चय केला, त्यामागे काही कारणे होती, ती अशी –

१) अस्पृश्य हे पूर्वीचे बौद्ध होते हे सिद्ध करण्याचा प्रयत्न आंबेडकरांनी केला.

२) बौद्ध धर्म हा भारतात निर्माण झाला, भारतात त्याचा विकास झाला. बुद्ध हे

अस्पृश्य जनतेला अधिक जवळचे होते. व अधिक प्रिय होते.

३) बौद्ध धर्म हा शास्त्रीय कसोटीला उतरणारा आहे. व आधुनिक जगाला प्रारब्ध किंवा दैवगती याबाबत मार्गदर्शन करण्याची ताकद व पात्रता बौद्ध धर्मात आहे. ही कारणे आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारण्यामागे होता.

हिंदू धर्म आणि बौद्ध धर्माबाबत बोलतांना आंबेडकरांचे विचार असे होते की, हिंदू धर्माने अस्पृश्य समाजाला आपले भवितव्य उज्ज्वल करण्यास संधी दिली नाही. उलट बौद्ध धर्म हा समता, न्याय यावर आधारलेला आहे. म्हणून सर्व धर्ममत्ता पुन्हा एकदा बौद्धमय झालेला पाहायचा आहे.

थोडक्यात - हिंदुधर्मात कर्मकांड, स्नान, संध्या यांना महत्त्व आहे. परंतु बौद्ध धर्मात या गोष्टींना महत्त्व नाही, हिंदू धर्मात ईश्वराला महत्त्व आहे. तर बौद्ध धर्मात देवाला महत्त्व नाही. नीतीला महत्त्व आहे, हिंदू धर्मात जातिव्यवस्था व विषमता दिसून येते. परंतु बौद्ध धर्मात जातिव्यवस्थेला व विषमतेला विरोध आहे. बौद्ध धर्म सामाजिक समतेला महत्त्व देतो. अशाप्रकारे डॉ. बाबासाहेबांनी हिंदू धर्म व बौद्ध धर्माची तुलना करुन समीक्षा केलेली आहे.

### ६.२.५ भारतीय राज्यघटना आणि सामाजिक सुधारणा (Indian constitution and social Reforms)-

डॉ. आंबेडकरांना घटनाकार असे म्हटले जाते. भारत देशाची विशेष म्हणजे जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या देशाची राज्यघटना लिहिण्याची जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर आली.

घटना समितीची सर्वप्रथम कल्पना मानवेंद्रनाथ रॉय यांनी मांडली होती. १९४६ मध्ये घटना समितीच्या निवडणुका झाल्या. त्यात डॉ. आंबेडकर बंगालच्या प्रांतिक कायदेमंडळावर निवडून आले. त्यानंतर घटना समिती अस्तित्वात आली. घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद बनले तर घटना निर्माण करणाऱ्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली घटना लेखन समितीने प्रत्यक्ष घटना तयार करण्याचे काम केले. आणि २६ जानेवारी १९५० रोजी घटना भारतासाठी लागू केली व भारत प्रजासत्ताक देश बनला. म्हणून बाबासाहेबांना 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' असे म्हटले जाते. आंबेडकरांनी राज्यघनटेविषयी विचार मांडले व त्यातूनच त्यांच्या सामाजिक सुधारणेबाबत विचार स्पष्ट होतात.

भारतीय राज्यघटनेने दिलेली समान संधी उपभोगायला नागरिक समान पातळीवर असावेत म्हणून पंडित नेहरुंच्या लोकशाहीच्या तत्त्वाचे आंबेडकरांनी स्वागत केले. आंबेडकरांनी राज्यघटनेत मूलभूत हक्कांची संकल्पना मांडली. व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर इतर व्यक्तींचे, संघटनांचे किंवा शासनाचे आक्रमण होऊ नये म्हणून आंबेडकरांनी राज्यघटनेत राजकीय व्यवस्थेबरोबरच समाजवादी अर्थव्यवस्था असावी. त्यांनी राजकीय लोकशाहीची चतुःसूत्री मांडली त्यानुसार -

१) व्यक्ती हेच राज्यघटनेचे ध्येय आहे.

२) व्यक्तीला काही अधिकाराची हमी राज्यघटनेने दिली पाहिजे.

३) कोणत्याही व्यक्तीला सुखसोयी मिळवितांना किंवा देतांना त्या व्यक्तीला राज्यघटनेने दिलेले अधिकार अबाधित राहावेत.

४) राज्याने कोणत्याही खाजगी व्यक्तीला इतरांवर राज्य करण्याचे अधिकार देऊ नयेत.

अशा प्रकारे आंबेडकरांनी आपल्या चतुःसूत्रीत नागरिकांच्या जीविताचा, स्वातंत्र्याचा आणि सुखप्राप्तीचा अधिकार कशा प्रकारे सुरक्षित ठेवता येईल याचाच विचार त्यांनी केला आहे. आंबेडकरांच्या विचारानुसार शासनावर मर्यादा घालणे महत्त्वाचे आहे. तसेच अधिक प्रभावी व्यक्ती किंवा ज्यांच्या हातात अर्थसत्ता आहे, त्यांचे अर्थसत्तेवरील नियंत्रण काढून घेऊन त्यांच्या जागेवर दुर्बळ व्यक्तींवर काही जाचक (कडक) नियम लावणाऱ्या पद्धतीचा नायनाट करणे हा विचार त्यांचा होता.

आंबेडकरांच्या मते राज्यघटनेत फक्त लोकशाही मूल्यांचा केवळ शब्दात उल्लेख करुन चालणार नाही, तर मानवी मूल्यांचा योग्य उपयोग होण्यासाठी राज्यघटनेत घटनात्मक कायद्याच्या स्वरुपात काही ठोस तरतुदी करणे आवश्यक आहे. या तरतुदीमधूनच आंबेडकरांनी सामाजिक सुधारणावादी विचार मांडलेत.

१) महत्त्वाचे उद्योगधंदे हे राज्याच्या मालकीचे असतील व राज्याकडूनच चालविले जातील.

२) मूलभूत स्वरुपाचे उद्योगधंदे राज्याकडून किंवा राज्याने स्थापन केलेल्या महामंडळाद्वारे चालविले जातील.

३) प्रत्येक व्यक्तीचा तिच्या मिळकतीप्रमाणे व विधिमंडळाने ठरवून दिलेल्या रकमेचा जीवन विमा सक्तीने उतरविण्यात आला.

४) शेती व्यवसाय हा राज्यातील अखत्यारीतील असेल.

५) राज्याला खाजगी व्यक्तीकडून जमीन संपादण्याचा अधिकार असेल. जमीन संपादन करतांना जमिनीवरील त्याच्या हक्काच्या रकमेइतकी रक्कम दिली जाईल.

६) जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी मिळालेले कर्जरोखे कसे आणि कधी वटविले जातील हे ठरविण्याचे अधिकार राज्याला राहतील.

७) हे कर्जरोखे वारसाहक्कांची संपत्ती असेल. परंतु वारसांना राज्याने संपादित केलेली जमीन किंवा व्याज परत मागता येणार नाही.

८) शेती सामुदायिक शेती म्हणून कसली जाईल.

९) शेती कसण्यासाठी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना देतांना जातीपतीचा विचार केला जाणार नाही. त्यामुळे कोणी जमीनदार, कोणी कूळ किंवा भूमिहीन असणार नाही. म्हणजे जो कसेल त्याला उत्पन्न मिळेल. त्यामुळे कष्टाला योग्य न्याय मिळेल व प्रत्येकाला आपली परिस्थिती सुधारण्यास संधी मिळेल असा न्यायवादी दृष्टिकोन आंबेडकरांचा होता.

१०) सामुदायिक शेतीला पाणी, जनावरे, बी-बियाणे, अवजारे, खते यासाठी शासन आर्थिक मदत करेल म्हणजे शासनाचे नियंत्रण व सहकार्य महत्त्वाचे मानले.

थोडक्यात राज्यघटनेत या कलमांचा समावेश केला तर भारतात राज्यसमाजवाद स्थापन करण्यात राज्यघटनेमार्फत करता येईल असे आंबेडकरांचे मत होते.

आंबेडकरांनी राज्यघटनेच्या माध्यमातून खालील सामाजिक सुधारणा अपेक्षित होत्या -

**१) मूलभूत हक्क प्रदान करणे -**

राज्यघटनेच्या माध्यमातून भारतातील सामाजिक व आर्थिक स्थिती, अस्पृश्यता इ. कारणांमुळे भारतीय नागरिकांना काही मूलभूत हक्क देण्यात यावे आणि म्हणून राज्यघटनेत तरतुदी करण्यासाठी आंबेडकरांनी समर्थन करणे.

**२) केंद्र सरकार शक्तिशाली करणे -**

भारतीय राज्यघटनेने केंद्र शासन बळकट (शक्तिशाली) असावे; राष्ट्रपती व संसद झाल्यामुळे जादा अधिकार केंद्राच्या वाट्याला आलेले व महत्त्वाचे अधिकारही केंद्र सरकारच्या हातात आल्यामुळे केंद्र सरकारच्या हाती मोठी सत्ता एकवटली म्हणून केंद्र सरकार शक्तिशाली बनले.

**३) लोकांचे सार्वभौमत्व महत्त्वाचे मानले -**

भारतीय राज्यघटनेने लोकांचे सार्वभौमत्व हे तत्त्व प्रस्थापित केले. भारत हे प्रजासत्ताक गणराज्य असेल असे स्पष्ट केले. व राज्यकारभाराचे सर्व अधिकार जनतेच्या हाती देण्यात आले. लोकांचे कल्याण हेच शासनाचे ध्येय असेल. लोकांचे सार्वभौमत्त्वाला जास्त महत्त्व दिले त्यामुळे लोकशाही स्थापण्यास मदत झाली.

**४) प्रौढ मतदान पद्धती अस्वीकारली -**

भारतीय राज्यघटनेत नागरिकांना नागरिकत्व बहाल केले त्यानुसार १८ वर्षावरील सर्व स्त्री-पुरुषांना निवडणुकीत मतदान करण्याचा हक्क मिळाला व त्यासाठी जात, धर्म, वंश, भाषा, प्रांत या कोणत्याही गोष्टींचा अडथळा येणार नाही असे सुचविले. यामुळे नागरिकांना शासनात आपल्या मताचा आदर होतो, अशी भावना निर्माण होऊन लोकशाही बळकट होण्यासाठी ही पद्धत महत्त्वाची मानली गेली.

**५) न्यायालयाचे स्वातंत्र्य -**

भारतीय राज्यघटनेने न्यायालये स्वतंत्र ठेवण्याचा प्रयत्न केला. न्यायाधीशांची निवडणुकीची पद्धत, त्यांचा कार्यकाळ, त्यांचा पगार याबाबत घटनात्मक तरतुदी केल्यात म्हणजे न्यायालयाचे विधिमंडळ व कार्यकारी मंडळ हे स्वतंत्र ठेवण्याचा प्रयत्न केला.

तसेच संसदेने केलेला कोणताही कायदा जर घटनाबाह्य असेल, नागरिकांचे मूलभूत हक्क नष्ट करणारा असेल तर कायदा नष्ट करण्याचा व घटनाविरोधी म्हणून जाहीर करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. या प्रकारे न्यायालयाचे पुनर्विलोकन

तत्त्वाचा स्वीकार केला त्यामुळे न्यायालये स्वतंत्र ठेवण्याचा प्रयत्न आंबेडकरांनी राज्यघटनेच्या माध्यमातून केला.

### ६) कल्याणकारी राज्य निर्माण करण्याचे ध्येय –

आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून जास्तीतजास्त लोकांचे सर्वाधिक हित साधण्याचे ध्येय समोर ठेवले. त्याद्वारे समाजात सामाजिक, राजकीय व आर्थिक न्याय स्थापन करणे, बंधुभाव वाढविणे व मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे ही लोककल्याणकारी पावले उचलली आहेत.

### ७) जनतेच्या आशा – आकांक्षा पूर्तता करणारा जाहीरनामा –

राज्यघटनेत मूलभूत हक्कांबरोबरच राज्यांच्या मार्गदर्शक तत्त्वांच समावेश आहे. घटनेतील मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे जनतेच्या इच्छा – आकांक्षा पूर्तता करणारा जाहीरनामा आहे. म्हणजे मूलभूत हक्कानुसार आदर्श नागरिक निर्माण होऊ शकतो व आदर्शराज्य अस्तित्वात येऊ शकते व समानतेवर आधारित विकसित समाज निर्माण होईल, असे आंबेडकरांचे मत होते.

### ८) धर्मनिरपेक्ष राज्य –

आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेची निर्मिती करतांना धर्मनिरपेक्ष राज्य निर्मिती कशी होईल हा विचार डोळ्यासमोर ठेवला. कोणजत्याही धर्माला भारतीय संविधानाने समान संधी व वागणूक दिली. धर्माच्या आधारावर इथे कोणताही भेदभाव पाळला जाणार नाही. प्रत्येकाने धर्मस्वातंत्र्य व पूजा स्वातंत्र्य देण्यात आले आहे. प्रत्येकाला आपल्या धर्मानुसार आचार–विचार व शिक्षणाचे स्वातंत्र्य असेल असेच घटनेचे धर्मनिरपेक्ष स्वरुप आहे. यातून राष्ट्रीय एकात्मता निर्माण होण्यास मदत होईल हा विचार आंबेडकरांचा होता.

### ९) घटनादुरुस्ती बाबत विचार –

भारतीय राज्यघटना काही प्रमाणात ताठर वा काही प्रमाणात लवचिक आहे. काही बाबतीत घटनेत बदल करणे अतिशय सोपे आहे. तर काही बदल करणे कठीण व गुंतागुंतीची आहे. जर समजा घटक राज्याच्या नावात, सीमेत, एखाद्या नव्या बाबीचा घटनेत समावेश करावयाचा असेल अशा बाबतीत लवकर बदल करता येतो. म्हणून भारताची घटना लवचिक असावी.

अशाप्रकारे आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेची रचना करताना सामाजिक विकास व सामाजिक समतोल राखण्याचा प्रयत्न केला आहे. सुधारणावादी दृष्टिकोन यातून आंबेडकरांचा दिसून येतो. राजकीय समानता मिळाली तरी सामाजिक समानता मिळाल्याशिवाय आर्थिक समानता मिळू शकणार नाही. म्हणून आंबेडकरांनी भारताची एकात्मता राखण्यासाठी त्यांनी हिंदू कोड बिलाची आवश्यकता स्पष्ट केली. त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. मूलभूत हक्कांचा संकोच होऊ नये म्हणून राज्यघटनेत न्यायालयाकडे दाद मागण्याची तरतूद केली. मार्गदर्शक तत्त्वात कल्याणकारी समाजरचना निर्माण करणे हे राज्याचे उद्दिष्ट असेल. दुर्बल घटकांचे व अनुसूचित जाती जमातींचे

शिक्षण व आर्थिक हिससंबंधाचे रक्षण झाले पाहिजे. तसेच देशाचे सार्वभौमत्व सिद्ध केले. तसेच स्वातंत्र्य, समता, या तत्त्वांना महत्त्वाचे स्थान देऊन प्रत्येकाला आचार - विचार, उच्चार, भाषा, लिपी इ. बाबत सुरक्षितता दिली. सर्वांना विकासाची समान संधी मिळेल, सर्वांचा सामाजिक दर्जा सारखाच असेल अशी तरतूदही केली.

## ६.३ स्वयंअध्ययन प्रश्न

**अ) दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१) आंबेडकरांनी बौद्ध धम्माची दीक्षा कोणत्या दिवशी स्वीकारली?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२) 'थॉट्स ऑफ पाकिस्तान' ग्रंथाचे लेखक कोण आहेत?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३) १९४८ मध्ये आंबेडकरांचा कोणता ग्रंथ प्रकाशित झाला?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४) जाती व धर्माच्या आधारावर अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ असावेत यासाठी कोणी उपोषण केले.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

५) राज्यघटना कोणत्या दिवशी लागू केली?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

६) डॉ आंबेडकर घटना समितीच्या कोणत्या पदावर होते.

..........................................................................................

..........................................................................................

७) आंबेडकरांच्या मते जातीचा अर्थ सांगा.

८) आंबेडकरांनी 'मनुस्मृतीचे' दहन कोणत्या वर्षी केले?

९) अस्पृश्यतेचा अर्थ सांगा.

१०) बाबासाहेबांनी अस्पृश्यांना कोणता संदेश दिला.

११) आंबेडकरांच्या मते धर्माचा अर्थ सांगा.

१२) आंबेडकरांनी खरा धर्म कोणत्या धर्मास म्हटले.

१३ ) 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' कोणास म्हटले जाते?

**ब) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) डॉ. आंबेडकरांच्या सुधारणावादी तरतुदी

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

२) आंबेडकरांची लोकशाहीची चतुःसूत्री

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

३) आंबेडकरांनी धर्माच्या बांधणीबाबत सांगितलेल्या बाबी (मुद्दे)

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

४) अस्पृश्यतेबाबत आंबेडकरांचे विचार

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

५) आंबेडकरांचे स्त्रीमुक्ती विषयी विचार.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

**क) दीर्घोत्तरी प्रश्न –**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते सविस्तर स्पष्ट करा.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

२) आंबेडकरांचे जातिव्यवस्थेबाबतचे विचार लिहा.

.......................................................................................

.......................................................................................

.....................................................................................

३) आंबेडकरांची हिंदू धर्म व बौद्ध धर्म याविषयी समीक्षा (तुलना) स्पष्ट करा.

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

४) आंबेडकरांनी राज्यघटनेच्या माध्यमातून केलेल्या सामाजिक सुधारणांचा आढावा घ्या.

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

## ६.४ सारांश

विद्यार्थी मित्रहो, प्रस्तुत प्रकरणात आपण राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य थोडक्यात समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रथम आपण डॉ. आंबेडकरांचे जीवन परिचय, तसेच त्यांनी केलेले लिखाण, विविध वृत्तपत्रातून केलेले लिखाण, भाषण यातून त्यांच्या कार्याचा परिचय करुन घेतला. आंबेडकारांनी तत्कालीन सामाजिक, आर्थिक व धार्मिक मुद्द्यांवर विचार व्यक्त केलेत व सामान्य जनतेला जागृत करण्याचे कार्य केले.

बहुजन समाजाला न्याय मिळावा म्हणून विविध साामाजिक सुधारणा केल्या. अस्पृश्यता नाहीशी करण्यासाठी जनआंदोलन उभारले. दलितांना मतदानाचा हक्क मिळावा म्हणून दुहेरी मतदानाचा हक्क मंजूर करून घेतला. अस्पृश्यांना राजकारणात नेतृत्व करण्याची संधी मिळावी म्हणून स्वतंत्र मतदार संघांची मागणी मान्य करुन घेतली. स्त्रियांना समानता, प्रतिष्ठा मिळविण्यासाठी 'हिंदू कोड बिल' मांडले. अस्पृश्य स्त्री- पुरुषांना शिक्षण मिळविणेसाठी प्रयत्न केला. त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची स्थापना केली. धर्मनिरपेक्ष राज्यघटनेची निर्मिती केली. राज्यघटनेत स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, हक्क, अधिकार तत्त्वांचा समावेश करून सामाजिक न्यायाचे राज्य निर्माण करण्याचे कार्य केले.

डॉ. आंबेडकरांनी तत्कालीन समाजातील जातिभेद समस्या नष्ट करण्यासाठी प्रयत्न केलेत. जातिव्यवस्था किती व कशी अमानवीय आहे, जातिव्यवस्थेला वर्णाचा व धर्माचा आधार मिळाल्यामुळे समाजात जात कशी घट्ट बसलेली आहे, याबाबत विचार व्यक्त केलेत. जात हा व्यक्तीचा समाजातील दर्जा ठरविणारा निकष आहे. जातिव्यवस्था ही पाप व पुण्याच्या कल्पनेवर आधारित असून, त्यामुळे त्याचा फायदा ब्राम्हण वर्ग (पुरोहित) कसा घेतो, हे मांडले. जातिव्यवस्थेतूनच अस्पृश्यता निर्माण झाली असे आंबेकडर म्हणतात. अस्पृश्यतेमुळे खालच्या वर्गाला स्पर्शसुद्धा करु दिला जात नाही.

त्यांच्यावर अन्याय केला जातो. त्यांचे शोषण केले जाते. म्हणून अस्पृश्यता नष्ट करून जातीयता संपविली पाहिजे. यासाठी संपूर्ण आयुष्य व्यतीत केले म्हणून त्यांना मानवमुक्तीचा महामानव म्हटले जाते.

आंबेडकरांनी धर्माला समाजाची धारणा करणारा असे म्हटले. धर्म हा मानवासाठी असून धर्माचा पाया व्यक्तिगत जीनवाला आवश्यक मानते. धर्म हा समाजात संघटन घडवून आणतो. परंतु धर्माच्या नावाने चालणारी दांभिकता नष्ट झाली पाहिजे. धर्म हे मानवी कल्याणाचे साधन बनावे असे त्यांना वाटते. धर्मात नीती असावी व धर्म बुद्धी निष्ठ असला पाहिजे. धर्माची नव्याने पुनर्बांधणी करणेही आवश्यक असून त्यात काही बदल आंबेडकरांनी सुचविलेत. आंबेडकरांनी हिंदू धर्म आणि बौद्ध धर्म यांची तुलना करुन बौद्ध धर्म हा सामाजिक समतेला महत्त्व देणारा आहे असे म्हटले.

आंबेडकरांनी राज्यघटना मांडून सर्व नागरिकांना सर्व अधिकार कसे मिळतील याचा विचार त्यांनी केला. कायद्याच्या स्वरुपात सामाजिक सुधारणावादी तरतुदी त्यांनी मांडल्या, त्यातून सामाजिक सुधारणा त्यांना अपेक्षित होत्या. त्यात नागरिकांना मूलभूत हक्क प्रदान करणे, सरकार सक्षम बनविणे, प्रजासत्ताक गणराज्य असावे, प्रौढ मतदान पद्धती स्वीकारुन लोकशाही बळकट करण्याचा प्रयत्न केला. तसेच न्यायव्यवस्था ही स्वतंत्र असावी, कल्याणकारी राज्य निर्माण करण्याचे ध्येय राज्यघटनेत ठेवले. राज्यघटना ही नागरिकांना मूलभूत हक्क प्रदान करते. त्यातून आदर्श राज्य निर्माण होऊ शकते व समानतेवर आधारित विकसित समाज निर्माण होईल, अशी आशा बाळगून त्यांनी कार्ये केले.

अशाप्रकारे आंबेडकरांनी लोकशाहीवादी, समानतावादी, आदर्श राष्ट्र निर्माण करण्यासाठी आयुष्यभर कार्ये केले; म्हणून त्यांना मानवमुक्तीचा महामानव म्हटले जाते.

## ६.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- जोखडातून – बंधनातून
- उपाध्येपण – ब्राम्हणीपणा, भेदाभेद करणारी वृत्ती.
- दांभिकता – खोटारडेपणा, बनावटपणा
- पक्षपात – भेदाभेद
- वंचित – लांब ठेवणे किंवा दूर ठेवणे.
- वास्तवता – खरेपणा, सद्यस्थिती.
- वर्गविहिन – वर्ग नसलेला
- प्रारब्ध –
- समाजवादी – समानतेवर आधारित समाज
- पुनर्विलोकन –

## ६.६ संदर्भसूची


१) डॉ. आंबेडकर, शांततामय सामाजिक क्रांतीचे प्रणेते. - ॲड. राम खोब्रागडे, सुगावा प्रकाशन, पुणे ३०, २ ऑक्टो. २००६.

२) भारतीय सामाजिक विचारवंत - डॉ. दा. धो. काचोळे, - कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद. पान नं. २६६ ते ३४१, २५ जुलै १९९९

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी - श्री कृष्णा मेणसे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, पाचवी आवृत्ती २००६

४) महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास (१९९१ ते १९९४)

- डॉ. अनिल कठारे, डॉ. वाघमारे, डॉ. गौतम पाटील, - चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, ऑगस्ट २००९

५) साप्ताहिक खान्देश, ‘नायक’, भीमजयंती विशेषांक. संपादक - ज्ञानेश्वर आमले, २०१०.

६) आंबेडकरवाद : तत्त्व आणि व्यवहार - डॉ. रावसाहेब कसबे - सुगावा प्रकाशन, पुणे, ऑक्टो.१९८९

७) माझी आत्मकथा - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

संपादक - संत ज. गो., तथागत प्रकाशन, नांदेड, जाने. २००८

८) डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार आणि भारतीय जाती समाज - प्राचार्य म. ना. कांबळे, प्रकाशक - किशोर ढमाले, अक्षर योजना - आशय टाइपसेटर्स, पुणे-६, डिसें. २००२

# एम . ए . समाजशास्त्र द्वितीय वर्ष

## पेपरः **3**

# लिंग आणि समाज

# घटक १

## लिंगभेदाची सामाजिक उभारणी

**अनुक्रमणिका**

**१.० घटकाची उद्दिष्टे**

**१.१ प्रस्तावना**

**१.२ संकल्पनात्मक समस्या – प्रश्न**

**१.२.१ पितृसत्ताक कुटुंबपद्धती पितृसत्तात्मकता**

**१.२.२ स्त्रिया**

**१.२.३ कुटुंबातील स्त्री**

**१.३ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न/उपक्रम**

**१.४ सारांश**

**१.५ पारिभाषिक शब्द**

**१.६ संदर्भसूची**

**१.७ सरावासाठी प्रश्न**

### १.० घटकाची उद्दिष्टे :

१) लिंगभेदातील पितृप्रधानता, लिंगभेद आणि लिंग या संकल्पना जाणून घेणे.

२) तसेच स्त्रियांची समाजातील स्थिती अभ्यासणे. उदा. स्त्रीची जैविक आणि सामाजिक निर्मिती समाजाने कशाप्रकारे केली आहे, त्याचप्रमाणे स्त्रीचा सामाजिक आणि सांस्कृतिक दर्जा अभ्यासणे.

३) कुटुंबामध्ये स्त्रियांची भूमिका काय आहे, हे अभ्यासणे.

४)समाजात वावरत असताना स्त्रीला कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते हे पाहणे.

### १.१ प्रस्तावना :

१८ व्या शतकापासून मानवतावादी चळवळीला प्रारंभ झाला. मनुष्याच्या सर्वांगीण उन्नतीसाठी व कल्याणासाठी मानवतावादाचा उदय झाला. प्राचीन काळातील भारतातील धार्मिक, वाङ्मयीन व पाश्चात्त्य विचारसरणींनी मानवतावादाला च ना दिली. मानवतावादाच्या प्रभावामुळे समाजघटकात जागृती झाली. त्यातून अनेक चळवळी उदयाला आल्या. त्यापैकी एक महत्त्वाची चळवळ म्हणून स्त्रीमुक्ती चळवळ किंवा विचारसरणी सुरू झाली. स्त्रीवाद ही आधुनिक युगात उदयाला आलेली महत्त्वपूर्ण अशी विचारसरणी आहे. स्त्री–पुरुषांमध्ये समता प्रस्थापित करण्यासाठी आणि स्त्रीयांवरील अन्यायाची जोखड मोडून काढण्यासाठी व त्यांना समाजात पुरुषांच्या बरोबरीने स्थान देण्यासाठी स्त्रीवाद उदयाला अ ला आणि ही वैचारिक स्थिती म्हणजे क्रांतिकारी विचारसरणीचे नवे रूप आहे. अमेरिकेच्या थॉमस जेफरसनने

अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनाम्या १७७६ मध्ये व्यक्तिस्वातंत्र्याची सर्वांगीण चर्चा केली. त्यानंतर झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीने मानवी हक्काचा जाहीरनामा घोषित करून मनुष्याला स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूलभूत हक्काची देणगी दिली.

२० व्या शतकापर्यंत समान अर्थव्यवस्था, प्रशासन, धर्म, कौटुंबिक व सांस्कृतिक क्षेत्रात पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा होता. एवढेच नाही तर निसर्गानेसुद्धा स्त्रियांना दुय्यम स्थान दिले. लिंगभेदाला शरीररचनेची भिन्नता कारणीभूत ठरली. स्त्रीउन्नतीचे सर्व मार्ग पुरुषशाहीने दडपून टाकले. या पुरुषी वर्चस्वाला विरोध करण्यासाठी स्त्रिया एकत्रित झाल्या. स्त्रियांचा कैवारी म्हणून प्राचीनकाळी ग्रीकमध्ये प्लेटोला मानले जात होते. पण आधुनिक काळात स्त्रीवादाला उग्र रूप आले आहे. हे उग्र रूप देण्याकरिता जे. एस. मिलचे नाव आवर्जून घेतले जाते. त्यांनी 'स्त्रियांची गुलामगिरी' हा ग्रंथ लिहिला. त्यांच्या विचारांमुळे स्त्री–मुक्ती चळवळीने उग्र रूप धारण केले. त्यांची ही देणगी विसरता येत नाही. भारतात राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, ताराबाई शिंदे यांनी स्त्रीवादाला चालना दिली. स्त्रियांवरील दडपशाहीच्या मार्गाला, संघर्ष मागा ने विरोध करणारी पुरोगामी चळवळ, स्त्रीवादी साहित्य, समाजसुधारक, संविधान व संविधानातील कायदे अशा असंख्य घटकांनी स्त्रीवादी आंदोलनाला उग्र रूप दिले.

जगातील काही अपवाद वगळता बहुसंख्य समाज हे पितृप्रधान, पितृसत्ताक व पितृवंशीय आहेत. या समाजात नकळतच स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेने दुय्यम स्वरूपाचा दर्जा दिला होता. संस्कृती, जैविकता अशा विविध स्वरूपात स्त्रियांना हीन दर्जा दिला आहे.

लिंगभेदाची सामाजिक उभारणी या प्रकरणात आपण पितृप्रधान संस्कृती कशी आहे व त्यामध्ये स्त्रियांचे स्थान काय आहे, कुटुंबातील तिचे स्थान व कुटुंबाबाहेर असणारी स्थिती या पैलूंचा अभ्यास करणार आहोत.

## १.२ संकल्पनात्मक समस्या/प्रश्न

**पितृसत्ताक कुटुंब पद्धती (पितृसत्तात्मकता)** (Patriarchy)

जगात सर्वत्र प्रामुख्याने पुरुषसत्ताक समाज व्यवस्था दिसून येते. अर्थात पुरुष प्रधानता या शब्दाला नवा अर्थ प्रामुख्याने पाश्चिमात्य देशात १९६० सालानंतर उदयाला आलेल्या स्त्री–मुक्तीवादी चळवळींनी दिला. त्यापूर्वीच्या काळात सरंजामशाही समाजात पुरुषांच्या परंपरा प्राप्त तसेच कुटुंबप्रमुख किंवा पिता या नात्याने असलेल्या प्रभुत्वाला पितृप्रधान समाजव्यवस्था असे नाव मिळालेले होते. अशा समाजातून राजकीय व आर्थिक रचना, पुरुषा–पुरुषांमधील संबंधातून निश्चित होत असे. १९६० नंतर प्रामुख्याने 'जहाल' स्त्रीवाद्यांनी जगातील सर्व ऐतिहासिक समाजव्यवस्था पुरुषशाही समाजव्यवस्थेची आहे अशी मांडणी केली. त्यांच्या मते, आजचे सर्व समाज मग ते आदिवासींच्या टोळ्यांपासून तर सुधारलेल्या भांडवलशाही अवस्थेतसुद्धा पुरुषसत्ताक असतात.

पुरुषप्रधानता म्हणजे लिंगभावाच्या शारीरिक जन्मदर कसोटीच्या आधारावर ठरवलेली श्रेणीबद्ध समाजव्यवस्था, उद्योगधंदे, तंत्रज्ञान विद्यापीठ, विज्ञान, राजकीय अधिकार, आर्थिक व्यवहार, पोलिसांच्या हातातील व्यक्ती म्हणजेच समाजातील सत्तेकडे जाणारी प्रत्येक वाट संपूर्णपणे पुरुषांच्या ताब्यात असते. अशा व्यवस्थेत भिन्नवर्ग, वंश किंवा संस्कृती यामध्ये

पुरुष भिन्न-भिन्न पायऱ्यांवर असतात. परंतु आपापल्या स्त्रियांवर वर्चस्व टिकविण्यात मात्र त्यांच्यात एकजूट व समान हितसंबंध असतात. बहुतेक सर्व समाजात जेथे समाजमान्य प्रतिष्ठित लैंगिक श्रमविभागणी दिसते तेथे स्त्रियांच्या श्रमाला कनिष्ठ दर्ज दिलेला आढळतो. पुरुषीसत्तेचा भौतिक पाया म्हणजे स्त्रियांच्या श्रमशक्तीवर व लैंगिकतेवर असलेले पुरुषांचे नियंत्रण होय. म्हणून स्त्रीवादी विचारसरणीनुसार पुरुषशाही ही विशिष्ट सत्तासंबंधाची व्यवस्था आहे. भारतीय संदर्भात पुरुषप्रधान व्यवस्था समजून घेताना भिन्न जात, वर्ग, जमात, धर्म यातील भिन्न अभिव्यक्तीचा विचार केला पाहिजे.

भारतात फार मोठ्या प्रमाणात पितृसत्ताक कुटुंबपद्धतीचा स्वीकार करण्यात आला आहे. पितृसत्ताक कुटुंबाच्याबाबत पुरुष हा केंद्रबिंदू असतो. आ ण त्यामुळे कुटुंबावर पुरुषांचे वर्चस्व असते. स्त्रियांना पितृसत्ताक कुटुंबात दुय्यम स्थान देण्यात आलेले असते. पित्याकडून वारसाहक्काच्या रूपाने संपत्तीचा वारसा (वाटा) मुलांकडे जात असतो. व कुटुंबाचे आर्थिक, सामाजिक, धार्मिक व्यवहार पार पाडीत असताना पुरुषाला अधिक महत्त्व देण्यात येते. अशा विविध व्यवहारांच्या संदर्भात स्त्रियांना फारसे महत्त्व देण्यात येत नाही. म्हणूनच अशा व्यवहारात स्त्रियांचे स्थान हे दुय्यम आहे. भारतातील ग्रामीण समाजात पितृसत्ताक कुटुंब पद्धतीचा व्यापक प्रमाणावर स्वीकार करण्यात आलेला आहे. कुटुंबातील वयस्क पुरुषाकडे कुटुंबातील सर्व अधिकारांचे आणि निर्णयांचे केंद्रिकरण झालेले असते. प्रत्येक पित्याचा जो ज्येष्ठ मुलगा असतो तोच कुटुंबाचा कर्ता असे मानण्यात येते आणि कुटुंबाची सर्व जबाबदारी त्याच्यावरच असते. विवाहानंतर पत्नीचे माहेराकडील असणारे कौटुंबिक स्वरूपाचे नाते कमी महत्त्वाचे ठरते. आणि सर्वस्वी पुरुषाच्या किंबहुना पतीच्या गोत्रातील एक सदस्य म्हणूनच स्वीकारण्यात येते. अशा कुटुंबातच जो परंपरागत व्यवसाय असतो त्या व्यवसायास सर्वजण मदत करीत असतात. कामाचे योग्य वाटत कुटुंबातील कर्ता पुरुष करीत असतो. आणि महत्त्वाचे निर्णय स्वत: घेत असतो आणि स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात येते. स्त्रियांचे कार्यक्षेत्र 'चूल आणि मूल' एवढ्यापुरतेच मर्यादित केलेले असते.

**व्याख्या :**

१)''ज्या कुटुंबाची औपचारिक सत्ता ही पुरुषाच्या हाती केंद्रित झालेली असते अशा कुटुंबास पितृसत्ताक कुटुंबपद्धती असे म्हणतात.''

२)''पितृसत्ताक कुटुंबपद्धती ही पित्याच्या नावाने चालत असते. ज्या कुटुंबाची निरंकुश सत्ता ही पुरुषाच्या हाती केंद्रित झालेली असतेुंब कुटु प्रमुख हा प रुषच असतो अशा कुटुंबास पितृसत्ताक कुटुंबपद्धती म्हणतात. हा कुटुंबप्रकार साधारणत: सर्वच समाजात पाहावयास मिळतो.

पितृसत्ताक कुटुंबपद्धती समाजात अनेक कारणांनी निर्माण झाली असावी असे मानले जाते. उदाहरणार्थ, जेव्हा समाजात संपत्तीचे महत्त्व वाढले तसेच संपत्तीचा संचय करणे महत्त्वाचे मानले जाऊ लागले तेव्हा ही कुटुंबपद्धती निर्माण झाली असावी असे मानतात. संपत्ती संरक्षण करण्याची जबाबदारी पुरुषाची असते असे मानले जाते. तसेच उत्पन्न वाढल्यानंतर, शेतीचा व्यवसाय निश्चित झाल्यानंतर, श्रमविभागणीचे तत्त्व रुजल्यानंतर पितृसत्ताक कुटुंब निर्माण झाले असावे असे मानले जाते. हजारो वर्षांपूर्वी अस्तित्वात असलेल्या रोमन आणि ग्रीक समाजात जेव्हा पितृसत्ताक कुटुंबाचे अस्तित्व दिसते तेव्हा ही कुटुंबपद्धती मातृसत्ताक

कुटुंबपद्धतीच्या आधी होती की काय? अशी शंका येते. अर्थात पुरुषांच्या महत्त्वाबरोबर ही कुटुंबपद्धती समाजात विकसित झाली असावी.

**पितृसत्ताक कुटुंबपद्धतीचे स्वरूप :**

या कुटुंबपद्धतीमध्ये पिता किंवा वयोवृद्ध माणूस हा कुटुंबप्रमुख असतो. ही कुटुंबपद्धती मातृसत्ताक कुटुंबपद्धतीच्या अगदी विरुद्ध आहे. भारतातील बहुतेक समाजात पितृसत्ताक कुटुंबपद्धती आज प्रचलित आहे. या कुटुंबपद्धतीत वंश पित्याच्या घरी निवास करतात. सर्व अधिकारांचे हस्तांतरण हे पित्याकडेच असतात. धार्मिक, आर्थिक कार्यक्रम पित्याद्वारे पूर्ण केले जातात. जगातील बहुतांश आदिवासी समाजातदेखील ही कुटुंबपद्धती प्रचलित असलेली दिसते. या कुटुंबपद्धतीत पुरुष हा सर्व प्रकारचे व्यवहार स्वत:च्या अधिकारात करीत असतो. कुलगोत्र पित्याचेच चालतात. वडीलमुलाला पित्यानंतर पित्याची भूमिका करावी लागते. पितृसत्ताक पद्धतीत जगात बऱ्याच ठिकाणी अस्तित्वात असली तरी सर्वत्र समान स्वरूपाची मात्र नाही.

पितृसत्ताक कुटुंबपद्धती ही नंतर निर्माण झालेली कुटुंबव्यवस्था आहे. पूर्वी मानव समाजात मातृसत्ताक कुटुंबपद्धतीचेच अस्तित्व सर्वव्यापी प्रमाणात होते. विवाहसंस्थेची निर्मिती झाल्यानंतर पुरुषसत्ताक व्यवस्थेचा उगम झाला आणि त्यातून पितृसत्ताक व्यवस्था अस्तित्वात आली.

**पितृसत्ताक कुटुंबपद्धतीची वैशिष्ट्ये :**

पितृसत्ताक कुटुंबपद्धतीच्या व्याख्या आणि स्वरूप लक्षात घेता त्यावरून या कुटुंबपद्धतीची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये विषद करता येतील ती पुढीलप्रमाणे

**१) पुरुषप्रधानता :**

या कुटुंबात पुरुषांना प्राधान्य दिले जाते. सर्वात जास्त वय असलेला पुरुष हा कुटुंबाचा प्रमुख नेता मानला जातो. पिता किंवा ज्येष्ठ भाऊ सर्व प्रकारची कामे कुटुंबात घडवून आणतात. विशेषत: आर्थिक आणि धार्मिक तसेच सामाजिक कार्ये पुरुषाकडून ठरविले जातात.

**२) वंशपरंपरा व वारसा :**

पितृसत्ताक कुटुंबपद्धती ही पितृवंशीय पद्धतीने देखील असते. या कुटुंबात वंशनाम पित्याचे असते. संस्कृती आणि वारसाहक्काने पुढच्या पिढीकडे हस्त ंतरित केले जाते. पुरुषांना धार्मिक कार्याचे प्रमुख मानले जाते.

**३) निवासस्थान :**

पितृसत्ताक कुटुंब हे पितृनिवासी कुटुंब आहे. विवाहानंतर वधू-वर हे वराच्या पित्याच्या घरी राहतात.

**४) स्त्रीयांचे दुय्यम स्थान :**

पितृसत्ताक कुटुंबात स्त्रियांना दुय्यम स्थान असते. कारण संपूर्ण कुटुंबाची सत्ता ही केवळ पुरुषाकडे केंद्रित झालेली आहे. त्यामुळे स्त्रियांना कमी महत्त्व असते.

वरील वैशिष्ट्यावरून हे स्पष्ट होते की, पितृसत्ताकुबफकु द्धती ही प रुषसत्ताक असते. पिता हाच कुटुंबाचा कर्ता असतो. वंशपरंपरा पित्याच्या नावाने चालत असते. कुटुंबाची

मालमत्ता आणि इतर अधिकार पित्याकडून मुलाकडे दिले जातात. जगात सर्वत्रच पितृसत्ताक कुटुंबपद्धतीचे अस्तित्व आढळून येते.

**पितृसत्ताक कुटुंबपद्धतीतील लिंगभेद :**

लिंगभेदाची समाजव्यवस्था निर्माण होण्यासाठी पितृसत्ताक कुटुंबप्रणाली बहुतांश प्रमाणात जबाबदार असलेली दिसून येते. या कुटुंबप्रकारात पित्याच्या वंशाला अधिक महत्त्व प्राप्त झाल्याने स्त्रियांचे दुय्यम स्थान निश्चित झाले. पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये कुटुंबातील सत्ता, अधिकार, हक्क, निर्णयप्रक्रिया पुरुषाकडे नियंत्रित झालेली आहे. स्त्रियांचे स्थान हे केवळ कुटुंबाच्या सातत्यासाठी किंवा वंशवृद्धीसाठी मर्यादित झालेले आहे. त्यामुळे स्त्रियांना केवळ उपभोग्य वस्तू म्हणून पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये स्थान प्राप्त झालेले आहे. त्यामुळे स्त्रियांना कुटुंबात हक्क, अधिकार, वारसा, व्यक्तिस्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्य यापासून अलिप्त ठेवले जाते. या सर्व गोष्टींमुळेच स्त्रियांना दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे. आणि म्हणूनच प्राचीन काळापासून आजतागायत स्त्रिया या कुटुंबापुरत्याच मर्यादित झाल्या असल्यामुळे किंवा त्यांच्याकडे पाहण्याचा गौण दृष्टिकोन लिंगभेदाची समाजरचना निर्माण करते. म्हणून पितृसत्ताक कुटुंबव्यवस्था ही लिंगभेदाची व्यवस्था नि**र्मा**ण करण्यात हत्त्वाची भूमिका बजावत असते.

**१) समाजाची लिंग पक्षपाती संरचना :**

भारतीय समाजव्यवस्थेत पुरुषप्रधान व्यवस्था असल्यामुळे अधिकाधिक अधिकार पुरुषाकडे हस्तांतरित झालेले आहे. यामुळे त्यांचे अतिरेकी व्यक्तिकरण होऊन त्यांच्या स्वच्छंदी वृत्तीचा अतिरेकी अंतर्भाविलेल्लोल्दिसून येता . स्त्रीयांना मात्र अशा प्रकारच्या अधिकारापासून वंचित ठेवले जाते. त्यामुळे समाजात लिंग पक्षपाताची संरचना पाहावयास मिळते. स्त्री आणि पुरुषामध्ये फरक केला जातो. हा फरक इतका पराकोटीचा आहे, की स्त्रीकडे मानव म्हणून पाहण्याऐवजी स्त्री म्हणूनच पाहिले जाते.

**२) वारसाहक्क :**

पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत पित्याची किंवा **पु**रुषाची ज्या द्धतीने अधिसत्ता असते त्याचप्रमाणे त्याला वारसाहक्क मिळत असतो. हे पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत मुलाला पित्याचा वारसा मिळालेला असतो, तर मुलींना वारसाहक्कापासून **वं**चित ठे ले जाते. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत मुलींना संपत्तीचा वाटाही मिळत नाही. आणि पित्याच्या संपत्तीवर त्यांना अधिकारही सांगता येत नाही. पक्षपाती वृत्तीस प्रोत्साहन पितृसत्ताक कुटुंबपद्धतीकडून मिळत असते. सद्यस्थितीत स्त्रियांना कायद्याच्या पाठिंब्यामुळे **पि**त्याच्या सं त्तीत वारसाहक्क मागता येतो. तरीदेखील स्त्रियांना हा हक्क मिळविण्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागतात. बहुतांश स्त्रियांना वारसाहक्क माहीत देखील नाही. त्यामुळे त्यांना आपला अधिकार मिळविता येत नाही. कारण पुरुषाकडे संपूर्ण कुटुंबाची सत्ता हस्तांतरित झाली आहे. तो म्हणेल ती पूर्वदिशा समजून कुटुंबाचा कारभार चालत असतो.

**३) एकांगी निर्णयप्रक्रिया :**

पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत कुटुंबाची संपूर्ण अधिसत्ता ही पुरुषाच्या हाती केंद्रित झाल्यामुळे कुटुंबांतर्गत एकांगी निर्णयप्रक्रिया पाहावयास मिळते. ज्याअर्थी स्त्रियांचे दुय्यम स्थान आहे त्याअर्थी त्यांचा निर्णयप्रक्रियेत सहभाग हा नसतोच जो काही निर्णय पुरुष मंडळींकडून घेतला

जातो त्याचे समर्थन व अनुकरण एवढीच भूमिका स्त्रियांच्या हाती असते. एखादा निर्णय चुकीचा जरी असेल तरीही त्यात स्त्रियांना आपले मत व्यक्त करण्याचा अधिकार नसतो. सुशिक्षित स्त्रियांनाही अशाच प्रकारचे वर्तन आपल्या कुटुंबातच करावे लागते.

**४) स्त्री–शिक्षणाची गरज :**

पितृसत्ताक कुटुंबात स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवले जाते. स्त्रियांच्या शिक्षणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले दिसून येते. कारण प्रचलित समाजव्यवस्थेत असा विचार पाह वयास मिळतो की, स्त्रियांना कुटुंबाची कामे करावयाची आहेत, तेव्हा त्यांना शिक्षण घेण्याची काय गरज? असा विचार केला जातो.

**५) मुलांच्या वृतीचे समर्थन :**

पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत पुरुषप्रधान व्यवस्था असल्यामुळे पुरुषांच्या कृतीचे समर्थन केले जाते. मग ते योग्य असो वा नसो त्यांना सर्व काही करण ाचा अधिकार आहे, असे म्हटले जाते. तसेच स्त्रियांच्या हातून एखादे वेगळे काम झाले की, पारंपरिक समाजव्यवस्थेस मान्य नसले तरी तिला त्या व्यवस्थेचा रोष पत्करावा लागतो. कुटुंबाच्या विरोधास सामोरे जावे लागते. त्यामुळे स्त्रियांच्या बाबतीत पक्षपाताची भूमिका घेतली जाते आणि पुरुषाचे समर्थन केले जाते. वडिलांकडून मुलांच्या वाईट सवयीचे समर्थन केले जाते.

**६) विधवा विवाहास विरोध :**

पितृसत्ताक कुटुंबात विधवा विवाहास विरोध केला जातो. परंतु पुरुष जर विधुर असेल तर त्यास पुनर्विवाहास मान्यता मिळते. त्यामुळे समाजात विधवा हिलांच्या समस्यात वृद्धी झालेली दिसते. परंतु सद्यस्थितीत काही प्रमाणात बदल झालेले पाहावयास मिळतात. परंतु ज्या समाजव्यवस्थेत पितृसत्ताक कुटुंबपद्धती आहे त्या समाजव्यवस्थेत पुरुषांच्या बाजूने निर्णय घेतले जातात.

**७) बहुपत्नी प्रथा :**

पितृसत्ताक व्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. त्यामुळे मुलांना अधिक महत्त्व दिले जाते. वंशाचे सातत्य ठेवण्यासाठी पुरुष मुलाच्या लालसेपोटी अनेक स्त्रियांशी विवाह करतात. तसेच आपल्या पुरुषत्वाची कल्पना देण्यासाठी देखील अनेक पत्नी करण्यासाठी पितृसत्ताक कुटुंब पद्धतीमध्ये बहुपत्नीत्वाच्या प्रचलनास समर्थन केले जाते. म्हणून पितृसत्ता कुटुंबपद्धतीत बहुपत्नी प्रथेचे अस्तित्व दिसून येते.

**८) घटस्फोटाला विरोध आणि बालविवाहास प्राधान्य :**

पितृसत्ताक समाजव्यवस्थेत घटस्फोट घेण्याचा अधिकार देखील पुरुषांना आहे. स्त्रियांना घटस्फोटाची मागणीही करण्याचा अधिकार पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत नाही. पुरुषांची जेव्हा इच्छा असेल तेव्हा तो पत्नीचा त्याग करू शकतो. परंतु स्त्रियांना स्वेच्छेने घटस्फोट घेण्याचा अधिकार मात्र नाही. तसेच या कुटुंबप्रकारात बालविवाह प्रामुख्याने प्रचलित आहेत. लहान वयात मुलीचे विवाह करून जबाबदारीतून मुक्त होण्यास प्राध न्य दिले जाते. घरातील महिलांना विवाहाची इच्छा नसताना मान्यता द्यावी लागते. विवाहास अनुकूल वातावरणात, वय, वराची निवड, इच्छा, आकांक्षा बाजूला सारून केवळ घेतल्या गेलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे किंवा त्यास संमती देणे याशिवाय स्त्रियांच्या ह ती काहीही राहत नाही.

त्यामुळे बालविवाहासारखी क्रूर पद्धती आजही पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत प्रचलित आहे.

**९) दुटप्पी लैंगिक नीती :**

स्मृतिकारांनी पुरुषाला अनेक स्त्रियांशी विवाह करण्याची, विधुरास विवाह करण्याची मुभा दिली आहे. स्त्रीलाही बालवयात वैधव्य आले तरी पुनर्विवाह नाकारला. स्त्री जर गर्भवती असेल, पुरुषांनी आपली गरज भागविण्यासाठी इतर मार्गाचा अवलंब केल्यास हरकत नाही असे चित्र दिसून येते. एखाद्या परपुरुषाशी स्त्रियांनी बातचीत केल्यासही तिला भ्रष्ट, दुराचारी, व्यभिचारी असे संबोधले जाते. कुटुंबातून तसेच समाजातून बहिष्कृत केले जाते. पितृसत्ताक व्यवस्थेत पुरुषांच्या बाजूने नियमनांबाबत शिथिलता पाहावयास मिळते. त ाच्या प्रत्येक क्रियेचे समर्थन केले जाते. तसेच स्त्रियांविषयी दुटप्पी धोरण आखले जाते. मग त लैगिकतेच्या बाबत असो अथवा अधिकारांच्या बाबतीत असो.

**१०) राजकीय कार्यात प्रवेश बंदी**

पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत स्त्रियांना राजकीय कारकिर्दीपासून अलिप्त ठेवले जाते. त्यांना केवळ कुटुंबापुरतेच मर्यादित राहावे लागते. क्वचितच प्रमाणात स्त्रियांना राजकारणात प्रवेश दिला जातो. तोही पुरुषांच्या नियंत्रणातच पुरुषप्रधानतेमुळे अगोदर प्राधान्य हे पुरुषांना दिले जाते. स्त्रियांना बुद्धीची कामे झेपणार नाहीत, त्यांनी चूल आणि मूलच सांभाळावे या विचारास प्राधान्य देऊन स्त्रियांना कुटुंबाव्यतिरिक्त इतर क्षेत्रात जाण्यास परवानगी नसते.

**११) जोडीदार निवडीवर मर्यादा**

**१२) सतीप्रथा**

**१३) पडदा पद्धती**

**१४) जरठ कुमारी विवाह**

**सारांश :**

भारतीय तसेच इतर समाजात देखील पितृसत्ताक कुटुंबपद्धती अस्तित्वात आहे. त्यानुसार त्या त्या देशातील विकासाचा दर कमी-अधिक प्रमाणात आहे. जोपर्यंत स्त्रियांना समानतेची वागणूक मिळत नाही तोपर्यंत कोणत्याही देशाचा विकास योग्य दिशेने होणार नाही. त्यामुळे पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत जोपर्यंत समानता ेणार नाही तोप र्यंत सम जात समानतेवर आधारित क्रिया किंवा वर्तन होणार नाहीत. त्यामुळे अगोदर समानतेची विचारप्रणाली तयार होणे आवश्यक आहे.

थोडक्यात पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये लिंगभेदाची मानसिकता असते म्हणून सामान्यत: स्त्रियांना सत्ता प्राप्तीपासून वंचित ठेवले जाते आणि त्यांच्यातील केवळ सेवाभाव या संकल्पनेच्या अवतीभवती स्त्रियांची कार्ये मर्यादित केली जातात. अशा समाजव्यवस्थेमध्ये जी श्रमविभागणी होते ती पुरुषांचे हीत लक्षात घेऊन केलेली असते. कुटुंबातील कार्ये असो किंवा समाजातील इतर कोणतीही कार्ये असोत त्यामध्ये स्त्रियांकडे सोपविलेली कार्ये ही अर्थकारणाशी संबंध असलेली आहेत. यावरून हे लक्षात येते आणि ही व्यवस्थाच स्त्रियांची दास्यत्वाची स्थिती व गुलामगिरीची स्थिती स्पष्ट करण्यात सहाय्यभूत ठरली आहे. समाजामध्ये ज्या काही संस्था - संघटना आहेत त्या पुरुषसत्ताकच आहेत.

**प्रश्न**

१) पितृसत्ताक कुटुंबपद्धतीचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) पितृप्रधान किंवा पितृसत्तात्मक कुटुंबातील लिंगभेद स्पष्ट करा.

३) स्त्रीशिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करा.

**ब) लिंग आणि लिंगभेदातील फरक/भेद किंवा लिंगभेद आणि लिंग यातील फरक**

लिंगभेद आणि लिंग (लैंगिक) या दोन भिन्न संकल्पना आहेत. लिंगभेद शब्दाचा उपयोग किंवा त्याचे तात्पर्य पुरुषात्मक दृष्टिकोनातून मानले जाते तर स्त्रियांना ते निर्मिती केली जाते. पुरुषात्मक आणि स्त्रियात्मक हे दोन वर्गात सामाजिक स्वरूपात दिसून येतात. त्यातून भिन्न संस्कृती आढळून येते. गेल्या काही वर्षापासून सामाजिक शास्त्रामध्ये लिंगभेदाच्या सामाजिक स्वरूपाला त्याच्या जैविक स्वरूपापासून वेगळे केले आहे. अर्थात लिंगभेद (सामाजिकीकरणानुसार) लैंगिक हे जैविक वर्गीकरण आहे तर लिंगभेद ही सामाजिक निर्मिती आहे.

अन्न ओकले हे आपल्या सेक्स, जेंडर आणि सोसायटी या १९७२ साल लिहिलेल्या ग्रंथात म्हणतात की, लैंगिकता ही जैविक आहे, जी स्त्री आणि पुरुषांचे जैविकदृष्ट्या विभाजन करते, तर लिंगभेद हा स्त्री आणि पुरुषांमधील समांतर आणि सामाजिकदृष्ट्या असमान विभाजन आहे.

लिंगभेद ही अशी एक संकल्पना आहे जी जैविक लिंगभेदाच्या विरुद्ध आहे. काही वर्षांपासून सामाजिकशास्त्रामध्ये लिंगाच्या सामाजिकतेचा त्याच्या जैविक गटापेक्षा वेगळे म्हणजेच लिंगभेद या संकल्पनेमध्ये अभ्यास केला जात आहे. साधारणत: जेंडर ही संकल्पना सेक्स डिफरन्सला वापरली जाते. परंतु समाजशास्त्रामध्ये लिंगभेद ही स कल्पना लिंगात्मक आधारे केल्या गेलेल्या विषम स्थितीची निर्मिती करण्याच्या हेतूने विचार केला जातो. ओकले यांनी आपल्या ग्रंथात सेक्स या शब्दाला महत्त्व प्राप्त करून दिले आहे. त्यांच्या मते, लैंगिकता याचा अर्थ पुरुषांच्या आणि स्त्रियांच्या जैविक विभाजनावर आधारित आहे. सामाजिक भिन्नतेच्या दृष्टीने लिंगभेद याचा विचार न करता सांस्कृतिक आदर्श आणि पुरुषत्व तसेच अधिकारत्वासंबंधी रूढीबद्ध विचारासंबंधी आणि संरचनात्मक अर्थाने सामाजिक संस्था आणि संघटनांनी लिंगभेदाचा अर्थ हा लैंगिक श्रमविभाजनाशी घेतला आहे.

**व्याख्या :**

१) लिंगभेद अशी एक संकल्पना आहे जी जैविक लिंगभे च्या विरुद्ध आह .

२) सामाजिकशास्त्रामध्ये लिंगाच्या सामाजिकतेला वैयक्तिकतेच्या जैविक गटापेक्षा वेगळे करणे म्हणजेच लिंगभेद होय.

**लिंग :**

**व्याख्या :**

स्त्री-पुरुषांमधील जैविक भेद म्हणजेच लिंग होय.

स्त्री-पुरुषांच्या भूमिकेचे निर्धारण व वर्तन भाषा, नियमने याविषयीची शकवण ही सामाजिकीकरणातूनच दिली जाते. ज्यामुळे कालांतराने व्यक्ती लिंगभेद करण्यास प्रवृत्त होत

असते. लहान मुलाचे मन हे कोऱ्या पाटीप्रमाणे असते, त्यावर जे बालवयात लिहिले गेले ते आयुष्यभर त्याच्या सोबत असते. त्यामुळे लिंगभेदास अधिक प्रमाणात सदोष सामाजिकीकरण जबाबदार आहे. सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे जैविक मानव प्राण्याचे विघटन केले जाते. मानवाचे मूल जेव्हा जन्माला येते तेव्हा ते एक जैविक प्राणी असते आणि नंतर सामाजिकीकरणाद्वारे त्या व्यक्तीचे सामाजिक प्र ण्यात रूपांतर होते आणि सामाजिक प्राण्यात रूपांतर होत असताना संस्कार होत असतात ेव्हा त्या बाळावर स्त्री-मूल्य व पुरुषमूल्य बिंबवली जातात. ज्यामुळे जैविक प्राण्याला स्त्रीमध्ये व पुरुषामध्ये रूपांतरित केले जाते. प्रसिद्ध स्त्रीवादी विचारवंत बेट्टी फ्रिडम यांनी असे म्हटले आहे की, बाळ जन्माला आल्यानंतर ते जैविक प्राणी म्हणून जन्माला येते. जन्माला आल्यानंतर स्त्री किंवा पुरुष तयार केले जातात म्हणजेच स्त्री **व** पुरुष हे जै कतेकडून सामाजिकतेकडे वळतात.

लैंगिकता आणि लिंगभेदाची पातळी ही जैविक भेदावर न करता सामाजिक भेदावर केली आहे. कारण नर आणि नारी हा भेद निसर्गत:च आहे. निसर्गाने त्यांची शरीररचना भिन्न ठेवलेली आहे. ही भिन्नता म्हणजेच लैंगिकता होय. परंतु बऱ्याचदा या शारीरिक वा जैविक भेदाची गल्लत सामाजिक सांस्कतिक भेदाशी केली जात आहे. त्यातूनच लिंगभेद ही सामाजिक संकल्पना निर्माण झाली आहे. स्त्री ही निसर्गत: नाजूक, गोड, लाजरी, मर्यादाशील, विनयशील असते असे म्हटले जाते तेव्हा खरे पाहता शारीरिक व जैविक गुणांशी त्याचा काहीही संबंध नसतो तर समाजाच्या व संस्कृतीच्या स्त्रीविषयीच्या अपेक्षा स्त्रीवर आरोपित केल्या जातात. मर्दानीपणा आणि जनानीपण किंवा स्त्रैम्य यांच्यात केल्या जाणाऱ्या भेदाचा संबंध शरीर भेदाशी नसून सामाजिक, सांस्कृतिक अपेक्षांशी आहे. तेव्हा नारीत्व ही सामाजिक-सांस्कृतिक पातळीवर निर्माण झालेली संकल्पना आहे आणि हाच मूलभूत फरक लैंगिक व लिंगभेद होय.

१९७० सालाच्या जवळपास लिंगभेदावर अध्ययन करण्यास सुरुवात झाली. यामध्ये समाजशास्त्र आणि मानसशास्त्र पुढे होते. आजपर्यंत लिंगभेदाकडे स्त्री-पुरुष ंमधील जैविक भिन्नतेच्या दृष्टिकोनातून पाहिले जात असे. तसेच पुरुषत्व आणि स्त्रीत्वासंबंधी सांस्कृतिक रूढीवादी विचारसरणी अस्तित्वात होती. जात वास्तवतेला स्थान नव्हते. विविध समाजात लैंगिक संबंधाचे स्वरूप भिन्न आहे. ऐतिहासिक काळ, जम ती आणि जातीसमूह तसेच सामाजिक वर्ग आणि अंतरपिढ्यांमध्ये हे स्वरूप दिसून येते. तरीही स्त्री-पुरुषांमधील अंतराबाबत सर्व समाजामध्ये समानता दिसून येते. ही असमानता लिंगभेद असमानतेमध्ये दिसून येते. सामाजिक जीवनात लिंगभेदाची रचना आणि अभिव्यक्ती केली जाते. ही संस्कृती, विचारधारा आणि तार्किक धारणांपर्यंत मर्यादित नाही तर घरातील लैंगिक व लिंगभेद श्रमविभाजनापासून ते श्रमिक बाजारपेठ, राज्यव्यवस्था, कामवृती (मैथून) भावना, हिंसात्मक रचना आणि सामाजिक संगठन अशा विविध सामाजिक क्षेत्रात लिंगभेद दिसून येतो.

पुरुषवादी मिथक आणि स्त्री उपेक्षा पाहता आपल्या भारतात महिलांच्या संख्येच्या अंतराचे कारण हे सामाजिक-आर्थिक परिस्थिती आहे. ज्यामध्ये महिला आणि बालिका (लहान मुली) जीवन जगण्यास बांधील आहेत. आपल्या समाजात मुलीकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा तिला उपेक्षित करण्याचा, घरातील ओझे, अर्थहीन से मानले जाते. घरात मुलापेक्षा मुलीला प्रत्येक गोष्टीत वेगळी वागणूक देण्याचा प्रयत्न केला जातो. केवळ सहन

करणे हा एक संस्कार तिच्यावर बालवयात एवढा बिंबविला जातो की, तो तिच्या जीवनाचा एक भाग बनतो. लहानपणापासून मुलीने विनयशील, नम्र आत्मसमर्पण करण्यास सदैव सज्ज, सेवा करणे तसेच अधिकाराची लालसा न ठेवणे अशा प्रकारे तिचे सामाजिकीकरण केले जाते. मुली आणि स्त्रियांच्या आहार, आरोग्य, स्वच्छतेच्या बाबतीत भेदभाव केला जातो. लसीकरणाच्या बाबतीतही असाच भेद दिसून येतो. आजचे लिंग प्रमाण पाहता पुरुषांच्या तुलनेत महिलांचे प्रमाण दिसेंदिवस कमी होत असतान दिसून येते. स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण खूप वाढले आहे.

भारतीय साहित्यामध्ये देखील स्त्रीप्रतिभा ही हीन दर्जाचीच असलेली दिसून येते. कारण स्त्री साहित्य असो अथवा इतर साहित्याचा प्रकार त्यास्त्री ही शोषित, शोषिक, अबला, सौंदर्य, भोग विलासी, सेविका, घर फोडणारी, इ. रूपात तिला रेखांकित केले जाते.

भारतीय समाजव्यवस्थेत मुलामुलींच्या लिंगभेदामध्ये कपडे, खेळ, खेळणी, आहार तसेच मुलीने जोरात हसू नये, मोठ्याने बोलू नये असे तिच्यावर निर्बंध घातले जातात. आजच्या परिस्थितीत तर मुली-महिलांवरील अत्याचारात प्रचंड माणात वाढ झाली आहे मग ते बलात्कार असो, हुंडाबळी, विनयभंग, अथवा स्त्री-शोषण यावरूनच समाजात स्त्रीचे असलेले स्थान दिसून येते. त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा सर्वात मोठा प्रश्न समाजासमोर आहे.

थोडक्यात लिंगावरून जो आज भेद केला जात आहे त्याचे सामाजिक रूप फार भयंकर आहे. जैविक दृष्टिकोनातून केवळ लिंगाधारे निसर्गाने स्त्री-पुरुषात भेद केला आहे. परंतु मानवाचे त्यांचे सामाजीकीकरण अशा प्रकारे केले आहे, ी आज मानव जन्म हा अभिशाप ठरत आहे. अशा प्रकारे लिंग (लैंगिक) आणि लिंगभेदातील अंतर किंवा फरक आपल्या लक्षात येईल.

**प्रश्न :**

1) Explain the Difference between Sex & Gender.
   लिंग आणि लिंगभेद यातील फरक स्पष्ट करा.

**१.२.२.) स्त्रीया जैविकी संस्कृती आणि समाज** (Women Biology Culture & Society)

**१) स्त्रियांमधील जैविक भिन्नत्व :**

(Biological difference in Women)

जैविक घटक हादेखील लिंगभेदासाठी परिणाम करणारा घट आहे. परंतु निसर्गाने केलेल्या सूक्ष्म फरकाने लिंगभेद केला जातोच स्त्री -पुरुष ना क वळ जैविक घटक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात नाही. तर जैविक फरकाचा आधार घेऊन त्यांना विषम वागणूक दिली जाते. यामागे पुरुषप्रधान संस्कृतीचा वैचारिक दृष्टिकोन आहे. जेव्हा जैविक घटकांचा विचार केला जातो, काही बाबतीत स्त्री-पुरुषात समानता आहे तर काही बाबतीत विषमता आहे, या समानतेच्या आणि विषमतेच्या आधारे किंवा या समतेच विषमतेचा आधार घेऊन लिंगभेद केला जातो. ज्यामुळे दैनंदिन जीवनात लिंगभेद पाहावयास मिळतो.

जैविकतेच्या मापनात लिंगभेदात्मकदृष्ट्या ज्या समान व विषमता दर्शवितात त्या ठळक बाबी पुढीलप्रमाणे –

**जैविक भिन्नता :**

जैविक भिन्नतेमुळेच स्त्री–पुरुषामध्ये काही प्रमाणात वेगवेगळ्या भावना जागृत होत असतात. लिंगभेद निर्धारित करण्याकरिता जीवशास्त्रीय तसेच मानवशास्त्रीय घटक बरेचसे महत्त्वपूर्ण आहेत. गर्भावस्थेमध्ये जैविक बाबी असे निश्चित रत त की, गर्भात असलेले बाळ मुलगा आहे की मुलगी.

स्त्री–पुरुषामध्ये जैविक भिन्नता दर्शविणारे काही घटक खालीलप्रमाणे –

**१) गुणसूत्रात्मक लिंग :**

गर्भधारणेच्या वेळी आई–वडिलांमध्ये ज्या फलित ग्रंथी असतात (त्यामध्ये पुरुष ४६, स्त्री २५) त्या एकत्रित गुणसूत्राच्या जोडीमध्ये लिंग निश्चित करणारे दोन गुणसूत्र एक्स आणि वाय हे असतात. स्त्रीमध्ये लिंग निश्चित करणाऱ्या जोडीमध्ये एक्सएक्स तर पुरुषामध्ये एक्सवाय हे दोन्ही प्रकारचे गुणसूत्र दिसून येतात. गर्भधारणा कोणत्या गुणसूत्राने झाली हे बाळाच्या लिंगनिश्चितीनंतरच होत असते. स्त्रीमध्ये केवळ एक्सएक्स हा एकमेव गुणसूत्र असल्यामुळे यापैकी कोणतेही गुणसूत्र गर्भात राहू शकते. वडिलाकडून गर्भाला एक्स गुणसूत्र मिळाले तर मुलगी आणि वाय गुणसूत्र मिळाले तर मुलगा हा जैविक भेद त्या गर्भात निर्माण होतो. यावरून ही गोष्ट लक्षात येते, की स्त्रियांना मुलगा किंवा मुलगी होणे हे स्त्रीवर निर्भर नसून ते पुरुषावर निर्भर आहे.

**२) लिंगग्रंथी :**

लिंगग्रंथी निर्माण होणे ही एक महत्त्वपूर्ण घटना आहे. गर्भधारणेच्या नंतर दोन महिन्यापर्यंत गर्भात मुलगा आहे की मुलगी हे निश्चित होऊ शकत नाही. कारण गर्भाची दोन महिन्यापर्यंत शरीररचना समान असते. गर्भाचे हात, पाय, हृदय, मूत्रपिंड आणि प्रजनन उत्पादन समान असतात. दोन महिन्यापर्यंत मुलगा आणि मुलगी यांची लैंगिक ग्रंथी आणि बाह्य जनेंद्रिय सुप्त अवस्थेमध्येच असतात. तिसऱ्या महिन्यामध्ये मुलीमध्ये अंडाशय आणि मुलांमध्ये विर्याशय निर्माण होते. लिंगनिश्चितीकरिता अंडाशय आणि विर्याशय यांचे काम पुढे चालून महत्त्वाचे होते. विर्याशयामध्ये निर्माण होणारे स्राव पुरुषामध्ये जनेंद्रिय गतिमान करीत असतात.

**३) लिंगग्रंथी स्राव :**

पुरुषाच्या विर्यामधून अंड्रोजन नामक तरल पदार्थ निर्मित होत असतो. अंड्रोजन या पदार्थामुळे पुरुष इंद्रियांचा विकास होत असतो. परंतु या प्रकारचा पदार्थ स्त्रियांमध्ये आढळून येत नाही. अशा प्रकारे स्त्री–पुरुषातील महत्त्वाची जैविक भिन्नता आहे.

**४) लिंगसंयोगी आंतरइंद्रिय :**

जेव्हा जीव गर्भाशयात असतो तेव्हा अंड्रोजनामुळे पुरुष ग्रंथी वीर्य उत्तेजक नलिका तसेच लिंग इत्यादी अंतर्ज्ञान इंद्रिय विकसित होत असतात. अंड्रोजनाच्या अभावामुळे गर्भाशयात स्त्रियांची योनी इत्यादी लैंगिक इंद्रिय विकसित होत असतात.

**५) बाह्यलिंगाविष्कार :**

कोणताही जैविक घटक जन्माला आल्यानंतर तो मुलगा आहे किंवा मुलगी हे निश्चित

करण्याचे काम बाह्य लिंग करीत असते. त्यानंतर त्या जैविक घटकांचे त्याच्या लिंगभिन्नतेच्या आधारावर पालनपोषण केले जाते. बाळोलमुलगा आह की मुलगी याविषयीचे प्रशिक्षण त्याला पालनपोषणाच्या प्रक्रियेमधून दिले जात असते.

**६) शरीररचनेत भिन्नता :**

स्त्री आणि पुरुषात काही शारीरिक भेद आढळून येतात. जेव्हा एखादे बालक युवा अवस्थेकडे जात असते तेव्हा त्याच्यामध्ये काही शारीरिक बदल हेतात. त्यामध्ये मुलांच्या भुजा बलदंड होतात आणि खांदे रुंद होतात. मुली जेव्हा युवा अवस्थेत जातात त्यावेळेला त्यांच्या पोटाचा काही भाग मोठो.होतोण पुढ गर्भावस्थेत गर्भाची वाढ त्या भागात योग्य पद्धतीने होण्यास साहाय्यता होते. स्त्रियांच्या चालण्यामध्ये आकर्षण विकसित होत जाते. स्त्रियांच्या स्तनाचा आकार वाढतो. आवाज नाजूक होतो, तर पुरुषांना दाढी-मिशा येत असतात आणि काही प्रमाणात त्यांच्या आवाजातही बदल होत असतो.

**जैविक समानता :**

स्त्री-पुरुषामध्ये ज्याप्रमाणे जैविक भिन्नता पाहावयास मिळते त्याप्र णेच त्यांच्यात जैविक समानताही आढळून येते. ज्यामुळे स्त्री-पुरुषामध्ये केला जाणार भेद स्पष्ट करण्याकरिता ज्या ज्या घटकांचा आधार घेतला जातो ते घटक किती सूक्ष्म आहेत हे सहज निदर्शनास येते. जैविक समानतेचा विचार केला असता स्त्री-पुरुषात कोणताही भेद नाही हे स्पष्ट होते. जैविक समानता म्हणत असताना स्त्री-पुरुषाच्या मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करणे या गोष्टीला अग्रक्रम देतो.

**बौद्धिक क्षमता :**

बौद्धिक क्षमतेचा अंतर्गत विचार करताना निसर्गत: ऐके गोष्ट स्पष्ट होत की, स्त्री-पुरुषांना बौद्धिक क्षमता निसर्गाने समान तत्त्वावर बहाल केली आहे. काही अंशी त्यांच्यामध्ये असा फरक आढळून येतो की बाल्यावस्थेपासूनुवावस्थेप र्यंत म लीची बौद्धिक क्षमता ही मुलाच्या तुलनेत अधिक प्रमाणात असते. अलीकडेच एकत्र सर्वेक्षणांतर्गत असे आढळून आले आहे, की अमेरिकास्थित भारतीय वंशाच्या मुलीचा अ यक्यू गॅलिलिओ, आइनस्टाइन यांच्यापेक्षा थोडा जास्त आहे. बाल्यावस्थेपासूनते यु वस्थेपर्यंत म लीची बौद्धिक क्षमता ही मुलाच्या तुलनेत अधिक प्रमाणात असते. प्रौढावस्थेपासून ते वृद्धावस्थेपर्यंत पुरुषांची बौद्धिक प्रगल्भता निश्चित होते. स्त्री-पुरुषांच्या बौद्धिक कौशल्यास मी लेखले जाते, तर पुरुषांच्या बौद्धिक क्षमतेला श्रेष्ठ समजले जाते.

**२) भावनिक क्षमता :**

ज्या पद्धतीने स्त्री-पुरुषांची बौद्धिक क्षमता ही समान आहे त्याप्रमाणे स्त्री-पुरुषांची मानसिक स्थितीदेखील समान आहे. ही समानता प्रामुख्याने निसर्गने सर्वांनाच सारख्याच प्रमाणात दिलेली आहे. ज्यांच्या आधारे लिंगभेद केला जातो जो की निरर्थक आहे. समाजात असा समज आहे की, स्त्रिया या पुरुषांपेक्षा अधिक भावनिक आहेत. परंतु बौद्धिक आणि मानसिक पातळीवर लिंगभेद करणे अयोग्य आहे. परंतु समाजात पाहिले तर निसर्गत: भावनिक भेद केलेला नाही. भावनिक पातळीवर स्त्री-पुरुष समान आहेत.

**३) भाषिक क्षमता :**

कोणत्याही समाजव्यवस्थेत स्त्री-पुरुषात भाषेच्या आधारावर लिंगभेद केला जात नाही. किंवा तसे करणे अयोग्य आहे. साधारणत: ही भाषिक समानता जगातील प्रत्येक समाजात पाहावयास मिळते. स्त्रीयांसाठी किंवा पुरुषांसाठी वेगळी भाषा पाहावयास मिळत नाही. जैविक तत्त्व लक्षात घेतले तर जन्मापासून ज्या समाजात आपण वावरत असतो तीच भाषा आत्मसात केली जाते. प्रत्येक व्यक्ती जैविक प्राणी आहे आणि समाजात वावरत असताना तो स्त्री किंवा पुरुष म्हणत असतो. ज्याअर्थी प्रत्येक व्यक्ती त्या त्या समाजाची सामान्य भाषा आत्मसात करते त्यामुळे जैविक समतेत भाषिक समानतेचाही सहभाग असतो.

**४) भूक व तहान :**

प्रत्येक व्यक्ती म्हणजेच स्त्री-पुरुषांना जैविक समानतेत आणखी एक महत्त्वाची समानता आढळून येते ती म्हणजे भूक व तहान होय. जी की स्त्री-पुरुषामध्ये समान स्वरूपात पाहावयास मिळते. ज्याला मानवशास्त्रीय भाषेमध्ये जैविक प्रेरणा असे म्हटले जाते. ज्यात भूक आणि तहान तसेच मलमूत्र विसर्जन यासारख्या बाबी समाविष्ट आहेत. या सर्व प्रेरणा जशा पुरुषामध्ये आढळून येतात तशाच त्या स्त्रियामध्येही आढळून येतात. अन्न आणि पाण्याची आवश्यकता प्रत्येक प्राणिमात्रामध्ये आहे. त्यानुसार स्त्री-पुरुषानुसार आपले जीवन जगण्याकरिता त्या गरजा पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. ज्यामुळे जैविक प्रेरणेच्या माध्यमातून कसल्याही प्रकारचा भेद नसल्याचे आढळून येते. म्हणजेच त्यांच्यात जैविक प्रेरणांच्या संदर्भात समानता आढळून येते.

**५) कामवासना**

शारीरिकदृष्ट्या विचार केला तर आणखी एका बाबतीत समानता पाहावयास मिळते ती म्हणजे अन्न-पाण्याप्रमाणेच प्रत्येक पुरुषांना आणि स्त्रियांना कामवासना ही समान तत्त्वावर प्राप्त झालेली आहे. दोन्ही गटांची शारीरिक गरज भागविणे अत्यंत आवश्यक असते त्यामुळे स्त्री-पुरुषांना कामवासनेसंदर्भातील गरज भागविणे निसर्गत: अनिवार्य आहे. फरक एवढाच आहे की, हे प्रमाण दोन्ही गटांत कमी - अधिक प्रमाणात असू शकते.

**६) समान ज्ञानेंद्रिय :**

स्त्री आणि पुरुषांच्या ज्ञानेंद्रियामध्ये कोणत्याही प्रकारचे फरक पाहावयास मिळत नाहीत. जे ज्ञानेंद्रिय स्त्रियांना आहेत तेच ज्ञानेंद्रिय पुरुषांनाही आहेत. ज्ञानेंद्रियांच्या आधारे लिंगभेद केला जाऊ शकत नाही. नाक, कान, डोळे, जीभ आणि त्वचा हे सारखेच असतात. अशी रचनाच निसर्गत: केलेली आहे.

थोडक्यात, निसर्गाने अंतर्गत आणि बाह्य जैविक फरक स्त्री-पुरुषामध्ये केला असला तरी इतर जाणिवा, भावना तसेच सामाजिक स्थान यात भिन्नता के ली नाही. परंतु ती समाजाने केली आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये केवळ स्त्रीला दुय्यम स्थान दिले आहे.

**२) स्त्रियांचा समाजातील आणि संस्कृतीतील दर्जा :**

कोणत्याही समाजातील स्त्रियांच्या दर्जाचे अथवा स्थान निश्चितीचे मूल्यांकन हे त्या समाजाच्या विशिष्ट चौकटीच्या संदर्भातच झाले पाहिजे. सामाजिक रचना, सांस्कृतिक वर्तन प्रमाणके आणि मूल्यव्यवस्था यांचा स्त्री-पुरुषांकडून उपेक्षिल्या गेलेल्या वर्तनावर प्रभाव पडतो. इतकेच नाही तर स्त्रीची समाजातील भूमिका व तिचे स्थानद खील फार मोठ्या

प्रमाणावर या घटकांनुसारच ठरत असते. स्त्रीजीवनावर महत्त्वपूर्ण असा प्रभाव टाकणाऱ्या महत्त्वाच्या संस्था म्हणजे कुटुंब व नातेदारी व्यवस्था, विवाह संस्था, ंशवारसा व्यवस्था आणि धार्मिक परंपरा या होत. स्त्रियांचे अधिकार आणि त्यांची कर्तव्ये या बाबतच्या समाजातील स्त्री-पुरुषांच्या कल्पनांना याच घटकांकडून वैचारिक व नैतिक आधार मिळतो. यांत्रिक व शैक्षणिक प्रगती, शहरीकरण, वाढती लोकसंख्या, वाढती महागाई आणि बदलते राहणीमान इत्यादी घटकांमुळे समाजव्यवस्थेच्या अन्य अंगोपांगात ज्या गतीने बदल घडून येतो त्या गतीने समाजाच्या वर्तनप्रमाणात बदल घडून येत नाही. ही तफाव लक्षात घेतल्यास कायदा आणि शैक्षणिक धोरण हे घटक सामाजिक अभिवृत्तीवर अपेक्षित प्रभाव पाडण्याला अपयशी ठरतात या प्रश्नाचे उत्तर मिळते. भारतीय स्त्रीचा खरा साम जिक दर्जा हे राज्यघटनेने व कायद्याने तिला प्रदान केलेले स्थान व तिची भूमिका आणि सा ाजिक परंपरांनी तिच्यावर लादलेले स्थान व त्याच्या अनुषंगाने तिला करावी लागणारी भूमिका यांच्यामधील अंतर दाखविणारे एक प्रातिनिधिक उदाहरण आहे. थोडक्यात असे म्हणता येईल, की सैद्धांतिकदृष्ट्या या गोष्टी स्त्रीयांना प्राप्त होतात त्या प्रत्यक्षात त्यांना क्वचितच लाभतात.

## धार्मिक परंपरा

### १) हिंदू धर्म

हिंदू धर्माने स्त्रियांना अनेक अपमानास्पदेषविशेषणे बहालावली आह त. शूद्रांप्रमाणे हिंदू स्त्रीलादेखील वेदाध्ययन करण्याचा किंवा यज्ञयागादी विधी करण्याचा हक्क नाही. स्त्रीने आपल्या बालपणी पित्याच्या अधिपत्याखाली राहिले पाहिजे, तारुण्यात पतीच्या स्वामित्वाखाली आणि पतीनिधनानंतर तिने आपल्या पुत्राच्या वर्चस्वाखाली राहावे. तिने स्वातंत्र्य मागू नये, एकपतीव्रत पाळावे, पुत्रप्राप्तीशिवाय स्त्रीला मोक्ष नाही. ऋतुस्राव व प्रसूती या दोन गोष्टींमुळे ती अपवित्र मानली जाते. तसेच याउलट विधवा ही दुर्दैवी व अशुभ मानली जाते. सर्व प्रकारे त्या विधवेवर बंधने लादली जातात. तिला पुनर्विवाहाचा अधिकार नाही.

हिंदू धर्मांतर्गत झालेल्या बौद्ध धर्म, जैन धर्म, शीख धर्म, वैष्णव पंथ यांसारख्या प्रतिकार चळवळींनी खासकरून धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रात स्त्रियांचा दर्जा उंचावण्याचे साहाय्य केले. परंतु या चळवळींनी सुद्धा स्त्रियांचा माता आणि पत्नी म्हणूनच गौरव केला आणि त्यांना इतर सामाजिक क्षेत्रांत पुरुषाहून हीन लेखले. बौद्ध धर्मात भिक्षूला भिक्षुणीपेक्षा उच्च दर्जा दिला गेला आहे. जैन धर्मातही स्त्रीचा शिकवणी ून कडक शब्दात धिक्कार केला आहे व केवळ मठातच मानाचे स्थान आहे. वीरशैव पंथाने मात्र घटस्फोट आणि पुनर्विवाहाला मान्यता दिली, परंतु असे असले तरीही भारतीय समाजाच्या सांस्कृतिक परंपरेने स्त्रियांना दिलेल्या कनिष्ठ स्थानात म्हणावा तसा बदल घडवून आणण्यात या चळवळीला यश आले नाही.

### २) इस्लाम धर्म :

कुराणाने स्त्री-पुरुषांना समान लेखले आहे. परंतु तिला पुरोहित होण्याच मान दिलेला नाही. धर्माच्या औपचारिक संघटनेत व मुस्लीम समुदायाच्या कायदेकानून बाबतच्या घडामोडीत तिला स्थान नाही. तिला काजी बनता येत नाही. पडदापद्धती काटेकोरपणे पाळावी लागते. सार्वजनिक नमाजात सहभागी होण्याच्या अधिकारापासून त्यां ा वंचित केले. इस्लामच्या

मते विवाह हा एक करार आहे, हा करार स्त्री-पुरुषांना असमान अधिकार देतो. मुस्लीम पुरुषांना बहुपत्नीत्वाचा व एकतर्फी घटस्फोटाचा अधिकारही देण्यात आलेला आहे. पतीला कुटुंबप्रमुख मानले जाते. विधवांना पुनर्विवाह करण्याची व स्त्रियांना घटस्फोट घेण्याची जरी परवानगी असली तरी मध्यमवर्गीयांकडून इन्कारच आहे. इस्लामने जरी स्त्रियांना मालमत्तेत वारसाहक्क दिलेला असला तरी प्रत्यक्षात त्यांच्या या हक्कांना पाठिंबा मिळत नाही. त्यांच्या अज्ञानामुळे व आपले हक्क मागून घेण्यास त्या असमर्थ असल्याने स्त्रिया हे हक्क गमावून बसतात.

**३) ख्रिश्चन - ख्रिस्ती धर्म :**

इस्लामप्रमाणेच ख्रिश्चन धर्मीयांची मूलतत्त्वे व स्थानिकांपरं एकमेका त मिसळलेल्या दिसून येतात. बायबलमध्ये स्त्रीला मायावी व मोहिनी मानले असल्याने स्त्री आणि तिची मालमत्ता या दोहोंना काबूत ठेवण्याच्या पतीच्या अधिकाराला अधिकच पुष्टी मिळाली. सुनांना कनिष्ठ स्थान दिले जात नाही. पती-पत्नी नात्यालाच विशेष महत्त्व दिले जाते. स्त्रीच्या अंगी काही गुण असले पाहिजेत या गोष्टींवर बायबलमध्ये भर दिला गेला आहे. स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. तसेच समाजाच्या संदर्भातही तिची काही कर्तव्ये आहेत. या प्रदीर्घ परंपरेमुळेच ख्रिस्ती स्त्रीयांनीच सर्वप्रथम प्रवेश केला. ख्रिस्ती धर्मात स्त्रियांवरील निर्बंध जरी कमी असले तरी त्या पुरुषांपेक्षा कनिष्ठ आहेत ही संकल्पना ख्रिश्चन धर्मातदेखील आहे.

**४) पारशी / झरतुष्ट्र धर्म :**

भारतातील पारशी लोक झरतुष्ट्र धर्माचे अनुयायी आहेत. हा धर्म स्त्रियांना कुटुंबात तसेच समाजात मानाचे स्थान देतो. त्यांना मालमत्तेचा अधिकार अ हे. धार्मिक व धर्मनिरपेक्ष शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. आणि घटस्फोट घेण्याची व पुनर्विवाह करण्याची परवानगी आहे. परधर्मी पुरुषाशी विवाह करण्याचा अधिकार स्त्रीला नाही. तसेच अग्यारीत प्रवेश करण्याची संमती नाही.

**५) आदिवासींचे धर्म :**

आदिवासी समाजात कुटुंबाच्या व समूहाच्या धार्मिक कार्यात स्त्रियांना निश्चित स्थान आहे. परंतु आदिवासींच्या खास पूजेअर्चेत त्यांना स्थान दिलेले नाही. मातृवंशीय जमातीत स्त्रिया पूर्वज देवतांची पूजा करतात. भारतातील सर्व आदिवासी जमाती ऋतुस्रावाला विटाळ मानतात आणि धार्मिक विधीच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानलेल्या पदावर त्यांना येता येत नाही. आर्थिक क्षेत्रातील कार्यभागामुळे सामाजिक व्यवहारात बरीच सूट मिळते.

निरनिराळ्या धर्मांनी स्त्रियांना बहाल केलेल्या स्थानात मूलभूत स्वरूपाचा असा फरक आहे हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते. १९व्या व २०व्या शतकात हिंदू समाजात उगम पावलेल्या ब्राह्मोसमाज, आर्य समाज किंवा प्रार्थना समाज या सुध रणा-चळवळींनी स्त्रियांच्या दर्जात सुधारणा घडवून आणली.

**२) वंशवारसा व्यवस्था :**

भारतात आपल्याला वंशवारसा ठरविणाऱ्या प्रामुख्याने दोन व्यवस्था दिसून येतात, एक मातृसत्ताकमातृवंशीय आणि दुसरी पितृसत्ताक किंवा पितृवंशीय.

**मातृवंशीय व्यवस्था :**

केरळमधील नायर, भियार आणि मोपला लोक, लक्षद्वीप समूहावरील जमाती तसेच मेघालय व आसामधील खासी व गारो जमाती ज्या अनुक्रमे भारताच्या नैर्ऋत्य व ईशान्य भागात स्थायिक झालेल्या आहेत, यांच्यात आपसात मातृवंशीयता आढळते.

१९व्या शतकात या व्यवस्थेत बरेच बदल घडून आले आहेत. मातृवंशीय कुटुंबव्यवस्थेत वंशावळ जरी स्त्रीच्या बाजूने ठरविली असली तरी सत्ता ही कुटुंबातील पुरुषाच्या हातात सामावलेली असते. या व्यवस्थेत काही संघर्षमय प्रवृत्ती आढळतात.

**पितृवंशीय व्यवस्था :**

भारतातील बहुसंख्य लोकांत पितृवंशीय कुटुंबव्यवस्थाच आढळते. पुरुषच कुटुंबाचे नाव व वंशवेल चालविते. या व्यवस्थेविषयी आपण सविस्तरपणे बघि ले आहे. त्याचे पुनर्वाचन करावे.

### ३) कुटुंब संघटन :

भारतात सर्वसामान्यत: एकत्र कुटुंब आढळते. या कुटुंबात म लमत्ताविषयक समान हक्क असलेले, कुटुंबाचा खर्च वाटून घेणारे, एकत्र वास्तव्य करून राहणारे, एकत्र भोजन, व्यवहार करणारे व पितृवंशीय नात्याने बांधले गेलेले पुरुष नातेवाईक आढळतात. अशा जीवनपद्धतीवर आधुनिकीकरणाचा, शहरीकरणाचा आणि अन्य सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचा चांगलाच प्रभाव पडलेला आहे. स्त्रीच्या दृष्टिकोनातून कुटुंबाकडे पाहिल्यास तिच्यावर असलेले अनेक जाचक निर्बंध, सूचना, तिचे कुटुंबात असलेले कनिष्ठ स्थान दिसून येते.

### ४) विवाह :

पितृवंशीय समाजात विवाह झाल्यानंतर स्त्री आपल्या मूळ कुटुंबातून पतीच्या कुटुंबात पाठविली जाते. मुलीच्या कौमार्याला फार महत्त्व दिले जात असल्याने आणि सगोत्र व स्वकुळातील विवाहावर निर्बंध असल्यामुळे मुलींचे लहान वयात विवाह ठर ू न देणे हे मुलींच्या दृष्टीने हितावह मानले जाते. असे निर्बंध काही धर्मांत आढळत नाहीत. आज विवाह पद्धतीत बरेच बदल घडून आले आहेत. तरीही 'एकविवाह' हाच आदर्श विवाह मानला जातो.

### ५) बदलत्या सामाजिक परिस्थितीत स्त्रीयांची भूमिका :

स्त्री-पुरुषांच्या भूमिकांमध्ये आजही भेद हा केला जातोच. भारतीय घटनेने जरी स्त्री-पुरुष समानतेला मान्यता दिली असली तरी समाज मात्र त्यांच्या भूमिकांमध्ये व कार्यक्षेत्रामध्ये काटेकोरपणे फरक करतो. घटनात्मक समानतेमागील हेतू व अर्थ लोकांनी स्वीकारल्याखेरीज खरी समानता प्रस्थापित होणेच शक्य नाही. भारताच्या निरनिराळ्या विभागांत जरी सांस्कृतिक भिन्नता असली तरी स्त्री आणि पुरुष यांच्या भूमिकांबद्दलच्या मू भूत कल्पनांच्या बाबतीत काही सामान्य वैशिष्ट्ये सर्वत्र आढळतात. स्त्रीचा प्रामुख्याने चूल आणि मूल यांच्याशीच संबंध जोडला जातो. तिने घरगुती कामे करावीत अशी अपेक्षा केली जाते आणि पत्नी व माता याच तिच्या स्वाभाविक भूमिका मानल्या जातात, लोकांच्या प्रचलित सांस्कृतिक कल्पनांच्या चौकटीत 'मुलांना जन्म देणे व त्यांचे संगोपन करणे म्हणजेच स्त्रीत्व' असे समीकरण केले आहे. संपूर्णतया संसारात गुंतलेल्या स्त्रिया ज्याप्रमाणे सर्व वेळ केवळ संसारालाच वाहून घेतात त्याचप्रमाणे शेतात, कारखान्यात, खाणीत, बांधकाम व्यवसायात काम करणाऱ्या

तसेच पांढरपेशी कामे करणाऱ्या स्त्रियांनादेखील संसारदक्ष राहावे अशी अपेक्षा केली जाते. पुरुषांच्या कुटुंबाबाहेरच्या क्षेत्रातील भूमिकेला मिळालेली मान्यता स्त्रियांच्या कुटुंबबाह्य जगातील भूमिकेला अद्याप मिळालेली नाही.

आपण आतापर्यंत घेतलेल्या आढाव्यावरून असे दिसून येते की, आजच्या भारतात स्त्रियांकडून अपेक्षिल्या गेलेल्या बहुविध भूमिका पार पाडताना सहाय्यभूत ठरणारी नवीन वर्तनप्रमाणके व नवीन संस्था यांची निर्मिती करण्यात समाज यशस्वी ठरलेला नाही. राज्यघटनेने ज्या हक्कांच्या व संधींच्या बाबतीत त्यांना आश्वासने दिली होती ते हक्क व त्या संधी बहुसंख्य स्त्रियांना लाभलेल्या नाहीत. स्त्रियांचे अनेक प्रश्न आज ज्वलंत समस्या झाल्या आहेत. स्त्रियांचा चित्रपट – जाहिरातींमधून लिंगप्रतीक म्हणूनच उपयोग केला जातो. एकीकडे तिला दुर्गा, सरस्वती, रणचंडिका, राधा, आई, बहीण, वात्सल्यमाऊली देवी अशा कितीतरी पवित्र भूमिकांमध्ये तिला स्थान द्यायचे तर दुसरीकडे बलात्कार, विनयभंग, चेहरा विद्रूप करणे अशा अनैसर्गिक कृतीने तिचे पतन केले जा`. आजच्या परिस्थितीत तर स्त्रीचे संरक्षण हीच जगापुढील सर्वात मोठी समस्या आहे.

### १.२.३ कुटुंबातील स्त्री – लिंगभेदात्मक भूमिका :

भारतामध्ये सर्वच समाजात धर्म, जाती, वंश व प्रदेशामध्ये मुलगी जन ाला येणे ही घटना मुलाच्या जन्माप्रमाणे स्वागतपर घटना मानली जात नाही. स्त्रियांकडे पाहण्याची पुरुषांची दृष्टी ही आर्थिक भावनात्मक ओझे आहे. तिच्या संपूर्ण आयुष्यात तिची काळजी घ्यावी लागते. कारण ती जन्मल्यावर पित्यावर अवलंबून असते. विवाहानंतर पतीवर निर्भर असते तर वृद्धावस्थेत मुलावर अवलंबून असते. त्याचप्रमाणे तिला संरक्षणही द्यावे ागते. ती कुटुंबाच्या किंवा सर्व समाजाच्या कल्याणासाठी काहीही हातभार लावत नाही. अशा तऱ्हेची विचारसरणी असल्याने प्रगती करण्याचा मार्ग मुलीला जन्माआधीपासूनच बंद होतो. आज प्रत्येक वर्षाला पोलिसांकडे हुंडाबळी, हुंड्यासाठी छळवणूक, अपहरण, बलात्कार, विनयभंग अशा हजारो केस नोंदविल्या जात आहे. त्यातही स्त्री-भ्रुणहत्येचे प्रमाण मागील वर्षी खूप होते. यावरून स्त्री-विषयीची समाजातील भावना लक्षात येते. ही लिंगविषमताच स ाजाच्या ऱ्हासास कारणीभूत असलेली दिसून येते. याशिवाय शिक्षणाबाबत स्त्रियांना भेदभावाची वागणूक मिळत आहे. कुटुंबात तिला निर्णयस्वातंत्र्य नाही. त्यामुळे इतर अन्यायही घरातच होतात. असे नाही तर समान सांस्कृतिक संस्थांमधूनही असा अन्याय होतो. त ामुळे लिंगभेद सातत्याने होतो. म्हणून लिंगभेदानुसार व्यक्तीच्या भूमिकांचे निर्धारण होते. कौटुंबिक पातळी असो अथवा सार्वजनिक क्षेत्रात लिंगभेद हा कोणत्या ना कोणत्या प्रकारे दिसून येतो. कारण व्यक्तीच्या भूमिकांच्या निर्धारणाचा आधारच मुळात लिंगभेद आहे. याठिकाणी आपण व्यक्तिगत पातळीवर अर्थात कुटुंबामध्ये स्त्रीविषयक लिंगभेदात्मक भूमिका कशी आहे, तिला काय स्थान आहे, हे पुढीलप्रमाणे अभ्यासू.

कुटुंब संस्थेमध्ये लिंगभेद हा स्त्रीच्या सहनशिलतेचा परिपाक आहे. हा भेदभाव व्यक्ती आपल्या व्यक्तिगत जीवनात भूमिकांचे निर्धारण करीत असताना करतो. ही कुटुंबातील लिंगभेदात्मक भूमिका काय आहे हे पुढीलप्रमाणे दिसून येईल.

**१) पडखाऊ भूमिका :**

व्यक्तिगत पातळीवर स्त्रियांची भूमिका ही प्रामुख्याने पडखाऊ भूमिका असते. प्रामुख्याने

स्त्रिया या कुटुंबात नेहमीच पडखाऊ भूमिका घेत असतात. त्यामागे प्रमुख कारण म्हणजे येथील पुरुषप्रधान व्यवस्था व त्यांचे सामाजीकरण, शारीरिकरित्या पुरुषांची खंबीर बाजू आणि स्वत:चे आर्थिक परावलंबन या गोष्टींमुळे स्त्रियांना आपल्या दास्यत्वाची जाणीव होऊन त्या परावलंबी जीवन जगत असतात. त्या आपल्यावरील अन्यायाचा विरोध करू शकत नाहीत आणि आपल्यावरील अन्याय निमूटपणे सहन करतात.

**२) दुय्यम वागणूक :**

जन्माला आल्यापासून स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जाते. त्यांच्या आहाराकडेही दुर्लक्ष केले जाते. कित्येक समुदायात स्त्री-भ्रूणहत्याही केली जाते. कुटुंबस्तरावर स्त्रियांच्या भावना, विचार, बौद्धिक क्षमता यांना डावलून निर्णय घेतले जातात. त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले जाते. सार्वजनिक कामाच्या सहभागापासून दूर ठेवले जाते. केवळ कुटुंबापर्यंत त्यांची भूमिका निर्धारित झालेली असते.

**३) परोपकारी सामाजीकरण :**

सामाजीकरणामुळे भूमिका-निर्धारण केले जात असते. लिंगभेदाला अनुसरूनही भूमिका-निर्धारण केले जाते. त्यामुळे स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जाते. सामाजीकरणाच्या माध्यमातून प्रशिक्षित केले जाते की स्त्रियांचे जीवन इतरांसाठीच आहे. स्त्री ही दुसऱ्याची देणगी आहे, धनाची पेटी आहे, जी दुसऱ्यांच्या स्वाधीन (पतीच्या) करावयाची आहे. त्यामुळे दैनंदिन जीवन जगत असताना स्त्रिया अगोदर इतरांचा विचार करतात व नंतर त्या आपला विचार करीत असतात.

**४) कल्पनेतील बंड :**

स्त्रियांवरील अत्याचार दूर करण्यासाठी बंडाशिवाय पर्याय नाही. परंतु स्त्रियांच्या बाबतीत हा प्रकार कमी प्रमाणात होतो. आपल्यावर होत असलेल्या अत्याचाराचा विरोध प्रत्यक्षरीया स्त्रिया करू शकत नाहीत. त्यांचे सामाजीकरणच अशा रीतीने झाल ले असते, की त्यांना बंड करण्याचीही इच्छा नसते. म्हणून बऱ्याचशा स्त्रियांच्या कल्पन ेवळ बंडाची कल्पना ठरतात.

**५) अनार्थिक कामांचे विभाजन :**

कुटुंबात कामाची विभागणी होत असताना लिंगभेद हो ाना दिसून य ो. स्त्रीयांची अधिक कामे आर्थिकदृष्ट्या लक्षात येणारी नसतात. उदा. मुलांचे संगोपन करणे. याशिवाय स्त्रियांना देण्यात येणाऱ्या या वागणुकीतून लक्षात येते ज्या कामातून स्त्रियांना आर्थिक उत्पन्न होणार नाही. जेणेकरून तिचे आर्थिक परावलंबन टिकून राहील, अशा प्रकारची अनार्थिक कामे स्त्रियांकडे सोपविली गेली व आर्थिक उत्पन्न हो री सर्व काम पुरुषांकडे हस्तांतरित केली गेली.

**६) व्यक्तिगत जीवनाचा अभाव :**

स्त्रिया जीवन जगत असताना त्यांच्यात व्यक्तिगत जीवनाचा अभाव दिसून येतो. पुरुषाप्रमाणे त्यांना स्वेच्छेने जीवन जगता येत नाही. तिच्यावर नेहमीच कुणाचे ना कुणाचे दडपण असते. त्यांना स्वत:च्या इच्छेप्रमाणे जीवन जगता येत नाही. प्रत्येकवेळी स्त्रियांना आपल्या कुटुंबाला

विचारात घेऊन किंवा विचारूनच आपल्या प्रतिक्रिया द्यावी लागते. स्वत:च्या आयुष्यातही तिला अधिकार नसतो. तर पुरुषाला मात्र स्वतंत्र जीवन जगण्याची मुभा असते. तो स्वत:च्या इच्छेप्रमाणे जीवन जगत असतो. त्याच्यावर कुणाचेही बंधन नसते.

**७) शैक्षणिक सुविधांमध्ये तफावत :**

पितृसत्ताक समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीला शिक्षणाच्या सुविधांपासून दूर ठेवले जाते. त्या मुलीची कितीही इच्छा असेल तरीही कामापुरते झाले पुष्कळ झाले असे म्हटले जाते. जरी ती मुलगी शिक्षणामध्ये कितीही हुशार असली तरीही तिला शिक्षणापासून परावृत्त केले जाते. आणि तरी काही कुटुंबातून शिकविले तरी तिला पुरुषाइतक्या सुविधा मिळू शकत नाहीत आणि मुलगा मात्र कितीही वेळेला नापास झाला तरी त्या मुलाला एखाद्या चांगल्या ठिकाणी ठेवतात. त्याच्या सर्व इच्छा-मागणी पूर्ण केली जाते. जरी त्या मुलाच्या मनात नसेल तरी असे केले जाते आणि ही स्थिती आजही चालूच आहे.

**८) कौटुंबिक जबाबदारीत तफावत :**

सामाजीकरणाच्याद्वारे कुटुंबातील मुला-मुलींमध्ये लिंगभेद केला जातो. प्रत्येक कुटुंबातील आई-वडिलांची काळजी मुलीपेक्षा मुलाकडेच जास्त असते आणि कुटुंबीयांची मन:स्थिती अशी होऊन बसते की एकदा त्या मुलीला आपल्या जबाबदारीतून म्हणजे लग्न लावून दिले म्हणजे ती पूर्ण आयुष्यातून बाजूला गेली. अशी मन:स्थिती असते. आजसुद्धा कितीही सुशिक्षित घराणे असले तरी त्या मुलीला आपल्या कौटुंबिक जब बदारीतून मुक्त करीत असतात. आणि मुलगा म्हणजे कुटुंबाचा वंशज मानला जातो. अशाप्रकारे स्त्रियांना कुटुंबातून दुय्यम स्थान दिले जाते.

**९) पुरुषप्रधानतेमुळे कुटुंब-संघर्ष निर्माण होऊ शकतो :**

आपल्या समाजात पुरुषप्रधान समाजव्यवस्था असल्यामुळे कुटुंबामध्ये स्त्रीला दुय्यम वागणूक दिली जाते. आणि ते स्त्रियांना सहन होत नाही. ती लगेचच कुटुंबातील व्यक्तीसोबत संघर्ष करीत असते. आणि या संघर्षातून त्या स्त्रीला बाजूला घर करावे लागते. आणि या घरामुळे समाज त्या स्त्रीला नावे ठेवत असतो व तिला त्रास दिला जातो. म्हणून स्त्री कितीही त्रास सहन करते पण कुटुंबाबाहेर राहण्यास हिंमत करत नाही. कारण त्या स्त्रीवर सामाजीकरणच अशाप्रकारे झालेले असते की ती कुटुंबामध्येच सर्व त्रास सहन करीत असते.

**१०) अधिकार व हक्कात भिन्नता :**

कुटुंबामध्ये मुलगा असो अथवा कर्ता पुरुष, सर्व अधिकार व हक्क हे पुरुषांच्या हातीच केंद्रित झालेले आहेत. मुलगी, पत्नी, सून अथवा बहीण यांचे सर्व निर्णय घेण्याचा अधिकार पुरुषाला तर स्त्रीच्या वाट्याला मात्र काहीच नाही. बोलण्याचा हक्क, एखादा निर्णय घेण्याचा हक्क अथवा शिक्षणही ती आपल्या इच्छेप्रमाणे घेऊ शकत नाही. स्वत:च्या इच्छा, आकांक्षांना तिला पदोपदी मुरड घालावी लागते.

**११) मानवतावादी दृष्टिकोनाचा अभाव :**

कौटुंबिक भूमिका निभावत असताना स्त्री ही आपल्यावर होणाऱ्या सामाजीकरणाप्रमाणेच आपल्या भूमिका निभावते व त्यांचे हस्तांतरण ती आपल्या मुलीकडे करत असते, ही परंपरा अशीच चालू राहते.

## १.४ सारांश :

समाजात सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक, वैचारिक या सर्वच क्षेत्रांतर्गत स्त्रियांना संधीपासून वंचित ठेवले गेल्यामुळे, सातत्याने दुय्यमत्वाच्या स्थानावर ठेवण्याचा प्रयत्न केला गेल्यामुळे स्त्रियांचे सर्वच क्षेत्रातील स्थान गौणत्वाचे राहिलेले दिसते. हे गौणत्वच स्त्रियांचे शोषण, दमन व अवलंबीकरण करते. त्यातूनच लैंगिक असमानता तसेच या आधारावर केला जाणारा भेदभाव हा पितृसत्तात्मक पद्धतीमुळे केला जातो असे मानतात. स्त्री-पुरुषामधील भेद हा वैदिक काळ वगळता आजपर्यंत स्त्रीच्या विचारात, स्वातंत्र्यात, अधिकारात कितीही आमूलाग्र बदल झालेला असला तरीही तिची गौणत्वची प्रतिमा ही आजही तशीच आहे. चांगले बदलही तितकेच असले तरी गौणत्व ही नाण्याची दुसरी बाजूही लक्षात घेणे आवश्यक आहे.

## १.५ पारिभाषिक शब्द :

१) Partriarchy - पितृसत्तात्मकता - पितृप्रधान व्यवस्था किंवा पितृसत्ताक कुटुंबपद्धती. या व्यवस्थेत औपचारिक सत्ता ही पुरुषाच्या स्वाधीन असते.

२) Sex - लिंग - एक जैविक संकल्पना, जी स्त्री-पुरुषातील नैसर्गिक जैविक फरक दर्शविते.

३) Gender - लिंगभेद
स्त्री आणि पुरुषांमधील सामाजिक विभेदीकरण किंवा जैविक लिंगभेदाच्या विरुद्ध आहे.

## १.६ संदर्भ ग्रंथसूची


१) अनंतराम शरयू आणि वंडसे उमा (१९८७), भारतीय सामाजिक स्त्रियांचे स्थान, मुंबई - पॉप्युलर प्रकाशन, पृष्ठ क्र. १२ ते २२.

२) संगवई संजय (संपा) (जाने-मार्च १९९९), अभिव्यक्ती - माध्यम चर्चेचे मराठी त्रैमासिक, नाशिक, रिलिका. पृष्ठ क्र. १८

३) डॉ. काकडे सिंधू आणि दुथडे वैशाली (२०१२) समाजशास्त्रातील सैद्धांतिक विचार, नाशिक : गौतमी प्रकाशन, पृष्ठ क्र. ३९७.

४) कर्वे स्वाती (संपा) (२००३) स्त्री विकासाच्या पाऊलखु प ॆ : प्रतिमा प्रकाशन पृष्ठ क्र. ९८.

५) गोटे शुभांगी (संपा) (२००३) स्त्री परिवर्तनाची आव्हाने (२००३) औरंगाबाद : साऊथ एशियन सोशल रिसर्च पब्लिकेशन पृष्ठ क्र. २००.

१) Desai, Neera & M Krishnaraj, (१९८७), Women & Society in India, Delhi, Ajanta Publishing House. Page No. 49

२) Mc Cormack, C&M. Strathern (ed) (1980), Nature, culture & Gender, Cambridge : Cambridge University Press Page 113

3) Mies Maria, (1980), Indian Women & Patriarchy conflicts & Di-

lemmas of Students & working women, New Delhi : Concept. Page 223

**१.७ सरावासाठी प्रश्न**

1) Explain the concept of Patrichy

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

2) 'Gender in Patrichy' - Discuss on

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

3) Evaluate the Women's Social & cultural role in family.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

4) Trace the role of women in family & its authority.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

5) Explain the Biological difference in women.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

6) Feild Work - Examine the Social - Biological & Cultural factors influencing gender relations in your area.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

१) पुरुषप्रधानता पुरुषसत्तात्मकता ही संकल्पना स्पष्ट करा. 'पुरुषप्रधान व्यवस्थेतील लिंगभेद' यावर चर्चा करा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

२) कुटुंबातील स्त्रियांच्या सामाजिक - सांस्कृतिक भूमिकेचे मूल्यमापन करा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

३) स्त्रियांमधील जैविक भिन्नत्व स्पष्ट करा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

**क्षेत्रीय कार्य :**

४) तुमच्या परिसरातील स्त्री-पुरुष संबंधांना प्रभावित करणाऱ्या सामाजिक - जैविक आणि सांस्कृतिक घटकांचे परीक्षण करा.

---------------------------------------------------------------------------



---------------------------------------------------------------------------

# घटक २

# लिंगभेदासंबंधीचे सिद्धांत

**अनुक्रमणिका**


२.० घटकाची उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ स्त्रीवादाचा इतिहास

२.३ लिंगभेदासंबंधीचे स्त्रीवादी सिद्धांत

- २.३.१ उदारमतवादी किंवा मवाळ स्त्रीवादी सिद्धांत
- २.३.२ जहाल किंवा क्रांतिकारी स्त्रीवादी सिद्धांत
- २.३.३ साम्यवादी किंवा समाजवादी स्त्रीवादी सिद्धांत
- २.३.४ उत्तर – आधुनिक स्त्रीवादी सिद्धांत

२.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

२.५ सारांश

२.६ संदर्भसूची


## २.० घटकाची उद्दिष्टे :

प्रस्तुत घटक अभ्यासण्यामागे स्त्री–पुरुष ही दोन नैसर्गिक भेद असले तरी या भेदांना समाजाने श्रमविभागणीत विभागले आहे. त्यामुळे स्त्री–पुरुषांमध्ये सामाजिक भेदाभेद दिसून येतो. हा भेद विचारवंत, उदारवादी किंवा मवाळवादी, जहाल किंवा क्रांतिकारी स्त्रीवाद, साम्यवादी किंवा समाजवादी आणि उत्तर–आधुनिकवादी सिद्धांत या सिद्धांताच्या आधारे मांडतात. त्यामुळे लिंगभावाआधारे या सिद्धांताची ओळख करून देण्यामागचा हेतू या घटकामागचा आहे.

## २.१ प्रस्तावना :

पृथ्वीतलावर मानव आणि मानवेतर प्राणी अनेक असले तरी या प्राण्यांमध्ये 'नर' आणि 'मादी' हे लिंगभेद पाहावयास मिळतात. तर मानवामध्ये लिंगभेदाच्या आधारे स्त्री आणि पुरुष असे प्रकार पडतात. मानवी प्राण्याचा विचार करता या सजीव गटात स्त्री आणि पुरुष असा लैंगिक भेद असून मानवी जीवनाच्या सातत्यासाठी हे दोन्ही घटक तितकेच आवश्यक आणि महत्त्वपूर्ण आहेत. स्त्री–पुरुष या दोहोंमध्ये फरक ओळखण्याचा आधार म्हणून लिंगभेद हा शब्द वापरला जातो. स्त्री म्हणजे जी गर्भधारणो,करते द ते तर पुरुष म्हणजे शारीरिक कष्टाची कामे करणे. यानुसार स्त्री आणि पुरुष यामधील वेगळेपण ओळखले जाते. यालाच 'स्त्री–पुरुषां'ची भूमिका असेही म्हणतात. या भूमिकेनुसारच त्यांना दर्जा प्राप्त होतो. लिंगभेदानुसारच कामाची वाटणी अर्थातच श्रमविभागणी केली जाते. म्हणजेच स्त्री–पुरुषांच्या

भूमिका या लिंगसापेक्ष असतात, वेगवेगळ्या असतात. त्यामुळे त्यांच्या दर्जातही भिन्नता दिसून येते.

लिंग हे जन्मत:च निर्धारित होते, ते अपरिवर्तनीय असते. स्वाभाविकच लिंगभेदानुसार त्यांना कार्य करावे लागते. त्यामुळे त्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधाही समाजपरत्वे ठरलेल्या असतात. निसर्गात श्रमविभाजनाचे तत्त्व प्रथमपासूनच लिंगभेदानुसार निर्माण झाले. त्यातूनच पुरुषांचे उत्पादन तर स्त्रियांचे प्रजोत्पादन हे कार्य समजण्यात आले.

जीवशास्त्रीयदृष्ट्या बालकाची लिंगनिश्चिती ही गुणसूत्राच्या जुळणीनुसार म्हणजे पुरुष एक्स गुणसूत्र आणि स्त्री गुणसूत्रातील एक्स गुणसूत्राचे फलित झाले तर मुलगी होते. याउलट पुरुषातील वाय आणि स्त्रीमधील एक्स गुणसूत्राच्या फलितामुळे मुलगा जन्माला येतो. थोडक्यात गुणसूत्रानुसार अर्भकाचे लिंग ठरते. जीव जन्माच्या प्रक्रियेत मनोलैंगिक जैविक घटकांचा उल्लेख केला जातो. हा घटक स्त्री व पुरुष या स्वरूपातील लिंगविशेषी फरक सुचित करतो. आक्रमकता, बळकट स्नायू ही पुरुषांची जैविक लक्षणे आहेत. त्यामुळे शिकार, युद्ध या क्रिया प्रामुख्याने पुरुषामध्ये दिसतात. स्त्रीच्या बाबतीत मनोलैंगिक जैविक दृष्टीने कोमलता, लाजाळूपणा ही लक्षणे दिसतात. थोडक्यात परंपरागत **स**मजुतीनु ार ती लैंगिकदृष्ट्या अबला मानली जाते. म्हणूनच स्त्रीला दुर्बल समजले जाते. वस्तुत: स्त्री ही पुरुषांच्या तुलनेत बरोबरीची असूनही लैंगिकदृष्ट्या ती आघातक्षम असल्यामुळे समाज तिच्या मुक्त संचाराबाबत अनेक बंधने घालतो.

## २.२ स्त्रीवादाचा इतिहास :

स्त्रीवाद ही प्रामुख्याने पाश्चात्त्य विचारधारा असून हजारो वर्षांच्या इतिहासाने महिलेचे मानवपण नष्ट करून जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करू दिली त्यातून बाहेर पडून स्त्रीला आपले हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण झालेले व्यासपीठ आहे. ॲरिस्टॉटलने ''मानवी इतिहासाच्या वाटचालीत निखळ माणूस म्हणून स्त्रीचे स्थान निर्धारण होण्यापेक्षा तिच्याकडे पुरुषसत्ताक मूल्यदृष्टीतून निर्माण केलेल्या प्रतिमेतून पाहण्यात आले'', अशा शब्दांत स्त्रियांचा दुय्यम दर्जा स्पष्ट केला. स्त्रीला कुटुंबात 'मादी' म्हणूनच स्थान असते. आर्थिक निर्णयात तिला कोणतेच स्थान नसते. चूल आणि मूल यापलीकडे स्त्रीत्व चे मूल्य प्रस्थापित करण्याकरिता स्त्रियांना जे अग्निदिव्य करावे लागते त्यातूनच स्त्रीवाद उदयास आला.

स्त्रीवाद म्हणजे समाजातील स्त्री-पुरुषांच्या दर्जामध्ये तसेच अधिकारामध्ये असणारी तफावत कमी करण्याच्या हेतूने निर्माण झालेली चळवळ होय. थोडक्य त स्त्री-पुरुषामध्ये समानता आणण्यासाठी उभारलेला लढा म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीच्या अध:पतनामागचे पुरुषी राजकारण तिला समजू लागले. यातूनच स्त्रीवाद अस्तित्वात आला.

इ.स.१८६७ मध्ये जॉन स्टुअर्ट मील यांनी महिलांकरिता मतदान च्या हक्काची मागणी इंग्लंडच्या संसदेत केली. इ.स. १८७२ मध्ये फ्रान्समध्ये स्त्रियांचे हक्क मांडणारी आंतरराष्ट्रीय परिषद भरली. यानुसार इ.स. १९२८ मध्ये इंग्लंडमध्ये महिलांना आणि इ.स. १९४६ मध्ये फ्रान्समध्ये महिलांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला. यातूनच पाश्चात्त्य देशांत स्त्रीवादाचा उदय

व विकास झाला. यानंतर मालमत्तेत मालकी व वारसाहक्क मिळविण्यासाठी स्त्रियांना लढा द्यावा लागला. स्त्री-पुरुषांच्या समानतेच्या मागणीतून सर्वच क्षेत्रात महिलांना स्थान मिळायला हवे असे आग्रही प्रतिपादन होऊ लागले. यातूनच स्त्री-स्वातंत्र्य ही कल्पना उदयास आली. महिलेला तिचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असून ते घडविण्याचा तिला अधिकार आहे. मतस्वातंत्र्यानंतर आर्थिक स्वातंत्र्य दिले तरच स्त्रीला स्वातंत्र्य मिळणार आहे. या अस्मिता लढ्यातूनच स्त्रीवाद या कल्पनेची उत्क्रांती झाली.

भारतात जातिवाद, लिंगभेदवाद हे पूर्वीपासूनच पाहावयास मिळतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात स्त्रियांना पुरुषांसमान शिक्षणाची संधी मिळाली. त्यांचा सामाजिक कार्यात क्रियाशील सहभाग वाढला. न्याय्य हक्काच्या पूर्ततेसाठी स्त्रीवादी **च**ळवळी ा उदय झाला. भारतामध्ये खऱ्या अर्थाने इ.स. १९७० नंतर स्त्रीवाद उदयास आला.

## २.३ लिंगभेदसंबंधीचे स्त्रीवादी सिद्धांत :

लिंगभेदसंबंधीचा स्त्रीवाद सिद्धांताचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येतात.

### २.३.१ उदारमतवादी किंवा मवाळवादी स्त्रीवाद सिद्धांत :

जॉन लॉक या विचारवंताला उदारमतवादी किंवा मवाळवादी स्त्रीवादी सिद्धांताचे जनक म्हणतात. स्त्रीसमस्यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने प्रेरित झालेल्या स्त्रीवादला उदारमतवादी स्त्रीवाद या नावाने ओळखले जाते. उदारमतवादी किंवा मवाळवादी स्त्रीवादी सिद्धांतामध्ये स्त्रियांना पुरुषाप्रमाणे वागण्याची मोकळीक द्यावी, स्वच्छंदी जीवन जगण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य हवे. या विचारप्रवाहाचा हा उदारमतवादी स्त्रीवादी सिद्धांत आहे. म्हणजेच स्त्रीला पुरुषाप्रमाणे निसंदिग्धपणे मनाप्रमाणे जीवन उपभोगता यावे या विचारांनी प्रेरित स्त्रीवादाला उदारमतवादी स्त्रीवाद असे म्हणतात. या स्त्रीवादाचे समर्थन करणाऱ्या विचारवंतांमध्ये प्रामुख्याने मेरिकुल स्टोन काफ्ट, जे. एस. मील, मार्गारेट कुलर, हॅरियट मॉर्टिनी आणि बेरी फ्रिडर यांचा समावेश होतो. उदारमतवादी विचारवंत बेरी फ्रिडर **यांच्या** मते, ''जे प ंत स्त्रिया स्वयंभूपणे स्वत:ला पुरुषाप्रमाणे बनविणार नाहीत, तोपर्यंत त्या पुरुषाच्या स्वाधीन राहतील म्हणून स्त्रियांनी स्वत:ला पुरुष समान बनवून मुक्त जीवन जगावे.''

स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याचे समर्थन करणारा हा स्त्रीवाद आहे. महिलांनाही पुरुषाप्रमाणे स्वत:च्या काही भावभावना, विचार, कल्पना, श्रद्धा असतात याबाबत विसर पडता कामा नये. म्हणूनच स्त्रियांनी निर्णयस्वातंत्र्य आणि जगण्याचा हक्क मिळविण्यासाठी निकाराचा लढा देणे आवश्यक ठरते.

पुरुषांना मानव म्हणून जे हक्क आणि अधिकार आहेत ते सर्व महिलांना मिळाले पाहिजेत. तेव्हाच सामाजिक स्तरावर महिला-पुरुष समानता प्रस्थापित होऊ शकते असे मवाळवादी किंवा उदारमतवादी स्त्रीवादाचे आग्रही प्रतिपादन आहे.

महिलांना कौटुंबिक, सामाजिक आणि सार्वजनिक या ठिकाणी दुय्यमतेची व कनिष्ठत्वाची वागणूक दिली जाते. त्यामुळे उदारमतवादी स्त्रीवाद महिलांच्या या दुय्यमत्वाला व कनिष्ठत्वाला विरोध करतो.

महिला व पुरुषांना जन्मत:च समसमान बुद्धी असते, पण ती विकसित होणे हे कष्टावर, मेहनतीवर अवलंबून असते म्हणून पुरुष बुद्धिमान असतो, तर महिला भावनाप्रधान अशी विभागणी करण्याला उदारमतवादी स्त्रीवाद विरोध करतो.

पुरुषांना मिळणारी स्वातंत्र्याची अधिक मुभा व महिलांवर लादलेली टोकाची बंधने या विरोधाभासाला व पुरुषी अधिनतेला या मवाळवादी किंवा उदारमतवादी स्त्रीवादाकडून विरोध होतो.

समाजाच्या सर्वच ठिकाणी असणाऱ्या पुरुषी राजकारणाला उदारमतवादी स्त्रीवादाचा विरोध आहे. २८ ऑगस्ट १९७० मध्ये न्यूयॉर्कमधे ल्या सभेत ब ट्टी फ्रेडनने असे जाहीर केले की, आपल्या मोर्चात महिलांबरोबरच पुरुषही आहेत. पण सर्वच पुरुष महिलांचे शत्रू असत नाहीत आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुरुषांच्या विरोधापेक्षा महिलांमधील आत्मविश्वासाचा अभाव हाच त्यांचा सर्वात मोठा शत्रू आहे. त्यामुळे महि लांमध्य आत्मविश्वास निर्माण होणे, स्वयंपूर्ण होणे स्वावलंबी जीवनाचे प्रतीक आहे.

उदारमतवादी किंवा मवाळवादी स्त्रीवाद हा महिलांच्या वैधानिक समतेचा आग्रह धरतात. त्यामुळे समानतापूरक कायद्याची निर्मिती, संवर्धन व संरक्षण व्हावे असा आग्रह या स्त्रीवादाचा आहे.

थोडक्यात, उदारमतवादी स्त्रीवादाप्रमाणे कायद्यानेच प्रस्थापित सम जव्यवस्थेतील स्त्री-पुरुष असमानता, बंधनयुक्त स्थिती अथवा दर्जा बदल**ता** येऊ शक े. सर्वच क्षेत्रांत महिलांना स्थान मिळायला हवे. महिला ही दासी नसून तिला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. महिलेला जर आर्थिक स्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य दिले तरच तिला स्वातंत्र्य प्र प्त होईल.

**२.३.२ क्रांतिकारी किंवा जहाल स्त्रीवाद :**

जहाल किंवा क्रांतिकारी स्त्रीवाद्यांनी यापूर्वीच्या स्त्रीवाद्यांनी स्व कारलेल्या बांधिलकीला या स्त्रीवादाने काहीसे आव्हान देऊन हा स्त्रीवाद इ.स. १९८० च्या दशकातील उत्तरार्धात उदयास आला. स्त्रीधोरण हे सर्वाधिक व्याप्ती असणारे शोषण आहे. स्त्रीधोरण हे इतर सर्व शोषणासाठी एक विशिष्ट चौकट प्राप्त करू देते. स्त्री स्वत:च्या शोषणासंदर्भात अधिक अनभिज्ञ असल्याचे आढळते.

जहाल किंवा क्रांतिकारी स्त्रीवाद्यांच्या मते कुटुंब संरचनेच्या अनुषंगाने पाळावी लागणारी आदर्शतत्त्वे, मूल्ये, विचार, श्रद्धा व कल्पना या बाबी स्त्रीशोषणासाठी जबाबदार असणारे महत्त्वाचे घटक आहेत. नैतिकता किंवा संस्कृती जत**नाचा** व संवर्ध संबंध केवळ महिलेशी जोडला जातो. कुटुंब व कुटुंबाबाहेरील सर्वच व्यवहारांमध्ये पुरुषांचे वर्चस्व व बंधने पाहावयास मिळतात. म्हणूनच जहाल स्त्रीवाद हा प्रस्थ पित पुरुषप्रधान समाजव्यवस्थेला विरोध करतो.

जहाल किंवा क्रांतिकारी स्त्रीवाद हा जैविक क्रांतीचा पुरस्कार करणारा स्त्रीवाद मानला जातो. स्त्रीला निसर्गत: लाभलेली मातृत्वाची देणगी ही वंशसातत्यासाठी असणारी महत्त्वाची बाब आहे. तरी या बाबीला पुढे करून महिलांचे शारीरिक, मानसिक व बौद्धिक अशा सर्वच प्रकारचे शोषण होताना दिसते. त्यामुळे जहाल किं**वा** क्रांतिकारी स्त्री ाद हा वेगळी भूमिका

घेतो. जहाल स्त्रीवाद्यांच्या मते, महिलांनी गर्भाशयाच्या बाहेर मूल जन्मास घालून पुरुषांच्या वर्चस्वाला आळा घालावा हा टोकाचा विचार हा स्त्रीवाद घेतो. पुरुषांच्या पुरुषार्थालाचा आव्हान देऊन त्यांच्या शोषणाला प्रत्युत्तर देण्याच्या उद्देशाने प्रेरित असलेल्या स्त्रीक्रांतीलाच जैविक क्रांती म्हटले जाऊ लागले. जैविक क्रांतीच्या माध्यमातून पुरुष ंच्या सहकार्याशिवाय मूल जन्मास घालण्यासाठी इतर साधनांचा अर्थात टेस्टट्यूब बेबी, क्लोनिंगचे साहाय्य घ्यावे असा आग्रह धरला.

स्त्री-पुरुषांनी बौद्धिक, शारीरिक व मानसिक दृष्टीने समान पातळीवर येणे या स्त्रीवादला महत्त्वाचे वाटते. लैंगिक गरजही महिला व पुरुषांना मिळालेली नैसर्गिक व उपजत गरज आहे. त्यामुळे ही गरज पूर्ण होण्यासाठी महिला व पुरुषांना समान लैंगिक स्वातंत्र्य असणे गरजेचे आहे. परंतु महिलांना स्वत:ची लैंगिक इच्छा अगर भावना व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य नाही. गरज भागवणे ही दूरची गोष्ट. तसे झाले तर अशा महिलांच्या चारित्र्याकडे समाज संशायाने पाहतो. तसे पुरुषांच्या बाबतीत मात्र नसते. पुरुषाला मात्र स्वत:ची गरज पूर्ण करण्यासाठी महिलेच्या संमतीची आवश्यकता वाटत नाही. तिला स्वत:च्या भोगासाठी जाणीवपूर्वक भाग पाडले जाते. म्हणूनच विवाहसारख्या पवित्र बंधनातील बांधले गेलेल्या पत्नीवर अनेक वेळा वैवाहिक बलात्कार घडून येतो. याला हा स्त्रीवाद विरोध करतो.

अनेक पुरुषांना आपल्या वारश्यापेक्षा पुरुषार्थ सिद्ध करण्यासाठी वारस हवे असते. महिलांना मात्र मातृत्व प्रदान झाल्याशिवाय समाजमान्यता, कौटुंबिक प्रतिष्ठा, घरातील स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करणे अवघड जाते. महिलांना मातृत्व प्रदान झाल्याशिवाय मोक्षप्राप्ती होणार नाही यासारखी मिथ्थकेसुद्धा वर्षानुवर्षे महिलांच्या मनावर बिंबवली गेली. त्यामुळेच जहाल किंवा क्रांतिकारी स्त्रीवाद पतीनिरपेक्ष मातृत्व व कु ारीमातेचा आग्रह धरून पुरुषी वर्चस्वाला विरोध करतो.

महिलांच्या अनुत्पादक समजल्या जाणाऱ्या कौटुंबिक कामाला ठरावी वेतन मिळावे या उद्देशाने प्रेरित हा स्त्रीवाद आहे. महिलांकडे या कामासाठी आवश्यक असणारी चिकाटी, सहनशीलता, सृजनशीलता या गुणांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यामुळे त्यांच्या या कामाला निश्चित वेतन मिळाले पाहिजे. फायरस्टोन त्यांच्या 'लैंगिक व्यवहाराची द्वंद्वात्मकता' या ग्रंथात म्हणतात की, समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास नसून तो लिंगविषयक संघर्षाचा इतिहास आहे. या इतिहासाची सुरुवात ही कौटुंबिक कामापासून होते.

स्त्री-पुरुषांच्या वेतनात फरक नसावा असे आग्रही प्रतिपादन हा जहाल स्त्रीवादी सिद्धांत करतो. कारण महिला व पुरुष यांना निसर्गत: मिळालेली बुद्धिमत्ता ही सारखी असते. त्यामुळे लिंगभेदाच्या आधारे कामाच्या मोबदल्यात फरक नसावा.

थोडक्यात, जहाल किंवा क्रांतिकारी स्त्रीवादी सिद्धातांच्या आधारे असे स्पष्ट करतो की प्रस्थापित समाजव्यवस्थेत महिलांच्या वाईट अवस्थेला पुरुषच जबाबदार आहेत त्यामुळे महिलांवर होणारे पुरुषी अत्याचार, जुलूम नष्ट करावयाचे असेल तर महिलांची मानसिक जडणघडण नव्याने करण्याची आवश्यकता आहे. स्त्री-पुरुषांच्या समानतेतील मार्गातील महत्त्वाचा अडथळा म्हणजे पितृसत्ताक कुटुंबव्यवस्था ही आहे. त्याकरिता जहाल किंवा

क्रांतिकारी स्त्रीवादी सिद्धांत पितृसत्ताक कुटुंब पद्धती उलथून टाकण्याची भाषा करतो.

**२.३.३ साम्यवादी – समाजवादी स्त्रीवादी सिद्धांत :**

लिंगभेदाच्या आधारे मांडण्यात येणाऱ्या स्त्रीवादी सिद्धांतातील समाजवादी स्त्रीवादी हा महत्त्वाचा सिद्धांत मानला जातो. या स्त्रीवादी सिद्धांतावर एँजेल व कार्लमार्क्स या विचारवंतांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. हा सिद्धांत अजून फारसा विकसित झालेला नसला, तरी स्त्री–पुरुषांच्या समानतेसाठी या विचारप्रणालीची खूपच आवश्यकता आहे. मार्क्सच्या मते, भांडवलशाहीमुळेच स्त्रियांचे शोषण होते. महिलांच्या दुय्यम दर्जाचे उगमस्थान हे पितृसत्ताक कुटुंबव्यवस्था हे आहे. समाजातील उत्पादन व्यवस्था आणि लैंगिक शोषणाची व्यवस्था ही महिलांना दुबळेपणा निर्माण करण्यास कारणीभूत ठरली. त्यामुळे महिलांचे शोषण करणारी पितृसत्ताक व्यवस्था संपुष्टात आणली पाहिजे, तरच स्त्री–पुरुष समानता प्रस्थापित होईल असा समाजवादी स्त्रीवादाचा दावा आहे. साम्यवादी समाजवादीस्त्रीवादी सिद्धांतात भांडवलशाहीला पूरक असणारे स्त्रीशोषण सार्वत्रिक स्वरूपात होताना आढळते. इथे भांडवलशाही हा शब्द पुरुषवादी या समानार्थी वापरला आहे.

मार्क्सवादी किंवा साम्यवादी स्त्रीवादाने स्त्रीस्वातंत्र्य आणि समानता या मूल्यांना आधारभूत मानून स्त्रीला महत्त्वाचे स्थान दिले. फुरियर या स्त्रीवादी विचारवंताने मुक्त प्रेम व समलिंगवादाचा पुरस्कार करून सामुदायिकरित्या घरकाम व बालसंगोपनाचा आग्रह धरला. फुरियर यांच्या मते, महिलांची समाजातील स्थिती हीच समाजाची प्रगती मोजण्याचे निकष मानायला हवेत. रॉबर्ट ओव्हेनी यांनी तर विवाहसंस्थेच्या माध्यमातून स्त्रियांचे होणारे शोषण थांबविण्यासाठी विवाह संस्थाच नष्ट करण्यावर भर दिला आहे.

साम्यवादी समाजवादी स्त्रीवाद भांडवलशाही व्यवस्था अर्थात पुरुषप्रधान व्यवस्थेला विरोध करतो. जसे भांडवलशाही व्यवस्थेअंतर्गत ज्याप्रमाणे आहे रे वर्ग नाही रे वर्गाचे शोषण करतो त्याचप्रमाणे कदाचित त्यापेक्षा अधिक शोषण पुरुषप्रधान सत्तेने महिलांचे केले आहे. त्यामुळे हा साम्यवादी स्त्रीवादी सिद्धांत पुरुषी अन्यायकारी वर्चस्वाला विरोध करतो.

लिंगभेदावरील समाजव्यवस्था निर्मितीसाठी केवळ आत्मविश्वास आणि इच्छाशक्ती निर्माण करणे यासारखे तात्पुरते उपाय महत्त्वाचे ठरणार नाहीत. त्याकरिता समाजव्यवस्थेत परिवर्तन हाच उपाय आहे असे समाजवादी स्त्रीवादी सिद्धांत सुचवितो.

घरकामाचा संबंध हा भांडवल निर्मितीशी असून घर हे एक प्रकारचा उद्योग तर घरकाम हे भांडवलाची अटळ गरज आहे. पुरुषांच्या आर्थिक उत्पादनास अधिकांश स्त्रीचे सहकार्य कारणीभूत ठरते. त्यामुळे उत्पन्नाचा काही भाग महिलांच्या घरकामाला द्यावा असे प्रतिपादन हा सिद्धांत करतो.

मार्क्सवादी स्त्रीवादी विचारवंत ॲलिसन यांच्या मते, आधुनिक पुरुषप्रधान समाजात आयोजित करण्यात येणाऱ्या सौंदर्य स्पर्धेमध्ये स्त्रियांचे सौंदर्य हे पुरुषांचे मुख्य लक्ष्य असल्याचे आढळून आले. स्त्रीचे हे 'वस्तुकरण' झाल्याचे दिसून येते. महिलेला पतीच्या इच्छेनुसार शृंगार करावा लागतो. मातृत्व हे नैसर्गिक असले तरी त्या संबंधीचे निर्णय घेण्याची मुभा महिलांना दिली जात नाही. आर्थिक स्वावलंबी महिलांना घरक म करून नोकरी किंवा

व्यवसाय करावा लागतो. त्याशिवाय पुरुष व स्त्रीमध्ये केलेला बौद्धिक भेद हा स्त्रीच्या परात्मिकरणासाठी महत्त्वाचा ठरतो. जो साम्यवादी समाजवाद्यांना मुळीच मान्य नाही.

### २.३.४ उत्तर – आधुनिक स्त्रीवादी सिद्धांत :

मानवाचे अधिकाधिक कल्याण साधणे अर्थात स्त्री आणि पुरुष या दोहोंचे कल्याण साधणे हे उत्तर – आधुनिक स्त्रीवादी सिद्धांताचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यामुळे स्त्री आणि पुरुष या दोहोंकडे समन्वयवादी आणि मानवतावादी दृष्टिकोनातून उत्तर– आधुनिक स्त्रीवादी सिद्धांत पाहतो. लिंगभेदाचे संपूर्ण उच्चाटन करून लिंगभेदरहित समाज नर्मितीसाठी पोषक ठरणाऱ्या सर्वच घटकांचा आधार या स्त्रीवादाने उदारमतवादी किंवा मवाळवादी, जहाल किंवा क्रांतिकारी आणि समाजवादी किंवा साम्यवादी स्त्रीवादातून घेतला आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावाखाली असलेल्या या स्त्रीवादाने कुटुंब आणि विवाहसंस्था यांच्यात कालानुरूप बदल करण्याची भूमिका घेतली. त्यामुळे बऱ्याचदा हे विचार उच्चभ्रू वर्ग आणि विकसित राष्ट्रांपुरते मर्यादित आहेत की काय याबाबत साशंकता निर्माण होते.

उत्तर – आधुनिक स्त्रीवादी सिद्धांत हा मानवतावादाचा पुरस्कर्ता असल्याने महिलेकडे एक स्त्री म्हणून न पाहता एक व्यक्ती किंवा मानव म्हणून पाहण्याची दृष्टी हा स्त्रीवाद देतो.

हा स्त्रीवादी सिद्धांत स्त्री आणि पुरुष यांना समान समजून समन्वयवादी दृष्टिकोनातून समानतेची वागणूक द्यावी असे प्रतिपादन करतो.

स्त्री आणि पुरुषांमध्ये भेद निर्माण करू पाहणाऱ्या मूल्यांना अगर श्रद्धांना केवळ तार्किकता व शास्त्रीयता याच्या आधारावर दूर करण्याचा प्रयत्न उत्तर – आधुनिक स्त्रीवादी सिद्धांत करतो.

स्त्री ही केवळ भोगवादी 'उपभोग्यवस्तू' आहे या पारंपरिक उपभोगवादी दृष्टिकोनाला हा स्त्रीवादी सिद्धांत विरोध करताना आढळतो. तसेच सुधारणावादी दृष्टिकोनाचा आग्रह धरून स्त्री–पुरुषांना समानतेचे हक्क व अधिकार प्रदान करून समाजव्यवस्थेत सुधारणा सुचवितो.

महिलांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील मारक ठरणाऱ्या प्रथा, परंपरा, अटी आणि श्रद्धा यासारख्या पूरक बाबींना प्राधान्य देऊन स्त्रीचा विकासातील वाटा वाढविणे सहज शक्य आहे असे या स्त्रीवादी विचारवंतांना वाटते. तसेच महिलांना त्यांचा हक्क आणि कर्तव्याची जाणीव करून देणे महत्त्वाचा मानणारा हा स्त्रीवादी सिद्धांत आहे. स्त्रियंच्या स्वातंत्र्याचे समर्थन हा सिद्धांत करतो पण स्वातंत्र्याच्या नावावर स्वैराचार करण्यालाही विरोध करतो. म्हणजेच हा स्त्रीवाद सुधारणा किंवा विकास विषयक स्वातंत्र्य बहाल करण्यास तत्पर आहे.

महिलांची कामाच्या प्रति स्त्रिची निष्ठा, तळमळ, चिकाटी, कार्यक्षमता आणि सातत्य या अंगभूत गुणांमुळे स्त्रीला तिच्या कामाचा मोबदला पुरुषाइतकाच मिळाला पाहिजे असा आग्रह हा सिद्धांत धरतो.

हा सिद्धांत लिंगभेद श्रमविभाजनाला विरोध करून गुणवत्तेवर आधारित श्रमाचा पुरस्कार करतो. स्त्री–पुरुषांमध्ये भेद करणाऱ्या मूल्यांचा त्याग करून समाजोपयोगी मूल्यांना उत्तर–आधुनिक स्त्रीवादाने महत्त्व दिले आहे. उत्तर आधुनिक सिद्धांत ुटुंब हे स्त्री–पुरुषांच्या

समन्वयाने चालावे असे मानतो. तसेच पूरुष समर्थक पारंपरिक समाजव्यवस्थेत परिवर्तन घडून आणून स्त्री-पुरुष या दोहोंना एकाच प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करते.

## २.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :

प्र.१ एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) स्त्रीवाद म्हणजे काय?

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

२) इंग्लंडमध्ये मतदानाच्या हक्काची मागणी कोणी आणि केव्हा केली?

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

३) जॉन लॉक या विचारवंताला कोणत्या स्त्रीवादी सिद्धांताचे जनक म्हणतात.

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

४) फायरस्टोन या विचारवंताचा महत्त्वाचा ग्रंथ कोणता?

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

प्र.२ टिपा लिहा.

१) स्त्रीवादाचा इतिहास

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

२) भारतातील स्त्रीवादाचा उदय

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

प्र. ३ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) लिंगभेदासंबंधीच्या उदारमतवादी किंवा मवाळवादी स्त्रीवादी सिद्धांत लिहा

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

२) क्रांतिकारी किंवा जहाल स्त्रीवादी सिद्धांत स्पष्ट करा

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

३) साम्यवादी-समाजवादी स्त्रीवादी सिद्धांत कोणत्या बाबींना महत्त्व देतो.

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

४)    उत्तर - आधुनिक स्त्रीवादी सिद्धांताची सविस्तर चर्चा करा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

## २.५ सारांश :

स्त्री-पुरुषामध्ये फरक ओळखण्याचा आधार म्हणजे लिंगभेद होय. समाजात पहिल्यापासूनच लिंगभेदानुसार श्रमविभागणी झाल्याने पुरुष म्हणजे उत्पादक आणि स्त्री म्हणजे प्रजोत्पादक असे कार्य सुरू झाले. स्त्री ही पुरुषांच्या तुलनेत बरोबरीची असूनही लैंगिकदृष्ट्या ती आघातक्षम असल्यामुळे तिच्या मुक्त संचाराबाबत अनेक बंधने आली. या आणि अशा अनेक बंधनातून स्त्रियांना मुक्त करण्यासाठी स्त्रीवाद ही पाश्चात्त्य विचारधारा अस्तित्वात आली. या विचारधारेतूनच पुढे स्त्रीवादी चळवळी अस्तित्वात आल्या व इ.स. १८७२ मध्ये फ्रान्समध्ये आणि इ. स. १९२८ मध्ये इंग्लंडमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. भारतात इ.स. १९७० नंतर स्त्रीवादाचा उदय होऊ लागला असे मानले जाते. या स्त्रीवादासंबंधी प्रामुख्याने उदार मत**वा**दी किंवा म ाळ स्त्रीवाद, जहाल किंवा क्रांतिकारी स्त्रीवाद, साम्यवादी किंवा समाजवादी स्त्रिवाद आणि उत्तर-आधुनिक स्त्रीवादी सिद्धांत अस्तित्वात आले व प्रत्येक स्त्रीवादी सिद्धांत स्त्रियांची 'दासी' या संकल्पनेतून मुक्तता करण्यासाठी विविध पर्याय सुचवू लागले.

## २.६ संदर्भसूची


१) कुलकर्णी पी. के. (२००६), समाजशास्त्रातील सैद्धांतिक दृष्टिकोन. श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

२) सुंदसिंह ठाकूर (२००६), युजीसी सेटनेट पेपर- ३, निर्मल प्रकाशन,    नांदेड.

३) साखरे सीमा, स्त्रीवाद - नागपूर

४) भागवत, रेगे, पलसाने (१९९४), स्त्री जीवनाची गुंतागुंत - स्त्री अभ्यासकेंद्र, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ पुणे.


## क्षेत्रीय कार्य - प्रात्यक्षिक

# घटक – ३

## लिंगभाव आणि समाज

**अनुक्रमणिका**

**३.० घटकाची उद्दिष्टे**

**३.१ प्रस्तावना**

**३.२ उत्पादन आणि पुनरुत्पादन**

**३.३ स्त्रियांचा दर्जा आणि भूमिका**

**३.४ घरकाम आणि स्त्रिया**

**३.५ लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी**

**३.६ स्त्रियांचे काम आणि तंत्रज्ञान**

**३.७ स्त्रिया आणि अर्थव्यवस्था**

**३.८ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न**

**३.९ सारांश**

**३.१० पारिभाषिक शब्दार्थ**

**३.११ संदर्भ गंथसूची**

## ३.० घटकाची उद्दिष्टे

१) उत्पादन व पुनरुत्पादन प्रक्रियेत स्त्रियांचे स्थान जाणून घेणे.
२) कुटुंबात स्त्रियांच्या कामाचे स्वरूप व महत्त्व अधोरेखित करणे.
३) स्त्रियांचा आर्थिक दर्जा व भूमिका यांचा संबंध समजावून घेणे.
४) लिंगभेदावर आधारित श्रमविभागणीचे स्वरूप स्पष्ट करणे.
५) तंत्रज्ञानाचा स्त्रियांच्या आर्थिक क्षेत्रातील सहभागावर झालेला परिणाम अभ्यासणे.
६) आर्थिक क्षेत्रातील स्त्रियांचे स्थान समजावून घेणे.

## ३.१ प्रस्तावना :

जवळजवळ सर्वच ज्ञात मानवी समाजामध्ये पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे स्थान भिन्न तर असतेच परंतु दुय्यमही असते. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय, इ. सर्वच क्षेत्रात स्त्रियांना दुय्यम स्थन प्राप्त झालेले दिसते. प्रस्तुत घटकात आपण प्रामुख्याने स्त्रियांच्या आर्थिक क्षेत्रातील स्थानाचा अभ्यास करणार आहोत.

१९८५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने असे घोषित केले **की,** जगाच्या एकूण लो संख्येत जवळजवळ ५० टक्के स्त्रिया आहेत. त्या जगाच्या एकूण कार्यबळापैकी $^{२}/_{३}$ श्रमशक्तीत

सहभागी आहेत. परंतु उत्पन्नाचा विचार केल्यास जागतिक उत्पन्नापैकी केवळ १/२ उत्पन्न स्त्रियांच्या हाती मिळते. आणि जगातील एकूण संपत्तीच्या १/१०० संपत्ती फक्त स्त्रियांच्या मालकीची आहे. आजच्या जगात सामर्थ्य हे स्नायूंमध्ये फारसे सामावलेले नसून पैशामध्ये सामावलेले आहे. आणि स्त्रिया जास्त झिजत असूनही त्यांचा मालमत्तेवर जास्त अधिकार नाही. प्रश्न असा आहे की, हे असे का घडावे? प्रस्तुत घटकात घरा ील आणि घराबाहेरील स्त्रियांच्या कामाचे स्वरूप, त्यांच्या कामाची दखल न घेतली जाण्याची कारणे इ. समजावून घेणे आवश्यक आहे. बहुसंख्य स्त्रियांचे काम कुटुंबाच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी होत असते. स्वयंपाकपाणी, साफसफाई, मुलांचे संगोपन, कुटुंबीयांची काळजी, सेवाशुश्रूषा इ. बरोबरच ग्रामीण भागात चारावैरण गोळा करणे, गाईगुरांची काळजी घेणे इ. विविध प्रकारची कामे स्त्रिया करीत असतात. घरकामाव्यतिरिक्त असंख्य संबंधित कामे स्त्रिया करीत असतात. मात्र त्यांच्या कामाची पुरेशी दखल घेतली जात नाही. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना दुहेरी कामाचे ओझे असते. तसेच कामाच्या ठिकाणी विविध प्रकारच्या पक्षपातास तोंड द्यावे लागते. आर्थिक विकासाचा, तंत्रज्ञानातील प्रगतीचा असंघटित क्षेत्रातील स्त्रियांवर विपरित परिणाम होतो. याशिवाय स्त्रियांचे काम, पुरुषांचे काम अशीही विभागणी दिसते. या सर्व गोष्टींचा परामर्श प्रस्तुत पाठात घेण्याचा प्रयत्न करूया.

## ३.२ उत्पादन आणि पुनरुत्पादन

### ३.२.१ ऐतिहासिक मांडणीचा विचार

मानवी समाजात स्त्रियांची संख्या सामान्यपणे ५० टक्के आहे, असे दिसून येते. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने शतकानुशतके अनेक अनुभव घेऊन जगल्या आहेत आणि कामेही करीत आल्या आहेत. मात्र असे असूनही इतिहास घडविण्यामधला त्यांचा सहभाग मात्र नेहमीच नाकारला आहे.

उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक साधनांमधून असे दिसून येते की, इतिहासपूर्व संस्कृतीमध्ये स्त्रियांचे उत्पादनातील आणि पुनरुत्पादनातील योगदान अत्यंत मोलाचे मानले गेले. मध्यभारतातील गुहांमध्ये आढळणारी जुनी चित्रे असे सुचवितात की, शिकारीच्या आणि कंदमुळे गोळा करणाऱ्या अवस्थेत लैंगिकतेवर आधारित श्रमविभागणी अगदी काटेकोर नव्हती. फळे, कंदमुळे गोळा करणाऱ्या स्त्रिया शिकारीमध्येही सहभगी होत असत. फुळे, कंदमुळे हे अन्न उदरनिर्वाहासाठी आवश्यक मानले जाई. तर शिकारीतून मिळविलेले मांस हे पूरक अन्न आणि मेजवानी म्हणून वापरले जाई. एकमेकांना भेटी देण्यासाठीसुद्धा या अन्नाचा वापर होई. या काळातील समाजांचे टिकून राहणे आणि सातत्य हे स्त्रियांच ा संगोपन, संवर्धक कामगिरीवर अवलंबून होते हे निश्चित.

या टप्प्यावर माणसाने अधिक धारदार आणि लांब पल्ल्याची शस्त्रे विकसित केली, त्या टप्प्यावर मोठ्या प्राण्यांच्या शिकारीला सुरुवात झाली असाव . शिकारीच्या मोहिमेवर शारीरिकदृष्ट्या सबल पुरुष आणि गरोदर नसलेल्या किंवा अंगावर दूध पिणारे मूल नसलेल्या स्त्रिया जात असतील. एकीकडे मोठ्या शिकारीतून आलेल्या मांसाचे जतन करणे आणि दुसरीकडे वनशेती, अन्नधान्य साठविणे, काही पाळीव प्राणी म्हणून बाळगणे अशी अनेक कौशल्ये पुढच्या काळात माणसाने विकसित केली असावीत. जास्त मुले जन्माला येऊ

लागली आणि लोकसंख्या वाढली अशा टप्प्यावर हे घडले असावे.

उत्पादनाची पातळी अशा तऱ्हेने उंचावल्यावर आता उत्पादन गरजेपुरते राहिले नाही. संपत्तीची जाणीव झाल्यानंतर स्त्रियांच्या आई होण्याच्या क्षमतेकडे अधिक साधनात्मक पद्धतीने पाहिले गेले असेल. मातृत्वाला आता एक विशिष्ट सांस्कृतिक अर्थ प्राप्त झाला. याच काळात पशुपालन अवस्था सुरू झाली असावी. प्राण्यांचे लैंगिक जीवन पुरुषांना जवळून पाहायला मिळाले असावे व त्यातून गुरांना फळविताना माणसाला स्वत:च्या लैंगिक क्षमतेची जाणीव झाली असावी. गर्भधारणेत पुरुषांची भूमिका काय असते, याचे ज्ञान त्याला झाले असावे. प्रजोत्पादन ही केवळ स्त्रीची मिरासदारी नसून स्त्री व पुरुष दोघांच्याही संबंधातून नवीन मानव जन्माल येतो, हा शोध फार महत्त्वाचा असावा. यातून पुरुषांमध्ये वर्चस्वाची भावना निर्माण झाली असण्याची शक्यता आहे. दोन्मधींटां ल स घर्ष मिटविण्याचे साधन म्हणून स्त्रियांना खाजगी मालमत्ता मानले जाऊ लागले असावे. एकीकडे कृषी संस्कृतीचा विकास आणि दुसरीकडे सरंजामी शासनव्यवस्थो बीढले दिसत . तसेच स्त्रियांच्या लैंगिकतेवरील नियंत्रण आणि स्त्रीची प्रतिष्ठा, पावित्र्य इत्यादी कल्पना व मूल्यांना महत्त्व प्राप्त झाले.

जसजशी शासनसंस्था उभारली जाते, तसतशी स्त्रियांवरची पुरुषांची सत्ताही काही प्रमाणात शासनसंस्थेकडे सोपवली जाते. औद्योगिक भांडवलशाहीच्या उदयाबरोबर खाजगी आणि सार्वजनिक जीवनात दुभंगलेपणा निर्माण होतो. यातूनच स्त्रियांचे श्रम बाजूला पडतात. त्यांचे घरकाम अदृश्य आणि विनामोबदल्याचे ठरते. प्रगत भांडवली समाजात अत्यंत पद्धतशीरपणे उत्पादन प्रक्रियेतून स्त्रियांना वगळले जाते आणि स्त्रियांच्या पुनरुत्पादन क्षमतेवर फार मोठ्या प्रमाणावर नियंत्रण ठेवले जाते, असे दिसते.

### ३.२.२ सारांश

थोडक्यात स्त्रियांच्या उत्पादक आणि पुनरुत्पादक श्रमांचे अपहरण हा स्त्रियांच्या दुय्यमत्वाचा भौतिक पाया आहे. आपल्या आजूबाजूला याची अनेक उदाहरणे आपण पाहत असतो. भारतात बहुसंख्य स्त्रिया (जवळजवळ ९० टक्के) असंघटित क्षेत्रात राबत असतात आणि आपल्याला किती मुले असावीत, हे ठरविण्याचे स्वातंत्र्यही त्यांना नसते, हे लक्षात घेतले पाहिजे. भुकेसाठी व जिवंत राहण्यासाठी माणूस उत्पादन करतो. या उत्पादन व्यवहारामध्येच लिंगसापेक्ष कामाची विभागणी प्रथमत: जन्माला आली. स्त्रीची जननक्षमता (पुनरुत्पादन क्षमता) जशी अपरिहार्य मानली गेली तीच अपरिहार्यता या लिंगसापेक्ष उत्पादन श्रमांना व कौशल्यांना आलेली दिसते.

## ३.३ स्त्रियांचा दर्जा आणि भूमिका

**३.३.१ दर्जा व भूमिका – संकल्पनेचा अर्थ कोणत्याही सामाजिक समूहात व उपसमूहात असलेल्या व्यक्तीच्या स्थानाला इतरांच्या स्थानाच्या संदर्भात 'दर्जा' ही संज्ञा दिली जाते. समाजशास्त्रीय दृष्टीने दर्जा म्हणजे ''एखाद्या विशिष्ट समाजव्यवस्थेत विशिष्ट काळी विशिष्ट व्यक्तीला समाजात असलेले स्थान होय.'' या स्थानानुसार प्राप्त झालेले हक्क आणि पार पाडाव्या लागणाऱ्या जबाबदाऱ्या यांच्या संदर्भातच इतरांच्या दर्जातील फरक स्पष्ट होत जातो. समाजव्यवस्थेत व्यक्तीला जे स्थान असते त्यानुसार**

**त्यांना कार्य करावे लागते. म्हणजेच भूमिका पार पाडाव्या लागतात. प्रत्येक दर्जायुक्त स्थान हे भूमिकेच्या संदर्भातच व्यक्त होत असते.**

### ३.३.२ स्त्रियांच्या आर्थिक भूमिका – महत्त्वाचे मुद्दे

समाजाची आर्थिक विकासाची अवस्था, स्त्रियांच्या कुटुंबातील व बाहेरच्या समाजातील भूमिकांबाबत प्रचलित असलेल्या सामाजिक, सांस्कृतिक अभव त्ती आणि सामाजिक दर्जाच्या मूलभूत पैलूंबाबतचे समाजाचे विचार या गोष्टींचा, स्त्रियांच्या आर्थिक भूमिका आणि त्यांना आर्थिक क्षेत्रात सहभागी होण्यास उपलब्ध असलेल्या संधी यांचे मोजमाप करण्यासाठी पाहणे आवश्यक आहे.

स्त्रियांच्या आर्थिक भूमिका व आर्थिक क्षेत्रात सहभागी होण्या  त्यांना समान हक्क व समान संधी मिळण्याची आवश्यकता याबाबत पुढील घटक महत्त्वाचे आहेत.

१) स्त्रियांचे आर्थिक दास्यत्व व परावलंबन हे त्यांच्या शोषणास कारणीभूत ठरते. आणि स्त्रिया या सामाजिक न्याय व मानवी अधिकार यापासून वंचित ठेवल्या जातात. कार्लमार्क्स व महात्मा गांधीजी या दोघांनी याच कारणास्तव स्त्री आणि पुरुष यांच्या भूमिकेतील ताठर भेदभावाला विरोध केला.

२) समाजाच्या विकासासाठी समाजातील सगळ्या लोकांनी पूर्णपणे सहभागी होणे व स्त्रियांच्या अंत:सामर्थ्याच्या संपूर्ण विकास होण्यासाठी त्यांन  संधी मिळणे आवश्यक असते. (स्त्रियांच्या बाबतीत केल्या जाणाऱ्या भेदभावाचे निराकरण करण्याच्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या ठरावाचा हा केंद्रबिंदू आहे.)

३) लोकसंख्यात्मक बदल आणि सामाजिक परिवर्तन यामधील आ ुनिक प्रवृत्ती म्हणजेच विवाहाचे वाढते वय, छोटी कुटुंबे, शहरीकरण, स्थलांतर, वाढती महागाई, उंचावत चाललेले राहणीमान आणि निर्णय घेण्याच्या बाबतीत स्त्रियांचा वाढत्या प्रमाणावर सहभाग मिळावा म्हणून केल्या जाणाऱ्या मागण्या इत्यादी घटकांनी स्त्रियांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या यात महत्त्वपूर्णरित्या परिवर्तन घडवून आणले आहे. सामाजिक पायबंदामुळे स्त्रियांना या आव्हानांना तोंड देता आले नाही तर सामाजिक आपत्ती ओढवण्याची भीती आहे.

स्त्रियांच्या आर्थिक क्षेत्रातील वाढत्या प्रमाणावरील सहभागाला पुढील घटकांमुळे अडथळे निर्माण होतात.

अ) स्त्रियांच्या भूमिका या ठराविक साच्यातच केल्या गेल्या पाहिजेत असे मानणारी पुराणमतवादी विचारसरणी. (स्त्री-पुरुषांमध्ये केली जाणारी श्रमविभाग ी ही केवळ वेगवेगळ्या समाजात भिन्न नसून ती एकाच समाजातील विविध लोकसमूहातही भिन्न राहिली आहे.)

ब) कामाच्या क्षेत्रात जर स्त्रिया मोठ्या प्रमाणावर सहभागी झाल्या तर त्यातून दीर्घकालीन बेकारी निर्माण होण्याची भीती. यातूनच स्त्रियांची अर्थव्यवस्थेतील भूमिका ही सीमान्त आहे, असे मानणारे सिद्धांत जन्मास येतात. अर्थात हा सिद्धांत कृषि प्रधान समाजांना मात्र लागू पडत नाही. कारण तेथे सर्व कुटुंब हाच उत्पादक घटक असतो. उत्पादन पद्धतीतील तांत्रिक परिवर्तनामुळे तांत्रिक नैपुण्याबद्दल मागणी होऊ लागते आणि असे नैपुण्य हस्तगत करण्याची संधी स्त्रियांना न मिळाल्याने नवीन अर्थव्यवस्थेत त्यांना स्थान मिळत नाही. (अलीकडच्या काळात अत्यल्प प्रमाणात यात बदल होऊ लागला आहे.)

### ३.३.३ भारतीय अर्थव्यवस्थेतील स्त्रियांच्या भूमिकेची अवनती :

स्त्रियांच्या स्थानावर व भूमिकेवर परिणाम करणारे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचे घटक –

१)हस्तव्यवसायांना सामान्यत: लागलेली उतरती कळा.

२)कृषी व्यवसायावर पडणारा लोकसंख्येचा वाढता दाब.

३)ग्रामीण भागातील वाढते दारिद्र्य आणि त्यामुळे लोकांना शहराकडे करावे लागणारे स्थलांतर.

४)सतत विकास पावणाऱ्या तांत्रिक प्रगतीबरोबर आधुनिक उद्योगांची होणारी वाढ.

५)शिक्षणाचा प्रसार.

६)वाढती महागाई.

७)जागतिकीकरण.

## ३.४ घरकाम आणि स्त्रिया

### ३.४.१ घरकाम – अदृश्य काम

जेव्हा आपण स्त्रिया आणि काम असे शब्द वापरतो, तेव्हा आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, सर्व स्त्रिया कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचे काम करीतच असतात. परंतु स्त्रियांचे काम कोणते? असा प्रश्न सहजच उभा केला जातो. या संदर्भात ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या अमृता प्रितम यांची एक फार सुंदर कविता आहे. आपण थोडक्यात ही कविता बघूया. (कवितेचा भावार्थ आहे)

यदि एक पतीसे पुछा जाए, ''तुम्हारी बीबी क्या करती है?''
तो फिर, ...
कौन जनम देता है – किसान या श्रमिक को?
बर्तन माँजना, कपडे धोना, खाना बनाना या सफाई करना –
कौन करता है?
कौन संभालता है – बच्चोंको या बुढोंको?
किसकी बदौलत पुरुषोंको समय मिलता है –
दारू पिना या ताश खेलनेको?
कौन करता है काम – बिना छुट्टी, बिना दाम, बिना आराम?
जिसका ना कोई मूल्य है, ना पहचान – ऐसा काम कौन करता है?

या छोट्याशा कवितेत एकूणच भारतात स्त्रियांच्या कामाकडे पाहण्याचा सर्वसामान्य दृष्टिकोन स्पष्ट होतो. घरातील आणि घराबाहेरील स्त्रियांच्या कामाची दखल घेतली जात नाही. बहुसंख्य स्त्रियांचे काम कुटुंबाच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी होत असते. पाणी भरणे, इंधन, चारावैरण गोळा करणे, गुराढोरांची निगा राखणे, स्वयंपाकपाणी, साफसफाई, घरातील सर्व सदस्यांच्या आरोग्याची काळजी यासारख्या कामाबरोबरच इतर विविध कामे त्या करतात. पण त्यांच्या कामाची पुरेशी नोंद घेतली जात नाही. असंघटित क्षेत्रात पगारी रोजगार करणाऱ्या स्त्रियांच्या बाबतीत देखील हेच घडते.

### ३.४.२ भारतीय जनगणना – स्त्रियांचे काम

दर दहा वर्षांनी होणाऱ्या भारताच्या जनगणनेत लोकसंख ेच्या अर्थ◦ यवस्थेच्या विविध पैलूंचाही विचार होतो. त्यात ‘काम’ या शब्दाची व्याख्या अशी केली आहे की ज्यामुळे बऱ्याचशा स्त्रियांचे काम हे ‘काम’ या शब्दात बसतच नाही. काम या शब्दाची जी व्याख्या केली जाते, त्यात घरातील विनावेतन काम मोजले जात नाही. प्रस्थापित सामाजिक - आर्थिक विश्लेषणात स्त्रियांचे बहुतांश काम नाकारले जाते, अदृश्य राहते. भांडवली अर्थव्यवस्थेमध्ये विनिमय मूल्य असणाऱ्या क्रयवस्तू म्हणजेच बाजारात विकण्यासाठी तयार केलेल्या वस्तू यांच्या निर्माणासाठी तयार केलेल्या श्रमांना किंवा ज्या श्रमांच्या मोबदला आर्थिक स्वरूपात मिळतो, अशा श्रमांनाच उत्पादक काम मानले जाते. म्हणूनच उदरनिर्वाहासाठीच किंवा बाजारात विकायला न गेलेले परंतु उत्पादन करणारे कामही मोजले जात नाही.

अर्थात देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये स्त्रियांच्या योगदानाविषयक जाणीव व ढू लागल्यामुळे ‘काम’ या संज्ञेच्या व्याख्येत धोरणात्मक बदल झाला आहे. १९९१ सालच्या जनगणनेत कामाच्या कक्षेत, थोडेफार उत्पन्न मिळवून देणारे स्त्रियांचे अंशकालिन काम समाविष्ट करण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यामुळे त्या जनगणनेत असे म्हटले की, शेतीखेरीज स्त्रिया हस्तव्यवसाय, विणकाम, शिवणकाम, भाजी विक्री इ. विविध्यवसाय करू लागल्या आहेत.

### ३.४.३ स्त्रियांचे घरगुती काम - अदृश्य नफा

सामान्यपणे असे दिसून येते की, एका बाजूने स्त्रीला उत्पन्न असलेले काम मिळत नाही, त्यामुळे अर्थव्यवस्थेअंतर्गत तिला स्थान मिळत नाही. तिला आर्थिक स्वातंत्र्यापासून वंचित ठेवले जाते. तर दुसऱ्या बाजूने मात्र ही अर्थव्यवस्था स्त्रियांच्या ि नमोबदल्याच्या श्रमांचे अदृश्य पद्धतीने शोषण करते. ज्यामुळे स्त्रिया धड कामगार दिसत न हीत आणि तरीही त्या कामगार असतात, पण त्यांना संघटित करता येत नाही.

अर्थव्यवस्थेमध्ये आज प्रत्येक कामगोसेसीमुळे ाल पाहिज ही कल्पना मान्य झाली आहे. यामध्ये मानवी गरजा भागविणाऱ्या सर्व वस्तूंची किंमत काही प्रमाणात गृहीत धरली जाते. अर्थात बाजारातून केवळ वस्तू, धान्य आणून काम होत नाही. त्यावर अनेक श्रम, प्रक्रिया कराव्या लागतात. उदा. धान्य स्वच्छ करणे, दळणे व नंतर स्वयंपाक करणे. धुणे, भांडी घासणे, झाडलोट, आजाऱ्याची काळजी इ. कामे असतात. कारखान्यात किंवा घराबाहेर काम करणाऱ्या कामगाराची दिवसभरात झालेली झीज भरून त्याला सक्षम करण्याचे काम असो की मुलांचे संगोपन व देखभाल करून भविष्यकाळातील श्रमशक्तीची जोपासना असो, इ. विविध प्रकारे स्त्रिया घरात काम करीत असतात, पण त्यांच्या श्रमशक्तीला उत्पादक मानले जात नाही. परिणामी त्यांचे काम अदृश्य राहते म्हणून तिचे शोषण होते. कुटुंब, प्रेम, त्याग, सहनशीलता वगैरे शब्दांच्या आवरणाखाली स्त्रिया सर्व कामे करीत असतात आणि भांडवलशाही उत्पादनाच्या प्रक्रियेला मदत करीत असतात. विनावेतन काम करून नफ्यामध्ये भर घालीत असतात. पण हा नफा अदृश्य राहतो. ‘अतिरिक्त मूल्य’ निर्माण करण्यात मदत करत असतात.

पुरुषांच्या, कुटुंबाबाहेरच्या क्षेत्रातील भूमिकेत समाजमान्यता स्त्रियांच्या कुटुंबबाह्य, किंवा बाहेरच्या जगातील भूमिकेला अद्याप पुरेशा प्रमाणात मान्यता ि ळालेली नाही.

संपूर्णपणे केवळ चूल आणि मूल इतकेच कार्यक्षेत्र असलेल्या स्त्रिया जसे सर्वकाळ केवळ आपल्या संसारालाच वाहून घेतात तर असंघटित क्षेत्राते असो की पांढरप शा व्यवसायात असो. या क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांनीदेखील **सं**सारदक्ष अ लेच पाहिजे, अशी अपेक्षा केली जाते. पुरुषांच्या बाबतीत असा दुहेरी भूमिकेचा विचार नसतो. कुटुंबात किंवा कुटुंबाबाहेर केले जाणारे काम असो की कोणतेही महत्त्वाचे निर्ण असो, या सव च बाबतीत स्त्री-पुरुषांच्या भूमिकेत मोठ्या प्रमाणावर भेदभाव अद्यापही आहे.

## ३.५ लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी

### ३.५.१ लिंगभेदावर आधारित श्रमविभागणीचे सैद्धांतिक विश्लेषण –

हजारो वर्षांपासून समाजात लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी प्रचलित आहे. स्त्रिया शारीरिकदृष्ट्या अबला आहेत, म्हणून युद्ध किंवा शारीरिक कष्टासाठी त्या योग्य नाहीत या कल्पनेतून ही विचारप्रणाली विकसित झाली आहे.

लिंगभेदावर आधारित श्रमविभाजन ही एक बहुमितीय संकल्पना आहे. 'श्रमविभागणीच्या सिद्धांताचा आधार घेऊन अनेक समाजशास्त्रज्ञांनी यावर स्पष्टीकरण दिले आहे. थरडॉक (१९४९) च्या मते जैविक भेदामुळे श्रमविभागणीला आधार मिळतो. टॉलकॉट पार्सन्स (१९५९) च्या मतेही पुरुषांची कार्ये साधनात्मक आणि स्त्रि**यां**ची का भावात्मक असतील तर एकमेकांना पूरक होतात आणि समाजव्यवस्थेचे कामकाज चांगले चालते. जेफ्रे (१९७९) यांनी भांडवलशाही अर्थव्यवस्थेत स्त्रियांकडे ग्राहक म्हणून व मुलांवर संस्कार करणाऱ्या म्हणून पाहिले जाते, उत्पादक म्हणून नाही, असे मांड ल आहे. मार्क्सच्या मतेही भांडवलशाहीत मालमत्तेला वारस मिळवून देण्याच्या स्त्रीच्या भूमिकेला आणि पर्यायाने एक पती-पत्नी विवाहाचे महत्त्व स्पष्ट केले आणि स्त्री-पुरुष समानता समाजवादी अर्थव्यवस्थेतच येऊ शकेल यावर भर दिला. अर्थात असे असले तरी स्त्रीचा प्रजनन वा लैंगिक संबंधांबाबतचा अधिकार यावर स्पष्ट विचार मांडले नाहीत. समाजवादी स्त्री-वादी लॅडीस (१९९१) यांनी मात्र स्त्रीच्या दर्जाचा विचार केवळ आर्थिक संरचनेवर हल्ला चढवून केला नाही तर त्यांनी सर्वच व्यवस्थांमधील पुरुषी वर्चस्वाविरुद्ध आवाज उठविला. बऱ्याचशा स्त्रीवाद्यांनी इतिहास व आर्थिक घटकांचा परामर्श न घेता मूलतः स्त्रीच्या प्रजननाच्या भूमिकेमुळे तिला पुरुषाचे वर्चस्व मान्य करावे लागले आणि ती मात्र गौण आवेइतर अन क भूमिकांना आणि आत्मसन्मान देणाऱ्या स्थितीला मुकली असे मानले. (डॉ. सुधा काळदाते 'स्त्रियांचा दर्जा: संकल्पना व स्वरूप' – डॉ. शुभांगी गोरे – संपादित 'स्त्री परिवर्तन ची आव्हाने' या लेखाच्या आधारे)

### ३.५.२ अर्थव्यवस्थेतील स्त्री-पुरुषपरत्वे श्रमविभागणी

हजारो वर्षापासून सर्व समाजात स्त्री-पुरुषपरत्वे श्रमविभागणी प्रचलित आहे. आजच्या जगात दिसणारे स्त्रियांचे काम, पुरुषांचे काम अशी विभागणी नैसर्गिक नाही. उत्क्रांतीच्या प्रक्रियेत सहज घडलेली नाही हे सांगण्यासाठी स्त्रीवादी अभ्यासक लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी या विषयी बोलू लागल्या. स्त्रियांना भोगावी लागणारी विषमता त्यांच्या बाईपणाशी अथवा देहाशी निगडित नसून सामाजिक परिस्थितीतील भौतिक वास्तवाशी आहे, हे स्त्री-प्रश्नांचा विचार करणाऱ्यांना जाणवते.

भारतात अशा प्रकारची श्रमविभागणी पुरुषी वर्चस्व, जात आणि प्रदूषण तत्त्वांवर आधारलेली आहे. स्त्रिया शारीरिकदृष्ट्या अबला आहेत आणि युद्ध किंवा इतर शारीरिक कष्टांच्या कामासाठी त्या योग्य नाहीत, या कल्पनेतून ही विचारप्रणाली निर्माण झाली आहे. म्हणून स्त्रियांचा सहभाग अल्पवेतनी शेतीची कामे, हस्तोद्योग आणि घरगुती कामे यापुरताच मर्यादित राहिला.

'आधुनिक' बाजार अर्थशास्त्रात निर्वाह मितव्ययाचा समावेश केल्यामुळे पारंपरिक स्त्री-पुरुषपरत्वे श्रमविभागणी ग्रामीण व नागरी क्षेत्रात एक रचनात्मक तत्त्व म्हणून प्रश्नास्पद ठरले आहे, कारण ते अन्यायमूलक आहे. स्त्रिया कौशल्याचे कोणतेच काम करू शकत नाहीत आणि त्यांना कमी वेतन मिळते किंवा त्यांनी कुटुंब टिकून राहण्याच्या गरजा कुठल्याही लाभाशिवाय भागवाव्यात असे अपेक्षित असते. आधुनिक बाजार अर्थव्यवस्थेत पुरुष कामगारांना वस्तू उत्पादनात ओढून आणि स्त्री कामगारांना निर्वाह उत्पादनामध्ये ठेवून स्त्री-पुरुषपरत्वे श्रमविभागणी तशीच चालू राहते. उदा. मागासलेल्या जातीतील पुरुषवर्ग आपले पारंपरिक व्यवसाय सोडून पुढे जाऊ शकले. पण त्याच समाजाच्या स्त्रिया आपला पारंपरिक लहानसहान कामे करीत तशाच राहिल्या.

भारतीय संदर्भात पाहता स्त्रिया घरकाम करीत असतानाच अनेक तऱ्हेचे उत्पादक काम करीत असतात. उदा. अडत व्यापाऱ्यांच्या घरात मोठ्या प्रमाणात आलेले धान्य साफ करण्याचे, जपून ठेवण्याचे काम स्त्रिया करतात. अन्नपदार्थ तर सर्वच स्त्रिया करतात. कोकणामध्ये छोट्या छोट्या शेतीच्या तुकड्यावर बायका राबत असतात आणि पुरुष मुंबईला कारखान्यात काम करतात. स्त्रिया नागलीची शेती, नारळीच्या-सुपाऱ्यांच्या बागेत काम करतात. कुंभाराच्या घरी चाकावर काम करणारा कुंभार कामगार समजला जातो पण माती आणणे, त्यातील दगड बाजूला करणे, पाणी मिसळणे, मातीची भांडी भाजणे इ. कामात मदत करणाऱ्या स्त्रियांना कामगार मानले जात नाही. अर्थात या सर्व प्रक्रियेत स्त्रियांचे भांडवलावर नियंत्रण नसते. ज्ञान, संपत्ती, कला, कौशल्ये, साधनसामग्री या कशावरही त्यांचा हक्क नसतो. आपली स्वत:ची श्रमशक्ती आणि आपण उत्पन्न केलेल्या वस्तूंची विक्री यावर स्त्रियांचे नियंत्रण नसते. त्यामुळे स्त्रियांचे श्रम म्हणजे लवचिक साधन सामुग्री असते. म्हणजेच पुरुषप्रधान कुटुंब व्यवस्थेत स्त्रियांच्या उत्पादक कामावर नियंत्रण ठेवलेले असते. आपल्या सांस्कृतिक संदर्भात जात, वर्ग यांच्या विषमतेची मुळे स्त्रीच्या दुय्यम स्थानाशी निगडित आहेत, असे म्हणता येईल. शासनसंस्था देखील आपल्या कल्याणकारी योजनांद्वारे अथवा विकासाच्या ढाच्यातून हेच घडवीत असतो. उदा. आजकाल स्त्रियांना शिवणेच्याचे प करण , पापड, लोणची तयार करण्याचे काम (बचत गटांच्या माध्यमातून) दिले जाते.

**३.५.३ लैंगिकतेवर आधारित श्रमविभागणीचे महत्त्वाचे घटक :**

१) स्त्री कामगारांना विशिष्ट प्रकारचे व विशिष्ट क्षेत्रात काम मिळते.

२) स्त्रियांना कमी वेतन मिळते आणि अकुशल कामगार मानले जाते.

३) त्यांचे स्वत:च्या श्रमशक्तीवर नियंत्रण नसते.

४) कृषीविषयक आणि अन्य प्रकारची अनेक कामे स्त्रियांकडून करवून घेतली जातात, परंतु ती अदृश्य, विनावेतन असतात.

५) घरात आणि घराबाहेर कामाचे दुहेरी ओझे स्त्रिया आपल्या खांद्यावर वागवितात.

६) सर्वदूर पसरलेल्या पुरुष प्रधानतेमुळे स्त्रियांच्या कामाचे अवमूल्यन तर होतेच, पण जेथे स्त्रिया घर चालवित असतात, तेथेही स्त्रियांचे अर्थार्जन पूरकच मानले जाते.

७) वरच्या जातीतील स्त्रिया आणि कनिष्ठ जातीतील स्त्रिया यांच्यात देखील लिंगभेदावर आधारित श्रमविभागणीचा अनिष्ट परिणाम दिसून येतो.

थोडक्यात पाहता लिंगभेदावर आधारित श्रमविभागणीचे वरील घटक महत्त्वाचे आहेत. अलीकडच्या काळात उच्च शिक्षणाच्या वाढत्या संधीकडे अनेक स्त्रिया पांढरपेशा व्यवसायात येत आहेत. यातील बहुसंख्य घरकाम आणि नोकरी या चक्रात अडकतात. अनेकींना आपले उत्पन्न नवऱ्याच्या ताब्यात द्यावे लागते तर अविवाहित मुली हुंड्यासाठी पैसा जमवितात. घरबसल्या काम करणाऱ्या व घराला आर्थिक मदत करणाऱ्या स्त्रियांचा स्वत:च्या मिळकतीवर अधिकार नसतो. घरकामाचे मूल्य नसते. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या त्यांचे परावलंबन आढळते. शासकीय योजनांमधून स्त्रियांसाठी विशिष्ट कामे दिली जातात. एकूणच स्त्रीचा प्रामुख्याने चूल आणि मूल यांच्याशीच संबंध जोडला जातो. पत्नी आणि माता या तिच्या स्वाभाविक भूमिका मानल्या जातात.

## ३.६ स्त्रियांचे काम आणि तंत्रज्ञान

### ३.६.१ प्रस्तावना

स्त्रियांचे काम किंवा स्त्रिया आणि काम स्पष्ट करताना लक्षात घेण्याची महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्व स्त्रिया कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचे काम करीतच असतात. परंतु तरीही त्यांचे काम उत्पादक आहे की अनुत्पादक, उपयुक्त आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जातो. अर्थात स्त्रियांनी कोणते काम कसे, किती करावे हे सर्व पुरुषप्रधान व्यवस्थेच्या चौकटीतच ठरते. आतापर्यंत आपण एकूणच स्त्रियांच्या कामाविषयी चर्चा केली आहे. मानव वंश शास्त्रज्ञांच्या मते धान्य, कपडे, हस्तकला विविध साधने इ. स्त्रियांनीच निर्माण केले आहे. सूत कातणे, कापड विणणे, कापड शिवणे, मातीची खेळणी तयार करणे इ. कामे स्त्रिया करीत असतात. १८व्या-१९व्या शतकात म्हणजे ब्रिटिश काळातदेखील सूत कातणे, कपडे विणणे, दुग्धव्यवसाय, सोन्या-चांदीचे दागिने तयार करणे, शेती इ. विविध व्यवसायात उच्च वर्गातील स्त्रिया वगळता इतर वर्गातील स्त्रिया काम करीत होत्यो, असे दिसत  . बिहार, बंगालसारख्या राज्यात घराघरांत हातमागावर स्त्रिया काम करीत होत्या.

अर्थात ब्रिटिश काळात कापड व्यवसायातच नव्हे तर अनेक क्षेत्रात औद्योगिकीकरणाला सुरुवात झाली. कापड गिरण्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर स्त्रिय  काम करू लागल्या.

मात्र विसाव्या शतकाच्या सुरुवातीला तंत्रज्ञानातील प्रगती, कायद्यातील बदल, परदेशी स्पर्धा इ.मुळे पेपर छपाई, रबर, कोळ**सा**, वाहतुकीची  धने यासारखे अनेक उद्योग-व्यवसाय सुरू झाले. अर्थात उपलब्ध आकडेवारीनुसार त्यात केवळ ८६,००० स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. धान्य, फळप्रक्रिया, दोऱ्या वळणे इ. व्यवसायात स्त्रियांची संख्या जास्त होती. सुरुवातीच्या काळात कापड उद्योगात स्त्रियांची संख्या वाढली. परंतु पुन्हा यंत्रमागामुळे त्यांचे प्रमाण कमी झाले. शहरीकरण, व्यापारीकरण, नवीन नवीन तंत्रज्ञान यामुळे स्त्रियांच्या या क्षेत्रातील सहभागावर अनिष्ट परिणाम झाला.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात व प्रामुख्याने गेल्या ३०-४० वर्षात आर्थिक क्षेत्रात स्त्रियांच्या

सहभागासंदर्भात अनेक बदल झाले. घरगुती कामाच्या व्यवसाय त पुरुषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण अधिक दिसून येते. कारण या व्यवसायात फारसे तंत्रज्ञान लागत नाही. तसेच कच्च्यामालाच्या पुरवठ्यावर प्रक्रिया करून व्यवसाय सुरू करता येतो. त्यामुळेच वेताचे काम, कापडउद्योग, लोणची, पापड, जॅम, जेली, सॉस इ. क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण जास्त दिसून येते.

**३.६.२ – तंत्रज्ञानाचा प्रभाव**

आधुनिक काळात विज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रभाव प्रचंड वाढला अ हे. हजारो स्त्रियांनी आज या क्षेत्रात प्रवेश केला आहे. आतापर्यंत पुरुषप्रधान असलेल्या अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन यासारख्या क्षेत्रात स्त्रियांनी आघाडी घेतली आहे. संरक्षण, अंतराळ संशोधन, संगणक, जाहिरात यासारख्या क्षेत्रातही स्त्रियांनी यश मिळविले आहे.

तंत्रविज्ञानाने आपले सर्व जीवनच प्रभावित केले आहे. बुद्धिवादी व वैज्ञानिक विचारसरणीचा प्रभाव स्त्रियांवरही पडला आहे. १९७३ साली भारतात स्त्री वैज्ञानिकांची संघटनाच स्थापन झाली आहे.

तंत्रज्ञान आणि स्त्रीजीवन यांचा संबंध पाहताना शेती, आरोग्य, उद्योगधंदे इ. विविध क्षेत्रांचा विचार करू या.

**३.६.२ – अ) शेती –**

आधुनिक काळात शेती व्यवसायात प्रगत तंत्रज्ञान आले आहे. पारंपरिक साधने जसे मोट, रहाटगाडगे, नांगर याऐवजी ट्रॅक्टर्स, पंप, मळणी यंत्रे इ. साधने उपलब्ध झाली आहेत. त्यामुळे स्त्री मजुरांची संख्या कमी होऊ लागली. अर्थात काही सकारात्मक बदल झाले. स्त्री मजुरांची संघटना स्थापन झाल्या. त्या आपल्या अधिकाराविषयी जागृत झाल्या. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, सहकारी पतपेढ्या इ. क्षेत्रात स्त्रिया काम करू लागल्या.

ग्रामीण भागातील तसेच आदिवासी क्षेत्रातील गरीब स्त्रियांचा संबंध वनाशी, वृक्षांशी अगदी जवळचा आहे. जंगल उत्पादने (डिंक, मध, कात, तेंदूपत्ता) गोळा करून त्यावर उपजीविका करणाऱ्या या स्त्रियांसाठी वनसंरक्षण अत्यंत महत्त्वाचे. जंगल ठेकेदारांच्या वृक्षतोडीला उत्तर भारतातील ग्रामीण स्त्रियांनी सुंदरलाल बहुगुणा यांच्या नेतृत्व खाली विरोध करून चिपको चळवळ उभारली. ग्रामीण भागात निरक्षर व अज्ञानी असलेल्या या स्त्रिया संघटनात्मक पातळीवर उत्तम काम करू शकतात, हे या चळवळीतून सिद्ध झाले.

थोडक्यात प्रगत तंत्रज्ञानामुळे शेतीच्या क्षेत्रात स्त्रियांच्या जीवनात प्रभाव पडला, असे दिसते.

**३.६.२ ब) मत्स्यव्यवसाय**

भारताला जवळजवळ ७००० कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. येथे राहणाऱ्या मासेमारी करणाऱ्या समाजाचे उदरनिर्वाहाचे एकमेव साधन हे मा ेमारी आहे. या परंपरागत व्यवसायात स्त्रियांचे प्रमाण प्रचंड आहे. ६०% काम प्रत्यक्षपणे म्हणजे प्रत्यक्ष मासेमारी करण्याचे काम पुरुष करतात. मात्र नंतरचे काम करण्यात स्त्रियांचा वाटा ४०% इतका आहे. औद्योगिक प्रगतीमुळे, जागतिकीकरणामुळे, या क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या विकासामुळे एकूणच या मत्स्यव्यवसायावर जो परिणाम झाला आहे त्यामुळे छोट्या मच्छीमारांवर अनिष्ट परिणाम

झाला आहे. अर्थातच स्त्रिया त्यामुळेच बाधित झाल्या आहेत. आज मासेमारीची साधने अत्यंत प्रगत झाली आहेत. मासेमारीचे १ अजस्र जाळे मोठ्या फूटबॉलच्या मैदानाएवढे असते. याचा अर्थ मासेमारी करणारी दोन माणसे आज खूप जास्त मासे कडू शकतात. अशा प्रकारच्या वेगाने होत जाणाऱ्या बदलाचा परिणाम माशांची हाताळणी, विभागणी आणि वापर या साऱ्यांवर होऊ लागला आहे. स्त्रिया मासे पकडून आणल्यानंतरची कामे करतात. खरे तर या स्त्रियाच घराला पैसा मिळवून देणाऱ्या महत्त्वाच व्यक्ती ठरतात. कारण आणलेल्या मासळीतून लाभ मिळविण्याचे आणि अन्न मिळविण्याचे काम त्या करतात. मात्र मोठ्या प्रमाणावर ट्रॉलर्सचा वापर सुरू झाल्यावर टिकाऊपणासाठी माल गोठविण्यास सुरुवात झाली. पर्यायाने स्त्रियांच्या कामावर परिणाम झाला. कोळ्यांवर परिणाम झालाच पण त्यांच्या स्त्रियांवर कठीण परिस्थितीत मासे विकायला जायची वेळ आली. विक्रीसाठी लांबचे अंतर कापणे आणि बाजारातील तीव्र स्पर्धेला तोंड देणे भाग पडते. अनेक स्त्रियांना इतर प्रकारचे मासे निवडणे, सुकविणे किंवा कोळंबी सोलणे त्यांच्यावर प्रक्रिया केल्या जाणाऱ्या ठिकाणी रोजगारावर कामगार म्हणून काम करणे भाग पडले आहे. (संदर्भ - अस्तित्व संघर्ष आणि सार्वभौमत्व या छाया दातार व श्रुती तांबे संपादित पुस्तकातील नलिनी नायक लिखित घटक - स्थिर निर्वाहसाधने विरुद्ध नफेखोरी - मत्स्यव्यवसायातील एक संघर्ष)

**३.६.२ - क) प्रसार माध्यमे - तंत्रज्ञान - स्त्रिया -**

तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे घराघरात आधुनिक इलेक्ट्रॉनिक साधने आली आहेत. त्यामुळे घरातील किचकट, वेळखाऊ कामे झटपट होऊ लागली. स्त्रीला फुरसतीचा वेळ मिळू लागला. त्याचबरोबर नवीन आव्हानेही आली.

सिनेमातून दाखविल्या जाणाऱ्या स्त्रीदेहाच्या प्रदर्शनातून, बीभत्स दृश्यातून समाजातील युवकांवर अनिष्ट परिणाम दिसून येतो. बलात्काराचे, छेडछाडीचे प्रमाण वाढले आहे. विज्ञान, तंत्रविद्येच्या युगात, इंटरनेट, व्हिडिओ ही माध्यमे काही महिलांच्या शोषणाचे साधनच आहेत. अनेक अश्लील ब्ल्यू-फिल्म्समध्ये स्त्रिया पैशाच्या लोभाने जातात. या व्हिडिओ फिल्म्समुळे महिलांचे एकप्रकारे व्यापारी शोषण होते. अर्थात या व्यापारी शोषणाला जबाबदार कोण? हा प्रश्न आहे. आपली अर्थव्यवस्था की महिला? औद्योगिक क्रांतीनंतर उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात वाढ होऊन उद्योगांमध्ये तीव्र स्पर्धा निर्माण झाली. आपापला माल खपविण्यासाठी विविध तंत्रांचा वापर होऊ लागला. जाहिरात हे त्यातील एक तंत्र. जाहिरातीत मॉडेल म्हणून सुंदर स्त्रियांना संधी मिळू लागली. अर्थात गरज असो, नसो स्त्रियांच्या शरीराचे प्रदर्शन करण्यास सुरुवात झाली. हे एक प्रकारे शोषणच आहे असे म्हणता येईल. अलीकडच्या काळात मॉडेलिंगच्या व्यवसायालाही चांगले स्थान प्राप्त झाले आहे. अनेक स्त्रिया या क्षेत्रात येत आहेत. चहा, कॉफी, साबण, परफ्युम्स, अंतर्वस्त्रे इ. असंख्य प्रकारच्या जाहिरातीत स्त्रियांचा वापर सुरू झाला. आधुनिक तंत्रज्ञानाने त्यांना हे एक नवीन दालन खुले करून दिले. पण त्याचबरेबर एक भोगवस्तू म्हणूनही त्यांचे प्रदर्शन होऊ लागले. जाहिरातीतील या व्यापारिक शोषणास सुरुवात झाली.

दुसरे असे की, बालसंगोपन, स्वयंपाकघर, स्वच्छता, आरोग्य ही त्या घरच्या स्त्रीचीच जबाबदारी आहे अशी स्त्रीची पारंपरिक प्रतिमा या माध्यमातून अधिक आदर्शपणे लोकांपुढे

मांडली जाऊ लागली. जाहिरातीतील स्त्रिया सगळ्यांनाच आदर्श वाटतात आणि त्याचप्रमाणे स्त्रियांनी घरात काम करावे अशी सामाजिक धारणा दृढ करतात. आधुनिक काळातील तंत्रविदयेमुळे जाहिरात आज घरोघर पोहोचल्यामुळे स्त्री-जीवनावर त्यांचे चांगले - वाईट परिणाम होऊ लागले आहेत.

**३.६.२ स्थलांतर**

भारतीय समाजाच्या परिवर्तनात एक महत्त्वाचे कारण म्हणजे औद्योगिकीकरण आणि नागरीकरण. या प्रक्रियांमुळे सामाजिक रचनेत बदल झाले. संयुक्त कुटुंबपद्धतीची जागा विभक्त कुटुंबपद्धतीने घेतली. विभक्त कुटुंबपद्धतीचे फायदे होते तरी अनेक त
स्वातंत्र्य मिळाले पण तिची सुरक्षितता कमी झाली.

स्वातंत्र्योत्तर काळात साहित्य, शिक्षण, प्रशासन, राजकारण, अर्थकारण इ. क्षेत्रात तिचा सहभाग वाढला. पण वेगाने होणाऱ्या नागरीकरणामुळे स्थलांतरास चा ना मिळाली. एकत्र कुटुंबपद्धतीवर त्याचा परिणाम झाला. लोकांचे कामाचे व राहण्याचे ठिकाण बदलले. शिक्षणाचा प्रसार झाला. लहान कुटुंबे अस्तित्वात आली.

पारंपरिक संयुक्त कुटुंबात स्त्रियांना फारसे स्वातंत्र्य नव्हते. स्थलां रामुळे निर्माण झालेल्या विभक्तकुटुंबात त्यांना स्वातंत्र्य प्राप्त झाले. विविध शैक्षणिक सोयी-सुविधांनी त्यांना शैक्षणिक संधी प्राप्त झाल्या. निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढला. स्त्रियांविषयीच्या दृष्टिकोनात बदल झाला.

अर्थात स्थलांतरामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. अनेकदा स्त्रीची बदली दुसऱ्या गावाला झाल्यामुळे किंवा केवळ पतीची बदली दुसऱ्या गावाला झाल्यामुळे त्यांना एकटे राहावे लागते. कधी-कधी घटस्फोट किंवा वैधव्यामुळे स्थलांतर करावे लागते. अशा स्त्रियांना अनेकदा समाजाची उपेक्षा सहन करावी लागते. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर केल्यामुळे स्त्रीजीवनाच्या मानसिक व सामाजिक पैलूवरही फार मोठा बदल झालेला दिसतो.

ग्रामीण भागातील परिस्थिती वेगळी असते. साखर कारखान्यात स्त्री-पुरुष मजूर म्हणून कामाला जातात. हे काम हंगामी असते. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाच प्रश्न निर्माण होतो. आजकाल काही ठिकाणी साखर-शाळा काढलेल्या दिसतात. रोजंदारीवर मिळालेला पैसा व जीवनातील पुढील भविष्याच्या दृष्टीने असलेली असुरक्षितता याचाही परणिाम त्यांच्या जीवनावर होतो.

खेड्यातून शहरात स्थलांतर. कारण नेहमी मिळणारे काम हेच असते. खेड्यात काम मिळाले तरी ते हंगामी असते. किंवा मिळणारी मजुरी कमी असते. चांगल्या भविष्याच्या आशेने शहरातील स्थलांतरितांना प्रामुख्याने झोपडपट्ट्यातूनच राहावे लागते.

सारांश तंत्रज्ञानाच्या विकासामुळे झालेले औद्योगिकीकरण, शहरीकरण यामुळे कनिष्ठ वर्गापासून ते उच्चवर्गीय महिलांचे कामासाठी, बदलीसाठी होणारे स्थलांतर हे तिच्या जीवनात बदल करणारे ठरते. काही घटकांचा तिच्यावर चांगला परिणाम होतो तर काही घटकांचा वाईट. अर्थात स्थलांतर केल्यावर मिळालेल्या वेळेचे नियोजन ती कशी करते यावर तिच्या जीवनातील यशापयश अवलंबून असते.

### ३.६.४ अर्थार्जनाचे विविध पर्याय व समानता

स्वातंत्र्यानंतरच्या काळात तंत्रज्ञानाचा प्रसार अधिक झाला. देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी मोठमोठे उद्योगधंदे उभारले जात आहेत. त्यामुळे स्त्रियांनाही रोजगार उपलब्ध होऊन अर्थार्जन करण्याची संधी मिळत आहे. स्त्री घराबाहेर पडून पुरुषांच्या बरोबरीने कार्य करू लागली आहे. अर्थार्जनामुळे तिचे आर्थिक परावलंबन कमी होण्यास मदत होत आहे. नागरीकरणामुळे निर्माण झालेल्या सामाजिक वातावरणात स्त्री-पुरुष संबंधांवरील पारंपरिक बंधने गळून पडू लागली आहेत. सहशिक्षणामुळे स्त्री निर्भय बनून ती विविध क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्य करू लागली आहे.

स्त्रिया छोटे-मोठे उद्योग, सरकारी-निमसरकारी कार्यालये, बँका, शिक्षणसंस्था, सार्वजनिक उद्योग, मनोरंजन केंद्रे, प्रशासन व्यवस्था, व्यवस्थापन क्षेत्र इ. विविध विभागात अर्थार्जन करू लागल्या आहेत. उच्चशिक्षित स्त्रिया उच्च पदावर आपले कर्तृत्व सिद्ध करीत आहेत.

## ३.७ स्त्रिया आणि अर्थव्यवस्था

**प्रस्तावना**

आतापर्यंत आपण स्त्रियांचे आर्थिक क्षेत्रातील स्थान या विषयाच्या वेगवेगळ्या पैलूंचा अभ्यास केला. प्रस्तुत भागात आता आपण आर्थिक क्षेत्रातील स्त्रियांच्या प्रत्यक्ष सहभागाचा विचार करणार आहोत.

गेल्या १००-१५० वर्षाच्या काळात भारतात जे सामाजिक परिवर्तन घडून आले आहे, त्यात स्त्रियांच्या दर्जात झालेले परिवर्तन हा एक महत्त्वाचा भाग आहे. स्त्रियांनी घराबाहेर काम करावे की करू नये? नोकरी करावी की नाही? यासारखे प्रश्न आज कमी झाले आहेत. केवळ घरकाम हेच स्त्रीचे काम हा समज कमी होत असून स्त्रियांच्या अर्थार्जनास, नोकरी-व्यवसायातील सहभागाला समाजमान्यता प्राप्त झाली आहे. स्त्रियांच्या अर्थव्यवस्थेतील स्थान जाणून घेण्यासंदर्भात झालेल्या आर्थिक सर्वेक्षणातून स्त्रियांचा, स्त्री-कामगारांचा ढोबळमानाने पुढीलप्रमाणे दोन ठळक क्षेत्रात विभागणी करता येईल - १) असंघटित क्षेत्र व २) संघटित क्षेत्र. शेती व्यवसाय, उद्योग व सेवा व्यवसाय या व्यवसाय तील फरक ज्याप्रमाणे कार्यात्मक असतो तसा फरक वरील दोन विभागात आढळत नाही. कारण एकाच प्रकारची कामे दोन्ही विभागात केली जाण्याची शक्यता असते.

या व्यतिरिक्त भारतातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांचे पुढीलप्रमाणे सर्वसामान्यपणे ३ प्रकारात वर्गीकरण करता येते.

अ)कृषी व संबंधित काम करणाऱ्या प्रामुख्याने ग्रामीण स्त्रिया.

ब)कृषीव्यतिरिक्त इतर उद्योगधंद्यात काम करणाऱ्या स्त्रिया.

क)नोकरी करणाऱ्या व सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रिया.

### ३.७.१ असंघटित क्षेत्रातील महिला

भारतीय अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण तसेच व्यापारीकरण झाले असले आणि त्यामुळे विविध प्रकारचे आर्थिक बदल झाले असले तरी शेती किंवा अ-कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या दुर्बल घटकांचे शोषण त्यांना थांबवता आलेले नाही.

**अर्थ - संघटितपणा आणि कायदेविषयक संरक्षण आणि उपाययोजनांचा अभाव**

**असलेले आर्थिक क्षेत्र म्हणजे असंघटित क्षेत्र असे म्हणता येईल. एकूणच असंघटित क्षेत्रात अर्थात स्त्रिया आणि पुरुष दोघांचाही सहभाग असतो. अशा या असंघटित क्षेत्रात शेती व तत्सम तसेच अन्य काही उद्योग यांचा समावेश होतो. या क्षेत्रातील लोकांची सामाजिक–आर्थिक स्थिती व तेथे उपलब्ध असेलले या विविध रा जगाराच्या संधी याबद्दलची माहिती कमी प्रमाणात उपलब्ध आहे.**

**३.७.१ – अ) असंघटित क्षेत्रातील स्त्रियांचे प्रश्न**

एकूण महिला कामगारांपैकी जवळजवळ ९०% महिला असंघटित क्षेत्रात काम करतात. असंघटित क्षेत्रातील वेतनपातळी ही मुळातच संघटित क्षेत्रापेक्षा कमी असते आणि त्यातही पुरुषांपेक्षा स्त्रियांना मिळणारा रोजगार कमी असतो. मजुर कमी मिळते. जास्त काम करावे लागते. रोजगार किती दिवस चालेल याबद्दल शाश्वती नसते. अधिकृतपणे फारशी नोंद नसते. थोडक्यात कामगार कायद्याचे संरक्षण नसते. याबद्दल श्रमशक्तीच्या अहवालात स्पष्टपणे लिहिलेले आहे. शेती, वनीकरण, दुग्धव्यवसाय, पशुपालन, रेशीम उद्योग, विडी उद्योग, बांधकाम, हस्तकला इ. अनेक क्षेत्रात आहेत. भारत सरकारने केलेल्या किमान वेतन कायद्याचे सरळसरळ उल्लंघन होत असते. तसेच समान कामासाठी समान दाम हे तत्त्वही विचारात घेतले जात नाही. भविष्य निर्वाह निधी, बाळंतपणासाठी सवेतन रजा, पाळणाघरांची सोय, प्रशिक्षण कार्यक्रम, सुरक्षा योजना या सर्वांचाच अभाव दिसून येतो. कच्चामाल, कर्ज परवाने, ओळखपत्रे, आरोग्य इ. विषयीच्या तरतुदी सहजपणे उपलब्ध होत नाही. म्हणूनच या क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांचे निष्ठुरपणे शोषण होते.

पुरेशा रोजगाराचा अभाव, स्त्रियांकडे असणारे मर्यादित कौशल्य, शिक्षणाचा, प्रशिक्षणाचा अभाव व त्यांच्या गतिशीलतेवर असणारे निर्बंध यामुळेच स्त्रिया परावलंबी असतात. ग्रामीण भागात त्यांचा दर्जा वडिलांच्या किंवा नवऱ्याच्या व्यावसा क दर्जाशी जोडला जातो. उदा. पोलिसीण बाई, डॉक्टरीण बाई, इ.

या क्षेत्रात स्त्रिया प्रामुख्याने अकुशल कामगार, शेतमजूर, हस्तव्यवसाय या क्षेत्रात काम करताना आढळतात. अर्थात आजकाल ग्रामोद्योगांना उतरती कळा लागल्याने स्त्रिया मर्यादित रोजगारांना मुकत आहेत.

स्वयंरोजगार करणाऱ्या अनेक स्त्रिया, घरोघरी वस्तूंची विक्री करणाऱ्या स्त्रिया, धुण्याभांड्याची कामे करणाऱ्या स्त्रिया, चिंध्या, कचरा ग ळा करणाऱ्या स्त्रिया इ. विविध प्रकारे या क्षेत्रात त्या काम करतात. पण त्यांचा एखाद्या निश्चित मालकाशी कामगार या नात्याने स्पष्ट संबंध नसतो. त्यामुळे मालकाकडून किंवा सर ारकडून मिळणारे फायदे त्यांना मिळत नाहीत. काम केले तर दाम, सुट्ट्यांचा प्रश्नच नाही, अशी स्थिती असते.

नव्या औद्योगिक धोरणामुळे अनौपचारिक क्षेत्रात अधिक विस्तार होत आहे. भारत, बांगलादेश, मलेशिया यासारख्या गरीब देशातील स्त्री–कामगार अनेक बहुराष्ट्रीय उद्योगांनी आपआपल्या देशात ओढून घेतल्या आहेत. या स्त्रियांना ठेकेदारांमार्फत कामाला लावणे, त्यांना अधिक सोयीचे असते. कारण त्यासाठी त्यांना कोणत्याही कायदेशीर लाभांची तरतूद करावी लागत नाही. मुख्य कारखान्यांचे विकेंद्रिकरण करून वेतन वाचविणे हा प्रकार औद्योगिक क्षेत्रात सर्रास चालू आहे.

थोडक्यात असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांचे वर उल्लेख केलेले विविध प्रश्न दिसून येतात.

आता आपण असंघटित क्षेत्रापैकी काही महत्त्वाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांचा विचार करूया.

**३.७.१ ब) कृषी क्षेत्र**

असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांपैकी ८०% स्त्रिया या कृषी क्षेत्रात काम करीत असून ग्रामीण भागात त्यांचे प्रमाण ८७% व नागरी भागात महिल कामगारांच्या १७% असल्याचे आढळते. शेतमजूर स्त्रियांमध्ये दलित, आदिवासी स्त्रिया यांचे एकूण प्रमाण जवळजवळ ६४% इतके आहे.

शेतीक्षेत्रात किमान मजुरी कायद्याचे उल्लंघन होताना दिसते. अतिशय गरीब असलेला शेतमजूर त्याला मिळणारी मजुरी अतिशय अपुरी असते. शेतमजूर स्त्रियांची कामे ठरलेली असतात. निंदणी, खुरपणी, लावणी, कापूस ेवेचणे काम स्त्रिया करतात. महिला शेतमजुरांचे दर कमी असतात. हा भेदभाव असण्याची कारणे पुढ लप्रमाणे सांगता येतील.

१)असंघटित स्वरूपाचा रोजगार

२)कुटुंबातील सदस्यांनाच कामास लावता येणे

३)कामगारांच्या मागणीचे हंगामी स्वरूप

४)काही कामे केवळ स्त्रियाच करू शकतात, असे मानून विविध कामांचे परंपरागत वर्गीकरण.

वेतन ठरवून देणारी यंत्रणा आणि किमान वेतन कायद्यानुसार ठरविलेले किमान वेतन मिळवून देण्याची तरतूद सर्वत्र समान नाही. शेतमजूर त्यातही स्त्रिया या गरिबी, निरक्षरता, अज्ञान, रोजगाराची अशाश्वती इ. अडचणींनी ग्रासलेल्या असतात. त्यांना औद्योगिक कामगार वापरत असलेल्या पद्धतीचा अवलंब करता येत नाही. कामाची मजुरी कमी असण्याचे दुसरे कारण असे की, एका दिवसाचे काम साधारणपणे ७ ते ९ तासाचे मानले जाते. घरची कामे करून कामावर येण्यास बाईला जर उशीर झाला तर तिला अर्ध्या दिवसाचे वेतन दिले जाते. अर्थात अलीकडच्या काळात हळूहळू बदल होत आहेत.

ग्रामोद्योग तसेच कुटीरोद्योग यांना उतरती कळा लागल्य ने स्त्रिया पर्यायी रोजगारांना आणि विशिष्ट नैपुण्यांना मुकल्या आहेत. परिणामी त्यांना व्यवसायास ठी कराव्या लागणाऱ्या हालचालींवर बरेच निर्बंध पडले आहेत. महिला शेतमजूर या आपल्याच गावात, घराच्या जवळपास कामे शोधतात.

अलीकडच्या काळात प्रामुख्याने हरितक्रांतीनंतरच्या काळात शेती व्यवसायात आधुनिक शेतीपद्धतीचा, तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. परिणामी स्त्रियांच्या या रोजगारावर परिणाम झाला आहे. कृषी विस्तार कर्मचाऱ्यांचा पूर्वग्रह-दूषित दृष्टिकोन या परि स्थतीला जबाबदार आहे. कारण नवीन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण प्रामुख्याने पुरुष शेतमजुरांनाच दिले जाते. याचा स्त्रियांवर विपरित परिणाम होतो.

**३.७.१ ब) बिगर शेतीचे व्यवसाय - ग्रामोद्योकुटीरा द्योग**

यामध्ये प्रामुख्याने पारंपरिक ग्रामोद्योग, कुटीरोद्योग यात कामे करणारे त्याचप्रमाणे सफाई कामगार, मोलकरणी इ.चाही समावेश होतो. अत्यंत साधे प्राथमिक तंत्रज्ञान, कमी

उत्पादनक्षमता, संस्थात्मक मिळणारे अपुरे कर्ज यासारख्या अडचणींना या उद्योगांना तोंड द्यावे लागते. रोजगाराविषयीची असुरक्षितता, किमान वेतनाचा अभाव, अनिश्चित कामाचे तास व इतर सोयी-सुविधांचा अभाव अशा अडचणींना त्यांना तोंड द्यावे लागते. स्त्रिया स्वत: संघटित नाहीत आणि त्यांच्या संरक्षणार्थ कोणतीही सार्वजनिक नियंत्रणात्मक व्यवस्थाही उपलब्ध नाही. यामुळे त्यांची परिस्थिती असहाय्य बनविली आहे. विविध उद्योगांची कामे घरबसल्या करणाऱ्या स्त्रियांचे शोषण अधिक होते. या क्षेत्रातील कामाची परिस्थिती नियंत्रित करण्याच्या हेतूने १९७० या वेठबिगारी नियंत्रण व निर्मूलन कायदा, १९६६ चा विड्या व सिगारेट उद्योगातील रोजगाराविषयक परिस्थिती नियंत्रण करणारा कायदा, विविध राज्यांनी या संदर्भात केलेले कायदे यांना कामगार संघटना, तसेच जागरूक यंत्रणा यांनी मदत केल्याशिवाय यश येऊ शकणार नाही. स्त्रियांमधील अल्पशिक्षण किंवा निरक्षरता, रोजगारासाठी मध्यस्थांवरचे अवलंबित्व तसेच त्यांना न्याय मिळवून देणारे व संरक्षण देणारे कायदे याबाबतचे त्यांचे अज्ञान यामुळेच अशा उद्योगातील स्त्रियांपुढे अडचणी निर्माण होतात.

### ३.७.१ – क) बांधकाम उद्योग

प्रामुख्याने अकुशल स्त्री कामगार या क्षेत्रात दिसून येतात. ठराविक काळापुरते काम उपलब्ध असते. स्त्री व पुरुष यांच्या वेतन दरात फरक असतो. वेळेवर वेतन मिळतेच असे नाही. कारण नसताना किंवा कारण न देता ठेकेदार त्यांना दंड करतात, पगार कापून घेतात. या क्षेत्रातही अशिक्षित, लहान वयात विवाह झालेल्या व पर्यायाने बालमृत्युदर जास्त असलेल्यांचे प्रमाण जास्त दिसून येते. बाळंतपणाच्या काळात मदत व आरोग्यविषयक सुविधांचा अभाव, अपुरा आहार यामुळे स्त्रियांचे आयुर्मान कमी आढळते. खरेतर योग्य वेतन, आरोग्यविषयक तरतुदी, पाळणाघराची व्यवस्था इ. देण्याचे आश्वासन या संदर्भात ठेकेदारांनी दिलेले असतात. पण त्यांचे पालन अभावानेच होते.

### ३.७.१ – ड) विडी उद्योग

आपल्या देशात या उद्योगाद्वारे मोठ्या प्रमाणावर शोषण होते. घरबसल्या विड्या वळून देण्याच्या या उद्योगाने स्त्रियांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून दिला आहे. या उद्योगात रोजगार मिळत असला तरी पिळवणुकीचे प्रमाण जास्त आहे. कारखान्यातील मजुरापेक्षा घरखात्याला हजार विड्यांमागे वळणावळ थोडी कमी दिली जाते. स्त्रिया आपल्या सोयीने घरी विड्या वळण्याचे काम करतात. विड्याची प्रत कमी झाल्यास वेतन कापले जाते. अलीकडच्या काळात विडी उद्योगाचीच पीछेहाट झाली आहे. त्यामुळे त्यावर अवलंबून असलेल्या स्त्रियांच्या रोजगारावर परिणाम झाला आहे. (अर्थात विडी ही आरोग्यास घातक असल्याने हे चांगले आहे. पण त्या उद्योगावर रोजगारासाठी अवलंबून असलेल्या स्त्रियांना पर्यायी रोजगार मिळणे आवश्यक आहे.)

### ३.७.१ – इ) चिकन उद्योग (कापडावर कलाकुसरीचे काम करण्याचा उद्योग)

या उद्योगात एकूण कामगारांपैकी जवळजवळ ९७% कामगार या स्त्रिया आहेत. त्यामध्ये करारबद्ध, स्वयंरोजगारी करणाऱ्या व काही प्रमाणात दल लांच्या सहाय्याने (मध्यस्थीने) नोकरीवर आणलेल्या असे ३ प्रकार आहेत. या उद्योगात बहुसंख्य स्त्रिया या मुसलमान असून, निरक्षर किंवा अल्पशिक्षित आहेत. पडदा पद्धतीचा वापर अनेकजणी करतात. विधवा, परित्यक्ता असलेल्या आणि निर्वाहपातळीच्या खाली जीवनमान असलेल्या दिसून

येतात. या उद्योगातील व्यापारी प्रचंड नफा कमवितात पण तुलनेने या स्त्रियांना अत्यल्प वेतन देतात. सरकारी संस्था देत असलेले वेतन व ठोक व्यापारी देत असलेले वेतन यात २० ते ३० टक्के फरक आढळतो. भांडवलाचा अभाव व अत्यंत व्यापारी स्वरूपाच्या बाजारपेठेत प्रवेश मिळण्यातील असंख्य अडचणी या गोष्टी या स्त्रियांच्या रोजगार करण्याची इच्छा पूर्ण करू शकत नाहीत.

### ३.७.१ – फ) स्वयंरोजगार

अलीकडच्या काळात सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर व्यापारीकरण झाले आहे तसेच दलालांचा प्रभावही वाढला आहे. या दोन्हींमुळे एकेकाळी स्वयंरोजगार करणाऱ्या तसेच घाऊक व्यापार करणाऱ्या स्त्रियांवर संकट ओढवले आहे. दुसरीकडे बेकारीच्या प्रमाणातही वाढ होत आहे. नोकऱ्यांचे क्षेत्र मर्यादित झाल्याने स्वयंरोजगार वाढविण्यावर आज भर दिला आहे. सरकारही त्यादृष्टीने व्यावसायिक शिक्षण, प्रशिक्षक, कर्जपुरवठा यासाठी व्यवस्थ करते व संबंधित लोकांना मदत करते. मणिपूरमध्ये यादृष्टीने खास स्त्रियांसाठी बाजारपेठांची व्यवस्था करण्यात आली आहे. अलीकडच्या काळात बचत गटांच्या माध्यमातून स्वयंरोजगारासाठी स्त्रियांना प्रोत्साहन दिले जाते. बाजारपेठेची व्यवस्थेत दलालांची साखळी असल्याने स्त्रियांना मिळणारा मोबदला कमी असतो. बाजारपेठांवरील नियंत्रणाच्या अभावी खाद्यपदार्थांवर प्रकिया करणे, हस्तव्यवसाय करून वस्तू बनविणे इ.सारख्या उद्योगात स्वयंरोजगार वाढविण्याचे अनेक अशासकीय संघटनांचे प्रयत्न बऱ्याचदा अयशस्वी होतात. निरक्षरता किंवा अल्पशिक्षण, साधन–सामग्रीचा अभाव, आधुनिक बाजारपेठाच्या तंत्रज्ञानाबद्दलचे अज्ञान यामुळे स्त्रियांच्या स्वयंरोजगार करण्याच्या प्रयत्नात अडथळे निर्माण होतात. दुसरे असे की, बँका किंवा पतपेढ्यासुद्धा आता–आतापर्यंत स्त्रियांना कर्ज देण्यास टाळाटाळ करत. अर्थात बचत गट किंवा इतर अशासकीय संघटना आणि व्यवसाय मार्गदर्शन – प्रशिक्षण केंद्रे स्त्रियांमध्ये स्वयंरोजगार वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्याचा फा दा ग्रामीण भागातील स्त्रियांनाही होत आहे.

### ३.७.२ संघटित क्षेत्रातील स्त्रिया

या क्षेत्रात सार्वजनिक क्षेत्रातील सर्व उद्योग तसेच १० किंवा त्याहून अधि कामगार काम करीत असलेले खाजगी क्षेत्रातील बिगर शेतीचे उद्यो यां ा समाव श होतो. एकूण स्त्री कामगारांपैकी जवळजवळ १०% स्त्रिया संघटित क्षेत्रात काम कर ात. हे क्षेत्र अर्थातच वेगवेगळे संरक्षक कायदे, नियम यांनी नियंत्रित झालेले असते. या स्त्रिया कापडगिरण्या, कोळसा उद्योग, तागाच्या गिरण्या, बँका, कारखाने, पोस्ट, टेलिफोन, आयुर्विमा महामंडळ यासारख्या उद्योगात काम करतात. याशिवाय कपडे, रबर, प्लॅस्टिक या उद्योगातही स्त्रियांचे प्रमाण वाढले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आणि प्रामुख्याने ९० नंतरच्या काळात स्त्रियांनी अनेक अपारंपरिक उद्योगात प्रवेश केला आहे. सार्वजनिक क्षेत्रात, व्यावसायिक, तांत्रिक, शैक्षणिक, वैद्यकीय, अभियांत्रिकी अशा व्यवसायात स्त्री कर्मचाऱ्यांची संख्या वाढलेली दिसते. याशिवाय नवीन व्यवसाय म्हणजे जाहिरात, बाजारपेठा, संगणक, माहिती–तंत्रज्ञान, संशोधन, व्यवस्थापन यासारख्या क्षेत्रातही स्त्रिया वेगवेगळ्या पदांवर क म करीत आहेत. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे या क्षेत्रात वेगवेगळ्या कायद्यांचे संरक्षण आहे. स्त्रियांच्या दृष्टीने महत्त्वाचे म्हणजे बाळंतपणासाठी सवेतन रजा, पाळणाघरांची सोय, विशिष्ट वेळा इ.चे

विपरित परिणामही दिसून येतात. म्हणजे अनेक उद्योगांतर्फे त्यामुळे स्त्रियांना कामावरच घेतले जात नाही. किंवा विवाहानंतर नोकरी जाते. स्त्रियांना काही ठरावीक प्रकारचे काम दिले जाणे, प्रामुख्याने अकुशल कामासाठी निवड करणे, उच्च कौशल्याच्या कामाबाबतच्या प्रशिक्षणाच्या संधीपासून दूर ठेवणे, समान वेतन्तानेभे़दे दभाव करण अशा गोष्टी सर्रास घडत असत. अलीकडच्या काळात अर्थातच यामध्ये बदल होत अ हे.

कापडगिरण्या, तागाच्या गिरण्या व खाणी या क्षेत्रात पूर्वी स्त्रियांचे प्रमाण जास्त होते. मात्र उत्पादनातील आधुनिकीकरणामुळे, उच्च तंत्रज्ञानाच्या वापरामुळे या क्षेत्रातील त्यांचे प्रमाण घटले आहे. म्हणजे ज्या उद्योगात भांडवलप्रधान ंत्रविद्येचा वापर करण्यात आला आहे, त्या उद्योगात कामगार कपात करताना पुरुषांऐवजी स्त्रियांना कामावरून कमी करणे अधिक सोपे गेले आहे.

**३.७.३.१ सेवा आणि व्यवसाय**

स्वातंत्र्यानंतरच्या काळात बिगर-पारंपरिक अशा सेवा आणि व्यवसायात स्त्रियांनी प्रवेश केला. त्यास पुढील घटक जबाबदार आहेत -

१)रोजगाराच्या बाबतीत कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान संधी दिल्या जातील, असे आपल्या राज्यघटनेने दिलेले आश्वासन.

२)स्त्री शिक्षणाचा विकास व त्यानुसार अनेक अपारंपरिक असलेल्या क्षेत्रात स्त्रियांना मिळालेला प्रवेश.

३)वाढत्या आर्थिक दडपणामुळे शहरातील मध्यमवर्गीय लोकांमध्ये स्त्रियांनी सवेतन नोकऱ्या करण्याबाबतच्या जुन्या सामाजिक मूल्यांमध्ये कालानुरूप झालेले परिवर्तन.

४)स्वातंत्र्योत्तर काळात विकासाची धोरण व योजना यामुळे सेवा व्यवसाय क्षेत्राचा घडलेला विस्तार.

सार्वजनिक क्षेत्रात, व्यावसायिक, तांत्रिक, शैक्षणिक, वैद्यकीय इ. व्यवसायांमध्ये स्त्री कर्मचाऱ्यांची संख्या १९६० सालापासून सतत वाढत राहिली आहे. आधी म्हटल्याप्रमाणे जाहिरात व्यवसाय संशोधन, हॉटेल व्यवस्थापन, विपणन, बँका यासारख्या नव्या उद्योगात स्त्रियांची संचालक पदावर नेमणूक केली जाते. परंतु जुन्या पारं रिक उद्योगात मात्र स्त्रियांना या पातळीवर मोठ्या प्रमाणात स्वीकारले गेल्याचे फारसे आढळत नाही. उदा. भारतीय शासकीय सेवा (खअड), भारतीय पोलीस सेवा (खझड), भारतीय परराष्ट्र संबंध (खऋड), रेल्वे, गृह खाते अर्थात या क्षेत्रातही हळूहळू स्त्रियांचे प्रमाण वाढत आहे.

**३.७.३.२ - संघटित क्षेत्रातील स्त्रियांचे प्रश्न**

संघटित क्षेत्रात किंवा सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांचे अनेक प्रश्न आहेत. काही कामाच्या ठिकाणी असणारे आहेत तर काही आपल्या सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीमुळे आहेत. थोडक्यात त्याचा पुढीलप्रमाणे विचार करता येईल.

१)स्त्री-पुरुष भेदभावाला तोंड द्यावे लागणे. अमेरिकेसारख्या अत्यंत प्रगत देशातही पुरुषांना स्त्री अधिकाऱ्याच्या हाताखाली काम करणे आवडत नसे. भारतातही ही परिस्थिती दिसून येते. डॉ. किरण बेदींच्या पुस्तकात असे उल्लेख आढळतात.

२)कामाचे ठिकाण दूर असेल तर जाण्या-येण्याची व्यवस्था, प्रसाधनगृहांची व्यवस्था, पाळणाघरे, इ. सोयींचा अभाव असतो. त्यांचा त्रास स्त्रियांना होतो.

३)वेळीअवेळी घराबाहेर जावे लागणे किंवा खेड्यापाड्यामधून फिरती असलेल्या नोकऱ्या पांढरपेशा स्त्रीला करता येत नाहीत. खेड्यापाड्यात आजच्या पंचायत राज व्यवस्थेशी जमवून घेणे अवघड असते.

४)अनेक कंपन्यांमधून लग्नानंतर नोकरी सोडावी लागेल, अशी अट घातली जाते.

५)बढतीवर बदली झाल्यास, कर्तृत्वाची संधी घरापासून दूर मिळाल्याने स्वीकारता येत नाही.

६)विवाह आणि प्रामुख्याने मातृत्व या गोष्टी आवश्यक आहेत, हे जरी खरे असले तरी त्यासाठी स्त्रियांना नोकरी व्यवसायात विशेष सवलती मिळणे आवश्यक आहे. बऱ्याचदा अशा सवलतींमुळे पुरुष सहकाऱ्यांचे टोमणे ऐकावे लागतात.

७)कामाच्या ठिकाणी होणारी छेडछाड, विनयभंग असे प्रसंगही घडतात.

**सारांश**

थोडक्यात स्त्री आणि पुरुषांना मिळणाऱ्या आर्थिक संधी आणि उपलब्धता यात निश्चितच खूप फरक आहे. समाजातील आर्थिक संरचनेत स्त्रियं**घअसं** टत आणि टत क्षेत्रात काम करताना दिसतात. असंघटित क्षेत्रात तर जवळजवळ ९०% स्त्रिया असून केवळ १०% स्त्रियांचे प्रमाण संघटित क्षेत्रात आहे. प्रश्न, समस्या आहेतच; पण बदलत्या काळात स्त्रियांसाठी नवनवीन संधी उपलब्ध होत आहेत हे निश्चित.

## ३.८ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

मराठी

१) अर्थव्यवस्थेतील लिंगभेदावर आधारित श्रमविभागणीचे स्वरूप स्पष्ट करा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

२) लिंगभेदावर आधारित श्रमविभागणीची कारणे लिहा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

३) लिंगभेदावर आधारित श्रमविभागणीची वैशिष्ट्ये लिहा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

४) ''स्त्रियांचे घरकाम अदृश्य असते.'' स्पष्ट करा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

५) स्त्रियांच्या आर्थिक भूमिकेवर परिणाम करणारे घटक लिहा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

६) असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांच्या समस्यांचे वर्णन करा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

७) संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांच्या समस्यांचे वर्णन करा.

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

८) 'भारतातील स्त्रियांचा आर्थिक दर्जा' यावर विस्ताराने लिहा.

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

टिपा लिहा

१) उत्पादन आणि पुनरुत्पादनात स्त्रियांची भूमिका.

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

२) कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान आणि स्त्रियांचा रोजगार.

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

३) असंघटित क्षेत्रातील स्त्रिया.

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

४) संघटित क्षेत्रातील स्त्रिया.

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

५) सेवा, व्यवसाय आणि स्त्रिया.

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

६) चिकन उद्योग व विडी उद्योगातील स्त्रियांचा रोजगार.

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

७) मत्स्य व्यवसाय व बांधकाम उद्योगातील स्त्रिया.

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

८) स्त्रियांचे घरकाम – अदृश्य नफा

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

९) लिंगभेदावर आधारित श्रमविभागणीचे सैधांतिक विश्लेषण

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

१०) स्त्रियांचा दर्जा व भूमिका – संकल्पना

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

English

1) Explain the nature of sexuel division of labour in the economy.

2) Write the characteristics of sexual division of labour.

3) 'Women's household work is invisible' - Explain

4) Enumurate the problems of women working in unorganised sector.

5) Write the problems of women working in organised sector.

6) Write in detail on - 'Economical status of women in India.'

Write short notes on -

1) Role of women in production and reproduction.

2) Women working in unorganised sector.

3) Women working in organised sector.

4) Household work - invisible profit.

5) Theositical explanation of sexual division work

6) Service sector and women.

--------------------------------------------------------------------------------

7) Agricultural sector and women

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

8) Women's status and role-concepts.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

## ३.९ सारांश

लिंगभाव आणि समाज या प्रस्तुत प्रकरणात आपण स्त्रियांचे अर्थव्यवस्थेतील स्थान समजून घेताना, त्या संदर्भातील अनेक पैलूंना जाणून घेण्याचा, समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. देहपातळीवर स्त्री व पुरुष यांच्यात भिन्नतो त्याहे भिन्नत च्या आधारावर सामाजिक–सांस्कृतिक पातळीवर वेगळेपणा निर्माण केला जातो व त्या आधारे समाजातील सर्वच क्षेत्रात स्त्री–पुरुषांच्या दर्जामध्ये, भूमिकामध्ये भेदभाव दिसून येतो. स्त्रियांचे दुय्यम स्थान अधोरेखित होते.

स्त्री आणि पुरुषांना मिळणाऱ्या आर्थिक क्षेत्रातील संधी आणि प्रवेश य त निश्चितच खूप फरक आहे. समाजातील आर्थिक संरचनेत जगातील बहुसंख्य भागात स्त्रिया, आर्थिक निर्णयक्षमता असो की आर्थिक नियोजन, व्यापारीविषय असो की करप्रणाली, कोणतेही धोरण ठरविताना त्यांचा सहभाग कमी दिसून येतो.

ऐतिहासिकदृष्ट्या विचार केल्यास अर्थव्यवस्थेतील उत्पादन प्रक्रियेत स्त्रियांना फारसे महत्त्व नव्हते. स्त्रियांचे महत्त्वाचे कार्यक्षेत्र म्हणजे घर, घरकाम आणि पुनरुत्पादन म्हणजे प्रजोत्पादन व त्यासंबंधित सर्व कामे जसे स्वयंपाक, साफसफाई, मुलांचे संगोपन, सेवा–शुश्रूषा इ.

अर्थव्यवस्थेतील वाढत्या व्यापारीकरणामुळे काही विपर्यस्त कल्पना पुढे आल्या आहेत. केवळ वेतनी श्रम म्हणजे काम समजले जाते. बाकी इतर स्वरूपाची कामे आर्थिकदृष्ट्या अनुत्पादक ठरविली जातात. बाजारासाठी होणारे उत्पादन आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे तर जीवनाच्या गरजा भागविणारे उत्पादन घरगुती काम समजले जाते. याचा अर्थ कुटुंबाच्या निर्वाहासाठी स्त्रिया करीत असलेले काम लाभदायक रोजगार म्हणून मानले जात नाही आणि असे काम करणाऱ्या स्त्रियांना कामगाराचा दर्जा मिळत नाही.

हजारो वर्षांपासून समाजात लिंगपरत्वे श्रमविभागणी प्रचलित आहे. स्त्रिया शारीरिकदृष्ट्या अबला आहेत आणि युद्ध किंवा इतर शारीरिक कष्टाच्या कामाकरता त्या योग्य नाहीत, या कल्पनेतून ही विचारसरणी विकसित झाली आहे. त्यामुळे स्त्रियांचा सहभाग घरगुती कामे, हस्तव्यवसाय, शेतीची कामे, कमी वेतनाची कामे यापुरता मर्यादित राहिला. आधुनिक काळात स्त्रिया नोकरी व्यवसायासाठी बाहेर पडल्या. तेथेही स्त्रियांच्या कामाचे विशिष्टीकरण झालेले आढळते. रोजगार विनिमय केंद्रातील नोंदीनुसार असे दिसून येते की, स्त्रियांना प्रामुख्याने शिक्षिका, स्टेनो टायपिस्ट, नर्स इ. कामासाठी बोलाविले जात असे.

आर्थिक क्षेत्रातील स्त्रियांचा दर्जा म्हणजे अर्थव्यवस्थेतील त्यांचे स्थान होय. खरंतर

स्त्रिया कोणते ना कोणते काम करीत असतातच. पण बाजारप्रधान अर्थव्यवस्थेचा विचार केल्यास असंघटित क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण मोठे आहे. कृषीक्षेत्र, मत्स्यव्यवसाय, बांधकाम, उद्योग, विडी उद्योग, चिकन उद्योग इ. सारख्या अनेक व्यवसायात स्त्रिया अकुशल स्वरूपाची कामे करतात. शिवाय अनेक स्वयंरोजगार करणाऱ्या स्त्रियाही आहेत. अर्थात या क्षेत्रात कायद्याचे कोणतेही संरक्षण नाही. सोयी-सुविधांचा अभाव आहे. किमान ेतन कायद्याचे उल्लंघन, बाळंतपणाच्या रजा, सुट्ट्या, भविष्य निर्वाह निधी, निवृत्तीवेतन इ.सारख्या कोणत्याही सुविधा उपलब्ध नसतात.

अलीकडच्या काळात संघटित क्षेत्रातही स्त्रियांना विविध संधी प्राप्त होत आहे. सार्वजनिक सेवा क्षेत्र तसेच ज्या उद्योगात १० पेक्षा जास्त व्यक्ती काम करतात आणि ते प्रामुख्याने कामगार विषयक कायद्यांनी संरक्षित असते, असे क्षेत्र म्हणज संघटित क्षेत्र. मात्र आता आतापर्यंत विचार केल्यास काही विशिष्ट क्षेत्रात जसे शिक्षक, टेलिफोन ऑपरेटर, स्वागतिका, परिचारिका, कारकून इ. कामे स्त्रियांना मिळत असल्याचे आढळते. मात्र आता विज्ञान, तंत्रज्ञान, जाहिरात व्यवसाय, व्यवस्थापन, अभियांत्रिकी संशोधन, वित्तक्षेत्र, संरक्षण अशा अनेक क्षेत्रात स्त्रियांनी यशस्वीपणे पदार्पण केले आहे आणि आपल्या कर्तृत्वाच ठसा उमटविला आहे.

## ३.१० पारिभाषिक शब्दार्थ :

**१)उत्पादन :** एखादी वस्तू तयार करणे, निर्माण करणे. प्रामुख्याने निर्जीव वस्तूंच्या निर्माणासाठी हा शब्द वापरला जातो.

**२)पुनरुत्पादन :** एखाद्या वस्तूचे पुनर्निर्माण करणे अर्थात येथे हा शब्द प्रजोत्पादन या अर्थाने वापरला आहे. सजीवाचे पुनरुत्पादन म्हणजे प्रजोत्पादन, अर्थात नवीन जीवाला जन्म देणे, प्रजोत्पादन करणे.

**३)दर्जा व भूमिका :** सामाजिक संरचनेचा एक महत्त्वाचा घटक म्हणून दर्जा व भूमिका यांच्याकडे पाहिले जाते. दर्जा व भूमिका यांना परस्परांपासून वेगळे करता येत नाही.

**दर्जा :** समाजातील प्रत्येक व्यक्तीला समाजात एक विशिष्ट स्थान असते. व्यक्तीचे समाजतील विशिष्ट स्थान म्हणजे त्या व्यक्तीचा दर्जा होय. तर भूमिका म्हणजे विशिष्ट दर्जाशी अनुरूप असा वर्तनप्रकार म्हणजे भूमिका होय. बर्नार्ड फिलिप्स यांच्या मते, सामाजिक भूमिका म्हणजे व्यक्तीच्या विशिष्ट दर्जाशी संबंधित प्रमाणके, मूल्ये व आंतरक्रिया यांचा संच. थोडक्यात दर्जाची क्रियाशील बाजू म्हणजे भूमिका होय. समाजजीवन गतिमान करण्याचे कार्य, दर्जा व भूमिका करत असल्यामुळे सामाजिक संरचनेचा घटक म्हणून दर्जा व भूमिकेचा उल्लेख केला जातो.

**पुरुषप्रधानता :** प्रामुख्याने १९६० पूर्वीपर्यंत पितृप्रधान समाजरचना हा शब्दप्रयोग प्रचलित होता. यात १९६० सालानंतर पाश्चिमात्त्य देशात उदयाला आलेल्या स्त्री-मुक्तीवादी चळवळीने पुरुषशाही किंवा पुरुषप्रधानता हा शब्दप्रयोग वापरण्यास सुरुवात केली. पुरुषप्रधानता म्हणजे लिंग नावाच्या जन्माने ठरलेल्या कसोटीच्या आधारावर ठरविली गेलेली श्रेणीबद्ध समाजव्यवस्था. लष्कर, उद्योगधंदे, तंत्रज्ञान, शिक्षण, विज्ञान, राजकीय संस्था, आर्थिक क्षेत्र, पोलीस इ. सर्वच क्षेत्रातील सत्ता पुरुषांच्या ताब्यात असते. म्हणून स्त्रीवादी विचारसरणीनुसार

पुरुषप्रधानता ही विशिष्ट सत्तासंबंधाची व्यवस्था आहे आणि मानवी जीवनातील सर्व उतरंडीचे ते मुळातील प्रारूप आहे. (संदर्भ – स्त्री–जीवनाची गुंतागुंत – लेखिका शर्मिला रेगे, विद्युत भागवत, वंदना – पान क्र. २०)

**लिंगवाद, लिंगभाव :** स्त्री–पुरुष भेद स्पष्ट करण्यासाठी इंग्रजीत लिंग या शब्दासाठी दोन पर्याय वापरले जातात. डशु आणि ऋशपवशी. सेक्स हा शब्द जीवशास्त्रीय दृष्टिकोनातून वापरला जातो. त्यातून नैसर्गिक भेद स्पष्ट होतो. उदा. मुलगी किंव स्त्री जातीत जन्माला आल्यामुळे एखाद्या व्यक्तीचे लिंग स्त्रीलिंग आहे असे आपण म्हणतो. पण ऋशपवशी हा शब्द सामाजिक–सांस्कृतिक अर्थाने वापरला जातो. मराठीत लिंगभाव किंवा लिंगवाद असे म्हणता येईल. स्त्रीत्व किंवा पुरुषत्वाचे गुण व्यक्ती जन्मल्यापासून वाढ होताना सामाजीकरणाच्या प्रक्रियेत समाजाला आत्मसात करणारे बाईपणाचे किंवा पुरुषपणाचे गुण आत्मसात करते. थोडक्यात लिंगभाव किंवा लिंगवाद ही संकल्पना सामाजिक अर्थाने वापरली जाते.

**स्थानांतर :** व्यक्तीने आपले मूळचे राहण्याचे ठिकाण बदलून विशिष्ट अंतरावरील ठिकाणी कायम वास्तव्य करण्याच्या पद्धतीला स्थानांतर अशी संज्ञा वापरली जाते. व्यक्तीच्या निवासस्थानातील कायमचा बदल असा त्याचा मूळ अर्थ आहे. अधिक चांगल्या उदरनिर्वाहाच्या साधनाची प्राप्ती करण्यासाठी अथवा अन्य अपरिहार्य कारणासाठी व्यक्ती आपल्या मूळच्या गावातून दुसऱ्या गावाकडे आपले आयुष्य व्यतीत करते. (संदर्भ – समाजविज्ञान कोश – संपा. स. मा. गर्गे.)

**श्रमविभागणी :** एखाद्या कामाचे किंवा त्या कामात असणाऱ्या निरनिराळ्या प्रक्रियांचे भाग, उपविभाग पाडून ते निरनिराळ्या व्यक्तींनी किंवा व्यक्तिसमूहांनी करणे, म्हणजे श्रमविभागणी. प्रत्येक समाजात अशा प्रकारची कामाची विभागणी व त्यानुसार विशेषीकरण आढळून येते.

## ३.११ : संदर्भ ग्रंथसूची


१) अनंतराम शरयू, वडसे उमा. (१९८७), भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

२) आपटे ज. शं. रोडे पुष्पा, (२००८), भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

३) भागवत विद्युत, रेगे शर्मिला, पळसाने वंदना – १९९४ – स्त्री जीवनाची गुंतागुंत, स्त्रीविकास अध्ययन केंद्र, पुणे विद्यापीठ.

४) दातार छाया (१९८८), स्त्री–पुरुष, ग्रंथाली प्रकाशन.

५) दातार छाया, तांबे श्रुती (संपा.) २०००, अस्तित्व संघर्ष आणि सार्वभौमत्व – स्त्री अभ्यासासमोरील आव्हाने, महाराष्ट्र स्त्री अभ्यास व्यासपीठ.

६) गोटे शुभांगी (संपा.) २००३, स्त्री परिवर्तनाची आव्हाने – साऊथ एशियन सोशल रिसर्च पब्लिकेशन, औरंगाबाद.

७) कवी माधवी (२०००), महिला कल्याण आणि विकास, विद्या प्रकाशन, नागपूर.

८) संपा. १९६७, भारतीय स्त्री, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे.

९) निंबाळकर विजय (संपा.) १९९२, सबला–स्त्री अभ्यास: स्वरूप आणि दिशा, जी. के. इन्स्टिट्यूट, गारगोटी.

१०) साने गीता (१९८६), भारतीय स्त्री-जीवन, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
11) Desai Neera, Krishraj Maitryee(1987) women and society in India. Ajanta Publish, New Delhi.
12) Patel Vibhuti (1982) women and work - I current information service, Research Center for women's studies, SNDT Women's University, Mumbai.
13) Rao Vijayeshwari (2008) women and development Himalay Publiching house.
14) Shramshakti Report of the National Commission on self employed women and the women in the ungrganied sector - Government of India - 1988.

# घटक – ४

# विकास आणि महिला सबलीकरण

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

 ४.२.१ विकासात्मक धोरण

 ४.२.२ जागतीकीकरण आणि उदारीकरण व स्त्रीवरील परिणाम

 ४.२.३ राज्य महिलांसाठी आरक्षण

 ४.२.४ धर्म आणि संस्कृती

४.३ स्वयं अध्ययन प्रश्न

४.४ सारांश

४.५ पारिभाषिक शब्द

४.६ संदर्भ सूची


## ४.० उद्दिष्टे :–

या घटकाचा अभ्यास केल्यावर तुम्हाला –

१. स्त्री विषयक विकासात्मक धोरणाची माहिती होईल.
२. जागतीकीकरण व उदारीकरणामुळे स्त्री जीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करता येईल.
३. महिलांसाठी आरक्षण कसे देण्यात आले आहे याचा परिचय होईल.
४. स्त्री, धर्म, संस्कृती या संकल्पनांचा अभ्यास करुन घेता येईल.
५. महिलांसाठी असलेले कायदे समजून घेता येईल.

## ४.१ प्रस्तावना :–

'विकास' या शब्दाचा जर व्यापक दृष्टिकोनातून विचार केला तर, सामुदायीक जीवनाचे सगळे पैलू त्याच्या कक्षेत येतात. कमाल उत्पादन, पुर्ण रोजगार, आर्थिक समानता व सामाजीक न्याय ही राष्टीय विकासाची समाजमान्य उद्दिष्ट्ये स्त्री व पुरूष या दोघांना लागू पडतात. परंतू, विषमतेवर आधारीत असलेल्या समाजातील उपेक्षित गटांना सहाय्य करण्यासाठी खास प्रयत्न केल्याखेरीज ही उद्दिष्ट्ये गाटता येणे शक्य नाही. म्हणूनच आपली राज्यघटना दुर्बल गटांचे शैक्षणिक व आर्थिक हित संबंध सुधारण्याची अत्यंत निकड आहे या गोष्टीवर भर देते. या संदर्भात स्त्रीयांचे जीवन सामाजीक ालीरिती व परंपरा

यांनी जखडलेले असल्याने, त्यांनी राष्ट्रीय जीवनात आपली भूमिका संपूर्णरित्या व योग्य पद्धतीने पार पाडावी अशी अपेक्षा असल्यास त्यांच्याकडे विशेष लक्ष पुरविणे अगत्याचे आहे, ही गोष्ट ध्यानी घेण आवश्यक आहे.

## ४.२ विषय विवेचन :-

### ४.२.१ विकासात्मक धोरण :-

स्वतंत्र भारताची घटना तयार झाल्यानंतर १९५२ साली प्रथम सार्वत्रिक निवडणूका झाल्या. ह्या निवडणूकीत भारतातील २१ वर्षे पूर्ण केलेल्या सर्व स्त्री-पुरुषांना समान अधिकार प्राप्त झाला. जाती, धर्म, भाषा, लिंग, जन्मस्थान यांवर आधारीत असा कोणताही भेद त्यात केला नाही. १९५३ साली केंद्रीय समाज कल्याण परिषद स्थापन झाली. या परिषदेचे मुख्य उद्दिष्ट हे समाज विकास कल्याण महिला, मुले आणि समाजातील कनिष्ठ स्तरावरील लोकांचा विकास करणे हा होता. घटनेने महिलांना जो समान हक्क दिला आहे, त्याची पूर्णपणे अंमलबजावणी करणे, महिलांचा सामाजीक दर्जा उंचावणे स्त्रीयांना विकासाच्या सर्व क्षेत्रात संरक्षण देणे या उद्देशाने महिला धोरण जाहिर केले.' विविध पंचवार्षिक योजनांच्याद्वारे महिलांच्या कल्याणासाठी काही प्रयत्न केले गेले.

**१. पहिली पंचवार्षिक योजना (१९५१-५६):-**

प्रसूती आणि मुलांच्या आरोग्यासाठी काही केंद्र उघडणे व कुटूंब नियोजनाची व्यवस्था करणे.

**२. दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६-६१) :-**

महिलांना प्रसूती अवस्थेत सुरक्षितता हवी, म्हणून त्याचा विचार झ ल आणि लहान मुलांसाठी पाळणा घरांची व्यवस्था झाली.

**३. तृतीय पंचवार्षिक योजना (१९६१-६६) :-**

यात महिलांच्या शिक्षणावर विशेष लक्ष दिले गेले. कुटूंब नियोजनावर भर दिला गेला. गावात बाल कल्याण केंद्र उघडली गेली. महिलांना आरोग्य शिक्षण दिले गेले.

**४. चौथी पंचवार्षिक योजना (१९६७-७४) :-**

यात शिक्षण, आरोग्य आणि कुटूंब नियोजनाचे कार्यक्रम आखले गेले.

**५. पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४-७९):-**

कामावर जाणाऱ्या महिलांसाठी विशेष सुरक्षितता दिली गेली.

**६. सहावी पंचवार्षिक योजना (१९७४-७९):-**

कामावर जाणाऱ्या महिलांसाठी विशेष सुरक्षितता दिली गेली.

**७. सातवी पंचवार्षिक योजना (१९८०-८५):-**

महिलांना रोजगार मिळावा म्हणून काही योजनांची शिफारस केली गेली. महिलांना आर्थिक स्वातंत्र्य मिळावे यासाठी विशेष भर दिला गेला.

**८. आठवी पंचवार्षिक योजना (१९८५-९०):-**

महिलांना स्वत:बद्दल अधिक आत्मविश्वास निर्माण व्हावा, म्हणून त्यांना अधिकार

देण्यासाठी झाले.

१९८५ साली भारत सरकारने मानव संवर्धन विकास मंत्रालय हा महि  ासांठी विशेष विभाग उघडला गेला. ह्या विभागाद्वारा केंद्रीय समाज कल्याण परिषदेला महिलांच्या विकासासाठी धन दिले जाते.

***  कायद्यातील त्रुटी दूर करणे :–**

महिलांच्या विकासासाठी कायद्यात किंवा प्रशासनात काही त्रुटी आढळल्याने त्या दुर करण्यासाठी जानेवारी १९९३ मध्ये स्थापन झालेल्या राज्य महिला आयोगाने याबाबतीत पुढाकार घेतला व महिलांचा सामाजीक दर्जा उंचावणे, स्त्रीयांना विकासाच्या सर्व क्षेत्रात संरक्षण देणे याला महत्व दिले.

***  शासनाद्वारे विशेष प्रयत्न :–**

शासनाच्या सर्व खात्यातील प्रशिक्षणात, महिलांच्या प्रतिष्ठेची जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीने पावले उचलली गेली आहेत. पोलीस यंत्रणेत स्त्रीयांची भरती वाढविण  त आली आहे. २५% पोलीस ठाणे ही स्त्री अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली आणण्यात आली आहेत. स्त्रीयांना स्व संरक्षणाचे प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. प्रसार–प्रचार माध्यमाच्या परिक्षण मंडळावर स्त्रीयांना ५०% प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे. ग्रामसभेतील ५०% स्त्रीयांनी दारु दुकान बंद करण्याची मागणी केल्यास दुकानाचा परवाना रद्द करण्याची घोषणाही शासनाने केली.

***  महिला आरक्षण धोरण :–**

महिलांकरीता सरकारी नोकऱ्यांमध्ये महिलांना ३०% जागा राखीव असणार आहेत. पंचायती व नगरपालिकांमध्येही महिलांना ३०% जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषद पातळीवर ज्या बाल विकास वैधानिक समित्या आहेत, त्यात ७०% महिला सदस्य असाव्यात व त्या समित्यांचे अध्यक्षपद हे महिलांना दिले जावे, अशी तदतूद करण्यात आली आहे. आर्थिक व सामाजीक समता, विकासाची व ढती संधी, पिळवणूक, फसवाफसवी, अत्याचार यापासून संरक्षण मिळण्याची आता मोठी शक्यता निर्माण झाली आहे.

***  स्त्रीमुक्ती चळवळ साधणे :–**

स्त्रीमुक्ती चळवळ ही स्त्री पुरुषांमध्ये दृढमुल झालेल्या विषमतेपासून मुक्ती मागते. घ्स्त्री–पुरुष समता हा या चळवळीचा पाया आहे. स्त्री–पुरुषांच्या कामांची अथवा भूमिकांची अदलाबदल हे या चळवळयचे उद्दिष्ट नाही. पुरुषांची सत्ता स्त्रीयांनी   काबीज करावी हा या चळवळयचा हेतू नाही. पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये आर्थिक, सामाजीक, सांस्कृतीक आणि कायदेशीर क्षेत्रात पुरुषपरायणता आहे. पुरुषाला झुकते माप आहे. म्हणून पुरुषी प्रतिमेच्या पुरुषाच्या खांद्यावरील ओझ्यापेक्षा स्त्रीच्या बायकी प्रतीमेचे ओझे अधिक जीव घेणे आहे. म्हणून ही चळवळ स्त्री –पुरुषांना या ओझ्यातून सोडवू बघते. ही चळवळ असा समाज निर्माण करु बघत आहे की, ज्यात स्त्री–पुरुष शारीरिक भेद असला तरी, या भेदावर आधारीत वेगळेपण आणि जगण्यामध्ये सक्ती नसावी. स्त्रीला माणूस म्हणून जगु द्यावे.

## ४.२.२ जागतीकीकरण आणि उदारीकरण व स्त्रीवरील परिणाम :-

जागतीकीकरण आणि उदारीकरण या प्रक्रियांची चर्चा आज चांगल्या आणि वाईट अर्थाने सर्वत्र होतांना दिसते. शीतयुद्धोत्तर काळात निर्माण झालेल्या नवीन विश्वरचनेमध्ये या दोन्ही प्रक्रियांचा प्रभाव वाढला असून त्या अपरिहार्य बनल्या आहेत. विशेष म्हणजे या दोन्ही प्रक्रिया सर्वसामान्य जनतेच्या दैनंदीन जीवनाला प्रभावित करत आहेत. जागतीकीकरणाच्या प्रक्रियेपासून आज कोणतेही राष्ट्र अलिप्त राहू शकत नाही. इच्छा असो अथवा नसो, पण आज प्रत्येक राष्ट्र जागतीकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये ओढले गेले आहे. आर्थिक उदारीकरणाच्या साधनाद्वारे राष्ट्रीय अर्थव्यवस्था आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेशी जोडण्याचा प्रयत्न राष्ट्रांकडून होत आहे. आज बहूतांश अविकसीत, गरीब, विकसनशील राष्ट्रांनी आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारलेला आहे. उदारीकरण व जागतीकीकरण या प्रक्रियांचा भारताने १९९० नंतर स्वीकार केला. या नवीन आर्थिक धोरणांचा परिणाम भारतातील विविध क्षेत्रांवर पडला. स्त्रीयांच्या स्थितीवर देखील या प्रक्रियेचा परिणाम झालेला दिसून येतो.

**जागतीकीकरण व उदारीकरण**

जागतीकीकरणाच्या संकल्पनेचा निश्चित अर्थ स्पष्ट करण **अ**वघड ाहे. अनेक विचारवंतांनी या संकल्पनेची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आह. पण त्यातून या संकल्पनेचे निश्चित स्वरुप स्पष्ट होत नाही. सर्वसाधारणपणे जागतीकीकरण ही उत्पादने, सेवा, भांडवल, लोक, माहिती आणि संस्कृती यांच्या सीमापार वाढत्या प्रवाहाला दर्शविणारी संकल्पना आहे. यांचा परिणाम भारतीय समाज आणि स्त्रीवर झाला आहे.

**सकारात्मक परिणाम**

**१. विवाह स्वातंत्र्य :-**

जागतीकीकरणाच्या प्रक्रियेमुळे राष्ट्रांमिविध क्षेत्रा **ध्य** सहकार्य वाढण्यात मदत झाली आहे. व्यापार, उद्योग या निर्मितीने आपले संबंध देशाबाहेर पोहचविले. पूर्वीच्या काळात संबंध मर्यादीत स्वरुपाचे होते. त्यातच विवाहसंबंध अतिशय मर्यादीत स्त्रीयांवर विवाह स्वातंत्र्याबाबत निर्बंध होते. त्यामुळे त्यांना स्वत:चा जोडीदार निवडण्याचा अधिकार नव्हता.परंतू, जागतीकीकरणामुळे भारतावर जागतीक मूल्यांचा प्रभाव पडला व ही निर्बंध शिथील होऊ लागली तसेच या संबंधात रहावे अथवा नाही हे ठरवून घटस्फोट घेण्याचे स्वातंत्र्यदेखील स्त्रीयांना मिळाले आहे. आज आपल्याला मोठ्या प्रमाणात प्रेमविवाह होतांना दिसतात. हे जागतीकीकरणाचेच फलीत म्हणावे लागेल.

**२. कुटूंबविषयक बंधनाथ शिथीलता :-**

जागतीकीकरणाचा परिणाम विवाह संस्थेबरोबर कुटूंब संस्थेवर देखील पडला आहे. समाजात संयूक्त कुटूंब पद्धतीचा ऱ्हास होवून विभक्त कुटूंब पद्धती मोठ्या प्रमाणात रुजू होऊ पाहत आहे. पैसा, संपत्ती, दर्जा यांमुळे व्यक्ती स्वातंत्र्याचा विकास होवून त्याला अधिकाधिक महत्व प्राप्त होत आहे. पुरुष प्रधान संस्कृती मागे पडत असून स्त्री-पुरुष कौटूंबिक संबंध हे वर्चस्वाचे न राहता ते सहचार्याचे बनले आहे. प्रमुखत: कुटूंबाच्या निर्णयामध्ये स्त्रीयांचा

मोलाचा वाटा असतो.

### ३. सामाजीक दर्जात झालेला बदल :–

जागतीकीकरणामुळे महिलांच्या सामाजीक दर्जात बऱ्याच प्रमाणात बदल झालेला दिसून येतो. स्त्रीयांवरील सांस्कृतीक व धार्मिक निर्बंध शिथील झाले आहेत. स्त्रीयांच्या राहणीमानात बदल झालेला आहे. सामाजीक जीवनात वावरतांना स्त्रीयांना विविध कायद्यांचे संरक्षण प्राप्त झाले आहे. समाजाचा स्त्रीयांबाबत पारंपरिक दृष्टयकोन बदलत असून स्त्री व पुरुष समानता वाढावी असा समज निर्माण होवू पाहत आहे.

### ४. आर्थिक व सामाजीक न्याय :–

पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये ऐतिहासीक काळापासून स्त्रीयांना उपेक्षित येवण्यात आले. त्यांना मुलभूत, आर्थिक, सामाजीक आणि राजकीय अधिकार नाकारण्यात आले. परिणामी स्त्रीयांच्या बुद्धिमत्तेचा, कार्यक्षमतेचा विकास होऊ शकला नाही. परंतू, जागतीकीकरणामुळे आर्थिक आणि सामाजीक न्यायावर आधारीत समाज व्यवस्थेची निर्मिती करणे शक्य झाले.

### ५. स्त्रीयांवरील अन्याय, अत्याचार दूर करण्यास सहाय्यक :–

पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीयांवर होणारे अन्याय, अत्याचार थांबविणे हे समाजापुढील मोठे आव्हान आहे. आज स्त्रीयांना वैवाहिक हिंसाचार, हुडांबळी, बलात्कार, सक्तीचा वैश्या व्यवसाय, स्त्रीयांची विक्री, लहान मुलींची हत्या, मारहाण, मादक पदार्थाची व्यसनाधिनता आदींसारख्या शारीरिक आणि मानसिक छळांना सहन करावे लागत आहे. याच्या विरुद्ध जागतीकीकरणामुळे मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण होण्यास पोषक वातावरण समाजात निर्माण होवू पाहत आहे.

### ४.२.३ राज्य – महिलांसाठी आरक्षण :–

लोकसभेत महिलांसाठी ३३% आरक्षण येवण्यासंबंधी घटनादुरुस्ती विधेयक मांडण्यात

आले. सर्व पक्षांनी दुरुस्तयसाठी पाठिंबा दिला. स्त्रीया व लहान मुलांना संरक्षणाची गरज असते, हे घटनेने मान्य केले. त्यांचे स्वतंत्र प्रश्न असतात. त्याचा सामाजीक व शैक्षणिक मागासलेपणाशी संबंध नसून आर्थिक परावलंबीत्व, शारयरिक दुर्बलता व असहाय्यतेशी आहे.

महाराष्ट्र शासनाने पंचायत, जिल्हा परिषद इ. ठिकाणी ३३% महिलांचे आरक्षण मान्य केले आहे व त्याची कार्यवाहीसुद्धा झाली आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे पूर्ण होत असतांना, भारतीय लोकशाहीने महिलांना **ही** संधी दिली. ` आरक्षण देत असतांना, अनेक प्रश्न निर्माण होतात. महिलांना ३३% आरक्षण दिल्याने आरक्षणाचा उद्देश सफल होईल का ? घटनेच्या मुलभूत तत्वात आरक्षण बसते का आणि त्यासाठी आरक्षण योग्य आहे काय!

लोकशाहीतील सत्तेचे विकेंद्रीकरण होत असतांना हे अगदी तळागाळापर्यंत झाले पाहिजे, हा हेतू त्यामागे आहे. महिलांना ३३% आरक्षण देत असतांना आपली सामाजीक मुल्य पद्धतीही लक्षात घेणे आवश्यक आहे. कर्नाटक राज्यातील ग्र मपंचायतीतील महिला

निवडून आलेल्या महिलांच्या कामाचे सर्व्हेक्षण केल्यावर **अ**से दिसून ाले की, महिलांना त्या कार्यालयाबद्दल फारसा आदर नाही तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेतील कुठल्याही व्यक्तीबद्दल आदर नाही. ह्या महिलांच्या मते, पंचायत हा एक आपल्या गावातील समाजाचा एक सुक्ष्म भागच आहे. त्यामुळे ७३ वय घटनादुरुस्ती केली असली तरी त्यातून अनेक प्रश्न निर्माण होतात. कायद्याने स्त्री प्रतिनिधींना आज पंचायत समिती, जिल्हा परिषदा इ. ठिकाणी ३३% आरक्षणामुळे अधिकार प्राप्त झाले. पण त्यासाठी फार मोठी प्रक्रिया आवश्यक आहे. विशेषत: दुर्बल घटकातील दलित महिलांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने सातत्याने काही प्रयत्न होणे आवश्यक आहे. गेली हजारो वर्षे स्त्रीयांना आर्थिक, सामाजीक व वैयक्तिक त्रासातून जावे लागते. पारंपरिक पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीयांना आपला बचाव करता आला नाही. आपण स्वत: निवडून आल्यानंतर, त्या भूमिकेला योग्य तो न्याय दिला पाहिजे. भारतीय समाजात पारंपरिक मूल्यरचनेमुळे आपल्यावरील होणाऱ्या अन्यायाबाबत महिला प्रतिकार करण्यास धजावत नाहीत.

पंचायतयत निवडून आलेल्या महिला या देवदासी पद्धत, बाल विवाह, विधवांचे पुनर्विवाह इ. त्या गावच्या स्थानिक, सामाजीक कार्यक्रम त व्यस्त असतात. तर, उच्च वर्गातील महिला या प्राथमिक आरोग्य केंद्र, रस्त्यावरचे दिवे, महिला मंडळे इ. वर आपले लक्ष केंद्रित करतात, असे पाहणीवरुन दिसून आले. याचा अर्थ निवडून आलेल्या महिला स्थानिक प्रश्नांना प्राधान्य देतात.

आणखी असे दिसून आले की, दुर्बल घटकातील बऱ्याचश्या महिला या निरक्षर आहेत. विविध समूहांच्या सामाजीक व आर्थिक अधिकारात शिक्षणामुळे असमानता निर्माण होते म्हणून या महिलांना मुलभूत शिक्षण दे**ण्या**ची चळवळ पुढाज ंनी केली तर, सामाजीक तफावत दूर होईल. ग्रामीण भागत उच्चवर्णीय महिला व दलित महिला प्रतिनिधी म्हणून निवडून येतात. पण पारंपरिक मुल्यकल्पनांमुळे दुर्बल घटकातील महिलांना फारसे स्वातंत्र्य मिळत नाही. शिक्षणाच्या अभावामुळे, पंचायतीत एखादा निर्णय घेण्यास त्यांच्याजवळ पुरेशी क्षमता नसते. त्यामुळे पतीने सांगीतलेल्या निर्णयानुसार त्या काम करतांना दिसतात. त्यात पुन्हा जात आणि वर्ग यांचाही त्रास त्यांन होतो. म्हणून अशा स्त्रीयांची उन्नती करावयाची असेल तर, त्यांना प्रशिक्षण शिबयरात सहभागी होऊ द्यावे व त्यांच्या राजकीय जाणिवा विस्तारीत कराव्या.

भारतयय राजकीय इतिहास पाहिला तर असे दिसते की, १९२९ सालय भारतीय महिला नेत्यांनी महिलांना मतदान अधिकार मिळावा म्हणून सायमन कमीशनपुढे निदर्शने केली. १९३१ साली पुन्हा गोलमेज परिषदेत हा विषय मांडला गेला. १९३० नंतर खुप प्रयत्न केले गेलेत. नगरपालिकेत महिलासांठी २०% जागा राखीव हव्य त, म्हणून नगरपालिकेतयल नवीन सदस्यांनी ही मागणी केली. या स्त्री प्रतिनिधींची नेमणूक मान्यता प्राप्त स्त्री संघटनांनी पाठविलेल्या यादीतून करावी अशी ती मागणी होती. त्यानंतर राखीव जागांसंबंधी उलटसुलट मते मांडण्यात आली. निवडणूक प्रक्रियेत स्त्रीयांचा सहभाग हवा, ही जाणीव निर्माण झाली.

विविध स्त्री संघटनांच्या मागणीवरुन राजीव गांधी सरकारच्या ाळात काही गोष्टी मान्य करण्यात आल्या आणि पंचायत समित्या, जिल्हा परिषदा यामध्ये महिलांसाठी ३०% राखीव जागा असाव्यात हे तत्वत: मान्य झाले.

सर्वप्रथम ग्रामीण क्षेत्रांतील राजकारणात स्त्रीयांचा सहभाग वाढावा म्हणून ग्राम पंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेत स्त्रीयांना ३३% आरक्षण लागू करण्यासाठी राज्यघटना (७३ वे संशोधन) कायदा १९९२ संसदेत मांडण्यात आला आणि २४ एप्रिल १९९३ ला ७३ व्या घटना दुरुस्तीत मान्यता देण्यात आली. राज्यघटनेत ङ्गपंचायतङ्घ या शीर्षकाखाली ‘१ अंतर्गत ही दुरुस्ती समाविष्ट करण्यात आली.

महिला आरक्षण :- ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांत प्रत्येक स्तरावर एकूण सदस्यांमध्ये १/३ सदस्य संस्था महिलांसाठी राखीव ठेवण्यात याव्यात. या पदांमध्ये अनुसूचीत जाती व जमातीतील महिलांचा समावेश आहे.

शेवटी निवडून आलेल्या महिला प्रतिनिधी कोणत्या दृष्टीकोनातून महिला समस्या गाव, तालुका व जिल्हा पातळीवरील समस्यांकडे बघतात व योग्य निर्णय घेऊ शकतात यावर त्यांच्या कारकीर्दीची यशस्वीता अवलंबून आहे.

महाराष्ट्रात आज राजकारणात ३३% आरक्षण झाले. परंतू, सरपंच म्हणून काम करतांना पुरुष अधिकारी व राजकीय विरोधक कडाडून विरोध व असहकार्य महिलांना करतांना दिसतात. परभणी जिल्ह्यातील सरपंच महिलांच्या अनुभवानुसार आज त्या जिल्ह्यातील ४०० गावातील महिला सरपंचांची अवस्था ही रबरी शिक्क्यापेक्षा वाईट आहे. महिलांच्यावर संपूर्ण अधिसत्ता बऱ्याच ठिकाणी पुरुषांची दिसून ये जिथे-जिथ महिला स्वतंत्रपणे कारभार पाहण्याचा प्रयत्न करतात, स्वत: निर्णय घेतात तीथे त्यांची मोठ्या प्रमाणावर अडवणूक होते. त्यामुळे विकास कामोंचा खोळंबा होता .

वास्ववीक पाहता, महिला योग्य पद्धतीने, खऱ्या अर्थाने राजकारण करु शकतात. पुरुषांनी राजकारण हे स्वार्थी व संधीसाधू बनविले. यामुळे महिलांची राजकारणात अडवणूक केली जाते. महिलांचे वर्चस्व सहन केजे जात नाही. पुरुषंनी महिलांना सहकार्य केल्यास सध्याच्या राजकीय परिस्थितीला चांगली कलाटणी मिळू शकते. बोटावर मोजता येणाऱ्या महिला स्वत:च्या निर्णय क्षमतेनुसार निर्णय घेऊन राजकारण करु शकतात. अन्यथा काही ठिकाणी महिलांना आपण फक्त सरपंच आहोत, एवढीच माहिती आहे. ही स्थिती बदलायची असेल तर, महिलांनय सतर्क व जागरुक असले पाहिजे.

कलम २४३ () च्या पोट कलम २ नुसार अनुसूचीत जाती आणि जमातींकरीता आरक्षीत असलेल्या एकूण जागांपैकी एक तृतीयांश जागा त्या समाजातील स्त्रीयांसाठी आरक्षीत ठेवण्यात आल्यात तसेच या दुरुस्तीनुसार अशी तरतूद केली की, एकूण जागांच्या १/३ जागा स्त्रीयांसाठी आरक्षीत असून त्या प्रत्यक्ष निवडणूकीने भरायच्या आहेत. त्या फिरत्या तत्वानुसार वार्ड निहाय बदलणाऱ्या आहेत. स्थानिय वराज्य संस्थांतील अध्यक्षीय पदे सुद्धा आरक्षीत ठेवण्यात आली आहेत.

राज्यघटनेच्या ७४ व्या दुरुस्ती कायदा १९९२ नुसार घटनेच्या नवव्या भागात 'नगरपालिका या शीर्षकांतर्गत २४३ () चा समावेश करण्यात आला.

कलम २४३ (१) प्रत्येक नगरपालिकेमध्ये अनुसूचयत जाती-जमातीच्या लोकांसाठी त्यांच्या त्या भागात लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाची तरतूद करण्यात आली.

अनुसूचीत जाती-जमाती रिक्त उपकलम (१) नुसार आरक्षीत असलेल्या एकण जागांपैकी १/३ जागा त्या समाजातील स्त्रीयांसाठी आरक्षीत ठेवण्यात येतील.

एकूण जागांच्या १/३ जागा स्त्रीयांसाठी आरक्षीत राहतील आणि त्य प्रत्यक्ष निवडणूकीने भरावयाच्या आहेत. त्या फिरत्या तत्वानुसार नगरपालिकेच्या वेगवेगळ्या वार्डात राहतील.

नगरपालिकेच्या अध्यक्षपदाच्या जागा देखील अनुसूचीत जाती-जमाती आणि महिलांसाठी त्या राज्याच्या कायद्यानुसार आरक्षीत राहतील.

### ४.२.४ धर्म आणि संस्कृती :-

धर्म आणि संस्कृती या घटकांना भारतीय समाजव्यवस्थेत परंपरेने महत्वाचे स्थान प्राप्त करुन दिले आहे. औद्योगीकीकरण, आधूनिकीकरण, जागतीकीकरण किती प्रमाणत घडून आले तरी धर्म आणि संस्कृती यांची जागा किंवा स्थान भारतीय समाजव्यवस्थेत टिकून आहे व ते तसेच टिकून राहीलही, कारण या घटकांच्या माध्यमातूनच समाजात स्त्री-पुरुषाचे संबंध निश्चित होत असतात. सामाजीक जीवनात वावरतांना स्त्रीयांनी परंपरेने चालत आलेल्या धार्मिक व सांस्कृतीक बाबींचे आचरण करावे अशी धारणा प्रचलीत आहे. त्यातूनच स्त्रीयांवर काही बंधने येतात व त्यांचा सामाजीक दर्जा निश्चित होतो. त्यामुळे देखील या घटकांच्या संदर्भात स्त्रीयां**ची** असणारी जब बदार लक्षात घेण महत्वाचे ठरेल.

### 'स्त्रीयांची धार्मिक जबाबदारी'

मानवी जीवनात धर्माला विशेष महत्व आहे. समाज जीवनाचे सामाजीक, आर्थिक आणि राजकीय हे ज्याप्रमाणे विविध पैलू आहेत त्याप्रमाणे समाज जीवनाचा धार्मिक पैलू देखील आहे. प्रत्येक समाजाचे जनजीवन हे धार्मिकतेशी संबंधीत आहे. धार्मिक विश्वास, श्रद्धा, परंपरांचा प्रभाव समाज जीवनावर पडलेला दिसतो. भारतातील विविध प्रमुख धर्मांचा आढावा घेतला असता त्यात स्त्रीयांच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १. कौटूंबीक जीवनाबाबत :-

भारतीय समाजात कौटूंबीक जीवन हे मोठ्या प्रमाणावर धर्माच्या प्रभावातूनच नियंत्रीत झाले आहे. धर्मात सांगीतल्याप्रमाणे कुटूंब हा तीचा महत्वाचा धर्म मानला जातो. स्त्रीने विवाहानंतर आपल्या सर्व कौटूंबीक जबाबदाऱ्या पार पाडाव्यात यासाठी धर्म स्त्रीला कौटूंबीक जीवनात बंदिस्त करुन ठेवतो. धार्मिक जीवनातील कुठलाही विधि पती एकटा करु शकत नाही. हिंदू कुटूंबात धार्मिकदृष्ट्या पतीचे स्थान फारच महत्वाचे मानले जाते. विवाहानंतर होणारा गर्भपात विधि व पुत्रोत्पत्ती हेही धार्मिक दृष्ट्या पुण्यकारक विधी

समजले जातात. गृहस्थधर्मास सर्वश्रेष्ठ मानुन संसार करणे ही स्त्री ची जबाबदारी मानली जाते.

**२. सण समारंभाबाबत जबाबदारी :-**

सण, समारंभ, उत्सव, व्रत यांसारख्या बाबी धार्मिक जीवनात महत्वपूर्ण मानल्या जातात आणि याबाबत स्त्रीयांची असणारी जबाबदारी महत्वाची असते. दसरा, दिवाळी, नवरात्र, नागपंचमी यांसारख्या सणांच्या वेळेस स्त्रीयांनी आपल्या प रंपरिक जबाबदाऱ्या पार पाडणे आवश्यक मानले जाते. सण-समारंभाच्या प्रसंगी स्त्रीयांनी विशिष्ट पेहराव करण, उपवास धरणे, देवतांची पुजा यांसाख्या गोष्टी भारतयी समाजात आजही टिकून आहेत.

**३. जीवनातील सर्वसामान्य कर्तव्ये :-**

सामाजीक जीवन जगत असतांना जीवनातील अनेक कर्तव्यांचा संबंध धर्माशय येतो. सत्य, अहिंसा, त्याग, सदाचार ही त्यानुसार मुलभूत कर्तव्ये मानलय जातात. हिंदू धर्मातील **'मनुस्मृती' या ग्रंथात स्त्रीयांची असणारी**

सर्वसाधारण कर्तव्ये विशद केली आहे. मातृत्व, पतीव्रता, वेदपठन यांसारखी स्त्रीयांची धार्मिक कर्तव्ये आजच्या काळात देखील महत्वाची मानली जातात. या कर्तव्याचे उल्लंघन करण म्हणजेच धार्मिक आचरणाचा त्याग करणे असे मानले जाते. त्यामुळे स्त्रीयांची ही एक महत्वपूर्ण जबाबदारी मानली जाते. मुस्लीम धर्मात देखील याच प्रकारचा सदाचार व परोपकार सांगीतला आहे.

**४. शिक्षणाबाबत जबाबदारी :-**

स्त्रीयांनी कुठल्या प्रकारचे शिक्षण घ्यावे हे देखील धर्माद्वारेच निश्चित केले जाते. भारतात हिंदू धर्माप्रमाणेच इतर सर्वच प्रमुख धर्मांमध्ये इतर सर्वच प्रमुख धर्मांमध्ये स्त्रीयांनी सांस्कृतीक व अध्यात्मिक शिक्षण घ्यावे यावर भर देण्यात आला शिवाय स्त्रीयांनी विशिष्ट मर्यादेपर्यंतच ज्ञान संपादन करावे, असे देखील धर्म निर्धारीत करतो. आजच्या काळात धर्मास शिक्षणात कुठलेही महत्व नाही. त्यामुळेच स्त्रीयांची नितीमत्ता ढासळत आहे. असे धार्मिक उपदेशकार म्हणतात.

**५. सामाजीक जीवनातील संस्कार :-**

संस्कार म्हणजे शारीरिक, मानसिक व बौद्धिक शुद्धीकरता केलेली क्रिया होय. भारतात विविध धर्मात वेगवेगळे संस्कार सांगीतले आहेत. याबाबतयत स्त्रीयांची जबाबदारी महत्वाची ठरते. हिंदू धर्मात गर्भाधान, पु , सिमान्तोन्नयन, जातकर्म, नामकरण, अन्नप्राशन, चुडाकर्म, उपनयन, विवाह इत्यादी सारखे महत्वाचे संस्कार आहेत. हे सर्व संस्कार हिंदू धर्मातील स्त्रीयांच्या जबाबदाऱ्या निर्धारीत करतात. या सर्व संस्कारात धार्मिक अंगाप्रमाणेच सामाजीक बाजूदेखील महत्वाची आहे.

**'स्त्रीयांची सांस्कृतीक जबाबदारी'**

भारतीय समाजाबरोबर जगात प्रत्येक ठिकाणच्या समाज जीवनात एका विशिष्ट प्रकारची संस्कृती आकारास आलेली असते. भारतात देखील संस्कृतीची जडण-घडण

प्राचीन काळापासून झाली आहे. भारतातील संस्कृतीचे वैशिष्ट्ये म्हणजे यात स्त्रीला संस्कृती रक्षणाचा आधार मानले आहे. त्यामुळे स्त्रीवर काही सांस्कृतीक जबाबदाऱ्या येऊन पडणे साहजीकच ठरते त्यापुढीलप्रमाणे –

**१. रितीरिवाज व रुढींचे पालन :–**

भारतीय समाजात काही रितीरिवाज व रुढी प्रचलीत आहेत. पारंपरिक समाज व्यवस्थांचा त्या आधार मानल्या जातात हे सांस्कृतीक लोक व्यवहार पाळणे ही स्त्रीयांची जबाबदारी आहे. यात धार्मिक कार्य व कौटूंबीक रितीरिवाज यांचा समावेश होतो. आजच्या काळात स्त्रीया कितीही आधूनिक व प्रगत झाल्या असल्या तरी, त्यांना

सांस्कृतीक चालीरिती व रुढी परंपरा यांचा **त्या**ग करता ेत नाही. त्यांच्या मर्यादेत राहूनच सामाजीक व्यवहार पार पाडावे लागतात.

**२. सांस्कृतीक नियंत्रण :–**

भारतीय समाजात स्त्रीयांवर विविध प्रकारची सांस्कृतयक नियंत्रणे प्रस्थापीत झालेली दिसून येतात. स्त्रीला समाजात राहतांना काही सांस्कृतीक नियम पाळावे लागतात. आपल्या राहणीमानापासून ते वर्तनापर्यंत स्त्रीला बालवयापासून वृद्ध अवस्थेपर्यंत या नियमांचे पालन करावे लागते. यापेक्षा वेगळे वर्तन करणे किंवा सांस्कृतीक नियमांचय अवहेलना करणे हे त्याज्य मानले जाते. म्हणजेच स्त्रीवर **का**ही सांस्कृती नियंत्रण प्रस्थापीत झालेली दिसून येतात.

**३. सांस्कृतीक मूल्यांचे जतन :–**

जात, मर्यादा, प्रतिष्ठा हय भारतीय संस्कृतीत स्त्रीसाठी निर्धरीत केलेली मूल्ये आहेत. भारतात सामाजीक संस्कृतीच्या स्थैर्यासाठी स्त्रीयांनी या सांस्कृतीक मूल्यांचे जतन करणे व त्यानुसार आचरण करणे आवश्यक मानले. जेम्ते ामुळ च कुटूंबात वावरतांना मोठ्यांचा मान राखणे, मर्यादेत राहून वागणे या गोष्टी स्त्रीयांच्या जबाबदाऱ्या मानल्या जातात.

**४. परंपरांचे वहन :–**

भारतात ज्या सांस्कृती परंपरा अस्तित्वात आहेत त्यांचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वहन करण आवश्यक मानले जाते. ही जबाबदारी प्र मुख्याने स्त्रीच मानली जाते. स्त्रयच आपल्या मुलांवर योग्य संस्कार करुन त्यांना घडविण्याचे काम करत असते. मुलांचे संगोपन करतांना त्यांच्यावर संस्कार करणे व अनिष्ठ गोष्टीपांसून दूर ठेवणे या गोष्टय स्त्रीयांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या मानल्या जातात.

**'महिला आणि कायदा'**

स्त्री चळवळीला कायद्यातील बदलांसाठी केलेल्या संघर्षा क दीघ परंपरा आहे. स्त्रीयांच्या संरक्षणार्थ कायदे करण्याची गरज आहे. हे तेव्ह च्या साम्राज्यवादी सरकारला पटवून देण्याचे प्रयत्न सुरुवातीच्या समाजसुधारकांनी केले. या वेगवेगळ्या सुधारणांचे प्रयत्न असमानधकारक वाटल्यामुळे या चळवळयच्या दुसऱ्या लाटेत स्त्रीयानी त्यांच्या वरच्या वैधानिक भेदभावांचा संपूर्ण अभ्यास करण्यासाठी एका समितीच्या स्थापनेची

मागणी केली. आपला कायदेशीर दर्जा सुधारावा म्हणून स्त्रीयांनी हे जे अविरत प्रयत्न चालवले होते. त्यांचेच प्रतिध्वनी अखेरीस उमटले ते स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत त्यात सामाजीक, राजकीय व आर्थिक बाबतीत स्त्री-पुरुष नागरिकांना समान दर्जा व संधी मान्य केलेले आहेत आणि पुढे कलम १५ द्वारा वैधानिक बाबतीत लैंगीक भेदभाव स्पष्टपणे अवैध ठरविण्यात आला आहे.

स्वातंत्र्यपूर्ण व स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीयांच्या कल्याणाच्या आणि सुरक्षीततेच्या दृष्टीने अनेक कायदे केले गेले. ह्या कायद्यांमुळे आज स्त्रीयांच्या कौटूंबिक आणि सामाजीक जीवनात बरेच परिवर्तन झालेले आहे. काही कायद्यांमुळे महिलांना पुरुषांसारखे समान अधिकार मिळाले आहेत. तर, काही कायद्यांमुळे महिलांना त्यांच्या शोषणापासून मुक्ती मिळाली आहे. काही कायदे हे महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी झाले आहेत. सतीबंदीचा कायदा, संमती वयाचा कायदा, पुनर्विवाहाचा कायदा, बाल विवाह प्रतिबंधक कायदा हे स्वातंत्र्यापूर्वी झालेले सामाजीक सुधारणांचे कायदे हे स्त्रीला जाचक बंधनातून तीची सुटका करुन तीचे परावलंबित्व नष्ट करण्यासाठी झ ले  हे विविध कायदे कोणते ते पुढीलप्रमाणे -

**'विवाह विषयक कायदे'**

विवाहासंबंधी ज्या महत्वाच्या प्रश्नांकडे आपण लक्ष पुरविले पाहिजे ते म्हणजे बहुविवाह, हिंदू कायद्याप्रमाणे द्विभार्या प्रतिबंधक कायद्याच्या तरतूदींची परिणामकारकरित्या करावी लागणारी अंमलबजावणी, विवाहाचे वय, विवाहाची सक्तीची नोंदणी आणि हुंड्याची समस्या हे होत.

**१. बालविवाह प्रतिबंधक कायदा :-**

'विवाह' ही स्त्रीच्या आयूष्यातील महत्वाची गोष्ट आहे. बालविवाह चे दुष्परिणाम लक्षात आल्याने विवाहाकरीता वयोमर्यादा असावी ही गोष्ट लक्षात आली व त्या दृष्टीने जो कायदा पास झाला, त्याला 'बाल विवाह प्रतिबंधक कायदा ' म्हणतात. इ.स. १९२९ साली बालविवाह प्रतिबंधक कायदा पास झाला. ह्या कायद्याप्रमाणे १५ वर्षे वयाच आतील मुलीशी लग्न केले तर तो गुन्हा आहे तसेच १८ वर्षे वयाच्या खालील मुलीला कायदेशीर विवाहाकरीता वडीलांची संमती असणे आवश्यक आहे ह्यालाच 'सारडा कायदा' म्हणतात.

**२. हिंदू विवाह कायदा :-**

१९५५ साली हिंदू विवाह कायदा अस्तित्वात आला. हिंदू कायदा हा हिंदू धर्म मानणाऱ्या व्यक्तीस लागू आहे. वीरशैव लिंगायत, बौद्ध, जैन, शीख, ब्राम्हो व आर्य समाज ह्या अनुयायींना लागू आहे. ज्या हिंदूंचे विवाह हे स्पेशन मॅरेज ॲक्टनुसार केले जात नाहीत त्या सर्वांना हा कायदा लागू होतो.

**३. विधवा विवाह कायदा :-**

भारतीय समाजात ७०-८० वर्षांपूर्वी मुलींची फार लवकर लग्न होत असत. तीसऱ्या शतकापर्यंत महिलांच्या जीवनाची अवस्था चांगली होती. त्यानंतर म्हणजे १० व्या

शतकानंतर विधवांकडे पाहतांना त्यांना अशुभ मानले जाई. त्य ंच्यावर अत्याचार होत. महाराष्ट्रात आणि बंगालमध्ये समाज

सुधारकांनी, विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न धसास लावला. महर्षी धोंडो केशव कर्वे आणि ईश्वरचंद्र विद्यासांगरांनी विधवेशी लग्न केले. इ.स. १८५६ साली विधवा पुनर्विवाह कायदा संमत झाला, हिंदू विधवांना पुनर्विवाह करण्यामागचे जे कायद्याचे व शास्त्रांचे अडथळे होते. ते दूर करण्यासाठी ह्या कायद्याची मदत झालय.

**४. द्विभार्या प्रतिबंधक कायदा :-**

१९५५ च्या हिंदू विवाह कायद्याने परंपरागत हिंदू विवाह पद्धतीत अनेक बदल केले आहेत. द्विभार्या चालीवर कायद्याने बंदी आहे. या कायद्यानुसार प्रथम पत्नी जीवंत असतांना, एखाद्या पुरुषाने दुसरे लग्न केले तर ते लग्न म्हणून समजले जात नाही. तर, इंडीयन पीनल कोड खाली तो शिक्षणा पात्र गुन्हा ठरतो. दुसऱ्य पत्नीला पत्नीचा दर्जा प्राप्त होत नाही. त्यामुळे अशा स्त्रीला पतीच्या इस्टेटीत कुठलाच हक्क मिळू शकत नाही व अशा विवाहापासून होणारी मुले अनौरस समजली जातात. प्रथम पत्नी व तीची औरस मुले ही पतीच्या इस्टेटीचयी वारसदार असतात.

**५. नोंदणी विवाह कायदा :-**

हा कायदा इ.स. १८७२ मध्ये पास झाला. या कायद्यानुसार विवाह नोंदले गेले पाहिजे. इ.स. १८७२ च्या कायद्यात काही सुधारणा होऊन इ.स. १९५४ साली नोंदणी विवाहाचा नवा कायदा पास झाला. या कायद्यानुसार वधू-वर हे नोंदणी विवाह करुन आपल्या स्वइच्छेनुसार धार्मिक विधी किंवा विवाह **समारं**भ ाजे करु शकतात. या कायद्यानुसार मुलीच्या विवाहाची वयोमर्यादा ही १८ वर्षे केली आहे. विवाहाची नोटीस ही एक महिना आधी द्यावी लागते. का कायदा विवाहाची साधी पद्धत सर्व भारतीयांना उपलब्ध करुन देतो.

**६. घटस्फोटाचा कायदा :-**

१९५५ च्या हिंदू विवाह कायद्याने कायदेशीर विभक्तपणा व घटस्फोट या दोन गोष्टी मान्य केल्या आहेत. पती-पत्नीचे नाते हे घटस्फोटात संपूष्टात येते. त्यानंतर १९७६ साली हिंदू कायद्यात दुरुस्ती केली गेली. व्यभिचार, क्रुर वागणूक, वेड लागणे, गुप्तरोग, धर्मांतर, बेपत्ता होणे अशा कारणांनी पतीला अथवा पत्नीला घटस्फोट मागता येतो.

**''कुटूंबविषयक कायदे''**

भारतामध्ये स्त्रीयांवर समाजात व प्रमुखत: कुटूंबात जे हिंसाचार व अत्याचार होतात. त्याच्या विरोधात स्त्रीयांना संरक्षण प्राप्त व्हावे म्हणून कायदे करण्यात आले आहेत. त्यात पुढील कायद्यांचा समावेश होतो.

**१. हुंडा प्रतिबंधक कायदा (१९६१) :-**

आधूनिक काळात हुंड्याचे आकडे दिवसेंदिवस वाढत चाललेले दिसतात. मोठ्या नोकऱ्या, गलेलठ्ठ पगार, गावातील दवाखाने, परदेशगमन, मुलांच्या शिक्षणासाठी झालेला

खर्च हे सर्व विवाहामध्ये वधूपित्याकडून काढण्याची दुष्ट प्रथा ही दिवसेंदिवस वाढतच आहे. वधूपित्याचे हे एक प्रकारचे शोषण आहे. हुंडा दिला नाही तर, विवाहानंतर मुलीचा छळ होतो व नंतर तीचा हुंडाबळी घेतला जातो. या दुष्ट रुढीला आळा बसावा म्हणून १९६१ साली हुंडाबंदी कायदा पास झाला.

हुंडाबळीच्या कायद्यात १९८४ मध्ये व १९८६ मध्ये बरेच बदल करण्या आ ` भादंवि कलम ४९८ (अ) या कलमात महिलांवर होणाऱ्या छळाची व्याख्या दिली आहे. एखाद्या विवाहीत महिलेस तीच्या नवऱ्याने किंवा नवऱ्याच्या नातेवाईकाने मुद्दाम जाणीवपूर्वक अशी वागणूक दिली की, ज्यामुळे ती विवाहीत महिला छळा ा कंटाळून आत्महत्या करण्यास प्रवृत्त होईल अशा प्रकारच्या छळास व जाचास तीच्या नवऱ्यास शिक्षा व दंड होऊ शकतो.

**२. वैश्या व्यवसाय प्रतिबंधक कायदा (१९५६) :-**

हा कायदा १९५६ साली पास झाला. अल्पवयीन मुलींच्या वैश्यांच्या धंद्यात होणाऱ्या नवीन भरतीला त्यामुळे आळा बसला. या कायद्यानुसार कोणत्याही स्त्रीची ह्या व्यवसायात राहण्याची इच्छा नसेल तर, तीची त्वरीत सुटका होऊन तात्पूरते आश्रमस्थान मिळू शकते.

**३. गर्भपाताचा कायदा (१९७२) :-**

मेडीकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नंसी बील १९७१ हा कायदा १ एप्रिल १९७२ पासून अंमलात आला. या कायद्यानुसार भारतातील सर्वधर्मीय स्त्रीयांना प्रथमच काही विशिष्ट परिस्थितीत गर्भपात करून घेण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. १९७२ पूर्वी कायद्याने गर्भपाताला बंदी होती. ह्या कायद्यानुसार कोणत्याही सज्ञान स्त्रीला स्वतःच्या इच्छेनुसार गर्भपात करुन घेणे शक्य आहे. त्यासाठी पतीच्या संमतीची जरुरी नाही. पती वा इतर कुणाही नातेवाईकांच्या इच्छेनुसार कोणत्याही स्त्रीवर गर्भपात लादता येत नाही.

**४. गर्भजलपरीक्षा विरोधक कायदा :-**

हा कायदा १९८८ साली पास झाला. गर्भजलांची परीक्षा करुन, त्याच्या आधारे गर्भ हा स्त्री की पुरुषाचा आहे, ह्याचे निदान करणे ायद शीर आहे . स्त्रीचे आरोग्य चांगले राहण्यासाठी असा कायदा असणे आवश्यक आहे.

**५. घरगुती हिंसेपासून महिला संरक्षण अधिनियम २००५ :-**

महिलांना दिलासा देणारा 'कौटूंबयक हिंसाचार २००५' य नव्या कायद्याची अंमलबजावणी २६ ऑक्टोबर २००६ पासून सुरु झाली. या कायद्यंतर्गत महिलांना शारीरिक, भावनिक, आर्थिक, हुंड्याची गैरकायदेशीर मागणी, लैंगीक छळापासून संरक्षण मिळणार आहे. या कायद्यानुसार न्याय पीठासमोर दावा आल्यानंतर ३ दिवसाच्या आत त्याची सुनावणी घेण्याचे बंधन मॅजिस्ट्रेटवर राहील. दावा दाखल झाल्यानंतर २ महिन्याच्या आत तो निकाली काढण्याचे बंधन मॅजिस्ट्रेटवर टाकण्यात आले आहे. गुन्ह्याच्यानुसार आरोपींना १ वर्ष सक्षम कारावास, २०,००० रु. दंड ठोठावण्याते येणार आह . हा गुन्हा अजामीनपात्र राहील.

## ''संपत्तय विषयक कायदे''

संपत्तीच्या संदर्भात वारसाने निर्माण होणारे हक्क हे धार्मिक कायद्यावर आधारलेले आहेत. मात्र संपत्तीचे अन्य अधिकार धर्मातीत कायद्यांनी नियंत्रीत होतात.

हिंदू स्त्रीचे वारसा हक्काचे अधिकार ''हिंदू वारसा हक्क कायदा'' १५५६ व पारंपरिक हिंदू कायद्याचा भाग असणारा मिताक्षर कायदा याने नियंत्रीत होतात. मुसलमान स्त्रीचा वारसा हक्क इस्लामच्या तत्वानुसार, पारशी व अन्य धर्मीय स्त्रीयांचे अधिकार इंडीयन सक्सेशन ॲक्ट यानुसार नियंत्रीत होतात. या अधिकारांची क्रमव र चर्चा पुढे केली आहे.

### १. हिंदू उत्तराधिकार अधिनियम १९५६ :–

हा कायदा हिंदूसह बौद्ध, जैन आणि शीख पंथांना लागू आहे.

कलम १४ – हिंदू स्त्रीची मालमत्ता ही तीची अबाधित मालमत्ता असते, हे ठरविण्यात आले. संपूर्ण मालक म्हणून मिळकत धारण करण्याचा अधिकार हिंदू स्त्री ला या कायद्याने प्राप्त झाला. १९५६ च्या कायद्याने 'स्त्रीधन' व अन्य संपत्ती यातील फरक जवळजवळ संपूष्टात आणला आहे.

आजही विवाहाच्या प्रसंगी स्त्रीला जे दागदागीने, भेटवस्तू मिळतात त्या सर्वस्वी तीच्या मालकीच्या असतात व त्या हडप करणाऱ्या विरुद्ध फौजदारी गुन्हा व शिक्षा त्या व्यक्तीस होऊ शकते.

कलम ०६ – सहदायकी मालमत्तेतील, संपत्तीतील हितसंबंध उत्तरजीवीत्वाच्या तत्वानुसार सहदायकीतील उत्तरजीवी सदस्याकडे प्रक्रांत होते.

कलम ८,९,१० – हिंदू वारसा कायदा सन १९५६ प्रमाणे त्यांची मिळकत अशा मयत हिंदू पुरुषाच्या विधवेला, मुलाला व मुलीस व इतर वारसांना मिळेल. मुलींना पूर्णपणे वगळता येणार नाही.

कलम १२, १३ – ॲग्रेट (बापाकडून नात्याचा) आणि कॉग्रेट (आईकडून नात्याचा) यांचामधील वारसापैकी जो पूर्व पिढीला अधिक जवळचा असेल त्याला वारसाबाबतचा पसंतीचा अनुक्रम मिळेल.

कलम १५ व १६ – मृत्यूपत्र न करता मरण पावलेल्या हिंदू स्त्रीची मालमत्ता

अ) पहिल्यांदा पुत्र व कन्या (कोणत्याही पुर्वमृत पुत्र किंवा कन्या यांची अपत्ये धरुन) आणि पती यांच्याकडे

ब) दुसऱ्यांदा पतीच्या वारसदारांकडे

क) तिसऱ्यांदा माता आणि पिता यांच्याकडे

ड) चवथ्यांदा पिताच्या वारसादारांकडे

इ) शेवटी मातेच्या वारसदारांकडे या क्रमानुसार प्रक्रांत होईल

कलम १९ – मृत्यूपत्रविरहीत मरण पावलेल्या मृत इसमांच्या मिळकतीमध्ये दोन

अथवा अधिक व्यक्तीना एकाच वेळी वारसा येत असेल तर, सदर मिळकत व्यक्तीगत पद्धतीने विभागली जाईल, असे वारस सामाईक समान हिस्सेदार होतील.

कलम २३ – राहत्या घरासंबंधीत विशेष तरतूदी करण्या आल्या आहेत. अविवाहीत मुलगी, विधवा मुलगी व परित्यक्ता मुलगी यांना या घरात राहण्याचा अधिकार देण्यात आला आहे. परंतू, सासरी राहण्याचा मुलीला मात्र त्या घरात राहण्याचा अधिकार दिला नाही. परंतू, आता कायद्यातील नव्या दुरुस्तीमुळे मुलींना मुलाइतकेच अधिकार राहणार आहेत.

कलम २९ – धर्मांतर केलेल्या हिंदूंचा वारसा हा त्याने जो धर्म स्वीकारला आहे त्या धर्माप्रमाणे किंवा १९२५ च्या इंडययन सक्सेशन ॲक्ट मधील तरतूदीप्रमाणे निर्देश केलेल्या वारसांना मिळेल.

२९ (क) – या अधिनियमाच्या कलम ६ मध्ये सहदायकी संपत्तीमध्ये कन्येला समान हक्क राहील. पुत्राला वाटून देण्यायोग्य असेल तेवढाच हिस्सा कन्येला वाटून देण्यात येईल. १९९४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० द्वारे या अधिनियमात महाराष्ट्रात सुधारणा करण्यात आली आहे.

२.मुस्लीम स्त्री आणि वारसा कायदा :-

मुस्लीम वारसा कायदा भारतातील इतर वारसा कायद्यांपे व गळा आहे. मुसलमान स्त्रीचे संपत्तीतील अधिकार इस्लामच्या तत्वांनी ठरविण्यात आले आहेत. मुसलमान वारसा हक्काचा कायदाही सुन्नी व शिया या दोन पंथांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे राबविल्या जातो. शिया कायदा स्त्रीयांच्या अधिकाराबाबत

अधिक उदार आहे. मुस्लीम स्त्रीया पुरुषांप्रमाणेच स्वतंत्रपणे मिळकतीचा उपभोग घेऊ शकतात. मुस्लीम कायदा मयत स्त्रीची मिळकत किंवा मयत पुरुषाची मिळकत असा भेदाभेद करत नाही.

इस्लाम कायदीय तत्वानुसार १) पती पत्नी दोहोंना वारस म्हंटले जाते., २) स्त्रीया आणि नातेवाईक यांची वारसापात्रता जास्त आहे, ३) आई-वडिल आणि नातेवाईक यांना पुरुष वारस असले तरी प्राधान्य, ४) सर्वसाधारण नियम-पुरुषापेक्षा स्त्रीला निम्मा हिस्सा, मुस्लीम कायद्यानुसार मालमत्तेची व्यवस्था मृत्यूच्या नंतर करण्याची जबाबदारी काहींवर पडते. जो न्याय दंडाधिकारी असतो.

**३. ख्रिश्चन स्त्री आणि वारसा कायदा :-**

संपूर्ण ख्रिश्चन कायदा विधयसंमत असून भारतीय वारसा कायदा १९२५ प्रमाणे आहे. हा कायदा मृत्यूपत्र विरहीत व मृत्यूपत्रसहित वारसाबाबत आहे.

मृत्यूपत्र विरहीत वारसा मृत्यूपत्र न करता मृत पावलेल्या व्यक्तीस म्हणतात. या कायद्याचा भाग ५ कलम १९ ते ५६ बाबत आहेत. हा कायदा ख्रिश्चन आणि पारशी व्यक्तींना लागू आहे. कलम ३३ नुसार मृत्यूपत्र न करता मयत झालेल्या व्यक्तीच्या मागे विधवा व त्याच्या रक्ताच्या नात्यातील व्यक्ती किंवा त्यांचे इतर जवळचे नातेवाईक असेल,

तर विधवेला १/३ व इतर मुले, मुली व नातू यांना २/३ हिस्सा मिळेल. विधवा व त्याचे इतर जवळचे नातेवाईक मधील व्यक्तीच्या बाबतीत विधवेस १/२, जवळच्या नातेवाईक व्यक्तीस १/२, फक्त विधवा मागे असल्यास तीला संपूर्ण मिळकत मिळेल.

**४. पारशी स्त्री आणि वारसा कायदा :-**

पारश लोकांच्या मालमत्तेची वाटणी भारतीय व वारसा कायदा १९२५ नुसार पुढीलप्रमाणे आहे-

कलम ५० ते ५६ नुसार - १) मृत व्यक्तीच्या हयातीत ज्यांचा जन्म झाला. आणि त्याच्या मृत्यूसमयी जे मुल मातेच्या गर्भात असेल आणि जे जन्माला आले असेल यात फरक केला जात नाही.

२. मृत व्यक्तीला नात्यातल्या विधवेने जर त्याच्या हयातीत पुनर्विवाह केला असेल तर तीला मालमत्तेमध्ये हिस्सा मिळणार नाही.

३. पूर्वीच्या कायद्यामध्ये मुलीस वडिलांच्या संपत्तीत मुलाच्या व विधवेच्या हिस्स्याचा अर्धा हिस्सा संपत्ती मिळत असेल. आता मात्र पुरुषाच्या मृत्यूनंतर त्याची विधवा मुलगा-मुलगी सर्वांनाच समान हिस्सा मिळतो.

४. मृत पुरुषास मुले नसतील व विधवा आणि अन्य वार**स** हया**त** अ तील र विधवेस संपूर्ण हिस्स मिळत नाही.

५. जेव्हा विधवा, मुलगा-मुलगी, आई व वडील असतात अशावेळी अ ईचा हिस्सा मुलीच्या १/२,वडिलांचा हिस्सा मुलांच्या १/२, विधवा व मुलगा या दोघांचा हिस्सा सारखाच असतो.

६. मुलांच्या मागे कोणताही नातेवाईक नसेल त्यावेळी मृत्यूविरहीत मृत झालेल्या पारशीची मिळकत त्याच्या वंशाच्या जवळच्या नातेवाईकांच्यात समान हिस्स्यात विभागली जाईल.

**''कार्यक्षेत्राबाबतचे कायदेछ'**

आधूनिक काळामध्ये स्त्रीयांना सामाजीक क्षेत्रात आपली कार्यकर्तृत्व दाखविण्याची संधी प्राप्त झाली. मात्र कामाच्या ठिकाणी आरोग्यास घातक वातावरण, मानसिक ताण, लैंगीक छळ, अधिकाऱ्यांचा त्रास यासारख्या समस्या त्यांच्या पुढे उपसतात. त्याचबरोबर वेतनामध्ये भेद आणि कामाच्या ठिकाणी असुविधा ह्या देखील समस्या भेडसावत असतात.

**१. समान वेतन कायदा १९७६ :-**

भारतीय संविधान कलम ३९ प्रमाणे राज्यांना मार्गदर्शक तत्वे ठरवून दिलेली आहेत. त्यानुसार स्त्री व पुरुषाला समान वेतन दिले पाहिजे म्हणून या संविधानातील तरतूदीला परिणामकारक स्वरुप म्हणून समान वेतन कायदा १९७६ मध्ये लागू करण्यात आला. हा कायदा सर्व आस्थापनांना लागू आहे व कलम २ (ग) नुसार वेतन या शब्दाच्या व्याख्येत मूळ वेतन, अन्य वाढीव भत्ते, रोख किंवा सेवा स्वरुपात दिलेले भत्ते वेतन या शब्दाच्या व्याख्येत अंतर्भूत आहेत.

स्त्री आणि पुरुषांचे काम समान असून वेतन देण्यात भेदाभेद करण हे कलम ४(१) चा भंग करणार कृत्य आहे तसेच संविधान कलम १४ व ३९ (५) मधील तरतूदींची पायमल्ली करण्यासारखे आहे. कोणत्याही मालकाने समान प्रकारच्या कामासाठी स्त्री-पुरुषांची भरती करतांना त्यांच्या सेवाशर्तीमध्ये, पदोन्नती, प्रशिक्षण किंवा बदली यामध्ये भेदाभेद करु नये.

**२. कारखाने अधिनियम १९४८ नुसार स्त्रीचे संरक्षण :-**

कलम २७ नुसार स्त्रीया व बाल कामगारांना कापड गिरणीत कपाशीपासून सूत कातण्याच्या यंत्राजवळ काम करण्यास प्रतिबंध आहे. मालकांनी प्रत्येक कारखान्यात संडास, मुतारी, स्त्री-पुरुष स्वतंत्र आरामकक्षाची सोय केली पाहिजे व त्यांच्या स्वच्छतेकडे लक्ष दिले पाहिजे. प्रत्येक कारखान्यात

ज्या ठिकाणी ३० पेक्षा जास्त स्त्री कामगार काम करतात अशा ठिकाणी पाळणा घराचय सोय असावी. सकाळी ६ ते ७ पर्यंतचय वेळूेसो इतर का णत्याही वेळेत स्त्री कर्मचाऱ्याला कामावर ठेवले जाणार नाही. धोकादायक कार्यपद्धती असलेल्या कारखान्यात स्त्रीयां व मुले यांना नोकरीवर ठेवता येणार नाही.

**३. घरेलू कामगार विधेयक २००८ :-**

धुणे-भांडी, पुसणे अशा सुमारे ३५ प्रकारच्या कामांमधून सुसूत्रता आणण्यासाठी कायद्याची मागणी करण्यत आली. या कायद्यामुळे जी गोष्ट नव्याने अस्तित्वात येणार आहे ती म्हणजे घरेलू कामगार कल्याण मंडळ या मंडळाच्या स्थापनेविषयी व त्याच्या कार्यांविषयीचे हे विधेयक आहे.

या विधेयकात त्याचे प्रयोजन स्पष्ट केले आहे. जसे घरेलू कामगारांच्या कल्याणाला चालला देण्यासाठी मंडळ स्थापन करणे, त्यांना वित्तयी लाभ देण्यासायी निधी निर्माण करणे यासाठी संबंधीत बाबींची तरतूद करणे.

मंडळाने करावयाच्या महत्वाच्या कामांमध्ये घरेलू कामगा ंची नोंदणी करणे, अपघात घडल्यास त्यांना सहाय्य पुरविणे, मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य देणे, लाभार्थी व त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीला आजारपणात वैद्यकीय खर्चासाठी सहाय्य करणे, प्रसूतीसाठी तरतूद, अंत्यविधयच्या खर्चाची तरतूद, पेंशन इ.

## ४.३ स्वयं अध्ययन प्रश्न :-

१) महिलांच्या जीवनावर जागतीकीकरणामुळे कोणकोणते परिणाम झाल आहेत ?

..............................................................................................

..............................................................................................

२) विकासात्मक धोरण संकल्पना स्पष्ट करा.

..............................................................................................

..............................................................................................

३) महिलांसाठी असलेले विविध कायदे कोणते ?

४) धर्म व संस्कृती यांवर टिप लिहा.

## ४.४ सारांश :-

महिला सबलीकरण ही महिलांच्या अधिकारांचा पुरस्कार करणारी आणि महिलांच्या विकासाशी संबंधित प्रक्रिया आहे. त्याचबरोबर महिलांना पुरुषांच्या बरोबरीने विकास आणि प्रगतीच्या समान संधय उपलब्ध करुन देणे, समाजामध्ये स्त्रीयांना उपेक्षीत ठेवणाऱ्या, त्यांना आर्थिक, सामाजीक आणि राजकीय लाभापासून वंचीत ठेवणाऱ्या शक्तीमध्ये वैचारयक परिवर्तन घडवून आणणे अशा प्रवाहांची दिशा बदलणे अपेक्षीत आहे.

ग्रामीण भागातील काहीशी अर्धशिक्षीत स्त्री आज आरक्षणामुळे पंचायतीत आली आहे. ती आज

जरी चाचपडत असली तरी येत्या दशकात मात्र समर्थपणे राजकारणात आपली छबी निर्माण केल्याशिवाय राहणार नाही.

वरील चर्चेच्या आधारे आपल्याला स्त्रीयांची धार्मिक जबाबदारीची जाण होईल. स्त्रीयांना धार्मिक जबाबदाऱ्या पार पाडतांना कौटूंबिक जीवन, सण, उत्सव, संस्कार इत्यादींचा विचार करुनच आपले जीवन जगावे लागते.

भारतात स्त्रीयांची जबाबदारी धर्म व संस्कृती या घटकांच्या प्रभाव तून निर्धारीत झाली आहे. त्यातुनच भारतीय स्त्रीयांवर अनेक निर्बंध लादले गेले व स्त्रीयांचा सामाजीक दर्जा कमकूवत बनला. मात्र, यामुळे भारतीय समाजातील सांस्कृतीक मूल्यांची जपवणूक होण्यास मोठ्या प्रमाणावर हातभार लागला ही गोष्ट देखील मान्य करावी लागेल.

थोडक्यात वरील कायदे करण्यात आले. यापैकी हिंदू विवाह कायदा हा महत्वाचा मानला जातो. या कायद्यात १९७८ मध्ये सुधारणा करण्यात आली. त्यानुसार मुलीचे विवाहविषयक वय १८ व मुलाचे २१ निश्चित करण्याते **आ**ले ह . ाजच्या काळात हिंदू विवाह विषयक कायद्यास आधार मानूनच भारतात सर्वत्र वि**वा**ह ि षयक तरतूदीचे पालन करण्यावर भर दिला जातो.

स्त्रीयांना कौटूंबीक जीवनात मोठ्या प्रमाणात संरक्षण प्राप्त होण्याच्या दृष्टीने वरील कायदे महत्वाचे मानले जाते. यात हुंडा प्रतिबंधक कायदा, महत्वाचा आहे. त्यात १९८७ रोजी सुधारण घडून आणल्या गेल्या. त्यामुळे स्त्रीयांना कौटूंबीक जीवनात कायदेशीर संरक्षण प्राप्त झाले. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३७५ व ४९८ मध्ये देखील कौटूंबीक हिंसाचार विरोधातील तरतूदी आहेत.

भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रीयांना संपत्ती विषयक अधिकार देण्यात आलेले नव्हते. पतीच्या व वडिलांच्या संपत्तीचा उत्तराधिकार स्त्रीयांना मिळत नव्हता. त्यामुळे स्त्रीयांची स्थिती दयनीय होती. या दृष्टीने स्त्रीयांना संपत्तीचा अधिकार देणारे वरील अधिकार महत्वाचे दिलेत. यापैकी २००४ च्या कायद्याद्वारे स्त्रीयांना संपत्तीचे अधिकार मोठ्या प्रमाणावर प्राप्त

झो. १९९३ च्या कायद्याद्वारे स्त्रीयांना वडिलांच्या संपत्तीचा उत्तराधिकार प्राप्त झाला.

## ४.५ पारिभाषीक शब्द :–

* परिषद –
* कार्यक्षमता –
* आरक्षण –

## ४.६ संदर्भसूची :–


१. प्रा. सौ. कवि माधवी – महिला कल्याण आणि विकास.

२. डॉ. कोतापल्ले लक्ष्मण – भारतातील सामाजीक कल्याण प्रशासन.

३. डॉ. मेहेत्रे स्मीता – भारतीय स्त्री आणि मानवाधिकार.

४. टोपे त्र्यं.कृ. – महिला व कुटूंबविषयक कायदे.

५. गांधी नंदिता, शाह नंदिता – स्त्री संघर्षाची नवी रुपे.

६. देसाई नीरा– भारतीय समाजातील स्त्रीयांचे स्थान.

७. डॉ. परुळेकर आशा – आधूनिक स्त्रीच्या समस्या.

८. डॉ. आगलावे प्रदिप – भारतीय समाज प्रश्न आणि समस्या.

९. भागवत विद्युत – 'स्त्री प्रश्ना' ची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने.

१०. डॉ. देवळाणकर शैलेंद्र – सत्रकालीन जागतीक राजकारण.

# घटक ५

# भारतीय स्त्री – बदलता दर्जा


५.० उद्दिष्टे

५.१ प्रास्ताविक

५.२ विषय विवेचन

  ५.२.१ भारतातील स्त्रियांचा बदलता दर्जा

  ५.२.२ विविध कालखंडातील स्त्री–जीवन

    ५.२.२.१ प्राचीन भारतातील स्त्री–जीवन

    ५.२.२.२ मध्ययुगीन भारतातील स्त्री–जीवन

    ५.२.२.३ ब्रिटिश कालखंडातील स्त्री–जीवन

५.३ पारिभाषिक शब्द

५.४ स्वयंअध्ययनाच्या प्रश्नांची उत्तरे

५.५ सारांश

५.६ संदर्भ पुस्तके


## ५.० उद्दिष्टे

## ५.१ प्रास्ताविक :

भारतीय संस्कृती आजही पुरुषप्रधान संस्कृतीच आहे. या संस्कृतीने स्त्रीला हीन लेखण्याची प्रवृत्ती समाजात रुजविली आहे. यामुळे भारतीय स्त्री आजही निकृष्ट दर्जाचे जीवन जगत आहे. तिला समाजात दुय्यम स्थान आहे. तिला विविध धार्मिक, सामाजिक, आर्थिक राजकीय अधिकारापासून वंचित ठेवले आहे. त्यामागे अनेक अंधश्रद्धा, रूढी, प्रथा, परंपरा आहेत त्या जर समजून घेतल्या तर स्त्रियांची स्थिती सुधारण्यास मदत होते.

हिंदू धर्मात स्त्रीला देवता मानले आहे. पण प्रत्यक्षात परिस्थिती तशी नाही. स्त्रियांना दासीप्रमाणेच वागणूक मिळते. प्राचीन काळी मध्ययुगापूर्वी भारतातील समाजजीवनात स्त्रियांना मानाचे स्थान होते. पण मध्ययुगीन कालखंडात मात्र स्त्रियांची सामाजिक स्थिती खालावण्यास सुरुवात झाली. मोघल साम्राज्यात स्त्रियांवर अनेक प्रकारची सामाजिक बंधने लादली गेली. धर्माने स्त्रियांच्या बाबतीत कठोर नियम बनविले. परिणामी भारतीय संस्कृती स्त्रियांच्या बाबतीत अधिक संकुचित बनत गेली व तिचा सामाजिक दर्जा खालावत गेला.

जेव्हा भारतात ब्रिटिश सत्ता प्रस्थापित झाली व त्यांनी मानवतावादी सामाजिक धोरण

राबविण्यास सुरुवात केली परिणामी स्त्रियांची सामाजिक स्थिती सुधारण्यास मदत झाली. स्त्रियांवर होणारे अन्याय, जाचक रूढी, कालबाह्य झालेल्या प्रथा, सामाजिक बंधने दूर करण्याचा प्रयत्न केला गेला. पाश्चिमात्य विचारांच्या प्रभावामुळे अनेक सामाजिक सुधारणा झाल्या. मध्ययुगीन काळाच्या तुलनेने स्त्रियांवरची बरीचशी बंधने कमी झाली व स्त्रियांना सामाजिक, राजकीय, आर्थिक अधिकार प्राप्त होण्यास सुरुवात झाली.

## ५.२ विषय विवेचन :

प्राचीनकालीन स्त्रियांना समाजात मानाचे स्थान होते. सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात त्यांचा वावर होता, पण नंतर मध्ययुगीन कालखंडात मात्र या परिस्थितीत परिवर्तन झाले. हिंदू धर्मामध्ये मुलीच्या जन्माचे स्वागत न होता नाराजी व्यक्त केली जाऊ लागली. याला अनेक घटक कारणीभूत होते. त्यात विशेषत: धार्मिक हक्क पूर्णत: पुरुषाकडे आले होते. संपत्तीची मालकी पुत्रांना प्राप्त होत होती. त्यामुळे पुत्रप्राप्ती महत्त्वाची मानली जाऊ लागली. मध्ययुगीन काळातील विविध सामाजिक परिस्थितीमुळे बालविवाह, विधवा पुनर्विवाहावर बंदी, आंतरजातीय विवाहांना विरोध यांसारख्या रूढी, प्रथा सुरू झाल्या. त्याचबरोबर सतीसारखी अमानवीय प्रथासुद्धा याच काळात सुरू झाली.

पण नंतरच्या काळात मात्र सामाजिक परिस्थिती बदलण्यास सुरुवात झाली. ब्रिटिश भारतात आल्यानंतर त्यांनी सर्वांसाठी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या. सामाजिक रूढी, प्रथा, परंपरांवर कायद्याने कडक निर्बंध टाकले. सामाजिक सुधारणेसाठी पोषक वातावरण निर्माण केले. नवनवीन कायदे केले. अशा अनेक घटकांचा अभ्यास आपल्याला या प्रकरणात करावयाचा आहे.

### ५.२.२.१ प्राचीन भारतातील स्त्री–जीवन :

भारतीय संस्कृतीचे आरंभ स्थान आपणास वैदिक वाङ्‌मयात पाहवयास मिळते. वैदिक वाङ्‌मयात ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद या वेदांतून आपल्याला भारतीय संस्कृती संदर्भात माहिती प्राप्त होण्यास मदत होते. यात स्त्रीजीवन जाणून घेता येते. वेदोत्तर प्रदीर्घ कालखंडात निर्माण झालेल्या संस्कृत व प्राकृत साहित्यातूनही स्त्रीजीवनाचे चित्रण झालेले आपल्यास आढळते.

बौद्ध व जैन धर्मग्रंथांतही स्त्रीजीवनाविषयी उल्लेख आहे. या धर्मग्रंथांत बौद्ध व जैन भिक्षुणी संघ कसे होते, त्यांच्या रचना कशा होत्या या संदर्भात त्यांचे कार्य व स्थिती संदर्भात सविस्तर उल्लेख आढळतो.

प्राचीन भारतातील स्त्रीला सामाजिक जीवनात खूप मोकळेपणा व स्वातंत्र्य होते, पण तसे ते अपवादानेच. तिला समाजात मान व प्रतिष्ठा होती. त्या काळात समाजातील आर्थिक व्यवहार फारसे विकसित झालेले नव्हते. त्यामुळे स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्यचा प्रश्न निर्माणच झाला नाही. जसजसे आर्थिक व्यवहार विकसित होत गेले तसा आर्थिक व्यवहारातील स्त्रियांचा सहभाग वाढला. समाजालाही स्त्रियांच्या आर्थिक वारसा परिस्थितीनुसार बदल करावे लागले. प्राचीन कालखंडामध्ये संयुक्त कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. कुटुंबात कमीतकमी

तीन ते चार पिढ्यांचे लोक एकत्र राहत असत. त्यामुळे कुटुंबात श्रमविभागणी होत असे. कुटुंबाचा प्रमुख हा पुरुष असे. त्यामुळे त्याच्याकडे अधिकाराचे केंद्रिकरण झालेले असे. कुटुंबातील अधिकाराच्या बाबतीत स्त्रीला दुय्यम स्थान होते.

भारतात आर्यांचा प्रवेश होण्यापूर्वी काही समाजात मातृसत्ताक कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. सिंधू नदीपासून ते नाईल नदीपर्यंत भूभागावर मातृसत्ताक कुटुंबपद्धती अस्तित्वात होती, असा निष्कर्ष डॉ. मार्शल यांनी संशोधनाच्या माध्यमातून काढला. हा निष्कर्ष सर्वमान्य झाला. या काळातला मानवी संस्कृतीचा असा टप्पा होता की अपत्यनिर्मितीमध्ये पुरुषाचेही स्थान असते हे त्याला कळले नव्हते. स्त्रीमध्येच अपत्यनिर्मितीचे अलौकिक सामर्थ्य आहे असे त्याला वाटत होते. म्हणून तो स्त्रीची तुलना पृथ्वीशी करीत असे. त्याचबरोबर स्त्रीने शेतीचाही शोध लावला. त्यामुळे समाजातील स्त्रीला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. पण जसजसा काळ गेला तसा निर्मिती प्रक्रियेतील पुरुषाचे स्थान स्पष्ट झाल्यानंतर व नांगराची शेती सुरू झाल्यानंतर स्त्रीचे समाजातील महत्त्व कमी होऊ लागले व पुरुषप्रधान संस्कृतीची निर्मिती होण्यास सुरुवात झाली.

भारतामध्ये जेव्हा आर्यांचे आगमन झाले तेव्हा त्यांचा संघर्ष अनार्याबरोबर सुरू झाला. या संघर्षाच्या अखेरीस आर्यांचा विजय झाला. पण पराभूत झालेल्या अनार्याबरोबर काही तडजोडी कराव्या लागल्या. अनार्य जरी पराभूत झाले तरी त्यांनी मातृसत्ताक कुटुंबपद्धतीचा त्याग केला नाही. त्यांनी स्वत:ची मातृसत्ताक संस्कृती जपण्याचा आटोकाट प्रयत्न केला. आर्यांनी मात्र ही मातृसत्ताक संस्कृती नष्ट करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. या सांस्कृतिक संघर्षात पुरुषप्रधान संस्कृतीची मुळे घट्ट होत गेली. तरीही मातृसत्ताक कुटुंबपद्धती पूर्णत: नष्ट झालेली नाही.

या संघर्षात आर्य समाजाने अनेक क्रूर रूढी, प्रथा, चालीरीतीने आर्यांची मातृसत्ताक कुटुंबपद्धती नष्ट करण्याचे प्रयत्न चालवले होते. बालविवाह, बहुपत्नीत्व, विधवांना अमानुष वागणूक देणे इ. प्रथा सुरू केल्या जेणे करून मातृसत्ताक कुटुंबपद्धतीवर वर्चस्व प्रस्थापित करता येईल. समाजातील स्त्रीचे महत्त्व कमी करण्याचा असा प्रयत्न अन्यत्र कुठेही झाला नसेल पण तरीही अनार्याची मातृसत्ताक कुटुंबपद्धती आजही अस्तित्वात आहे. अजूनही काही आदिवासी जमातीत मातृसत्ताक कुटुंबपद्धती अस्तित्वात आहे.

म्हणजेच पुरुषप्रधान संस्कृतीची पाळेमुळे घट्ट होण्यापूर्वी मातृसत्ताक पद्धतीचा अवलंब करणारी समाजव्यवस्था भारतात अस्तित्वात होती. त्या काळात स्त्रियांना समाजात महत्त्वाचे स्थान होते.

### वैदिक कालखंडातील कुटुंबसंस्थेत स्त्रीचे स्थान :

वैदिक कालखंडातील कुटुंबसंस्था ही आर्य समाजरचनेचा महत्त्वपूर्ण भाग होती. आर्यांची कुटुंबसंस्था ही पितृसत्ताक कुटुंबपद्धतीची होती. त्यामुळे कुटुंबात पुरुषाला महत्त्व होते. कुटुंबप्रमुख म्हणून पित्याकडे सत्ता असे. असे जरी असले तरी कुटुंबात माता-पित्यांना दर्जा समान होता. कुटुंबात स्त्रीला महत्त्व दिले जात असे. तिला घराची स्वामिनी मानले जायचे. धर्मकृत्यामध्ये पत्नीला महत्त्वाचे स्थान असे.

वैदिक कालखंडात सांस्कृतिक क्षेत्रातसुद्धा स्त्रियांचे एक विशेष असे स्थान होते. सम्राट जनकाच्या ब्रह्मवादी सभेत याज्ञवालक्यास अनेक प्रश्न विचारून त्रस्त करणारी स्त्री गार्गी, वाचक्नवी इ. या स्त्रिया वैदिक कालखंडातील सांस्कृतिक क्षेत्रातील दर्जाचे प्रतिनिधित्व करतात. याज्ञवालक्याची पत्नी मैत्रेयी भौतिक सुख बाजूस सारून अमरत्वास पोहोचविणाऱ्या तत्त्वचर्चेत गुंतलेली बृहदारण्यक उपनिषदात वर्णिलेली आहे. म्हणजेच भारतीयांचे वैदिक कालखंडातील कौटुंबिक जीवन बौद्धिक, सांस्कृतिक जीवनाच्या निकोप वाढीस कारण झाले होते. कौटुंबिक जीवनात स्त्री-पुरुष असा भेद केला जात नव्हता. प्राचीन भारतीयांच्या दैनंदिन व सार्वजनिक व्यवहारात स्त्रियांचा दर्जा वैशिष्ट्यपूर्ण असा होता.

राज्यकारभारातही मदतनीस म्हणून अनेक स्त्रिया कार्यरत होत्या. उदा. राजमहिषी यांना मोठी प्रतिष्ठा प्राप्त होती. राजाचे अष्टवीर प्रधानात राजमहषीचा समावेश होता. राज्यकारभारावर देखरेख ठेवण्यासाठी सभा व समिती या दोन प्रजातंत्र संस्था असत. या प्रजापतीच्या मुली मला ऐकोप्याने मदत करोत अशी राजाने प्रार्थना केली आहे. पण राजकारभाराच्या मुख्य सभेत स्त्रियांना सहभागी होण्यास परवानगी नव्हती असे ब्राह्मण ग्रंथात म्हटले आहे.

## प्राचीन कालखंडातील स्त्रीशिक्षण :

प्राचीन कालखंडात ब्राह्मणकालानंतर स्त्रियांच्या वैदिक शिक्षणावर बंदी येण्यास सुरुवात झाली. आर्य पुरुष अनार्य स्त्रीशी विवाह करू लागले. अशा अनार्य पत्नीला मंत्रोच्चारण येत नसल्याने परिणामी स्त्रियांना वैदिक शिक्षणापासून दूर ठेवण्यात येऊ लागले. त्यातून स्त्रियांवर होणारा उपनयन विधीही बंद झाला. असे असले तरी स्त्रियांचे शिक्षण पूर्णपणे बंद झाले नव्हते. स्त्रियांना उपनयन होऊन रजोदर्शनापर्यंत शिक्षण दिले जात असे.

उच्चस्तरातील महिलांना विविध विषयांत नैपुण्य मिळावे यासाठी संधी उपलब्ध होती. वात्सायनाच्या कामसूत्रात राजकन्या व सरदारकन्या या विविध शास्त्रांच्या अध्ययनामुळे तीव्र बुद्धिमत्तेच्या असत असा उल्लेख आहे. जैन व बौद्ध ग्रंथांतही अनेक विदुषींचे उल्लेख आढळतात. सातवाहन राणी नायनिका हिने राज्यकारभार चालविल्याचा उल्लेख आहे. तर काही ठिकाणी स्त्रियांना लष्करी शिक्षणही दिले जात असे, असे 'शक्तिकी' उल्लेखावरून आढळते. शकुंतला आपले प्रेमपत्र कमलपत्रावर लिहीत असे. तिची सखी अनुसया इतिहास जाणणारी होती असा उल्लेख कालिदासात आहे.

बौद्धविहार, जैन संथागर, हिंदूंची मंदिरे यामधून स्त्रियांसाठी शिक्षणदानाचे कार्य होत असे. अमरकोश उपाध्याया व आचार्या अशा शब्दांनी स्त्रीशिक्षिकांचा उल्लेख होत होता. हे साहित्यातील उल्लेख तत्कालीन स्त्रियांच्या शैक्षणिक जीवनाची स्थिती निर्देश करतात.

## प्राचीन कालखंडातील स्त्री-विवाह (वैवाहिक दर्जा)

प्राचीन कालखंडात कन्येचा विवाह करून देण्याची जबाबदारी पालकाची मानली जाई. या काळामध्य सवर्ण व सजातीय वधू-वरांचे विवाह व्हावेत असा समाजाचा आग्रह होता. कनिष्ठ वर्णातील वराशी विवाह करण्यास मान्यता नव्हती, पण उच्च वर्णातील मुलाने कनिष्ठ वर्णातील मुलीशी केलेला विवाह समाजमान्य होता.

विवाहाच्या वयाबाबत मात्र स्थलकालपरत्वे भिन्नता आढळून येते. वधू ही वरापेक्षा

वयाने लहान असावी अशी प्रथा होती. वैदिककाळात विवाहाच्या वेळी वधू वयात आलेली असे. कारण त्या काळात वधू स्वत: वराची निवड करू शकत होत्या. वैदिकेतर काळात मुलीचा विवाह ती ऋतुमती होण्याच्या सुमारास करावा यावर भर देण्यात येऊ लागला. बौद्ध व जैन धर्मांतील स्त्रियांनाही भिक्षुणी वा साध्वी होण्यास संमती होती. त्या काळात अनेक स्त्रिया संन्यासमार्गाकडे वळू लागल्या. त्यामुळे समाजात विवाहयोग्य मुली मिळणार नाहीत अशी भीती समाजचिंतकांना वाटू लागली. परिणामी मुलीच्या विवाहाचे वय कमी करण्याकडे समाज वळू लागला. कालांतराने कमी वयातच मुलीचे विवाह होऊ लागले.

**विधवा पुनर्विवाह :**

पुनर्विवाह करणाऱ्या विधवा स्त्रीस 'पुनर्भू' असे म्हटले जात असे. प्राचीन कालखंडात विधवा विवाहास समाजमान्यता होती. या काळात समाजामध्ये बालविवाहाची प्रथा सुरू झाल्याने समाजात विधवांची समस्या निर्माण झाली. त्यातूनच विशेष अशा परिस्थितीत विधवा विवाहास मान्यता देण्यात आली.

**घटस्फोट :**

वैदिक काळात विवाह विच्छेदनाची म्हणजेच घटस्फोटाची कल्पनाच नव्हती. कारण विवाह हा एक संस्कार मानला जात असे. त्यामुळे एकदा का वधू-वराची सप्तपदी घेतली की त्यांच्यात अतूट असे आमरण नाते निर्माण होते. दोघांपैकी कोणीही एक जरी व्यभिचारी असला तरी त्यांच्यातील नाते नष्ट होत नाही. एखाद्या वेळेस पत्नीचा त्याग केला तरी तिच्या भरणपोषणाची जबाबदारी पतीला टाळता येत नसे. तसेच पतित झालेल्या पतीचा त्याग पत्नीला करता येत नसे. कारण ते नाते अविभेद्य आहे असे मानले जात असे.

**सतीप्रथा :**

पतीच्या मृत्यूनंतर पत्नीने चितेमध्ये जाळून घेऊन मरण पत्कारणे म्हणजे सती जाणे होय. पतिव्रता स्त्रीला सती जाण्याशिवाय अन्य कोणताही मार्ग नाही असे धर्मशास्त्रकार सांगतात. म्हणून समाजाने सतीप्रथेचा पुरस्कार केला. मृत पतीचे मस्तक मांडीवर घेऊन त्याच स्थितीत पतीच्या चितेवर सती जाण्याच्या प्रकारास सहगमन असे म्हणत असत. वैदिककाळात सतीप्रथेचा अभाव होता.

**पडदापद्धत :**

उच्चवर्णातील स्त्रिया या राजवाड्याच्या, प्रासादाच्या बाहेर जात नसत म्हणून लोक त्यांना पाहू शकत नसत. कालिदास शाकुंतलमध्ये असा उल्लेख करतो की, शकुंतलेस दुष्यतांच्या दरबारात नेताना तिच्या मुखावर गोषा होता. उच्चवर्णातील स्त्रिया पडद्याशिवाय जनसंपर्कामध्ये येत नसत. पण याचा अर्थ असाही नाही की, निम्न वर्णातील स्त्रियाही गोषा करीत. असे अनुमान काढता येत नाही.

**स्त्रीधन :**

स्त्रीला वैदिक काळात धनाचा अधिकार नव्हता. पण कुठल्याही परिस्थितीत पतीने तिच्या मूलभूत गरजा (अन्न, वस्त्र, निवारा) पूर्ण केल्या पाहिजेत अशी प्रथा होती. पती

निधनानंतर तिला पोटगीचा अधिकार होता. पतीने स्वखुषीने दिलेले धन, आई-बाप यांच्याकडून मिळालेले धन, याची मालकी स्त्रीला मिळत असे. या स्त्रीधनात स्थावर व जंगम मालमत्तेचा समावेश होता. याचा विनियोग स्त्रिया तिच्या मर्जीप्रमाणे करू शकते असत.

**विधवा केशवपन :**

वेद, धर्मसूत्र व महत्त्वाच्या स्मृतिग्रंथात विधवा केशवपनाचा उल्लेख आढळत नाही. केशवपनाची सुरुवात इसवीसनाच्या आठव्या शतकानंतर झाली असावी. असाही अंदाज केला जातो की, बौद्ध व जैन धर्मातील भिक्षुणींवरून ही प्रथा निर्माण झाली असावी.

वरील अनेक मुद्यांवरून असे स्पष्ट होते की, वैदिक काळात स्त्रीला मानाचे स्थान होते. स्त्री-पुरुष यांच्या दर्जात समानता होती. बालविवाहाची प्रथा या काळात नव्हती. विवाहप्रसंगी स्त्रीला तिचा जोडीदार निवडण्याचा अधिकार होता. सामाजिक व धार्मिक कार्यात तिला मानाचे स्थान होते. पुरुषाच्या बरोबरीने ती त्यात सहभागी होत असे. बहुपत्नीत्वाची प्रथा अस्तित्वात नव्हती. स्त्रियांना संपत्तीचे अधिकारही प्राप्त होते. विशेष परिस्थितीत स्त्रियांना विवाह विच्छेदनाचा अधिकार देण्यात आला होता.

प्रारंभिक स्मृती काळात मात्र स्त्रीच्या या स्थानात बदल होण्यास सुरुवात झाली. स्त्रियांना धार्मिक अधिकारांपासून वंचित करण्यास सुरुवात झाली. उपनयन संस्काराची समाप्ती, शिक्षणाची उपेक्षा, विवाहाची वयोमर्यादा कमी, सामाजिक दर्जावर अनिष्ट परिणाम होऊ लागला. या काळात स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी लेखले जाऊ लागले.

उत्तरकालीन स्मृतीकाळात स्त्रीचा दर्जा फारच खालावला. गृहस्वामिनी म्हणून वावरणारी स्त्री दुर्बल ठरली. उपनयन संस्कार फक्त पुरुषांपर्यंत मर्यादित झाल्यामुळे स्त्रीला शूद्र मानण्यात येऊ लागले. विधवा पुनर्विवाह संपुष्टात आले.

**५.२.२.२ मध्ययुगीन भारतातील – स्त्रीजीवन :**

प्राचीन कालखंडात मध्ययुगीन कालखंडापूर्वीच्या काळात भारतीय समाजजीवनात स्त्रीला मानाचे स्थान होते. कुटुंबात स्त्रियांना मानाने, आदराने वागविले जात असे. स्त्रीला गृहलक्ष्मी मानण्यात येत असे. पुरुषाबरोबर सामाजिक व धार्मिक कार्यात सहभागी होता येत असे. मात्र मध्ययुगीन कालखंडात विविध कारणांमुळे स्त्रियांची सामाजिक, धार्मिक स्थिती खालावली. याच काळात मुस्लीम संस्कृतीचा भारतीय समाजजीवनावर प्रभाव पडला. त्याचा परिणाम स्त्रीजीवनावरही पडला. हिंदू धर्माची प्रवृत्ती सनातनी बनली. त्यामुळे स्त्रियांचे धार्मिक अधिकार अधिक संकुचित झाले. परिणामी स्त्रियांची सामाजिक स्थिती खालावली.

तुर्क लोकांचा भारतावर प्रभाव पडण्याअगोदर भारतातील स्त्रियांचा वावर हा सर्व क्षेत्रात होता. भारतात जेव्हा तुर्कांचे आगमन झाले त्यावेळी अरब आणि अब्बासिद जमातीपासून मिळालेला वारसाही त्यांनी आणला. त्या जमातीत स्त्रियांना मानाने वागविण्याची प्रथा होती. पण मुस्लिमांच्या भारतातील आगमनाचा आणि सामाजिक पद्धती, रूढी, प्रथा संस्कृतीचा प्रभाव भारतातील स्त्रियांच्या सामाजिक जीवनावर पडलेला दिसून येतो. त्यामुळे भारतीय स्त्रीचा सामाजिक, धार्मिक जीवनस्तर खालावला.

**पडदा पद्धत :**

मुस्लिम धर्मातील संस्कृती, रूढी, प्रथा, परंपराचा भारतातील स्त्रीजीवनावर पडलेला प्रभाव म्हणजे हिंदू धर्मातील स्त्रियांनी स्विकारलेली पडदा पद्धत होय. पडदा वापरण्याची पद्धत मुस्लिमांप्रमाणे हिंदू धर्मातील उच्च वर्णियांमधील स्त्रियांमध्येही रूढ झाली. मात्र हिंदू धर्मातील निम्न वर्णातील स्त्रिया पडदा वापरत नसत. त्या फक्त दुपट्टा वापरत असत. स्त्रियांची मानसन्मानाची स्थिती टिकून राहावी, वांशिक शुद्धता टिकून राहावी यासारख्या कारणांमुळे हिंदू स्त्रियांनी पडदा पद्धतीचा स्वीकार केला.

**बालहत्या :**

मध्ययुगीन कालखंडात भारतीय समाजजीवनात बालहत्येच्या प्रथेला चालना मिळाली. मुलीचा जन्म म्हणजे दु:खाचे कारण समजण्यात येई. त्यामुळे बालहत्येची सुरुवात झाली.

**बहुपत्नीत्वाची पद्धत :**

हिंदू धर्मात बहुपत्नीत्वाची प्रथा रूढ होती. या पद्धतीमुळे स्त्रियांचा सामाजिक दर्जा खालावला. मुस्लिम धर्मातही बहुपत्नीत्वाची पद्धत अस्तित्वात होती. मुस्लिम राज्यकर्ते त्यांच्या जनानखान्यात हजारो स्त्रिया ठेवीत असत. बहुपत्नीत्व, जनानखान्याची पद्धत इ. मुळे स्त्रियांचा सामाजिक दर्जा खालावला. त्यांना अपमानास्पद जीवन जगावे लागत असे. विधवा पुनर्विवाहास मान्यता असल्याकारणाने वृद्धाबरोबर तरुण विधवा स्त्रियांनाही विवाह करावा लागे. एकंदरीत स्त्रीजीवन अत्यंत खडतर होते.

**शिक्षणावर बंदी :**

मुस्लिम राजवटीमुळे अनेक राजघराणी पुढे आली. अशा घराण्यांतील मुली शिक्षण घेत असत. पण याचे प्रमाण अत्यल्पच होते. राजपूत, नायर, इ. घराण्यातील स्त्रियांना शिक्षणाची संधी होती. जैन धर्माच्या साध्वीं लिहिण्या-वाचण्याइतपत शिक्षण घेत असत. पण सर्वसामान्य स्त्रियांच्या शिक्षणावर अघोषित बंदीच होती. स्त्री-शिक्षणाविषयी समाजात असा समज पसरवला गेला की, मुलींनी शिक्षण घेतल्यास शिक्षण घेणाऱ्या मुलीस वैधव्य प्राप्त होते. त्यामुळे स्त्री-शिक्षणावर अघोषित बंदीच होती.

मात्र मध्ययुगीन कालखंडात स्त्रियांना लष्करी शिक्षण घेण्यास परवानगी होती. राजघराण्यातील स्त्रिया, राजपूत घराण्यातील स्त्रिया लष्करी शिक्षण घेत असत. कर्नाटक, म्हैसूर प्रदेशातील क्षत्रिय घराण्यातील स्त्रिया ढाल, तलवारीचे शिक्षण घेत असत.

**बालविवाह पद्धत :**

भारतात तुर्कांचे आगमन झाल्यानंतर बालविवाह पद्धतीला प्रोत्साहनच मिळाले. कारण तुघलकशाहाने राणामल भट्टीच्या मुलीबरोबर विवाह करण्याची सक्ती केली व तिला पळवून नेले होते. अशा प्रसंगी हिंदू राजे - राजघराण्यातील स्त्रियांचा मान राखता यावा, त्यांच्या अब्रूचे रक्षण व्हावे यासाठी त्यांच्या मुलीचा विवाह लहानपणीच लावत. सुलतानशाही व मुघलशाहीच्या काळामध्ये तर बालविवाहाच्या प्रथेला मोठी चालना मिळाली. मुलगी आठ-नऊ वर्षाची झाली की, तिचा विवाह लावण्यात येई.

### मातृत्वाचा आदर :

मुस्लिम धर्मात मातेला मोठ्या आदराने वागविले जाई. मुघल राजवटीतील सामाजिक पद्धतीचा प्रभाव, हिंदू धर्मावरही झाला. मुस्लिम समाजातील लोकांप्रमाणे हिंदू लोकही स्त्रीला सन्मानाने वागवीत असत. पतींच्या तुलनेत स्त्रिला दुय्यम स्थान होते. असे जरी असले तरी तिला कुटुंबात आदराने वागविले जात असे. हिंदू धर्माप्रमाणे प्रत्येक धर्मकार्यात पुरुषाबरोबर त्याची पत्नी असणे आवश्यक आहे. त्यामुळे स्त्रीला अर्धांगिणी म्हणून संबोधले जाते. त्यामुळे स्त्रियांना सामाजिक जीवनात महत्त्वाचे स्थान दिले जाई.

### स्त्रियांचे धार्मिक अधिकार :

वेदकाळात स्त्रियांना अनेक धार्मिक अधिकार होते. उदा. स्त्रियांना उपनयन संस्कार करण्याचा अधिकार होता. स्त्रिया पुरुषांबरोबर धार्मिक कार्यात सहभागी होत असत. पण कालांतराने स्मृतिकारांनी स्त्रियांचा वैदिक मंत्रोच्चाराचा अधिकार काढून घेतला. शिवाय उपनयन संस्कार करण्यास अपात्र ठरविण्यात आले. स्त्रीची तुलना पुरुषाबरोबर करता येणार नाही यावरच स्मृतिकारांनी भर दिला. स्त्रियांना वैदिक यज्ञ करण्याचा हक्क नाकारला. स्मृतिकारांनी स्त्रियांचे धार्मिक, सामाजिक अधिकार नाकारून पुरुषांपेक्षा दुय्यम स्थान त्यांना दिले. तिला विविध कारणांमुळे अशुद्ध ठरविले. जसे स्त्रीला मासिक पाळीच्या काळात अशुद्ध ठरविले आहे. त्याचबरोबर स्त्रीने अपत्याला जन्म दिल्यानंतर काही कालावधीकरिता तिला अपवित्र मानले गेले. स्त्रियांना शूद्र ठरविले गेले. वेदाध्ययनाचा अधिकार नाकारला गेला. त्यामुळे त्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले. इ.स. १००० वर्षापासून त्यांना शिक्षणापासून वंचित व्हावे लागले. त्यामुळे भारतीय समाजातील स्त्रियांचा मोठा दर्जा हा अशिक्षितच राहिला. त्याचा परिणाम असा झाला की, स्त्रिया धार्मिक कर्मकांडाकडे वळल्या. त्या धर्माच्या उपासक बनल्या.

थोडक्यात, मध्ययुगीन कालखंडात स्त्रियांना धार्मिक अधिकारापासून दूर ठेवण्यात आले. त्यामुळे अध्यात्मिक चिंतनापेक्षा बाह्य कर्मकांडाच्या विधींना अधिक प्राधान्य देऊन स्त्रिया धार्मिक आचरण करीत असत.

### विधवा स्त्रियांचा सामाजिक दर्जा :

मध्ययुगीन कालखंडात भारतीय विधवा स्त्रियांची स्थिती अत्यंत केवीलवाणी अशी होती. पतीच्या निधनानंतर त्यांना डोक्यावरचे केस काढून टाकावे लागत असे. वेशभूषा, केशभूषा, रंगीत कपडे वापरणे यावर निर्बंध होता. तिचे जर पाऊल वाकडे पडल्यास अत्यंत कडक शासन केले जाई. सार्वजनिक उत्सवात, धार्मिक सण उत्सवात, इ. ठिकाणी सहभागी होण्यास निर्बंध होते.

विधवा पुनर्विवाहाची प्रथा प्रचलित होती. पण ती काही ठराविक जातीपुरतीच मर्यादित होती. परंतु पुरुषांना मात्र पुनर्विवाह करण्याची परवानगी होती. निम्न वर्णातील जातींमध्ये विधवा पुनर्विवाहाची परवानगी होती. मात्र उच्च वर्गातील स्त्रियांना मात्र पुनर्विवाहावर बंदी होती. त्यामुळे घटस्फोटास परवानगी नव्हती.

थोडक्यात मध्ययुगीन कालखंडात परकीय आक्रमणांच्या काळात स्त्रियांचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल एवढेच मर्यादित झाले होते. स्त्री एक उपभोगाची वस्तू ठरली होती. अगदी १९व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत हीच परिस्थिती होती. या काळात स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत कनिष्ठ वा दुय्यम स्थान दिले गेले. त्यांचा दर्जा कनिष्ठ होता. स्त्रियांना समाजात एखाद्या उपभोगाच्या वस्तूप्रमाणे विकले जाई. दास-दासी प्रथा अस्तित्वात होती. याच काळात सतीच्या प्रथेला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. तिचा संपत्तीवरचा अधिकार नाकारला गेला होता. त्यामुळे स्त्रियांचे सामाजिक स्थान दुय्यम झाले. सार्वजनिक व धार्मिक बंधनांनी स्त्रियांना पुरते जखडून टाकले होते.

१८ व्या शतकात बालविवाहाची प्रथा प्रचलित होती. अडीच ते तीन वर्षांपासून ते आठ-नऊ वर्षाच्या मुलीचा विवाह केला जात असे. अशा मुली शिक्षणापासून वंचित राहिल्या. कुटुंबात मुलींपेक्षा मुलांना महत्त्वाचे स्थान दिले जाई. मुलांना दर्जेदार शिक्षण व इतर सोयी-सुविधा पुरविल्या जात असत. शिक्षण व विवाहाबाबत स्त्रियांवर बंधने असल्या कारणाने त्यांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध आले व आई-वडील, पती, मुले इ.च्या प्रभावाखाली (नियंत्रणाखाली) मुलींना जीवन जगावे लागले.

**५.२.२.३ ब्रिटिश कालखंडातील स्त्री-जीवन :**

भारतात ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर त्यांनी जी धोरणे भारतात राबविली, सुधारणा केल्या, त्यांनी ज्या सामाजिक सुधारणा केल्या त्याचे प्रामुख्याने स्त्रीजीवनावर परिणाम दिसून आले. भारतात वैचारिक जागृती घडून आली. या जागृतीच्याद्वारे भारतीय समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा यांना विरोध केला. त्याचबरोबर स्त्रियांवर होणारा अन्याय, जाचक रूढी, बंधने दूर करण्याचा प्रयत्न केला गेला.

मध्ययुगीन भारतीय समाज हा रूढी, परंपरावादी होता. धर्माचा प्रभाव त्याच्यावर मोठ्या प्रमाणात होता. या काळात स्त्रियांचे जीवन हलाखीचे बनलेले होते. ब्रिटिश भारतात आल्यानंतर त्याचा प्रभाव भारतीयांवर पडत गेल्याने भारतीयांना आपल्या सामाजिक परिस्थितीची जाणीव झाली. पाश्चिमात्य विचार, नवी शिक्षण पद्धती, वृत्तपत्रे इ. मुळे वैचारिक जागृती घडून येण्यास मदत झाली. त्यातून स्त्री-जीवनाचा विचार केला जाऊ लागला.

ब्रिटिशपूर्व काळात भारतीय समाजावर धर्माचा मोठा प्रभाव असल्या कारणाने जाती व्यवस्था, कुटुंबसंस्था व विवाहसंस्था यांच्यावर मोठी बंधने आली होती. रोटी-बेटी व्यवहारावर कडक निर्बंध होते. या सर्वांवर नियंत्रण ठेवण्यासाठी 'जातपंचायत' अस्तित्वात होती. जातपंचायतीचे निर्णय सर्वांना मान्य करावे लागत असत. अशी अनेक बंधने समाजातील प्रत्येक घटकावर होती. विशेषत: स्त्रियांवर ती तुलनेने जास्त होती. ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेनंतर मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडून आले. पाश्चिमात्य संस्कृतीचा भारतीय संस्कृतीवर प्रभाव पडू लागला. भारतीय जनतेच्या रूढी, परंपरा, प्रथांमध्ये परिवर्तन घडून येऊ लागले. परदेशी जाऊन आलेल्या व्यक्तींमध्ये वैचारिक परिवर्तन घडून आले. हळूहळू भारतीय संस्कृतीवर आघात होण्यास सुरुवात झाली.

### शिक्षणाची संधी :

ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेनंतर भारतीय स्त्रियांना व इतर जातींना शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या. भारतामधील धर्मव्यवस्था व समाजव्यवस्थेमधील दोष दाखवून देणाऱ्या ख्रिश्चन मिशनरीजनी पाश्चात्त्य शिक्षणाच्याद्वारे पाश्चात्त्य मूल्यांचा परिचय भारतीय समाजाला करून दिला. पाश्चात्त्य शिक्षणामुळे भारतीय जनतेला समता, बंधुता, मानवतावाद इ. बाबी समजायला व कळायला सुरुवात झाली. त्यामुळे वैचारिक बदलास सुरुवात झाली व सामाजिक प्रबोधनास सुरुवात झाली. आपल्या सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीचे आकलन सुशिक्षित वर्गाला होऊ लागले. त्यातून नवे नेतृत्व उदयास येऊ लागले.

भारतात ठिकठिकाणी शाळा, महाविद्यालये सुरू झाली. इ.स. १८८२ मध्ये लॉर्ड रिपन भारताचा व्हाईसरॉय झाल्यानंतर शिक्षण विषयक सुधारणा करण्यासाठी हंटर कमिशनची नेमणूक केली. या कमिशनने स्त्री शिक्षणावर भर दिला. म्हणजे १९व्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक व धार्मिक प्रबोधनाच्या काळात स्त्रीशिक्षणावर विशेष भर देण्यात आला. समाजात स्त्रीचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करण्यात येऊ लागले. त्याचबरोबर स्त्रियांशी संबंधित असलेल्या अनिष्ट रूढी, परंपरा, प्रथा, निरक्षरता इ. गोष्टींकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्यात येऊ लागले. मात्र स्त्रियांना शिक्षण द्यावे ही विचारसरणी रुजण्यास बराच काळ जावा लागला.

समाजसुधारणेची पार्श्वभूमी तयार होत असताना शिक्षणाच्या प्रसाराला सुरुवात झाली. त्याबरोबरच स्त्री-जीवनाचाही विचार सुरू झाला. त्याचीच सुरुवात फुले दांपत्यांने १८४८मध्ये पुण्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली. एका भारतीयाने भारतीय स्त्रियांसाठी काढलेली ही पहिलीच शाळा. या उपक्रमाला समाजातून प्रखर विरोध त्या काळी झाला. १८४८ ते १८५२ या कालावधीत फुले दांपत्याने एकूण १८ शाळा काढल्या.

सरकारी पातळीवरूनही स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न सुरू झाले होते. १८२४ मध्ये मुंबईत मुलींची पहिली शाळा ख्रिस्ती मिशनऱ्यांनी काढली. १८७६ ते १९५० या कालावधीत ख्रिस्ती मिशनऱ्यांनी अनेक राज्यात स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी शाळा काढल्या. इ.स. १८७० पासून मुलींच्या शाळा संख्येने वाढल्या. भारतीय स्त्रियाही शिक्षणाच्या प्रसारासाठी पुढाकार घेऊ लागल्या. त्यात पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे यांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे. आनंदीबाई जोशी, डॉ. रखमाबाई, ताराबाई शिंदे, जनाक्का शिंदे, स्वर्णकुमारी देवी, दत्त, कामिनी रॉय, लक्ष्मीबाई टिळक, महर्षी धोंडो केशव कर्वे, र. धों. कर्वे, इत्यादींनी स्त्री शिक्षणासाठी भरीव कामगिरी केली.

### सतीप्रथा बंदी :

राजा राममोहन रॉय हे सतीप्रथेला विरोध करणारे पहिले भारतीय होते. १८१८ मध्ये विल्यम बेंटिकने बंगाल प्रांतात सतीप्रथा बंदी केली. मात्र सबंध भारतभर सतीप्रथा बंदीसाठी कायदा झाला इ. स. १८२९ मध्ये. या कायद्याला प्रारंभी विरोध झाला. सतीप्रथा बंदीमुळे भारतीय स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत परिवर्तन होण्यास सुरुवात झाली.

### विधवा पुनर्विवाह :

ब्रिटिशांच्या विविध धोरणांमुळे व कायद्यांमुळे स्त्रियांच्या स्थितीत बदल होण्यास सुरुवात झाली. अशा सुधारणावादी काळात विधवा पुनर्विवाहाविषयी विचार वाढीस लागला. १८५० मध्ये ईश्वरचंद विद्यासागर यांनी विधवा पुनर्विवाह संदर्भात कायदा करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. भारतीय समाजात विधवांची स्थिती कशी आहे यासंदर्भात लिखाण केले. यामुळे स्त्रियांना कोणकोणत्या समस्येला सामोरे जावे लागते यावर प्रकाश टाकला. परिणामी १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाहाचा कायदा झाला. या विधवा पुनर्विवाह कायद्यामुळे विधवा स्त्रीला काही संपत्ती विषयक अधिकारही प्राप्त झाले. या कायद्यामुळे विधवा स्त्रियांना पुनर्विवाहाचा मार्ग मोकळा झाला होता. पण समाजमान्यता मात्र तशी मिळाली नव्हती. पण कायदा झाल्यामुळे विधवा स्त्रियांची स्थिती सुधारण्यास मदत झाली. त्यांची हालअपेष्टांमधून सुटका झाली.

**विधवा ब्राह्मण स्त्रियांच्या केशवपनविरोधी चळवळ :**

पुण्यात दीन बंधूंनी विधवा ब्राह्मण स्त्रियांच्या केशवपनास विरोध करणारी चळवळ सुरू केली. केशकर्तनकारांनी हे काम करू नये म्हणून विनंती करण्यात आली. त्याला प्रतिसाद म्हणून, ''यापुढे ब्राह्मण विधवांच्या डोक्याचे केस काढणार नाही'' अशी सभेत प्रतिज्ञा करण्यात आली. यामुळे ब्रह्मण स्त्रियांची केशवपनसारख्या जाचक अशा प्रथेतून सुटका झाली.

**बालविवाह विरोध :**

१८६० मध्ये विवाह संमती वय १० वर्षे ठरवून कायदा करण्यात आला. बालविवाहाचे स्त्रियांवर होणारे अनिष्ट परिणाम लक्षात घेऊन हा कायदा करण्यात आला. मध्ययुगीन कालखंडात बालविवाहाचे प्रमाण मोठे होते. त्याचे अनिष्ट परिणाम स्त्रियांना भोगावे लागत होते. ब्रिटिशांनी अशा प्रकारचा कायदा करूनही तसा काही विशेष परिणाम जाणवत नव्हता. तत्कालिन सुधारकांनी बालविवाहाचे दुष्परिणाम स्त्रियांना कसे भोगावे लागतात याविषयी जागृती केली.

**अस्पृश्य स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा :**

उच्च जाती व उच्च वर्णीयांच्या दबावाखाली अस्पृश्य, कनिष्ठ जाती दबलेल्या होत्या. त्यांना अनेक बंधनांनी जखडून ठेवले होते. या जाती अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्र्य यात पिचलेल्या होत्या. एकोणिसाव्या शतकात परिवर्तनाचे वारे वाहू लागले. मुलींसाठी शाळा सुरू झाल्या. त्यासाठी म. फुले, सावित्रीबाई फुले यांनी अपार कष्ट घेतले. सावित्रीबाई फुले यांनी अनाथ बालिकाश्रम सुरू केले. यात परित्यक्ता, विधवा, अनाथ अशा स्पृश्य-अस्पृश्य स्त्रियांना आधार मिळाला.

**५.२.१ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्त्रीजीवन :**

१९ व्या शतकात भारतीय समाजाला पाश्चात्त्यांकडून समता, स्वातंत्र्य, बंधुत्व या मूल्यांची इंग्रजी शिक्षणातून ओळख झाली. नवसुशिक्षितांचा वर्ग धर्मसुधारणेच्या व कार्यसुधारणेच्या कार्यास प्रवृत्त झाला. स्त्रियांच्या संदर्भातील अनिष्ट चालीरिती, रूढी, परंपरा याविरुद्ध समाजप्रबोधन आणि इंग्रजी सत्तेच्या कायद्याच्या आधाराने बदल करण्याचे प्रयत्न

झाले. १८२९ साली राजा राममोहन रॉय यांनी सतीबंदी कायदा करण्यात पुढाकार घेतला. दयानंदांच्या आर्य समाजाने बालविवाह, पडदाप्रथा याविरुद्ध आंदोलन केले. ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या पुढाकाराने १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाहाचा कायदा झाला. मुलींचे विवाहाचे वय वाढविण्यात आले. म. फुले, नाना शंकरशेठ या समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्वपूर्ण कार्य केले. इंग्रजी मिशनरी शाळा, महर्षी कर्वे, पंडिता रमाबाई, या सर्वांच्या कार्यामुळे उत्तरोत्तर स्त्री शिक्षणात वाढ होत गेली. परंतु यामुळे शहरी भागात स्त्रियांच्या सामाजिक सुधारणांना चालना मिळाली. पण ग्रामीण भागातील स्त्रियांच्या जीवनात मात्र काहीच फरक पडला नाही. विधवा विवाहोत्तेजक मंडळी, पुनर्विवाहोत्तेजक मंडळी यांच्या कार्यामुळे पुनर्विवाहाला चालना मिळाली.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्त्रियांच्या दर्जात सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रयत्न झाले. सुधारणा आंदोलने आणि राज्यघटनेच्या तरतुदींच्या माध्यमातून स्त्रियांना अनेक अधिकार देण्यात आले. अनेक सामाजिक कायदे करण्यात आले. पुरुषांच्या बरोबरीने स्थान देण्यात आले. हिंदू कोड बिलामुळे स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळाले. औद्योगिकीकरणामुळे निर्माण झालेल्या अर्थव्यवस्थेत कुटुंब व्यवस्थेतील परिवर्तन, स्त्रियांसाठी निर्माण झालेल्या व्यवसायसंधींनी स्त्रियांना कर्तृत्व दाखविण्यास नवे क्षेत्र निर्माण झाले. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबन व अर्थार्जनामुळे स्त्रियांच्या कौटुंबिक व सामाजिक स्थानात परिवर्तन होऊ लागले. नवीन वैधानिक व्यवस्था, शिक्षणाचा प्रसार ही स्त्रियांच्या उन्नतीमागील कारणे असली तरी पाश्चिमात्य संस्कृतीच्या संपर्कातून निर्माण झालेली स्वातंत्र्य व समानतेची संकल्पना, औद्योगिकीकरण, नागरीकरण, या बाबी स्त्रियांच्या सामाजिक स्थानात बदल करण्यास कारणीभूत ठरल्या.

आजची भारतीय स्त्री आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात पुरुषांइतकीच स्वतंत्र आहे. या सर्वच क्षेत्रांत स्त्रियांनी स्वत:चे कर्तृत्व सिद्ध केले आहे. पूर्वी स्त्रीला कुटुंबात दुय्यम स्थान होते. यात परिवर्तन झालेले आहे. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्या आहेत. चूल आणि मूल इतकेच कार्यक्षेत्र न राहता आज अंतराळ प्रवासापर्यंत तिने झेप घेतली आहे. बदलत्या काळानुसार कुटुंबव्यवस्थेत स्त्रीच्या स्थानात व दर्जात अनेक मूलगामी परिवर्तन झालेले दिसून येतात.

**१) स्वातंत्र्य :**

आधुनिक कुटुंबातील स्त्री आता स्वत:चे निर्णय स्वत: घेऊ लागली आहे. शिक्षण, व्यवसायाची निवड, विवाहातील जोडीदाराची निवड इ. संदर्भात स्त्री स्वत:चे निर्णय स्वत: व स्वतंत्रपणे घेताना दिसत आहे. स्वत:च्या आयुष्यातील विविध पातळीवरचे निर्णय स्वत:च घेऊ लागली आहे. तिला आता पारंपरिक बंधनात न राहता तिच्या आवडीप्रमाणे राहणे पसंत आहे.

**२) समता :**

आधुनिक स्त्री ही पुरुषाची दासी नसून ती सहचारिणी, सखी बनली आहे. कुटुंबात तिच्या मतांचा विचार होऊ लागला आहे. कुटुंबात स्त्री-पुरुष भेद ठेवला जात नाही.

समानतेची वागणूक दिली जाऊ लागली आहे. संपत्तीत पतीच्या व माहेरकडूनही समान वाटा मिळू लागला आहे. पुरुषाच्या बरोबरीचे सर्व हक्क तिला प्राप्त झाले आहेत.

**३)अर्थार्जन :**

पारंपरिक स्त्रीप्रमाणे आधुनिक स्त्रीचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल एवढेच राहिले नाही. ती अर्थार्जनासाठी घराबाहेर पडू लागली आहे. ती नोकरी, व्यवसाय इ. क्षेत्रात आत्मविश्वासाने वावरू लागली आहे. अर्थार्जन करू लागली आहे. डॉक्टर, इंजिनिअर, पायलट, प्राध्यापक, वकील, व्यावसायिक अशा सर्व प्रकारची पदे ती भूषवू लागली आहे. त्यामुळे तिच्यात अर्थार्जनाची क्षमता निर्माण झाली आहे. परिणामी स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाली आहे. ती कुटुंबाला आर्थिक मदत करीत आहे.

**४)निर्णयप्रक्रियेत सहभाग :**

पूर्वी स्त्रीला कुटुंबात दुय्यम स्थान होते. तिच्या मताला कुठलीही किंमत दिली जात नव्हती. किंबहुना तिला त्याविषयी तिचे मत विचारले जात नव्हते. तसेच त्यांना मतप्रदर्शनाचा अधिकारही नव्हता. आधुनिक कुटुंबातील स्त्री शिक्षित आहे. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आहे. व्यवहारज्ञान प्राप्त झाले आहे. इ. कारणामुळे स्त्रीला कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत सामील करून घेतले जाऊ लागले आहे. स्वत:ची भूमिका ती ठामपणे मांडू लागली आहे. मुलांचे शिक्षण, घरातील व्यवहार, विवाह इ.विषयी निर्णय घेताना दिसत आहे. स्वत:ला न पटणाऱ्या गोष्टींना ती विरोध करू लागली आहे.

**५)संपत्तीत वाटा :**

कायद्याने स्त्रियांच्या संपत्तीविषयक अधिकारात बदल केले आहेत. स्त्रीला स्वत:चा वारस नेमायचा अधिकार, दत्तक घेण्याचा अधिकार, वडिलांच्या संपत्तीमधील बरोबरीचा अधिकार इ. सारखे अधिकार कायद्याने तिला प्राप्त झाले आहेत. त्यामुळे तिचे कुटुंबातील स्थान निर्णायक स्वरूपाचे बनले आहे.

६) **कार्यक्षेत्रात घट :**

पारंपरिक स्त्रियांच्या तुलनेत आधुनिक स्त्रियांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या बऱ्याचशा कमी झाल्या आहेत. आधुनिक यंत्र, मोठ्या प्रमाणात बाजारात उपलब्ध असलेले घरगुती साहित्य इ.मुळे स्त्रियांची घरातील कामे बरीचशी कमी झाली आहेत. स्त्री जर अर्थार्जन करीत असेल तर घरकामासाठी नोकर असतात. त्यामुळे घरातील कामाचे ओझे हलके झाले आहे. यामुळे तिला जो रिकामा वेळ मिळतो तो ती स्वत:च्या व्यक्तिमत्त्व विकास, छंद वा आवडींना देऊ लागली आहे.

**सत्तेत स्थान :**

पूर्वी स्त्रीचे कार्यक्षेत्र फक्त चूल आणि मूल एवढेच होते. तिला कुठल्याही प्रकारचे राजकीय अधिकार नव्हते. पण आजच्या आधुनिक स्त्रीला राज्यघटनेने राजकीय प्रक्रियेत सामावून घेतले आहे. लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधान परिषद सभागृहात दिवसेंदिवस स्त्रियांची संख्यात वाढत आहे. पंतप्रधान, राष्ट्रपती, मंत्री, मुख्यमंत्रीपद भूषवू लागली आहे. पंचायतराजमध्ये ५०% आरक्षण प्राप्त झाले आहे. सरपंच, पंचायत समिती, सभापती जि. प.

अध्यक्ष यासारखी पदे भूषवू लागली आहे.

**शैक्षणिक परिवर्तन :**

प्राचीन, मध्ययुगीन कालखंडातील स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यांना अध्ययन, अध्यापनाचा अधिकारही नव्हता. पण ब्रिटिश सत्ता स्थापन झाल्यानंतर शिक्षणाच्या संधी वाढल्या, समाजसुधारकांनी प्रयत्न केले, परिणामी स्त्रियांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या व स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या. आजची स्त्री वेगवेगळ्या प्रकारचे शिक्षण घेताना दिसत आहे. शासनानेसुद्धा स्त्रियांचे शिक्षणातील प्रमाण वाढविण्यासाठी विविध योजना राबविल्या आहेत. विविध कायदे बनविले आहेत. परिणामी शिक्षणातील स्त्रियांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. नुसतीच वाढत नसून ती आघाडीवर आहे.

वरील सर्व प्रकराची परिवर्तने स्त्रियांच्या सुधारलेल्या स्थितीचे निदर्शक आहेत. परंतु अधिक खोलात जाऊन विचार केल्यास असे दिसून येते की, हे परिवर्तन प्रामुख्याने शहरी भागात दिसून येते. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या स्थितीत तुलनेने तेवढे परिवर्तन झालेले नाही. ग्रामीण स्त्रियांच्या सामाजिक जीवनात मंद गतीने परिवर्तन होत आहे.

ग्रामीण भागात स्त्रीशिक्षणाचा म्हणावा तेवढा अजूनही प्रसार झाला नाही. ग्रामीण स्त्री आजही कालबाह्य रूढी, प्रथा, परंपरांच्या बंधनात अडकून आहे. आधुनिकतेचा स्पर्श झालेला नाही. कुटुंबात तिला आजही दुय्यम स्थान दिले जाते. स्त्रीमुक्तीची चळवळ ग्रामीण भागापर्यंत म्हणावी तेवढी प्रभावीपणे पोहोचली नाही.

आदिवासी जमातीमधील स्त्रियांची स्थिती तर ग्रामीण स्त्रियांपेक्षा वाईट आहे. आधुनिकतेचे वारे अजूनही तिच्यापर्यंत पोहोचले नाही. आदिवासी स्त्रियांच्या जीवनातील परिवर्तनाचा विचार करावा अशी कोणतीही आशावादी बाब यांच्या बाबतीत दिसून येत नाही.

वरील सर्व विवेचनाच्या आधारे भारतीय समाजातील आधुनिक काळाच्या संदर्भात स्त्रियांच्या दर्जाची चर्चा करताना काढला जाणारा निष्कर्ष एकांगी ठरेल. कारण भारतीय समाजातील स्त्रीचा विचार करताना शहरी, ग्रामीण, आदिवासी स्त्रीजीवनाचा एकत्रित विचार करणे अपरिहार्य आहे. परिवर्तन होत आहे पण वेग अतिशय मंद आहे. जागृती होत आहे. स्त्रियांना त्यांचे अधिकार कळू लागले आहेत व स्त्रियांचे सक्षमीकरण होत आहे.

## ५.३ पारिभाषिक शब्द :

१) गृहस्थाश्रम - यज्ञयाग व प्रजोत्पादन - देवऋण व पितृऋण फेडण्यासाठी.

२) वानप्रस्थाश्रम - आत्मचिंतनासाठी

३) ब्रह्मचर्याश्रम - वेदाध्यायन - ऋषीऋण फेडण्यासाठी

४) वर्ण - वैदिक आर्यामध्ये व्यवसायाच्या निमित्ताने तीन नवे वर्ण निर्माण झाले. वैदिक यज्ञसंस्कृतीचे जतन करणारा ब्राह्मण, धैर्यवान लोकांचा संघर्ष, लढाई करणाऱ्या लोकांचा समूह क्षत्रिय, व्यवसाय करणाऱ्यांचा वैश्य, आर्येतर जमातीत शूद्र, वर्ण या संज्ञा देण्यात आल्या.

५) स्मृती – धर्मसूत्राचे उपबृहण करून त्याचा अर्थ सांगणारे ग्रंथ.

६) स्त्रीधन – हिंदू स्त्रीला मिळणारे दागदागिने, मौल्यवान वस्तू, जडजवाहिरे, यांचा समावेश होतो.

७) वैदिक हिंदू धर्म – वैदिककालीन आर्यांनी, वेदावर आधारभूत असे आचरण करण्यास लावणाऱ्या आणि समाजाचे नियमन करणाऱ्या बाबींना वैदिक हिंदू धर्म असे म्हटले आहे.

८) समानता – स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही लोकशाहीची आधारतत्त्वे आहेत. सामाजिक, राजकीय, आर्थिक, वगैरे क्षेत्रातील समानता प्राप्त करण्याचे प्रयत्न राज्यघटनेने केलेले आहेत.

९) स्त्री–मुक्ती, स्त्री–पुरुष विषमता लिंगाधिष्ठित मानण्याच्या प्रवृत्तीविरुद्ध उभे केलेले वैचारिक आणि कृतिशील आंदोलन.

१०) परिवर्तन – ज्या बदलामुळे समाजातील संरचनेत बदल होतो, त्याला परिवर्तन म्हटले जाते.

---

## ५.४ स्वयंअध्ययन प्रश्न

---

टिपा लिहा

१) सतीप्रथा

------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------

२) विधवा केशवपन

------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------

३) विधवा पुनर्विवाह

------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------

४) स्त्रियांचे धार्मिक आधार

------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------

दीर्घोत्तरे लिहा.

१) प्राचीन कालखंडातील स्त्रीजीवनावर निबंध लिहा.

------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------

२)  ब्रिटिशकालीन स्त्रीजीवनात झालेले परिवर्तन स्पष्ट करा.

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

३)  स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्त्रीची भूमिका विशद करा.

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

थोडक्यात उत्तरे लिहा

१)  भारतीय समाजातील पडदा पद्धतीचे स्वरूप सांगा.

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

२)  हिंदू स्त्रीचे कुटुंबातील स्थान विशद करा.

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

३)  ब्रिटिश सत्तेने स्त्रियांसाठी केलेल्या कायद्यांची माहिती द्या.

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

४)  एकोणिसाव्या शतकात स्त्री-जीवन कसे होते ते स्पष्ट करा.

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

५)  विधवा स्त्रियांचा सामाजिक दर्जा स्पष्ट करा.

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

## ५.५ सारांश :

## ५.६ संदर्भ ग्रंथ :

१) डॉ. राव व दी. - प्राचीन भारतीय संस्कृती

२) डॉ. प. म. राहूरकर व प्रा. रं. ना. मालपाणी, प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, पुणे कॉंटिनेंटल प्रकाशन, आठवी आवृत्ती - १९९४

३) विद्युत भागवत, शर्मिला रेगे - भारतातील समकालीन कुळाचे प्रश्न - स्त्रीवादी चर्चा विश्वाचा आढावा.

# घटक ६

## स्त्रीविषयक – प्रमुख सामाजिक समस्या

**अनुक्रमणिका**


६.0 उद्दिष्टे

६.१ प्र

६.२ विषय विवेचन

    ६.२.१ आरोग्य

    ६.२.२ शिक्षण

    ६.२.३ विकास

६.३ स्वयंअध्ययन

६.४ सारांश

६.५ पारिभाषिक शब्द

६.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


### ६.0 उद्दिष्टे

या घटकातील अभ्यासामुळे आपल्याला

+ आरोग्य म्हणजे काय याचा अर्थ कळेल.
+ स्त्रियांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेता येईल.
+ स्त्रियांच्या आरोग्य संवर्धनासाठीच्या शासकीय योजनांची माहिती मिळेल.
+ महिलांच्या शिक्षणाची स्थिती समजण्यास मदत होईल.
+ महिलांच्या शैक्षणिक विकासासाठीच्या विविध योजनांची माहिती प्राप्त होईल.
+ विकासाचा अर्थ कळण्यास मदत होईल.
+ महिला विकासात येणारे अडथळे जाणून घेता येतील.
+ महिला विकासासंदर्भातील योजना व कायदे जाणून घेण्यास मदत होईल.

### ६.१ प्रस्तावना :

भारतातील स्त्रियांची सामाजिक स्थिती अनेक स्थित्यंतरातून गेली असून, तिने पुष्कळ चढ–उतार पाहिले आहेत. वैदिककाळात त्यांची देवता म्हणून पूजा होत असे. मुस्लिम काळात त्यांच्या सामाजिक दर्जात मोठी घसरण झाली. तर ब्रिटिश राजवटीत त्यांच्याकडे गुलामांचे गुलाम म्हणूनच बघितले जाई. स्वातंत्र्यानंतर ही लाट पुन्हा अनुकूल झाली. आता

बहुतांश कायद्यामुळे त्याच्या सामाजिक स्थितीत सुधारणा होण्यास मदत झाली आहे, हे नाकारता येणार नाही. तांत्रिक प्रगतीमुळे म्हणा किंवा उत्क्रांतीच्या प्रक्रियेमुळे म्हणा शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक क्षेत्रात ही प्रगती झाली आहे. संख्येने थोड्या असल्या तरी स्त्रिया जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात दिसतात तरीसुद्धा स्त्रियांची सामाजिक स्थिती समाधानकारक नाही.

भारतात मुलामुलींचे प्रमाण दर हजार मुलांमागे ९४० (२०११) एवढ्याच मुली आहेत. भारतातील एकूण लोकसंख्येच्या जवळपास ४९% एवढ्या स्त्रिया आहेत. तरीही स्त्रियांची स्थिती समाधानकारक अशी नाही. स्त्रियांचा दर्जा सुधारण्यासाठी दोन स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. ते म्हणजे संरक्षक कायदे व कल्याणकारी योजना होत.

स्वतंत्र भारतात निश्चितच भारतीय स्त्रियांच्या स्थितीमध्ये क्रांतिकारक परिवर्तन घडून आले आहे. मात्र स्त्री शिक्षणाची वर्तमान स्थिती संतोषप्रद स्वीकारली जाऊ शकत नाही. आजही भारतीय पुरुषांचा मोठा गट स्त्री वर्गास प्राचीन, मध्यमयुगीन रूढी - परंपरांपासून मुक्त करण्यास तयार नाही. लोकशाही शासनव्यवस्था आणि प्रगतिशील समाज स्त्रियांबरोबर असून, स्त्रियांना शिक्षण देऊन पुरुषांच्या समकक्ष आणण्यासाठी प्रयत्नशील आहे.

मनुष्यबळ विकासाचा एक प्रमुख घटक म्हणून आरोग्याकडे बघितले जाते. आरोग्य म्हणजे केवळ रोगाची अनुपस्थिती नसून त्यामध्ये स्वत:च्या क्षमतेचाही पुरेपूर वापर करता येण्याच्या क्षमतेचाही समावेश होतो. आरोग्यामध्ये व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक, आर्थिक व सामाजिक सुस्थितीचा समावेश होतो. आरोग्य हे व्यक्तीच्या अस्तित्वाची ओळख असते. भारतात आजही माता मृत्यूचे प्रमाण इतर प्रगत देशांच्या तुलनेत जास्त आहेत. त्याचबरोबर स्तनदा माता, गर्भवती माता यांच्या समस्यांचेही प्रमाण जास्त आहे. कारण मानवी विकासाची लक्ष्ये महिला आणि सबलीकरणाशी जवळून गुंफलेली आहे. महिलांचे एकूण लोकसंख्येत ४८.४६% (२०११) एवढे प्रमाण आहे. महिला एक मौल्यवान मानव संसाधन असून देशाच्या शाश्वत विकासासाठी त्यांचा सामाजिक, आर्थिक विकास अनिवार्य आहे.

## ६.२ विषय विवेचन

### ६.२.१ आरोग्य :

आरोग्याचा संबंध व्यक्ती आणि समाजजीवनाशी आहे. कोणत्याही राष्ट्राची प्रगती ही त्या देशातील लोकांच्या निकोप आरोग्यावर अवलंबून आहे. देशातील नागरिकांचे आरोग्य निकोप असेल तरच त्या देशाची सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगती वेगाने होऊ शकते. आरोग्य चांगले असेल तरच व्यक्तीचे कौटुंबिक व वैवाहिक आरोग्य उत्तम राहू शकते. शरीर चांगले असेल तर मन चांगले राहते. जर शरीर विविध रोगांनी ग्रासलेले असेल तर मनही थकलेले असते अशीच अवस्था समाजाची व कुटुंबाची असते. विकसित देश त्यांच्या देशातील नागरिकांचे आरोग्य जाणीवपूर्वक जपतात. परिणामी त्या देशाचा विकास वेगाने होतो.

यासाठी सभोवतालचे वातावरण निकोप ठेवले जाते. समाजातील सर्व घटकांची म्हणजेच स्त्री-पुरुषांच्या आरोग्याची काळजी योग्य प्रकारे घेतली जाते. व्यक्तिगत जीवनापासून ते

सार्वजनिक जीवनापर्यंत आरोग्याची काळजी घेतली जाते. जर अशा प्रकारचे वातावरण सभोवताली असेल तरच समाजाची प्रगती होते.

समाजाचा एक प्रमुख घटक म्हणजे 'स्त्री', जर ती विविध क्षेत्रात मागसलेली असेल, मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असेल, आरोग्यविषयक समस्यांनी ग्रस्त असेल, तर त्या देशाचा विकास एकांगी होतो. तात्पर्य समाजातील प्रत्येक घटकाचे शारीरिक नि मानसिक आरोग्य जर निकोप असेल तरच तो समाज सुदृढ व निकोप समजला जातो.

''आरोग्य म्हणजे फक्त रोग नसणे वा दुबळे असणे असे नाही तर आरोग्य ही शरीराची आणि मनाची सामाजिक प्राणी या नात्याने एक परिपूर्ण अवस्था असते.'' असे १९४८ साली स्थापन झालेल्या जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्याचे स्पष्टीकरण केले आहे. शारीरिक आणि सामाजिक पैलू हे एकाच अवस्थेत परिपूर्ण अवस्था कायमस्वरूपी असते असे मात्र नाही. कारण आरोग्याची अवस्था ही सातत्याने कमी - अधिक होत असते. निकोप आरोग्य असेलच असे नाही आणि सदैव निकृष्ट आरोग्य असेलच असे नाही. कारण समाजात एका बाजूला उत्तम प्रकृती असणारे लोक असतात तर दुसऱ्या बाजूला गंभीर आजार नि मृत्यू दिसत असतात. म्हणजेच समाजाची आरोग्य स्थिती ही सदैव सारखीच नसते. आरोग्याची कल्पनाच मुळी सापेक्ष असते.

आरोग्य हे सभोवतालच्या परिस्थितीवर अवलंबून असते. म्हणून आरोग्य आणि परिस्थिती या दोघांचा निकटचा संबंध आहे. सभोवतालच्या परिस्थितीनुसारच व्यक्तीच्या शरीरात रोग उत्पन्न होतात. म्हणूनच मानवनिर्मित वातावरणाचा प्रभाव व्यक्तीच्या आरोग्यावर पडू लागला आहे, नव्हे तो पडलाच आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, आरोग्य म्हणजे मनाने व शरीराने जी व्यक्ती निकोप असते, नि सभोवतालचे वातावरण निकोप प्रकृतीला पोषक असते, त्याला आरोग्य म्हटले जाऊ शकते. हे आरोग्य व्यक्ती, कुटुंब नि समाजालासुद्धा अभिप्रेत आहे. मानवनिर्मित वातावरणापेक्षा नैसर्गिक वातावरण केव्हाही व्यक्तिजिवनाला अनुकूल असते.

**निवासस्थान :**

निवास तथा घरकुल याचा संबंध आरोग्याशी जवळचा आहे. घर चांगले असेल तर त्या घरातील सदस्यांचे आरोग्यही चांगले राहते. घरात खेळती हवा, भरपूर सूर्यप्रकाश आवश्यक असते. स्वयंपाकगृह, बैठक, शयनगृह इ.ची नितांत आवश्यकता असते. अशी उत्तम आरोग्यासाठीची कल्पना आहे पण चित्र काही वेगळेच आहे. प्रामुख्याने ग्रामीण व शहरी भागातील झोपडपट्ट्यांमधील स्थिती अत्यंत दयनीय आहे. सभोवताली घाणीचे साम्राज्य, सांडपाण्याची व्यवस्था नसते, शेळ्या, डुकरे, कुत्रे यांचे वास्तव्यही तिथेच असते. या सर्वांचा परिणाम कुटुंबातील सर्वच सदस्यांवर होत असतो. विशेषकरून स्त्रियांवर. कारण त्या सर्वात जास्त वेळ घरात घालवतात. त्यामुळे त्यांना विविध रोगांना सामोरे जावे लागते. साथीच्या रोगांना तोंड द्यावे लागते.

**आहार :**

सकस आहार हा आरोग्याला पोषक असतो. पण भारतातील १२ जनता अशी आहे की,

त्यांचा पोषक आहाराशी संबंधच आलेला नाही. विशेषत: ग्रामीण, आदिवासी, शहरी मध्यमवर्गीय, कनिष्ठ वर्गीय स्त्रियांच्या बाबतीत दूध, अंडी, मांस, फळे, भाज्या या घटकांचा सकस आहारात समावेश होतो. ज्यांना शक्य आहे ते असा आहार घेतात. त्यांचे आरोग्य निकोप राहते. पण भारतातील ५०% लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली आहे. त्यांना दोन वेळेचे जेवण जरी प्राप्त झाले तरी भरपूर झाले. सकस आहार ही दूरची गोष्ट आहे.

भारतीय संस्कृती पुरुषप्रधान आहे. त्यामुळे त्याचा प्रभाव कुटुंबावरही जाणवतो. घरातील सर्व पुरुष जेवल्यानंतरच घरातील स्त्री राहिले उरलेले, शिळे अन्न ग्रहण करते. तसेच दूध, फळे, अंडी, इ. गोष्टी घरातल्या पुरुषांना प्रथम दिल्या जातात. घरातील स्त्रिया, मुलींना राहिले दिले जाते अथवा तेही मिळत नाही. त्यामुळे पोषक आहाराच्या कमतरतेमुळे स्त्री अनेक रोगांना बळी पडते.

**वैद्यकीय सोयीचा अभाव :**

वैद्यकीय सेवा जर सर्वसामान्य व्यक्तीपर्यंत पोहोचली असेल तर अशा समाजातील सदस्यांचे आरोग्य निकोप राहू शकते. प्रत्येक गावात निदान प्राथमिक आरोग्य केंद्र असेल तर लोकांचा किरकोळ आजार प्राथमिक अवस्थेत असतानाच निदान होऊ शकते. बाळांतपणासाठी प्रशिक्षित दाई असेल तर गर्भवती स्त्रियांचा प्रश्न गंभीर बनणार नाही.

पण ग्रामीण भागात या सगळ्या मुलभूत सोयींचा अभाव मोठ्या प्रमाणात आहे. अनेक गावात प्राथमिक आरोग्य केंद्र तर नाहीतच पण प्रशिक्षित दाईसुद्धा नाही. जे काही डॉक्टर आहेत ते शहरात खाजगी दवाखाने चालवतात. भरमसाट पैसे आकारतात. गरीब, सामान्य व्यक्ती अशा खाजगी दवाखान्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. परिणामी गंभीर आजाराचा बळी ठरतो. ज्या गावात प्राथमिक आरोग्य केंद्र आहे तिथे डॉक्टर वेळेवर येत नाहीत, औषधांचा नियमित पुरवठा नसतो. सामान्य तपासणीची साधने वा सुविधासुद्धा नसते. ज्या काही शासनाच्या आरोग्यविषयक योजना आहेत त्या राबविल्या जात नाहीत. त्याचे परिणाम ग्रामीण जनतेला भोगावे लागतात.

**खेळ :**

आरोग्य आणि खेळाचा संबंध घनिष्ट आहे. उत्तम आरोग्य रक्षणासाठी कोणत्याही वयोगटातील स्त्री-पुरुषांनी 'पद' बाजूला ठेवून खेळणे आवश्यक आहे. आवडी-निवडीनुसार प्रत्येकाला हवा तो खेळ खेळता येऊ शकतो. ज्या खेळात शरीराची अवयवांची हालचाल होऊन त्याचा फायदा होईल. अन्नाचे पचन व्यवस्थित होते, रक्ताचे अभिसरण व्यवस्थित होते. शरीर स्थूल न राहता सडसडीत राहते. रोगप्रतिकार क्षमता वाढते.

पण या सर्वाचा अभाव भारतीय स्त्रियांच्या आयुष्यात आहे. मुलगी ७-८ वर्षांची झाल्यानंतर पालक मुलींना मैदानावर खेळायला पाठवत नाहीत. तिला भातुकलीसारखे घरातल्या घरात खेळता येणारे खेळ खेळण्यासाठी सांगतात. जर एखादी मुलगी मैदानी खेळ खेळत असेल तर 'मुलीच्या जातीला शोभत नाही' म्हणून टीका केली जाते. तिच स्थिती स्त्रियांची आहे. त्यांचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल एवढेच आखून दिल्याने त्यांना त्यांच्या आरोग्यासाठी व्यायाम, खेळ इ. साठी विशेष वेळ काढता येत नाही. परिणामी भारतीय

स्त्रियांमध्ये स्थूलपणा, स्थूलपणामुळे रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार. सांधेदुखी, कंबरदुखीसारखे रोग जडतात.

**सामाजिक स्थिती :**

स्त्रियांच्या आरोग्यावर परिणाम करणारा घटक म्हणून सामाजिक परिस्थितीकडे पाहता येते. कारण रोग उत्पन्न होण्याकरिता सामाजिक परिस्थितीसुद्धा कारणीभूत असते. स्त्रिया ज्या विविध समूहात वा सामाजिक परिस्थिती वावरत असतात ती सामाजिक परिस्थितीसुद्धा विविध रोग उत्पन्न करण्याकरिता कारणीभूत असते.

ग्रामीण समाज, आदिवासी समाजातील स्त्रियांवर रूढी, प्रथा, परंपरांचा, अंधश्रद्धेचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर असतो. राहणीमाण, स्वच्छता, आहार याबाबतीत अज्ञानी असतात. स्वयंपाकाचे ठिकाण, सांडपाण्याची व्यवस्था नसणे, उघड्यावर शौचास जाणे या सर्व परिस्थितीशी स्त्रियांचा जवळचा संबंध आहे. याचा थेट परिणाम स्त्रियांच्या आरोग्यावर होतो व विविध रोगांना त्या बळी पडतात.

**अंधश्रद्धा :**

ग्रामीण व आदिवासी समाज आत्यंतिक रूढी नि परंपरावादी असतात. एखादा रोग झाला म्हणजे जादूटोणा, मांत्रिक, नवस इ. मध्ये स्त्रिया गुरफटून जातात. कुटुंबातील व्यक्तीसुद्धा संबंधित स्त्रीला डॉक्टरकडे घेऊन न जाता ते मांत्रिकाकडे घेऊन जातात. तो भूतबाधा झाली म्हणून ते काढून टाकण्यासाठी म्हणून वेगवेगळे अघोरी प्रयोग करतो. काही वेळेस तर संबंधित स्त्रीचे लैंगिक शोषणही केले जाते. या सर्व प्रकारात स्त्रीचे हाल होतात. एकतरी मृत्यूला कवटाळणे वा मानसिक रुग्ण बनते.

**मानसिक रोग :**

भारतीय संस्कृती पुरुषप्रधान संस्कृती आहे. ज्या कुटुंबातील स्त्रिया सतत पुरुषाच्या दडपणाखाली असतात, त्यामुळे अशा स्त्रिया मानसिकदृष्ट्या दुबळ्या बनतात. त्यांच्यात एक प्रकारे मानसिक विकृती निर्माण होते. अशा वेळेस भूतबाधा झाली, देवी अंगात येते म्हणून मांत्रिकाला बोलविले जाते. तसा मानसिक रोग आहे पण मांत्रिकाच्या रूपाने त्या कुटुंबात एक वेगळाच रोग प्रवेश होतो. हळूहळू हा मांत्रिक कुटुंबातील सर्वच स्त्रियांना वश करतो व त्यांचे लैंगिक शोषण करू लागतो. पुरुष असाहाय्य बनतात. कुटुंब गर्तेत जाते.

**आर्थिक स्थिती :**

आर्थिक स्थितीसुद्धा अनेक रोगांना कारणीभूत ठरते. ज्या कुटुंबाची आर्थिक स्थिती ही बेताची असते त्या कुटुंबातील स्त्रीवर सर्वात जास्त जबाबदारी असते. गलिच्छ वस्ती, दूषित पाणी, असुविधाजनक ठिकाणी कामाला जाणे, यामुळे स्त्रीला अनेक रोगांनी पोखरले जाते. त्वचारोग, क्षयरोग, खरूज, संसर्गजन्य रोग इ. रोग होण्याची दाट शक्यता असते. जर त्या स्त्रीला दारू, तंबाखू, बिडी इ. व्यसने असतील तर कॅन्सर, पोटाचे विकार इ.सारख्या रोगांना बळी पडते. कुटुंबात दारिद्र्य असल्याने घरातील स्त्री सदैव उष्टे अन्न, शिळे अन्न, कुजलेले अन्न खाऊन नको त्या रोगाचे शिकार होतात.

केवळ आर्थिक सुबत्ता असेल तर रोग होत नाहीत हा निव्वळ गैरसमज आहे. श्रीमंत, ज्यांची आर्थिक स्थिती उत्तम आहे अशा कुटुंबातील स्त्रियांनासुद्धा विविध आजार होतात. जिभेचे लाड पुरविण्यासाठी तेलकट, तुपकपट, गोड, रुचकर अन्न खाण्यावर अधिक भर असतो. शिवाय मद्य, सिगारेट, इ.सारख्या सवयी सुद्धा काही श्रीमंत, उच्चमध्यमवर्गीय कुटुंबांतील स्त्रियांना असतात. परिणामी शरीराला स्थूलपणा येतो, हालचाल मंद होते, या सर्वांमुळे विविध रोगांचे आक्रमण होते.

मध्यमवर्गीय स्त्रियांसुद्धा यापासून मुक्त नाहीत. त्यांनासुद्धा अनेक रोगांनी ग्रासलेले असते. मध्यमवर्गीयांचा रुचकर खाण्यावर जास्त भर असतो, जेवणात तेलाचे प्रमाण, तूप, गोड पदार्थ, चटपटीत पदार्थ असले तरच उत्तम जेवण असे मानले जाते. त्यामुळे अशा जेवणात पोषकतत्त्वे असतील असे नाही. तसेच व्यायामाचा अभाव हाही मध्यमवर्गीय स्त्रियांची फार मोठी समस्या आहे. परिणामी मधुमेह, संधिवात, गुडघेदुखी, हृदयरोग, पोटाचे विकार इ. सारखे रोग उत्पन्न झालेले असतात.

**भारतातील स्त्रियांची आरोग्यविषयक स्थिती :**

भारतातील सर्वसाधारण जनता ही सध्याच्या आधुनिक आणि प्रगत आरोग्य सुविधांपासून दूर असण्याचे कारण म्हणजे गेली ६० वर्षे आरोग्य मनुष्यबळ नियोजनावर अभिजनवादी आरोग्यसेवकांची असणारी मक्तेदारी होय. भारतात ६ लक्ष डॉक्टर, १० लक्ष नर्स, २ लक्ष दंतवैद्य आहेत, पण ग्रामीण भागाच्या तुलतेत शहरी भागात ७० टक्के डॉक्टर सेवा देतात. भारतातील ६४० जिल्ह्यांपैकी केवळ १९३ जिल्ह्यांमध्ये वैद्यकीय शिक्षणाच्या सोयी उपलब्ध आहेत. खाजगी क्षेत्रामध्ये ७० टक्के डॉक्टर कार्यरत आहेत. त्यामुळे नागरिकांना जास्तीचा खर्च करावा लागतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानांकनानुसार भारतात अजूनही २५ टक्के डॉक्टरांची कमतरता आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानांकनानुसार दर १० हजार लोकसंख्येमागे २५ वैद्यकीय सेवा देणारे असणे आवश्यक आहे. भारतात हे प्रामण १९ एवढेच आहे.

ग्रामीण आरोग्य सांख्यकीनुसार भारतातील प्राथमिक आरोग्य केद्रांमध्ये २४३३ डॉक्टरांची कमतरता आहे. सामूहिक आरोग्य केंद्रामध्ये ११३६१ विशेषज्ञ डॉक्टरांची कमतरता आहे. भारतातील आरोग्य क्षेत्रातील मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे भारतातील आरोग्य स्थिती म्हणावी तशी समाधानकारक नाही. विशेष म्हणजे स्त्रियांसाठी विशेष अशी सोय नाही. त्यामुळे भारतीय स्त्रियांची आरोग्यविषयक स्थिती चिंताजनक आहे.

**मातामृत्यू व बालमृत्यू :**

मातामृत्यू व बालमृत्यू हे सर्वस्वी मातेच्या आरोग्यावर अवलंबून आहे. सध्या भारतात मातामृत्यू दर एक लाखामागे १२८ एवढा आहे. बालमृत्यू १३.३ एवढा आहे. उत्तर भारतात ६० टक्के मुले-मुली, २१ व १८ वर्षापूर्वीच विवाह करतात. अशा वेळेस मातेचे वय लहान असल्यामुळे तिच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतो. त्याचबरोबर दोन अपत्यांमधील कमी अंतर असल्यामुळे मातेचे आरोग्य खालावलेले असते. त्यामुळे बालकांना आवश्यक तो पोषण आहार प्राप्त होत नाही. या विविध कारणांमुळे बालमृत्यू व मातामृत्यूचे प्रमाण वाढत जात आहे.

**कुपोषण :**

आरोग्यपूर्ण जीवनासाठी सुपोषण आवश्यक आहे. भारतात अजूनही सर्वांना पोषक आहार उपलब्ध होत नाही. स्त्रियांच्या संदर्भात ही समस्या जास्त गंभीर आहे. कुपोषणाला आर्थिक समस्येबरोबरच सामाजिक रूढी, प्रथा, परंपराही तेवढ्याच जबाबदार आहेत. कारण आजही स्त्री कुटुंबात दुर्लक्षितच आहे. मुलाचा वंशाचा दिवा म्हणून जास्त काळजीपूर्वक सांभाळ केला जातो तर मुलीकडे परक्याचे धन म्हणून दुर्लक्ष केले जाते. यामुळे मुलींमध्ये, स्त्रियांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे.

विशेषत: ग्रामीण व आदिवासी स्त्रियांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.

**सार्वजनिक स्वच्छता :**

सार्वजनिक स्वच्छता हा सार्वजनिक आरोग्याच्या संदर्भातील एक महत्त्वाचा घटक आहे. भारतात सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत स्थिती चांगली नाही. सार्वजनिक स्वच्छतेशी निगडित साथीच्या रोगांचा प्रसार भारतात वेगाने होतो. उदा. मलेरिया, डेंग्यू, कॉलरा, प्लेग इ.सारख्या रोगांचा प्रसार अस्वच्छतेमुळेच होतो आहे.

सार्वजनिक शौचालयांची स्थिती अत्यंत दयनीय अशी आहे. भारतातील निम्म्यापेक्षा अधिक जनता तर उघड्यावरच शौचाला बसते. यामुळे अनेक साथीचे रोग पसरण्यास मदत होते. त्याचबरोबर स्त्रियांनाही पोटदुखी, पोटाचे विकार इ.सारखे आजार होतात.

**स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा अभाव :**

वैयक्तिक आरोग्य राखण्यासंदर्भात स्वच्छ पिण्याचा पाण्याचा पुरवठा होणे आवश्यक आहे. कारण अनेक आजार हे दूषित पाण्यामुळे होतात. भारतात अद्यापही प्रत्येकाला स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होऊ शकला नाही. त्याचा परिणाम वैयक्तिक आरोग्याबरोबरच सार्वजनिक आरोग्यावरही झाला.

**कुशल दायीच्या अभावी मातामृत्यू :**

आजही ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्राचा अभाव आहे. यामुळे गर्भवती महिला दवाखान्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. परिणामी अकुशल व्यक्तीकडून प्रसूती केली जाते व यात अनेक मातांचा मृत्यू होतो.

**हिमोग्लोबिनची कमतरता :**

भारतातील बहुतेक स्त्रियांना हिमोग्लोबिनच्या कमतरतेमुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. स्त्रियांना स्वत:च्या आरोग्याविषयीच्या जाणीवजागृतीच्या अभावाने या समस्यांना सामोरे जावे लागते. तसेच पोषक आहाराचा अभाव, यामुळेही ही समस्या बहुतेक स्त्रियांमध्ये जाणवते.

**संख्यात्मक बाळंतपणाचे प्रमाण कमी :**

बाळांतपणाच्या वेळेस संसर्ग, उच्च रक्तदाब, असुरक्षित बाळांतपण इ. कारणांमुळे

गुंतागुतीची परिस्थिती निर्माण होऊन माता व बालक यांच्या मृत्यूचे प्रमाण भारतात मोठे आहे. याचबरोबर संख्यात्मक बाळांतपणाचे (दवाखान्यामधील) प्रमाणही कमी आहे. ग्रामीण भागातील कुटुंब दवाखान्याचा खर्च पेलवत नाही म्हणून दवाखान्यात येतच नाहीत. परिणामी माता व बालकाच्या मृत्यूचा धोका संभवतो. यासारख्या अनेक समस्यांना भारतातील स्त्रिया तोंड देत आहेत.

**महिलांसाठी आरोग्यविषयक विविध योजना व कार्यक्रम**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अगदी प्रथम पंचवार्षिक योजनेपासूनच शासनाने आरोग्यविषयक योजना व कार्यक्रम आखून सुदृढ भारताच्या पायाभरणीस सुरुवात केली होती. यात स्त्रियांच्या व बालकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले गेले. पण तरीही म्हणावी एवढी प्रगती उद्दिष्टे साधता आली नाही. अजूनही विविध कार्यक्रम व योजनांच्या माध्यमातून महिला व बालक यांच्या आरोग्यासाठीचे प्रयत्न सुरूच आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत.

**१)प्रजनन व बालआरोग्य :**

ही योजना माता व बालकाचे आरोग्य सुधारण्यासाठी जे विविध प्रयत्न, कार्यक्रम व योजना राबविण्यात येत होत्या, त्यांच्या एकत्रित स्वरूपामधून निर्माण झाली आहे. १५ ऑक्टोबर १९९७ साली ९०व्या पंचवार्षिक योजनेअखेर या योजनेचा पहिला टप्पा सुरू करण्यात आला. प्रजनन व बालआरोग्य कार्यक्रमाचा दुसरा टप्पा १ एप्रिल २००५ रोजी पाच वर्षांसाठी लागू करण्यात आला.

**उद्देश –**

१) मातामृत्यू प्रमाण कमी करणे

२) अर्भक मृत्यूदर कमी करणे

३) एकूण जननदर कमी करणे.

याद्वारे बालआरोग्य सुधारणे व लोकसंख्या स्थिर करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

**मातांचे आरोग्य :**

मातामृत्यू कमी करण्यासाठी या कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या काही योजना

१)आवश्यक प्रसूतिशास्त्र सेवा.

२)पीएचसी स्तरावर २४ तास आरोग्यसेवा पुरविणे.

३)जन्माच्या वेळी कुशल कर्मचाऱ्यांची हजेरी.

४)सामुदायिक संस्थात्मक पातळीवर रेफरल सेवा देणे.

५)प्रसूती व्यवस्थापण कौशल्य.

मातांचे आरोग्य सुधारण्यासाठी इतर व्यवस्था

– राष्ट्रीय पोषणात्मक रक्तक्षय (अनेमिया) रोगप्रतिबंधक कार्यक्रम.

– ग्राम आरोग्य व पोषणद्रव्य दिवस.

– जननी सुरक्षा योजना.

२)राजमाता जिजाऊ कुपोषणमुक्त ग्राम अभियान :

महाराष्ट्र शासनाने २६ सप्टेंबर २०११ रोजी राजमाता जिजाऊ कुपोषणमुक्त ग्राम अभियान सुरू केले.

मुले कशामुळे कुपोषत होतात याचे विश्लेषण करताना प्रामुख्याने जन्मतः वजन कमी, मुलांना आहार भरविण्याच्या चुकीच्या पद्धती आणि आजार यासारख्या समस्यांवर विचार करून यावर उपाययोजना करण्याचे ठरविले.

जगाच्या पातळीवर भारतात सर्वांत जास्त मुले कुपोषित आहेत. इतर देशांमध्ये ही समस्या होती, पण त्या देशांनी यावर यशस्वी मात केली. या जागतिक अनुभवाच्या आधारावर महाराष्ट्र राज्याने कुपोषणमुक्तीसाठी दशपदीचा वापर केला.

१)बाळाच्या जन्मानंतर एक तासाच्या आत चिकाचे दूध पाजणे.

२)बाळाला ६ महिने वयापर्यंत फक्त आईचे दूध पाजणे.

३)बाळाला चौरस आहार देणे.

४)बाळाची आहाराची वारंवारता हळूहळू वाढविणे.

५)बाळाच्या आहारात लोहयुक्त सिरप स्प्रिंकल देणे.

६)बाळ ६ महिन्यांचे झाल्यावर आईच्या दुधाबरोबरच इतर आहार सुरू करणे.

७)बाळाला ९ महिने ते ५ वर्षे वयापर्यंत दर सहा महिन्यांनी जीवनसत्त्व 'अ'चे डोस देणे.

८)घरता आयोडिनयुक्त मिठाचा वापर करणे.

९)सर्व लसीकरण वेळापत्रकाप्रमाणे देणे.

१०)लहान आणि मोठ्यांच्या मलमूत्रांची विल्हेवाट लावणे.

**जननी सुरक्षा योजना :**

ही योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत आहे. या योजनेंतर्गत प्रसूतीसाठी व प्रसूतीनंतर काळजी घेण्यासाठी एकत्रितपणे रोख साहाय्य दिले जाते. नागरी व ग्रामीण भागातील संख्यात्मक प्रसूतीला प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेत भर देण्यात आला आहे. तसेच मातामृत्यू व बालमृत्यू कमी करणे यावरही भर देण्यात आला आहे.

**जननी बालसुरक्षा योजना :**

ही योजना १ जून २०११ रोजी केंद्र सरकारने सुरू केली. या योजनेच्या माध्यमातून गर्भवती माता व आजारी नवजात शिशूला पूर्णपणे मोफत आरोग्य सुविधा पुरविण्यात येणार आहे.

**नवसंजीवन योजना :**

आदिवासी भागातील अर्भक मृत्युदर आणि माता मृत्युदर कमी करण्यासाठी नवसंजीवन योजनेची सुरुवात १९९५-९६ मध्ये करण्यात आली होती. ही योजना महाराष्ट्रातील १५ आदिवासी जिल्ह्यांत राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत ग्रामीण रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्र यामध्ये मोफत जेवणाची सोय करून देण्यात येते. आदिवासी भागातील गर्भवती महिलांची नोंद, नियमित आरोग्य तपासणी, आवश्यक त्या औषधांचा पुरवठा व्हावा यासाठी नवसंजीवन योजनेंतर्गत 'मातृत्व अनुदान' योजना राबविण्यात येत आहे.

**सिकलसेल (रक्तातील कोयता) :**

सिकलसेल हा आजार गंभीर स्वरूपाचा आहे. या रोगामध्ये लाल रक्तपेशी आपला आकार बदलून कोयत्याच्या आकाराच्या होतात. त्यामुळे रक्तवाहिन्यांतून रक्त सहज वाहून जाऊ शकत नाही. त्या घट्ट चिकट होतात. त्यांचा पुंजका तयार होतो. त्याच्या गाठी तयार होतात. रक्तपुरवठ्यात अडथळा निर्माण होतो. अवयवांना पुरेसा ऑक्सिजन न मिळाल्यामुळे हळूहळू अवयव निकामी होतात. सांधे दुखतात, संसर्ग होतो. या प्रकारचे रुग्ण भारतात पाच ते दहा लाखांच्या आसपास आहेत असा अंदाज आहे.

यासाठी १९९९-२००० मध्ये सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रम राबविण्यास सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करणे, प्राथमिक आरोग्य केंद्रात मोफत सोल्युबिलिटी चाचणी करणे, सिकलग्रस्त व वाहक यांचा शोध घेणे, सिकलग्रस्त व्यक्तींना लाल तर वाहकांना पिवळ्या कार्डाचे वाटप करणे, ग्रस्त व वाहकांना लसीकरण करणे, फॉलिक ॲसिडच्या गोळ्या, ॲन्टिबॉयोटिक्स, पेन किलर्स, इ. सोयी प्राथमिक आरोग्य केंद्रात करून देणे.

**आरोग्य विषयक मूलभूत संकल्पना :**

भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद २१ चा अर्थ लावताना सर्वोच्च न्यायालयाने 'आरोग्य' हादेखील मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट केले आहे. म्हणजेच आरोग्य हा मूलभूत मानवी हक्क आहे. भारतच नव्हे, तर जगातील सर्वच देश त्यांच्या नागरिकांना आरोग्यसेवा पुरविण्यासाठी कटिबद्ध आहेत आणि तसे ते प्रयत्न करताना दिसत आहेत.

भारतीय राज्यघटनेनुसार आरोग्य हा राज्यसूचीमधील विषय आहे. त्यामुळे आरोग्यसेवा सर्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी ही राज्य सरकारची आहे. महाराष्ट्रामध्ये आरोग्यसेवा यंत्रणेबाबत धोरण व निर्मितीची अंमलबजावणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय या विभागावर आहे. याचा प्रमुख हा कॅबिनेट दर्जाचा मंत्री असतो. त्यांच्या मदतीसाठी राज्यमंत्री व उपमंत्री असतात.

**आरोग्याच्या संदर्भातील काही मूलभूत संकल्पना :**

आरोग्यसेवा क्षेत्रामध्ये विविध संकल्पनांचा वापर केला जातो. अशा विविध संकल्पनांचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे-

**१)आरोग्यविषयक काळजी :**

समाजातील व्यक्ती, कुटुंब व समुदाय यांना आरोग्यसेवा पुरविणाऱ्या विविध घटकांमार्फत ज्या आरोग्यसेवा पुरविल्या जातात व ज्यामार्फत आरोग्याची जोपासना, निगा व प्रोत्साहन

दिले जाते, या सर्व प्रक्रियेला मिळून आरोग्यविषयक काळजी असे म्हटले जाते.

**२)आरोग्य व्यवस्था :**

आरोग्यविषयक नियोजन, प्राधान्यक्रम ठरविणे, संसाधनाचे एकत्रीकरण, त्याचे पुनर्वितरण, धोरणांची अंमलबजावणी, त्यांचे मूल्यमापन आणि आरोग्यशिक्षण इ.बाबींचे व्यवस्थापन व संघटन करणारी यंत्रणा म्हणजे आरोग्य व्यवस्था होय.

**३)ढोबळ जन्मदर :**

ढोबळ जन्मदर म्हणजे एका वर्षामध्ये दर हजार लोकसंख्येच्या मागे जिवंत जन्मास आलेल्या एकूण अपत्यांची संख्या.

एका वर्षात जिवंत जन्मास आलेल्या एकूण

अपत्यांची संख्या

------------------------------ x १००

त्या वर्षमध्यास असलेली एकूण लोकसंख्या

एका वर्षात मृत्यू पावलेल्यांची एकूण संख्या

------------------------------ x १००

त्या वर्षमध्यास असलेली एकूण लोकसंख्या

म्हणजेच एका वर्षात दर हजार व्यक्तीमागे मृत्यू पावलेल्या व्यक्तींची संख्या म्हणजे ढोबळ मृत्यूदर.

**माता मृत्युदर :**

एका वर्षामध्ये एक लाख जिवंत जन्माला आलेल्या बालकांपाठीमागे मृत्यू पावलेल्या मातांच्या संख्येवरून ठरविले जाते.

**अर्भक मृत्युदर :**

एका वर्षामध्ये दर हजार जन्मास आलेल्या अपत्यांच्या मागे, एकूण मृत अर्भकांची संख्या म्हणजे अर्भक मृत्यू होय.

अशा अनेक संकल्पनांच्या माध्यमातून आरोग्य व लोकसंख्याविषयक निर्देशांक वापरले जातात.

भारत हा विकसनशील देश आहे. भारताने विविध क्षेत्रात विकास घडवून आणला आहे. पण आरोग्य विषयक स्थितीमध्ये अजूनही सुधारणेला भरपूर वाव आहे. भारतात आज ही स्त्रियांना दुय्यम दर्जाजी वागणूक दिली जाते. तीच स्थिती आरोग्याच्या संदर्भात आहे. माता मृत्यूचे प्रमाण, कुपोषण, लिंगगुणोत्तर, स्त्रिभ्रुण हत्या, अशा अनेक समस्या स्त्रियांच्या सामाजिक आरोग्याच्या संदर्भात आहेत. स्त्रियांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. सध्याच्या आरोग्य विषयक समस्या म्हणजे स्तनाचा कर्करोग, गर्भाशयाचा कर्करोग इ. समस्यांना ती तोंड देत आहे.

आजघडीला भारतासमोरील मोठे आव्हान म्हणजे वर्षानुवर्ष वाढत जाणाऱ्या आरोग्यविषयक समस्या. यापैकी बहुतांश समस्या या स्त्रियांच्या बाबतीतल्या आहेत. या समस्यांपैकी बहुतांश समस्या या स्त्रियांच्या आरोग्यविषयक जाणिवेच्या अभावी तर काही समस्या या साधनांची कमतरता वा तांत्रिक क्षमतेच्या अभावामुळे निर्माण झाल्या आहेत. या समस्या दूरही करता आल्या असत्या मात्र भारताचे राजकीय निर्णय 'मतांचा' विचार करून घेतले जातात. त्यामुळे या समस्या आणखीच गंभीर होत गेल्या आहेत.

भारत हा विकसनशील देश आहे. भारताने विविध क्षेत्रात विकास घडवून आणला आहे. पण आरोग्य विषयक स्थितीमध्ये अजूनही सुधारणेचा भरपूर वाव आहे. भारतात आज ही स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. तीच स्थिती आरोग्याच्या संदर्भात आहे. माता मृत्यूचे प्रमाण, कुपोषण, लिंगगुणोत्तर, स्त्रिभ्रूण हत्या, अशा अनेक समस्या स्त्रियांच्या सामाजिक आरोग्याच्या संदर्भात आहेत. स्त्रियांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. सध्याच्या आरोग्य विषयक समस्या म्हणजे स्तनाचा कर्करोग गर्भाशयाचा कर्करोग इ. समस्यांना ती तोंड देत आहे.

## ६.२.२ शिक्षण :

**प्रस्तावना :** भारतीय समाजात अजूनही पुरातन स्वरूपाच्या प्रथा, रूढी प्रचलित आहेत. या भारतीय समाजात विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि पौराणिक परंपरा आढळतात. त्यामुळे एका बाजूला फार मोठी विविधता निर्माण झाली, तर दुसऱ्या बाजूला विषमता आणि शोषणात्मक प्रथा निर्माण झाल्या. जसे जातिभेद, लैंगिक विषमता इत्यादी देशामधील शिक्षणव्यवस्था ही अशा प्रकारच्या सामाजिक, सांस्कृतिक वैशिट्यांमुळे प्रभावित होते. परिणामी स्वातंत्र्यप्राप्ती वेळी शिक्षण व्यवस्थेमध्ये असमानता मोठ्या प्रमाणात होती. ज्याचे प्रतिबिंब लैंगिक विषमता, जातीय, सामाजिक विषमतेमध्ये पडल्याचे दिसून येते. त्यामुळे राज्यघटनेमध्ये अशा प्रकारची विषमता नष्ट करण्यासाठी सर्वांना शिक्षणाची समान संधी व मूलभूत हक्क देण्यात आले. असे जरी असले तरी आजही समाजव्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात असमतोल दिसून येतो. समाजातील विविध घटक आजही शिक्षणापासून वंचित आहेत.

एकूण लोकसंख्येपैकी ४८ टक्के लोकसंख्या ही स्त्रियांनी व्यापलेली आहे. त्या फक्त देशाच्या मौल्यवान मानवसंसाधनाच्या घटक आहेत, असे नव्हे तर एकूण देशाचा किंवा समाजाचा शाश्वत विकास साधण्यासाठीच्या एक निर्धारक घटक आहेत. राज्यघटनेने स्त्रियांना विविध मार्गांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या तरीही भारतीय समाजामध्ये स्त्रियांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते.

देशाचा सामाजिक आणि आर्थिक विकास घडवून आणण्यामागे शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. वाढत्या विकासदरासोबत निर्माण होणाऱ्या विविध संधीचा फायदा घेण्यासाठी शिक्षणाची उपलब्धता असणे आवश्यक आहे. यासाठीच शिक्षणाच्या विविध टप्प्यांवर मुलींच्या शिक्षणासाठी विविध प्रयत्न झाल्याचे दिसून येते.

**स्त्रीशिक्षणाची सद्यस्थिती :**

२०११ च्या जनगणनेनुसार प्राप्त झालेल्या माहितीमुळे स्त्री-पुरुष साक्षरतेच्या दरामध्ये मोठी तफावत आढळून येते. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची साक्षरता ही एकूण ७४.०४ टक्के एवढी आहे. त्यापैकी पुरुष साक्षरता ८२.१४ टक्के एवढी आहे, तर स्त्री साक्षरता ६५.४६ टक्के इतकी आहे.

**भारताचे पुरुष व स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण**

| जनगणना वर्ष | एकूण साक्षरता | पुरुष साक्षरता | स्त्री साक्षरता | स्त्री-पुरुष साक्षरता तफावत |
|---|---|---|---|---|
| १९५१ | १८.३३ | २७.१६ | ८.८६ | १८.३० |
| १९६१ | २८.३ | ४०.४ | १५.३५ | २५.०५ |
| १९७१ | ३४.४५ | ४५.९६ | २१.९७ | २३.९८ |
| १९८१ | ४३.५७ | ५६.३८ | २९.७६ | २६.६२ |
| १९९१ | ५२.२१ | ६४.१३ | ३९.२९ | २४.८४ |
| २००१ | ६४.८३ | ७५.२६ | ५३.६७ | २१.५९ |
| २०११ | ७४.०४ | ८२.१४ | ६५.४६ | १६.६८ |

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे एकंदरीत शिक्षणातील गळतीमध्ये मुलींचे प्रमाण मोठे आहे. जरी विविध प्रयत्नांमुळे त्यात घट होत असली, तरी अजूनही हे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत जास्तच आहे.

**भारतातील मुलींच्या शिक्षणातील गळतीचे प्रमाण (इयत्ता १ली ते ७वी)**

| वर्ष | प्रमाण |
|---|---|
| २००१ | ३९.०३ टक्के |
| २००५ | २८.४९ टक्के |
| २००९ | २१.०१ टक्के |

तिसरा मुद्दा म्हणजे विविध सामाजिक घटक आणि प्रदेशात आढळणारी विषम स्थिती. मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण अनुसूचित जाती, जमातीमध्ये फार कमी आहे, तर त्याचबरोबर मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत उत्तर भारतातील परिस्थिती अधिक विदारक आहे.

अशा मुली-स्त्रियाच्या शैक्षणिक मागासलेपण याची कारणमीमांसा करणे गरजेचे आहे. त्याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१)पुरुषप्रधान संस्कृती :**

भारतीय समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान असल्यामुळे मुळातच स्त्रीच्या जन्मापासूनच तिच्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यांचे कार्यक्षेत्र 'चूल आणि मूल' एवढेच मर्यादित ठेवण्यात आले. त्यामुळे त्यांना शिक्षणाची संधी प्राप्त झाली नाही.

**२)प्रतिगामी विचारसरणी :**

प्रतिगामी विचारसरणीमुळे मुली कौमार्य अवस्थेमध्ये आल्यानंतर तिचे शिक्षण थांबविले जाते. पुढे शिकू दिले जात नाही. मुलींना शिक्षणाची गरज काय? किंवा 'मुली या परक्याचे धन' या विचारसरणीमुळे मुलींमध्ये गुणवत्ता असतानासुद्धा, क्षमता असतानासुद्धा तिला शिक्षण घेऊ दिले जात नाही. जरी पुढे शिकू दिले तरी तिला हवे ते शिक्षण दिले जात नाही.

**३)गळतीचे प्रमाण जास्त :**

मुलींचे मुळातच शिक्षणाचे प्रमाण कमी, त्यातच बालविवाहसारख्या प्रथांमुळे गळतीचे प्रमाण वाढलेले आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागात आई-वडील कामाला गेल्यानंतर भावंडांना सांभाळण्याचे कामही मुलींना करावे लागते. त्यामुळे सुद्धा मुलींना शिक्षणापासून दूर राहावे लागते.

**४)दारिद्र्य :**

भारतामध्ये आजही दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे. घरातील मोठ्या व्यक्ती कामावर गेल्यानंतर घराची सर्व जबाबदारी ही मुलीवरच येते. तसेच बहुतेक मुलींना बालवयातच आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी कामाला जावे लागते. ज्या देशात संसाधनाची उपलब्धता असते तेव्हा त्या देशात आर्थिक संपन्नता असते व शिक्षणाकडे लक्ष दिले जाते. परंतु भारतात मुबलक संसाधनाची उपलब्धता नसल्याकारणाने मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष दिले जात नाही.

**५)पायाभूत सुविधांचा अभाव :**

शाळांमधून पायाभूत सोयी-सुविधांचे जसे-स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय नसणे, घरापासून शाळेचे अंतर जास्त असणे, वसतिगृहांची सोय नसणे, इ. मुळे देखील मुलींचे शिक्षणाचे प्रमाण कमी आढळून येते.

**६)शाळेचा कालावधी :**

शाळांचा दिवसामधील निश्चित असलेला कालावधी व मुलींना घरगुती कामे करण्यासाठीचा कालावधी दोन्ही सारखेच असल्याने घरातील कामे सोडून मुली शाळेत जाऊ शकत नाहीत.

## महिलांचा शिक्षणातील सहभाग वाढविण्यासाठीचा शासकीय उपक्रम वा उपाययोजना किंवा कार्यक्रम -

आपण अभ्यासलेल्या वरील समस्यांमुळे आजही भारतातील ३४% महिला या निरक्षर आहेत. मुलींच्या शिक्षणासाठी स्वातंत्र्योत्तर काळात विशेष भर देण्यात आला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ नुसार, स्त्रियांच्या सामाजिक दर्जामध्ये वाढ घडवून आणण्यासाठी, शिक्षणाचे सामाजिक बदलाचे साधन म्हणून महत्त्व मान्य करण्यात आले. त्या अनुषंगाने मुलींच्या शिक्षणातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक अडथळे दूर करण्यासाठी विविध योजना, कार्यक्रम राबविण्यात आले. त्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१)राष्ट्रीय साक्षरता अभियान :**

या अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या संपूर्ण साक्षरता अभियानामध्ये स्त्री-शिक्षणावर भर देण्यात आला.

**२)खडू-फळा मोहीम :**

या अभियानाच्या माध्यमातून भरती केल्या जाणाऱ्या एकूण शिक्षकांपैकी ५९% महिला शिक्षकांची भरती करण्यात आली.

**३)जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम**

या कार्यक्रमांतर्गत मुलींच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. त्यानुसार हा कार्यक्रम राबविण्यासाठी जेव्हा एखाद्या जिल्ह्याची निवड करण्यात येते, त्यामध्ये ''स्त्रियांच्या शैक्षणिक मागासलेपणाची स्थिती'' हा घटक लक्षात घेतला जातो. त्याचबरोबर पटनोंदणी वाढविणे, ती टिकवून ठेवणे व गुणवत्ता सुधारणे यावर भर दिला जातो.

**४)नवोदय शाळा :**

केंद्रशासनाकडून राबविण्यात येणाऱ्या या अभियानांतर्गत नवोदय शाळांमध्ये प्रवेश दिल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी $^{१}/_{३}$ या मुली असणे आवश्यक आहे. नवोदय शाळा व केंद्रीय विद्यालयामध्ये १२वी पर्यंतचे शिक्षण मोफत दिले जाते.

**५)सर्वशिक्षा अभियान :**

२००१ साली सुरू झालेल्या अभियानाचे, मुख्य उद्दिष्टांपैकी एक, हे सार्वत्रिक व प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी मुलींच्या शिक्षणावर भर देणे हा आहे. त्यानुसार महत्त्वाच्या दोन गोष्टींवर विशेष भर देण्यात आला. त्यात गुणवत्तापूर्ण शिक्षण व जीवनकौशल्य शिकविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

**६)मुलींच्या शिक्षणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम :**

हा कार्यक्रम २००३ साली सुरू करण्यात आला. हा कार्यक्रम सर्वशिक्षा अभियानाचाच एक महत्त्वपूर्ण भाग आहे. यानुसार शैक्षणिकदृष्ट्या मागास गटामधील 'शिक्षण घेत असलेल्या' व शाळाबाहेरील अशा दोन्ही परिस्थितीमधील मुलींच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्यांना साधने पुरविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. या अंतर्गत मीना मंच, शिकवणी वर्ग, कौशल्य विकास, बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षण इ. कार्यक्रमाद्वारे मुलींच्या शिक्षणाचा दर्जा उंचावण्यावर भर दिला जातो.

**७)कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय :**

अनु. जाती, जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक समुदायातील मुलींना उच्च प्राथमिक स्तरावरील दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी जुलै २००४ साली ही योजना सुरू करण्यात आली. SC/ST/OBC अल्पसंख्यांक यांना ७५% आरक्षित जागा ठेवल्या जातात व २५% जागा दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील मुलींना राखीव असतात.

**८)सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना :**

या योजनेची सुरुवात १९८३-८४ मध्ये करण्यात आली. ही योजना १ ली ते ८ वी

दरम्यान शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास वर्गातील विद्यार्थिनींसाठी सुरू करण्यात आली. ही स्वयंस्फूर्त योजना असून शिक्षक गावातील स्थानिक नागरिकांच्या सहाय्याने २००० रु. इतकी रक्कम विद्यार्थिनीच्या नावाने बँकेत जमा करतात. त्याद्वारे शिक्षणाचा खर्च मागविला जातो.

**९)अहिल्याबाई होळकर योजना :**

मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने १९९६-९७ पासून ही योजना सुरू केली या अंतर्गत शाळेची सोय नसलेल्या ग्रामीण भागात ५ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना शिक्षणासाठी गावाबाहेर जाण्यासाठी महाराष्ट्र राज्य वाहतूक महामंडळाच्या बसेसमधून मोफत प्रवासाची सुविधा दिली जाते.

**१०)माध्यमिक शिक्षण प्रेरक योजना :**

अनु. जाती व अनु. जमातीमधील मुलींचे माध्यमिक शाळेतील प्रमाण वाढावे व त्यांची गळती थांबवावी या उद्देशाने २००८-२००९ या वर्षी ही योजना सुरू करण्यात आली.

अशा अनेक योजनांच्या माध्यमातून महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जातो.

**६.२.३ विकास :**

आज प्रत्येक देशाला विकासाची गरज आहे. प्रत्येक देश, समाज आणि व्यक्ती त्यादृष्टीने प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर ठिकठिकाणी केला जात आहे. काही देशांनी देशांतर्गत संसाधनाचा योग्य वापर करून फार मोठ्या प्रमाणात विकास केला आहे. काही देश विकासासाठी प्रयत्नशील आहेत, तर काही देश अजूनही अविकसित आहेत. यानुसार जगात तीन प्रकारचे देश आढळून येतात. विकसित, विकसनशील, अविकसित या स्तरात विविध देश विभागले गेले आहेत. आर्थिक विकास घडवून आणण्याची सर्वच देशांमध्ये स्पर्धा सुरू झालेली आहे. नैसर्गिक साधनाचा उपयोग आर्थिक विकास साधण्यासाठी केला जाऊ लागला आहे. यातून अनेक प्रकारच्या समस्या जाणवू लागल्या आहेत. देशाचा आर्थिक विकास म्हणजेच प्रगती असे मानले जाऊ लागले आहे. पण आजच्या आधुनिक युगात विकासाच्या संकल्पनेत बदल झालेला आहे. आर्थिक प्रगती होणे, राष्ट्रीय उत्पन्न वाढणे ही केवळ आर्थिक वृद्धी होय. त्याला खऱ्या अर्थाने विकास म्हणता येणार नाही. आर्थिक वृद्धीबरोबरच सामाजिक विकास होणे आवश्यक मानले जाऊ लागले.

**६.२.३.२ विकासाचा अर्थ :**

विकास ही एक प्रक्रिया आहे. पूर्वी विकास म्हणजे केवळ आर्थिकवृद्धी असे मानले जाई. आर्थिक विकास झाला की देशातील इतर क्षेत्रांचा विकास आपोआप होतो असे समजण्यात येत असे. पण ज्याला आर्थिक विकास समजला जात होता त्यामुळे केवळ व्यक्तीचे, देशाचे आर्थिक उत्पन्न वाढले जाते. पण यातून सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्राचा विकास होत नव्हता. म्हणजेच विकास हा केवळ आर्थिकच नव्हे तर तो सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक इ. सर्वच दृष्टीने होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे विकासाची नवीन संकल्पना मांडण्यात आली. त्या व्याख्या पुढीलप्रमाणे -

**भारतीय नियोजन आयोग :**

भारतीय नियोजन आयोगाने विकासाची व्याख्या करताना असे सांगितले आहे की, ''एका बाजूला अनुपयोग वा उपयोगाखाली असलेल्या मानवी शक्तीच्या मात्राचे कमी किंवा जास्त प्रमाण आणि दुसऱ्या बाजूला नैसर्गिक संसाधनाचा उपयोग करण्यात आला नाही याचे सहअस्तित्व असणारे वैशिष्ट्य असलेला देश होय.''

**जॉन ड्रेव्नोव्सकी :**

''विकास ही सामाजिक आणि आर्थिक वास्तवतेच्या संख्यात्मक वृद्धी आणि गुणात्मक परिवर्तनाची एक प्रक्रिया असून, त्या प्रक्रियेस सामाजिक किंवा आर्थिक विकास प्रक्रिया म्हणता येईल. विकास प्रक्रियेचा आर्थिक आणि सामाजिक या दोन्ही घटकांशी संबंध असल्याने 'शुद्ध' सामाजिक किंवा 'शुद्ध' आर्थिक विकास संभवत नाही. ती एक प्रक्रिया आहे. म्हणून त्यास साधेपणाने विकास म्हणणे योग्य ठरेल.''

**यू. एन. ओ. :**

अशा देशास विकसनशील म्हणता येईल की, ज्यामध्ये प्रतिव्यक्ती वास्तविक उत्पन्न हे संयुक्त राज्य, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि पश्चिम युरोपच्या प्रतिव्यक्ती वास्तविक उत्पन्नाच्या तुलनेत कमी आहे.

अशाप्रकारे विकास म्हणजे केवळ आर्थिक विकास नव्हे तर सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक इ. क्षेत्रातील विकाससुद्धा अभिप्रेत आहे. म्हणजेच समाजाच्या संरचनेत असे परिवर्तन की जे सर्व स्तरातील मानव समूहाच्या जीवनात घडून येईल. म्हणून विकासाची नवीन संकल्पना व्यापक आहे. आर्थिक क्षेत्राबरोबरच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक इ. क्षेत्रातदेखील विकास घडून येणे म्हणजे विकास होय.

**महिला विकास :**

मानवी विकासाचा संबंध हा महिला विकास आणि सबलीकरणाशी जवळचा व घनिष्ट आहे. हा संबंध संशोधनांनी स्पष्ट आढळून आला आहे. महिलांचा एकूण लोकसंख्येत ४८.४६% (२०११च्या जनगणनेनुसार) एवढे प्रमाण आहे. या अनुषंगाने महिला या मानवसंसाधनातील महत्त्वाचा घटक आहे. देशाच्या शाश्वत विकासासाठी महिलांचा सामाजिक, आर्थिक विकास होणे अनिवार्य आहे.

शासन घटनात्मक तरतुदीच्या आधारावर महिलांच्या सर्वांगीण कल्याण, विकास आणि सबलीकरणासाठी निरंतर प्रयत्नशील आहे. महिला व बालविकास मंत्रालय हे महिलांच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी कार्य करते.

महिलांच्या सशक्तीकरणासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे वर्ष 'महिला आंतरराष्ट्रीय वर्ष' म्हणून घोषित केले. त्याचबरोबर १९७५-८५चा कालखंड हा महिला आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून जाहीर केले. ८ मार्च हा महिला दिन म्हणून प्रत्येक वर्षी साजरा केला जातो. हे सर्व करण्यामागचा एक उद्देश म्हणजे स्त्रियांच्या समस्यांकडे, त्यांच्या गरजांकडे, समाजाचे, शासनाचे लक्ष वेधून घेणे व त्यांना मूलभूत अधिकार प्राप्त करून देणे. ते त्यांच्यापर्यंत

पोहोचविण्यासाठी तसे उपक्रम शासनास हाती घेण्यास भाग पाडणे. केंद्र व राज्य शासन सतत स्त्रियांच्या विकासाचे विविध उपक्रम हाती घेऊन स्त्रियांचा आर्थिक व सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करत आहे. तरीही स्त्रियांच्यासमोर अनेक आर्थिक, सामाजिक समस्या उभ्या आहेत.

**महिलांच्या विकासात येणारे अडथळे वा समस्या**

शासन जरी विविध उपक्रम-कार्यक्रम राबवून स्त्रियांची सामाजिक, आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करीत असले, अगदी थोड्या व काही विशिष्ट गटातील स्त्रियांच्या जीवनात सुधारणा झालेली असली तरी अजूनही समाजातील विविध जाती-धर्मातील स्त्रियांची सामाजिक व आर्थिक स्थिती ही चिंताजनक आहे. स्त्रियांना विकासापासून वंचित ठेवणाऱ्या या समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१)स्त्री-पुरुष विषमता :**

२०११ च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येमध्ये महिलांची संख्या ४८.४६ टक्के एवढी आहे. मात्र शतकानुशतके सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनापासून परावृत्त ठेवण्यात आले होते. समाजातील सर्व स्तरात त्यांना दुय्यम दर्जा देऊन मोठी स्त्री-पुरुष असमानता निर्माण करण्यात आली. म्हणजेच लोकसंख्येच्या निम्म्या गटास हक्कापासून परावृत्त ठेवलेल्या समाजास मुक्त व विकसित समजले जाऊ शकत नाही.

**२)सामाजिक परंपरा :**

भारतीय समाजात स्त्रियांना प्रत्येक क्षेत्रात निम्न दर्जा दिला गेला. त्याला विविध रूढी, प्रथा, परंपराही जबाबदार आहेत. मुलीचा जन्म नकोसा, मुलास प्राधान्य, स्त्री-भ्रूण हत्या, जन्मपूर्व गर्भलिंग, संपत्तीवरील अधिकार नाकारणे, विधवा स्त्रियांना दुय्यम दर्जा, स्त्रियांच्या भ्रमणावर नियंत्रण, आरोग्य व शिक्षण यात मुलगा मुलगी भेद इ. रूढी, 'प्रथां'मुळे स्त्रियांच्या विकासात अडथळे निर्माण होत आहेत.

**३)स्वातंत्र्याचा अभाव :**

भारतीय स्त्रियांना पुरुषांएवढे स्वातंत्र्य नाही. ती अगदी जन्मापासून ते मृत्यूपर्यंत इतरांवर अवलंबून असते. ती इतरांवर अवलंबून असल्यामुळे स्वतंत्र्य निर्णय घेऊ शकत नाही. त्यामुळे तिचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही. तिला तिच्या क्षमता सिद्ध करण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे तिचा विकास होण्यास अडथळे निर्माण होत आहेत.

**४)दारिद्र्य :**

स्त्रियांना कुठल्याही प्रकारचे स्वातंत्र्य नसल्या कारणामुळे, तसेच सर्व प्रकारच्या संधीच्या अभावामुळे त्या दारिद्र्यात जीवन जगत आहेत. एकतर आर्थिक स्वातंत्र्य नाही आणि दुसरे म्हणजे परावलंबन त्यामुळे त्यांचा आर्थिक विकास झाला नाही. ज्या कुटुंबात दारिद्र्य आहे, काही वेळेस अशा कुटुंबातील पालक मुलींना विकतात. काही कुटुंबातील पुरुष स्त्रियांना वेश्यावृत्ती करण्यास भाग पाडतात. अशा अनेक समस्यांना गरिबीमुळे तोंड द्यावे लागते.

**५)महिलांवरील हिंसाचार :**

पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांना अबला समजले गेल्याने त्यांच्याविरुद्ध हिंसाचाराची प्रवृत्ती निर्माण झाली. त्यांना कुटुंबात व कुटुंबाबाहेर हिंसाचाराला सामोरे जावे लागते. तसेच स्त्रिया पुरुषांच्या विविध अत्याचाराला बळी पडतात. त्यांची मानहानी, शारीरिक शोषण केले जाते. त्यांच्यावर शारीरिक, मानसिक अत्याचार केले जातात. हुंड्यासाठी बळी दिला जातो. अशा अनेक प्रकारच्या हिंसात्मक प्रवृत्तींना सामोरे जावे लागते.

**६)व्यावसायिक शिक्षणाच्या अपुऱ्या संधी :**

जरी शेजारच्या लहान शहरात मुली शाळेत जात असल्या तरी सर्व ठिकाणी शिक्षणाच्या पुरेशा सोयी नसल्याने विशेष किंवा उच्च शिक्षण याचा लाभ घेणे त्यांना शक्य होत नाही.

**७)नोकरीच्या संधीचा अभाव :**

अगदी सुशिक्षित स्त्रियांना देखील नोकऱ्यांची चणचण जाणवते. अशा प्रकारच्या बेकारीमुळे त्यांना कमी वेतनावर जास्त वेळ काम करावे लागते. परिणामी अशी नोकरी सरकारी व संघटित क्षेत्रातील नियमित नोकरांना मिळते. त्याप्रमाणे आर्थिक व सामाजिक सुरक्षा देऊ शकत नाही.

**८)आरोग्यविषयक समस्या :**

योग्य व पोषक आहाराच्या अभावामुळे स्त्रिया आजार, साथीचे रोग, ताणतणाव यांना सहज बळी पडतात. त्यात एड्ससारख्या भयानक आजाराची भर पडली आहे. पायाभूत सोयींचा अभाव, औषधाचा कमी पुरवठा वा अनुपलब्धता याबरोबरच आरोग्याविषयीच्या असणाऱ्या गैरसमजुती, त्यांच्याप्रति असणाऱ्या जागृतीचा अभाव, सामाजिक प्रथांमुळे आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष यांचा एकंदरित परिणाम महिला विकासावर होतो.

**९)सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रातील संधीचा अभाव :**

स्त्रियांना धोरणात्मक निर्णय घेणाऱ्या व त्या धोरणाची अंमलबजावणी करणाऱ्या सामाजिक, आर्थिक व राजकीय संस्थांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व दिले जात नाही. जरी स्थानिक स्वराज्य संस्थेत ५०% आरक्षण असले तरी त्यांना तेवढे अधिकाराचा वापर करू दिला जात नाही. विधानसभा, लोकसभेमध्ये अगदीच अल्पसंख्या आहे. त्यामुळे महिलांचा या क्षेत्रातील विकास झाला नाही.

यासारखे अनेक अडथळे महिला विकासात येत असल्याचे आढळून येते.

**हिंसा :**

समाजाची प्रगती जसजशी होत आहे तसतसे स्त्रियांविरुद्धचे हिंसाचार वाढत आहे. समानतेच्या तत्त्वाचा स्वीकार करून देखील स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जात आहे. त्या विविध अत्याचाराला बळी पडत आहेत. स्त्रियाविरुद्धच्या हिंसाचारात त्यांना दुखापत केली जाते. इजा केली जाते, धमकावले जाते. शारीरिक, मानसिक छळ केला जातो. हुंडाबळी, विनयभंग यासारख्या अत्याचारांचा समावेश होतो.

भारतामध्ये दर ४७ मिनिटाला एक बलात्कार होतो, ४४ मिनिटाला छेडछाड, टिंगल

टवाळी होते. २० मिनिटांस एक विनयभंग, २० मिनिटास हुंडाबळी, इ. प्रकारची हिंसा स्त्रियांबाबत होते.

हिंसाचाराचे प्रमाण पाहिले तर २५% मानसिक यातना, २७% विनयभंग, १३% टिंगल टवाळी, १५% अपहरण, १४% बलात्कार, ६% हुंडाबळी असे आढळून येते.

म्हणजेच आजही आधुनिक म्हणून घेणाऱ्या समाजात स्त्रियांवर अत्याचार मोठ्या प्रमाणात होताना दिसतात.

**पत्नीस मारहाण :**

सर्व प्रकारच्या स्तरात स्त्रियांना मारहाण केली जाते. भारतामध्ये तर पत्नीला मारहाण करणे, सर्वसामान्य, समाजमान्य वर्तन समजले जाते. पतीकडूनच नव्हे तर त्याच्या नातेवाइकांकडूनसुद्धा मारहाण केली जाते.

पती त्याच्या पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ करतो. शारीरिक मारहाणीत चापट मारणे, या प्रकारापासून ते लाथाबुक्क्यांनी मारणे, वस्तू फेकून मारणे, शारीरिक यातना देणे, इ. अशा प्रकारच्या मारहाणीत हात-पाय मोडणे, प्रसंगी जीवही जातो. एवढ्या क्रूरतेने पत्नीस मारहाण केली जाते. त्याचबरोबर मानसिक त्रासही दिला जातो. या प्रकारात टोचून बोलणे, अपमान करणे, अपशब्द बोलणे, चारित्र्यावर संशय घेणे, बोलण्यावर संशय घेणे, इ. प्रकारचा मानसिक त्रास दिला जातो.

**विधवा स्त्रीविरुद्ध अत्याचार :**

विवाहानंतर पती मृत झाला किंवा एक-दोन अपत्यानंतर पतीचा मृत्यू झाला तर त्या स्त्रीला संपूर्ण जीवन वैधव्यात घालवावे लागते. मुलांचे संगोपन करावे लागते किंवा प्रौढ वयात वयाच्या ४०-५० वर्षांनंतर स्त्रिया विधवा होतात. बालविधवा, अपत्य असणाऱ्या आणि प्रौढ विधवांच्या समस्य सारख्याच आहेत. त्यांच्या सामाजिक, आर्थिक आाणि भावनात्मक समायोजनाच्या समस्या आहेत. अपत्य असणाऱ्या विधवांना वडील व आई या दोन्ही भूमिका वठवाव्या लागतात. बालविधवा आणि अपत्य असणाऱ्या विधवांचे पतीच्या घरी काळजी घेतली जात नाही. आर्थिक परावलंबामुळे त्यांच्यावर घरातल्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतात.

विधवांच्या समस्यांत आणखी भर म्हणजे घरच्यांकडून होणारी मारहाण, भावनात्मक दुर्लक्ष, शिवीगाळ करणे, लैंगिक दुरुपयोग, अधिमान्य संपत्तीपासून वंचित ठेवणे, विधवेच्या मुलांचा दुरुपयोग इ. अनेक प्रकारच्या हिंसेला सामोरे जावे लागते.

**हत्या (हुंडाबळी/भ्रूणहत्या) :**

भारतामध्ये १९८० नंतर हुंडाबळीमध्ये वाढ झालेली आढळून येते. हुंड्याची पूर्तता झाली नाही तर किंवा माहेरहून वेळोवेळी मौल्यवान वस्तू जर आणल्या नाही तर तिचा वेगवेगळ्या प्रकारे मानसिक, शारीरिक छळ केला जातो. तरीही तिने कुटुंबाच्या गरजा पूर्ण केल्या नाही तर तिला जाळून मारले जाते, विहिरीत ढकलले जाते, इ. प्रकारे तिची हिंसा केली जाते.

पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये मुलांना मुलांपेक्षा अधिक महत्त्व दिले जाते. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा, म्हातारपणाची काठी म्हणून बघितले जाते. मुलीकडे परक्याचे धन म्हणूनच बघितले जाते. परिणामी गर्भलिंग चिकित्सा करून गर्भामध्ये मुलीचा गर्भ आहे का मुलाचा गर्भ याची चाचणी केली जाते आणि जर तो गर्भ मुलीचा असला तर गर्भपात केला जातो.

**बलात्कार :**

बलात्कार ही घटना (हिंसा) सर्वच देशात गंभीर स्वरूप धारण करीत आहे. विकसनशील व अविकसित देशांत याचे प्रमाण तुलनात्मक दृष्टीने जास्त दिसून येते. वयनुसार बलात्काराचे प्रमाण १६ ते ३० वर्षांच्या वयातील स्त्रियांवर सर्वात जास्त आहे. ते ५६ टक्के एवढे आहे. १० वर्षांपेक्षा कमी वयातील मुलींवर बलात्काराचे प्रमाण ४.२ टक्के एवढे आहे. १० ते १६ वर्षांतील २२.८ टक्के मुलींवर बलात्कार होतो. ३० वर्षांच्या वरील १७ टक्के स्त्रिया बलात्कारासारख्या अत्याचाराला बळी पडतात. बलात्कार हा फक्त गरीब, कनिष्ठ वर्गातीलच स्त्रियांवर होत नाही तर या अत्याचाराल सर्व स्तरातील मुली बळी पडतात. इतकेच नव्हे तर भिकारी, कचरा वेचणाऱ्या, मंतिमंद, गतिमंद मुलीसुद्धा अशा अत्याचाराच्या बळी ठरतात.

अशा बलात्कारासरख्या माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटना समाजासमोर येत नाहीत याचे कारण म्हणजे समाजाचा असलेला दबाव. जर अशा प्रकारास विरोध केला तर समाजात तिची बदनामी केली जाते. यामुळे घाबरून स्त्रिया अशा घटना पुढे आणत नाहीत.

सर्वसाधारणपणे बलात्कार हा ओळखीच्या व्यक्तीकडूनच केला जातो. त्यामुळे अशा घटना उघडकीस येत नाहीत. काही बलात्कार हे अनोळखी व्यक्तीकडून केले जातात याचे प्रमाण २० टक्के एवढे आहे. अशा अत्याचाराच्या बळी ठरलेल्या स्त्रियांना अपमानीत जीवन जगावे लागते. समाजात त्यांना अगदी हीन समजले जाते. त्यामुळे अशा अनेक स्त्रिया आत्महत्या करतात.

**महिला सबलीकरण–महिला विकासाच्या योजना कार्यक्रम–**

**महिला सबलीकरण :**

कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय अशा सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना हक्क प्रदान करून त्यांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करणे, विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे आणि त्या माध्यमातून स्त्री–पुरुष असमानता कमी करणे. या प्रक्रियेला महिला सबलीकरण असे म्हणतात.

महिला सबलीकरणासाठी केंद्र व राज्य सरकार यांनी विविध अंगी प्रयत्न केले आहेत. ते पुढील प्रमाणे –

**१) महिला शिक्षण :**

सर्वशिक्षा अभियानसारख्या सर्वव्यापक कार्यक्रमांमुळे बालिकांच्या शिक्षणावर सकारात्मक परिणाम घडून आलेला आहे. लिंगभाव समानता निर्देशांक ०.९४ इतका तर उच्च प्राथमिक स्तरासाठी ०.९२ इतका झाला. तसेच प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावरील मुलींच्या पटनोंदणीमध्येही वाढ झाली आहे. ५–१४ या वयोगटातील मुलींची पटावरची संख्या

वाढली. ती २००९-१० मध्ये ८७.७७ एवढी झाली.

परंतु भारत मानव विकास अहवाल २०११ नुसार पटनोंदणी दर जरी वाढला असला तरी निव्वळ हजेरी दर अजूनही बराच कमी आहे.

महिलांच्या साक्षरता दरातही ५३.७% (२००१) वरून ६५.४६% (२०११) अशी वाढ झाली आहे.

**२) महिला व आरोग्य :**

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामुळे स्त्रियांच्या आरोग्यविषयक निर्देशांकात सुधारणा झाली आहे. भारत मानव विकास अहवालानुसार माता मृत्यू प्रमाण २००३ मधील एक लाख जिवंत जन्मामागे ३०१ हून २००९ मध्ये २१२ पर्यंत कमी झाले. संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण २००६ मधील ३१% च्या तुलनेत २००९ मध्ये ७८% इतके वाढले.

**३)महिला व अर्थव्यवस्था**

कार्यशक्तीमधील त्यांचे योगदान त्यांना देण्यात आलेल्या कामाची गुणवत्ता, त्यांच्या जीडीपीमधील योगदान ही महिलांचे अर्थव्यवस्थेतील मुख्य प्रवाहीकरणाची निदर्शक आहेत. राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमामध्ये महिलांसाठी २३१ मोड्युलर कोर्सची ओळख करण्यात आली आहे. तसेच महिलांचे अर्थव्यवस्थेत एकात्मिकरणासाठी सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या मार्गाने त्यांचे वित्तीय समावेशन करणे एक महत्त्वाचा डावपेच आहे. नाबार्डची स्वयं-सहायत्ता गट-बँक लिंकेज प्रोग्राम ही सूक्ष्म वित्तपुरवठ्याची जगातील सर्वात मोठी योजना आहे. त्याअंतर्गत मार्च २०१० अखेर ६९.५३ लाख स्वयं-सहाय्यता गट बँकेशी जोडण्यात आले आहेत. त्यापैकी ७६% गट केवळ महिलांचे आहेत.

**४)राष्ट्रीय महिला आयोग**

महिला हितरक्षणासाठी संमत करण्यात आलेल्या राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम १९९० नुसार राष्ट्रीय स्तरावर एक संवैधानिक संस्था म्हणून ३१ जाने. १९९२ रोजी राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाच्या माध्यमातून आर्थिक सबलीकरण, राजकीय सबलीकरण, महिलाविरुद्ध हिंसा व भेदभावास प्रतिबंध, वंचित गटातील महिलांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा, माध्यमांमधील महिलांच्या असभ्य प्रदर्शनावर प्रतिबंध, अशा अनेक स्तरावर हा महिला आयोग कार्य करतो आहे.

**५)राष्ट्रीय महिला सबलीकरण :**

इ.स. २००१ मध्ये ''राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरण', महिलांची प्रगती, विकास आणि सबलीकरण घडवून आणण्याच्या उद्देशाने भविष्यकालीन रूपरेषा म्हणून घोषित करण्यात आले. या धोरणामध्ये इतर बाबींबरोबरच महिलांच्या विरुद्ध भेदभाव समाप्त करणे आणि सध्याच्या संस्थांच्या सदृढीकरणासाठी विस्तृत निर्देश देण्यात आले आहेत. त्यामध्ये न्यायव्यवस्था, स्वास्थ्य देखभाल आणि अन्य सेवांची सुलभ उपलब्धता साध्य करणे, निर्णयप्रक्रियेत महिलांना समान संधी प्राप्त करून देणे, या सर्व बाबी या धोरणात समाविष्ट आहेत.

**६)महिलांशी संबंधित कायदे :**

अ)महिला असभ्य प्रदर्शन (थोपवणूक) अधिनियम - १९८६ - या कायद्यान्वये जाहिरात प्रकाशन, लेखन, चित्र किंवा इतर कोणत्याही स्वरूपात महिलांच्या अशिष्ट प्रदर्शनाची थोपवणूक करण्याच्या विशिष्ट उद्दिष्टाने संमत करण्यात आला.

**ब)हुंडा प्रतिबंधक कायदा**

हुंड्याची सांस्कृतिकदृष्ट्या संमत पद्धत परिणामस्वरूप महिलांवर होणारा हिंसाचार हे भारतीय महिलाविरुद्ध भेदभावाचे सर्वात प्रमुख स्वरूप आहे. 'राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्युरो' (२००९) अनुसार २००९ मध्ये हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ अंतर्गत ५६५० घटनांची नोंद करण्यात आली.

**क)अनैतिक व्यापार (थोपवणूक) कायदा १९५६**

या कायद्यानुसार व्यापारी लैंगिक शोषणासाठी केल्या जाणाऱ्या अनैतिक व्यापाराची थोपवणूक करण्यासाठी असलेला एक प्रमुख कायदा आहे. उदा. वेश्यागृह चालविणे, वेश्या व्यवसायाच्या कमाइवर जगणे, वेश्या व्यवसायासाठी व्यक्ती मिळविणे, प्रवृत्त करणे किंवा घेऊन जाणे इत्यादी यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने हा कायदा बनविण्यात आला.

**ड)गर्भधारणापूर्व आणि जन्मपूर्व निदानतंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा - १९९४**

वैद्यक समुदायामार्फत लिंग निवडीच्या भेदभावपूर्वक प्रकारांना आळा घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने हा कायदा करण्याचे आदेश दिले. या कायद्याने अनुवंशिक चयापचयविषयक समस्या, गुणसूत्रांविषयी समस्या, गर्भ वा गर्भवती महिलेच्या जीवास धोका असल्यास जन्मपूर्व चाचण्या काही अटींची पूर्तता करून करण्याची संमती दिली आहे. लिंग निवडीसाठी अशी चाचणी करणाऱ्या डॉक्टर व व्यक्तींना शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

**७)कौटुंबिक हिंसाचारापासून महिला संरक्षण कायदा - २००५**

हा कायदा घरातील हिंसाचाराने पीडित महिलांना आदेश, निवास आदेश, देखभाल भरपाई आणि अस्थाई कस्टडी आदेशांच्या स्वरूपात संरक्षणात्मक नागरी उपाययोजना उपलब्ध करून देतो.

या कायद्याने एका समन्वयीत अंमलबजावणी व्यवस्थेची निर्मिती केली आहे. ज्याद्वारे महिलांना निवारा, वैद्यक सुविधा आणि न्यायिक सहाय्यासारख्या आधारभूत सुविधा सुलभतेने उपलब्ध होतील.

**८)नोकरीच्या ठिकाणी लैंगिक छळापासून महिलांचे संरक्षण विधेयक - २०१०**

या विधेयकात सर्व प्रकारच्या कामाच्या ठिकाणी (सरकारी, खाजगी, संघटित, असंघटीत) लैंगिक छळाविरुद्ध संरक्षणाची तरतूद करण्यात आली, ती थांबविण्यासाठी व तक्रार निवारणासाठी ही तरतूद करण्यात आली आहे.

## स्वयंअध्ययन

प्र.१ सविस्तर उत्तरे लिहा.

१) आरोग्याचा अर्थ सांगून भारतीय स्त्रीच्या आरोग्यविषयक समस्या विशद करा.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

२) आरोग्यविषयक समस्या सोडविण्यासाठी शासनाने केलेल्या उपाययोजना सांगा.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

३) स्त्रियांच्या शिक्षणातील अडथळे कोणते ते सविस्तर वर्णन करा.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

४) स्त्रियांसाठी शासनाने शिक्षण क्षेत्रात केलेल्या तरतुदी स्पष्ट करा.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

५) विकास म्हणजे काय? स्त्रियांच्या विकासातील विविध अडथळे सांगा.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

६) स्त्रियांच्या विकासाकरिता शासनाने केलेल्या उपाययोजना कोणत्या त्या सविस्तर लिहा.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

७) स्त्रियांच्या सामाजिक सुरक्षेच्या संदर्भात केलेल्या विविध कायद्यांची माहिती द्या.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

प्र.२ टिपा द्या.

१) आरोग्यविषयक योजना.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

२) शिक्षणाच्या विकासाकरिता योजिलेले उपाययोजना.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

३) स्त्रीअत्याचार प्रतिबंधात्मक कायदे.

--------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

४) हुंडाबळी.

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

५) कौटुंबिक हिंसाचार.

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

## ६.४ सारांश

अशारितीने या घटकात आपण प्रमुख सामाजिक समस्यांचा अभ्यास केला. त्यात प्रामुख्याने आरोग्यविषयक, शिक्षण विषयक व विकासाबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली.

## ६.५ पारिभाषिक शब्द :

संसाधन - Resource
शौचास - Toilet
विकसनशील - Developing

## ६.६ संदर्भ सूची / अधिक वाचनासाठी पुस्तके


१) डॉ. राव व दी. - प्राचीन भारतीय संस्कृती

२) डॉ. प. म. राहूरकर व प्रा. रं. ना. मालपाणी, प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, पुणे कॉंटिनेंटल प्रकाशन, आठवी आवृत्ती - १९९४

३) विद्युत भागवत, शर्मिला रेगे - भारतातील समकालीन कुळाचे प्रश्न - स्त्रीवादी चर्चा विश्वाचा आढावा.

4) Singh R. V. (2011), "Women Empowerment in India", New Delhi, Shree Publishers & Distributors.

5) Chhattarji Mohini (2005), "Women's Human Rights", Jaipur, Avishkar Publisher and Distributor.

6) Ghosh Utpal Kumar (2003) "Issues on empowerment of Women", Delhi, Mohit Publication.

७) सिंह जनमेजय, (२०१०), ''आधुनिकता एवं नारी सशक्तीकरण'', जयपूर, रावत पब्लिकेशन्स.

८) शहा घनश्याम (२००८), ''भारतातील सामाजिक चळवळी'', अनुवाद : प्राची चिकटे, पुणे, डायमंड पब्लिकेशन.

९) धडियाली रेहाना (संपा), (२००८), ''समकालीन भारतातील नागरी स्त्रिया'', अनुवाद : मंजुषा गोसावी, पुणे, डायमंड पब्लिकेशन.

१०) भागवत विद्युत, (२००८), ''स्त्रीवादी सामाजिक विचार,'' पुणे, डायमंड पब्लिकेशन.

११) देवगावकर एस. जी., देवगावकर शैलजा आणि डुमरे जयमाला, (२००९), ''सामाजिक चळवळी (परंपरागत आणि नवीन)'', नागपूर, साईनाथ प्रकाशन.

१२) नानीवडेकर मेधा, (२००६), ''महाराष्ट्रातील स्त्री चळवळींचा मागोवा'', पुणे, मागोवा प्रकाशन.

# घटक ७

# महिलांच्या चळवळी

**अनुक्रमणिका**


**७.० उद्दिष्टे**

**७.१ प्रस्तावना**

**७.२ विषय विवेचन**

**७.२.१ स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भारतातील महिलांच्या चळवळी, दारूबंदी चळवळ**

**७.२.२ महाराष्ट्र : स्वयंसाहाय्यता गट आणि दारूबंदी चळवळ**

**७.२.३ विविध मुद्द्यांवरील महिलांच्या चळवळी**

**७.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न/उपक्रम**

**७.४ सारांश**

**७.५ पारिभाषिक शब्द–शब्दार्थ**

**७.६ संदर्भसूची**


## ७.० उद्दिष्टे

या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपणास

स्वातंत्र्यपूर्व भारतातील महिलांच्या चळवळीचे स्वरूप जाणून घेता येईल.

१) स्वातंत्र्योत्तर भारतातील महिलांच्या चळवळी, तसेच दारूबंदी चळवळ जाणून घेता येईल.

२) महाराष्ट्रातील स्वयंसाहाय्यता गट आणि दारूबंदी चळवळीची वाटचाल जाणून घेता येईल.

३) विविध मुद्द्यांवरील महिलांच्या चळवळी विशेष संदर्भात स्त्रीभ्रूणहत्याविरोधी, बलात्कार, कौटुंबिक हिंसाचार आणि लैंगिक अत्याचारविरोधी चळवळीचे स्वरूप माहिती करवून घेता येईल.

## ७.१ प्रस्तावना :

भारत हा अतिप्राचीन देश असून सिंधू संस्कृती ही भारतीय समाजाची आद्य संस्कृती मानली जाते. भारतीय समाजात कुटुंबव्यवस्थेला मानाचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला हीन लेखले गेले. पुरुषांपेक्षा स्त्रीला दुय्यम स्थान देण्यात आले. पुत्रप्राप्तीसाठी

अनेक विधी केले जात, परंतु मुलगी जन्माला येणे हे दुर्भाग्याचे, दारिद्र्याचे लक्षण मानले जाई. स्त्रीला घराच्या चार भिंतीआड मुद्दाम समाजापासून, शिक्षणापासून, विकासापासून दूर ठेवले गेले. स्त्रियांना विविध नियमांत बांधून ठेवण्याचा प्रयत्न येथे केला गेला होता.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात स्त्रियांच्या दुय्यम दर्जाविषयी नकारात्मक दृष्टिकोन ठेवून स्त्रीला समाजात, घरात तसेच इतर क्षेत्रांत मानाचे स्थान मिळावे यासाठी धडपड केली. जोपर्यंत स्त्री ही चार भिंतीच्या चाकोरीतून बाहेर पडणार नाही, तोपर्यंत स्त्री प्रगतीकडे वाटचाल करणार नाही, हे सत्य लक्षात घेऊन तत्कालीन समाजसुधारकांनी मुलींसाठी शिक्षणाची दारे उघडी करण्याचा प्रयत्न केला, धर्म, प्रथा, परंपरा, सामाजिक रूढी या नावाखाली स्त्रियांवर लादली जाणारी बंधने यातून तिची सुटका होण्यासाठी, तिच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आधुनिक शिक्षणाशिवाय पर्याय नाही यासाठी काही स्त्री चळवळी उभारण्यात आल्या. ज्यामधून स्त्रीस्वातंत्र्याची, स्त्री अस्तित्वाची संकल्पना पुढे येऊ लागली.

## ७.२ विषय – विवेचन :

अगदी प्राचीन काळापासून स्त्रियांना निम्न व दुय्यम स्थान दिलेले आपणास आढळून येते. वैदिक काळापासून 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाचा उद्धार करी' असे म्हणत स्त्रीला चूल आणि मूल तसेच रांधा, वाढा व उष्टी काढा यामध्ये गोवून ठेवण्यात पुरुषी संस्कृती यशस्वी झाली आहे. परंतु त्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी महिलांच्या चळवळी अस्तित्वात आल्या.

तत्कालीन परिस्थितीत अनेक वाईट रूढी, प्रथा, परंपरा या समाजात अस्तित्वात होत्या. या स्त्री अस्तित्वाच्या चळवळींमधूनच स्त्रियांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी पुढाकार घेतला. या समाजसुधारणेसाठी लेखन साहित्य हेही एक साधन म्हणून अस्तित्वात आले. एकूणच सामाजिक-सांस्कृतिक जीवनात स्वातंत्र्य आणि समता या जीवनमूल्यांच्या प्रस्थापनेसाठी उदयास आलेल्या चळवळी व त्या चळवळींमुळे दलित-पीडित व शोषितांना आलेले भान साहित्यातून प्रगटणे स्वाभाविक होते. म्हणूनच स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारतातील महिलांच्या चळवळी पाहत असताना आपणास तत्कालीन परिस्थितीतील रूढी, प्रथा, परंपरेचा अभ्यास करावा लागतो.

### ७.२.१ स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भारतातील महिलांच्या चळवळी :

प्राचीन भारतीय संस्कृतीचा विचार केला असता स्त्रीच्या जीवनावर व्यक्तिगत तसेच सार्वजनिक स्तरावरील विविध घटकांचा फार मोठा परिणाम घडून आलेला दिसतो. प्राचीन काळात स्त्रीला एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच स्वातंत्र्य होते. परंतु काळाच्या प्रवाहात हे स्वातंत्र्यसुद्धा पितृसत्ताक कुटुंबपद्धती, रूढी, प्रथा, परंपरा याबरोबर वेगवेगळ्या कालखंडात संपुष्टात आलेले दिसून येते. परंतु आज स्त्रियांनाही स्वातंत्र्य असावे किंवा आहे याबाबत मतभिन्नता असलेली दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारतातील महिलांच्या चळवळींचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**स्वातंत्र्यपूर्व भारतातील महिलांच्या चळवळी**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारताच्या विविध भागात समाजाच्या पुनर्रचनेसाठी चळवळी झाल्या. त्यामध्ये सतीची चाल नष्ट करण्यापासून ते विधवांचा पुनर्विवाह, स्त्रियांचे शिक्षण इत्यादी अनेक विषय होते. हे प्रश्न फक्त स्त्रियांच्या चळवळीचे म्हणून उचलले गेले नाहीत, तर ते समाजाचा सर्वांगीण विकास, प्रगतीसाठी आवश्यक होते. म्हणून उपरोक्त प्रश्नासंदर्भात चळवळी झाल्या. त्यात प्रामुख्याने सतीबंदीचा कायदा इ.स. १८३२ मध्ये करण्यात आला. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी १८४८ मध्ये भिडे यांच्या वाड्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली. तसेच १८५१ मध्ये रास्तापेठेत मुलींची शाळा सुरू केली. १८५२ मध्ये वेताळपेठेत अस्पृश्यांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा सुरू केली. १८५५ मध्ये शेतकरी व शेजमजूर स्त्री–पुरुषांसाठी शाळा सुरू केली.

१८५३ मध्ये बालहत्या प्रतिबंधकगृह व प्रसूतिगृह सुरू केले. १ मे १८८२ रोजी पुणे येथे आर्य महिला समाजाची स्थापना झाली. त्याच वर्षी ताराबाई शिंदेलिखित 'स्त्री–पुरुष तुलना' हे जळजळीत भाषेतील पुस्तक प्रकाशित झाले. १८८७ मध्ये रखमाबाईने दादाजी या आपल्या नवऱ्याशी संसार करण्यास नकार दिला व त्यासाठी सहा महिने तुरुंगवासाची तयारी दर्शविली. त्याच वर्षी आनंदीबाई जोशी या भारतातील पहिल्या स्त्री डॉक्टर झाल्या. १८९१ मध्ये संमतीवयाचा कायदा पास झाला. १९१६ मध्ये महर्षी कर्वेद्वारा स्वतंत्र महिला विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. १९२१ मध्ये रघुनाथ धों. कर्वे यांच्याद्वारे 'राइट एजन्सी – संघटना १९३२ च्या सुमारास स्थापन झाल्या. राष्ट्रीय पातळीवर नॅशनल कौन्सिल ऑफ विमेन' आणि 'विमेन्स इंडिया असोसिएशन' या संस्था स्त्रियांसाठी अधिक कार्य करीत होत्या.

सर्वप्रथम स्त्री संस्थांना एकत्र आणण्याचा प्रयत्न रमाबाई रानडे यांच्या अध्यक्षतेखाली १९०४ मध्ये भरलेल्या मुंबई येथील अखिल भारतीय परिषदेत झाला. ही स्वातंत्र्यासाठी उभारलेली चळवळ होती. दुसरी अखिल भारतीय महिला परिषद १९२६ मध्ये पुण्यात स्थापन झाली. सरोजिनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय, रामेश्वरी नेहरू इत्यादी स्त्रियांनी या स्वातंत्र्य चळवळींची सूत्रे आपल्या हातात घेतली.

१९२७ मध्ये स्थापन झालेली 'ऑल इंडिया विमेन्स कॉन्फरन्स' ही सुशिक्षित स्त्रियांची एक व्यापक संघटना होती. व्यक्ती स्वातंत्र्य, समानता, सामाजिक न्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे काम ही संघटना करीत होती. स्त्रियांचे शिक्षण, कायदे, मतदानाचा हक्क, देवदासी प्रथा अशा समस्यांना वाचा फोडणारी ही पहिलीच घटना असून, ही सामाजिक घटना होती. राजकारणात भाग घेणे तिच्या उद्दिष्टात बसत नसले तरी १९३२ मध्ये आपल्या अधिवेशनात या संघटनेला असे म्हणावे लागले की, ''स्त्रीला आपल्या हक्काचे स्थान मिळविण्याचे उद्दिष्ट गाठायचे असेल, तर परिषदेला व्यापक राजकारणापासून अलिप्त राहता येणार नाही.'' १९३६ मध्ये राष्ट्रसेविका समिती स्थापन होऊन राष्ट्रउभारणीत पुरुषांच्या बरोबरीने योगदान देण्याची गरज प्रतिपादन करण्यात आली. १९३७ मध्ये अवंतीबाई गोखले व नलिनी सुखटनकर या महिला पुणे नगरपालिकेत निवडून आल्या. १९३८ मध्ये कमलाबाई सोहानी या पहिल्या स्त्रीशास्त्रज्ञ झाल्या.

अशाप्रकारे अनेक पुरुषसुधारक व स्त्रियांनी स्त्री शिक्षणाकरिता व उत्थानाकरिता वैयक्तिकरित्या व संस्थांमार्फत कार्य केलेले दिसते. स्त्री चळवळ किंवा केवळ स्त्रियांकरिता कार्य करणाऱ्या संघटनाही दिसतात. जसे : स्वर्णकुमारीदेवीची मुलगी सरलादेवी हिने

कलकत्त्यामध्ये ‘भारत स्त्री महामंडळ’ १९१० मध्ये सुरू केले. त्याचे काम नंतर इतर भागातही पसरले. १९१७ मध्ये ॲनी बेझंट, डोरोथी व मार्गारेट कुझिनने मद्रासला प्रथम व नंतर अन्य ठिकाणी 'Women's Indian Association' - WIA सुरू केले. १९१८ मध्ये लेडी टाटा व इतरांनी 'Bobamy Presidency Women's Council' सुरू केले. त्यांनी युद्धकाळात बरेच काम केले व नंतर 'National Council of Women in India' मध्ये सामील झाले. ही उेंपलळश्र १९२५ मध्ये 'Lady Memberdeen' ने स्थापित केली व यात BPWC बरोबर Calcutta Women's League of Service आणि बिहार, ओरिसा, दिल्लीचे सामील झालेत. १९२७ मध्ये मद्रास येथे स्थापन झालेल्या ने 'Women's Indian Association' त्यांचे काम झपाट्याने वाढविले. ही संघटना स्त्रियांच्या हितकारी सरकारी तत्त्वांवर दबाव आणणे, त्याचबरोबर अनाथाश्रम, आधारगृह, मॉन्टेसरी हेसुद्धा चालवित. त्यांचे ‘स्त्रीधर्म’ हे मासिकही होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्रीविषयक चळवळीचे योगदान फार मोठे आहे. १९२७ च्या महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहात स्त्रियांच्या सहभागाची सुरुवात फार मोठ्या प्रमाणावर झाली. १९३० च्या काळाराम मंदिर सत्याग्रहात पहिली अटक होणारी तुकडी स्त्रियांचीच होती. १९४२ च्या नागपूरमध्ये आयोजित अखिल भारतीय दलितवर्ग काळात राधाबाई कांबळे, जाईबाई चौधरी, अंजनाबाई देशभ्रतार, गीताबाई गायकवाड इ. महिला नेत्या आंबेडकरी चळवळ लोकांपर्यंत पोहोचवत होत्या. ‘चले जाव’ चळवळीच्या तोडीचा हा स्त्री सहभाग होता.

यावरून स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रीचळवळ आणि स्त्री वाटचाल आपल्या लक्षात येते. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनी काम केले ज्यामुळेच भारतीय संविधानात-निर्मितीत त्यांची दखल घ्यावी लागली.

**७.२.१.२ स्वातंत्र्योत्तर भारतातील महिलांच्या चळवळी**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र स्त्रियांच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थितीत उल्लेखनीय परिवर्तन होत गेले. तरीही इतर देशांतील महिलांचा विचार करता आजही भारतीय महिलांसारखी दयनीय अवस्था दुसऱ्या कोणत्याही देशातील स्त्रीची नाही. आरोग्य, शिक्षण, रोजगार या आघाड्यांवर तिची पीछेहाट झाली असल्यामुळे हाती आलेले संपूर्ण राजकीय हक्क निरर्थक बनले होते. कारण सामाजिक स्वातंत्र्याशिवाय राजकीय स्वातंत्र्याला अर्थ उरत नाही. म्हणूनच डॉ. आंबेडकरांसारख्या समाजसुधारकाने स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या, त्यांना त्यांच्या न्याय्य हक्कांपासून वंचित करणाऱ्या व परिणामी निम्न आर्थिक दर्जा देण्यास कारणीभूत ठरणाऱ्या परंपरागत धार्मिक व सामाजिक रूढींविरुद्धचे आंदोलन स्वातंत्र्ययुद्धाबरोबरच सुरू केले होते. दीर्घकालीन परंपरांनी बधिर झालेल्या स्त्रीमनाला चेतन करण्याचे सामर्थ्य शिक्षणातच आहे हे फुले, कर्वे आणि डॉ. आंबेडकरांनी हेरले होते. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांचा मोठा सहभाग होता. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्त्री स्वातंत्र्यलढा लढली. याचा एक सुप्त परिणाम असा झाला की, स्त्रियांतील हिनत्वाची भावना कमी झाली व आत्मविश्वास वाढला. आरंभीच्या काळातील स्त्रीमुक्ती चळवळीचे स्वरूप तसे सौम्य वाटत असले तरी या चळवळीला भक्कम पायावर उभे करण्याचे कार्य याच काळातील आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण प्रौढ मतदान पद्धती स्वीकारली. भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना पुरुषांबरोबरचा सामाजिक दर्जा दिला. स्त्रियांचा सामाजिक व आर्थिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने विविध योजना आखण्यात आल्या. मुख्य म्हणजे हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रीचे कुटुंबातील स्थान, तिचा वैवाहिक दर्जा यासारख्या बाबींच्या संदर्भात स्पष्ट व पुरोगामी धोरणाचा स्वीकार केला गेला.

**हिंदू कोड बिल :**

स्त्रीस्वातंत्र्याचा जाहीरनामा असलेले हिंदू कोड बिल डॉ. आंबेडकरांनी केवळ एका जातीसाठीच नव्हे, तर संपूर्ण हिंदू स्त्रियांच्या हक्कासाठी, उन्नतीसाठी, विकासासाठी अत्यंत परिश्रमपूर्वक हिंदू कोड बिल १९४८ मध्ये संसदेत मांडले. यामध्ये प्रामुख्याने –

१) घटस्फोट देण्याचा अधिकार.

२) नवऱ्याने घटस्फोट दिल्यास पोटगी मिळण्याचा अधिकार.

३) पहिली पत्नी असताना पतीला दुसरा विवाह करण्यास बंदी येऊन स्त्रियांना जीवनात स्थैर्य मिळणे.

४) स्त्रियांना दत्तक घेण्याचा.

५) मुलाप्रमाणेच मुलीला दत्तक जाण्याचा अधिकार.

६) स्त्रियांचा स्वत:च्या मिळकतीवरचा अधिकार.

७) वडिलांच्या मिळकतीवर मुलींना मुलांइतकाच हिस्सा.

८) मुलीला वारस होण्याचा अधिकार.

९) आंतरजातीय विवाहास मान्यता.

१०) स्त्रीला स्वत:चे वारस निश्चित करण्याचा अधिकार इ. अधिकार याद्वारे मिळणार होते.

आधुनिक काळात महिलांच्या चळवळी वाढल्या. स्त्रीमुक्तीसाठी विविध कायदे करण्यात आले, परंतु ते सर्वार्थाने परिपूर्ण आहेत असे कोणीही म्हणून शकणार नाहीत. कारण त्यातही त्रुटी आहेत. त्यासाठी चळवळीद्वारे प्रयत्न होत आहेत. असे कायदे झाले तरी तेवढ्यानेच स्त्रीजीवन सुकर होणार नाही. या कायद्यांमुळे काही प्रमाणात का होईना संरक्षण मिळाले. निदान न्याय मागण्याचा मार्ग तरी कायद्याने खुला झाला. या कायद्यात पूर्णता: यावी व अंमलबजावणी सक्षमपणे व्हावी, यासाठी महिला संघटना चळवळींद्वारे प्रयत्नशील आहेत. स्त्रीचळवळीचा विचार करताना त्याचाच एक भाग म्हणून स्त्रीमुक्ती कायद्यांचा आढावा घेणे उचित ठरेल.

विधवा विवाह कायदा (१८५६), सतीबंदी कायदा (१८२९), बालविवाह प्रतिबंधक कायदा (१९२९), हिंदू विवाह कायदा (१९५६), द्विभार्या प्रतिबंधक कायदा (१९५५), नोंदणी विवाह कायदा (१८७२), सुधारित (१९५४), घटस्फोट कायदा (१९५५), पोटगी कायदा (१९४६), सुधारित (१९५६), हुंडा प्रतिबंधक कायदा (१९६१), सुधारित कायदा (१९८४), मुलींचा अनैतिक व्यापारविरोधी कायदा (१९५६), दत्तक घेण्याचा कायदा

(१९५६), वेश्याव्यवसाय प्रतिबंध कायदा (१९५६), गर्भपाताचा कायदा (१९७२), गर्भजल परीक्षणविरोधी कायदा (१९८८), मुंबई देवदासी संरक्षण कायदा (१९३४), बलात्कारासंबंधीचा कायदा, औद्योगिक व श्रमशक्तीविषयक कायदे (१९७६), फौजदारी कायदा ४९८-अ (१९८३), कौटुंबिक छळापासून महिलांचे संरक्षण कायदा (२००५), स्त्रियांचे बीभत्स प्रदर्शनविरोधी कायदा (१९८२), कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळविरोधी कायदा (१९९४) इ. ठळक कायदे महिलांवर होणारे अन्याय-अत्याचार थांबविण्यासाठी करण्यात आले, परंतु वास्तवात मात्र या कायद्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याचे दिसून येते.

**भारतातील दारूबंदी चळवळ**

भारतीय ग्रामीण समाजात अंधश्रद्धा, दारिद्र्यता, गरिबी, बेरोजगारी यामुळे येथील लोकांमध्ये मद्यपानाचे सेवन होत असलेले दिसून येते. प्रथमत: महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली दारूबंदी चळवळ सुरू करण्यात आली होती. १९३७ मध्ये काँग्रेसचे मंत्रिमंडळ सत्तेवर आल्यानंतर मद्रास, बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश, उत्तर-पश्चिम सीमा प्रांतात मद्यपान बंदीसाठी कायदे करण्यात आले आहेत. १९३८ साली मुंबई व उत्तर प्रदेशात दारूबंदी कायदे संमत करण्यात आले. मात्र स्वातंत्र्योत्तर काळातदेखील मद्यपान ही समस्या भारतात उग्र स्वरूपात अस्तित्वात आहे. त्यामुळे दारूबंदीसाठी भारतात विविध राज्यांत आजही चळवळी होताना दिसतात.

आजतागायत ग्रामीण भागात राहणारे ७० टक्क्यांहूनही अधिक लोक आहेत. ग्रामीण भागात मद्यपानामुळे अनेक अनिष्ट परिणामांना तेथील महिला बळी पडतात. दारू पिऊन पतीद्वारे पत्नीला मारहाण करणे, मानसिक छळ करणे यांसारख्या विविध हिंसाचाराच्या घटना घडतात. याबरोबरच मद्यपानामुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक हानी होते व कुटुंबास आर्थिक विवंचना सहन करावी लागते. त्यामुळे या अत्याचारास कंटाळून त्यास विरोध करण्यासाठी ग्रामीण भागातील महिलांनी संघटन घडवून आणण्यास सुरुवात केली. यातून दारूबंदीसाठीच्या चळवळी घडवून आणल्या. दारूबंदी चळवळ ही प्रामुख्याने पुरुषांच्या मद्यसेवन करण्याच्या सवयीत सुधारणा घडवून आणणारी आहे. यासाठी दारूविक्री करणाऱ्या दुकानांवर मोर्चे नेले जातात. काही ठिकाणी तर अशा दारूविक्री करणाऱ्या दुकानांची तोडफोड केली जाते. दारू पिऊन एखादी व्यक्ती जर आपल्या पत्नीस मारहाण करत असेल, तर महिला संघटितपणे त्या स्त्रीच्या बाजूने उभ्या राहतात व त्या अत्याचाराचा विरोध करतात.

**दारूबंदी चळवळीचे परिणाम :**

मद्यपानाच्या सेवनाचा सर्वात दूरगामी परिणाम हा स्त्रियांवर होत असतो. कारण पती मद्यपान करून आल्यानंतर त्याच्याकडून होणारी मारहाण, शिवीगाळ, आर्थिक हानी यामुळे कुटुंब रसातळाला जाते. त्यामुळेच दारूबंदीच्या विरोधात ग्रामीण भागातील स्त्रियांनी ज्या विविध चळवळी उभ्या केल्या त्याचे परिणाम तेथील समाजजीवनावर पडलेले दिसून येतात ते पुढीलप्रमाणे -

**१)दारूविक्रीवर बंदी :**

दारूबंदी चळवळीचा परिणाम म्हणून ग्रामीण भागात दारूविक्रीवर मोठ्या प्रमाणावर

नियंत्रण प्रस्थापित झालेले दिसून येते. दारूविक्रीचा परवाना नसणाऱ्या दुकानांच्या विरोधात कारवाई करण्यात आल्यामुळे या अवैध धंद्यांवर नियंत्रण आले. तसेच अनेक ठिकाणी परवाना असणाऱ्या दुकानांवरदेखील बंदी घातली गेली.

**२)स्त्रीअत्याचारावर नियंत्रण :**

दारू पिऊन महिलांना मारहाण करण्याच्या घटनांवर आजच्या काळात नियंत्रण आले आहे. एखादी व्यक्ती आपल्या पत्नीस व मुलांना त्रास देत असेल तर ती खासगी गोष्ट असत नाही, तर महिला संघटित होऊन त्या घटनेचा विरोध करतात. त्यामुळे स्त्रियांवरील कौटुंबिक अत्याचारावर नियंत्रण प्रस्थापित करता आले.

**३)स्त्रीसामर्थ्यात वाढ :**

दारूबंदी चळवळी या ग्रामीण भागात स्त्रीसामर्थ्यात वाढ घडवून आणणाऱ्या ठरल्या आहेत. या चळवळीच्या माध्यमातून राजकीय प्रक्रियेवर प्रभाव पडला व त्यातूनच स्त्रियांच्या प्रश्नांची दखल घेणे राजकीय नेतृत्वास भाग पाडले.

**४)कायद्यांची निर्मिती :**

दारूबंदी चळवळीची दखल घेत शासनाने दारूबंदीसाठी कायद्यांची निर्मिती केली आहे. यानुसार एखाद्या गावात ७० टक्के महिलांनी एखाद्या दारूविक्री दुकानावर बंदी घालण्याचा प्रस्ताव मांडल्यास त्या दुकानावर बंदी घातली जाते.

दारूबंदी चळवळीमुळे ग्रामीण भागातील स्त्रियांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय, कायदेशीर सक्षमीकरण घडून येण्यास मदत झाली आहे. स्त्रीवादी चळवळींच्या प्रभावामुळेच शासनाला दारूबंदीसाठी उपाययोजना करणे भाग पडले. महिलांनी आपल्या संघटन व समूहशक्तीचा आविष्कार ग्रामीण भागात दारूबंदी चळवळीद्वारे समोर आणला आहे.

**७.२.२ महाराष्ट्र : स्वयंसाहाय्यता गट आणि दारूबंदी चळवळ**

महाराष्ट्र राज्यात स्त्रियांच्या अनेक चळवळी झाल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने शिक्षण, आरोग्य, हक्क व अधिकार, आर्थिक, सामाजिक, राजकीय विकास या घटकांचा उल्लेख केला जातो. राज्यात अनेक ठिकाणी स्त्रीचळवळी उभारल्या गेल्यामुळे स्त्रियांना आपल्या हक्कांची आणि अधिकाराची जाणीव होऊ लागली. त्यामुळे शिक्षणाशिवाय आपला विकास साध्य करणे अशक्य आहे हे जाणून स्त्रिया शिक्षणासाठी पुढे आल्या. कौटुंबिक परिस्थिती सुधारण्यासाठी स्वत:च काही प्रमाणात मिळणाऱ्या पैशांची बचत करण्याची गरज भासू लागली. यातून स्वयंसाहाय्यता गटाची कल्पना पुढे आली तसेच दारूमुळे होणारे कुटुंबाची हानी थांबविण्यासाठी दारूबंदीची चळवळ पुढे आली. महाराष्ट्रातील महिला स्वयंसाहाय्यता गट आणि दारूबंदी चळवळीचे स्वरूप पुढीलप्रमाणे दिसून येते.

**महाराष्ट्रातील स्वयंसहायता गट**

स्वयंसाहाय्यता समूहाचे जनक महंमद युनूस आहेत. स्वयंसाहाय्यता गटांची संकल्पना ही बांगलादेशातून आलेली असून, याद्वारे आर्थिक व सामाजिक क्रांती घडून आलेली आहे. आपल्या अडचणीच्या वेळी एकमेकांना, परस्परांना बचतीतून आर्थिक साहाय्य करणे, आपली आर्थिक परिस्थिती बदलण्यासाठी स्वत:चे बीज भांडवल तयार करणे, सामाजिक

प्रश्नांसंबंधित विचार व कृती करणे, स्वरोजगाराची शक्ती व आत्मविश्वास वाढविण्यासाठी परस्परांच्या सहकार्याने तयार झालेल्या व्यक्तींच्या समूहाला 'स्वयंसाहाय्यता गट' म्हणता येईल. म्हणजेच ग्रामीण भागातील समान आर्थिक व सामाजिक स्तरातील तसेच ज्यांचे आचार, विचार समान आहेत, ज्यांची परस्पर जवळीक आहे, अशा लोकांचे लहान लहान गट स्थापन करून गटाच्या निर्णयानुसार गटातील सभासदांकडून दरमहा ठरावीक रक्कम जमा करून या निधीतून गटातील सभासदांच्या आर्थिक अडचणी भागविणारा गट म्हणजे स्वयंसाहाय्यता समूह होय.

**स्वयंसहायता गट स्थापनेचा उद्देश :**

'झटकून टाक जीवा दुबळेपणा मनाचा' आर्थिक प्रगती या एकाच ध्येयाने प्रेरित झालेल्या लोकांचा एक छोटासा गट स्थापन करावयाचा आहे. कारण आजपर्यंत लाभार्थीसाठी वैयक्तिक प्रयत्न केले पण यश आले नाही. म्हणून आता समूहामार्फत प्रयत्न कराचे आहेत. या समूहाचा उद्देश आहे स्वयंसहायता. 'जो दुसऱ्यावर विसंबला, त्याचा कार्यभाग बुडाला' आजपर्यंत लोकांना शासनाच्या अनुदानावर आर्थिक प्रगतीसाठी विसंबून राहवे लागत असे. स्वत: काही भर अनुदानात घालावी असा कधी प्रयत्न त्यांनी केला नाही. कमीतकमी दररोज १ रुपया जमा करावयाचा, महिन्याचे ३० रुपये जमा झाले की ते बँकेत भरायचे. आजपर्यंत बँकेत ज्यांनी स्वत:च्या नावाने खाते उघडले नाही त्या व्यक्तीला गटाच्या नावाने खाते उघडण्याची संधी या योजनेत दिली आहे. स्वत:ची मदत करायची आहे. घरात काटकसर करून जमा केलेल्या पैशांची किंमत आम्हाला कळली म्हणजे निढळ घामाच्या पैशातून जमा केलेला पैसा वाईट मार्गावर खर्च होणार नाही. तो पैसा सत्कारणी-सत्कृत्यासाठी खर्च होईल. आपण म्हणाल घर घरात बाप-लेकाचेच पटत नाही. भावा-भावाचे पटत नाही. मग गटात दहा घरांची दहा माणसे, यांचे कसे पटेल, दहा घरांची माणसे व एका ध्येयाने प्रेरित झालेली दहा माणसे जर एकत्र झाली तर निश्चितच त्यांचे ध्येय सफल होईल.

आपल्या हाताची पाच बोटे वेगवेगळी असतात, पण कोणी आपल्यावर आक्रमण केले तर प्रतिकार करण्यासाठी पाच बोटे एकत्र करून आपण मूठ बांधतो, स्वत:चे संरक्षण करतो. वेगवेगळी पाच बोटे एकत्र आल्यामुळेच हे शक्य होऊ शकते. त्याचप्रमाणे गटातील वेगवेगळ्या जातीधर्मांच्या व्यक्ती एकत्र येऊन अशक्य गोष्ट शक्य करू शकतात. म्हणून स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेंतर्गत स्वयंसहायता गट स्थापन करून त्यांचा व्यवसायासाठी कर्जपुरवठा व इतर आवश्यक ती मदत करून त्यांना स्वरोजगार मिळवून द्यावयाचा व आर्थिक प्रगती करावयाची आहे.

## स्वयंसहायता गट आणि महिला सबलीकरण

**अ)आर्थिक सबलीकरण :** महिला आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होणे ही आज काळाजी गरज झाली आहे. महिला स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून काही प्रमाणात बचत करताना दिसून येते. गटाच्या माध्यमातून ती घरात लागणाऱ्या अत्यावश्यक वस्तूंची खरेदी, मुलांचे शिक्षण, सण-उत्सव साजरे करते, व्यवसाय, उद्योग करू लागल्या. स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून केल्या गेलेल्या बचतीमुळेच आज कुटुंबात महिला पुरुषांच्या बरोबरीने आर्थिक

निर्णय घेताना दिसून येतात.

**ब)सामाजिक सबलीकरण :** भारतीय संविधानानुसार स्त्री आणि पुरुष हे समान आहेत परंतु वास्तवात मात्र चित्र वेगळेच आहे. कुटुंबात आणि समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. परंतु आधुनिक शिक्षण, कायदे, शासकीय ध्येयधोरणे यामुळे ही परिस्थिती बदलत आहे. महिलांना आज शिक्षणाचे, बचतीचे महत्त्व माहीत झाल्यामुळे ती ग्रामीण भागात महिला संघटन उभी करू लागली. यातून महिला एका गटाच्या व समूहाच्याद्वारे एकत्र येऊ लागल्या. त्यातून त्यांच्यात विचारांचे आदान-प्रदान घडून येण्यास मदत झाली. या संघटनांच्या माध्यमातूनच ग्रामीण भागात महिलांचा प्रभाव वाढण्यास मदत झाली. तिच्याकडे आज कुटुंबाचा आणि समाजाचाही बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे.

**क)राजकीय सबलीकरण :** स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून स्त्रियांच्या आर्थिक परिस्थितीत लक्षणीय बदल झाला आहे. स्त्रियांचा ग्रामीण भागात एक विशिष्ट प्रकारचा गट निर्माण होत असल्यामुळे आपल्या संख्याबळाच्या आधारावर राजकारणातही सक्रिय होणे शक्य झाले. त्यामुळे स्थानिक पातळीवर होणाऱ्या निवडणुकांत स्त्रियांना भरीव कामगिरी करता आली. गावातील विकास योजनांची आखणी व कार्यवाही करण्याच्या प्रक्रियेत स्त्रियांच्या गटास महत्त्वपूर्ण भूमिका बजावणे शक्य झाले.

अशाप्रकारे महाराष्ट्रात स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून लाखो महिलांना फायदा झाला आहे. या गटाच्या माध्यमातून महिला आज अनेक लघुउद्योग, व्यवसाय करून आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारत आहे.

**महाराष्ट्रातील दारूबंदी चळवळ**

ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार पाहिजे. तितका न झाल्यामुळे आजही ग्रामीण भागात कमालीचे दारिद्र्य, उपासमार, बेरोजगारी यांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे नैराश्य, गरिबी यामुळे ग्रामीण लोक हे मद्यपानाच्या आहारी जाऊन ही समस्या तीव्रतेने अस्तित्वात आली आहे. भारतात महाराष्ट्र हे राज्य दारूबंदी चळवळीच्या बाबतीत अग्रेसर आहे. महाराष्ट्रातील मोठी लोकसंख्या ही ग्रामीण भागात केंद्रित झालेली आहे. महाराष्ट्रातदेखील १९७० नंतरच्या काळात दारूबंदी चळवळीचा प्रभाव वाढलेला दिसून येतो. समाजप्रबोधन, विकृतीवर आळा आणि प्रशासनावर वचक अशी त्रिसूत्री घेऊन या दारूबंदी संघर्ष समितीने राज्यातील गावागावात मतदानाद्वारे दारूबंदीबाबत जागृती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रातील सामाजिक वास्तव समजून घेण्यासाठी येथील दारूबंदी चळवळीचा आढावा घेणे उपयुक्त ठरेल.

महाराष्ट्रात सुरुवातीपासूनच ग्रामीण भागात मद्यपानाची समस्या गंभीर स्वरूपाची आहे. गाव, तांडा, झोपडपट्ट्यांमध्ये देखील ही समस्या तीव्र स्वरूपात समोर आली. १९७०पर्यंत महाराष्ट्रात दारूबंदीसाठी खंबीर स्वरूपाच्या प्रयत्नांचा अभाव होता. मात्र या दशकापासूनच महाराष्ट्रात दारूबंदी चळवळीची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. जावळी या तालुक्यात प्रथम स्त्रियांनी दारूबंदीसाठी संघटितपणे लढा दिला. त्यासाठी तालुक्यातील दुकानांची तोडफोड करण्यात आली. या घटनेचा पडसाद नंतरच्या काळात महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागात

पडला व दारूबंदी चळवळीस चालना मिळाली.

## राज्याच्या विविध भागांतील दारूबंदी चळवळ

संपूर्ण राज्यात होणाऱ्या मद्यविक्रीतून शासनाला अब्जावधी रुपयांचा फायदा होतो. मात्र या दारूविक्रीमुळे अनेक गावातील तरुण आणि इतर लोक या मद्यपान किंवा दारूच्या आहारी गेले आहेत. दारूविक्रीच्या दुकानांमुळे खेड्यात राहणाऱ्या लोकाना व्यसनाधीन बनविले जात आहे. गावामध्ये दारूबंदी करण्यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार पूर्वी गावात ग्रामसभा घेऊन त्यात दारूबंदीचा ठराव मांडणे गरजेचे होते. त्यानंतर ग्रामसभेत मंजूर झालेला ठराव जिल्हा उत्पादक शुल्क कार्यालयात अधीक्षकांच्या आदेशानुसार ठरावाची शहानिशा करून प्रत्यक्ष तपासणी करण्यात यायची. या तपासणीचा अहवाल थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे आणि त्यांच्या माध्यमातून तहसीलदारांकडे पाठविण्यात येत होता. त्यानुसार तहसीलदार गावात जाऊन पाहणी करायचे आणि त्यानंतर गावात दारूबंदी करण्यासाठी मतदान घेण्यात यायचे. मतदानात गावातील महिला मतदारांपैकी ५०% महिलांनी दारूबंदीच्या बाजूने मतदान केल्यास त्या गावातील दारूविक्रीचे दुकान बंद करण्यात येते. महाराष्ट्रात १९८१ साली दारूबंदी विभागाने मद्यपानाची साडेतीन लाख प्रकरणे दाखल केली होती. यावरून मद्यपानाची समस्या महाराष्ट्रात किती तीव्र प्रमाणात अस्तित्वात आहे याची कल्पना येते. महाराष्ट्रातील पुढील प्रादेशिक विभागाचा आढावा घेत दारूबंदी चळवळीची व्याप्ती समजून घेता येईल.

### १)पश्चिम महाराष्ट्रातील दारूबंदी चळवळ

पश्चिम महाराष्ट्राचा विचार कल्यास कोल्हापूर जिल्हा दारूबंदीसाठी मोठ्या प्रमाणावर अग्रेसर आहे. कोल्हापूर जिल्ह्यात महिलांच्या मतदानाद्वारे होणारी दारूबंदीबाबतची गाजत असलेली प्रक्रिया आता राज्यातील गावागावात पोहोचत आहे. कोल्हापूर येथील जावळी हा तालुका १००% दारूमुक्त तालुका म्हणून ओळखला जातो. त्याचप्रमाणे राजापूर या तालुक्यात ७० दारूच्या दुकानांवर बंदी घालण्यात आली. पुणे, सातारा, सांगली जिल्ह्यात देखील दारूबंदीसाठी स्त्रियांनी ग्रामीण भागात चळवळी केल्या आहेत.

### २)विदर्भातील दारूबंदी चळवळ

विदर्भात चंद्रपूर, वर्धा व गडचिरोली या तीन जिल्ह्यामध्ये दारूबंदी चळवळ प्रभावी असलेली दिसून येते. येथे मोठ्या प्रमाणावर आदिवासी लोक राहत असल्यामुळे मद्यपानाची समस्या अधिक तीव्र आहे. त्यामुळे येथील महिलांनी संघटित होऊन दारूबंदीसाठी चळवळी १९९०च्या दशकात सुरू केल्या. प्रसंगी दारूबंदीसाठी स्त्रियांना हिंसाचाराच्या मार्गाचा अवलंब करून दारूची दुकाने उद्ध्वस्त केली.

### ३)मराठवाड्यातील दारूबंदी चळवळ

मराठवाडा या विभागात दारूबंदी चळवळीचा प्रभाव दिसून येत नाही. औरंगाबाद, जालना, लातूर व नांदेड या जिल्ह्यात काही प्रमाणावर दारूबंदीसाठी महिलांना संघटित होऊन मोर्चा काढला असला, तरी त्यास व्यापक चळवळीचे स्वरूप प्राप्त होऊ शकले नाही. बीड,

उस्मानाबाद या जिल्ह्यांमध्ये आज कमालीचे दारूविक्रीचे प्रमाण असेलेल दिसून येते.

**४)खानदेशातील दारूबंदी चळवळ**

जळगाव, धुळे व नंदूरबार या जिल्ह्याचा विचार करता जळगाव व धुळे जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये स्त्रियांनी पुढाकार घेऊन आज दारूबंदी केली आहे. नंदूरबार जिल्हा हा आदिवासींचा जिल्हा म्हणून ओळख असलेल्या भागात आज दारूच्या अतिसेवनाने, अनेक जर्जर व्याधी, आजार या लोकांना जडलेले दिसून येतात. शिक्षणाचे कमी प्रमाण, शासनाचे दुर्लक्ष, छुप्या पद्धतीने दारूची विक्री यामुळे या भागात दारू सेवनाचे प्रमाण अधिक असलेले दिसून येते.

महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात आज दारूबंदी चळवळी होत असल्या तरीसुद्धा शासनाच्या दुर्लक्षामुळे काही दिवसातच दारूबंदी झालेल्या गावात छुप्या पद्धतीने दारूविक्री केली जाते.

**शासकीय ध्येयधोरणे आणि उपाययोजना**

महाराष्ट्रात पूर्वीपासूनच दारूबंदीसाठी कमी-अधिक प्रमाणात चळवळी सुरू आहेत. बऱ्याच ठिकाणी नागरिकांनी आक्रमकपणे दारूअड्डे बंद पाडले. परंतु अशा पद्धतीने दारूबंदी करताना संपूर्ण गावाचा विशेषत: महिलांचा सहभाग त्यात फारच कमी दिसून आला. त्यामुळे संघर्ष समितीने आक्रमकतेला बाजूला ठेवून राज्यातील गावागावात महिलांच्या मतदानाद्वारे दारूबंदी व्हावी आणि यासाठी प्रशासनावर दबाव आणणे अशी भूमिका घेतली जाते.

महाराष्ट्रातील दारूबंदी चळवळ ही मोठ्या प्रमाणावर शासकीय धोरणांना प्रभावित करणारी ठरली आहे. मद्यपान बंदी हा राज्याच्या अखत्यारितील विषय मानला जात असल्यामुळे त्या संदर्भात योग्य धोरणांची आखणी करणे आवश्यक ठरते. स्त्री- चळवळींद्वारे दारूबंदीसाठी पुढील धोरणांच्या निर्मितीची मागणी केली जाते.

१) 'दारूबंदी' हा कार्यक्रम सार्वत्रिक स्वरूपात लागू करण्यात यावा व विकास योजनांमध्ये या कार्यक्रमाचा समावेश केला जावा.

२) दारूबंदी मंडळाची राज्यस्तरावर स्थापना केली जावी तसेच जिल्हा, गाव व वॉर्ड स्तरावर समित्या स्थापन कराव्यात.

३) दारूबंदी धोरणाचा केवळ आर्थिक बाजूने विचार न करता त्या पाठीमागील सामाजिक बाजू विचारात घ्यावी.

४) अवैध मद्यपान निर्मितीवर बंदी, सार्वजनिक मद्यपानविषयक परवाने रद्द करणे, सार्वजनिक संस्थांच्या मार्फत लोकमत जागृती करणे या मागण्या करण्यात आल्या.

५) एखाद्या विशिष्ट दारूविक्री करणाऱ्या दुकानाच्या विरोधात जर महिलांनी बंदीची मागणी केली तर ती मान्य व्हावी.

६) दारूच्या सेवनातून स्त्रियांवर होणाऱ्या कौटुंबिक अत्याचाराविरोधात संरक्षक कायदे निर्माण करावेत.

धान्यापासून दारूनिर्मितीला विरोध आणि मतदानाद्वारे दारूबंदी हे दोन्ही मुद्दे घेऊन

राज्यातील ३५ संघटनांच्या कार्यकर्त्यांनी मिळून काही महिन्यांपूर्वी राज्य दारूबंदी संघर्ष समितीची स्थापना केली आहे. सामाजिक प्रश्नांवर सातत्याने लढणाऱ्या आणि राज्यात एक दबाव गट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अंनिस, अण्णा हजारे प्रणीत भ्रष्टाचार निर्मूलन समिती, डॉ. अभय बंग यांची सर्च, वारकरी संप्रदायाची व्यसनमुक्ती संघटना, ऑल इंडिया यूथ फेडरेशन, जनवादी महिला संघटना, युवक क्रांती दल यासह अनेक संघटनांचे कार्यकर्ते या समितीवर आहेत. राज्यातील जवळपास वीस जिल्ह्या दारूबंदी चळवळीचा प्रभाव दिसून येतो. महाराष्ट्रात ग्रामीण भागाप्रमाणेच शहरी भागातील झोपडपट्ट्यांमध्ये देखील स्त्रियांनी दारूबंदीसाठी चळवळी केलेल्या दिसतात. महाराष्ट्रात स्वयंसेवी संघटना दारूबंदी चळवळीस प्रेरणा देण्याचे कार्य करतात. मात्र जोपर्यंत लोकशिक्षण व सार्वजनिक संस्थांचे सहकार्य या गोष्टी घडून येत नाहीत तोपर्यंत संपूर्ण दारूमुक्त समाजव्यवस्था निर्माण होऊ शकत नाही.

### ७.२.३ विविध मुद्द्यांवरील महिलांच्या चळवळी

आधुनिक काळात भारतात स्त्रियांच्या चळवळीमागील वैचारिक भूमिकेत बदल झालेला दिसून येतो. स्त्री–भ्रूणहत्या, बलात्कार, कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक छळ यांसारखे ज्वलंत मुद्दे भारतात अस्तित्वात आहेत. भारतीय समाजातील लिंगभावात्मक अन्यायाचे निदर्शन करणारे हे मुद्दे आजच्या काळात स्त्रीचळवळीच्या दृष्टीने मध्यवर्ती स्वरूपाचे मानले गेले व त्या विरोधात स्त्रियांचे संघटन घडून येण्यास सुरुवात झाली. हे सर्व मुद्दे शहरी व ग्रामीण भागतील स्त्रियांना समान प्रमाणात भेडसावतात. त्यामुळे त्यांचा विरोध करण्यासाठी स्त्रीवादी संघटनांमध्ये एकवाक्यता निर्माण झालेली दिसून येते. भारतात लिंगभावात्मक मुद्द्यांवरील स्त्रीचळवळी पुढीलप्रमाणे आहेत –

१)स्त्रीभ्रूणहत्या

२)बलात्कार

३)कौटुंबिक हिंसाचार

४)लैंगिक छळ

यांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येईल.

**स्त्रीभ्रूणहत्या**

स्त्री गर्भलिंगनिदान करून गर्भपात करणे याला स्त्रीभ्रूणहत्या संबोधले जाते. आईच्या पोटात गर्भाअवस्थेत मुली मारून टाकण्याच्या विकृत, हिंसक, संवेदनाहीन आणि अन्यायकारक समस्येने सध्य भारताला ग्रासलेले आहे. स्त्रीचा जन्मच नाकारणे ही आधुनिक विज्ञान युगातील सर्वात क्रूर आणि नीच कृती आहे. या ज्वलंत समस्येने गंभीर रूप धारण केले आहे. आज सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्त्री कार्य करीत आहे. पण आपल्यावर होणारा अन्याय ती निमूटपणे का सहन करते? स्त्रीभ्रूणहत्येला ती का तयार होते? ती विरोध का करत नाही? याचाच अर्थ असा की पुरुषांच्या विचारांचा आणि जुन्या विराचारांचा प्रभाव बहुतांश स्त्रियांच्या विचारसरणीवर असल्यामुळे स्त्रीभ्रूणहत्या होत आहे. जन्मास येण्याअगोदरच कन्यारत्नाचा बळी घेतला जातो. स्त्री जर स्वतंत्र विचारांची असती तर तिने स्वत:च्या पोटात वाढणारा तो अंकुर नष्ट करण्याचा विचारही केला नसता. उलट त्याला विरोध केला असता.

आज समाजात इतके विचित्र चित्र दिसत आहे की अगदी सुशिक्षित स्त्रियासुद्धा अशा पापकर्मात सहभागी झालेल्या दिसतात. त्यामुळे येथे त्यांच्या शिक्षणाचा काहीच फायदा होताना दिसत नाही. मुलगा असो की मुलगी, हे दोघेही समान आहेत असा विचार जोपर्यंत प्रत्येक स्त्रीमध्ये रुजणार नाही तोपर्यंत आपण स्वत:ला सुशिक्षित, सुविचारी, सुसंस्कारी, सुसंस्कृत झालो किंवा आहोत असे कसे समजू शकू? आज एकही क्षेत्र असे नाही जिथे स्त्रिया नाहीत. मग मुलगाच कशासाठी हवा? स्त्रीने आपली व आपल्या परिवार सदस्यांची मानसिकता योग्य ठेवलीच पाहिजे. स्त्रीभ्रूणहत्या करणे म्हणजे एका स्त्रीने आपल्या स्वत:च्या हातानेच आपला अपमान करणे होय. प्रत्येक स्त्रीने ठरवले तर स्त्रीभ्रूणहत्या थांबवता येऊ शकेल आणि असे झाले तरच आपण म्हणू शकू की खऱ्या अर्थाने महिलांमध्ये जागृती निर्माण झाली किंवा खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता आली. सर्व विवेकवादी धर्मीयांनी स्त्रीभ्रूणहत्या रोखलीच पाहिजे. मानवतावादी चळवळ उभारली पाहिजे.

स्त्री कोणत्याही जातीधर्माची असो, अडाणी किंवा सुशिक्षित असो, गरीब असो की श्रीमंत, पण तिला जर एक किंवा दोन मुलीच असतील तर अशा महिलांची प्रशासनाने, सामाजिक संघटनांनी दखल घेऊन त्यांना सन्मानित करून समाजाला त्यांचा आदर्श पटवून दिला पाहिजे. यामुळे अन्य महिलांना, समाजाला प्रोत्साहन मिळेल. मुलींना गर्भातच मारणे किंवा बालपणीच मारणे ही केवळ भारतातीलच समस्या नाही, तर जगातील अनेक देशांत कमी-जास्त प्रमाणात ही विकृती राजरोसपणे किंवा छुपेपणाने सुरू आहे. ही समस्या केवळ आजच उद्‌भलेली आहे असे नाही. प्राचीन काळापासून विविध धर्म, वंश, गट, टोळ्या, देशामध्ये ही अमानुष कृती सुरू असल्याचे संदर्भ विविध देशांतल्या इतिहासात, साहित्यात, काव्यात आढळतात. आज आधुनिक युगात, विज्ञान युगात ही स्त्रीभ्रूणहत्या व्हावी ही निंदनीय व निषेधार्ह बाब आहे. या नीच कृतीला वेळीच आवर घातला पाहिजे. भ्रूणहत्येसारखे भयावह प्रकार रोखायचे असतील तर मला असे वाटते, की कायदे बदलले पाहिजेत. अधिक कडक कायदे केले पाहिजेत. कायदे राबविणारी, लक्ष ठेवणारी स्वतंत्र यंत्रण उभारली पाहिजे. गर्भपाताची अशी प्रकरणे सामुदायिक गुन्हेगारी मानली पाहिजे. संबंधितांवर खुनाचे गुन्हे नोंदले पाहिजेत आणि कडक शिक्षा दिली पाहिजे तरच या अमानुष कृतींना पायबंद बसेल. गर्भपात घडविणारे सुशिक्षित मध्यम आणि उच्चमध्यम वर्गातले, सधन घरातले लोक आहेत ही बाब अधिक गंभीर आहे.

ग्रामीण व शहरी भागांत शिक्षित-अशिक्षित कुटुंबांमध्ये मुलगा जन्माला यावा असे वाटत असते, तर याची कारणे पुढीलप्रमाणे :

१) मुलगा हाच वंशाचा दिवा असतो.

२) मुलगा हा उत्पन्नाचे साधन असतो.

३) हुंडाविरोधी कायदा असूनही मुलीला हुंडा द्यावा लागतो आणि विवाहात खूप खर्च होतो.

४) मुलगा हा म्हातारपणाची काठी असतो.

५) मुलगा हा मुलीपेक्षा सशक्त असतो, तर मुली कमजोर असतात.

६)	मुलीच्या शिक्षणावर केलेला खर्च वाया जातो. तिच्या शिक्षणाचा आपल्याला काही फायदा नसतो.

७)	एका मुलीपाठोपाठ अनेक मुली होण्याची भीती.

वरील अनेक कारणे स्त्रीभ्रूणहत्येस कारणीभूत असली, तरी स्त्रीच स्त्रीभ्रूणहत्या करण्यास तेवढीच जबाबदार ठरत आहे जेवढे पुरुष.

स्त्रियांनी लढले पाहिजे. अगदी जातीधर्माच्या भिंतीपलीकडे जाऊनसुद्धा. कारण पुरुषसत्ता कुटुंबव्यवस्थेत महिलांचा उपयोग करून जाती, धर्म आणि अंधश्रद्धा अबाधित ठेवायची आणि संपूर्ण समाजच दुभंगलेला राहील अशी व्यवस्था करण्याचे जे काही षडयंत्र केले जातेय, ते षडयंत्र मोडीत काढण्याचे आव्हान आजच्या स्त्रीपुढे आहे. आज एकीकडे प्रगतीची शिखरे पादाक्रांत करीत असताना, महाराष्ट्रातील स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण फारच गंभीर आहे. महाराष्ट्रात हिंसेचा कहर झाला आहे. कधीकाळी महाराष्ट्रात स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण नगण्य होते आणि आज देशात जम्मू काश्मीर पाठोपाठ महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात गेल्या १० वर्षांत ४ लाख ७० हजार स्त्रीभ्रूणहत्या झाल्या आहेत. म्हणजेच दरवर्षी ५० हजार आणि प्रतिदिवशी १५२ मुलींना जन्माआधीच खुडून टाकले जाते. जनगणना आयोगाची ही आकडेवारी फारच बोलकी आहे. खरे तर स्त्रीभ्रूणहत्येचा संपूर्ण विषयच वैद्यकीय क्षेत्रातील गुन्हा असून अतिरेक्यांनाही लाजवेल असा हा हल्ला आहे. या गुन्ह्यात आज देशभरातील ३८ हजार डॉक्टर सामील आहेत आणि तब्बल १५०० कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल यासाठी केली जाते, हे यामधील भयावह वास्तव आहे.

महाराष्ट्राच्या विकसित भागात तर याबाबतची परिस्थिती अतिशय वाईट आहे. कोकण आणि विदर्भात स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण अत्यल्प आहे. पण मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात फारच विदारक स्थिती आहे. गडचिरोली, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, नंदुरबार, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये नर्सिंग नियमांना तितकेच महत्त्व आहे. म्हणूनच की काय, तेथे हे प्रमाण कमी आहे. मात्र राज्यात स्त्रीभ्रूणहत्येचे सर्वाधिक प्रमाण बीड जिल्ह्यात आहे आणि त्यापाठोपाठ जालना, औरंगाबाद, जळगाव, नाशिक, लातूर, नांदेड, अकोला, सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांची नावे घेतली जातात.

स्त्रियांच्या सुरक्षिततेबाबत, स्वातंत्र्याबाबत, हुंडापद्धतीच्या विरोधात अनेक कायदे करण्यात आले असतानाही स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण वाढण्याचे कारण काय आहे? याचे उत्तर शोधताना आपणास स्वातंत्र्यानंतर या देशात महिलांच्या सुरक्षिततेसाठी ३७ कायदे करावे लागले आहेत. याचाच अर्थ आपल्या समाजातील पुरुषच सुज्ञ नाहीत. ते जर सुज्ञ असते, तर स्त्रीच्या सुरक्षिततेसाठी वेगळे कायदे करावे लागले नसते. ही बाब समाजासाठी फारच घातक आहे. स्त्रीशी वाईट वागण्याचे टेक्निकच समाजाने शिकून घेतले आहे आणि म्हणूनच स्त्रीविषयक प्रत्येक अपप्रवृत्तीविरुद्ध कायदाच करावा लागला. ब्रिटिशांनी बालिका हत्याविरोधी कायदा केला. कौटुंबिक अत्याचार रोखण्यासाठी शाहू महाराजांना कायद्याचं अस्त्र उगारावे लागले, तर आता स्त्री घराबाहेर पडू लागल्यानंतर तिच्यावर कामाच्या ठिकाणी होणारे अत्याचार दिवसेंदिवस वाढतच असताना, आजही विशाखा गाईड लाईनने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार

कामाच्या ठिकाणी स्त्रीवर होणारा हिंसाचारविरोधी कायदा अद्याप अस्तित्वात आलेला नाही. आजही देशभरात स्त्रीचा हुंड्यासाठी छळ केला जातो. तिचा बळ घेतली जातो आहे. त्यासाठी अनेक कायदे आहेत, पण त्या कायद्यांनाही धाब्यावर बसवत पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्थेत स्त्रीचेच शोषण केले जाते ही भयावह स्थिती आहे.

**बलात्कार :**

स्त्रीवर होणाऱ्या अत्याचारामध्ये 'बलात्कार' हा आणखी एक प्रकार आहे. देशामध्ये आज विनयभंगाचे व बलात्काराचे गुन्हेही मोठ्या प्रमाणात घडत आहेत. विरोधी लिंगीयांची इच्छा व संमती नसताना बळजबरीने केलेला संभोग म्हणजेच बलात्कार होय. आज बलात्काराचे स्वरूप सर्वच समाजामध्ये असलेले दिसून येते मग तो समाज पुढारलेला असो अथवा मागासलेला. बलात्कार ही प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेली समस्या आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या लोकसंख्या फंडाच्या अहवालानुसार भारतात दर ४५ मिनिटांनी एका स्त्रीवर बलात्कार होतो. दिल्ली, मुंबईसारख्या शहरांत बलात्काराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत जात आहे.

**व्याख्या :**

बलात्कार या शब्दाची शब्दकोशातील व्याख्या पाहू.

''एखाद्या स्त्रीच्या संमतीशिवाय तिच्याशी बेकायदेशीर लैंगिक संबंध प्रस्थापित करणे म्हणजे बलात्कार होय.''

भारतीय दंड विधान संहितेच्या कलम ३७५ मधील व्याख्या - ''जेव्हा एखादा मनुष्य अ) स्त्रीच्या इच्छेविरुद्ध, ब) तिच्या मूकसंमतीशिवाय, क) धाकदपटशा दाखवून, जिवे मारण्याची भीती दाखवून तिची संमती मिळवून, ड) त्या स्त्रीचा आपण पती नाही, पण त्या स्त्रीला आपण त्याच्याशी विवाह केला आहे असे वाटून ती संमती देते, इ) वस्तुस्थितीच्या गैरसमजातून त्या स्त्रीने संमती दिली असताना आणि अशी स्त्री जर १६ वर्षांखालील असेल तर तिने संमती दिली असली-नसली तरी तिच्याशी लैंगिक संबंध घडवितो तेव्हा त्याला बलात्कार असे म्हणतात.''

बलात्काराला 'जबरी संभोग' असेही म्हटले जाते. बलात्कार हे बाहेरच्या व्यक्तीकडूनच होतात असेही नाही, तर कुटुंबामध्येही ते घडतात, त्यामुळे कौटुंबिक अत्याचाराचा तो एक भाग ठरतो. सुनेवर किंवा भावजयीवर बलात्कार होण्याचे प्रकार बऱ्याच कुटुंबातून घडतात. सासूचा त्रास, नणंदेची कटकट, दीर व सासऱ्याची जबरी कामेच्छा अशा वातावरणात तिचा केव्हा बलात्कारात बळी दिला जाईल याचा नेम नसतो. म्हणजेच अशा स्त्रियांवर बळजबरीने बलात्कार करण्यात तिचा सासरा व दिराचा समावेश असतो. भारतात जेव्हा २० बलात्कार घडतात त्यापैकी केवळ  एका गुन्ह्याची नोंद होते असा अंदाज आहे. कारण बलात्कारित स्त्रीकडे पाहण्याचा पूर्वापार दृष्टिकोन पूर्वग्रहदूषित आहे. ती स्त्री समाजाच्या नातेवाइकांच्या व कुटुंबाच्याही दृष्टीने कलंकित मानली जाते. त्यामुळे बलात्कार होऊनही समाजापुढे न आलेल्या, पोलिसात नोंद न झालेल्या बलात्कारांची संख्या फार मोठी असू शकते. हे गुन्हे प्रकाशात न येण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) भारतीय समाजातील स्त्रियांचा कनिष्ठ दर्जा.

२) बलात्काराच्या संदर्भात स्त्रीलाच जबाबदार धरण्याची परंपरागत वृत्ती.

३) कुटुंबीयांचा बलात्कारित स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन.

४) योनीशुचितेला दिले जाणारे आत्यंतिक महत्त्व.

५) पोलिसांची कामाची पद्धती व गुन्हा नोंदवून घेण्याची उदासीनता.

६) न्यायालयात वकिलांकडून होणारी उलटतपासणी व गुन्हेगाराला शिक्षा होईल याबाबतची साशंकता.

७) सामाजिक बदनामी.

८) वैद्यकीय तपासण्या आणि

९) बलात्कारित स्त्रीची आत्महत्या इ. कारणांमुळे बलात्काराच्या वास्तविक आकडेवारी प्रकाशात येत नाहीत.

**बलात्काराची कारणे :**

बलात्काराची कारणे आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**अ) नागरीकरण :**

नागरीकरणामुळे लोक रोजगारासाठी शहराकडे धाव घेत आहेत, परंतु सर्वच लोक जागेच्या अभावी स्वत:चे कुटुंब सोबत घेऊन जाऊ शकत नाहीत. झोपडपट्ट्यांतून जीवन व्यतीत करावे लागते. अपुऱ्या निवासी जागेतून नको ते लैंगिक दृश्य प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दृष्टीस पडते, त्यातून लैंगिक कुतूहल वाढते, भावना उत्तेजित होतात. त्या क्षमविण्यासाठी बलात्कार घडतात.

**ब) विवाहाचे वाढते वय :**

दीर्घकालीन शिक्षण, त्यानंतर रोजगाराचा शोध, जातीअंतर्गत विवहाचे बंधन यामुळे मुलांमधील विवाहाचे वय वाढले आहे. स्वाभाविकत: आपल्या लैंगिक भावनांना नियंत्रित करण्यात अपयशी ठरणारे युवक बलात्काराच्या मार्गाचा अवलंब करतात.

**क)स्त्रियांची जवळीकता :**

आधुनिक काळात स्त्रिया चार भिंतीच्या आत गुंतून न राहता अर्थार्जनासाठी बाहेर पडत आहेत. शिक्षण, नोकरी, व्यवसाय इत्यादींच्या निमित्ताने जास्तीतजास्त काळ पुरुषांच्या सहवासात अथवा त्यांच्या जवळ येत आहेत. त्यामुळे बलात्काराची संधी वाढली आहे.

**ड) धर्म व नैतिक मूल्यांची घसरण :**

आधुनिक विज्ञानवादी समाजात धर्माचे पारंपरिक नियंत्रण कमी झाले आहे. पातिव्रत्य, वैवाहिक एकनिष्ठता, पाप-पुण्य यांसारख्या मूल्यांना अवकळा आली आहे. त्यामुळे बलात्काराचे प्रमाण वाढले आहे.

**इ)स्त्रीस्वातंत्र्याच्या चुकीच्या कल्पना :**

अलीकडच्या स्त्री स्वातंत्र्याच्या कल्पनेमुळे भडक मेकअप, अल्पकपडे यातून कामुक अथवा सेक्सी दिसण्याची स्पर्धाच जणू काही स्त्रियांमध्ये दिसते. पुरुषांना रिझवणे, आपण त्याच्यात न गुंतता त्याला आपल्यात गुंतवणे इत्यादींमध्ये स्त्रियांना रुची वाटण्याचे प्रमाण वाढले आहे. अशा स्त्रिया बलात्काराला बळी पडू शकतात.

याशिवाय पुरुषातील लैंगिक प्रबलता, कुटुंबातील संस्कार, सामाजिकीकरण, सामाजिक पर्यावरण हेसुद्धा  बलात्काराची कारणे ठरू शकतात.

**बलात्कार आणि महिलांच्या चळवळी**

भारतीय समाजव्यवस्थेचा विकास होत असताना बलात्कार या समस्येच्या रूपाने स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचे प्रमाण अद्याप कमी झालेले नाही. बलात्काराच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसते. मोठ्या महानगरांमध्ये स्त्रियांना यामुळे असुरक्षित अवस्थेत जीवन जगावे लागते. त्यामुळेच या समस्येच्या विरोधात भारतात स्त्रियांच्या स्वयंसेवी संघटनांनी संघटन घडवून आणले. या चळवळींनी पुढील मुद्द्यांवर भर दिलेला दिसून येतो.

१) स्त्रियांना सार्वजनिक जीवनात वावरताना कायदे करून सुरक्षा प्राप्त व्हावी यासाठी लढा देणे.

२) पुरुषी अत्याचारास विरोध करू शकेल यासाठी स्त्रियांना सामर्थ्य प्रदान करणे.

३) स्त्रियांविषयी समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्यासाठी भारतात मोठ्या प्रमाणावर लोकशिक्षणपर शिबिरे आयोजित करणे.

४) स्त्रियांविषयी वाईट भावना ठेवणाऱ्या किंवा छेडछाडीचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींच्या विरोधात सामूहिक प्रयत्नांद्वारे मात करणे.

५) बलात्कारासारखे अनैतिक कृत्य करणाऱ्या व्यक्तीस सार्वजनिक जीवनातून हद्दपार करणे.

६) बलात्काराच्या विरोधात केल्या जाणाऱ्या कायद्यांत अधिक कठोरता आणून यासाठी मृत्युदंडाची शिक्षा देण्याची तरतूद निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न करणे.

भारतात बलात्काराविरोधात विविध कायदे करण्यात आले आहेत; मात्र कायद्याने कितीही मोठी शिक्षा दिली तरी स्त्रीच्या अब्रूची नुकसानभरपाई होत नाही. त्यामुळे स्त्रीवादी चळवळींनी प्रसंगी कायदा हातात घेऊन या समस्येच्या विरोधात आवाज उठविला. तसेच समाज जागृतीचे कार्य घडवून आणले आहे.

**कौटुंबिक हिंसाचार :**

कौटुंबिक हिंसाचार हा स्त्रीविरुद्ध होत असलेला सर्वसामान्य आणि सततचा होणारा छळ आहे. ज्या देशात  अशा प्रकारच्या हिंसेसंबंधी सखोल अभ्यास केला गेला त्या प्रत्येक देशात असे दिसून आले आहे, की देशातील १० ते ६९ टक्के महिलांना आपल्या आयुष्यात हिंसेला सामोरे जावे लागते आणि तो हिंसाचार आपल्या जवळच्या जोडीदाराकडून होणारा असतो. १२ ते २५ टक्के स्त्रियांना बळजबरीने लैंगिक संबंध वा त्याचा प्रयत्नही आयुष्यात भोगावा लागलेला आहे.

अशा पाहणीतून धक्कादायक माहिती उपलब्ध झाली आहे.

- स्त्रीविरुद्धच्या हिंसाचाराचा सूत्रधार हा प्रामुख्याने पुरुष असतो.
- सलगीच्या नात्यात शारीरिक हिंसाचाराबरोबरच मानसिक व शाब्दिक हिंसाचार जास्त प्रमाणात दिसून येतो. चारपैकी एक स्त्री लैंगिक अत्याचाराला बळी पडते.
- स्त्रीला तिच्या जवळच्याच आणि ओळखीच्याच पुरुषाकडून हिंसेचा जास्त धोका असतो.

ऑस्ट्रेलिया, कॅनडा, साऊथ आफ्रिका, इस्राईल आणि अमेरिकेत हिंसेमुळे होणाऱ्या महिलांच्या हत्येपैकी ४० ते ७० टक्के महिलांची हत्या त्यांच्या जोडीदाराकडून झालेली दिसून येते. कौटुंबिक आंतरक्रियात्मक घटक मुख्यत: स्त्रियांवरील अत्याचारास कारणीभूत ठरत आहेत, ज्यामध्ये कौटुंबिक उद्दिष्टांचा लोप होऊन त्याची जागा स्वार्थकेंद्रित व्यक्तिगत उद्दिष्टांनी घेतली आहे. पती-पत्नींमध्ये प्रेमसंबंधात्मक घनिष्ठता कमी होऊन दर्जात्मक संघर्ष कमी होऊ लागला आहे. भारतीय समाजाच्या सर्व स्तरामध्ये सर्व प्रकारच्या स्त्रियांवर अत्याचार होतात. यात श्रीमंत, मध्यम, गरीब, उच्चशिक्षित ते निरक्षर, शहरी व ग्रामीण स्त्रिया, बालिकेपासून तर वृद्धापर्यंत सर्व जाती, धर्म, प्रातांतील स्त्रियांचा समावेश होतो. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीकडे मायेची ऊब मिळावी म्हणून स्त्री ही मोठ्या अभिलाषेने पाहते, परंतु कुटुंबातील सासू-सासरा, दीर, नणंद, जाऊ इत्यादींकडे तिचा पाहण्याचा दृष्टिकोन आपलेपणाचा असतो, परंतु हे सर्व लोक जमेल तसे व मिळेल त्या वेळी त्रास देतात. प्यायला आणि अंघोळीला पाणी दिले नाही, कपडे धुवून काढले नाहीत, घरी आलेल्या पाहुण्यांचा योग्य सत्कार करीत नाही, नुसती माहेरची आठवण काढते, परपुरुषाकडे टक लावून पाहते, आवाज चढवून बोलते, कपडे व्यवस्थित वापरत नाही, भपकेबाज राहते, नटते-मुरडते-हसते इ. कारणे दाखवून विनाकारण बोलत असतात, त्या बोलण्यात खोचकपणा असतो. अनेक गलिच्छ आरोप करून तिचे जगणे कठीण केले जाते. वास्तविक घर हे मंदिर व स्त्री ही त्या मंदिरातील देवता आहे असे मानले जाते, परंतु ना घर ना दैवत, कितीतरी अत्याचार तिच्या घरातच होत असतात.

कुटुंबांतर्गत अत्याचारांमध्ये हुंडाबळी, शारीरिक व मानसिक छळ, लैंगिक दुर्व्यवहार, विधवांचा छळ, मुलीचा गर्भ असल्यास भ्रूणहत्या करण्यास भाग पाडणे, वारसा हक्क नाकारणे, सुनेला अथवा पत्नीला माहेराहून पैसा आणण्यास भाग पाडणे, अपमान, मारझोड व दुखापत, बलात्कार, नववधूला जाळणे इ. बाबींचा त्यात समावेश होतो.

**व्याख्या :**

आज सर्वत्र कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. कौटुंबिक हिंसाचार ही एक ज्वलंत व मोठी सामाजिक समस्या बनली आहे. म्हणून कौटुंबिक हिंसाचाराला प्रतिबंध करण्यासाठी केंद्र सरकारने कौटुंबिक हिंसाचारापासून महिला संरक्षण कायदा, २००५ आणि कौटुंबिक हिंसाचारापासून महिला संरक्षण नियम २००६ लागू केला आहे. २००५च्या कौटुंबिक हिंसाचारापासून महिला संरक्षण कायद्यात कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या दिली असून ती पुढीलप्रमाणे आहे.

या कायद्यानुसार आरोपी व्यक्तीचे कोणतेही कार्य, काही कारणे किंवा आचारणाचा समावेश कौटुंबिक हिंसाचारामध्ये होईल, जर तो -

अ) पीडित व्यक्तीच्या स्वास्थ्य, सुरक्षा, जीवन, अंगाची वा त्याची मानसिक वा शारीरिक लाभाची अपहानी करतो किंवा त्यास कोणती हानी पोहोचवितो किंवा त्यास संकटात टाकतो किंवा त्याची अशी करण्याची प्रवृत्ती आहे आणि त्याच्या अंतर्गत शारीरिक दुरुपयोग, लैंगिक दुरुपयोग, मौखिक आणि भावनात्मक दुरुपयोग आणि आर्थिक दुरुपयोग केला जातो. किंवा

ब) हुंडा किंवा अन्य संपत्ती किंवा मूल्यवान वस्तूंची कोणत्या कायद्याच्या विरुद्ध मागणीच्या पूर्तीकरिता त्यास किंवा त्याच्याशी संबंधित कोणत्या व्यक्तीला त्रास देण्याच्या दृष्टीने पीडित व्यक्तीचे उत्पीडन केले जाते किंवा त्यास हानी पोहोचविली जाते किंवा संकट निर्माण केले आहे.

क) भाग 'अ' किंवा 'ब' मध्ये वर्णित कोणत्या आचरणाद्वारे पीडित व्यक्ती किंवा त्याच्याशी संबंधित कोणत्या व्यक्तीवर धमकीचा प्रभाव ठेवीत असेल. किंवा

ड) पीडित व्यक्तीला हानी पोहोचवितो किंवा उत्पीडन होईल असे करतो मग ते शारीरिक किंवा मानसिक असो.

अशा प्रकारे प्रस्तुत कायद्याद्वारे कौटुंबिक हिंसाचाराची अतिशय व्यापक आणि स्पष्ट व्याख्या करण्यात आली आहे. कुटुंबातील नातेवाईक असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या स्वास्थ्य, सुरक्षा, जीवन किंव मानसिक आणि शारीरिक हानी केली जाते किंवा त्यास संकटात टाकले जाते. इतकेच नव्हे तर आर्थिक लाभासाठी त्या व्यक्तीशी संबंधित व्यक्तीला त्रास देण्यासाठी पीडित व्यक्तीचे उत्पीडन केले जाते किंवा धमकी देऊन त्याला मानसिक दहशतीखाली ठेवले जाते त्यास कौटुंबिक हिंसाचार असे म्हणतात.

### कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप :

प्रस्तुत कायद्यामध्ये कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप स्पष्ट केले आहे. कौटुंबिक हिंसाचारामध्ये शारीरिक दुरुपयोग, लैंगिक दुरुपयोग, मौखिक आणि भावनात्मक दुरुपयोग आणि आर्थिक दुरुपयोग याचा समावेश केला आहे. या दुरुपयोगाचे स्पष्टीकरण केल्यास कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप अधिक स्पष्ट होईल.

#### अ)शारीरिक :

शारीरिक छळ म्हणजे आरोपी व्यक्तीचे असे कोणते कार्य वा आचरण होय, की ज्यामुळे पीडित व्यक्तीला शारीरिक त्रास, नुकसान किंवा त्याच्या जीवनास अनारोग्याचा धोका निर्माण होतो. तसेच त्याच्या स्वास्थ्य किंवा विकासाचा ऱ्हास होतो. पीडित व्यक्तीवर हमला केला जातो किंवा त्याला मारहाण केली जाते. शारीरिक छळात अतिशय मारहाण, श्रम व दुखापत या बाबींचा समावेश होतो. मारहाणीत हात पिरगळणे, थोबाडीत मारणे, केस ओढणे, ठोसा लावणे, लाथाबुक्क्यांनी मारहाण करणे, काठीने मारणे, भिंतीवर डोके आपटणे, हातपाय मोडण्यापर्यंत सर्वच प्रकारच्या मारहाणीचा त्यात समावेश आहे. दिवसभर पतीचा

मार खाऊन व शारीरिक-मानसिक छळ सहन करूनही रात्री पतीला लैंगिक सुख देण्यासाठी तयार राहवे लागते. अशा प्रकारचे विविध अत्याचार स्त्रीला सहन करावे लागतात.

**ब)मानसिक आणि भावनात्मक :**

मानसिक आणि भावनात्मक छळामध्ये दुसऱ्यासमोर अपमान, उपहास, तिरस्कार, शिव्या देणे, संबंधित स्त्रीला अथवा तिच्या नातेवाइकांना इजा पोहोचविण्याची धमकी देणे आणि सतत कमी लेखणे होय. कौटुंबिक कार्यातसुद्धा सतत चुका काढून तिचा आत्मविश्वास कमी करण्याचा प्रयत्न केला जातो तसेच विशेष रूपात मुले वा मुलगा न होण्याच्या संबंधात अपमान किंवा उपहास केला जातो.

**क)आर्थिक :**

अशा सर्व वा कोणत्याही आर्थिक वा वित्तीय संसाधने, ज्याची पीडित व्यक्ती हक्कदार आहे, त्या आर्थिक गोष्टींपासून पीडित व्यक्तीला वंचित ठेवणे किंवा त्याचा उपयोग करू न देणे म्हणजे आर्थिक दुरुपयोग होय. भारतीय समाजात स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसाचाराचा कळस म्हणजे हुंडाबळी होय. स्त्रीहिंसेच्या घटनांमध्ये हुंडाबळीची समस्या प्रमुख ज्वलंत समस्या आहे.

हुंडा प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असतानाही भारतात प्रत्येक ९० मिनिटाला एक हुंडाबळीची घटना घडते. म्हणजेच एका दिवसात जवळपास १६ व एका वर्षात ६ हजारांपेक्षा जास्त घटना हुंडाबळीच्या घडून येतात. भारतात महिलांविरुद्ध अत्याचार-गुन्हे २००४-०६ नुसार हुंडाबळीचे ७०२७ गुन्हे नोंदविण्यात आले.

**ड)लैंगिक :**

लैंगिक छळ म्हणजे लैंगिक स्वरूपाचे असे आचरण की जे स्त्रीत्वाचा दुरुपयोग, अपमान आणि तिरस्कार करते. तिच्यावर आक्रमण केले जाते. लैंगिक छळामध्ये संभोगाची इच्छा नसतानाही स्त्रीला संभोग करण्यास भाग पाडणे, मासिकपाळी सुरू असताना संभोगाची मागणी करणे, सिगारेटचे चटके देणे, चावणे इत्यादींचा समावेश केला जातो. यावरून स्त्रियांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराचे स्वरूप लक्षात येते.

उपरोक्त विवेचनावरून कौटुंबिक हिंसाचाराचे चित्र आज किती विदारक झाले आहे हे लक्षात येते. आजही महिलांचा आर्थिक, सामाजिक, राजकीय विकास व्हावा, महिलांना समाजात पुरुषांबरोबर समान अधिकार मिळावा यासाठी विविध कायदे, सुधारणात्मक धोरण राबविले जात असले तरी कायद्याचा सोयीस्कर अर्थ लावून कायद्यातून पळवाटा काढल्या जात असल्यामुळे आज गुन्हा सिद्ध करणे आणि गुन्हेगाराला शिक्षा करणे, तसेच न्यायदानाला विलंब लागणे यामुळे पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत राजरोस स्त्रियांवर अत्याचार होत आहेत.

**लैंगिक अत्याचार :**

भारतीय समाजात लैंगिक विषयावर मोकळेपणाने आणि खुलेपणे बोलणे निषिद्ध मानले गेले आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या लैंगिक समस्यांबद्दल बोलणे त्यातही बायकांना खूपच अवघड होते. जगात आणि भारतात सर्वसाधारणपणे दिसणारा हिंसाचाराचा प्रकार म्हणजे लैंगिक अत्याचार होय. हा विषय खूपच संवेदनशील असल्यामुळे आणि मोकळेपणाने

बोलले जात नसल्याने अशा प्रकारच्या अत्याचाराबद्दल खूपच कमी संशोधन आजतागायत उपलब्ध आहे.

अनेक आफ्रिकी देशात लैंगिक अत्याचाराचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. भारतातही लग्नानंतरच्या पहिल्या रात्री लैंगिक अत्याचार होण्याचे प्रमाण जास्त आहे. याचे कारण बायकांचे समाजातले दुय्यम स्थान आणि बायको ही आपली मालमत्ता आहे, अशी असलेली पुरुषांची मानसिकता. अशाप्रकारच्या हिंसाचाराचा परिणाम स्त्रीच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होत असतो आणि तो केवळ तात्पुरता नसून त्याचा परिणाम दूरगामी असतो. स्त्रीच्या सामाजिक आयुष्यावरदेखील याचा परिणाम दिसून येतो. परंपरावादी समाजात एखाद्या पीडित स्त्रीने आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराबद्दल सांगितले तर तिला समाजाकडून केवळ उपेक्षाच मिळते. आपली शक्ती दाखविणे आणि दुसऱ्यावर वर्चस्व गाजविणे यामुळेच नात्यात लैंगिक अत्याचार होताना दिसून येतो. मुख्यत्वे नवऱ्याकडून बायकोवर असा अत्याचार होत असतो. मनात इच्छा नसताना समागम करायला भाग पाडणे वा इतर लैंगिक कृत्ये करायला लावणे असे प्रकार जेव्हा लग्नाच्या नात्यात घडतात तेव्हा नवरा-बायको दोघांनाही हा नवऱ्याचा अधिकारच आहे, अशी समजूत असल्याने या प्रकाराबद्दल मोकळेपणाने बोलले जात नाही किंवा मदत मागितली जात नाही.

मध्यंतरी सहा प्रगतशील देशांमध्ये झालेल्या सर्वेक्षणात भारतातील पुरुषांबाबत धक्कादायक माहिती बाहेर आली. एकूण सर्वेक्षणात सहभागी १५०० पुरुषांपैकी २४% पुरुषांनी आपण आपल्या जोडीदारावर लैंगिक अत्याचार केला असल्याचे कबूल केले आहे आणि कुटुंब एकत्र राहण्यासाठी स्त्रीने घरगुती हिंसाचार सहन करायलाच हवा, असे ६५% पुरुषांचे मत आहे.

लैंगिक अत्याचार थांबविणे हे जसे खूप कठीण तसेच या प्रकाराबद्दल तक्रार करणेदेखील अवघड आहे. त्यामुळे अशा अत्याचाराची माहिती मिळणे पण अशक्यप्राय होते. माणसे समाजात वावरताना मुखवटा लावून वागतात. एखादा साधा दिसणारा, साळसूद माणूस आतून अतिशय विकृत असू शकतो आणि ते त्याच्या जोडीदाराला किंवा पत्नीलाच जाणवते. रिनाच्या लग्नाला सहाच महिने झाले आहेत. ती अजूनही नवऱ्यासोबत एकटी राहायला, रात्री बेडरूममध्ये जायला घाबरते. तिच्या नवऱ्याने पहिल्याच रात्री तिला अंधारात जळक्या वर्तमानपत्राच्या प्रकाशात नग्न पाहण्याचा हट्ट केला, त्यानंतर दिवसेंदिवस तिचा त्रास आणि त्याच्या मागण्या वाढत गेल्या. तिला हे कोणाला सांगता येईना की बोलता येईना. कारण चारचौघात तो अगदीच वेगळा वागत असे. शेवटी त्याच्या एका मित्राबरोबर शरीरसंबंध ठेवण्याची त्याची मागणी तिने अमान्य केली आणि धीर धरून तिने तिच्या मैत्रिणीला ही गोष्ट सांगितली. आता रिनाने घटस्फोटासाठी अर्ज केला आहे आणि ती हा अनुभव विसरण्यासाठी समुपदेशनही घेत आहे.

लैंगिक अत्याचार म्हणजे एखाद्याच्या मनाविरुद्ध केलेली लैंगिक कृती. अनेकदा हे कृत्य करण्याकरिता पीडित स्त्रीला मारहाण किंवा मारहाणीची भीती दाखविण्यात येते. लग्न झालेल्या अनेकींवर नवऱ्याकडून बलात्कार केला जातो; पण त्या काही बोलायला घाबरतात. कारण आपल्या संस्कृतीत समागम हा नवऱ्याचा हक्क समजला जातो. त्यामुळे लग्नबंधनात झालेल्या बलात्काराबद्दल बोलायला, तक्रार करायला कोणी धजावताना दिसत नाही.

**लैंगिक अत्याचार म्हणजे :**

१) मनाविरुद्ध वा बळजबरीचा समागम.

२) अश्लील (पोर्नोग्राफी) चित्रे किंवा मजकूर, फिल्म पाहण्यास मनाविरुद्ध भाग पाडणे.

३) ज्यामुळे स्त्रीचा मानभंग, अपमान होईल असे लैंगिक कृत्य करणे वा करायला भाग पाडणे.

४) मनाविरुद्ध अनैसर्गिक कृत्य करायला भाग पाडणे.

५) लैंगिक व अश्लील नावे ठेवणे.

६) मुलांवर लैंगिक अत्याचार करणे.

बऱ्याचदा लैंगिक अत्यचाराबरोबर पीडित स्त्रियांना शारीरिक आणि मानसिक अत्याचारालादेखील सामोरे जावे लागते. युनायटेड नेशन्सच्या सर्वेक्षणानुसार जगातील तीन स्त्रियांपैकी एकजण मारहाण, बलात्कार किंवा अत्याचाराची बळी आहे आणि हा अत्याचार तिच्या जवळच्या, ओळखीच्या व्यक्तींकडून झालेला असतो.

तसेच एखाद्या स्त्रीवर लैंगिक अत्याचार होतो - जर तिचा जोडीदार

१) स्त्रीकडे उपभोगाची वस्तू म्हणून पाहतो आणि स्त्रीच्या कामाबद्दल त्याची ठाम व टोकाची मते बाळगतो.

२) तिचे बाहेर संबंध असल्याचा आरोप करतो व तिच्या बाहेरील कुठल्याही मैत्रीबद्दल मत्सर बाळगतो.

३) तिने ठरावीक पद्धतीने कपडे घालण्याची सक्ती करतो.

४) तिला लैंगिक नावांनी हाक मारतो वा स्त्रीत्वाचा अपमान करतो.

५) लैंगिक संबंधाची बळजबरी करतो, मनाविरुद्ध अत्याचार करतो.

६) अनैसर्गिक लैंगिक संबंधाची मागणी व बळजबरी करतो.

७) ती आजारी असतानाही लैंगिक संबंधाची मागणी करतो.

८) लैंगिक संबंधांदरम्यान शस्त्र वा वस्तूंचा वापर करणे.

९) इतर व्यक्तींशी शरीरसंबंध करण्यासाठी भाग पाडणे.

१०) तिच्या मनाविरुद्ध संबंध ठेवणे वा न ठेवणे.

## लैंगिक छळ आणि महिलांच्या चळवळी

बलात्कार, कुटुंबातच पतीकडून, नातेवाइकांकडून स्त्रीवर होणारी बळजबरी, कामाच्या ठिकाणी वरिष्ठांकडून होणाऱ्या अनैतिक मागण्या यामुळे भारतात आधुनिक काळात स्त्रियांची लैंगिक पिळवणूक होताना दिसते. त्यामुळे या गंभीर मुद्यास भारतातील जहाल स्त्रीवादी संघटनांनी आपल्या संघर्षाचा मुद्दा बनविला आहे. या चळवळींनी पुढील मुद्दे समोर आणले आहेत.

१) कौटुंबिक जीवनात स्त्रीवर तिच्या इच्छेविरोधात पतीकडून होणारी बळजबरी हा बलात्कार मानून त्यावर कठोर उपाययोजना केली जावी.

२) स्त्रिया व पुरुषांच्या हातातील खेळणी न बनता स्त्रियांच्या शरीरावर त्यांची स्वत:ची मालकी असावी.

३) कामाच्या ठिकाणी स्त्रीवर होणारे लैंगिक अत्याचार थांबविण्यासाठी त्या विरोधात कायदे निर्माण केले जावे.

४) लैंगिक छळाविरोधात समाजातील स्वयंसेवी संघटनांद्वारे कारवाई केली जावी.

५) स्त्री-पुरुष यातील लिंगभाव निरपेक्ष संबंध प्रस्थापित करण्यासाठी लढा उभारणे किंवा संघटित प्रयत्न करणे.

भारतात स्त्रीवादी चळवळींच्या प्रभावामुळे स्त्रियांना कामाच्या ठिकाणी संरक्षण मिळवून देणारे कायदे संमत करण्यात आले व त्याची अधिक परिणामकारकपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. यातून स्त्रियांवरील अत्याचारात घट होताना दिसून येते.

## ७.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - उपक्रम

१) भारतातील स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर महिलांच्या चळवळीवर निबंध लिहा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

२) महाराष्ट्रातील स्वयंसहाय्यता गट चळवळीतून होणारे महिलांचे सबलीकरण स्पष्ट करा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

३) भारतातील स्त्री-भ्रूण हत्येची कारणे कोणती?

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

४) बलात्कार म्हणजे काय सांगून बलात्काराची विविध कारणे स्पष्ट करा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

५) कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप स्पष्ट करा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

६) कौटुंबिक हिंसाचार निवारणाचे उपाय सांगा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

७) लैंगिक छळविरोधी चळवळीचे स्वरूप स्पष्ट करा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

## ७.४ सारांश :

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रीचळवळी या सामाजिक सुधारणा, राजकीय हक्कांची प्राप्ती, वसाहतवादास विरोध या मुद्यांना घेऊन संघटित झाल्या. त्यातूनच स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांना राजकीय व सामाजिक हक्क प्राप्त झाले. मात्र स्त्रियांनी पर्यावरण, भ्रष्टाचार, दारूबंदी, ग्राहक हक्क संरक्षण यासारख्या नवीन मुद्यांना घेऊन आपला लढा चालू ठेवला. परंतु २१व्या शतकाच्या उंबरठ्यावर स्त्रियांना स्त्रीभ्रूणहत्या, बलात्कार, लैंगिक आणि कौटुंबिक अत्याचार यासारख्या प्रश्नांवर आज चळवळी उभ्या कराव्या लागत आहेत. स्त्रियांचे आजही पूर्वीसारखेच शोषण केले जाते. फरक एवढाच आहे की उपरोक्त प्रश्नाचे स्वरूप आधुनिक आहे. स्त्रीला एक माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त होण्यासाठी स्त्रीचळवळींचा आरंभ झाला आणि आजही ही चळवळ सतत कार्यशील आहे. परंतु स्त्रियांना आजही पुरुषांच्या बरोबरीने आचार, विहार करण्याचा, शिक्षण घेण्याचा, आपले मत परखडपणे मांडण्याचा अधिकार मिळाला नाही. शासनाची भूमिकाही आज कठोर पावले उचलताना दिसत नाही ही खंत सर्व विचारवंतांसमोर असलेली दिसून येते.

## ७.५ पारिभाषिक शब्द-शब्दार्थ

स्त्री-भ्रूणहत्या - स्त्री गर्भलिंगनिदान करून गर्भपात करणे याला स्त्रीभ्रूणहत्या संबोधले जाते.

बलात्कार - एखाद्या स्त्रीच्या संमतीशिवाय तिच्याशी बेकायदेशीर लैंगिक संबंध प्रस्थापित करणे म्हणजे बलात्कार होय.

कौटुंबिक हिंसाचार - कोणत्याही प्रकारची इजा, जीवनाची सुरक्षा, आरोग्य यांना असलेला धोका, शारीरिक किंवा मानसिक, आर्थिक त्रास, लैंगिक छळ, शाब्दिक हिंसा आणि भावनिक हल्ला ज्याचे वर्णन या कायद्यातील कलम ३ मध्ये केलेले आहे म्हणजे कौटुंबिक हिंसाचार होय.

लैंगिक अत्याचार - लैंगिक अत्याचार म्हणजे एखाद्याच्या मनाविरुद्ध केलेली लैंगिक कृती.

## ७.६ संदर्भसूची

1) Singh R. V. (2011), "Women Empowerment in India", New Delhi, Shree Publishers & Distributors.

2) Chhattarji Mohini (2005), "Women's Human Rights", Jaipur, Avishkar Publisher and Distributor.

3) Ghosh Utpal Kumar (2003) "Issues on empowerment of Women", Delhi, Mohit Publication.

४) सिंह जनमेजय, (२०१०), ''आधुनिकता एवं नारी सशक्तीकरण'', जयपूर, रावत पब्लिकेशन्स.

५) शहा घनश्याम (२००८), ''भारतातील सामाजिक चळवळी'', अनुवाद : प्राची चिकटे, पुणे, डायमंड पब्लिकेशन.

६) धडियाली रेहाना (संपा), (२००८), ''समकालीन भारतातील नागरी स्त्रिया'', अनुवाद : मंजुषा गोसावी, पुणे, डायमंड पब्लिकेशन.

७) भागवत विद्युत, (२००८), ''स्त्रीवादी सामाजिक विचार,'' पुणे, डायमंड पब्लिकेशन.

८) देवगावकर एस. जी., देवगावकर शैलजा आणि डुमरे जयमाला, (२००९), ''सामाजिक चळवळी (परंपरागत आणि नवीन)'', नागपूर, साईनाथ प्रकाशन.

९) नानीवडेकर मेधा, (२००६), ''महाराष्ट्रातील स्त्री चळवळींचा मागोवा'', पुणे, मागोवा प्रकाशन.

एम . ए . समाजशास्त्र द्वितीय वर्ष

पेपरः **4**

# शिक्षण आणि समाज

# घटक – १

## शिक्षणाचे समाजशास्त्र

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ शिक्षणाचे समाजशास्त्र

१.३ शैक्षणिक समाजशाखाच्या व्याख्या

१.४ शैक्षणिक समाजशाखाचे स्वरूप आणि व्याप्ती

१.५ शैक्षणिक समाजशास्त्राचा विकास

१.६ शैक्षणिक समाजशास्त्राचा अभ्यासविषय

१.७ शिक्षणाची उद्दिष्टे

१.८ सैद्धांतिक दृष्टीकोण

१.९ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.१० सारांश

१.११ संदर्भ सूची

१.१२ क्षेत्रीय/प्रात्यक्षिक कार्य


### १.० घटकाची उद्दिष्ट्ये

प्रस्तुत घटक शिकल्यानंतर आपणांस 'शिक्षणाचे समाजशास्त्र' य समाजशाखाच्या उपशाखेची ओळख होण्यास मदत होईल. समाजशास्त्राच्या अनेक उपशाखा असून त्यापैकी शैक्षणिक समाजशास्त्र ही महत्त्वाची शाखा मानली जाते. कारण शिक्षण हा समाजाचा कणा असून या शिक्षणाचे समाजशास्त्र शिकत असताना या घटकात शैक्षणिक समाजशाखेचे स्वरूप आणि व्याप्ती, या उपशाखेचा विकास, अभ्यासविषय कोणता आहे हे समजण्यास मदत होईल. तसेच शिक्षणाचे उद्देश कोणते आहेत. तसेच शैक्षणिक समा जशास्त्राचे स द्धांतिक परिप्रेक्ष्य किंवा दृष्टिकोण कोणते हे समजण्यास मदत होईल. करीता प्रस्तुत घटक अभ्यासावयाचे आहे.

### १.१ प्रस्तावना :

प्रस्तुत 'शिक्षण आणि समाज' या पेपरमध्ये समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून शिक्षणाचा विचार करावयाचा आहे. समाजशास्त्र आणि शिक्षण यांचा संबंध काय व विविध सामाजिक घटकांचा शिक्षणावर कसा परिणाम होतो याचे विवेचन करा याचे आहे. परंतु 'शिक्षणाचे समाजशास्त्र' (Sociology of education) ही संकल्पना अभ्यासण्यापूर्वी समाजशास्त्राचा

थोडक्यात अर्थ पाहावा लागेल. समाजशास्त्र म्हणजे समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारे शास्त्र होय. मानव हा एक सामाजिक प्राणी आहे. स माजिक व सांस्कृतिक जीवन हे मानवाचे एक व्यवच्छेदक वैशिष्ट्य होय. सामाजिक व सांस्कृतिक जीवनाची राजकीय, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक इत्यादी अंगे असून त्यांचा अभ्यास करणारे विविध सामाजिक शास्त्रे आहेत. समाजशास्त्राचा अभ्यासविषय व व्याप्ती विचारात घेता समाजशास्त्राचा प्रभाव मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रावर आज पडला आहे. मानवी जीवनाच्या विशिष्ट अंगाचा अभ्यास करणाऱ्या प्रत्येक शास्त्राचा समाजशास्त्राशी जवळचा संबंध आहे. एवढेच नव्हे तर प्रत्येक शास्त्राचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास होत असून यातूनच समाजशास्त्राच्या राजकीय समाजशास्त्र, औद्योगिक समाजशास्त्र, नागरी समाजशास्त्र, ग्रामीण समाजशास्त्र, धर्माचे समाजशास्त्र इत्यादी शिक्षणशास्त्रावरही समाजशास्त्राचा प्रभाव पडलेला आहे. यातूनच शिक्षणाचे समाजशास्त्र ही समाजशास्त्राची नवी उपशाखा अस्तित्वात आली.

## १.२ शिक्षणाचे समाजशास्त्र

व्यक्तीच्या वर्तनात घडून येणारा बदल किंवा विकास म्हणजे शिक्षण होय. हा बदल किंवा विकास होताना व्यक्तीच्या जन्मजात नैसर्गिक प्रवृत्तीमधून तिच्या विकासाला चालना मिळते. हे जरी खरे असले तरी सामाजिक वातावरण (Social Environment) व्यक्तीच्या शैक्षणिक विकासाला सहाय्यभूत ठरत असते. सामाजिक वातावरण व्यक्तीचा विकास प्रेरित व नियंत्रित करत असते. म्हणून व्यक्ती एकटा जन्माला येत असला तरी इतर व्यक्तींच्या सहवासात आल्या शिया त्याचा विकास होत नाही. प्रत्येक व्यक्ती कुटुंबात वाढतो. शेजारी, मित्र यांच्यात मिसळतो. शाळा, महाविद्यालयात शिकतो. विविध ठिकाणी नोकरी करतो. हे करताना त्याचा विविध सामाजिक संस्थांशी संबंध ठेवतो. या सर्व सामाजिक वातावरणातून त्याच्यावर संस्कार होत असतात. त्याचे राहणीमान, भान, रितीरिवाज, परंपरा, विचारसरणी, श्रद्धा, मूल्ये इत्यादी तो समाजातूनच स्वीकारत असतो. थोडक्यात व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण, त्याचा विकास हा विविध सामाजिक संबंधांतून होत असतो. त्यामुळे शिक्षणाचा विचार करताना सामाजिक संबंधांचा विचार होणे अपरिहार्यच ठरते. व्यक्तीच्या व्यक्तिमत्वावर परिणाम करणाऱ्या सर्व प्रकारच्या सामाजिक संबंधाचा, संस्थांचा व त्याअंतर्गत प्रक्रियांचा अभ्यास हा शैक्षणिक समाजशास्त्राच्या अर्थातच शिक्षणाचे समाजशाखाचा आहे.

शैक्षणिक समाजशास्त्राचे जनक म्हणून जॉर्ज पेन (George Payne) यांना म्हटले जाते. जॉर्ज पेन यांनी इ.स. १९२८ साली (Principles of educational sciences) हा ग्रंथ लिहून शैक्षणिक समाजशास्त्राची सुरुवात केली. म्हणूनच त्यांना शिक्षणाच्या समाजशास्त्राचे जनक म्हटले जाते. याबरोबरच **जॉन** ड्युई यं ी ही शिक्षणाचा विचार प्रामुख्याने सामाजिक दृष्टिकोनातून करून शिक्षणक्षेत्रात समाजशास् ीय सिद्धांतांना प्रतिष्ठा निर्माण करू दिली.

## १.३ शैक्षणिक समाजशास्त्राच्या व्याख्या (Definition of sociology of education) :

१. जॉर्ज पेन यांच्या मते, 'व्यक्तीला अनुभवसिद्ध करणाऱ्या व तिच्या अनुभवांना सुसंघटित करणाऱ्या सामाजिक संबंधांचे व हे सामजिक संबंध घडवून संस्था समाजसमूह व सामाजिक प्रक्रियांचे वर्णन व विवेचन करणारे शास्त्र म्हणजे शैक्षणिक समाजशास्त्र होय.

२. ब्राऊन यांच्या मते, व्यक्ती व अन्य व्यक्ती, समाजसमूह व विविध प्रकारच्या वर्तन वैशिष्ट्यांनी युक्त अशा सांस्कृतिक वातावरणातील आंतरक्रियांचा अभ्यास म्हणजे "शैक्षणिक समाजशास्त्र होय."

३. ऑटोवे म्हणतात की, 'सामाजिक वातावरणाचा विकसनशील बालकावर जो प्रभाव पडत असतो त्याचाच शैक्षणिक समाजशास्त्र प्रामुख्याने विचार करते.'

४. कुक आणि कुक म्हणत की, सर्व प्रकारच्या शिक्षणपद्धतीमध्ये अंतर्भूत असलेल्या अध्ययन-अध्यापनक्रियांचा दर्जा सुधारण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून ते उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने शिक्षणप्रक्रियेतील मानवी घटक कसे सहाय्यभूत होऊ शकतात याचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे शैक्षणिक समाजशास्त्र होय.

थोडक्यात ह्व

- शैक्षणिक समाजशास्त्रात शिक्षणप्रक्रियेला सहाय्यभूत ठरणाऱ्या घटकांना महत्त्व दिले जाते.
- व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पाडणाऱ्या सामाजिक वातावरणाचा विचार प्रामुख्याने शैक्षणिक समाजशाखांत केला जातो.
- शिक्षण प्रक्रियेतील मानवी घटकांचे महत्त्व लक्षा**त** घेतले जा`.
- शैक्षणिक समाजशास्त्रात सामाजिक संबंध, सामाजिक संस्था समूह इत्यादींना शैक्षणिक समाजशास्त्रात महत्त्व दिले जाते.

## १.४ शैक्षणिक समाजशास्त्राचे स्वरुप आणि व्याप्ती (Nature and scope of sociology of education) :

शिक्षण हे समाजव्यवस्थेचे महत्त्वाचे अंग आहे. समाजव्यवस्था सुरळीत चालण्यासाठी यासाठी समाजशास्त्र काही सिद्धांत मांडते व इतर सामाजिक संस्थांची शिक्षणाचे कसे संबंध असावेत याविषयी मार्गदर्शन करते. समाजशास्त्रज्ञ ज्या अर्थाने कुटुंब, धर्म, कायदा इत्यादींना सामाजिक संस्था मानतो. याच अर्थाने शिक्षणपद्धतीला समाजशास्त्रीय दृष्टीने सामाजिक संस्था मानतो. शैक्षणिक समाजशाखाचे स्वरुप पाहताना शिक्षण म्हणजे काय हे पाहणे आवश्यक आहे. मानसशास्त्रीय दृष्टीने शिक्षण ही व्यक्तिगत बा**ब** अ हे. परंतु समाजशास्त्र शिक्षणाला सामाजिक प्रक्रिया (डेलळरश्र झीलशीी) मानते. समाजशास्त्रज्ञांच्या मते, शिक्षण

म्हणजे सामाजिकीकरण (ीेलळरश्रेसळीळेप) होय. सामाजिकीकरण म्हणजे 'ज्या प्रक्रियेद्वारे व्यक्ती सामाजिक वातावरणाशी जुळवून घेते व समाजात एक सन्मान्य, सहकार्यशील व कार्यक्षम व्यक्ती म्हणून जीवन जगू लागते त्या प्रक्रियेला सामजिकीकरण म्हणतात. ऑटावे म्हणतात की, 'शिक्षण ही समाजातच चालणारी प्रक्रिया आहे. तिची ध्येय व पद्धती या ज्या समाजात चालणारी प्रक्रिया चालते त्या समाजाच्या स्वरुपावर अवलंबून असतात.'' शैक्षणिक समाजशास्त्राचे स्वरूप लक्षात घेता जॉन ड्युई यांचे मत लक्षात घ्यावे लागते. त्यांच्या मते, सामाजिक व्यवहार व परंपरागत उद्दिष्टांमध्ये व्यक्तीला सहभागी करून घेऊनच शिक्षणाला प्रारंभ किंवा सुरुवात केली पाहिजे. ब्राऊन म्हणतो की, 'प्रचलित सामाजिक परिस्थितीशी जुळवून घेणे एवढेच शिक्षणाचे मर्यादित उद्दिष्ट नव्हते तर समाजपरिवर्तन हेही शिक्षणाचे एक प्रमुख कार्य आहे. ब्रुबेकर यांच्या मते, शिक्षणही सामाजिक क्रियाच आहे. सामाजिक प्रक्रियेचा अभ्यास करणे हा शैक्षणिक समाजशास्त्राचाच नव्हे तर 'एकूण शैक्षणिक तत्त्वज्ञानाचाही महत्त्वाचा विषय आहे''.

थोडक्यात, शिक्षण हे समाजाने शिरोधार्य मानलेले तत्वज्ञान, मान्य केलेली अधिकृत मूल्ये व आदर्श लोकंमध्ये संक्रमित करण्याचे एक साधन आहे. हा दृष्टिकोण तत्त्वज्ञानाने समाजशास्त्राला दिला आहे. शिक्षण ही व्यक्तिगत प्रक्रिया कशी आहे या चा मानशशास्त्रज्ञाने प्रकाश टाकला. तर समाजशास्त्र शिक्षणाचे स्वरुप स्पष्ट करताना शिक्षण हे प्रामुख्याने सामाजिक प्रक्रिया आहे व विविध प्रकारच्या सामाजिक संबंधांमधून ती घडून येते.

**शैक्षणिक समाजशास्त्राची व्याप्ती** (Scope of sociology of education)**:**

शिक्षण ही समाजाची उपव्यवस्था (Sub-system) म्हणून समाजशास्त्रात अभ्यास केला जातो. 'शैक्षणिक शिक्षण', सामाजिकीकरण, धर्मसंस्था, सामाजिक वर्गव्यवस्था, सामाजिक विकास या दृष्टीकोनातून अभ्यास करताना समाजाच्या गरजा भागविणारी उपव्यवस्था म्हणजे ज्या अर्थसंस्थेकडे पाहिले जाते या अर्थसंस्थेचाही अभ्यास, राजकीय संस्थेचाही अभ्यास शैक्षणिक समाजशास्त्रात केला जातो. एकंदरीतच समाजातील शिक्षणाची कमी... व्याप्ती लक्षात घेऊन सामजिक संबंध, सामाजिकीकरण, सामाजिक व्यवस्था, सामाजिक परिस्थिती, आर्थिक विकास, मानवी संसाधनांचा विकास, समाजकल्याण इत्यादी दृष्टीकोनातून शैक्षणिक समाजशास्त्राची व्याप्ती लक्षात घ्यावी लागते. तसेच

ह्व ● शिक्षणाच्या स्थानाचे समाजातील महत्त्व.

ह्व ● कुटुंब, शाळा, धार्मिक संस्था यांच्यातील परस्परसंबंधांचा अभ्यास.

ह्व ● स्थानिक समाजाच्या गरजा व आकांक्षा यांचा विचार, दृकश्राव्य स धनांचा शिक्षणावर होणारा परिणाम इत्यादी क्षेत्रांचा शैक्षणिक समाजशास्त्रात विचार करावा लागतो.

## १.५ शैक्षणिक समाजशास्त्राचा विकास (Development of sociology of education) :

अमेरिकन कमिशनर ऑफ एज्युकेशन असणारे विल्यम टी. हॅरिसने प्रथम शिक्षण हे

समाजशास्त्रावर आधारित असावे हा विचार मांडला. इ.स. १८१७ मध्ये शिकागो विद्यापीठातील अल्निआॅन डब्ल्यू स्मॉल या समाजशास्त्राच्या प्राध्यापकाने प्रत ेक शिक्षकास समाजशास्त्रीय दृष्टिकोनाची ओळख असण्याची आवश्यकता स्पष्ट केली. जॉन ड्युई यांनी शाळा ही एक सामाजिक संस्था असून शिक्षण ही एक सामजिक प्रक्रिया आहे से विचार मांडले तर एस. पी. उटनने यांनी शाळा ही सामाजिक संस्था असून तिची ध्येय सामाजिक असून तिच्या व्यवस्थापन, शिस्त, अध्यापन पद्धतीवर या विचारांचा पगडा असला पाहिजे हा विचार पुढे मांडला.

शैक्षणिक समाजशास्त्राचा पुरस्कार करणारे अनेक विचारवंत होते. डब्ल्यू बी. ब्रुकओव्हर (W. B. Brookover) यांच्या मते १८८३ ते १९४५ पर्यंतच्या काळात शैक्षणिक समाजशास्त्राच्या वेगवेगळ्या संकल्पना उदय पावल्या. यामध्ये

* शिक्षणाची उद्दिष्टे ठरविण्यासाठी शैक्षणिक समाजशास्त्राचा आधार घ्यावा असे सांगणारे स्नेडन, पीटर्स, क्लेमन्टस् व किनेमन या विचारवंतांचा समावेश होतो.
* शैक्षणिक समाजशास्त्र हे उपयाजित समाजशास्त्र आहोंक्षेण ार स्मिथ, झौरबोह (Zorbauch), काल्प (Kalp), लेस्की झेलिनी (Leskie zeleny) हे विचारवंत होते.
* सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेचे पृथक्करण म्हणजे शैक्षणिक समाजशास्त्र होय, असे प्रतिपादन करणारे इलवुड (Ellwood), स्मिथ (Smith), आणि ब्राऊन (Brown) हे विचारवंत होते.
* शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे एक साधन म्हणजे शैक्षणिक समाजशास्त्र होय, असे प्रतिपादन करणारे विचारवंत म्हणजे झेलनो (Zeleny) व पेन (Peyne) हे होत.

जॉन ड्युई, एमील डरवीन, कार्ल मॅनहीन, टॉलकॉट पार्सन्स, रॉब ं मर्टन, मॅक्स वेबर, कार्ल मार्क्स इव्हान इलिच, पॉवले क्रिअटे या समाजशास्त्रज्ञांच्या विचारावर शिक्षणाच्या समाजशास्त्राची पायाभरणी करण्यात आली. भारतात राधाकमल मुखर्जी, आर. एन. सक्सेना इत्यादींचा विचार शैक्षणिक समाजशास्त्राच्या विकासात करावा लागेल.

## **१.६ शैक्षणिक समाजशास्त्राचा अभ्यासविषय** (Subject matter of sociology of education) **:**

शैक्षणिक समाजशास्त्राची व्याप्ती डब्ल्यू. बी. ब्रुकओव्हर (W. B. Brookover) यांनी पुढीलप्रमाणे सांगितली आहे.

१. समाजाच्या इतर घटकांशी असलेले शिक्षण व्यवस्थेचे नाते किंवा संबंध.
२. सामाजिक नियंत्रण वा इतर सामाजिक अधिकार पद्धतीच्या प्रक्रियांशी शिक्षण व्यवस्थेच्या असलेल्या संबंध व्यवस्थेचा अभ्यास करणे.
३. सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाची किंवा त्याबाबतची स्थिती कायम राखण्याच्या

प्रक्रियांमधील शिक्षणव्यवस्थेच्या कार्याचा अभ्यास करणे.

४. सामाजिक वर्ग, दर्जाशी शिक्षणाचा असलेल्या संबंधांचा अभ्यास करणे.

५. सामाजिक, सांस्कृतिक व इतर समूहांशी असलेल्यांं सं धांच्या स दर्भात औपचारिक शिक्षणव्यवस्थेच्या कार्याचा अभ्यास करणे.

६. शिक्षणव्यवस्थेतील सामाजिक संबंधांचा अभ्यास करणे.

७. शैक्षणिक प्रक्रियेत भाग घेणाऱ्या व्यक्तींच्या वर्तणुकीवर किंवा व्यक्तिमत्वावर होणारा शिक्षणाचा परिणाम अभ्यासणे.

८. शिक्षणाच्या सामाजिक भूमिकेचा अभ्यास करणे.

९. मुलांच्या सामाजिकीकरणासंदर्भात शिक्षण संस्थेचे कार्य किंवा भूमिका अभ्यासणे.

१०. थोडक्यात समाजपरिवर्तन, सामाजिक संस्था, संस्कृती, वर्ग, सामाजिक वातावरण, सामाजिकीकरण, सांस्कृतिक पर्याय, तडजोड, स्पर्धा, सहकार्य, समाविशन, उर्जा, भूमिका नियमने आणि मूल्ये इत्यादींचा शिक्षणावर होणारा परिण म व शिक्षणाचा सामाजिक संकल्पनावर, प्रक्रियेवर होणारा परिणाम अभ्यासण्याचे प्र. ... कार्य शैक्षणिक समाजशास्त्र करते.

## **१.७ शिक्षणाची उद्दिष्टे** (Objectives of education) **:**

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात, व्यवहारात ध्येयाचे किंवा उद्दिष्टाचे महत्त्व सांगण्याची आवश्यकता नाही. परंतु शिक्षणाचे कार्य ज्यांच्योबर सो वले आह त्यांना शिक्षणाचे उद्दिष्ट माहित असणे आवश्यक आहे. शिक्षण म्हणजे जर सर्वांगीणविकास हा अर्थ घेतला तर शिक्षणाच्या उद्दिष्टांत ज्ञानप्राप्ती, आकलन, कौशल्य विकसित करणे, व्यावहारिक उपयोग, अभिरूची व अभिवृत्ती, रसग्रहणचा पाच घटकांचा समावेश होतो. हे सर्व घटक लक्षात घेऊन शिक्षणाचे काही प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे सांगता येतील.

### **१. ज्ञानप्राप्ती :**

भगवान श्रीकृष्ण गीतेत म्हणतात, 'नहि ज्ञानेर सदृश्यं पवित्रमिह विद्यते ।' तर बेकन म्हणतो, 'Knowledge is Power' या दोन विचारांवरून ज्ञानाचे महत्त्व लक्षात येते. अद्ययावत ज्ञानाच्या अभावी आधुनिक जगात व्यक्ती तग धरू शकणार नाही. स्पर्धेत तो मागे पडेल म्हणून ज्ञानप्राप्तीला जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. ज्ञान प्राप्त करून घेण्याचे प्रमुख साधन म्हणजे शिक्षण हे होय. व्यक्ती लहानपणापासूनच ज्ञानप्राप्ती करून घेतो. व्यक्ती जन्मापासून ते मृत्यूपर्यंत सतत ज्ञानप्राप्ती करून घेत असतो. तरी विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानजिज्ञासा जागृत करून त्यांना ज्ञानसाधनेला प्रवृत्त करणे हे शिक्षकाचे प्रथम कर्तव्य आहे. जिज्ञासा ही ज्ञान मिळविण्याचा महत्त्वाचा मार्ग आहे. प्राचीन काळापासून म्हणजे गुरु-शिष्य परंपरा अर्थात गुरुकुल पद्धतीपासून ज्ञानप्राप्तीला महत्त्वाचे स्थान आहे. आजच्य शिक्षणव्यवस्थेविषयी सर जॉन ॲडम्स म्हणतो, ''आपल्या शाळा म्हणजे माहितीवजा ज्ञानाचा पुरवठा करणारी दुकाने व शिक्षक म्हणजे ते विकणारे विक्रेते.'' असे माहितीवजा ज्ञान हे ना व्यक्तीला ना

समाजाला उपयोगी पडणारे असते. खरे ज्ञान हे व्यक्तीला त्याच्या वर्तनावर व जीवनविषयक दृष्टिकोनावर काही संस्कार उमटला आहे. व्यक्तीच्या डोक्यात केवळ माहिती कोंबणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट नसून ज्या ज्ञानाने विद्यार्थ्याला जीवनविषयक लाभ मिळेल. त्याच्या आचरविचारांत परिवर्तन घडून येईल तेच खरे ज्ञान होय हेच शिक्षणाचे उद्दिष्ट आहे.

### २. मानसिक शक्तीचा व प्रवृत्तीचा विकास :

ज्ञानविकास म्हणजे ज्ञानार्जन क्षमतेचा विकास होय किंवा ज्ञानार्जन प्रक्रियेत अंतर्भूत असलेल्या निरनिराळ्या मानसिक शक्तीचा विकास, बुद्धीविचार, तर्क, कल्पना, विश्लेषण, आकलन, उपयोजना, रसग्रहण अशा विविध शक्ती मानवाला जन्मजातच मिळाल्या आहेत. परंतु त्या सुप्त अवस्थेत असतात. त्यांना चालना देणे किंव या प्रवृत्तींचा विकास करण्याचे महत्त्वाचे कार्य शिक्षणाचे आहेत. शिक्षणाद्वारे निसर्गप्राप्त शक्ती जागृत व्हायला हव्यात, कार्यक्षम व्हायला हव्यात. मानव हा विचार करणारा प्राणी असल्याने त्याला विचार करायला आपण किती संधी देतो, वाव देतो हे महत्त्वाचे आहे हे काम शिक्षण करत असते. मुदलियार आयोगात म्हटले आहे की, ''पाठाचे यश हे त्या पाठात किती भाग संपवला यावर अवलंबून नाही तर त्यातून विद्यार्थ्यांच्या आकलनशक्तीचा, रसग्रहणशक्तीचा व कार्यकुशलतेचा किती विकास झाला यावर तो अवलंबून आहे.'' कायम टिकते ते शिक्षण होय. तर कायम काय टिकते ? तर मन:शक्तींना लागलेले वळण, मनोवृत्तीवर झालेले संस्कार, विचार, भावनांना लागलेल्या चांगल्या सवयी. थोडक्यात शिक्षणाचा उद्देश हा मानसिक शक्तीचा व प्रवृत्तीचा विकास हे आहे.

### ३. उपयोजनकौशल्य व व्यावहारिक कार्यक्षमता विकास :

जीवन जगत असताना ज्या अडचणी समोर येतात त्यांना तोंड देण्याचे, उद्‌भवणाऱ्या समस्या सोडविण्याचे सामर्थ्य म्हणजे शिक्षण होय. जॉन ड्युईच्या मते, 'विचार म्हणजे समस्या सोडविणे व शिक्षण म्हणजे ज्ञानाचा उपयोग करून घेण्याचे कौशल्य संपादन करणे म्हणजे शिक्षण' ज्ञानाचे महत्त्व अनन्यसाधारण असले तरी सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने ज्ञानापेक्षाही शहाणपणाला (Wisdom) अधिक महत्त्व आहे. Wisdom म्हणजे ज्ञानाचे उपयोजन करण्याचे कौशल्य होय. ज्ञानामुळे विद्‌वत्ता प्राप्त होते; तर शहाणपणामुळे सामर्थ्य प्राप्त होते. उपयुक्तता हेच खरे ज्ञानाचे मूल्य आहे. म्हणून शिक्षणाचे खरे उद्दिष्ट हे ते जीवन उपयोगी असले पाहिजे हे आहे.

### ४. उपजीविका व व्यवसाय शिक्षण :

नोकरी करावी, एखादा व्यवसाय करावा, कुटुंबियांच्या गरजा भागवाव्यात याच हेतूने अनेक शिक्षयाकडे पाहत असतात. या ध्येयालाच 'उदरभरणा' (Bread & Butter) चे ध्येय म्हणतात. ज्ञानसंवर्धन, अध्यात्मिक व नैतिक विकास, चारित्र्य निर्मिती इत्यादी ध्येयाच्या तुलनेत हे ध्येय कमी प्रतीचे असले तरी कमी महत्त्वाचे किंवा उपेक्षणीय मात्र नाही. म्हणजेच 'माणूस' केवळ भाकरीवर जगू शकत नाही हे खरे परंतु ता भाकरीशिवायही जगू शकत नाही ही त्याहूनही खरी बाब आहे. सध्या ज्ञानप्राप्ती व सांस्कृतिक विकास या

शिक्षणाच्या ध्येयाबरोबरच उपजीविका व व्यवसाय शिक्षण यालाही महत्त्व आले आहे. आध्यात्मिक दृष्टीनेही उपजीविकेला महत्त्व आहे. रामदास स्वामींच्या मते, ''आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका । तर संत ज्ञानेश्वरांच्या मते 'जेयाचे ऐहिकही धड नाही । तेयांचे परत्र पूससी काई । म्हणजेच संत महात्म्यांनी ही उपजिवीकेला महत्त्वाचे स्थान दिले आहे. म्हणून शिक्षणाच्या उद्दिष्टांत उपजीविकेला महत्त्वाचे स्थान आहे म्हणून आधुनिक शिक्षण हे व्यवसायाभिमुख किंवा नोकरीभिमुख असावे. याकरीता प्रयत्न आहेत. म. गांधी यांनी मुलोद्योगी शिक्षणाच्या योजना सादर करून शिक्षणाचा व्यवसापायी व उपजीविकेशी संबंध जोडण्याचा सर्वप्रथम प्रयत्न केला. कोठारी आयोगानेही उत्पादन क्षमता व स्वयंपूर्णता या ध्येयाला राष्ट्रीय उद्दिष्ट मानून शिक्षणात त्याला अग्रस्थान दिले आहे.

### ५. व्यक्तिगत पात्रतेचा विकास :

'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' या तत्त्वाप्रमाणे प्रत्येक व्यक्तीची बुद्धिमत्ता वेगळी, अभियोग्यता, आवडीनिवडी वेगवेगळ्या इच्छा-आकांक्षा वेगवेगळ्या ही व्यक्तिगत भिन्नता ध्यानात घेऊन प्रत्येकाला आपआपल्या बुद्धिनुसार व पात्रतेनुसार शिक्षण होण्याचे, आपल्या आवडीनिवडींचा विकास करून घेण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. सर्वांना समान नियम लावता कामा नये. अन्य गुणांच्या विकासालाही संधी दिली पाहिजे. थॉर्न डाईकने बुद्धीचे तीन प्रकार सांगितले आहेत. १. अमूर्त पातळीवर विचार करण्याची क्षमता किंवा पुस्तकी शिक्षण घेण्याची पात्रता. २. प्रत्यक्ष वस्तू हाताळून त्यातून नवनिर्मिती करण्याची क्षमता ३. इतरांशी वागण्याची, सामाजिक जबाबदारी पार पाडण्याची पात्रता. यापैकी सामान्य बुद्धिऐवजी विशेष बुद्धिमत्ता, अभियो.... हा विचार पुढे आला आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांतील त्याच्या अंगी असलेल्या विशेष गुणांच्या विकासामुळे त्याचे व्यावसायिक जीवन यशस्वी झाले आहे. थोडक्यात शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये हा उद्देश शिक्षणाचा असल्याने शिक्षणात व्यक्तिगत पात्रतेचा विकास हा महत्त्वाचा उद्देश शिक्षणाचा आहे.

### ६. सृजनशिलतेचा व प्रतिभेचा विकास :

सृजनशिलता म्हणजे नवनिर्माणक्षमता होय. ही सृजनशीलता प्रतिभेशी समतुल्य अशी मानसिक शक्ती होय. प्रतिभा ही सृजनशिलतेच्या वरची पातळी होय. बुद्धिमत्ता, सर्जनशीलता, कलात्मकता किंवा प्रतिभा ही ठराविक विद्यार्थ्यांमध्ये आढळते. स्टीव्हनसन च्या मते, ''प्रतिभा म्हणजे दहा टक्के दैवी वा जन्मजात शक्ती तर नव्वद टक्के परिश्रम होय.'' म्हणजेच सृजनशीलता किंवा प्रतिभा ही निसर्गदत्त असली तरी तिचा विकास हा प्रयत्नसाध्य आहे. म्हणून प्रतिभागुणांची जोपासना करणे, मार्गदर्शनाद्वारे त्य ंना संस्कारित करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे.

### ७. सामाजिकता, नागरिकत्व व राष्ट्रीयत्व यांचा विकास :

प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असले तरी तो समाजाचा व र ष्ट्राचा एक जबाबदार नागरिक असतो म्हणून त्याच्या ठिकाणी सामाजिकतेचा विकास करून सामाजिक व राष्ट्रीय जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हे शिक्षणाचे एक महत्त्वाचे उद्देश आहे.

लोकशाहीची यशस्वींना भवितव्य हे नागरिकांच्या गुणवत्तेवर अवलंबून आहे. ही गुणवत्ता शिक्षणामुळे येत असते. व्यापक सामाजिक हितासाठी व्यक्तिगत हित बाजूला सारण्याची, पदार्थासाठी स्वार्थभावनेवर विजय मिळविता यावा याकरीता सामाजिक प्रेरणा व्यक्तीमध्ये निर्माण झाली पाहिजे. प्रतिभावंतांनी व कलावंतांनी स्वच्छ दी न वागता किंवा स्वान्त: सुखाय' यासाठी उपयोग न करता 'बहुजनहिताय-बहुजन सुखाय' या न्यायाने केले पाहिजे. म्हणून विद्यार्थ्यांत सामाजिक दृष्टिकोन, नागरिकत्वाची जाणीव, कर्तव्यनिष्ठा व लोकहित दक्षता निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षणावर येऊन पडते. जा ीयता, भाषिकता, प्रांतीयता, धार्मिकता, फुटीरवादी हाती बळावत आहेत. आधारणीवर र ष्ट्रीय एकात्मता टिकविण्यासाठी शिक्षणाचे उद्दिष्ट हे सामाजिकता, नागरिकत्व व राष्ट्रीयत्व याचा विकास करणे हेच असले पाहिजे.

### ८. सौंदर्याभिरुची व रसिकता यांचा विकास :

कुलनिर्मिती किंवा कलास्वाद ही मानवाची मूलभूत गरज नाही याशिवाय मानव जिवंत राहू शकतो. परंतु त्याच्याअभावी मानवी जीवनात आनंद निर्माण होणार नाही. त्याशिवाय मानवी जीवनाला संपन्नता व परिपूर्णता येणार नाही. प्रत्येक व्यक्ती ही कलावंत व प्रतिभावंत होऊ शकणार नाही. परंतु रसिक मात्र निश्चित बनू शकतो. कलांच्या आस्वादामुळे व्यक्तीमध्ये सौंदर्यदृष्टीसोबतचे संवेदनशिलता, कल्पकता, सहृदयता या गुणांचा विकास, भावनात्मक विकास हातो. म्हणून विद्यार्थ्यांमध्ये कलाअभिरुची, सौंदर्यदृष्टी व रसिकतेचा विकास होण्यासाठी प्रयत्न शिक्षणाच्या माध्यमातूनच होत असता .

### ९. फुरसतीचा सद्‌उपयोग :

व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा दर्जा हा तो फुरसदीच्या वेळचा उपयोग कशा प्रकारे व्यतीत करतो यावर अवलंबून असतो. माणसाच्या आवडीनिवडी वेगवेगळ्या असतात, त्या आवडीनुसार आपला फुरसदीचा वेळ व्यतीत करत असतो, याकरीता त्या व्यक्तीच्या ठिकाणी योग्य त्या आवडी-निवडी-छंद निर्माण केले पाहिजेत. रिकाम्या वेळेचा सहउपयोग कसा करावा याचे शिक्षण विद्यार्थीदशेपासूनच मिळायला हवे युना पुरस्कृत मूलभूत शिक्षण योजनेच्या शैक्षणिक उद्दिष्टांत फुरसदीच्या वेळेचा सद्‌उप या ग करण्याच्या शिक्षणालाही महत्त्वाचे स्थान दिले आहे. विद्यार्थ्यांमध्ये कलाअभिनयाचा विकास करणे, वेगवेगळे छंद लावणे व जोपासणे, सवयींना हितकारक वळण देणे हे शिक्षणाचे एक ध्येय किंवा उद्दिष्ट आहे.

### ११. सुसंस्कृततेचा विकास :

शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट हे सुसंस्कृत मानव निर्माण करणे हे आहे. संस्कृती व कलाच व्यक्तीच्या जीवनाला उदारता व सखोलता प्राप्त करून देऊ शकतात. व्यक्ती ज्ञानसंपन्न झाला. बुद्धिमत्तेचा विकास झाला व त्याच्या अंगी सौंदर्यदृष्टी व कलाभिरूची निर्माण झाली म्हणजे तो सुसंस्कृत झाला असे साधारण मानले जाते. ज्याच्या अंत:करणामध्ये सुहृदता, मानवता व करूणा या गुणांचा विकास झाला आहे तोच खरा सुसंस्कृत व्यक्ती होय.

साहित्य, कला, तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्रे यांच्या अभ्यासातून अशा सुसंस्कृतपणाच्या जीवनदृष्टीचा विकास होत असतो. म्हणूनच विज्ञान व तंत्रज्ञानात शाखांमधील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एकांगी विकास होऊ नये म्हणून त्यांच्या अभ्यासक्रमातही सामाजिक शास्त्रांच्या अध्ययनाची सोय करण्यात आली आहे. थोडक्यात सुसंस्कृत समाजाची निर्मिती करण्याचे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे.

**''नैतिक व अध्यात्मिक मूल्यांचे संस्कार करणे :**

नैतिकता व अध्यात्मिकतेशिवाय व्यक्तिमत्त्वाला काहीच अर्थ नाही. नैतिकतेच्या अभावामुळेच सर्वत्र भ्रष्टाचार, हीन कृत्य दिसू लागले आहेत. समाजाची व देशाची प्रगतीही चारित्र्यसंपन्न लोकांवरच अवलंबून असते. प्रामाणिकपणा, सत्यप्रियता, विनय, दु:खी कष्टी व गरीबांबद्दल सहानुभूती, सेवा, त्याग, नि:स्वार्थवृत्ती, माणुसकी, ध्येयनिष्ठ इत्यादी गुणांचा नीतिमत्तेत व चारित्र्यात समावेश होतो. आध्यात्मिक वृत्तीही नितीमत्तेचा पाया आहे. म्हणूनच विद्यार्थ्यांत या गुणांचा विकास करणे शिक्षणाचे ध्येय आह . कोठारी आयोगाने नैतिक व अध्यात्मिक मूल्यांचा विकास हे एक राष्ट्रीय उद्दिष्ट मानले आहे. डॉ. राधाकृष्णन म्हणतात की, ''आपण एक संस्कृती घडवीत आहोत, एखादा कारखाना नाही. संस्कृतीचे मूल्य व श्रेष्ठत्व हे भौतिक समृद्धी वा शासकीय यंत्रणेवर अवलंबून नसून व्यक्तींच्या चारित्र्यावर आहे, म्हणून शिक्षणाचे प्रमुख कार्य हे चारित्र्य निर्मिती आहे.''

**१२. शरीरस्वास्थ्य व शरीरसंवर्धन :**

प्राचीन शिक्षणात शारीरिक विकास करणे हे शिक्षणो ध्ये होत . प्लेटोने आपल्या शिक्षण योजनेतील प्राथमिक अवस्थेत शारीरिक शिक्षणावर भर दिला होता. रूसोनेही मुलाला निसर्गांच्या सानिध्यात बागडू द्यावे, खेळू द्यावे, झाडावर चढू द्यावे, पाण्यात पोहू द्यावे असे अगदी प्रतिपादन केले होते. दुर्बलतेतूनच विकृती जन्माला येतात असे रूसो म्हणतात. प्लेटोने आपल्या अभ्यासक्रमात 'Gymnastics' बरोबरच Music (संगीत) या विषयाचा अंतर्भाव केला आहे. शारीरिक विकासाचा प्रयत्न विद्यार्थ्यांचे मानसिक सा र्थ्य वाढविण्याच्या दृष्टीने झाला पाहिजे. योगशिक्षण हे याचे एक उत्कृष्ट साधन आहे. त्यामुळे शारीरिक व मानसिक स्वास्थ्याकरीता शिक्षणाची आवश्यकता असल्याने शिक्षणात याला महत्त्वाचे

**१३. समायोजन क्षमता :**

समायोजन म्हणजे परिस्थितीशी जुळवून घेणे होय. समायोजन ही मानवी जीवनातील आवश्यक बाब मानली जाते. म्हणून उपलब्ध परिस्थितीशी समायोजन साधण्याचे शिक्षण मुलांना दिले पाहिजे. प्रत्येकाला आपल्या मर्यादांची जाणीव करून देऊन त्यानुसार आशा-आकांक्षांना मुरड घालून झेपेल ते शिक्षण, व्यवसाय करण्याची शिकवण त्याला दिली पाहिजे. योग्यता असूनही अनेक वेळा निराशा पदरी पडते. अशा वेळी परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्याचे कार्य शिक्षणाचे आहे.

---

## १.८ सैद्धांतिक दृष्टीकोण :

---

फ्रेच समाजशास्त्रज्ञ एमील डरखीम यांना शैक्षणिक समाजशास्त्राचा प्रणेता मानला जातो. एमील डरखीम यांनी शैक्षणिक सिद्धांताचे अध्ययन करून समाजशास्त्रात त्यांना स्थान दिले. त्यांनी पॅरिस येथील वास्तव्यात असताना 'Science of education & sociology' हा विशिष्ट स्वरुपाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्याचबरोबर Education of Moral-1925, The Evolution & Educational thought-1838 या तीन पुस्तकाच्या माध्यमातून शिक्षणाविषयीचा सैद्धांतिक दृष्टिकोण स्पष्ट केला. ही पुस्तके एमील डरखीमच्या मरणोत्तर प्रकाशित झाली.

एमील डरखीम यांनी प्रथमपासूनच शैक्षणिक प्रक्रिया व शिक्षणाच्या विविध प्रकारांचे समाजरचनेशी व समाजाचे सामाजिकरणाशी कशा प्रकारचे संबंध आहेत या अध्ययनावर अधिक भर दिला. त्यामुळेच त्यांना शैक्षणिक समाजशास्त्राचा प्रणेता म्हणतात.

शैक्षणिक समाजशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करताना एमील डरखीमने सर्वप्रथम समाजशास्त्रीय दृष्टिकोनाशी शिक्षणाच्या अध्ययनात असलेली आवश्यकता लक्षात घेतली आहे. डरखीमच्या मते, शिक्षण ही एक समाजशास्त्रीय संकल्पना आहे. त्याने शिक्षण ही संकल्पना विचारात घेताना 'कोणत्याही आवश्यक सामाजिक विचारांचा उगम हा त्याच्या कार्यातून होत असतो' हे तत्त्व महत्त्वाचे मानलेले आहे. तसेच शिक्षणाचे विविध सिद्धान्त हे इतर शास्त्रापेक्षा समाजशास्त्राशी अधिक प्रमाणात संबंधित आहेत, असे म्हटले जाते.

एमील डरखीमने शिक्षणातच खऱ्या अर्थाने समाजशास्त्राचा **मूल** अ त ा आहे हे तत्त्व मान्य करून डरखीम शैक्षणिक आदर्शाचे सामाजिक-सांस्कृतिक परिस्थिती व विविध महत्त्वाच्या शैक्षणिक उपक्रमांच्या प्रकारात प्रत्येक समाजानुरूप मोठ्या प्रमाणात फरकानुरूप स्वरूपात शिक्षणाची महत्त्वपूर्ण व आवश्यक अशी भूमिका असते. एमील डरखीमच्या मते, शिक्षण हे एक स्थिर घटक नसून ती एक सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे. किंबहुना सामाजिक परिवर्तनाचे लक्षण 'शिक्षण/शिकणे' या शेब्क्षेद्वारे पष्ट हा ते. शिक्षण हे समाजात घडून येणारे परिवर्तन यांच्यावर आपला प्रभाव टाकत असते. तसेच सामाजिक परिवर्तनात आपली भूमिका महत्त्वपूर्णरित्या पार पाडीत असतो. शिक्षण हे सामुदायिक जीवनाच्या प्रवृत्तीचे तत्त्व रुजविण्यास शिक्षण एक सामर्थ्यशाली साधन आहे. त्याचबरोबर सामाजिक आदर्श व सांस्कृतिक मूल्यांची निर्मि**ती** शिक्षणाद्वारे केल जाते.

शिक्षण एक सामाजिक घटक आहे हे स्पष्ट करण्यासाठी डरखीमने काही समाजशास्त्रीय दृष्टीकोण सांगितलेले आहेत.

- शिक्षण व त्याचे समाजशास्त्रीय कार्य ही एक प्रचलित सामाजिक वस्तुस्थिती आहे.
- शिक्षण व सामाजिक सांस्कृतिक परिवर्तनात घनिष्ठ स्वरुपाचे संबंध आहेत.
- सांस्कृतिक संक्रमणात व तुलनात्मक संशोधनात शैक्षणिक व्यवस्थेचे विविध प्रकार समाविष्ट होत असतात.
- शाळांमध्ये सामाजिक व्यवस्थेच्या संदर्भातील विकासाचा मागोवा लक्षात घेतला जातो.

उपरोक्त विवेचनात डरखीमचा शिक्षणाच्या समाजशास्त्रासंबंधीच्या दृष्टीक्षेपाचे महत्त्व

लक्षात येते. त्याच्या या दृष्टिक्षेपाचा वापर पुढे अनेक विचारवंतांनी केला आहे. यात मुख्यत्वेकरून बुकोव्हर, पार्सन्स, मर्टन, सॅम्युअल, गोटलीन इ. सारख्या महत्त्वाच्या समाजशास्त्रज्ञांचा समावेश होतो. या समाजशास्त्रज्ञांमुळे ा अर्थान शिक्षण संस्थांचे सैद्धांतिक समाजशास्त्रीय दृष्ट्या अध्ययन करण्यात महत्त्वाचे योगदान आहे. या विचारवंतांच्या मते, शिक्षणाची भूमिका ही व्यक्ती व समाजाच्या विकासात अ शय महत्त्वाची असते. शिक्षणाद्वारेच व्यक्तीचे वर्तन व सामाजिक प्रक्रिया या उत्कृष्टरीत्या समजून घेता येत असतात. यामुळे वर्तमान काळात शिक्षणाचे समाजशास्त्राला समाजशास्त्राचे एक महत्त्वाची उपशाखा मानली जाऊ लागली.

## १.९ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

प्र.१ला एका वाक्यात उत्तरे लिहा

अ) शिक्षण म्हणजे काय ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

ब) शैक्षणिक समाजशास्त्राचे जनक कोणास म्हटले जाते ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

क) जॉर्ज पेन यांचा शैक्षणिक समाजशास्त्राशी संबंधित ग्रंथ कोणता ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

ड) शिक्षणसंस्था ही समाजाची कोणती व्यवस्था आहे ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

इ) शिक्षण हे समाजशास्त्रावर आधारित असावे हा विचार प्रथम कोणी मांडला ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

ई) शैक्षणिक समाजशास्त्राची व्याप्ती कोणत्या विचारवंताने स्पष्ट केली ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

प्र.२रा टीपा लिहा

अ) शैक्षणिक समाजशास्त्राचे स्वरूप

---------------------------------------------------

---------------------------------------------------

ब) शैक्षणिक समाजशास्त्राची व्याप्ती

---------------------------------------------------

---------------------------------------------------

क) शैक्षणिक समाजशास्त्राचा विकास

---------------------------------------------------

---------------------------------------------------

ड) शैक्षणिक समाजशास्त्राचा अभ्यासविषय

---------------------------------------------------

---------------------------------------------------

इ) ज्ञानप्राप्ती - शिक्षणाचे उद्दिष्ट

---------------------------------------------------

---------------------------------------------------

प्र.३रा खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

अ) शैक्षणिक समाजशास्त्र म्हणजे काय ? अर्थ स्पष्ट करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

ब) शैक्षणिक समाजशास्त्राचा विकास थोडक्यात लिहा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

क) शैक्षणिक समाजशास्त्राचा अर्थ सांगून व्याप्ती स्पष्ट करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

ड) सामाजिकता, नागरिकत्व व राष्ट्रीयत्वाच्या विकासाकरीता शिक्षणाची आवश्यकता आहे काय ? स्पष्ट करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

प्र.४था खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा

अ) शिक्षण म्हणजे काय ? शिक्षणाची उद्दिष्ट स्पष्ट करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

ब) शैक्षणिक समाजशास्त्राची व्याख्या देऊन शैक्षणिक समाजशास्त्राचा अभ्यासविषय स्पष्ट करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

क) शैक्षणिक समाजशास्त्राविषयीचा एमील डरखीमचा सैद्धांतिक दृष्टिकोण स्पष्ट करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

## १.१० सारांश

शिक्षण ही समाजाची उप-व्यवस्था (sub-system) असून या उपव्यवस्थेचा समाजशास्त्रात शैक्षणिक समाजशास्त्र या शाखेअंतर्गत अभ्यास केला जातो. शिक्षणाचा आणि समाजाचा जवळचा संबंध आहे. शिक्षणाशिवाय समाजाचा व व्यक्तीचा विकास होत नाही. तरी शिक्षणसंस्थेवर समाजातील विविध घटकांचा.... सामाजिक वातावरण, जात, धर्म, संस्कृती इत्यादींचा प्रभाव पडत असतो. म्हणूनच शिक्षणाचा विचार सामाजिक दृष्टिकोनातून मांडण्याचा प्रयत्न जॉर्ज पेन यांनी त्यांच्या (Principals of educational sociology-1928) या ग्रंथाच्या माध्यमातून केला आहे. जॉर्ज पेन यांच्या मते ''व्यक्तीला अनुभवसिद्ध करणाऱ्या व तिच्या अनुभवांना सुसंघटित करणाऱ्या सामाजिक संबंधांचे व सामाजिक संबंध घडवून आणणाऱ्या संस्था, समाजसमूह व सामाजिक प्रक्रियांचे वर्णन व विवेचन करणारे शास्त्र म्हणते. शैक्षणिक समाजशास्त्र होय. समाजशास्त्र हे शिक्षणाला सामाजिक प्रक्रिया (Social process) मानते. समाजशास्त्रात शिक्षणाला सामाजिककरणाची प्रक्रिया मानतात. कारण शिक्षणामुळे ज्ञानप्राप्ती होते. या मिळालेल्या ज्ञानाच्या आधारे उपयोजन कौशल्य व व्यावहारिक कार्यक्षमता विकसित पावतात. एवढेच नव्हे तर मानसिक शक्तीचा व प्रवृत्तीचा विकास होतो. शिक्षणामुळेच उपजीविका व व्यवसाय शिक्षण मिळते. अर्थातच् ज्ञानप्राप्तीच्या आधारे व्यक्तिगत पात्रतेच्या विकासाबरोबरच सृजनशीलते व प्रतिभ चा विकास करणे, सामाजिकता, नागरिकत्व व राष्ट्रीयत्व यांचा विकास घडवून आणणे, सौंदर्याभिरूचि व रसिकता यांचा विकास, रिकाम्या वेळेचा सहउपयोग कसा करावा याचे शिक्षण, सुसंस्कृत समाजाची निर्मिती करणे इत्यादी समाजाच्या व व्यक्तीच्या दृष्टीने शिक्षणाचे उद्दिष्ट आहेत.

## १.११ संदर्भ सूची :


१. डॉ. कुंडले मधुकर (१९९०). शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र : श्री विद्या प्रकाशन, पुणे

२. डॉ. पारसनीस न. रा. (२००१), शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका : नित्यनूतन प्रकाशन, पुणे.

३. डॉ. दुनाखे, डॉ. देशपांडे (२००१), प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र : नित्यनूतन प्रकाशन, पुणे.

४. डॉ. पेंडसे प्रतिभा (२००६), उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, श्री मंगेश प्रकाशन, पुणे.

५. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ मुक्त विद्या केंद्र - तृतीय वर्षे- सामाजिक शास्त्रे अभ्यासक्रम- विशिष्ट सामाजिक प्रश्नांचा अभ्यास.


## १.१२ क्षेत्रीय कार्य/प्रात्यक्षिक कार्य :

* विविध जाती-धर्मातील विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक प्रगतीचा तुलनात्मक अभ्यास करून त्यांची कौटुंबिक, शैक्षणिक, आर्थिक पार्श्वभूमी त्यांच्या शैक्षणिक विकासाला पूरक-मारक ठरले आहे का ? याचे अवलोकन करावे. याकरीता व्यक्ती अस्थापन पद्धतीचा वापर करावा.

# प्रकरण २

# शिक्षण आणि समाज

## शिक्षणाचे सामाजिक घटक

**अनुक्रमणिका**


२.१. उद्दिष्टे

२.२. प्रस्तावना

  २.२.१. शिक्षण–सामाजिक उपव्यवस्था

  २.२.२. कौटुंबिक शिक्षण आणि सामाजिकरण

  २.२.३. शिक्षण आणि स्तरीकरण

  २.२.४. शिक्षण आणि गतिशिलता

२.३. पारिभाषिक शब्द

२.४. स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

२.५. सारांश

२.६. संदर्भ ग्रंथ


## २.१. उद्दिष्टे

'शिक्षण' हा घटक मानव विकासातील एक महत्त्वाचा घटक आहे. प्रत्येक समाजातील मूलभूत प्रक्रिया आहे. मानव जीवनाच्या आंरभापासून शिक्षणाची प्रक्रिया चालू आहे. त्यामुळे प्रत्येक समाजात व्यक्ती शिक्षणाला महत्त्व आहे. शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नाही तर यात व्यवसायिक, सामाजिक, धार्मिक, वर्तनविषयक, व्यवहारविषयक, कौशल्य इत्यादींशी संबंधित आहे.

या प्रकरणात आपण शिक्षणाचा संबंध सामाजिक घटकांशी कसा आहे ते अभ्यासणार आहोत.

या प्रकरणात –

- 'शिक्षण' समाजाची उपव्यवस्था आहे या संदर्भात जाणून घेता येईल.
- कुटुंबातील शिक्षण प्रक्रियाच्या संदर्भात माहिती समजून घेता येई.
- सामाजिकरण आणि शिक्षण यातील परस्पर संबंध जाणून घेता येतील.
- सामाजिक स्तरीकरण आणि शिक्षण यांचा प्रभाव समजून घेता येईल.
- शिक्षण आणि सामाजिक गतिशिलता यांचा परस्पर संबंध माहित करून घेता येईल.

## २.२. प्रस्तावना

'शिक्षण' ही संपूर्णतः सामाजिक वस्तू आहे. शिक्षणसंस्था समाजनिर्मिती आहे. शाळा हा ही एक लहानसा समाज आहे, मानवी विकास सामाजिक वातावरणातच घडून येतो. या स्थूल व प्राथमिक स्वरूपाच्या गोष्टी लक्षात घेतल्या की, शिक्षणाचा विचार समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून करण्याची आवश्यकता कळून येते. समाज म्हटला की त्यात कुटुंब, धर्म, राज्य इ. विविध संस्था आल्याच. समाजामध्ये विविध स्तर, जाती, वर्गही असतात. त्यांची प्रत्येकाची वेगवेगळी जीवन पद्धती असते. या विविध संस्था आणि समाजाची संस्कृती यांचा संबंध येतो. प्रामुख्याने संस्कृतीच्या संगोपन, संवर्धनासाठी 'शिक्षण' हे साधन म्हणून योजले जाते. सामाजिक संस्था शिक्षण प्रक्रियेला हातभारत लावतात आणि त्यावर आपला प्रभाव पाडतात. शिक्षण ही त्याच्या परिने त्याच्यावर आपला प्रभाव पाडते. अशी ही क्रिया-प्रतिक्रिया सतत चालू राहते. तेव्हा शिक्षणाला 'समाजशास्त्रीय अधिष्ठान' मिळाले तरच शिक्षणाचा विचार जास्त वास्तववादी विचारातून होईल. त्याचे यर्थाथ स्वरूप समजेल.

सामाजिकरणाच्या व त्याच्याशी निगडित असलेल्या अन्य प्रक्रियाच्याद्वारे 'समाजव्यवस्था' टिकवून ठेवण्याचे कार्य घडते. शिक्षणाचे कार्य म्ह णज 'संरक्षणशील' स्वरूपाचे आहे. पण समाजजीवन चालू राहावयाचे असेल तर त्यात परिवर्तन व्हायला हवे व तसे ते होत असते. या परिवर्तनामागील प्रमुख घटक कोणते? याचा शिक्षणाशी काय संबंध? हा प्रश्न समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे. त्याचबरोबर औपचारिक शिक्षणपद्धती निर्माण झाल्यामुळे समाजजीवनावर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम होतातच. परिणामी समाजात विविध स्वरूपाचे परिवर्तन घडून येते.

## २.२.१. शिक्षण-समाजाची एक उपव्यवस्था

प्रचलीत सामाजिक व्यवस्था कायम राहावी, असा प्रयत्न ज्यांच्या ज्यांच्या हाती समाजजीवनाची सूत्रे असतात त्यांनी त्यांनी सतत केला आहे, अशी इतिहासाची साक्ष आहे. प्रामुख्याने हा प्रयत्न धर्मसंस्था आणि राज्यसंस्थेने केला आहे. प्राचीन कालखंडात धर्मसंस्थेचा प्रभाव जीवनाच्या अंजोगांपागावर असल्याने समाजजीवन नियमबद्ध व साचेबद्ध झाले होते. 'शिक्षण' हे धर्मगुरूच्या, विशिष्ट जातीच्या स्वाधीन असल्याकारणाने त्यांनी शिक्षणाचा अर्थ व उद्देश धर्मग्रंथात सांगितलेली जीवनाची उद्दिष्टे व्यक्तीने कशी साध्य करून घ्यावीत हे सांगण्यासाठी केले. त्यासाठी आचार पद्धती, विचारपद्धती, नैतिकमूल्य कोणती असावीत हे शिकविले. समाजनियंत्रणासाठी दंड-पारितोषिकांची योजना केली, पाप-पुण्याच्या कल्पना मांडल्या. या सर्वांमागे केवळ आपली सत्ता टिकून राहावी असा धर्मसंस्थेचा व धर्म गुरुंच हेतू होता. काही अंशी असे मानने योग्य आहे पण प्लेटो, ॲरिस्टॉटल, रुसो, आईनस्टाईन इ. सारखे वैज्ञानिक या सर्वांच्या विचारांचा व कार्याचा परिणाम हा समाजजीवनाचा ओघ बदलण्यात झालेला स्पष्ट दिसतो. युरोपमधील प्रबोधनापासून मानवतावाद, विज्ञानवाद अशा नव्या विचारसरणी उदयास आल्या. फ्रेंच व अमेरिकन राज्यक्रांती झाली, औद्योगिकक्रांती झाली, यंत्रयुग, अणुयुग, अवकाशयुग अशी नव नवी युगे झपाट्याने सुरू झाली. आपण

पहातच आहोत. वा सर्व घडामोडीतून जीवनविषयक, नवीमूल्य, नवा दृष्टिकोन उदयास आला. नवीन तत्वज्ञान निर्माण झाले. नव साहित्य निर्माण झाले. ही सर्व शिक्षणामुळे घडून आलेल्या परिवर्तनाचीच अपत्ये आहेत.

मध्ययुगानंतर असा नवा इतिहास घडत असताना समाज जीवनातील, समाजव्यवस्थेतील शिक्षणाचा मेळ कसा घ्ज्ञालावा हा प्रश्न निर्माण झाला. परंपरागत शिक्षणाची उद्दिष्टे अभ्यासक्रम व अध्ययन पद्धती या निरर्थक ठरल्या. यामुळे शिक्षण व समाजजीवन यांच्यात प्रचंड मोठी दरी निर्माण झाली आणि शिक्षणाच्या, संस्कृतीच्या, संरक्षणाच्या व संवर्धनाच्या कार्यातच खंड पडला. म्हणून शिक्षणाच्या पुनर्रचनेकडे आधुि क समाजशास्त्रज्ञ व प्रगमनशील शिक्षणवेत्ते यांना वळावे लागले.

म्हणजेच शिक्षण प्रत्येक समाजातील एक मूलभूत क्रिया आहे. मानवाच्या सामाजिक जीवनाच्या सुरुवातीच्या काळापासून शिक्षणाची प्रक्रिया चालन आलेली आहे. प्रत्येक समाज व्यक्तीच्या शिक्षणाला अतिशय महत्त्व देतो. या ठिकाणी शिक्षणाचा अर्थ केवळ पुस्तकी शिक्षणापुरताच मर्यादित नाही. ज्ञान, जीवनोपयोगी माहिती, कौशल्य आत्मसात करणे याची प्रक्रिया या दृष्टिकोनातून शिक्षणाचा विचार केला आहे. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीचे समाजीकरण योग्य प्रकारे केले जाते. समाजव्यवस्थेतील कुटुंबसंस्था सारख्या सामाजिक संस्थाला काही निश्चित मर्यादा पडतात. मुलामध्ये सामाजिक जबाबदारीची जाणिव परिणामकारकरितीने शिक्षणाच्या मध्यमातून केले जाते.

कोणत्याही समाजाने भूतकाळात प्राप्त केलेले ज्ञान, साहित्य, तत्वज्ञान, कला, धर्म, वाङमय, रूढी, प्रथा, परंपरा या सर्वांना सामाजिक वारसा अ े संबोधले जाते. हा सामाजिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडून एक समाजव्यवस्थेचा उपघटक म्हणून शिक्षणाकडे बघितले जाते. कारण व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण ही शिक्षण संस्थेशी निगडित आहे. व्यक्तीच्या अंगभूत गुणांना चालना देणे, व्यक्तीचे अनुभवविश्व समृद्ध करण्याचे कार्य शिक्षणाच्या माध्यमातून केले जाते. त्यामाध्यमातून व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा विकास घडवून आणला जातो.

## २.२.२. सामाजिकरण आणि कौटुंबिक शिक्षण

समाजशास्त्रीयदृष्ट्या कुटुंब संस्थेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. समाजाचा मूलभूत घटक व प्राथमिक घटक म्हणजे कुटुंब होय. कुटंब ी फार प्राचीन संस्था आहे. समाज आणि संस्कृती टिकविण्याच्या आणि वाढविण्याचे महत्त्वाचे कार्य कुटुंब संस्थेकडून केले उ एवढेच नाही तर समाजाची निर्मिती ही सुद्धा कुटुंबातूनच झालेली आहे. आपल्या भटक्या जीवनाकडून स्थिर जीवनाकडे मानव वळला, तसतशी कुटुंबाची वाढ होवू लागली. कुटुंब ही मानवाची भावनात्मक गरज बनली. कुटुंबामुळे व्यक्तीच्या जीवनाला सातत्य व स्थैर्य लाभते. भावनांमुळे मानवातील मानण्याचा विकास साधला गेला आहे. शेजारी-पाजारी, मित्र परिवार यांनाही कुटुंबात समाविष्ट करून घेण्याची प्रवृत्ती ही भारतीय समाजात आढळून येते.

सामाजिकरणाचे साधन म्हणूनही कुटुंबाला अनन्यसाधारण महत्त्व अ हे. कुटुंब ही व्यापक समाजाची एक साधी प्रतिकृतीच होय. मुलाचे प्राथमिक सामाजिकरण कुटुंबातच

होते. आई, वडील, मोठी भांवडे, नातेवाईक यांच्याकडून विविध माध्यमातून सामाजिकरणाची प्रक्रिया घडवून आणली जाते. समाजातील रूढ वर्तनप्रकाराची पहिली ओळख कुटुंबातच होते. समाजातील शिस्तिचे नियम इतर नियमने, मूल्ये याचे ज्ञान कुटुंबातच होते. आई–वडीलांच्या सवयी, श्रद्धा, रूढी, प्रथा, परंपरा, धार्मिक अभिवृत्ती, मूल्ये मुलाला जाणिवपूर्वक शिकविल्या जातात आणि मुलही ते शिकते. भावी काळातील काही भूमिका मूल कुटुंबातच शिकते. कुटुंबाबाहेरील काही गोष्टी ज्या सामाजिक जीवनात आवश्यक असतात त्या सुद्धा गोष्टी कुटुंबातील सदस्यांच्याकडून मुलाला शिकविल्या जातात. जेणेकरून सामाजिक जीवनात तो सक्षमपणे वावरू शकेल. कुटुंबातच मुल आई–वडीलांकडून भावंडाकडून भाषा शिकते. कुटुंबातील सदस्यांच्या वर्तनाचे अनुकरण करते.

कुटुंब हे असे एक अनौपचारीक शिक्षणाचे साधन आहे की, जिथे प्रेमाने आपुलकीने सामाजिकरणाची प्रक्रिया केली जाते. असे अन्य कुठल्याही समूहात घडून आणली जात नाही. कुटुंबातील सदस्याच्या आंतरक्रियांमधू मूल विविध गोष्टी शिकते व त्याचे व्यक्तीमत्व फुलत जाते. त्याच्या व्यक्तीमत्वामध्ये सर्वात मोठा हातभार हा कुटुंबाचा असतो. जर व्यक्तीचे समाजीकरण कुटुंबाकडून योग्यरितीने झाले नाही तर त्याच्या व्यक्तिमत्वात गंभीर उणीवा राहू शकतात. मुलाचे पहिले सामाजिक संबंध हे कुटुंबातील व्यक्तीशी प्रस्थापित होतात व ते अत्यंत घनिष्ठ स्वरूपाचे असतात. त्यामुळेच कुटुंबातील व्यक्तीकडून अत्यंत प्रभाविरित्या सामाजिकरण घडवून आणले जाते. जर का कुटुंबातील सामाजिकरणात काही उणिवा राहिल्या तर मुले गुन्हेगारी प्रवृत्तीची निर्माण होतात, मनोविकृत निर्माण होतात. यावरूनच कौटुंबिक शिक्षणाचे सामाजिकरणातील महत्त्व दिसून येते.

कुटुंबाकडून विविध प्रकारचे अनौपचारिक पद्धतीने शिक्षण दिले जाते. औपचारिक शिक्षणामुळे समाजाच्या विकासाच्या पाहिजे तेवढी वि**का**सात्मक  ार्याला चालना मिळू शकत नव्हती. त्यामुळे अनौपचारिक शिक्षणाला आपोआपच महत्त्व प्राप्त झाले. अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्व समजल्यामुळे त्यासाठीची नवीन व्यवस्था उदयास आली. असे अनौपचारिक शिक्षण सहज शिक्षणाला पुरक ठरू लागले. उदाहरणार्थ स्त्री–पुरुषाच्या सामाजिक भूमिका वेगवेगळ्या आणि निश्चित झाल्यानंतर कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी आवश्यक ती कौशल्य आत्मसात करणे पुरुषांना आवश्यक झाले. कारागीर, शेतकरी, शिकारी आणि सैनिक असे विविध व्यवसाय निर्माण झाले. या व्यवसायाचे शिक्षण कुटुंबातील सदस्यांकडून (उदा. वडील, मोठा भाऊ इ.) मिळू लागले. त्याच वेळी मुलींना घराची देखभाल, अपत्यांचे संगोपण इ. कामे आईकडून शेजारच्या स्त्रियांकडून आत्मसात के ली जात होती. म्हणी, लोकगिते, लोककला इ. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत करण्याचे कुटुंबातील वरिष्ठ सदस्य करीत असतात. या सामाजिकरणाच्या प्रक्रियेतून समाज अजून प्रगल्भ होतो.

नव्या पिढीच्या दृष्टीने संगोपनाच्या बरोबरीने शिक्षणाचे कार्य कुटुंबसंस्थेचे महत्त्वाचे कार्य गणले जाते. बालकांच्या शारीरिक, बौद्धिक, नैतिक, सांस्कृतिक, कलात्मक, अशा सर्वांगीण विकासाची जबाबदारी कुटुंबसंस्थेवर असते. समाजाच्या संदर्भात कुटुंब ही 'नागरी सद्‌गुणांच्या शिक्षणाची शान' मानली जाते. कुटुंबात मिळणारे बरेचशे शिक्षण अनौपचारिक स्वरूपाचे असते. कुटुंबात होणाऱ्या व्यक्तीमत्त्वाचा विकास दर्जा हा उच्च पातळीचा असतो.

जगातल्या कुठल्याही देशात कोणत्याही समाजातील सर्व व्यक्ती  ा समूह एकाच समान पातळीवर असत नाहीत. सर्व मानवी समाजात कोणत्याना कोणत्या स्वरूपात विषमता ही अस्तित्वात असतेच मग तो आदिवासी समाज असो, ग्रामीण समाज असो वा नागरी समाज असो. तो कुठलाही समाज असो त्यात सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा, सामाजिक, दर्जा इ. वरून स्तर निर्माण झालेले असतातच. कारण सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा अधिकाराची समाजात विषम वाटणी झालेली आहे. त्यातून भिन्न स्वरूपाचे स्तर निर्माण होतात. या स्तरामधील दर्जांच्या भिन्नतेमुळे त्यांची श्रेष्ठ, कनिष्ठ अशी रचना निर्माण झालेली असते. समाजातील एखादा स्तर श्रेष्ठ म्हणून गणला जातो तर दुसरा स्तर हा कनिष्ठ म्हणून ओळखला जातो. अशा स्तरात समाजाची झालेली विभागणी म्हणजे सामाजिक स्तरीकरण होय.

कोणत्याही समाजात सामाजिक स्तर अचानक निर्माण होत नाहीत. समाज विकासाच्या दीर्घ कालखंडात समाजाचा जसा जसा विकास होत जातो, अधिकाधिक गुंतागुंतीचा होत असतो. तस तसे त्या समाजात विविध घटकाच्या आधारावर स्तर निर्माण होण्यास सुरुवात होतात व कालांतरेने या स्तरास समाजमान्यता मिळते आणि एकदा का स्तरीकरणास समाजमान्यता मिळून ती दृढमूल झाली की ती दीर्घ काळ टिकून राहते. पण याचा अर्थ असा नाही की, सामाजिक स्तरीकरणाच्या स्वरूपात बदल होत नाहीत. कालाओघात स्तरीकरण व्यवस्थेचे स्वरूप बदलत जाते. उदा. धर्मव्यवस्था, जातीव्यवस्था यांचे स्वरूप प्राचीन काळातील आणि आजचे स्वरूप भिन्न आहे. याचा अर्थ असा नाही की स्तरीकरण संपुष्टात येईल. ते कोणत्याना कोणत्या स्वरूपात ते अस्तित्वात असते. कारण स्तरीकरण सर्व काळात, सर्व समाजात अस्तित्वात आहे.

सामाजिक स्तरीकरण ही एक वास्तवता आहे. ती सार्वत्रिक बाब आहे. स्तरीकरण हे एका व्यक्ती वा समूहातून घडवून आणले जात नाही तर ते दीर्घ कालखंडात सामाजिक प्रक्रियेतून घडून येते. स्तरीकरणाचे निकष वा आधार हे अर्पित व अर्जित अशा दोन्ही स्वरूपाचे आहे. त्यामुळे प्रत्येक समाजातील सामाजिक स्तरीकरणाचे स्वरूप भिन्न आहे. स्तरीकरण ही एक समाजाची उपसंरचना आहे. मात्र कालांतराने सामाजिक स्तरीकरणाचे आधार बदलत जातात. म्हणजेच सामाजिक स्तरीकरणाची प्रक्रिया निरंतर चालणारी आहे.

सामाजिक स्तरीकरण सर्वत्र जरी असले तरी मात्र त्याचे स्वरूप सर्वत्र सारखेच नाही. सर्वसाधारण पण स्तरीकरणाची दोन रूपे वा प्रकार आहे. हे प्रकार व्यक्तीला स्तर बदलण्याची संधी आहे की नाही यावरून ते ठरत असतात. स्तरीकरणातील पहिला प्रकार म्हणजे 'बद स्तरीकरण' या स्तरीकरण प्रकारात व्यक्तीला आपला सामाजिक दर्जा बदलण्याची संधी नसते. तर दुसरा प्रकार म्हणजे 'मुक्त स्तरीकरण' या स्तरीकरण प्रका ात व्यक्तीला स्वतःच्या कर्तृत्वावर स्तर बदलण्याची संधी प्राप्त होते. बंद स्तरीकरणाचे उदाहरण जातसंस्था आहे तर मुक्त स्तरीकरणाचे उदाहरण म्हणजे वर्गव्यवस्था आहे.

भारतात सामाजिक स्तरीकरण जाती व्यवस्थेवर आधारित आहे. प्राचीनकाळी उच्च जातीकडे धार्मिक आणि सामाजिक राजकीय अधिकार केंद्रित झाले होते. अध्ययन आणि अध्यापणाचा अधिकार हा फक्त उच्च जातीतील सदस्यानाच होता. कनिष्ठ जातीतील व्यक्तींना अध्ययनाचा अधिकार नव्हता. कनिष्ठ जातीतील व्यक्तीची इच्छा वा क्षमता असली तीतील व्यक्तीला शिक्षण घेता येत नव्हते

पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव पडण्यापूर्वी भारतात व्यवसायिक शिक्षणाचा प्राधान्य होते. हे व्यवसायिक शिक्षण देण्याची व्यवस्था भारतीय जाती संस्थेने केली होती. जातीच्या नियमानुसार प्रत्येक व्यक्तीला आपल्याच जातीचा परंपरागत व्यवसाय करावा लागे. त्यामुळे व्यवसायिक शिक्षणाचे धडे मुलाला त्याच्या कुटुंबातच मिळत असत. आपल्या कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तीच्या हाताखाली मुलगा व्यवसायाच्या दृष्टीने तयार होत असत. असे जरी असले तरी आज अनुवांशीकतेचे तत्व सर्वमान्य नाही. समाजातील प्रत्येक व्यक्तीत शारीरिक व मानसिक भिन्नता आढळने ही भिन्नता लक्षात घेवून व्यक्तीच्या जीवनाची आखणी करणे आवश्यक असते व महत्त्वाचेही असते. परंतु जाती संस्थेने या महत्त्वाच्या घटकाची अवहेलना केली. व्यक्तीच्या आवडी निवडीचा मनाचा, शारीरिक क्षमतेच्या कुठलाही विचार न करता व्यक्तींची संपूर्ण जीवन या संस्थेने ठरवून टाकले. त्यामुळे व्यक्तीमध्ये नवीन काही शिकण्याची, नवे काही करण्याची इच्छाच मारून टाकली. व्यक्तीला निष्क्रीय बनवले. उच्च जातीतील व्यक्तीकडे सामाजिक प्रतिष्ठा असणारे, आर्थिक प्राप्ती मोठ्या प्रमाणात होणारे व्यवसाय ही तर कनिष्ठ जातीकडे सेवा करणारे निम्न दर्जाचे काम दिले होते. एखाद्या व्यक्तीला व्यवसाय बदलण्याची इच्छा असली तरी तो तसे करू शकत नव्हता.

धार्मिक शिक्षणापासून वंचित, नवीन व्यवसायिक शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे काम जातीव्यवस्थेने केले आहे. उच्च जातीमधील अपात्र लोकांना उच्च सामाजिक स्थान मिळाले. तर पात्रता असूनही केवळ जन्म कनिष्ठ जातीत झाल्यामुळे **का**ही लो ंना श्रेष्ठत्वापासून वंचित ठेवण्यात आले.

म्हणजेच भारतातील शिक्षणाचा अभाव हा जातीसंस्थेच्या स्थिरत्वाचे कारण मानता येईल. भारतीय जातीप्रथेनुसार शिक्षणाचे क्षेत्र फक्त 'ब्राह्मणांना' मोकळे होते. इतरांकरीता फक्त जातीतील व्यवसाय शिक्षण उपलब्ध होते. त्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्य 'समानता' ही कल्पना विकसित होण्यासाठी ब्रिटिशांच्या अगमनापर्यंत वाट पहावी ल गली. त्यामुळे अनेक प्रकारचे अन्याय होवूनही त्याविरुद्ध प्रभावी अशी जनजागृती होवून त्याचा प्रसार होवू शकला नाही. अशिक्षितपणाने अंधविश्वास व रूढीवादास जन्म दिला. त्यातून परंपरेची जोपासना करणे व रूढीचे पालन करण्याची प्रवृत्ती निर्माण झाली आणि जातीसंस्था टिकवून ठेवण्यास कारणीभूत ठरली.

भारतात, ब्रिटिशांचे अगमन झाल्यानंतर शिक्षणाची **सं**धी सर्वां ाठी खुली केली. ब्रिटिशांनी ब्रिटिश मिशनरीनी शिक्षणाचा प्रचार प्रसार केला. समानता, मानवतावाद यासारखे विचार शिक्षणाच्या माध्यमातून जनसामान्यापर्यंत पोहचण्यास मदत झाली. इंग्रजानी भारतात सुरू केलेल्या धर्मनिरपेक्षा अशा शिक्षणाने धर्मावर अधिष्ठित असलेल्या सामाजिक स्तरांना धक्का देण्यास सुरुवात कें. समानता, मानवतावादाचे विचार मूळ धरू लागले. शिक्षणाच्या प्रसारामुळे शैक्षणिक दर्जाच्या आधारावर व्यक्तीचा सामाजिक दर्ज ठरू लागला. त्याचप्रमाणे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली करण्यात आल्यामुळे जन्मानुसार सामाजिक दर्जा ठरविणाऱ्या तत्वास समाजात विशेष स्थान राहिले नाही. सर्व जातीतील व्यक्ती शिक्षणाच्या आधारावर स्वतःच्या कार्यकर्तृत्वावर एका स्तरातून दुसऱ्या स्तरात जावू लागले. ब्रिटिश प्रशासनात नौकरवर्गाची आवश्यकता होती. मुख्यतः दुय्यम प्रकारच्या नौकऱ्यांमध्ये सुशिक्षितांची भरती

करण्यात आली. ती भरती करतान जातीचा विचार केला नाही. त्यामुळे सरकारी नौकरीत विभीन्न जातीचे लोक एकत्र काम करू लागले.

आधुनिक शिक्षण पद्धतीमुळे भारतीय लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टी रुजण्यास मदत झाली. त्यामुळे जातीसंस्थेविषयी अनादर निर्माण झाला. जन्म किंवा धार्मिक पात्रतेच्या अधारे श्रेष्ठ, कनिष्ठ हे तत्त्व अमान्य करण्यात आले. या शिक्षित जनतेने वर्गव्यवस्थेचा स्वीकार केला. यात व्यक्ती स्वतःच्या क्षमतांच्या कर्तृत्वाच्या बळावर एका स्तरातून दुसऱ्या स्तराव जावू लागला. सामाजिक दर्जा उंचाविण्याचा प्रयत्न करू लागला.

औद्योगिकरणानंतर सामाजिक स्तरीकरणाचे निर्धारित घटक बदलले. शिक्षण हा घटक सुद्धा सामाजिक स्तरीकरणाचा निर्धारण करणारा घटक ठरू लागला आहे. सामाजिक वर्ग आणि शिक्षण यांच्यातील संबंध दोन प्रकारे दर्शविता येते. एक म्हणजे उच्च वर्गातील व्यक्तीला आजचे महागडे शिक्षण घेणे सहज परवडते. ही गोष्टी गरिबांच्या बाबतीत मात्र इतकी सोपी नाही. अर्थात आजकाल हुशार विद्यार्थ्यांना विविध शिष्य ृत्ती उपलब्ध आहेत. तसेच अनेक वित्तसंस्था, शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून देत आहोत. पण असे जरी असले तरी आर्थिक मागास व्यक्तीला मर्यादा पडतातच. कारण इतरांच्या मदतीवर शैक्षणिक प्रगती करून सामाजिक दर्जा बदलविणे फार आवघड आहे. पण अशा अवघड परिस्थितसुद्धा उच्च शिक्षण घेवून आपला सामाजिक दर्जा उंचावणाऱ्याची संख्या वाढते आहे. अशा व्यक्ती स्वतःच्या कार्यकर्तृत्वावर उच्च स्तरात प्रवेश मिळवू शकतात. उच्च शिक्षणामुळे केवळ प्रतिष्ठीत व्यवसायच मिळतो वा नौकरीच मिळते असे नाही तर व्यक्तीचे सामाजिक वर्तन, शिष्टाचार, वागणे, बोलणे आणि एकंदरीत जीवनावरच प्रभाव पडतो. म्हणून शिक्षण हे सामाजिक स्तराचे एक महत्त्वाचे निर्धारक घटक आहे.

### २.२.४. शिक्षण आणि गतिशिलता

'गतिशिलता' हा शब्द भौगोलिक आणि सामाजिक स्थानातील सापेक्ष बदलासाठी वापरला जातो. सामाजिक गतिशिलतेच्या प्रक्रियेत व्यक्ती किंवा समूहांनी स्तरीकरण व्यवस्थेअंतर्गत विविध स्तरांपैकी एका स्तरातून दुसऱ्या स्तरात जाणे अभिप्रेत आहे. म्हणजेच स्तरीकरण व्यवस्थेअंतर्गत विविध स्तरांमध्ये व्यक्ती व समूहाची नी हलचाल घडून येते व त्याचे अभिसरण होते. त्याला सामाजिक गतिशिलता असे म्हणतात. अशा हलचालीमुळे व्यक्ती व समूहांच्या सामाजिक दर्जात बदल घडणे येणे स्वाभाविक आहे.

शिक्षण आणि गतिशिलता यांचा परस्पर संबंध घनिष्ठ आहे. शिक्षणाचा प्रभाव सामाजिक गतिशिलतेवर मोठ्या प्रमाणात घडून येतो. सामाजिक गतिशिलता दोन प्रकारी आहे. एक म्हणजे समस्तर गतिशिलता. दुसरी म्हणजे स्तंभीय गतिशिलता होय. जेव्हा एखाद्या व्यक्ती वा समूहाच्या सामाजिक स्थानात किंवा दर्जात बदल होतो. पण त्या अनुषंगाने त्या व्यक्तीचा किंवा समूहाचा सामाजिक स्तर वा सामाजिक वर्ग मात्र बदलत नाही. तेव्हा घडून येणाऱ्या केवळ सामाजिक स्थानातील बदलाला 'समस्तर गतिशिलता' असे ंबोधले जाते. उदा. एखाद्या प्राध्यापकाने वकील म्हणून व्यवसाय स्वीकारला तर त्याच्या व्यवसायिक स्थानात बदल होतो. पण दोन्ही व्यवसायिक स्थाने एकाच सामाजिक वर्गातील असल्यामुळे त्या

व्यक्तीच्या सामाजिक वर्ग किंवा स्तर बदलत नाही. कारण दोन्ही व्यवसायांना समाजात सारखीच प्रतिष्ठा आहे. तर जेव्हा सामाजिक वर्गाच्या श्रेणी व्यवस्थेत व्यक्ती वा समूहाच्या वरच्या स्तरातून खालच्या स्तरात किंवा खालच्या स्तरातून वरच्या स्तरात उभ्या रेषेत वर खाली हलचाल होते. तेव्हा त्याला स्तंभीय अतिशिलता म्हटले जाते. उदा. एखाद्या कनिष्ठ जातीतील शेतकऱ्याचा मुलगा खअड ऑफीसर होणे. वा मोठा उद्योगपती उद्योगात नुकसान झाल्यामुळे, उद्योग बुडाल्यामुळे कामगार म्हणून काम करणे. हे स्तंभीय गतिशिलतेचे उदाहरण आहे.

औद्योगिकरण, नागरिकर आणि आधुनिकीकरण यांचे समाजजीवनावर जे परिणाम होतात त्यापैकी एक परिणाम म्हणजे सामाजिक नागरी व राजकीय हक्काबदलची जाणीव वाढत जाते. अनेक गट व पक्ष सत्तास्पर्धेत उतरतात. सत्तेच्या जोरावर अनेक संस्थाचे, पर्यायाने समाजजीवनाचे नियंत्रण करता येते. शिक्षण पद्धतीही त्यातून वगळली जात नाही. राजकीय व सामाजिक जीवनात सहभागी होण्याची ही प्रवृत्ती सम जाच्या गतीमाणतेचे द्योतक आहे. जुन्या निष्ठा जाऊन त्याची जागा नव्योनिहेघेणे गतिमानत च लक्षण आहे. गतिमानता हे समाज औद्योगिक बनत चालल्याचे लक्षण आहे. माणसे खेडी सोडून शहराकडे स्थलांतर करतात, नवे व्यवसाय करतात, काही व्यक्ती परदेशात जावून स्थाईक होतात. असे किती तरी बदल घडून येतात. औद्योगिकीकरणाला भिस्त असते. ही विशेषज्ञता प्राप्त करण्यासाठी प्रदीर्घ शिक्षण हवे. अशा शिक्षणासाठी दूरच्या गावी, स्वकियांपासून दूर जायला हवे.

ज्या समाजात शिक्षणाचे प्रमाण जास्त त्या समाजात गतिशिलतीचे प्रमाण जास्त. अशिक्षित समाजापेक्षा सुशिक्षित समाजात गतिशिलतेचे प्रमाण जास्त आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला समाजातील अधिकाधिक उच्च आणि प्रतिष्ठीत समजल्या जाणाऱ्या व्यवसायात पदार्पण करून आपला आर्थिक तसेच सामाजिक दर्जा वाढविता येतो. आणि अधिक वरच्या सामाजिक वर्गात प्रवेश करता येतो व आपला जीवनस्तर उंचावता येतो. शिक्षणामुळे व्यक्तीच्या अभिवृत्ती आणि मूल्यातही बदल होतो. व्यक्तीचे व्यक्तीमत्व विकासोन्मूख बनते. आणि मग अशी व्यक्ती उच्च सामाजिक दर्जा प्राप्त करण्या**सा**ठी तत्याने धडपडत असते. अनेक व्यक्तीच्या बाबतीत शिक्षणामुळे असा बदल घडून आला. एकंदर समाजात व्यापक प्रमाणावर सामाजिक गतिशिलता घडून येते.

शासन विविध योजनांच्या माध्यमातून समाजातल्या प्रत्येक स्तरात 'शिक्षण' पोहचविण्याचा प्रयत्न करते आहे. कारण शिक्षण हे असे एक साधन आहे की ज्यामुळे व्यक्तीचा, समाजाचा किंबहुना देशाचा विकास होण्यास मदत होते. शिक्षणामुळे व्यक्तीला सभोवतालच्या परिस्थितीची जाण तर होतेच त्याचबरोबर स्वतःबाबत जागृतही होतो व परिवर्तन करण्यासाठी तो मेहनत घेण्यासाठी तयार होतो. आपोआपच उर्ध्वगामी सामाजिक गतिशिलतेची प्रक्रिया सुरू होते. म्हणजे ज्या समाजात शिक्षणाचे प्रमाण जास्त असते त्या समाजात परिवर्तनाची गती जास्त असते. भारतीय समाजव्यवस्थेत ग्रामीण व आदिवासी समाजापेक्षा नागरी समाजाची परिवर्तनाची गती जास्त आहे कारण या समाजात शिक्षणाचे प्रमाण तुलेनेने जास्त आह . म्हणून नागरीभागात गतिशिलतेला वाव असते. तुलनेने ग्रामीण व आदिवासी **भा**गात जातीचा प्र व व धर्माचा प्रभाव असल्याकारणाने तिथे गतिशिलतेची प्रक्रियोनेतुलेने मंद असत .

अनुसूचित जाती व जमाती व इतर मागास गटांना शासन प्रामुख्याने शिक्षणासाठी विविध योजना राबवून शिक्षणाचा स्तर उंचावण्यासाठीचे प्रयत्न चालू आहेत. जेणेकरून त्यांच्या सामाजिक परिस्थितीत बदल होईल व जीवनमानाचा स्तर उंचावेल. बऱ्याच प्रमाणात यात यश आलेले दिसून येते. शासकीय नौकरी व्यवसाय नेतृत्व यात प्रगती झाल्याचे आढळून येते. म्हणजेच शिक्षणामुळे सामाजिक गतिशिलता मग ती स्तंभीय असो वा समस्तर गतिशिलता असो त्याला चालना मिळते. त्यामुळे समाजाच्या विकासाला चालना मिळते. तसेच देशाचा विकासाचा दर वाढण्यास मदत होते.

## २.३. पारिभाषिक शब्द

- समाजिकरण – ज्या प्रक्रियेद्वारा त्याच्या किंवा तिच्या संस्कृतीत योग्य मानले जाणारे वर्तनप्रकार आणि नियमने व्यक्ती शिकून घेते आणि त्याचा अवलंब करते त्या प्रक्रियेला 'समाजिकरण' म्हणतात.
- स्तरीकरण – समाजातील सदस्यांची विषम दर्जा असलेल्या स्तरात झालेली रचना म्हणजे 'स्तरीकरण' होय.
- बंद स्तरीकरण – ज्या स्तरीकरण प्रक्रियेत व्यक्तीला आपला सामाजिक स्तर बदलता येण्याची शक्यता नसते वा सामाजिक गतिशिलतेचा पूर्णपणे भाव असता त्यास बंद स्तरीकरण म्हणतात.
- मुक्त/खुले स्तरीकरण – ज्या स्तरीकरण व्यवस्थेत व्यक्तीला आपला स्तर बदलण्याची संधी असते किंवा ज्या स्तरीकरण व्यवस्थेत गतिशिलतेला वाव असतो त्यास मुक्त स्तरीकरण म्हणतात.
- जात – जात म्हणजे बंद वर्ग आहे.
- वर्ग – समान संधी, समान आर्थिक आणि व्यवसायिक दर्जा, समान अभिवृत्ती आणि वर्तनप्रकार तसेच समान जीवन पद्धती असणाऱ्या लोकांचा समुदाय म्हणजे सामाजिक वर्ग होय.
- सामाजिक गतिशिलता – व्यक्तीची एका सामाजिक दर्जाकडून दुसऱ्या सामाजिक दर्जाकडे जाण्याची क्रिया म्हणजे सामाजिक गतिशिलता होय.
- समस्तर गतिशिलता – जेव्हा व्यक्ती वा समूहाच्या सामाजिक स्थानात बदल होतो पण त्या अनुषंगाने त्या व्यक्तीचा किंवा समूहाचा सामाजिक स्थान वा स्तर बदलत नाही तेव्हा अशा घडून येणाऱ्या सामाजिक स्थानातील बदलाला समस्तर गतिशिलता असे संबोधतात.
- स्तंभीय गतिशिलता – जेव्हा वर्गाच्या श्रेणी रचनेत व्यक्ती वा समूह वरच्या स्तरातून खालच्या स्तरात वा खाल्या स्तरातून वरच्या स्तरात असे अभिसरण होते तेव्हा त्यास स्तंभीय गतिशिलता असे म्हणतात.
- उर्ध्वगामी गतिशिलता – उर्ध्वगामी गतिशिलता म्हणजे खालून वरच्या दिशेला होणारी

हालचाल.

- अधोगामी गतिशिलता – अधोगामी गतिशिलता म्हणजे वरून खालच्या दिशेने होणारी हलचाल.

## २.४. स्वाध्याय

एका वाक्यात उत्तरे द्या.

(१) बंद स्तरीकरणाचे उदाहरण सांगा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

(२) मुक्त स्तरीकरणाचे उदाहरण द्या.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

(३) सामाजिकरणाची व्याख्या लिहा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

(४) सामाजिक स्तरीकरणाचा अर्थ सांगा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

(५) सामाजिक स्तरीकरणाचे प्रकार सांगा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

(६) सामाजिक गतिशिलतेचा अर्थ सांगा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

(७) उर्ध्वगामी गतिशिलतेचे उदाहरण द्या.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

(८) अधोगामी गतिशिलतेचे उदाहर द्या.

-----------------------------------------------

दिर्घोत्तरी प्रश्न

१) समाजिकरणाच्या प्रक्रियेत कुटुंबशिक्षणाची भूमिका स्पष्ट करा.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

२) सामाजिक स्तरीकरणावर शिक्षणाचा प्रभाव स्पष्ट करा.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

३) शिक्षण आणि सामाजिक गतिशिलता यांचा परस्पर संबंध स्पष्ट करा.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

टीपा द्या.

१) शिक्षण - सामाजिक उपव्यवस्था.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

२) स्तरीकरण.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

## २.६. संदर्भग्रंथ


१) अकोलकर ग. वि., 'समाज संस्कृती आणि शिक्षण', विद्या प्रकाशन, नागपूर, १९७३

२) डॉ. बोवडे प्रकाश, 'भारतीय समाजरचना पारंपरिक व आधुनिक', मंगेश प्रकाशन, नागपूर - १९९४

३) डॉ. साळुंखे सर्जेराव, 'समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना'', नरेंद्र प्रकाशन, पुणे, १९९६

# घटक – ३

## शिक्षण आणि अर्थव्ङ्गवस्था, शिक्षण आणि राजकारण व शिक्षण आणि सङ्गाज ङ्गांच्ङ्गातील संबंध

**अनुक्रमणिका**

**अ) उद्दिष्टे**

**ब) प्रास्ताविक**

**क) विषय विवेचन**

**क १ आर्थिक विकासातील शिक्षणाची भूमिका**

**क.२ शिक्षणाची लोकशाहीतील भूमिका**

**क.३ शिक्षणाची समाजातील भूमिका**

**ड) स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**इ) सारांश**

**फ) क्षेत्रीय कार्य**

**ग) पारिभाषिक शब्द /शब्दार्थ**

**ह) संदर्भ सूची**

### अ) उद्दिष्ट्ये :

अर्थव्यवस्था, राज्य व्यवस्था आणि समाज व्यवस्था सामाजिक विकास प्रक्रियेतील महतवाच्या व्यवस्था आहेत. सामाजिक परिवर्तन आणि विकास प्रक्रियेचे सुकाणू ह्या तीनही व्यवस्था आणि शिक्षण यांचा परस्पर संबंध अत्यंत घनिष्ठ असा आहे. शिक्षणामुळे ह्या तीनही व्यवस्थांमध्ये गुणात्मक वाढ होऊन त्यांचा दर्जा उंचावतो व एकंदर त्याचा अनुकूल परिणाम पहावयास मिळतो. आर्थिक प्रगती, लोकशाही मूल्यांची रूजवण आणि संपूर्ण समाजव्यवस्थेतील अनुकूल विकासात्मक परिवर्तन या दृष्टिने शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. शिक्षणाच्या ह्या महत्वपूर्ण भूमिकेचाच परामर्श सदर घटकात केलेला आहे.

ह्या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

- शिक्षण आणि आर्थिक विकास यांच्यातील संबंध स्पष्ट करता येईल.
- शिक्षण आणि राजकीय व्यवस्था यांच्यातील संबंधासह लोक**शा**हीतील ि क्षणाची भूमिका समजण्यास मदत होईल.
- शिक्षणाचा एकूणच समाजावर कसा परिणाम होतो व समाजविकासातील शिक्षणाच्या भूमिकेचे महत्त्व समजून घेता येईल.

## ब) प्रास्ताविक :

शिक्षण आणि समाज यांचा अन्योन्य संबंध आहे. विशेषतः मानवी समाजाच्या प्रागतिक वाटचालीचा आढावा घेतला असता त्यात शिक्षणाचे स्थान अग्रगण्य आहे. शिक्षित समाजच आपली सर्वांगीण उन्नती करू शकतो. विविध अशा आर्थिक प्रगतीच्या संधी शिक्षणाद्वारे खुल्या होतात. आर्थिक सुधारणांची गती समाजसदस्यांच्या शिक्षणाच्या प्रमाणावर अवलंबून असते. सुशिक्षित समाज सदस्य विकासाची गती आणि आधुनिकरणातील नवीन मूल्ये यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करतात व अशा समन्वयाच्या प्र त्नांतूनच विकसाची वाटचाल करू शकतात. शिक्षणामुळे समाजात रोजगाराच्या नवीन संधी, त्यासाठीची नवीन क्षेत्रे खुली होतात. उद्योग धंद्यामधील नवीनतम तंत्रज्ञानाला आत्मसात करत येते. आणि त्याद्वारे उत्पादकता व उत्पन्न यांच्यात वाढ करता येणे शक्य होते. समाज सदस्यांमधील आरोग्य विषयक जागृती देखील शिक्षणामुळे निर्माण होते. ह्या जागृतीतून त्यांची कार्यक्षमता वाढते व त्याद्वारे आर्थिक विकासाचा मार्ग प्रशस्त होतो.

शिक्षण व्यवस्थेच्या प्रभावी कार्यामुळे समाज सदस्यांमध्ये लोकशाही प्रवृत्ती च्या नागरिकत्वाचे गुण रूजविता येतात. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय यांसारख्या लोकशाही मूल्यांचे समाज मानसात परिपोषण करण्याचे कार्य शिक्षणाद्वारे केले जाते. लोकशाहीचे संवर्धन, संरक्षण आणि प्रसार शिक्षणामुळेच्या माध्य होता . शिक्षणामुळे आपले अधिकार व कर्तव्ये यांची जाणीव झालेल्या नागरिकांनी हुकुमशाहीला नाकारून लोकशाही सत्ता प्रस्थापित केल्याची उदाहरणे जागतिक इतिहासात पहावयास मिळतात.

शिक्षण ही सामाजिक संस्कारांना बळ देणारी प्रक्रिया आहे. समाजीकरण, मूल्य शिक्षण, संस्कृती शिक्षण सामाजिक नियंत्रण यसाराख्या प्रक्रियांच्या द्वारे व्यक्तीच्या सामाजिक अभिव्यक्तिचा वा समाजशीलतेचा पाया रचला जातो. भौतिक प्रगतीसह सामाजिक सुधारणा आणि आधुनिकीकरण अशा प्रागतिक प्रक्रियांची रूजुवात शिक्षणामुळेच साध्य होते. अशा प्रकारे समाजाच्या एकदंर प्रागतिक वाटचालीमध्ये शिक्षणाचा वाटा महत्वाचा आहे.

शिक्षणाचा समाजाच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक पैलूंवर नेमका कोणात प्रभाव पडतो? सिक्षण आणि वरील घटकांचा परस्पर संबंध कसा आहे?

समाजव्यवस्थेमध्ये शिक्षणाची भूमिका कशी महत्त्वपूर्ण ठरते? इ. मुद्यांचा परामर्श पुढील विवेचनाच्या आधारे घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## क) विषय विवेचन :

### क. १ आर्थिक विकासातील शिक्षणाची भूमिका (Role of Education in EconomicDevelopment)

आर्थिक विकास हा विकास प्रक्रियेतील एक महत्वाचा नि मूलभूत असा टप्पा आहे. विकास प्रक्रियेचा प्रत्येक पैलू अर्थोत्पादन, आर्थिक प्राप्ती आणि आर्थिक उत्पादन प्रक्रियेशी संबंधित साधनांच्या विकासावरच सामाजिक विकासाचा वेग अवलंबून

असतो. आर्थिक विकासाचा संबंध हा शिक्षण व्यवस्थेशी आहे. समाजातील शिक्षणाचे प्रमाण, समाज सदस्यांच्या गुणात्मक स्थितीवरच आर्थिक विकासाची गती अवलंबून असते. विकसित राष्ट्रांच्या निरिक्षणातून ही बाब स्पष्ट होते की त्या राष्ट्रांमध्ये शिक्षणाचा प्रसार-प्रचार, समाजसदस्यामधील शिक्षण घेण्याची प्रवृत्ती निश्चितच अधिक आहे. मूलभूत शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण व उच्च शिक्षणाचे प्रमाण अधिक आहे.

आज जागतिकरणाच्या माध्यमातून जग जवळ येत आहे. विकासाच्या नव्या संधी आणि आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने नवीन क्षेत्रे उपलब्ध होत आहेत. त्या संधी प्राप्त करण्याच्या दृष्टीने शिक्षणाचे महत्त्व अनन्य साधारण असेच आहे. निरक्षर वा अशिक्षित समाज जागतिकीकरणातून निर्माण झालेली नवीन आव्हाने पेलू शकणार नाही. पारंपारिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक, तांत्रिक, वैज्ञानिक, संगणक माहिती व तंत्रज्ञान, व्यवस्थापन इ. विविध घटकांशी संबंधित शिक्षणाचा समाजात प्रचार नि प्रसार होणे गरजेचे आहे.

आर्थिक विकासात शिक्षणाची नेमकी काय भूमिका आहे. हे पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

### १) उत्पादकता आणि शिक्षण :

कोणत्याही देशातील शैक्षणिक तरतूदीकिंवा त्या-त्या देशातील शैक्षणिक गुंतवणुक ही मनुष्यबळ विकासातील गुंतवणुक असते. विकसित मनुष्यबळाच्या आधारेच नवीन तंत्रज्ञान, विदेशातील नवीनतम शोधांचे ज्ञान आणि त्यांची आपली उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने प्रभावी अंमलबजावणी ह्या गोष्टी साध्य करता येतात. प्राथमिक आ ण माध्यमिक शिक्षण घेतलेल्या कामगारांच्या कार्यक्षमतेवर ह्या शिक्षणाच्या सकारात्मक प्रभाव पडून उत्पादकतेते वाढ झाल्याचे एका अभ्यासात आढळून आले आहे. व्यावसायिक कौशल्ये आणि व्यवस्थापकीय गुणांमध्ये वाढ होऊन नवीनतम तंत्रे आत्मसात करण्याचा वेग व पर्यायाने उत्पादकता वाढल्याचे निदर्शनास येते.

कृषी क्षेत्रात नवीन तंत्रांच्या आधारे शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच ा उत्पादनात वाढ झाल्याचे दिसते. ही नवीन तंत्रे ात्मसात करण्यामध्ये शिक्षणाचा वाटा महत्वाचा आहे. कृषी क्षेत्राप्रमाणेच औद्योगिक क्षेत्रात देखील शिक्षणाची भूमिका महतवाची ठरली आहे. तांत्रिक क्षमतेतील वृध्दी आणि तांत्रिक परिवर्थनाच्या मुळाशी शिक्षणच आहे. त्यामुळेच औद्योगिक क्षेत्राद्वारे केल्या जाणाऱ्या उत्पादकतेमध्ये वाढ झालेली आहे. अशा प्रकारे कृषी, औद्योगिक, लघुउद्योग वा इतर क्षेत्रांमध्ये शिक्षणाद्वारे उत्पादकता वाढल्याचे दिस े.

### २) शिक्षण आणि उत्पन्न :

शिक्षण आणि उत्पादन क्षमता विकास यांच्यातील सहसंबधाचा वि र रील मुद्यांच्या विश्लेषणात आपण केलेला आहेच. शैक्षणिक सुधारणा, शिक्षण प्रसार आणि शिक्षणाबद्दलची आस्था ह्या तीन बाबींचा उत्पादकते प्रमाणेच एकंदर उत्पन्न वाढीवर देखील सकारात्मक परिणाम होतो असे दिसून येते. १९८० तच्या दरम्यान लॅटिन अमेरिकेतील एका अभ्यासात असे आढळले आहे की उत्पन्नातील विषमता, दारिद्र्य आणि शालेय शिक्षण यांच्यामध्ये सह

संबंध आहे. कामगारांच्या उत्पन्नातील असमानतेमागे शालेय शिक्षणातील तफावत हे एक प्रमुख कारण आहे. ज्या कामगारांनी माध्यमिक शिक्षण घेतले होते त्यांचे उत्पन्न हे प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या व अशिक्षित कामगारांपेक्षा अधिक होते.

शिक्षणामुले व्यक्तीस अधिक उच्च दर्जाच्या संधी प्राप्त होतात. रोजगार, उद्योजकता, उत्पादकता इ. घटकांमध्ये अनुकूल वृध्दी होते. परिणाम उत्पन्नात देखील वाढ होते. नोकरी व्यवसायाचे ठिकाणी पदोन्नती वा वेतन वाढीसाठी शैक्षणिक गुणवत्ता व शैक्षणिक पात्रतेतील प्रगती अपेक्षित असते हे आपणांस विदित आहेच. संपूर्ण देशाचा विचार करता उत्पन्न आणि शिक्षण यांच्यातील संबंध केवल व्यक्तीपुरताच मर्यादित नसून राष्ट्रीय स्तरावर दरडोई उत्पन्नावर परिणाम करणारा आहे हे देखील दिसून येते.

### ३) मनुष्यबळ विकास, कुटुंब आणि शिक्षण :

कोणत्याही देशातील मनुष्यबळ हे खरे तर त्यात – त्या देशाचे मोठे भांडवल आहे. शिक्षण व्यवस्थेचा विकास म्हणजे ह्या मनुष्यबळातील एक गुंतवणुक आहे. शिक्षणामुळे उपलब्ध मनुष्यबळाच्या क्षमतांचा विकास साध्य करता येतो व ह्या विकासातूनच आर्थिक उन्नती साध्य करता येते. शिक्षणाचा संबंध मूल्यांचा आत्मसातीकरणाशीदेखील आहे. शिक्षणामुले सामाजिकदृष्ट्या आदर्श मूल्यांना व्यक्ति आत्मसात करते. सुसंस्कृत बनते परिणामी भ्रष्टाचार व्यवसानाधीनता, अनेतिकता, इ. उपप्रवृत्ती पासून दूर राहते. याचा परिणाम आर्थिक बचत पर्यायाने आर्थिक वृध्दीलागे हो त्याचप्रमाण कार्यक्षमतेते व आरोग्यात सकारात्मक वृध्दी होते व परिणामी आर्थिक स्थिती सुधारते.

काही विचारवंत शिक्षणाचा आणि कुटुंबाच्या आकाराचा संबंध जोडतात त्यांच्यामते शैक्षणिकदृष्ट्या प्रगत व्यक्तींच्य कुटुंबातील सदस्य संस्काय कमी असते. जननदर कमी असतो. कुटुंबाच्या आकार लहान असतो. परिणामी कुटुंबाची आर्थिक स्थिती चांगली असते. आपल्या अपत्यांचे संगोपन व शिक्षण ते अधिक उत्तम प्रकारे करू शकतात त्यामुळे नव्याने निर्माण होणरे मनुष्यबळ देखील विकसित असते. आर्थिक विकासासाठी अनुकूल असते. याउलट अशिक्षित आणि अडाणी कुटुंबामध्ये विपरित चित्र दिसते. जननदर अधिक, कुटुंबाचा आकार मोठा परिणामी मनुह्ययबळाकडे पुरेसे लक्ष देता येत नाही. कुटुंबाच्या व पर्यायाने देशाच्या आर्थिक स्थितीवर देखील विपरित परिणाम होतो.

शिक्षण आणि कुटुंबातील स्त्रियांच्या अवस्था यांचा देखील परस्पर संबंध दिसतो. उच्च शिक्षित कुटुंबामध्ये स्त्रियांना अधिक खुले वातावरण, त्यांच्या अधिकारांचा सन्मान व प्रतिष्ठा त्याचप्रमाणे शैक्षणिक वा व्यावसायिक विकास करण्याच्या विविध प्रकारच्या संधी उपलब्ध केल्या जातात. परिणामी स्त्रियांच्या रूपातील मनुष्यवळाची क्षमता वाढते. कुटुंबाची आर्थिक क्षमता वाढते. अधिक चांगल्या प्रतीचे जीवनमान जगता येते. कुटुंबाचे हे विकसित मनुष्यबळ पर्यायाने राष्ट्राचीच संपती असते व त्याचा सत्कारात्म परिणाम राष्ट्राच्या आर्थिक विकासावर होतो.

### ४) शिक्षण आणि व्यापार :

वर्तमान काळातील आर्थिक विकासाच्या साधनापैंकी व्यापार हे एक महत्वाचे साधन आहे. व्यापाराच्या माध्यमातून अर्थोत्पादन क्षमता मोठ्या प्र  ाणात व ढविता येते. जागतिकरण व उदारीकरणाच्या माध्यमातून जगातील अनेक देश व्यापारीदृष्ट्या परस्परांशी जोडले गेलेले आहे. नवनवीन तंत्रज्ञान, व्यवस्थापकीय कुशलता आणि विपनातील अ धुनिकता यांच्या बळावर अनेक देश आपल्या दृष्टीने हिताचे व्यापारी संबंध निर्माण करतात व आर्थिक विकास करवून घेतात. या सर्वांच्या मुळाशी सिक्षणच आहे. शिक्षणाच्या आधारेच ही कौशल्ये विकसित करता येतात व त्यांचा वापर व्यापार वृध्दीसाठी केला जातो.

शिक्षणाच्या माध्यमातूनच नवीन तंङ्ज्ञान वा क्षमता विकसित केल्या जातात. व त्यातून व्यापार वृध्दी पर्यायाने आर्थिक विकासास चालना मिळते. भारताने उपग्रह प्रक्षेपण क्षेत्रात अद्वितीय अशी क्षमता संपादन केलेली आहे. इतर देशांचे उपग्रह आपण अवकाशात प्रक्षेपित करून देतो व त्या बदल्यात आपल्याला मोठ्या प्रमाणात परकीय चलन देखील प्राप्त होते. हे मूलतः शिक्षणामुळेच शक्य झालेले आहे.

### ५) शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक विकास :

शिक्षणाचा आरोग्य ह्या घटकाशी निकटचा संबंध आहे. शिक्षणामुळे आरोग्यविषयक सवयींमध्ये अनुकूल बदल होतो. आहार–विहार अधिकाधिक सुयोग्य करण्याकडे सुशिक्षित व्यक्तींचा कल असतो. योग्य पोषणमूल्ये व उष्मांकांचे प्रमाणात सेवन केले जाते. आरोग्यास विघातक सवयी, व्यसने यांच्यापासून सुसिक्षित व्यक्ती दूर राहते. परिणामी कार्यक्षमता व उत्साहात वाढ होते. याचा परिणाम आर्थिक विकास साधण्यावर होतो. कुपोषित राष्ट्रे आर्थिकदृष्ट्या अत्यंत मागासलेली आहेत व त्यांचा संपूर्ण निधी केवळ उपासमारीशी झगडण्यातच व्तीत होतो इतकेच नव्हे तर त्यांना यासाठी परक्या र ष्ट्रांवर व्यतीत होतो इतकेच नव्हे तर त्यांना यासाठी परक्या राष्ट्रांवर विसंबून राहा ` लागते. हे सोमालिया कंबोडिया यांसारक्या राष्ट्रांच्या उदाहरणावरून स्पष्ट होते.

### ६) शिक्षण, जनजागृती व आर्थिक विकास :

शिक्षणामुळे जन जागृती साध्य करता येते. आपले विविध प्रकारचे अ   कार आणि कर्तव्ये यांची व्यक्तिंना जाणीव होते. शैक्षणिक दृष्ट्या जागृत व्यक्ती वेठबिगारी, गुलामगिरी, कर्ज बजारीपणातून सावकाराद्वारे केले आर्थिक शोषण इ. दुष्टचक्रामधून स्वतःला मुक्त करून घेते. आपल्या क्षमतेनुसार आवडता व्यवसाय वा रोजगार करून आपली आर्थिक उन्नती साध्य करू शकते.

शैक्षणिक जागृतीमुळेच व्यक्तीला आपल्या उन्नतीसाठी उपयुक्त अशा शासकीय पत धोरणांचा, योजनांचा लाभ घेता येतो. कौटुंबिक आर्थिक विकासाबरोबरच राष्ट्राच्या आर्थिक विकासात देखील यामुळे मोलाची भर पडते.

### ७) रोजगाराच्या संधी आणि शिक्षण :

रोजगाराच्या क्षेत्रात शिक्षणामुळे विविध प्रकारच्या संधी उपलब्ध होतात. औपचारिक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, उद्योजकता विकास किमान कौशल्यांवर आधारित अभ्यासक्रम

इ. सारख्या शिक्षणक्रमामुळे व्यक्तिच्या अंगी रोजगाराभिमुख विविध क्षमतांचा विकास होतो व रोजगार प्राप्त होण्याच्या शक्यता आणि संधी वाढतात. याच परिणाम आर्थिक विकास साध्य करण्यावर होतो.

अशा प्रकारे वरील मुद्यांच्या आदारे शिक्षण आणि आर्थिक विकास यांच्यातील सहसंबंध स्पष्ट होतो. शिक्षण आणि आर्थिक विकास यांच्यातील सहसंबंध स्पष्ट होतो. शिक्षण हा आर्थिक विकास प्रक्रियेतील अपरिहार्य असा घटक आहे. शिक्षणाशिवाय आर्थिक विकास शक्य नाही. संतुलित व प्रभावी शिक्षण व्यवस्ता केवळ आर्थिक विकासच नव्हे तर उत्पादकता, दरडोई उत्पन्न व कौटुंबिक मनुष्यबळाचा विकास देखील साध्य करण्यास उपयुक्त ठरते.

## ड १) स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

### ड १.१ लघुत्तरी प्रश्न

१) उत्पादकता आणि शिक्षण यांतील संबंध स्पष्ट करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

२) कुटुंबाच्या आर्थिक विकासातील शिक्षणाची भूमिका स्पष्ट करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

३) शिक्षणाद्‌वारे आरोग्य व आर्थिक विकास कसा साध्य करता येतो. विवेचन करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

४) स्त्री शिक्षण आणि आर्थिक विकास यांच्यातील संबंध विशद करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

### ड १.२ टीपा लिहा.

१) शिक्षण आणि उत्पन्न

-----------------------------------------------

-----------------------------------------------

२) शिक्षण आणि कौटुंबिक विकास

-----------------------------------------------

-----------------------------------------------

३) व्यापार प्रक्रियेतील शिक्षणाची भूमिका

-----------------------------------------------

४) शैक्षणिक जनजागृती व आर्थिक विकास

-----------------------------------------------

-----------------------------------------------

५) शिक्षण आणि रोजगाराच्या संधी

-----------------------------------------------

-----------------------------------------------

**ड १.३ दीर्घोत्तरी प्रश्न**

आर्थिक विकासातील शिक्षणाची भूमिका विशद करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

क. २ शिक्षणाची लोकसाहीतील भूमिका

-----------------------------------------------

-----------------------------------------------

(Role of Education in Democracy)

शिक्षण आणि राजकारण ही एकाच समाजजीवनाची दोन महत्वाची अंगे आहेत. शिक्षण व्यवस्था आणि राजकीय व्यवस्था या एकूण समाजव्यवस्थेच्या दोन उपव्यवस्था आहेत. त्यामुळे ह्या दोन्ही व्यवस्थामध्ये परस्पर संबंध आहेत च काही विच रवंतांच्या मते शिक्षण हे सत्ताधारी वर्गाच्या हतातील अत्यंत प्रभावी असे साधन असते. आपली सत्ता व हितसंबंध सरक्षित ठेवण्यासाठी त्यांना अनुकुल अशा विचारसरणीचा प्रसार करण्यासाठी सत्ताधारी वर्ग शिक्षण व्यवस्थेचा  वापर करतो. राष्ट्राचे शासन हुकुमशाही मानणैरे नागरिक हवे असतात. शासन लोकशाही प्रवृत्तीचे असेल तर तेथील नागरिक देखील लोकशाही प्रवृत्तीचे हवे असतात.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने लोकशाही, स्वातंत्र्य समानता, ब धुता सामाजिक न्याय यासारख्या लोकशाही मूल्यांना मानणारी राज्यव्यवस्था स्वीकारली. राजकीय सत्तेच्या अगदी अतिम बिंदूपर्यंत लेकशाही पध्दतीच्या शासनतंत्राचा स्वीकार केला गेला. ग्रामस्तरापसून राष्ट्रीय स्तरपर्यंत लेकशाही पध्दतीने शासन यंत्रणा उभारण्याची व्यवस्थ  अस्तित्वात आली. अशा परिस्थितीत लोकसाही मूल्यांचे शिक्षण देणारी, रूजविणारी व लोकशाहीस पोषक नागरिक घडविणारी शिक्षण व्यवस्ता असणे हे ही आवस्यकच ठरते. दुसऱ्या शब्दांत लेकशाही प्रवृत्तीच्या नागरिकत्वच्या विकासासाठी शिक्षणाची भूमिका  हत्त्वपूर्ण ठरते. पुढील काही मुद्यांच्या आधारे शिक्षणाच्या ह्या भूमिकेचा परामर्श घेता येईल.

## १) लोकशाही मूल्ये रूजविणे :

लोकांनी लोकांकडून लोकांसाठी चालविलेली राज्य व्यवस्था म्हणजे लोकशाही होय.'' परंतु आधुनिक काळात लोकशाहीची व्याप्त केवळ शासन संस्थेपुरती मर्यादित राहिलेली नाही. लेकशाही म्हणजे व्यक्तिगत व सामाजिक जीवन उत्तमरित्या जगण्याचा मार्ग होय. लोकशाही पध्दतीत व्यक्तीला महत्त्व आहे. तिला सर्व प्रकारचे स्वातंत्र्य आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय ही लोकशाहीची मूल्ये आहेत. लोकशाही मध्ये राज्य जरी बहुसंख्यांकांचे असले तरी येथे अल्पसंख्यांकांची देखील कदर केली जाते. सर्वांना संधींची समानता दिली जाते. असा प्रकारच्या लोकशाही प्रवृत्तीस पोषक मूल्यांना रूजविण्याचे कार्य शिक्षणाकडून केले जाते. शिक्षणाद्वारे समाजसदस्यांची मानसिकता बदलविता यते. आत्मकेंद्री व संरजामशाही प्रवृत्तीचा तयाग करून सत्तेचे **वि**केंद्रीकरण इतरांच्या सहअस्तित्वाची जाणी शिक्षणामुळेच लोकांमध्ये निर्माण होत असते.

### १) लोकशाही प्रवृत्तीचे नागरिकत्व घडविणे :

'लोकशाही प्रवृत्तीचे नागरिकत्व' या संकल्पनेमध्ये 'लोकशाही प्रवृत्ती व नागरिकत्व या दोन संज्ञा अंतर्भूत आहेत. व्यापक अर्थाने लोकशाही सं कल्पन चा विचार करता 'लोकशाही प्रवृत्ती म्हणजे प्रत्येक व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तींच्या सर्व प्रकारच्या सवातंत्र्याची जाणीव टेवणे, त्यांचा सन्मान करणे, त्याच्या प्रगतीसाठी पोषक अशी मनोवृत्ती अंगी बाणणे होय. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मूल्यांची जपणूक करण्याची व्यक्तीमधील प्रवृत्ती म्हणजेच लोकशाही प्रवृत्ती होय.

नागरिक म्हणजे एखाद्या देशाचा अनेक वर्षापासूनचा रहिवसी होय. ते रहिवासी त्या देशाशी निष्ठावान असेलच असे नाही. 'नागरिकत्व' म्हणजे देशाशी निष्ठावान व प्रामाणिक असणे होय. देशासाठी बलिदान करण्याची तयारी असणे होय. नागरिकत्वाच्या संकल्पनेत राष्ट्राभिमान, हक्क व कर्तव्याबद्दलची जाणीव या तीन महत्त्वपूर्ण पैलूंचा समावेश होतो.

'लोकशाही प्रवृत्तीचे नागरिकत्व' या संकल्पनेत वरील अर्थाने 'लोकशाही प्रवृत्ती' आणि 'नागरिकत्व' या दोन्ही संक्लपनांचा समावेश होतो. लोकशाही मूल्यांची जोपासना करणारा त्या देशाचा नागरिक म्हणजे लोकशाही प्रवृत्तीचा नागरिक होय.

शिक्षणाद्वारे लोकशाही मूल्यांचे शिक्षण अगदी प्राथमिक स्तरपासूनच दिले जाते व त्यांची रूजवण व्यक्तीमध्ये केली जाते. त्याचप्रमाणे राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रविषयक आपले उत्तरदायित्व, कर्तव्य, देशभक्ति यासारख्या राष्ट्रीय गुणांची जोपासना देखील शिक्षण, शिक्षणक्रम आणि शिक्षण संस्थांच्या द्वारे केली जाते. अशा **प्र**कारे 'लोकशाही वृत्तीचे नागरिक घडविण्यामध्ये शिक्षणाचा वाटा महत्वाचा आहे.

### ३) अधिकार व कर्तव्ये यांची जाणीव :

लोकशाही शासन प्रणाली नागरिकांना व्यापक स्वातंत्र्य प्रदान करते. जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त कल्याण साधणे हेच लोकशाहीचे उद्दिष्ट असते. त्यादृष्टीने देशातील

नागरिकांना राजकीय, आर्थिक, शैक्षणिक व्यावसायिक स्वातंत्र्या बरोबरच विविध प्रकारचे अधिकार प्रदान केले जातात. लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी अ णि नगरिकांच्या व पर्यायाने राष्ट्राच्या उन्नतीसाठी असे अधिकार आवश्यक असतात. शिक्षणाच्या माध्यामातून ह्या अधिकारांची जाणीव नागरिकांना कडून दिली जाते. त्यामुळे आपल्या अधिकारांविषयी ते जागृत बनतात. अशा अधिकरांचा संकोच किंवा हनन करू पाहणाऱ्या राजकीय सत्तेविरोधात ते एकत्रित येऊन ती बदलण्याचा प्रयत्न करतात पर्यायाने लोकशाहीचेच रक्षण करतात व या सर्वांमागे शिक्षणच असते.

लोकशाहीतील सुजाण आणि सजग नागरिकांना आपल्या अधिकारांबरोबरच कर्तव्यांची सुध्दा जाणीव असते. ह्या कर्तव्याद्वारे राष्ट्र, समाज, समाज बांधव इ. विषयीचे आपले कर्तव्य काय आहे. आपल्या कर्तव्यांचे आपण पालन करावयास हवे ही भावना वाढीस लागते. ह्या विषयीची जाणीव लोकांमध्ये निर्माण करण्याचे कार्य शिक्षणच करते. सुशिक्षित नागरिकांमध्ये आपल्या कर्तव्यांचे पालन करण्याची प्रवृत्ती ही निश्चितच वाढलेली असते.

### ४) अभिव्यक्ती स्वातंत्र्याची जाणीव :

लोकशाही शासन प्रणालीने नागरिकांना दिलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे अतिशय महत्वाचे आहे. भाषण संभाषण-लेखन इ. माध्यमांद्वारे नागरिक आपली मते प्रकट करू शकतात. टीका-टिप्पणी करू शकतात. आपल्या मत स्वातंत्र्यांच्या बळ वर आपल्या व्यक्तिगत व समूहाच्या विकासाच्या दृष्टीने वातावरण निर्मिती करू शकतात. याच आधारे संघटनात्मक बांधणी देखील करू शकतात. असे करीत असताना इतरांच्या अभिव्यक्ति स्वातंत्र्याचा आदर करणे देखील अपेक्षित असते. लोकशाहीचा विकास आणि संवर्धन या दोन्हीही दृष्टीने हे आवश्यक असते. शिक्षण प्रक्रियेतून व्यक्तिला तिच्या अभिव्यक्ति स्वातंत्र्यांची जाणीव होत असते. इतकेच नव्हे तर अभिव्यक्ति स्वातंत्र्याचा उपयोग कसा करावा. आपले विचार प्रकट करताना कोणती खबरदारी घ्यावी. या बाबतीतील प्रशिक्षण जाणीव देखील शिक्षणाद्वारेच नागरिकांना प्राप्त होत असते.

### ५) राष्ट्रीयत्वांची भावना निर्माण करणे :

लोकशाही शासन व्यवस्था आपल्या नागरिकांमध्ये राष्ट्रीयत्वाच्या भावना विकसित करण्याच्या दृष्टीने प्रयत्नरत असते. तया संदर्भात शासन व्यवस्थेबरोबरच. महत्वपूर्ण भूमिका असते ती शिक्षणाची!

राष्ट्रीयत्वाची भावना म्हणजे राष्ट्रीय तत्त्वज्ञान धर्म, संस्कृती, परंपरा व इतिहास याबद्दल अभिमान असणे होय. आदर्श नागरिकाला आपल्या राष्ट्राबद्दल अभिमान असणे. होय. आदर्श नागरिकाला आपल्याराष्ट्राबद्दल योग्य तो अभिमान असतो. राष्ट्राभिमानात आपल्या राष्ट्रातील उणिवा व कमकुवतपणा मनमोकळेपणे मान्य करण्याची तयारी दोष दूर करण्यासाठीची धडपड, व्यक्तिगत हितापेक्षा राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याची प्रवृत्ती इ. बाबींचा समावेश होतो. राष्ट्राभिमान व राष्ट्रीयत्वची भावना निर्माण करण्याचे कार्य शिक्षण व्यवस्थेद्वारेच केले जाते. भारतात ब्रिटिशांनी औपचारिक सिक्षणास प्रारंभ केल्यानंतर शिक्षित व्यक्तींनी राष्ट्राभिमानाने प्रेरित होऊन स्वातंत्र्यलढा उभारला होता. ह्या स्वातंत्र्य संग्रामात सिक्षणाची भूमिका मध्यवर्ती

नि महत्वाची होती हे आपण जाणतोय.

### ६) आंतरराष्ट्रीय सामंजस्य भावनेचा विकास :

प्रत्येक राष्ट्राच्या नगरिकांमध्ये आपल्या राष्ट्राबद्दल राष्ट्रीयत्वाची भावना असतेच, मात्र अतिरेकी राष्ट्रवादाची भावना असेल तर राष्ट्रीयत्वास विकृत स्वरूप प्राप्त होते व राष्ट्रा-राष्ट्रांत युध्दे होतात. पहिले व दुसरे महायुध्द ही अतिरेकी राष्ट्रवादाचीच उदाहरणे आहेत. युध्दामुळे अपरिमित हानी होते. शांतता नष्ट होते राष्ट्र व समाजाच्या अस्तित्वाला धोका उत्पन्न होतो. आज शांतता व सामंजस्याचे महत्त्व सर्वांना पटले आहे. शांततामय सहजीवनाद्‌वारेच खरा विकास शक्य आहे याची जाणीव आज झालेली आहे.

एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राला व त्याच्या प्रश्नांना सहानुभूतीने समजून घेण्याचा प्रयत्न म्हणजेच आंतरराष्ट्रीय सामंजस्य होय. मानव म्हणून सर्वांच्या आशा-आकांशा, सुख-दुःखे प्रश्न समान आहेत. आज जगतील सर्व देश अधिकाधिक जवळ येत आहेत. जागतिकीकरणच्या माद्यमतून परस्परावलंबन वाढलेले आहे. वैश्विक समुदायाशी समायोजन साधणे. ही काळाची गरज आहे. ही गरज पूर्ण करण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय सामंजस्यांची भावना निर्माण करण्याचे कार्य सिक्षणच करते. शैक्षणिक संस्कारांच्या माध्यमातून 'विश्वबंधुत्व आणि वसुधैव कुटुम्बकम' ही भावना विकसित होते तिचे महत्त्व आणि आवश्यकता पटते.

---

## ड २) स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

---

ड २.१ लघुत्तरी प्रश्न

१) लोकशाही मूल्ये व शिक्षण यांतील संबंध स्पष्ट करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

२) शिक्षणाद्‌वारे अधिकार व कर्तव्यांची जाणीव कशी होते?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

३) अभिव्यक्ती स्वातंत्र्यांच्या दृष्टीने शिक्षणाचे महत्तव विशद करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

४) शिक्षणाची राष्ट्रीयत्वाच्या विकासातील भूमिका स्पष्ट करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

ड २.२ टीपा लिहा.

१) लोकशाही प्रवृत्तीचे नागरिकत्व

-----------------------------------------------

-----------------------------------------------

२) आंतरराष्ट्रीय सामंजस्यातील शिक्षणाची भूमिका

-----------------------------------------------

-----------------------------------------------

३) अभिव्यक्ति स्वातंत्र्याचा विकास व शिक्षण

-----------------------------------------------

-----------------------------------------------

ड २.३ दीर्घोत्तरी प्रश्न

शिक्षणाचा राजकारणाशी असलेला संबंध सांगून लोकशाहीतील शिक्षणाची भूमिका स्पष्ट करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

## क. ३ शिक्षणाची समाजातील भूमिका

(Role of Education in Society)

मनुष्य ह समाजशील प्राणी आहे. समाजात रहूनच व्यक्ती आपल्यामूलभूत गरजांबरोबरच समाजिक, भावनिक, आर्थिक, शारिरीक इ. विशेष गरजांची पूर्तता करू शकतो. मानवी जीवनात गरजांची पूर्तता करतांना व्यक्तिच्या सहज प्रवृत्ती वा प्रकृतिपेक्षा 'सामाजिक प्रेरणा' ह्या अधिक महत्वाच्या असतात. समाजीकरणासारख्या प्रक्रियांच्या द्वारे व्यक्तीला ह्या सामाजिक प्रेरणांचे महत्त्व पटवून तिच्यावर सामाजिक संस्क र बिंबवले जातात. शैक्षणिक प्रक्रिया ही अशा प३कारच्या सामाजिक संस्कारांना बळ देणारी प्रक्रिया आहे. तिच्याद्वारे सामाजिक सस्कांरांचे अंतरीकरण वा आत्मसतीकरण तसेच दृढीकरण शक्य होत असते. सामाजिक विकासाचा विचार करीत असतांना सुशिक्षित व सुसंस्कृत व्यक्तींचा व समाजिकतची जाणीव विकसित झालेल्या व्यक्तींचा विचार ओघाने येतोच. किंबहुन विकसित, मूल्याधिष्ठित आणि निरामय समाजजीवनासाठी हा विचार अपरिहार्यच आहे. शेवटी व्यक्ती-व्यक्तिंनी मिळूनच समाज बनत असतो. व्यक्तिविकास म्हणजे पर्यायाने सम जविकासाचाच पाया आहे. शिक्षण हे व्यक्तिच्या भौतिक विकासाबरोबरच सामाजिक व अधिभौतिक विकासाचा पाया रचणारी प्रक्रिया आहे. त्यामुळेच अधिकाधिक लोकांपर्यंत शिक्षण पोहोचल्यास तो समाज विकास पावतो. अशी अनेक उदाहरणे आपल्याला दिसतील 'शिक्षणाची समाजातील भूमिका किंवा 'शिक्षण आणि समाज' यांच्यातील सहसंबंध पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

### १) **समाजीकरण** (Socialization)

समाजीकरण म्हणजे मनुष्य ह्या जैविक प्राण्याचे मनुष्य ह्याच समाजशील प्राण्यात रूपांतरण करणारी प्रक्रिया होय. व्यक्तींच्या अंगी सामाजिक ुणांचा विकास करून तिला समाजाचा उपयुक्त नि जबाबदार घटक बनविण्याचे कार्य समाजीकरणाद्वारे केले जाते.

'समाजीकरण हे एक प्रकारचे शिक्षण असून ते घेतलेल्या व्यक्तीस आपली समाजिक भूमिका चांगल्या प्रकारे वठविता येते.'

व्यक्तिला समजीकरणाचे प्रारंभिक धडे कुटुंबापासुनच मिळतात. तथापि बाह्य सामाजिक जगताशी व्यक्तीचा खऱ्या अर्थाने औपचारिकरित्या संबंध जेडण्याचे कार्य शिक्षणसंस्था करतात व व्यक्तिला समाजाचा एक जबाबदार घटक बनवितात. वविध सामाजिक मूल्ये, सांस्कृतिक तत्त्वे, राष्ट्रीयता, सहजीवन, समाजाप्रती संवेदनशीलता, इ. गुणांची जेपासना व संवर्धन शिक्षणाद्वारेच व्यक्तिमध्ये केले जाते. म्हणूनच शिक्षणाचे हे समाजीकरणाचे कार्य व्यापक असा समाजातील सामाजिकतेचे अस्तित्व व विकास यांच्या दृष्टीने आत्यंतिक महत्वाचे आहे.

### २) **मूल्य शिक्षण** (Value Education)

माणसाचे वर्तन कसे असावे यासंबंधी समाजात कही आदर्श निर्माण केलेले असतात. हे आदर्श किंवा मानदंड म्हणजेच 'मूल्ये' होत. 'सत्य', 'अहिंसा', 'शांती', स्नेह, प्रेम, सुचिता ही काही मूल्यांची उदाहरणे आहेत. समाजजीवन निरामय व्हवे, व्यक्ति-व्यक्ति, समूह-समूह व समूह आणि व्यक्ति यांच्यातील परस्पर संबंध मूल्याधिष्ठित बसुन परस्परांच्या विकासास प्रेरक ठरवित हेच मूल्य शिक्षणाचे उद्दिष्ट असते. समाजात सुरू असलेली मूल्यांची घसरण ही व्यक्ती व समाज असा दोहोंच्याही हिताच्या दृष्टीने घातक असते. मूल्यविहीन समाज रसातळाला जतो. म्हणून मूल्यांची जोपासना पालन, शिक्षण व संवर्धन अत्यावश्यक ठरते. शिक्षण हे मूल्य शिक्षणाचे एक प्रभावी साधन आहे. शिक्षणाद्वारे व्यक्ति मध्ये विविध प्रकारच्या मूल्यांची रूजवण व विकास केला जातो. शिक्षणाने येग्य मूल्यांचे संवर्धन केले नाही तर अंतिमतः चुकीची व अयोग्य मुल्ये त्यांची जगा घेतील व सम जाच्याच अवनतीस कारणीबूत ठरतील. म्हणूनच शैक्षणिक प्रक्रियेद्वारे विविध अशा आदर्श मूल्यांचे शिक्षण समाजात रूजविण्याचे कार्य केले जाते. स्वातंत्र्य, समता, ब धुता, लोकशाही, राष्ट्रनिष्ठा, समाजवाद सर्वधर्म समभाव, इ. मूल्ये विद्यार्थी दशेत व्यक्तीवर बिंबविण्याचे कार्य शैक्षणिक संस्थाकडून केले जाते.

### ३) **सामाजिक नियंत्रण** (Sicial Control)

सामाजिक नियंध्णाच्या दृष्टीने देखील शिक्षणाची भूमिका अत्यंत महतत्वपूर्ण आहे. ''ज्या साधनांच्या सहाय्याने समाज आपल्या सदस्यांना वर्तनाच्य सवीकृत दंडकाप्रमाणे वर्तन करावयास भाग पाडतो त्यांच्या व्यवस्थेस सामाजिक नियंत्रण असे म्हणतात.''

सामाजिक नियंत्रणाद्वारे व्यक्तिच्या अथवा समाज सदस्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचे

कार्य केल जाते. व्यक्तिचे वर्तन हे व्यापक समजहितास पेषकच असले ाहिजे ते समाजहितास बाधा आणणारे नसावे. ही समजची अपेक्षा असते. समाजाची ही अपेक्षा पूर्ण करण्यासाठी व समाजव्यवस्था सुरळितपणे चालण्यासाटी सामाजिक नियंत्रण व्यवस्था अतिशय महत्वाची ठरते. समाजसदस्यांच्या व्यक्तिगत परंतू समाजहितास बाधक आकांक्षांना आवर घालून व्यक्तिचे वर्तन समाजानुगामी म्हणजेच अनुचलनात्मक कसे असेल याची काळजी सामाजिक नियंत्रणाद्वारे घेतली जाते.

शिक्षण हे सामाजिक नियंत्रणाचे एक प्रभावी माध्यम आहे. शिक्षणाद्वारे व्यक्तीच्या अंगी सुसंस्कारांची रूजवणुक केली जाते ज्यांच्यामुळे व्यक्तीविचलित प्रवृततपसून परावृत्त होत असते. शिक्षणामुळेच योग्य व अयोग्य काय याचा सारासार विच र सम जसदस्यांमध्ये रूजतो. तारतम्याचा विकास होतो. त्याच प्रमाणे सामाजिक नियंत्रणाच्या इतर साधनांचा जसे धर्म, कायद, प्रथा, लोकनीती इ. चा परिचय होतो अपगमनात्मक प्रवृतती वा वर्तनातील धोका कळतो व व्यक्तिवर सामाजिक नियंत्रण प्रस्थापित होण्यास मदत होते.

### ४) **संस्कृती शिक्षण** (Cultural Education)

समाज सदस्यांना आपल्या समाजाच्या संस्कृतीचा परिचय किंवा शिक्षण देण्याचे कार्य शिक्षणाद्वारे केले जाते.कोणत्याही समाजाची संस्कृती ही त्या समजचा दर्पण असते. त्याचप३माणे त्या-त्या समाजिक समूहसाठी ती आदर्श असते. सांस्कृतिक मूल्यांमध्ये नेहमी आदर्शांचाच समवेश होत असतो. त्यामुळे सस्कृती सिक्षणाच्या माध्यामातून आदर्श मूल्यांचे प्रसिक्षण व त्याद्वारे सुसंस्कृत समाज सदस्यत्वाची जडण-घडण व्यक्तीमध्ये केली जाते. आपल्याच समाजच्या परंपरा, मूल्ये, आदर्श इ. चे ज्ञान व्यक्तीला प्राप्त होते. त्यामुले आपल्याच सामाजिक परिवेशाशी व्यक्तिंचा परिचय होतो. व त्याचा परिणाम समाज सदस्यांमधील सहसंबंध दृढ होण्यास मदत होते. शिक्षणाच्या संस्कृती सिक्षणाच्या कार्यामुळे समाजीकरण, व्यक्तिमत्व विकास यांसारख्या सामाजिकृष्ट्या महत्वच्या प्रक्रियांना देखील गती मिळते. व त्याचा परिणाम समाज व्यवस्थेच्या निर्माण प्रक्रियेवर देखील होतो.

### ५) **नागरिकता विकास** (Citizenship Development)

'नगरिक' म्हणजे एखाद्या देशाचा अनेक वर्षांपासूनचा रहिवाशी होय. अशा रहिवाशांना तया-त्या देशाचे नागरिकत्व प्राप्त झालेले असते. 'नागरिकत्व' ह्या सं ल्पनेत अनेक गोष्टींचा समावेश होतो. ह्या लोकांना आपल्या देसाबद्दल अभिमान असतो. ते देशांशी निष्ठावान तसेच प्रामाणिक असतात. देशाच्या संरक्षणासाठी आत्मबलिदान करण्यास देखील तयार असतात. मात्र प्रत्यक्षात हे असे असेलच असे नाही. शिक्षणाची भूमिका या ठिकाणी महत्त्वपूर्ण ठरते. सिक्षणाच्या माध्यमतून समाज सदस्यांमध्ये आपापल्या देशांच्या नागरिकतवाची जडण-घडण केली जाते. आपली राष्ट्रीय परंपरा, तिची महानता, राष्ट्रप्रेम यासारख्या राष्ट्रीय प्रवृत्तींची रूजवण सिक्षणाच्या माध्यमातून मुलांमध्ये केली जाते. राष्ट्रीय सण, उत्सव, राष्ट्रगीत व देशभक्तीपर गीतांचे गायन यासारख्या उपक्रमांच्या अयोजनातून विद्यार्थी जीवनातच राष्ट्रीय भावनेची जडण-घडण केली जाते. त्यातूनच समाजसदस्यांमध्ये नागरिकत्वाच्या गुणांचा विकास व 'संवर्धन' केले जाते. 'भारताचा स्वातंत्र्य लढा' हे शिक्षण आणि नागरिकत्व

संबंधातील एक उत्कृष्ट उदाहरण आहे. शिक्षण प्रसारामुळेच भ तीयांमध्ये नागरिकत्व, सार्वभौमत्व व स्वातंत्र्याविषयी जागृती निर्माण झाली होती. व त्याचाच परिणाम म्हणून हा स्वातंत्र्य लढा उभा राहिला व यशस्वी देखील झाला.

### ६) **सामाजिक परिवर्तन** (Social Change)

मानवी समाज अनेक प्रकारच्या बदलतून जात असतो. ढोबळ मानाने समाजात घडणारा बदल म्हणजेच सामाजिक परिवर्तन होय. हॅरी. एम. जॉन्सन यांचे मते 'मूलभूत अर्थाने समाज रचनेत होणारा बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय.'' सामाजिक परिवर्थनामुळे सामाजिक प्रथा, चालीरिती, परंपरा, जीवन पध्दती, आचार-विचार या बाबींमध्ये बदल होतो समाज सदस्यांमधील परस्पर संबंधामध्ये देखील बदल होतो. समाज परिवर्तनाची प्रक्रिया निरंतर सुरू असते. समाजाच्या प्रगतीसाठी परिवर्तनाची गरज असते. सामाजिक परिवर्तनाच्या ह्या प्रक्रियेत शिक्षणाची भूमिका ही अत्यंत महत्तवपूर्ण अशी आहे. ज्या समाजात शिक्षणाचे प्रमाण अधिक असते त्या समाजात सामाजिक परिवर्तनाची गती व तदानुषंगाने होणाऱ्या विकासाचे प्रमाण अधिक असते. हे आपल्याला दिसु शकते सिक्षणामुळे व्यक्तीचा व्यक्तिगत विकास होतो. शिक्षणाच्या सहाय्यानेच व्यक्ति जीवनोपयोगी कौशल े प्राप्त करते व व्यक्ति विकासातूनच सामाजिक जीवनोपयोगी कौशल्ये प्राप्त करते व व्यक्ती विकासातूनच सामाजिक विकास साध्य केला जाऊ शकतो.

शिक्षणामुळेच समाजातील कालबाह्य झालेल्या रूढी, अंधश्रध्दा व सनातनी प्रवृत्तीमध्ये बदल घडून आला समाजात मोठ्या प्रमाणावर परिवर्थन घडून आले. जाती जातींमधील संबंधांची दरी, अस्पृश्यता, जतीयवाद, स्त्रियांवरील अत्याचार इ. समस   नष्ट करण्यामागे व इष्ट परिवर्तन घडवून आणण्यामध्ये शिक्षणाचीच भूमिका महत्वाची आ े. आज जती जाती व स्त्री-पुरूष संबंधामध्ये मोठ्याप३माणावर परिवर्तन झाले आहे याचे श्रेय सिक्षणालाच आहे.

शिक्षणामुळे राजकीय, आर्थिक, वैज्ञानिक, धार्मिक नैतिक इ. अनेक बाबतीत परिवर्तन शक्य होते. शिक्षणामुळेच आधुनिकीकरण, लोकशाही, भावनिक व राष्ट्रीय एकात्मता इ. सकारत्मक परिवर्थन रूजविणारी मुल्ये समजात प्रसृत होतात व सामाजिक परिवर्तनास कारणीभूत ठरतात. त्याचप्रमाणे समाजास प्रेरक व कारक असे नेतृत्तव देणारे समाजसुधारक देखील शिक्षणामुळेच निर्माण झालेत व त्यांनी समाजात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. म. फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासोहब आंबेडकर, राजर्षि   शाहू महराज ही या बाबतीतील प्रभावी उदाहरणे सांगता येतील.

### ७) **सामाजिक गतीशीलता** (Social Mobility)

सामाजिक गतिशीलता म्हणजे एका सामजिक स्तरातून दुसऱ्या सामाजिक स्तरात प्रवेश करणे होय. शिक्षणामुळे व्यक्तीच्या विचारसरणीत, कौशल्यांमध्ये व क्षमतांमध्ये सकरात्मक परिवर्तन होते. त्यांच्यामध्ये वृध्दी होते व यचा परिणाम म्हणून आपल्या मुळ सामाजिक स्तरापेक्षा उच्च दर्जाच्या सामाजिक स्तरात प्रवेश करण्याची संधी समाज सदस्यांना उपलब्ध

होते. समाजात उर्ध्वगामी सामाजिक गतिशीलतेचा (णर्िीव डेलळरश्र चेलळश्रळीूं) प्रत्यय येतो.

आंतरजातीय विवाह, जातीधिष्ठित व्यवसायांचा त्याग करून नव्या अधिक उत्पन्न देणाऱ्या व्यवसायांची निवड करण्याचे स्वातंत्र्य, राजकीय, आर्थिक, औद्योगिक, सांस्कृतिक असा विविध क्षेत्रांमध्ये समजातील कनिष्ठ स्तरातील सदस्यांचा झालेला प्रवेश ही सामाजिक गतीशीलतेचीच उदाहरणे असून ह्या गतीशीलतेमागील प्रेरणा 'शिक्षण' हीच आहे.

### ८) **सामाजिक सुधारणा** (Social Reforms)

समाजातील इष्ट सामाजिक परिवर्तन हे समाज सुधारकांनी घडवून आणलेल्या सामाजिक सुधारणांमुळे शक्य झालेले आहे. ह्या सुधारणांमागील प्रेरक शक्ती म्हणजे शिक्षण होय. समाजाच्या विविध घटकांपर्यंत शिक्षणाचा प्रवाह पोहचला त्याचा प्रभाव निर्माण झाला व सामाजिक सुधारणा आपल्याला दिसून येतात.

स्वातंत्र्य काळात व त्यानंतरच्या काळात देखील समाज सुधारणा विषयक जी विविध आंदोलने भारतात झालीत. त्यांच्यामागील प्रेरणा शिक्षण हीच होती. शिक्षणामुळे इष्ट अनिष्ट यातील फरक व्यक्तीस कळू लागतो. अन्यायाची जाणीव होते व न्याय हक्काविषयी ती जागृत होते. बलविवाह, सती प्रथा, हुंडा प्रथा, अस्पृश्यता, जातीयता इ. अनिष्ट सामाजिक प्रथांविषयी जनजागृती निर्माण करण्याचे कार्य सिक्षणामुळेच शक्य झाले सिक्षण प्रसारामुळेच ह्या अनिष्ट प्रथांना पायबंद बसू शकला व सामाजिक सुधारणा घडून येऊ शकल्यात.

### ९) **भौतिक प्रगती** (Materiallistic Development) ...

भौतिक व सामाजिक जीवनांतील निरंतरता हे शिक्षणाचे एक कार्य आहे.शिक्षणामुले भौतिक प्रगती होते. व भौतिक प्रगतीचे परिणाम समाजव्यवस्थेवर होतात.

समाज सदस्यांच्या जीवनमनाच्या स्तर उंचावतो. उत्पादन क्षमता वाढते. समजाच्या व राष्ट्राच्या प३गतीच्या दृष्टीने हे उपयुक्त ठरते.

आज वाहतुकीची साधने, दळणवळण, प्रसार माध्यमे, वैद्य**कीय**, संगण इ. क्षेत्रात झालेल्या प३गतीमागे शिक्षण हाच घटक कारणीभूत असून ह्य प्रगतीमुळे भारताच्या सामाजिक जीवनात फार मोठे परिर्तन घडून आलेले आहे. मानवी जीवन अधिकाधिक सुखकर करणे या भौतिक प्रगतीमुळे शक्य झाले आहे. त्याचप३माणे सा**मा**जिक संबंधा ध्ये सुध्दा परिवर्तन झालेले आहे.

### १०) **आधुनिकीकरण** (Modernization) ...

आधुनिकीकरण ही एक प्रागतिक संकल्पना असून तिच्या**म**ध्ये सा ाजिक परिवर्तन तसेच कलानुरूप सामाजिक समायोजनाचा संदर्भ अभिप्रेत आहे. आधुनिकीरण हा शब्दच मुळात प्रगतचा निर्देशक असून नवे विचार, नवीन संकल्पना, नवीन वस्तु, नवीन तत्त्वे, इ. चा स्वीकार कतरून तद्नुरूप जीवनात परिवर्तन करण्याची तत्परता म्हणजे आधुनिकीकरण होय.

जुने कालबाह्य टाकून कालानुरूप तर्कसंगत व विज्ञाननिष्ठ विचारसरणीचा सवीकार म्हणजे आधुनिकीकरण होय.

शिक्षणामुळे आधुनिकीकरणाला चालना मिळते, ॉिक्षक रणाम ळे भारतीय समाजात परंपरागत व्यवसाय पध्दती, बलुतेदारी, पारंपारिक शेतीपध्दती जाऊन या क्षेत्रात आधुनिक पध्दतींचा स्वीकार करण्यात आला त्यामुले नवीन अर्थव्यवस्था उदयाला आली.

मिशनऱ्यांनी सुरू केलेल्या इंग्रजी शिक्षणामुळे भारतात पाश्चात्य ज्ञानाद्वारे नव विचारांचा प्रभाव पडला. समाज जागृती होऊ लागली व सामाजिक चळवळींमधून समाजिक प्रबोधनास आरंभ झाला.

भौतिक सुधारणा, सुसंघटित राज्यतंत्र, उदारमतवाद, व्यक्तीस्वातंत्र्य, समता, सवातंत्र्य, लेकशाही मूल्ये इ. चा स्वीकार आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेअंतर्गतच केला गेला व त्यामुळेच पारंपारिक रूढी, अंधश्रध्दा, स्त्री-पुरूष विषमता, गुलामगिरी वेठबिगरी यासारख्या अनिष्ट गोष्टींना धक्का बसला बुध्दिवाद, धर्मनिरपेक्षता, सामाजिक ऐक्य, समाजिक न्याय संदींची समानता इ. नवीन सामाजिक मूल्ये उदयास आली. ह्या नव्या आधुनिक मुल्यांच्या व्यापक स्वीकार आणि प्रसार प्रक्रियेत शिक्षणाचा महत्वाचा व मूलभूत वाटा आहे.

## ड ३) स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

### ड ३.१ लघुत्तरी प्रश्न

१) समाजीकरणातील शिक्षणाची भूमिका स्पष्ट करा.

------------------------------------------------

------------------------------------------------

२) नागरिकता विकास व शिक्षण यांच्यातील सहसंबंध विशद करा.

------------------------------------------------

------------------------------------------------

३) 'सामाजिक परिवर्तनासाठी सिक्षण प्रेरक असते' स्पष्ट करा.

------------------------------------------------

------------------------------------------------

४) आधुनिकीकरण व शिक्षण यांच्यातील संबंध स्पष्ट करा.

------------------------------------------------

------------------------------------------------

### ड ३.२ टीपा लिहा.

१) मूल्यशिक्षण व शिक्षण

-------------------------------------------

-------------------------------------------

२) सामाजिक नियंत्रणात शिक्षणाची भूमिका

-------------------------------------------

-------------------------------------------

३) सामाजिक गतिशीलता आणि शिक्षणाची भूमिका

-------------------------------------------

४) सामाजिक सुधारणांमधील शिक्षणाचे योगदान

-------------------------------------------

-------------------------------------------

**ड ३.३ दीर्घोत्तरी प्रश्न**

१) शिक्षणाची प्रमुख कार्ये कोणती? शिक्षणाची समाज विकासातील भूमिका स्पष्ट करा.

-------------------------------------------

-------------------------------------------

२) शिक्षणाच्या समाजातील भूमिकेचे स्वरूप स्पष्ट करा व त्याच्या कार्यांचा आढावा घ्या.

-------------------------------------------

-------------------------------------------

## इ . सारांश :

वरील विवेचनाच्या आधारे शिक्षणाची समाजच्या विकासात महत्वाची भूमिका आहे हे स्पष्ट होते. किंबहुना शिक्षण हेच कोणत्याही विकास प्रक्रियेचे मूलभूत माध्यम आहे. कोणत्याही समाजाच्या वा राष्ट्राच्या अर्थकारण, राजकारण आणि समाजकारणाला गतिमानता प्रदान करण्यामागे शिक्षणाची भूमिका मध्यवर्ती आहे. हे देखील वरील विवेचनावरून स्पह्नट झालेले आहे.

कोणत्याही राष्ट्राची आर्थिक प्रगती ही त्या राष्ट्राच्या सर्वंकष प्रगतीचा कणा असतो. शिक्षण आणि अर्थकारण यांच्यातील परस्पर संबंध त्या-त्या देशाच्या आर्थिक ध्येय-धोरणे, पत-व्यापार यांच्या विषयीचा दृष्टिकोण, कर्ज पुरवठा, कर्ज घेण्याची प्रवृत्ती, इ. बाबींना प्रभावित करतो. शिक्षणामुळे व्यक्ती आपल्या व्यक्तिगत आर्थिक विकसबरोबरच कौटुंबिक व व्यापक अशा राष्ट्रीय अर्थ विकासाला गती देऊ शकते. सिक्षणामुळेच नवीन तंत्रज्ञान विकसित वा आत्मसात करता येते. त्या द्वारे उत्पादनाच्या क्षेत्रात प्रगतीचा टप्पा गाठता येतो व त्याद्वारे उत्पादनाच्या क्षेत्रात प्रगतीचा टप्पा गाठता येतो. आर्थिक सुधारणा करता येतात.

मनुष्यबळ विकासाला देखील सिक्षणामुळेच चालना मिळते. आणि विकसित मनुष्यबळ हे आर्थिक विकासासाठीचे भांडवल ठरते.

अर्थकारणाप्रमाणेच राजकारणात देखील शिक्षणाची भूमिका महत्वाची ठरते. १९ व्या शतकातील शैक्षणिक प्रगतीमुळेच आपल्या राजकीय अधिकारांची जाणीव विविध राष्ट्रांमधील जनतेला झाली आणि लोकशाहीचा पुरस्कार केला जाऊ लागला. लोकशाही मूल्यांची जेपासना, प्रचार नि प्रसार निव्वळ शिक्षणामुळेच साध्य करता आला आहे. शिक्षणामुळेच व्यक्तिंना अभिव्यक्ति स्वातंत्र्याची जाणीव होते. लोकशाही ने त्यांना प्रदान केलेल्या एका मोठ्या अधिकारचा वापर शिक्षणामुळेच सहजसाध्य झाला आहे. लोकशाहीस पुरक अशा राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा पुरस्कार शिक्षणाद्वारेच केला जातो व त्य ही पलिकडे जाऊन आंतरराष्ट्रीय सामंजस्यांची भावना निर्माण होते. तीही शिक्षणामुळेच!

शिक्षण व्यवस्थेचा समाज व्यवस्थेशीदेखील घनिष्ठ संबंध असून शिक्षणाच्या माध्यामातून समाजात विकासास पूरक नि पोषक असे अनुकूल निर्णय घेता येतात. सामाजिक परिवर्तनास चालना मिळते. शिक्षणामुळेच समाज सदस्यांच्या सामाजिक गतिशीलतेत वाढ होते व ते आपली उन्नती साध्य करू शकतात. समाजसदस्यांतील परस्पर सामाजिक संबंधावर देखील शिक्षणाचा अनुकूल प्रभाव पडतो. अनिष्ट सामाजिकाप्रथां तिला जली देऊन समाज विकास व मानवतेस पेषक अशा गुणांचा समाजसदस्यांमध्ये विकास होतो. सामाजिक नियंत्रण, संस्कृतीचे हस्तांतरण, समाजीकरण असा प्रक्रिया शिक्षणामुळेच अधिक सुदृढ बनतात. त्याचा फायदा पर्यायाने समाजालाच होत असतो.

## फ) क्षेत्रीय कार्य :

(क-१) आपल्या जवळच्या एखाद्या कारखान्याला अथवा कामगार वसतीला भेट देऊन कुशल व अकुशल तसेच शिक्षित व अशिक्षित कामगारांचे निरिक्षण करा. त्यांचे तुलनात्मक अध्ययन करून उत्पन्नातील विषमता आणि शिक्षण यांचा सहसंबंध स्पष्ट करा.

(क-२) आपल्या परिसरातील एखाद्या माध्यमिक शाळेस भेट देऊन शालेय उपक्रमांच्याद्वारे लोकशाही मूल्ये कशी रूजविली जातात याचा आढावा घ्या. विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या अशा शैक्षणिक उपक्रमांची सूची तयार करा.

(क-३) शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे एक सशक्त माध्यम आहे. शिक्षणामुळे भारतीय समाजातील अनिष्ट प्रथा कशा दूर झाल्यात स्त्रियांच्या सामाजिक दर्जात कशी सुधारणा झाली याचा आढावा घ्या.

## ग) पारिभाषिक शब्द/शब्दार्थ :

जागतिकीकरण : व्यापारदृष्ट्या जगभरातील विविध देशांचे एकत्र येणे.

मनुष्यबळ विकास : कार्यासाठी उपलब्ध व्यक्तींच्या क्षमतांचा विकास

लोकशाही : लोकांनी, लोकांचे,लोकांसाठी चालि वल ले राज्य

नागरिक : एखाद्या देशाचा अनेक वर्षापासूनचा रहिवसी

मूल्यशिक्षण : समाजतील आदर्श मूल्यांचे समाजसदस्यांना शिक्षण देणे.

सामाजिक गतिशीलता : एका सामाजिक स्तरातून दुसऱ्या समाजिक स्तरात प्रवेश करण्याची प्रक्रिया

आधुनिकीकरण : कालसुसंगत व प्रागतिक नवीन तत्वांना स्वीकारणे.

## ह) संदर्भ/अधिक वाचनासाठी ग्रंथ :


१ वीरकर प्र. कृ. व प्रतिभा (१९९१), उद्योनमुख भारतीय समाजाचे शिक्षण व शिक्षक, पुणे, द्वारका प्रकाशन

२ वाघमारे जे. एम्. (१९८४), शिक्षण : समाज परिवर्तन आणि राष्ट्रीय विकास, मुंबई, केशव गोरे स्मारक ट्रस्ट प्रकाशन.

३ माळी मा. गो (१९८३), आधुनिक शिक्षणाच्या समस्या : उपाय आणि नियोजन, कोल्हपूर, अजब पुस्तकालय

४ भौमिक अभिजीत (२०१०), शिक्षा समाज और समाजशास्त्र, नई दिल्ली, ओमेगा पब्लिकेशन्स

# घटक - ४

## भारतीय शिक्षणाची परंपरा

**अनुक्रमणिका**


**४.0 उद्दिष्टे**

**४.१ प्रस्तावना**

**४.२ विषय-विवेचन**

**४.२.१ भारतीय समाजातील शिक्षणाचा ऐतिहासिक आढावा.**

**४.२.२ विवेकानंद, म. गांधी, डॉ. राधाकृष्णन व डॉ. आंबेडकर यांचे शैक्षणिक योगदान**

**४.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**४.४ सारांश**

**४.५ पारिभाषिक शब्द**

**४.६ संदर्भसूची**


### ४.0 उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यावर तुम्हाला

१. भारतीय शिक्षणाचा इतिहास समजेल.

२. शिक्षण क्षेत्रात योगदान देणाऱ्या विचारवंतांचा परिचय होईल.

३. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणाचा होत गेलेल विकास स्पष्ट होईल.

### ४.१ प्रस्तावना

शिक्षण स समाज यांचा घनिष्ठ संबंध असतो. समाजात होणाऱ्या परिवर्तनाबरोबरच शिक्षणव्यवस्थेतही परिवर्तन होत असते. शिक्षणाची ध्येये, शिक्षणाचा आशय, पद्धती, तंत्रे, अभ्यासक्रमाचे स्वरूप इत्यादींत बदल होत असतात. भारतातील शिक्षणव्यवस्था ही प्राचीन काळापासून आजपर्यंत बदलत आलेली आहे. विकसित होत आलेली आहे. भारतीय शिक्षणाची परंपरा व शिक्षणाचे बदलते स्वरूप समजून घेण्यासाठी आपण या घटकाद्वारे सविस्तर अभ्यास करणार आहोत.

### ४.२ विषय-विवेचन (Presentation of Subject-matter) :

प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे या घटकात तुम्ही भारतातील शिक्षणाचा विकास समजावून

घेणार आहात. विवेचनाच्या सोयीसाठी य घटकाचे तीन विभाग पाडले आहेत. पहिल्या घटकात प्राचीन काळातील शिक्षणाचे स्वरूप समजावून घेणार आहात. दुसऱ्या विभागात ब्रिटिश कालीन शिक्षणाचे स्वरूप अभ्यासणार आहात. तर तिसऱ्या विभागात स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणाचे स्वरूप जाणून घेणार आहात.

### ४.२.१ अ) प्राचीन काळातील शिक्षण :

साधारणत: आर्यांच्या आगमनापासून हे हर्षवर्धनाच्या राजवटीपर्यंतचा (इ.स.६४७ पर्यंतचा) कालखंड हा प्राचीन कालखंड मानला जातो. एवढ्या प्रदीर्घ कालखंडात भारतीय शिक्षण पद्धतीचे स्वरूप एकसारखे न राहता बदलत आलेले आहे. प्राचीन काळातील शिक्षणाचे बदलते स्वरूप किंवा विकास पुढील तीन उपकालखंड पाडून समजावून घेता येईल.

अ) पूर्व वैदिक काळातील शिक्षण, ब) उत्तर वैदिक काळातील शिक्षण, क) बौद्धकालीन शिक्षण.

अ)पूर्ववैदिक काळातील शिक्षण (Education in Early Vedic Period)

इ.स. पूर्व १२०० पर्यंतचा कालखंड हा पूर्व वैदिक कालखंड मानतात. यालाच ऋग्वेदकाल असेही म्हणतात. वेदग्रंथात विशेषत: ऋग्वेदात तत्कालीन शिक्षणविषयक माहितीचे अप्रत्यक्ष उल्लेख आढळतात. पूर्व वैदिक काळातील शिक्षणाचे स्वरूप पुढील मुद्यांच्या आधारे समजावून घेता येईल.

**१) शिक्षणविषयक मार्गदर्शक तत्त्वे :** पूर्व वैदिककालीन शिक्षणपद्धती ही काही निश्चित अशा मार्गदर्शक तत्त्वांवर आधारलेली आहे. पहिले तत्त्व असे होते की, जन्मत: प्रत्येक व्यक्ती ही देवऋण, पितृऋण व ऋषीऋण अशा तीन ऋणांत असते आणि या ऋणांतून मुक्त होणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे असे मानले होते. यज्ञादी कर्मे करून देवऋणातून, विवाहाद्वारे प्रजोत्पादन करून (वंशसातत्य राखून) पितृऋणातून तर विद्यार्जन करून म्हणजेच ज्ञानसाधना करून ऋषीऋणातून मुक्त होता येते असे मानले होते. म्हणजेच थोर ऋषींनी निर्माण केलेल्या ज्ञानाचे एक पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण करण्याचे तत्त्व शिक्षण प्रक्रियेमागे होते. थोडक्यात ऋषीऋणातून मुक्त हो ासाठी शिक्षण घेण म्हणजेच ज्ञानाचे संक्रमण करणे हे तत्त्व शिक्षणामागे होते. दुसरे तत्त्व म्हणजे विद्यार्जन करणे म्हणजेच शिक्षण घेणे हे व्यक्तीच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा किंवा अवस्था म नली होती. व्यक्तीच्या आयुष्याचे ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम असे चार आश्रम म्हणजेच टप्पे मानले होते आणि व्यक्तीने जीवनाच्या पहिल्या आश्रमात म्हणजेच ब्रह्मचर्याश्रमात धर्म पुरुषाच्या प्राप्तीसाठी गुरुगृही जाऊन भावी जीवनास उपयुक्त पडणारे शिक्षण घ्यावे तसेच शिस्त, संयम, चारित्र्य इत्यादी सद्गुणांचे संवर्धन करावे हे निश्चित केले होते. ऋग्वेदकालीन शिक्षणाचे तिसरे तत्त्व म्हणजे शिक्षण हे सर्वांसाठी मुक्त म्हणजेच खुले होते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा चार वर्गांत म्हणजेच वर्णात तत्कालीन समाज विभागलेला होता आणि ह्या चारी वर्णातील व्यक्तींना शिक्षण घेण्याचा अधिकार होता. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही शिक्षणाचा अधिकार होता. (स्त्रीशिक्षणाचे पुढे अधिक विवेचन केले आहे.)

**२) शिक्षणाची ध्येये :** ऋग्वेदकालीन शिक्षणाची ध्येये अत्यंत व्यापक होती. तत्कालीन शिक्षण केवळ पोटार्थी नव्हते. तसेच ते निव्वळ पुस्तकीही नव्हते. व्यक्तीला ''अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे'' घेऊनहेजेशिक्षणा च ध्येय होते. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे, चारित्र्य निर्मिती करणे, सामाजिक कर्तव्ये पार पाडण्याची क्षमता विकसित करणे, समाजाच्या संस्कृतीचे संरक्षण, संवर्धन व संक्रमण करणे, व्यक्तीचे सुयोग्य समाजीकरण करणे इत्यादी उच्च व उदात्त ध्येये ऋग्वेदकालीन शिक्षणाची होती. विद्या हा तिसरा डोळा मानला जाई. दोन्ही डोळ्यांनी जे दिसू शकत नाही ते ह्या तिसऱ्या डोळ्याने दिसते असे मानले जाई. विद्येमुळेच व्यक्तीची प्रगती होते व अज्ञानी मनुष्याचे जीवन पशुतुल्य मानले जाईल. सत्य, सेवा, नम्रता, शिस्त, संयम, कष्टाची सवय, धर्मपालनवृत्ती, नीतीची चाड, अतिथी सत्कार इत्यादी सद्गुणांचे संवर्धन करून व्यक्तीचा मानसिक व शारीरिक विकास साधणे हे शिक्षणाचे ध्येय मानले जाईल.

**३) गुरुकुल पद्धती :** या काळात गुरुकुल शिक्षण पद्धती होती. नगरापासून दूर नदीकिनारी शांत व रम्य अशा वनात गुरुकुलांची स्थापना केली जाई. गुरुचे गुरुकुलातच वास्तव्य असे. मुलगा आठ-दहा वर्षांचा झाल्यावर त्याच्यावर 'उपनयन' (शिक्षण प्रारंभाचा) नावाचा संस्कार करून त्याला गुरुगृही म्हणजेच गुरुकुलात शिक्षणासाठी पाठविले जाई. गुरुकुलात सुमारे १२ वर्षे राहून विद्यार्थी शिक्षण घेई. त्याला गुरुकुलात अत्यंत संयमी जीवन जगावे लागे. तसेच कष्टाची कामे करावी लागत. गुरुची सेवा करणे, त्याची आज्ञा पाळणे, गुरू निंदा न करणे, यज्ञासाठी समिधा व गाईसाठी चारा गोळा करणे, सात्त्विक आहार घेणे, साधे राहणीमान ठेवणे इत्यादी कर्तव्ये विद्यार्थ्यास पार पाडावी लागत. गुरु हा ज्ञानी, चारित्र्यसंपन्न, नि:पक्षपाती असावा अशी अपेक्षा असे. गुरुने शिष्यावर पुत्रवत प्रेम करावे, आपल्याजवळील सर्व ज्ञान शिष्यास देऊन तो आपल्यापेक्षा श्रे ठ ज्ञानी हा ईल यासाठी झटावे, सर्व शिष्यांना समान लेखावे, त्यांच्यावर उत्तमोत्तम संस्कार करावेत अशी अपेक्षा असे. शिष्याची ओळख गुरुवरून होई. शिष्याच्या चांगल्या वाईट वर्तनाची जबाबदारी गुरुवरच टाकली जाई. त्यामुळे गुरु हे आपल्या शिष्यांवर सुसंस्क र करून त्यांना उत्तम/ आदर्श नागरिक बनविण्यासाठी झटत असत. शिक्षण पूर्ण झाल्यावर शिष्य गुरुदक्षिणा देऊन स्वगृही परतत असे व गृहस्थाश्रम स्वीकारीत असे.

**४) अभ्यासाचे निकष :** गुरु आपल्या शिष्यांना विविध विषयांचे शिक्षण देत असे. चार वेदांचा अभ्यास करणे हा प्रमुख अभ्यास विषय होता. त्याचबरोबर गणित, ज्योतिष, व्याकरण, कल्प, छंदशास्त्र, निरूक्त यांचेही अध्ययन करावे लागे. शिवाय यांपैकी एखाद्या विषयात पारंगत व्हावे लागे. तसेच शारीरिक शिक्षण, विविध कला, शेती, पशुपालन यांचेही शिक्षण दिले जाई. शरीरसंवर्धन व बलोपासनेसाठी गुरुकुलात शिष्यांना विविध प्रकारच्या व्यायामाचे धडे दिले जात.

**५) अभ्यासाच्या पद्धती :** ऋग्वेदकालीन ज्ञान वेदांमध्ये असलेल्या ऋचा व श्लोक यांच्या माध्यमातून दिले जाई. त्यामुळे त्यावेळी वेदाभ्यास ह पठन, मनन व चिंतन या तीन टप्प्यांतून केला जाई. या काळात गुरू मौखिक पद्धतीने शिष्यास सर्व प्रकारचे ज्ञान देत असे. त्यामुळे या पद्धतीत पाठांतरावर भर असे.

**६) स्त्रीशिक्षण :** ऋग्वेदकाळात स्त्री शिक्षणास पूर्ण वाव होता. त्याकाळी 'चरण' नाम वैदिक अध्ययन-अध्यापन संस्था होती व तिच्यात स्त्रियांनाही सहज प्रवेश मिळे. मुलांप्रमाणे मुलीवरही उपनयन संस्कार करून त्यांना गुरूगृही शिक्षणासाठी पाठविले जाईल. विद्यार्थिनींचे ''ब्रह्मवादिनी व सधोवधू'' असे दोन प्रकार होते. पहिल्या प्रकारात स्त्रिया विवाह न करता किंवा विवाहानंतरही दैवीमीमांसा व तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत. वैदिक यज्ञयागाचे ज्ञान मिळवित. विश्वतारा, आपाल, घोषा, निनावरी, लोपामुद्रा यांसारख्या स्त्रियांनी वेदाच्या काही ऋचा लिहिल्या. अपिशाली सारख्या स्त्रिया गुरू म्हणूनही प्रसिद्ध होत्या. मैत्रेयी, गार्गी, प्रतितेत्री, वाचनवी इत्यादी मोठ्या तत्त्ववेत्त्या स्त्रिया होत्या. त्या गहन विषयावर पुरुष विद्वानाबरोबर वादविवाद करीत. कित्येक स्त्रिया ज्ञानदान, मंत्रघोष व वेदपठनाचे कार्य करीत. दुसऱ्या प्रकारच्या स्त्रिया म्हणजे सधोवधू केवळ विवाह होईतोपर्यंत शिक्षण घेत. त्यानंतर विवाहबद्ध होऊन संसार करीत. सात-आठ वर्षांच्या क ळात त्या वेदमंत्र, नित्यधर्मकृत्यासाठी लागणारे मंत्र व प्रार्थना यांचे शिक्षण घेत. विवाहित स्त्रिया नित्यधर्म म्हणून वेदपठण करीत, अर्घ्य देत व मंत्रोच्चारही करीत. अशा प्रकारे पूर्व वैदिक काळात स्त्रियांना पुरुषांप्रमाणे शिक्षणाचा अधिकार होता.

### ब) उत्तरवैदिक काळातील शिक्षण (Education in Post Vedic Period)

सुमारे इ.स. पूर्व १२०० ते इ.स. पूर्व ६०० पर्यंतचा कालखंड हा उत्तर वैदिक कालखंड मानला जातो. याकाळात धार्मिक, राजकीय व सामाजिक जीवनात मोठे बदल घडून आले. या काळात यज्ञादी धार्मिक विधींचे महत्त्व वाढले. त्यामुळे हे विधी पार करणाऱ्या ब्राह्मणांचेही महत्त्व वाढले. आर्यांच्या टोळ्या पूर्वेकडे गंगा-यमुनेच्या खोऱ्यापर्यंत व दक्षिणेकडे विंध्य पर्वतापर्यंत पसरल्या. राजेशाही रूढ होऊन राज्यविस्तारासाठी लढाया सुरू झाल्या. वर्णव्यवस्था ताठर झाली. स्त्रियांचे स्थान व दर्जा घसरला. शिक्षणपद्धतीतही महत्त्वाचे बदल घडून आले.

**१) शिक्षणविषयक मार्गदर्शक तत्त्वे व ध्येये :** पूर्व वैदिक काळातल्या प्रमाणेच उत्तर वैदिक काळातही ऋषी ऋणातून मुक्त होण्यासाठी विद्यार्जन करणे हे शिक्षणामागील एक प्रेरक तत्त्व होते. तसेच या काळात चार आश्रमाची व्यवस्था अधिक स्थिर झाली आणि व्यक्तीने ब्रह्मचर्याश्रमात गुरूगृही जाऊन विद्यार्जन करणे हेदेखील व्यक्तीचे कर्तव्य मानलेले होते. मात्र या काळात एक महत्त्वाचा बदल घडून आला आणि तो म्हणजे पूर्व वैदिक काळात शिक्षण हे चार वर्णांसाठी खुले होते. उत्तर वैदिक काळात मात्र शूद्र वर्णास शिक्षण घेण्यास बंदी घालण्यात आली. वेदग्रंथाचे वाचन, वेदमंत्राचे पठण व श्रवण करण्यास, तसेच संस्कृत भाषा बोलण्यास व शिकण्यास शूद्रांना मनाई केली गेली. तसेच स्त्रियांच्या शिक्षणावरही अनेक निर्बंध घालण्यात आले.

पूर्व वैदिक काळाप्रमाणेच उत्तर वैदिक काळातील शिक्षणाची ध्येये होती. व्यक्तीचा बौद्धिक, मानसिक, शारीरिक विकास करणे, चारित्र्यनिर्मिती व सामाजिक बांधिलकी निर्माण करणे, सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडण्याची क्षमता निर्माण कर े इत्यादी शिक्षणाची ध्येये होती.

**२) आश्रम पद्धती :** पूर्व वैदिक काळात गुरूकुल शिक्षण पद्धती होती. या पद्धतीस कांही मर्यादा होत्या. गुरु ज्या विषयात पारंगत असे त्याच विषयाचे ज्ञान घेऊ इच्छिणारे विद्यार्थी गुरुकुलात जात. विषयांच्या मर्यादेमुळे गुरुकुलात येणाऱ्या विद्यार्थ्यांचीही संख्या कमीच असे. तसेच विद्यार्थ्यांना गुरूच्या घरातच रहावे लागत असल्याने गुरुगृहात थोड्याच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा लागे. ह्या सर्व अडचणींवर मात करण्यास ठी उत्तर वैदिक काळात आश्रमपद्धती उदयास आली. एक प्रमुख आचार्याच्या नेतृत्वाखाली वेगवेगळ्या विषयात तज्ज्ञ असलेले विद्वान ऋषी किंवा आचार्य एकत्र येऊन शिक्षण देण्यासाठी 'आश्रम' ही शैक्षणिक संस्था स्थापन करू लागले. आश्रम पद्धती ही गुरुकुल पद्धतीचा प्रगत टप्पा होता. रामायण-महाभारत ह्या आश्रमांचा उल्लेख आढळतो. उदा. मालिनी नदीकाठावरील कण्व ऋषीचा आश्रम, नैमित्यारण्यातील शौनकांचा आश्रम (यात १० हजार विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचा उल्लेख आढळतो.) प्रयाग येथील भारद्वाज आचार्यांचा अ श्रम इ. विशेष प्रसिद्ध होते. जातककथांमध्येही तक्षशिला व बनारस येथील आश्रमांचा उल्लेख आढळतो. श्रीकृष्ण व सुदामा शिक्षण घेत असलेला सांदिपानी ऋषीचा आश्रमही विशेष प्रसिद्ध होता.

याकाळातही उपनयन संस्कारांनंतर विद्यार्थ्यास आश्रमात प्रवेश दिला जाई. शिक्षणास प्रारंभ करताना 'उषाकर्म' नावाचा विधी केला जाई. विद्य र्थ्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याच्यावर 'समावर्तन' नावाचा संस्कार केला जाई व मग तो स्व ृही परतत असे.

**३) अभ्यासाचे विषय :** आश्रमात वेदांच्या अभ्यासाबरोबरच ब्रह्मविद्या, इतिहास, नीतीशास्त्र, खगोलशास्त्र, गणित, युद्धशास्त्र, गायन-वादन-नर्तन इत्यादी विषयांचे ज्ञान दिले जाई. आश्रमामध्ये वेदविद्या, इतिहास, दंडनीती, वार्ताशास्त्र यांचे शिक्षण मिळे असा उल्लेख मनुस्मृतीत आढळतो. तर आश्रमात वेदविद्या, दंडनीतीशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादींच्या अभ्यासास महत्त्व होते असे कौटिल्याने म्हटले आहे. साधारणपणे आश्रमातील विद्यार्थी वेदाबरोबरच आपापल्या वर्णाच्या व्यवसायाला अनुरूप असे शिक्षण घेत. ब्रह्मण- विद्यार्थी वेदविद्या, इतिहास, छंदशास्त्र, व्याकरण, खगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र या विषयांचा, क्षत्रिय- विद्यार्थी वेदविद्या, युद्धशास्त्र, लष्करी डावपेच, दंडनीतीशास्त्र इत्यादी विषयांचा तर वैश्य विद्यार्थी वेदविद्या, व्यापार, शेती, पशुपालन या विषयांचा अभ्यास करीत. आश्रमात तांत्रिक व वैद्यकीय शिक्षणही दिले जाई. वैद्यकीय शिक्षणात औषधी गुणधर्म, शल्यचिकित्सा, रोगनिदान इत्यादी विषय शिकवित. आश्रमात वेगवेगळ्या विषयांचे वेगवेगळे विभाग होते. उदा. ब्रह्मविद्येचे शिक्षण देणाऱ्या विभागास ब्रह्मस्थान म्हणत. राजनीती, दंडशास्त्र, अर्थशास्त्र, व्यापार यांचे शिक्षण देणाऱ्या विभागास विष्णुस्थान म्हणत. शस्त्रविद्या शिकविणाऱ्या विभागास महेंद्रस्थान, वनस्पतीचे ज्ञान देणाऱ्या विभागास सोमस्थान म्हणत.

**४)अभ्यासपद्धती :** या काळात लेखनकला अवगत असली तरी ज्ञान हे मुख्यत्वेकरून पाठांतर पद्धतीद्वारेच एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सं मित केले जाई. त्यामुळे विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती तल्लख असणे गरजेचे मानले जाई. आश्रमातील अभ्यासपद्धतीत पुढील प्रमुख टप्पे होते.

अ) शुश्रुषा : गुरुमुखातून ज्ञानप्राप्तीची इच्छा होणे हा पहिला टप्पा होय.

ब) श्रवण : गुरुमुखातून संथा घेण्याने विद्येचा प्रारंभ होत असे. त्यास श्रवण म्हणत.

क) ग्रहण : श्रवण केलेले ज्ञान आत्मसात करणे म्हणजे ग्रहण.

ड) धारण : ग्रहण केलेले ज्ञानाचे नीट आकलने म्हणजे धारण हा य.

इ) ऊहापोह : गुरुबरोबर चर्चा करून ज्ञानाची धारणा पक्की करणे म्हणजे ऊहापोह होय.

फ) विज्ञान : गुरुमुखातून ऐकलेल्या विषयाचे पूर्ण ज्ञान प्राप्त करणे म्हणजे विज्ञान होय.

ग) तत्त्वाभिनिवेश : गुरुमुखातून ऐकलेल्या विषयाचे पूर्ण ज्ञान आपल्या अंगी भिनविणे म्हणजे तत्त्वाभिनिवेश होय. या शेवटच्या टप्प्यात विद्यार्थ्यांचे विशिष्ट विषयाचे ज्ञान परिपूर्ण झाले असे मानले जाई.

५) स्त्रीशिक्षण : उत्तरवैदिक काळात स्त्रीशिक्षणाचा उत्तरोत्तर संकोच होत गेलेला दिसतो. महाकाव्यांच्या काळात स्त्रिया मुख्यत: संगीत, नृत्य या कलांचे व घरगुती कामात उपयुक्त ठरेल अशा स्वरूपाचे शिक्षण घेत असाव्यात. याकाळा आध्यात्मिक, तात्त्विक व वैद्यकीय शिक्षण मुख्यत: पुरुषच घेत असल्याचे दिसते. राजघराण्या ील क ही स्त्रियांना लष्करी शिक्षण दिले जात असावे. पुढे मुलींवर उपनयन संस्कार करणे बंद झाले. वेदाभ्यासाचा हक्क स्त्रियांना नाकारला. राजघराण्यातील स्त्रिया शिक्षण घेत. सामान्य स्त्रिया मात्र अडाणीच राहिलेल्या दिसतात. या काळात बालविवाह प्रथा सुरू झाल्याने स्त्रियांना शिक्षणाची संधी दुर्मिळ होत गेली.

## क) बौद्धकालीन शिक्षण (Education in Buddhist Period)

प्राचीन भारतीय शिक्षणपद्धतीच्या विकासातील तिसरा टप्पा म्हणजे बौद्धकालीन शिक्षण पद्धती होय. सर्वसाधारणपणे गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माची स्थापना केल्यापासून ते सम्राट हर्षवर्धनच्या राजवटीपर्यंतचा कालखंड हा बौद्ध धर्माच्या प्रभावाचा कालखंड होता. या कालखंडात भारतीय शिक्षणाच्या विकासाचा तिसरा टप्पा म्हणजे विद्यापीठांची स्थापना अस्तित्वात आलेला दिसतो. बौद्धकालीन शिक्षणाचे स्वरूप पुढील मुद्यांच्या आधारे समजावून घेता येईल.

**१) शिक्षणविषयक तत्त्वे व शिक्षणाची ध्येये :** वैदिक धर्मातील वेदप्रामाण्य, यज्ञात होणारी हिंसा, निरर्थक कर्मकांडाचे स्तोम, वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था इत्यादी गोष्टींना विरोध करून मानवी दु:खाचा विनाश करण्यासाठी व समतेवर आधारलेली समाजव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माची स्थापना केली. 'ि र्वाण' प्राप्ती हे बौद्ध धर्माचे ध्येय होते. आपल्या धर्माचा प्रसार करण्यासाठी बुद्धांनी आपल्या अनुयायांचे 'संघ' (बौद्ध संघ) स्थापन केले. बौद्ध संघात प्रवेश करणाऱ्या व्यक्तींना राहण्यासाठी विहार किंवा मठ (बौद्ध विहार किंवा बौद्ध मठ) बांधण्यात आले. बौद्ध विहारात राहणाऱ्या लोकांना बौद्ध तत्त्वज्ञानाचे शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली. प्रारंभी 'निर्वाण' प्राप्ती हे ह्या शिक्षणाचे ध्येय होते. बौद्ध धर्माची दिक्षा घेतलेले लोक ंसाठी ह शिक्षण मर्यादित होते. संसारी व्यक्तीस हे शिक्षण घेता येत नव्हते. पण पुढे हे धोरण बदलावे लागले. कारण सामान्य जनतेस बौद्धधर्मीय शिक्षण दिल्याशिवाय ह्या धर्माचा प्रसार होणार नाही हे ओळखून बौद्ध

विचारवंतांनी सर्वांना शिक्षण देण्यास सुरूवात केली. उत्तर वैदिक कालखंडात शुद्रांना शिक्षण घेण्यास बंदी होती. बौद्ध विचारवंतांनी शिक्षणाचा अधिकार सर्व वर्णाच्या जातीच्या व धर्माच्या लोकांना बहाल केला. सुरूवातीस धार्मिक शिक्षणावर भर दिला गेला. पुढे मात्र व्यावसायिक, तांत्रिक, औद्योगिक शिक्षण दिले जाऊ लागले. अशा प्रकारे बौद्ध काळात शिक्षणाचे सार्वत्रिकरण व लौकिकीकरण घडून आले. प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीच्या विकासातील हा महत्त्वाचा टप्पा ठरला.

**२)शिक्षणाचे दोन स्तर :** बौद्धकाळातील शिक्षणाचे प्राथमिक शिक्षण व उच्च शिक्षण असे दोन स्तर होते.

**अ)प्राथमिक शिक्षण :** बौद्ध मठात दिले जाई. आठ ते नऊ वर्षांच्या मुलास बौद्धमठात विद्यार्थी म्हणून प्रवेश दिला जाई. 'पब्बजा' नावाचा विधी झालेले मुल प्रवेशास पात्र ठरे. प्रवेश दिल्यावर मुलास 'श्रमण' म्हणत. तेथे मुलास लेखन, वाचन, गणित, बुद्धाचे चरित्र व विचार यांचे शिक्षण 'पाली' भाषेतून दिले जाई. मुलाच्या वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत हे शिक्षण चाले. शिक्षण पूर्ण झाल्यावर 'उपसंपदा' नावाचा समारंभ होई व मुल स्वगृही परते. परंतु ज्याला 'भिक्षू' बनण्याची इच्छा असे तो कायमस्वरूपी बौद्ध संघात राहू शकत असे. त्याला उपज्जाय किंवा आचार्य ही उपाधी दिली जाई. शिक्षण काळात विद्यार्थ्यास खाणेपिणे, स्नान, निद्रा, पोशाख, गुरुसेवा, शिस्त इत्यादीबाबतचे कडक नियम पाळावे लागत. गुरु व शिष्यांचे संबंध 'पितापुत्र' संबंधासारखे असत. गु रु ह विद्वान, चारित्र्य ंपन्न व संयमी असत. आपल्याकडील सर्व ज्ञान ते शिष्यास देत.

**ब)उच्च शिक्षण :** बौद्ध विहारातून व मठातून पुढे तक्षशिला, वल्लभी, नालंदा, विक्रमशीला इ. मोठमोठी विद्यापीठे स्थापन झाली. या विद्यापीठातून उच्च शिक्षण दिले जाई. विद्यापीठांची स्थापना ही प्राचीन भारतीय शिक्षणाच्या विकासातील सर्वात प्रगत टप्पा होती. या विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांस 'द्वारपरीक्षा' नावाची अत्यंत कठीण परीक्षा द्यावी लागे. बौद्धसंघातून सर्वांच्या संमतीने निवडलेल्या विद्वान व चारित्र्यसंपन्न अशा भिक्षूकडे (कुलपतीकडे) विद्यापीठाची प्रशासकीय सूत्रे दिली जात. त्याच्या मदतीला दोन मंडळे असत. एक मंडळ विद्यापीठाचे दैनंदिन कामकाज पाहणे, विद्यापीठ परिसराची व्यवस्था ठेवणे, इमारती बांधणे, विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनाची व्यवस्था करणे अशी प्रशासकीय कामे करीत असे तर दुसरे मंडळ प्रवेश परीक्षा घेणे, अभ्यासक्रम ठरविणे. ग्रंथालयाची व्यवस्था ठेवणे, आचार्यांमध्ये कामाचे वाटप करणे अशी शैक्षणिक कामे करीत असे. ही दोन्ही मंडळे व कुलपती राजे व श्रीमंतांकडून अर्थसहाय्य मिळवित असत. बौद्ध विद्यापीठातून बौद्धधर्म व तत्त्वज्ञान याबरोबरच व्याकरण, भाषाशास्त्र, शिल्पकला, संगीत, खगोलशास्त्र तसेच इतर धर्माची शिकवण व तत्त्वे यांचे शिक्षण दिले जाई. हिंदू विद्यापीठात वेदविद्या, संस्कृत, व्याकरण, धर्मशास्त्र, कला, खगोल यांचे शिक्षण दिले जाई. विद्यापीठातून मौखिक पद्धती (व्याख्यान पद्धती), वादविवाद, चर्चा ह्या अभ्यासपद्धतींचा वापर केला जाई. वरील विषयांशिवाय हस्तकला (सूतकताई, विणकाम, शिवणकाम), वास्तुकला, शिल्पकला, विज्ञान, तंत्रज्ञान, औषधोपचार व शल्यचिकित्सा यांचेही शिक्षण दिले जाई. शारीरिक तंदुरुस्तीसाठी विविध खेळ व व्यायाम प्रकार यांचे ही शिक्षण दिले जाई. या विद्यापीठांतून

देशातील तसेच विदेशातील विद्यार्थी शिक्षणासाठी येत असत.

३) प्रमुख विद्यापीठे : प्राचीन भारतीय विद्यापीठांची कार्यपद्धती स्थूलमानाने वरीलप्रमाणे होती. तथापि प्रत्येक विद्यापीठाचे वेगळे स्वरूप व महत्त्व होते. त्यापैकी कांही प्रमुख विद्यापीठे पुढीलप्रमाणेह्व

अ) तक्षशिला : प्राचीन काळात गांधार देशाची राजधानी असलेले हे शहर इ.स. पूर्व सातव्या शतकापासून विद्येचे केंद्र म्हणून विकसित झाले. राजग्रह, बनारस, मिथिला, पाटलीपुत्र इ. शहरांतील तसेच परदेशातून विद्यार्थी शिक्षणासाठी तक्षशिलेत येत. वैद्यकशास्त्र व धनुर्विद्या यासाठी तक्षशिला प्रसिद्ध होती. ब्राह्मी लिपी, खारोष्ट्री लिपी, ग्रीकांचे स्थापत्यशास्त्र व मानसशास्त्र यांचाही अभ्यास या विद्यापीठात होई. येथील काही आश्रमात सुमारे ५००० इतके विद्यार्थी असत.

ब) काशी : इ.स. पूर्व सातव्या शतकात हिंदूंचे वेदशास्त्र, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, ज्योतिष, खगोलशास्त्र इत्यादी शिक्षण देणारे हे लोकप्रिय विद्यापीठ होते. हिंदुप्रमाणेच बौद्धधर्माचे शिक्षण देणारे आचार्यही या विद्यापीठ त होते.

क) नालंदा : बिहारजवळ पाटण्यापासून ८० कि.मी. वर असलेल्या या विद्यापीठाचा विकास इ.स. ४५० ते ११ वे शतक या कालखंडात घडून आला. सुमारे दीड कि.मी. लांब व ३ ते ४ कि.मी. रुंद अशा विस्तीर्ण जागेत असलेल्या या विद्यापीठात ७ सभागृहे, सुमारे २०० खोल्या, विद्यार्थी व आचार्यांची स्वतंत्र निवासस्थाने व अनेक मूळ ग्रंथ असलेले सुसज्ज ग्रंथालय होते. इत्सिंगनी या प्रवाशाने या विद्यापीठात देशातील व परदेशातील ३००० विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचा उल्लेख केलेला आहे. विविध देशातील विद्वान बौद्ध ग्रंथांचे लिप्यांतर करून घेण्यासाठी या विद्यापीठात ेत. बौद्धधर्म, वैदिक धर्म व व्यवहारोपयोगी कला यांचे ज्ञान येथे मिळत असे.

ड) वल्लभी : हे काठेवाडातील व्यापाराचे व शिक्षणाचे प्रसिद्ध केंद्र होते. इ.स. ६४० च्या सुमारास येथे १०० विहार व ४००० विद्यार्थी होते. बौद्धधर्माबरोबरच अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, गणित यांचे शिक्षण दिले जाई. इत्सिंगच्या मते येथील विद्यार्थ्यांना राजदरबारी अधिकारीपदे मिळत.

इ)विक्रमशीला : पाल घराण्याचा संस्थापक धर्मपाल याने आठव्या शतकात स्थापन केलेल्या या विद्यापीठात विविध इमारती व ग्रंथालये होती. १२ व्या शतकात त्यामध्ये सुमारे ३००० विद्यार्थी शिकत असल्याची नोंद आढळते. या विद्यापीठात अनेक तिबेटी विद्यार्थी असत. येथील विद्वानांनी संस्कृत ग्रंथाचे तिबेटी भाषेत अनुवाद केले. यात व्याकरण, तर्कशास्त्र, अध्यात्म, तंत्रवाद इत्यादींचे शिक्षण चाले. ह्या प्राचीन भारतीय विद्यापीठांनी विविध विषयांतील ज्ञानाचे संरक्षण व संवर्धन करून भारतीय विद्येचा देशोविदेशात प्रसार केला.

**४) स्त्रीशिक्षण :** उत्तर वैदिककाळात स्त्रीशिक्षणावर घातलेली बंदी बौद्धकाळात उठली. प्रारंभी स्त्रियांना बौद्धसंघात प्रवेश देण्यास बुद्ध तयार नव्हते. पुढे त्यांनी नाखुषीने त्यास परवानगी दिली. त्यामुळे बौद्धमठातून स्त्रियांना म्हणजेच भिक्षुणींना शिक्षण मिळू

लागले. मात्र स्त्री मठांची संख्या तशी कमीच होती. कुलीन व व्यापारी वर्गातील स्त्रिया खाजगी शिक्षण घेत असत. शीलभत्तारिका, प्रभुदेवी, व्यंका या प्रसिद्ध कवयित्री व लेखिका होऊन गेल्या. अध्यात्मिक व तात्त्विक ज्ञान मिळविलेली 'सुमका' नामक भिक्षुणी समाजजागृतीसाठी व्याख्याने देत असल्याचा उल्लेख आढळतो. संघमित्रांचे बौद्धधर्मप्रसाराचे कार्य तर सर्वश्रुतच आहे. अर्थात या काळात स्त्रियांवर अनेक अनिष्ट बंधने घालण्यात आल्याने स्त्रीशिक्षणाचा म्हणावा तसा प्रसार होऊ शकला नाही.

**प्राचीन शिक्षणपद्धतीतील दोष :**

ऋग्वेदकाळ ते सुमारे दहाव्या शतकापर्यंत प्राचीन शिक्षणपद्धत क ी बदलत आली हे तुम्ही अभ्यासले आहे. या पद्धतीत पुढील दोष होते.

१) ग्रंथप्रामाण्य : प्राचीन काळात धर्मग्रंथातील विशेषत: वेदग्रंथातील ज्ञान हेच सत्य, सर्वश्रेष्ठ व अंतिम मानल्याचे बुद्धिप्रामाण्यवादाऐवजी ग्रंथप्राम ण्यास महत्त्व आले. वेद, पुराणे व इतर धर्मग्रंथाहून वेगळे ज्ञान मांडण्याचेस कोणी केल नाही. त्यामुळे ज्ञानाच्या क्षेत्रात नवे विचार उदयास आले नाहीत.

२) भौतिक व सामाजिक शास्त्रांकडे दुर्लक्ष : प्राचीन काळात धर्मगुरुंच्या हाती शिक्षणकेंद्रे होती. त्यांनी धार्मिक व अध्यात्मिक शिक्षणावर अतिरिक्त भर दिला व भौतिक व सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासाकडे बरेचसे दुर्लक्ष केले. त्यामुळे प्राचीन शिक्षण बरेचसे एकांगी बनले.

३) परंपराप्रियता : परंपरेने चालत आलेले ज्ञान तेवढेच चांगले असा विचार रूढ होऊन नवीन ज्ञानशाखांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे ज्ञानाचा पुरेसा विस्तार झाला नाही.

४) मक्तेदारी : स्त्रीशूद्रांना शिक्षणाचा अधिकार नाकारल्याने शिक्षण क्षेत्रात उच्चवर्णीय पुरुषांची विशेषत: ब्राह्मणांची मक्तेदारी निर्माण झाली व बहुजन समाज अज्ञानाच्या अंधारात खितपत पडला.

### ४.३.२ ब्रिटिश कालखंडातील शिक्षण (Education in British Period) :

प्राचीन भारतातील विकास अभ्यासल्यानंतर आता तुम्ही ब्रिटिश कालखंडात भारतातील शिक्षण पद्धतीचा विकास कसा झाला हे समजावून घेणार आहात.

तुर्की लोकांनी कॉन्स्टॅन्टिनोपल शहराचा ताबा घेतल्यानंतर युरोपातून पूर्वेकडील देशांकडे जाणारा खुष्कीचा मार्ग बंद केला. त्यामुळे युरोपियन लोकांनी पूर्वेकडील देशांकडे जाणारे जलमार्ग शोधण्यास सुरूवात केली. यातूनच पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा याने २७ मे, १४९८ रोजी भारताकडे जाणारा जलमार्ग शोधून काढला. त्यामुळे व्यापाराच्या निर्मितीने पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज इत्यादींनी कंपन्या स्थापन केल्या व ते भारतात आले. भारतातील व्यापार व प्रदेश यावर वर्चस्व मिळविण्यासाठी त्यांच्यात संघर्ष झाला. या संघर्षात इंग्रज विजयी झाले आणि इंग्रजी ईस्ट इंडिया कंपनीची भारतात राजवट सुरू झाली. पोर्तुगीजांनी गोव्यात तर फ्रेंचांनी पाँडेचेरीत आपापल्या राजवटी स्थ न केल्या. साधारणपणे १७५७ च्या

प्लासीच्या लढाईतील विजयाने भारतात इंग्रजी वा ब्रिटिश सत्तेचा पाया घातला व ही सत्ता १९४७ पर्यंत टिकून राहिली. सुमारे १५० वर्षांपेक्षा अधिक काळ टिकलेल्या ह्या ब्रिटिश राजवटीचा भारतीय समाजावर लक्षणीय प्रभाव पडला आणि भारतीय समाजाच्या विविध क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडून आले. भारतातील शैक्षणिक क्षेत्रही याला अपवाद राहिले नाही. ब्रिटिश राजवटीत भारतात आधुनिक शिक्षण पद्धतीचा पाय घातला गेला. पाश्चात्य देशातील ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान व तंत्रज्ञान यांचे शिक्षण इंग्रजी भाषेच्या माध्यमातून देण्यास सुरूवात झाली. ब्रिटिश राजवटीत शिक्षणपद्धतीचा विकास कसा झाला हे पुढील मुद्यांच्या आधारे समजावून घेता येईल.

**१) ख्रिस्ती धर्मप्रसारकांचे शैक्षणिक कार्य :** पोर्तुगीज, डच, इंग्रज, फ्रेंच इत्यादींनी भारतात आपला जम बसविल्यानंतर त्यांच्या मदतीनेखिप्रो हनान अनेक ख्रिस्ती धर्मप्रसारक भारतात आले व त्यांनी ख्रिस्ती धर्मप्रसाराचे कार्य सुरू केले. आपले धर्मप्रसाराचे कार्य सुलभ व्हावे म्हणून त्यांनी भारतात शिक्षणप्रसाराचे कार्य सुरू केले. त्यामुळ ख्रिस्ती धर्मप्रसारकांना भारतातील आधुनिक शिक्षणाचे प्रवर्तक म्हणता येते. ह्या ख्रिस्ती धर्मप्रसारकांच्या शिक्षण प्रसाराच्या कार्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते.

**२) पोर्तुगीज ख्रिस्ती धर्मप्रसारकांचे कार्य :** पोर्तुगीजांनी भारतात सर्व प्रथम प्राथमिक शिक्षण सुरू केले. त्यांनी गोवा, दीव, दमण, हुबळी, कोचीन, चितगांव इत्यादी ठिकाणी प्राथमिक शाळा सुरू करून त्यामध्ये पोर्तुगीज भाषा, स्थानिक भाषा यांच्याबरोबरच हस्तकला, शेती, गणित व रोमन कॅथालिक पंथाचे शिक्षणसुरु केल . भारतीय मुलांना मोफत शिक्षण दिले. पोर्तुगीज ख्रिस्ती मिशनऱ्यांनी इ.स. १५७५ मध्ये गोवा येथे एक महाविद्यालयही सुरू केले. तसेच बांदरा येथेही एक महाविद्यालय सुरू केले. या महाविद्यालयात लॅटिन व पोर्तुगीज भाषा, व्याकरण, संगीत, धर्मशास्त्र, तर्कशास्त्र यांचे शिक्षण दिले जाई. अशाप्रकारे पोर्तुगीज ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी भारतात प्राथमिक शाळा व महाविद्यालये सुरू करून आधुनिक शिक्षणाचा पाया घातला.

**ब) डचांचे शैक्षणिक कार्य :** १७ व्या शतकात भारतात आलेल्या डचांनी बंगालमधील चीनसुरा व हुगळी येथे व मद्रासच्या (चेन्नईच्या) किनाऱ्यावर नागपट्टम येथे कारखाने उभारले व आपल्या कारखान्यातील परिसरात त्यांनी शाळा सुरू केल्या. महत्त्वाचे म्हणजे या शाळांचा उपयोग डचांनी धर्मप्रसारासाठी केला नाही. डचांनी सिलोनमध्ये (श्रीलंकेत) एक महाविद्यालयही सुरू केले होते.

**क)फ्रेंचांचे शैक्षणिक कार्य :** फ्रेंचांनी पाँडेचरी, माहि, कालिकत, ठाणा, चंद्रनगर याठिकाणी प्राथमिक शाळा सुरू करून त्यांमध्ये सर्व धर्माच्या मुलांना प्रवेश दिला. या शाळांत भारतीय शिक्षकांकडून स्थानिक भाषेत शिक्षण दिले जाई. गरीब विद्यार्थ्यांना भोजन, पोशाख, पुस्तके इ. मोफत पुरविली जात. फ्रेंचांनी पाँडेचेरीत एक माध्यमिक शाळाही सुरू केली व तिच्यात फ्रेंचांची मुले व भारतीय अधिकाऱ्यांची मुले शिक्षण घेत असत.

**ड)डेन लोकांचे शैक्षणिक कार्य :** डेन्मार्कमधून आलेल्या लोकांनी श्रीरामपूर, त्रिचनापल्ली,

फोर्ट सेंट, मद्रास इत्यादी ठिकाणी प्राथमिक शाळा काढल्या. त्यांनी 'ट्रानक्यूबार' येथे १७१६ मध्ये प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देणारी संस्था काढली. तसेच मद्रासमध्ये एक 'धर्मदाय शाळा' ही काढली. तसेच मद्रासमध्ये एक 'धर्मदाय शाळा' ही काढली. डेन ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी मुस्लिम लोकांच्या प्राथमिक शिक्षणाकडेही विशेष लक्ष दिले. तसेच त्यांनी भारतीयांना इंग्रजी भाषा शिकविण्याचीही सो केली. त्यांनी तमिळ भाषेच्या अभ्यासासही प्रोत्साहन दिले. तमिळ शब्दकोशही प्रकाशित केला. त्यांनी बायबलचे तमिळ व तेलगु भाषांत अनुवाद केले.

**इ)इंग्रज ख्रिस्ती धर्मप्रसारकांचे शैक्षणिक कार्य :** इतर ख्रिस्ती धर्मप्रसारकांप्रमाणेच इंग्रज ख्रिस्ती धर्मप्रसारकांनीही १८१३ ते १८३३ या काळात भारतात अनेक ठिकाणी प्राथमिक शाळा सुरू केल्या. धर्मप्रसार हा मुख्य उद्देश असल्य ान या शाळांतून बायबलच्या अभ्यासावर भर असे. त्याशिवाय गणित, व्याकरण, इतिहास, भूगोल इत्यादींचे स्थानिक भाषांतून शिक्षण दिले जाई. या शाळात एकशिक्षक पद्धती बाजूला ठेवून प्रत्येक विषयासाठी वेगळे शिक्षक असत. शिक्षण मोफत असे. युरोपियन मुले, धर्मांतरीत भारतीय मुले, अॅग्लोइंडियन मुले यांना या शाळेत प्राधान्य असे. इंग्रज धर्मप्रसारकांनी आपल्या शाळांसाठी नवीन पाठ्यपुस्तकेच प्रकाशित केली. ह्या धर्मप्रसारकांनी पुढे मद्रास, मुंबई, बंगाल ह्या प्रांतात धर्मार्थ विद्यालये स्थापन करून त्यांमध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षणाची व्यवस्था क ली.

## २) ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीतील शैक्षणिक विकास :

अ) चार्टर अॅक्ट : ख्रिस्ती धर्मप्रसारक डॉ. कैरे, वार्ड व मार्शमन यांनी हिंदु व मुस्लिम यांच्या विरोधात मतप्रदर्शन करणारे एक पुस्तक प्रकाशित केल्याने हिंदु-मुस्लिमांनी बंगालमध्ये दंगली सुरू केल्या. त्यामुळे गव्हर्नर जनरल लॉर्ड मिंटो याने ह्या धर्मप्रसारकांना तुरुंगात टाकून धर्मप्रसाराच्या कार्यास बंदी घातली. या विरोधात ईस्ट इंडिया कंपनीचा भारतातील एक सेवानिवृत्त अधिकारी चार्ल्स ग्रँट यांच्या नेतृत्वाखाली इंग्लंडमध्ये धर्मप्रसारकांनी आंदोलन केले. ग्रँटने पाश्चिमात्य ज्ञान-विज्ञा भारतीयांना इंग्रजी माध्यमातून द्यावे व ख्रिस्ती धर्माचा भारतात प्रसार करावा असे सुचविले. परिणामी १८१३ मध्ये कंपनीने १८१३ मध्ये चार्टर अॅक्ट (सनदी कायदा) संमत केला. या अॅक्टनुसार भारतीयांना शिक्षण देण्याची जबाबदारी कंपनी सरकारवर टाकली व कंपनीने दरवर्षी एक लाख रुपये भारतीयांच्या शिक्षणावर खर्च करावेत, तसेच ख्रिस्ती धर्मप्रसारकांना भारतात धर्मप्रसारासाठी परवानगी द्यावी असे ठरविले.

**ब) शिक्षणाच्या माध्यमाविषयी वाद :** शिक्षणप्रसारास मदत करण्यासाठी १८२३ मध्ये ''जनरल कौन्सिल ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन'' या नावाची समिती नेमली व तिच्याकडे एक लाख रुपयांचा फंड सोपविला. ह्या फं भ रतीया ना पाश्चिमात्य पद्धतीचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून देण्यासाठी खर्च करावा असे मानण रा एक गट (अँग्लीसिस्ट पार्टी) निर्माण झाला. या गटात राजा राममोहन रॉय व काही इंग्रज गृहस्थ होते. याउलट हा फंड परंपरागत पद्धतीचे भारतीय शिक्षण संस्कृत, फारसी, अरबी या भाषांतून देण्यासाठी वापरावा असे मानणारा दुसरा एक गट (ओरिएंटॅलिस्ट पार्टी) निर्माण झाला.

या वादातून तोडगा म्हणून कंपनी सरकारने इंग्रजीच्या अभ्यासाबरोबरच पौर्वात्य भाषेत भाषांतरीत करणे यासाठी हा फंड खर्च करण्याचे ठरविले. त्यानुसार भारतीयांना पाश्चिमात्य साहित्य व विज्ञान यांचे ज्ञान देण्यासाठी १८१७ मध्ये स्थापन केलेल्या हिंदू कॉलेजला (प्रेसिडेन्सी कॉलेज) अनुदान देण्यात आले. तसेच सरकारने कलकत्ता, आग्रा व दिल्ली येथे संस्कृत महाविद्यालये सुरू केली.

**क) मेकॉलेचा प्रस्ताव :** १८२८ मध्ये लॉर्ड विल्यम कॅव्हेंडिश बेटिंग गव्हर्नर जनरल म्हणून भारतात आला. गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळात पहिला कायदा सदस्य म्हणून थॉमस वाबिंग्टन मेकॉले याची नियुक्ती झाली. बेटिंगने मेकॉलेस शिक्षण समितीचा अध्यक्ष म्हणून नेमले. चार्टर ॲक्टनुसार एक लाख रुपये शिक्षणावर कसे खर्च करावेत यावर तसेच इतरही वादग्रस्त विषयांवर बेटिंगने मेकॉलेस सल्ला देण्याचे सुचविले. त्यानुसार मेकॉलेने एक प्रस्ताव तयार केला. या प्रस्तावात त्याने ‘‘भारतीयांना पाश्चिमात्य पद्धतीचे शिक्षण इंग्रज माध्यमातून द्यावे. तसेच भारतातील पारंपारिक शिक्षण हे पाश्चिमात्य शिक्षणापेक्षा दुय्यम प्रतीचे असल्याने ते देऊ नये. पाश्चिमात्य शिक्षणाचा उद्देश सफल करण्याइतपत भारतीय भाषा विकसित झालेल्या नसल्याने संस्कृत व अरबी भाषेतील पुस्तक छपाई बंद करावी. मुस्लिम व संस्कृत कॉलेजेस बंद करावीत, हिंदु-मुस्लिम विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्त्या बंद कराव्यात. सरकारी फंड फक्त इंग्रजी शिक्षणासाठी खर्च करावा.’’ इत्यादी उपाययोजना सुचविल्या. राजा राममोहन रॉय व अन्य पुरोगामी सुधारकांनी भारतीय समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, परंपरा इत्यादींचे उच्चाटन करून सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी मेकॉलेच्या प्रस्तावाची अंमलबजावणी करावी म्हणून सरकारवर दडपण आणले. परिणामी सरकारने पाश्चिमात्य पद्धतीचे शिक्षण देण्याचे उपक्रम सुरू केले. तथापि, काही इंग्रज, मुस्लिम व हिंदू लोकांनी मेकॉलेच्या प्रस्तावास विरोध केला. त्यामुळे सरकारने १८३९ मध्ये मेकॉलेच्या प्रस्तावात थोडासा बदल केला आणि संस्कृत व अरबी भाषेतील पौर्वात्य शिक्षणावर काही रक्कम खर्च करण्याचे ठरविले. मात्र शाळा-कॉलेजमधील शिक्षणाचे माध्यम इंग्रजीच राहिले असे ठरविले. प्रशासनात खालच्या स्तरावर ‘कारकूनी’ करण्यासाठी इंग्रज भाषा जाणणारे भारतीय उपलब्ध व्हावेत यासाठी इंग्रजी माध्यमाचे धोरण सरकारला उपयुक्त ठरले. परिणामी इंग्रजी शिक्षण घेणाऱ्या भारतीयांची संख्या वाढू लागली.

**ड) शिक्षणविषयक झिरपण्याचा सिद्धांत** (Filteration Theory of Education) : या काळात शिक्षणावर कमीतकमी खर्च करणे हे कंपनी सरकारचे धोरण होते. त्यानुसार सर्व भारतीयांना शिक्षण न देता केवळ थोड्याच भारतीयांना म्हणजेच उच्चवर्गास शिक्षण द्यावे. त्यामुळे त्यांच्या मार्फत आपोआपच शिक्षण खालच्या वर्गापर्यंत पोहोचेल असा सिद्धांत मांडण्यात आला. यालाच शिक्षणाचा झिरपण्याचा सिद्धांत असे म्हणतात. उच्च वर्गातून शिक्षण पाझरत (झिरपत) खालच्या वर्गापर्यंत पोहोचेल या सिद्धांतास अनेक ख्रिस्ती मिशनरी, ईस्ट इंडिया कंपनीचे काही संचालक, मेकॉले इत्यादींनी पाठिंबा दिला. तथापि प्रत्यक्षात हा सिद्धांत खोटा ठरला. कारण शिक्षण घेतलेल्या वर्गाने शिक्षणाचा उपयोग फक्त स्वत:च्या स्वार्थासाठी म्हणजे नोकऱ्या मिळविण्यासाठी केला. खालच्या वर्गास शिक्षण देण्याचे कार्य त्याने केले नाही. म्हणून सरकारने १८५४ मध्ये या सिद्धांताचा अधिकृतपणे त्याग केला.

तथापि, व्यवहार  मात्र हा सिद्धांत ब्रिटिश सत्तेचा शेवट होईतोपर्यंत टिकून राहिला. मात्र आग्राचा लेफ्टनंट गव्हर्नर जेम्स थॉमस व मुंबईचा गव्हर्नर एल्फिन्स्टन यांनी ग्रामीण भागात शिक्षण प्रसार होण्यासाठी प्राथमिक शाळा सुरू केल्या. एल्फिन्स्टनने पुण्यात संस्कृत कॉलेज तर मुंबईत इंजिनिअरिंग व मेडिकल स्कूल सुरू केले.

**ई) चार्लस वूडचा खलिता :** १८५३ मध्ये चार्टर ॲक्टच्या नूतनीकरणाची वेळ आली तेव्हा भारतातील शिक्षणविषयक समस्यांचा अभ्यास करून त्या समस्यांवर उपाययोजना सुचविण्यासाठी कंपनी सरकारने नियामक मंडळाचा अध्यक्ष चार्लस वूड याच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने भारतातील शिक्षणाचा सविस्तर अभ्यास केला. भारतीय विद्वानांशी चर्चा करून त्यांची शिक्षणविषयक मते जाणून घेतली. आणि त्याआधारे एक अहवाल तयार केला. या अहवालातील शिफारशीवर आधारित असे शैक्षणिक धोरण १८ जुलै १८५४ रोजी कंपनीच्या संचालकांनी जाहीर केले. यालाच वूडचा खलिता (थेवॅी ऊशीींिलह) असे म्हणतात. या खलित्यातील प्रमुख शिफारसी पुढीलप्रमाणे होत्या.

१) भारतीयांना शिक्षण देणे ही कंपनी सरकारची जबाबदारी आहे.

२) भारतीयांना पाश्चिमात्य शिक्षण देणे व त्याद्वारे कंपनी सरकारला विश्वसनीय व सक्षम मनुष्यबळ पुरविणे हे शिक्षणाचे ध्येय असावे.

३) भारतीयांना पाश्चिमात्य ज्ञान, विज्ञान, साहित्य, कला, तत्त्वज्ञान यांचे ज्ञान दिले जावे.

४) प्राथमिक शिक्षण देशी भाषांमधून तर उच्च शिक्षण इंग्रजीमधून दिले जावे.

५) पंजाब, बंगाल, मुंबई, मद्रास व उत्तर-पश्चिम प्रदेश या पाच  ांतात लोकशिक्षण विभाग स्थापन करून त्यांची जबाबदारी लोकशिक्षण संचालकावर सोपवावी. ह्या संचालकांच्या मदतीस उपशिक्षण संचालक, शाळा निरीक्षक, सहाय्यक शाळा निरीक्षक ही पदे निर्माण करावीत.

६) लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर कलकत्ता, मद्रास व मुंबई येथे विद्यापीठे स्थापन करावीत. या विद्यापीठात  एक सिनेट स्थापन करावे. कुलगुरु व उपकुलगुरु ही पदे सरकारने भरावीत.

७) भारतात शिक्षणसंस्थांची क्रमबद्ध मांडणी णपळींशीीळींळशी – उेश्रश्रशसशी – क्ळसह ीलहेश्री – चळववश्रश ीलहेश्री – खपवळसशपेीी झीळारीू ीलहेश्री या क्रमाने करावी.

८) सर्वसामान्य लोकांना कृतीयुक्त व व्यवहारोपयोगी शिक्षण उपलब्ध करून द्यावे. त्यासाठी सरकारने शैक्षणिक सोयीसुविधा, अनुदान, शिष्यवृत्त ी, वेतन अनुदान, ग्रंथालये, प्रयोगशाळा इ. उपलब्ध करून द्याव्यात.

९) शिक्षकांसाठी प्रशिक्षण संस्था काढाव्यात.

१०) स्त्रीशिक्षणास चालना देण्यासाठी सरकारने अनुदान द्यावे.

११) शैक्षणिकदृष्ट्या मुसलमान मागासलेले असल्याने त्यांना शिक्षण द्यावे.

१२) पौर्वात्य साहित्य व भाषांच्या विकासास प्रोत्साहन द्यावे.

१३) सुशिक्षित लोकांना प्राधान्याने सरकारी नोकरी द्यावी.

१४) शिक्षणसंस्था धर्मनिरपेक्ष असाव्यात. सरकारी नोकरी देत ना धर्माचा विचार करू नये. इत्यादी.

वूडच्या खलित्यातील वरील शिफारशींची गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसीने अंमलबजावणी केली. या खलित्याने भारतात आधुनिक शिक्षण पद्धतीचा पाया घातला म्हणून काहीजण वूडच्या खलित्यास ''भारतीय शिक्षणाची मॅग्नाचार्टा'' असे म्हणतात.

## ३) राणीच्या राजवटीतील शैक्षणिक विकास :

१८५७ चा उठाव शमल्यानंतर भारतातील ईस्ट इंडिया कंपनीची राजवट बरखास्त झाली. भारतावर इंग्लंडच्या राणीची राजवट सुरू झाली. या राजवटीत भारतातील शिक्षणाचा झालेला विकास पुढील मुद्यांच्या आधारे समजावून घेता येईल.

**अ) वूडच्या खलित्याची अंमलबजावणी :** वूडच्या खलित्यातील शिफारशीप्रमाणे पुढे १८५७ मध्ये कलकत्ता, मुंबई, मद्रास येथे विद्यापीठे स्थापन केली. तसेच प्रत्येक प्रांतात शिक्षण खाते सुरू करून शिक्षण संचालक, उपसंचालक, शाळा तपासणीस इत्यादींची नेमणूक केली. मुंबई, मद्रास,रत्नेह्मो१ ८५७ मध्य च वैद्यकीय महाविद्यालये सुरू केली. सरकारचा पाठिंबा व अनुदान मिळू लागल्याने सम जसुधारकांनी मुलींसाठी शाळा सुरू केल्या. काही मुस्लिम नेत्यांनी मुस्लिमांसाठी शाळा काढल्या. त्यामुळे स्त्रीशिक्षण व मुस्लिमांचे शिक्षण सुरू झाले व शिक्षण सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली.

**ब) हंटर आयोग :** वूडच्या खलित्याच्या अंमलबजावणीमुळे माध्यमिक व उच्च शिक्षणाची प्रगती झाली होती. मात्र प्राथमिक शिक्षणाकडे सरकारचे दुर्लक्ष झाले होते. कारण वूडच्या खलित्यातील प्राथमिक शिक्षणाबद्दलच्या शिफारशी पार्लमेंटने अमान्य केल्या होत्या. म्हणून प्राथमिक तसेच माध्यमिक शिक्षणाची सद्य:स्थित काय आहे ? या शिक्षणाच्या प्रसारासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात ? शिक्षणक्षेत्रात खाजगी संस्थांना उत्तेजन द्यावे काय ? शिक्षण प्रसाराच्या कार्यात ख्रिस्ती धर्मप्रसारकांच्या शाळांचे स्थान काय असावे ? इत्यादी प्रश्नांचा अभ्यास करून त्यासंबंधी शिफारसी करण्यासाठी गव्हर्नर जनरल लॉर्ड रिपन याने विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली २० सदस्य (यामध्ये १५ इंग्रज व ५ भारतीय) असलेला एक आयोग नेमला. (३ फेब्रुवारी, १८८२) या आयोगाने विविध प्रांतातील शैक्षणिक स्थितीची पाहणी करून, शिक्षणतज्ज्ञांच्या भेटी घेऊन, दोनशे जणांच्या साक्षी घेऊन आपला अहवाल सादर केला. या अहवालातील प्रमुख शिफारशी पुढीलप्रमाणे होत्या.

**१) प्राथमिक शिक्षण :** प्राथमिक शिक्षण जीवनोपयोगी व्हावे व त्याचा प्रसार व्हावा, गरीब व मागासलेल्या जातीजमातीपर्यंत ते पोहचवावे, विद्यार्थी स्वावलंबी होण्यासाठी

प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात कृषी, विज्ञान, आरोग्य, गणित, उद्योग, कला यांचा समावेश व्हावा, प्राथमिक शिक्षणास सरकारने पैसा व साधने पुरवून उत्तेजन द्यावे. प्राथमिक शिक्षकांसाठी प्रशिक्षण देणारी महाविद्यालये काढावीत.

**२) माध्यमिक शिक्षण :** माध्यमिक शिक्षणाच्या कार्यातून सरकारने मुक्त होऊन ते काम खाजगी संस्था व व्यक्तीकडे सोपवावे. सरकारी माध्यमिक श ळा स्थानिक स्वराज्यसंस्थांकडे हस्तांतरीत कराव्यात. माध्यमिक शिक्षण प्रसारासाठी सरकारने 'सहाय्यता अनुदान' द्यावे. माध्यमिक शाळांना खर्चासाठी शुल्क आकारता यावे. माध्यमिक शाळांतील अभ्यासक्रम 'अ' आणि 'ब' अशा दोन प्रकारचा असावा. 'अ' अभ्यासक्रमात साहित्याचा समावेश असावा व पुढे विद्यापीठीय शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांनाच त्यामध्ये प्रवेश द्यावा. 'ब' अभ्यासक्रमात व्यावसायिक शिक्षणाचा समावेश असावा. व्यवसाय करू इच्छिणाऱ्यांनाच त्यामध्ये प्रवेश द्यावा. ज्यामुळे ते स्वावलंबी होतील. माध्यमिक शिक्षकांसाठी मद्रास व लाहोर प्रमाणे इतरत्रही प्रशिक्षण महाविद्यालये सुरू करावीत. मातृभाषा व इंग्रजी भाषा या दोन्हीचेही ज्ञान माध्यमिक स्तरावर द्यावे.

**३) उच्च शिक्षण :** महाविद्यालयांना दिले जाणारे अनुदान हे शिक्षक संख्या, महाविद्यालयांचा खर्च, स्थानिक गरजा इत्यादींचा विचार करून द्यावे. अभ्यासक्रमात विविधता असावी. युरोपियन विद्यापीठात शिकलेल्यांना प्राध न्या` शिक्षक म्हणून महाविद्यालयात नेमावे. हुशार विद्यार्थ्यांना परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती द्यावी. महाविद्यालयात व्याख्यानमाला आयोजित कराव्यात. उच्चशिक्षण मोफत नसावे. उच्च शिक्षणापासून सरकारने अलिप्त रहावे. इत्यादी.

**४) विशेष शिक्षण :** स्त्रीशिक्षणासाठी अनुदान द्यावे. मुलींच्या शाळेत स्त्रियांनाच शिक्षक म्हणून नेमावे. गरीब मुलींना शिष्यवृत्ती द्यावी. मुलींसाठी वेगवेगळ्या माध्यमिक शाळा असाव्यात. मुस्लिम शाळांना प्रोत्साहन व अनुदान द्यावे. मुस्लिम संख्या जास्त असेल तेथे मिडल स्कूल व हायस्कूल काढावीत मुस्लिम शाळांत मुस्लिम शाळा तपासणीस नेमावेत. मुस्लिम विद्यार्थ्यांना प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत शिष्यवृत्ती द्यावी. मुस्लिमांच्या इंग्रजी शिक्षणावर भर द्यावा इ. मागासलेल्या ज तीजमातीच्या मुलांना सरकारी शाळेत भरती करावे. आदिवासी मुलांना मोफत शिक्षण द्यावे. आदिवासींची भाषा ही शिक्षणाचे माध्यम असावे. आदिवासींचे शिक्षण सरकारची जब बदारी असावी.

**५) धार्मिक शिक्षण :** सरकारी शाळांमधून धार्मिक शिक्षण देऊ नये. खाजगी शिक्षणसंस्था धार्मिक शिक्षण देऊ शकतील. पण त्यांनी सरकारी मदतीची अपेक्षा ठेऊ नये. धार्मिक शिक्षण देणाऱ्या संस्थांना मदत करताना सरकारने केवळ त्यांचे शैक्षणिक कार्यच विचारात घ्यावे.

हंटर आयोगाच्या शिफारशी सरकारने स्वीकारल्या. ऑक्टोबर १८८४ मध्ये केंद्र शासनाच्या शैक्षणिक धोरणाची ढोबळ मार्गदर्शक रूपरेषा म्हणून ह्या शिफ रशी प्रांतिक सरकारना स्पष्ट करण्यात आल्या. दरवर्षी शैक्षणिक प्रगतीचा अहवाल तयार होऊ लागला.

**क) १९०४ चा विद्यापीठ कायदा :** लॉर्ड कर्झन (१८९९ ते १९०४) याने भारतातील

विद्यापीठांची पुनर्रचना करण्यासाठी व त्यांच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासाठी थॉमस रॅले यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला. या आयोगाच्या अहवालाच्या आधारे कर्झनने २१ मार्च १९०४ रोजी ''भारतीय विद्यापीठ कायदा'' संमत केला. या कायद्याने १) सिनेट सदस्यांची संख्या कमी करून सिनेटमध्ये विद्यापीठातील शिक्षकांना प्राधान्य दिले. २) महाविद्यालय स्थापनेसाठी असणारे विद्यापीठ मान्यतेचे नियम कडक केले. ३) विद्यापीठांना संशोधन करण्याचा अधिकार दिला. ४) प्राध्यापक व प्रवक्ते यांच्या नेमणुका करण्याचा अधिकार विद्यापीठास दिला. ५) विद्यापीठाच्या प्रादेशिक सीमा ठरविण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला दिला. या कायद्याने विद्यापीठावर सरकारचे कडक नियंत्रण घातले. म्हणून भारतीयांनी या कायद्यास विरोध केला.

लॉर्ड कर्झनने प्राथमिक व माध्यमिक शिक्षणात देखील सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्याने देशी भाषांना महत्त्व देणे, ग्रंथालये वाचनालयां चा विकास करण , स्त्रीशिक्षणासाठी अनुदान देणे, पात्रताधारक शिक्षक नेमणे, व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण देणे, हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देणे इत्यादी उपाय योजले होते. कर्झन हा कट्टर साम्राज्यवादी असल्याने त्याच्या शैक्षणिक सुधारणा ही एक राजकीय खे आह असे मानून भारतीयांनी त्याच्या सुधारणांना विरोधच केला.

ड) सॅडलर आयोग : गव्हर्नर जनरल लॉर्ड चेम्सफर्ड याने कलकत्ता विद्यापीठाच्या समस्या समजावून घेण्यासाठी नेमलेल्या (१९१७) सॅडलर आयोगाने कलकत्ता विद्यापीठाबरोबरच इतरही विद्यापीठांच्या समस्यांचा तसेच म ध्यमिक शिक्षणाचा अभ्यास करून पुढील शिफारशी केल्या. १) इंटरमिजिएटचे वर्ग स्वतंत्र असावेत व त्यामध्ये मातृभाषेतून शिक्षण द्यावे. २) माध्यमिक व इंटरमिजिएट शिक्षणावर ''दुय्यम शिक्षण मंडळाचे'' नियंत्रण असावे. ३) पदवी अभ्यासक्रम तीन वर्षाचा असावा. ४) स्त्रीशिक्षणासाठी स्वतंत्र मंडळ असावे. ५) व्यावसायिक शिक्षणावर भर द्यावा. ६) हायस्कूलपर्यंत शिक्षणाचे माध्यम देशी भाषा व त्यापुढील शिक्षणाचे माध्यम इंग्रजी भाषा असावे. ७) शिक्षकांना प्रशिक्षण देणारी महाविद्यालये वाढवावीत. इ. सरकारने ह्या शिफारशी स्वीकारल्या. पण आर्थिक अडचणीमुळे त्या दिशेने फारशी वाटचाल झाली नाही. १९१९ च्या माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा कायद्याने शिक्षण खाते सोपीव करून त्याचा कारभार भारतीय मंत्र्यांच्या हाती सोपविला.

इ)सार्जंट योजना : भारत सरकारचा शिक्षणविषयक एक योजना तयार केली. या योजनेत पुढील तरतुदी होत्या. १) ६ ते १४ वयोगटातील मुलांना म फत व सक्तीचे शिक्षण द्यावे. २) सर्वच विद्यार्थ्यांना हायस्कूलमध्ये प्रवेश न देता ११ ते १७ वयाच्या दरम्यान ज्यांनी विशेष चमक दाखविली आहे अशांनाच हायस्कूलमध्ये प्रवेश द्यावा. ३) हायस्कूलमधील विद्यार्थ्यांपैकी सुमारे १० टक्के मुलांनाच महाविद्यालयात प्रवेश द्यावा. ४) इंटरमिजिएटचा वर्ग माध्यमिक शाळांना जोडावा. ५) महाविद्यालयातील शिक्षण तीन वर्षांचे असावे. ६) तरुणांना शारीरिक शिक्षण देण्यासाठी 'नॅशनल यूथ मूव्हमेंट' सुरू करावी. ७) अध्यापन पद्धती व परीक्षांचा दर्जा सुधारण्या ाठी विद्यापीठ अनुदान आयोग स्थापन करावे. ८) बुद्धिमान व्यक्ती शिक्षकी पेशाकडे वळाव्यात म्हणून शिक्षकांचे वेतन वाढवावे. इत्यादी.

फ) भारतीयांचे शैक्षणिक कार्य : ब्रिटिश राजवटीत अनेक भारतीय समाजसुधारकांनी व राष्ट्रीय चळवळीतील नेत्यांनी शिक्षणप्रसाराचे कार्ये. केले महात्मा फुल यांनी पुणे शहरात मुलींसाठी (१८४८) अस्पृश्यांसाठी शाळा काढल्या. (१९५१) सर सय्यद अहमद खान यांनी मुरादाबाद येथे पर्शियन शाळा (१८५७) क ढली. अलिगढ येथे (१८७०) हायस्कूल व पुढे एक कॉलेज (१८७५) काढले. पुण्यात चिपळूणकर, टिळक व आगरकरांनी राष्ट्रीय शिक्षण देणारी 'न्यू इंग्लिश स्कूल' ही शाळा (१८८०) काढली. पुढे ह्या नेत्यांनीच डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन करून फर्ग्युसन व इतर कॉलेजेस काढली. स्वामी दयानंद सरस्वतींनी अँग्लो वैदिक कॉलेजची स्थापना (१८८४) केली. स्वामी श्रद्धानंदाने गुरूकुल पद्धतीच्या शाळा काढल्या. ॲनी बेझंट यांनी बनारस येथे सेंट्रल हिंदू कॉलेज (१८९८) काढले. रविंद्रनाथ टागोरांनी शांतिनिकेतनची स्थापना (१९०१) केली. तसेच त्यांनी विश्वभारती विद्यापीठ (१९२१), श्रीनिकेतन (१९२२), ग्रामीण शाळा (१९२४), ह्या शिक्षण संस्था स्थापन केल्या. महर्षि धोंडो केशव कर्वेनी अनाथ बालिकाश्रम (१८९६), हिंगणे मुलींची शाळा (१९०७) व पुढे स्वतंत्र महिला विद्यापीठ (१९१६) स्थापन केले. पंडित मदनमोहन मालवीय यांनी बनारस हिंदू विद्यापीठ (१९१६) काढले. १९२० मध्ये पुण्यात टिळक महाविद्यालय स्थापन झाले व १९२१ मध्ये त्याचे रूपांतर टिळक महाराष्ट्र विद्यापीठात झाले. म. गांधींनी १९३७ मध्ये आपली शिक्षण विषयक वर्धा योजना मांडून मुलांना नैतिक व स्वावलंबी बनविणारे शिक्षण दिले जावे असे सुचविले.

ब्रिटिश राजवटीत बहुसंख्य भारतीय नेत्यांनी राष्ट्रप्रेम निर्माण करणारे शिक्षण भारतीयांना देशी भाषांतून दिले जावे यावर भर दिलेला दिसतो.

ब्रिटिश राजवटीतील शिक्षणाची वैशिष्ट्ये :

१) ब्रिटिश राजवटीत भारतात पाश्चिमात्य धर्तीचे शिक्षण तंत्रज्ञानाचे इंग्रजी माध्यमातील शिक्षण भारतात सुरू झाले.

२) ब्रिटिश राजवटीत स्त्रीशुद्रांनाही शिक्षणाचा अधिकार मिळाला व शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले.

३) ब्रिटिश राजवटीत धार्मिक शिक्षण मागे पडले व धर्मनिरपेक्ष शिक्षण पद्धती सुरू झाली.

४) इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीयांना स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, मानवता या पाश्चात्य मूल्यांची ओळख झाली व त्यांनी आपल्या समाजातील अनिष्ट प्रथा नष्ट करून समाजसुधारणा घडवून आणण्यासाठी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्याचे कार्य सुरू केले.

५) ब्रिटिश राजवटीत स्वातंत्र्यप्राप्तीसाठी चळवळ करणाऱ्या नेत्यांनी भारतीयांच्यात राष्ट्रप्रेम निर्माण करण्यासाठी 'राष्ट्रीय शिक्षण' ही संकल्पना मांडून त्यासाठी शिक्षण संस्था स्थापन केल्या.

६) ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आपल्या सत्तेशी एकनिष्ठ राहील अशा मनोवृत्तीचा भारतीयांचा वर्ग तयार करण्यासाठी तसेच राज्यकारभारात कारकूनी करण्यासाठी उपयुक्त ठरेल असा पांढरपेशीय वर्ग तयार करण्यासाठी इंग्रजी शिक्षणप्रसारावर भर दिला.

ब) स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शिक्षण (एर्वीलरींळेप ळप झीीं-ळपवशशिपवशपलश झशीळेव) : स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाला दारिद्र्य, बेकारी, विषमता, अन्नधान्य टंचाई, अनारोग्य, अस्वच्छता, अज्ञान, निरक्षरता, अंधश्रद्धा, रूढीप्रियता, दैववादी वृत्ती इत्यादी समस्यांना सामोरे जावे लागले. या सर्व समस्यांचे निराकरण करून देशाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सरकारने अनेक उपक्रम सुरू केले. या उपक्रमांमध्ये शिक्षण प्रसारास महत्त्वाचे स्थान देण्यात आले. स्वातंत्र्योत्तर काळात घडून आलेल्या शैक्षणिक विकासाचे चित्र पुढीलप्रमाणे मांडता येईल.

अ) राज्यघटनेतील तरतूदी : स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही व्यवस्था स्वीकारली. लोकशाही यशस्वी होण्यासाठी व आर्थिक-सामाजिक विकास साध्य करण्यासाठी सुजाण व जबाबदार नागरिकांची गरज असते व असे नागरिक शिक्षणाद्वारेच तयार होऊ शकतात याची घटनाकारांना जाणीव होती. म्हणून त्यांनी शिक्षणप्रसारास पोषक ठरतील अशा पुढील तरतूदी राज्यघटनेत केल्या.

१) कलम २९ ब नुसार राज्याद्वारे किंवा राज्यामार्फत मिळणाऱ्या अनुदानावर चाललेल्या शिक्षणसंस्थांत धर्म, वंश, जात, भाषा इत्यादींच्या आधारे प्रवेश नाकारता येणार नाही.

२) कलम ३० नुसार भाषिक व धार्मिक अल्पसंख्य समूहांना त्यांच्या पसंतीप्रमाणे शिक्षणसंस्था स्थापण्याचा व चालविण्याचा अधिकार दिला आहे.

३) कलम ४५ नुसार १४ वर्षे वयापर्यंतच्या सर्व मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी राज्यावर टाकण्यात आली.

४) कलम ४६ नुसार समाजातील दुर्बल घटकांच्या विशेषत: अनुसूचित जाती जमातीच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधांची राज्याने विशेष काळजी घेण्यास सांगितले आहे.

वरील तरतुदीवरून हे स्पष्ट होते की, स्वातंत्र्योत्तर भारतात शिक्षण ही राज्याची घटनात्मक जबाबदारी बनली आहे. तसेच सर्वांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून दिली आहे.

ब) शैक्षणिक आयोगांची स्थापना : शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी व शिक्षणविषयक धोरण ठरविण्यासाठी सरकारने वेळोवेळी विविध आयोग समित्या स्थापन करून त्यांच्या शिफारशींची अंमलबजावणी केलेली आहे.

१) डॉ. राधाकृष्णन आयोग : स्वातंत्र्यानंतर उच्च शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी नेमलेल्या डॉ. राधाकृष्णन विद्यापीठ आयोगाने (१९४८) ''नेतृत्व विकास, संस्कृती संक्रमण व संवर्धन, विद्यार्थ्यांचा बौद्धिक, शारीरिक, आध्यात्मिक व नैतिक विकास, आंतरराष्ट्रीय सद्भावनेचा विकास, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्याय ह्या लोकशाही मूल्यांचा विकास'' इत्यादी उच्च शिक्षणाची ध्येये मानली आणि ही ध्येये साध्य करण्यासाठी पुढील शिफारशी केल्या.

- उच्च शिक्षणात बुद्धिमान व्यक्ती शिक्षक म्हणून आकर्षित व्हाव्या म्हणून शिक्षकांना आकर्षक वेतन व अन्य सोयीसुविधा पुरविणे.
- अध्यापनाचा दर्जा सुधारण्यासाठी व्याख्याने, प्रपाठ , उजळणी वर्ग, चर्चासत्रे, सुसज्ज ग्रंथालये व प्रयोगशाळा अशा सुविधा पुरविणे.
- विद्यार्थ्यांच्या सामान्य व व्यावसायिक अभिरूची लक्षात घेऊन अभ्यासक्रम तयार करणे.
- शास्त्रीय संशोधनास अग्रक्रम देणे.
- व्यावसायिक शिक्षणावर भर देणे.
- उच्च शिक्षणाचे माध्यम प्रादेशिक भाषा असावे, तथापि हिंदी व इंग्रजी भाषांचेही अध्ययन करणे.
- परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी परीक्षा मंडळे स्थापन करणे.
- विद्यार्थी कल्याण मंडळे स्थापन करणे.
- स्त्रीशिक्षणाच्या सोयीसुविधा वाढविणे.
- ग्रामीण महाविद्यालये व विद्यापीठे स्थापन करणे.
- उच्च शिक्षणासाठी सरकारने अनुदान देणे इत्यादी.

आयोगाच्या वरील तरतुदींची सरकारने अंमलबजावणी केल्याने स्वातंत्र्योत्तरकाळात उच्च शिक्षणाचा झपाट्याने प्रसार झाला.

२) मुदलियार आयोग : ''लोकशाही नागरिकत्व, व्यावसायिक कार्यक्षमता, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व व नेतृत्त्व यांचा विकास करणे हे माध्यमिक शिक्षणाचे ध्येय मानून ही ध्येये साध्य करण्यासाठी पुढील शिफारसी केल्या.

- माध्यमिक शिक्षणाचा कालावधी सात वर्षे असावा. ११ ते १७ वयोगटातील मुलामुलींना माध्यमिक शिक्षण द्यावे.
- माध्यमिक शिक्षणाचे माध्यम साधारणत: मातृभाषा व प्रादेशिक भाषा असावे.
- माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमात दोन भाषा, सामाजिक शास्त्रे, गणित, सामान्य विज्ञान, हस्तव्यवसाय, शारीरिक शिक्षण, कला व संगीत, कृषी, वाणिज्य, तंत्रज्ञान असे विविध विषय समाविष्ट असावेत.
- पाठ्यपुस्तकांचा दर्जा सुधारण्यासाठी पाठ्यपुस्तक समिती गठित करावी.
- अध्यापनासाठी कृतिशील व प्रकल्प पद्धतींचा वापर करावा.
- प्रत्येक माध्यमिक शाळेत सुसज्ज ग्रंथालय व प्रशिक्षित ग्रंथपाल असावा.
- ऐच्छिक स्वरूपात धार्मिक शिक्षण द्यावे. चारित्र्यनिर्मिती करणारे नैतिक शिक्षण द्यावे.
- शाळेत अभ्यासपूरक उपक्रम राबवावेत. तसेच मार्गदर्शन व समुपदेशन सुविधा निर्माण करणे.

● विद्यार्थ्यांना आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी व त्यांना शारीरिक शिक्षण द्यावे.

● शाळांच्या सदस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचविण्यासाठी निरीक्षक नेमावेत इत्यादी.

सरकारने ह्या शिफारसींची अंमलबजावणी केल्याने माध्यमिक शिक्षणातील दोष दूर होण्यास मदत झाली.

३) कोठारी आयोग : प्राथमिक, माध्यमिक व विद्यापीठीय ह्या तिन्ही स्तरावरील तसेच जीवनाच्या सर्व क्षेत्रातील शिक्षणाचा एकत्रित विचार करून शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा वाढविण्यासाठी १९६४ मध्ये डॉ. डी. एस. कोठारी आयोगाची स्थापना केली. या आयोगाने ''शिक्षणाद्वारे उत्पादकता वाढविणे, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक व राष्ट्रीय सेवावृत्ती निर्माण करणे, देशाचे आधुनिकीकरण घडवून आणणे, सामाजिक, नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचा विकास करणे, धार्मिक सहिष्णूता निर्माण करणे इत्यादी शिक्षणाची ध्येये मानून ती साध्य करण्यासाठी विविध शिफारशी केल्या. त्यापैकी काही प्रमुख शिफारशी पुढीलप्रमाणे –

● आयोगाने शिक्षणाचा नवीन आकृतीबंध पुढीलप्रमाणे सुचवि ा : १ ते ३ वर्षाचे पूर्व प्राथमिक शिक्षण, १० वर्षाचे सामान्य शिक्षण, २ वर्षाचे उच्च माध्यमिक शिक्षण, ३ वर्षाचे पदवी शिक्षण आणि २ किंवा ३ वर्षाचे पदव्युत्तर शिक्षण.

● शिक्षकाचा दर्जा उंचावण्यासाठी व बुद्धिमान युवक शिक्षकी पेशा डे आकर्षित होण्यासाठी त्यांना आकर्षक वेतन, बढती, निवृत्ती लाभ अशा सुविधा द्याव्यात.

● शिक्षकासाठी प्रशिक्षण व्यवस्था करावी. सेवांतर्गत प्रशिक्षणाचा विश ल कार्यक्रम हाती घेतला जावा.

● प्रत्येक बालकास किमान ७ वर्षाचे चांगले व उपयुक्त प्राथमिक शिक्षण द्य वे व ते मोफत व सक्तीचे असावे.

● सर्व शिक्षण विनाशुल्क देण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून राष्ट्राने वाटचाल करावी.

● सर्वांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून द्यावी. त्यासाठी अपंग, स्त्रिया, मागासलेल्या जातीजमाती यांच्या शिक्षणासाठी खास तरतुदी कराव्यात. शिक्षणातील प्रादेशिक असमतोल दूर करावा.

● गुणवत्तापूर्ण पाठ्यपुस्तके व अध्ययन–अध्यापन सामग्री कमी किं तीत उपलब्ध करून द्यावे. पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी राज्यस्तरावर एखादे स्वायत्त मंडळ निर्माण करावे.

● विद्यापीठांचा विकास करावा. त्यांना पूर्ण स्वायत्तता द्यावी. कृषी विद्यापीठे व महाविद्यालये स्थापन करावीत.

● व्यावसायिक, तांत्रिक व अभियांत्रिकी शिक्षणाचा विस्तार करावा.

● विज्ञान शिक्षण व संशोधनाकडे अधिक लक्ष द्यावे.

● प्रौढ शिक्षण, निरंतर शिक्षणाचे उपक्रम सुरू करावेत. इत्यादी.

कोठारी आयोगाच्या शिफारशीवर आधारित भारताने आपले पहिले शैक्षणिक धोरण १९६८ मध्ये प्रसिद्ध केले. शिक्षणाचा नवीन आकृतीबंध, उच्च माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायीकरण, कार्यानुभव, समाजसेवा, पुस्तकनिर्मिती, शिक्षकांचे सुधारित वेतनमान, कृषी विद्यापीठ स्थापना, त्रिभाषासूत्र, दुर्बलांचे शिक्षण, स्त्रीशिक्षण, विद्यापीठांची स्वायत्तता इत्यादी शिफारसींची अंमलबजावणी करण्यात आली. तर कांही शिफारशींची अंशत: अंमलबजावणी केली आहे. त्यामुळे भारतीय शिक्षणाच्या विकासास वेगळी दिशा प्राप्त झाली.

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : १९८६ : राजीव गांधी सरकारने हे धोरण जाहीर केले. या धोरणात पुढील तरतुदी सुचविल्या.

● सर्वांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे. समता प्रस्थापित करण्यासाठी शिक्षण देणे.

● प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाची पुनर्रचना करणे.

● शिक्षकांच्या प्रशिक्षणात आधुनिकता आणणे.

● राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्के इतकी गुंतवणूक शिक्षणात करणे.

● प्रौढ शिक्षण व निरंतर शिक्षणावर भर देणे.

● शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रीय साधनसंपत्तीचा योग्य विक स व वापर करणे.

● शिक्षणपद्धती समाजाभिमुख बनविणे.

● अभ्यासक्रमात ''स्वातंत्र्यलढा, संविधानिक जबाबदाऱ्या, राष्ट्रीय अस्मिता, सामाजिक-सांस्कृतिक वारसा, समतावाद-लोकशाही-धर्मनिरपेक्षता, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण संरक्षण, सामाजिक अडसरांचे निर्मूलन, लहान कुटुंबाचा आदर्श, वैज्ञानिक मनोवृत्तीची रूजवणूक'' ह्या दहा गाभाभूत घटकांचा समावेश करणे.

● तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाची पुनर्रचना करणे.

● बालसंगोपन व शिक्षण यांच्यात समन्वय साधणे.

● मुक्त विद्यापीठे, दूरशिक्षण विभाग, ग्रामीण विद्यापीठे स्थापन करणे.

● बुद्धिमान विद्यार्थ्यांसाठी नवोदय विद्यालये स्थापणे.

● पदवी व नोकरी यांची फारकत करणे इत्यादी.

१९६८ च्या शैक्षणिक धोरणात ज्या बाबी यशस्वी होऊ शकल्या नाहीत त्यांची दखल १९८६ च्या धोरणात घेतली गेली. या धोरणात अनेक शैक्षणिक समस्या व नावीन्यपूर्ण गोष्टींचा विचार केला आहे. या धोरणाची अंमलबजावणी सुरू असून ती पूर्णपणे यशस्वी झाल्यास भारतीय शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल दिसून येईल.

२) सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९९२ : १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या

अंमलबजावणीचे व परिणामांचे पुनर्विलोकन करून हे सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९९२ मध्ये जाहीर केले. त्यामध्ये पुढील शिफारशी केल्या.

- शैक्षणिक प्रशासन व नियोजन यामध्ये शिक्षणतज्ज्ञांना सहभागी करून घेणे.
- शैक्षणिक प्रशासन व पर्यवेक्षणात सेवांतर्गत सेवकांना सहभागी करून घेणे.
- राष्ट्रीय स्तरावरील अ) राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रि क्षण परिषद (छउएठढ) ब) राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (छखएझअ) क) विद्यापीठ अनुदान आयोग (णॠउ) या तीन संस्थांचे पुनर्विलोकन करणे.
- चर्चासत्रे, कार्यशाळा, नवीन अभ्यासक्रम इत्यादीवरील खर्च भ्रामक असून तो शालेय साधन सुविधांसाठी करावा.
- उच्च शिक्षणावर केला जाणारा अमाप खर्च कमी करून तो सामान्य शिक्षणाकडे वळवावा.
- शैक्षणिक धोरण ठरविल्यानंतर त्यासाठी लागणाऱ्या वित्ताची व्यवस्था करावी.

वरील सुधारित शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी एक कृतिकार्यक्रम नश्चित केला. त्यामध्ये शैक्षणिक प्रशासनात सुधारणा करणे, सक्तीचे प्राथमिक शिक्षण यशस्वी करणे, शिक्षणाच्या विविध स्तरांवर मुलींचा सहभाग वाढविणे. साक्षरता प्रसा ासाठी प्राथमिक शिक्षण, अनौपचारिक शिक्षण व प्रौढ शिक्षण या तिन्ही मार्गांचा अवलंब करणे. विद्यार्थ्यांची शाळेतील संख्या व उपस्थिती टिकविणे, शालेय पाठ्यपुस्तकांचे पुनर्विलोकन करणे इत्यादी बाबींचा समावेश आहे.

३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : २००१ : १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात व त्यावर आधारित १९९२ च्या सुधारित शैक्षणिक धोरणात नमूद केल्याप्रमाणे दर पाच वर्षांनी शिक्षण पद्धतीने पुनर्विलोकन करावयाचे होते. त्यानुसार नोव्हेंबर २००० मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने सुधारित अभ्यासक्रम आराखडा तयार केला. आणि सप्टेंबर २००१ मध्ये हा अभ्यासक्रम आराखडा जाहीर केला. जनतेच्या आशा आकांक्षा, राष्ट्रापुढील आव्हाने, संविधानात्मक बाबी, जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्या, बदललेले सामाजिक संदर्भ, विज्ञानतंत्रज्ञानातील प्रगती इत्यादी बाबींचा विचार हा अभ्यासक्रमात केला आहे. १९८६ च्या व १९९२ च्या राष्ट्रीय धोरणातील मूळ आराखड्यातील स्थुलरूप तत्वांशी हा अभ्यासक्रम आराखडा सुसंगत ठेवला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक सं ोधन व प्रशिक्षण परिषदेने तयार केलेला अभ्यासक्रम डोळ्यांसमोर ठेवू न राज ा नी आपली स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन या अभ्यासक्रमांसी आपले अभ्यासक्रम सुसंगत ठेवावेत अशी अपेक्षा आहे.

या अभ्यासक्रम आराखड्यात पाच प्रकरणे असून पहिल्या प्रकरणात अभ्यासक्रम तयार करताना विचारात घ्यावयाच्या बाबी व संपर्क यांची चर्चा केली आहे. दुसऱ्या प्रकरणात प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमाचे संघटन तर तिसऱ्या प्रकरणात विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन कसे करवे याची तर पाचव्या प्रकरणात अभ्यासक्रम आराखड्याने रचनाकौशल्य व त्यांची अंमलबजावणी याबाबतची चर्चा केली आहे.

या आराखड्यात नवीन ज्ञान, विज्ञान व कौशल्ये यांचा अभ्यासक्रम अंतर्भाव करून घेण्यासाठी 'अग्रणी अभ्यासक्रम' ही नवीन संकल्पना मांडली आहे. तसेच राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक दर्जाचे नियंत्रण केले जावे या हेतूने 'राष्ट्रीय मूल्यमापन संघटना' स्थापण्याची तरतूद केली आहे. शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यासाठी औपचारिक शिक्षणाला समांतर मुक्तशाळा किंवा मुक्त अभ्यास पध्दतीची कल्पना मांडली आहे. प्राथमिक स्तरावर आरोग्यदायी शिक्षण व उत्पादक जीवन कौशल्ये हा नवीन विषय समाविष्ट केला आहे. वरिष्ठ प्राथमिक व माध्यमिक स्तरावर विज्ञानाच्या जोडीला तंत्रज्ञान विषयाचा समावेश केला आहे, संस्कृत व परकीय भाषा अभ्यासणे, उच्च प्राथमिक स्तरावर ''व्यावसायिक शाखा अभ्यासक्रम'' निर्माण करणे, विषय निवडीचे स्वातंत्र्य देणे, क्रेडिट पध्दती अवलंबणे, सतत मूल्यमापन करणे इत्यादी बाबींचाही समावेश या अभ्यासक्रम आराखड्यात कला आहे. ह्या बाबी भारतीय शिक्षणपध्दतीत क्रांती घडविणाऱ्या आहेत.

ड) स्वातंत्र्योत्तर भारतातील शिक्षणाची वैशिष्टये : भारतात स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा विकास होत चालला आहे. या विकासाचे स्वरूप समजण्यासाठी स्वातंत्र्योत्तर भारतातील शिक्षणाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे –

१) शिक्षणाचे सार्वत्रिकरण : परंपरागत भारतात केवळ उच्च जातींनाच विशेषतः शिक्षण घेण्यास बंदी होती. ब्रिटिशांनी शिक्षण सर्वांसाठी खुले केले तरीही ब्रिटिश राजवटीत फारच थोड्या भारतीयांना शिक्षण मिलाले. स्वातंत्र्यानंतर मात्र शिक्षण ही राज्याची जबाबदारी बनली त्यामुळे सर्वांना शिक्षण देण्यासाठी सरकारने बालवाड्या, अंगणवाड्या, प्राथमिक व माध्यमिक शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, रात्रशाळा, तंत्रशाळा, औद्योगिक व व्यावसायिक शिक्षणाची केंद्रे, साक्षरताप्रसारासाठी प्रौढ शिक्षण केंद्रे इत्यादी शिक्षणसंस्थांचे देशभर जाळे उभारले. दुर्बल घटकांना शिक्षण घेता यावे म्हणून शिष्यवृत्ती, वहया पुस्तके व गणवेश यांचे वाटप, वसतीगृहे, मधल्या सुट्टीत भोजन, शैक्षणिक प्रवासासाठी सवलत, खाजगी शिक्षणसंस्थांना अनुदान इत्यादी सोयीसुविधा पुरविल्या जात आहेत. शिक्षण प्रसारासाठी विविध योजना (खडू फळा येजाना, सर्व शिक्षण अभियान, विद्यार्थी दत्त योजना, मुलींना मोफत शिक्षण इ.) राबविल्या जात आहेत. त्यामुळे शिक्षण प्रसारास मोठी चालना मिळाली आहे. इ. स. १९५१ मध्ये भारतात केवळ १८.३% इतके साक्षरतेचे प्रमाणतेहोते ` २००१ मध्य ६५.३८ टक्क्यावर पोहचले आहे. यावरून शिक्षण प्रसाराची कल्पना येते. इ. स. २०१० मध्ये केंद्र सरकारने १४ वर्षापर्यंतच्या मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा कायदा संमत केला आहे. त्यामुळे शिक्षण प्रसारास मोठी चालना मिळणार आहे.

२) विविध प्रकारचे शिक्षण : परंपरागत भारतातील शिक्षण हे प्रामुख्याने धार्मिक स्वरूपाचे होते तर ब्रिटिश राजवटीत प्रामुक्याने प्रशासकीय कार्ये पार पाडण्यासाठी उपयुक्त असणारा कर्मचारी वर्ग तयार करणारे शिक्षण दिले जाई. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र विविध आयोगांच्या शिफारशी व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील तरतूदी यांना अनुसरून शिक्षणाचा समतोल विस्तार करण्यावर भर दिला जात आहे. कला, वाणिज्य, सामाजिक व नैसर्गिक शास्त्रे, कृषी कायदा, व्यवस्थापन, तंत्रज्ञान औद्योगिक, अभियांत्रिकी, वैद्यकिय, संगणक, माहिती तंत्रज्ञान, अवकाश इत्यादी विविध विद्याशाखांतील शिक्षण दिले जात आहे. त्यामुळे

आज भारतात विविध प्रकारचे शिक्षण उपलब्ध झाले असून भारतीय बुध्दिमान व उच्चशिक्षित युवकांना देशात व परदेशातही रोजगाराच्या आकर्षक संधी मिळू लागल्या आहेत.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत परकीय विद्यापीठांना भारतात आमंत्रित केले असल्याने आज अनेक परकीय विद्यापीठांना भारतात आपले अभ्यासक्रम सुरू केले आहे. त्यामुळे परकीय विद्यापीठांशी भारतीय विद्यापीठांना स्पर्धा करणे अनिवार्य होऊन त्यांना आपला दर्जा सुधारावा लागणार आहे.

**३) शिक्षणाच्या उद्दिष्ट्यांत बदल** : ज्ञानसंपदा, ज्ञानसंवर्धन, चारित्र्य निर्मिती, सामाजिक बांधीलकी, राष्ट्रीय भावना व राष्ट्रप्रेम निर्मिती, नैतिक मूल्यांची जोपासना इत्यादी शिक्षणाच्या प्रमुख उद्दिष्टे मानली जातात. सर्व शैक्षणिक आयोगांनी व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांनी शिक्षणाच्या ह्या उद्दिष्टांवर भर दिलेला आहे. तथापी, स्वातंत्र्योत्तर भारतात सत्ता, संपत्ती, रोजगार इत्यादींच्या प्राप्तीसाठी शिक्षणास महत्त्व आपल्याने शिक्षणाची वरील उद्दिष्ट्ये व्यवहारात मागे पडत चालली आहेत. ज्ञानाऐवजी माहिती संपादण्यात महत्त्व आले आहे. नोकरी मिळविणे, निर्वाह चालविणे, करिअर घडविणे, व्यक्तिगत महत्वाकांक्षा पूर्ण करणे इत्यादी उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी शिक्षण घेतले जात आहे. परीक्षेतील गुणांनाच शैक्षणिक गुणवत्ता मानले जात आहे.

## ४.२.२ विचारवंतांचे शैक्षणिक योगदान

### ४.२.२.१) स्वामी विवेकानंद यांचे भारतीय शिक्षणात योगदान :

ब्रिटीशांचे भारतात आगमन व त्यानंतर त्यांनी भारतावर केलेले प्रशासन याचा दूरगामी परिणाम भारतीय जीवनावर झाला आहे. जुनी भारतीय संस्कृती व नवी पाश्चात्य संस्कृती यांच्यात तुलना होऊ लागली. एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीला काही भारतीय पाश्चात्य संस्कृतीने अधिक प्रभावित झाले. त्यांना आपली संस्कृती जुनाट व त्याज्या वाटू लागली. आपले ते वाईट व पाश्चात्य ते सर्व स्वागतार्ह असी त्यांची सर्वसाधारण मनोधारणा झाली. आपली संस्कृतीही पाश्चात्य संस्कृतीइतकीच किंबहुना अधि श्रेष्ठ आहे हे सांगण्याची गरज निर्माण झाली. यातून प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, आर्य समाज, ब्राह्मो समाज या चळवळी सुरू झाल्या. जगाला आपली संस्कृती श्रेष्ठ केशी हे पटवून द णारे अनेक विचारवंत उदयास आले. त्यांनी समाजप्रबोधन व समाज परिवर्थनाचे कार्य हाती घेतले. श्री. स्वामी विवेकानंद हे यापैकीच एक महान तत्वज्ञ होत. त्यांनी भारतात आणि भारताबाहेर वेदान्त तत्वज्ञानाचा प्रसार केला. आपल्या देशाच्या आध्यात्मिक क्षेत्रातील उज्ज्वल परंपरेची साऱ्या जगाला ओळख करून दिली.

**स्वामीजींचे जीवन चरित्र** : मूळ नांव नरेंद्र दत्त होय. त्यांचा जन्म कलकत्ता येथे १३ जानेवारी १८६३ मध्ये झाला. ते लहानपणापासून विरक्त वृततीचे होते. ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल त्यांच्या मनात सतत संशय होता. पुढे रामकृष्ण परमहंस यांच्याशी त्यांचा संबंध आला. परमहंसानी नरेंद्रास आत्मसाक्षात्कार घडविला. नरेंद्रने संन्यास घेऊन स्वामी विवेकानंद हे नाव धारण केले. स्वामीजी परहंसाच्या शिष्यापैकी सर्वात आवडते शिष्य होते. स्वमीजींनी मिशनरी वृत्तीने आयुष्यभर रामकृष्ण परमहंसाचे विचार पसरविण्याचे कार्य केले. ११ सप्टेंबर

१८९३ मध्ये विश्वधर्म संमेलनात भाग घेण्यासाठी तेंरिकामे ेला गेल . वेदांतज्ञानाचा प्रसार केला. १८९३ मध्ये न्यूयॉर्क येथे वेदांत समाजाची स्थापना केली. रामकृष्ण मिशनची स्थापना केली. या संस्थेव्दारा त्यांनी आपल्या अध्यात्मिक विच रांना मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. ४ जुलै १९०२ रोजी वयाच्या ४० व्या वर्षी त्यांनी देह ठेवला.

**स्वामीजींचे जीवनविषयक तत्त्वज्ञान** : स्वामी विवेकानंद वेदांती होते. अव्दैतवाही होते. मानवी जीव व वैश्विक जीव यात एकात्मत साधणे हा वेदांत तत्त्वज्ञानाचा मुख्य भाग आहे. यात प्रत्येक व्यक्ति महत्वाची आहे. स्वामीजींचे जीवनविषयक तत्त्वज्ञान थोडक्यात खालीलप्रमाणे सांगता येईल.

स्वामीजींचे शिक्षण विषयक तत्त्वज्ञान

ज्ञानाचा उगम मानवी मनात

ज्ञानप्राप्ती म्हणजे आत्मानुभूती, आत्मसाक्षात्कार

स्वयं शिक्षणाने मूल शिकते.

सुप्तशक्तींच्या विकासाला योग्य परिस्थिती निर्माण करणे हे शिक्षणाचे कार्य.

धर्म हा शिक्षणाचा गाभा

मनाची एकाग्रता हे एक मोठे सामर्थ्य

शिक्षण म्हणजे जीवनाची घडण

अंतःकरणातील मानवतेचा विकास हेच खरे शिक्षण

(१) विवेकनंदाच्या दृष्टीने ज्ञानाच्या उगम हा मानवी मना**तून** हो ो. ज्ञान हे मानवाच्या मनात उपजत सुप्तावस्थेत असते. ''जगातील सर्व ज्ञानाचा उगम मानवी मनात आहे. मन हे विश्वाचे विशाल ग्रंथालय आहे. बाह्य जगातील एखाद्या प्रसंगातून सूचना मिळते. ती सूचना मनाला कार्यप्रवण करते व त्यातून ज्ञानाचा अविष्कार होतो. ज्ञानप्राप्ती म्हणजे आत्मानुभूती, आत्मसाक्षात्कार होय. शिकणे याचा अर्थ अज्ञ नाचे पटल दूर करणे होय.'' असे स्वामीजी म्हणतात.

(२) स्वामीजी म्हणत की कोणीही कोणाला शिकवू शकत नाही. स्वयंशिक्षणाने मूल शिकते. स्वतःच्याच निरीक्षणाने व विचाराने त्याला अनेक गोष्टी समजतात व त्यातून ते शिकते.

(३) स्वीमीजींच्या मते मुलांच्या गरजांप्रमाणे त्याना शिक्षण द्यावयास हवे. मुलांमध्ये लपलेल्या सुप्त प्रवृतींनी त्याच्या गरजा निश्चित केल्या गेल्या पाहिजेत. पालकांच्या इच्छा व गरजा मुलांवर लादल्या जाऊ नयेत. मुलांच्या गरजा विचारात घेऊन सिक्षणाची उभारणी केली जावी.

मुलांना सुप्त शक्तिंची जाणीव करून देणे व त्या सुप्त शक्तिंच्या विकासाला योग्य परिस्थिती निर्माण करणे हे शिक्षणाचे कार्य होय.

(४) धर्म हा शिक्षणाचा गाभा आहे. अविभाज्य भाग आहे. असे स्वामीजी म्हणत. ''धर्म

म्हणजे माणासामाणसातील दैवी शक्तींचा अविष्कार ''शिक्षण म्हणजे माणसातील पूर्णत्वाचा अविष्कार'' दैवी शक्ति आणि पूर्णत्व या दोन्ही वेगळ्य नव्हेत. असे विचार त्यांनी मांडले खऱ्या अर्थाने धर्म ही एक जीवपध्दती आहे. स,र्व धर्माची मूलतत्वे एकत्रित करून मुलांना धार्मिक शिक्षण द्यावे असे ते म्हणत.

(५) स्वामीजींच्या मते मनाची एकाग्रता हे एक मोठे सामर्थ्य आहे. एकाग्रतेमुळे मानवाला आयुष्यात यश मिळते. एकाग्रता रूपी किल्लीनेच ज्ञानभांडाराची कवाडे उघडणे शक्य आहे. या एकाग्रतेसाठी ब्रह्मचर्यपालन आवश्यक आहे. का ा, वाचा व मन पवित्र ठेवणे. म्हणजे ब्रह्मचर्य होय. ब्रह्मचर्याने अध्यात्मिक व मानसिक सामर्थ्य वाढते असे स्वामीजी म्हणत.

(६) शिक्षण म्हणजे जीवनाची घडण होय. सद्विचारांचे संस्क र मनावर घडणे होय. चारित्र्य संवर्धन होय. अंतःकरणातील मानवतेचा विकास हेच खरे शिक्षण.

(७) ज्ञान हा सर्वांचा जन्मसिध्द हक्क आहे. शिक्षणाचा प्रसार समाजातील सर्व स्तरात झाला पाहिजे.

(८) स्त्री शिक्षणाचे महत्व स्वामीजींनी ओळखले होते. राष्ट्र उध्दारासाठी स्त्री शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे हे त्यांनी ओळखले. स्त्र ीच कुटुंबात व राष्ट्र कार्यात असणारे महत्वाचे स्थानही त्यांनी दाखवून दिले. स्त्री शिक्षणासंबंधी त्यांचे विचार त्यांच्या वरील दिलेल्या तत्त्वज्ञानाशी निगडीत असेच आहेत. एका स्त्रीच्या शिक्षणाने तिचा आणि कुटुंबाचा उध्दार होतो. स्त्रियांनी स्वालंबी व्हावे असे स्वामीजी सांगत.

स्वामीजींचे शैक्षणिक योगदान :

(अ) शिक्षणाचा अर्थ : वर दिलेल्या शैक्षणिक विचाराप्रमाणे स्वा ीजींना अभिप्रेत असलेला शिक्षणाचा अर्थ खालील प्रमाणे आहे.

मानवातील पूर्णत्वाचा अविष्कार म्हणजे शिक्षण होय. मानवातील सुप्त बीजरूप क्षमतांचा विकास करणे म्हणजे शिक्षण होय. आत्मविकासाची प्रक्रिया म्हणजे शिक्षण होय. चारित्र्यसंवर्धन म्हणजे शिक्षण होय. शिक्षण म्हणजे **मान**वनिर्मिती, तेचा विकास करणे, इच्छाशक्तिचा विकास करणे. तिचे नियंत्रण करून आत्मविकासाच्या कामी तिचा विनियोग करण्याचे सामर्थ्य म्हणजे शिक्षण होय.

(ब) स्वामीजींनी सांगितलेली शिक्षणाची ध्येये : स्वामी विवेकानंदांनी शिक्षणाची खालील ध्येये सांगितली आहेत.

(१) स्वतःचा स्वतःवर विश्वास असणे ही आत्मविकासाची पहिली पायरी आहे असे स्वामीजी म्हणत. शिक्षणाने स्वतःवरचा विश्वास विकसित केला पाहिजे.

शिक्षणाचा हेतू आपल्यात असलेल्या सुप्त शक्तिबद्दलची जागृती निर्माण करणे. होय. शिक्षणाने मानवामध्ये धैर्य व विश्वास निर्माण व्हावा.

(२) स्वतःवरील विश्वासाचा विकास व्हवा म्हणून आत्मज्ञान करून घेण्याची अत्यंत

आवश्यकता आहे. आत्मज्ञान मिळविण्याचे कौशल्य प्राप्त करून देणे व आत्मज्ञानाबरोबर आत्मविश्वास व आत्मनिर्भरता यांचा विकास करणे, हे शिक्षणाचे ध्येय होय.

(३) जीवनावश्यक प्राथमिक गरजा समर्थपणे भागविण्यास शिक्षणाने मदत करावी असी अपेक्षा स्वामीजी करतात. जीवनावश्यक गरजा भागविणे हे शिक्षणाने एक ध्येय होय.

(४) विवेकानंदांनी चारित्र्यसंवर्धनही महत्वाचे मानले होते. चारित्र्यात विशाल व्यापक सहानुभूती, मानवामानवातील प्रेम, इतरांच्या दुःखाबद्दल आत्मियता समाविष्ट आहे. चारित्र्यसंवर्धन व नैतिक विकास हे स्वामीजींच्या दृष्टीने शिक्षणाचे एक ध्येय होय.

(५) शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट मानव निर्माण करणे हे होय. स्वामीजी म्हणूनच शिक्षणास ''माणूस घडविते ते शिक्षण'' असे म्हणतात.

(६) स्वामीजींच्या मते शक्ती व सामर्थ्याची उपासना हाही शिक्षणाचा एक हेतू आहे.

(७) शिक्षणाने विश्वबंधुत्वाची भावना जागवावी, निष्काम सेवेचे बावना निर्माण करावी. जगाविषयी प्रेम निर्माण करावे. व जगासाठी काही तरी चांगले करण्याची स्फूर्ती द्यावी अशीही स्वामीजींची अपेक्षा आहे.

(ब) अभ्यासक्रम : शिक्षणाची ध्येये साध्य करण्यासाठी विवेकानंदांनी अब्यासक्रमात अध्यात्मिक व व्यावहारिक विषयांचा समावेश असावा असे सुचविले. त्यांनी विज्ञान व वेदांत यांचा समन्वय सुचविला. लोकांना जीवन जगण्यास ठी अर्थोत्पादनासाठी तंत्रज्ञानाचे व व्यावसायिक विषयांचे ज्ञान हवे असे ते म्हणत.

विवेकानंदानी अभ्यासक्रमात शास्त्र व वेदांत, प्रादेशिक भाषा, संस ृत, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, शारीरिक शिक्षण व व्यावसायिक विष ांचा समावेश असावा असे सांगितले.

(क) शिक्षण योजना : प्राचीन काळी असलेली गुरूकुल किंवा आश्रम पध्दती विवेकानंदाना विशेष पसंत होती. त्यांच्या मते हेच सिक्षण जीवनावर चांगले संस्कार घडविते.

शिष्य आणि गुरूंच्या अंगी कोणते गुण असावेत हे त्यांनी केले आहे. शिष्यांच्या अंगी आचार-विचारांची शुध्दता, आत्मसंयमन, सहनशीलता, हवी तर गुरूंच्या अंगी संस्कार घडविण्यासाठी शुध्दाचरण, चारित्र्य संपन्नता, निस्वार्थी वृत्ती, ज्ञानद नाची आवड आणि विव्दता हवी.

(ड) अध्ययन-अध्यापन पध्दती : स्वामी विवेकानंद केंद्रीयकरण पध्दतीस म्हणजेच मनाच्या एकाग्रता पध्दतीस ज्ञान संपादनात अधिक महत्व देतात. ज्ञान प्राप्तीचे साधन म्हणजे मनाची एकाग्रता त्यांच्या मते एकूण शिक्षणाचेच सगळे रहस्य मनाच्या एकाग्रता शक्तीत सामावलेले आहे. त्या शिवाय ते श्रध्देला अधिक महत्व देतात. ''श्रध्दावान लभते ज्ञानम्'' हे वचन प्रसिध्द आहे.

तर्क, व्याख्यान, विचार विमर्श, व्यक्तिगत निर्देशन व परामर्श यांचाही शिक्षण पध्दती म्हणून वापर करावा असे स्वामीजींनी सुचविले आहे.

(इ) शिक्षक : स्वामीजी शिक्षकाच्या वैयक्तिक आयुष्याला व त्याच्या चारित्र्याला अतिशय महत्व देतात. त्यांच्या मते फक्त त्यागी व्यक्तींच शिक्षक होऊ शकते. शिक्षकाचे चारित्र्य शुध्द हवे. आपल्या व्यक्तिमत्वाची छाप पाडून त्याने मुलांच्या वर्तनाला आकार द्यावा. प्रेम व सहानुभूतीने वागावे शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या चुका दाखविण्याऐवजी त्याच्यात असलेल्या सुप्तशक्तींबद्दल त्यास सांगावे. प्रत्येकाला पूर्णत्वाला पोहोचविण्यासाटी प्रयत्न करावा.

(फ) धार्मिक शिक्षण : सर्व शिक्षणाचा गाभा धर्म आहे असे स्वामीजी सांगत. आपल्या धर्माचा आदर करण्यास विद्यार्थ्यांनी शिकले पाहिजे व ळी अन्य धर्माचा आदर करण्याची शिकवणही त्यांना दिली पाहिजे. धार्मिक शिक्षणाव्दारे सर्व धर्माचा जो गाभा आहे तोच सांगितला जावा असे स्वामीजी म्हणत. सर्व धर्मांत चांगली तत्त्वे सांगितलेली असतात. ही तत्त्वे एकाच प्रकारची असतात. कोणत्याही धर्माने खोटे बोलावे, एकमेकांचा द्वेष करावा असे सांगितलेले नाही. सर्व धर्मातील एकत्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या ध्यानी आणून द्यावे. धर्माचे अवडंबर न माजविता विश्वप्रेमाची अनुभूती घेणे म्हणजेच धर्म असे स्वामीजी म्हणत. सर्व धर्म समभावाचा गाभा शिक्षणातून विद्यार्थ्यांना शिकविला पाहिजे यावर त्यांचा भर होता.

(ह) स्त्री शिक्षण : समाजात आणि कुटुंबात स्त्रियांना सन्मानाने वागविले जावे असे स्वामीजींचे म्हणणे आहे. समाजाची प्रगती त्या समाजाता स्त्रियांना मिळणाऱ्या प्रतिष्ठेवर जोखली जाते. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता :' यावर त्यांचा विश्वास होता. स्त्रियांचा उध्दार करण्यात घालवावे असे स्वामीजी म्हणत. स्त्रियांचा उध्दार झाला की देशाचा आपोआप विकास होईल. यावर त्यांचा विश्वास होता. ते स्त्री शिक्षणाचे कट्टर पुरस्कर्ते होते.

स्वामीजी बालविवाहाच्या प्रथेविरूध्द होते. स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांना शिक्षण हवे असे स्वामीजी आग्रहाने प्रतिपादन करीत. शिक्षणाने त्या धीट व निर्भय बनल्या पाहिजेत. त्यांची मनःशांती वाढली पाहिजेत. त्या स्वालंबी झाल्या पाहिजेत. असे त्यांना वाटे.

स्त्रियांना इतिहास, पुराणे, गृहव्सवस्था, वविध कला, गृहस्थीधर्म आणि चारित्र्य संवर्धनाची माहिती शिकविली पाहिजे, असे स्वामीजींचे सांगणे होते. शिक्षित स्त्रियांच्या घरातच मोठ्या माणसांचा जन्म होतो यावर त्यांचा विश्वास होत .

(म) सर्वसामान्यांचे शिक्षण : गरीबीचे मूळ कारण शिक्षणाचा अभाव होय. म्हणून सर्वसामान्यांचा मागासलेपणा नाहिसा करण्यासाठी त्यांच्यात शिक्षणाचा प्रचार व प्रसार व्हावयास हवा असे विवेचन विवेकानंदांनी केले आहे. सर्व सामान्यात जेव्हा शिक्षणाचा प्रसार होतो. त्यांचा बुध्दिविकास होतो तेव्हाच देशाची प्रगती होते. असे स्वामीजी सांगत. मातृभाषेतून शिक्षण मिलावे असे स्वामीजी सांगत.

असा रितीने स्वामी विवेकानंदांचा काळ हा एका बाजूला कर्मठ सन तनी तर दुसऱ्या बाजूला पाश्चात्य विचारवंतांच्या आहारी गेलेला अशा दोन टोकांच्या पिढीचा काळ होतो.

स्वामीजींनी आपल्या व्याख्यानातून समन्वयवादी भूमिका मांडली. सनातनी लोकांना आधुनिक ज्ञान विज्ञानाचे महत्व पटवून दिले तर पुरोगाम्यांनी धर्मासंबंधीचे महत्व ध्यानात आणू दिले अशा रीतीने स्वामीजींनी प्राचीन अध्यात्मकदृष्टी व आधुनिक वैज्ञानिक यांचा समन्वय साधून राष्ट्रीय तत्त्वज्ञानाची पार्श्वभूमी तयार केली. सर्वसामान्यांचे शिक्षण, स्त्री शिक्षण यावर त्यांचा भर होता. स्त्रीशिक्षणाचे तर ते कट्टर पुरस्कर्ते होते. शिक्षणाची सुरूवात घरापासून होऊन नंतर समाज, राष्ट्र व शेवटी मानवता व विश्वबंधुत्व असा विकास व्हावा अशी त्यांची अपेक्षा होती.

### ४.२.२.२ **महात्मा गांधी**

प्रास्ताविक : म. गांधींनी राज्यशास्त्राबरोबरच शिक्षणशास्त्रातही मोलाची भर घातली आहे. त्यांनी आपल्या जीवनविषयक तत्त्वज्ञानातूनच शिक्षणाचे तत्त्वज्ञान प्रतिपादन केले.

शिक्षण विषयक तत्त्वज्ञान : गांधीजींची परमेश्वरावर श्रद्धा होती. त्यांच्या मते शिक्षणाने व्यकतीला मरमेश्वराचे ज्ञान व्हावे. आपले जीवनविषयक तत्त्वज्ञान साकार करण्यासाठी त्यांनी शिक्षणामध्ये प्रयोग केले.

शिक्षणाने समाजाच्या गरजा भागवाव्यात असे त्यांना वाटे. शिक्षण उद्योग व कृतीप्रधान असावे असे ते म्हणत.

गांधीजींचे शिक्षणविषयकविचार खाली क्रमवार दिले आहेत.

१) शिक्षणाचा अर्थ : महात्मा गांधीजींच्या दृष्टीने शिक्षणाचा अर्थ व्यापक आहे. केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे. आपल्या 'हरिजन' या ३१ जुलै १९३७ च्या अंकात ते लिहितात ''केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे. शिक्षणाचा प्रारंभ देखिल नव्हे. शिक्षण म्हणजे बालकाच्या व व्यक्तीच्या सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती करून व्यक्तीचा शारीरिक व मानसिक आणि आध्यात्मिक विकास साधणारे माध्यम होय.'' शिक्षणात महात्मा गांधींनी व्यक्तिमत्वाच्या सर्व घटकांचा अंतर्भाव केला आहे.

शिक्षणाचा अर्थ स्पष्ट करताना ते म्हणातात, ''शिक्षण म्हणजे बालकाच्या किंवा व्यक्तीच्या शरीर, मस्तिष्क आणि आत्म्याच्या अंतर्गत सर्वोत्तम गुणांचा विकास होय.''

२) शिक्षणाची ध्येये : गांधीजींच्या जीवनाविषयीच्या तत्त्वज्ञानात अध्यात्मिकतेला सर्वोच्च स्थान आहे. याचा प्रभाव त्यांच्या शैक्षणिक विचारावर पडलेला दिसून येतो. या प्रभावातूनच त्यांनी शिक्षणाची खालील ध्येये सांगितली आहेत.

आत्मनिर्भरता : गांधीजींच्या मते शिक्षणाने विद्यार्थ्यास आर्थिक, शारीरिक आणि मानसिक दृष्टीने आतमनिर्भर बनवावे. आर्थिक निर्भरतेसाठी गांधीजी बालकास कोणत्या ना कोणत्या व्यवसायाचे शिक्षण द्यावे असे म्हणत. शरीरिक आत्मनिर्भरता म्हणजे आरोग्यपूर्ण शरीर. शिक्षणात शारीरिक विकासाकडे लक्ष देण्यासाठी खेळ व कवायती हव्यात. शारीरिक श्रम हवेत. मानसिक आत्मनिर्भरता म्हणजे बालकाच्या अंतर्गत मानसिक क्षमतांचा पूर्ण विकास होय.

सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेचा विकास : गांधीजी सामाजिक उत्तरदायित्वाच्या

भावनेचा विकास करण्यावरही भर हवा असे म्हणज. बालकास द्यावयाचे शिक्षण बालकाच्या भौतिक आणि सामाजिक वातावरणात शिक्षण घेते तेव्हा त्याच्या सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेचा विकास होऊ शकेल.

चारित्र्य संवर्धन : गांधीजींनी चारित्र्य संवर्धनास नेहमी महत्व दिले. शिक्षणाने बालकात उच्च दर्जाचे चारित्र्य निर्माण करावे. श्रेयस-प्रेयस, त्याज्य-ग्रहणीय अशी तथ्ये त्यास समजावीत. शिक्षण हे चारित्र्य निर्मितीचे सर्वात महत्वपूर्ण साधन आहे.

स्वतंत्रजेच्या भावनेचा विकास : गांधींजीच्या मतानुसार शिक्षण हे व्यक्तीस स्वतंत्र करण्याचे साधन आहे. ''सा विद्या या विमुक्तये'' यावर गांधीजींचा पूर्ण विश्वास होता. मुक्त स्वातंत्र्य म्हणजे स्वतंत्रता नव्हे. स्वातंत्य म्हणजे स्वैराचार नव्ह . ते अनुशासित सवतंत्रजेचे प्रबळ प्रवर्तक होते. शिक्षणातून स्वयंशिस्त निर्माण व्हावी.

अध्यात्मिक विकास : शिक्षणाचे अंतिम ध्येय व जीवनाचे अंतिम ध्येय यात गांधीजींनी फरक मानला नाही. त्यांनी जीवनाचे अंतिम ध्येय **व्यक्ती**चा अध ात्मिक विकास होय असे सांगितले आहे. या ध्येयाच्या प्रकाशातच व्यक्तीने आपल्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक व अन्य सर्व व्यवहारांची दिशा निश्चित केली पाहिजे. बालकाचा अध्यात्मिक विकास शिक्षणातून व्हावा. गांधीजी केवळ आदर्शवादी नव्हते तर ते व्यवहारावादीही होते. ते भौगोलिकता व अध्यात्मिकता यांचा समन्वय साधणारे होते. समन्वयवादी होते.

(३) अभ्यासक्रम : गांधीजींच्या मते पाठ्यक्रमात खालील विषयांचा समावेश व्हावा.

(१) मूलाद्योगी हस्तकला : कृषी, सूतकताई, विण**काम,** सुतार धातूकाम, मातकाम, बागकाम इ.

(२) मातृभाषा : केवळ मातृभाषेचेच शिक्षण द्यावे असे नव्हे तर सर्व शिक्षण मातृभाषेतून द्यावे.

(३) गणित : गणिताचे दैनंदिन जीवनोपयोगी ज्ञान द्यावे.

(४) सामाजिक अभ्यास : भूगोल, इतिहास, नागरिकाशास्त्र, या विषयाच्या अध्ययनातून मूल समाजाविषयीचे ज्ञान मिळविते. यातून सामाजिक उत्तरदायित्व च्या भावनेचा विकास होईल. त्यास समाज कर्तव्याची जाणीव व्हावी.

(५) सामान्य विज्ञान : सामान्या विानाच्या अभयासाने निसर्गाचे ज्ञान होते. वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होतो.

(६) शारीरिक शिक्षण : शारीरिक शिक्षण हे व्यायाम शिक्षणाचे प्रमुख अंग असावे.

(७) चित्रकला व संगीत : भावनांच्या अभिव्यक्तीसाठी, सौंदर्यसृष्टी विकसित करण्यासाठी संगीत व चित्रकलाही शिकवावयास हवी.

(४) अध्ययन अध्यापन पद्धती : गांधीजींनी पुढील तीन पद्धतींची शिफारस केली.

(१) कृतिद्वारा शिक्षण (२) स्वानुभवातून शिक्षण (३) समावायातूनच शिक्षण

कृतिद्वारा शिक्षण : गांधीजी म्हणत, ''खरे बौद्धिक **शिक्षण** हे रीरावयांच्या हात, पाय, डोळ,

नाक इत्यादींच्या योग्य वापरातून होऊ शकते.

स्वानुभवातून शिक्षण : गांधीजी स्वानुभवातून शिक्षण असावे असे म्हणत. मूल जितके अधिकाधिक अनुभव घेईल तिके त्याचे ज्ञान अधिक व्यापक होईल. म्हणून अनुभवातून शिक्षण व्हावे. हे अनुभव जीवनाभिमुख असावेत.

समवायातून शिक्षण : शिक्षणाच्या निरनिराळ्या विषयामध्ये व त्यातून शिक्षण आणि जीवन यामध्ये समवाय प्रस्थापित व्हावा असे गांधी म्हणतात. विषयांचे पृथक ज्ञान देण्याऐवजी ज्ञान हे एकसंघ आहे ह्याची जाणीव शिक्षकास असावी.

(५) शिक्षकांचे स्थान : महात्मा गांधी बालकेंद्रित शिक्षणाचे समर्थक होते. त्यांनी नेहमी शिक्षणकेंद्रित शिक्षणास विक्षरोध केला. गांधीजींच्या तत्वानुसार शिक्षण प्रक्रियेत शिक्षकांचे स्थान मार्गदर्शक, मित्र असे आहे. शिक्षकाने बालकाच्या सर्वांगिण विकासाबाबत जागरूक रहावे असे ते म्हणत. शिक्षक सहिष्णू, धैर्यशील, त्यागी व उदारहृदयी असावा.

(६) शिस्त : शिस्तीविषयी गांधीजी म्हणतात की, ‘‘छक्ीने निर्माण होते ती शिस्त नव्हे. आत्मबलावर आधारित स्वयंशिस्त हीच खरी शिस्त, शिक्षकाच्या अंगी अशी स्वयंशिस्त असेल तरच तो आपल्या विद्यार्थ्यांत ती संक्रमित करू शकेल.

(७) स्त्री शिक्षण : गांधीजी स्त्री व पुरूष यांना समान समजत. त्यांच्या मते स्त्रीयांच्या उन्नतीसाठी त्यांना शिक्षण हवे. त्यांना यथोचित शिक्षण हवे. त्यांना कौटुंबिक कर्तव्य पार पाडण्यासाठी व सामाजिक कर्तव्य पार पाडण्यासाठी शिक्षण हवेच. त्यांच्या शिक्षणाची विशेष व्यवस्था हवी.

(८) प्रौढशिक्षण : गांधीजींच्या मते समाजोन्नतीसाठी प्रौढ शिक्षणाची अतिशय आवश्यकता आहे. मूलोद्योगी शिक्षण केवळ बालकांचेसाठीच नव्हे तर त्यांच्या पालकांसाठीही हवे. प्रौढ शिक्षणातून जनतेस अज्ञानाच्या अंधकारातून प्रकाशाकडे नेता येईल.

शिक्षणतज्ज्ञ या नात्याने महात्माजींनी १९३७ मध्ये आपले शिक्षण विषयक विचार मांडले. त्याच साली डॉ. झाकीर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली वर्धा येथे एक समिती नेमण्यात आली. या समितीने गांधीजींच्या विचारांचे सूत्र धरून एक शित्रक्षण योजना तयारकेली. हीच वर्धा शिक्षण योजना किंवा मूलोद्योगी शिक्षण योजना होय.

मूलोद्योगी शिक्षण योजनेची वैशिष्ट्ये : वर्धा शिक्षण यो नेची किंवा मूल द्योगी शिक्षण योजनेची महत्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

(१) सक्तीपचे व मोफत शिक्षण : या योजनेनुसार ७ ते १४ वयोगटातील मुलामुलीना सक्तीचे व सोफत शिक्षण देण्यावर भर आहे. सर्वांचे कमीत कमी प्राथमिक शिक्षण होणे अत्यावश्यक समजण्यात यावे.

(२) व्यवसाय हे शिक्षणाचे केंद्रबिंदू : एखादा व्यवसाय किंवा उत्पाद कार्य हे शिक्षणाचे माध्यम व्हावे अशी शिफारस समितीने केली. व्यवसाय केंद्रबिंदू समजून त्या भोवती सर्व विषय शिकवावेत. निरनिराळे विषय शिकविताना सहाकर, नियोजन, काटेकोरपणा, वैयक्तिक जबाबदारीची जाणीव विविध गुणांच्या विकासावर भर द्यावा असे समितीने

सुचविले.

विद्यार्थ्यांच्या क्रियाशीलतेला चालना मिळून त्याचा मानसिक विकास व्हावा तसेच शिक्षणाचा जीवनाशी संबंध जाडून ते जीवनोपयोगी व्हावे अशी समितीची शिफारस होती.

(३) समवायाचे तत्त्व : मूलोद्योगी शिक्षण पद्धतीचे एक वैशिष्ट्य म्हणजे समवायाचे तत्त्व होय. ज्ञानाच्या एकात्मतेचा अनुभव मुलांना यावा. सर्व ज्ञान एकच आहे, अभ्यासाच्या सोईसाठी त्याची विभागणी विविध विषयात केली आहे. हा विचार मुलांमध्ये रुजावा म्हणून समवायाचा तत्वाचा आग्रह गांधीजींनी धरला. शिकविताना एका विषयाचा दुसऱ्या विषयाशी तसेच जीवनाशी असणारा संबंध सांगणे म्हणजेच समवाय साधणे होय.

(४) स्वाश्रयाचे तत्त्व : मूलोद्योगी शिक्षण पद्धतीचे स्वावलंबी किंवा स्वाश्रमी शिक्षण हे महत्वाचे तत्त्व आहे. शाळेत जे उत्पादन निघते ते विकून त्यांच्या विक्रयातून शाळेचा खर्च भागवावा म्हणजेच शाळा स्वाश्रयी असावी असे गांधीजींचे मत होत .

(५) सामाजिक व नैतिक विकासाची सोय : विद्यार्थ्यांमेध्ये समाजस वा दृष्टिकोन विकसित व्हावा असे योजनेत अपेक्षित आहे. या योजनेत गांधीजींचे आवडते अहिंसा तत्व गुंफलेले आहे. सुयोग्य व आदर्श नागरिकत्व रूजावे म्हणून प्रयत्न आहे. सामाजिक तिथ्या, राष्ट्रीय उत्सव, ग्रामसफाई, साक्षरता प्रसार, सहली, भेट सामुदायिक प्रार्थना तसेच सामाजिवक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा अंतर्भाव म्हणून करण्यात आला आहे. शाळा व समाज यांचा संबंध वाढविण्यावर भर आहे.

(६) मूलोद्योगी शिक्षण योजनेचा अभ्यासक्रम : (या अगोदरच्या प्रश्न तील अभ्यासक्रम हा मुद्दा पहावा.)

(७) मुलोद्योगी शिण योजनेतील अध्ययन अध्यापन पद्धती : (**या** अगोदरच ा प्रश्नातील अभ्यासक्रम हा मुद्दा पहावा.)

मूलोद्योगी शिक्षण योजनेचे मूल्यमापन : कोणतीही शिक्षण योजना ही निर्मात्याच्या जीवनविषयक जत्त्वज्ञानातून निर्माण होते. गांधीजींना अध्यात्मावर आधारलेले, कमीतकमी गरजावर आधारलेले त्यागमय संपन्न जीवन अपेक्षित होते. त्यांन विशिष्ट प्रक रची समाजरचना अपेक्षित होती. ज्या समाजात औद्योगिकरणाचा अतिरेक नसेल, जीवन यंत्राधीन नसेल,वर्गविरहित समाज असेल, हस्तव्यवसाय आणि कुटीरोद्योगांचा भरपूर व व असेल, प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण असेल असा समाज गांधीजींना अपेक्षित होता. अशा समाज निर्मितीसाठी व सामाजिक क्रांतीसाठीच मूलोद्योगी शिक्षणाची योजना होती.

या योजनेला सुरुवातीला चांगला प्रतिसाद मिळाला यात असलेले 'व्यवसाय केंद्र तत्त्व' आणि 'स्वाश्रयी तत्व' या दोन गोष्टी वगळता ही अत्यंत चांगली योजना आहे असे तिच्या टीकाकारांचेही मत होते.

दुर्दैवाने मूलोद्योगी शिक्षण योजना फारशी यशस्वी ठरली नाही. याची कारणे म्हणजे

विविध प्रकारच्या हस्तव्यवसायांची योजना झाली नाही. केवळ कताई विणाई या पुरतेच शिक्षण राहिले. समजून उमजून योजनेची अंमलबजावणी झाली. गांधीजींना अपेक्षित नसलेल्या काही गोष्टीही त्यांच्या नावावर घुसडण्यात आल्या. वैचारिक गोंधळ वाढले. स्वाश्रयी योजनेवर वादंग झाले. या सर्वांचा परिणाम म्हणून शासनाने ी योजना बंद केली. मूलोद्योगी योजना आपल्या देशातून बंद झाली तरी गांधीजींनी सांगितलेल्या शैक्षणिक तत्वांचा अवलंब आज शिक्षण क्षेत्रात सर्वत्र आहे. कृतीतून शिक्षण, व्यवसायास महत्व या कल्पनाही आपण स्वीकारल्या आहेत. कार्यानुभव व समाजसेवा आज आवश्यक विषय आहेत. गांधीजींनी शिक्षणालापुस्तकी अभ्याक्रमाच्या जोखडातून बाहेत काढून त्याला कृतीची व व्यावसायिक शिक्षणाची जोड दिली. शिक्षणास जीवनभिमुख बनविले यातच या मूलोद्योगी पद्धतीचे महत्व सामाविले आहे.

## ४.२.२.३ डॉ. राधाकृष्णन सर्वपल्ली

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ या दिवशी तिरुपतीजवळ असणाऱ्या तिरुत्तानी या आंध्र प्रदेशातील एका खेडेगावात झाला. त्यांचे शिक्षण तिरुत्तानाची प्राथमिक शाळा, ल्यूथरन मिशन स्कूल, वेलोरचे व्हूरिस कॉलेज आणि मद्रासच्या ख्रिश्चन कॉलेज येथे झाले. त्यांची घरची आर्थि परिस्थिती बेताचीच होती, पण ती त्यांच्या शिक्षणाआड आली नाही.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी ज्या वेळेला वैज्ञानिक प्रगती परमोच्च स्थानावर होती, त्यावेळेला जगाला आपल्या तत्त्वज्ञानाने मुग्ध करुन टाकणाऱ्या अध्यात्मिक नेत्यांमध्ये डॉ. राधाकृष्णन यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.ते म्हणत, ‘पक्ष्यांप्रमाण हवेत उड्डाण आणि माशांप्रमाणे पाण्यात पोहायला शिकल्यानंतर आता आम्हांल मनुष्याप्रमाणे जमिनीवर चालायला शिकता आलं पाहिजे.’ मानवतेच्या आवश्यकतेवर भर देताना ते म्हणतात, ‘मानवाचा दानव बनणं, हा त्याचा पराभव आहे, मानवाचा महामानव होणं हा त्याचा चमत्कार आहे आणि मानवाचा मानव होणं हा त्याचा विजय आहे.’ ते आपल्या संस्कृती आणि कलेविषयी आत्मियता बाळगणारे महान अध्यात्मिक राजकीय नेते होते. ते सर्व धर्मावलंबियांविषयी अत्यंत आदर भाव राखून होते.

त्यांनी कित्येक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संघटना, शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. १९०९ मध्ये ते चेन्नईमध्ये एका कॉलेजात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. यानंतर काही काळापर्यंत ते आंध्र विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून काम पाहिले. १९४८-४९ मध्ये युनेस्कोच्या एग्जीक्यूटीव्ह बोर्डाचे अध्यक्ष म्हणून काम केल्यानंतर १९५२-६२ या कालावधीत ते भारताचे उपराष्ट्रपतीही होते. देशाला एका तत्त्वज्ञ मार्गदर्शकाची गरज लक्षात घेऊन स्वातंत्र्याच्या प्रारंभ काळात काँग्रेसची ज्येष्ठ मंडळी संविधान सभेचे सदस्य होण्यास पाचारण करण्यास त्यांच्याकडे गेले. त्यांना राजकारणात रस नव्हता. पण पंडीत नेहरु यांच्या आग्रहाखातर त्यांच्या सान्निध्यात आले. सरळ अंगकाठी, पाणीदार डोळे, कोट-धोतर-फेटा असा पेहराव, रुबाबदार व्यक्तिमत्त्व, प्रभावी वकृत्व, असामान्य भाषा प्रभुत्व अशा थाटात ते पहिल्यांदा रशियाला गेले. त्यांना रशियातील भारतीय वकील म्हणून पाठविण्यात आले. आचारविचार

आणि रीतीभाती या बाबतीत आपले भारतीयत्व सांभाळून रशियन समाजात वावरणारा हा विलक्षण माणूस पाहून अनेक पत्रकारांनी त्यांच्याविषयी चित्रविचित्र आणि प्रसंगी सचित्र बातम्या दिल्या. परखड आणि सत्य बोलणारे म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांच्या विद्वत्तेवर स्टेलिनसुद्धा भाळला होता. दहा वर्षाच्या उपराष्ट्रपती पदानंतर ते १९६२ मध्ये भारताचे राष्ट्रपती या सर्वोच्च पदाचे मानकरी ठरले. ते १९६७ पर्यंत या पदावर होते.

डॉ. राधाकृष्णन यांनी तत्त्वज्ञान आणि संस्कृतीवर अनेक ग्रंथाची रचना केली. यात 'द फिलॉसफी', 'एन आयडियलिस्ट व्ह्यू ऑफ लाईफ', हिंद व्ह्यू ऑफ लाईफ' आदि प्रमुख ग्रंथांचा समावेश आहे. 'भारतीय संस्कृती', सत्य की खोज' आणि 'संस्कृती तथा समाज' ही हिंदी अनुवादीत त्यांची लोकप्रिय व महत्त्वपूर्ण पुस्तके आहेत.

त्यांच्यातील तत्त्वचिंतकाची, कर्तृत्वाची दखल जगभरातल्या अनेक संघटना, विद्यापीठांनी आणि संस्थानी घेतली. त्यांच्या शंभरहून अधिक जगभरातल्या विद्यापाठांनी डॉक्टरेटची उपाधी देऊन उचित गौव केला आहे. यात हॉवर्ड विद्यापीठ आणि ओवर्लिन कॉलेजचाही समावेश आहे. १९५४ मध्ये भारत सरकारने त्यांचा 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब देऊन सन्मान केला. त्यांना विविध देशांमध्ये भारतीय व पाश्चात्य देशांच्या तत्त्वज्ञानावर व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित केले जात असे. सर्वपल्लींचा लौकिक देशात आणि विदेशात पसरला होता. ऑक्सफर्ड विद्यापीठाने 'हिंदूचा जीवनविषयक दृष्ट काने' या विषयावर त्यांची व्याख्याने आयोजित केली. पुढे ती ग्रंथरुपाने प्रसिद्ध झाली. आपल्या विचारांनी, कल्पनांनी आणि ओजस्वी मधुर वाणीने लोकांना मंत्रमुग्ध करण्याची त्यांच्यात दिव्याशक्ती होती. त्यांच्या राष्ट्रपती कालखंडात १९६२ मध्ये भारत-चीन आणि १९६५ मध्ये भारत-पाक युद्धे झाली. या दरम्यान त्यांनी आपल्या ओजस्वी वाणीने, विचारांनी त्यांनी भारतीय सैनिकांचे मनोधैर्य उंचावण्याची महत्त्वपूर्ण भूमिका निभावली.

त्यांचे प्रसिद्ध विचार होते, 'तत्त्वज्ञान एक सकारात्मक विद्या आहे. प्रत्येक व्यक्ती ईश्वराची प्रतिमा आहे. आंतरात्म्याचे ज्ञान कधीही नष्ट होत नाही. तत्त्वज्ञानचा उद्देश जीवनाची व्याख्या करण्याचा नाही तर जीवन बदलण्याचा आहे.

डॉ. राधाकृष्णन हे विसाव्या शतकातील एक मौलिक व देदिप्यमान व्यक्तिमत्त्व. शिक्षणक्षेत्रात तत्त्वज्ञान आणि भारतीय संस्कृतीचा समन्वय घडविण्यात त्यांचा अमूल्य असा वाटा आहे. शिक्षणाच्या माध्यमातून सर्वांगिण विकास, शिक्षणाशिवाय जनतेचा उद्धार नाही. शिक्षणामुळे व्यक्ती आत्मभानी होऊन त्यातूनव्यक्तीर्याविचा रा शी दिशा ठरते, हे त्यांचे शिक्षणविषयक चिंतन व तत्त्वज्ञान सर्वमान्य आहे. म्हणून त्यांच्या या शिक्षणविषयक कार्याबद्दल कृतज्ञता व आदर राखण्यासाठी त्यांचा ५ सप्टेंबर हा जन्मदिवस 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो.

शिक्षकांचे समाजात अनन्यसाधारण महत्त्व आहे, पण आजे हे पद सन्मानाचे नव्हे तर टिंगळटवाळीचा विषय बनून राहिले आहे. वास्तविक शिक्षक म्हणजे गुरु आणि गुरु शिष्याला साधना सांगून थांबत नाहीत, तर त्यांच्याकडून करवून घेतात. श्री शंकराचार्यांनी म्हटले आहे, ज्ञानदान देणाऱ्या गुरुला शोभेल अशी उपमा या त्रिभुवनात कोठेही नाही. भारतीय संस्कृतित

गुरु-शिष्य हे नाते पवित्र मानले जाते.

एक राजकारणी असूनही डॉ. राधाकृष्णन यांनी प्रामुख्याने शिक्षणतज्ज्ञ आणि तत्त्वज्ञानी हीच भूमिका निभाली. शिक्षणक्षेत्रातील योग्य मार्गदर्शन करणाऱ्या द्रष्ट्या नेतृत्वाची गरज राधाकृष्णन यांच्या कार्यामुळे भागली. त्यांनी मांडलेले तत्त्वज्ञान केवळ विशिष्ट शाखेचा अभ्यास व पुरस्कार करणारे नव्हते, तर त्याला सामाजिक हिताचे अधिष्ठान होते. त्यांनी आद्य शंकराचार्यांचा मायावाद स्वीकारला व तो संस्कारित आणि फेरमांडणी करुन मांडला. त्यांच्यावर विशेष कामगिरी न बजावल्याची टीका करण्यात आली. तरीही आधुनिक काळाला साजेशी केलेली त्यांची कामगिरी डोळ्यांआड करता येत न ही. 'इंडियन फिलॉसॉफी' या द्विखंडात्मक इंग्रजी ग्रंथातून व इतर लेख व्याख्यानांतून भारतीय तत्त्वज्ञानाचा बोध पाश्चिमात्यांना सुंदर शैलीत करुन दिला.

जगातील विविध धर्मग्रंथाचा सखोल अभ्यास करुन त्यांनी असा निष्कर्ष क ढला आहे की, एकच धर्म अनेक संप्रदायांमध्ये विभागला आहे. धर्म ही मानवजातीला जोडणारी शक्ती आहे, तोडणारी नाही. एखाद्या संप्रदायाने त्यांच्या खास रुढी - परंपरांना नष्ट न करता आग्रह वृत्तींचा व रुढींचा बंदिस्तपणा टाकून दिला पाहिजे. सध्याच्या अस्तित्ववादी संकल्पनेबद्दल त्यांना खास विश्वास नव्हता, म्हणून त्यांनी उपनिषदातील तत्त्वज्ञान हेच खरे अस्तित्ववादी तत्त्वज्ञान असल्याची भूमिका मांडली आहे. सर्व धर्मामधील सत्य एकच अ ल्याची वृत्ती हिंदू धर्माने अंगिकारली असून ती सातत्याने जोपासली. प्रत्येक धर्माच्या शिकवणूकीचा अभ्यास तत्त्वज्ञानाच होऊ शकतो. त्याचा अभ्यास देवशास्त्रात अपेक्षित नाही. कारण ज्ञानमीमांसेत सत्यज्ञान मिळण्याचे प्रत्यक्ष व अनुमान त्यांच्याप्रमाणे अंतप्रज्ञा हेही एक साधन असल्याचे ते मानतात. धर्मग्रंथाच्या ईश्वरी कर्तृत्वावर त्यांचे प्रामाण्य अवलंबून नसून ते त्यातील ऋषींच्या गूढ अनुभूतींवर असते, असे त्यांचे मत होते. हा दृष्टीकोन स्वीकारल्यावर धर्मचिकित्सा व प्रस्थापित धर्म मतांमध्ये समन्वय करता येतो. गौतम बुद्धांनी सांगितलेला अनात्मवाद व वेदांचा आत्मवाद (ब्रह्मवाद) यातील मते एकच आहेत, कारण बुद्धांनी 'मी' आणि 'माझे' ही वृत्ती निर्माण करणारा जीवात्मा नाकारला आहे. जीवात्मा अहंकारातून येतो. अहंकाराची बाधा सरल्यावर निर्वाण रुपातील परमशांती लाभते. त्यातूनच येणारा चैतन्याचा अनुभव म्हणजेच आत्म्याचा अनुभव हेच वेदान्ताला अभिप्रेत आहे. देह नष्ट होण्याआधीही व्यक्ती ईश्वराशी एकरुप होऊ शकते. अंतिम मोक्षाने (ब्रह्मनिर्वाण) हा जीवनमुक्त होऊ शकतो. यामुळे सायुज्य मुक्ती प्राप्त झालेले महात्मे इतर जीवांच्या उद्धारासाठी प्रयत्नशील असतात. उपनिषदांचे सार व सर्व शास्त्रांचे माहेर असलेल्या 'श्रीमद्भगवतगीता' या ग्रंथावरची त्यांची टीका उल्लेखनीय आहे. महाभारतकालीन परिस्थितीचा आढावा घेत व श्रुती-पुराणे यातील वचनांचा दाखला देत त्यांनी या महान ग्रंथांवरील टीका आपल्या ओघवत्या शैलीत लिहिल्यामुळे ती जिज्ञासूसाठी सूलभ आणि वाचनीय ठरली आहे.

'दर रेन ऑफ रिलीजन इन कंटेंपररी फिलॉसॉफी १९२०)' या ग्रंथात त्यांनी रामानुजाचे विशिष्ट अद्वैत मत व सगुण उपासना स्वीकारले आहे. 'इंडियन फिलॉसॉफी' (भाग पहिला - १९२३, भाग दुसरा - १९२७) या ग्रंथात आद्य शंकराचार्यांचा अद्वैतवाद स्वीकारल्याचे स्पष्ट होते. 'ऍन आयडियलिस्ट व्ह्यू ऑफ लाईफ' या ग्रंथात त्यांनी जीवनाचे समग्र तत्त्वज्ञान

विस्तृतपणे मांडले आहे. उपनिषदे, ब्रह्मसूत्री व भगवद्‌गीता या प्रस्थानत्रयी ग्रंथांच्या अधिकारी व्यक्तीला आचार्य म्हणत असल्यामुळे डॉ. राधाकृष्णन यांना 'आचार्य' ही पदवी तंतोतंत लागू पडते, कारण या तिन्ही ग्रंथांवर आपले अभ्यासपूर्ण भाष्य त्यांनी लिहिले आहे. त्यांच्या ग्रंथाचे अनुवाद केवळ भारतीय भाषांत नव्हे तेशींबदे ाषांतही झाल असून ते अभ्यासकांना उपयुक्त ठरले आहेत. मद्रास विद्यापीठात तसेच कलकत्ता येथील पंचम जॉर्ज विद्यापीठात त्यांनी काही काळ अध्ययन केले. आंध्र विद्यापीठ (१९३१-३५) व बनारस हिंदू विद्यापीठाचे (१९३९-४८) ते कुलगुरु होते. लंडनला पौरस्त्य धर्म व नीतीशास्त्राचे प्राध्यापक व १९२९ साली ते ऑक्सफर्ड येथील मँचेस्टर कॉलेजात तुलनात्मक धर्मशास्त्राचे प्राध्यापक होते. त्यामुळे जगातील प्रमुख तत्त्वज्ञानी आणि शिक्षणतज्ज्ञ म्हणून त्यांनी स्थान मिळविले.

रशियातील राजदूत असताना (१९४९-५२) स्टालीन यांनी त्यांना खास निमंत्रण देऊन त्यांची भेट घेतली होती. एवढे त्यांच्या विद्वत्तेबद्दल आकर्षण त्याकाळातील जगातील नेत्यांना होते, हे विशेष. १९५२-६२ पर्यंत ते भारताचे उपराष्ट्रपती होते त १९६२-६७ सालपर्यंत त्यांनी भारताचे राष्ट्रपतीपद भूषविले. १९५४ साली त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च पुरस्कार प्रदान करुन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

ऐहिक व पारलौकिक कल्याणाचा मार्ग दाखवणारे गतिमान विभूतीमत्व म्हणून राधाकृष्णन यांची आठवण सदैव राहिल. तीव्र चिकाटी व प्रखर बुद्धिमत्ता तसेच विविध क्षेत्रामध्ये भरीव योगदान देणारी राधाकृष्णनसारखी दुसरी व्यक्ती विसाव्या शतकाल झाली नाही.

स्वतंत्र भारतात (१९४८) पहिल्या शिक्षण आयोगाचे अध्यक्ष त्यांना नेमण्यात आले होते. यातच त्यांची शिक्षणाबद्दलची आस्था आणि तळमळ लक्षात येते. एका आदर्श शिक्षकाची व्याख्या त्यांनी आपल्या सेवाभावी कृतीतीस मा र मांडली. आपली अमोघ व अमूल्य ज्ञानसंपदा देणाऱ्या डॉ. राधाकृष्णनविषयक कृतज्ञता व्यक्त करावी तितकीच थोडकीच आहे.

### ४.२.२.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर :

#### अल्पचरित्र :

डॉ. भिमराव रामजी उर्फ बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भाततीलच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित असे विचारवंत व समाजसुधारक होते. त्यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेशातील महू या गावी महार जातीत झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण दापोलीत, माध्यमिक शिक्षण साताऱ्यात झाले. पुढे सयाजीराव गायकवाड ंच्या मदतीने कोलंबिया विद्यापिठात (अमेरिका) एम.ए. व पीएच.डी. या पदव्या मिळवून भारतात आले व बडोदा संस्थानात नोकरी करु लागले. पण तेथे अस्पृश्य म्हणून तुच्छतेने वागविले जात असल्याने त्यांनी ती नोकरी सोडली व मुंबईत सिडनेहॅमेजकॉले मध्ये प्राध्यापक बन . पुढे छ. शाहू महाराजांच्या सहकार्याने इंग्लडला जाऊन अर्थशास्त्रातील एम.एस्सी व बॅरिस्टर या पदव्या मिळविल्या व भारतात येऊन मुंबई हायकोर्टात वकिली व्यवसाय सुरु केला. नंतर मुंबईच्या सरकारी लॉ कॉलेजमध्ये प्रथम प्राध्यापक व नंतर प्राचार्य म्हणून काम केले. याच काळात त्यांनी आपल्या सामाजिक सुधारणा व कार्यास सुरुवात केली. अस्पृश्यांच्या उद्धारासाठी

विविध चळवळी व सत्याग्रह सुरु केले. आपल्या विचाराच्या प्रसारासाठी मूकनायक, बहिष्कृत भारत, समता व जनता अशी वृत्तपत्रे सुरु केली. तसेच बहिष्कृत हितकारणी सभा, स्वतंत्र मजूर पक्ष, ऑल इंडिया शेडूल्ड कास्ट फेडरेशन इत्यादीची स्थापना केली. १९२६ ते १९३६ पर्यंत ते मुंबई विधिमंडळाचे सदस्य होते. अस्पृश्यांचे प्रि निधी म्हणून ते गोलमेज परिषदेस हजर राहिले. महात्मा गांधीशी पुणे करार करुन अस्पृश्यांसाठी विधिमंडळात राखीव जागा मिळविली. व्हाईस रॉयच्या कार्यकारी मंडळात कामगार मंत्री म्हणून ही कामे केली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाचे पहिले कायदेमंत्री झाले. तसेच घटना मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून राज्यघटकना निर्मितीमध्ये महत्त्वाचे योगदान दिले. १९५६ मध्ये हिंदू धर्माचा त्याग करुन बौद्ध धर्म स्वीकारला. त्यानंतर अल्पावधीतच त्यांचे ६ डिसेंबर १९५६ ला निधन झाले. अशा ह्या लोकोत्तर पुरुषांचे शिक्षणविषयक विचार व कार्य तुम्ही अभ्य सणार आहात.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व हे अष्टपैलू होते. ते जसे समाजसुधारक, राजकारणी, अर्थशास्त्रज्ञ, घटनातज्ञ होते तसेच ते एक शिक्षणतज्ञ ही होते. ज्ञानाचे शिक्षणाचे महत्त्व त्यांना पुरेपुर उमगले होते. म्हणूनच त्यांनी विद्येला आपले दैवत मानून विद्येशिवाय माणसाला शांती नाही व माणुसकी ही नाही असे म्हणत. म्हणूनच त्यांनी शिक्षणाचे ध्येय, शिक्षणाचा आश, विद्यार्थी व शिक्षक कसे असावेत शिक्षणाचे महत्त्व इत्यादीबाबत आपले विचार मांडलेले आहेत. त्यांचे शिक्षणविषयक विचार पुढीलप्रमाणे मांडता येतात.

### १) शैक्षणिक तत्त्वज्ञान :

हजारो वर्ष अज्ञानाच्या अंधारता खितपत पडलेल्या आपल्या अस्पृश्य बांधवांना शिक्षण देऊन शहाणे केल्याशिवाय त्यांचा उद्धार होणार नाही. त्यांची गुलामगिरी संपुष्टात येणार नाही. याची बाबासाहेबांना जाणीव होती. म्हणून त्यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. आपले शिक्षण विषयक तत्त्वज्ञान स्पष्ट करताना ते म्हणतात, ''शिक्षण हे परिवर्तनाचे साधन आहे.'' शिक्षणामुळे मानवास आत्मसन्मान व सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होते. विविध सद्गुणांची प्राप्ती होते. त्यामुळे माणूस म्हणून सुखी जीवन कसे जगावे हे ळते. शिक्षणामुळे नव्या जगाची ओळख होते. प्रज्ञा, शिल व करुणा यांचा सुरेख संगम साधणारे शिक्षण व्यक्तीला दिले पाहिजे. त्यांनी मूल्याधिष्ठीत म्हणजेच नैतिक बैठक असलेल्या शिक्षणाचा पुरस्कार केला. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय ह्या लोकशाही मूल्यांवर अधारलेली समाजव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी लोकांना नैतिक शिक्षण दिले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. या संदर्भात ते म्हणतात, ''लोकशाही यशस्वी करावयाची असेल तर समाज नैतिक मूल्याधिष्ठित शिक्षणाद्वारे संस्कारित झाला पाहिजे. लोकशाहीसाठी सुशिक्षित समाजाची नितांत गरज आहे. शिक्षित, नैतिक व मूल्याधिष्ठीत समाजातील लोकशाही अधिक यशस्वी ठरते.

डॉ. बाबासाहेबांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन अत्यंत विधायक व रचनात्मक असा होता. समाजाचा सामाजिक, आर्थिक, राजकीय यांनी घडवून आणण्याचे साधन म्हणून ते शिक्षणाकडे पाहतात. त्यांनी आपल्या अनुयायांना ''शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा'' असा संदेश दिला. शिक्षणाद्वारे संघटन वाढले पाहिजे व संघटीतपणे अन्याय अत्याचाराविरुद्ध

संघर्ष केला पाहिजे तरच समाजात क्रांती घडून येईल असे त्यांना वाटत होते.

थोडक्यात शिक्षणाद्वारे समता, स्वातंत्र्य, बंधुत्व ह्या मूल्यांवर आधारलेली समाजरचना प्रस्थापित होऊ शकते. असे तत्त्वज्ञान त्यांनी मांडले. शिक्षणाद्वारे दलितांना स्वाभिमान, आत्मसन्मान व आम्मोद्वार साध्य करता येईल असा विश्वास त्यांना वाटत होता.

### २) प्राथमिक शिक्षणाविषयीचे विचार :

प्राथमिक शिक्षण हे पायाभूत शिक्षण आहे. बालमनावर सद्‌गुणांचे संस्कार करणे हा प्राथमिक शिक्षणाचा हेतू असावा असे बाबासाहेबांचे मत होते. ते म्हणतात ''प्राथमिक शिक्षणाचे खरे ध्येय हे व्यक्तीला केवळ साक्षर करणे हे नसावे तर खऱ्या अथ ने ती शिक्षित होऊन पुढील आयुष्यात देखील ज्ञान मिळवित राहिली पाहिजे.'' जे लोक पिढ्यान्‌पिढ्या अज्ञानी आहेत त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळत नाही. म्हणून प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे करावे. तसेच ते मोफत असावे असा त्यांचा आग्रह होता. ज्या लोकांना फी देणे शक्य आहे त्यांच्याकडून फी घेऊन गरीबांच्या शिक्षणाचा खर्च भागवावा, असा उपाय त्यांनी सुचविला. अज्ञान, अंधश्रद्धा, रुढी परंपरा, दारिद्र्य, शोषण इत्यादीने ग्रासलेल्या लोकांना मुक्त करण्यासाठी त्यांनी प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे असे त्यांना वाटे. तथापि तत्कालिन परिस्थितीत प्राथमिक शिक्षणाची मोठी हेळसांड होत होती. शिक्षणावर केवळ दरडोई चौदा आणे खर्च केला जात होता. चौथी इयत्तेपर्यंत सुमारे ८२% गळतीचे प्रमाण होते. म्हणजेच प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराच्या गती खूपच मंद होती म्हणून त्यांनी प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारने उचलली व हे शिक्षण सक्तीचे करावे असा विचार त्यांनी मांडला.

### ३) उच्च शिक्षणविषयीचे विचार :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उच्च शिक्षणाविषयी देखील आपले विचार मांडलेले आहेत. ब्रिटिश राजवटीच्या काळात उच्च शिक्षणाची स्थिती अत्यंत वाईट होती. त्यामुळे उच्च शिक्षणात धोरणात्मक व कार्यात्मक बदल झाले पाहिजेत असे त्यांना वाटे. विद्यापीठात प्रशासकांचे नव्हे तर विद्वान मंडळींचे वर्चस्व असावे. तेथे ज्ञानसंपादन व ज्ञान प्रसाराचे कार्य चालावे. विद्यापीठाने सामान्य जनतेच्या दरवाजापर्यंत उच्च शिक्षण पोहचवावे असे त्यांचे मत होते. विद्यापीठाने सामान्य जनतेच्या दरवाजापर्यंत उच्च शिक्षण पोहचवावे असे त्यांचे मत होते. विद्यापीठांचे मूल्यांकन हे केवळ ज्ञानसंपादनाच्या आधारे न करता त्यांच्या सामाजिक बांधिलकेच्या आधारे व्हावे असे त्यांना वाटे. विद्यापीठाने केवळ परीक्षा घेण्याचे कार्य न करता ती आधुनिक ज्ञानाची व विज्ञानाची केंद्रे व्हावीत. तसेच देशातील दीन–दलितांना व पिडीत वंचितांना उच्च शिक्षणाचा लाभ झाला पाहिजे असे त्यांना वाटे.

### ४) स्त्री शिक्षणाचा पुरस्कार :

बाबासाहेबांनी स्त्री शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केला. मुलांप्रमाणेच मुलींनाही शिक्षण द्यावे असा विचार त्यांनी मांडला. महाडच्या चवदार तळ्याच्या वेळी मनुस्मृतीचे दहन करताना स्त्रियांना उद्देशून ते म्हणतात की, मुलींना शिक्षण द्या. ज्ञान हे स्त्रीयांना ही आवश्यक आहे. मुली शिकल्या तरच भारताची भावी पिढी चांगली निर्माण होईल. स्त्री शिक्षणप्रसार

व्हावा म्हणून त्यांनी अनेक महिला परिषदांचे आयोजन करुन स्त्री शिक्षणविषयक ठराव संमत करुन घेतले. स्त्रियांना सक्तीचे व मोफत शिक्षण द्यावे त्यांच्यासाठी स्त्रियांना वेगळी वसतीगृहे असावीत असा त्यांचा दृष्टीकोन होता.

### ५) विद्यार्थी व शिक्षकाविषयीचे विचार :

बाबासाहेबांनी विद्यार्थी व शिक्षकाविषयी देखील आपले विचार मांडलेले आहेत. ते म्हणतात विद्यार्थी हा शिक्षणप्रक्रियेचा केंद्रबिंदू आहे. त्याचा सर्वांगिण विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय असते. विद्यार्थी कसा असावा हे स्पष्ट करताना ते म्हणतात, की विद्यार्थ्याला स्वत:ला शिक्षणाची आस्था असली पाहिजे. तसेच तो चारित्र्यसंपन्न ही असला पाहिजे. ज्ञान व चारित्र्यसंपन्न विद्यार्थीच योग्य–अयोग्यतेचा विचार करु शकतो. असे विद्यार्थी तयार झाल्यास समाज परिवर्तन त्वरित घडून येईल असा आशावाद ते व्यक्त करतात. विद्यार्थी त्यांचे कर्तव्य कसे पार पाडतात यावरच समाजाचे भवितव्य अवलंबून आहे असे ते म्हणतात.

शिक्षक कसा असावा हे स्पष्ट करताना ते म्हणतात की, शाळा हे पवित्र स्थान असून तेथे मुलांच्या मनावर सुसंस्कार केले जातात. तसेच चांगले ागरिक घडविणे ह शाळेचे कार्य आहे. हे कार्य पार पाडण्यासाठी समतोल बुद्धीचे, नि:पक्षपाती व थोर मनाचे शिक्षक असले पाहिजेत. ब्राह्मण लोकांना असे सांगतात, की शिक्षण घेणे हे तुमचे काम नव्हे, तुमचे काम मजूरी करणे हे आहे. शिक्षण फक्त ब्राह्मणानेच घ्यावे म्हणू ब्राह्मणांच्या हाती शिक्षणाची सुत्रे देवू नयेत म्हणजेच त्यांना शिक्षक करु नये असे बाबासाहेब म्हणतात.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक योगदान किंवा कार्ये :

पारंपारिक भारतात स्त्रिया व अस्पृश्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे ते अडाणी, दरिद्री व सामाजिक सांस्कृतिकदृष्ट्या अप्रगत राहिले. उच्च जातींनी त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेवून त्यांच्यावर गुलामगिरी लादली. स्त्रिया व अस्पृश्यांच्या गुलामगिरीच्या शृंखला तोडण्यासाठी त्यांना शिक्षण देणे आवश्यक आहे हे ओळखून बाबासाहेबांनी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. त्यांचे शिक्षणक्षेत्रातील योयो न पुढीलप्रमाण –

### १) बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना :

दलितोद्धार करण्यासाठी स्थापन केलेल्या (१९२४) या सभेने दलितांच्या शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. दलित विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, ंथालये, अभ्यासकेंद्रे, औद्योगिक व शेतीशाळा सुरु करण्याचे उद्दिष्टे ठेवले ानुसार सा लापूर येथे वसतिगृह सुरु करुन दलित विद्यार्थ्यांना निवास, भोजन, कपडे, शिक्षणसामुग्री अशा सुविधा पुरविल्या. या वसतिगृहास सोलापूर नगरपालिकेकडून अनुदानही मिळविले. दलित विद्यार्थ्यांना ज्ञानप्राप्ती व्हावी म्हणून या सभेने 'सरस्वती विलास' नावाचे एक मासिक सुरु केले व मनोरंजनाचे हिडिस प्रकार इत्यादी पासून दलितांना दूर ठेवण्यासाठी व त्यांचे मने विधायक कार्याकडे वळविण्यासाठी या सभेने 'महार हॉकी क्लब'' सुरु केला.

### २) शिक्षण संस्थेची स्थापना :

दलितांमध्ये शिक्षण प्रसार करण्यासाठी बाबासाहेबांनी दलित शिक्षणसंस्थाची १९२८ मध्ये स्थापना केली. माध्यमिक शिक्षण घेण्यास असमर्थ असलेल्या दलित विद्यार्थ्यांसाठी पाच वसतिगृहे सुरु करुन त्यासाठी मुंबई सरकारकडून वार्षिक ९०००/- रुपये अनुदान मिळविण्याची जबाबदारी या संस्थेने उचलली. पुढे सरकारी अनुदान कमी पडू लागल्यानंतर बाबासाहेबांनी मुस्लिम व पारशी धर्मदाय संस्थांकडून आर्थिक सहाय्य मिळविले.

### ३) पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना :

दलितासह सर्वच घटकांना शिक्षण देण्याच्या उद्देशाने बाबासाहेबांनी (जुलै १९४५) रोजी मुंबईत 'सिद्धार्थ कॉलेज' काढले. आपली शिक्षणसंस्था व महाविद्यालये च लविण्यासाइी बाबासाहेबांनी शिक्षण प्रेमी असलेल्या विद्वानांना पाचारण केले. मराठवाड्यासारख्या मागास भागात स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी कथन केले होते. पुढे असे विद्यापीठ निघाले व त्यास बाबासाह बांचे नाव ण्यास जो ि रोध झाला त्यावरुन सर्वणांची दलितांविरोधी मनोवृत्ती अद्यापही टिकून असल्याचे दिसून आले.

### ९) इतर प्रश्न :

१९२७ मध्ये बाबासाहेबांनी प्राथमिक शिक्षणाची गती वाढावी म्हणून व शाळेतील गळतीची समस्या सुटावी म्हणून सरकारने प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे व त्यावरील खर्च वाढवावा अशा सूचना सरकारल्या केल्या. अस्पृश्यांच्या शिक्षणाविषयी सवर्णांना तळमळ नव्हती. अस्पृश्य विद्यार्थ्यांना ते घर भाड्याने देत सत दिलेच तर भरमसाठ भाडे घेत. अशावेळी बाबासाहेब अशा पिडीत विद्यार्थ्यांच्या मदतीस येत व त्यांची व्यवस्था लावून देत. सरकारी आज्ञा असूनही सवर्ण जातीचे शिक्षक अस्पृश्य मुलामुलींना शाळेत प्रवेश देत नसत. दिल्यास वर्गाबाहेर बसवित. फेकून छडी मारीत. अशा साध्यासाध्या समस्यांवरही बाबासाहेबांनी लढे उभारले.

अशाप्रकारे बाबासाहेबांनी शिक्षण प्रसाराचे कार्य केले. पण त्यांचे हे कार्य केवळ दलित वर्गापुरते मर्यादित नव्हते. स्त्रिया, कामगार, शेतकरी व अन्य पीडीतग्रस्तांच्या शिक्षणासाठीही त्यांनी प्रयत्न केले. आंबेडकरांच्या शिक्षणप्रसाराच्या कार्याने दलित चळवळीचा उदय झाला. प्रारंभी ही चळवळ केवळ मयार जाती पुरतीच मर्यादित होती. पुढे जसजसा शिक्षणप्रसार होऊ लागला तसतसे इतर दलित जातीजमाती ही संघटीत होऊन आपल्या न्याय हक्कासाठी संघर्ष करु लागल्या.

# घटक – ५

## स्वतंत्र भारतातील शिक्षणाची रचना

**अनुक्रमणिका**


**अ) उद्दिष्टे**

**ब) प्रास्ताविक**

**क) विषय विवेचन**

**क १ शिक्षण आयोग**

**क.२ कार्यक्रम व धोरणे**

**क.३ आर्थिक सुधारानंतरची आव्हाने**

**क.४ आधुनिक भारतातील शिक्षण व्यवसाय**

**ड) स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**इ) सारांश**

**फ) क्षेत्रीय कार्य**

**ग) पारिभाषिक शब्द /शब्दार्थ**

**ह) संदर्भ सूची**


### अ) उद्दिष्ट्ये :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय शिक्षणाची खऱ्या अर्थाने पुनर्रचना करण्यात आली. स्वतंत्र भारताच्या नवीन आशा–आकांक्षा, नवीन आवश्यकता व संविधानातील नवीन उद्दिष्टांच्या प्राप्तीच्या दृष्टीने ही पुनर्रचना आवश्यक होती. भारतीय संविधानाच्या ध्येय–धोरणांचा पाठ पुरावा करण्यासाठी तसेच भारतीय समाजाला विकासाची वाटचाल करण्यासाठी शिक्षण हे एक महतवाचे साधन आहे. त्याची उपयुक्तता घटनाकरांनी तसेच तत्कालीन धुरीण मंडळींनी ओळखली होती. त्या दृष्टीने शिक्षणाची व्यवस्था व ब्रिटीश सत्तेने केलेल्या शिक्षणाच्या रचनेत बदल करून स्वतंत्र भारतातील स्वतंत्र नागरिकांचया आशा–आकाक्षांचा वेध घेणाऱ्या शिक्षणाची नव्याने रचना केली. टप्याटप्याने व काल सुसंगत असा बदल वेळो वेळी तिच्यात केल गेला. आज ही ही शैक्षणिक पुनर्रचनेची प्रक्रिया सुरूच आहे. ह्या पनर्रचनेचाच आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत घटकात केलेला आहे.

ह्या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शिक्षण व्यवस्थेच्या पुनर्रचनेसाठी भारत सरकारने स्थापन केलेल्या विविध आयोगांपैकी काही महतवच्या आयोगांची माहिती प्राप्त होईल.

भारत सरकारने शिक्षण प्रसादार्थ राबविलेल्या विविध कार्यक्रम आणि धोरणांचा परामर्श

घेता येईल

भारताने राबविलेल्या आर्थिक सुधार कार्यक्रमांचा शिक्षण व्यवस्थेवर काय परिणाम झाला? शिक्षण व्यवस्थेसमोर केणती आव्हाने उभी राहिलीत? य चा आढावा घेता येईल.

आधुनिक भारतातील शिक्षण व्यवसाय कसा आहे हे जाणून घेता येईल.

## ब) प्रास्ताविक :

समाज विकासाच्या वाटचालीत आहे. भारताला प्रगतीचे सर्वोच्च शिकर गाठावयाचे असेल आणि निरामय समाज जीवनाचा अनुभव घ्यवयाचा असेल तर शिक्षणाला पर्याय नाही. व्यक्तीच्या वैयक्तिक तयाचप्रमाणे संपूर्ण समाजाच्या समाजिक आकांक्षांची पूर्तता शिक्षणाद्‌वारेच करता येते. शिक्षण हे विकासाबरोबरच समाज परिवर्तनाचे देखील महत्वाचे साधन आहे. म्हणून भारतीय समाजातील तळा गाळातील अगदी शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचावे, त्याचा उत्कर्ष व्हावा व पर्यायाने भारताचा उत्कर्ष व्हावा ही तळमळ स्वातंत्र्य लढ्यातील व स्वतंत्र भारताच्या धुरिण अशा नेतृतवाची हेती. य साठीच शैक्षणिक प्रसार-प्रचार, शैक्षणिक विकास व समाज परिवर्तन यांच्या दृष्टीने शैक्षणिक आराखडा तयार करण्याचे काम स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळात प्राधोन्योने केल गेले. भारतीय लोकशाही रूजविण्याचे प्रभावी माध्यम म्हणून देखील शिक्षणाकडे पाहिले गले व त्या दृष्टीने देखील विविध शैक्षणिक कार्यक्रम आणि ध्येय धोरणांचा आराखडा देखील तयार करण्यात आला. हा आराखडा कालबध्द रीतीने राबविण्यासाठी व विशिष्ट कालांतर्गत शिक्षणाचे विशिष्ट उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी विविध योजना राबविण्यात आल्या.

बारत सरकारने तयार केलेल्या शैक्षणिक धोरणांच्या अंमलबज वणीस ठी विविध समित्य, आयोग यांची स्थापना करण्यात आली. त्यांनी आपल्या शिफारशी, सूचना, परीक्षणे यांच्याद्‌वारे भारतीय शिक्षण व्यवस्थेला अद्ययावत ठेवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात सुधारणांचे विविध कार्यक्रम राबविले गेलेत. ह्या सर्व सुधारणांमध्ये शिक्षणाची भूमिका मध्यवर्ती आहे. १९९१ नंतर भारतात आर्थिक सुधार कार्यक्रत राबविण्यास आरंभ झाला. जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण ह्या प्रक्रियांच्या माध्यमातून भारतीय शिक्षणव्यवस्थेसमोर अनेक नवीन आव्हाने उभी र हिलीत. दळणवळणाच्या साधनांत व संगणकीय क्षेत्रात झालेल्या अफाट क्रांतीचा शिक्षण क्षेतावर विलक्षण परिणाम झाला. त्यामुळे आधुनिक काळातील शिक्षण, त्याचे स्वरुप, उद्दिष्टे, अध्यापन तंत्रे, पद्धती, शिक्षक, शिक्षकाचे समाजातील स्थान, इ. मध्ये देखील मोठा बदल झाला. अशा सर्व मुद्यांचा परामर्श पुढील विवेचनाच्या आधारे घेऊ या.

## क) विषय विवेचन :

### क. १ शिक्षण आयोग (Education Commissions) :-

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाने' दोन शिक्षण आयोगांची स्थापना करण्याचे निश्चित केले. त्यापैकी एक आयोग विद्यापीठ स्तरीय शिक्षणाच्या दृष्टीने

तर दुसरा माध्यमिक स्तरावरील शिक्षणाच्या दृष्टीने नियुक्त करण्यात आला होता. ह्या आयोगांच्या स्थापनेमागे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या बदललेल्या शिक्षणविषयक गरजा ओळखून त्यांची पूर्तता करण्याचा प्रमुख उद्देश होता. त्यादृष्टीने भारतीय शिक्षण व्यवस्थेची पुनर्रचना करण्यास प्राधान्य देण्यात आले होते. भारताच्या स्वातंत्र्यलढ्य दरम्यान लोकांना शिक्षण क्षेत्राविषयी दिलेल्या वचनांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने उचललेले हे पहिले पाऊल होते. वयाच्या चौदाव्या वर्षांपर्यंत सर्वांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याच्या मुद्यावर घटनापीठात चर्चा होऊन त्यासंबंधीचे निर्देश राज्यधोरणांच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये समाविष्ट करण्यात आलेत. त्यादृष्टीने १९६० पर्यंत सार्वत्रिक अशा प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात यावे असे निश्चित केले गेले. त्याचबरोबर स्वतंत्र भारताच्या बदललेल्या गरजांच्या अनुषंगाने माध्यमिक व उच्च शिक्षणांतर्गत आवश्यक ते परिवर्तन करण्याचेदेखील सुनिश्चित केले गेले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या अगदी आरंभीच्या काळातील वरील पार्श्वभूमी लक्षात घेऊन नंतरच्या काळात भारत सरकारच्या वतीने काही शिक्षण आयोगांची स्थापना करण्यात आली. त्यांच्याविषयी पुढीलप्रमाणे जाणून घेऊ या !

### विद्यापीठ शिक्षण आयोग १९४८ :–

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली १९४८ साली विद्यापीठ शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. हाच आयोग 'डॉ. राधाकृष्णन कमिशन' म्हणून देखील ओळखला जातो. भारतातील विद्यापीठ शिक्षणाच्या प्रश्नांचा सांगोपांग विचार करणे हा या आयोगाच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देश होता. ह्या आयोगाने ज्या क्रांतीकारक शिफारशी केल्यात त्यापैकी महत्त्वाच्या शिफारशींमधील काही मुद्दे पुढीलप्रमाणेह्न

१) लोकशाहीस पोषक अशा शिक्षणाचे उद्दिष्ट देशातील व्यक्तींचा संपूर्ण विकास साधणे हेच राहील.

२) लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय ह्या लोकशाहीस पूरक तत्त्वांची प्राप्ती हीच उच्चशिक्षणाची ध्येये असतील.

३) भारताला विकसित राष्ट्रांच्या पंक्तीत स्थान प्राप्त करावयाचे असेल तर देशातील दीन-दुबळ्यांचा विशेष आस्थेने आपणांस विचार करावा लागेल.

४) सुशिक्षित व श्रमिक यांच्यातील अंतर कमी झाले पाहिजे आणि ग्रामीण भागातील बुद्धिमत्तेचा ग्रामीण भागाच्या विकासासाठी उपयोग केला गेला पाहिजे.

५) जात, धर्म, वर्ण हे भेदभाव लक्षात न घेता भातृभाव निर्माण करावा लागेल.

६) समकालीन समाजाच्या व्यावसायिक, औद्योगिक व तांत्रिक गरजा ओळखून त्यांची तातडीने पूर्तता केली गेली पाहिजे. त्यादृष्टीने प्रत्येक प्रांतामध्ये किमान जिल्हास्तरावर एक अशा भरपूर संख्येने व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था स्थ पन करायला हव्यात अशी आम्ही जोरदार शिफारस करतो.

## १९४८ ची ताराचंद समिती :-

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर माध्यमिक स्तरीय शिक्षणाचा विचार करण्यासाठी १९४८ साली ताराचंद समिती नेमण्यात आली होती. ह्या समितीने १९३९ साली आचार्य नरेंद्र देव समितीने केलेल्या शिफारशींचा अभ्यास करून पुढील शिफारशी केल्यात.

१) माध्यमिक विद्यालये बहुउद्देशीय केली जावीत.

२) संपूर्ण माध्यमिक शिक्षणाच्या व्यवस्थेचे मूल्यमापन करण्यासाठी आयोग नेमण्यात यावा.

## आचार्य नरेंद्र देव समिती १९५२ :-

ताराचंद समितीने आपल्या शिफारशी भारत सरकारला सादर केल्यानंतर चार वर्षांनी म्हणजेच १९५२-५३ मध्ये पुन्हा आचार्य नरेंद्र देव यांच्या अध्यक्षतेखाली माध्यमिक शिक्षणाचा विचार करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली. ह्या समितीने पुढील शिफारशी केल्या.

१) बहुउद्देशीय शाळांची स्थापना करण्यात यावी.

२) माध्यमिक शिक्षण अधिक व्यवहाराभिमुख करण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रम अधिकाधिक व्यावहारिक करणे गरजेचे आहे.

३) आर्थिक विकास लक्षात घेऊन माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात व्यावसायिक शिक्षणाचा समावेश व्हावा.

४) मुलांचे व्यक्तीभेद जाणण्यासाठी मानसिक परीक्षण करण्याची व व्यावसायिक शैक्षणिक मार्गदर्शन करण्याची सुविधा निर्माण करण्यात यावी.

आचार्य नरेंद्र देव समितीच्या वरील महत्त्वपूर्ण शिफारशींना अधिक व्यापक रूप देण्यासाठी त्याच वर्षी डॉ. लक्ष्मण स्वामी मुदलियार यांचे अध्यक्षतेखाली माध्यमिक शिक्षण आयोग नेमण्यात आला.

## माध्यमिक शिक्षण आयोग १९५२ :-

१९५२ साली मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय माध्यमिक शिक्षणाचे मूल्यमापन करण्यासाठी 'माध्यमिक शिक्षण आयोग १९५२' स्थापन करण्यात आला. ह्या आयोगाने १९५३ मध्ये आपला अहवाल भारत सरकारला सादर केला. ह्या अहवालात अनेक महत्त्वपूर्ण शिफारशी करण्यात आल्या होत्या. त्यांपैकी काही प्रमुख शिफारशी पुढीलप्रमाणे:-

१) अभ्यासक्रमाचे (माध्यमिक) विभिन्नीकरण करण्यात यावे. एक भाग अनिवार्य विषयांचा तर दुसरा भाग वैकल्पिक विषयांचा असावा.

२) उच्च स्तर माध्यमिक वर्षास महाविद्यालयाचे एक वर्ष जोडावे.

३) ग्रामीण भागातील विद्यालयांतून कृषी, पशू व उद्यान विज्ञान शिक्षण व फुटीरोद्योगांची

सोय व्हावी.

४) पाठ्यपुस्तक निवड मंडळ असावे.

५) बौद्धिकांबरोबरच कार्य व योजना कौशल्ये यांना योग्य स्थान असावे. अभ्यासक्रम त्यादृष्टीने तयार केला जावा.

६) विद्यार्थ्यांना व्यावसायिक मार्गदर्शन देण्याची व्यवस्था हवी.

वरील शिफारशींबरोबरच अध्यापक प्रशिक्षण, शालेय प्रशासन, परीक्षा या पैलूंवरदेखील आयोगाने लक्ष वेधले आहे.

शासनाने वरील शिफारशी स्वीकारून त्यांची अंमलबजावणी केल . तथापि, देशातील सर्व राज्यांमध्ये ह्यासंबंधी एकवाक्यता दिसून आली नाही. संपूर्ण भारतातील सर्व स्तरांवरील शिक्षणाचा पुनर्विचार करण्यासही भारत सरकारने १९६४ साली कोठारी आयोग नेमला.

## कोठारी आयोग (१९६४–६६) :–

देशातील सर्व शिक्षणाचा साकल्याने विचार करून भारतीय शिक्षण व्यवस्थेस एक प्रकारचा नवीन आराखडा उपलब्ध करून देणारा आयोग म्हणून कोठारी आयोगाकडे पाहिले जाते. डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली ह्या आयोगाची स्थापना करण्यात आली होती. ह्या आयोगाच्या अहवालाच्या आधारेच 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८' ठरविण्यात आले होते.

कोठारी आयोगाने स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय शिक्षण व्यवस्थेचे परीक्षण करून निष्कर्ष मांडला की, ''भारतीय संविधानाने सुनिश्चित केलेली उद्दिष्टे आणि देशातील विविध क्षेत्रांना भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी भारतीय शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र आणि क्रांतीकारी स्वरुपाचे बदल करणे आवश्यक आहे.'' आयोगाच्या मते ह्या सर्वसमावेशक शैक्षणिक पुनर्बांधणीची तीन प्रमुख उद्दिष्टे आहेतह्न

१) आंतरिक सुधारणा

२) गुणवत्ता विकास

३) शैक्षणिक सुविधांचा विस्तार.

१) आंतरिक सुधारणा :–

कोठारी आयोगाच्या मते, 'कोणतीही सुधारणा ही तेवढी महत्त्वाची व निकडीची नाही जेवढे की शिक्षणास अधिकाधिक जीवनाभिमुख आणि लोकांच्या गरजा व आकांक्षांच्या पूर्ततेच्या दृष्टीने पूरक बनविणे आहे.

वरील दृष्टिकोनातून आयोगाने विज्ञान, शिक्षण, कार्यानुभव, व्यावसायिक शिक्षण, समाजातील सर्व स्तरांतील मुलांसाठी सामाजिक शिक्षण व्यवस्था, समाजसेवा, राष्ट्रसेवा, भाषाविषयक धोरण, राष्ट्रीय एकात्मता, लवचिकता, गतिशील ा, मूलभूत सामाजिक व नैतिक मूल्ये, आध्यात्मिकता इ. बाबींना शिक्षणक्रमात विशेष महत्त्व दिले.

## २) गुणवत्ता सुधार/विकास :-

शैक्षणिक गुणवत्तेच्या विकासाच्या दृष्टीने कोठारी आयोगाने उपलब्ध सुविधांचा पूरेपूर वापर व शिक्षण व्यवस्थेची पुनर्बांधणी ह्या दोन मुद्यांवर भर दिला. आयोगाचे हे दोन्ही मुद्दे भारतीय शिक्षण व्यवस्थेत क्रांतिकारी बदल करणारे ठरलेत.

उपलब्ध सुविधांचा पुरेपूर उपयोग करण्याच्या दृष्टीने आ `गाने कामाच्या दिवसांमध्ये वाढ करणे, दिवसांतील कामाचा कालावधी/कामाचे तास वाढविणे, सुट्यांचा योग्य उपयोग, अखंड समर्पित भावनेने कार्य करणे, इ. बाबी सुचविल्या.

शिक्षण व्यवस्थेच्या पुनर्बांधणीचा विचार मांडताना कोठारी आयोगाने 'शिक्षणाचा १० + २ + ३' हा आकृतिबंध सादर केला. त्यानुसार शिक्षणाची पहिली दहा वर्षे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, मधली दोन वर्षे उच्च माध्यमिक शिक्षण व शेवटची तीन वर्षे पदवी शिक्षण सुचविले. त्याचप्रमाणे शिक्षकांच्या वेतनात भरीव अशा सुधारणा अथवा वृद्धी करणे तसेच विविध स्तरांतील शिक्षकांच्या वेतनमानातील तफावत कमी करणे ह्या सुधारणा सुचविल्या.

## ३) शैक्षणिक सुविधांचा विस्तार :-

कोठारी आयोगाने शैक्षणिक सुविधांचा विस्तार करण्याविषयीची सूचना आपल्या अहवालात केलेली आहे. त्यादृष्टीने पुढील उपक्रमांची शिफारस केलेली दिसून येते.

प्रौढ शिक्षण, प्रभावी आणि उत्तम दर्जाचे प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देणे त्याचप्रमाणे माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणाचा गुणवत्तात्मक विकास करणे इ.

कोठारी आयोग हा भारतीय शिक्षण क्षेत्राला कलाटणी देणारा असा महत्त्वाचा आयोग ठरला. ह्या आयोगाने सुचविलेला १० + २ + ३ हा शैक्षणिक आकृतिबंध सर्वस्वीकृत झालेला आहे. ह्या आयोगाने माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरी  शिक्षणाच्या दृष्टीने पुढील शिफारशी सुचविल्या आहेत.ह्

१) माध्यमिक शाळांमधून तांत्रिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात.

२) इंग्रजी, मातृभाषा, हिंदी या तीन भाषा, तीन प्रकारची शास्त्रे, गणित, सामाजिक शास्त्रे, चित्रकला, कार्यानुभव, संस्कृत इ. विषय शिकविले जावेत.

३) बहुउद्देशीय शाळा स्थापन व्हाव्यात.

४) आश्रमशाळांचे प्रमाण वाढवावे.

५) पाठ्यपुस्तकात एकसूत्रता असावी यासाठी पाठ्यपुस्तक मंडळ असावे.

६) अध्यापनाच्या कृती आणि क्रीडन पद्धतींचा वापर व्हावा.

७) बौद्धिक विकासाबरोबरच शारीरिक विकासालाही योग्य स्थान द्यावे.

८) परीक्षेतील वस्तुनिष्ठ प्रश्नांची संख्या वाढवावी. अंतर्गत परीक्षा व कालिक चाचण्या घेण्यात याव्यात. अंकात्मक गुणदानाऐवजी अ, ब, क अशा श्रेणी ठेवाव्यात.

९) शाळेतील शिक्षक प्रशिक्षित असावेत त्यांचे सेवांतर्गत प्रशिक्षण व्हावे.

१०) पगार आणि भत्त्यांवर १०० टक्के अनुदान द्यावे व शिक्षकाच्या पगाराचा सर्व खर्च शासनाने उचलावा.

ब) उच्च माध्यमिक शिक्षण

१) व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १९८६ पर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या ५०% करावी.

२) व्यावसायिक तंत्रशिक्षण संस्थांमध्ये पूर्णकालीन अभ्यासक्रम सुरू करावेत.

३) पत्राद्वारे प्रशिक्षणाची सोय करावी.

४) वाणिज्य, प्रशासन व लघुउद्योगांशी संबंधित अशा पाठ्यक्रमांचे विस्तृत पायावर आयोजन करावे.

---

**ड) स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

---

ड. १.१ एका वाक्यात उत्तरे लिहा

१) विद्यापीठ शिक्षण आयोग १९४८ चे अध्यक्ष कोण होते ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

२) १९४८ च्या ताराचंद समितीचे उद्दिष्ट कोणते होते ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

३) माध्यमिक शिक्षण आयोग १९५२ कुणाच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आला ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

४) कोठारी आयोगाची स्थापना कोणत्या वर्षी करण्यात आली होती ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

५) कोठारी आयोगाने कोणता शैक्षणिक आकृतीबंध सादर ेला ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

ड. १.२ थोडक्यात उत्तरे लिहा.

१) डॉ. राधाकृष्णन आयोगाच्या शिफारशींची चर्चा करा.

------------------------------------------------

------------------------------------------------

२) आचार्य नरेंद्र देव समिती १९५२ ने केलेल्या चार शिफारशी लिहा.

------------------------------------------------

------------------------------------------------

३) मुदलियार समितीच्या शिफारशींचा आढावा घ्या.

------------------------------------------------

------------------------------------------------

४) कोठारी आयोगाच्या शैक्षणिक पुनर्बांधणीची थोडक्यात र्चा करा.

------------------------------------------------

------------------------------------------------

५) कोठारी आयोगाच्या उच्च माध्यमिक शिक्षणासंदर्भातील शिफारशी कोणत्या ?

------------------------------------------------

------------------------------------------------

ड. १.३ दीर्घोत्तर प्रश्न

१) स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने नेमलेल्या शिक्षण आयोगांचा आढावा घ्या.

------------------------------------------------

------------------------------------------------

२) कोठारी आयोगाच्या शिफारशींची सविस्तर चर्चा करा.

------------------------------------------------

------------------------------------------------

## **क. २ कार्यक्रम आणि धोरणे** Programmes & Policies :-

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४७ साली भारत सरकारपुढे निरक्षरता आणि शिक्षणाच्या प्रसाराचा प्रश्न गंभीरपणे उभा ठाकला होता. हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने भारत सरकारच्या वतीने विविध ध्येय-धोरणांचा पुरस्कार केला जात होता. भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांनी ह्या प्रश्नाला तोंड देण्यासाठी संपूर्ण देशातील शिक्षण व्यवस्थेवर केंद्र सरकारचे प्रभावशाली नियंत्रण असावे अशी आग्रही भूमिक घेतलेली होती. त्यादृष्टीने

संपूर्ण देशात एकसामायिक अशी शिक्षण व्यवस्था असावी असेदेखील त्यांचे मत होते. स्वतंत्र भारताची आधुनिक अशी शिक्षणप्रणाली विकसित करण्यासाठी १९४८ साली 'विद्यापीठ शिक्षण आयोगाची व १९५२ मध्ये माध्यमिक शिक्षण आयोगाची अनुक्रमे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व डॉ. एल्. एस. मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना केली होती. पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या सरकारने शास्त्रीय धोरणविषयक प्रस्ताव स्वीकृत केला होता. नेहरू सरकारने उच्च दर्जाचे व अधिक गुणवत्तापूर्ण वैज्ञानिक शिक्षण उपलब्ध करण्याच्या दृष्टीने भारतीय प्रौद्योगिकी संस्थान (ख.ख.ढ.) सारख्या संस्था विकसित केल्या. १९६१ मध्ये केंद्र सरकारने 'राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद' (छउएठढ) ह्या संस्थेची स्थापना केली. ही एक स्वायत्त अशी संस्था असून केंद्र आणि विविध राज्य सरकारांना शैक्षणिक धोरणांची निर्मिती आणि अंमलबजावणी यांच्या संदर्भात सल्ला व मार्गदर्शन करण्याचे काम करते.

शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे, स्वतंत्र भारताच्या नव्याने निर्माण झालेल्या गरजा, आकांक्षा यांची पूर्तता करणे, भारतीय संविधानाच्या ध्येय-धोरणांचा पाठपुरावा करून जनमानसात त्यासंबंधीची जागृती निर्माण करणे, भारताला विज्ञान व आधुनिकता यांच्या जोडीने विकासाच्या वाटेवर मार्गस्थ करणे ही शैक्षणिक धोरणे राबविण्यामागील प्रमुख भूमिका होती व त्यादृष्टीनेच शैक्षणिक क्षेत्रात विविध ध्येय-धोरणांचा व उपक्रमांचा पुरस्कार सरकारतर्फे केला गेला व आजपर्यंत केला जात आहे. ह्या कार्यक्रम व धोरणांपैकी काही प्रमुख कार्यक्रम व धोरणांची पुढे चर्चा केलेली आहे.

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८ :-

१९६४-६६ च्या कोठारी आयोगाच्या अहवालावर आधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरविण्यासाठी तत्कालीन शिक्षणमंत्री 'त्रिगुणा सेन' यांनी संसदीय सदस्यांची एक समिती नेमली. ह्या समितीने कोठारी आयोगाच्या शिफारशींवर चर्च केली व ह्या चर्चेतूनच १९६८ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार झाले. भारताच्या तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी १९६८ च्या शैक्षणिक धोरणात शिक्षणाचा विकास करण्यावर भर देण्यात आलेला होता.

१) घटनेतील ४५ व्या कलमानुसार वयाच्या चौदाव्या वर्षांप ंत सर्व मुलांना सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण व त्यासाठी आवश्यक ते परिश्रम घेणे.

२) शिक्षकांच्या सामाजिक दर्जामध्ये वाढ, सेवाशर्तींमध्ये सुधारणा करणे व शिक्षक प्रशिक्षणास महत्त्व देण्यात आले.

३) प्रादेशिक भाषांचा विकास घडवून आणणे. माध्यमिक स्तरावर त्रिभाषा सूत्राचा अवलंब करणे. हिंदी, संस्कृत व इंग्रजीच्या अभ्यासास चालना देणे.

४) शैक्षणिक संधींची समानता, सामाईक शाळा पद्धतीचा स्वीकार तसेच शैक्षणिक असमतोल दूर करण्यासाठी प्रयत्न करणे.

५) देशांतर्गत बुद्धिमत्तेचा शोध घेणे.

६) कार्यानुभव व समाजसेवा यांना अभ्यासक्रमात विशेष महत्त्वाचे स्थान.

७) शालेय स्तरावर विज्ञान शिक्षण व संशोधनावर भर.

८) उत्तम व दर्जेदार पाठ्यपुस्तकांची निर्मिती.

९) मूल्यमापन व परीक्षा पद्धतीत सुधारणा घडवून आणणे.

१०) माध्यमिक स्तरावर व्यावसायिक शिक्षणाची सोय करणे.

११) विद्यापीठ स्तरावर अर्धवेळ व पत्राचार अभ्यासक्रमांचा विक स व प्रसार करणे.

१२) प्रौढ शिक्षण व साक्षरतेचा विकास करणे.

१३) क्रीडा व खेळ यांचा विकास करणे.

१४) अल्पसंख्यांकांच्या शिक्षणाकडे लक्ष देणे.

१५) संपूर्ण देशभरात १०+२+३ ह्या आकृतीबंधाचा स्वीकार करणे.

१९६८ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे स्वतंत्र भारताच्या इतिहासातील शिक्षणविषयक पहिले धोरण होते. हे धोरण स्वीकारल्यानंतर भारतीय शिक्षण पद्धतीत मोठ्या प्रमाणावर बदल घडून आले. देशात शैक्षणिक सुविधांचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला. त्याचप्रमाणे विविध स्तरांवरील शिक्षण संस्था व त्यांच्यामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. एकंदरीत भारताच्या शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने हे शैक्षणिक धोरण म्हणजे एक मैलाचा दगड ठरले.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९७९) आराखडा :–**

१९७७ साली भारतात सत्तांतर झाले. काँग्रेस पक्षाचे सरकार जाऊन जनता पक्षाचे सरकार आले. ह्या सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा पुनर्वि र केला जाइ ल असे जाहीर केले. त्यानुसार १९७९ साली राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आराखडा तयार झाला. ह्या आराखड्यातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे चर्चिता येतीलह्न

१) स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय या मूल्यांना धक्का न लावता व्यक्तींचा विकास करणे व त्यातूनच सामाजिक कल्याण साधणे हा शिक्षणाचा मूळ उद्देश आहे. शिक्षणातून राष्ट्रीय एकात्मता व सांस्कृतिक वारशाचा अभिमान यांना प्रोत्साहन मिळावयास हवे. यादृष्टीने सध्याच्या शिक्षण पद्धतीची पुनर्रचना करणे आवश्यक आहे.

२) सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण : वयाच्या चौदा वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांना सक्तीचे शिक्षण दिले गेले पाहिजे. प्राथमिक शिक्षणात चारित्र्य संवर्धन व व्यक्तिमत्त्व विकास यांवर भर दिला पाहिजे. गरीब विद्यार्थ्यांना मधल्या वेळचे जेवण, गणवेश, पाठ्यपुस्तके इ. पुरविणे. अनुसूचित जाती–जमातींच्या शिक्षणाकडेपु रविण . शाळा व समाजाचा समन्वय साधणे. सामायिक शाळा पद्धतीचा विकास करणे.

३) प्रौढ शिक्षण :– पुढील पाच वर्षांत देशातील १०० दशलक्ष प्रौढांना शिक्षण देऊन सार्वत्रिक साक्षरतेचे उद्दिष्ट गाठणे.

प्रौढांमध्ये साक्षरतेबरोबरच कार्यात्मक विकास व सामाजिक जाणीव निर्माण करणे.

प्रौढ शिक्षण हे समाजकेंद्री असावे.

ग्रामीण भागातील शिक्षक व समाज यांना प्रौढ शिक्षण कार्यक्रम   त सहभागी होण्यास प्रवृत्त करावे. तसेच प्रौढ शिक्षण कार्यक्रमातील अध्यापक शक्यतो स्त्रिया असाव्यात.

प्रौढ शिक्षण कार्यक्रमात निरंतर शिक्षण कार्यक्रमांचा समावेश असावा.

४) माध्यमिक शिक्षण :- माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावेत. माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात विविधता आणून शैक्षणिक भार कमी करावयास हवा.

ग्रामीण भागात माध्यमिक शिक्षणाचा विस्तार करावयास हवा.

५) उच्च शिक्षण :- उच्च शिक्षणावरील भार कमी करणे. पत्राचार अभ्यासक्रम, दूरशिक्षण, अंशकालीन कार्यक्रम इ. उपक्रमांतून उच्च शिक्षणविषयक सुविधांचा विस्तार करता येईल.

पदवीपूर्व शिक्षण हे तीन वर्षांचे असणे योग्य आहे.

पदव्युत्तर शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न व्हावयास   वेत.

वरील शैक्षणिक क्षेत्रांबरोबरच तांत्रिक शिक्षण, कृषीविषयक शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, संस्कृती शिक्षण, शारीरिक शिक्षण इ. शिक्षण क्षेत्रांवरदेखील ह्या आराखड्यात प्रकाश टाकण्यात आलेला आहे. ह्याशिवाय शिक्षण विषयक अत्यंत महत्त्वाच्या अशा पुढील मुद्यांवरदेखील ह्या आराखड्यात चर्चा करण्यात आलेली आहे.

१) शिक्षणाचे माध्यम - सर्व स्तरांवर शिक्षणाचे माध्यम प्रादेशिक भाषा राहील. प्राथमिक स्तरावरील शिक्षण मातृभाषेतून दिले जाईल.

माध्यमिक स्तरावर त्रिभाषासूत्राचा अवलंब केला जाईल.

२) भाषा विकास - भाषा अध्यापन तंत्रे, भारतीय भाषा, संस्कृत तसेच सिंधी भाषेचा अभ्यास यांचा विकास केला जाईल.

ळळळ) शिक्षणाच्या संधी - ज्यांची पहिलीच पिढी शिकत आहे त्य ंच्या मुलांना पूर्व प्राथमिक शिक्षण दिले जाईल.

मागासवर्गीयांच्या शैक्षणिक समस्यांकडे विशेष लक्ष पुरविण्यात येईल.

प्रादेशिक असमतोल दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल.

३) परीक्षा पद्धतीची पुनर्रचना - १९७९ च्या शिक्षण विषयक आराखड्यात परीक्षा पद्धतीमध्ये बदल सुचविलेले आहेत. मूल्यमापनात पाठांतरावर भर न देता परीक्षा अधिक वस्तुनिष्ठ व विश्वसनीय केली पाहिजे.

प्राथमिक, माध्यमिक व पदवीपूर्व अशा तीन स्तरांवर शालांत परीक्षा असतील त्याचप्रमाणे अंतर्गत मूल्यमापन पद्धतीचा विकास करावयास हवा.

४)अल्पसंख्यांकांचे शिक्षण - एकात्म भारतीय समाजाच्या ध्येयासाठी अल्पसंख्यांकांना शैक्षणिक संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन देणे.

५) शिक्षणावरील गुंतवणूक – मानवी बुद्धिमत्ता आणि नैतिक शक्ती ह्या घटकांच्या विकासासाठी शिक्षण विकास आवश्यक आहे. शैक्षणिक विकासासाठी अधिकचे अर्थसाह्य लागले तरी शिक्षणावर अधिक खर्च केला पाहिजे.

६) परीक्षण – दर पाच वर्षांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी कितपत झाली आहे. उद्दिष्टांची सफलता कितपत झाली आहे याचा आढाव घेतला पाहिजे. त्याचे परीक्षण केले पाहिजे.

वरीलप्रमाणे जनता पक्षाच्या राजवटीत १९७९ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आराखडा तयार करण्यात आला होता. परंतु हे सरकार अल्पकाल टिकले. त्यामुळे ह्या धोरणात पुढे प्रगती होऊ शकली नाही.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) :–

भारताचे तत्कालीन पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांनी भारताच्या २१ व्या शतकातील पदार्पणाच्या दृष्टीने नवीन शैक्षणिक धोरण ठरविण्याचा मानस व्यक्त केला होता. भारत सरकारच्या शिक्षण मंतालयाने १९८५ मध्ये 'शैक्षणिक आव्हान' हा प्रलेख लोकसभेत सादर करून सुमारे ४० वर्षांमध्ये आपल्या धोरणात्मक कार्यवाहीतील उणिवांवर प्रकाश टाकला. ही पुस्तिका समाजातील सर्व शिक्षणप्रेमी, नागरिक, शिक्षणतज्ज्ञ यांना पोहोचविली गेली. यामागे नवे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' हे लादलेले नसावे तर त्यामध्ये जनमानसाच्या प्रतिक्रिया व्यक्त झाल्या पाहिजेत हा हेतू होता.

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचे १९८६ मध्ये 'मानवी साधन संपत्ती विकास मंत्रालय' हे नवीन नामकरण झाले. मे १९८६ मध्ये त्या मंत्रालयाने १९८६ चे नवीन 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' जाहीर केले. त्यात काही गोष्टींचा प्रामुख्याने विचार आढळतो.

१) शिक्षण ही वर्तमानकालीन व भविष्यकालीन महत्त्वपूर्ण गुंतवणूक आहे.

२) नव्या शैक्षणिक धोरणाची कार्यवाही कीरताना कंद्र सरकार व घटक राज्ये ह्यांच्या संयुक्त प्रयत्नांतून ती होईल.

३) 'समानतेसाठी शिक्षण' हेच ह्या धोरणाचे मुख्य सूत्र असेल. घटक, विभाग व प्रदेशांमधील विषमता दूर करण्याचा निर्धारपूर्वक प्रयत्न केला जाईल.

४) पूर्व प्राथमिक शिक्षणाचे स्वरुप बालसंगोपनाचे असेल. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी अनौपचारिक कार्यक्रमांचा आधार घेतला जाईल. माध्यमिक शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी विशेष आग्रह असेल. उच्च माध्यमिक स्तरावर व्यावसायीकरणाचा कालबद्ध कार्यक्रम राबविला जाईल; तर उच्च शिक्षणाच्या विविध स्वरुपात सुसूत्रता आणली जाईल. मुक्त विद्यापीठ व दूरशिक्षणातून उच्च शिक्षणाची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला जाईल.

५) नवीन शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षकांच्या भौतिक सुखसुविधा, शिक्षणसंस्थांच्या सुविधा, शिक्षणाचा दर्जा यांच्यात वाए केली जाईल.

६) सर्वच स्तरांवर शिक्षणाचा आशय अधिक अर्थपूर्ण **व** सुसंबंद्ध बनि ला जाईल.

वरील शैक्षणिक धोरणाची कार्यवाही योग्य दिशेने व्हा**वी** म्हणून मान ी साधन संपत्ती विकास मंत्रालयाने 'कृती कार्यक्रम' काढला. शैक्षणिक क्षेताशी संबंधित अशी २३ कार्यक्षेत्रे ह्यादृष्टीने निवडण्यात आलीत. त्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्यासाठी २३ कार्यगट निश्चित करण्यात आले. ह्या गटांनी केलेल्या प्रयत्नांचे फलस्वरूप म्हणजे कृती कार्यक्रम होय. ह्या कृतीकार्यक्रमातील कार्यगटांचे विषय पुढीलप्रमाणे होते.

१) पद्धती कार्यान्वित करणे
२) शालेय शिक्षण आशय व प्रक्रिय
३) स्त्रियांना समान शिक्षण
४) मागासवर्गीयांसाठी शिक्षण
५) अल्पसंख्यांकांचे शिक्षण
६) अपंगांसाठी शिक्षण
७) प्रौढ व निरंतर शिक्षण
८) बालसंगोपन व शिक्षण
९) प्राथमिक शिक्षण, अनौपचारिक शिक्षण, खडू-फळा मोहीम
१०) माध्यमिक शिक्षण व नवोदय विद्यालये
११) शिक्षणाचे व्यावसायीकरण
१२) उच्च शिक्षण
१३) मुक्त विद्यापीठे
१४) तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण
१५) संशोधन व विकास
१६) प्रसार माध्यमे व शैक्षणिक तंत्रज्ञान
१७) पदवी व नोकऱ्या यांतील संबंध तोडणे
१८) यथार्थ संस्कृती दर्शन व भाषाविषयक धोरणाची अंमलबजावणी
१९) क्रीडा, शारीरिक शिक्षण व युवक
२०) मूल्यमापन प्रक्रिया व परीक्षा सुधार
२१) शिक्षक व त्यांचे प्रशिक्षण
२२) शिक्षणाचे व्यवस्थापन व
२३) ग्रामीण विद्यापीठ व संस्था

वरील कार्यक्रमांपैकी विशेष महत्त्वाच्या कृतीकार्यक्रमांची उद्दिष्टपूर्ती कशी केली गेली ते पाहू या-

**अ) पूर्व प्राथमिक शिक्षण :-** सहा वर्षांपर्यंतच्या ७०% बालकांपर्यंत बालसंगोपन व शिक्षणविषयक सेवा इ.स. २००० पर्यंत पोचविण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. त्यादृष्टीने इ.स.१९९०, १९९५ व २००० अशा तीन टप्प्यांत अनुक्रमे २,५०,०००, १०

लाख व २० लाख अशी बालसंगोपन व शिक्षण केंद्रे स्थापन करण्यात येतील.

**ब) प्राथमिक शिक्षण :–** प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी व्यवहार्य अशी आर्थिक तरतूद करण्यात यावी. प्रथम वयाच्या ११ वर्षांपर्यंतचे व नंतर वयाच्या १४ व्या वर्षांपर्यंतचे शिक्षण मोफत व सक्तीचे ा य ईल. हे कार्यक्रम अनुक्रमे १९९० व १९९५ पर्यंत पूर्ण करण्यात येतील.

प्राथमिक शिक्षणातील सुविधांचा अभाव ह्या समस्येवर मात करण्यासाठी 'खडू फळा मोहीम' हाती घेण्यात येईल. ह्या मोहिमेत शिक्षकांसाठी साहित्य, वर्ग अध्यापनास उपयुक्त साहित्य, खेळणी, वाचनालय, संगीत वाद्ये इ. बाबींची उपलब्धता करून दिली जाईल.

**क) माध्यमिक शिक्षण :–** माध्यमिक शिक्षणास आतापर्यंत वंचित राहिलेल्या समाजगट व प्रदेशांसाठी प्राधान्यक्रमाने सुविधा निर्माण कराव्यात. इ.स.२००० पर्यंत हे उद्दिष्ट पूर्ण होईल. उच्च संपादनक्षम अशा अतिहुशार व प्राज्ञ विद्यार्थ्यांच्या तसेच समाजाच्या उपेक्षित गटातील विद्यार्थ्यांच्या प्रज्ञेचा विकास व्हावा यासाठी ७ व्या पंचवार्षिक योजना काळात प्रत्येक जिल्ह्यात एक नवोदय विद्यालय स्थापन करण्यात येईल. यात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ७५% आरक्षण असेल. मुलींचे प्रमाण ३३% राहील. निवास, भोजन व शिक्षण नि:शुल्क असेल.

**ड) उच्च माध्यमिक शिक्षण :–** + २ स्तरावरील शिक्षणाचे व्यावसायीकरण प्राधान्याने व अधिक परिणामकारकरित्या करणे. १९९० व १९९५ पर्यंत व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या एकूण विद्यार्थी संख्येच्या १०% व २५% पर्यंत वाढली पाहिजे.

**इ) उच्च शिक्षण :–** देशात १९८५ पर्यंत १५० विद्यापीठे व ५००० महाविद्यालये होती. उच्च शिक्षणाची पुनर्रचना करून दर्जा सुधारावा यासाठी 'स्वायत्त महाविद्यालयांचा' प्रयोग करावयाचे ठरले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात उच्च शिक्षण संस्थांचे पुनर्गठन व विस्तार, अभ्यासक्रमांची पुनर्रचना, संशोधन कार्यास प्रोत्साहन, गतिमानता इ. बाबी समाविष्ट करण्यात आल्यात. ७ व्या पंचवार्षिक योजनेत ५०० स्वायत्त महा द्यालयांची निर्मिती करणे, प्रत्येक घटक राज्यात एक मुक्त विद्यापीठ स्थापन करणे, सर्वच विद्यापीठांच्या कार्यक्रमाचा विस्तार सेवा व निरंतर शिक्षण हा आवश्यक घटक बनविणे इ. कार्यक्रम राबविण्यात येतील.

१९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हा १९६८ च्या शैक्षणिक धोरणाचा वस्तुनिष्ठ व भविष्यकालीन केलेला पुनर्विचार आहे. ह्या धोरणात विविध स्तरांवर गाठावयाची उद्दिष्टे कालबद्ध करण्यात आलेली आहेत. २१ व्या शतकातील विविध आव्हाने पेलण्याच्या दृष्टीने भारतीय शिक्षण व्यवस्थेला सक्षम करण्याचा प्रयत्न ह्या धोरणात केलेला दिसतो.

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात १९९२ साली पी. व्ही. नरसिंहराव सरकारने काही बदल केले. काही नवीन उपक्रमांची भर ह्यात टाकली. यामध्ये –

राष्ट्रीय शालेय पोषण आहार योजना (१९९५), जिल्हा प्राथ मक शिक्षण कार्यक्रम (१९९३) ह्या दोन महत्त्वाच्या योजनांचा समावेश होता.

i) राष्ट्रीय शालेय पोषण आहार योजना (१९९५) :- या योजनेअंतर्गत इ. १ली ते ५वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना प्रतिदिनी पोषणमूल्य असलेले शिजविलेले अन्न देण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्व शासकीय, शासकीय अनुदानित आणि स्थानिक वराज्य संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांमध्ये ही योजना लागू करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या किमान उपस्थितीच्या आधारे दरमहा धान्याचे वितरण देखील के ेगेले. ग्रामीण विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती वाढावी यादृष्टीने हा उपक्रम राबविण्यात आला होता.

ii) जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम (१९९३) :- ह्या उपक्रमांतर्गत नियोजन व व्यवस्थापनांचे विकेंद्रीकरण, शैक्षणिक साहित्याचा दर्जा उं वणे आणि शाळेची प्रभावशीलता वाढविणे ह्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्यात आले होते.

भारत सरकारच्या शैक्षणिक धोरणात निरंतर परिवर्तन, विकास, परीक्षण इ. बाबींना प्राधान्य देण्यात आल्याचे दिसते. २००१ साली ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाबरोबरच 'शिक्षणाचा मूलभूत हक्क' प्रदान करण्यात आला. सन २०१० पर्यंत सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे ठरविले गेले. १८ ऑक्टोबर २००१ या दिवशी भारत सरकारने आपल्या शैक्षणिक धोरणाचा भाग म्हणून अभियांत्रिकी वास्तुशास्त्र, इ. व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यासाठी राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रवेश परीक्षांची योजना केलेली आहे. सदर अभ्यासक्रमांची व्यावसायिक गुणवत्ता टिकविण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.

**सर्व शिक्षा अभियान :–** प्राथमिक शिक्षण हे शिक्षण व्यवस्थेचे एक अविभाज्य आणि महत्त्वपूर्ण अंग आहे. त्यादृष्टीनेच ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी 'मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण' हे मूलभूत अधिकाराचाच एक भाग बनले आहे. शिक्षण एक कायदा (ठढए) २००९ नुसार अशा प्रकारचे शिक्षण हा बालकाचा हक्कच असल्याचे मान्य करण्यात आले आहे.

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी संपूर्ण देशव्यापी कार्यक्रम सन २००१ मध्ये भारत सरकारने सुरू केला. हा कार्यक्रम म्हणजेच 'सर्व शिक्षा अभियान' होय. शिक्षणाची गुणवत्ता वाढवून त्याचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने लेल हे एक महत्त्वपूर्ण पाऊल होय. ह्या कार्यक्रमास स्वत:ची अशी निश्चित उद्दिष्टे असून कालबद्ध स्वरूपात ती पूर्ण करावयाची आहेत.

सर्व शिक्षा अभियान हा केंद्र व राज्य सरकार यांच्यातील भागीदारीच एक उत्तम नमुना आहे. देशातील संपूर्ण जिल्ह्यांचा समावेश ह्या अभियानाच्या कार्यक्षेत्रात ेतो. समाजातील धुरीण मंडळी, शिक्षणप्रेमी नागरिक यांचादेखील सहभाग ह्या अभिय नात घेण्यात येतो. समुदायाच्या सक्रिय सहभागाने मुलांना उच्च दर्जाचे व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करणे हा ह्या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

**प्रमुख वैशिष्ट्ये :–**

१) सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत सुस्पष्ट व कालबद्ध असा कार्यक्रम.

२) शिक्षणाची गुणवत्ता व काल सुसंगतता यांवर विशेष भर.

३) अनुसूचित जाती जमाती तसेच धार्मिक, भाषिक अल्पसंख्यांक माजातील मुलांच्या शैक्षणिक सहभागावर केंद्रित.

४) लिंगभावाला महत्त्व न देता स्त्रियांसाठी (मुलींसाठी) योग्य ते शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे व त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे.

५) मूलभूत शिक्षणाद्वारे सामाजिक न्यायाच्या तत्त्वाला पुढे नेण्याची एक संधी.

६) केंद्र व राज्य सरकार तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यातील भागीदारी.

७) मूलभूत शालेय व्यवस्थापनांत पंचायत राज संस्था, शालेय व्यवस ापन समिती, ग्रामीण व झोपडपट्टी स्तरीय समित्या, पालक-शिक्षक संघ, आदिवासी विकास मंडळे, इ. चा सक्रिय सहभाग.

८) भारत सरकारने राज्यांना त्यांचा स्वत:चा असा मूलभूत शिक्षणविषयक दृष्टिकोण विकसित करण्याची दिलेली एक नामी संधी.

सर्व शिक्षा अभियान उद्दिष्टे :-

१) सन २००४ पूर्वी सर्व शालाबाह्य मुलांना, शाळा, शिक्षण हमी केंद्रे, पर्यायी शाळा, शाळेकडे परत शिबिर इ. मध्ये आणण्याचे /दाखल करण्याचे उद्दिष्ट.

२) २००७ पर्यंत प्राथमिक शालेय शिक्षणाची ५ वर्षे पूर्ण करणे.

३) सन २०१० पर्यंत प्राथमिक शालेय शिक्षणाची ८ वर्षे पूर्ण करणे.

४) 'जीवनासाठी शिक्षण' ह्या तत्त्वानुसार प्राथमिक शालेय शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा समाधानकारक ठेवणे.

५) लिंगभावविषयक व सामाजिक भेद वाव अंतरांना कमी करणे. शिक्षणाचा त्यासाठी प्रभावी उपयोग करणे.

६) शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाचे उद्दिष्ट सन २०१० पर्यंत गाठणे.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत उपक्रम :- सर्व शिक्षा अभियान ह्या कार्यक्रमांतर्गत शालाबाह्य मुलांना विशेष प्रशिक्षण देणे. शेजार शाळा, सामाजिक आणि लिंगभाव विषयक भेदांची दरी भरून काढणे, विशेष गरजू मुलांच्या आवश्यकतांची पूर्तता रणे. इ. उपक्रमांचा समावेश केलेला आहे. ह्यातील काही प्रमुख उपक्रमांची माहिती जाणून घेऊ य .

**१) शिक्षक प्रशिक्षण :-** शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाचा व गुणवत्तावाढीचा विचार करीत असताना 'शिक्षक' हा घटक केंद्रस्थानी आहे. शिक्षकाच्या गुणवत्तेवरच शिक्षणाचा दर्जा अवलंबून आहे. त्यादृष्टीने सर्व शिक्षा अभियानांतर्गत कुशल, अकुशल आणि नवनियुक्त शिक्षकांसाठी प्रशिक्षणाची व्यवस्था केलेली आहे. नवीन शैक्षणिक तंत्रे, अध्यापन पद्धती, साहित्य, इ.चे. प्रशिक्षण दिले जाते. यादृष्टीने सर्व शिक्षा अभियानात १४ दिवसीय सेवांतर्गत प्रशिक्षण, तालुका आणि गट पातळीवरील १०-१० दिवसांचे प्रशिक्षण, ६० दिवसीय

उद्‌बोधन वर्ग (नवनियुक्त व अप्रशिक्षित शिक्षकांसाठी) ३० दिव ीय परिचयात्मक पाठ्यक्रम इ. प्रशिक्षणक्रमांचे नियोजन करण्यात आलेले आहे.

**२) मोफत पाठ्यपुस्तके :–** आरंभीच्या काळात सर्व परिलक्षित मुलांना म्हणजेच सरकारी शाळांमधील शासकीय अनुदानित शाळांमधील त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांनी चालविलेल्या शालेय विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके पुरविण्यात येतील. २०११-१२ पासून शासकीय शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्यात येतील.

**३) शालेय इमारतींची देखभाल व दुरुस्ती :–** शालेय इमारतीच्या देखभाल पोटी शासकीय शाळांना विशेष अनुदान देण्याची तरतूद केलेली आहे.

**४) शालेय अनुदान :–** शाळेसाठी नवीन पुस्तके वा ग्रंथ खरेदी, नवीन व उपयुक्त उपकरणांची खरेदी या कामांसाठी प्राथमिक शाळांना वार्षिक ५००० ते ७००० रु. पर्यंत शालेय अनुदान देण्याची तरतूद ह्या अभियानांतर्गत केलेली आहे.

**५) समुदाय नेतृत्त्व प्रशिक्षण :–** समुदाय विकासाच्या दृष्टीने समुदायाचा शिक्षण प्रक्रियेतील सहभाग महत्त्वाचा आहे. गावातील शिक्षण व्यवस्थापन, शालेय दर्जा सुधार कार्यक्रम यांसारख्या उपक्रमांत समाजातील नेतृत्त्व करणाऱ्या धुरीण मंडळींना समाविष्ट केले जाईल. त्यांना त्या दृष्टीने विशेष प्रशिक्षण देण्याची तरतूद सर्व शिक्षा अभियानामध्ये करण्यात आलेली आहे. यादृष्टीने ग्रामशिक्षण समितीतील सहा जणांना निवडण्यात येईल व त्यातही स्त्रियांना प्राधान्य दिले जाईल.

**६) विशेष गरजू मुलांचे शिक्षण :–** समाजातील ज्या मुलांना विशेष गरजा आहेत त्यांच्या गरजांची पूर्तता करून त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था ह्या अभियानात केलेली आहे. अपंग, शारीरिक व्यंग वा विशेष वैद्यकीय व्यवस्था आवश्यक असलेली मुले यांच्या त्या गरजा पूर्ण करण्यासाठी वैद्यकीय चिकित्सा शिबिरांचे आयोजन, मोफत साहित्य वाटप जसे- कुबड्या, सायकल इ. शाळेत विशिष्ट प्रकारचा मार्ग बनविणे (ठर्ा) यांसारख्या सुविधा पुरविण्याचा प्रयत्न केला जातो.

**७) मुलींसाठी शिक्षण :–** मुलींच्या शिक्षणावर समाजात केले जाणारे दुर्लक्ष हेरून त्यांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी विविध आकर्षक योजना सर्व शिक्षा अभियानांतर्गत करण्यात आलेल्या आहेत. त्यात मुलींना शाळेपर्यंतचा मोफत प्रवास, मोफत गणवेश, पुस्तके, सहलींचे नियोजन यांसारखे उपक्रम राबविण्यात येतात.

**८) संगणक प्रशिक्षण :–** संगणकीय साक्षरता ही बदलत्या काळाची गरज आहे. मुलांना सहभागात्मक शिक्षण व स्वयं अध्ययनास प्रवृत्त करण्यासाठी संगणकाचा वापर अनिवार्य आहे. सर्व शिक्षा अभियानांतर्गत वरिष्ठ प्राथमिक स्तरीय मुलांसाठी संगणक शिक्षण उपलब्ध केले जाते.

वरील काही मुद्यांच्या आधारे 'सर्व शिक्षा अभियान' कार्यक्रमाची थोडक्यात ओळख आपण करून घेतलेली आहे. भारत सरकारचा अत्यंत महत्त्वाकांक्षी समग्रलक्षी असा हा शैक्षणिक कार्यक्रम आहे. ह्या कार्यक्रमासाठी अर्थसंकल्पांतर्गत भरीव तरतूद शासनातर्फे केली जाते.

ड. २.१ एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षण मंत्री कोण होते ?

----------------------------------------------

----------------------------------------------

२) विद्यापीठ शिक्षण आयोग १९४८ चे अध्यक्ष कोण होते ?

----------------------------------------------

----------------------------------------------

३) १९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची दोन उद्दिष्टे लिहा.

----------------------------------------------

----------------------------------------------

४) 'शिक्षणाचे आव्हान' हा प्रलेख लोकसभेत कधी सादर झाला ?

----------------------------------------------

----------------------------------------------

५) 'शिक्षण हक्क कायदा २००९' कशाचा उल्लेख करतो ?

----------------------------------------------

----------------------------------------------

ड. २.२ थोडक्यात उत्तरे लिहा.

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८ मधील तरतुदींचा आढावा घ्या.

----------------------------------------------

----------------------------------------------

२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मधील कार्यगटांचा आढावा घ्या.

----------------------------------------------

----------------------------------------------

३) सर्व शिक्षा अभियानाची प्रमुख वैशिष्ट्ये लिहा.

----------------------------------------------

----------------------------------------------

ड. २.३ सविस्तर उत्तरे लिहा.

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आराखडा १९७९ विशद करा.

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मधील कृती कार्यक्रमांच  आढावा घ्या.

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

३) सर्व शिक्षा अभियानांतर्गत उपक्रमांची चर्चा करा.

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

**क. ३ आर्थिक सुधारणांनंतरची आव्हाने** Challenges After Economic Reforms :-

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जागतिक पातळीवर विविध देशांमध्ये आर्थिक सुधारणांविषयक कार्यक्रम राबवावयास सुरुवात झाली. विशेषत: अविकसित आणि विकसनशील देशांमध्ये हे आर्थिक सुधार कार्यक्र अनिवार्यपणे राबविले जाऊ लागलेत. भारतातदेखील आर्थिक अरिष्टानंतर खाजगीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरण ह्या तिन्ही प्रक्रिया आर्थिक सुधारणांच्या दृष्टीने महत्त्वाच्**या** माध्यम ठरल  त. उद्योगधंदे, व्यापार, आयात-निर्यात, तंत्रज्ञान, उत्पादन, कृषी इ. विविध क्षेत्रांवर ह्या आर्थिक सुधारणांचे परिणाम झालेत. निरनिराळी आव्हाने निरनिराळ्या क्षेत्रांसमोर नव्याने उभी    ठाकली. विकास प्रक्रियेच्या दृष्टीने ह्या आव्हानांचा सामना करण्यासाठी धोरणात्मक आणि क्रियात्मक अशा दोन्ही पातळींवर नव-नवीन निर्णय आणि प्रयोग केले जाऊ लागले. ही काळाची गरज आणि अनिवार्यता होती. शिक्षण क्षेत्रदेखील ह्या आव्हानांपासून दूर र हिलेले नाही. आर्थिक सुधार कार्यक्रमानंतर भारतीय शिक्षण क्षेत्रासमोर नवीन आव्हाने उभी राहिलीत. शिक्षणाचा संबंध केवळ व्यक्तीपुरता मर्यादित नसून शिक्षणसंस्था, मनुष्यबळ विकास, शैक्षणिक धोरणे व उपक्रम व अंतिमत: राष्ट्रविकास आणि सामाजिक, आर्थिक, भाषिक, सांस्कृतिक, सामूहिक अशा विविध क्षेत्रांवर प्रभाव पडलेला दिसून येतो. अशा प्रकारच्या प्रभावामुळे शिक्षण क्षेत्रासमोर निर्माण झालेल्या आव्हानांच्या यादीत भरच पडताना दिसते.

१ जानेवारी १९९५ रोजी उरूग्वे येथे संपन्न झालेल्या परिषदेत ऋअढ (ऋशपशीरश्र असीशशाशपीं ढीशरींू) ची जागा (थढज) थीश्रव ढीरवश जीसरपळूरींळेप ने घेतली. आर्थिक सुधारणांच्या दृष्टीने एक जागतिक पीठ निर्माण झाले. संपूर्ण जग हेच व्यापार केंद्र बनले. 'जागतिक खेडे' ऋश्रेलरश्र तळश्रश्ररसश ही संकल्पना जगातील विविध देशांना जवळ आणणारी ठरली. संकल्पना, व्यक्ती, वस्तू, सेवा आणि भांडवल यांचा मुक्त प्रवाह जगातील विविध अर्थसत्ता आणि समाज यांच्या एकत्रीकरणासाठी कारणीभूत ठरला. जागतिकीकरणाची

प्रक्रिया ही त्यादृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली. शिक्षण हेदेखील व्यापार–व्यवसायात्मक आदान–प्रदान प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक बनले. जागतिकीकरणाच्या ध्यासाने भारतातील शिक्षण प्रणालीवर अत्यंत दूरगामी स्वरूपाचे परिणाम घडून आलेत. त्य मुळे उभ्या राहिलेल्या नवीन आव्हानांना भारतीय शिक्षण व्यवस्था सामोरी जात आहे. पुढील काही मुद्यांच्या आधारे ह्या आव्हानांची चर्चा करू या–

१) शैक्षणिक शुल्कातील वाढ

२) खाजगी क्षेत्रांची भूमिका महत्त्वपूर्ण

३) शिक्षणाची सहज सुलभ उपलब्धता

४) समानता वाढविणे शैक्षणिक समानता

५) गुणवत्ता वाढ

६) सुसंगत अभ्यासक्रमांची निर्मिती

७) शैक्षणिक सुधारणांचा वेग वाढविणे.

८) शैक्षणिक स्थलांतराचा प्रश्न

९) सांस्कृतिक शिक्षणाचा प्रश्न

१०) ई–शिक्षण

**१) शैक्षणिक शुल्कातील वाढ :–** भारतात सुरू झालेल्या आर्थिक सुधारणा शैक्षणिक क्षेत्रात शुल्कवाढीचे नवीन आव्हान किंवा संकट घेऊन आलेल्या दिसतात. शिक्षण क्षेत्रावरील विशेषत: उच्च शिक्षणावरील खर्चात पुरेशी वाढ झाली नाही. विना अनुदानित शिक्षण संस्थांना मोठ्या प्रमाणात परवानगी दिलेली आहे. त्याचप्रमाणे शासकीय विद्यापीठांमध्येदेखील स्वआधारित आर्थिक तत्त्वावरील अभ्यासक्रमांची वाढती संख्या यांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. याशिवाय खाजगी क्षेत्रातील शिक्षण संस्थांचे शुल्कवाढीचे अधिकार न्यायालयीन प्रक्रियेतून संस्थाचालकांना मिळाल्याने शुल्कवाढ होत असते.

आज भारतातील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शुल्क सर्वसामान्य जनतेच्य आवाक्याबाहेर गेलेले आहेत. शैक्षणिक शुल्कवाढीच्या ह्या आव्हानावर मात करण्यासाठी कमी दरातील शैक्षणिक कर्जाची उपलब्धता, शासकीय अनुदानित महाविद्यालयांची संख्या वाढविणे, यांसारखे काही उपाय योजता येतील. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्तींची संख्या वाढविता येईल. मनुष्यबळावरील गुंतवणूक म्हणजे भावी विकासावरीलच गुंतवणूक आहे हे तत्त्व अंगीकारले पाहिजे.

**२) खाजगी शिक्षण संस्थांची वाढती संख्या :** भारतीय शिक्षण क्षेत्रात खाजगी शिक्षण संस्थांचा उदय व विकास हा आर्थिक सुधार कार्यक्रमांनंतर मोठ्य प्रमाणात झाला आहे. उदारीकरणाच्या माध्यमातून विदेशी शिक्षणसंस्थांचे अभ्यासक्रमदेखील भारतात उपलब्ध होऊ लागलेले आहेत. खाजगी शिक्षणसंस्थांचा मुद्दा गुणवत्तेच्या दृष्टीने स–कारात्मक व न–

कारात्मक अशा दोन्ही दृष्टींनी आव्हान म्हणून उभा ठाकतो. काही खाजगी शिक्षण संस्थांची गुणवत्ता ही वादातीत असते व ती टिकवून ठेवण्यासाठी ह्या संस्था आटोकाट प्रयत्न करतात. याउलट काही शिक्षणसंस्था विद्यार्थीसंख्या वाढवून सवंग लोकप्रियतेच्या बळावर गुणवत्ता, परीक्षा पद्धतीतील उच्च मानदंड, पारदर्शिता, निरपेक्षता इ. मूल्यांशी तडजोड करतात व अयोग्य मार्गांचा अवलंब करून शिक्षण क्षेत्रात गैरमार्ग रूजविण्याचा प्रयत्न करतात. अशा दोन्ही प्रकारच्या शिक्षणसंस्थांचे आव्हान सद्य परिस्थितीत उभे आहे. शासकीय मान्यताप्राप्त शिक्षणसंस्थांची गुणवत्ता वाढविणे, त्यांचा दर्जा उंचावणे त्याचबरोबर दुसऱ्या प्रकारातील नकारात्मक शिक्षण संस्थांवर कायद्याच्या दृष्टीने प्रभावी नियंत्रण ठेवणे व त्यांची विश्वासार्हता टिकविणे गरजेचे आहे.

**३) शिक्षणाची सहज सुलभ उपलब्धता :–** भारतीय समाजात शिक्षणाचा प्रसार होऊन जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतीय सहभाग वाढावा यादृष्टीने शिक्षण हे सर्वसामान्यांना सहज सुलभरित्या उपलब्ध झाले पाहिजे. आज पूर्व प्राथमिक स्तरापासून उच्च शिक्षणाच्या स्तरापर्यंत सर्वच स्तरातील शिक्षण सहज सुलभरित्या उपलब्ध नाही ही व स्तविकता आहे. अनेक खेडी, झोपडपट्ट्या, वस्ती इ.ना. शिक्षणाचा ेस्पेर्शदेखील झाल  ला नाही. त्यामुळे शाळाबाह्य मुलांची संख्यादेखील भरपूर आहे. पुढील शिक्षणाची सुविधा  नसणे, शिक्षणाविषयीची अनास्था यांमुळे मध्येच शाळा सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्यादेखील प्रचंड आहे.

आर्थिक सुधारणांच्या माध्यमातून एकीकडे उच्च दर्जाच्या सर्व सो  ीसुविधांनीयुक्त आंतरराष्ट्रीय शाळा, तारांकित वा श्रेणीप्राप्त महाविद्यालये समाजातील काही घटकांसाठी उपलब्ध आहेत तर दुसरीकडे सर्वसाधारण व शिक्षणाच्या किमान अपेक्षा पूर्ण करू शकणाऱ्या संस्थांची मात्र वानवा आहे असे विसंगतीपूर्ण चित्र सध्या भारतात दिसत आहे. ह्या परिस्थितीवर मात करून शिक्षण हे भौगोलिक अंतर, आर्थिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या देखील सहज सुलभरित्या उपलब्ध व्हावयास हवे. समाजातील सर्वच घटकांना स्त्रिया, उपेक्षित, वंचित, अल्पसंख्याक इ. ना सहज सुलभ उपलब्ध करून त्यांना त्यांच्या स्वत:च्या विकासाबरोबरच राष्ट्रविकासाच्या प्रवाहात सहभागी करून घेणे हे एक मोठेच आव्हान आहे. सर्व शिक्षा अभियानासारख्या उपक्रमांद्वारे हे आव्हान पेलण्याचा प्रयत्न केला जात असला तरी त्याची परिणामकारकता वाढविण्याची मात्र आवश्यकता आहे.

**४) शैक्षणिक समानतेचा प्रश्न :–** आर्थिक सुधारणांनंतरच्या काळात शैक्षणिक समानतेचा प्रश्न हा एक कळीचा प्रश्न असून भारतासह जगातील अनेक विकसनशील व आर्थिकदृष्ट्या मागास राष्ट्रांच्या शिक्षण व्यवस्थेसमोरील एक प्रमुख आव्हान आहे. गरीब, भाषिक वा धार्मिक अल्पसंख्याक, आदिवासी, शरणार्थी, रस्त्यावरील व कामगार मुले इ. समूहांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांना शिक्षण प्रवाहात समाविष्ट करणे गरजेचे आहे. समाजातील हे दुर्लक्षित घटक इतर समूहांच्या तुलनेत शैक्षणिकदृष्ट्या मागास राहिल्याने सामाजिक विषमतेची दरी रुंदावत जाते. सामाजिक सलोखा व शांतता आणि स्थैर्य यांना धोका पोहोचतो व समाजविकासाच्या वेगाला खीळ बसते.

आर्थिक सुधारणांमुळे एकीकडे उच्चशिक्षित, व्यावसायिकदृष्ट्या प्रशिक्षित व कौशल्यप्राप्त व्यक्तींना अधिक उच्च दर्जाचा रोजगार प्राप्त होतो. त्यांचा आर्थिक दर्जा उंचावतो तर

दुसरीकडे अशिक्षित, अप्रशिक्षित व अकुशल व्यक्तींचा आर्थिक विकास खुंटतो. आज आर्थिक सुधारणांनंतर भारतात हे चित्र अत्यंत ठळकपणे समोर उभे राहिले आहे. त्यादृष्टीने शैक्षणिक उन्नतीची समान संधी अशा समूहांना उपलब्ध करून देणे ही महत्त्वाची आवश्यकता आहे.

लिंगभावातील असमानता हादेखील शैक्षणिक समानतेच्या दृष्टीने एक महत्त्वाचा प्रश्न आहे. भारतीय स्त्रियांना शैक्षणिक संधींची समानता उपलब्ध करून देऊन आर्थिक विकासाबरोबरच त्यांचा कौटुंबिक व सामाजिक स्तर उंचावण्याकडे लक्ष पुरविणे गरजेचे आहे.

**५) गुणवत्ता वाढ :-** आर्थिक सुधारणांचे धोरण भारताने स्वीकारल्यानंतर जागतिकीकरणाच्या माध्यमातून भारतीय शिक्षण पद्धतीत अनेक बदल करणे अपेक्षित होते. भारतीय अभ्यासक्रम, पदवी, परीक्षा पद्धती, अध्यापन पद्धती, संशोधन इ. घटकांचा स्तर हा आंतरराष्ट्रीय शिक्षण प्रणाली च्या स्तराशी साम्य राखणारा हवा. त्यादृष्टीने भारतीय शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे हे एक महत्त्वाचे आव्हान आज भारतीय शिक्षण व्यवस्थेसमोर उभे आहे. यासाठी नवनवीन व प्रभावी अशा सहभागात्मक अध्यापन पद्धतींचा अवलंब करणे. त्यादृष्टीने शिक्षक-प्राध्यापक यांना प्रशिक्षित करणे. आंतरराष्ट्रीय शैक्षणिक घडामोडींवर लक्ष ठेवून त्यांच्यामध्ये आपला सहभाग वाढविणे गरजेचे आहे.

भारतातील जुना, पारंपारिक केवळ सैद्धांतिक असा अभ्यासक्रम बदलवून अधिक संशोधनात्मक अभ्यासक्रम राबविणे अत्यावश्यक आहे. भारतीय शिक्षणसंस्थांमधील मूल्यमापन पद्धती, परीक्षा पद्धती यांच्यातील पारदर्शिता व वस्तुनिष्ठता वाढविल्यास गुणवत्ता वाढीचे आव्हान आपण समर्थपणे पेलू शकू.

**६) सुसंगत अभ्यासक्रमांची निर्मिती :-** गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रमांबरोबरच सांप्रत काळातील भारतातील विविध अभ्यासक्रम हे कालसुसंगत म्हणजेच वर्तमानकाळाच्या व्यावहारिक गरजांची पूर्तता करणारे असावेत. आधुनिक काळातील तंत्रज्ञान, वैज्ञानिक प्रगती, माहिती तंत्रज्ञान व संगणकाच्या क्षेत्रातील क्रांती, नवीन तंत्रे यांची आवश्यकता ओळखून रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांची अधिक आवश्यकता आहे. अभ्यासक्रमाचे स्वरूप केवळ सैद्धांतिक न राहता संशोधनपर प्रात्यक्षिक **व** उिपियो जत स रूपाच हवे. व्यावहारिक गरजांबरोबरच समाजाच्या इतर गरजांची पूर्तता करणारे किमानपक्षी त्यांच्याशी मेळ घालणारे हवे.

भारत सरकारच्या विविध शैक्षणिक धोरणांमधून सध्या हा प्रयत्न केला जात आहे. शैक्षणिक धोरण १९८६ ची १९९२ मध्ये पुनर्रचना करताना केंद्रीय मनुष्यबळ विकास विभागाने या मुद्यावर लक्ष केंद्रित केले असून गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच कालसुसंगत अभ्यासक्रमांच्या निर्मितीवर भर दिलेला आहे. भारतातून अमेरिकेसह जगाच्या विविध भागांतील विकसित राष्ट्रांमध्ये भारतीय युवकांना आधुनिक रोजगाराच्या नवनवीन संधींची सहजपणे होणारी उपलब्धता हे अभ्यासक्रमांच्या सुसंगतेचेच एक उदाहरण आहे, असे असले तरी भारताच्या स्वत:च्या अशा काही विशेष गरजा आहेत. त्यांच्या पूर्ततेच्या दृष्टीनेदेखील

सुसंगत अभ्यासक्रमांच्या व शिक्षणक्रमांच्या आखणीची आवश्यकता आहे.

**७) शैक्षणिक सुधारणांचा वेग वाढविणे :–** भारतात शैक्षणिक सुधारणा घडवून आणण्यासाठी अगदी स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच विविध प्रकारचे शैक्षणिक आयोग, समित्या, योजना, अभियान यांची स्थापना वा आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार सन २००० पर्यंत वंचितांना माध्यमिक शिक्षण उपलब्ध करणे, १९९०–९५–२००० अशा तीन टप्प्यांत पूर्व प्राथमिक, प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करणे तसेच ७ व्या पंचवार्षिक योजनेत उच्च शिक्षण पुरविणाऱ्या शिक्षण संस्थांची संख्या वाढविणे, शिक्षण विस्तार कार्यक्रम हाती घेणे इ. उद्दिष्टे निश्चित करण्यात आली होती. अद्यापपावेतो ही उद्दिष्टे पूर्णपणे प्राप्त करण्यात आलेली नाहीत. यावरून भारतातील शैक्षणिक सुधारणांचा वेग किती मंद आहे याची जाणीव होते.

शैक्षणिक सुधारणांच्या वेगाची जाणीव ठेवताना भारताची वाढती लोकसंख्या व लोकसंख्या वाढीचा वेग यांचेही भान राखावे लागेल. उपलब्ध शैक्षणिक सुविधा वाढत्या लोकसंख्येच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करणाऱ्या असाव्यात. आर्थिक सुधारणा व त्यांच्या माध्यमातून अनिवार्य ठरलेल्या खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण ह्या प्रक्रियांमुळे शैक्षणिक उद्दिष्टांची उंची अकस्मातपणे अधिकच वाढली आहे. आजही भारतीय समाजातील स्त्रिया, दलित, अल्पसंख्याक, निराधार मुले, अशिक्षित प्रौढ समूहांची संख्या भरपूर आहे. त्यांच्या शैक्षणिक गरजादेखील भरपूर आहेत. शैक्षणिक सुविधांपासून ते भरपूर दूर आहेत. ही दरी दूर करणे गरजेचे आहे.

**८) शैक्षणिक स्थलांतराचा प्रश्न :–** शैक्षणिक आर्थिक सुधारणांनंतरच्या काळातील प्रकर्षाने उभा राहिलेला एक महत्त्वाचा प्रश्न आहे. भारतीय शिक्षण पद्धतीला उभे राहिलेले एक कडवे आव्हान आहे.

भारतात शिक्षण घेतल्यानंतर उच्चशिक्षणासाठी अमेरिका **व** इतर ि कसित राष्ट्रांमध्ये स्थलांतर करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे व दिवसेंदिवस तीमध्ये वाढ होत आहे. ह्या पार्श्वभूमीवर दोन प्रश्न उभे राहतात. पहिला म्हणजे– भारतात दर्जेदार व व्यावसायिकदृष्ट्या उच्च गुणवत्तेचे शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या कमी आहे काय ? व दुसरा म्हणजे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शिक्षण ही देखील एक व्यापारी प्रक्रिया बनली आहे व या प्रक्रियेत भारतात उच्च शिक्षण घेण्यासाठी विकसित देशांतून कितपत प्रमाणात विद्यार्थी येतात?

वरीलपैकी पहिल्या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी आल्यास त्यादृष्टीने भारतात उच्च शैक्षणिक दर्जा प्राप्त संस्थांची संख्या वाढविणे अपेक्षिते. अाहेत सरकारन नुकतीच त्यादृष्टीने पाऊले उचलली असून आय.आय.टी. व भारतीय प्रबंधन संस्थान तसेच केंद्रीय विद्यापीठांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर शोधताना विसंगतीपूर्ण परिस्थिती दिसून येते ह्व सन २००४–०५ मध्ये भारतातून अमेरिकेत शिक्षणासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे १२,००० एवढी होती तर याउलट अमेरिकेतून भारतात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या केवळ २०३ एवढीच होती. यावरून शैक्षणिक व्यापारी दृष्टिकोनातून

देखील भारताला झालेल्या आर्थिक लाभाचे परिणाम कमीच होते हे सिद्ध होते. यादृष्टीने भारतातील उच्च गुणवत्तात्मक व दर्जेदार शिक्षणसंस्थांची संख्या वाढविणे व विदेशी विद्यार्थ्यांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून त्यांना आकर्षित करणे गरजेचे आहे.

**९) सांस्कृतिक शिक्षणाचा प्रश्न :-** शिक्षण हे संस्कृतीच्या हस्तांतरणाचे एक प्रभावी साधन आहे. संस्कृती शिक्षणाच्या दृष्टीने उच्च शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. आर्थिक सुधारणांतर्गत भारतात सुरू झालेल्या खाजगीकरण, जागतिकीकरण व उदारीकरणाच्या प्रक्रियांतून उदयाला आलेल्या आधुनिक शिक्षण संस्थांमधून की, ज्यामध्ये विदेशी विद्यापीठे व व्यावसायिक संस्थांचाही समावेश आहे- भारतीय संस्कृती, सांस्कृतिक वारसा व सांस्कृतिक मूल्यांचे शिक्षण दिले जात नाही. ह्या संस्थांची पायाभरणी हीच मुळात व्यावसायिक तत्त्वांवर झालेली आहे. बऱ्याचदा अशा शैक्षणिक संस्थांतून उच्चशिक्षित मुले तर बाहेर पडतात परंतु सुसंस्कृतता व संवेदनशीलता यांचा मात्र अभाव त्यांच्यामध्ये आढळून येतो.

आज सांस्कृतिकदृष्ट्या पाश्चात्त्यीकरणाच्या आहारी गेलेली व पाश्चात्त्य संस्कृतीचे अंधानुकरण करणारी भारतीय मुलांची पिढी निर्माण होत अहे. यातूनच व्यसनाधीनता, चंगळवाद, उच्छृंखलता, विकृत लैंगिकता इ. विविध प्रश्न समोर येत आहेत. वृद्धांच्या समस्या, कौटुंबिक कलह, विवाह विच्छेद यांचे प्रमाण व ढत आहे. यामागे कुठेतरी भारतीय सांस्कृतिक मूल्यांचा ऱ्हास हे एक प्रमुख कारण आहे.

आजच्या आधुनिक शिक्षणप्रणालीसमोर गंभीरपणे उभ्या ठाकलेल्या ह्या आव्हानांची समर्थपणे सामना करण्याची आज गरज निर्माण झालेली आहे. प्राथमिक व माध्यमिक शाळांतून अलीकडच्या काळात दिले जाणारे मूल्य शिक्षण हा एक छोटासा प्रयत्न यासंदर्भात दिसून येतो. मात्र उच्च शिक्षणाच्या स्तरावर अशा उपक्रमांची आजही वानवा आहेच.

**१०) ई-शिक्षण :-** 'ई-शिक्षण' म्हणजेच इंटरनेट, संगणक यांसारख्या इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून दिले जाणारे शिक्षण होय. शिक्षण प्रक्रियेसाठी एक माध्यम म्हणून शिक्षणसंस्था, शाळा, महाविद्यालये यांची जागा काही प्रमाणात ही ई-उपकरणे घेऊ लागलेली आहेत. 'ऑनलाईन क्लासरूम,' 'ऑनलाईन परीक्षा' इ. संकल्पना भारतीय समाजात रूजत आहेत. शिक्षण विस्ताराच्या दृष्टीने निश्चितच त्यांची उपयुक्तता आहेच. परंतु त्यादृष्टीने संगणक प्रशिक्षित मनुष्यबळ, संगणक साक्षरता, संगणकांची उपलब्धता इ. घटकांची अपूर्णता आहे. शिवाय ई-शिक्षणाच्या साठी विजेची उपलब्धता पुरेशा प्रमाणात नाही. त्यामुळे ही समस्या सोडवून ई-शिक्षणाचे आव्हान पेलण्यासाठी वरील परिस्थितीवर मात करणे, जलदगती इंटरनेटच्या जाळ्याचा विस्तार करणे गरजेचे आहे.

## ड) स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

ड. ३.१ एका वाक्यात उत्तरे लिहा

१) भारतात आर्थिक सुधारणा कोणत्या वर्षापासून राबविण्यात आल्या ?

------------------------------------------------

------------------------------------------------

२) आर्थिक सुधारणांतर्गत अंतर्भूत तीन प्रक्रिया कोणत्या ?

--------------------------------------------------

--------------------------------------------------

३) भारतीय शिक्षण क्षेत्रासमोरील दोन आव्हाने लिहा.

--------------------------------------------------

--------------------------------------------------

४) शैक्षणिक समानता म्हणजे काय ?

--------------------------------------------------

--------------------------------------------------

ड. ३.२ थोडक्यात उत्तरे लिहा

१) आर्थिक सुधारणांनंतर भारतीय शिक्षण प्रणालीसमोरील कोणतीही दोन आव्हाने स्पष्ट करा.

--------------------------------------------------

--------------------------------------------------

२) शैक्षणिक स्थलांतर म्हणजे काय ? शैक्षणिक स्थलांतराचा प्रश्न विशद करा.

--------------------------------------------------

--------------------------------------------------

३) सांस्कृतिक शिक्षणाच्या आव्हानाचा आढावा घ्या.

--------------------------------------------------

--------------------------------------------------

ड. ३.३ सविस्तर उत्तर लिहा

आर्थिक सुधार कार्यक्रमांनंतर भारतीय शिक्षण व्यवस्थेसमोर उभ्या राहिलेल्या आव्हानांचे विश्लेषण करा.

--------------------------------------------------

--------------------------------------------------

## **क. ४ आधुनिक भारतातील शिक्षण व्यवसाय** Teaching Profession in Modern India :-

आधुनिक भारताच्या जडणघडणीला खऱ्या अर्थाने गतिमानता प्राप्त झाली ती

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच ! अर्थात् तत्पूर्वी ब्रिटिश काळातच आधुनिकीकरणाची प्रक्रिया प्रारंभ झालेली होती. भारतीय समाजव्यवस्थेतील जाती, धर्म, राज्य, अर्थ, कुटुंब, विवाह, शिक्षण इ. सामाजिक संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल झालेत. त्यांच्या स्वरूपात आमूलाग्र परिवर्तन झाले. व्यवसाय, उद्योग, उत्पादन तंत्रे इ. व्यावसायिक क्षेत्रांचे स्वरूप देखील बदलले. ह्या सर्वांचा परिणाम भारतीय समाजातील लोकांच्या परस्पर सामाजिक संबंधांवर देखील झाला. उपरोक्त समग्र परिवर्तन वा आधुनिकीकरणाचा संबंध येतो. तो शिक्षण प्रक्रियेशी ! कारण शिक्षणाच्या माध्यमातूनच आधुनिकीकरणाचा हा पाया रचला गेला आहे.

आज आधुनिकीकरणाच्या बाबतीत भारताने मोठी मजल मारलेली आहे. विकसनशील राष्ट्राकडून 'विकसित राष्ट्र' होण्याकडे अधिक वेगाने वाटचाल चाललेली आहे. ह्या परिस्थितीत शिक्षण व्यवस्थेचे स्वरूपदेखील पालटलेले आहे. 'शिक्षण म्हणजे धर्म' असा पारंपारिक दृष्टिकोण जाऊन त्याला व्यावसायिक स्वरूप प्राप्त झालेले आहे. शिक्षण, शिक्षक, विद्यार्थी, शिक्षणाची उद्दिष्टे व ती साध्य करावयाची साधने आणि मार्ग अशा सर्वच घटकांमध्ये व्यावसायिकतेने प्रवेश केलेला आहे. शिक्ष**णा**च्या व्यावसायिकीकर ाबरोबरच नवीन आव्हाने नवीन समस्यादेखील निर्माण झालेल्या आहेत. त्यांच्या निराकरणाचा प्रयत्न व नवीन आव्हाने पेलण्याची क्षमता आधुनिक शिक्षण प्रक्रियेद्वारे समाजात रुजविण्याचे कार्य सुरू आहे.

लोकशाही राज्यव्यवस्था, लोकशाही मूल्ये, भारतीय संविधानाने समोर ठेवलेली उद्दिष्टे लोकमानसात रुजविणे, त्यांची परिपूर्तता **कर**णे हे आधुनि भारतातील शिक्षण व्यवस्थेसमोरील मोठे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय एकात्मता, सर्व धर्म समभाव, लोकशाही नागरिकत्व, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांची जोपासना व त्याचबरोबर विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीची बरोबरी साधणे संगणक तसेच माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राचा प्रगतीसाठी उपयोग करून घेणे, त्यादृष्टीने मनुष्यबळाचा विकास करणे, जागतिकी**क**रण, खाजगी रण, उदारीकरण अशा प्रक्रियांतून पुढे आलेल्या विकासात्मक वृद्धीच्या आव्हानांचा सामना करणे ही आधुनिक भारतातील शिक्षणासमोरील मोठी आव्हाने आहेत. त्यादृष्टीने शिक्षक, विद्यार्थी यांच्यातील परस्परसंबंध व त्यांच्या भूमिका यामध्येदेखी**ल** मोठा बदल झा ेला आहे. ह्या संबंधांमधील प्राथमिकतेची जागा दुय्यमतेने घेतल्याचे दिसते.

अशा प्रकारे शिक्षण प्रक्रियेतील कारके व शिक्षण व्यवस्थेतील सर्वच घटकांमध्ये परिवर्तन झालेले आहे. ह्या परिवर्तनाचा आढावा पुढील काही मुद्यांच्या आधारे घेऊया.

आधुनिक शिक्षणाची ध्येये :- आधुनिकीकरण हे आधुनिक काळाचे तत्त्वज्ञान बनलेले आहे. प्रचलित काळाच्या गरजेनुसार प्रचलित तत्त्वज्ञाना**ने** आधु कीकरण हे आजच्या शिक्षणाचे ध्येय बनले आहे. जागतिक स्तरावर प्रत्येक विकसित वा विकसनशील देशाने आपल्या जनतेसाठी चांगल्या प्रकारच्या अद्ययावत शिक्षणाची उपलब्धता करून देण्याचा प्रयत्न केला आहे. जर चांगल्या शिक्षणाची सोय केली नाही तर एखाद्या देशाला वैज्ञानिक वा आर्थिक प्रगतीचा विचार करणेसुद्धा शक्य होणार नाही. दैनंदिन जीवनात विज्ञानाचा उपयोग केल्याशिवाय सुखी व निरामय जीवन उपभोगता येणार नाही. आधुनिक प्रगत जीवनाच्या व्यापक संदर्भात उदयोन्मुख भारतीय समाजाला आवश्यक व उपयुक्त असे समर्थ

शिक्षण देणे आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून आधुनिक शिक्षण ची ध्येये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. विज्ञाननिष्ठा व आधुनिक तंत्रज्ञानात्मक विकास साध्य करणे.

२. एकंघ, एकजिनसी समाज निर्माण करून भावनिक एकात्मता व राष्ट्रीय ऐक्य साधणे.

३. सामाजिक प्रगतीसाठी निरक्षरतेचे उच्चाटन करणे.

४. विविध विकासात्मक योजनांच्या अंमलबजावणीसाठी तज्ज्ञ व कार्यक्षम अशा मनुष्य बळाचा विकास करणे.

५. व्यक्तीमध्ये उपयोजन क्षमता निर्माण करणे.

६. सामाजिक, नैतिक व आध्यात्मिक मूल्यांची जोपासना करणे.

७. व्यक्तीमध्ये चिकित्सक, बुद्धिनिष्ठ असा वैज्ञानिक दृष्टिकोण निर्माण करणे.

शिक्षणाच्या ध्येयाकडे नवीन दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. शिक्षण म्हणजे केवळ ज्ञानदान नव्हे. ज्ञानाचा विस्फोट आणि झपाट्याने होणारा सामाजिक बदल म्हणजे शिक्षणाला दिलेले आव्हानच आहे. माहिती व प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रा**ती**ल क्रां ह्या आव्हानाला अधिक परिपुष्ट करीत आहे. ह्याबाबत भारतीय शिक्षण आयोगाने (१९६४-६६) मांडलेला नवा वैचारिक दृष्टिकोण महत्त्वाचा आहे.

" The very aim of education has to be viewed differently - it is no longer taken as concerned primarily with the imparting knowledge or the preparation of the finished product with the awakening of curiosity, the development of proper interest, attitude & values & building up of such essential skills as independent study & capacity to think & judge for oneself without which it is not possible to become responsible member of a democratic society."

म्हणूनच आधुनिक भारताच्या शिक्षणात शिक्षण आणि उत्पादन यांची सांगड घालण्यावर, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता साधण्यावर; लोकशाही मूल्यांची जोपासना करण्यावर तसेच आधुनिकीकरणास प्रोत्साहनपूरक असे विज्ञाननिष्ठ शिक्षण देण्यावर व मानवी जीवन कल्याणकारी करण्यावर अधिक भर देण्यात आलेला आहे.

आधुनिक भारतातील शिक्षणाची आधुनिक ध्येये वा उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षण व्यवस्थेतील शिक्षक ह्या घटकाची भूमिका मध्यवर्ती आहे. आधुनिक भारतीय शिक्षणव्यवस्थेत शिक्षकाचे स्थान व भूमिका आता जाणून घेऊ या.

**आधुनिक भारतीय समाजातील शिक्षकाचे स्थान :-** शिक्षण प्रक्रियेमध्ये शिक्षक, विद्यार्थी व अभ्यासक्रम हे तीन घटक महत्त्वाचे आहेत. शिक्षकाशिवाय शिक्षण प्रक्रिया घडत नाही. प्राचीन काळी भारतीय समाजात शिक्षकाचे स्थान सर्वोच्च होते. त्याला 'गुरू' म्हणून संबोधले जात असे. तत्कालीन शिक्षण व्यवस्था ही धर्माधिष्ठित असल्याने गुरूंना धार्मिकदृष्ट्या

महत्त्वाचे स्थान होते. मध्ययुगीन काळ राजकीयदृष्ट्या अस्थिरतेचा होता. शिक्षकांना प्रतिष्ठा होती. परंतु ती प्राचीन 'गुरू' इतकी मात्र नव्हती. ब्रिटिश काळात समाजाची आध्यात्मिक श्रद्धा कमी होऊ लागली व भोगवादी प्रवृत्ती वाढू लागली. शिक्षणात ल अध्यात्मवादाची जागा व्यावसायिक वृत्तीने घेतली. या सर्व बदलांमुळे शिक्षकाच्या स्थानात व प्रतिष्ठेत बदल घडून आला.

आजच्या आधुनिक काळात व समाजात शिक्षण आणि शिक्षक यांचा दर्जा ढासळला आहे. शिक्षण हे पूर्वीप्रमाणे 'ज्ञानदान' वा 'व्रत' न राहता व्यवसाय बनलेला आहे. ज्ञानदानापेक्षा अर्थार्जनाला अधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. पूर्वीच्या काळी गुरूंजवळ असलेली ज्ञानसाधना, पात्रता व उच्च आचारसंहिता आज दिसून येत नाही. सध्या शिक्षणावरच समाजाचा विश्वास राहिलेला नाही. शिक्षण व्यवसाय व शिक्षक या दोहोंचेही अवमूल्यन झाल्याचे दिसून येते. आज शिक्षकांना पूर्वीइतकी प्रतिष्ठा नाही. बदललेल्या समाजात सत्ताकारण, अर्थकारण व अधिकार यांच्याभोवती प्रतिष्ठेचे वलय निर्माण झालेले आहे. शिक्षकाकडे या तीनही गोष्टींचा अभाव असल्याने त्याला समाजात प्रतिष्ठा नाही.

**प्रतिष्ठा कमी होण्याची कारणे :–** आजच्या शिक्षकाच्या अंगी ध्येयवाह, ज्ञानलालसा, विद्यार्थ्यांविषयी प्रेम, चारित्र्यसंपन्नता, मनोनिग्रह, व्यासंगी वृत्ती, बहुश्रुतता, निर्भयता इ. गुणांचा अभाव आढळतो. पैशांच्या अपेक्षेने तुटपुंज्या ज्ञानावर ि रूपयोगी शिक्षण देण्यावरच शिक्षकांचा भर दिसून येतो. त्यामुळे समाजातील त्याची प्रतिष्ठा कमी झालेली आहे.

समाज शिक्षकाकडे सुशिक्षित व बुद्धिमान म्हणून मार्गदर्शकाच्या अपेक्षेने पाहत असतो. समाज परिवर्तनात शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते. शिक्षक समाजाच्या ह्या अपेक्षा पूर्ण करू शकला नाही म्हणजे तो आपली प्रतिष्ठा गमावतो. शिक्षकाचा व्यवसाय हा एक संवेदनशील व्यवसाय आहे. शिक्षकाने ही संवेदनशीलता गमावली तर समाजजी न रूक्ष व भकास होईल. आजच्या शिक्षकांपैकी बहुतेक शिक्षक संवेदनाहीन झालेले आहेत. शिक्षणक्षेत्रातील राजकारण, भ्रष्टाचार, बदल्यांची भीती, धावपळीचे जीवन, सभोवतालचे गढूळ सामाजिक वातावरण इ. मुळे शिक्षक भावनिकदृष्ट्या अस्थिर असतो. त्य मुळे त्याच्या प्रतिष्ठेवर विपरित परिणाम होतो.

आजच्या समाजात शिक्षकाची प्रतिष्ठा कमी झालेली असली तरी त्याचे समाजासाठी असलेले महत्त्व मात्र कायम आहे. बालकाच्या व्यक्तिमत्त्वाचा विक स करून भावी नागरिक घडविण्याचे काम शिक्षकालाच करावयाचे आहे. शिक्षकाला समाज परिवर्तनाच्या कार्यात महत्त्वाची भूमिका पार पाडावयाची आहे.

**आधुनिक शिक्षण व्यवसाय व व्यावसायिकता :–** शिक्षकी पेक्षा किंवा शिक्षण व्यवसाय हा समाजातील विविध व्यवसायांपैकीच एक आहे. साधारणपणे त्याच प्रकारची नोकरी किंवा चरितार्थासाठी तेच काम करणाऱ्या लोकांचा समूह म्हणजे विशिष्ट व्यावसायिकांचा समूह होय. प्रत्येक व्यवसायाचे समाजजीवनात एक विशिष्ट स्थान असते, महत्त्व असते. हे स्थान वा महत्त्व त्या व्यवसायाच्या कार्यावरून व समाजाच्या प्रागतिक वाटचालीतील त्याच्या वाट्यावरून ठरते. मानवी जीवन उंचावणाऱ्या मूल्यांची पूर्तता करणारा व्यवसाय हा

श्रेष्ठ व्यवसाय मानला जातो.

आधुनिक काळात शिक्षणाचे कार्य हे पूर्णपणे शिक्षणसंस्थांकडे हस्तांतरित झालेले आहे. यादृष्टीने कुटुंबाचे कार्य जरी महत्त्वाचे असले तरी अगदी वयाच्या दुसऱ्या तिसऱ्या वर्षापासूनच बालकाचा संबंध शिक्षणसंस्थांशी औपचारिकरित्या जोडला जाऊ लागला आहे. शिक्षणसंस्थेतील शिक्षकांचे शिक्षण, त्यांची व्यावसायिक पात्रता, हातोटी, शिक्षण संस्थांमधील उपलब्ध सोयी सुविधा, आधुनिक तंत्रांचा वापर, उच्च गुणवत्ता, व्यावसायिकता इ. व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाच्या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. उच्च व्यवसाया े काही निकष शिक्षण व्यवसायालासुद्धा लागू झालेले आहेत. त्यापैकी काही निकष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. सखोल ज्ञान व प्रदीर्घ प्रशिक्षण काळ

२. गुणवत्तेवर प्रवेश

३. व्यावसायिक आचारसंहिता

४. व्यावसायिक अद्ययावतता

५. व्यावसायिक अद्ययावतता

वरील निकषांचे पुढील प्रकारे विवेचन करता येईल.

**१. सखोल ज्ञान व प्रदीर्घ प्रशिक्षण काल :–** व्यावसायिकाचे आपल्या विषयाचे ज्ञान सखोल असते. ते प्राप्त करण्यासाठी त्याने प्रदीर्घ काळ परिश्रम घेतलेले असतात. आपल्या व्यवसायाची विशेष कौशल्ये आत्मसात करण्यासाठी त्याने उच्च कोटीचे प्रशिक्षण घेतलेले असते. त्या व्यवसायाची ज्ञानात्मक बाजू त्याने पूर्णपणे समजावून घेतलेली असावी. त्या व्यावसायिकाला या ज्ञान व कौशल्यांचे सामाजिक गरजांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने उपयोजन करता यावयास हवे. आपल्या प्रशिक्षणामुळे समाजातील कोणाची व कोणती गरज पूर्ण भागवायची आहे याची जाणीव त्या व्यावसायिकासे **ओ**लेली सत . प्रखर बुद्धिनिष्ठा व त्याचबरोबर सामाजिक हिताची जोपासना, त्यासाठी लागणारी कौशल्ये वापरणारे क्रियाशील मन व तन यांच्यामुळेच व्यावसायिकास एक वेगळी उंची गाठता येते.

**२. गुणवत्तेवर प्रवेश :–** विशिष्ट व्यवसायाचे प्रशिक्षण घेऊन त्यातील पात्रता प्राप्त करण्यासाठी गुणवत्तेवर आधारित प्रवेश प्रक्रिया असते. ती पार पाडून तीत यशस्वी ठरलेल्या उमेदवारांना त्या विशिष्ट अभ्यासक्रमास प्रवेश मिळविता येतो. ह्या प्रवेश प्रक्रियेतील गुणवत्तेचे निकष त्या-त्या व्यवसायातील तज्ज्ञ ठरवितात. प्रवेश परीक्षा, मुलाखत, सादरीकरण, इ. प्रक्रियांतून बऱ्याचदा उमेदवारांना जावे लागते. आधुनिक काळात बी.एड्., डी.एड्. ह्यांसारख्या व्यावसायिक शिक्षणक्रमांना गुणवत्तेच्या आधारेच प्रवेश दिला जातो. शिक्षण व्यवसाय क्षेत्रातील व्यावसायिक घडविण्याचे कार्य ह्या अभ्यासक्रमांमधून केले जाते.

**३. व्यावसायिक आचारसंहिता :–** शिक्षकाला आपला व्यवसाय उत्तम रीतीने पार पाडावयाचा असेल तर त्याला आपल्या व्यवसायाच्या काळाशीसुसंगत अशा आचार प्रणालीचे भान हवे. त्याची वर्तणूक समाजमान्य हवी. त्याच्या वर्तनाचे नियम त्याच्या प्रतिष्ठेला साजेसे हवेत. समाजाने शिक्षकावर टाकलेली जबाबदारी, समाजाची शिक्षकाच्या

चारित्र्याबद्दलची अपेक्षा व भावी पिढीच्या चारित्र्य निर्माणातील शिक्षकाची भूमिका लक्षात घेता शिक्षकाकडून विशिष्ट वर्तनाची अपेक्षा असते. कसे वागावे याविषयीचे नियम म्हणजे आचारसंहिता होय. आचारसंहिता म्हणजे व्यवसायाचे नियम ह`त.

शिक्षकाच्या आचारसंहितेच्या विविध बाजूंमध्ये शिक्षकी व्यवसायाची निष्ठा, व्यवसाय विकास, चारित्र्याविषयी नियम, विचारसरणी, शाळेतील कामाविषयीचे नियम, विद्यार्थ्यांसंबंधीची कर्तव्ये, समाजमान्य वर्तनाचे नियम इ. बाबीं ा समावेश होतो.

**४. व्यावसायिक अद्ययावतता :–** आपल्या व्यवसायातील नवीनतम तंत्रे, अद्ययावत ज्ञान व घडामोडी यांचे ज्ञान व्यावसायिकाजवळ असावयास ह`. आपल्या व्यावसायिक गुणवत्तेच्या वृद्धीसाठी हे अत्यावश्यक असते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आज गतिमानता आलेली आहे. नवनवीन तंत्रांचा वापर व्यावसायिक विकासाच्या दृष्टीने केला जात आहे. शिक्षण क्षेत्रदेखील ह्यास अपवाद नाही. शिक्षण व्यवसायातील नवीनतम तंत्रांचे व ज्ञानाचे आत्मसातीकरण शिक्षकांनी करावयास हवे. त्योदृष्टीने ा जित शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम, कृतीसत्रे, चर्चासत्रे, उद्‌बोधन वर्ग इ. उपक्रमांमध्ये वेळोवेळी सहभागी व्हा यास हवे. माहिती–तंत्रज्ञाच्या विद्यमान युगात शिक्षण व्यवसायातील अद्ययावतता ही काळाची गरजच आहे.

**५. व्यावसायिक स्वातंत्र्य :–** शिक्षकाचा व्यवसाय करीत असताना शिक्षकांमध्ये उपक्रमशीलता वाढावी यासाठी त्यांना व्यावसायिक स्वातंत्र्याची आवश्यकता असते. समाजहितैषी विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त अशा उपक्रमांचे उपयोजन करीत असताना त्यांच्यावर वरिष्ठ आणि संबंधित घटकांनी पूर्णपणे विश्वास टाकून त्यांना प्रोत्साहन द्यावयास हवे. यातूनच त्यांचे स्वत:चे व पर्यायाने विद्यार्थ्यांचेदेखील व्यक्तिमत्व विकास पावते.

**आधुनिक शिक्षण व्यवसायातील आव्हाने :–** आधुनिक भारतीय समाज हा सामाजिक, राजकीय, आर्थिक, औद्योगिक इ. विविध स्थित्यंतरांतून जात आहे. शिक्षण क्षेत्रदेखील त्याला अपवाद नाही. भारतीय शिक्षण व्यवस्थेत आज शिक्षणाचे प्रमाण, शिक्षणाचे माध्यम, शैक्षणिक सुविधा शिक्षकाचे समाजातील स्थान, विद्यार्थ्यांवरील प्रसार माध्यमांचा प्रभाव इ. विविध आव्हाने उभी राहिलेली आहेत. एक व्यावसायिक म्हणून शिक्षकाला ह्या आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. ह्या आव्हानांची चर्चा पुढील मुद्यांच्या आधारे आपल्याला करता येईल.

**१. ज्ञानाचा प्रस्फोट व तंत्रज्ञानातील अफाट प्रगती :–** ज्ञानाच्या प्रस्फोटाने शिक्षकाला 'ज्ञान' अद्ययावत ठेवणे अवघड झाले व ज्ञान देण्याची साधने उपलब्ध झाल्याने 'माहिती' देणारी केंद्रे पूर्वीपेक्षा वाढली. त्यामुळे शिक्षक हा 'विश ष ज्ञानी' ी गोष्ट विशेषत: प्राथमिक व माध्यमिक स्तरावर अनुभवणे कठीण झाले. 'विशेष ज्ञानामुळे' व्यावसायिक म्हणून मिळणारी प्रतिष्ठादेखील दुरापास्त झाली.

**२. राजकीय प्रभाव :–** आज शिक्षण क्षेत्रावरील राजकीय प्रभाव वाढीस लागलेला दिसतो आहे. शिक्षणसंस्था ह्या राजकीय नेत्यांच्या आश्रयाने वाढीस लागलेल्या आहेत. मुख्याध्यापक, शिक्षक, प्राचार्य, प्राध्यापक अशा शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाच्या घटकांना

राजकीय प्रभावापुढे मान तुकवावी लागत आहे. नव्या शैक्षणिक संस्थांची सुरूवात, नेमणुका, प्रवेश, पुस्तके या साऱ्या बाबतीतील निर्णय हे शैक्षणिकच आहेत असे म्हणण्याची परिस्थिती नाही. महाविद्यालयीन क्षेत्रात तर हा प्रभाव अधिक जाणवतो. महाविद्यालयीन निवडणुका व त्याद्वारे महाविद्यालयात राजकीय पक्ष व संघटनांचा प्रवेश यांच्यामुळे राजकीय प्रभाव वाढलेला आहे.

**३. प्रसार माध्यमांचा प्रभाव :–** आधुनिक विद्यार्थ्यांवर दूरचित्रवाहिन्या, चित्रपट, इंटरनेट यांसारख्या प्रसारमाध्यमांचा प्रभाव वाढलेचे त्र आह . बऱ्याचदा ह्या प्रसार माध्यमांतून नकारात्म, हिंसाचार, उत्तानपणा, चंगळवादास पोषक व शैक्षणिक हितास बाधक अशा प्रवृत्तींचे उदात्तीकरण केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांवर न–कारात्म प्रभाव निर्माण होतो व तो दूर सारण्याचे खडतर आव्हान शिक्षकांपुढे निर्माण होत .

**४. अशैक्षणिक कामांचा बोझा –** आज शिक्षकाची नेमकी भूमिका कोणती ? हे निश्चित करण्याची वेळ आलेली आहे. समाजाची जडण–घडण करणाऱ्या व व्यक्तिमत्त्वाचा विकास करणाऱ्या शिक्षकांना पोषण आहार, जनगणना, मतदार ओळखपत्रांचे वाटप, औषधांचे वाटप, निवडणुकांतील कामे इ. विविध अशा अशैक्षणिक कार्यांची सक्ती केली जाते. ही कामे न करणाऱ्यांवर प्रशासनाकडून दंडात्मक कारवाईदेखील केली जाते. त्यामुळे आजचा शिक्षक अशा अशैक्षणिक कामांच्या ओझ्याखाली दबलेला आहे. त्यानिमित्ताने केल्या जाणाऱ्या कारवाईच्या शंकेने मानसिक बैचेनीचा, धास्तीचा सामना करीत आहे. याचा विपरीत परिणाम त्याच्या मुख्य भूमिकेवर झोलसून य ते.

**५. स्वयंप्रेरणेचा अभाव :–** शिक्षकी पेशात प्रवेश करणारे बरेचसे जण स्वयंप्रेरणेने या व्यवसायात न येता नाईलाजाने आल्याचे चित्र दिसते. दुसरे काही न करता आल्याने किंवा आपल्या पात्रतेपेक्षा कमी दर्जाच्या व्यवसायात आपण आलो आहोत या भावनेने शिक्षण क्षेत्रात व्यावसायिक म्हणून येणाऱ्यांची संख्या बरीच आहे. अशा शिक्षकांमध्ये स्वयंप्रेरणा, प्रेम, निष्ठा, समर्पण यांचा अभाव आढळतो व त्यामुळे व्यावसायिक निष्ठेचा प्रश्न निर्माण होतो.

वरील काही आव्हानांमुळे आधुनिक भारतीय समाजातील शिक्षणाचा व्यवसाय हा खरेतर अधिक आव्हानात्मक बनलेला आहे. त्यामुळे ह्या क्षेत्रात येण ऱ्या व्यक्तींनी आपली पात्रता व व्यावसायिक उपयुक्तता अधिक वाढविणे गरजेचे आहे. व्यावसायिक विकासावर केंद्रित राहून स्वत:बरोबरच सहकाऱ्यांच्यासह संघटित प्रयत्नांनी ह्या आव्हानांचा सामना करावयास हवा.

---

## ड.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

---

ड. ४.१ एका वाक्यात उत्तरे लिहा

१) आधुनिक शिक्षणाची दोन ध्येये लिहा.

------------------------------------------------

------------------------------------------------

२) आधुनिक भारतीय समाजात शिक्षकाची प्रतिष्ठा कमी होण्याची दोन कारणे लिहा.

---------------------------------------------

---------------------------------------------

३) आधुनिक शिक्षकास व्यावसायिक अद्ययावतता प्राप्त करून देणारी दोन साधने लिहा.

---------------------------------------------

---------------------------------------------

४) सध्याच्या काळात शिक्षकांना करावी लागणारी कोणतीही दोन अशैक्षणिक कामे लिहा.

---------------------------------------------

---------------------------------------------

ड. ४.२ थोडक्यात उत्तरे लिहा

१) आधुनिक शिक्षणाची ध्येये थोडक्यात स्पष्ट करा.

---------------------------------------------

---------------------------------------------

२) आधुनिक भारतीय समाजात शिक्षकांची प्रतिष्ठा कमी करणाऱ्या कारणांचा आढावा घ्या.

---------------------------------------------

---------------------------------------------

ड. ४.३ दीर्घोत्तरी प्रश्न

१) आधुनिक भारतातील शिक्षण व्यवसायाचे स्वरुप स्पष्ट करून आधुनिक शिक्षणाची ध्येये विशद करा.

---------------------------------------------

---------------------------------------------

२) आधुनिक शिक्षकाची व्यावसायिकता वाढविण्यासाठी आवश्यक निकषांची चर्चा करा.

---------------------------------------------

---------------------------------------------

३) आधुनिक शिक्षण व्यवसायातील आव्हानांचा आढावा घ्या.

---------------------------------------------

---------------------------------------------

## इ–सारांश :–

भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या दृष्टीने स्वातंत्र्यप्राप्ती नंतरचा काळ दिश निर्देशक ठरला. स्वातंत्र्यलढ्या दरम्यान लोकांना शिक्षण क्षेत्राविषयी दिलेल्या वचनांच्या पूर्ततेच्या दृष्टीने व एकूणच शिक्षणव्यवस्थेचा आढावा घेऊन तिची स्वतंत्र भारताच्या दृष्टीने पुनर्रचना करण्यासाठी शैक्षणिक आयोगांची स्थापना भारत सरकारने केली. विद्यापीठ स्तरीय व माध्यमिक शिक्षणाच्या दृष्टीने प्रथमत: दोन स्वतंत्र आयोगांची स्थापना भारत सरकारने १९४८ साली केली होती. त्याचप्रमाणे १९६० पूर्वी सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट गाठण्याचेदेखील निश्चित केले गेले होते.

विद्यापीठ शिक्षण आयोग १९४८, ताराचंद समिती १९४८, आचार्य नरेंद्र देव समिती १९५२, माध्यमिक शिक्षण आयोग १९५२, कोठारी आयोग १९६४–६६ अशा विविध आयोगांच्या वा समितींच्या स्थापनेमागे भारतीय शिक्षण व्यवस्थेला अधिकाधिक अद्ययावत बनवून लोकाभिमुख बनविणे व विकासाचा टप्पा गाठणे हे उद्दिष्ट होते. विविध आयोगांनी शिक्षणव्यवस्थेसंबंधी विविध सूचना केलेल्या आहेत. त्या सूचनांच्या अनुषंगाने भारत सरकारने विविध कार्यक्रम आणि धोरणे शिक्षणाच्या दृष्टीने अ खलेली दिसतात. विविध शैक्षणिक धोरणांमध्ये प्राथमिक स्तरापासून ते उच्च शिक्षण तसे प्रौढ शिक्षणासारख्या मुद्यांची चर्चा केलेली आहे. कालबद्ध कार्यक्रमांच्या आधारे भारताच्या शैक्षणिक विकासाचे उद्दिष्ट गाठण्याचे प्रयत्न झालेले दिसून येतात.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जगातील विविध देशांनी आर्थिक सुधार कार्यक्रम हाती घेतले. भारतदेखील त्यास अपवाद नव्हता. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण ह्या तीन प्रक्रियांच्या माध्यमातून बदलत्या शैक्षणिक व्यवस्थेचे आव्हान यशस्वीपणे पेलण्याचा प्रयत्न भारताने केल्याचा दिसतो. आज शिक्षण व्यवस्थेचा संबंध समाजविकासाच्या सर्वंकष पातळीवर जोडला जातो. लोकशाही राज्यव्यवस्था, लोकशाही मूल्ये, स्वातंत्र्य, समता व बंधुता, सामाजिक न्याय या तत्त्वांना भारतीय जनमानसात रुजविण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे शिक्षणच आहे. शिक्षणाला आजच्या आधुनिक काळात व्यावसायिक स्वरूप प्राप्त झालेले आहे. शिक्षक–शिक्षकाचे कार्य–शिक्षकाचे समाजातील स्थान अशा सर्वांमध्ये परिवर्तन झालेले आहे. विज्ञाननिष्ठेची रुजवण, आधुनिक तंत्रज्ञानात्मक विकास साधणे तसेच नैतिक व आध्यात्मिक मूल्यांची जोपासना करणे ही आधुनिक शिक्षण–प्रणालीची तत्त्वप्रणाली आहे. काळानुरूप सुसंगत व अद्ययावत शिक्षणव्यवस्थेची रचना करणे हेच महत्त्वाचे साध्य आहे.

## फ) क्षेत्रीय कार्य :

अ) आपल्या परिसरातील प्रौढ साक्षरता केंद्रास भेट द्या व त्याच्या कार्याची माहिती घ्या.

ब) आपल्या परिसरातील माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांना भेट देऊन तेथील ई–शिक्षणाच्या सुविधेविषयी माहिती घ्या.

क) आपल्या परिचयाच्या अध्यापकांची मुलाखत घ्या व 'आधुनिक काळातील शिक्षकाचे सामाजिक स्थान' याविषयी त्यांची मते जाणून घ्या.

## ग) पारिभाषिक शब्द/शब्दार्थ :

प्रौढ शिक्षण : निरक्षर अशा प्रौढ व्यक्तींसाठी शिक्षण योजना

खाजगीकरण : मालकी नियंत्रण सरकारी पातळीवरून खाजगी पातळीवर आणणे.

उदारीकरण : अर्थव्यवस्थेचे शिथिलीकरण.

जागतिकीकरण : देशाच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहारांचा विस्तार करणे.

मनुष्यबळ विकास : समाजातील व्यक्ती (माणूस) हेच समाजाचे बलस्थान आहे म्हणून व्यक्तींमध्ये विविध क्षमतांचा विकास करून मनुष्यबळ समृद्ध करणे.

## ह) संदर्भ/अधिक वाचनासाठी ग्रंथ :


१. वीरकर प्र.कृ. व प्रतिभा (१९९१), उदयोन्मुख भारतीय समाजाचे शिक्षण व शिक्षक; पुणे, द्वारका प्रकाशन.

२. वाघमारे जनार्दन (१९९३), आजचे शिक्षण : स्वप्न आणि वास्तव; पुणे, सुरेश एजन्सी.

३. माळी मा. गो. (१९९६), भारतीय शिक्षणाचे आधुनिकीकरण, पुणे; मेहता पब्लिशिंग हाऊस.

४. नाईक ज. पां. (२०००), अनौपचारिक शिक्षण, पुणे, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन.

५. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (१९८७) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९८६, पुणे.

६. डोंगरे ग. शं. (संपा.) (१९९०) ; शिक्षणातील नवे विचारप्रवाह, नाशिक, य.च.म.मु.

७. नरवणे मीनल (२००३), भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या, पुणे नित्यनूतन प्रकाशन.

८. Shukla P. D. (1988), The New Education Policy ; Delhi, Sterling Publishers Pvt. Ltd.

९. Ram A. & Sharma K. D. (2005), National Policy on Education : An overview, Delhi, Vikas Publishing House.

१०. Reforms & Innovation in Higher Education (2001), Delhi, Association of Indian Universities.

# प्रकरण ६

## भारतातील शैक्षणिक समस्या

**अनुक्रमणिका**

**६.०. उद्दिष्टे**

**६.१. प्रास्तावना**

**६.२. विषय विवेचन**

- **६.२.१. भाषिक माध्यमाची समस्या**
- **६.२.२. बदलते शैक्षणिक शुल्क वा त्याचा प्रभाव**
- **६.२.३. मागास घटकांच्या/वर्गाच्या शैक्षणिक समस्या**
  - **६.२.३.१. अनुसूचित जाती**
  - **६.२.३.२. अनुसूचित जमाती**
  - **६.२.३.३. स्त्रिया**
- **६.२.४. शिक्षण आणि गतिशिलता**

**६.३. पारिभाषिक शब्द**

**६.४. स्वाध्याय**

**६.५. सारांश**

**६.६. संदर्भ ग्रंथ**

## ६.० उद्दिष्टे

गांधींजींनी भारतात मूलभूत शिक्षण व्यवस्थेमार्फत क्रांती घडवून आणायची होती. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, प्राथमिक शाळेने अहिंसात्मक सामाजिक क्रांतीचे नेतृत्व केले पाहिजे.

भारतात अनु. जाती, जमाती, स्त्रिया हे भारतीय समाजातील दुर्बल घटक आहेत. एकूण भारतीय लोकसंख्येच्या ५०% पेक्षा जास्त भाग या घटकाने व्यापला आहे. तरीसुद्धा हा घटक शैक्षणिकदृष्ट्या मागसलेला आहे. भारतीय समाजात अनेक शैक्षणिक समस्या आहेत.

सदर प्रकरणात आपण.

१) भारतातील भाषा माध्यमाच्या समस्या जाणून घेण्यास मदत होईल.

२) भारतातील बदलत्या शैक्षणिक शुल्का परिणाम विविध सामाजिक स्तरावर कसा झाला याची माहिती होईल.

३) भारतातील अनु. जाती, जमाती, स्त्रिया या दुर्बल घटकांच्या समस्या माहिती होतील.

४) प्रौढशिक्षण व त्यातील समस्या जाणून घेण्यास मदत होईल.

## ६.१. प्रस्तावना

भारतात अजूनही निरक्षर लोकांचे प्रमाण फार मोठे आहे. २०११ च्या जनगणनेनुसार हे प्रमाण २५९६% इतके आहे. सर्व शिक्षा अभियानामुळे शिक्षणाचा प्राथमिक स्तरावर फक्त संख्यात्मक विकास झालेला दिसून येतो. मात्र गुणात्मक विकास खुंटलेलाच आहे. असर – २०१२ च्या पाहणीनुसार शासकीय शाळांमधील फक्त ५०% मुलाना १५० पर्यंत आकडे ओळखता येतात. प्राथमिक शिक्षण पूर्ण होण्याअगोदर शाळा सोडणाऱ्याचे प्रमाण अजूनही ४२.३९% इतके आहे. उच्च शिक्षणामध्ये व्यवसायिक व तांत्रिक शिक्षणाकडे असणारे शासनाचे दुर्लक्ष, संशोधन कार्याबदलची उदासिनता, भरमसाठ शैक्षणिक शुल्क, खाजगी संस्थाचे ..., गुणवत्तेचा अभाव अनु. जाती, जमातीच्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक इ. समस्या आजही दिसून येतात.

२०११ च्या जनगणनेनुसार महिला साक्षरता दर हा ६३.४६ एवढा कमी आहे. राज्यनिहाय तुलना केल्यास अधिक लोकसंख्या असलेल्या राज्यातील स्त्रियंची साक्षरता कमी आहे. उदा. राजस्थान ५२.६०%, बिहार ५३.३३%, झारखंड ५६.२%, उत्तरप्रदेश ५९.२६% शिक्षणाअभावी मुलींचे कमी वयातच लग्न होतात.

१९९१ नंतर खाजगी क्षेत्राद्वारे शैक्षणिक संस्था चालविणे हे सेवा कार्य राहिले नाही तर शिक्षणाकडे 'नफ्याचा एक मार्ग' म्हणून पाहिले जावू लागले. त्यातून मोठ्या प्रमाणात खाजगी संस्था निर्माण झाल्या.

## ६.२.१. भाषिक माध्यमांची समस्या

भारताची भाषिक समस्या ही किती भाषांना अभ्यासक्रमात स्थान असावे आणि शिक्षणाचे माध्यम कोणती भाषा असावी. अशा स्वरूपाची केवळ शैक्षणिक नाही. ती सामाजिक समस्या आहे आणि तिला लोकशाहीचा संदर्भ आहे. समान संधीशी व राष्ट्रीय एकात्मेशी तीचा संबंध आहे. भारतात भाषावार राज्य पुनर्रचना झाली ती लोकशाहीच्या दृढीकरणासाठी. तिच्यामुळे प्रादेशिक, दूरभिमान वाढू नये वशिलेबाजी, लाचलूचपत यांना वाव मिळू नये. शिक्षणाचा दर्जा उंचावला पाहिजे हा ही त्यामागील हेतू होता. पण त्यामुळेच केवळ शासकीय व्यवहारासाठी नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक आदान प्रदानासाठी राष्ट्र भाषेची गरज निर्माण झाली. आणि तो मान त्यांनी हिंदीला दिला. मातृभाषेतून शिक्षण मिळणे हा बालकांचा नैसर्गिक हक्क आहे, आणि शिक्षणातही मातृभ षा हेच माध्यम असावे याबद्दल फारसा वाद उरला नाही.

इंग्रजीच्या माध्यमांवर सर्व शिक्षणतज्ज्ञानी अक्षेप घ्रेतले. त्याचे स्वरूप जसे मानसशास्त्रीय होते, तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक ही होते. या माध्यमातून शिक्षण घेणे भारतीय समाजातील अनेक घटकांना अडचणीचे ठरते. त्यामुळे अनेक मुले शिक्षणापासून ते वंचित राहू शकतात. 'इंग्रजी' माध्यमामुळे शैक्षणिक दरी निर्माण होईल. शिक्षित, अशिक्षित दरी वाढत जाईल. अशा इंग्रजी माध्यमातून शिकलेला वर्ग स्वतःच्य संस्कृतीला पारखा बनत चालला आहे. जागतिक संपर्कासाठी, वैज्ञानिक तांत्रिक प्रगतीसाठी इंग्रजीचे महत्त्व सर्वांनाच

मान्य आहे. 'ग्रंथालयीन भाषा' म्हणूनच तिचा उपयोग हो े गरजेच आहे. व्यवहारीक भाषा म्हणून नाही.

डॉ. डी. सी. कोठारी - विद्यापीठ अनुदान मंडळाचे भूतपूर्व अध्यक्ष यांनी 'भाषिक समस्या' ही एक विशाल सामाजिक आणि उत्क्रांतीचा भाग अ हे हे लक्षात घेतले पाहिजे' या विचाराकडे लक्ष वेधले. भारतातील प्रादेशिक भाषांचा विकास आजच्या वैज्ञानिक युगात कोणत्या दिशेने व्हावा, या प्रश्नाकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. पण त्यांनीच म्हटल्याप्रमाणे देशातील प्रचंड संख्येने असलेले निरक्षर जोपर्यंत साक्षर होत नाहीत त ांना आपली मातृभाषा धडपणे समजत नाहीत तो पर्यंत आंतरप्रांतीय संपर्काच्या भाषाचा प्रश्न तितकासा महत्त्वाचा ठरत नाही.

विद्यार्थ्यांच्या भाषिक ज्ञान कौशल्यावर त्यांची व्यवसायिक व आर्थिक प्रगती अवलंबून आहे हे लक्षात घेतले पाहिजे. हुशार विद्यार्थ्यांनी बहू भाषिक बनण्याखेरीज गत्यंतर नाही. पण हे बहुभाषिक वृत्ती सामाजिक एकतेसाठी उपयोगी पडणे हीच राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाची गरज आहे.

## ६.२.२. बदलते शिक्षण शुल्क आणि त्याचा प्रभाव

'शिक्षण हे सामाजिक विकासाचे व परिवर्तनाचे एक महत्त्वाचे साधन आहे. कोणत्या ही भेदभावाशिवाय व कोणत्याही बंधानाशिवाय सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे. घटनेतील कलम ४१ नुसार ही शासनाची जबाबदारी होती. नंतर त्याचे रूपांतर कलम २१ (१) द्वारे मूलभूत अधिकारामध्ये झाले. पण समाजातील सर्व स्तरांपर्यंत शिक्षण घेवून जाण्यास शासनाला शक्य नव्हते. त्यामुळे शिखणाच्या प्रसारासाठी खाजगी संस्थांची मदत घेतली तशी त्यांना परवानगी शासनाकडून देण्यात आली. महाराष्ट्रात ही प्रक्रिया १९८६ पासून सुरू झाली पण खरा वेग १९९० नंतर खाजगीकरणाच्या धोरणाच्या मंजुरीनंतर प्राप्त झाला. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षणासाठी अनेक खांजगी संस्था या क्षेत्रात आल्या. कालांतराने शासनाने 'कायम' किंवा 'अनुदानित' या तत्वावर अनेक संस्थांना, शिक्षण संस्थाना परवानगी दिली. त्याचा परिणाम असा झाला की, विविध ठिकाणी अगदी मेट्रो सिटीपासून ते ग्रामीण भागात शिक्षणसंस्थाचे .... फुटले. त्याचे शिक्षणक्षेत्रावरच ांगल वाईट असे दोन्ही प्रभाव आपल्याला दिसून येतात. मग ते सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक स्वरूपाचे आहेत.

म्हणजे १९९० नंतर 'शिक्षण' हे सेवा कार्य राहिले नाही तर ते शिक्षण हे व्यवसाय, नफ्याचा मार्ग या अनुषंगाने पाहिले जावू लागले. यामुळे अनेक व्यवसायिक व्यक्ती, संस्था यांनी शिक्षण क्षेत्रात 'गुंतवणूक' करण्यास सुरुवात केली. या प्रक्रियेला वेग ऋअढड च्या जानेवारी २००५ पासूनच्या अंमलबजावणीमुळे आणखीनच वाढला. पण याचे परिणाम भारतीय समाजातील विविध घटकांना मोठ्या प्रमाणात झाला. तो पुढीलप्रमाणे -

शहरात, ग्रामीण भागात मराठी माध्यम, इंग्रजी माध्यम, सेमी इंग्रजी सारख्या अनेक शाळा मोठमोठ्या इमारतीसह सुरू झाल्या. पण प्रदेशासाठी मात्र त्य चे शैक्षणिकही तेवढेच मोठे होते. त्यामुळे आर्थिक मागास घटकातील विद्यार्थ्यांना या मोठ्या शैक्षणिक शुल्कापोटी

शिक्षणाच्या संधी नाकारल्या जातात. ज्यामफळे शिक्षणाच्या मूलभूत हक्कांपासून वंचितच राहतील. ग्रामीण भागातील शासन अनुदानित मराठी ज्ञान असल्याकारणाने या शाळाकडे जाण्याचा ओघ कमी झाला आहे. कारण इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा प्रभाव वाढत्याकारणाने मोठ्या शहरापासून ते ... पर्यंत, प्रत्येक पालकाला त्यांच .... इंग्रजीमाध्यमांच्या शाळेत जायला हवा असे वाटू लागले आहे. ते एका प्र**का**रचे सामाजि प्रतिष्ठीचे लक्षण मानल्या जावू लागले आहे. त्याचा फायदा हे इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी करून घेतला व त्यांनी 'कॅपीटेशन फींस' म्हणून भरमसाठ शैक्षणीक शुल्क आकाराल्यास सुरुवात केली.

अगदी बालवाडीपासून या 'डोनेशन फिस'ची सुरुवात्त हो े. शाळ च्या जेवढा परिसर शुशोभीत मोठी इमारत चककीत परिसर असले तेवढी फिस मोठी. 'गुणवत्तापपूर्ण शिक्षण' ही तिथे दुय्यम बाब ठरते. यामुळे कनिष्ठ वर्गातील, मध्यम वर्गातील मालकांना ही अशा प्रकारची फिस झेपत नाही अशा वेळेस त्यांना कु**ठे**तरी इतर मरा ी माध्यमांच्या शाळांमध्ये पाल्यांना पाठवावे लागते.

प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा या सव्र स्तरावर हा प्रकार सर्रास चालू आहे. शासनाने कितीही कायदे केले तरी कायम विना**अ**नुदानीय' सल्या कारणाने शासनाला यावर आळा घालण्यास मर्यादा येतात. तसेच नेता, पुढारी, त्यांचे कार्यकर्ते यांच्याच शाळा असल्याकारणाने त्याच्यांकडे डोळेझाक ही केली जाते. त्यामुळे शिक्षणाच्या बाजारीकरणाला चालना मिळाली. काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व पालकांची शैक्षणिक शतकासंदर्भात फसवणूक केली जाते. विविध सोयी सुविधांच्या नावाखाली भरमसाठ शैक्षणिक शुल्का आकारले जाते मात्र सुविधा दिल्या जात नाही.

उच्च शिक्षणाचेही मोठ्या प्रमाणात खाजगीकरण झालेले आहे. पूर्वी उच्च शिक्षण हे शासनाच्या अखत्यारित होते. त्यामुळे कमी शुल्कात आर्थिक मागास विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येत असे पण उच्च शिक्षणाचे खाजगीकरण झाले व गावा-गावात व्यवसायिक, तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था सुरू झाल्या. पण मात्र गुणवत्तेपेक्षा श्रीमंत असलेल्यांच्या मुलांनाच प्रवेश मिळू लागला आहे. कारण आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या विद्यार्थ्यांना अशा संस्थामध्ये प्रवेश मिळणासे झाले. असे विद्यार्थी दर्जेदार शिक्षण पासून वंचित झाले. परिणामी गरिबीची गुणवत्ता असलेल्या मुलांना बेरोजगार म्हणून राहावे लागले आहे. ज्या उच्च शिक्षणासाठी नावजलेल्या संस्था आहेत. अशा संस्थात प्रवेश मिळविण्यासाठी भरमसाठ शुल्क असलेल्या शिकवण्या लावून गुणवत्ता यादीत येण्यासाठी प्रयत्न केले जातात. अशा ठिकाणेही श्रीमंताच्याच मुलांना प्रवेश मिळणार. परत पैशा अभावी दर्जेदार मार्गदर्शक/ अभावी, स्टडीमटेरीअलच्या अभावी ग्रामीण भागातील मागास भागातील आर्थिक दृष्ट्या मागास असलेली गुणवत्तापूर्ण क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना अशा शिक्षणापासून वंचित राहावे लागते. मात्र असे विद्यार्थी व्यवसायिक दृष्ट्यो उपेयोगी नसल ल्या सामाजिक शास्त्राकडे वळतात.

खाजगी उच्च शिक्षणाच्या अशा श्रीमंताच्या संस्थामधून गुणवत्ता संवर्धन व वर्धन होईलच याची हमी देता येणार नाही. त्याचबरोबर अशा खाजगी संस्थामधून शिक्षक, शिक्षकेत्तर, कर्मचारी यांच्या बाबतीत ''क्ळीश रपव ठळींश'' हे धोरण राबवून मनमानीपणे

त्यांचा वापर करून घेण्याची प्रवृत्ती वाढते आहे. त्यामुळे अशा गरजू कर्मचाऱ्यांचे शोषण होवू लागले आहे.

समाजातील वंचित घटक जसे अनुसूचित जाती, जमाती यांच्याकडे पुरेसे आर्थिक पाठबळ नसते असे घटक शिक्षणाच्या बदलेल्या व्यवस्थेमुळे, भरमसाठ शैक्षणिक शुल्कामुळे शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. कारण वाढते शुल्क, शैक्षणिक साहित्याचे वाढते दर, शिकविण्याचे शुल्क इ. मुळे शिक्षण घेणे परवडत नाही. समाजाचे दोन प्रमुख भागांमध्ये रूपांतर होईल. एक म्हणजे 'गाका' दुसरे म्हणजे 'परिघ' गाभ्यामध्ये श्रीमंताचा समावेश असेल. यांनाच आधुनिक व उच्च शिक्षण प्राप्त होईल. परिघामध्ये मध्यमवर्गीय, कनिष्ठ स्तरातील वर्गाचा समावेश होईल.

या खाजगीकरण, जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेमध्ये शिक्षणाचा जो मुख्य हेतू आर्थिक कायदा बनलेला आहे. त्यामुळे मुल्यशिक्षण व त्याद्वारे विद्यार्थ्यांच्या समातोल विकासाचे मूळ उद्देश पूर्णपणे बाजूला पडले आहे. परिणामी फक्त उद्योगासाठीच मनुष्यबळाच्या निर्मितीवर भर दिला जात आहे. शिक्षण हे सेवा न राहता तो व्यवसाय बनत चालला आहे. आणि तो पूर्णतः भांडवलदारांच्या नियंत्रणाखाली जात आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता शिक्षणाची संधी सर्व स्तरातील वर्गांना मिळावी या करीता खाजगी व शासनाच्या अनुदानित संस्था या दोन्ही घटकांचा समावेश असणे गरजेचे आहे. पण खाजगी संस्थावर शासनाचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. जेणे करून आर्थिक मागास घटकाला सुद्धा शिक्षणाची संधी प्राप्त होईल. नफ्यासोबत गुणवत्तेला संधी, समानतेसोबत आर्थिक बाजू. उपयुक्तते सोबत गुणवत्तेला संधी समानतेसोबतच आर्थिक बाजू उपयुक्तेसोबत उपलब्धता याची सांगड घालणे गरजेचे आहे.

### ६.२.३.३. स्त्री शिक्षणाच्या समस्या

भारतातील अजूनही ७०% लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. धर्माचा प्रभाव, कालबाह्य रूढी, प्रथा, परंपरा, अज्ञान, अंधश्रद्धा इ. विघातक कृत्याना बळी पडलेल्या या समाजात स्त्री हा महत्त्वाचा घटक आहे. तरी सुद्धा तीची सतत अवहेलना होते आहे. आजही भारतात मुलीचा जन्म म्हणजे दुःखद घटना समजली जाते. तिच्या जन्मापासून मृत्यू पर्यंत तिला दुय्यम स्थान दिले जाते. जी नवनिर्मितीस सक्षम आहे. जिच्यामुळे आपण जन्माला आलो आहोत अशा स्त्रीला आपण दुय्यम लेखणे म्हणजे नवनिर्मितीला कमी लेखणे होय. याची जाणीव समाजातील प्रत्येक सदस्याला करून देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात स्त्री शिक्षणाबाबतची उदासिनता व शिक्षणाची दुरावस्था याल कारणीभूत आहे.

भारतात स्त्री जन्मापासूनच तिच्या खडतर आयुष्याची सुरुवात होते. तिच्या लहानपणा पासूनच 'स्त्रिचे' संस्कार केले जातात. तू मुलगी आहेस याची जाणीव करून दिली जाते. समान वागणूक दिली जात नाही. अशी स्त्रियांच्या व्यक्तीमत्व विकास विरोधी मानसिकतेत सुधारणा होणे गरजेचे आहे. शिक्षणात येणाऱ्या समस्यापुढील प्रमाणे आहेत –

**(१) स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक :–** भारतीय समाजात स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. याचे कारण म्हणजे पुरुष प्रधान संस्कृती हे होय. स्त्री ही बौद्धिकदृष्ट्या

कमकुवत असते. असे मानून तिला शिक्षणपासून वंचित ठेवले जाते. तिला घरकामात लक्ष देण्यासाठी तिला प्रवृत्त केले जाते.

**(२) स्त्री–शिक्षणासंदर्भात उदासिनता :–** भारतात स्त्री–शिक्षणासंदर्भात भारतीय स्त्रीचे कार्यक्षेत्र म्हणजे 'चूल आणि मूल' ऐवढेच मानले जाते. तिला लिहण्या–वाचण्या ऐवढेच शिकविले जाते. ग्रामीण भागामध्ये तर एवढेही शिकवले जात नाही. शिक्षणाबाबत तिच्या मनात लहानपणापासून नैराश्य, घरातील व आजूबाजूच्या परिसरातील लोक निर्माण करतात.

**(३) ग्रामीण भागात शाळा व सुविधांचा अभाव :–** ग्रामीण भागात विशेषतः दुर्गम भागात प्राथमिक शाळाच नाहीत अशा वेळेस पालक आपल्या मुलींना शेजारच्या खेड्यात पाठविण्यास उत्सूक नसतात. जरी प्राथमिक शाळा असली तसीूलभूत सोयी–सुविधा नसल्या कारणानेसुद्धा मुलींना शाळेत पाठवित नाहीत.

**(४) शैक्षणिक समानतेचा अभाव :–** भारतात सर्व सामाजिक स्तरांमध्ये मुलांच्या तुलनेत मुलींवर कमी खर्च केला जातो. सहाजिकच मुलींना शिक्षणाच्या कमी संधी प्राप्त होतात. त्यामुळे स्त्रियांना पुढचे शिक्षण व खर्चिक शिक्षण देण्यासाठी पालक उदासिन असतात.

**(५) गळतीची समस्या :–** मुलांच्या तुलनेमध्ये मुलीचे शिक्षणातील गतीचे प्र जास्त आहे. त्याचप्रमाणे शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात मुलीच शैक्षणिक गळतीदर जास्त असल्याचे आढळून येते. आर्थिक मागासलेपणा, आई–वडीलांचा अशिक्षितपणा, परंपराप्रीय, रूढीप्रीय, संकुचीत दृष्टिकोन, निरस अभ्यासक्रम शिक्षकांची कमी संख्या व त्यांची ग्रामीण भागात काम करण्याची उदासिनता इ. कारणे मुलींच्या गळतीसाठी कारणीभूत आहेत.

**(६) दोषपूर्ण अभ्यासक्रम :–** वर्तमान अभ्यासक्रम हा अगदीच निरस, दोषपूर्ण अव्यवहारी असा आहे. या अभ्यासक्रमातून विशेषतः मुलींना भविष्यकाळात स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी उपयोगी पडत नाही. या अभ्यासक्रमातून बदलत्या परिस्थितीशी समायोजन साधण्याची क्षमता यात नाही. सामाजिक, औद्योगिक, आर्थिकबदल लक्षात घेवून अभ्यासक्रमाची रचना असणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या ि क्षणाकडे मुली वळत नाही व पालकांची भूमिका पण 'शिकून काय उपयोग' अशी असते.

**(७) आर्थिक समस्या :–** वर्तमान शिक्षण हे खर्चिक होत चालले आहे. खाजगीकरणामुळे आर्थिक मागास वर्ग उत्तर दर्जाच्या शिक्षणापासून वंचित राहतो आहे. शासनाने मुलांपेक्षा मुलीच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. पण तसे त्याप्रमा ात होताना दिसत नाही. मुलीसांठी विशेष शैक्षणिक उपाय योजनाची गरज आहे. जेणेकरून आर्थिकदृष्ट्या मागास वर्गातील पालकसुद्धा त्यांच्या मुलींनोतशाळेवू शक ल.

**(८) अपुरी शिक्षक संस्था :–** प्राथमिक, उच्चमाध्यमीक स्तरावर प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता असल्याकारणामुळे ग्रामीण भागातील अनेक शाळा बंद पडल्या आहेत. परिणामी ग्रामीण भागातील मुली शिक्षणापासून वंचित राहात आहेत. तसेच मुलीच्या शाळेत येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी महिला शिक्षकांची आवश्यकता असते पण महिला शिक्षकांची

आवश्यकता असते. पण महिला शिक्षकांची संख्या पण अपुरी आहे. यामुळे पालक सुरक्षेच्या पोटी मुलींना शाळेत पाठवत नाहीत. अशा अनेक कारणांमुळे मुलीचे शिक्षण क्षेत्रातील प्रमाण मुलांच्या तुलनेत कमी आढळते.

### ६.२.३.१ अनुसूचित जातीच्या शैक्षणिक समस्या

अनुसूचित जातीच्या शैक्षणिक मागासलेपणासाठी तत्कालीन भारत च सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय परिस्थिती कारणीभूत आहे. या परिस्थितीमुळे त्यांना शिक्षणाच्या संधीपासून वंचित करण्यात आले. ते पिढ्यान्पिढ्या निरक्षर रहिले. स्वातंत्र्यानंतर अनुसूचित जातीच्या शिक्षणावर लक्ष केंद्रीत करण्यात आले, असे असले तरीही अजूनही ते इतर जातीच्या शैक्षणिक प्रगतीच्या तुलनेत मागासलेलेच आहेत. अनुसूचित जातीच्या मागासलेपणाची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत –

**(१) आर्थिक मागासलेपणा :–** अनुसूचित जातीमध्ये अजूनही मोठ्या प्रमाणात आर्थिक मागासलेपणा आढळून येतो. परिणामी कुटुंबातील सर्व सदस्यांना कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी मजुरी करणे आवश्यक असते. त्यामुळे घरातील मोठ्या भावंडाना त्याच्या लहान भावडांना सांभाळणे व घराकडे लक्ष देणे असे काम करावे लागते. काही ळेस घरातील लहानमुले सुद्धा ढाब, हॉअेल इ. ठिकाणी कामावर जातात. त्यामुळे त्यांना शिक्षण घेणे शक्य नसते.

**(२) शिक्षणाप्रती उदासिनता :–** आई–वडील अज्ञानी, निर्धन असल्यामुळे त्यांना शिक्षण म्हणजे वेळ वाया घालविणे असे वाटते. त्यापेक्षा मुलांनासुद्धा त्यांचे सोबत ते कामावर नेतात. शाळेत जावून वेळ वाया घालविण्यापेक्षा ाम क ल्यास दोन पैसे जास्त मिळतील. या भावनेपोटी ते मुलाला शाळेत पाठवत नाहीत. तसेच शिकून काय फायदा, शिकून झाल्यावर सुद्धा हेच काम करावे लागते. त्यापेक्षा आत्तापासूनच काम केल्यास आर्थिक फायदा होईल अशी त्यांची भूमिका असते.

**(३) सामाजिक, रूढी प्रियता, अयोग्य चालीरिती व अंधश्रद्धा** :– पूर्वी कनिष्ठ जातीतील लोकांना शिक्षण घेण्यास बंदी होती. जातीचा जो व्यवस य असेल तेच व्यवसाय करावा लागे. पण ब्रिटिश भारतात आल्यानंतर सर्वांना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध झाली पण सामाजिक परिस्थिती न बदलल्याने, धर्माच्या प्रभावामुळे शिक्षणाचा प्रसार जेवढा व्हावयास हवा तेवढा झाला नाही. स्वातंत्र्यानंतर सुद्धा घटनात्मक तरतुदी केल्या गेल्या, योजना राबविल्या गेल्या पण त्या त्यांच्या पर्यंत पोहचल्या नाही. काही ठिकाणी अजूनही पिठ्यान्पिढ्या चालत आलेला व्यवसाय त्यांना करावा लागतो आहे. शिक्षण घेतल्यास वा उच्च शिक्षण घेतल्यास गाव बहिष्कृत केले जाते अशी परिस्थिती काही ठिकाणी आजही आढळून येते.

**(४) शासकीय शैक्षणिक योजनापासून वंचित :–** अनुसूचित जातीमधील सर्व जातींना आजूनही शासकीय सवलतीचा फायदा घेता आला नाही. त्यातील काही विशिष्ट जमिनी शैक्षणिक फायदा करून घेतला पण काही जातींना मात्र म्हणावी तशी प्रगती करता आली नाही. महाराष्ट्रातील काही जाती शैक्षणिकदृष्ट्या अजूनही मागासलेल्याच आहेत.

**(५) राखीण जागांना विरोध :–** घटनेत अनु. जातीना शासकीय नौकरीत विशिष्ट जागा राखीव ठेवल्या आहेत. पण आजूनही समाजातील काही जाती या आरक्षणाला विरोध करतात व निमशासकीय, शासकीय नौकरीतील आरक्षणाच्या जागा भरल्या जात नाहीत. तसेच शैक्षणिक क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या ज्या प्रमाणात जागा भराव्यास हवे तेवढ्या जागा भरल्या जात नाहीत. परिणामी अनु. जातीतील शिक्षणास इच्छूक मूले शिक्षणपासून वंचित राहतात.

**(६) गळतीचे प्रमाण जास्त :–** 'गळती' म्हणजे विद्यार्थ्यांना १ ते ४ वर्गाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण न करता मध्येच शाळा सोडून देणे. संपूर्ण साक्षरतेच्या आगोदरच अकाली शाळा सोडून जाणे म्हणजे गळती होय. अनु. जातीच्या मुलांमध्ये गळतीचे प्रमाण तुलनेत जास्त आहे. कारण घरची आर्थिक परिस्थिती वाईट असल्यामु ळ च शाळकरी मुलाला घरची जबाबदारी उचलावी लागते. तसेच वर्तमान स्थितीतील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या गरजा भागवू शकत नाही. त्यामुळे अनु. जातीमधील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण जासत आहे.

**(७) मार्गदर्शनाचा अभाव :–** मार्गदर्शनाच्या अभावामुळेसुद्धा अनेक मुले शि घेण्यापासून वंचित आहेत. अनु. जातीतील अनेक पालक निरक्षर असल्यामुळे त्यांना त्याच्या मुलांना शिक्षणासंदर्भात मार्गदर्शन वा प्रेरणा देण्याची आवश्यकता असणे पण त्याच्या अभावाच्या पोटी पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवत नाहीत. तसेच शिक्षण घेतल्यामुळे होणारे फायदे व न घेतल्यामुळे होणारे नुकसान या संदर्भात त्यांना योग्य मार्गदर्शन झाल्यास शिक्षणपासून मुले वंचित राहणार नाहीत.

**(८) जातीची बंधने :–** अगदी प्राचीन कालखंडापासून कनिष्ठ, अस्पृश्य जातींना शिक्षण घेण्यावर बंदी होती. ब्रिटिश सत्तेत त्यांनी शिक्षणासाठीची दारे खुले केली तरीही रूढी, परंपरा, पुनर्जन्म सिद्धांत, कर्म सिद्धांत इ. मुळे त्यांनी शिक्षण घेतले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, फुले, शाहू महाराज इ. च्या प्रयत्नामुळे जागृती झाली पण म्हणावा तेवढा प्रतिसाद कनिष्ठ जातीतील सर्व जातींकडून मिळाला नाही. स्वातंत्र्यानंतर सुद्धा अनेक उपाययोजना करून सुद्धा आजही सर्वात कमी साक्षरता कनिष्ठ जातीतच आढळून येते. जातीची बंधने अजूनही पाळली जातात. मुख्यतः ग्रामीण भागात, मागास राज्यात अशी परिस्थिती आढळून येते.

अशी अनेक व इतर अनेक समस्यांमुळे अनुसूचित जातीमध्ये मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक समस्या आढळून येतात.

### ६.२.३.२ अनुसूचित जमातीच्या शैक्षणिक समस्या

अनुसूचित जमातीच्या शैक्षणिक मागासलेपणाचे प्रमुख कारण म्हणजे मुख्य समाजापासून त्यांची अलगता. हे शैक्षणिक मागासलेपण दूर करण्याचे अनेक उपाय स्वतंत्र भारतात केले गेले असले तरी या जमाती शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्याच आहेत. त्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत –

**(१) भटक जमीन :–** अजूनही काही आदिवासी जमाती त्यांच्या उदर निर्वाहासाठी

जंगलामध्ये सतत भटकत असतात. त्यामुळे त्यांच्या मुलांना शाळेत पाठविने शक्य नसते. ते दुर्गम भागात असल्यामुळे सद्धा तेथे शाळा नसतात. त्यामुळे सुद्धा शिकणे शक्य होत नाही.

**(२) भाषेची समस्या :–** प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र बोली भाषा असते. शाळेमध्ये प्रमाण नागरी भाषेतून शिक्षण दिले जाते. त्यामुळे आदिवासी मुले शाळेत गेल्यानंतर शिक्षकाशी बोलताना मोठ्या प्रमाणात अडथळे येतात. तसेच पुस्तकांमधील भाशा सुद्धा मराठीच असल्या कारणाने जी त्यांना समजत नाही. अशा परिस्थितीत त्यांचे शाळेत मन लागत नाही. एक न्यूनगंड निर्माण होता. त्यामुळे ते शाळा सोडून देतात.

**(३) शिक्षणाप्रती उदासिनता :–** प्रचिलीत शिक्षण पद्धती ही मुख्य प्रवाहातील सामाजिक घटकांना गृहीत धरून आखलेली आहे. ती पद्धती आदिवासी जमातीला उपयोगी नाही. आदिवासी जमाती जंगलात राहात असल्यामुळे दुर्गम प्रदेशांत राहात असल्यामुळे त्यांना उदरर्निवाहासाठी भटकंती करणे क्रमप्राप्त आहे. एका ठिकाणी राहून उदरनिर्वाह करणे शक्य नसते. जर मुलांना शाळेत पाठविण्यास एका ठिकाणी राहावे लागेल. त्यापेक्षा न शिकलेलेच बरे ही भावना निर्माण झाली. 'शिकून काय करायचे' हा दृष्टिकोन रूजला. त्यामुळे त्यांच्या शिक्षणाप्रती उदासिनता मोठ्या प्रमाणात निर्माण झाली.

**(४) दारिद्र्य :–** आदिवासी जमातीमध्ये दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे. एक तर ते दुर्गम भागात वस्ती करून राहतात. जंगलाची अनेक कायद्यामुळे त्यांचे जंगलावर अवलंबून असलेली उदरनिर्वाची साधने संपुष्ठात आली. परिणामी इतर कामे करावी लागतात. बाहेरच्या जागचे व्यवहारीक ज्ञान नसल्या कारणामुळे त्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक होती. त्यामुळे कुटुंबातील प्रत्येक सदस्याला अर्थप्राप्तीसाठी काम करावे लागते. त्यात लहान मुलांचा सुद्धा समावेश आहे. ही मुले जंगलातील फळे गोळा करून विकणे, मध विकेण, लाकडी मोळ्या विकणे असे उद्योग उदरनिर्वाहासाठी करतात त्य मुळे शाळेत जाण्याचा प्रश्न निर्माण होत नाही.

**(५) शाळेचे वातावरण अनुकूल व वाटणे :–** आदिवासी जमाती जंगल परिसरात वास्तव्यास असल्याकारणाने त्यांना तशा वातावरणाची सवय पडलेली असते. तसेच वेशभूषा ही भिन्न असते, बोली भाषा भिन्न असते, राहणीमान, वर्तनव्यवहार भिन्न असतात. शाळेत मात्र या सर्वांच्या विपरीत परिस्थिती असतात. शाळेत गणवेश घालून जावे लागते. शाळेत गेल्यावर शिक्षक व इतर वर्ग मित्रांशी आंतरक्रिया करताना मराठीतूनच करावी लागते. शाळेत वावरताना विविध नियमांचे पालन करावे लागते. हे सर्व त्यांना न मानवणारे असते परिणामी ते शाळेतच जात नाहीत.

**(६) दुर्गम भागात वस्ती :–** आदिवासी जमातीची वस्ती अत्यंत दुर्गम भागात, कडे कपारित व निखुरलेली असते. अशा ठिकाणी त्यांच्यासाठी शाळा सुरू करणे शक्य नसते. जरी शाळा असली तरी इतर वस्तीची मुले नद्या, नाले, डोंगर, कप री ओलांडून शाळेत दररोज येणे शक्य नसते. कारण पावसाळ्यात पुरसदृश्य परिस्थिती असते. उन्हाळ्यात ऊन मोठ्या प्रमाणात असते अशा अनेक कारणामुळे ते शाळेत जात नाहीत.

**(७) शिक्षकांची उदासिनता :–** आदिवासी पाड्यावरच्या शाळेत काम करण्याची

शिक्षकांची इच्छा नसते. कारण तिथे मूलभूत सुविधांचा अभाव मोठ्या प्रमाणात असतो. तसेच शाळा सुद्धा मुख्य वस्तीपासून दूर असल्याकारणाने शाळेपर्यंत चालत जाण्याशिवाय पर्याय नसतो. त्यामुळे शिक्षक अशा ठिकाणी काम करण्यास उत्सूक नसतात. शिक्षा म्हणून काही शिक्षकांना अशा ठिकाणी पाठविले जाते. पण असे शिक्षक महिन्यातून कधीतरी शाळेत हजेरी लावतात. त्यामुळे आदिवासी पाड्यावरील मुले शिक्षणापासून वंचित राहतात.

अशा प्रकारे आदिवासींच्या या अनेक शैक्षणिक समस्या आपल्याला ाढळून येतात.

## ६.२.४. प्रौढ शिक्षण

प्रौढ शिक्षण अनौपचारिक शिक्षणाचा महत्त्वपूर्ण घटक आहे. साक्षरता दर हा विकासाचा निर्देशांक आणि त्याचवेळी मूल्यमापनाची ती एक मोजपट्टी आहे. जागतिक स्तरावर विचार करता प्रत्येक ५ व्यक्तीमागे १ व्यक्ती निरक्षर आहे. एकूण लोकसंख्येपैकी १६% प्रौढ लोकसंख्या ही निरक्षर आहे. त्यापैकी २/३ स्त्रिया आहेत. यामुळेच संयुक्त राष्ट्रसंघाने २००३–२०१२ हे दशक 'साक्षरता दशक' म्हणून जाहीर केले.

प्रौढ शिक्षणाची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे.

औपचारिक शिक्षणाबाहेर असणाऱ्या प्रौढांना माहिती व ज्ञान यांच्य सोबत जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक त्या कौशल्यांचा विकास घडवून आणण्यासाठी दिल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक कार्यक्रमाचा समूच्यय म्हणजे प्रौढ शिक्षण होय.

प्रौढ शिक्षणाची आवश्यकता

(१) व्यक्ती विकासा साधने.

(२) मूलभूत व अद्यायावत कौशल्य प्रदान करणे.

(३) व्यवसायिक कार्यक्षमता निर्माण करणे.

(४) आरोग्यपूर्ण जीवन जगण्यासाठी मदत करणे.

(५) भावनिक एकात्मता व राष्ट्रीय एकता साध्य करणे.

(६) वैज्ञानिक विचारसरणीचा प्रसार करणे.

(७) सामाजिक कार्यामध्ये संरचनात्मक सहभाग वाढविणे.

या वरील परिस्थितीची पूर्तता करण्यासाठी प्रौढ शिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला.

केंद्र शासनाने २ ऑक्टोबर १९७८ साली प्रौढ शिक्षण कार्यक्रमाची सुरुवात केली.

## ६.३. पारिभाषिक शब्द

गळतीची समस्या

प्राथमिक शिक्षणाचा पाया यशस्वीपणे पूर्ण होण्याअगोदरच विद्यार्थ्यांने शाळा सोडणे या समस्येला गळतीची समस्या असे म्हणतात.

भारतीय राज्यघटनेच्या सूचीमध्ये ज्या जातींचा समावेश असलेल्या जातींना अनु. जाती असे म्हणतात.

खाजगीकरण

शासन नियंत्रित संघटना किंवा शिक्षण समूह यांच्यावर खाजगी चालकांचे नियंत्रण प्रस्थापित होणे म्हणजेच खाजगीकरण.

## ६.४. स्वाध्याय

दीर्घोत्तर प्रश्न

१)अनुसूचित जातीच्या शैक्षणिक समस्या काणेत्या त्या सविस्तर वर्णन करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

२)स्त्रियांच्या शैक्षणिक समस्यांची चर्चा करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

३)वाढते शैक्षणिक शुल्कांच्या पराभवाची चर्चा करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

४)अनुसूचित जमातीच्या शैक्षणिक समस्याची चर्चा करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

## ६.५. सारांश

## ६.६. संदर्भग्रंथ

श्र अकोलकर ग. वि., 'समाज संस्कृती आणि शिक्षण', विद्या प्रकाशन, नागपूर, १९७३

श्र डॉ. बोवडे प्रकाश, 'भारतीय समाजरचना पारंपरिक व आधुनिक', मंगेश प्रकाशन, नागपूर – १९९४

श्र डॉ. साळुंखे सर्जेराव, 'समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना'', नरेंद्र प्रकाशन, पुणे, १९९६